# शिवपुत्र संभाजी

( साधार, विवेचनात्मक चरित्र )

डॉ. सौ. कमल गोखले

ज्ञान-विज्ञान विकास मंडळ,

१३९३ शुक्रवार पेठ, बाजीराव रस्ता, पुणे २.

TITLE : SHIVAPUTRA SAMBHAJI
(Authoritative and critical biography)

AUTHOR : Dr. Mrs. Kamal Shrikrishna Gokhale
1393, Shukrawar Peth, Bajirao Road,
Poona-2. (Maharashtra State, India)

PUBLISHERS : Shri Shrikrishna Purushottam Gokhale
Dnyan-Vidnyan Vikas Mandal,
1393 Shukrawar Peth,
Bajirao Road, Poona-2, India.

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती
मंडळाने अनुदान देऊन गौरविलेले



**द्विबिंदु वर्गांक :** व्ही २ : वाय् ७ : के : ५७ : जी

**दशांश वर्गांक :** ९२३. १५४

**प्रथम आवृत्ती :** पुण्यतिथी दिन :
शक १८९२, फाल्गुन वद्य ३०
शुक्रवार दि. २६ मार्च १९७१

**मुद्रक :** श्री. य. गो. जोशी
आनंद मुद्रणालय, १५२३ सदाशिव पेठ,
पुणे ३०

**प्रकाशक :** श्री. पु. गोखले, ज्ञान-विज्ञान विकास मंडळ,
१३९३ शुक्रवार पेठ, बाजीराव रस्ता, पुणे २.

**मूल्य :** सव्वीस रुपये.

# आशीर्वाद

सौ. डॉ. कमल गोखले यांनी श्री छत्रपती संभाजी यांच्या चरित्राचा अभ्यास अनेक वर्षांपासून चालविला आहे. त्या विषयावर मुंबई विद्यापीठाच्या पीएच्. डी. ( डॉ. ऑफ फिलॉसफी ) पदवीसाठी त्यांनी इंग्रजी प्रबंध सादर केला. प्रबंधाचा मी एक परीक्षक होतो. त्यांची तोंडी परीक्षाही झाली, आणि नंतर त्यांना पदवी देण्यात आली. हा आपला मूळ प्रबंध आधारास घेऊन आणि त्यानंतरच्या कित्येक वर्षांत आणखी मिळालेली माहिती अभ्यासून " शिवपुत्र संभाजी " हा संभाजी चरित्रपर मराठी ग्रंथ प्रकाशित करून पुण्याजवळ भीमाकाठी वढू येथे असलेल्या छत्रपती संभाजी महाराजांच्या वृंदावनासमोर फाल्गुन वद्य अमावस्या शके १८९२ या संभाजी महाराजांच्या श्राद्धतिथीस त्यांच्या स्मृतीस अर्पण केला.

हा ग्रंथ सुमारे छापील साडेपाचशे पृष्ठांचा आहे. हा ग्रंथ शुद्ध ऐतिहासिक आहे. शुद्ध ऐतिहासिक म्हणजे काय? तर जो पूर्वकालीन घटितांच्या विश्वसनीय आणि प्रमाणभूत अशा विविध साधनांच्या आधारे लिहिलेला असतो तो. आधारास घेतलेल्या साधनांची माहिती शेवटी ग्रंथात जोडलेली आहे. समकालीन घटना प्रत्यक्ष पाहिलेल्यांनी किंवा दुसरी माहिती मिळवून तयार केलेले साधन ग्रंथ हा एक साधनांचा प्रकार. पश्चात्कालीनांनी पण अस्सल साधनांच्या आधारे लिहिलेल्या हकीकती हा दुसरा प्रकार. याचा आधार घटित निश्चितीकरिता पहिल्या प्रतीचा धरून केलेले लिखाण ते शुद्ध ऐतिहासिक म्हणावे. असे साहित्य विविध प्रकारचे, अनेक भाषांत विखुरलेले, गद्यात किंवा पद्यात लिहिलेले आढळते. या समकालीन साहित्यातही लेखकाच्या मातब्बरीप्रमाणे माहिती ग्रथित केलेली असते. मातब्बरीप्रमाणेच लेखकाचा पक्ष, परिस्थिती, ज्ञान आणि अभिनिवेश याचाही विचार करावा लागतो. बाजारी माहिती, दरबारी माहिती, खाजगी माहिती असेही प्रकार निवडावे लागतात. शिवाय या समकालीन लिखाणातील संगती, विसंगती शोधावी लागते. कालस्थलासंबंधीच्या चुका हुडकून काढाव्या लागतात. असे पुष्कळ परिश्रम करून घटितनिश्चिती करावी लागते. मग निश्चित केलेली घटिते संगतवार लावून त्यावरून प्रकरणांची सजावट करून हाती घेतलेला विषय पुरा करावा लागतो. अभ्यासकाला सर्वच भाषा येतात असे

नाही; तेव्हा जाणकारांच्या साहाय्याने बिनचूक भाषांतरे संपादन करावी लागतात. असा प्रपंच आणि खटाटोप, शुद्ध ऐतिहासिक रचनेसाठी अवश्य असतो.

दुसरा प्रकार शबल इतिहासाचा. याला ऐतिहासिक असे नाव देतात; पण तो शुद्ध इतिहास नव्हे. ऐतिहासिक कादंबऱ्या, कथा, कहाण्या, नाटके, काव्ये ही सर्व या शबल वर्गात मोडतात. शुद्ध इतिहासाचे काम हे शबल ग्रंथ भागवू शकत नाहीत. येथे प्रतिभेचा आणि शैलीचा प्रश्न उत्पन्न होतो. शुद्ध आणि शबल या दोन्ही प्रकारांत या गुणांची महती मानावी लागते. शैली नसलेले लिखाण गोडीने वाचणारा वाचक विरळा. निदान सरळ आणि सुबोध अशी शैली असावी. अगदी प्रामाणिक शुद्ध इतिहास पुष्कळदा शैलीअभावी अत्यंत कंटाळवाणे होतात. वाचकाचे मन लागत नाही. आता घटितांची जुळणी करताना किंवा संगती लावताना साधनांचा आधार पुष्कळदा मिळत नाही; तेव्हा लेखक आपल्या बुद्धीच्या आणि प्रतिभेच्या बळावर मांडणी करतात. ही जुळणी विवाद्य असू शकते. निश्चित आणि पक्के झालेले घटित बदलू शकणार नाही. पण प्रतिभेचा खेळ बहुरंगी होऊ शकेल.

उत्तम कोटीचे कवी, कथाकार यांचे मुख्य बळ हे प्रतिभाबळ होय. आणि प्रतिभासंपन्न शुद्ध इतिहासकार हाही त्या बळावर घटनांची संगती लावतो, घटनांचे अर्थ स्पष्ट करतो, गूढे उकलून दाखवतो. पण येथे हे लक्षात घेतले पाहिजे की, कवि, कथाकारांची प्रतिभा ही एक जातीची आणि प्रमाणवादी शुद्ध इतिहासकाराची प्रतिभा ही दुसऱ्या जातीची किंवा भिन्न जातीची. कवी अनुभवाच्या आणि स्फूर्तीच्या आधारे प्रतिभा प्रकट करतो आणि ऐतिहासिक पंडित हा मानवी इतिहासाच्या सूक्ष्म अवलोकनाने, मननाने आणि चिंतनाने परिष्कृत झालेली प्रतिभा वापरतो. कवि-कथाकारांची प्रतिभा स्वैर संचार करू शकते. शुद्ध ऐतिहासिकांची प्रतिभा अभ्यासाने परिनिष्ठित झालेली असते. कवि कथाकार यांच्या मनात, ऐतिहासिक विषय येतो तेव्हा तो त्या विषयाकरिता शुद्ध ऐतिहासिकाप्रमाणे घटित-निश्चितीची तपश्चर्या करीत नाही. कच्चा ऐतिहासिक माल घेऊन त्याला आपल्या आवडीचा रंग देऊन कार्यसिद्धी करतो. तो लोकप्रिय झाला तरी त्याच्या लिखाणाला इतिहास म्हणणे ही भ्रांती होईल. एवढा भेद नीट लक्षात वागवून चालले असता, जिज्ञासू वाचकांचा घोटाळा होणार नाही.

लोक असा घोटाळा हमेश करतात आणि मग अधिकाराच्या प्रश्नावरून वाद होतात. कविकथाकारांना किंचित ऐतिहासिक वाटणाऱ्या घटितांच्या आधारे प्रतिभेच्या गगनात मुक्त संचार करण्याचा पूर्ण अधिकार आहे. त्यांनी ऐतिहासिक शब्द पाटीवर रंगवला, तर तसे रंगवण्याचाही त्यांना अधिकार आहे. सावधान असावयाचे ते वाचकांनी. तेव्हा शुद्ध इतिहास पाहिजे असेल, तर त्यांनी कवि-कथाकारांच्या बाजारात हिंडू नये. शुद्ध इतिहासाच्या मंदिरातच जावे. मंदिर निराळे,

रंगभूमी निराळी. एवढी दक्षता घेतली म्हणजे वादाचे काही कारण नाही. प्राचीन साहित्यकारांचाही तसाच आदेश आहे. कवि-कथाकार काल्पनिक पात्रे निर्माण करतात, त्यांना किंवा त्यांच्या बोलण्याला कथा किंवा काव्यच मानावे. इतिहास समजू नये. असे केल्याने सर्वांना व्यवस्थित जाग येईल.

हे खरे असले तरी, जनमनावर पकड कवि-कथाकारांचीच अधिक असणार; पण त्याला उपाय नाही. अथवा एकच आहे. शुद्ध ऐतिहासिकांनी, सुबोध अथवा प्रासादिक आणि शक्य असेल तर प्रातिभ असे लेखन उपलब्ध करून द्यावे. म्हणजे कवि-कथाकारांचेही कार्य सुकर होईल.

म्हणूनच आम्ही सौ. डॉ. कमल गोखले यांनी लिहिलेल्या "शिवपुत्र संभाजी" या ग्रंथाची भलावण करतो. अनेक कारणांस्तव डॉ. कमल गोखले या धन्यवादास पात्र आहेत. त्यांच्यासारखी पदवी-विभूषित स्त्री क्वचित अशा इतिहासाकडे वळली हा एक विशेष. त्यांचे पती श्री. श्री. पु. गोखले यांचे संपूर्ण उत्तेजन त्यांच्या पाठीशी असले तरी संसार संभाळून वर्षानुवर्षे त्या इतिहास—अभ्यासात रमून गेल्या हा दुसरा विशेष. जिथे पुरुष सुद्धा वाऱ्याला उभे राहत नाहीत, सहकारी, साहाय्यक, उत्तेजक मिळत नाहीत, कंटाळवाणी वाटचाल एकट्यानेच करावी लागते, अशा इतिहासप्रांतात त्या रमल्या. "द्राक्षापाक" सोडून त्यांनी "नारिकेलपाकाची" आवड धरली. हा तिसरा विशेष. डॉ. कमल गोखले यांच्या या प्रयत्नामुळे संसाराची आणि भावी पिढीची सूत्रे बव्हंशी ज्यांच्या हाती असतात ते नारीमंडळ त्यांच्याकडे कौतुकाने पाहील, त्यांच्या आदर्शामुळे उत्तेजित होईल आणि आमचे रुक्ष इतिहासक्षेत्र सहानुभूतीने भिजवील. हा एक मोठाच लाभ म्हणावा लागेल.

आमचे मित्र इतिहाससंशोधक श्री. वासुदेवराव बेंद्रे यांनीही भरपूर माहितीने भरलेला असा विस्तृत ग्रंथ संभाजी चरित्रावर लिहून प्रकाशित केलेला आहे. या दोन्ही ग्रंथांच्या वाचनामुळे श्री छत्रपती संभाजी महाराजांच्या चरित्राचे वास्तव स्वरूप जनतेच्या मनावर ठसा उमटवील असा मला भरवसा आहे. यापूर्वी जी संभाजी-चरित्रे लोकांसमोर होती, त्यात तो व्यसनी, राज्य घालविणारा अशी त्याची प्रतिमा रंगवलेली दिसे. आता या दोन्ही चरित्रांवरून आपल्या विश्वविख्यात पित्याच्या पश्चात् संभाजीने अनेक शत्रूंशी चौहोबाजूंनी कशी टक्कर दिली आणि पराक्रम केवढा गाजवला त्याची यथार्थ कल्पना वाचकांना येईल. तरी स्वराज्याकरिता धडपडणाऱ्या आपल्या थोर पित्याच्या समक्षच संभाजी दिलेरखानाकडे गेला हा त्याच्या चरित्रावरील डाग कधीही पुसून जाणार नाही! संभाजी नुसता शूर नव्हता, तर संस्कृत जाणणारा सुसंस्कृत होता आणि शेवट असीम धैर्याने आणि बाणेदारपणाने तो वागला ही त्याची कीर्तीही कधीच पुसली जाणार नाही. त्याच्या या कीर्तिसूर्याचे दर्शन डॉ. कमल गोखले यांच्या प्रस्तुतच्या

शुद्ध ऐतिहासिक ग्रंथाने जनतेला घडेल याचा मला फार हर्ष होतो. आमचे मित्र वासुदेवरावजी बेंद्रे यांनी पंचवीस तीस वर्षांपूर्वीपासून संभाजीच्या चरित्रावरील डाग काढून टाकून त्याचे उज्ज्वल चरित्र अभ्यासण्यासाठी आणि प्रकाशित करण्यासाठी "श्री छत्रपती संभाजी चरित्र कार्यालय" अनेक वर्षे चालविले होते, त्याची या निमित्ताने आठवण होते. पुन्हा एकवार सौ. डॉ. कमल गोखले यांचे आभार मानून त्यांचे या क्षेत्रात रमलेले मन यापुढेही असेच रमत राहो अशी मनापासून इच्छा प्रकट करतो.

मिति फाल्गुन वद्य ३०, १८९२
दि. २६ मार्च १९७१
पुणे

दत्तो वामन पोतदार

# चरित्राची वाटचाल

संभाजी राजांच्या चरित्राबद्दल काही कुतूहल आणि पुष्कळसे गैरसमज इतरांप्रमाणे माझ्याही मनात असल्यामुळे, अनेक संबंधित विद्वान मंडळींशी चर्चा केल्यावर मी हा विषय माझ्या डॉक्टरेटच्या प्रबंधासाठी निवडला होता. प्रथम मार्गदर्शक प्राध्यापक या नात्याने सेंट झेवियर कॉलेजचे डॉ. कोहेल्हो यांनी मला विद्यार्थिनी म्हणून घेण्याचे मान्य केले होते. परंतु काही तांत्रिक अडचणींमुळे त्यांना तसे करता आले नाही. त्यामुळे त्यांनीच मला एल्फिन्स्टन कॉलेजच्या डॉ. जी. एम्. मोरायस यांच्याकडे पाठविले. विषय अवघड; फारसे कागदपत्रही उपलब्ध नसल्याने माझे काम रेंगाळत होते. अखेर हे लक्षात येऊन डॉ. मोरायस यांनी मला त्यावेळी रुईया कॉलेजात असलेल्या डॉ. व. दी. राव यांच्याकडे पाठविले. रुईया महाविद्यालयाची विद्यार्थिनी म्हणून माझ्या कामाला वेग येईल असे मला वाटू लागले. तोच डॉ. राव अमेरिकेत एका वर्षासाठी प्राध्यापक म्हणून गेल्याचे मला वर्तमानपत्रावरून कळले. खरे म्हणजे मी माझ्या परीने या विषयाशी संबंधित असलेले सारे साहित्य वाचीत होते; टिपणे काढीत होते. परंतु मार्गदर्शनावाचून माझ्या कामाला गती येणे अशक्य होते.

प्रबंधात काही तरी नवीन, अप्रकाशित साहित्य वापरणे जरूर असते. या दृष्टीने प्रयत्न करू लागल्यावर साहजिकच मी प्रथम श्री. वा. सी. बेंद्रे यांच्याकडे गेले. श्री. बेंद्रे स्वतः तुकाराम महाराजांचे चरित्र लिहिण्यात गढून गेलेले होते. ते मला साहाय्य करतील आणि त्यांनी इंग्लंडहून आणलेले " फॅक्टरी रेकॉर्ड " मला वापरण्याची परवानगी देतील किंवा नाही याची शंकाच होती. पण प्रत्यक्षात वेगळाच अनुभव आला. त्यांनी थोडा विचार करून मला त्यांच्याजवळच्या सर्व टंकित कागदांच्या फायली देऊन मी 'War tactics of Sambhaji' असा विषय घ्यावा असे सुचविले. इतकेच नव्हे तर स्वतः मार्गदर्शन करावयाचे मान्य केले. त्यांनी दोन तीन वर्षे माझ्या प्रबंधासाठी सर्व प्रकारचे साहाय्य केले. मध्यंतरी श्री. बेंद्रे यांना सरकारी अनुदान मिळाल्याने १९६० साली त्यांनी स्वतःच 'छत्रपति संभाजी' हे त्यांचे पुस्तक प्रसिद्ध केले.

पुस्तक प्रसिद्ध झाल्यावर श्री. बेंद्रे यांचा या विषयातील रस कमी होणे साहजिकच होते. परंतु मी त्यांच्या बरोबर पेशवे दप्तर, आणि गुरुवर्य म. म.

पोतदार यांच्या संग्रहातील संभाजीकालीन सर्व साहित्याचा लाभ घेतला. इतरही पुष्कळ अनुभव मिळाला. श्री. बेंद्रे मुंबईला राहावयास गेले. दोन्ही मार्गदर्शक दूर असल्याने आणि मी मूळ निवडलेला विषय प्रबंधाला अपुरा आहे असे लक्षात आल्यामुळे माझे येथपर्यंतचे सर्व श्रम फुकट जाऊन, आता पुढे काय करावे असा प्रश्न माझ्यासमोर उभा राहिला.

श्री. बेंद्रे यांचे 'छत्रपती संभाजी' हे पुस्तक मी अभ्यासले. त्यांनी आपल्या मोठ्या ग्रंथात महत्त्वाची व उपलब्ध माहिती व अनेक साधने वापरलेलीच नव्हती. श्री. शं. ना. जोशी यांचा 'संभाजीकालीन पत्रसारसंग्रह', म. म. पोतदार यांनी प्रसिद्ध केलेले संभाजी महाराजांचे दानपत्र, सुप्रसिद्ध इतिहास-संशोधक आणि गोव्याचे रहिवासी कै. डॉ. पांडुरंगपंत पिसुर्लेकर यांचे गोव्यावरील लिखाण, पुण्याच्या भारत इतिहास संशोधन मंडळाने प्रसिद्ध केलेले विपुल साहित्य श्री. बेंद्रे यांच्या पुस्तकात अभावानेच तळपत होते.

कै. गो. स. सरदेसाई यांनी आपल्या 'उग्रप्रकृती संभाजी' या पुस्तकात संभाजीविषयी रूढ असलेले गैरसमज त्यावेळच्या उपलब्ध साधनांचा उपयोग करून दूर करण्याचा प्रयत्न केलेला होता.

ही प्रकाशित साधने मला वापरता येतील असे ध्यानात आल्यावर मला पुन्हा हुरूप आला. परंतु प्रबंधासाठी नवे व शक्यतो अप्रकाशित साहित्य कोठून मिळवावे हा प्रश्न शिल्लकच होता. कै. सरदेसाई यांच्या इंग्रजी पुस्तकात संभाजी राजांनी अंबरचा (जयपूर) राजा रामसिंग यास लिहिलेल्या संस्कृत पत्राचा उल्लेख सापडला. या पत्राची मूळ प्रत मिळविण्याच्या प्रयत्नांत मी सीतामहूचे इतिहास संशोधक डॉ. रघुवीरसिंग यांना पत्र पाठवून विनंती केली. त्यांनी आस्थेवाईकपणे आणि तत्परतेने मला त्या संस्कृत पत्राची नक्कल पाठविली. त्यानंतर मी त्यांच्याजवळ असलेले संभाजीकालीन अप्रसिद्ध व अज्ञात साहित्य ते पाठवू शकतील काय अशी विनंती केली. डॉ. रघुवीरसिंग यांनी त्यांच्या संग्रहात जयपूरच्या दप्तरातील (आता बिकानेर) अखबारांच्या छायाचित्रित प्रती असल्याचे कळविले. अखबार पर्शियन भाषेत असल्याने आणि मला त्यावेळी सीतामहूस जाऊन राहणे अशक्य असल्यामुळे मला त्यांनी निवडक अखबारांची भाषांतरे करून पाठविण्याचे आनंदाने कबूल केले. त्या कामासाठी एका मुन्शीची नेमणूक करून आणि स्वतः निवडून भाषांतरित केलेले साहित्य तपासून हप्त्याने मला पाठविले. त्याबद्दल मी त्यांची फार आभारी आहे.

डॉ. पिसुर्लेकर केळकर व्याख्यान मालेत 'पोर्तुगेज-मराठे संबंधावर' व्याख्याने देण्यासाठी पुण्यात आले तेव्हा मी त्यांना भेटण्याची संधी साधली. डॉक्टरसाहेबांशी त्यावेळी जी ओळख झाली ती मला माझ्या विषयासाठी तर उपयोगी पडलीच पण पुढे त्यांचा इतका संबंध आला की ते मला मुलीसारखे

मानू लागले. मला थोड्याफार फ्रेंच आणि पोर्तुगेज भाषा येत असल्याने मी त्यांचे माझ्या विषयापुरते ग्रंथ वाचले होते. पोर्तुगेज भाषेत त्यांनी विपुल लेखन केलेले आहे. मी माझ्या काही अडचणी सोडवून घेण्यासाठी गोव्याला गेले. आम्ही त्यांच्याकडेच उतरलो. त्यांनी माझ्याशी संभाजीविषयक सर्व उपलब्ध साहित्याची चर्चा करून मार्गदर्शन केले. उतार वयातही आस्थेवाईक आणि प्रेमळपणाने त्यांनी आम्हाला गोव्यातील सर्व महत्त्वाची ऐतिहासिक ठिकाणे दाखविली. खंडो बल्लाळाने संभाजीराजांचा घोडा पोहणीला लागला असताना राजांना ज्या ठिकाणी वाचविले त्या ठिकाणचा नेमका पुरावा उपलब्ध नाही. दुर्भाटची खाडी किंवा सांतु इस्तेव्हंव या ठिकाणी हा प्रसंग घडला असावा असे सागून त्यांनी ती दोन्ही ठिकाणे दाखविली. ऐतिहासिक घटना घडलेली ठिकाणे पाहण्याचा किती फायदा होतो याचा अनुभव मी गोव्यात घेतला. भाणस्तरीच्या रस्त्यावरील देवीच्या जवळ असलेल्या शिलालेखाचे छायाचित्र काढून आम्ही परतलो. त्यानंतर मी शक्य ती सर्व ठिकाणे पाहिली.

विशेषतः संगमेश्वर येथे जाऊन संभाजी राजांच्या आयुष्यातील दुर्दैवी प्रसंग ज्या परिसरात घडला तेथे फिरून आल्यावर सरदेसाई यांच्या वाड्याच्या बाजूला लपून राहण्यासाठी संभाजी राजे त्या बाजूला पळाले असतील किंवा नाही याची मनांत शंका उत्पन्न झाली. त्या बाजूने पुन्हा पळून जावयास मार्गच नाही. पुढे ही शंका पेशवे दप्तरातील कागदावरून खरी ठरली. संभाजी राजे सरदेसाई यांच्या वाड्यात राहात असत. परंतु ते त्या वाड्यात पकडले न जाता तेथून दक्षिणेस सुमारे दोन मैलांवर असलेल्या नावडी या त्यावेळच्या बंदरात पकडले गेले असा उल्लेखच सापडला. नावडी संगमेश्वर बंदराजवळ जेथे आता आधुनिक रस्ता नदी ओलांडून जातो तेथे वसलेले आहे.

माझा डॉक्टरेटचा प्रबंध १९६६ साली मान्य होऊन मला पदवी मिळाली. संभाजीची कारकीर्द केवळ नऊ वर्षांची असली तरी मला माझ्या प्रबंधाचे काम पूर्ण करावयास त्यापेक्षा सहा महिने अधिक म्हणजे एकूण साडेनऊ वर्षे लागली. म. म. डॉ. द. वा. पोतदार हे माझे परीक्षक होते. त्यांनी तोंडी परीक्षेच्या वेळी सुमारे चार तास जे प्रश्न विचारले आणि पुढील काळात जे बहुमोल मार्गदर्शन केले त्याचा मला हे प्रसिद्ध होणारे चरित्र लिहिताना पुष्कळ उपयोग झाला. संभाजीच्या संबंधात आज-जे जे साहित्य उपलब्ध आहे त्या सर्वांचा परिपूर्ण उपयोग करून मी हे चरित्र वाचकांच्या हातात देत आहे.

या चरित्रात आता इंग्रजी, पोर्तुगेज, फार्सी, डच, संस्कृत व मराठी भाषेतील सर्व उपलब्ध साधनांचा मी शक्य तितका जास्त उपयोग केला आहे. दिल्लीतील संग्रहालयात ज्या डच मायक्रोफिल्म आहेत त्यांचाही मी उपयोग केला आहे. १७ व्या शतकातील डच भाषा समजणे कठीण आहे. ती समजणारे लोकही मिळू

शकत नाहीत. त्यात अधिक माहिती मिळण्याचा संभव आहे. त्याचप्रमाणे फार्सी भाषेतील अखबारही त्यावेळच्या शत्रुपक्षाच्या दृष्टिकोनातून बरीच नवी माहिती पुरवितात. शिवाजी महाराजांच्या काळापासून औरंगजेबाच्या मृत्यूपर्यंतचे हे अखबार आता भा. इ. सं. मंडळाकडून लवकरच प्रसिद्ध होणार आहेत. या मुघल-मराठा संघर्षाची माहिती मराठी कागदपत्रात मिळत नाही. बाबूजी दखनी वकील संभाजीची हकीकत नेहमी लिहीत असे; तो मुघलांच्या कैदेत सापडला असा १६८३ सालच्या अखबारात उल्लेख सापडतो. अशा हकीकती मिळाल्या तर इतिहासात किती तरी भर पडू शकेल.

पृष्ठ ४०६ वरील पाटीलकीच्या वादाची माहिती छापून झाल्यानंतर या महजराची नक्कल मला चिंचवड येथे पाहावयास मिळाली. त्यात खंडोजी संभाजी-राजांना समक्ष भेटला आणि त्याने आपल्या पाटीलकीचे वर्तमान सांगितले असे स्पष्टपणे म्हटलेले आहे. १६८२ सालच्या या निवाड्याच्या उपलब्ध माहितीत तसा उल्लेख नसल्याने तो येथे केला आहे.

या पुस्तकात फारसी अखबारांत मिळालेल्या अनेक सरदारांची नावे दिलेली आहेत. काही नावांचा स्पष्ट उलगडा होत नाही तर काही वेळा नेमके नाव कळत नाही. एका नावाचे दोन अधिकारी आले की तो मुघल का मराठा अधिकारी आहे याचा उल्लेख शक्य तेव्हा सूचीत केला आहे. एकाच नावाची अनेक गावे असतात. सरदारांच्या व लढायांच्या संदर्भावरून ती स्थळे निश्चित करण्याचा प्रयत्न केलेला आहे. उदाहरणार्थ इंदोर. इंदोर हे संस्थान नसून नाशिक जिल्ह्या-तील एक गाव धरलेले आहे.

ताराबाईकालीन पत्रव्यवहार आणि अखबारात संभाजीला दुर्गाबाई नावाची बायको होती अशी माहिती मिळते.

अशी काही नवी माहिती मिळविता आली असली तरी अनेक महत्त्वाच्या घटनांची विश्वसनीय कागदपत्रे मिळाली तर अनेक गुंतागुंतीच्या प्रश्नांवर अधिक जोरदार आणि निर्णायक मते व्यक्त करणे शक्य होईल. इतिहास लेखनात केव्हाही कोणाचा शब्द अखेरचा असे होऊ शकत नाही. नवे नवे पुरावे व साधने उपलब्ध होऊन ऐतिहासिक घटनांवर नवा प्रकाश पडत असतो. हे मान्य करूनही या चरित्रात नव्या माहितीची भर पडू शकली तरी एकूण आराखड्यात आत फारसा बदल होईल असे वाटत नाही.

या पुस्तकात मी मराठा–मुघल संघर्ष, मराठा–पोर्तुगेज संबंध आणि युद्धे यांचे सविस्तर वर्णन दिलेले आहे. मराठी मुलखावर मुघलांचे कसे सर्वत्र आक्रमण चालूच होते आणि त्याला मराठे कसे धैर्याने आणि नेटाने तोंड देत होते; संर-क्षणाबरोबर हल्ले करून त्यांनी विशेषतः औरंगाबाद आणि बऱ्हाणपूर असे लुटले की शिवाजी महाराजांची सुरतेची सुप्रसिद्ध लूट समोर उभी राहावी! पोर्तुगेजांशी

लढताना संभाजीने जशास तसे हे धोरण तर स्वीकारलेच पण धाडसाबरोबरच मराठ्यांच्या प्रसिद्ध गनिमी युद्धतंत्राचाही सर्व आघाड्यांवर यशस्वीरीतीने उपयोग केला. केवळ पोर्तुगेजांचे नशीब थोर म्हणूनच संभाजी राजांना तेथील यशाचा फायदा घेण्यास वेळ मिळाला नाही.

न्यायदान, प्रजादक्षता, महसुलाचे धोरण, वतनवृत्ती, अष्टप्रधान इत्यादी राज्यकारभारविषयक गोष्टींचा सविस्तर आढावा घेतलेला आहे. त्यावरून संभाजी राजांच्या काळात राज्यकारभाराची घडी व्यवस्थित होती असेच म्हणावे लागते. संभाजी राजांची प्रवृत्ती धार्मिक होती असेही वाटते. त्यांना रामदास स्वामी व इतर साधुसंतांविषयी वाटत असलेला आदर, समर्थांच्या मठांची त्यांनी घेतलेली काळजी, ठिकठिकाणी दिलेली दाने आणि अनुदाने वगैरे अनेक गोष्टी मी दिलेल्या आहेत.

संभाजी महाराजांचे संपूर्ण चरित्र सुसूत्रपणे आणि विवेचनात्मक रीतीने देण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यांचे युद्धकौशल्य, प्रजेविषयीची कळकळ, राज्यकारभाराची घडी, सुलतान अकबराच्या वेळी आणि अंबरचा राजा रामसिंगाशी पत्रव्यवहार करताना त्यांनी दाखविलेली दूरदृष्टी, धडाडी, कल्पकता इत्यादी अनेक गोष्टींवर या चरित्राने प्रकाश पडून आजपर्यंतची परंपरागत दूषितदृष्टी ते बदलावयास लावील असे निश्चयाने वाटते. शिवाजीराजांसारखा संभाजी लोकोत्तर नव्हता; परंतु त्याचे चरित्र आजपर्यंत रंगविण्यात येई तसे ते नसून त्यांच्याही अंगात अनेक गुण होते. त्यांनी आपल्या कारकीर्दीत सर्व शक्ती पणाला लावून कारभार केला. शिवाजी महाराजांसारखा तो पुरुषसिंह नसला तरी त्या महापुरुषाला शोभेल असाच त्यांचा छावा होता इतके वाचकांच्या ध्यानात आले तरी लेखिकेला श्रमाचे सार्थक झाले असे वाटेल. इतिहास-लेखन करताना किंवा चरित्र लिहिताना आपल्या चरित्रनायकाचे वकीलपत्र न घेणे उत्तम. इतिहास कोणत्याही प्रकारचा अभिनिवेश न ठेवता लिहावयास हवा. हा आदर्श डोळ्यांसमोर ठेवून हे चरित्र संभाजी महाराजांच्या हौतात्म्यदिनीच नव्हे तर प्रत्यक्ष त्याच स्थळी, वढू येथे संभाजी राजांच्या २८२ व्या पुण्यतिथीच्या दिवशी वाचकांच्या हातात देताना मी अंगावर घेतलेले कार्य पूर्ण झाल्याने समाधान आणि आनंद वाटत आहे. प्रबंधाच्या सुरुवातीपासून ते हे चरित्र पूर्ण होईपर्यंत सुमारे तेरा साडेतेरा वर्षे मला अनेक संस्थांचे साहाय्य आणि विद्वानांचे मार्गदर्शन मिळाले त्याचा येथे कृतज्ञतापूर्वक नामनिर्देश करणे आवश्यक आहे. कै. पांडुरंगपंत पिसुर्लेकर, सीतामहूचे डॉ. रघुवीरसिंग, म. म. पोतदार, श्री. वा. सी. बेंद्रे यांनी किती बहुमोल मदत केली ते मागे सांगितलेच आहे. उपलब्ध साधनांचे मूल्यमापन, चिकित्सा करण्यासाठी श्री. ग. ह. खरे व मराठी पत्रांचा अर्थ आणि बारकावा सांगण्यासाठी शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांनी साहाय्य केले. पोर्तुगेज वाचताना

श्री. अ. ज. करंदीकर यांनी आपला वेळ खर्च केला. कै. शं. ना. जोशी, प्रा. रा. वि. ओतुरकर, श्री. दि. वि. काळे, प्रा. सदाशिव आठवले, श्री. ना. के. जोशी, श्री. जोगळेकर, दिल्लीत स्थायिक झालेले माझे मित्र श्री. कुळकर्णी, इत्यादी अनेकांचा अनेक प्रकारांनी हातभार लागलेला आहे. भा. इ. सं. मंडळाचे आणि केसरी-मराठा ग्रंथालय, प्राज्ञपाठशाळेचे आणि विश्वकोश कार्यालयाचे ग्रंथालय आणि तेथील व्यवस्थापकांनी अनेक ग्रंथ मला संपूर्ण वेळ उपलब्ध करून दिले यासाठी मी कृतज्ञ आहे. संस्कृत मजकुराच्या भाषांतरासाठी वाईचे श्री. केळकर शास्त्री आणि श्री. रंगनाथ शास्त्री जोशी यांचे ऋण मानणे जरूर आहे.

सातारच्या पारसनीस संग्रहालयातील संभाजीची दोन रंगीत चित्रे प्रस्तुत ग्रंथात छापण्याची श्री. बाबासाहेब पारसनीस यांनी परवानगी दिली; या रंगीत चित्रांची छायाचित्रे सातारचे श्री. अण्णाराव भिडे यांनी काढली. या दोघांच्या सहकार्यामुळेच या चरित्रग्रंथाला शोभा येऊ शकली. मी त्यांची फार आभारी आहे.

सरदार श्री. गं. ना. ऊर्फ आबासाहेब मुजुमदार यांनी चिंचवडच्या देवस्थानातील संभाजीराजांचे एक अप्रकाशित पत्र आणि श्री. य. न. केळकर यांनी भा. इ. सं. मंडळात वाचलेले एक अप्रकाशित टिपण दिल्याबद्दलही मी दोघांची आभारी आहे.

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृति मंडळाने या पुस्तकाला अनुदान देऊन माझ्या प्रयत्नांचा जो गौरव केला त्याचा साभार उल्लेख करणे जरूर आहे.

या चरित्रग्रंथाला गुरुवर्य दादा पोतदार यांनी चिकित्सक व सुदीर्घ पुरस्कार लिहून जो आशीर्वाद दिला त्याबद्दल मी त्यांची अत्यंत ऋणी आहे.

खाली दिलेल्या तीन ठळक चुका नजरचुकीने राहून गेल्या; त्याबद्दल वाचकांनी क्षमा करावी. २२ व्या पानावर नवव्या ओळीत ‘ कोल्हापूर ’ ऐवजी कोलार आणि ८४ व्या पानाच्या नवव्या ओळीत ‘ बुडून गेला ’ या शब्दा-ऐवजी ‘ बहूत केला ’ असे वाचावे. १४३ व्या पानावरील आठव्या ओळीत १६७५ सालाऐवजी १७५८ साल हवे याची वाचकांनी नोंद घ्यावी.

या ग्रंथाला आजचे स्वरूप येण्यासाठी जे कष्ट पडले त्यात माझे पती श्री. श्री. पु. गोखले यांनी सिंहाचा वाटा उचलला. स्वतःची व्यावसायिक कामे बाजूला ठेवून अनेक गैरसोयी सोसून त्यांनी सर्व प्रकारचे कष्ट केले. या मदतीचा ऋण-निर्देश करणे त्यांना आवडणारे नसले तरी त्याची नोंद करणे माझे कर्तव्य आहे.

ही मुद्रण प्रत आणि सूची तयार करण्यात व मुद्रिते तपासण्यात सर्व गोखले कुटुंबीयांनी सहकार्य दिले त्यांचा नामनिर्देश न करताच आभार मानते.

आनंद मुद्रणालय, के. जोशी, सालकर, व्ही. जोशी, सुबक व अचूक नकाशे काढून देणारे श्री. पारीख व फाटक या सर्वांनीं या पुस्तकाच्या सुबक-

पणाचे श्रेय आहे. त्या सर्वांची मी फार आभारी आहे.

एका अत्यंत वादग्रस्त विषयावरील चरित्रग्रंथ विद्वान आणि चिकित्सक वाचकांच्या हातात देताना कर्तव्यपूर्तीच्या आनंदाबरोबरच काहीशी भीती माझ्या मनात वसती करून आहे. मला विचार करून जे प्रामाणिकपणे वाटले ते मी मांडले आहे. त्यांत काही अभिनिवेश नाही. कोणाची वकिली करून कोणाला दूषणे देण्याची इच्छा नाही. या संबंधात कोणी तज्ज्ञ आणि अभ्यासू काही सुचवतील किंवा अनवधानाने राहिलेल्या चुका दाखवितील तर मी आभारी होईन. या पुस्तकाची दुसरी आवृत्ती काढावयाचा योग आला म्हणजे किंवा हेच चरित्र इंग्रजी भाषेत प्रसिद्ध करताना मी सर्व योग्य सूचनांचा उपयोग करीन इतके आश्वासन देते.

पुणे २

सौ. कमल गोखले

# अनुक्रमणिका

* * *



छत्रपती संभाजी महाराज

## १. स्वराज्याचा वारसा

सातव्या, आठव्या शतकापासून हिंदुस्थानाला परकीयांचे पाय लागले. सुरुवातीला अरबांनी जलमार्गाने येऊन पश्चिम किनाऱ्यावर स्वाऱ्या केल्या. आठव्या शतकाच्या प्रारंभी अरब सिंध प्रांतात आले. नवव्या दहाव्या शतकांत वायव्येकडून मुसलमानांनी स्वाऱ्या केल्या. गझनी, घोरी सुलतानांच्या स्वाऱ्यांचा उद्देश हिंदुस्थानातील संपत्ती लुटण्याचाच होता. त्यांना हिंदूंच्या सुवर्णभूमीचे आकर्षण वाटू लागले. लुटीच्या हेतूने येता येता त्यांनी दिल्लीत पाय रोवले. मामलुक ( गुलाम ) घराण्यातील कुतुबुद्दीन ऐबकने प्रथम दिल्लीत सत्ता स्थापन केली. या सुलतानांची सत्ता वाढत गेली. अल्लाउद्दीन खिलजीने आपली नजर दक्षिणेत वळविली.

दिल्ली येथील सुलतानांच्या आपापसातील तंट्यांमुळे बाबरला हिंदुस्थानात शिरकाव करावयास वाव मिळाला. त्याने दिल्ली येथे खऱ्या अर्थाने मुसलमानांची सत्ता स्थापन केली, आणि ती हळूहळू सर्व भारतात पसरत गेली.

प्राचीन महाराष्ट्रात अहिर, वाकाटक, कलचुरी यांची राज्ये वऱ्हाड, खानदेश आणि कोकणात होती. त्यानंतर महाराष्ट्रात यादवांचे ( ११८७ ते १३१८ ) आणि कर्नाटकात विजयानगरची ( १३३६ ते १५६५ ) राज्ये नांदत होती. इ. स. १३१८ पासून १३४७ पर्यंत महाराष्ट्रात दिल्लीच्या सुलतानांचा अंमल होता. १३४७ मध्ये हसन गंगूने बहामनी राज्याची स्थापना केली. या सत्तेचा अंमल महाराष्ट्र, कर्नाटक आणि तेलंगणात होता. सन १५२६ पर्यंत बहामनी राज्याची सत्ता होती. याच बहामनी राज्यातून दक्षिण हिंदुस्थानात निजामशाही, बरीदशाही, इमादशाही, आदिलशाही आणि कुत्बशाही राज्ये निर्माण झाली. १५६५ साली झालेल्या तालीकोटच्या लढाईत विजयनगरचे हिंदूंचे एकमेव राज्य नष्ट झाले.

महाराष्ट्रात अहमदनगरची निजामशाही ( १४९० ते १६३६ ) आणि विजापूरची आदिलशाही ( १४८९ ते १६८६ ) यांचा अंमल होता. या शाह्यां-तील सुलतान आणि प्रमुख अधिकारी मुसलमान असले तरी त्यांना स्थानिक हिंदू वतनदार, देशमुखांची मदत घ्यावी लागे. भोसले, जाधव, निंबाळकर, घाडगे घोरपडे, मोरे, शिर्के, माने, शिंदे, डफळे असे अनेक सरदार सुलतानांच्या

लष्करात अधिकारपदावर होते. सुलतानांच्या आपापसातील भांडणात मालोजी, शहाजी, आणि इतर जहागिरदारांना आपले कर्तृत्व दाखविण्याची संधी मिळाली. या भांडवलाच्या वारशाच्या आधाराने शिवाजी महाराजांना स्वराज्याची मुहूर्तमेढ रोवण्यास वाव मिळाला.

मालोजीला लष्करी खर्चासाठी निजामशाहीतून वेरूळच्या आसपासच्या गावांची जहागीर मिळालेली होती. दौंडजवळची गावे, इंदापूर, सिन्नर तालुक्यातील काही गावे, नगर जिल्ह्यातील मुंगी, पैठण, वेरूळच्या उत्तरेला बनसेंद्र या ठिकाणची पाटीलकी भोसल्यांकडे होती. मालोजीने भोसले घराण्याच्या उत्कर्षाचा पाया घातला होता. बुऱ्हाण निजामशहाचा विश्वास संपादन केल्यामुळे, इंदापूरचा बंदोबस्त शहाने मालोजीवर सोपविलेला होता. ही कामगिरी बजावीत असताना मालोजी धारातीर्थी मरण पावला.

उत्तरेतील मुघलांना दक्षिणेत सत्ता स्थापन करावयाची होती. सन १५९६ मध्ये अकबराने निजामशाही राज्यावर स्वारी केली. निजामशाही आणि आदिलशाही यांच्या भांडणांत मुघलांच्या आगमनाची भर पडली. मुघलांनी निजामशाहीतील अहमदनगरचा किल्ला हस्तगत केला. या लढाईत मलीकंबरबरोबर शहाजी, लखुजी जाधव, फलटणचे निंबाळकर यांनी मुघलांविरुद्ध निजामशहाच्या बाजूने टक्कर दिली. निजामशाहीतील प्रतिष्ठित सरदार लखुजी जाधव यांच्या मुलीचा–जिजाऊचा–शहाजीशी विवाह झाला. त्याला मालोजीच्या मृत्यूनंतर निजामशहाने १६२० साली वडिलार्जित जहागीर दिली. शहाजी आणि लखुजी या सासरे-जावयात वितुष्ट आले. त्यामुळे लखुजी जाधव मुघलांच्या नोकरीत शिरला.

निजामशाही टिकविण्यासाठी शहाजी सतत मुघल आणि आदिलशाही सत्तांविरुद्ध झगडत असे. शहाजीने निजामशहाच्या नावाने कोकण आणि देशावर निरेपासून ते चांदोरच्या डोंगरापर्यंत सत्ता स्थापन केली. हा शहाजीचा पराक्रम पाहून मुघलांनी निजामशहाविरुद्ध सैन्य पाठविले. १६३२ ते १६३६ पर्यंत मुघल–निजामशाही संघर्ष चालू होता. त्यात नाशिक, खानदेश, संपूर्ण वऱ्हाड आणि उत्तर कोकणाचा काही प्रदेश जिंकून तो औरंगाबादच्या सुभ्यात मुघलांनी समाविष्ट केला. उरलेला भीमा आणि निरा नद्यांमधील प्रदेश विजापूरकरांकडे राहिला.

शहाजहानने निजामशाही बुडविण्यासाठी आणि शहाजीने ती तारण्यासाठी केलेला संघर्ष नऊ वर्षे चालू होता. निजामशाहीत अपमान झाला म्हणजे शहाजी आदिलशाही नोकरीत जाई. शहाजीने एकदा मुघलांकडे आणि तीन तीन वेळा निजामशाही आणि आदिलशाही यांत स्थित्यंतरे केली. १६३६ साली मात्र शहाजी आदिलशाही नोकरीत आला तो तेथे शेवटपर्यंत होता. शहाजीच्या अंगी

शौर्य, धाडस हे गुण होते. त्याने जेथे जेथे नोकरी केली तेथे त्याला मान आणि अधिकार मिळाले.

शिवाजी महाराजांचा जन्म १६३० साली शिवनेरी येथे झाल्यावर, शहाजीच्या अस्थिर जीवनामुळे जिजाबाई आणि शिवाजी यांना वणवण करीत दिवस काढावे लागले. १६३६ साली शिवाजी आणि जिजाबाई शहाजीच्या पुण्यातील जहागिरीत येऊन राहिले. दादाजी कोंडदेव आणि जिजाबाई यांच्या समर्थ मार्गदर्शनाखाली शिवाजी राजे १६४७ सालापर्यंत पुण्यात होते.

अनेक मानापमान सहन करीत शहाजी राजांसारखे अनेक मराठे सरदार परकीयांच्या नोकऱ्यांत कर्तृत्व गाजवीत होते. स्वदेशावर परकीयांची सत्ता बळकट करण्यात त्यांचे शौय आणि कर्तृत्व खर्च होत होते. या सर्व सामर्थ्यवान व पराक्रमी मंडळींची शक्ती स्वराज्य, स्वधर्म आणि स्वजनांसाठी कोणीतरी वळविणे आवश्यक होते. कोणीतरी ठिणगी पेटवून प्रेरणा देण्याची आवश्यकता होती. दक्षिणेतील शाह्यात लढणाऱ्या या मराठेवीरांनी पार्श्वभूमी तयार केली होती. याच वीरांच्या साहाय्याने मराठ्यांना स्वातंत्र्य आणि स्वतंत्र अस्तित्व मिळवून देण्याचा महत्त्वाकांक्षी उद्योग शिवाजी महाराजांनी आपल्या अंगावर घेतला.

शिवाजीराजे आपल्या वडिलांच्या पुण्यातील जहागिरीत असतानाच त्यांनी १६४९ साली आदिलशाही सत्तेशी झगडा सुरू केला. त्यावेळी त्यांच्याकडे इंदापूर, सुपे, पुणे व चाकण हे परगणे होते. दादाजी कोंडदेव यांच्याकडे बारा मावळची सुभेदारी होती. त्यांनी सुव्यवस्था उत्पन्न केलेल्या या दुर्गम प्रदेशात सुलतानांनी दुर्लक्ष केलेले होते. याच भागातील लोकांनी मराठ्यांच्या स्वातंत्र्यलढ्यात आणि स्वराज्याच्या उभारणीत संपूर्ण सहकार्य दिले. 'राज्य व्हावे ही श्रींची इच्छा आहे' असे सांगून आत्मविश्वासाने शिवाजी महाराजांनी आदिलशाही दडपणाने आणि भीतीने ग्रासलेल्या सरदारांना स्वराज्यस्थापनेच्या महान कार्यात एकरूप केले.

१६४७ साली दादाजी कोंडदेव मरण पावल्यावर शिवाजी राजांनी सिंहगड किल्ला घेऊन आदिलशाही सुलतानाला एक प्रकारचे आव्हानच दिले. या आक्रमक हालचालींना अप्रत्यक्षपणे विरोध दर्शविण्यासाठी आदिलशाही सेनापती मुस्ताफाखान याने शहाजीला जिंजी येथे कैद केले. कर्नाटकात असलेला शहाजीचा मुलगा संभाजी आणि पुण्याच्या जहागिरीत असलेला शिवाजी या दोघांवर आदिलशहाने स्वारी केली. वडिलांच्या सुटकेसाठी शिवाजीराजांना घेतलेले गड सोडावे लागले.

शिवाजीराजांनी सुरू केलेल्या उद्योगाचे अनुकरण करावयास जावळीच्या मोऱ्यांनी सुरुवात केली. शिवाजीराजांनी हस्तगत केलेल्या प्रदेशावरही स्वारी करावयास त्याने कमी केले नाही. स्वराज्याच्या आड येणाऱ्या मराठा

सरदारांची शिवाजीराजांनी गय केली नाही. सामोपचाराचा उपयोग होत नाही हे लक्षात येताच १६५६ साली यशवंतराव मोऱ्याचे पारिपत्य करून राजांनी जावळीचे खोरे ताब्यात घेतले. मोऱ्यांप्रमाणेच सुप्याच्या संभाजी मोहितेला कैद करून त्याचा बंदोबस्त केला. जिंकलेल्या प्रदेशाच्या सुरक्षिततेसाठी राजांनी मोरोपंत पिंगळे यांच्याकडून जावळीच्या खोऱ्याजवळच प्रतापगडाचा किल्ला बांधला. छोट्याशा स्वराज्यात शिवाजीराजांनी प्रथमपासूनच सुव्यवस्था निर्माण केली, आणि नव्या प्रदेशांच्या सुरक्षिततेसाठी काही नवे गड बांधले व जुन्यांची डागडुजी केली.

महंमद आदिलशहाच्या आजारपणाचा आणि त्याच्या राज्यात निर्माण झालेल्या बजबजपुरीचा शिवाजीराजांनी फायदा घेतला. त्यांचे कोकणातील किल्ले, दाभोळचे बंदर आणि त्याखालचा मुलूख ताब्यात घेतला. १६५८ साली सिद्दीशी झालेल्या मैत्रीतून राजांनी तळ, घोसला, रायगड हे किल्ले आणि त्यांच्या भोवतालचा प्रदेश स्वराज्यात समाविष्ट केला.

आतापर्यंत शिवाजी राजांनी केवळ आदिलशाहीतील मुलूख जिंकला होता. १६५७ नंतर त्यांनी मुघलांचा दक्षिणेतील प्रदेश ताब्यात घ्यावयास प्रारंभ केला. हा लढा सुरू करण्यापूर्वी शिवाजीमहाराजांनी औरंगजेबाकडे वकील पाठवून मराठ्यांना कोकणाचा मुलूख दिल्यास ते विजापूरकरांविरुद्ध लढावयास तयार असल्याचे कळविले. परंतु औरंगजेबाने किंवा त्याच्या अधिकाऱ्यांनी या विनंतीकडे दुर्लक्ष केले. त्यांची ही धरसोड वृत्ती दिसताच महाराजांनी मुघलांच्या ताब्यातले जुन्नर मारून पुष्कळ लूट मिळविली; अहमदनगरवर छापे घातले. येथपासून खऱ्या अर्थाने मराठ्यांच्या स्वातंत्र्ययुद्धाला सुरुवात झाली. मुघल प्रदेशावर आक्रमण करून शिवाजीमहाराजांनी मुघल बादशहाला आव्हानच दिले होते. परंतु औरंगजेब स्वतःच राज्यपद मिळविण्याच्या उलाढालीत गर्क असल्यामुळे, त्याने राजांच्या या हालचालीकडे दुर्लक्ष केले.

त्याचा फायदा घेऊन शिवाजीमहाराजांनी आदिलशाही राज्यातील प्रदेश काबीज केला. विजापूरचे राज्य बापलेकांच्या उद्योगात धोक्यात येईल असे वाटल्यामुळे, विजापूरच्या बेगमेने अफझलखानाला महाराजांच्या मुलखावर स्वारी करण्यास पाठविले. नूतन स्वराज्यावर हे फार मोठे संकट आले होते. खान शिवाजी राजांना जिवंत पकडण्याच्या महत्त्वाकांक्षेने चालून आला होता. शिवाजी राजांनी खूप घाबरगुंडी उडाल्याचे नाटक केले आणि शरणागतीचा स्वीकार करण्यासाठी अफझलखानाला फसवीत प्रतापगडाच्या पायथ्याशी यावयास लावले. त्या अभूतपूर्व भेटीत अफझलखानाला शिवाजी महाराजांनी ठार केले. या प्रसंगानंतर महाराजांचे स्थान एकदम उंचावले. अफझलखानाच्या वधाचा फायदा घेत मराठ्यांनी वाई प्रांत, पन्हाळा इत्यादी प्रदेश हस्तगत केला.

शिवाजी महाराजांच्या वाढत्या पराक्रमामुळे मुघलांना त्यांच्याकडे लक्ष देणे भाग पडले. येथूनच म्हणजे १६५७ मध्ये मराठा-मुघल संघर्षाला तोंड लागले. शिवाजी महाराजांच्या हयातीत औरंगजेबाला दक्षिणेत यावयास वेळ मिळाला नाही. परंतु त्याने शायस्ताखान, मिर्झा राजा जयसिंग, शहाजादा मुअज्जम, महाबतखान, दिलेरखान अशा मातब्बर सरदारांना पाठविले. १६६० ते १६७३ पर्यंत शिवाजी राजांनी मुघलांना सामना दिला. त्यांनी शायस्ताखानाची बोटे तोडून फजिती केली तरी जयसिंगाने पुरंदराला वेढा घातल्यावर त्यांना माघार घ्यावी लागली, आणि तह करून जिंकलेला बराच प्रदेश त्यांना सोडावा लागला. इतकेच नव्हे तर मुघलांची चाकरी पत्करून केवळ नऊ वर्षांच्या संभाजीला मन्सबदार म्हणून मुघलांकडे पाठवावे लागले. या तहातूनच त्यांच्या जीवनातील सर्वांत कसोटीचा आग्र्याचा प्रसंग ओढवला. त्यातून ते शिताफीने आणि सुदैवाने निसटले आणि सर्व भारतात त्यांच्या कीर्तीचा सुगंध पसरला.

आग्र्याहून सुटून आल्यानंतर शिवाजी राजांना गमावलेला प्रदेश पुन्हा स्वराज्यात आणण्यासाठी आणि त्यात वाढ करण्यासाठी मुघल आणि आदिलशहा यांच्याशी अनेक आघाड्यांवर युद्ध करावे लागले. त्यांनी मुलकी आणि लष्करी व्यवस्थेत अनेक गोष्टी नव्याने सुरू केल्या. गड-कोटांच्या कारभारात सुधारणा करून राज्याला स्थैर्य आणावयाचा प्रयत्न केला. आता त्यांचे सामर्थ्य स्वराज्याभोवती असलेल्या मुघल, विजापूरकर, पोर्तुगेज, सिद्दी, इंग्रज शत्रूंविरुद्ध टिकाव धरण्याइतके वाढले होते. दक्षिणेतील शाह्या त्यांना खंडणी देऊ लागल्या होत्या. इंग्रज व पोर्तुगेज यांना महाराजांच्या सामर्थ्याची जाणीव होऊन त्यांचे वकील व्यापारी सवलती मिळविण्यासाठी दरबारी खेटे घालू लागले होते.

स्वराज्याला आता जनतेच्या मान्यतेची आवश्यकता होती. महाराजांना सभोवतालच्या राज्यांच्या बरोबरीचे स्थान उत्पन्न करून राजकीय प्रतिष्ठा मिळविण्याची जरूरी होती. उत्तरेत काय किंवा दक्षिणेत काय ज्या सत्ता राज्य करीत होत्या त्या परकीय मुसलमानांच्या होत्या. १५६५ साली विजयनगरचे राज्य नष्ट झाल्यापासून सबंध हिंदुस्थानात हिंदूंचे राज्य किंवा हिंदूंचा राजा कोठेही राज्य करीत नव्हता. शिवाजीमहाराजांनी राज्यारोहण समारंभ करून स्वराज्याला इतर परकीय राज्यांच्या बरोबरीचे स्थान मिळवून दिले. हिंदवी स्वराज्य त्यांनी स्वसामर्थ्यावर स्थापन केले.

जून १६७४ साली राज्याभिषेक झाल्यावर दोनच वर्षांनी शिवाजीमहाराजांनी कर्नाटकात स्वारी करून स्वराज्याची सीमा वाढविली. स्वराज्याच्या सीमा वाढवीत असताना जंजिरेकर सिद्दी, पोर्तुगेज, इंग्रज यांच्याशी त्यांचे संबंध आले. स्वराज्याच्या शेजारी सिद्दी घरातील उंदरासारखा होता. त्याला मुघल आणि इंग्रजांचा पाठिंबा मिळत असल्याने तो शिरजोर बनून मराठी मुलखात सतत

जाळपोळ आणि लूटमार करीत असे. महाराजांनी आरमारात वाढ करून सिद्दीचा बंदोबस्त करण्यासाठी दंडाराजपुरी गड घेण्याचा प्रयत्न केला. त्यात अपयश आल्यामुळे १६७८ साली खंदेरीजवळ त्यांनी तटबंदी सुरू केली. याला इंग्रजांचा विरोध होता. सिद्दीनेही उंदेरीवर तटबंदी सुरू केली. इंग्रजांनी सिद्दीला मुंबईला थारा दिल्याने तो अधिकच शिरजोर झाला. सिद्दी आणि इंग्रज या दोघांचा बंदोबस्त करण्यासाठी १६७९-८० मध्ये महाराजांना युद्ध करावे लागले. त्यांत इंग्रजांनी माघार घेऊन मराठ्यांशी तह केला.

शिवाजीमहाराजांच्या मृत्यूच्या वेळी स्वराज्याची सीमा कोणती होती हे निश्चितपणे ठरविणे कठीण आहे. शिवाजीमहाराजांनी एखादे ठाणे घेतले की ते कायम त्यांच्याकडे राहिले असे होत नसे. शत्रूने ती ठाणी घेतली तर महाराज पुन्हा ती काबीज करीत. असा क्रम स्वराज्यस्थापनेच्या प्रारंभापासून त्यांच्या मृत्यूपर्यंत चालू होता.

स्वराज्यात साल्हेरी किल्ल्यापासून गोदावरी नदीच्या अलीकडे कुलदेश, वरघाट, तळघाट, तुंगभद्रापावेतो एक प्रांत व तुंगभद्रेपलीकडे कोल्हापूर, बाळापूर, चंदी, येलूर हे धरून कावेरीच्या सरहद्दीपर्यंतचा दुसरा प्रांत असे दोन प्रांत होते.

स्वराज्याच्या उत्तर सीमेत नाशिक जिल्हा असून त्यात साल्हेर, मुल्हेर, रवळा, जवळा, हनुवंतगड, अहिवंतगड, मार्कंडा, पट्टागड, रामसेज, त्रिंबकगड हे गड होते. या किल्ल्यांखालचा प्रदेशही स्वराज्यात होता. जव्हार, रामनगर, सुरतेच्या जवळचा किल्ला महाराजांच्या ताब्यात होता.

पुणे जिल्ह्यात जुन्नरपासून कल्याण-भिवंडीपर्यंतचा प्रदेश स्वराज्यात असून केळशी, कल्याण-भिवंडी, पनवेल, थळ, पाली, सरसगड, नागोठाण, प्रबळगड, श्रीवर्धनगड, पेण खाडीपर्यंतचा प्रदेश स्वराज्यात होता. वसईच्या खाडीतून वर जाताना पोर्तुगेज मुलुखानंतर केवळ एकदोन मैलांवर मराठी प्रदेश होता.

स्वराज्याच्या मध्यभागात पुणे, पुरंदर, सिंहगड, लोहगड, रोहिडा, इंदापूर, सुपे, राजगड, प्रसिद्धगड, रायगड हे किल्ले होते.

सातारा जिल्ह्यातील वाई, महाबळेश्वर, जावळी, प्रतापगड, पांडवगड, सातारा, परळी आणि कऱ्हाड स्वराज्यात होते.

दक्षिण कोकणात कोल्हापूर व पाच कोसांवर कृष्णा नदीच्या तीरापर्यंतचा मुलूख संगमेश्वर, शृंगारपूर, विशाळगड, चिपळूण, राजापूर, दाभोळ, अंकोला, कडवाडी, शिवेश्वर, वेंगुर्ले, फोंडा, डिचोली, मर्दनगड, भिवगड शिवाजी राजांच्या ताब्यात होते.

कर्नाटकात जिंजी, पेद्दापोलम, कांजीवरम, तिरुपती, उटळूर, कावेरीच्या अलीकडील एकोजीचा प्रांत कोलार, बेलवाडी, तंजावरच्या उत्तरेकडील मुलूख गदक, वेलूर इत्यादी प्रदेश कर्नाटकाच्या स्वारीत महाराजांनी स्वराज्यात आणला.

या कर्नाटकातील प्रदेशाप्रमाणेच स्वराज्यातील पुष्कळसा मुलूख १६७४ सालानंतर स्वराज्यात आलेला आहे.

संभाजी राजांना मिळालेल्या स्वराज्याच्या वारशाची ही रूपरेषा आहे. हे सर्व राज्य शत्रूच्या मुलखांतील प्रदेश जिंकून निर्माण झालेले होते. तरी स्वराज्या-भोवतालच्या शत्रूंचा नायनाट झालेला नव्हता. औरंगजेबाच्या हयातीत स्वराज्यावर त्याचे आक्रमण केव्हा ना केव्हा तरी येण्याची भीती होतीच. सिद्दी आणि इंग्रजांचे प्रकरण मिटलेले नव्हते. पोर्तुगेजांनाही शह बसलेला नव्हता. तसेच मराठे आणि पोर्तुगेज यांचे संबंध बिघडलेलेच होते.

सुव्यवस्थित राज्यकारभाराची आणि गडकोटांची व्यवस्था असलेल्या, एक करोड होन उत्पन्नाच्या, पण शत्रूने वेढलेल्या, अशा स्वराज्याचा वारसा संभाजी राजांकडे आला.

* * *

## २. बालपण

शिवाजी महाराजांनी इ. स. १६४७ साली रोहिडा किल्ला ताब्यात घेऊन स्वराज्याची मुहूर्तमेढ रोवली. त्यानंतरच्या दहा वर्षांत महाराजांनी अनेक पराक्रम केले. त्यात त्यांनी पुणे, पुरंदर, कोंडाणा, चाकण, सुपे ही पुण्याच्या परिसरातील ठिकाणे स्वराज्याच्या अमलाखाली आणली. या स्वराज्यस्थापनेच्या पहिल्या टप्प्यात त्यांनी मुख्यतः विजापूरकरांशीच सामने केलेले होते. ह्या वेळेपर्यंत त्यांची दोन लग्ने झालेली होती. सईबाईशी त्यांचे लग्न १६४०-४१ सालच्या सुमारास झाले. त्या रूपाने सुंदर आणि गोड स्वभावाच्या होत्या. शिवाजी महाराजांना पहिल्या तीन मुलीच झाल्या. या मुलींच्या पाठीवर सईबाईला पुत्ररत्न झाले. या पहिल्या मुलाचा जन्म ज्येष्ठ शुद्ध १२, शके १५७९ म्हणजे १४ मे १६५७ गुरुवार या दिवशी पुरंदर येथे झाला.[1] त्या आनंदाप्रीत्यर्थ साखर वाटून दानधर्म करण्यात आला. कनकगिरीला मारल्या गेलेल्या संभाजीराजांचे नाव युवराजांना ठेवण्यात आले.

बाळंतपणानंतर सईबाईची प्रकृती फार दिवस चांगली राहिलेली नसावी. ती कोणत्या तरी दुखण्याने ( बहुधा बाळंतरोग असावा ) आजारी होती. पुरंदरहून सईबाई आणि संभाजी यांना प्रतापगडला नेण्यात आले. आजारपणात प्रकृती क्षीण झाल्यामुळे तिच्या अंगावर पुरेसे दूध येत नव्हते. यामुळे जिजाबाईंना आपल्या नातवाची काळजी वाटणे साहजिकच होते. संभाजीस आजारी आईचा संसर्ग होऊ नये आणि दूधही चांगले आणि भरपूर मिळावे ह्या हेतूने जिजाईने नसरापूर जवळच्या कापूरवहाळ गावाच्या गाडे नावाच्या मराठा घराण्यातील धराई आवा या स्त्रीला संभाजीची दाई म्हणून प्रतापगडास नेले.[2] धराई आवाच्या दुधावर संभाजीचे पोषण होऊ लागले. या अमोल सेवेबद्दल जिजाईने तिला प्रतिवर्षी २६ होनांची तैनात लावली. या दुखण्यातून सईबाई उठलीच नाही. ती ५ सप्टेंबर १६५९ (भाद्रपद वद्य १४ शके १५८१ ) या दिवशी राजगडावर मरण पावली.[3]

---

१. शिचप्र–पृष्ठ १८, ५०, ५६.

२. ऐसंसा, खंड १, ले. १३७ पृ. १३२–३३ मंस्वीय क्र. ३५.   ३. शिचप्र–पृष्ठ १६.

पिता-पुत्रांच्या आयुष्यातील या दु:खद घटनेनंतर शिवाजी-अफझलखान भेटीचा, मराठ्यांच्या इतिहासातील रोमहर्षक प्रसंग घडला. अफझलखानाच्या भेटीला जावयाचा निर्णय करताना महाराजांनी संभाजी आणि मातोश्री जिजाबाई यांना रायगडी ठेवावे असे सांगून पराजय झाला तरी माझा मीच आहे, प्राणनाश झाला तर संभाजी राजे आहेत त्यास राज्य देऊन त्यांचे आज्ञेत तुम्ही राहावे असे सांगितले.[1]

शिवाजीमहाराज अफझल प्रकरणातून सहीसलामत सुटले. खानाचा वध करून त्यांनी अद्वितीय असा पराक्रम केला आणि विजापुरकरांना आपल्या शौर्याची चुणुक दाखविली. त्यानंतर त्यांनी आदिलशाही अमलाखाली असलेल्या मराठी मुलुखात चढाई सुरू केली, महाराजांच्या तुफानी जीवनात त्यांना आपल्या लहान मुलाकडे लक्ष देणे कठीणच होते. त्यातून जिजाबाई संभाजीचे पालनपोषण करण्यास समर्थ असल्यामुळे त्यांना या गोष्टीकडे लक्ष देण्याची विशेष जरूरीही वाटली नाही. आईवेगळ्या नातवाकडे जिजाईचा ओढा आणि प्रेम असणे साहजिकच होते. भोसले घराण्यात संभाजी हा त्यावेळी एकुलता एकच मुलगा होता. त्यामुळे जिजाबाईला संभाजीच्या शिक्षणाची जबाबदारी अंगावर घेऊन त्याच्याकडे संपूर्णपणे लक्ष ठेवणे शक्यही होते.

**शिक्षण :**

मातोश्री जिजाबाईंनी शिवाजीला लहान वयात शिक्षण दिलेच होते. त्याच शिक्षणात तयार होऊन शिवाजीमहाराज स्वराज्य-स्थापनेच्या कामाला लागले होते. संभाजीच्या शिक्षणाची जबाबदारी जिजाबाईंवर आली तेव्हा त्यांच्या परिस्थितीत बराच फरक झालेला होता. तरीही शिक्षणाच्या पद्धतीत मात्र फारसा फरक पडलेला नव्हता. जिजाबाईने आपल्या नातवाला रामायण आणि महाभारतातल्या गोष्टी सांगितल्याच असणार. आता त्यांचे केवळ इतिहासात जमा झालेल्या गोष्टी सांगून समाधान होत नव्हते. आपल्या लाडक्या आणि पराक्रमी मुलाच्या जीवनातील अनेक रोमहर्षक प्रसंगांचा जिवंत इतिहासही त्यांनी संभाजीला अधिकारवाणीने सांगितलेला असणारच! केशवभट आणि उमाजी पंडित हे संभाजीचे गुरू होत.[2] केशवभट पुरोहिताने संभाजीला प्रयोगरूप रामायण सांगितले. या श्रवणाची सांगता करून केशवभटाला राजापूर प्रांतातील संगमेश्वर तालुक्यात १६०० लारी भूमी दान देण्यात आली. त्यावेळी १५८९½ लारीची ठिकाणे त्यांच्या स्वाधीन करण्यात आली. कोणत्यातरी तांत्रिक अडचणीमुळे त्यावेळी

१. सभा ब, पृष्ठ १२.

२. दंनीति-बें, पृष्ठ ६१; एकव, पृष्ठ ४३.

देता न आलेली उरलेली १०३/४ लारीची भूमी त्यांना २७ मार्च १६९२ ला देण्यात आली.[1]

संभाजीला कोणकोणत्या प्रकारचे शिक्षण दिलेले होते याचा पुष्कळसा बोध सभासद व चिटणीसांच्या बखरीतून, पुढे दिलेल्या माहितीवरून होतो. "संभाजीने विद्या अभ्यास करावा, त्याला सुशिक्षित करावा म्हणून त्याला घोड्यावर बसवणे, शास्त्रविद्या, तालीम, तिरंदाजी याचे शिक्षण देवविले...आपण राजे व हे राजपुत्र, पुढे राज्यास अधिकारी हेच. आपण महाराष्ट्र राज्य आक्रमून धर्मस्थापना केली. ते पुढे वृद्धीस यांचे हाती पावावी. अष्टप्रधान यांतच राजपुत्राची गणना आहे. सर्व अमात्य राजाचा वाम (?) भुज, युवराज, राजपुत्र हा सत्य भुज असे आहे. त्या अर्थी ते सुशिक्षित असावे म्हणून लेखनादी अभ्यास करविला. आणि उत्तम वृद्ध सेवक समीप ठेविले. दंडनीती, राजधर्म हे सांगविले. राजपुत्रधर्म पितृसेवा कायावाचा मने करावी; जी करणे ती पित्यास संतोष उत्पन्न होय अशी करावी; कोणतेही कर्म पित्यास तिळप्राय विषाद उत्पन्न होय ऐसे करू नये. पित्याची कृपा ज्याजवर असेल त्याजवरी आपण कृपाच करावी; ज्याचे ठायी पित्याचा द्वेष त्याशी आपणही करावा, त्यासी प्रीती करू नये; पित्यानी संतुष्ट होऊन युवराजपद कारभार सांगितला असता गर्वारूढ होऊ नये; संपत्तीचे मदे आणि तारुण्याचे मदे करून उन्मत्त होऊ नये; पिता, माता व भगिनी व बंधू, मित्र व वल्लभ थोर थोर प्रतिष्ठित असतील (त्या) प्रजादिकांचा अपमान करू नये; मोठीही वृद्धी पावला असता पित्याची आज्ञा उल्लंघन करू नये, हाच पुत्राचा धर्म श्रेयस्कर आणि भूषणापेक्षा भूषण होय. बंधुवर्ग असतील त्यात आपण युवराज झालो, कारभार करतो, म्हणून गर्व धरून आपण सर्वांहून अधिक ऐसे कदापि मानू नये. राजाची आज्ञा पालन न केली व बंधूची अवगणना केली असता द्रोंहे करून (तो युवराज) पदच्युत होतो...बहुत नम्रत्वे करून सकलगुणसंपन्न असोन सर्व मंत्री व सेवक जन उत्तम यांचा सहवास व युक्ती श्रवण करून राज्यातील माहितगारी व राज्य करण्याच्या युक्ती अवगत करून घ्याव्या. त्यांची मान्यता रक्षावी. उत्तम जनांची संगती करावी. नीच व दुर्व्यसनी यांची कदापि मैत्री करू नये. (त्यांचा) सहवास न करावा असे बोध करविले. राजांनी पुत्रास बहुत प्रकारे रक्षावे. मत्त हत्तीस अंकुश नसल्यास तो अनर्गल होतो. सर्वांचे घात करतो. तसेच पुत्र रक्षिले नाहीत आणि लघु मनुष्याची संगती जाली व मद जाला असता, आपणच राज्य करावे म्हणून इच्छा अनर्गल होतील. तेणे करून राज्यक्षय होईल. जे मांस–आमिष असुक स्थळी आहे ऐसे व्याघ्रास कळलियावरी त्याचे निवारण होत नाही, तसेच पुत्रांचे निवारण मग करू गेले तरी घडत नाही.

१. सपमा–मा. पा, ले. ४४, पृष्ठ १५७; दंनीति–वैं, पृष्ठ ६१; पेद, खंड ३१, ले. ५३.

यास्तव उत्तम सुशिक्षित, प्रौढ सेवक सावध असावे. राजाचे कुळी अनीतिमान पुत्र निर्माण जाला म्हणजे ते राज्य व कुल शीघ्र क्षयास जाते. म्हणोन बहुत नीतीने रक्षिणे तसे रक्षिले. आणि मातबर सरकारकून प्रौढ यांजपाशी बसावे, दरबारात बसावे, कारभारात माहीत होत जावे असे सांगून करविते जाले. श्रीरामदासस्वामी यांचे दर्शन, सहवास करण्यास ( युवराज संभाजीस ) पाठविले होते.[१]

या माहितीत थोडा उपदेश केलेला असल्याचे दिसले तरी संभाजी आणि राजाराम यांना त्या काळी अनुरूप असे आणि शिवाजी राजांचे पुत्र म्हणून कसे शिक्षण दिले असेल हे ध्यानात येते. 'बुधभूषण' या संस्कृत ग्रंथात संभाजीने काव्यालंकार, शास्त्रे, पुराणे, संगीत आणि धनुर्विद्या यांचा सखोल अभ्यास केला होता याचा उल्लेख आहे. संस्कृत भाषेशी संभाजी चांगला परिचित असावा असे वाटते.[२]

**सैनिकी शिक्षण :**

सैनिकी शिक्षणासाठी संभाजीचे गुरू कोण होते याची माहिती मिळत नाही. त्याकाळी सध्यासारखी सैनिकी शिक्षणाची विद्यालये नसली तरी त्या काळास योग्य होईल अशा घोड्यावर बसणे, मल्लयुद्ध करणे धनुष्यबाण चालविणे, तलवारीचे व पट्ट्याचे हात, भाल्याची फेक इत्यादी गोष्टींना महत्त्व होते. या सर्व गोष्टींचे शिक्षण संभाजीला दिलेले असणारच. शिवाजीमहाराज स्वराज्यनिर्मितीसाठी अनेक ठिकाणी हालचाली करीत होते. त्याचाही लाभ संभाजीला मिळालेला असणारच. लहान वयातच संभाजीला शिवाजीमहाराजांचा प्रतिनिधी म्हणून मुघलांकडे मन्सबदार म्हणून राहावे लागले होते. त्यामुळे त्याला कळत न कळत या सर्व गोष्टींचे ज्ञान प्राप्त झालेले होते.

सैनिकी तुकडीचे नेतृत्व करावयाचे शिक्षण मिळावे म्हणून शिवाजीमहाराज संभाजीला अनेकवेळा पाच ते दहा हजार सैन्याच्या तुकडीचे नेतृत्व देत असावेत किंवा त्याला स्वतःबरोबर एखाद्या आघाडीवर नेत असावे. युद्धकलेत आणि डावपेचात कुशल असलेल्या शिवाजीसारख्या पित्याचे मार्गदर्शन लाभल्यामुळे संभाजी युद्धकलेत तरबेज झाला. संभाजीच्या युद्धकलेतील नैपुण्याबद्दल आबे करे[३] याने प्रशंसा केलेली आहे.

शिवाजीमहाराजांनी शृंगारपूर घेतल्यानंतर म्हणजे १६६१ सालानंतर संभाजी महाराजांचा विवाह पिलाजी शिर्के यांची कन्या राजसबाई[४] बरोबर मोठ्या

१. सशिचिब, पृष्ठे २७१ ते २७२.    २. बुधभू–वे, पृष्ठ २.

३. FBS-SNS, p. 232    ४. पका–स, पृष्ठ १८०–१८१

समारंभाने साजरा झाला. विवाहानिमित्त चारपाच लाख रुपये खर्च झाला. वधूचे नांव येसूबाई असे ठेवण्यात आले.[१]

संभाजीचे दुसरे लग्न दुर्गाबाई नावाच्या स्त्रीशी झाले होते. हे लग्न केव्हा आणि कोठे झाले आणि ही मुलगी कोणाची असावी यासंबंधी काहीच माहिती मिळत नाही.[२]

## संभाजीचा राजकारणात प्रवेश :

शिक्षण आणि युद्धकलेतील ज्ञान प्राप्त करून घेत असतानाच संभाजीला लहान वयातच राजकारणाचे प्रत्यक्ष धडे घेण्याची संधी मिळालेली होती. वयाच्या ९।१० व्या वर्षीच तो मुघलांचा मन्सबदार झाला. १६६४ साली औरंगजेबाने जयसिंगाला शिवाजीवर स्वारी करावयासाठी पाठविले. दक्षिणेत येताच जयसिंगाने दि. ३० मार्च १६६५ रोजी पुरंदरला वेढा घातला. शिवाजीमहाराजांनी मुघली फौजांचा प्रतिकार करण्यासाठी अनेक उपाय योजले. मुघलांचा वेढा मारून काढण्याच्या कार्यात मराठ्यांची पुष्कळ प्राणहानी झाली असती आणि पैसाही खर्च झाला असता. फार काळ मुघलांविरुद्ध टिकाव धरणे शक्य नाही हे ध्यानात येताच शिवाजीमहाराजांनी जयसिंगाबरोबर तहाची बोलणी सुरू केली. दि. ११ जून १६६५ या दिवशी महाराज आणि जयसिंग यांची भेट झाली. दि. १३ जून १६६५ ला मराठे आणि मुघल यांच्यात तह झाला.[३] या तहान्वये शिवाजीला देशावरचे नऊ आणि कोकणातील चवदा किल्ले आणि त्यांच्या खाली येणारा मुलुख मुघलांना द्यावा लागला. त्यातून वगळलेले राजगड, तोरणा, रायगड, तळेगड इत्यादि बारा किल्ले आणि त्या खालचा एक लक्ष होन उत्पन्न असलेला प्रदेश महाराजांकडे राहिला. शिवाजी महाराजांनी औरंगजेबाची एकनिष्ठपणे सेवा करावी असेही तहात ठरले होते. साहजिकच ते औरंगजेबाचे ताबेदार झाले होते. या पेचातून महाराजांनी युक्तीने स्वतःची सुटका करून घेतली. त्यांनी पाच हजाराची मन्सब आणि नोकरीच्या खर्चाची जहागीर संभाजीच्या नावाने स्वीकारली. आणि राजकारणाचे डावपेच करण्यासाठी ते स्वतः मोकळे राहिले. त्यामुळे संभाजीचा नकळत राजकारणात चंचुप्रवेश झाला आणि राजकारणाचे प्रत्यक्ष धडे घेण्याचीही संधी त्याला मिळाली.

या तहानंतर शिवाजी आणि संभाजी दि. १५ जून १६६५ ला राजगडावर गेले. तहात ठरलेल्या अटीप्रमाणे दि. १७ जूनला उग्रसेन कच्छवाहबरोबर संभाजीस राजा जयसिंगाच्या हवाली करण्यासाठी त्याच्या छावणीत पाठविले.

१. साशिचिव, पृष्ठ २४५
२. ताकाका–प, पृष्ठ १४३, १९५.
३. शिचप्र, पृष्ठ २३, ५१

दि. १८ जून रोजी केवळ आठ वर्षांचा संभाजी मुघलांच्या छावणीत दाखल झाला.[1] जयसिंगाने पोषाख आणि रुप्याच्या हौद्यासह हत्ती देऊन संभाजीचा सन्मान केला. सप्टेंबर १६६५ पर्यंत शिवाजीचा प्रतिनिधी या नात्याने संभाजी मुघलांकडे ओलीस राहिला. तहात ठरल्याप्रमाणे राजा जयसिंगाने शिवाजीच्या मदतीने विजापूरकरांवर स्वारी केली. परंतु या मोहिमेत मुघलांना यश मिळाले नाही. विजापूरकर आणि गोवळकोंडेकर यांच्या एकजुटीत शिवाजीने सामील होऊ नये म्हणून जयसिंगाने शिवाजी आणि औरंगजेब यांच्या भेटीची योजना आखली. त्यावेळच्या राजकीय परिस्थितीचा विचार करून महाराजांना औरंगजेबाच्या भेटीचे आमंत्रण स्वीकारावे लागले.

**शिवाजी आणि संभाजी यांची आग्र्यास भेट :**

लहान वयातच संभाजीला आपल्या पित्याचे प्रतिनिधित्व स्वीकारावे लागलेले होते. तो मुघलांचा मन्सबदार असल्याने त्याला शिवाजी महाराजांबरोबर आग्र्याला जाणे प्राप्तच होते. त्याच्या बालवयाचा विचार केला तर महाराष्ट्रातून दूर उत्तरेस जाणे फारच त्रासदायक होते यात शंका नाही. जिजाबाई आणि इतर आप्त मंडळींचा निरोप घेऊन दोघे पितापुत्र दि. ५ मार्च १६६६ या दिवशी शत्रूच्या शिबिरात जाण्यासाठी निघाले.[2] तेव्हा पालखी, घोडे, उंट अशा साधनांनीच प्रवास करावा लागत असे. या दूरच्या प्रवासाकरिता हवामानही अनुकूल नव्हते. मे-जूनच्या सुमाराला उत्तर हिंदुस्थानात उन्हाळाही तापदायक असतो. अशा खडतर परिस्थितीत प्रवास करून दोघेही दि. ११ मे १६६६ रोजी आग्र्यास पोचले. मालुकचंदाच्या सराईत पोचल्यावर त्यांनी आपले तंबू ठोकले.[3] आठव्या वर्षीच कठीण प्रवास करावा लागल्यामुळे संभाजीच्या काटकपणाची, सहनशक्तीची आणि धैर्याची कसोटी लागली असे म्हणावयास हरकत नाही.

**आग्रा येथील दरबार :**

मन्सबदाराचे मानमरातब स्वीकारण्याची पहिली संधी संभाजीला जयसिंगाच्या छावणीत मिळाली होती. आग्र्याला गेल्यावर त्याला औरंगजेबाचा दरबार, मुघल साम्राज्याचे वैभव पाहण्याची संधी मिळाली. महाराष्ट्राच्या साध्या राहणीच्या तुलनेत मुघल दरबाराचा थाट डोळे दिपून जाण्यासारखाच होता.

शिवाजी महाराज आग्र्यात आल्याचे कळताच जयसिंगाचा मुलगा कुमार रामसिंग याने शिवाजीमहाराजांना देण्यासाठी गिरधरलाल मुन्शीबरोबर एक

१. मइसा, खंड ८, ले. १६; BCV, P 295 to 302

२. शिचप्र, पृष्ठ २३. ३. RR SA--RSS.

चांदीच्या साजांनी मढविलेला घोडा आणि पोशाख पाठविला. शिवाजीमहाराजांनी त्यांचा स्वीकार करून मुन्शीला २०० रु. आणि पोशाख देऊन परत पाठविले. दि. १२ ला रामसिंगाचा राजवाड्याभोवती पहारा होता. तेथून तो स्वागत करण्यासाठी शिवाजीमहाराजांच्या छावणीजवळ आला. शिवाजीला औरंगजेबाच्या दरबारात घेऊन जाण्यासाठी गिरधरलाल मुन्शीला त्याने पुढे पाठविले. शिवाजी, संभाजी आणि गिरधरलाल दाहार–अरा बागेत आले. शिवाजीला फिरोज बागेतून आणण्यासाठी रामसिंगाने दुंगरमल चौधरीला धाडले. शिवाजी, संभाजी आणि कुमार रामसिंग यांची नूरगंज बागेत भेट झाली. हे तिघे दरबारात पोचेपर्यंत औरंगजेब दिवाण–इ–आममधून दिवाण–इ–खासमध्ये गेला होता. त्यामुळे तेही दिवाण–इ–खासमध्ये गेले. आसद्खानाने शिवाजी आणि संभाजी यांना बादशहापर्यंत नेले. शिवाजीमहाराजांनी एक हजार मोहरा, रु. दोन हजार नजर आणि रु. पाच हजार निसार म्हणून दिले. त्यानंतर संभाजीला औरंगजेबासमोर नेण्यात आले. त्याने पाचशे मोहरा, रु. एक हजार नजर आणि रु. दोन हजार निसार म्हणून बादशहाला दिले. शिवाजीमहाराजांना राजा जयसिंगाच्या पुढे आणि ताहीरखानाच्या जागी ( याला पंधरा दिवसांपूर्वीच पाच हजाराची मन्सब दिलेली होती ) उभे करण्यात आले. औरंगजेब प्रत्यक्ष शिवाजीमहाराजांशी किंवा त्यांना उद्देशून काहीच बोलला नाही.

त्या दिवशी औरंगजेबाचा वाढदिवस असल्यामुळे सर्वांना विडे दिले त्यात शिवाजीलाही विडा देण्यात आला. त्यानंतर इतर सर्वांना मानाचे पोशाख देण्यात आले. त्यामुळे शिवाजीमहाराजांना दुःख झाले. ते भयंकर रागावले. ते लक्षात येताच बादशहाने कुमार रामसिंगाला त्याचे कारण विचारावयास सांगितले. आपल्याला योग्य तो मान न देता कोठे तरी उभे करण्यात आले. माझी मन्सब मी काढून टाकतो असे चिडून शिवाजीमहाराजांनी कुमाराला सांगितले. रामसिंगाने महाराजांची समजूत काढण्याचा प्रयत्न केला, परंतु त्याचा उपयोग झाला नाही. त्यानंतर शिवाजी आणि संभाजी यांना, कुमार रामसिंग घरी घेऊन गेला. त्याच्याशी चर्चा केल्यावर शिवाजीला आपल्या छावणीत जाण्याची परवानगी मिळाली. त्याच दिवसाच्या तिसऱ्या प्रहरी शिवाजीने बाळूशहा आणि गिरधरलाल यांच्याशी चर्चा करून सांगितले की, मी माझा मुलगा तुमच्याकडे नोकरीसाठी पाठवितो. तो बादशहाचा चाकर राहील.

दि. १३ मे रोजी औरंगजेबाने शिवाजीची चौकशी करून तो दरबारात येणार आहे किंवा नाही असे विचारले. संध्याकाळच्या दरबारात संभाजी रामसिंगाबरोबर गेला. संभाजी बादशहासमोर रामसिंगाच्या शेजारी उभा होता. नजराणा म्हणून बादशहाने संभाजीला सरोपा ( Sar-o-pa ), रत्नजडित खंजीर आणि एक मोत्यांची माळ दिली. दि. १२ मे नंतर शिवाजीमहाराज

औरंगजेबाच्या दरबारात पुन्हा गेले नाहीत. शिवाजीमहाराजांना पोशाख व दिलासा देऊन परत आणावे म्हणून बादशहाने आज्ञा केली. परंतु दिलासा देणाऱ्या मुल्तफितखान, आकिलखान व मुखलिसखान यांना शिवाजी म्हणाला, "घेत नाही पोशाख मी. मी काय असा मनुष्य आहे की ज्यास बादशहाने जसवंतसिंगाच्या खाली उभे करावे ?" इत्यादी प्रकारचे भाषण करून शिवाजी बादशहाला न भेटताच परत फिरला.[1]

**कैद आणि सुटका :**

बादशहाजवळ जहानरा बेगम, जाफरखान आणि राजा जसवंतसिंग हे शिवाजीच्या विरुद्ध बोलले. त्यानंतर शिवाजीला मारावे, तुरुंगात टाकावे का एखाद्या गडात अडकवून ठेवावे याविषयी औरंगजेबाने चर्चा केली. शिवाजीला रणदाझखानाच्या घरी नेण्याची औरंगजेबाने सिद्दी फौलादला आज्ञा दिली. रामसिंगाला ही गोष्ट कळताच त्याने मुहमद अमीनखान यास त्यासंबंधी विचारले. त्यामुळे बादशहाने कुमार रामसिंग याजकडून शिवाजी पळून जाणार नाही, तो काही खोडी करणार नाही अशा प्रकारची हमी लिहून घेतली. शिवाजीने दिनांक १५ मे १६६६ या दिवशी रामसिंगाला चांगली वर्तणूक करावयाची हमी देणारे एक पत्र लिहून दिले. शेवटी कुमार रामसिंगाने शिवाजीला काबुल येथे घेऊन जावे असे ठरले. त्याला महाराजांनी विरोध केला. दि. १९ मे पर्यंत या संबंधात चर्चा झाली आणि अखेर ती कल्पना सोडून देण्यात आली. ही चर्चा चालू असताना किंवा पुढे केव्हाही शिवाजीमहाराज औरंगजेबाला भेटावयास गेले नाहीत. तरीही मन्सबदार संभाजी रामसिंगाबरोबर बादशहाच्या दरबारात नेहमी जात असे.

अशाच एका भेटीत औरंगजेबाने एका मल्लाबरोबर संभाजीला मल्लयुद्ध खेळावयास सांगितले. या सूचनेला संभाजीने तडफदारपणाने विरोध केला.[2]

बादशहाने घेतलेले सर्व गड परत दिले तर आपण बादशहाला त्यांच्या बदल्यात दोन कोट रुपये द्यावयास तयार असून संभाजीला बादशहाच्या नोकरीत ठेवावयास तयार आहो. आपल्याला महाराष्ट्रात परत जावयास परवानगी द्यावी अशा आशयाचा एक अर्ज महाराजांनी मुहमद अमीनखान याजबरोबर औरंगजेबाकडे पाठविला. या अर्जामुळे औरंगजेबास राग आला. शिवाजीने कोणासही भेटू नये असा हुकूम काढून औरंगजेबाने त्याच्या निवासस्थानावर चौक्या बसविल्या.

१. शिचसा, खंड १२, लेख ७९ ते ८४; RRSA–RSS.

२. दानपत्र–सं.

हे कळताच महाराजांना ब्रह्मांड आठवले. ते मनात खूप कष्टी झाले. संभाजीला पोटाशी धरून त्यांनी बहुत खेद केला. शिवाजीमहाराजांवर चौक्या बसलेल्या असल्या तरी संभाजी मोकळाच होता. तो रामसिंगाबरोबर दरबारात जातच होता. १६६६ सालाच्या जून महिन्याच्या पहिल्या आठवड्यात औरंगजेबाने शिवाजीकडे सर्व गडांची मागणी केली. शिवाजीमहाराजांनी ती अमान्य केली. दि. ७ जूनला आपल्या सर्व सेवकांना महाराजांनी परत जाण्यास सांगितले आणि तसे परवाने मागितले. सेवकांनी तंबू वगैरे काढून टाकून परत जावयाची तयारी केली. शिवाजीमहाराजांना आग्र्याला बराच काळ काढावा लागल्याने त्यांचा आतापर्यंत बराच पैसा खर्च झाला होता. जुलै महिन्यात महाराजांनी हुंडी देऊन रामसिंगाकडून सहासष्ट हजार रुपये घेतले. औरंगजेबाच्या कडक बंदोबस्तातून सुटून जाण्याची चिन्हे महाराजांना दिसत नव्हती.[1]

अखेर दि. १८ ऑगस्ट १६६६ रोजी सकाळच्या वेळी शिवाजीमहाराज संभाजीसह पेटाऱ्यात बसून औरंगजेबाच्या कैदेतून निसटले.[2] ही बातमी कळताच औरंगजेब संतापला. त्याची तळपायाची आग मस्तकात गेली, आणि त्याने शिवाजीला पकडून आणण्यासाठी चारही दिशांना सैन्य रवाना केले.

आग्रा येथून निसटल्यावर शिवाजी आणि संभाजी यांच्या संबंधी श्रीदिग्विजय बखरीत म्हटले आहे की, "आग्रा येथून निसटल्यावर शिवाजी-संभाजी कुरुक्षेत्री काही दिवस राहून मथुरेस आले. मार्गी येता संभाजीमहाराज यांचे वय अल्प, चालावयाचा अभ्यास नाही. देशी जावे तरी निभावणी कशी होती ! महत्संकट वाटले. परंतु श्री जगदंबा सानुकूल त्यायोगे मोरोपंत पेशवे यांचे मेहुणे अण्णाजीपंत व काशीपंत व विसाजीपंत हे त्रिवर्ग बंधू, कुटुंबसुद्धा मथुरेत राहिले होते. त्यांचा व निराजीपंतांचा परिचय होता. तीर्थ करीत करीत फिरता सर्वांची गाठ पडोन आगत-स्वागत जाले. परस्पर शपथ प्रमाण घेऊन संभाजीमहाराजांस त्यांचे हवाली केले...महाराजांनी आज्ञा केली की, 'आम्ही देशी पावल्यावरी तुम्हास लेहून पाठवू, नंतर तुम्ही चिरंजीवास घेऊन यावे.'[3]

शिवाजीमहाराज राजगडला सुखरूप पोचल्यावर त्यांनी शंभुराजांना परत आणण्याचा बेत केला. काशीपंत, विसाजीपंत यांना पत्र गेल्यानंतर त्रिवर्ग व संभाजी निघाले. वाटेत काय झाले यासंबधात या बखरीत[4] वर्णन आहे की, "मथुरेत संभाजी राजे ठेविले. त्यास आणवावे, यवनांत वृत्त न कळावे, असे विचारात महाराज असता, काशीपंत याणी ब्रह्मवेश, संभाजीमहाराजांना देऊन,

१. शिचसा, खंड १२, ले. ७९–८४; RRSA-RSS.

२. कित्ता; शिचप्र, पृ. २४; मोआम–प, पृ. १९.

३. शिदिब–पृष्ठ २५२–२५४ ४. कित्ता, पृष्ठ २५४–२५७

मार्गांनी घेऊन येत असता, पादशाही ताकीद सर्वांठायी जाली होती की, ‘ शिवाजी येथून पळून गेले, त्यास अथवा त्यांचे लेकास आणोन देईल, त्यास बक्षीस देऊन, मोठे मरातबाने त्याचे चालविले जाईल. ’ त्यावरून गावोगाव तलाश पाडीत होते. संभाजी राजे यांस काशीपंत मार्गांनी घेऊन येत असता, मौजे...गाव हवेली उज्जयिनी येथे गाठ पडली. संभाजीराजे आधीच स्वरूपवान्, पूर्ववय, त्यायोगे सौंदर्येकरून फार चांगले दिसत. त्यावरून पाहणारांनी दूरदृष्टी ‘ ब्राह्मण पादचारी फिरणार, त्याचे पोटी असा पुत्र होणार नाही. कृत्रिम काही आहे ’ असे मनात आणोन, अडथळा केला. काशीपंत खातरजमा बहुत तऱ्हेनी त्यांची करीत; परंतु न होय. त्यावरून जिकीरीस येऊन बोलते जाले की, ‘ शपथ प्रमाण केली असता, अप्रमाण मानिता, त्या अर्थी तुमचे मनात जसे खरे वाटेल ते कळवावे, तसे करीन, असे बोलले. गावचेही चार मिळाले, त्यांणीही वृत्त ऐकले, तेव्हा ब्राह्मणाची करुणा येवोन, ‘ तुम्ही ब्राह्मण, आपला चिरंजीव म्हणता; परंतु आम्हास खरे वाटत नाही. हा शिवाजीमहाराजांचा लेक असेल असे वाटते. तुम्ही नाही म्हणता, त्यास पुत्र तुमचा, तरी एक पात्री भोजन करावे; म्हणजे आमचा संशय दूर होईल. ’ हे ऐकोन अंतःकरणात परम भय पावोन, विचार करिते जाले की, जर करिता जेवतों तो ब्राह्मण्यातून भ्रष्ट होतो; नाही म्हणतों तरी यास नेतात ! आमचे प्राणाशी गाठ पडती ! ’ प्राणान्त संकट जाणून, विश्वेश्वरास ‘ सहस्र ब्राह्मण भोजनास घालू ’ असा नवस नवसून बोलते जाले की, ‘ व्रतबंध ब्राह्मणाचा जाला म्हणजे एकपात्री भोजन नाही. ही वेदाज्ञा आहे. एक फलहार केला असता, वेदाज्ञा आहे. याव्यतिरिक्त वेदाज्ञा नाही. तथापि तुम्ही आमचे पुत्राचा अभिलाष इच्छिता, तरी सांगाल ते करणे प्राप्त. तुम्ही या गावाचे अधिकारी यांचे विद्यमाने सांगावे. स्वजातिधर्मे चालावे किंवा कसे ? ते सांगाल तसे करू. ’ म्हणोन विनयतेनी बोलल्यावरून ‘ फराळाचे नूतन पाक करून एक जागी बसोन करावा. म्हणजे तुम्हास मुक्त करू, ’ बोलल्यावरी काशी पुन्हा बोलते जाले जे, ‘ पहा मी गरीब ब्राह्मण अनाथ आहे. महायात्रेस येकटे येऊ नये म्हणोन कुटुंबसुद्धा मातुश्रीस घेऊन आलो. म्हातारी पुण्यवान होती, ती विष्णुपद सेवून मुक्त जाली. स्त्रियेनी देह प्रयागी समर्पण केला. आम्ही उभयता राहिलो; ते या प्रवाही पडलो ! भगवान् तू त्राता आहेस. उपाहारास एकंदर बसोन करू नये हे धर्मशास्त्र असता संकटार्थी योजिला. विषय सुदृढ राहून, बंधुपितृण्यादि वडिले भेटली, म्हणजे कृतकृत्यता सर्व मेळविली. बोलोन बहुत गहिवरोन, सरंजाम दिल्हा तो घेऊन, पाकक्रिया केली आणि एकपात्री सोजी दशमी वाढून, फराळ केला. ते ग्रामस्थानी पाहून निरपराधे दंड या ब्राह्मणास करीत होतो असे वाटून, एक पागोटे व पाच रुपये द्यावयास काढले. तेव्हा काशीपंत बोलले जे ‘ मी भिक्षुक ब्राह्मण नव्हे. गृहस्थ आहे. त्यात महायात्रा केली; तिचे मांवदे जाल्याशिवाय, कोणाचे घरी

पाणी देखिल घेऊ नये. प्रारब्धानी फराळ करविला इतकेच पुरे. कृपा करावी म्हटल्यावरून मशारनिल्हेस आज्ञा दिली. महाराज आधीच सुकुमार. त्यात उष्ण-कालचे पायी चालणे, दोन चार कोस चालता परम संकट व्हावे, असे करीत गंगातीरास आले. तेथून पुढे जावयास, घोंडी घेऊन, राक्षसभुवनी गंगा उतरोन, पुण्यास आले. तेथे महाराजांची स्वारी रायगडास गेली, हे कळोन निकडीचे लोक सरंजाम घेऊन महाराजांकडे चालले. महाराजांस कळोन भेटीचा समारंभ चांगला करून सुमुहूर्ती भेटी घेतल्या. मोठा आल्हाद महाराजांस व मातुश्री जिजाबाई साहेबांस व राणीवंशात जाला. किल्लोंकिल्ल्यास डाकेनी वर्तमान जाऊन साखऱ्या वाटल्या. तोफा जाल्या. सर्व राज्यांत सर्व जनांनी मोठा उत्साह केला. संभाजीमहाराजांचा पुनर्जन्म जाला. काशीपंत व विसाजीपंत व कृष्णाजीपंत यास 'विश्वासराव हा किताब देऊन, पालखी, हत्ती, सरंजाम, बहुमान वस्त्रे अलंकार दिल्हे." [१]

**राजगडाच्या वाटेवर :**

शिवाजी आणि संभाजी यांची औरंगजेबाच्या तावडीतून सुटका झालेली असली तरी त्यांना महाराष्ट्रात सुखरूपपणे परत जावयाचे दिव्य करावयाचे होते. औरंगजेबाच्या सैन्याची चारही बाजूंना पाळत होती. मुघल सैन्याला हुलकावणी देण्यासाठी महाराज संभाजीला घेऊन प्रथम मथुरेला गेले. तेथे मोरोपंत पिंगळे यांचा मेव्हणा कृष्णाजी काशी हा राहात होता. महाराज त्याला भेटले. संभाजीला लहान वयात यापुढील धावपळीचा, चुकवाचुकवीचा प्रवास झेपणारा नव्हता. संभाजीला कृष्णाजीपंत, काशी राऊ आणि विसाजीपंत यांच्या स्वाधीन करावयाचे ठरले.[२] मथुरेच्या मुक्कामातच शिवाजीने दाढी आणि मिशा काढून टाकल्या. शिवाजी महाराजांनी आपल्या अंगाला राख फासली. त्यांच्या सहकाऱ्यांनीही फकिरांचे वेश धारण केले. सोने, रत्ने बरोबर घेऊन सर्व मंडळी यमुना नदी पार करून अलाहाबादला पोचली.

मुघलांचा पाठलाग चुकवीत शिवाजी महाराज दि. १२ सप्टेंबर १६६६ रोजी राजगडावर पोचले. आपल्या मुलाला मुघलांच्या पाठलागाचा त्रास होऊ नये म्हणून शिवाजीमहाराजांनी एक अजब युक्ती केली. त्यांनी आपल्याला कब-कलशाकडून संभाजी तिकडेच मरण पावल्याचे पत्र आले असल्याचे जाहीर करून ते पुत्रशोक करू लागले.[३] त्यामुळे जवळपासचे जमीनदार, शिवाजीशी गुप्त संबंध

१. शिदिव

२. शिचप्र. पृष्ठ ४७; मइसा, खंड ८, ले. २३, पृष्ठ १९।२०; सशिचिव, पृष्ठ २४०; सभा–व. पृष्ठ ४५; मॉआम- प, पृष्ठ २०

३. RRSA–RSS. p. 58–59; 98-99.

ठेवणारे कित्येक उमराव आणि रजपूत लोकांनी त्यांना सांत्वनासाठी पत्रे लिहिली. संभाजीच्या पत्नीने अतिशोकामुळे सती जावयाची इच्छा दाखविली. तिला मोठ्या कष्टाने सती जावयाच्या विचारापासून परावृत्त करण्यात आले. शिवाजीमहाराजांनी संभाजीसाठी सर्व उत्तरक्रियाही उरकून टाकली आणि स्वतःला दुसरा मुलगा झाल्याचेही जाहीर केले.[१]

ही बातमी शिवाजी महाराजांनी हेतुतःच पसरविली होती. त्यावेळी त्यांना संभाजी हा एकटाच मुलगा होता. मुघलांनी संभाजीचा पाठलाग करू नये म्हणून राजगडला परत आल्यावर महाराजांनी मोठ्या युक्तीने ही अफवा पसरविली होती.

संभाजी मथुरेच्या ब्राह्मणांबरोबर कसा परतला याविषयी दिल्कुशा लिहितो, “ इकडे मथुरेत शिवाजीचा मुलगा होता. त्याचा चेहरा कोवळा होता आणि त्याचे केस लांब होते, ब्राह्मणांनी त्याला मुलीचा वेष दिला. नंतर तो आपल्या बायका पोरांना घेऊन निघाला. स्त्री वेषधारी मुलाला ( संभाजी ) ही आपली दासी आहे असे त्याने दाखविले. अशारीतीने त्याने त्याला शिवाजीपाशी पोहोचविले. शिवाजीने त्याला इतकी बक्षिसी दिली की, त्या ब्राह्मणाचे जन्माचे सार्थक झाले. ”[२]

संभाजीला राजगडावर पोचविण्याची सर्व जबाबदारी महाराजांनी मथुरेच्या त्रिवर्गाकडे सोपविलेली होती. शिवाजीमहाराजांचे पत्र आणि निरोप जाताच कृष्णाजी विश्वासराव, त्यांच्या मातोश्री आणि काशी त्रिमल यांनी संभाजीराजे यांस ‘ जानवे आणि धोतर नेसवून आपला भाचा म्हणून राजगडास आणले[३] ते शके १५८८, मार्गशीर्ष शु. ५ म्हणजे २० नोव्हेंबर १६६६ रोजी राजगडास पोचले.[४] याचा अर्थ महाराजांच्या नंतर २ महिने आणि ८ दिवसांनी संभाजी परत आला. त्याला सुखरूपरीतीने परत आणल्याबद्दल महाराजांनी कृष्णाजी, त्याची आई आणि काशी त्रिमल यांना बक्षिसे दिली. “ साहेब आगरीयाहून निघाले याउपरि चिरंजीव राजश्री संभाजीराजे यांस कृष्णाजी विश्वासराऊ यांचे सांभाळी केले. मानइले चिरंजीवास सुखरूप किल्ले राजगडास घेऊन आले. मानइलेची मातोश्री आईची बंधिली. म|| काशी त्रिमळ हेही बराबरी आलियाबद्दल मेहेरबानीने बक्षीस द्यावयाचा तह केला. एकूण रुपये ५००००; मातुश्री आईजी २५०००, म|| काशी त्रिमळ २५०००. ”[५] कृष्णाजी त्रिमळ शिवाजीबरोबरच

१. कित्ता; KK-ED, pp 281, 284-86; शिचवृ, खंड-३

२. मोआम-प, पृष्ठ २०

३. सभाब पृष्ठ ४७

४. शिचप्र, पृष्ठ २४

५. मइसा- खंड ८, ले. २३

आलेला होता. विसाजी मथुरेस राहिला म्हणून कृष्णाजी, काशी व त्याची आई हे दोघेजणच संभाजीला घेऊन आल्यामुळे बक्षीस या दोघांनाच देण्यात आले असावे. संभाजी परत येईपर्यंत जिजाबाई उपवास करीत होती. तो सुखरूप परतल्यावर जिजाईने पारणे करून पुष्कळ दानधर्म केला.[१]

संभाजी सुखरूप परतल्यावर त्याच्या मरणाच्या वाईट बातमीबद्दल शिवाजीची बायको आणि इतर लोकांनी महाराजांना विचारले. तेव्हा ते म्हणाले की, त्या उठावणीने बादशहास गाफील व मुलाच्या शोधाविषयी निष्काळजी न बनविते तर सारखी धरपकड होत असलेल्या विकट रस्त्याने दोन महिन्यांच्या अवधीत आपला मुलगा येऊन पोचणे कठीण झाले असते.[२]

शिवाजी आणि संभाजी आग्र्याहून सुखरूप परतले हे खरे असले तरी वाटेत त्यांच्याबद्दल अनेक गोष्टी प्रसृत झालेल्या होत्या. चिटणीसांनी जी दंतकथा दिलेली आहे ती अशी : "मथुरेस पत्रे पाठविली जे देशी सुखरूप पावलो. याउपरि सावधपणे संभाजी राजे यांस घेऊन येणे. ऐसे काशीपंतास लिहिले. त्याणी संभाजीराजे यांस घेऊन येता, वाटेने (त्यांचे) स्वरूप सुंदर, सतेज (तेव्हा) हा कोणी मातबर आहे ऐसी चौकशी पडली. ते समयी "आम्ही ब्राह्मण, हा आमचा मुलगा म्हणोन फराळ एके जागा बसोन काशीपंतांनी केला. ऐसे प्रकारे संकटे करून निभावून आलियावरि महाराज फार संतोषी होऊन, विश्वासू खरे"[३] अशाच प्रकारची एक दंतकथा शिवाजी महाराजांबद्दलही प्रचलित आहे.

संभाजीच्या आयुष्याचा विचार करताना हे आग्रा प्रकरण महत्त्वाचे मानावे लागते. ८।९ व्या वर्षी संभाजीला मन्सबदार म्हणून शिवाजीचे प्रतिनिधित्व करावे लागले. लहान वयातच त्याला मुघली दारबारचा थाट पाहावयास मिळाला. मानमरातबाची, देण्याघेण्याची, दरबारी रीतिरिवाजांची त्याला माहिती मिळाली. आईवाचून पोरके असलेल्या या मुलाला परप्रांतात अनोळखी ठिकाणी आणि अनोळखी माणसांबरोबर राहावयाची पाळी आली. त्याच्या बाल मनाला पित्याचे राजकीय हेतू समजणे शक्यच नव्हते; तरीही त्याला आलेला अनुभव त्याच्या मनात कायमचे घर करून राहिला असेल. संभाजीने औरंगजेबाच्या दरबारात पाऊल टाकले तेव्हा त्या बालमनाला कल्पनाही नसेल की पुढील आयुष्यात याच बादशहाकडून त्याचे हालहाल होऊन नियती त्याची सत्त्वपरीक्षा पाहणार होती. औरंगजेबालाही त्यावेळी कल्पना नव्हती की शिवाजीसारख्या सिंहाचा हा छावा आपल्याला भारी होणार आहे. पुढे काय

१. एकब, पृ. ४२
२. शिचवृ, खंड ३ रा, KK-ED.
३. सशिचिब, पृष्ठ २४३

घडणार आहे हे त्यावेळी कोणालाच माहीत नव्हते. नियतीने मात्र या प्रसंगानंतर तेवीस वर्षांनी संभाजी आणि औरंगजेब यांची अगदी वेगळ्या परिस्थितीत भेट घडविली. त्या भेटीत स्वराज्याचे रक्षण करणाऱ्या सिंहाच्या छाव्याचे क्षात्रतेज त्याच्या आणि जनतेच्या दृष्टोत्पत्तीस आले. त्या त्यागाच्या आणि क्षात्रतेजाच्या बलयानेच संभाजीच्या मृत्यूनंतर मराठ्यांनी आपले स्वातंत्र्ययुद्ध अखेरपर्यंत चालू ठेवले.

संभाजी जेव्हा राजगडास परत आला तेव्हा महाराष्ट्राच्या राजकीय परिस्थितीत बराच बदल झालेला होता. दक्षिणेचा सुभेदार म्हणून राजा जयसिंगाच्या जागेवर शहाआलम येणार होता.[१] शिवाजीमहाराजांना आग्रा प्रकरणानंतर काही काळ शांतता हवी असल्याने त्यांना मुघलांशी नमते घेणे भाग होते. त्यामुळे महाराजांनी शहाआलमशी तहाच्या वाटाघाटी सुरू केल्या. मुघलांचे आणि शिवाजीचे सख्य होऊन शहाआलमने महाराजांशी सल्ला केला. या तहाप्रमाणे शिवाजीचा प्रतिनिधी म्हणून संभाजीला चार हजार स्वारांची मन्सब देण्याचे आणि त्याला वऱ्हाड व खानदेशात मोकासा द्यावयाचे ठरले.[२] मुघलांची मन्सबदारी स्वीकारण्यासाठी संभाजी राजगडावरून दि. ९ ऑक्टोबर १६६७ रोजी औरंगाबादेस जावयास निघाला आणि दि. २७ ऑक्टोबरला तो तेथे पोचला.[३] दुसऱ्या दिवशी (दि. २८ ऑक्टोबर) संभाजी आणि जसवंतसिंग यांची भेट झाली. दि. ४ नोव्हेंबर १६६७ ला मुघली मन्सबदार म्हणून संभाजी शहाआलमला भेटला. शहाआलमने त्याला एक हत्ती आणि रत्नजडित तलवार भेट दिली. मन्सबदारीच्या तांत्रिक गोष्टी पूर्ण झाल्यावर जसवंतसिंगाच्या माणसाबरोबर दि. ५ नोव्हेंबर १६६७ रोजी संभाजी राजगडास परतला.[४] संभाजी लहान असल्यामुळे त्याचे प्रतिनिधी म्हणून निराजी रावजी आणि सेनापती म्हणून प्रतापराव गुजर १६६८ च्या ऑगस्ट महिन्यात औरंगाबादेस गेले.[५]

शिवाजी आणि शहाआलम यांचा झालेला तह फार काळ टिकला नाही. १६६९ साली तह मोडल्यामुळे प्रतापराव गुजर आणि आनंदराव राजगडला परत आले. अशा रीतीने संभाजीच्या बालपणातील बारा वर्षांचा पहिला टप्पा समाप्त झाला.

१. M A--Js, p. 40

२. शिपसा सं. क्र-११'१८, पृ. ३२३; RR SA--RSS, p 66, 68

३. शिचप्र, पृष्ठ २४

४. मोआम--प; पृष्ठ २५; शिचप्र, पृष्ठ २४, ६१

५. शिचप्र पृष्ठ २४; मोआम, प, पृष्ठ २६

* * *

# ३. युवराज संभाजी

युवराज म्हणून संभाजीच्या आयुष्याचा १६७० ते १६८० हा दहा वर्षांचा काळ होय. त्याच्या आयुष्यातील हा दुसरा टप्पा आहे. " बुधभूषण " या राजनीतिपर संस्कृत ग्रंथावरून, राजनीतिशास्त्रात सांगितलेले शिक्षण शिवाजी महाराजांनी आपल्या युवराजाला, संभाजीला दिले असे दिसते. पुरातन राजनीतिशास्त्रज्ञांच्या ग्रंथांचा अभ्यास करून, संभाजीने त्यातील वचनांचा संग्रह आपल्या ' बुधभूषण ' या ग्रंथात केलेला आहे. याशिवाय या ग्रंथात संभाजीचे गुणवर्णन करणारे श्लोकही आढळतात :

तस्यात्मजः शंभुरिति प्रसिद्धः समस्तसामंतशिरोवतंसः ।
यः काव्यसाहित्यपुराणगीतकोदण्डविद्यार्णवपारगामी ॥ १५ ॥

( म्हणजे काव्य, अलंकारशास्त्र, पुराणे, संगीत आणि धनुर्विद्या यांत पारंगत असलेला त्याचा ( शिवाजीचा ) मुलगा शंभू हा सर्व मांडलिक राजांच्या अग्रस्थानी शोभत आहे ).[१] संभाजीच्या या वर्णनावरून शिवाजीमहाराजांनी उत्कृष्ट प्रकारचे शिक्षण देऊन त्याला सुविद्य केले होते असे दिसून येते.

युवराजपदाला उपयुक्त असे शिक्षण देण्याच्या दृष्टीने महाराजांनी संभाजीला श्री समर्थांच्या सान्निध्यात ठेवले होते असा उल्लेख एका बखरीत दिलेला आहे.

**राज्यकारभारात प्रवेश : ( १६७० ते १६७४ )**

१६७० सालापासूनच शिवाजीमहाराजांनी युवराज म्हणून संभाजीला शिक्षण देण्यास प्रारंभ केला. राज्यकारभारात त्याला अनुभव यावा म्हणून महाराजांनी शके १५९२ माघ वद्य एकादशीस ( दि. २६ जानेवारी १६७१ ) संभाजीला कारभार सांगितला.[२] त्याला स्वतंत्र लेखकही दिले. दि. १९।९। १६७१ पूर्वीच माहादाजी यमाजी हा चिरंजीव संभाजीराजे यांकडे वाकेनिविसीचे मुतालिकीस होता. त्याला दरबारात येण्याजाण्याचे काम करावे लागे म्हणून वार्षिक १०० होन मुकर केले होते. लिहिण्यासाठी कागद, शाही ( शाई ), सिरे

१. बुधभू-वे, पृष्ठ २
२. शिचप्र, पृष्ठ ५२

(?) व मदतनीस देण्यास शिवाजीमहाराजांनी दि. १९–९–१६७१ या दिवशी धारराव निंबाळकर यांस लिहिले होते.[1]

### युद्धआघाडीवर संभाजी :

लहानपणापासूनच युद्धकलेचे युवराजाला शिक्षण दिलेले असले तरी १६७२ सालापासून तो आघाडीवर जाऊ लागलेला दिसतो. शिवाजीमहाराज त्याला एखाद्या मोठ्या तुकडीचे नेतृत्व करावयास सांगत असत. १६६८ आणि १६७२ साली भारतात आलेल्या फ्रेंच प्रवाशाने संभाजीच्या धैर्याचे आणि युद्ध-कौशल्याचे वर्णन केलेले आहे. त्यावेळी गुजरातमध्ये असलेला आबे करे[2] ( Abbe' carre' ) लिहितो, " शिवाजी राजांनी आपल्या सैन्याचे विभाग करून शेजारच्या सर्व शत्रूंवर एकाच वेळी हल्ला चढविला आहे...शिवाजी राजांनी दहा हजार शूर अशा सैन्याचा विभाग आपल्या मुलाच्या ( संभाजीच्या ) ताब्यात दिला होता. हा युवराज लहान असला तरी धैर्यशील आणि आपल्या पित्याच्या कीर्तीस साजेल असाच शूर वीर आहे. शिवाजीमहाराजांसारख्या युद्धकुशल बापाबरोबर राहून तो युद्धकलेत तरबेज झालेला असून, चांगल्या वयोवृद्ध सेना-पतीचीही बरोबरी करील इतका तो तयार आहे. तो मजबूत बांध्याचा असून अति स्वरूपवान आहे. त्याचे सौंदर्य हाच सैनिकांचे त्याचेकडे आकर्षण वाढविणारा मोठा गुण आहे. सैनिकांचे त्याच्यावर प्रेम आहे. आणि ते त्याला शिवाजी-सारखाच मान देतात. फरक इतकाच की ह्या सैनिकांना संभाजीच्या हाताखाली

---

१. मइसा-खंड ८, लेख २५, पृष्ठ २१

२. टीप : आबे करे याला ही सर्व हकीकत बहुधा चेऊलच्या मराठा सुभेदाराने आपल्या पाहुण्यांचे लक्ष दुसरीकडे वेधण्याच्या हेतूने सांगितली असावी असे डॉ. सुरेन्द्रनाथ सेन म्हणतात. संभाजी निःसंशय उत्तम लढवय्या आणि कर्तृत्ववान सेनापती असला तरी आबे करेने केलेली प्रशंसा अस्थानी असल्याचे आणि आपल्या पित्याचे व्यवहारकुशल राजकारणी गुण आणि आचार संभाजीमध्ये नव्हते असे डॉ. सेन लिहितात. आबे करे हा शिवाजीची उत्साहाने स्तुती करणारा आणि मराठ्यांच्या राजाविषयी, त्याच्या शत्रुमित्रांप्रमाणेच आदरभाव ठेवणारा आणि कौतुक करणारा निःपक्षपाती साक्षीदार, असे डॉ. सेन मान्य करतात. चेऊलच्या सुभेदाराने आबे करेचे लक्ष दुसरीकडे वेधण्यासाठी संभाजीचे अतिशयोक्तिपर वर्णन केले असे त्यांचे विधान मान्य करावयाचे म्हटले तर आबे करेचे लक्ष दुसरीकडे म्हणजे कोठे जावे या सुभेदाराच्या हेतूसंबंधी डॉ. सेन काहीच सांगत नाहीत. महाराजांनी संभाजीला स्वतःच्या बरोबर किंवा मोरोपंत पिंगळ्यांसारख्या कुशल नेत्याबरोबर पाठविलेले असणे, तसा पुरावा उपलब्ध नसला तरी, संभवनीय व शक्य वाटते. संभाजीला शिवाजीराजांनी युद्धकलेचे शिक्षण देणे योग्य व साहजिकच होते. स्वतःच्या कारकीर्दीत संभाजीने तसे नैपुण्य दाखविलेलेही दिसते.

लढण्यात विशेष धन्यता वाटते. ते आपल्या कर्तबगारीचे सारे श्रेय आपल्या छोट्या सेनापतीस देतात. कोणीही कर्तबगारी दाखविली तर संभाजी त्यांचे कौतुक करतो. त्याचेसमोर एखाद्याने शौर्य दाखविले तर संभाजी त्याला बक्षीस दिल्यावाचून राहात नाही. ''

शिवाजी राजांच्या सैन्याने १६७२ च्या जानेवारी आणि जूनमध्ये रामनगरजवळ चढाई करून जव्हार लुटले होते; रामनगर घेतले होते. मोरोपंत या तुकडीचे नेतृत्व करीत होते.[१]

आवे करे पुढे म्हणतो, " संभाजीला खंबायत आणि गुजरात प्रांतावरील राजांवर स्वारी करण्यास हुकूम देण्यात आला. आपल्या वडिलांनी आपल्याला इतकी महत्त्वाची व मोठी कामगिरी सांगितलेली पाहून त्याला धन्यता वाटली, आणि मोठ्या उत्साहाने कार्यप्रेरित होऊन तो आपल्या सैन्यानिशी विशेष पराक्रम करून दाखविण्यास उद्युक्त झाला. ज्यांच्यावर तो स्वारी करणार ते त्याच्या नांवाच्याच दराऱ्याने पळून गेले. त्यामुळे त्याला यश आणि कीर्ती मिळविणे सोपे गेले. त्याने थोड्या अवधीत बराचसा मुलूख कबजात आणला. या बालराजाची सर्वत्र इतकी स्तुती केली जाते की त्याच्या बापालाही हेवा वाटत असेल. ''[२]

राज्यकारभाराचे शिक्षण घेत असताना संभाजीचा इंग्रज वखारवाल्यांशी संबंध आला. शिवाजीमहाराजांच्या गैरहजेरीत संभाजीला दरबारातील शिष्टाचाराचे अनुभव व परकीय दूतांशी वागण्या-बोलण्याची संधी मिळाली. वयाच्या सोळाव्या वर्षीच त्याचा इंग्रजांशी संबंध आला. शिवाजीशी तह करण्यासाठी टॉमस निकल्सला सूचना दिलेली होती की शिवाजीची भेट न झाल्यास त्याचा मुलगा किंवा जो कोणी अधिकारी असेल त्याला भेटून परत यावे.[३] मुंबईचा गव्हर्नर आणि हिंदुस्थानचा प्रेसिडेंट यांच्या हुकमाप्रमाणे टॉमस निकल्स महाराजांशी तह करण्यासाठी, शामजी आणि इतर ३७ लोकांसह दि. १९ मे १६७३ रोजी मुंबईहून निघाला. नागोठणे, पाली, सरसगड ( पानुसवाडी ) या मार्गाने ते दि. २१ ला रायगडाच्या पायथ्याशी पोचले. महाराज दोन दिवसांच्या मुक्कामावर असलेल्या एका क्षेत्रात स्नानासाठी गेले असल्याचे तेथे त्याला समजले. शिवाजी नसल्यामुळे टॉमस निकल्सने गडावर येऊन बोलण्यासाठी संभाजीची परवानगी मागितली. ती त्याने लगेच दिली. त्या दिवशी पाऊस फार पडत असल्यामुळे टॉमस गडावर गेला नाही. दि. २३ मे १६७३ रोजी तो आणि त्याचे सहकारी गडावर गेले. टेकडीच्या माथ्यावरील मोठ्या शहरात शिवाजीमहाराजांचा चौसोपी वाडा होता.

१. शिपसासं–क्र. १४०४, १४४२, १४४७.

२. FBS-SNS, pp. 232–233

३. शिपसासं–क्र. १५३५

त्याच्या मध्यभागी मोठी इमारत होती. तेथे बसून राजे कारभार पाहात असत. टॉमस निकल्सला पिलाजी भेटला. ( महाराजांनी इंग्रजांशी तह करण्याचे सर्व अधिकार पिलाजीला दिले होते. ) संभाजी लहान आणि अननुभवी असल्यामुळे त्याच्यावर महत्त्वाच्या गोष्टी सोपविलेल्या नसल्याचे पिलाजीने सांगितले. दि. २४ मे ला टॉमस निकल्सला भेटावयास बोलाविले. तेथे शिवाजीचा चिटणीस बसला होता. त्याने इकडचे तिकडचे प्रश्न विचारले. तेवढ्यात संभाजी तेथे गेला. त्याने निकल्सचे काय काम आहे हे समजावून घेण्याची इच्छा दाखविल्यामुळे त्याला आपल्या कामाचे स्वरूप सांगितले ते ऐकल्यावर ‘ मला याबाबतीत काही करता येत नाही. मी तुमच्या आगमनाबद्दल महाराजांना कळवितो म्हणजे ते लवकर येतील. तुमच्या प्रकृतीलाही उंचावरची हवा मानवणार नाही. तेव्हा तुम्ही खाली जाऊन राहा ’ असे संभाजीने सांगितले. टॉमस निकल्स गडाखाली आला. तो पायथ्याशी ५–६ दिवस राहिला. त्याला मीठ आणि लाकूड या संबंधात हुकूम हवा होता. त्यामुळे दि. २–६–१६७३ रोजी निकल्सने शामजीला संभाजीकडे पाठविले. परंतु तेवढ्यात शिवाजी आल्याचे कळल्यामुळे दि. ३–६–१६७३ ला निकल्स पुन्हा रायगडावर गेला.[1] महाराजांच्या गैरहजेरीत संभाजीला इंग्रज वकिलाशी बोलण्याची संधी मिळाली.

शिवाजीमहाराजांच्या राज्याभिषेकानंतर त्यांच्या घराण्यात थोडी धुसफूस सुरू होऊन गृहकलह निर्माण झाला असावा असे वाटते. याचा विचार करण्यापूर्वी महाराजांच्या राज्याभिषेकाच्या वेळी संभाजीचे नातेवाईक कोण कोण होते ते पाहणे अगत्याचे आहे.

**कुटुंब-परिवार :**

संभाजीची आई सईबाई, तो दोन वर्षांचा असतानाच मरण पावली. तरीही त्याला वयाच्या सतरा वर्षांपर्यंत ( १६७४ पर्यंत ) आजीचे, जिजामातुश्रीचे वात्सल्य लाभले. संभाजीच्या आजोळच्या नातेवाईकांचा त्याला काही सहवास मिळाला किंवा काय यासंबंधात कागदपत्रे उपलब्ध नाहीत. संभाजीला त्याच्यापेक्षा तीन मोठ्या बहिणी होत्या. सकवारबाई, राणूबाई, आणि अंबिकाबाई. या अनुक्रमे १६५०, १६५२-५३ आणि १६५४-५५ च्या सुमारास जन्मल्या. बजाजीचा मुलगा महादाजी निंबाळकरशी सकवारबाईचे लग्न झाले होते. राणूबाई जाधवांकडे दिली होती आणि अंबिकाबाईचे लग्न हरजीराजे महाडिक यांच्याशी झाले होते.[2]

१. शिपसासं–क्र. १५३६, पृष्ठ ४४०

२. भोवंच-सा, पृष्ठ ४७

संभाजीची बायको येसूबाई ही शिवाजी महाराजांची पहिली सून, आणि जिजाबाईची नातसून. १६८० सालापर्यंत भोसले घराण्यात तीच एक सून होती. येसूबाईला आपल्या आजेसासूचा बरीच वर्षे सहवास लाभला. ( सुमारे १६६१ ते १६७४ ) त्यामुळे ती सुविद्य, सुसंस्कृत आणि कर्तृत्ववान झाली. तिचे माहेरही त्या काळात प्रसिद्ध होते. शिर्के हे दाभोळ येथील मामले रायरीचे देशमुख. त्यांना रायरी-शिरकाण येथील सरदेशमुखीचे वतन होते. शिरकाण म्हणजे शिर्क्यांची जहागीर. तसेच शिर्काई ही त्यांची कुलस्वामिनी. शिरकाण म्हणजे शिरे कापणे किंवा शिर्क्यांचा नायनाट असा अर्थ नसून शिर्क्यांच्या ताब्यातील प्रदेश असा त्याचा खरा अर्थ आहे. जसे हबशांचे हबसाण, फिरंग्यांचे फिरंगाण त्याप्रमाणेच शिर्क्यांचे शिरकाण होय.[१] दोन मोठ्या घराण्यांचा येसूबाईशी जवळचा संबंध असल्यामुळे तिच्यावर लहानपणापासूनच चांगले संस्कार आणि त्यांचे आचरण होणे स्वाभाविक होते. 'चवथा वाडा मोर्तब सुद' असा जिजाबाईचा आणि 'श्री सखीराज्ञी जयति' असा येसूबाईचा शिक्का होता.[२] जिजामातुश्रींची अनेक पत्रे उपलब्ध असली तरी येसूबाईचे संभाजीच्या कालातील एकच पत्र उपलब्ध आहे.[३]

संभाजी राजांनी रायगडजवळ पाचवड येथे राजमंदिर बांधण्याची आज्ञा केली होती. ते उत्तम प्रकारे बांधण्यात आले. संभाजी आणि येसूबाई यांना हा प्रासाद पाहून संतोष वाटला. त्यांनी इमारतीच्या लोकांस तीन हजार आणि अर्जोजी यादव या स्थापत्यशास्त्रज्ञास ५ हजार होन दिले.[४] संभाजी विरुद्ध झालेल्या कटात बाळाजी आवजी, आवजी बल्लाळ व शामजी यांना राजांनी देहान्त शासन केले, त्याची सविस्तर माहिती राज्यारोहण आणि शहाजादा अकबर या प्रकरणांत दिलेली आहे.

येसूबाईचे दुसरे पत्र राजांच्या मृत्यूनंतरचे उपलब्ध असून त्यात तिने चिंचवडच्या देवस्थानाकडून पैशाची मागणी केलेली आहे.[५]

देहान्त शासन करण्यात आल्यावर त्या संबंधात येसूबाई आणि संभाजीराजे यांच्यात चर्चा झाली. त्यासंबंधी मल्हारराव चिटणीस लिहितो, "... याप्रमाणे जाहल्यावर महाराजांस बाळाजी आवजी पुत्रासुद्धां तिघांसही मारिलें असें कळले. तेव्हा 'त्यांस मारावयाचे कारण नव्हते' असे बोलिले आणि महालात गेले. तेथे

१. सनदापत्रे, वतन- निवाडापत्र, पृष्ठ ८०-८५; महजर नामा, पृष्ठ ७७-७८

२. अमराअ-जो, पृष्ठ २२९, २३१

३. श्रीसाका, लेख ६७, पृष्ठ ११३

४. ताकाका-प, पृष्ठ ४७०, लेख ३२२

५. मइसा, खंड २, पृष्ठ १९ ते २३

येसूबाईसाहेब यांणीं बाळाजी प्रभू मारिले हे उचित न केले, बहुता दिवसांचे आणि इतबारी व पोख्त. थोरले महाराज कृपाळू. सर्व अंतरंग त्याजपाशी होते. चिटणीस राज्याचे व आपले प्राण ऐसे म्हणत आले. वंशपरंपरेने चिटणीशी देऊन पत्र शपथपूर्वक त्यांस दिले. ते माहित असोन, त्यांणी अपराधही काही केला नाही ( असे असतां ) लहानाचे सांगण्यावरून हे गोष्ट कशी केली ? सर्व कारकून गेले, मारिले, बेदिल जाहले, अन्यायीहि झाले, एक एक होते तेहि ऐसे केले. पुढे राज्य कसे चालेल ? ' इत्यादि बोलली. तेव्हां ' आमचेही मनांत ही गोष्ट नव्हती परंतु रागाचे समयीं बोललों तितक्यावर परवानगी सांगून जाले ते वाईट वाटून उठून आलों. वाईट गोष्ट जाली खरी. तुम्ही त्यांचे धाकटे पुत्र दोघे आहेत ते खाजगीकडे ठेवून त्यांचा बंदोबस्त दरमहा देऊन चालवावा. त्यांचे कारकून लिहिणार त्यांचे हातचे काम चालविण्याचे. मुलें लहान आहेत. त्यांजवर कृपा करावयाची, असे सांगितलें. त्याजवरून येसूबाईसाहेब यांणीं मुले दोन खंडो बल्लाळ व निळो बल्लाळ, यांचे रक्षण केले.''[१] या कटाची चर्चा पुढील प्रकरणात येईलच.

" शिक्के शिवाजीमहाराज जिजाबाईसाहेब यांचेकडे ठेवून करवीत होते; त्याचप्रमाणे संभाजीमहाराज यांणी शिक्के पेटीत घालून, देवापाशी ठेवून, पेटीची किल्ली वाड्यात असावी, शिक्के करणे ते परवानगीची याद जाली म्हणजे नेऊन, समजवावी, नंतर शिक्के तेथेच आणोन करावे. असे येसूबाईसाहेब यांजपासून करवू लागले. असे चालत होते. याजवर त्या कागदावर शिक्के करविणे व आपले कागदपत्र लिहविणे, चिठ्ठीचपाटी लिहिविणे ते येसूबाईसाहेब खंडो बल्लाळ यांजकडून करवू लागली " असे म. रा. चिटणीस बखरीत म्हटले आहे.

संभाजी आणि येसूबाई यांना दि. ४–९–१६७८ रोजी श्रृंगारपूर येथे मुलगी झाली. तिचे नाव भवानीबाई असे ठेवण्यात आले.[२] तिचे लग्न हरजी राजे महाडिक यांचा मुलगा शंकराजी महाडिक याच्याबरोबर झाले. तिला दुर्गोजी आणि अर्जोजी अशी दोन मुले झाली. शंकराजीच्या मरणानंतर भवानीबाई सती गेली. शाहूने आपल्या बहिणीला–भवानीबाईला तारळे गावची सरदेशमुखी व नाडगौडाचे वतन दिले होते.[३] भवानीबाईच्या पाठीवर येसूबाईला अपत्य झाले नव्हते. त्यांना मुलगा हवा होता म्हणून त्यांनी श्रृंगारपूरला पुत्रकामेष्टी यज्ञ केला. दि. १८–५–१६८२ ला संभाजी आणि येसूबाई यांना मुलगा झाला. त्याचे नाव शिवाजी असे ठेवण्यात आले. तोच पुढे शाहू या नांवाने ओळखण्यात येऊ

१. मराचिब, पृष्ठ १२

२. शिचप्र, पृष्ठ २९

३. पेद. शाहू रु. क्र. ३ ( पुडके ३ ) क्र. २०३

लागला. ( त्याची जन्मवेळ सूर्योदयापासून घ. २४ ( दिनमान घ. ३२ ) शततारका नक्षत्र, चरण ३, रास कुंभ ).[१]

**सावत्र माता :**

संभाजीला सात सावत्र माता होत्या : सगुणाबाई, सकवारबाई ( गायकवाड ); काशीबाई ( जाधव ), पुतळाबाई ( मोहिते ), सोयराबाई ( मोहिते ), लक्ष्मीबाई ( विचारे ) आणि गुणवंताबाई ( इंगळे ). १६७४ मध्ये शिवाजीमहाराजांचा राज्याभिषेक झाला त्यावेळी त्यांच्या चार बायका जिवंत होत्या. संभाजी राजे गादीवर बसले तेव्हा दि. २७–६–१६८० रोजी पुतळाबाई सती गेली. शेवटी सोयराबाई आणि सकवारबाई या राहिल्या. सोयराबाईच्या मृत्यूसंबंधी ' वारसा हक्काच्या कलहातून राज्यपद ' या प्रकरणात माहिती दिलेली आहे. सकवारबाई येसूबाईबरोबर मुघलांच्या कैदेत होती.

**सावत्र भावंडे :**

सकवारबाईला एक मुलगी होती. तिचे नाव कमलाबाई असून तिचा जन्म दि. ७–९–१६६१ मध्ये झाला. तिचे लग्न नेताजी पालकरच्या मुलाशी झाले होते. सगुणाबाईला एक मुलगी होती, तिचे लग्न संभाजीचा मेव्हणा गणोजी शिर्के याच्याशी झाले होते. तिचे सासरचे नाव राजकुंवरबाई.

सोयराबाईला एक मुलगा आणि एक मुलगी होती. मुलगा राजाराम. याचा जन्म दि. २४–२–१६७० रोजी झाला. राजारामाचे पहिले लग्न दि. १५–३–१६८० रोजी प्रतापराव गुजर यांची मुलगी जानकीबाईशी झाले. जानकीबाई मेल्यानंतर संभाजीने राजारामाची आणखी तीन लग्ने केली. पहिली बायको हंबीरराव मोहिते यांची मुलगी ताराबाई; दुसरी कागलकर घाटगे यांची कन्या राजसबाई आणि तिसरी खानविलकर यांची कन्या अंबिकाबाई.

**शिवाजीमहाराजांचा राज्याभिषेक :**

महाराजांनी अनेक पिढ्यांच्या गुलामगिरीनंतर हिंदूंचे स्वतंत्र असे हिंदवी स्वराज्य आपल्या अचाट कर्तृत्वाने निर्माण करून ठेवले. तरीही ते विजापूरकरांचे जहागिरदार म्हणूनच ओळखले जात. त्यांना मुघलांचे मांडलिकत्व पत्करावे लागले होते. त्यामुळे त्यांनी निर्माण केलेल्या स्वराज्याला इतर सत्तांप्रमाणे स्वतंत्र व सार्वभौम राज्याचे स्थान प्राप्त करून देण्यासाठी स्वतःला राज्याभिषेक करून

१. शिचप्र. पृ. ३१; पेद. सभा-ब. पृष्ठ १.

घ्यावयाचे ठरविले. गागाभट्टांनी संकलन केलेल्या राज्याभिषेक प्रयोगावरून शिवाजीमहाराजांच्या राज्याभिषेकाला परंपरेचे पावित्र्य मिळवून दिले.

या राज्याभिषेकाचा सोहळा रायगडावर शके १५९६ ज्येष्ठ शुद्ध त्रयोदशीला ( म्हणजे दि. ६ जून १६७४ या दिवशी ) शुक्रवारची रात्र तीन घटका उरली असता म्हणजे शनिवारी पहाटे सुमारे पाच वाजावयाच्या सुमुहूर्तावर झाला. त्यापूर्वी प्रायश्चित्ते वगैरे धर्मविधी, राज्याभिषेकाच्या अनेक विधींपैकी आणि दानधर्मांपैकी महत्त्वाचा तुलादान विधी २९ मे पासून सुरू झाला. शिवाजीराजे आणि त्यांची पट्टराणी म्हणून सोयराबाई यांना मंगल घटकेला हिरेजडित सिंहासनावर बसवून दोघांवर मौल्यवान जडावाचे मोतीलग झालरीचे छत्र धरण्यात आले. अष्टदिशांकडून आणविलेल्या गंगाजलांनी, सिंहासनाच्या आठ खांबांजवळ उभे राहून अष्टप्रधानांनी आणि थोर ब्राह्मणांनी सुवर्णपात्रातून अभिषेक करून सिंहासनारोहणाचा, छत्रधारणाचा आणि राज्याभिषेकाचा विधी पार पडला.

सात वाजण्याच्या सुमारास दरबार महालात भव्य सिंहासनावर बसून छत्रपतींनी नजराणे आणि मुजरे घेतले. त्यावेळी युवराज म्हणून संभाजी राजांना सिंहासनाच्या पायरीवर बसविले होते. अष्टप्रधान मानाप्रमाणे उजव्या आणि डाव्या बाजूला उभे होते. यावेळी इंग्रजांचा वकील ऑक्झेंडन हा नजराणा देण्यासाठी आला होता. त्याने छत्रपतींना,

१. हिरेजडित शिरपेच, किंमत रु. ६९०.

२. हिरेजडित सलकडी, किंमत रु. ४५० आणि

३. मोती ( रति १०$\frac{9}{10}$ ), किंमत रु. ५१० असा एकूण रु. १६५० चा नजराणा दिला.

युवराज संभाजीला दोन लालखचित सलकडी, किंमत रु. १२५ आणि एक ८ हिऱ्यांची अंगठी किंमत रु. २५० असा एकूण रु. ३७५ किंमतीचा आहेर दिला.

अष्ट प्रधानांपैकी मोरोपंत, अण्णाजी पंडित, निराजी पंडित आणि रावजी सोमनाथ या सर्वांना मिळून रु. २७९० किंमतीचा नजराणा दिला.[1] ( दि. २६ मे १६७४ ).

या विधियुक्त राज्याभिषेक समारंभात संभाजीला युवराजपदाचा मान मिळाला. शिवाजी महाराजांच्या पश्चात संभाजीच वारस म्हणून गादीवर येणार असे गृहीत धरूनच इंग्रजांनी संभाजीला नजराणा दिला होता. राजारामाला नजराणा दिल्याची नोंद इंग्रजांनी केलेली नाही. राज्यारोहणानंतर सर्व राण्यांसह शिवाजी महाराज सज्जनगडावर समर्थांच्या दर्शनास गेले होते. तेव्हा युवराज

१. छशिमका, पृष्ठ १९१-१९४; शिपसासं, क्र. १६४०-१६४३.

संभाजीही त्यांच्या बरोबर होता.[१] राज्याभिषेकानंतर ७–८ महिन्यांनी म्हणजे दि. ४–२–१६७५ ला महाराजांनी संभाजीची मुंज केली.[२]

**संभाजी राज्यकारभारात** ( १६७४ ते १६७७ ) :

संभाजीला दिवाणी कामकाजाचेही शिक्षण दिलेले होते असे दिसते. कर्यात मावळ येथील कुलकर्ण जानकी कोम रंगभट बिनबाळंभट ठकार हिची मिरासी होती. शंकराजी भोवर मुतालिकीस ठेवला होता. हा कागद संभाजीराजांनी करून दिला होता. तरी यादव नामदेऊ यांनी संभाजीचा कागद शंकराजी भोवर याचे कुलकर्ण म्हणून नेला. म्हणून शिवाजी महाराजांनी कर्याती मावळचा सुभेदार आणि हवालदार यांना लिहून तो कागद रोखून धरण्याविषयी आणि शंकराजी मुतालिकच असल्याचे दि. १२-१०-१६७४ रोजी लिहिले.[३]

१६७५ च्या सुमारास शिवाजी आणि मुघल यांच्यात तहाची बोलणी सुरू होती. महाराजांनी काही किल्ले द्यावे, ५-६ हजारांची मन्सब घेऊन मुलाला बादशाही नोकरीत पाठवावे अशा अटींवर मुघल आणि शिवाजी यांच्यात तह व्हावयाचा होता. परंतु पक्का विश्वास नसल्यामुळे शिवाजीमहाराजांनी मुघल सेनापतीकडे आपल्या मुलाला पाठविण्याचे रहित केले.

महाराजांना आदिलशहावर स्वारी करावयाची असल्याने त्यांनी खानजहान बहाद्दूरशी बोलणी सुरू केली. दि. ७-७-१६७५ रोजी खानाच्या अर्जावरून शिवाजीचा मुलगा, संभाजी याला सहा हजार, ८० लाख दामाची मनसब, नगारे, नौबती, झेंडा दिल्याचे फर्मान[४] पादशहाने गुर्जबरदाराबरोबर रवाना केले. तह झाला असाच जुलैपर्यंत सर्वत्र समज होता; परंतु प्रत्यक्षात शिवाजीमहाराजांनी हा तह होऊ दिला नाही.

महाराजांच्या कारकीर्दीत संभाजीच्यापुढे काही तंट्यांचे निकाल होत असत. १६७५ मध्ये गोपाल सेट सेट्या याच्या सेटेपणासंबंधी तंटा निर्माण झाला होता. दि. १३–३–१६७५ ला या तंट्याचा निकाल लागला. या महजरात संभाजी होता. गोपाळसेटच्या बाजूने निकाल लागून त्याचे सेटेपण खरे ठरले. त्याबद्दल संभाजीला भेट म्हणून ५ होन आणि सरकारी सेरणी म्हणून त्याने १५० होन द्यावे असे ठरले.[५]

१. श्रीसच-आ, पृष्ठ ३७२
२. शिचप्र, पृष्ठ २७, ६४
३. शिपसासं-क्र. १६८८
४. MA-JS, p 88
५. मइसा–खंड १८ लेख ५७, पृष्ठ ८०

संभाजी रायगडला असताना शिवाजीबरोबर दरबारातील कामकाजात लक्ष घालीत असे. दि. ६–९–१६७५ रोजी सॅम्युअल ऑस्टिन हा रायगडला राजापूरच्या वखारीच्या लुटीच्या भरपाईची मागणी करण्यासाठी आला होता. दि. ७–९–१६७५ रोजी या वकिलाने महाराजांची भेट घेतली. या शिष्टाईच्या वेळी संभाजी शिवाजीराजांच्या बाजूला बसला होता आणि इतर अधिकारी उभे होते.[१]

शिवाजी महाराजांच्या वतनाच्या स्वराज्यातील उद्योगातही संभाजी काम करीत असे. केवळ नऊ वर्षांचा असताना महाराजांच्या बरोबर संभाजी आग्र्याला गेला होताच. दप्तरी कामातही संभाजी भाग घेत असे. शिवाजी महाराजांच्या कारकीर्दीत संभाजीने दोन पत्रे पाठविली होती. या पत्रांवर मोरोपंतांची मुद्रा आहे. ही पत्रे ‘ अजरख्तखाने ’ या मायन्याची नसून ‘ मशुरुल ’ या मायन्याची असून त्यांना राज्यकारभारात स्थान आहे. ही पत्रे अनुक्रमे जुन्नर आणि पुणे येथील सुभेदार आणि सरहवालदार या विभागीय अधिकाऱ्यांना लिहिलेली आहेत. राज्याभिषेकानंतर छत्रपतींनी देशमुख, देश कुलकर्णी, पाटील आणि गाव कुलकर्णी या मिरासदारावर ‘ सिंहासन पट्टी ’ आकारली होती; इनामदारांवर ती आकारलेली नव्हती.

या धोरणाप्रमाणे चांबलीचे सरनाईक आणि विनायक भट इनामदार यांच्यावर हा कर आकारून तो वसूल करण्यात आला. दि. ४–५–१६७५ रोजी संभाजीने पुण्याच्या राघो भास्कर हवालदाराला लिहिले कीं, “ निलोजी निळकंठराऊ, शंकराजी निळकंठराऊ व विसाजी निळकंठराऊ व त्रिंबक निळकंठराऊ यांसी मौजे चांबिली तर्फ कऱ्हेपठार परगणे मजकूर येथे इनाम कास टका एक आहे. त्यावरी तुम्हीं मिरासपटी २५ होनू घालूनु पैका मागता म्हणऊनू कलो आलें. तरी परगणे मजकुरावरी मिरासपटी घातली नसतां उगेच आपले भातेने पैका मागता हे कोण खेश या उपरी त्यास येक रुकेयाची तसवीस न देणे. त।। त्याचे इनामास पेशजी रुका घेतला लागली नाही पेस्तरहि तुम्ही मिरासपटी व हरयेक बाबे तसवीस न देणे. ”[२]

याच अर्थाचे दुसरे पत्र संभाजीने दि. ४–५–१६७५ रोजीच पुण्याच्या राघो बल्लाळ सुभेदाराला लिहिले होते. या पत्रात वर दिलेलाच मजकूर प्रारंभी असून त्याच्यापुढे, “ पुणा येथे कास टका इनाम येक आहे त्यासी मिरासपटी देणे म्हणून राघो भास्करे होनु २५ लाविले आहेत म्हणून कलो आले तरी ज्या

१. ERS, No. 122, p 70; Austin's Narrative 24–8–1675 to 15–9–1675

२. शिचसा, खंड ३, लेख ४००, पृष्ठ ४; अमराअ-जो, पृष्ठ ८८–८९

माहालास मिरासीपटी घातली आहे तेथें इनामदारास हिसाबीने घ्यावे यैसा तह केला आहे त्यास जे माहाली मिरासपटीच घातली नाही तेथे इनामदारास पैके मागणे कोण गोष्टी. त्याहीमध्ये नीलकंठराऊ यास पटी मागणे हें उचित नाही. तरी तुम्ही राघो भास्करास येक कागद लेहून देणे आणि त्यांचे वाटे नवजाये यैसी गोस्टी करणें. मशार निल्हे निलकंठ राऊ याचे इनामास पेशजीहि तसवीस लागली नाही आणि हालीं राघो भास्कर पटी मागतो याबद्दल तुम्ही त्यास बहुत वजाने लेहून मशारनिल्हे निलकंठरायाचे वाटे नव जाती त्यांचा बोभाट हुजूर न ये यैसी गोस्टी करणे."[1]

या दोन्ही पत्रांवरून संभाजी पित्याच्या कारभारात किती तन्मयतेने लक्ष घालीत असावा हे स्पष्ट होते. ती अधिकारवाणीने लिहिलेली असून त्याच्या पद्धतशीर व चोख कारभाराची ग्वाहीच देतात असे वाटते. या हुकमाची अंमल-बजावणी होऊन राघो बल्लाळाने ती सिंहासन पट्टी रद्द केली.[2]

संभाजीने शास्त्रे व पुराणे यांचा सखोल अभ्यास केला असल्यामुळे शिवाजीमहाराजांनी त्याला १६७५ साली धार्मिक बाबींचेही अधिकार दिलेले असावे.

**पुन्हा आघाडीवर :**

१६७५ मध्ये महाराजांनी संभाजीला युद्धाच्या आघाडीवर धाडलेले दिसते. महाराजांनी आदिलशाही मुलखावर स्वारी केली होती, त्यात संभाजीने भाग घेतला होता. त्याचे वर्णन जॉन फ्रायरने केलेले आहे. हा पेशाने डॉक्टर होता. तो १६७३ साली हिंदुस्थानात आला. सुरत, मुंबई, जुन्नर येथे फिरल्या-नंतर तो मुंबईहून कारवारमार्गे १६७५ मध्ये गोव्यात गेला. १६७६ साली तो वेंगुर्ल्याला होता आणि कारवार–गोकर्ण भागात प्रवास करीत होता. तो लिहितो, "मध्यंतरीच्या काळात आदिलशाहीतील सरदारांच्या बेबनावाचा फायदा घेऊन, मन मानेल तिकडे शिवाजी राजांचे सैन्य दौड करीत आहे. त्याच्या सैन्यातील संभाजीच्या नेतृत्वाखालील तुकडी थेट गोवळकोंडा राज्यातल्या भागानगरपर्यंत गेली. आणि दुसरी तुकडी गोव्याजवळील फोंड्याच्या कोटावर चालून गेली. शिवाजी राजांच्या मुलाने भागानगरमधील काही भाग लुटला व शहरात जाळपोळ केली. तोच बहलोलखान आडवा आल्यामुळे त्याला चुकवीत दुसऱ्याच रस्त्याने परत फिरला. वाटेत संभाजीने हुबळी, रायबाग आणि इतर बाजार पेठांवर छापे

१. शिचसा, खंड ३, लेख ४०१, पृष्ठ ४–५

२. कित्ता, लेख ४०२, पृष्ठ ५

घालून त्या लुटल्या. "[१] ही माहिती डॉ. फ्रायरने १६७८ ऑक्टोबरच्या पत्रात दिलेली आहे.

शिवाजीमहाराजांनी १६७५ च्या एप्रिल महिन्यात फोंड्याचा वेढा चालू केला. त्याच वेळी त्यांनी आदिलशाही हद्दीतील एटगेरी व गोवळकोंड्याच्या हद्दीतील भागानगरजवळची दोन मोठी शहरे लुटली आणि तेथून पुष्कळ संपत्ती आणि सावकार फोंड्याला शिवाजीपाशी नेले.[२] या सैन्याचे नेतृत्वही संभाजीनेच केलेले दिसते. इंग्रज वखारवाल्यांनी संभाजीच्या नावाचा उल्लेख केलेला नसला तरी फ्रायरने तो केलेला आहे. याच वेळी १६७५ च्या एप्रिल महिन्यात बहलोलखान या भागात चालून आला तो शिवाजीने त्यांला लाच दिल्यामुळे मिरजेत थबकला होता.[३]

फोंड्याच्या वेढ्यात महाराजांना मदत करण्यासाठी संभाजी तेथे गेला असावा. फोंडा घेतल्यानंतर त्याच्या आसपासच्या गावांसंबंधी वाद निघाल्यामुळे संभाजी आणि गोवेकर पोर्तुगेज यांच्यात लढाई झाली त्यांत संभाजीला माघारे यावे लागले होते. ज्या पत्रात या लढाईची बातमी दिलेली होती त्यातच शिवाजी मेला आणि संभाजी गादीवर आला असल्याचे म्हटले होते. परंतु ही बातमी विश्वासार्ह नव्हती.[४] यावरून महाराजांच्या गोव्यातील राजकारणात संभाजीची चांगली मदत होत होती असे म्हटल्यावाचून राहवत नाही. फोंडा किल्ला घेतल्यावर त्याच्या खाली येणारी ६० गावे सोडून देण्याचे संभाजीने गोवेकर पोर्तुगेजांना कळविले होते.[५]

महाराजांनी इंग्रजांची राजापूर येथील वखार लुटल्यानंतर त्यांच्या भरपाईबद्दल शिवाजी आणि इंग्रज यांच्यामध्ये बरेच दिवस वाटाघाटी चालू होत्या. १६७७ च्या सुरुवातीस इंग्रजांनी राजापूरची वखार बंद करून तेथील लोकांना सुरतकरांनी परत बोलाविले होते. हे कळताच शिवाजीने इंग्रजांच्या तक्रारी मिटविण्याकरितां आणि त्यांनी राजापूर सोडू नये म्हणून, संभाजीला इंग्रजांकडे पाठविले होते, आणि यापुढे सर्व काही न्यायाने आणि नियमितपणे देण्याचे आश्वासन दिले होते.[६]

१. Fy—TI, letter no. 4, p. 396.

२. शिपसासं—क्र. १७४३.

३. कित्ता-क्र. १७४६, १७५३

४. कित्ता, क्र. १८७९

५. कित्ता, क्र. १८८२

६. कित्ता, क्र. १९०९

संभाजीचा काही ना काही कारणाने इंग्रजांशी संबंध आलेला होता. त्यांच्याशी वाटाघाटी करण्याची संधी त्याला मिळालेली होती. सुरतकर इंग्रजांचे त्याच्या विषयी चांगले मत झाले होते. शिवाजी आणि संभाजी त्यांच्या वखारीची लूट करणार नाहीत असे त्यांना वाटत होते. सुरतकर दि. १०-१-१६७७ च्या पत्रात मुंबईकरांना लिहितात, " शिवाजीच्या फर्मानाची मात्र तितकी खात्री वाटत नाही हे आमच्या ध्यानात आहे. परंतु त्याची भरभराट होऊन त्याचे राज्य वाढत आहे, यामुळे आपल्याच राज्यात तो आमची लूट करील अशी शंका घेववत नाही. त्याच्या मरणानंतरही काळजी करण्याचे कारण दिसत नाही. कारण त्याच्या मुलाला मुकुट ( अधिकार ? ) प्राप्त झाला असून तो बराच समंजस दिसतो. ( His son is already crowned and of sufficient understanding he appears )[1]

१६७१ साली संभाजीला कारभार सांगितल्यापासून ते १६७७ च्या जानेवारीमध्ये तो इंग्रजांकडे कामासाठी जाईपर्यंत संभाजीच्या युद्धाच्या आघाडी-वरील हालचालीत किंवा राज्यकारभारातील कामकाजात त्याने कोठेही गैरवर्तणूक किंवा गैरकारभार केलेला दिसत नाही. त्याच्यावर सोपविलेली कामगिरी तो व्यवस्थितरीतीने पार पाडतानाच दिसतो. इतके सगळे सुरळीत चालू असूनही युवराज संभाजीच्या आयुष्यात असे काय घडले असेल, की ज्यामुळे या कर्तृत्ववान राजपुत्राच्या मनात अचानकपणे शत्रूला जाऊन मिळावे असे विचार आले असतील ? १६७४ साली शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक झाल्यानंतर घरातील वातावरणात काही धुसफूस, काही असूया, काही स्वार्थ, त्याच्या युवराजपदाबद्दल हेवा तर उत्पन्न झाला नसेल ना ?

**गृहकलह :**

१६७० सालापर्यंत सर्व भोसले घराण्यात संभाजी हा एकुलता एक मुलगा होता. त्यामुळे इतर सावत्र मातांना मुलगा होईपर्यंत तरी संभाजी सर्वांचाच लाडका असणे अगदी स्वाभाविक आहे. तोपर्यंत शिवाजी आणि संभाजी या पितापुत्रांचे संबंध बिघडण्याचे काही कारण नव्हते आणि ते कुठल्याही प्रकारे बिघडले होते असेही दिसत नाही.

दि. २४ फेब्रुवारी १६७० या दिवशी सोयराबाईला मुलगा झाला. शिवाजी महाराजांना दुसरा पुत्र झाला. राज्याभिषेकाच्या वेळी संभाजी सतरा वर्षांचा झालेला होता तेव्हा राजाराम केवळ चार वर्षांचाच होता. १६७४ पर्यंत म्हणजे राज्याभिषेकाचा सोहळा पार पडेपर्यंत महाराजांच्या मातोश्री जिजाबाई-

१. शिपसासं–क्र. १९०७; ERS, no 198, p. 104

साहेब जिवंत होत्या. शिवाजी महाराजांच्या अनेक बायकांवर म्हणजेच त्यांच्या सुनांवर त्यांचा वचक असणे आणि घरातील सर्वच कारभारावर त्यांचे छत्र असणे साहजिक होते. तोपर्यंत कोणाच्या मनात काही आले तरी त्याला वाचा फुटणे किंवा कोणत्याही प्रकारचा गृहकलह निर्माण होणे शक्यच नव्हते. आणि तसा काही कलह होता असे दिसतही नाही. परंतु राज्याभिषेकानंतर थोड्याच दिवसांत जिजाबाईसारखी कर्तृत्ववान आणि राजापासून तो सुनांपर्यंत सर्वांवर आपल्या अस्तित्वाने, व्यक्तिमत्त्वाने, अधिकाराने वचक ठेवणारी राजमाता दि. १७ जून १६७४ रोजी निधन पावली.[१] हे वडिलधारे छत्र नाहीसे झाल्यावर शिवाजी महाराजांच्या बायकांवरील धाक आणि त्यांना एकत्र बांधणारा दुवा तुटणे स्वाभाविकच होते.

महाराजांचा राज्याभिषेक होईपर्यंत गादीच्या वारसा हक्काचा प्रश्न निर्माण होण्याचा संभवच नव्हता. त्यानंतर मात्र त्या प्रश्नाने डोके वर काढले असावे असे वाटते. राज्याभिषेकाच्या वेळी सोयराबाईला पट्टराणीचा मान मिळाला असला तरी तिचा मुलगा राजाराम याला युवराजपद न मिळता तो मान संभाजीकडे आला. इंग्रज वकिलानेही महाराजांबरोबरच युवराजाला आहेर केला. संभाजीला सिंहासनाच्या पायरीवर बसविण्यात आले तेव्हाच संभाजीचा वारसा हक्क एका अर्थाने मान्य झाल्यासारखाच होता. असा मानपान आपल्या मुलाला मिळाला नाही याचा अर्थ याच्यापुढे चालून येणारा वारसा हक्कही राजारामाला मिळणार नाही असे मनात येऊन सोयराबाईला दुःख झाले असेल तर ते सर्वसाधारणपणे मनुष्यस्वभावाला आणि त्यातल्या त्यात स्त्रीस्वभावाला धरून स्वाभाविकच वाटते. स्वतःच्या मुलाविषयी प्रेम वाटण्यापासून ते दुसऱ्याच्या मुलाचा आणि त्यातल्या त्यात सावत्र मुलाचा द्वेष वाटणे हा मातेचा निसर्गदत्त स्वभाव आहे, असे म्हणावयास हरकत नाही. काही अपवाद सर्व नियमांना असतात तसे या बाबतीतही असणे संभवनीय मानले तरी राजमाता होण्याचा संभव समोर दिसत असताना स्त्रीसुलभ स्वभाव उफाळून वर आला तर नवल काय?

शिवाजी, सोयराबाई आणि संभाजी यांच्यातील गृहकलहाचा उल्लेख अनुपुराणात आणि बखरीत केलेला आहे. हे वर्णन मनुष्यस्वभावाला धरून आहे. शिवाजीमहाराज १६७४–७५ च्या सुमारास स्वतःच्या कारकीर्दीत यशाच्या शिखरावर पोचलेले असताना त्यांना गृहकलहाने बेजार केले होते. राजारामाला गादी मिळावी म्हणून सोयराबाईने महाराजांजवळ हट्ट सुरू केला असे शिवदिग्विजय बखरीत आणि अनुपुराणात म्हटले आहे. जिजाबाई निधन पावल्यावर सोयराबाईने राजारामाला गादी मिळविण्यासंबंधी बोलणे केले, असे शिवदिग्विजय

१. शिचप्र, पृष्ठ ५३

बखरीत आहे तर हा प्रसंग महाराज कर्नाटकाच्या स्वारीवर जाण्यापूर्वी अनुपुराणात रंगविलेला आहे. दोन्हींचा काळ साधारणपणे एकच आहे.

शिवदिग्विजय बखरकार लिहितात, " ते छत्र ( जिजाबाईचे ) विच्छिन्न जाल्यामुळे उदासवृत्तीने बहुतेकांनी रंजने केली...श्रीमंत सौभाग्यादि वज्रचुडेमंडित सौ. सोयराबाईसाहेब राजारामसाहेबांची मातुश्री आहेत. आजपर्यंत थोरल्या बाईंनी मनोरंजन करून स्थितींनीच गुजरा केला...आता महाराज देहावरी न रहातां विरागी दिसतात...सोयराबाईसाहेब याणीं कारभारी अनुकूल जाणून, महाराज व्रतस्थ होते, महालात जात नहुते. ते दिवशी महाराज निजले. त्यांजजवळ येऊन, 'बाईसाहेब आल्यात, आपल्याला बोलावितात' म्हणून सुचविले... 'त्यात महाराजांस एके दिवशी बाई विचारू लागली कीं, ज्येष्ठ पुत्र दौलतीचे अधिकारी आहेत. त्यांचे व पदरच्या मनुष्यांचे बनत नाही. माझा मूल लहान आहे. याजवरि सरकारचा लोभ आहे. त्यास संस्थान, त्याजला अधिकार द्यावयाचा किंवा वडिलाचा वडिलाकडे सोपावयाचा, हे सांगावें " हे सोयराबाईचे उद्गार ऐकताच आपण वैभव भोगावे हे तुमच्या मनात नाही. तुमच्याजवळ याच्यापुढे येऊ नये असे म्हणून महाराज निघून गेले. त्यामुळे आपल्या मुलाला अधिकार असावा, संभाजीस नसावा हे तिच्या मनात आले आणि वरवर ती त्यांच्या समोर गोडगोड वागली तरी महाराज मरतील तर बरें असे निखालसपणे तिला वाटू लागले. त्यामुळे धूर्त राजांनी रामदासस्वामींजवळ दुःख व्यक्त केले. बखरकाराच्या म्हणण्याप्रमाणे स्वामींनी महाराजांची समजूत घातली. सोयराबाई स्वार्थासाठी कोणतेही कृत्य करावयास कमी करणार नाही म्हणून 'हस्ताक्षर पाहून करणे तरी करावे स्वदस्तुर असेल ते मान्य करावे, चिन्हावरी जाऊ नये' असे शिवाजीने बाळाजी आवजीकडून सर्व किल्ल्यांवर कळविले.[१]

अनुपुराणात[२] या बखरीसारखाच मजकूर आहे. १६७८ ते ८० सालात भोसले घराण्यात गृहकलह कसा निर्माण झाला होता यासंबंधात कागदपत्रे उपलब्ध नसली तरी त्याचे वर्णन या काव्यात सापडते.

---

१. शिदिब, पृष्ठे ४५४ ते ४६१

२. **टीप :** श्री. त्र्यं. शं. शेजवलकर यांनी परमानंद काव्यावर पुष्कळच टीका केलेली आहे. अनुपुराण हे संभाजीची अतिशय उथळ आणि मिथ्या स्तुती करणारे काव्य आहे असे सांगून ते पुढे म्हणतात की यातील कोणताही भाग परमानंदकृत नाही. त्याच्या देवदत्त नावाच्या लबाड पुत्राने तो संभाजीच्या कारकीर्दीत आपल्या इष्ट हेतूंच्या सिद्धीसाठी मागील काही शिवकाल त्यात घेऊन त्रुटित स्वरूपात कसावसा रचला आणि त्याला पुढे या देवदत्ताच्या मुलानेच, म्हणजे गोविंदाने शाहूची मर्जी संपादन करण्यासाठी, शाहूच्या जन्माचे रामजन्मासारखे पूर्वाख्यान

[ पुढील पानावर

'परमानंदकाव्यम्' या नावाचे एक काव्य 'शिवभारत'कार कवि परमानंद यांच्या नावावर आहे. परंतु ते काव्य स्वतः परमानंद कवी, त्यांचा मुलगा देवदत्त आणि नातू गोविंद यांनी लिहिलेले आहे. काव्य म्हटले की त्यात स्तुतिपाठ, अलंकारिक व अतिशयोक्तिपूर्ण वर्णने बरीच असतात आणि शंभर नंबरी सत्य येणे कठीणच असते. परंतु या काव्यात समकालीन व्यक्तींनी ऐकलेल्याच नव्हे तर पाहिलेल्या घडामोडींची वर्णने असल्यामुळे त्यात सत्याचा थोडाफार अंशही आहे. देवदत्त आणि त्याचा मुलगा, दोघेही छत्रपतींच्या राजधानीत राहात होते, वावरत होते. या काव्यात शहाजी, शिवाजी आणि संभाजी यांची राजकीय क्षेत्रातील कामगिरी वर्णिलेली आहे. यात कवीचा संभाजीविषयीचा जिव्हाळा, त्यांच्या हर्षामर्षांच्या खोचा, शाक्तपंथाची श्रेष्ठता, संभाजीने तो पंथ स्वीकारल्या-मुळे त्याला आणि इतरांना अशक्य वाटत असलेली महाराष्ट्रराज्याची व्याप्ती, आणि त्यासाठी आवश्यक असलेले शिवाजीचे अकालमरण या गोष्टींची पद्धतशीर माहिती दिलेली आहे. या काव्याची तीन पाने शहाजी, चार पाने शिवाजी आणि बाकीची संभाजीच्या वर्णनाने व्यापलेली आहेत. हे काव्य शहाजादा अकबर याचे इराणला प्रयाण होईपर्यंतच आहे. संभाजीच्या आयुष्यातील शेवटच्या दोन वर्षांतील वर्णन या काव्यात नाही. सोयराबाई आणि संभाजी यांच्यातील सापत्नभाव, शाक्तपंथाचा गुरू 'छंदोगामात्य' मंत्री कवि कलश असून त्यानेच संभाजीला पूर्वजन्माचा वृत्तांत सांगून त्याला शाक्त पंथी कलशाभिषेक करावयास प्रवृत्त केले इत्यादी वर्णन केलेले आहे. संभाजी सर्वगुणसंपन्न, निर्दोष, सरळ, उदार, शिवा-जीच्या राज्यावर येण्यास लायक असा राजा आहे असे काव्यात वर्णन आहे. सोयराबाई कलीची दूत, राक्षसी वृत्तीची व स्वार्थी दाखविलेली आहे. लेखक

---

मागील पानावरून ]

रचून, पुत्रकामेष्टिरूपाने त्याचा जन्म घडवून आणून जोड दिली. हाही स्वत:ला कवींद्र म्हणूनच म्हणवून घेतो...जेथे परमानंद काव्यात छापण्यात आलेल्या प्रकरणाइतके ऐतिहासिक सत्याशी अगदीच विसंगत व शिसारी आणण्याइतके स्तुतिपठण व वर्णन आढळते तेथे त्याला काव्यापेक्षा भाटाच्या पोवाड्यांचीच सर येते. तरीही ही वर्णने समकालीन व्यक्तींनी ऐकलेल्या, पाहिलेल्या घडामोडींची असल्यामुळे त्यात सत्याचा अंश निवडता येतो. घटनांची मांडणी कितीही काल्पनिक, पूर्वग्रहदूषित किंवा उघड उघड खोटी रचलेली दिसत असली तरी ऐतिहासिक झगड्यातील एका बाजूकडील पक्षपाती लोक आपल्या कृत्यांबद्दल व विरुद्ध बाजूच्या व्यक्तींबद्दल काय म्हणत होते याचा त्यावरून बोध होतो. देवदत्त व त्याचा पुत्र दोघेही छत्रपतींच्या राज-धानीच्या परिसरात वावरत होते, राहात होते. त्यामुळे इतिहासात अन्यत्र न नोंदली गेलेली माहिती त्यांच्या काव्यात येणे स्वाभाविक आहे व ती तोलून, पारखून ग्रहण करण्यास हरकत दिसत नाही.

समकालीन असल्यामुळे इतरत्र न आलेले काही खरे ऐतिहासिक प्रसंग यात आहेत. काव्यात शंभर नंबरी सत्य येणे कठीणच असते. अतिशयोक्ती आणि कल्पना असलेले भाग वगळून, इतर पुराव्याच्या अभावी, जे संभवनीय व ऐतिहासिक दृष्टीने शक्य कोटीतले वाटते तेवढाच भाग येथे घेतलेला आहे.

हे काव्य उपलब्ध होईपर्यंत संभाजी आणि त्याचे सहकारी यांची बाजू समजण्यास काही मार्गच नव्हता. या काव्यावरून सोयराबाईच्या विरुद्ध पक्षाची संभवनीय बाजू कळू शकते. केवळ त्यामुळेच हे काव्य विचारात घेणे प्राप्त आहे.

१६७६ ते १६८० या चार वर्षांच्या काळापुरता या काव्याच्या आधाराने इतिहास जुळविण्याचा येथे प्रयत्न केलेला आहे.

महाराजांच्या निधनानंतर सोयराबाईंची स्थिती कैकयीसारखी होऊन ती राजारामाचा हक्क गादीवर प्रस्थापित करण्यासाठी सर्व तऱ्हेचे प्रयत्न करीत होती. इतिहासापुरती कैकेयीची उपमा सोडून फक्त मान्य करण्यासाठी घटना येथे विचारात घेतली आहे. संभाजी आणि राजाराम यांना एकत्र ठेवू नये, राजाराम दुर्बल असल्यामुळे तिला वाटणारी त्याची काळजी व संभाजी तिची पर्वा करीत नसल्याचे सोयराबाईने शिवाजीला सांगितले.[1]

हे सोयराबाईचे म्हणणे महाराजांना पटले नाही. म्हणून ते म्हणतात, "माझी धर्मपत्नी, पूर्वजन्मीची सखी शंभूला जन्म देऊन नाहीशी झाली. तिचा मुलगा ज्येष्ठ आणि शिकलेला आहे. मी आणि इतर लोकांनी त्याचा अपमान करू नये अशी माझी इच्छा आहे. संभाजी प्रतापी आणि स्वतःच्या बुद्धीने चालणारा असल्याने ते मंत्र्यांना सहन होत नाही." महाराजांना सोयराबाईचे म्हणणे गैर वाटले तरीही ते तिला म्हणतात, "जर तुला या दोघांचे एकत्र राहाणे रुचत नसेल तर आपण संभाजीला दुसरीकडे पाठवू." यावर शिवाजी महाराजांनी मिळविलेले राज्य राजारामाला द्यावे आणि संभाजीसाठी दुसरे निर्माण करावे असे सोयराबाईने सुचविले.[2]

अशी चर्चा घरात चालू असताना शिवाजी महाराजांनी कर्नाटकाच्या स्वारीवर जाण्याचे ठरविले. निघण्यापूर्वी त्यांनी सभा भरविली. ते सिंहासनावर बसलेले असताना संभाजी तेथे गेला. त्याने वडिलांच्या पायावर डोके ठेवले. महाराजांनी संभाजीला जवळ बसण्याचा आग्रह केला. राजनीतीचा अभ्यास केलेला, सुशिक्षित संभाजी विनयाने त्यांच्याजवळ बसला नाही. महाराज संभाजीला म्हणतात, "आपल्याला मिळालेल्या राज्यावर मुलाने राज्य केले तर लोक त्याला मान देत नाहीत. मुलगा विद्वान आहे की नाही हे तो

१. पका–स, पृष्ठ ५६–५७

२. कित्ता, पृष्ठ ५७ ते ६२

जवळ राहिला असता कळत नाही. मला सुद्धा शहाजीने पुण्यास ठेवले. उतार वयामुळे मला स्वराज्याचे रक्षण करणे जड जात आहे. तरी हे राज्य मी तुला देतो. राज्यातील कोणताही भाग तुझ्या सावत्र भावाला देणार नाही. त्याच्यासाठी मी नवीन राज्य जिंकेन. म्हणजे तुम्हा दोघांना स्वतंत्रपणे राज्य करता येईल. राजाराम लहान आहे. तो मला प्रिय आहे. तो स्वतः राज्य भोगावयास मागत नाही. तुझे गुण मोठे आहेत. पृथ्वी मी तुझ्या ताब्यात देण्यास तयार आहे. खरे म्हणजे राज्य एकाचेच होऊ शकते. जशी शरीराची वाटणी होऊ शकत नाही, तशीच राज्याची वाटणी होऊ शकत नाही. हे राज्य कोणातरी एकालाच दिले पाहिजे. मी दुसरे राज्य जिंकून येईपर्यंत तू रायगडला सोयराबाईच्या सहवासात न राहता शृंगारपूरला राहून प्रभावली सुभ्याचा कारभार पहा."

संभाजी यावर म्हणतो, "आमचे दैव हेच आमच्या सुखदुःखाचे कारण आहे. त्याला आईबाप कोणी जबाबदार नाहीत. तुम्ही नसलात तर स्वराज्यात माझे मन रमणार नाही. तुम्ही येथेच रहा. तुम्ही असलात म्हणजे बरे. वाटणीची कल्पना चूकच आहे. व्यवहाराला धरून नाही. बापाजवळ राज्य मागणारा पुत्रच नव्हे."[1]

सोयराबाईला, संभाजी रायगडावर राहावयास नको होता असे या संवादावरून स्पष्ट दिसते. तिने स्पष्टपणेच 'माझ्या मुलाला राज्य द्या, संभाजीची दुसरीकडे व्यवस्था करा.' असे म्हटल्याचे बखर आणि काव्य सांगते. त्यावरून संभाजीला सावत्र आईपासून त्रास होत असावा हे स्पष्ट दिसते. आपल्या दानपत्रात संभाजीने स्पष्टपणे म्हटले आहे की, "सावत्र आईच्या रागामुळे वडिलांनी मला वाईट वागणूक दिली. तरी मी रामचंद्राप्रमाणे वागलो."[२]

संभाजीला राज्य मिळू नये म्हणून त्याच्याविषयी अफवा उठवून सोयराबाईने लोकांचे मन कलुषित केल्याचा संभव वाटतो. १६७१ ते १६७५ पर्यंत त्याच्या गैरवर्तणुकीचा ओझरताही उल्लेख कोठे आढळत नाही. "शिवाजीच्या एका मुख्य ब्राह्मणाच्या मुलीशी संभाजीने व्यभिचार केला. तिला भेटण्यासाठी रात्री गडाखाली जाण्याचे त्याने न सोडल्यास त्याचा कडेलोट करण्याचा हुकूम शिवाजीने दिल्याचे ऐकून संभाजीने त्याला विषप्रयोग केला असे कित्येक लोक बोलतात. सिद्दी संबूळकडून शिवाजी मेल्याचे कळले. निश्चित बातमी कळत नाही."[3]

१. पका–स, पृष्ठे ६० ते ६८

२. दानपत्र : श्लोक : ११८–११९

३. शिपसासं–क्र. १८११

असे पत्र मुंबईकरांनी सुरतेला पाठविलेले असले तरी अशा प्रकारच्या बातम्या सोयराबाईने पसरविलेल्या असण्याचाच संभव जास्त वाटतो. या पत्रात संभाजीने शिवाजीला विषप्रयोग केल्याचे लोक बोलतात असे म्हटले आहे. याच्या उलट सोयराबाईने विषप्रयोग केल्यामुळे महाराज निधन पावले असे बखरीत लिहिलेले आहे.[1]

१६७७ साली संभाजीला कारभार सोपविल्यावर करवीर प्रांत, राजापूर, विशाळगड, रांगणा, बावडा किल्ल्यांसुद्धा देखरेख पाहणे, चौकशी करणे इत्यादी कामे शिवाजीमहाराजांनी संभाजीवर सोपविली होती. परंतु घालमेल करणे वगैरे कमजास्तीच्या नेमणुका करणे ही कामे महाराजांच्या आज्ञेशिवाय करू नये असे त्याला सांगण्यात आले होते.[2]

**शृंगारपुरात :**

दि. ६-१०-१६७६ ला शिवाजी महाराज कर्नाटकच्या स्वारीवर निघाले. सावत्र आईच्या सहवासात संभाजीला ठेवणे त्यांना इष्ट वाटत नव्हते. आपल्या गैरहजेरीत सोयराबाई आणि संभाजी यांच्यात तंटा होऊ नये म्हणून महाराजांनी संभाजीला शृंगारपूरला पाठविण्याचा निर्णय घेतला असावा. परमानंद काव्याशिवाय संभाजीला शृंगारपूरला का ठेवले याची माहिती इतरत्र मिळत नाही.

कर्नाटकच्या स्वारीवर निघताना संभाजी महाराजांबरोबर होता. दि. १-११-१६७६ रोजी संभाजी शृंगारपूरला जाऊन राहिला.[3] महाराजांनी विश्वनाथ नावाच्या आपल्या विश्वासू माणसाला संभाजीबरोबर पाठविले होते. शृंगारपुरात संभाजी वेळ कसा घालवीत असे याची माहिती अनुपुराणात मिळते. संभाजी रोज व्यायाम करीत असे. त्याला व्यायामाची आणि मल्लखांबाची आवड होती, असे दिसते. रायगडावर एक लोहस्तंभ आहे त्याला संभाजीचा मल्लखांब म्हणतात.[4] शृंगारपूरच्या दुर्गम प्रदेशात त्याने धनुर्विद्येचा अभ्यास केला. त्याने तेथे अष्टादश पुराणे क्रमाने ऐकली. त्याने कामंदकीचा व इतिहासाचा अभ्यास केला.[5] येथेच त्याने बुधभूषण ग्रंथ लिहिला असावा. तो लोकांशी मृदुपणाने वागत असे. जे जे लोक त्याचा आश्रय मागत त्यांना तो आश्रय देत असे.

१. शिदिब, पृष्ठ ४६२-४६३
२. कित्ता, पृष्ठ ४४४
३. शिचप्र, पृष्ठ २८
४. मरापं रा-दा. पृष्ठ ३१
५. पका-स, पृष्ठ ६९

शिवाजीमहाराजांच्या मंत्र्यांनी त्रास दिलेली प्रजा शृंगारपूरला संभाजीकडे जात असे. संभाजी त्यांना आधार व दिलासा देत असे.

तेथे संभाजीचा चांगला जम बसलेला सोयराबाई आणि तिच्या साहाय्यकांना बघवेना म्हणून त्यांनी संभाजीला त्रास देण्यास सुरुवात केली. परंतु संभाजी खंबीर असल्यामुळे त्यांचे काही चालले नाही.[१]

शृंगारपुरात संभाजीने कलीची उपासना सुरू केली त्याचे परमानंद काव्यात विस्तृत वर्णन आहे. बंगालमधील शाक्त पंथाचा शिवयोगी महाराष्ट्रात संभाजीच्या येथे शृंगारपुरास राहिला होता. ज्या परिसरात संभाजी राहात होता तो कऱ्हाडे ब्राह्मणांच्या वस्तीचा भाग होता. याच वेळी त्यांच्यात शाक्त मार्गात प्रवीण असे लोक निर्माण झालेले दिसतात. राज्यावर आल्यानंतरची संभाजीची अनेक पत्रे उपलब्ध आहेत. त्या पत्रांत या उपासनेबद्दल किंवा या शिवयोग्याबद्दल काही उल्लेख आढळत नाही.

संभाजीने कलीची उपासना सुरू केल्यामुळे शके १६००, पौष शुद्ध ११ म्हणजे दि. २३–३–१६७८ रोजी कलशाभिषेक करून घेतला. यासंबंधी अधिक माहिती ‘ धार्मिक धोरणात ’ दिलेली आहे.

संभाजी शृंगारपूरला गेला तेव्हा त्याच्याबरोबर येसूबाई, दुर्गाबाई व त्याची एक बहीण ( जाधवांकडील असावी ) ही मंडळी होती.[२] याच वास्तव्यात संभाजी आणि येसूबाई यांना भवानीबाई नावाची मुलगी झाली. ( दि. ४–९–१६७८ )[३]

या घडामोडी चालू असताना मुघलांचा सुभेदार दिलेरखान दक्षिणेत आला होता. शिवाजीमहाराज कर्नाटकात स्वारीवर गेल्याची संधी साधून त्याने संभाजीला आपल्या बाजूला वळविण्याचा प्रयत्न केला. संभाजीकडे दूताकरवी एक पत्र पाठविले. “ औरंगजेबाला सह्याद्री जिंकावयाचा आहे. त्यासाठी तो तुझी अपेक्षा करतो आहे; तुझ्याशी संधी करण्याची इच्छा करीत आहे. तू आमच्याकडे यावेस म्हणून औरंगजेबाने तुझ्यासाठी सैन्य, संपत्ती, व पत्र दिले आहे. तू शृंगारपूरला स्वस्थ काय बसला आहेस ? औरंगजेब येण्यापूर्वी तू आणि मी सह्याद्री जिंकू. ” या पत्राला संभाजीने उत्तर पाठविले. त्यात तो म्हणतो, “ हा देश माझ्या हातात टाकून वडील दूर गेले आहेत. तो देश मला तुझ्या हातात देववत नाही. माझ्या पराक्रमाने मी नवीन मुलूख जिंकून औरंगजेबाचे समाधान करू शकेन. ” अशा

१. कित्ता, ६९ ते ७२

२. अख: २७–११–१६८; ताकाका, ले. ३२०, पृष्ठ ४८४

३. शिचप्र, पृष्ठ २९

तऱ्हेचा गुप्त पत्रव्यवहार संभाजी आणि दिलेरखान यांच्यात चालू होता.[१] यावरून वडिलांनी टाकलेली जबाबदारी सोडून संभाजी दिलेरखानाकडे जावयास तयार नव्हता असे दिसते.

१६७८ सालच्या एप्रिल–मे महिन्यात शिवाजी महाराज कर्नाटकाच्या स्वारीवरून परत आले.[२] मोरोपंत पेशवे आणि इतर मंत्र्यांबरोबर झालेल्या वाटणी-संबंधीच्या चर्चेत महाराज म्हणतात, " मी नवीन राज्य जिंकले आहे. आता पुढे काय करावे ? ज्येष्ठ मुलाला राज्याचा मोठा भाग द्यावा, लहानाला लहान भाग द्यावा असा सर्वसामान्य नियम आहे. राजाराम लहान असल्याने त्याला लांब ठेवणे योग्य वाटत नाही. त्यामुळे मी जिंकलेल्या लांबच्या प्रदेशात ( कर्नाटक ) संभाजीला पाठवावे. याला तुमची संमती असेल तर ते मी करीन " शिवाजी महाराजांच्या मनात असे विभाजन आले असेल का ? दूरच्या कर्नाटकात संभाजी सारखा बाणेदार व शूर अधिपती हवा असे तर महाराजांच्या मनात आले नसेल ना ?

त्यावर मोरोपंत म्हणतात, " रायगड आणि महाराष्ट्राची इच्छा संभाजी करीत आहे. महाराजांचा मुलगा म्हणून आम्ही त्याला मान देतो. नमस्कार करावयास गेलो तर तो आमचा उपहास करतो. " मोरोपंताने संभाजीच्या कागाळ्या महाराजांच्या कानावर घातल्या. " कराच्या बाबतीत संभाजी प्रजेला सूट देत असल्याने राज्याच्या महसुलात तूट पडते आहे. " एवढेच नव्हे तर मोरोपंतांच्या कानावर आलेली पण संभाजीने गुप्त ठेवलेली त्याची मुघलांची गट्टी त्याने महाराजांच्या कानावर घातली.[३] " आधिप दिलेंद्र आपला शत्रू. त्यांत संभाजी त्याला मिळाला तर आपली स्थिती काय होईल ? संभाजी साहसी आहे. तो यवनाकडे जात आहे. अजूनही काही घडले नाही तोपर्यंत आपण काही हालचाल केली पाहिजे " असे मोरोपंत म्हणताच महाराज अत्यंत दुःखी झाले. अश्रू ढाळीत लेखणी हातात घेऊन त्यांनी संभाजीला आदेश दिला की, " प्रजेला अभय देऊन करवसुलीत प्रतिबंध करतोस, मंत्र्यांचा अपमान करतोस तरी तू शृंगारपूर सोडून सज्जनगडला जा. "[४] शिवदिग्विजय बखरकार याच प्रकरणात संभाजी रामदासांजवळ काही शिकला नाही म्हणून म्हणतात. ते खरे असते तर महाराजांनी त्याला पुन्हा सज्जनगडला पाठविला असता असे वाटत नाही.

१. पका–स, पृष्ठ ७६-७८

२. शिचप्र, पृष्ठ २९; ERS vol II no 292, 296

३. पका-स. पृष्ठ ८०-८१

४. कित्ता

शृंगारपूरपेक्षा सज्जनगडावर संभाजी चांगल्या देखरेखीखाली राहील असे तर त्यांना वाटले नसेल ना ?

महाराजांच्या आज्ञेनुसार संभाजी दि. ३–११–१६७८ च्या पूर्वी केव्हा तरी सज्जनगडला गेला.[1]

देवस्थाने, मठ, मशिदी यांना अनेक गावी जमिनी दिल्या जात. त्यात पड जमिनीही इनाम देत. त्या पुन्हा लागवडीस आणाव्या असा हेतू असे. सातारा जिल्ह्यातल्या नींब गावातील सदानंद गोसावी यांच्या मठाला मिळालेल्या अशा जमिनीपैकी खुद्द नींब येथील अर्धा चाहूर जमीन १६७४–७५ ही दोन वर्षे पडच राहिलेली होती. दोन्ही वर्षे कीर्दीच्या प्रश्नावर पुढील वर्षी सनद होईल असे सांगण्यात आले. तरी गोसाव्याने वहितीला आणली नाही. त्यामुळे इनाम मना करण्यात आला. म्हणून त्याने कनिष्ठांकडे हुकूम आणविण्यासाठी संभाजीकडे तक्रार केली, आणि इनाम पुन्हा चालू करावा अशी विनंती केली. ही विनंती गोसाव्याने बहुधा संभाजी सज्जनगडला आल्यानंतर केली असावी. त्यावर दि. ३–११–१६७८ रोजी संभाजीने अण्णाजी दत्तोला लिहिले, “ सदानंद गोसावी यांचा इनाम सांप्रत मना केला आहे. चालता केला पाहिजे म्हणतो. हा मामला आम्हास दखल नाही. तुम्हांस कळेल ते पारिपत्य केले पाहिजे. ”[2] या पत्रावरून इनाम जमिनीचे हे प्रकरण माहीत नसल्यामुळे संभाजीने या विषयात स्वतः काही निर्णय न करता अण्णाजी दत्तोलाच पारिपत्य करावयास सांगितलेले दिसते. अनुपुराणात मंत्र्यांनी जो आरोप केलेला आहे त्या प्रकारे संभाजी प्रजेला वाटेल तशी सूट देत असेल असे वाटत नाही. परंतु ज्या अर्थी लोक तक्रारी घेऊन संभाजीकडे जात असत त्या अर्थी प्रजेचा त्याच्यावर विश्वास किती होता याचा अंदाज करता येतो. या पत्राचा जो काळ आहे त्या सुमारास मुघलांकडे जावयाचा संभाजीचा विचार ठरलेला असेल किंवा नाही ते मात्र कळू शकत नाही. या पत्रावरून इतकाच बोध होतो की संभाजी आपले कर्तव्य पार पाडताना काही गैर करीत नसावा. प्रस्तुत पत्रानंतर एकाच महिन्याने म्हणजे ३–१२–१६७८ रोजी “ संभाजी शिवाजी राजे यास पारखे होऊन परळी गडावरून पळून मोगलाईत दिलेरखानाकडे गेले. ”[3]

संभाजी दिलेरखानाकडे जाणार आहे याची कल्पना शिवाजी आणि त्याच्या मंत्र्यांना होती असे अनुपुराणावरून दिसते. त्यांनी आणि स्वतः शिवाजी राजांनी

१. शिचप्र. पृष्ठ २९

२. मइसा, खंड १५ लेख १४२

३. शिचप्र, पृष्ठ २९; अख.

संभाजीला या कृत्यापासून परावृत्त करावयाचा काही प्रयत्न केला किंवा नाही हे मात्र कळत नाही. महाराज एप्रिल–मेमध्ये कर्नाटकातून परत आले आणि संभाजी डिसेंबरमध्ये पळाला. या सहा महिन्यांत पितापुत्रांची गाठभेट झाली होती किंवा नाही याचाही कागदोपत्री पुरावा उपलब्ध नाही. या अत्यंत महत्त्वाच्या मुद्याचा परमानंद काव्यात काहीच उल्लेख नाही याचे आश्चर्य वाटते.

शिवाजीमहाराज या बाबतीत मंत्र्यांवर अवलंबून राहिले असतील असे त्यांच्या जीवनाचा विचार करता मान्य करवत नाही. त्यांनी स्वतः काही हालचाल करून काही पाळत ठेवली असेल काय ? या सर्वच विषयांत इतिहास आज तरी अंधारात आहे, आणि त्या अंधारात चाचपडत, क्वचित ठेचकाळत इतिहास-कारांना जावे लागते आहे हे खरे ! आणि ज्या शिवाजीमहाराजांनी आपल्या राजकीय जीवनात, जगाला थक्क करून सोडणारे यश मिळविले त्या प्रभावी व्यक्तिमत्त्व असलेल्या पित्याला, आपल्या मुलाला प्रतिबंध करता आला नाही याचेही आश्चर्य वाटल्यावाचून राहात नाही.

मंत्र्यांच्या मतावर विश्वास टाकून संभाजीला वळविण्याचा प्रयत्न झाला असेल किंवा प्रयत्न करूनही संभाजीने वडिलांचे ऐकले नसेल काय ? राजाचा युवराजच शत्रुपक्षाला मिळणे ही काही दुर्लक्ष करण्यासारखी किरकोळ गोष्ट नाही. त्यामुळे महाराजांनी या गोष्टीकडे दुर्लक्ष केले असेल हेही खरे वाटत नाही; विचारी मनाला पटत नाही.

शिवाजीमहाराजांच्या आज्ञेप्रमाणे संभाजी शृंगारपुराहून सज्जनगडावर गेलेला दिसतो. त्याला रायगड किंवा पन्हाळा येथे भेटून परळीला जावयास सांगितले की दोघांची भेट न होताच त्याला तसा हुकूम देण्यात आला ? तो मुघलांकडे पळून जाण्याच्या विचारात आहे तेव्हा त्याला समर्थांकडे पाठवून त्याला चार उपदेशाचे शब्द सांगविण्याचे महाराजांच्या मनात नसेल ना ? सज्जन-गडावर त्यावेळी रामदास स्वामी होते की नाही हेही समजू शकत नाही. सज्जनगडावर स्वामींच्या समोर संभाजीला भेटून आपला स्वराज्याच्या वाटणीचा निर्णय त्याला सांगावयाचे तर राजांच्या मनात नसेल ना ? या गृहकलहात समर्थांचे मत तर त्यांना अजमावावयाचे नसेल ना ? काहीच कागदपत्रे उपलब्ध नसल्याने असे अनेक प्रश्न मनात गर्दी करतात. संभाजी मुघलांकडे जाण्याच्या विचारात आहे, हे कळल्यावरही ज्या अर्थी त्याला सज्जनगडावर पाठविण्यात आले, त्या अर्थी त्याच्या मागे शिवाजी महाराजांचा काही तरी हेतू असावा हे निश्चित. रामदास स्वामींसमोर पितापुत्रांची कलुषित झालेली मने साफ करण्याचा, सावत्रपणाचा, गृहकलहाचा जटिल प्रश्न सोडविण्यासाठी सज्जनगड हे स्थळ निवडले नसेल ना ?

हे सगळे विचार मनात येत असले तरी सज्जनगडावर संभाजी अटकेत होता असे भीमसेन सक्सेना म्हणतो. परंतु त्यासंबंधी तसा उल्लेख इतरत्र आढळत नाही.[१]

**सज्जनगडावरून पलायन :**

सज्जनगडावरील अधिकाऱ्याला सांगून संभाजी साताऱ्याच्या जवळ पाच मैलांवर असलेल्या माहुलीच्या–कृष्णा–वेण्णा नद्यांच्या पवित्र संगमावर स्नान करावयास निघाला. त्याने सुभेदाराला सांगितले की, "आज मोठी पर्वणी आहे. म्हणून मी माहुली क्षेत्रात स्नानार्थ जात आहे." आपल्याबरोबर थोडे लोक घेऊन घोड्यावर स्वार होऊन ते निघाले. संभाजीने माहुलीत आल्यावर तीर्थस्नान वगैरे करून विपुल दानधर्म केला. त्यांनी गडावरून बरोबर आलेल्या माणसास सांगितले, "तुम्ही आता परत जा. किल्लेदाराला आणि महाराजांना कळवा की मी मुघल सेनेत निघालो आहे. मी दिल्लेंद्राकडे जात आहे. सह्याद्रीला पिडण्यासाठी (जिंकून घेण्यासाठी) परत येईन." संभाजीने आपल्या अनुयायांना सांगितले की, "जगायची इच्छा असेल तर माझा पाठलाग करू नका. परत जा."[२] अशा रीतीने संभाजी स्वराज्यातून शत्रुपक्षात–गोटात सामील झाला.

आपल्या आयुष्यात इतकी उलट उडी घेताना संभाजीच्या मनात काय विचार चालू असतील ? रायगडला महाराजांनी न बोलविता परस्पर सज्जनगडावर पाठविले यामुळे तर संभाजीच्या मनात काही शंका आली नसेल ? त्याला आपला वडलांचा आधार तुटला असे वाटून तो हताश तर झाला नसेल ? तो विजापूरकर किंवा गोवळकोंडेकरांकडे न जाता मुघलांकडे का पळाला असेल ? दिलेरखानच त्याने का निवडला असेल ? वयाच्या आठव्या नवव्या वर्षापासून तो शिवाजीचा प्रतिनिधी बनून मुघलांचा मन्सबदार झाला होता. त्याने औरंगजेबाचा दरबार पाहिला होता. मन्सबदार म्हणून तो १६६५–६६ आणि १६६७–६८ मध्ये मुघलांकडे गेला होता. ज्या ज्या वेळी शिवाजीराजे मुघलांशी तह करीत किंवा तहाची बोलणी करीत त्या त्या वेळी संभाजीला बादशाही मन्सबदार म्हणून धाडण्याचे ठरत असे. या पार्श्वभूमीवर तो कदाचित स्वतंत्रपणे मन्सब किंवा जहागिर मिळविण्यास आणि स्वतंत्रपणे (?) स्वतःचे कर्तृत्व दाखविण्याच्या विचाराने तर दिलेरखानाकडे गेला नसेल ? शिवाजीराजे संभाजीला मुघलांकडे जाऊ देण्याच्या विचारापासून परावृत्त करू शकले नाहीत की त्याला अडवू शकले नाहीत. पण गंमत अशी संभाजी स्वतः राज्यावर आल्यानंतर

१. मोआम–प, पृष्ठ ७१

२. पका–स, पृष्ठ ८२–८४

राजाराम मुघलांकडे जहागिरीच्या आशेने निघालेला असता संभाजीने त्याला पकडून अटकेत ठेवले होते.[१]

संभाजी मुघलांना का मिळाला याची कारणे कागदपत्रात सापडतात. जेधे शकावलीत आणि सभासद बखरीत संभाजी रुसून मुघलांकडे गेला असे म्हटले आहे.[२] सुरतकर लिहितात, "पण सर्वांत त्याची ( शिवाजी ) मनःशांती अधिक ढळविणारी जी गोष्ट घडली ती त्याचा ज्येष्ठ पुत्र (संभाजी) त्याच्यावर नाखूष होऊन बादशाही सरदार दिलेरखान याच्याकडे पळून गेला असून, तो मुसलमान होऊ इच्छितो."[३] याच अर्थाची माहिती फ्रान्सिस मार्टिन या फ्रेंच गव्हर्नरने दिली आहे.[४] या चारही उल्लेखांत विशेष फरक नाही. सर्वांनीच संभाजी वडिलांवर रागावून मुघलांना मिळाला असे म्हटले आहे. इंग्रजांनी संभाजी मुसलमान होऊ इच्छितो असे म्हटले असले तरी त्या विधानाला त्यांच्याजवळ काय आधार होता ते कळत नाही व त्या म्हणण्यात काही अर्थही दिसत नाही.

याशिवाय 'बुसातिन्-उस-सलातिन'मध्ये संभाजी मुघलांकडे जाण्याचे अगदी वेगळेच कारण दिले आहे. "सिवाजी कित्येक कामाबद्दल संभाजीसी त्रासून कंटाळला होता. या दिवसात शरहनवीस ( सुरनीस )[५] याचे कन्येवर संभाजी फार आषक होता; म्हणजे लुब्ध झाला होता. येणेकरून संभाजीविसीं सिवाचे मनांत फारच वाकडेपणा येऊन सिवाजी अत्यंत त्रासला होता...सिवाजीने मनांत आणिलें कीं संभाजीस हरएक बाहान्याने पकडून जिवे मारावा किंवा कैद करावा. संभाजी यांणी हा सिवाजीचा इरादा ओलखून संशयांकित जाहाला. आपण दिलेरखानाकडे निघोन जावे असा निश्चय केला, आणि जातीने जाऊन पोहचण्यापूर्वी आधी एक पत्र आम्ही आपलेकडे येतो अशा मजकुराचे लिहून त्याने दिलेरखानाकडे पाठविले. त्यानंतर जातीनेही त्या पत्राचे लागोपाठच दिलेरखानाकडे निघाला. संभाजी आमचा आश्रय जोडण्याकरितां इकडे येत आहे असे संतोषाचे वर्तमान दिलेरखानास कळताच...संभाजी केव्हा येईल याची मार्गप्रतीक्षा करीत बसला. इतक्यात सिवास बातमी समजली कीं, संभाजी याणी दिलेरखानाकडे निघोन जाण्याचा निश्चय करून दिलेरखानाकडे चालता जाहाला आहे."[६] त्याने पुढे संभाजी प्रत्यक्ष दिलेरखानाकडे गेला असे नमूद केले आहे.

१. अख : २०-९-१६८५

२. सभा-ब पृष्ठ ७७, शिचप्र, पृष्ठ २९

३. शिपसासं. क्र. २०९२

४. The Karnatik Expedition, J. Martin, p. 348

५. यावेळी अण्णाजी दत्तो सुरनीस पदावर होता

६. विआ—पा. ( बुस ) पृष्ठ ५२७

गैरवर्तणुकीमुळे शिवाजीमहाराज शिक्षा करतील म्हणून संभाजी दिलेर-खानाकडे गेला असे बुसातिन-उस-सलातिन प्रमाणेच चिटणीस बखरीतही लिहिलेले आहे. त्याने संभाजीच्या मुंजीनंतरचा म्हणजे १६७५ नंतरचा प्रसंग दिलेला आहे. "व्रतबंध करून युवराज्याभिषेक करावासे मनात आणून व्रतबंध केला. परंतु संभाजी महाराजांची मर्जी एक प्रकारची. कोण्हे एके दिवशी हळदकुंकू समारंभ, शीतला गौरी, यास सर्व सुवासिनी स्त्रिया राजवाड्यात येणार त्यात कोण्ही रूपवान स्त्री आली. तिजला महालात नेऊन बलात्कार–अविचार जाला हें वृत्त महाराजांसही समजलें. ते समयीं बहुत तिरस्कार येऊन बोलिले जे, "राज्याचे अधिकारी हे, अगम्यागमन श्रेष्ठ वर्णाचे ठायीं जालें, सर्व प्रजा हें राजाचे कुटुंब आप्तसमान, हे पुत्र जाले तरी काय करावयाचे? यांचा त्याग करीन, शिक्षा करीन ऐसे आग्रह करून बोलिले. ही बातमी संभाजी महाराज यांस समजली. त्याजवरून दोन घोडियांवरि आपण व स्त्री ऐसे बसोन, पांच पंचवीस माणसें मावळे आपले खासगीची घेऊन रात्रीसच निघोन पाचवडास असतां तेथून गेले. ते वेळे दिलेलखान औरंगाबादेस होते त्यांजपाशी गेले....बहुत सत्कार करून ठेविले."[1] या प्रसंगाचा चिटणीसाने दिलेला काळ आणि इंग्रजी पत्रातील बातमीचा काळ एकच दिसतो.

ही घटना खरी असेल तर संभाजीने फार मोठी चूक केली असेच म्हणावे लागेल. बुसातिन-उस-सलातिन आणि चिटणीसाने संभाजी शृंगारपूरहून सज्जन-गडाला गेल्याचे सांगितलेले नाही. या दोन्ही ठिकाणी संभाजी गेला असल्याचा, प्रमाणभूत मानलेल्या जेधे शकावलीत, उल्लेख आहे. सोयराबाईला संभाजीस गादी मिळू द्यावयाची नव्हती. गादी मिळावी म्हणून राजारामाला चांगला ठरवून संभाजीला बदनाम करण्यासाठी सोयराबाईने त्याच्याबद्दल गैरवर्तणुकीचा आरोप पसरविला असावा असे वाटते. संभाजीने तरुण वयात एखाद्या तरुण व सुंदर मुलीवर नजर ठेवली असेल तर सोयराबाईने पराचा कावळा करणेही संभवनीय मानले पाहिजे. गादी मिळविण्यासाठी माणसे कोणत्या थराला जातात याची इतिहासात अनेक उदाहरणे सापडतात. उमाजी पंताच्या द्वारे सोयराबाईने संभाजीला व्यसनाधीन बनविल्याची गोष्ट 'प्रभुरत्नमाला' या ग्रंथात दिलेली आहे.[2]

प्रत्यक्षात सज्जनगडाहून संभाजी मुघलांना मिळाला तेव्हा त्याच्या बरोबर त्याची बायको (दुर्गाबाई?) त्याची एक बहीण होती असे फार्सी बातमीपत्रात म्हटले आहे.[3] सन १६८२ पर्यंत या दोघी अहमदनगरच्या किल्ल्यात होत्या.

१. मराचिब, पृष्ठ ३४६–३४७

२. प्रर–मु, पृष्ठ १६५

३. अरव: २७–११–१६८१

त्यांना सोडविण्यासाठी संभाजीच्या हुकमाप्रमाणे मराठ्यांनी अहमदनगर किल्ल्यावर दोन तीन वेळा हल्ले केले होते.[1] त्यानंतर त्यांना दौलताबादला हलविलेले दिसते. संभाजी, येसूबाई आणि गिरजोजी यादव यांनी दुर्गाबाईला सोडवून आणण्याचे पुष्कळ प्रयत्न केले होते. १७१६ सालातील यादव घराण्याच्या कागदपत्रात दुर्गाबाईला 'मातोश्री दुर्गाबाई' असे म्हटलेले आढळते.[2]

संभाजीला शिवाजीमहाराज त्याच्या चुकीबद्दल ठार मारणार होते असे बुसातिन-उस-सलातिन आणि चिटणीस बखरीत म्हटलेले असले तरी तो दिलेरखानाकडून परत आल्यानंतर महाराजांनी त्याला सामोपचाराने, प्रेमाने, घरोब्याने, आपुलकीने वागविल्याचे त्यांनी व्यंकोजीला—आपल्या भावाला—स्वतःच लिहिलेल्या पत्रात कळविले आहे.[3] शिवाजीराजे असल्या अनैतिक वर्तणुकीच्या बाबतीत इतके कडक होते की त्यांनी स्वतःच्या मुलाच्या असल्या अक्षम्य चुकी-साठी देहान्त शासन करावयास मागे पुढे पाहिले नसते.

या सर्व पुराव्यांचा विचार केल्यावर युवराज म्हणून तो कारभार करीत असताना संभाजीला रायगडावरील अधिकार नाकारण्यात आल्याने तो रागावला असावा, कदाचित् त्याच्यावर खोटेनाटे आरोप करण्यात येऊ लागल्यामुळे किंवा इतिहासाला अज्ञात असा कोणता तरी मोठा अन्याय त्याच्यावर झाल्यामुळे तो रागावून मुघलांना मिळाला असावा असे वाटते.

संभाजीने १६८० साली एका ब्राह्मणाला दान दिले होते. त्या दानपत्रात तो म्हणतो, "मंत्र्यांच्या सांगण्यावरून मला राज्य दिले नव्हते. सावत्र आईच्या रागाने बापाने मला वाईट रीतीने वागविले. तरी मी रामचंद्राप्रमाणे वागलो. अर्धकोटीचे राज्य व किलेकोट असलेले राज्य टाकून मी थोड्या घोड्यांसह सैन्याला मिळालो."[4] राज्यावर आल्यावर संभाजीने स्वतः केलेल्या दानपत्रात हे लिहिलेले असल्यामुळे त्याच्यावर अधिक चर्चा करण्याचे कारणच उरत नाही. अर्थात् कारणे काही का असेनात संभाजी मुघलांना मिळाला ही त्याने आपल्या आयुष्यात एक घोडचूकच केली यात काही शंका नाही. त्याला राग आला असेल किंवा त्याच्यावर काही अन्याय होत असेल तरी त्याने शत्रुपक्षाला न मिळता कोणत्या तरी अन्य मार्गाने आपले गाऱ्हाणे व्यक्त करावयास हवे होते.

संभाजी दिलेरखानाकडे गेल्याचे समजताच शिवाजीमहाराजांनी त्याला परत आणण्यासाठी सैन्याची एक तुकडी पाठविली. एक लहानसा जमाव घेऊन

१. अरव, २–६–१६८२

२ ताकाका–प, पृष्ठ १९५, ४८४, ५४८

३. शिपसासं, क्र. २२३६

४. दानपत्र.

संभाजी किल्ल्याच्या बाहेर पडला. त्याने दिलेरखानाकडे मनुष्य पाठवून निरोप केला की, 'मी जवळ येऊन पोहोचलो आहे, शिवाजीची एक तुकडी माझा पाठलाग करीत आहे. तुम्ही मदत पाठवा.'[१] हे दिलेरखानाला कळताच त्याने एखलासखानाबरोबर तीन चार हजार स्वार देऊन संभाजीला आणण्यासाठी पाठविले. सुप्याच्या पलीकडे चार कोसांवर संभाजी आणि एखलासखान यांची भेट झाली. संभाजीच्या जवळ ३०० स्वारांहून अधिक जमात नव्हती. एखलासखान संभाजीला जाऊन मिळताच त्यांचे सैन्य बळ वाढले. त्यामुळे चालून आलेल्या शिवाजीच्या फौजेने त्यांचा पाठलाग करणे सोडून दिले. संभाजी एकदोन मजल पुढे गेल्यावर दिलेरखान त्याला सामोरा गेला. दि. १३–१२–१६७८ रोजी समारंभपूर्वक त्यांची भेट झाली. त्याचे स्वागत करून बादशहाने संभाजीसाठी पाठविलेला एक हत्ती, तीन घोडे, पोषाख, तलवार, चौघडा हा नजराणा दिलेरखानाने त्याला दिला. याशिवाय संभाजीला ७००० स्वार आणि ७००० जातांची मन्सब देण्यात आली.[२] संभाजीच्या बरोबर आलेल्या माणसांना बहाद्दुरगड येथे ठेवण्यात आले. संभाजीच्या रक्षणाची उत्तम व्यवस्था करण्यात येऊन चौकी पहारे ठेवण्यात आले. संभाजी मुघलांकडे गेला तेव्हा त्याच्याबरोबर येसूबाई नसून दुर्गाबाई आणि एक बहीण ( जाधवरावांकडील ) या दोघी होत्या.[३] दिलेरखानाने संभाजीचे नाना प्रकारांनी समाधान करून त्याला भरवसा देऊन संतुष्ट केले. संभाजी आल्याने दिलेरखानालाही आनंद झाला होता.

बजाजी नाईक याचा मुलगा महादजी नाईक हा चार हजारी मन्सबदार होता. तो शिवाजीचा जावई होता. त्याने संभाजीला म्हटले, "तूं कां आलास ?" संभाजीने त्याचे बोलणे दिलेरखानास सांगितले. यावर दिलेरखानाने महादजीस काही दिवस अटकेत ठेवून नंतर मुक्त केले.[४]

दिलेरखानाने संभाजी त्याच्याकडे आल्याचा फायदा घेऊन मराठी मुलखातील प्रदेश जिंकावयास सुरुवात केली. त्या दोघांनी काही गड घेतले. त्यात दि. ३-४-१६७९ रोजी भूपाळगड जिंकला. शिवाजीमहाराजांनी मांजऱ्यानजीकच्या पर्वतावर एक मजबूत किल्ला बांधून त्याचे भूपाळगड असे नाव ठेवले होते. या किल्ल्यावर सामान, सरंजाम आणि मालमत्ता ठेवण्यात येत असे. गडावर लढाऊ शिबंदी, शूर शिपायांचा पक्का बंदोबस्त केलेला होता. मुघलांची फौज येत आहे असा पुकारा होताच भयभीत होऊन तर्फेतर्फेकडील, कसब्यातील गावोगावची

१. मोआम—प, पृष्ठ ७१.

२. विआपा ( बुस ), पृष्ठ ५२७; शिचप्र, पृष्ठ २९; अख : १४-१२-१६७९; दानपत्र

३. अख : २७-११-१६८१

४. मोआम.–प, पृष्ठ ७१

माणसे सामान सुमानासह गडावर आश्रयासाठी आली. दिलेरखानाने सकाळी किल्ल्याजवळ पोचून हल्ला केला. दोन प्रहर दिवसपर्यंत मोठी लढाई झाली. दोन्ही बाजूची बरीच माणसे मेली. दिलेरखानाने दि. ३-४-१६७९ रोजी किल्ला घेऊन गडावरील माणसांचे सर्वस्व हरण केले. ७०० माणसे कैद झाली. त्यातल्या प्रत्येकाचा एक एक हात कापून त्यांना सोडून दिले. गर्दीत पुष्कळ माणसे ठार झाली. शिवाजीमहाराजांची १६००० सैन्याची कुमक पोचण्यापूर्वीच किल्ला पडला. तरीही मराठी सैन्याने युद्ध रचना करून लढा देण्याचे ठरविले. ईरिचखान आणि बजाजीराव परांड्याकडून दिलेरखानाच्या फौजेत सामान सरंजाम आणीत असल्याचे मराठ्यांना कळताच ते त्यांच्यावर चालून गेले. दिलेरखानाने एखलासखानाला दीड हजार स्वारांसह ईरिचखानाच्या मदतीस पाठविले. किल्ल्यापासून सहा कोसांवर एखलासखान आणि मराठे यांच्यात मोठी लढाई झाली. इतरही अनेक चकमकी झाल्या. खानाने तोफखान्याची सरबत्ती केल्यामुळे अनेक मराठे ठार झाले. दिलेरखानाने किल्ला जिंकल्यावर तो पाडून जमीनदोस्त केला.[१]

अनुपुराणातही या वेढ्याचे वर्णन केलेले आहे. संभाजीने गडावर दूत पाठवून दिलेरखान्याच्या प्रबळ सैन्यापुढे, गड दुर्बळ असल्याने निष्कारण जीवांची व धान्याची हानी करून न घेता किल्ला खानाला द्यावा असा निरोप पाठविला. परंतु संभाजीचे म्हणणे न ऐकताच गडावर प्रतिकाराची तयारी करण्यात आली. खानाचे आणि शिवाजीचे सैन्य आदिलशहाच्या सीमेवर आले. संभाजी घोड्यावर आणि दिलेरखान हत्तीवरून जात असताना गडावरील लोकांनी प्रथम आगळीक केली. खानाचे सैन्य गडावर चालून गेले. गडावरून त्यांच्यावर बाणांचा आणि दगडांचा वर्षाव झाल्याने खानाचे बरेच लोक जखमी झाले. फिरंगोजी नरसाळाने गड लढविण्याचा शक्य तितका प्रयत्न केला परंतु खानाचे मोठे सैन्य आणि संभाजीचा पराक्रम यापुढे त्याला हार खावी लागली.[२]

याच सुमाराला शहाजादा मुअज्जमला दक्षिणेचा सुभेदार नेमण्यात आले. तो एप्रिल–मे १६७९ च्या सुमारास औरंगाबादला आला. मुघल सैन्य, दिलेरखान आणि संभाजी पन्हाळ्याला वेढा घालणार होते. तेथे पावसाळ्यात छावणी करून दीर्घ काळापर्यंत वेढा चालू ठेवण्याचा त्यांचा विचार होता.[३] संभाजी आणि दिलेरखान यांनी पावसाळा संपताच विजापूरच्या वजिरांना शिवाजीवर चालून जाण्यास भाग पाडले. त्याला तोंड देण्यासाठी शिवाजी महाराजांनी

१. विभापा ( बुस ) : मोआम–प, पृष्ठ ७१–७२

२. पका-स, पृष्ठ ८८; शिचप्र, पृष्ठ २९; दानपत्र, श्लोक १२१, विभा ( बुस ) पा, पृष्ठ ५३३।५३४

३. शिपसासं, क्र. २११०

सरहद्दीवर १२००० घोडेस्वार आणून ठेवले होते.[१] परंतु प्रत्यक्षात पन्हाळ्याला वेढा पडला नाही.

भूपाळगड घेतल्यावर दिलेरखान घोलगडाच्या बाजूला गेला. दि. १८-८-१६७९ ला त्याने घोलगडजवळ भिवरा नदी ओलांडली आणि आदिलशाही सरदार मसूद खानावर चालून जाण्याचे ठरविले. दिलेराविरुद्ध आपला टिकाव लागणार नाही असे वाटल्याने मसूदखानाने शिवाजीची मदत मागितली. तेव्हा शिवाजी महाराजांनी विजापूरकरांशी तह केला. दिलेरखान मंगळवेढे जिंकून विजापूरच्या बाजूस गेला.[२]

मसूदखानाने साबाजी घाटगे यास बोलावून, तोरगल येथील शिबंदी त्याच्याबरोबर देऊन त्याला इंदीकडे पाठविले. संभाजी रसद घेऊन निघाला होता. संभाजी आणि साबाजी यांचा मुकाबला होऊन त्यात साबाजी जखमी झाला.

दि. १५ सप्टेंबरला दिलेरखान विजापूरच्या जवळ गेला. विजापूरकरांच्या मदतीसाठी शिवाजीने सैन्याची एक तुकडी धाडली आणि दुसरी तुकडी विजापूरकरांवर केंद्रित झालेले सैन्य पांगविण्यासाठी मुघल हद्दीत पाठविली. तरीही विजापूर घेण्याचा हट्ट दिलेरखानाने सोडला नाही. त्याने मराठ्यांच्या सैन्याकडे दुर्लक्ष केले. परंतु त्याला विजापूर घेता आले नाही. त्यामुळे शहाजादा मुअज्जम आणि दिलेरखान यांच्यातील मतभेद वाढत गेले. मुघल हद्दीतील जालना वगैरे प्रदेशात शिवाजीने केलेल्या लुटीचा दिलेरखानाने बंदोबस्त न केल्यामुळे औरंगजेबाने त्याची कानउघाडणी केली. त्यामुळे रागावून मराठ्यांना मुघल हद्दीतून पळवून लावण्यासाठी दिलेरखानाने मिरज आणि पन्हाळ्याच्या बाजूला मोर्चा वळविला. जालगिरी, तिकोटा, होनवड या मार्गाने तो अथणीपर्यंत पोचला. संभाजी त्याच्याच बरोबर होता. दिलेरखानाने अथणीपर्यंत जाताना बरीच गावे आणि खेडी उद्ध्वस्त केली. तो ऐनापुरास जात असताना संभाजी निघून गेला अशी बातमी त्याला समजली.[३]

संभाजी दिलेरखानाकडे असताना त्याचे लग्न महेश्वरच्या तापीकांतांची मुलगी चंपा हिच्याशी झाल्याचे श्री. वा. सी. बेंद्रे यांनी त्यांच्या ‘छत्रपती संभाजी’ या पुस्तकात म्हटले आहे. हे त्यांचे विधान कसे चुकीचे आहे आणि हरिकवीच्या ‘शंभुराजचरित’ या काव्याचा नायक हाच शिवाजी महाराजांचा मुलगा संभाजी अशी गैरसमजूत झाल्यामुळे हा घोटाळा श्री. बेंद्रे (आणि डॉ.

१. कित्ता, क्र. २११६

२. विआपा (बुस), पृष्ठ ५३३; MA-JS, p 112

३. विआपा (बुस) पृष्ठ ५५४--५५९

प. कृ. गोडे ) यांनी कसा केला आहे हे श्री. भा. रं. कुळकर्णी[१] यांनी साधार सिद्ध केले असल्याने ' चंपा आणि संभाजी ' यांच्यासंबंधी येथे चर्चा करण्याचे कारण नाही.

संभाजी दिलेरखानाकडून स्वराज्यात परत आला त्यासंबंधी निरनिराळी माहिती मिळते. सभासद लिहितो, " राजियांचा पुत्र संभाजी रुसून आपणाजवळ आला आहे. त्यास गौरव करून आम्ही ठेवून घेतला आहे. तर पातशहांनी मेहेरबान होऊन त्यास नावाजावे म्हणजे राज्यात दुई होईल. राज्यातील लष्कर उठोन आपोआप येईल आणि किल्लेकोट साधतील म्हणून लिहिले. त्याजवरून पातशहांनी विचार केला, की राजियांचा पुत्र आला आहे, त्यास नावाजिता पातशाहीत फितवा करून पातशाही बुडवितील. नावाजू नये. हुजूर आणून कैदेत ठेवावा. ऐसा विचार करून दिलेरखानास लिहून हुकूम पाठविला, की संभाजी राजियास घेऊन हुजूर येणे असे लिहिले. तो अगोदर दिलेरखानाचा वकील पातशहाजवळ होता. त्यानी हे वर्तमान खानास लिहून पाठविले. ते वर्तमान खानास कळताच संभाजी राजियास सूचना करून पळविले. ते पळून पन्हाळियास आले.[२]

सभासद बखरीत दिलेरखानाने सूचना केल्यामुळे संभाजी पळाला असे लिहिले असले तरी संभाजी आणि दिलेरखान यांच्यांत मतभेद सुरू झाले होते. दिलेरखान, संभाजी, सर्जाखान यांनी तिकोटा, होनवड, तेलंगपासून अथणीपर्यंत गावे लुटताना अनेकांना कैद केले; हिंदूंचे हाल केले. येथेच संभाजी आणि दिलेरखान यांच्यांत मतभेद झाले. सर्जाखानाने हिंदूंचे केलेले हाल संभाजीस आवडले नव्हते. संभाजीने कैदी सोडावेत असा आग्रह धरल्याने त्याचे दिलेरखानाशी मतभेद झाले.[३] औरंगजेबाचा संभाजीला कैद करण्याचा हुकूम कळल्याबरही त्यांचे मतभेद होण्याचा संभव होता. तो संभाजीला सूचना देऊन पळवून देईल असे वाटत नाही. संभाजीने आपल्या दानपत्रात या मतभेदांचा उल्लेख केलेला आहे. " दिलेल आसूराबरोबर माझे भांडण झाले. " इतकेच नव्हे तर दोघांत मारामारी होण्यापर्यंत मजल गेली होती.[४]

शिवाजी महाराजांचे संभाजीला मुघलांकडून सोडवून आणावयाचे प्रयत्न चालूच होते. त्यांनी संभाजीला भरवसा देऊन आपल्याकडील लोकांस त्याच्याकडे पाठविले. संभाजीला परत येण्यासाठी पत्रही लिहिले होते.[५] दोघांत वाकडेपणा

१. नवभारत मासिक, जून १९६१, पृष्ठे १३ ते १६

२. सभाव, पृष्ठ ७७

३. विआपा, ( बुस ) पृष्ठ ५५९; शिपसासं, क्र. २१४२

४. दानपत्र, श्लोक १२५

५. शिपसासं, क्र. २२३६

पूर्वी आलेला असला तरी शिवाजीराजांनी दाखविलेल्या कळवळ्याने आणि प्रेमामुळे तो नाहीसा झाला. त्यांनी संभाजीचे मन आपल्याकडे वळवून घेतले. त्यामुळे संभाजी एकटाच निघून विजापुरास गेला. 'बुसातिन-उस-सलातिन' मध्ये संभाजीने आपल्या स्त्रीला शूर पुरुषाचा पोषाख चढवून पाच स्वारांबरोबर खानाच्या छावणीतून पळविल्याचे नमूद केले आहे.[1] शिवाजी महाराजांनी संभाजीला परत आणण्याचे प्रयत्न केलेच होते. शिवाजीराजांची माणसे गुप्तपणे संभाजीकडे येत जात असत. विजापुरापासून १६ कोसांवर अथणी हे स्थळ आहे. जवळच जंगलात छावणी होती. तेथून शिवाजीच्या माणसांनी एके संध्याकाळी त्याला युक्तीने बाहेर काढले. दिलेरखानाने इतका बंदोबस्त केला असूनही इतक्या मोठ्या फौजेमधून दहा स्वारांनिशी संभाजी निघून गेला. हे कसे घडले याचा तपास लागला नाही.[2] परंतु संभाजी एकटाच पळाला आणि तो गेल्यानंतर दिलेरखानाने संभाजीच्या बायकोला आणि मुलीला अटकेत ठेवले.[3]

संभाजी विजापुरास गेला तेव्हा मसूदखानाने संभाजीला सामान, सरंजाम, पोशाख आणि बिछाईत देऊन मदत केली. शिवाजी महाराजांनी, विजापूरकरांवर दिलेरखान पूर्वी चालून जाणार होता तेव्हा, मसूदखानाला साहाय्य करून मैत्री संपादन केली होती. संभाजीला सोडवून आणण्यासाठी मसूदखानाचा उपयोग करून घेता येईल अशी हे साहाय्य देताना महाराजांची कल्पना असावी. मसूदखान संभाजीला मदत करतो आहे हे कळताच दिलेरखानाने अब्दुल रजाकला विजापुरास पाठविले. अब्दुल रजाक विजापुरास पोचताच संभाजी ३०० घोडे आणि १००० पायदळ बरोबर घेऊन दि. २१–१२–१६७९ रोजी पन्हाळ्यास पोचला.[4]

संभाजी पन्हाळ्याला आल्याचे कळताच शिवाजी महाराजांना अतिशय आनंद झाला. मुलाची गाठ घेण्यासाठी ते पुरंदरहून पन्हाळ्याला गेले. दि. १३–१–१६८० रोजी पितापुत्रांची भेट झाली. महाराजांनी प्रेमाने संभाजीचा सत्कार करून त्याला राज्य देण्याचे आश्वासन दिले.[5] "या भेटीत पिता-पुत्रांचे बरेच बोलणे झाले. राजे लेकराला म्हणतात, 'लेकरा, मला सोडू नको. औरंगजेबाचा आपला दावा. तुजला दगा करावयाचा होता, परंतु श्रीने कृपा करून सोडून आणिला. थोर कार्य झाले. आता तू जेष्ठ पुत्र, थोर झालासा आणि सचेतर

१. विआपा, (बुस) पृष्ठ ५६०

२. मोआम-प, पृष्ठ ७३

३. अख—२७--११--१६८१

४. विआपा (बुस), पृष्ठ ५६०; शिपसासं, क्र. २१४२; शिचप्र--पृष्ठ ३०; दानपत्र; सभाब, पृष्ठ ७७

५. दानपत्र

( स्वतंत्र ) राज्य कर्तव्य हे तुझ्या चिती आहे असे आपणास कळले, तर मजला हे अगत्य आहे. तरी तुजलाही राज्य एक देतो. आपले पुत्र दोघेजण, एक तू संभाजी व दुसरा राजाराम-ऐसियास हे सर्व राज्य आहे. यास दोन विभाग करतो. एक चंदीचे राज्य, याची हद्द तुंगभद्रा तहद कावेरी हे एक राज्य आहे. दुसरे राज्य तुंगभद्रा अलीकडे गोदावरी नदीपर्यंत राज्य आहे. ऐशी दोन राज्ये आहेत. त्यास तू वडील पुत्र. तुजला कर्नाटकचे राज्य दिधले. इकडील राज्य राजारामास देतो. तुम्ही दोघे पुत्र दोन राज्ये करणे. आपण श्रीचे स्मरण करून उत्तर सार्थक करीत बसतो. ' असे बोलिले. तेव्हा संभाजी राजे बोलिले की, ' आपणास साहेबांचे पायाची जोड आहे, आपण दूधभात खाऊन साहेबांचे पायाचे चिंतन करून राहीन. ' असे उत्तर दिधले. आणि राजे संतुष्ट जाहले. मग पितापुत्र बैसून कुल राज्य आपले देखिले. "[१]

कर्नाटकच्या स्वारीवरून परत आल्यानंतर पितापुत्रांची गाठ पडलेली नसेल तर ही भेट जवळजवळ तीन वर्षांनी होत होती. तेव्हा दोघांना आणि विशेषतः महाराजांना अत्यंत आनंद होणे स्वाभाविक आहे. महाराज, आग्र्याहून सुटका झाल्यावर संभाजीला सोडून आले होते, त्या भेटीनंतर त्यांना झालेला आनंद आणि याप्रसंगी झालेला आनंद यांत फरक होता. गृहकलह, मतभेद, मुलगा शत्रूकडे पळून जाणे इत्यादी अनेक संघर्षांनंतर त्यांच्या आयुष्यात हा क्षण आलेला होता. या भेटीचा सोहळा अविस्मरणीय झाला असेल यांत शंकाच नाही. राजे झालेला आनंद कोणाजवळ बोलून दाखविणार ? या प्रसंगानंतर राजे व्यंकोजीला लिहितात, " चिरंजीव राजश्री संभाजी राजे मोगलाईत गेले होते : त्यास आणावयाचा उपाय बहूत केला; त्यासही कळो आले की ये पातशाहीत अगर विजापूरचे अगर भागानगरचे पातशाहीत आपले मनोगतानुरूप चालणार नाही. ऐसे जाणोन त्याणी आमचे लिहिण्यावरून स्वार होऊन आले. त्याची आमचे भेट जाली. घरोब्याचे रीतीने जैसे समाधान करून ये तैसे केले. हे सविस्तर वर्तमान तुम्हास कळावे म्हणोन लिहिले असे. "[२]

संभाजीला पन्हाळ्याला ठेवून शिवाजी महाराज रायगडावर गेले. संभाजी परत आल्यानंतर त्याला पुन्हा कारभार सांगितलेला दिसतो. दि. १५–३–१६८० या दिवशी महाराजांनी राजारामाचे प्रतापराव गुजर यांच्या मुलीशी लग्न केले.[3] या लग्न-समारंभाला संभाजीला रायगडावर नेलेले नव्हते; तो पन्हाळ्यालाच होता. युवराज संभाजीला लग्नाचे आमंत्रण दिलेले नसावे, याचे आश्चर्य वाटते. अर्थात्

१. सभाव, पृष्ठ ७७--७८

२. शिपसासं.--क्र. २२३६ ३. शिचप्र, पृष्ठ ३०

यावरून शिवाजी महाराजांना संभाजीला सोयराबाईपासून दूर ठेवावयाचे होते असेच दिसते.

समकालीन कागदपत्रांवरून १६८० सालच्या जानेवारी महिन्यात महाराजांनी संभाजीला फ्रेंचांशी वाटाघाटी करण्याचा अधिकार दिलेला दिसतो. फ्रेंचांच्या बोटी राजापूर बंदरात नांगरून पडलेल्या होत्या. या बोटीतून कोणीही बाहेर पडताना दिसले नसल्यामुळे, ती जहाजे एखाद्या खासगी व्यापाऱ्याची असतील अशी संभाजीची समजूत झाली. या बोटींसंबंधी संभाजीला माहितीही पुरविण्यात आलेली नव्हती. या फ्रेंचांच्या बोटी आहेत असे कळताच संभाजीने फ्रेंच कंपनीला सौजन्य दाखविण्यासाठी काही खलाशी बोटीवर पाठविले. ते तेथे व्यापार करण्यासाठी किंवा काही हेतूने आलेले नाहीत असे त्यांनी सांगितले. त्यामुळे त्यांच्यापैकी कोणी किनाऱ्यावर आलेले नव्हते. परंतु पुढील काळात फ्रेंच व्यापारासाठी आले तर पूर्वीपासून फ्रेंच आणि मराठे यांच्यात चालू असलेल्या मैत्रीला ( फ्रेंच गुप्त रीतीने शिवाजी महाराजांना शस्त्रास्त्रे पुरवीत असत. ) पुन्हा उजळा मिळेल असे फ्रेंचांनी सांगितले.[१]

या मजकुरावर दि. १३ जानेवारी १६८० ही तारीख आहे. संभाजी आणि शिवाजी महाराज यांचीही भेट त्याच दिवशी झाली होती.

* * *

१. भाइसंमं–त्रैमासिक, १९२३. फेब्रु. मार्च. जून. जुलै. वर्ष ३, अंक २, ३ आणि ४. Contemporary French Accounts of Shivaji. p. 107.

# ४. वारसा-हक्काच्या कलहातून राज्यपद

कोणत्याही प्रकारच्या राज्यकारभारात मुख्य शासनकर्ता निधन पावला, की त्या शासनकर्त्याची जागा कोण घेणार असा प्रश्न उभा राहतो. जवळ जवळ तीनशे वर्षांपूर्वी शिवाजी महाराजांच्या निधनानंतर असाच प्रश्न निर्माण झाला होता. खरे पाहिले तर असा प्रश्न निर्माण होण्याचे कारण नव्हते. युवराज संभाजी हे महाराजांचे ज्येष्ठ चिरंजीव असल्यामुळे मराठ्यांच्या गादीवर त्यांचाच अधिकार होता. असे असूनही शिवाजी महाराज निधन पावल्यानंतर रायगडावर राजारामाचा गट आणि पन्हाळगडावर संभाजीचा गट यांच्यांत गादीसंबंधी कलह निर्माण झाला. दोन्हीही पक्ष आपापल्या परीने गादी मिळविण्यासाठी खटपट करू लागले.

शिवाजी महाराजांच्या हयातीतच त्यांच्या पश्चात राजपद कोणाला मिळावे याविषयी चर्चा सुरू झाली होती. संभाजीचा हक्क डावलून आपला मुलगा राजाराम याला गादी मिळावी अशी सोयराबाईची खटपट चालू होती. शिवाजी महाराजांच्या अखेरच्या काळात सोयराबाईने त्यांना एक दिवस विचारले, 'जेष्ठ पुत्र दौलतीचे अधिकारी आहेत. त्यांचे व पदरच्या मनुष्यांचे बनत नाही. माझा मूल लहान आहे. याजवरी सरकारचा लोभ आहे. त्यास संस्थान, त्याजला अधिकार द्यावयाचा किंवा वडिलांचा अधिकार वडिलाकडे सोपावयाचा, हे सांगावे...सोयराबाईस क्रोध उत्पन्न जाला; परंतु आधी स्त्री, त्यात सत्ताधारी, वडील कोण्ही नाही, आपल्या मुलास अधिकार असावा, संभाजीस नसावा हे मनापासून चित्तात आले.'[१]

सोयराबाईच्या अशा वृत्तीतून मुख्यतः वारसा-हक्काचा प्रश्न उद्‌भवला असावा. त्यातून संभाजी राजे सन १६७८ मध्ये मुघलांना जाऊन मिळाल्यामुळे अष्टप्रधान मंडळात त्यांच्याविषयी अविश्वास आणि कटुता निर्माण होणे अगदी स्वाभाविक होते. अशा परिस्थितीत शिवाजी महाराजांना वारसा-हक्काबद्दल निश्चित असा निर्णय करणे कठीण झाले असावे. त्यामुळेच त्यांनी हा प्रश्न अनिर्णितच ठेवला असावा. यासंबंधी काही चर्चा झाली असली तरी स्पष्ट असा निर्णय

१. शिदिव, पृष्ठ ४५९; पका

लागलेला नसावा असे वाटते. मरणापूर्वी शिवाजी महाराजांनी एक अधिकृत आज्ञापत्र प्रधानांसाठी मागे ठेवले होते असे केवळ रायरीच्या बखरीत (इंग्रजी भाषांतर) नमूद केलेले आहे.[1]

शिवाजी महाराज आपल्या अंतकाळी म्हणतात, "राज्य म्यां शिवाजीने चाळीस हजार होनांचा पुणे महाल होता, त्यावरि एक कोड होनांचे राज्य पैदा केले. हे गड, कोट व लष्कर पागा ऐसे मिळविले. परंतु मजमाघारे हे राज्य संरक्षण करणार ऐसा पुत्र दिसत नाही. कदाचित धाकटा कुंवार राजाराम वाचला तर तो एक हे राज्य वृद्धीने पावतील. संभाजी राजे वडील पुत्र जाणता आहे, परंतु बुद्धी फटकळ आहे. अल्पबुद्धी आहे. यास काय करावे ! आपण तो प्रयाण करतो. तुम्ही कारकून व हुजरे मराठे कदीम या राज्यातील आहां. तुम्हांस या गोष्टी कळल्या असाव्या."[2] हा सभासदाच्या बखरीतील मजकूर ग्राह्य धरला तर शिवाजी महाराजांनी वारसा-हक्काचा प्रश्न अष्टप्रधान मंडळावर सोपविला होता असे मानावे लागेल.

या वारसा-हक्काच्या कलहातून गोष्टी कोणत्या थराला गेल्या आणि संभाजी राजांनी अधिकार-सूत्रे आपल्या हातात घेऊन राज्यकारभार करण्यास कशी सुरुवात केली या गोष्टीचा बोध होण्यासाठी त्या वेळच्या रायगड आणि पन्हाळगड येथील घटनांचा विचार करणे आवश्यक आहे.

**रायगडावरील घटना :**

शिवाजी महाराजांच्या निधनानंतर दि. ३ एप्रिल १६८० रोजी अष्ट प्रधानांनी विचार केला, "जे, संभाजी महाराजांची मर्जी यथास्थित मार्गावरी येण्याचे उपाय करून (यथास्थित) होय तोपर्यंत, संभाजी महाराज यांस आहेत तसे बंदोबस्ताने राखून, सर्व राज्याचा बंदोबस्त राजाराम साहेब येथे आहेत यांस मंचकारोहण करून कार्य चालवावी. नंतर सर्वांनी महाराजांकडे जाऊन, त्यांची मर्जी प्रसन्न करून राज्याभिषेकादी करणे तसे त्यास करावे. ऐसा संकल्प करून क्रिया समाप्ती जालियावरी राजाराम साहेब यांस सुमुहूर्ते मंचकारोहण करविले."[3]

याप्रमाणे खरोखरच अष्टप्रधान वागले असते तर संभाजी महाराजांनाही विशेष राग आला नसता अशी कल्पना करावयास अडचण वाटत नाही. परंतु या प्रधान मंडळींनी संभाजीराजांचा वारसा-हक्क अमान्य करून त्यांना पकडण्याचा कट केला.

१. शिछशे, पृष्ठ १५५

२. सभाब, पृष्ठ ८७

३. चिविशिछ्च, पृष्ठ ३६३

जेधे शकावली, मल्हार रामराव चिटणीस बखर आणि परमानंद काव्य या उपलब्ध साधनांतून या कटाची जुळवाजुळव करता येते.

शिवाजी महाराजांच्या निधनानंतर १९ दिवसांनी साडेतीन मुहूर्तांतील अक्षय्यतृतीयेच्या मुहूर्तावर म्हणजे दि. २१ एप्रिल १६८० या दिवशी अनाजीपंत सुरनीस सचीव यांनी राजारामाचे मंचकारोहण करून संभाजी राजे यांस कैद करावे असा तह करून मोरोपंत पेशवे यांसह पन्हाळ्यावर चालोन गेले.[१] शिवापूर दप्तरातील यादीत पन्हाळ्याच्या मोहिमेचे नेतृत्व मोरोपंतांकडे असल्याचे नमूद केले आहे.[२] जेधे शकावलीत सोयराबाईचा उल्लेख नसला तरी हा कट तिच्याच मार्गदर्शनाखाली रचला गेला असावा असे वाटते. कारण तिला राजारामाच्या हक्काच्या आड येत असलेल्या संभाजीला दूर करावयाचे होते. मोरोपंत आणि अण्णाजी, सैन्याला योग्य वेतन देऊन आणि संभाजीला तोंड देण्याची तयारी करून पन्हाळ्यास निघाले. संभाजीला पकडावे किंवा मारावे असा मोरोपंताने हुकूम दिला होता.[३]

परमानंद कवीच्या म्हणण्यात थोडेबहुत तथ्य असावे असे वाटते. कारण वरील कटानंतर वर्षा सव्वा वर्षाने संभाजीमहाराजांवर विषप्रयोग केला असल्याचा पुरावा इंग्रज वखारवाल्यांच्या पत्रात सापडतो.[४]

शिवाजीमहाराजांच्या निधनानंतर रायगडावरील सर्व कारभाराची सूत्रे सोयराबाईने आपल्या हातात घेतली. तिने मोरोपंत प्रधान आणि निळोपंत अमात्य, अण्णाजी दत्तो सचीव हे प्रमुख; हंबीरराव मोहिते सेनापती, रूपाजी भोसले, आनंदराव निंबाळकर, काटकर, महाडीक, गुजर, पालकर व शिर्के हे सरदार अशा सर्वांनी विचार केला की महाराजांनी आज्ञा केली आहे की संभाजी महाराज यांची उग्र प्रकृती, यांस राज्य आवरणार नाही. सर्वांचा नाश करून आपणही नाश पावतील. औरंगजेब महाशत्रू भागानगर प्रांतासमीप येऊन पावला. त्याचा पराभव यांचे वस्तू ( हस्ते ) होणार नाही. राजाराम सुबुद्ध व याचे हाते राज्यरक्षण होऊन सर्वांचे कल्याण घडेल. त्या अर्थी संभाजीराजे यांस आहेत तसेच तेथील बंदोबस्त करवून, कैदेत राखून, राजाराम यांसच घेऊन, राज्य रक्षून, नंतर वडील राज्याचे अधिकारी सिंहासनाचे तेच आहेत, त्यांचे स्वाधीन राज्य करावे. मग पुढे रक्षोत अथवा न रक्षोत. परंतु ही मसलत प्राप्त आहे ती सिद्धीस

१. शिचप्र--पृष्ठ ३०, ५३

२. शिचप्र, पृष्ठ ५३

३. पका--पृष्ठ ३३--४४

४. FR–Bom to Sur, ३०–८–१६८१, Bom Vol 9, p 73--6; Orme Vol 116--117, p 278--83.

गेलियावाचून त्यासच आणून करू जातां अनर्थ पडून राज्य जाईल. यास्तव कृत निश्चय करून राजाराम घेऊन राज्य चालवावेसे केले.[१] चिटणीसाने दिलेल्या या माहितीत सोयराबाईने १६८१ नंतर औरंगजेब दक्षिणेत येऊन आणि संभाजीच्या रागीट स्वभावामुळे त्याला शत्रूचा बंदोबस्त करता येणार नाही इत्यादी भविष्यात घडलेल्या गोष्टी, शिवाजीमहाराजांची आज्ञा, राजाराम राज्य करण्यास कसा लायक आहे इत्यादी गोष्टी प्रधान आणि सरदारांना सांगून राजारामाला गादीवर बसविले असे म्हटले आहे. याशिवाय औरंगजेबाचा बंदोबस्त करून राज्याचे रक्षण केल्यावर साळसूदपणे ती राज्य संभाजीच्या स्वाधीन करणार होती. हातात एकदा आलेली सत्ता कोणीही ( आणि विशेषतः महत्त्वाकांक्षी स्त्री ) सहसा सोडून देईल हे मनुष्यस्वभावाच्या विरुद्ध वाटते. सोयराबाईने राजारामाला गादीवर बसविण्याची मसलत केली हे खरे. तिला संभाजीचा अधिकार मान्य होता हा चिटणीसाचा युक्तिवाद योग्य व बरोबर वाटत नाही.

राजारामाला गादीवर बसविण्याची मसलत ठरल्यानंतर सोयराबाईने हवालदार कान्होजी भांडवलकर आणि सरनोबत शहाजी भोसले (?) यांना रायगड किल्ल्याचा बंदोबस्त करावयास सांगून किल्ल्याचे दरवाजे बंद ठेवून दिंड्या उघड्या ठेवण्याची आज्ञा दिली. पाचाड येथे दहा हजार मावळे आणि सरदार ठेवण्याचा हुकूम दिला. सेनापतीला कऱ्हाड प्रांती कोल्हापूरला जाण्यास सांगितले. रायगडावरील काही सरदार प्रतापगडावर पाठविले. साताऱ्याला मावळे लोकांच्या जमावाने जावे असे ठरले. ही सारी व्यवस्था केल्यानंतर सोयराबाईने बाळाजी आवजीस बोलावून घेऊन त्याला पन्हाळा येथे बंदोबस्ताची पत्रे लिहिण्यास सांगितले. त्याने उत्तर दिले की, "आम्ही दरखदार (अधिकारी) राजाचे. खावंद वडील संभाजी महाराज असतां, अशी पत्रे आम्ही लिहिणार नाही. तेव्हा तुम्हास हा आग्रह करण्याचे कारण नाही." त्यावर सोयराबाई त्याला म्हणते, "तुमचे हातचे पत्र नसल्यास लोकांचा विश्वास पडणार नाही. यास्तव तुम्हाकडे दरख, त्या अर्थे बरीवाईट पत्रे तुम्ही लिहावी. हे तुम्हास प्राप्त. लिहून द्यावी" यामुळे बाळाजीपुढे मोठा प्रश्न उभा राहिला. तो पत्रे लिहिण्यास तयार नव्हता परंतु सोयराबाईची इतराजी दिसून येताच, "मी लिहीत नाही मूल आवजी बावा आहे, त्यास स्वाधीन करतों. पाहिजे तसे करावे" म्हणून उठून गेले.[२] या माहितीवरून सुरुवातीच्या कटात बाळाजीचा हात नसावा असे वाटते. त्यामुळे त्याला पकडल्याचा उल्लेख आढळत नाही.

१. मराचिब, पृष्ठ ४२

२. मराचिब, पृष्ठ २३

सोयराबाईने आवजी बावापासून पत्रे लिहवून घेऊन ती रवाना केली. ही पत्रे खंडोजी नाईक, जासूदांचा नाईक आणि गणोजी कावळा यांच्याबरोबर पन्हाळ्याचा हवालदार बहिरजी नाईक इंगळे, सोमाजी नाईक बंकी, कृष्णाजी बंकी, हिरोजी फर्जन्द यांना पाठविण्यात आली. "येथील प्रसंग एक प्रकारचा आहे. संभाजी महाराज यांस कैद करून बहुत सावधपणे असावे. महाराजांचे वर्तमान (शिवाजी महाराजांच्या मृत्यूची बातमी) फुटू देऊ नये." अशा अर्थाची पत्रे करवीर येथे असलेले जनार्दनपंत सुमंत आणि पाराजीपंत पेडगावकर यांनाही पाठविली. संभाजी महाराजांना जी पत्रे दिली होती ती बंदोबस्त झाल्यावर द्यावी असे जासुदांना सांगितलेले होते. त्यांनी जाऊन त्याअन्वये पत्रे देऊन काही बंदोबस्त झाला."[१]

मोरोपंत आणि अण्णाजी दत्तो संभाजी राजांना पकडण्यासाठी निघाले असताना संभाजी महाराजांनी हंबीररावाला पत्र लिहून आपल्या पक्षात सामील होण्यास सांगितले. राज्यावर माझा अधिकार असून राजारामासारख्या दुबळ्या व लहान मुलाला गादीवर बसविले तर शत्रुपक्षाला महाराष्ट्र सहज जिंकून घेता येईल असे त्यांनी पत्रात लिहिले होते. हंबीरराव संभाजीच्या बाजूस जावयास तयार झाला; परंतु इतर मंत्र्यांनी पन्हाळ्यावर हल्ला करण्याचा निर्धार कायम ठेवला. महाराजांनी फौजेतील सर्व सरदार वगैरे लोकांकडे राजकारणे आणि आपले नावे पत्रे पाठविली.[२]

दि ३ मे १६८० ला मुंबईकर सुरतेस कळवितात की, "मोरो पंडित, अण्णाजी पंडित वगैरे संभाजीचे हुकूम घेण्यास पन्हाळ्यास गेले आहेत." परंतु हे प्रधान तिकडे कशासाठी गेले हे मुंबईकरांना माहीत नव्हते.[३] प्रत्यक्षात ते संभाजीला पकडण्यासाठी गेले होते; हुकूम घेण्यासाठी नव्हे.

रायगडाहून मंत्री निघाले तेव्हा त्यांना बरेच अपशकून झाले. प्रल्हाद निराजीने संभाजी महाराजांशी मिळते घेण्याचे ठरविले. मोरोपंत पंडिताने आपण शिवाजी महाराजांचा शब्द पाळून राजारामाला सहकार्य देण्याचा आपला आग्रह कायम ठेवला. हंबीररावाने मोरोपंत आणि अण्णाजी दत्तो यांना गुप्त बैठकीस बोलाविले; परंतु त्या दोघांनी नकार दिला. हा आपला अपमान झाला असे समजून हंबीररावाने त्यांच्या जवळचा जमाव आपल्या बाजूला वळवून घेतला. मोरोपंत आणि अण्णाजीने हंबीररावावर हल्ला केला. हंबीररावाने त्या दोघांचा पराभव

१. मराचिब–पृष्ठ ४–५

२. कित्ता

३. शिपसांसं–लेख २२५६

केला. त्यांना आणि प्रल्हाद निराजीला १९ मे ते १६ जून १६८० च्या दरम्यान कऱ्हाड येथे कैद करून पन्हाळ्यास नेले.[1]

यापूर्वी थोडे दिवस म्हणजे दि. १६ मे १६८० रोजी रायगडावर काही लोकांना कैद करण्यात आले होते.[2]

तिघांबरोबर राहूजी सोमनाथलाही अटक करण्यात आली होती. कारण तोही या कटात सामील होता. पुढे राहूजी सोमनाथ आणि प्रल्हाद निराजीला सोडून दिलेले दिसते. प्रल्हाद निराजीची मुद्रा दि. २८-८-१६८० च्या पत्रावर सापडत असल्यामुळे त्याला त्यापूर्वीच सोडले असावे.[3]

दि. ३-६-१६८० च्या पत्रात मुंबईकर इंग्रज सुरतेला कळवितात की, " अण्णाजी पंडिताचा शिरच्छेद झाला. मोरोपंतावर मर्जी खप्पा झाली नाही. तथापि त्याला अजून विश्वासात घेतलेले नाही. "[4] त्यावेळी अण्णाजी दत्तो जिवंत असून कैदेत होता.

**पन्हाळगडावरील घटना :**

शिवाजीमहाराज निधन पावले त्यावेळी संभाजीराजे पन्हाळ्यास होते. सोयराबाईने महाराजांच्या निधनाची बातमी गुप्त ठेवावयाचा प्रयत्न केला होता. शिवदिग्विजय बखरीतील मजकूर थोडासा वेगळा आहे. " महाराजांच्या कैलास-वासासंबंधी पत्रे लिहून, सर्वांठायी रवाना जाली. पूर्वीची पत्रे वाखा जाल्याची गेली, ती पन्हाळ्याचे किल्ल्यावरी संभाजीमहाराज असतां घोडा फिरावयास खाली आले, तों जासूद लगबगीने येता पाहिला. त्यास पाहून बोलावून विचारले. त्याणी ' रायगडाहून आलों पन्हाळ्यास जाणें. आपणास पत्रें आणिली आहेत. ' उभा राहून पत्रें फोडून पाहतां संभाजीराजास–' वाखा आहे. आरोग्य होईल ' म्हणून होते ते पत्र पाहून दुसरे लखोटे कोणाचे आहेत म्हणून बोलले. चाकर माणसांची प्राप्ति दाखवीत नाही म्हणावयाची काय? त्याणी ते लखोटे दाखविले. त्यात हवालदाराचा व सुभेदाराचा लखोटा घेऊन फोडून पाहतां त्यांत ' फार घाबरे आहेत. पुढे बंदोबस्त ठरेल तसे लिहूं. परवानगीशिवाय संभाजीमहाराजांस उतरूं जाऊ येऊ देऊ नये ' अशी अक्षरे पाहून तसेच निघाले, ते रातोरात करून साताऱ्यास येऊन, तेथील बंदोबस्त करून, तेथून लोक बदलोन दुसरे घेऊन निघाले. ते चार प्रहर दिवस रात्र खाऊन, जेवून त्वरित निकडीने येताव तो

१. पका, Section III, पृष्ठ ३३ ते ३९; शिचप्र, पृष्ठ ३०

२. शिचप्र, पृष्ठ ५३

३. शिचसा, खंड १२, लेख ८९, पृष्ठ ५५

४. शिपसासं-क्र. २२६१

महाराजांचे शव दर्शनास खाली आणिले. म्हणोन पाच सात कोशांवर बातमी समजली. तेथे ढाला करून जे निघाले ते चालले. इकडे महाराजांचे सार्थक करून किल्ल्यावरि येऊन पुढे कसे करावे, अशा विचारात, परंतु राजप्रेत राजा केल्या-वाचून दहन करू नये, या अर्थे राजाराम साहेबांचे नांवे द्वाही फिरवून, किल्ल्यांत बंदोबस्त करावा. तों आतां पत्रें जिकडील तिकडे रवाना केलीं, संभाजीमहाराज इतःपर वर्तमान कळोन येतील, तो त्यांचा बंदोबस्त ठेवण्याविषयीं लिहिलेंच आहे. तेव्हा त्यांचे येणें जरूर. आपला घाट करूं. या विचारें मसलतशीर असतां संभाजीची वार्ता नाही. किल्ल्यावरी स्वस्थ वागणे. मेल्याचा शोक, परंतु पुढे घाल-मिलीचा प्रसंग. बंदोबस्त पेखी काही एक नाही. त्यास चार प्रहर रात्र गुदरली, तो दुसरे दिवशी सकाळी संभाजीमहाराज दरवाजे उघडले तो येऊन पोचले. येताच दरवाज्यावरि हवालदार होते, त्याजला कैद करण्याचा इशारा नसल्यामुळे येऊ देऊन आपले बराबरचे कांही तेथे ठेवून, कामदार कैद केले. राजारामसाहेब व सोयराबाईसाहेब आदि कैद करून, आपण बंदोबस्त करून, कामदारांचे दंड-खंड ठरवून, खुलासे जामीन घेऊन केले. याप्रमाणे बंदोबस्त, पुढील कार्य, सर्व संभाजीमहाराजांनी जातीनेच केले. नंतर संभाजीमहाराजांची पत्नी सौ. येसूबाई-साहेब यांसी आणविली. तमाम किल्लोकिल्ल्यात संभाजीमहाराज मालक यांचे हुकमाप्रमाणे करीत जावें. फौजेतही पत्रे रवाना केली.''[१] या बखरीत संभाजी-महाराज शिवाजीमहाराजांच्या निधनानंतर लगेच पन्हाळ्याहून निघोन रायगडावर आल्याचे म्हटले आहे. परंतु प्रत्यक्षात संभाजीराजे दोन महिने पन्हाळ्यालाच होते.[२] याही बखरीत संभाजीमहाराजांना पन्हाळगडाच्या खाली उतरू देऊ नये असेच म्हटलेले आहे.

शिवाजीमहाराजांच्या निधनाची बातमी सोयराबाईने गुप्त ठेवण्याचा प्रयत्न केला होता तरी इतकी महत्त्वाची वार्ता गुप्त कशी राहणार ? कर्णोपकर्णी संभाजी-महाराजांना सर्व बातमी समजली. महाराजांची क्रिया साबाजी भोसले यांजपासून करवून घेतली. जे जासूद रायगडावरून गेले होते त्यांना संभाजीराजांनी विचारले, "आबासाहेब कसे आहेत तें खरें सांगा, नाहीतर पारिपत्य करीन. ते समयीं जासुदांस धीर न निघे. जाहले वर्तमान सविस्तर सांगितले. काही श्रमी होऊन लागलेच किल्लेदार, हवालदार व सबनीस बोलावून आणून त्यांजदेखत पुन्हां जासुदांस विचारले. तेव्हा पुन्हां त्यांनी तसेच सांगितलेवर तत्काळीच त्यांस बेड्या घालून कैद केले.[३]

१. शिदिव, पृष्ठ ४६७–४६८

२. शिपसासं–पत्रे २२४९, २२५३, २२६३, २२६५

३. मराचिव–पृष्ठ

महाराजांच्या निधनाची बातमी समजताच संभाजी राजांनी पन्हाळगडावर श्राद्धविधी उरकले. सोयराबाई आणि प्रधान मंडळातील काही जणांनी जरी राजारामाला गादीवर बसविले असले तरी सैन्य व प्रजा संभाजी महाराजांच्या बाजूची होती. दि. १९–४–१६८० च्या सुमारास संभाजी राजे पन्हाळ्याला असताना असंख्य सैन्य त्यांना जाऊन मिळत होते. संभाजी महाराजांनी आपला हक्क प्रस्थापित करण्यासाठी योग्य ती पावले टाकली. राजापुरास माणसे पाठवून तेथे असलेले सर्व धान्य अडकवून किल्ल्यावर पाठविण्याचे हुकूम दिले. रावजी पंडिताला पाठवून कारवारच्या बाजूच्या सुभेदारांना हिशेब देण्यासाठी बोलाविले.[१] दि. २७ एप्रिल १६८० च्या सुमारास संभाजी राजांनी कारभार आपल्या हाती घेऊन राजपदही घेतले. आणि सुभेदार, हवालदार इत्यादी सर्व अधिकारी लोकांना आपल्याकडे बोलावून घेतले.

या कौटुंबिक कलहाची बातमी मराठी राज्याभोवती असलेल्या सत्ताधीशांना कळू नये म्हणून संभाजी महाराजांनी जरूर ती दक्षता घेतलेली दिसते. त्यांनी दि. ५ मे १६८० रोजी गोव्याचा व्हॉइसरॉय ( याला पोर्तुगेज भाषेत विजरई असे म्हणतात ) अंतोनिओ पाइस द सांदे याला आपला वकील रामाजी नाईक ठाकूर याच्याबरोबर सलोख्याचे पत्र पाठविले. या पत्रात संभाजी राजांनी आपल्या वडिलांच्या दुःखद निधनाची बातमी देऊन आपण सत्ताधारी झाल्याचे कळविले होते.[२] त्याचप्रमाणे त्यांनी दि. ७ मे १६८० रोजी मुरगोडचा देसाई याला शिवाजीमहाराजांनी जी खंडणी ठरविली असेल तेवढीच घेईन असे त्याच्या पत्राला उत्तर देऊन अभय दिले होते.[३]

संभाजीमहाराजांना पकडण्यासाठी रायगडला झालेल्या कटाचा सुगावा त्यांना लागला होता. अण्णाजी दत्तो आणि मोरोपंत यांनी ज्या जासुदांबरोबर पन्हाळ्याच्या अधिकाऱ्यांना पत्रे देण्यासाठी पाठविलेले होते त्यांनाच बहुधा दि. २७–४–१६८० च्या सुमारास कैद केले असावे. दि. २७–४–१६८० रोजी राजापूरकर इंग्रज सुरतेला कळवितात, “ कित्येकांना त्याने कैद केले व कित्येकांना कामावरून दूर केले.[४] रायगडावरील कटात पन्हाळ्यावरील जे अधिकारी सामील झाले त्यांपैकी बहुधा काहीजणांना कैद करून काहींना कामावरून दूर केलेले असावे. या पत्रात संभाजीने रागाच्या भरात कोणाला मारल्याचा उल्लेख नाही हे ध्यानात ठेवले पाहिजे. परंतु म. रा. चिटणीस बखरीत सोमाजी नाईक आणि त्याचा

१. शिपसासं–लेख २२४९, २२५०
२. पोम. Pm--PP, p २, ३, ४
३. शिचसा–खंड १२, लेख ८७, पृष्ठ ५४
४. ERS, No 503, p. 311

मुलगा, बापूजी भाऊराव, सूर्याजी काळे यांना मारल्याचा उल्लेख आहे.[१] काहींना जरी कैद केले असले तरी एकंदर सर्वत्र शांतता असून संभाजीमहाराज पन्हाळ्यास काही दिवस राहिले.[२]

महाराजांच्या निधनानंतर जी कट-कारस्थाने झाली त्यामुळे राजाराम, सोयराबाई, काही मंत्री, असे दोन गट स्पष्ट झाले. यात खरी बाजू कोणाची? राजारामाला गादीवर बसविण्यात सोयराबाईचा काही स्वार्थ होता का असा विचार करू लागले तर काय दिसते? राजाराम केवळ दहा वर्षांचाच असल्याने मंत्र्यांच्या हातात सर्व कारभार गेला असता. त्याच्या आईला साहजिकच राजमाता म्हणून काही ना काही तरी महत्त्व आले असते. यामुळे राजारामाला गादी मिळवून देण्यात तिचा हात असणे मनुष्यस्वभावाला धरून आहे. सोयराबाईने स्वतः पुढाकार घेऊन मंत्र्यांना हाताशी धरले असेल, का अण्णाजी दत्तो प्रभृति मंत्र्यांनी तिला या कटात ओढली असेल; यातले नेमके काय झाले असेल? प्रधान मंडळींनी सोयराबाईला हाताशी धरून राजारामाला गादी देण्यामागे मंत्र्यांनाही एक कारण होते. वर्षा दीड वर्षापूर्वीच संभाजी शत्रुपक्षाला—दिलेरखानाला—जाऊन मिळालेला होता. युवराज म्हणून संभाजीचा वारसा—हक्क मान्य केला तरी त्याच्या या कृत्याने त्याची बाजू निःसंशय लंगडी झालेली होती. एकेकाळी शत्रूला—मुघलांना—जाऊन मिळालेल्या मुलाला गादीवर बसवावे काय, असा प्रश्न मोरोपंत प्रधान आणि अण्णाजी दत्तो यांच्यापुढे उभा राहिला असणे अगदी साहजिकच होते. संभाजीच्या चुकीच्या वर्तणुकीमुळे त्याची बुद्धी फटकळ आहे, तो अल्पबुद्धी आहे असे उद्‌गार सभासदाने महाराजांच्या तोंडी घातले आहेत. या वाक्यांच्या रूपाने सभासद आपली भीतीच व्यक्त करीत असावा असे वाटते. संभाजीच्या या दुष्कृत्याने शिवाजीराजांना किती भयंकर यातना झाल्या असतील हे सांगण्याचीही जरूरी नाही.

प्रथम राजारामाचे मंचकारोहण करून महाराजांची मर्जी प्रसन्न करून नंतर त्यांना राज्याभिषेक करावा हा चिटणीसांच्या बखरीत दिलेला विचार सयुक्तिक होता यात काही शंका नाही. पित्याचे निधनप्रसंगी रायगडावर न बोलावल्यामुळे आणि नुकताच मुघलांकडून परत आलेला असल्याने संभाजीची मनःस्थिती चांगली नसणे साहजिकच होते. त्यामुळे काही काळापुरते राजारामाला मंचकारोहण करून त्यानंतर संभाजीचा राज्याभिषेक करण्याचे धोरण आणि मनोदय योग्य वाटतो. परंतु संभाजीला पकडून कैद करण्याच्या योजनेचा कट सर्वस्वी अयोग्य होता असेच वाटते. या कटाचा सुगावा लागल्यावर संभाजी राजे

१. मराचिव–पृष्ठ ५

२. शिचसासं–२२५१, २२५३



छत्रपती संभाजी आणि शाहू (मांडीवर घेतलेले)

रागावले असले तर त्यांना दोष देणेही तितकेच अयोग्य होय. त्याने केलेली धरपकड रागाच्या भरात केली हे म्हणणेही उचित वाटत नाही. हा आरोपही फोल ठरतो. ज्या घटना घडल्या त्यात संभाजीने आपला हक्क प्रस्थापित करावयाच्या प्रयत्नाबद्दल त्याला दूषणे देणे बरोबर नाही. राज्यावर यावयाचा आपला अधिकार प्रस्थापित करण्यासाठी त्याने काही अयोग्य पावले उचलली का हे पाहिले तर त्यासाठी संभाजीने योग्य रीतीने हालचाल केली असेच दिसते. सैन्यात संभाजी राजे लोकप्रिय होते. सारी प्रजाही त्यांच्या बाजूची होती. त्यांच्या वारसाहक्काच्या आड येणाऱ्या आणि त्यांना कैद करण्याचे कारस्थान करणाऱ्या मंडळींना संभाजीराजांनी अटकेत टाकले. या व अशा प्रकारच्या परिस्थितीत कोणताही शासनकर्ता जे करील तेच संभाजीने केले असेच म्हणावेसे वाटते.

**संभाजीमहाराजांचे सलोख्याचे धोरण :**

कटाचा पूर्णपणाने बंदोबस्त केल्यानंतर संभाजी महाराजांचे राजपद निर्वेध झाले. अटकेत टाकलेल्या माणसांच्या जागी त्यांनी नवीन नेमणुका केल्या. जून १६८० च्या सुरुवातीला त्यांना महाराजांचा सर्वाधिकार प्राप्त झाला. यावेळी अनेकांनी पन्हाळ्याला संभाजीराजांचे अभिनंदन केले.[1] पन्हाळ्याला त्यांनी १००० स्वार सज्ज ठेवले होते. त्यांना दोन महिन्यांचा अगाऊ पगार दिला होता. नवीन सुभेदारांनी संभाजी राजांच्या हुकुमावाचून बक्षीस मिळणार नाही असे राजापूरच्या इंग्रजांना बजाविले होते. इंग्रजांनी महाराजांकडे अर्ज केला होता, त्याला उत्तर देताना ते म्हणतात, "तूर्त मला सवड नाही. सवड होताच हिशेब पाहून निकाल करू." राजापूर शहरात स्वार आणि शिपायांची गर्दी झाली होती. आपल्या नव्या राजाला भेटण्याच्या उत्साहाने ते संभाजीकडे जात होते. त्यामुळे राजापूरच्या इंग्रजांना आता संरक्षणासाठी नोकर ठेवावे की काय असा विचार पडला होता.[2]

संभाजी महाराजांनी आपला सासरा पिलाजी शिर्के यांना पंधरा हजार मावळे जमा करून, सर्व किल्ल्यांचे खबरदारीस नेमून, चौक्या उठवून त्यांच्या लोकांच्या मदतीने किल्ल्यांचा बंदोबस्त केला. कवी कलशाने महाराजांनी रायगडला जाऊन राज्याभिषेक करावा असा यावेळी सल्ला दिला.[3] सर्व ठिकाणांची व्यवस्था झाल्यावर संभाजी राजांनी रायगडला जावयाचे ठरविले. संभाजी महाराजांनी म्हलोजी घोरपडे यांसी स (रंजामी) देऊन मुखत्यारी सांगोन सरनोबतीची वस्त्रे

१. पका--३९--४०

२. शिपसासं–क्र. २२६१, २२६३

३. पका–पृष्ठ ४०

दिली आणि किले पन्हाळ्यास ठेवून आपण रायगडास गेले.[१] रायगडला जाताना त्यांची मनःस्थिती तितकीशी समाधानकारक नव्हती. काही दिवसांपूर्वी झगडा करावा लागला तसा कदाचित रायगडावरही झगडा करावा लागेल की काय असे त्यांना वाटणे साहजिकच होते. या परिस्थितीत ते संतप्त झाले तसे ते धर्मप्रवणही झाले होते. संत, साधू, महंतांचा आपल्याला आशीर्वाद असावा; त्या योगाने मनाला धीर आला तर पाहावे असे त्यांना वाटले असेल तर त्यात आश्चर्य कसले ? पन्हाळा सोडून रायगडाच्या वाटेवर असताना त्यांनी साधुसंतांचे दर्शन घेतले. काही व्रतस्थ मंडळींच्या भेटी घेतल्या. मौजे कोरटी येथे मल्हार गोसावी, सदाव्रती गोसावी यांना भेटून त्यांनी त्यांच्याशी संभाषण केले. ते प्रामाणिक ईश्वरभक्त आहेत अशी त्यांची खात्री झाली. त्यांच्याकडे असलेला नाडोली तर्फ मारुल प्रांत कऱ्हाड हा गाव त्यांच्या धार्मिक उत्पन्नासाठी (आग्रहार) चालवावा असे महाराजांनी ठरविले. हा गाव प्रारंभी धार्मिक उत्पन्नासाठी दिलेला असला तरी काही कारणांमुळे शिवाजी राजांनी काही दिवस तो अमान्य केला होता. संभाजी राजांनी दि. ३–६–१६८० रोजी कऱ्हाडचा देशाधिकारी भानजी गोपाळ यांस आज्ञापत्र देऊन हा गाव पुन्हा स्वामींसाठी चालवून कुल गोसावी यांसी दुमाला करण्यास सांगितले. ते गावी तुम्ही काही घ्यावयाची गरज नाही असे त्याला बजावले.[२]

कऱ्हाड सोडल्यावर वाटेत संभाजी महाराज प्रतापगडला थांबले. त्यांनी तेथे तुळजा भवानीची पूजा केली; प्रतापगडावरून रायगडाचे दर्शन घेतले आणि दुसऱ्या दिवशी ते रायगडावर जाण्यास निघाले.[३] आषाढ शुद्ध २, शुक्रवारी म्हणजे दि. १८ जून १६८० रोजी संभाजी राजे रायगडास पोचले, आणि सारा बंदोबस्त करून राज्य करू लागले. त्यांच्या दिमतीस त्यावेळी २०००० सैन्य होते.[४] शृंगारपूरला जाण्यापूर्वी १६७७ सालच्या ऑक्टोबर महिन्यात रायगड सोडल्यापासून जवळजवळ तीन वर्षांनी संभाजी राजे रायगडला आलेले होते. या तीन वर्षांच्या काळात अनेक विचित्र घटना घडल्या होत्या. परंतु आता राजे म्हणून ते रायगडावर आले होते. सह्याद्रीच्या कडेकपारीत, रानावनात स्वैरपणाने हिंडणारा रायगडचा सिंह काळाने नेला असला तरी १८ जूनला हा त्या सिंहाचा छावा रायगडावर स्थानापन्न झाला होता.

१. वार्षिक इतिवृत्त, भाइसंमं, शके १८३६, पृष्ठ ६०

२. सनदापत्रे–पृष्ठ १३५

३. पका–पृष्ठ ३९

४. शिचप्र, पृष्ठ ३०; शिपसासं, क्र. २२६५

रायगडला संभाजी महाराजांनी राजारामाला नजर कैदेत ठेवले.[१] याचा हेतू पुन्हा त्याला हाताशी धरून मंत्र्यांनी कारस्थाने करू नये हा होता. "सोयराबाईसाहेब यांजपाशी जाऊन बाईसाहेब कोठे आहेत म्हणून बहुत क्रोधे करून विचारले. ते समयी जवळील बायका सर्व भये करून निघाल्या. तुम्ही राज्यलोभास्तव महाराजांस विषप्रयोग करून मारिले, असा आरोप शब्द बोलून, कोनाडा भिंतीस करून, त्यात सोयराबाईसाहेबास चिणोन, दूध मात्र घालीत जावे (असे) सांगून 'आता पुत्रास घेऊन राज्य करावे!' असे बोलिले. त्यानंतर तीन दिवस ती तशीच होती. तिसरे दिवशी प्राण गेला. हे कळल्यावर दहन केले. क्रिया करविली. ऐसेपरि उग्रपणे मातबर सरदार दोनशेपर्यंत माणूस शासन करून उग्र दंड केला."[२]

दि. २३–१०–१६८० च्या डाग रजिस्टरमध्ये म्हटले आहे, "गोवळकोंड्याहून असे लिहून आले आहे की, शिवाजी राजाला त्याच्या दुसऱ्या बायकोकडून विषप्रयोग झाला असावा (?). त्याचा कनिष्ठ पुत्र गादीवर बसावयाचे घाटत होते. त्याला तुरुंगवास प्राप्त झाला आहे. आता शिवाजीचा ज्येष्ठ पुत्र राज्य करीत आहे. त्याला थोड्या अडचणी आल्या असे नाही. त्यामुळे त्याने सेनापती रघुनाथ पंडितास कर्नाटकात संपूर्ण कारभार दिला. लहानसहान अंमलदारांच्या त्याने बदल्याही केल्या. शत्रूपासून आपल्या राज्याचे रक्षण करण्याच्या इराद्याने संभाजीने ८००० जादा स्वार नोकरीस ठेविले आहेत."[३] कारण मुघलांचे व विजापूरचे सैन्य घाटातून स्वारी करील अशी वदंता होती.[४]

चिटणीस, शिवदिग्विजय बखरीत आणि डाग रजिस्टरमध्ये सोयराबाईने शिवाजीमहाराजांवर विषप्रयोग केल्याचा आरोप आहे. परंतु इंग्रजांच्या बातमीप्रमाणे तो रक्तातिसाराने मरण पावल्याचे नमूद केले आहे.[५] सोयराबाईला भिंतीत चिणून मारली हा आरोपही बरोबर वाटत नाही. कारण ती पुढे वर्ष सव्वा वर्षाने विषप्रयोगाने किंवा विषप्राशनाने मेली असे मुंबईकर आपल्या दि. २७–१०–१६८१ च्या पत्रात नमूद करतात.[६]

---

१. शिचप्र, पृष्ठ ३०; मराचिब–पृष्ठ ५

२. मराचिब–पृष्ठ ५

३. शिपसासं–क्र. २२८६

४. डाग रजिस्टर–अप्र, २।३–९–१६८०, पृष्ठ ५७९

५. शिपसासं–क्र. २२५३

६. Bom to Sur, २७–१०–१६८१; O. M. 116, Ser; Orme Vol 116--117, p. 290--292; Bom Vol 9 (1681), p. 96--97.

संभाजी राजांनी रायगडला गेल्यावर राजारामाला वस्त्रेभूषणे देऊन त्याचा सत्कार केल्याचे; सोयराबाई, पुतळाबाई या मातांशी गोड बोलून त्यांना ममतेने वागविल्याचे परमानंद काव्यात म्हटले आहे.[१] राजारामाला नजरकैदेत ठेवले असले तरी संभाजी महाराजांनी त्याला दयेने वागविले होते. त्याचप्रमाणे थोड्याशा जमिनीचा कारभार मिळाला असून तो तेवढ्यावर संतुष्ट आहे.[२] संभाजी राजे रायगडला येऊन आठ दिवस झाले नाहीत तोच दि.२७–६–१६८० या दिवशी त्यांची सावत्र आई पुतळाबाई (शिवाजीमहाराजांची चौथी पत्नी) सती गेली. महाराजांच्या मृत्यूनंतर दोन महिन्यांनी ती सती जाण्याचे कारण समजत नाही. उपरांतिक राजांनी पुनः मागती विधिपुरस्सर क्रिया केली. धर्म बहुत केला.[३]

रायगडावरील परिस्थिती आटोक्यात आल्यावर आणि राज्यात स्थिरता झाल्यावर संभाजी महाराजांनी स्वतः राजा झाल्याचे जाहीर केले. एकंदर त्यांच्याविषयी रागीट किंवा क्रूर असा बोलबाला झाल्याचे दिसत नाही. उलट ते फार मेहनती आणि सावध आहेत असेच लोक बोलत होते.[४]

संभाजी महाराज समजूतदार असून आपल्या कंपनीला त्यांच्यापासून त्रास पोचणार नाही असे डच वखारवाल्यांनी म्हटलेले आहे.[५]

संभाजीमहाराजांनी श्रावण शुद्ध पंचमी, शके १६०२ म्हणजेच दि. २० जुलै १६८० या दिवशी स्वतःचा मंचकारोहण समारंभ केला.[६]

शिवाजीमहाराजांच्या मृत्यूनंतर राज्यपद मिळण्यात संभाजीराजांना अनेक विघ्ने आली होती. राज्यपद मिळावे म्हणून त्यांनी एक नवस केला होता. हा नवस त्यांनी १६८० सालाच्या ऑगस्ट महिन्यात फेडला. या संबंधाची माहिती त्यांनी त्यावेळी केलेल्या दानपत्रात मिळते.[७]

राज्यसूत्रे हातात आल्यावर लगेच संभाजीमहाराजांचा राज्याभिषेक होऊ शकला नाही. अष्ट प्रधानांची नेमणूकही झालेली नव्हती. अशा परिस्थितीत त्यांनी १६८० सालच्या मे महिन्यापासून स्वतःच्या अधिकारात पत्रव्यवहार सुरू केलेला होता. उपलब्ध असलेल्या मराठी कागदपत्रांवरून जुलै १६८१ पर्यंत संभाजीमहाराजांनी आपल्या अधिकारात, निरनिराळ्या क्षेत्रांत अनेक पत्रे

१. पका–पृष्ठ ४२
१. शिपसासं--लेख २२६५, २२७५
३. शिचप्र, पृष्ठ ५३; मसाछोव, पृष्ठ ५२-५८
४. शिपसासं--क्र. २२६५
५. डाग रजिस्टर अप्र दि. २।३–९--१६८०, पृष्ठ ५७९
६. शिचप्र, पृष्ठ ३०; मराचिव, पृष्ठ ५
७. हे ‘ धार्मिक धोरण ’ या प्रकरणात दिले आहे.

लिहिलेली दिसतात. धार्मिक बाबतीत सासंधुत, मठाधिपतींना पूर्वीप्रमाणेच मोईनी चालू ठेवल्या. स्वराज्यात वेळगावकडील देसाई सुद्धा मे महिन्यापासून संभाजीमहाराजांशी पत्रव्यवहार करतात. आपल्या मागण्या कळवितात. त्यांचा विचार करून संभाजीराजेही त्यांना अभयपत्रे देतात. या सर्व पत्रव्यवहारावरून शिवाजीमहाराजांच्या निधनानंतर राज्यात कोठल्याही प्रकारचा गोंधळ निर्माण झालेला होता असे दिसत नाही.

मुरगोडच्या रुद्रप्पाने राजांकडे तक्रारी केल्या होत्या. तो मुरगूड परगण्याची (मुरगूड वेळगाव जिल्ह्यातील बैलहोंगलच्या ईशान्येला ७ मैलांवर आहे.) खंडणी वसूल करून कटोरगडचा तनखा आणि इमारती यांसाठी देत असताना विठ्ठल हरी हा मराठी अधिकारी त्या बाजूस जाऊन पैशाबद्दल किरकोळ वराता करू लागल्यामुळे कटोरगडास पैसे पाठविण्यात व्यत्यय येतो अशी त्याची तक्रार होती. यावर संभाजीने कटोरगडास तनखा आणि इमारती यांसाठी आज्ञेप्रमाणे पैसा द्यावा असे कळविले. बेटगिरीचा सुभेदार बाबाजी रखमांगद याने दोन गाव व गुरेढोरे मारून पेवातील धान्यही नेले, त्यामुळे रयतेला दहशत बसली आहे अशी रुद्रप्पाची दुसरी तक्रार होती. बाबाजी रखमांगदाने जे काही नेले असेल ते सर्व तो सोडून देईल, तुम्ही रयतेला धीर द्यावा असे संभाजीने उत्तर पाठविले. रुद्रप्पाची तिसरी तक्रार अशी होती की, संतेगिरेकरांनी गाव मारून गुरेढोरे आणि शेळया पळवून नेल्या असता सुभेदार नारो अंबाजी हा त्याची पाठ राखतो. त्यावर संभाजीमहाराजांनी त्याला कळविले कीं नारो अंबाजीस ताकीद केली असून तो संतेगिरेकरांना योग्य ते करावयास लावील. दि. २८-८-१६८० रोजी रुद्रप्पाच्या सर्व तक्रारींचे निरसन करून संभाजीमहाराजांनी पत्रात लिहिले की स्वामींची त्याच्यावर कृपा आहे. एकनिष्ठतेने वागावे.[1]

प्रधान मंडळींना फार काळ अटकेत ठेवणे योग्य नव्हते. मोरोपंत, अण्णाजी यांना कैदेतून मुक्त करण्याविषयी हरजी महाडिक, गणोजी शिर्के, अमळोजीराजे महाडिक, तुकोजी पालकर, मेहुणा महादजी निंबाळकर, जोत्याजी केसकर आणि त्रिंबक बाजी देशपांडे इत्यादी सरदारांनी विनंती केली. ते म्हणाले की, "साहेब सिंहासनाधीश होणार आणि प्रधान यांचे घरी चौक्या हे विहित नाही." यावरून चौक्या उठविल्या. बाळाजी आवजी प्रभू चिटणीस यांनी आपले काम करावे असे सांगून कृपा केली. प्रधान यांचे व अमात्यांचे गुमास्ते वगैरे यांणी काम तूर्त करावे अशी आज्ञा जाहली, आणि सेवा करू लागले![2]

१. शिचसा, खंड १२, लेख ८९, पृष्ठ ५५--५६

२. मराचिब, पृष्ठ ८

शंभूमहाराज अंत:पुरातील स्त्रियांच्या मनात भरले आणि त्यांना अधिक मान चढला.

रेशमी वस्त्रे धारण केलेला, अत्यंत तेजस्वी, केशरी गंध लावलेला, चंदनाची उटी व फुलांच्या माळा धारण केलेला, जरीपटका बांधलेला, चिलखत ढाल, तलवार, धनुष्य ही आयुधे धारण केलेला, सोन्याच्या कंबरपट्ट्याने ज्याने कंबर बांधली आहे, शेला पांघरलेला, वर छत्र धरलेला, बाजूला चवऱ्या ढाळल्या जात असलेला, असा शंभूमहाराज अधिकारानुसार आपापल्या स्थानांवर बसलेल्या आणि हात जोडलेल्या सरदारांकडून स्तुती केला गेला, पाहिला गेला.[१]

अस्सल कागदपत्रात राज्याभिषेकाचे वर्णन आढळत नसल्याने बखर आणि काव्य यातील मजकुरावरून ह्या सोहळ्याची, काव्यात येणारी अतिशयोक्ती वजा करून, कल्पना येऊ शकेल असे वाटते.

संभाजीराजांचे अष्टप्रधान कोण कोण होते याची विस्तृत माहिती ' राज्य कारभार ' या प्रकरणात दिलेली आहे.

**दुसरा कट :**

राज्याभिषेक झाल्यानंतर संभाजीमहाराजांना काही महिने स्वस्थता मिळाली. १६८१ सालच्या मे महिन्यात औरंगजेबाचा चवथा मुलगा सुलतान अकबर आपल्या बापाविरुद्ध बंड करून मराठ्यांच्या आश्रयाला आला होता. अण्णाजी दत्तो आणि इतर अधिकारी कैदेतून सुटलेले होते. अकबराच्या आगमनाचा फायदा घेऊन या मंडळींनी संभाजीराजांविरुद्ध कारस्थाने सुरू केली. अकबराच्या साहाय्याने राजारामाला गादीवर बसविण्याचे कारस्थान अण्णाजी दत्तो वगैरे मंडळींनी रचले. संभाजीमहाराज आणि अकबर यांची गाठ पडण्यापूर्वीच अण्णाजी दत्तो वगैरे मंडळी त्याला भेटली. या दुसऱ्या कटाची माहिती पंतप्रतिनिधींची बखर, इटालियन प्रवासी मानुत्‌ची, रॉबर्ट ऑर्मे व इंग्रजांच्या पत्रात मिळते. या कटाचे दोन भाग होते. एक राजारामाला गादीवर बसविण्याचा आणि दुसरा संभाजीचा काटा काढण्याचा.

" इतक्यात अनाजी दत्तो यांच्या पक्षपाती लोकांनी त्या महंमदासी (अकबर) राजाराम याचे हिताविषयी संभाजीस घाताची मसलत केली, हे वर्तमान संभाजीस महंमदाने कळविले. त्याचे भेटीस संभाजी गेला. मग त्याने अनाजी दत्तो व शिर्के कुलातील जे मुख्य षह सापडले ते, परभू बाळाजी आवजी पुत्रासहित हत्तीचे पायी दिले. "[२] या पंतप्रतिनिधीच्या बखरीत संभाजीच्या घाताचा उल्लेख आहे.

---

१. पका, पृष्ठ ४२–४४, श्लोक ८ ते ३९

२. पंप्रब-भाव, पृष्ठ २७

अकबर पालीस असताना अण्णाजी दत्तोचे पक्षपाती लोक अकबराला भेटले. कटातील पहिल्या म्हणजे राजारामाला गादीवर आणण्याच्या भागाविषयी रॉबर्ट ऑर्म लिहितो, "कटातील मंडळी संभाजी आणि अकबर यांची भेट होण्यापूर्वीच अकबराला भेटली. संभाजीमहाराजांना मारण्याच्या कटात अकबर सहकार्य देण्यास तयार असेल तर ही मंडळी राज्याचा मोठा हिस्सा त्याला देऊन, राजारामाला लहान भाग ठेवण्यास तयार झाली होती."[१] या माहिती-वरून कटवाल्यांनी कोणती मजल गाठलेली होती हे ध्यानात येते. ते संभाजीला ठार करण्याच्या मोबदल्यात स्वराज्याच्या मोठ्या भागावर पाणी सोडण्यास तयार झालेले होते.

यापेक्षा थोडी अधिक माहिती मानुत्चीने दिली आहे. "याच सुमारास संभाजीचे सरकारकून व संभाजी यांचे भांडण झाले होते. त्यांनी आपल्या राजा-विरुद्ध राजद्रोहाचे पत्र लिहिले व त्यात त्यांनी शहाजादा अकबराला कळविले की आम्ही तुम्हाला मिळतो. अकबर या संधीचा फायदा घेण्यास उद्युक्त झाला. तो सर्व गोष्टी दुर्गादासाच्या संमतीने करीत असल्याने त्याने त्याचा सल्ला घेतला. दुर्गादासाने सांगितले की हे पत्र कदाचित् संभाजीनेच तू अशा बंडाला सहाय्यक होशील की संभाजीने केलेल्या उपकाराचे स्मरण ठेवून त्याच्या बाजूने झटशील हे अजमावण्याच्या दृष्टीने लिहविले असावे. तरी ते पत्र तू संभाजीच्या हवाली करून आपले इमान आणि कृतज्ञता त्याला दाखविणे चांगले. संभाजीला हे पत्र मिळाले. तो पत्रलेख अस्सल आणि राजद्रोही असल्यामुळे त्याने ताबडतोब संबंधित सरकारकुनांना ठार मारण्याचा हुकूम पाठविला. अकबराने दाखविलेल्या मित्रत्वाबद्दल त्याचे आभार मानले. संभाजीने यापुढे त्याच्यावर अधिक लोभ ठेवून त्याच्या राजकारणात त्याला साहाय्य करण्याचे आश्वासन दिले.[२]

दुर्गादासाच्या सल्ल्याप्रमाणे अकबराने संभाजीला या कटाची माहिती पुरविलेली दिसते. या कटाची माहिती मुंबईकर इंग्रजांनी आपल्या पत्रात दिलेली आहे. 'संभाजीमहाराज मोठ्या प्राणघातक संकटात सापडले होते. त्यांच्या जेवणातील मांसान्नात घातलेल्या विषाने ते मरायचे, परंतु त्यांच्या अल्पवयी नोकराने त्यांना ते खाऊ दिले नाही. त्यातील थोडा भाग नोकरांपैकी एकाला आणि कुत्र्याला घातला. दोघेही थोड्याच तासांत मेले.[३]

१. HF-RO, p 105

२. SM-NM, Vol II, pp 257-258

३. FR ; Bom to Sur 30--8--1681, BomVol 9, p 73-6, Orme Vol 116-17, p 278--283; Bom to Sur 8--9--1681, Bom Vol 9, p 77--79; Orme Vol 116--17, p 280--84

संभाजीराजांविरुद्ध कट घाटत असताना राजे पन्हाळ्यास होते.[१] पन्हाळ्याच्या मुक्कामात डच वकील लेफेबेर हा राजांना भेटण्यासाठी तेथे गेला होता. त्याने व्यापारी सवलती आणि तांब्याची नाणी पाडण्याची परवानगी मागितली होती. कॅनरा येथील व्यापार सर्वांना खुला असल्याने चांगला फायदा होईल असे त्यास वाटत होते.[२]

या कटात अण्णाजी दत्तो, बाळाजी आवजी, सोमाजी दत्तो, हिरोजी फर्जन्द, सोयराबाई वगैरे मंडळी होती. संभाजीने कटवाल्यांना पकडून कडक शिक्षा ठोठावल्या. जेधे शकावलीत या कटाचा उल्लेख नसला तरी कटात मारलेल्यांची जी नावे दिलेली आहेत व त्याचा जो काळ दिलेला आहे तो आणि इंग्रजांनी लिहिलेल्या पत्रातील नावे व काळ सारखाच आहे. १६८१ सालाच्या ऑगस्ट महिन्यात संभाजीराजांनी कवी कलशाच्या सांगण्यावरून अण्णाजी दत्तो याजवर इतराजी करून मार दिला. त्या माराने तो मेला. बाळाजी प्रभू, सोमाजी दत्तो व हिरोजी फर्जन्द यांना परळी खाली कैद करून मारले. शामजी नाईक याचा या कटात हात असल्याच्या संशयावरून त्यालाही कर्नाटकात कैद केले.[३] याशिवाय या कटात ज्यांचा हात होता अशा पाच जणांना हत्तीच्या पायाखाली घालून मारले. कटात सापडलेल्या आणखी वीस जणांना ठार मारण्यात आले.[४]

या कटासंबंधी डच वखारवाले मलबारहून दि. २९-९-१६८२ रोजी लिहितात, “अण्णाजी दत्तोने संभाजीचा धाकटा भाऊ राजाराम यास गादीवर बसवून संभाजीला मारण्याचा प्रयत्न केला म्हणून राजांनी त्याला मारले. त्याची मालमत्ता जप्त केली आहे. अण्णाजी मारला गेल्याने डच कंपनीला बरे वाटले. अण्णाजी गोव्याला असताना डचांना त्याच्याविषयी प्रेम नव्हते. संभाजी आणि पोर्तुगेज यांचे सख्य आहे.[५]

मल्हार रामरावाने संभाजी महाराज रायगडावर गेल्यावर लगेच २०० लोक आणि शिवाय बऱ्याच जणांना मारल्याची माहिती दिलेली आहेच. हा आकडा अतिशयोक्तिपूर्ण वाटतो. कटात प्रत्यक्ष असलेली आणि संशयावरून धरलेली २५–३० माणसे मारली असावी असे वाटते.

सोयराबाईचा मृत्यू याच सुमारास विषप्रयोगाने झाला. मुंबईकर इंग्रज दि. २७–१०–१६८१ च्या पत्रात लिहितात, “राजारामाची आई मेली. कोणी

१. शिचसा, खंड ६ लेख १११

२. Letter from Cannara dt 26-9-1681, p 563 (unpub)

३. शिचप्र, पृष्ठ ३०; मराचिव, पृष्ठ ११

४. FR : Bom to Sur, I2-10-1681; Bom to Sur 12-10-1681

५. Letter from Malbar, dt 29-9-1681, p. 1140 (unpub)

म्हणतात की संभाजीच्या सांगण्यावरून तिला विष घालून मारली," येथे विष-प्रयोगामुळे मृत्यू किंवा विषप्राशनाने आत्महत्या या दोनही गोष्टी संभवनीय वाटतात. सोयराबाईने गळ्याला फास लावून घेऊन प्राण दिला असे मराठी साम्राज्याच्या छोट्या बखरीत लिहिलेले आहे.[1]

अशा तऱ्हेने संभाजी महाराजांनी दुसऱ्या कटाचे कारस्थान तडफदारपणाने हाणून पाडले. शिवाजीमहाराजांच्या मरणानंतर संभाजी राजांविरुद्ध तीन कारस्थाने झाली. या तीनही कारस्थानातून ते सुखरूपपणे बाहेर पडले. औरंगजेबाच्या रूपाने स्वराज्यावर येणाऱ्या संकटाची चाहूल असताना अण्णाजी दत्तो, हिरोजी फर्जन्द, बाळाजी आवजी या मंडळींनी अकबराची मदत घेऊन संभाजी राजांना गादीवरून काढण्याचा डाव रचला ही अत्यंत दुर्दैवाची गोष्ट आहे यांत शंका नाही. ही कृत्ये राष्ट्रद्रोही होती. पहिल्या कटानंतर संभाजीने रागाने कोणाला न मारता त्यांना प्रथम कैदेत टाकलेले असले तरी नंतर त्यांना मुक्त करून पूर्वीचेच हुद्दे दिले. दुसरा विषप्रयोगाचा कट उघडकीस आल्यानंतरच कटातील लोकांना देहान्त शासन केले. या कृत्यात संभाजी महाराजांनी क्रौर्य, खुनशीपणा किंवा सूडबुद्धी दाखविली असे वाटत नाही. राजाच्याच जिवावर उठलेल्या व्यक्तीविरुद्ध कोणत्याही शासनाने जे केले असते तेच संभाजी राजांनी केले. त्यात काही चूक होती असे वाटत नाही.

राज्यावर आल्यापासून संभाजी विरुद्ध कट-कारस्थाने चालू होती. संभाजी राजांना या अंतर्गत कारवायांना तोंड देत आपले आसन स्थिर ठेवावे लागत होते. एका कटाची निरवानिरव होते न होते तोच दुसरा कट झाला. १६८१ सालातल्या विषप्रयोगाच्या कटानंतर दोन तीन वर्षे काही भानगड उपस्थित झाली नाही. १६८४ साली ते मुघल, पोर्तुगेज, सिद्दी यांच्याविरुद्ध लढा देण्यात गुंतलेले असताना ऑक्टोबर-नोव्हेंबर महिन्यात संभाजी राजांविरुद्ध पुन्हा काहीतरी कट कारस्थान झाले असावे. दि. २९–१०–१६८४ ला त्यांनी मानाजी मोरे, गंगाधरपंत, वासुदेवपंत, राहुजी सोमनाथ यांना अटक केली.[2] या लोकांना का पकडले असावे ते समजत नाही. एखादे नवे कारस्थान किंवा पहिल्या दोन कटांत ते सामील असल्याचे ध्यानात आले असावे असा संभव वाटतो. संभाजी महाराजांनी काही कारणांच्या अभावी एखादे कृत्य केलेले दिसत नाही. अंतर्गत प्रश्नांना तोंड देत देत, घरगुती प्रश्न व्यवस्थितपणे आणि धैर्याने सोडवून स्वराज्याभोवती आलेल्या संकटांना त्यांनी कसे तोंड दिले ते पुढील प्रकरणात येईलच.

१. मसाछोब–पृष्ठ ५२–५८

२. शिचप्र, पृष्ठ ३३

## ५. संभाजी आणि शहाजादा अकबर

१६५७ साली फक्त चार महिन्यांच्या अंतराने इतिहासात अमर ठरलेल्या दोन कर्तृत्ववान पुरुषांच्या पुत्रांचा जन्म झाला. औरंगजेबाचा मुलगा शहाजादा अकबर याचा जन्म उत्तरेत दि. ११ सप्टेंबर १६५७ ला[१] झाला तर शिवाजी-महाराजांच्या संभाजीचा जन्म दक्षिणेत दि. १४–५–१६५७ ला महाराष्ट्रात पुरंदर येथे झाला. या दोन युवराजांची त्यांच्या जन्मानंतर चोवीस वर्षांनी नियतीने भेट घडवून आणली. दक्षिणोत्तर जन्माला आलेल्या युवराजांच्या युतीने त्यावेळच्या राजकारणाला वेगळीच कलाटणी मिळाली.

अकबर आणि संभाजी यांच्यात इतरही बरेच साम्य आढळते. अकबर औरंगजेबाचा चवथा मुलगा तर संभाजीही शिवाजीचे चवथे अपत्य. संभाजीची आई सईबाई तो दोन वर्षांचा असताना वारली तर अकबराची आई तो दोन महिन्यांचा असतानाच मरण पावली. साहजिकच आईवेगळी असलेली ही दोन्ही मुले आपापल्या वडिलांची लाडकी बनली. संभाजी राजे जन्मास आले त्यावेळी शिवाजी महाराज स्वराज्यस्थापनेच्या पहिल्या टप्प्यात होते, तर त्याच वेळी भावांशी लढून औरंगजेब दिल्लीच्या तख्तावर बसला होता. शूर, कर्तृत्ववान, युद्ध-निपुण आणि राजकारणात निष्णात आणि दक्ष असलेले शिवाजी आणि औरंगजेब हे संभाजी आणि अकबर यांच्या बालपणात एकमेकांविरुद्ध डावपेच टाकीत होते. साहजिकच दोघांनाही राजकारणाचे धडे घ्यावयाची संधी लाभली. गंमत अशी की दोघेही आपल्या वडिलांशी १६७८ साली भांडले, रागावले आणि स्वतंत्र राज्य निर्माण करावयाच्या हेतूने एकमेकांच्या शत्रूंना मिळाले. फरक इतकाच की संभाजीला आपली चूक ध्यानात येऊन शिवाजीच्या मदतीने मुघलांच्या तावडीतून सुटता आले तर रजपुतांना जाऊन मिळाल्यामुळे अकबराचे फार हाल झाले. त्यानंतर अकबर संभाजीकडे आला आणि त्याच्याकडेच अडकून पडला. या दोन राजपुत्रांत वरवर असे साम्य दिसले तरी अकबराच्या मानाने संभाजी चांगला शूर, धाडसी आणि स्वाभिमानी असून तो सुलतान अकबराच्याच पित्याला, औरंगजेबाला फार त्रासदायक ठरला.

१. MA--J S., p 320

अकबर संभाजीकडे आश्रयासाठी आला त्यालाही एक पार्श्वभूमी आहे. औरंगजेबाने, आपल्या इतर मुलांप्रमाणे, अकबरालाही लहानपणापासून राजकारणाचे शिक्षण दिले होते. दि. ९ मे १६६७ ला त्याला प्रथम आठ हजारी मन्सब देऊन छत्री, नगारा इत्यादींचा मान दिला. १६७२ मध्ये राजपुतान्यातील सतनाम्यांचे बंड मोडण्यासाठी त्याला इतर सरदारांबरोबर पाठविले. वयाच्या सतराव्या वर्षी त्याला असदखानाबरोबर काबूलला धाडण्यात आले. १६७६ मध्ये त्याला माळव्याचे सुभेदार नेमले. तेथे त्याचे जमले नाही. किसनसिंग हाडा आणि अकबर यांचे भांडण झाले आणि अखेर त्यात किसनसिंगाचा मृत्यू झाला. १६७८ ते १६७९ पर्यंत तो मुलतानच्या सुभेदारीवर असताना त्याची एकूण पाच ठिकाणी बदली करण्यात आली. या सर्व कामगिऱ्या करीत असताना अकबराने कोणतेही कर्तृत्व करून दाखविले नाही.[1]

१६७८ साली घडलेल्या राजकीय घटनांमुळे औरंगजेब आणि अकबर यांचे संबंध बिघडले. दि. १० डिसेंबर १६७८ रोजी राजा जसवंतसिंगाच्या मृत्यूनंतर औरंगजेबाने जोधपूर खालसा करण्याचा घाट घातला. जसवंतसिंगाच्या राण्या आणि त्याच्या कारभाऱ्यांना ही गोष्ट मान्य नव्हती. त्यामुळे रजपुतांनी औरंगजेबाविरुद्ध बंड केले.[2] या बंडाचा मोड करण्यासाठी बादशहाने शहाआलम, आजमशहा आणि शहाजादा अकबर या तीन मुलांना रवाना केले.[3] दि. ४ मार्च १६८० रोजी अकबराला चितोडची बाजू सांभाळण्यासाठी धाडण्यात आले.[4] या कामगिरीत अकबराला अपयश आल्यामुळे औरंगजेब त्याच्यावर रागावला. त्याला योग्य त्या सूचना दिलेल्या असूनही अकबराने रजपुतांविरुद्ध लढण्यात पाच महिने फुकट घालविले. रजपुतांसमोर आपला निभाव लागत नाही हे ध्यानात येताच हे युद्ध बंद करावे असे अकबराने औरंगजेबाला सुचविले.[5] त्यामुळे औरंगजेबाला राग आला आणि त्याने त्याची कानउघाडणी केली. अकबरालाही आपल्या वडिलांचा राग आला. बापलेकांत ही बोलणी चालू असतानाच अकबराने रजपुतांशी गुप्त रीतीने बोलणी सुरू केली. दुर्गादास राठोड आणि राजा रामसिंग यांच्या सल्ल्यानुसार अकबराने औरंगजेबाविरुद्ध बंड पुकारले.[6]

१. MA–JS., p 72 to 99.

२. Ibid, p 104, 105,

३. Ibid, p 115

४. Ibid, p 117

५. Ibid, p 122; CHI.

६. HOS- JS, p 71

सिसोदिया आणि राठोड यांच्या मदतीने दि. ११ जानेवारी १६८१ रोजी स्वतः बादशहा झाल्याचे जाहीर करून आपल्या नावाची नाणीही पाडली.[१] या घटनेची बातमी कळताच औरंगजेबाने अकबराच्या बायकोला आणि त्याच्या साथीदारांना दिल्लीस पाठविले. झेबुन्निसा ही अकबराची बहीण आपल्या भावाला सामील झाल्याने औरंगजेबाने तिलाही सेलीम गडावर तुरुंगात टाकले आणि तिची सर्व मालमत्ता जप्त करण्यात आली.[२]

याच झेबुन्निसा आणि संभाजी यांच्या प्रेमाच्या संबंधांविषयी बखरीत अतिशयोक्त वर्णने लिहिलेली आहेत. संभाजी पकडला गेल्यानंतर झेबुन्निसाने त्याचा जीव वाचविण्यासाठी प्रयत्न केले असेही त्यात लिहिले आहे. परंतु ती १६८१ पासून उत्तरेत तुरुंगातच होती आणि ती कैदेतच मरण पावली.[३] ती दक्षिणेत कधी आलीच नाही.

औरंगजेबाने अकबराला पत्र पाठवून त्याचे मन वळविण्याचा प्रयत्न केला.[४] परंतु त्याने राठोड आणि सिसोदे यांच्या मदतीने आपल्या पित्याविरुद्ध युद्ध पुकारले. त्यांच्या युद्धाचा तळ अजमेर येथे होता. औरंगजेबाजवळ पुरेसे सैन्य नसल्यामुळे त्यावेळी तो पेचात सापडलेला होता. तरीही त्याच्यावर हल्ला करावयाची संधी घालवून अकबर स्वस्थ बसला. औरंगजेबाचे राजकारणातील हुकमी शस्त्र कपटनीती. त्याचा उपयोग करून त्याने रजपूत सरदारांना अकबरापासून फोडले. रजपूत सोडून जाताच अकबराने अजमेरच्या तळावरून पळ काढला. त्यानंतर अकबराला रानोमाळ भटकण्याची वेळ आली.[५]

**दक्षिणेच्या वाटेवर :**

रजपुतांचे साहाय्य नाहीसे होताच अकबर भांबावला. काय करावे हे त्याला सुचेना. प्रथम मारवाडला जाऊन तेथून इराणला जावयाचा अकबराचा विचार होता. अकबराची पळापळ पाहून औरंगजेबाने शहाजादा मुअज्जम, सर्व प्रांतांचे सुभेदार, किल्लेदार आणि जमीनदारांना अकबराच्या वाटा अडविण्याचे हुकूम दिले. अकबराची यावेळी कशी त्रेधा उडाली होती याविषयी तो दि. ११ मे १६८१ ला संभाजीला पाठविलेल्या पत्रात म्हणतो, "...आणि औरंगजेबाबरोबर युद्धाचा प्रसंगच आला नाही. त्यामुळे माझ्या कुटुंबातील काही माणसे घेऊन मी मारवाडात गेलो. दुसऱ्या दिवशी रात्रीच्या वेळी दुर्गादास

१. MA–JS p 126; 275

२. Ibid

३. Ibid ४. MR, Vol XVII No 97, p 47, 48

५. CHI–p 250--255

राठोड आपल्या सैन्यासह मला येऊन मिळाला. मारवाडात दोन तीन वेळा मला भटकण्याचा प्रसंग आला. माझा पाठलाग करावयाच्या कामावर शहाजादा मुअज्जम याची नेमणूक झालेली होती. त्याला माझा पाठलाग करणे जमले नाही म्हणून त्याने आपले सैन्य मारवाडात ठिकठिकाणी विखरून ठाणी उभी केली. त्यामुळे मी राजा जयसिंगाच्या मुलखात गेलो. त्याने मला घोडे आणि इतर जिन्नस दिले आणि त्याच्याच राज्यात राहावे अशी विनंती केली. परंतु त्याचा मुलुख राजधानीजवळ (मुघलांच्या) असल्यामुळे मला तेथे राहणे इष्ट वाटले नाही. "[1]

अशा प्रकारे सर्व मार्ग बंद झाल्यानंतर कोठेच सुरक्षितता वाटेनाशी झाल्यावर अकबराने संभाजीच्या आश्रयास जावयाचे ठरविले. अकबर आणि दुर्गादास राठोड यांनी दि. ९ मे १६८१ ला महेश्वर येथे नर्मदा नदी ओलांडली. त्यानंतर दोनच दिवसांनी अकबराने पूर्वी दिलेले पत्र संभाजीमहाराजांस लिहिले. त्यात तो पुढे लिहितो की; "...यामुळे तेथे (जयसिंगाच्या मुलखात) राहाणे मला इष्ट वाटले नाही. तुमचे शौर्य आणि मर्दुमकी लक्षात घेऊन इकडे निघून येण्याचा मी निर्णय घेतला...परमेश्वर कृपेने जमादिलावल महिन्याच्या पहिल्या दिवशी (दि. ९ मे १६८१) मी महेश्वर येथे नर्मदा नदी सुखरूपपणे पार केली. दुर्गादास राठोड माझ्याबरोबर आहे. माझ्याबद्दल तुम्ही निःशंक राहावे. परमेश्वर-कृपेने मला राज्य मिळाले तर नाव माझे आणि राज्य तुमचे राहील. आलमगीर हा तुमचा आणि माझा शत्रू आहे हे लक्षात घ्यावे. त्यामुळे आपण दोघांनी मिळून आपले उद्दिष्ट साध्य होईल असे करण्याचा निश्चय करावा. शहाण्या माणसांना विशेष सांगण्याची जरूरी नाही. साधा इषारा पुरे. "[2]

अकबराला मुघलांचा पाठलाग चुकविण्यासाठी कोठे कोठे जावे लागले आणि शेवटी दक्षिणेत संभाजीकडे जाईपर्यंत त्याला कशी धावपळ करावी लागली यासंबंधी खाफीखान, मासिरी आलमगीरी व इंग्रज वखारवाल्यांनी निरनिराळी माहिती दिली आहे. त्या सर्वांपेक्षा स्वतः अकबराने संभाजीला पाठविलेल्या पत्रात जो मार्ग सांगितलेला आहे तो विश्वसनीय वाटतो.

दि. ९ मे १६८१ रोजी लिहिलेले पत्र संभाजी महाराजांना योग्य वेळी मिळाले नसावे किंवा त्यांनी हेतुपूर्वक अकबराला उत्तर पाठविले नसावे. औरंग-जेबासारख्या मातबर शत्रूच्या मुलाकडून अनपेक्षितपणे आलेल्या पत्राचा योग्य तो विचार करून त्यावर निर्णय घेणे ही एक अत्यंत कठीण गोष्ट होती. अकबर मात्र संभाजीच्या आश्रयास यावयास अधीर झालेला होता. पहिल्या पत्राला उत्तर

१. HOS--JS, p 201–203; मोमसं–प, पष्ठ ६२, ६३

१. Ibid किता

येण्याची वाट पाहून अकबराने दि. २० मे १६८१ या दिवशी संभाजीराजांना दुसरे पत्र लिहिले, "हिंदुस्थानातील त्या राजश्रेष्ठाने (संभाजीने) या माझ्या पत्रात लिहिल्याप्रमाणे वागावे म्हणजे जगात (आणि धार्मिक दृष्टीने) त्याचा सुलौकिक होईल. यापूर्वी मी तुम्हाला एक पत्र पाठविले होते. ते बहुतेक मिळाले नसावे. नाहीतर तुम्ही त्याचे उत्तर पाठविले असते. आता मी येऊन पोचेपर्यंत तुम्ही पत्रे पाठविण्यात कसूर करू नये. त्या एकनिष्ठ राजाची (संभाजींची) वार्ता ऐकण्यासाठी मला दीर्घ काळापासून उत्कंठा लागली आहे. अधिक काय लिहिणे? तुम्हाला भेटण्याची आतुरता आहे."[1] या पत्रावरून अकबर संभाजीमहाराजांना भेटावयास किती उत्सुक होता हे स्पष्ट होते. याशिवाय त्याला संभाजीचा आश्रय मिळावयासाठी त्यांची मान्यताही हवी होतीच. मराठ्यांवाचून दुसरीकडे कोठेही त्याला आश्रय मिळण्याची शक्यताही नव्हती.

त्यामुळे संभाजीच्या उत्तराची वाट न पाहताच अकबराने आपला प्रवास चालू ठेवला. मुघलांचा पाठलाग चुकवीत दुर्गादास राठोड अकबराला सुरक्षितपणे त्रिंबक येथे दि. ११ मे नंतर आणि जूनपूर्वी घेऊन आला.[2] संभाजी आणि मराठेच केवळ औरंगजेबाच्या बलाढ्य शक्तीविरुद्ध टिकाव धरू शकतील अशा विश्वासाने दुर्गादास राठोड यानेच कदाचित अकबराला संभाजीकडे आश्रय मागण्यास सुचविले असावे.

अकबराने रजपुतांशी संगनमत करून बंड केल्यावर आता तो मराठ्यांच्या आश्रयास जात आहे हे कळताच औरंगजेबाने त्याला दोन पत्रे लिहिली. या पत्रात आपला मुलगा परत यावा, शत्रूला मिळण्याची त्याने चूक करून घातक मार्ग कसा अवलंबिलेला आहे हे अकबराच्या निदर्शनास आणून द्यावयाचा प्रयत्न केलेला होता. अकबराने वडिलांच्या दोन्ही पत्रांना उत्तर पाठविले. या पत्रात अकबराने औरंगजेब आतापर्यंत सर्वांशी कसा वागला हे स्पष्ट केले आहे. अकबर त्यात लिहितो की, "आपण लिहिले आहे...मुलाच्या हिताची काळजी घेणे आणि त्याचा जो हक्क असेल तो त्याला मिळवून देणे हे पित्याचे कर्तव्य आहे. धन्य परमेश्वराची, पुत्र म्हणून माझी जी कर्तव्ये होती ती बजावण्यात आणि आपली सेवा करण्यात मी कोणत्याही प्रकारे कसूर केलेली नाही. आपण माझ्यावर जी कृपेची आणि मेहेरबानीची वृष्टी केली त्याचे पूर्ण वर्णन तर जाऊ द्या, त्यापैकी काही गोष्टींचे वर्णन करणेही अशक्य आहे."[3]

अकबर दक्षिणेकडे जात आहे हे लक्षात येताच औरंगजेबाने औरंगाबादचा सुभेदार बहादूरखान खानजहान याला आणि इतर अधिकाऱ्यांना त्याची वाट

१ Ibid

२. शिचप्र, पृष्ठ ३१ ३. मोमसं--प, पृष्ठे ५७ ते ६२

अडवून त्याला पकडावयाचे हुकूम सोडले. तोपर्यंत अकबर बागलाणात पोचला होता. बागलाणचा फौजदार आणि मुल्हेरचा किल्लेदार देविसिंग बुंदेला याने अकबराची वाट अडविण्याचा प्रयत्न केला. बागलाणातून अकबर नासिकच्या दिशेने निघून गेल्याचे देविसिंगाकडून समजताच बहाद्दूरखान नासिक येथे पोचला. अकबर त्याच्या अगोदर एक दिवस नासिकहून त्रिंबककडे आणि तेथून कोकणात पळून गेल्याचे तेथे त्याला कळले.[१]

फादर पिएर जोसेफ द ऑर्लीन्स १६८८ सालापूर्वी एक दोन वर्षे गोव्यात आला होता. त्याने १६५८ पासून १६८७ सालापर्यंत शिवाजी आणि संभाजी यांची हकीकत लिहिलेली आहे. संभाजीकडे अकबर आश्रयासाठी गेला त्या संबंधात तो लिहितो, "Sultan Akbar, third son of the great Mogul Aurangzeb, having taken Umbrage at some occurrence at Court, retired suddenly to the territories of Sambhaji with about 400 horsemen. Sambhaji who was quite ready to profit by the quarrels of others, thought this occasion a good one, and in order to make the most of it, received Akbar and treated him with every possible consideration."[२] अकबराचे येणे म्हणजे संभाजीला एक सुवर्ण संधी वाटली असे भीमसेन सक्सेनानेही म्हटलेले आहे.

**अकबराचे मराठी राज्यात आगमन :**

अकबराच्या दोनही पत्रांना संभाजीने उत्तर धाडले नाही. तो आपल्या राज्यात आल्याचे कळताच त्याला आश्रय द्यावयास संभाजी तयार नव्हता. औरंगजेबाचा मुलगा आपल्याकडे आला आहे तेव्हा त्याचा फायदा आपण घ्यावा असे कवी कलशाने संभाजी महाराजांस सांगितले. कविकलशाचा हा सल्ला संभाजीस पसंत नव्हता. ते रागावून त्याला म्हणाले की तुम्हाला योग्य वाटेल ते करा. अकबर प्रत्यक्ष मराठी राज्यात आलेला असल्याने त्याची योग्य ती व्यवस्था करणे संभाजीला भाग पडले असावे.[३]

अकबर मराठी मुलखात शिरताच त्याला आणण्यासाठी संभाजीने काही लोक पाठविले. त्यांनी त्याला नियोजित ठिकाणी नेले. माहोली किल्ल्यास लागून असलेल्या सुधागड (पाली) येथे अकबराच्या राहण्याची व्यवस्था करण्यात आली.[४] कुलाबा जिल्ह्यात रेवदंडाच्या पूर्वेस पालीपासून एका मैलावर धोंडसे हे गाव आहे.

१. मोआम--प पृष्ठ ७८, MA-JS, p 122-127

२. ERS–D' Orleans extracts, p 339-340

३. अजितोदय ४. FR--Bom to Sur, 10-6-1681

धोंडसे गावाच्या दक्षिणेस पादशहापूर असून तेथे त्या वेळच्या खाणाखुणा अद्याप दिसतात. जवळच भोरप ऊर्फ सुधागड हा किल्ला आहे. ही ठिकाणे रायगडाच्या जवळ नाहीत.

भीमसेन सक्सेना अकबराची व्यवस्था खेळणा गडावर केलेली होती असे म्हणतो. पण सक्सेनाचे हे विधान बरोबर नाही. अकबराजवळ ४०० घोडे, २५० उंट आणि थोडे पायदळ होते. अकबराचे लोक त्याला राजा म्हणून मुजरा करीत असत. तो मध्यम बांध्याचा आणि रंगाने गोरा होता. त्याची व्यवस्था पालीगडाच्या पायथ्याशी, पेंढ्याने शाकारलेल्या मोठ्या घरात केलेली होती. घराच्या भोवती कॅलिको कापडाचे पडदे आणि छत लावलेले होते. बसावयास सतरंजी होती. दिल्लीच्या मुघली वैभवाच्या तुलनेत मराठी राज्यातील साध्या राहणीचा फरक अकबराला जाणवणे साहजिक होते. कोकणातील या साध्या घरासमोर अकबर उघड्यावरच बसत असे. त्याच्या बरोबर आलेले रजपूत आणि मुसलमान लोक अकबराच्या घराभोवतीच राहात असत. संभाजीने अकबराच्या संरक्षणासाठी ३०० हशम ठेवले होते. अकबर पालीस राहावयास आल्याचे कळताच मराठी राज्यातील जवळपासचे सुभेदार त्याला भेटावयास गेले. दि. १५।१७ जून १६८१ च्या सुमारास संभाजीने आपला प्रतिनिधी म्हणून हिरोजी फर्जंद यास अकबराकडे पाठविले. त्याच्या बरोबर एक पत्रही दिले. हिरोजीने एक हजार पागोडे, एक मोत्याचा रत्न आणि हिरेजडित मोठा कंठा, एक हिरेजडित तुरा, इराणी आणि हिंदू पद्धतीच्या काही वस्तू अकबराला नजराण्यादाखल दिल्या. अकबराला लागणाऱ्या धान्यसामुग्रीचीही व्यवस्था करण्यात आली.[1] अशा पद्धतीने आमंत्रणावाचून एका अर्थाने अगांतुकपणेच आलेल्या या पाहुण्याची व्यवस्था करण्यात आली.

ऑगस्ट १६८१ च्या सुमारास अकबराजवळ इतर लोक नोकरीस आले. स्वार आणि प्यादे यांची वाढ झाली. त्यापूर्वी थोडे दिवस संभाजीने २० हजार होन देऊन नेताजी आणि इतर लोकांना अकबराजवळ ठेवले होते. अकबर स्वतःची फौज जमा करीत आहे असे लक्षात येताच त्याला निरोप पाठवून संभाजीने कळविले की तू जर स्वतःचे सैन्य जमा करीत असशील तर दुसऱ्या मुलखात जा. नाहीतर आहे त्या प्रकारे माझ्या मुलखात राहा. जे लोक अकबराकडे रुजू झाले होते त्यांना मनाई करणारी आज्ञा संभाजीने काढली. त्याने अकबराला ६० होनांचा रोजमारा देऊ केला होता.[2] अकबराने मराठी राज्यात राहून स्वतःचे सैन्यबळ वाढवू नये म्हणून योग्य वेळीच दक्षता घेतलेली दिसते.

१. FR-Bom to Sur 10-6-1681, 21-6-1681; Bom Vol 9, p 51to60

२. अख

संभाजीस समक्ष भेटण्याची अकबराला बरीच उत्सुकता होती. तरीही त्याची भेट घेण्यासाठी संभाजी राजे तातडीने गेले नव्हते. अकबराची भेट घ्यावी की घेऊ नये याविषयी त्यांचा निर्णय होत नसावा. या अवघड आणि नाजूक प्रश्नात त्यांनी श्री समर्थांचा सल्ला घेतला असावा. समर्थांनी संभाजी राजास कृपापूर्वक बोललेली अकरा वचने दिली होती. त्यात अकबरासंबंधी एक वचन होते. "पूर्वी एक प्रसंग आला होता. राजश्री संभाजी महाराज श्रींच्या दर्शनास सज्जनगडी येणार म्हणोनि स्थळसिद्धि कारणे मनुष्य आले होते. ते समयीचे वर्तमान, उत्तरेकडील राजपुत्राचे ( अकबर ) आगमन झाले, म्हणोनि ऐकिले. ते समयी आता काय आला म्हणोनि बोलिले. परंतु या उपरीही हे प्रांतीचे लोक अनुकूल करून घेतील तरी उभयता योगे कार्यसिद्धीच आहे. परंतु त्वरा पाहिजे."[१] कदाचित अकबरासंबंधी विचारविनिमय करण्यासाठी संभाजी राजे सज्जनगडावर जाणार असतील. ते येण्याचे कारण कळताच समर्थांनी वरील उपदेश दिला असावा. या उपदेशाप्रमाणे संभाजीने अकबरास भेटण्याची घाई मात्र केली नाही. त्यामागे वेगळी कारणे होती. कदाचित ते अकबराविषयी खात्री करून घेत असतील. तो कसा आहे, कोणता हेतू मनात धरून इकडे आला आहे याचा अंदाज घेत असतील. कसेही असले तरी अकबर हा औरंगजेबासारख्या कपटी व कारस्थानी शत्रूचा मुलगा होता. त्यामुळे प्रत्येक पाऊल काळजी घेऊन टाकणे जरूर होते. त्याशिवाय संभाजी महाराज त्यांच्या विरुद्ध होत असलेल्या कटाची पाळेमुळे शोधून काढण्यात गुंतलेले होते.

**संभाजीविरोधी कट आणि अकबर :**

जून–जुलै १६८१ च्या सुमारास संभाजीवर विषप्रयोग करण्याचा कट झाला होता. या कटात अण्णाजी दत्तो, सोमाजी दत्तो, हिरोजी फर्जंद, सोयराबाई इ. मंडळी होती. त्यांनी या कटात अकबरास गोवण्याचाही प्रयत्न केला होता. परंतु तो त्यास बधला नाही. उलट अकबरानेच संभाजीकडे एक गुप्त दूत पाठवून या कटाची बातमी त्यांना दिली. या कृत्यामुळे संभाजीची अकबराविषयी खात्री पटली. विषप्रयोगाचा कट फसल्यानंतर याच मंडळींनी अकबराच्या मदतीने संभाजी महाराजांना गादीवरून काढून टाकण्याचा प्रयत्न केला. त्यांनी राजद्रोह करणारे एक पत्र अकबराला लिहून कळविले, की 'आम्ही तुला मिळतो.' अकबर प्रथम या गोष्टीचा फायदा घ्यावयास तयार झाला होता. परंतु दुर्गादासाच्या संमतीनेच तो सर्व गोष्टी करीत असल्याने अकबराने त्याचा सल्ला घेतला. अकबराने या मंडळींच्या पत्रावर विसंबू नये. कदाचित् हे पत्र संभाजीनेच त्याची

१. श्रीसच–आ, पृष्ठ ३६९

परीक्षा पाहण्यासाठी लिहविले असेल. तू अशा बंडाला साहाय्य करशील की संभाजीने केलेल्या उपकाराचे स्मरण ठेवून त्याच्या बाजूने झटशील हे अजमावण्याचाही त्यामागे हेतू असेल. तरी श्रेयस्कर मार्ग म्हणजे तू ते पत्र संभाजीच्या हवाली करून आपले इमान आणि कृतज्ञता त्याला दाखव. हे अस्सल आणि राजद्रोही कटाचे पत्र हातात येताच संभाजीने संबंधित सरकारकुनांस ठार मारण्याचा तावडतोब हुकूम दिला.[१]

निकोलाय मानुत्चीने दिलेल्या माहितीसारखीच या कटाची हकीकत पंत प्रतिनिधींच्या बखरीत दिलेली आहे. " इतक्यांत अनाजी दत्तो याच्या पक्षपाती लोकांनी त्या महंमदाशी ( अकबराशी ) राजाराम याचे हिताविषयी संभाजीस घाताची मसलत केली. हे वर्तमान संभाजीस महंमदाने कळविले.... त्यानी अनाजी दत्तो...हत्तीचे पायी दिले. "[२]

हा कट उघडकीस आल्यावर संभाजी राजांना अकबराविषयी विश्वास उत्पन्न झाला आणि त्यांनी अकबराची भेट घेण्याचे निश्चित केले.

**पहिली भेट :**

संभाजी महाराजांनी अकबराला रायगडावर भेटीसाठी बोलाविले नाही. तेच स्वतः त्याला भेटण्यासाठी पालीस गेले. कार्तिक शु. १३, रविवार दि. १३ नोव्हेंबर १६८१ रोजी संभाजी राजे आणि अकबर यांची सेनासमुदा, लष्कर व हशम यांच्यासमवेत पादशहापूर ( सुधागड ) येथे भेट झाली. अकबराच्या बरोबर दुर्गादास राठोडही होता. दोघांनी एकमेकांचा सन्मान केला.[३] उत्तर आणि दक्षिण ध्रुवांची युती झाली ! ही भेट झाल्यावर संभाजी आणि कबजी बाबा अकबराच्या खानगीसाठी राजापुरास गेले आणि तेथून रायगडावर परतले.[४]

**औरंगजेबाची दक्षिणेकडे आगेकूच :**

अकबर संभाजीकडे आश्रयासाठी गेल्याचे कळल्यापासून औरंगजेब अस्वस्थच होता. त्या दोघांची एकी झाल्याने त्यांचे बळ वाढले आणि अकबराचे बंड पसरले तर आपल्या राज्याला आणि जीविताला धोका उत्पन्न झाल्यावाचून राहणार नाही अशी त्याला खात्री होती. या गंभीर परिस्थितीची त्याला जाणीव होती. आपण आपल्या वडिलांना तुरुंगात टाकून, दुसऱ्या भावांविरुद्ध एका भावाशी संगनमत करून, भांडून कूटनीतीनेच राज्यपद मिळविले होते याची

१. SM-- NM, p 257-258

२. पप्रब, पृष्ठ २७

३. शिचप्र, पृष्ठ ३०, ४७     ४. ताकाका--प, पृष्ठ ४४७

त्याला या प्रसंगी आठवण होणे स्वाभाविकच होते. जी गोष्ट औरंगजेबाने आपल्या भावांविरुद्ध केलेली होती तीच गोष्ट अकबराने आपल्या वडिलांविरुद्ध आचरणात आणली होती. या बिकट परिस्थितीत औरंगजेबापुढे एकच मार्ग मोकळा होता. अकबर आणि संभाजी एकत्र होऊन काही हालचाल करण्यापूर्वीच दक्षिणेकडे कूच करून त्यांचा नाश करणे. औरंगजेब रजपुतांविरुद्ध चालू असलेल्या युद्धात गुंतलेला होता. त्याने घाईघाईने रजपुतांशी तह केला. अकबराला पकडण्यासाठी आणि मराठी राज्य नष्ट करावयाचा विडा उचलून औरंगजेब दक्षिणेकडे निघाला. तो जिद्दीने दक्षिणेकडे निघाला त्यावेळी त्याला कल्पनाही नव्हती, की त्याला मराठ्यांविरुद्ध सतत पंचवीस वर्षे लढावे लागेल आणि आपण आपल्या मुलखात कधीच परतू शकणार नाही ! दक्षिणेत स्वारी करावयासाठी त्याने प्रचंड सैन्य जमा केले. शहाजादे आणि अनुभवी सरदारांना बरोबर घेऊन औरंगजेबाने दि. ८ सप्टेंबर १६८१ या दिवशी अजमीरहून कूच केले. त्यापूर्वी म्हणजे दि. २१ ऑगस्टला त्याने आपला दुसरा मुलगा आज्जम याला शहा ही पदवी देऊन दक्षिणेच्या मोहिमेवर पाठविलेच होते. तो दि. ११ नोव्हेंबर १६८१ रोजी औरंगाबादला पोचला. दि. २४ ऑक्टोबर १६८१ ला चिनकिलिचखान ख्वाजा आबिद (गाजीउद्दीन फिरोजजंग याचा बाप) याचीही दक्षिणेकडे रवानगी करण्यात आली.[1]

दि. १३ नोव्हेंबर १६८१ रोजी स्वतः औरंगजेब आपल्या प्रचंड सामर्थ्यासह बऱ्हाणपुरास पोचला. गमतीचा योगायोग असा, की याच दिवशी अकबर आणि संभाजी यांची पादशहापूर येथे भेट झाली. १६८१ च्या अखेरीस औरंगजेबाने शहाजादा आज्जम, बहाद्दूरखान, चिनकिलिच खान, हसनअली खान या सरदारांना स्वराज्याच्या सरहद्दीवर चढाई करण्यासाठी रवाना केले. दुसरीकडे त्याने अकबराला पकडण्यासाठी सिद्दी, पोर्तुगेज आणि स्वार्थी देसाई यांचे सहकार्य मिळविण्याचे प्रयत्न सुरू केले. या प्रयत्नांना यश येऊन सिद्दी हे मुघलांचे अधिकारी बनले आणि पोर्तुगीजांनी औरंगजेबाला सर्व प्रकारचे साहाय्य देण्याचे मान्य केले.

औरंगजेबाचे असे प्रयत्न चालू असताना संभाजीमहाराजही स्वस्थ बसले नव्हते. त्यांनी मुघली आक्रमणाला तोंड देण्याची तयारी सुरू करून दुसरीकडे जंजिऱ्याच्या सिद्दीविरुद्ध चालू असलेली मोहीम जास्त निकराने चालू ठेवली. १६८१ च्या अखेरीस संभाजीने सिद्यांच्या दंडाराजपुरीला वेढा घातला. संभाजी राजे स्वतः या युद्धात मार्गदर्शन करीत होते. या वेढ्यात त्यानी शहाजादा अकबरलाही

१. MA--JS, p 130–132

आपल्या बरोबर नेलेले होते.[1] याच सुमारास हसनअली खान कोकणात उतरल्याने संभाजीराजे आणि अकबर जंजिऱ्याच्या वेढ्यातून कल्याणला परत गेले.[2]

**एक मनसुबा :**

अकबर आणि दुर्गादास मराठ्यांकडे आल्याचा फायदा करून घेण्यासाठी संभाजीने एक योजना आखलेली असावी असे दिसते. या मनसुब्यासंबंधी फक्त दोन पत्रांतच माहिती मिळते. ही दोन पत्रे संभाजी आणि अकबर यांनी अंबरचा ( जयपूरचा ) राजा रामसिंग याला १६८२ च्या मे आणि नोव्हेंबर महिन्यांच्या सुमारास लिहिली होती. या दोन पत्रांवरून असे दिसते की, सुलतान अकबराने इराणच्या शहा आब्बासकडे आणि संभाजीने अंबरच्या राजा रामसिंगाशी पत्रव्यवहार केलेला होता. ही मूळ पत्रे उपलब्ध नाहीत. ती मिळू शकली तर त्यावरून या योजनेचा अधिक आणि स्पष्ट बोध होऊ शकेल.

संभाजीने रजपुतांना औरंगजेबाविरुद्ध उठविण्याचा प्रयत्न केला होता. हा उठाव करण्यासाठी अकबर आणि दुर्गादास राठोड यांना उत्तरेत पाठविण्यात येणार होते. राजा रामसिंगाने अकबराला मदत करून दिल्लीच्या तख्तावर बसवावयाचे; त्यामुळे नामधारी राजेपण त्याच्याकडे गेले तरी प्रत्यक्ष सत्ता हिंदूंच्या ताब्यात राहिली असती. एकूण मनसुब्यातील हा पहिला टप्पा होता. असे करण्याने अकबर उत्तरेकडे गेला असता तर आपोआपच त्याचा पाठलाग करण्यासाठी औरंगजेबही वर गेला असता.

अशा परिस्थितीत संभाजीने या मनसुब्यात आणखी एक धाडसी योजना आखली होती. औरंगजेबाच्या सैन्याची मराठी सीमांवर पुष्कळ फजिती होत होती. त्याचे सेनानायक पुरेसे कर्तृत्ववान नव्हते. अशा प्रसंगी संभाजी महाराजांनी बादशहा औरंगजेबालाच पकडून कैदेत टाकण्याची योजना आखली होती. एकूण मनसुब्यात हे दोन महत्त्वाचे मुद्दे होते. या योजनेची स्पष्ट कल्पना देण्यापूर्वी संभाजीने राजा रामसिंगाला एक पत्र लिहिले होते आणि त्यात बादशहाला विरोध करण्याची विनंती केलेली होती. ही गोष्ट रामसिंगाला बहुधा मान्य नसावी. त्याने संभाजीला पत्र लिहून कळविले होते की "तुम्ही बादशहाला विरोध करू नये आणि त्याचे सार्वभौमत्व मान्य करावे."[3] संभाजी आणि राजा

१. FR : Bom to Sur, 3-1-82, Bom Vol 9, p 4; Sur Vol 108, p 34–35; Orme Vol 117–3, p 80–82

२. FR : Bom to Sur, 4–2–82, Bom Vol 9, p 7--8; Sur Vol 117 p. 60--61; Orme Vol 117–3, p 64

३. HOS--JS, p 201, 203

रामसिंग यांचा हा पत्रव्यवहार चालू असताना अकबराने दिल्लीचे राज्य मिळावे आणि औरंगजेबाचा सूड घेता यावा म्हणून इराणचा शहा अब्बास आणि रामसिंग यांस पत्र लिहिले. इराणच्या शहाकडे अकबराने मदत मागितली होती आणि त्याने अकबराला मदतीचे आश्वासनही दिले होते.[१]

अकबराने रामसिंगाचेही सहकार्य मागितले होते. तो दिनांक २२ मे १६८२ च्या सुमारास लिहितो, " हिंदूंना कशा पद्धतीने औरंगजेब वागवितो हे तुला माहीतच आहे. तुमचा मुलगा कृष्णसिंग ( आणि वारस ) याला कशी वागणूक मिळाली हेही तुम्हाला ठाऊकच आहे. परिंडा या गावी एका स्त्रीच्या प्रकरणावरून तो एका अफगाणाकडून मारला गेला होता. ही घटना दि.१०एप्रिल १६८२ ला घडली. ही गोष्ट आलमगीराच्या हटवादीपणामुळे झाली. हाच हटवादीपणा त्याने तुमच्या जमातीवर वारंवार लादला आहे. तुमचे वंशज आमच्या घराण्याची परंपरागत सेवा करीत आल्याने मला तुमच्याविषयी आदर आहे. माझ्या वंशजांनी त्यांना चांगली वागणूक दिली होती. तुझ्या वडिलांना दिलेली मन्सब आणि मिर्झा राजा हा किताब मी तुला आणि तू कुमार असताना मिळालेली मन्सब तुझा मुलगा भूषणसिंग याला बहाल करतो. मी तिकडे येत असलेल्या बातमीकडे तू लक्ष ठेव. मी जेव्हा माझ्या सैन्यासह उत्तरेत येईन तेव्हा तू तुझ्या सैन्यासह मला येऊन मिळावे. असे केलेस तर तुला माझ्या दरबारात मानमरातब मिळेल. नेहमीचे जडजवाहिर आणि पोषाख अस्थिर परिस्थितीमुळे धाडलेले नाहीत. "[२]

या पत्रावरून असे दिसते की संभाजी महाराजांनी आपल्या मनसुब्याची कल्पना अकबराला दिलेली नव्हती. अकबर फक्त स्वतःला गादी मिळावी म्हणून प्रयत्न करताना दिसतो. त्याने या कामासाठी इराणच्या शहाचीही मदत मागितलेली होती हे पूर्वी सांगितलेले आहे.

संभाजीने रामसिंगाला पाठविलेल्या पत्रात अकबराला आश्रय दिल्याबद्दल आणि एकंदर राजकीय परिस्थितीविषयीही लिहिलेले होते. त्या पत्राला पाठविलेल्या उत्तरात रामसिंग लिहितो, " तुम्ही सुलतान अकबर यास आपल्या राज्यात आश्रय दिलात ही फार चांगली गोष्ट झाली. तुम्ही जे धोरण अमलात आणीत आहा ते मला मान्य आहे. आपण सगळे हिंदू आहोत म्हणून या परिस्थितीत जे करणे योग्य आहे असे तुम्हाला वाटते ते करावयास मी तयार आहे. " हिंदू म्हणूनच जे शक्य होते ते करण्यास आणि संभाजीला सहकार्य देण्यास राजा रामसिंग तयार असला तरी तो स्वतः जबाबदारी घ्यावयास तयार नव्हता. वर दिलेल्या पत्राला उत्तर पाठविताना संभाजी राजे रामसिंगाला लिहितात, " हा

१. HOS--JS, p 201, 203     २. HOS–JS, p 204, 205

जर तुमचा उद्देश असेल तर या कार्यात तुम्हीच पुढाकार घ्यावयास हवा. त्या यवनाधमाला ( औरंगजेबाला ) सांप्रत असे वाटू लागले आहे की आम्ही हिंदू तत्त्वशून्य झालो आहोत. आम्हाला धर्माचा काहीही अभिमान राहिलेला नाही. बादशहाची वागणूक यापुढे आम्हाला सहन होणार नाही. आम्ही क्षत्रिय आहो. आमच्या धर्माला कमीपणा आणणारी कोणतीही गोष्ट आम्ही मान्य करणार नाही. वेद, श्रुती-स्मृती इत्यादींनी धर्म आणि जाती यांच्या संबंधीची कर्तव्ये नेमून दिलेली आहेत. त्यांची पायमल्ली झालेली आम्हाला सहन होणार नाही. राजे म्हणून प्रजापालनाचा आमचा जो धर्म आहे तो आम्ही टाकू शकत नाही. या दुष्ट यवनांशी युद्ध करण्यात आम्ही आमची संपत्ती, आमचा देश, आमचे दुर्ग, सारांश सर्व काही पणास लावावयास तयार आहोत. या दृढ उद्देशाने आम्ही गेली दोन वर्षे अकबर आणि दुर्गादास राठोड यांना आमच्या देशात आश्रय दिला आहे. आम्ही यवनाधिपतीच्या अनेक सेनानायकांचा वध केला, कित्येकांना कारागृहात टाकले, काहींना खंडणी घेऊन तर काहींना दयाबुद्धीने सोडून दिले. काहींनी लाच चारून आपली सुटका करून घेतली. अशा रीतीने बादशहाचे सेनानायक हे बिनकामाचे ठरले. आता अशी वेळ आली आहे की त्या यवनाधमाला ( औरंगजेबाला ) पकडून कारागारात घालणे शक्य होईल. मग आपल्या देवतांची पुन्हा स्थापना करून धर्मकर्मे निर्विघ्नपणे पार पडतील अशी व्यवस्था करता येईल. हे सारे लवकरच करावयाचे आम्ही ठरविले आहे याची आपण खात्री बाळगावी.

" परंतु आपल्या मानात आम्ही अल्पवयी आणि अननुभवी आहोत. आपल्या धर्माभिमानाच्या आणि शौर्याच्या अनेक गोष्टी आम्ही ऐकलेल्या आहेत. तुम्ही यावेळी सतांग राजसंपन्न आहात. तुम्ही यावेळी धैर्य आणि साहस दाखविलेत तर आणि यवनांची शक्ती नष्ट करण्याच्या कामात आम्हाला मदत केलीत तर आपण काय करू शकणार नाही ? या गोष्टीचा आम्ही विचार करतो तेव्हा आपण अशा प्रसंगी धर्माभिमान सोडून गप्प बसून राहिला याचे आम्हाला आश्चर्य वाटते.

" आणखी एक गोष्ट. दुर्जनसिंग हाडा हा कशा प्रकारचा मनुष्य आहे हे आपल्या दोघांनाही माहीत आहे. त्याच्यापाशी किती संपत्ती होती हेही आपल्याला ठाऊक आहे. परंतु त्याने आपल्या संपत्तीवर पाणी सोडले आणि आमच्या सूचनेस अनुसरून त्याने शौर्य गाजविले व धामधूम उडवून दिली. तुम्ही तिकडच्या भागात असल्यामुळे तुम्हाला हे सर्व माहीतच असेल. ( बुंदीचा राजा दुर्जनसिंग हाडा याने औरंगजेबाविरुद्ध बंड केले होते. पुढे तो एका लढाईत मारला गेला. )

" इकडे आम्ही अकबर आणि दुर्गादास यांना गुजराथेत पाठविण्याच्या विचारात आहो. यावेळी आपणही जे काही शक्य आणि आवश्यक आहे ते

धैर्याने करावे. पठाणाधिप ( इराणचा ) शहा आब्बास याने आपण अकबराला साहाय्य करू असे लिहिले आहे. परंतु या बाबतीत आपण यवनांची मदत घ्यावी आणि यशाचे श्रेय त्यांना मिळवून द्यावे हे मला अनुचित वाटते. आपले पिते ( राजा जयसिंग ) यांनी यवनाधमाला दिल्लीश्वर करून त्याचे श्रेय संपादन केलेच ना ? त्याप्रमाणे आपणही अकबराला मदत करून यशाचे धनी व्हावे. यवनांच्या मदतीने अकबराला राज्यपद लाभले तर त्यांना प्राधान्य येईल. ही गोष्ट आपण घडू देऊ नये. आपण उभयतांनी एक होऊन अकबराला गादीवर बसविले तर धर्मरक्षणाचे कार्य होईल आणि आपल्या या कार्याने महाराजा जयसिंह यांच्या वंशाला शोभा येईल.

" माझे मंत्री कवि कलश आणि जनार्दन पंडित हे तुम्हाला सविस्तरपणे वेगळे पत्र लिहीत आहेत. प्रतापसिंहाच्या ( दूत ) आणि इतर हेरांच्या तोंडून आपल्याला सगळा तपशील कळेल. ते आपल्याला भेटतीलच. आपले कुशल वरचेवर कळवीत असावे. अधिक काय लिहिणे. सर्व गोष्टी आपल्याला विदितच आहेत. "[१]

या मोठ्या पत्रावरून आपल्याला अनेक गोष्टींचा बोध होतो. संभाजी-राजांचा आत्मविश्वास आणि त्यांच्या मनाची झेप किती मोठी होती याची कल्पना येते. या मनसुब्यातील कल्पना प्रत्यक्षात आचरणात येण्यासारखी होती का ? एकट्या मराठ्यांच्या शक्तीवर हा मनसुबा यशस्वी होणारा नव्हता. संभाजीला आपल्या सामर्थ्याची कल्पना असल्यामुळे, अधिक सामर्थ्यवान अशा रजपुतांनी या कार्यात पुढाकार घ्यावा अशी त्याची इच्छा होती. रजपुतांनी या कामात पुढाकार घेतला असता तर संभाजीमहाराज सर्वस्व पणाला लावण्यास तयार होते. मुघली सैन्याने त्यावेळी मराठी राज्याला वेढलेले असल्याने कोणतीही गोष्ट मराठे एकाकीपणे अंगावर घेण्याच्या परिस्थितीत नव्हते. दोन तीन वर्षे औरंगजेबा-विरुद्ध लढत राहिल्यामुळे रजपुतांची ताकदही कमी झाली असावी. त्यामुळे त्यांनी संभाजीला साहाय्य करण्याचे मान्य केले तरी ते प्रत्यक्ष पुढाकार घेण्यास तयार नसावे आणि त्यामुळेच त्यांनी संभाजीच्या धाडसी मनसुब्याला मान्यता दिली नसावी असा संभव वाटतो. शहा आब्बासची मदत घेण्यास संभाजी तयार नव्हता ही एक महत्त्वाची गोष्ट या पत्रात आढळते. परकीय अशा यवनाला हिंदुस्थानच्या राजकारणात वाव देऊन त्याला शिरकाव आणि श्रेय मिळू द्यावे ही कल्पनाही संभाजीला मान्य नव्हती. औरंगजेबाचा पराभव करण्यासाठी हिंदूंनीच एकजूट करून ही कामगिरी बजावावी असे त्यांना वाटत होते.

१. HOS-JS, p 205-208

या मनसुब्याविषयी आपले मत व्यक्त करताना रियासतकार कै. गो. स. सरदेसाई लिहितात की, औरंगजेबाच्या मुख्य छावणीवर हल्ला करून त्याच्या सैन्याची धूळधाण करण्यास अकबर वारंवार सांगत असूनही सिंहासारखा शूर असलेला संभाजी या मोठ्या योजनेत धैर्याने पुढाकार घेत नाही आणि निष्कारण काळकाढूपणा करतो. तो कमी पडला.[1] एकूण परिस्थितीचा विचार करता कै. सरदेसाई यांचे हे मत बरोबर वाटत नाही. संभाजीने रामसिंगाला लिहिलेल्या पत्रावरून त्याला स्वतःच्या सामर्थ्याची पूर्ण कल्पना होती असे दिसते. स्वराज्याला शत्रूने सर्व बाजूंनी गराडा घातलेला असताना उत्तरेत सैन्य धाडणे चूकच ठरले असते. याच्या उलट औरंगजेबाची शक्ती इतकी मोठी होती की त्याला उत्तर आणि दक्षिण आघाड्यांवर एकाच वेळी मुकाबला करणे फारसे कठीण नव्हते. त्यामुळे प्रथमतः स्वराज्याच्या संरक्षणाची कामगिरी टाकून अकबराच्या नादाने नसते धाडस करणे योग्य वाटत नाही.

या मनसुब्यासंबंधी पत्रव्यवहार आणि खलबते चालू होती तेव्हा इंग्रज वखारवाल्यांना संभाजी आणि अकबर यांच्या गुप्त कारस्थानाची कुणकुण लागलेली असावी. ते आपल्या पत्रातून लिहितात की, "अकबराचे सैन्य संभाजी राजाला मिळालेले असून ३० हजार स्वार मुघल बादशहावर चालून जात आहेत. तसेच दुर्गादासाबरोबर १२ हजार स्वार आणि २० हजार पायदळ असल्याचे समजते."[2] संभाजीने इतके मोठे सैन्य जमविण्याची अकबराला परवानगीच दिलेली नव्हती; त्यामुळे त्याच्याजवळ फारच थोडे सैन्य होते. औरंगजेबाविरुद्ध फक्त मराठेच निकराने लढा देत होते.

१६८२ सालच्या ऑगस्ट महिन्याच्या अखेरीस संभाजी आणि अकबर यांची भेट झाली. या भेटीत संभाजीराजांनी अकबराला आपल्या मुलखातून समुद्रमार्गाने अहमदाबादच्या बाजूने राठोडांच्या मुलखात पाठविण्याचे ठरविले होते. याची बातमी औरंगजेबाला कळून रुहुल्लाखानाला हुकूम देण्यात आला की त्याने अहमदाबाद, बडोद्याच्या सुभेदाराला कळवून अकबराची वाट अडवून त्याला कैद करावे. अहमदाबाद, सुरत, बडोदे, थालनेर, नंदुरबार, रावेर, माळवा इत्यादी ठिकाणच्या फौजदारांना अकबराला कैद करण्याचा हुकूम देण्यात आला.[3]

या भेटीनंतर अकबर तिकोना येथे थांबला. परंतु त्याला तेथील हवा मानवली नाही. त्यामुळे त्याला जैतापूर येथे ठेवण्यात आले. तेथील हवाही त्याला मानवली नाही. अकबराचे नातेवाईकही तेथे आजारी पडले.[4]

---

१. NHM–GSS, p. 318

२. FR: Bom to Sur, 4-2-1682; Sur Con, 30-10-1682

३. अख : ३–९–१६८२

४. अख : १३–९–१६८२

काही ना काही कारणाने अकबराला उत्तरेकडे पाठविण्याचा बेत यशस्वी झालेला दिसत नाही. उत्तरेत जाता न आल्याने अकबरही निराश झालेला असावा. संभाजीला फक्त अकबराच्या दृष्टीने वागणे शक्यच नव्हते. औरंगजेबाने सर्व गड-किल्ल्यांना वेढलेले असताना स्वराज्याच्या रक्षणाला प्राधान्य देणे भाग होते. मुघलांना तोंड देत असतानाच इंग्रज, सिद्दी आणि पोर्तुगेज यांच्याशीही संघर्षाची तयारी करणे संभाजीला प्राप्त होते. सिद्दी आणि पोर्तुगीजांना मराठ्यां-विरुद्ध मदत करण्यास औरंगजेबाने त्यांच्यावर दबाव आणलेला होता. अशा परिस्थितीतच १६८२ सालाच्या अखेरीस असा एक प्रसंग घडला आणि त्यामुळे संभाजी आणि अकबर यांचे संबंध दुरावले. एक माळ व एक हत्ती पूर्वी संभाजीने अकबराला भेट म्हणून दिलेला होता. एका हिंदू गायिकेला अकबराने मुसलमान करून आपल्याजवळ रखेली म्हणून ठेवले होते. संभाजीने भेटीदाखल दिलेली माळ आणि इतर काही वस्तू अकबराने त्या गायिकेला दिल्या. अकबराच्या प्रत्येक हाल-चालीवर, तो काय काय करतो या गोष्टींवर संभाजीचे बारकाईने लक्ष असे. आपण भेट म्हणून दिलेली माळ अकबराने एका रखेलीला दिल्याचे कळताच संभाजीने तो राजाचा अपमान आहे असे मानले. त्याने अकबराला निरोप पाठविला 'की तुझ्या सन्मानासाठी मी तो कंठा तुला दिला होता. अकबराने उलट उत्तर पाठविले की, "मी बादशहा आहे. माझ्या मनासारखा मी वागेन." हे उत्तर येताच संभाजीने अकबराच्या दिमतीला दिलेले २००० घोडदळ आणि २००० पायदळ परत बोलाविले. खर्चाची रक्कम देणे बंद केले. त्यामुळे अकबर फारच निराश झाला. सैन्य काढून घेतल्यामुळे त्याला काही करता येणेही अशक्य होते. अखेर रागावून त्याने आपल्या डेऱ्यांना आणि घरांना आग लावली आणि फकीराचा वेश धारण करून त्याने गोव्याचा मार्ग धरला.[1]

संभाजी आपल्याकडे ठराविक मर्यादेपलीकडे लक्ष द्यावयास तयार नाही हे अकबराच्या लवकरच ध्यानात आले होते. 'कंठा' प्रकरणावरून त्यांचे संबंध बिघडण्यास निमित्तच मिळाले. त्याचा तनखा आणि सैन्य कमी होताच दुसरीकडे जाण्यास कुमक मिळावी असे त्याने संभाजीस कळविले. आता तो मराठी मुलखात राहणे शक्य नाही असे ध्यानात आल्यामुळे संभाजी अकबराला कुमक देण्यासही तयार नव्हता. तो मराठी मुलखातून बाहेर पडल्याचे औरंगजेबाला कळताच त्याने सर्व अधिकाऱ्यांना, अहमदाबाद आणि तेलंगणाच्या सुभेदारांना त्याचा पाठलाग करण्याचा हुकूम दिला आणि चारही बाजूंच्या लोकांना सावध राहण्यास सांगितले. त्याने रुहुल्लाखान आणि आपला नातू शहाजादा मुईजुद्दीन यांना राम-नगरच्या बाजूला अकबराची वाट अडवावी असे हुकूम दिले. अकबर बंगालकडे

१. अख : १७-२-१६८३

जात असेल तर झारखेडच्या मार्गाने त्याचा पाठलाग करावा; तो हिंदुस्थानाकडे जात असल्यास गोंडवनाच्या मार्गाने पाठलाग करून त्याला पकडावे, असे औरंगजेबाने फर्माविले होते. अकबर मारवाडात जाण्याचा संभव असल्याने रुहुल्लाखानाने मेवाडचा फौजदार मुरतझमखान, भांदलचा फौजदार भावसिंग यांना तो मराठ्यांच्या मुलखातून बाहेर पडत असल्याचे कळविले होते. असदखानालाही त्याचा पाठलाग करण्यास सांगण्यात आले होते.[१]

### अकबर गोव्यात जातो :

अकबराला मुघलांच्या हद्दीत जाणे शक्यच नव्हते. त्यामुळे फक्त फिरंग्यांच्या प्रदेशात जाण्याचा मार्ग त्याला मोकळा होता. दि. ३ जानेवारी १६८३ रोजी तो फिरंगी मुलखात बांदा येथे गेला.[२] तेथून त्याने पोर्तुगीज विजरई (व्हॉइसरॉय) फ्रान्सिको द ताव्होरा याच्याकडे आपला वकील पाठविला. तो गोव्यातील किल्ल्यात दि. १७ जानेवारी १६८३ ला संध्याकाळी विजरईला भेटला. त्याने अकबर आणि संभाजी यांचे भांडण झाल्याचे सांगून एक पत्र देऊन काही रत्ने विजरईजवळ विकण्यासाठी दिली. या पत्राला विजरईने दि. १९-१-१६८३ रोजी उत्तर पाठविले की, "तुमचे पत्र मिळाले. ते वाचून आनंद झाला. आपल्याला भोगावे लागलेले कष्ट ध्यानात आले. मला आपल्याबद्दल सहानुभूती वाटते."[३] पोर्तुगीज विजरईला वाटणारी सहानुभूती फार काळ टिकू शकली नाही. दि. २१-१-१६८३ च्या सुमारास औरंगजेबाचा वकील शेख महमद गोव्यात पोचला.[४] त्यामुळे विजरईने अकबराच्या बाबतीत आपले धोरण बदलले; कॅनराच्या राज्यातून मक्केला जाण्याची इच्छा अकबराने विजरईजवळ व्यक्त केलेली होती. त्यासाठी त्याने बोटी आणि परवाने मागितले होते. या मागणीप्रमाणे विजरईने पाच बोटींसाठी पाच परवाने दिले.[५] अकबर बांद्यास असताना दि. १६-२-१६८३ ला विजरई लिहितो, "तुमचा रत्नजडित खंजीर मिळाला. या भेटीबद्दल आभारी आहे. तुमचा वकील अबदुल हमीद याच्याबरोबर तुम्ही मागितलेल्या वस्तू पाठविल्या आहेत. आपल्या मागण्यांसंबंधी वकिलाबरोबर पत्र पाठविले आहे. रत्ने विकण्यासंबंधी त्याला जरूर ती माहिती कळविली आहे. आपण लिहिल्याप्रमाणे आपल्याकरिता जहाजे देण्यासंबंधी मी मंगलोरच्या राणीला लिहिले असून मदत करण्याची शिफारस केली आहे. ठरल्याप्रमाणे मी आपल्या-

१. अख : ५-१-१६८३; १०-१-१६८३
२. अख : २४-१-१६८३
३. HRCPM, p 101
४. कित्ता ५. कित्ता पृष्ठ १०२

करिता पणजी येथे एक जहाज तयार ठेवले आहे. वकिलाला सांगितल्याप्रमाणे आपणाकडून दोन इसम आल्यावाचून तयार ठेवलेले जहाज मंगलोरच्या राणीकडे जाणार नाही.''[१]

या पत्रावरून पोर्तुगीज विजरईने अकबराच्या प्रवासाची बरीच तयारी केलेली होती असे दिसते. विजरई अकबराला मदत करण्यास तयार असल्याची कुणकुण तेथे असलेला औरंगजेबाचा वकील शेख महमद यास समजली. त्याने ही बातमी इतर मुघल सरदारांना कळविली.

मक्केला जावयासाठी अकबर प्रयत्न करीतच होता. त्याने विजरईकडे पुन्हा एकदा जहाजाची मागणी केली. पण त्याने नकार दिला. अखेर अकबराने एका महमदाकडून एक जहाज मागविले. मुहमदखान याने अकबराला नेण्यासाठी एक जहाज राजापुरास धाडले; पण ते फारच लहान असल्यामुळे त्यातून जाण्याचा विचार त्याने सोडला. औरंगजेबाच्या हुकुमानुसार अकबराचा पाठलाग करण्यासाठी विजरईने त्या जहाज देणाऱ्या मुसलमानाचा पाठलाग चालू ठेवला होता.[२] अखेर अकबरास एक जहाज पैदा करण्यात यश आले. दि. २३ नोव्हेंबर १६८३ च्या पूर्वी त्या जहाजातून जाण्याचा त्याने प्रयत्नही केला. जहाजावर जाऊन कवि कलश आणि दुर्गादास यांनी अकबराची भेट घेऊन त्याचे मन वळविण्याचा प्रयत्न केल्याने मक्केला जाण्याचा त्याचा बेत फसला.[३] संभाजीचा निरोप घेऊन ते राजापुराहून वेंगुर्ल्यास गेले. त्यांनी अकबराला जाऊ दिले नाही. त्याला एकटाच पाठविणे गैर वाटल्याने अकबराला परत आणण्याचा दुर्गादासानेही प्रयत्न केलेला दिसतो. त्याला परत आणण्यात संभाजीचा काही राजकीय हेतू असावा. याच सुमारास पोर्तुगीज आणि मराठे यांचे युद्ध चालू झालेले होते. अशावेळी तो पोर्तुगीज हद्दीत जाणे मराठ्यांना घातक होते; विजरई अकबराचा उपयोग करून घेण्याचा संभव होता. संभाजीनेच अकबराचे मन वळवून त्याचा पोर्तुगीजांविरुद्ध लढताना उपयोग करावयाचे ठरविले. दि. २४ नोव्हेंबर १६८३ ला संभाजीने सांतो एस्तेव्हो या गडाला वेढा दिला. गड त्याने जिंकला पण तेवढ्यात औरंगजेबाचा मोठा मुलगा शहा आलम याच वेळी दक्षिण कोकणाच्या स्वारीसाठी येणार असल्याची वार्ता कळताच त्याला तो दोन दिवसांत सोडावा लागला. या वेळ्यात अकबर संभाजीच्या बरोबर होता. मराठे आणि पोर्तुगीज यांच्या संबंधात मध्यस्थी करावयाची अकबराने उत्सुकता दाखविली होती. दि. २९-११-१६८३ ला अकबरामार्फत संभाजीने राय कीर्तिसिंगला गोव्याच्या विजरईकडे पाठविले.

१. कित्ता

२. कित्ता, पृष्ठ १०४

३. FR: Bom to Sur, 28-11-1683

परंतु संभाजीचे अधिकारपत्र त्याच्याजवळ नसल्यामुळे विजरईने त्याला थारा दिला नाही.[1] दि. २३-१२-१६८३ ला संभाजी गोव्याची हद्द सोडून रायगडास परतला. त्याने कवि कलश आणि अकबर यांना पोर्तुगीजांशी तह करण्यासाठी मागे ठेवले.[2] दि. ७ जानेवारी १६८४ रोजी अकबर आणि कवि कलश यांनी भिमगड येथे पोर्तुगीजांशी तहाच्या प्राथमिक वाटाघाटी केल्या.[3] त्या फोंडा येथे पूर्ण झाल्या. दि. २५–१–१६८४ ते ४–२–१६८४ पर्यंत अकबर मराठे–पोर्तुगीज तहात मध्यस्थाचे काम करीत होता.

**अकबराच्या पुढील हालचाली :**

फोंडा येथील तहाच्या वाटाघाटींनंतर, दि. २०-२-१६८४ रोजी अकबर जैतापुरला पोचला.[4] आणि कवि कलश रायगडला गेला. जैतापुराहून त्याने कवि कलशाशी पत्रव्यवहार सुरू केला. तेथे पोचताच अकबराने कवि कलशाला पत्र पाठवून भेटीस बोलाविले. अकबराने कीर्तिसिंगाला संभाजीकडे काही कामासाठी धाडले होते. त्याने तहासंबंधी काही निरोप दिला का असेही तो पत्रात विचारतो. पत्र मिळताच कवि कलशने उत्तर पाठविले ते त्याला पोचले. या पत्रात कलशाने संभाजी पाचाडला पोचल्याचे आणि त्यांची भेट झाल्याचे नमूद केले होते.[5] या पत्राला उत्तर पाठविताना अकबर दि. २७–७–१६८४ रोजी लिहितो, " महमद आज्जमचा ( शहाजादा ) वकील तेथे आल्याचे समजले. तो कशाकरिता येथे आला आणि त्याच्या बरोबर कोणती बोलणी झाली ते कळले नाही. तुम्हाला तह करणे योग्य वाटत असेल तर तह करा. पण माझ्याबद्दल म्हणावयाचे तर मी काही तुम्हाला अनुकूल नाही. तरीही तुम्ही पत्रव्यवहार करण्यास हरकत नाही. तुम्ही इकडे येणे आवश्यक आहे. ते सोयीचे होईल. अनेक राजकारणे तडीस जातील. तुम्ही जाणावे की राजकारणाच्या मसलतीसाठी पावसाळ्याचा मोसम अनुकूल असतो. तहाच्या गोष्टींवर अवलंबून राहून बेखबर ( गाफील ) राहू नका. कारण उभयपक्षात खरा तह असा नाही. पावसाळ्यानंतर भिमगडाचे प्रकरण समोर येईलच. आपले पुढील हित कशात आहे हे तुमचे तुम्हालाच चांगले समजेल. "[6] या पत्रावरून महमद आज्जमचा

१. PM-PP, p 48

२. शिचप्र, पृष्ठ ३२

३. कित्ता

४. HOS-JS, p 208-209, मोमसं-प, पृष्ठ ६५

५. HOS--JS, p 208--209; मोमसं–प, पृष्ठ ६५–६६

६. कित्ता

वकील रायगडला कशासाठी गेला ते समजत नाही. संभाजी कदाचित् आज्जमच्या मार्फत अकबराची औरंगजेबाकडे शिफारस करीत असावा. अशा प्रकारचा प्रयत्न गाजीउद्दीन खान व अकबराची बहीण जैबुननिसा यांच्यामार्फत १६८४ च्या अखेरीस केलेला दिसतो.[१] कदाचित् या वाटाघाटी आज्जममार्फत होत असाव्या असे वाटते. या पत्राला कलशाने उत्तर धाडलेले दिसत नाही, कारण त्यावेळी तो आजारी होता. त्याच्या आजारपणाची बातमी अकबराला कळताच त्याने दि. २०-८-१६८४ रोजी कलशाला पत्र पाठवून त्याच्या प्रकृतीची, भिमगडच्या तहाची, महमद आज्जमच्या वकिलाबरोबर काय ठरले इ. गोष्टींची चौकशी केली.[२]

अकबराला पोर्तुगीजांशी चाललेल्या तहाच्या वाटाघाटीत मध्यस्थ म्हणून घेतलेले असले तरी प्रत्यक्ष तहाच्या वाटाघाटी काय झाल्या याची माहिती नसल्याने तो त्याचीही चौकशी करतो. दि. २०–८–१६८४ ला अकबराने पत्र पाठविल्यानंतर कलशाने त्याला दोन पत्रे लिहिली. त्यांनी एके ठिकाणी भेटावयाचे ठरले असल्याने अकबर राजवाडीहून ( डिचोली ) निघाला होता. पण त्यांची भेट झाली नाही. ते दि. ३०–८–१६८४ रोजी भेटण्याचे ठरले होते; परंतु मुहरमच्या १ पासून १० ( २८ नोव्हेंबर ते ७ डिसेंबर ) दिवस मुसलमान धर्मीय सुतकाप्रमाणे पाळीत असल्याने अकबर चांगले काम हाती घ्यावयास तयार नव्हता. तो कलशास कळवितो की ती भेट ८ किंवा ९ डिसेंबरला ठरवावी. त्या दिवशी तो भेटीसाठी साखरप्याहून मलकापुरास जाणार होता. कलशाने उत्तर पाठवून तो ग्रहणानिमित्त १० डिसेंबरला कोल्हापुराला जाणार असल्याचे कळविले. तो दि. १६ ला मलकापुराला जाऊन दुसऱ्या दिवशी अकबराला भेटावयास तयार होता. दि. १७ पर्यंत ही भेट लांबविणे अकबराला पसंत नव्हते. त्यामुळे तो कलशाला कळवितो की, "आपण या महिन्याच्या १६ तारखेस मलकापुरास येऊन १७ तारखेस भेटू असेही तुम्ही लिहिले आहे. आम्ही मुहरमचे दहा दिवस थांबलो ते केवळ सुतकाचे दिवस म्हणून. हे दहा दिवस संपले की मुहरमच्या अकरा तारखेस ( ८–१२–१६८४ ) आम्ही साखरप्याहून मलकापुरास येऊ. तुम्ही पण त्या दिवशी मलकापुरास येऊन मला भेटावे. भेट झाल्यानंतर तुम्ही कोल्हापुरास जावे. विलंब लावू नये. याउपर तुमची मर्जी."[३] या पत्रावरून अकबर कलशाची भेट घ्यावयास किती उत्सुक होता हे ध्यानात येते. कवि कलश बरोबर संभाजीही ग्रहणानिमित्त कोल्हापुरास जाणार असावा. अकबराच्या पत्राप्रमाणे ( डिसेंबर १६८४ ) त्याची संभाजीसही भेटावयाची इच्छा होती. ते दोघे कोल्हापूरला गेले

१. अख : ४–१२–१६८४

२. HOS–JS, p 211, मोमसं–प, पृष्ठ ६६

३. Ibid; कित्ता

किंवा नाही हे समजण्यास पुरावा उपलब्ध नाही. परंतु संभाजी, कविकलश आणि अकबर यांची भेटही झालेली नसावी.

१६८४ च्या अखेरीस संभाजी आणि अकबर यांनी मुघलांशी तह करावयाचा प्रयत्न केलेला दिसतो. तह कशासंबंधी होता ते समजत नाही. दि. २७–११–१६८४ च्या पूर्वी केव्हा तरी अकबराकडून एक माणूस आणि संभाजीचा वकील गाजीउद्दीन खानाकडे गेले होते. आम्ही गुन्हेगार आहोत. तहाचा निरोप आणला आहे असे त्यांनी गाजीउद्दीन खानाला सांगितले. परंतु त्याला या संबंधात अधिकार नसल्यामुळे ते दोघे माघारे फिरले.[1] ईश्वरदास नागरच्या म्हणण्याप्रमाणे औरंगजेबाची मुलगी जीनतुन्निसा बेगमने अकबराला एक उपदेशपर पत्र लिहिले. त्याला उत्तर देताना शहाजाद्याने बादशहाला आणि जीनतुन्निसाला पत्रे लिहून आपल्या अपराधाची क्षमा मागितली. बादशहाने त्याला उत्तर पाठवून तुम्ही निःशंकपणे आमच्याकडे यावे असे त्याला कळविले.[2] परंतु औरंगजेबाने त्याला क्षमा केलेली दिसत नाही. १६८४ च्या डिसेंबर महिन्यात मरमय मुगलानी आणि मोहमद मोसीम यांच्या मार्फत जैबुननिसा बेगमने अकबराची विचारपूस केली. त्यानंतर अकबर आणि संभाजीच्या वकिलांची अर्जदास्त औरंगजेबाला सादर केली. त्याने स्पष्ट सांगितले की, ह्यांच्याशी तह तलवारीनेच होणार. औरंगजेबाने हुकूम दिला की मलिकशहाने अकबर आणि संभाजीच्या वकिलांस गाजीउद्दीनकडे पाठवावे. रस्त्यात त्यांना त्रास न देता सुखरूपपणे संभाजीकडे परत पाठवावे.[3]

अकबराचा औरंगजेबाशी तह करण्याचा प्रयत्न फसला. तेव्हा त्याचे वास्तव्य साखरपा आणि मलकापूर येथेच होते. दि. १८–१–१६८५ पूर्वी काही दिवस संभाजी मोहिमेसाठी खेळण्याकडे जाणार असल्याचे अकबराला कळले होते. त्या सुमारास तो संभाजीस लिहितो, " छत्रपती संभाजी राजे यांस विदित व्हावे. मुघल ( घाटाखाली ) उतरून आले. यावेळी कवी कलश यांनी ठाण मांडून झुंज दिली हे महमूदखान व खिदमत परस्तखान यांच्या लिहिण्यावरून कळले. कवी कलश हा आपला एकनिष्ठ सेवक आहे. कुणाच्या मत्सराने त्याचा नाश होईल असे परमेश्वर न करो. कवि कलशावर आपली कृपा रहावी आणि आपण त्याचे कल्याण करावे हे योग्य होय, आत्तापर्यंत मुघल माघारे परतले असतीलच. तुमच्या लिहिण्याप्रमाणे तुम्ही खेळण्याकडे रवाना झाला असाल. तसे असल्यास कळवावे

१. अख : २७–११–१६८४

२. मोमसं–प, पृष्ठ २१

३. अख : ४–१२–१६८४

म्हणजे मी पण येऊन या मोहिमेत तुमच्या बरोबर राहीन."[१] अकबराने संभाजी बरोबर मोहिमेत जावयाची इच्छा व्यक्त केलेली असली तरी तो प्रत्यक्ष मोहिमेत गेला की नाही, त्यांची गाठ पडली किंवा नाही हे समजत काही.

औरंगजेबाने किंवा जैबुननिसाने अकबर आपल्याकडे परत यावा म्हणून फेब्रुवारी १६८५ मध्ये खटपट केलेली दिसते. शेख हमीद मीर अदल व मुहमद अकबर याच्या शिक्षकास काही सांगून त्यास खिलअत देऊन अकबराकडे पाठविण्यात आले होते. त्याच्या बरोबर फर्मान देऊन त्याला परत येण्याविषयी विनंती करण्यात आली होती.[२] याच सुमारास अकबर मलकापूर किंवा साखरण्याहून शिरवळच्या बाजूस गेला असावा. कारण औरंगजेबाने फेब्रु. १६८५ मध्ये सैफुल्लाहखानास खिलअत देऊन अकबराला आणण्यासाठी शिरवळकडे पाठविले होते.

या हालचालींची माहिती ईश्वरदास नागरने पुढील प्रमाणे दिलेली आहे : "शिरवाणगडचा ( शिरवळ ) ठाणेदार बहाद्दुरखान याच्या पत्रावरून बादशहाला कळले की शहाजादा अकबर याच्या बरोबर प्रचंड सैन्य देऊन त्याला उत्तर हिंदुस्थानात पाठविण्याचा विचार संभाजी करीत आहे. ही बातमी कळताच बादशहाने शहाजादा आज्जम यास ३० हजारांचे सैन्य बरोबर देऊन अहमदनगराकडे पाठविले. अकबर त्याच वाटेने उत्तर हिंदुस्थानात जाणार होता. बादशहाने शहाजादा आज्जम यास आज्ञा केली की अकबराचीच वाट अडवावी आणि तो जाईल तेथे त्याचा पाठलाग करून त्याला कैद करावे." यावरून असे दिसते की संभाजीने अकबराला उत्तरेत पाठविण्याचा पुन्हा एकदा प्रयत्न केला असावा. शहाजादा आज्जम अकबराची वाट अडविण्यासाठी गंगापुरास ( औरंगाबाद जिल्हा ) पोचला. त्यामुळे शहाजादा अकबर घाबरला. तो साल्हेरीच्या किल्ल्याजवळ पोचला. जवळच हनवंतगडचा किल्ला होता. त्या किल्ल्याजवळ शहाजादा आज्जम पोंचून त्याने अकबराची वाट अडविली. हे पाहिल्यावर अकबराला आपला बेत सोडून द्यावा लागला. तो साल्हेरीहून कोकणात उतरला आणि माहुलीच्या किल्ल्याच्या आश्रयास जाऊन राहिला.[३]

अकबराला अशा भटक्या आयुष्याचा कंटाळा आलेला होता. तो हैराण झाला होता. बादशहापाशी दया याचना करावी असे त्याला वाटले तरी दुर्गादासाच्या सल्ल्यामुळे ते त्याला शक्य झाले नाही. शेवटी अकबर माहुलीहून कल्याण-भिवंडीला पोचला. तेथे दोन तीन दिवस थांबून तो पन्हाळगडापाशी

१. मोमसं—प, पृष्ठ ६७-६८

२. अख : —२६--२--१६८५

३. मोमसं--प, पृष्ठ २०

आला. तेथे त्याचे मुघलांशी घनघोर युद्ध झाले. त्यामुळे अकबराचा मार्ग खुंटला आणि त्याला परत डोंगराळ भागात जावे लागले. या धावपळीत तो साल्हेर, माहुली, कल्याण-भिवंडी या मार्गाने गेलेला दिसतो. तो एकदम पन्हाळ्याला जाऊन तेथे लढाई होणे शक्य वाटत नाही. भीमसेन सक्सेनाच्या म्हणण्याप्रमाणे वरील लढाई चाकणजवळ झाली असावी.

अकबराच्या उत्तरेकडे जावयाच्या प्रयत्नासंबंधी भीमसेन सक्सेना लिहितो, "शहाजादा अकबर हा संभाजीपाशी होता. बादशाही सैन्ये विजापुरात गुंतली आहेत, बादशाही मुलुखात सैन्ये नाहीत हे त्याने पाहिले. त्याने संभाजीचा सल्ला घेतला. त्याने दुर्गादास राटोड यास बरोबर घेतले. १० हजारांपेक्षा अधिक अशी मराठ्यांची फौज त्याच्या बरोबर होती. ही फौज घेऊन तो उत्तर हिंदुस्थान-कडे जाण्याच्या उद्देशाने निघाला. बादशहाने दूरदृष्टीने जाफरखान वजीर याचा नातू आणि नामदारखानाचा मुलगा मरहमतखान यास अहमदनगर येथे ठेविले होते. अकबराच्या हालचालीची त्याला बातमी लागली. त्याने त्या प्रांतातील फौजदारांना बोलावून घेतले आणि तो अकबरावर चालून गेला. चाकणजवळ प्रखर युद्ध झाले. बादशहाचे भाग्य जोरावर होते. मरहमतखानाचा जय झाला. अकबर पराजित होऊन संभाजीच्या मुलखाकडे निघून गेला.[1]

भीमसेन सक्सेना आणि ईश्वरदास नागर यांच्या तपशिलात थोडा फार फरक असला तरी दोघांच्या मताने अकबराने उत्तरेत जाण्याचा प्रयत्न केला होता. त्याची मुघली सैन्याशी लढाई झाली. त्यात त्याचा पराभव झाल्यामुळे अकबर संभाजीच्या डोंगराळ मुलखाकडे निघून गेला.

याच्या उलट श्री. वा. सी. बेंद्रे यांनी अकबराच्या हालचालीसंबंधी वेगळी माहिती दिली आहे.

(१) संभाजी राजांनी अकबराची गुजरातेत पाठवणी केली. त्यानंतर अकबर पुन्हा खाली उतरला नाही. अकबर नक्की जहाजात केव्हा व कोठे बसला हे समजत नाही. (पृ.२०८)

(२) दुर्गादास व धनाजी जाधव सैन्यानिशी इ. स. १६८५ च्या अखेरीस जाऊन त्यांनी तेथील लोकांस मिळवून भडोच घेतले. नंतर अकबर तेथे गेला. जहाजाची वगैरे सर्व तयारी होऊन राजापुराहून ती येईपर्यंत आणि इराणच्या शहाचे फर्मान मिळेपर्यंत तो तेथेच भडोच कोटात मजबुतीने राहिला. तिकडूनच तो पर्शियात गेला. (पृ. २१२)

---

१. मोआम–प, पृष्ठ ९२-९३

(३) संभाजीराजांनी दुर्गादास व धनाजी जाधव यांच्या हाताखाली आपले सैन्य देऊन अकबराच्या नावाने ते मेवाड, बुंदेलखंडापर्यंत नेऊन भिडविले होते (पृ. ५०५).

(४) धनाजी जाधवाच्या व दुर्गादासाच्या नेतृत्वाखाली मोठे सैन्य देऊन भडोच ताब्यात घेतले व तेथून राजस्थानात बंडाची ज्वाला पसरविली. (पृ.५७२)

(५) संभाजीराजे पकडले गेले असे कळल्यानंतर धनाजी हा उत्तरेतून परत आला. (पृ. ६२३)

पहिला मुद्दा श्री. बेंद्रे यांनी दि. ३०-१०-१६८५ च्या सुरतच्या पत्रावरून घेतला असावा. सुरतकर लिहितात, "सुमारे ४००० लोकांनी सुलतान अकबराच्या नावाने शहराचा ताबा घेऊन अकबरास पादशहा म्हणून जाहीर केले आहे."[१] परंतु अकबराच्या नावाने भडोचच्या बंडखोरांनी गाव ताब्यात घेऊन अकबराच्या नावानेच द्वाही फिरविली होती. हा दंगा खोजा जमातीच्या लोकांनी केला होता. तो अहमदाबादचा सुभेदार शुजाअतखान याने हाणून पाडला. अकबर, धनाजी जाधव आणि दुर्गादास भडोचला जाण्याचा संभव नव्हता.

दुसऱ्या मुद्द्यात दुर्गादास आणि धनाजी जाधव यांनी भडोंच ताब्यात घेतल्यावर अकबर तेथे गेला असे म्हटले आहे. ज्या सुभेदाराने अहमदाबादचा दंगा मोडून काढला तो अकबराला सहज पकडू शकला असता. अकबराने उत्तरेत जाण्याचा प्रयत्न केला असला तरी ग्वाल्हेरपर्यंत गेल्यावर त्याला माघारे फिरावे लागले होते. धनाजी जाधव उत्तर हिंदुस्थानात असण्याचाही संभव वाटत नाही.

धनाजी जाधव दि. १९ मे १६८७ रोजी सातारा जिल्ह्यातील बोरगाव येथे आहे. बोरगाव, सातारा जिल्हा येथील अनाजी बिन् हरजी व जानोजी बिन् तुकोजी आणि कानोजी बिन् देवजी पटेल सौजन्यसागर महामेरू राजश्री धनाजी जाधव यास आपली तकसीमेतील भागी विकताना दि. १९-५-१६८७ ला लिहितात की, "साल मजकुरी मुलुकात दुष्काळ पडिला. ऐसियासि आपणास एका दिवसाचे खावयास नाही म्हणऊन आम्ही तुम्हांपाशी येऊन आपले आत्मसंतोशे आपल्या खासा तकसीमेपैकी तकसीम घेऊन आपणास वाचविले पाहिजे."[२] या पत्रावरून धनाजी जाधव दक्षिणेत आहे हे स्पष्ट होते आणि संभाजीच्या मरणानंतर तो दक्षिणेत उतरण्याचा संभव उरत नाही.

अकबराचा उत्तरेत जाण्याचा प्रयत्न फसला. संभाजीराजेही मराठी राज्याच्या संरक्षणात गुंतल्यामुळे त्यांना अकबराकडे लक्ष देण्यास वेळ नव्हता. हिंदुस्थानात अपयश आल्यानंतर अकबराने दोन जहाजे विकत घेतली आणि राजापूरच्या

१. F. R : Sur to king 30-10-1685; 4-11-1685

२. मइसा--रा, खंड ३, लेख ५६०

बंदरातून तो १६८७ सालच्या फेब्रुवारी महिन्यात इराणकडे रवाना झाला.[१] त्याच्याबरोबर जियाउद्दीन महमद सुजाई आणि ४०–५० माणसे होती. दुर्गादास राठोडने त्याला रवाना केल्यानंतर तो स्वतः रतलामच्या प्रांतात गेला.

इराणला पोचल्यावर शहा आब्बासचा मुलगा शहा सुलेमान याने त्याचे स्वागत केले. त्याला पुष्कळ नजराणे दिले. तो तेथेच १७०४ साली वयाच्या सत्तेचाळीसाव्या वर्षी मरण पावला.[२] संभाजीकडे आश्रयासाठी आलेल्या औरंगजेबाच्या मुलाच्या आयुष्याची परवड होऊन अखेर त्याला परदेशात मरण आले. वैयक्तिक दृष्टीने पाहिले तरी अकबराचे नुकसान झाले आणि त्याच्या वागणुकीमुळे मराठे आणि मुघल यांच्या राजकारणावर दूरगामी परिणाम झाले.

अकबर संभाजीच्या आश्रयास आल्यामुळे औरंगजेबाला मराठ्यांच्याविरुद्ध शस्त्र उचलण्यास आयती संधी मिळाली. शिवाजीमहाराजांच्या कारकीर्दीत उदयास आलेले मराठ्यांचे राज्य त्याला नाहीसे करावयाचे होते. परंतु तो उत्तरेच्या राजकारणात गुंतल्यामुळे त्याला ही संधी मिळालेली नव्हती. अकबर आणि संभाजी यांची युती त्याला मोडणे अपरिहार्य होते. त्यामुळेच उत्तरेत बंदोबस्त करून अकबराला पकडण्यासाठी आणि अकबराला आश्रय देणाऱ्या मराठ्यांचा मोड करण्यासाठी तो दक्षिणेत उतरला. सर्व शक्तीनिशी दक्षिणेत येऊन औरंगजेबाने काय साधले? तो अकबराला पकडू शकला नाही. मराठ्यांचा तरी त्याला मोड करता आला का? संभाजीराजांना पकडण्यात त्याला यश आले. त्यांच्या धीरोदात्त हौतात्म्यानंतर काही काळ त्याला यश मिळाल्यासारखे वाटले. परंतु पुरेपूर पंचवीस वर्षे औरंगजेब मराठ्यांविरुद्ध लढत राहिला तरीही मराठी सत्ता तो नामशेष करू शकला नाही.

संभाजीच्या दृष्टीने विचार करू लागले तर त्याला अकबराचा किती उपयोग झाला? कै. गो. स. सरदेसाई यांचे मत असे आहे की, "Again and again did Akbar urge upon Sambhaji's attention the advisability of making a sudden sweep upon the emperor's central camp and effecting a complete rout of his powerful armies. But such a daring project required a genius like that of Shivaji to execute it. Sambhaji, brave as a lion personally, lacked the patient calcu-

१. KK-ED, p 319; मस्वायु-प, पृष्ठ १२; SM–NM–Vol II p 279–280; शिचप्र, पृष्ठ ३४

२. MA-JS, p 288

lating forethought and vigilance essential for the success of such an extensive and large scale undertaking."[1]

याच्या उलट संभाजीचे (गेल्या १०-१२ वर्षांत) चरित्र लिहिणारे श्री. वा. सी. बेंद्रे यांच्या मताप्रमाणे, "शहाजादा अकबर याचा मोंगली परचक्रास शह देण्यात संभाजीने पुरेपूर उपयोग करून घेतला." (पृ. १७४)

त्या काळचा निःपक्षपातीपणाने विचार केला तर प्रत्यक्षात संभाजीला अकबराचा फारसा उपयोग झाला नाही असेच म्हणावे लागते. अकबराजवळ आर्थिक सामर्थ्य किंवा सैनिकशक्ती नव्हती. सैन्यबल वाढविण्यासाठी संभाजीला त्याचा उपयोग झाला नाही. तो राजकारणातही मुरब्बी नव्हता. त्यामुळे त्याची सल्लामसलत घेण्यासाठी संभाजीला त्याचा उपयोग नव्हता. मुघली आक्रमणाला संभाजीराजांच्या सैनिकांनीच शौर्याने तोंड दिले. या परचक्राला तोंड देण्यासाठीही अकबराचा उपयोग झाला नाही. अकबरासारख्या आगंतुक पाहुण्याला आश्रय द्यावा लागल्यामुळे संभाजीमहाराज राज्यावर स्थिर होण्यापूर्वीच औरंगजेब मराठी राज्य नष्ट करावयाचा पण करून दक्षिणेत उतरला. त्यामुळे संभाजीराजांना सर्व शक्ती पणाला लावून औरंगजेबाचे आव्हान स्वीकारावे लागले.

आश्रयासाठी आलेल्या अकबराशी संभाजीचे संबंध कसे होते त्याची माहिती या प्रकरणात दिलीच आहे. संभाजीकडे आश्रयास जाण्याचा अकबराचा बेत पूर्वनियोजित नव्हता. बापाच्या सैन्याला चुकवीत नर्मदा ओलांडल्यानंतर त्याने दुर्गादासाच्या सल्ल्यामुळे इकडे यावयाचे ठरविले. त्यानंतर अकबराने संभाजीला पत्र लिहिले. त्याच्या दोनही पत्रांना संभाजीने उत्तरे दिली नाहीत; त्यावरून तो त्याला आश्रय देण्यास उत्सुक नव्हता असे दिसते. अकबर मराठी राज्यात आल्यानंतर सुद्धा संभाजीने त्याला थारा देण्यासंबंधी कवी कलशाजवळ नापसंती दर्शविली होती. कवी कलशाने अकबराला आश्रय देण्याचा जो सल्ला दिला तोही योग्य वाटत नाही. संभाजी राजांनीही या सल्ल्याला बळी न पडता स्वतःच्या मताप्रमाणे वागावयास हवे होते. अकबराला आश्रय दिल्यानंतर त्यांनी अंबरच्या रामसिंगाचा सल्ला विचारला. रामसिंगाने संभाजीने योग्य तेच केले असे मत पत्रात कळविले.

अकबर मराठी राज्यात आल्यावरही त्याच्याशी संभाजी राजांचे संबंध औपचारिकच होते. मात्र त्याच्या संरक्षणाची संभाजीने पूर्ण काळजी घेतली होती. अकबर त्यांच्या भेटीसाठी उतावीळ होता तरीही ते त्याची भेट घेण्यास उत्सुक नव्हते. अकबराविषयी, त्याच्या हेतूविषयी खात्री पटल्यानंतरच संभाजीने औरंगजेबाच्या रोषाची पर्वा न करता त्याची भेट घेतली. त्यानंतर संभाजीने

१. NHM-GSS, p 318

राजा रामसिंगामार्फत अकबराला दिल्लीच्या तख्तावर बसवावयाचे ठरले. त्याप्रमाणे अकबराकडे नामधारी राजेपद जाऊन सर्व सत्ता हिंदूंच्या हातात राहावयाची होती. रजपुतांनी पुढाकार घेण्याचे नाकारल्यामुळे हा मनसुबा तडीस जाऊ शकला नाही. अकबर नाचगाण्यात मग्न असता त्याने संभाजीने भेट म्हणून दिलेला कंठा त्याच्या रखेलीला दिल्यामुळे राजे रागावले. त्यांनी सैन्य काढून घेऊन त्याची तैनात बंद केली. दोघांचे संबंध दुरावले. शेवटी अकबर पोर्तुगीज हद्दीत निघून गेला. त्याने त्यांच्या मदतीने इराणला जावयाचा केलेला बेतही यशस्वी होऊ शकला नाही. त्याच सुमारास पोर्तुगीज आणि मराठे यांचे संबंध बिघडले होते. औरंगजेबाने पोर्तुगीजांना आपल्या बाजूला वळवून घेतले होते. पोर्तुगीज आणि मराठ्यांचे युद्ध चालू असताना अकबर त्यांच्या मुलखात राहणे धोकास्पद होते. शिवाय पोर्तुगीज विजरईशी अकबराचे संबंध चांगले होते त्याचाही उपयोग करून घेता येण्यासारखा होता. त्यांनी दुर्गादास आणि कवी कलश यांच्यामार्फत अकबराला इराणला जाण्यापासून परावृत्त केले. त्याला गोव्याची थोडीफार माहिती असल्याचा फायदा घेण्यासाठी संभाजीने गोव्यातील सांतो एस्तेव्हो गड घेताना त्याला बरोबर घेतले होते. त्याला एकट्याला कधीही आघाडीवर जाऊ देण्यात आले नाही. मराठे आणि पोर्तुगीज यांच्या तहाच्या वाटाघाटीसाठी त्याचा मध्यस्थ म्हणून उपयोग करण्यात आला तरी त्याला संभाजीने अधिकारपत्र दिलेले नव्हते. केवळ वेळ काढण्यासाठी अकबराला पोर्तुगीज विजरईकडे पाठविलेले होते. रायगडला घडलेल्या वाटाघाटींची त्याला माहिती दिली नव्हती. त्याचा शक्य तेवढा उपयोग करून घेताना त्यांनी अकबराला इतर राजकारणापासून अलिप्त ठेवले होते. त्याच्याशी वागताना महाराष्ट्राच्या राजाने कुठे नमते घेतले नाही की त्याच्यापुढे मान वाकविली नाही. त्याला कधीही अनावश्यक महत्त्व दिले नाही. मात्र शक्य असेल तेवढा त्याचा उपयोग करून घेतला.

* * *

# ६. मराठे, सिद्दी आणि इंग्रज

अमात्यांच्या आज्ञापत्रात मराठी राज्याशेजारी असलेल्या शत्रूंचे वर्णन यथार्थ शब्दात केलेले आहे. शिवाजीच्या राज्याला प्रथमपासून उपद्रव होत राहिला तो जंजिऱ्याच्या सिद्दीकडून. त्याबद्दल आज्ञापत्रात म्हटले आहे, " पुढे पराक्रमात राज्य हस्तवश्य करावे त्यास सन्निधवासी शत्रु म्हणजे केवळ उदरांतील व्याधि, त्याचा पराभव आधीं करावा या विचारें शामल ( सिद्दी ) केवळ राज्याचे अपायाचेंच कारण, यवनेशाचे मनोरथाचें साधन, त्या शामलाकरितां पहिले मुख्य शत्रूची कार्यसिद्धि विशेष जाहली, किंबहुना या विषम संधीमध्यें त्याने कित्येक देशदुर्गें आक्रमिली...पहिले तीर्थरूप राजश्री थोरले कैलासवासी स्वामीने शामलावर उपराळा ताम्राकडून ( यवन ) झाला, याकरिता शामल अवशेष उरला. अन्यथा त्यांचे यत्नामुळें शामलानें अवशेष उरावें काय होतें ? कोणी एक स्थळ अथवा देश परनिग्रह प्राप्त जाहला असतां उपराळी याचे बळें निर्वाह करिता तों उपराळा आधी तोडावा, त्या उपरी त्याचा यत्न करावा अशी नीति आहे. "[१] मराठ्यांच्या राज्याला सिद्दीचा नेहमीच उपद्रव होत असे. त्याच्यासंबंधी सभासदानें म्हटले आहे, " घरांत जैसा उंदीर, तैसा महाराजांचे राज्यास सिद्दी. "[२] उपद्रव देणाऱ्या या शेजाऱ्याचा उपराळा थांबविणे हे मराठी राज्यकर्त्यांचे महत्त्वाचे कार्य झालेले होते. आज्ञापत्रात सांगितलेल्या नीतीला अनुसरून शामलाचा आणि ताम्राचा–यवनाचा–विरोध घालून उपराळा थांबविणे हे एक कर्तव्य बनले. हा सर्व पराक्रम संभाजीराजांनी केला.

इंग्रज आणि इतर सावकारांबद्दल आज्ञापत्रकाराने म्हटले आहे, " साहुकारांमध्ये फिरंगी व इंग्रज व वलंदे व फरासीस व डिंगमारादि टोपीकर हेही लोक सावकारी करितात. परंतु ते वरकड सावकारांसारखे नव्हेत. यांचे खावंद प्रत्येक राज्यच करीत आहेत...तथापि टोपीकरांस, या प्रांती प्रवेश करावा, राज्य वाढवावें, स्वमतें प्रतिष्ठावी, हा पूर्णाभिमान. तदनुरूप स्थळोस्थळी कृतकार्यही झाले आहेत. त्यास ही हट्टी जात, हातास आलें स्थळ मेल्यानेही

१. आप–जो, पृष्ठ ७–८

२. सभाब, पृष्ठ ५५

सोडावयाचे नव्हेत. यांची अमदरक्रुती अडले गेले इतकीच असों द्यावी. त्यास केवळ नेहमी जागा देऊ नये. जंजिऱ्यासमीप तो या लोकांचे येणें सहसा होऊ देऊं नये. कदाचित् वखारीस जागा देणे झाली तर खाडीचे मोबारीं (तोंडी) समुद्रतीरीं न द्यावी. तसें ठिकाणी जागा दिल्याने जो पर्यंत आपले मर्यादेने आहेत तो आहेत, नाही ते समयीं आरमार, तोफा, दारुगोळा हेंच त्यांचे बळ, आरमार पाठीशी देऊन त्यांचे बळें त्या बंदरी नूतन किल्लाच निर्माण करणार. तेव्हां इतकें स्थळ राज्यांतून गेलें. याकरितां जागा देणेच तर लांब खाडी, गाव दोन गांवें राजापुरासारखी असेल तेथे फरासीसास जागा दिला होता, त्या न्यायें दोन चार नामांकित थोर शहरें असतील त्यांमध्यें जागा द्यावा. तो असा कीं, नीच जागा, शहराचे आवारी." [१] इंग्रजांनी संभाजीमहाराजांच्या कारकीर्दीत सिद्दीला मदत केली, सहकार्य दिले. त्यामुळे मराठी मुलखाला उपद्रव वाढला. सिद्दीचा बंदोबस्त करताना इंग्रजांचा अडथळा निर्माण होत असे. म्हणून या प्रकरणात संभाजीराजे, सिद्दी आणि इंग्रज यांचे एकूण संबंध कसे होते व संभाजीमहाराजांनी सिद्दीचा बंदोबस्त करण्यासाठी इंग्रजांशी कसे संबंध ठेवले होते हे पाहावयाचे आहे.

जंजिऱ्याच्या प्रांताला हबसाण असे म्हणतात. या हबसाणात जंजिरे कोट, मुरुड, नांदगाव, मांडले, श्रीवर्धन, म्हसले, गोवले आणि पंचायतन असे महाल होते. जंजिरा कोट हे या भागाचे मुख्य ठिकाण होय. त्याचे एकूण क्षेत्रफळ सुमारे ३२५ चौरस मैल आहे. हबसाणाच्या उत्तरेला कुंडलिका नदी किंवा रोह्याची खाडी, पूर्वेला कुलाबा जिल्ह्यातील रोहा, माणगाव आणि महाड तालुक्याचा भाग, दक्षिणेस सावित्री नदी किंवा बाणकोटची खाडी आणि पश्चिमेला अरबी समुद्र आहे.

शिवाजी महाराजांची सत्ता वाढू लागल्यावर त्यांना कोकणचा ताबा घ्यावा लागला. त्यामुळे त्यांचा पोर्तुगेज, इंग्रज, डच, फ्रेंच व दंडाराजपुरीकर सिद्दी या आरमारी सत्तांशी संबंध आला. त्यांना प्रतिबंध करण्यासाठी शिवाजी महाराजांनी आरमाराची वाढ केली. त्यांनी कर्नाटकच्या स्वारीनंतर पाश्चात्य किंवा सिद्दी-सारख्या सत्तेला पायबंद घालण्यासाठी आरमारी सामर्थ्य वाढविण्याचे ठरविले. या बाबतीत इंग्रज अडथळा करीत असत. सुरतकर इंग्रज आसपासच्या मुघल राज्यावर अवलंबून असल्यामुळे महाराजांना मुघलांविरुद्ध लढताना त्यांचा उपयोग होऊ शकला नाही. सुरतकर इंग्रज सिद्दीला मदत करून अडचण निर्माण करीत असत. त्यामुळे शिवाजी महाराज राजापूरच्या वखारीची नुकसान भरपाई करून देण्यास टाळाटाळ करीत होते. त्यांच्या मृत्यूनंतरसुद्धा हे नुकसानभरपाईचे

१. आप-जो, पृष्ठ २५-२६

घोंगडे तसेच भिजत पडलेले होते. संभाजी महाराजांच्या कारकीर्दीतही या प्रश्नाचा निकाल लागला नाही.

**शिवाजी, इंग्रज आणि सिद्दी :**

सुरतेच्या सुभेदाराच्या शिफारशीने सिद्दी कासम भारी होऊन इंग्रजांच्या मुंबई बेटावर आश्रयासाठी राहिला होता. तेथून तो मराठी मुलखाला उपद्रव देत असे. याबद्दल शिवाजी महाराजांनी इंग्रजांकडे अनेक वेळा विचारणा केली होती. परंतु मुघलांच्या दडपणाने व भीतीने त्यांनी मुंबईतून सिद्दीला काढण्याचे धाडस केले नाही. सिद्दीला आश्रय देणाऱ्या इंग्रजांचे पारिपत्य करावयाचे महाराजांनी प्रयत्न केले. त्यांनी सिद्दीचा परस्पर बंदोबस्त करण्याचा प्रयत्न केला. पण तो यशस्वी होऊ शकला नाही. सिद्दीचा बंदोबस्त करावयाचा असेल तर प्रथम इंग्रजांचा बंदोबस्त करणे जरूर होते. त्यासाठी महाराजांनी मुंबई बंदराजवळ असलेल्या खंदेरी आणि उंदेरी या दोन बेटांपैकी खंदेरीवर १६७८ साली तटबंदी बांधण्यास प्रारंभ केला. या तटबंदीला इंग्रजांनी विरोध केला. मुंबईहून जाणारे व येणारे कोणतेही गलबत तोफांच्या माऱ्यातून सुटणार नाही अशा ठिकाणी हा नवा किल्ला बांधण्यात आला. मुघलांनी या किल्ल्यावर हल्ला करण्यासाठी आपला आरमारी सेनापती सिद्दी कासम पाठविला होता.[1]

इंग्रजांनी मराठ्यांच्या आरमारावर हल्ला करण्यासही कमी केले नाही. इंग्रज आणि सिद्दी यांनी खंदेरी घेण्याचा प्रयत्न केला. तटबंदीच्या बांधकामात अडथळा करण्याचाही प्रयत्न केला. शिवाजी महाराजांच्या आरमारी सामर्थ्याची कल्पना आल्यामुळे इंग्रजांनी युद्ध टाळले. खंदेरीला इंग्रजांचा विरोध होताच. शिवाजी महाराजांनी राजापूरच्या त्यांच्या वखारीतील माल जप्त करून तेथील इंग्रजांना कैद केले. बचावासाठी इंग्रजांनी मराठ्यांशी वाटाघाटी सुरू केल्या. खंदेरी घेण्याचा इंग्रज आणि सिद्द्यांचा प्रयत्न फसल्यावर सिद्दी कासमने उंदेरी बेट ताब्यात घेतले. थळच्या बाजूला मारा करता यावा म्हणून त्याने तोफाही डागल्या.

दि. १८ जानेवारी १६८० रोजी शिवाजी महाराज आणि इंग्रज यांच्यात तह झाला. या तहातील अटी महत्त्वाच्या आहेत. सिद्दीच्या बंदोबस्तासाठी महाराजांनी इंग्रजांवर लादलेल्या अटींचा येथे विचार करावयाचा हेतू असा की त्या अटींमुळे पुढील काळात संभाजी, इंग्रज आणि सिद्दी यांचे संबंध आणि परस्परांची वागणूक चांगली ध्यानात येऊ शकेल. या अटी सिद्द्याच्या बंदोबस्ताबरोबरच मराठी मुलखाची होणारी नासधूस थांबावी अशा हेतूने महाराजांनी

१. शिपसार्स-ले. २२५४

घातलेल्या होत्या. त्या अटी अशा : ( १ ) तुमच्या ( इंग्रज ) मदतीने आलेले सिद्दीचे आरमार आणि तुमचेही आरमार तुम्ही काढून नेले पाहिजे. ( २ ) आपण मुघलांचे नोकर आहोत अशा सबबीवर जर सिद्दीचे आरमार निघून जात नसेल तर तुम्ही त्यांना कोणत्याही प्रकारची मदत, दारूगोळा, होड्या इत्यादी पुरवू नये. खंदेरीहून त्यांचे आरमार हलणार नाही तोपर्यंत आम्ही मुंबईत एक बातमीदार आणि दहा माणसे ठेवून तुम्ही हे कलम कसे पाळता ते पाहू. ( ३ ) नागोठणे किंवा पेणच्या खाडीत आमच्या कोणाही शत्रूला प्रवेश देऊ नये आणि आता आपले वैर चालू असताना सिद्दीने येऊन पुष्कळ कैदी धरून नेले. ते परत करण्यास त्याला सुचवावे. यापुढे कोणत्याही कारणासाठी त्याला या खाडीत प्रवेश देऊ नये. ( ४ ) सिद्दीच्या नोकरीत असलेल्या दाऊदखानाने आमच्या मुलखात येऊन आमचे पुष्कळ नुकसान केले आहे. म्हणून तुम्ही त्याला बेटावरून काढून लाविले पाहिजे.[१] हा तह इंग्रज कसा पाळतात हे पाहण्यासाठी महाराज फार काळ जगलेच नाहीत. तहानंतर २–३ महिन्यांतच त्यांचे निधन झाले.

**संभाजी राजे, सिद्दी आणि इंग्रज :**

इंग्रजांबरोबर झालेला तह ते कसा पाळतात हे पाहावयास शिवाजीमहाराज जिवंत राहिले नसले तरी त्यांचाच छावा शत्रूला जाब विचारावयास समर्थ होता. सिद्दी, इंग्रज आणि मराठे यांच्या हालचालींचा एकत्र विचार केला तर त्यांची फार चांगली कल्पना येऊ शकते. इंग्रज आणि सिद्दी यांच्या संबंधांवर संभाजी महाराज आणि इंग्रज यांचे संबंध अवलंबून असत. तिघांचा एकत्र विचार केला म्हणजे प्रत्येकाची स्वतःच्या हालचालीमागची भूमिका आणि संभाजी राजांचे त्यांच्या संबंधातले धोरण स्पष्टपणे कळते.

इंग्रजांनी हिंदुस्थानात अनेक ठिकाणी वखारी घातलेल्या होत्या. सुरतेची वखार ही त्यात मुख्य होती. मराठ्यांचा सुरतेपेक्षा मुंबईच्या वखारीशी अधिक संबंध येत असे. सुरतकर इंग्रजांची मुघल आणि सिद्दी यांना सहानुभूती असे आणि सिद्दीला ते सर्व प्रकारचे सहकार्य देत. सुरतकर इंग्रजांचे हे धोरण मुंबईकरांना पसंत नसे. परंतु त्यांना प्रत्येक वेळी सुरतकरांच्या सल्ल्यावाचून काही करता येत नसे. या संघर्षामुळे अनेक प्रश्न निर्माण होत असत.

**संभाजी व इंग्रज :**

शिवाजीमहाराजांच्या मरणानंतर इंग्रज संभाजीला भेटण्यासाठी उत्सुक असल्याने ते योग्य संधीची वाट पाहात होते. प्रारंभी संभाजी राजे पन्हाळ्याला असताना त्यांनी राजापूरला नवीन सुभेदार पाठविला होता. संभाजी राजांच्या

१. शिपसासं–क्र. २२११

हुकूमावाचून बक्षीस[१] मिळणार नाही असे त्याने तेथील इंग्रजांना सांगितले. त्यावर त्यांनी संभाजीकडे अर्ज केला. " तूर्त मला सवड नाही. सवड होताच हिशेब पाहून निकाल करू. " असे नकारदर्शक उत्तर राजांनी दिले.[२]

राजापूरची वखार बंद झाल्यावर इंग्रजांची मालमत्ता वखारीतच राहिली होती; त्यांचे नोकर अडकून पडले होते. इंग्रजांना मालमत्ता आणि माणसे सोडवून आणण्यासाठी संभाजीमहाराजांची परवानगी हवी होती. सुभेदाराकडून परवानगी मिळाली नाही म्हणून त्यांनी आपली माणसे पाठविली. परंतु सध्या अन्य कामात गुंतल्याने तुमच्या विनंतीचा विचार नंतर करीन असे सांगून महाराजांनी त्यांना परत पाठविले.[३]

दि. १८ जून १६८० ला संभाजीराजे रायगडावर गेले. इंग्रजांनी आपली माणसे रायगडावर पाठविली. त्यांनी 'बक्षिसाचा' प्रश्न काढला. राज्यात व्यवस्था होऊन थोडा स्वस्थपणा आल्यामुळे संभाजी राजांना इंग्रजांच्या अडचणी समजावून घेण्यास वेळ मिळेल आणि अनुकूल उत्तरे मिळतील अशी राजापूरकरांची समजूत होती. परंतु प्रत्यक्षात तसे घडले नाही. तेव्हा दि. १५ जुलै १६८० रोजी मुंबईकरांनी राजापूरला कळविले की, " संभाजी राजांशी किंवा त्यांच्या मंत्र्यांशी सध्या तरी बोलणी करू नये. त्याचा काही उपयोग होणार नाही. "[४] संभाजीमहाराजांनी इंग्रजांच्या मागण्यांचा ताबडतोब विचार न करता थोडा वेळ काढण्याचा प्रयत्न केला. शिवाजीमहाराजांबरोबर केलेला तह इंग्रज कशा रीतीने पाळतात आणि सिद्दीला मुंबईत थारा देतात किंवा काय हे त्यांना पाहावयाचे होते.

इंग्रजांनी शिवाजीमहाराजांशी केलेला तह पाळला नव्हता; सिद्दीचा बंदोबस्त केला नव्हता. सिद्दीच्या हालचालीही पूर्ववत चालू होत्या. तो पेण, नागोठणे या भागात लूटमार करीतच होता. तो मुंबईत राहिलाच होता. सिद्दीने

१. टीप : Bakshish--a present or a gift to an inferior; the amount paid as a reparation for the losses at Rajapur is always treated as a free gift from Shivaji and hence the use of this word. Shivaji claimed that the English had no right to such a reparation as the English factory was plundered while it was in enemy country.

२. शिपसासं-क्र. २२६३

३. ERS : Rajapur to Sur 10-6-1680; No. 509, p 313

४. Rajapur to Bom 22-6-1680; Raja to Sur 26-6-1680; Bom to Raja 15-7-1680

युद्धात पकडलेल्या गलबतांचा मुंबईत उघडपणे लिलाव सुरू केला होता. सशस्त्र लोक तेथे उतरवून तो इंग्रजांच्या पहारेकऱ्यांना अडथळा निर्माण करीत होता. सर्व प्रकारे इंग्रजांना त्रास होत असला तरी यात इंग्रजांचाही हात आहे अशी मराठ्यांची समजूत होती. सिद्दी मुंबईत राहिला तर संभाजीराजा त्याच्या गलबतावर हल्ला केल्यावाचून राहणार नाही अशी शंका मुंबईकरांनी आपल्या दि. ३ मे १६८० च्या पत्रात व्यक्त केली होती.[१] संभाजीमहाराजांच्या भीतीने मुंबईकरांनी सिद्दीचा दाणागोटा बंद करून सर्व मदत थांबविली. सिद्दीचे लोक जेरीस आल्यामुळे त्याने नागोठणे, पेण, आपटे व बद्दी येथे लुटालूट करणार नाही असा इंग्रजांशी करार केला. ऑगस्ट महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात सिद्दीने आपले आरमार बाहेर काढले.

संभाजीमहाराजांनी वरील गोष्टीसंबंधी इंग्रजांना जाब विचारला. त्याचबरोबर त्यांनी सिद्दीलाही धडा शिकविण्याचे ठरविले. दि. १८ ऑगस्ट १६८० पूर्वी काही दिवस राजांच्या २०० लोकांनी एका रात्री गुप्तपणाने अंधारातून उंदेरी बेटावर प्रवेश केला. अंधार आणि बेटावरील खाणाखुणांचा परिचय नसल्यामुळे सिद्दीला त्यांची लवकरच चाहूल लागल्याने मराठ्यांचा पराभव झाला. सुमारे ८० मराठ्यांची शिरे सिद्दीने मुंबई बेटावर आणल्यामुळे मराठ्यांच्या वकिलाला वाईट वाटले. डेप्युटी गव्हर्नरने ती शिरे किंवा कैदी मुंबई बेटावर उतरू दिले नाहीत. सर्व डोकी भाल्यावर टोचून त्यांचे किनाऱ्यावर प्रदर्शन करावयाचा सिद्दीचा अमानुष उद्देश मुंबईकरांनी सिद्धीस जाऊ दिला नाही.[२]

बखरकारांना सिद्दी आणि इंग्रज यांच्याशी झालेल्या सर्व हालचालींची माहिती नसली तरी कोठे तरी ते एखादा प्रसंग देतात. वरील प्रसंगाशी सुसंगत असा एक प्रसंग मराठी साम्राज्याच्या छोट्या बखरीत दिलेला आहे. "तो खंदेरीहून मायनायकाचा पुत्र उंदेरीवर ३०० शिपाई माणसानिशी धावून गेला. तेथे लढाई झाली. आरमार घेऊन फिरोन खंदेरीस किल्ल्यास येताना हबशी याणी मुकाबला केला. हातघाईस येऊन मायनाजी नाईक याचे पुत्राचे डोके मारून गलबतात घालून मुंबईस हबशांनी पाठविले. शेख महमद उंदेरीवर किल्लेदार होता. त्याजवर एक दोन वेळा दर्यासारंग व नाईक मजकूर यानी सरंजाम सुद्धा जाऊन हल्ला केला. परंतु बाजू सर झाली नाही. खांदेकरांची कमतीच राहिली.[३]

सिद्दीने मराठ्यांची मारलेली डोकी समुद्रावर लटकावून भीती निर्माण करावयाचा प्रयत्न केल्याची बातमी सुरतेला गेली. त्यांनाही या अमानुष कृत्याचा

१. शिपसासं–क्र. २२५६
२. Bom to Sur 18–8–1680; Sur Vol 108, p 116
३. मसाछोब–पृष्ठ ५१

राग आला. सिद्दीला मदत न करता संभाजीशी सख्य राखण्याचा आदेश त्यांनी मुंबईकरांना दिला. तरीही इंग्लंडहून सिद्दीच्या संबंधात हुकूम येईपर्यंत संभाजीशी निर्णायक बोलणी करू नयेत असे त्यांनी सुचविले.[१]

बक्षिसाच्या मागणीसाठी इंग्रजांनी जुलै महिन्यातच रायगडला नोकर पाठविले होते. हे नोकर तीन महिने तेथे राहून संभाजीमहाराजांचे पत्र घेऊन २५-१०-१६८० रोजी, राजापूरला परत गेले. त्यासंबंधी त्यांनी सुरतेला जो वृत्तांत कळविला त्याचा सारांश असा, "मूळ कराराप्रमाणे सिद्दीच्या बाबतीत इंग्रज काही करीत नसल्यामुळे इंग्रजांच्या बद्दल आपल्या मनात आदर नाही असे तो (संभाजी) म्हणतो. सिद्दीला घालवून लावीपर्यंत तो आपले काहीच काम करणार नाही. उलट पूर्वी मिळालेल्या बक्षिसाच्या रकमेची परत मागणी करील. परंतु सिद्दी बेट सोडून जाईल तर अथणीची लूट वगैरे सर्व बाबतीत पूर्वी शिवाजीच्या वेळेपासून चालले होते तसेच स्नेहाने तो चालवील असे दिसते.[२] शिवाजीमहाराजांशी झालेल्या कराराप्रमाणे इंग्रज वागत नसल्याची तक्रार संभाजी राजांनी केली होती. त्यांनी स्पष्टपणे बजाविले होते की सिद्दीला मुंबईहून घालवून दिल्याशिवाय त्यांच्या कोणत्याही मागण्यांचा विचार होणार नाही. बक्षिसाबद्दल त्यांनी अनुकूल मत व्यक्त करूनही पद्धतशीर हुकूम दिला नव्हता. डेप्युटी गव्हर्नरने सिद्दीला मुंबईच्या बंदरातून काढून, पावसाळ्यात त्याला राहू न देण्याचे, आणि तोफा, दारूगोळा वगैरे सामुग्रीचा पुरवठा न करण्याचे कबूल केले तर इंग्रजांचा बक्षिसाचा प्रश्न सुटणार होता. इंग्रजांनी तहातल्या गोष्टी पाळल्या नाहीत तर संभाजीराजे या तक्रारी दूर करण्यासाठी अन्य मार्ग अवलंबणार होते.[३]

संभाजीराजे इंग्रजांना केवळ दम देत राहिले नाहीत किंवा इंग्रजांनी विनंती केल्यावर सिद्दी जाईल किंवा त्याचा बंदोबस्त होईल म्हणून ते वाट पाहात स्वस्थ बसले नाहीत. त्यांनी राजापूरच्या वखारीजवळ सैन्य जमा केले. या सैन्याचा हल्ला होईल अशी इंग्रजांना भीती वाटत असल्याने राजापूरला अडकून पडलेल्या इंग्रजांना तेथून निघून जाता येईना.[४] राजापूरला दौलतखानाच्या आधिपत्याखाली मराठ्यांचे ४-५ हजार सैन्य असून त्यांच्याजवळ ५० गलबते

१. Sur to Bom, 3–9–1680, 8–9–1680; Bom Vol 19, p 41, 45

२. शिपसासं–क्र. २२८७

३. कित्ता–क्र. २२८७, २२९२

४. कित्ता–क्र. २२९२

होती.[१] हे आरमार सज्ज ठेवण्यात दोन हेतू होते; सिद्दीचा प्रतिकार आणि इंग्रजांवर दडपण. सिद्दीला आश्रय दिल्यामुळे संतापून राजा हे आरमार मुंबईवर पाठवील अशी शंकाही मुंबईकरांनी व्यक्त केली होती.[२]

डिसेंबरच्या पहिल्या दोन आठवड्यांत सिद्दीचे आरमार वेंगुर्ल्याकडे लुटालूट करावयास गेले होते. त्यांचा प्रतिकार करण्यासाठी दौलतखान आपले आरमार घेऊन त्यांच्या पाठलागावर गेला.[३] त्याच्या सैन्यात थोडी वाढ झाली होती. ६० गुराबे, आणि गलबते, आरमारावर ५००० आणि राजापुरात भरतीसाठी ५००० माणसे ठेवलेली होती.[४]

सिद्दीचा बंदोबस्त करण्यासाठी संभाजी महाराजांनी आपला निष्णात आणि धूर्त वकील दि. २०–११–१६८० रोजी इंग्रजांशी बोलणी करण्यासाठी मुंबईला पाठविला. त्याच्या बरोबर महाराजांनी पत्रही दिलेले होते. सिद्दीच्या मुंबईतील हालचालींवर बारकाईने लक्ष ठेवण्याची गुप्त सूचनाही त्याला दिलेली होती. आवजी पंडित वकिलाने सांगितले की, "शिवाजी महाराजांशी झालेल्या तहाप्रमाणे मुंबईकरांनी सिद्दीचा बंदोबस्त केला नाही तर संभाजी राजे इंग्रजां-विरुद्ध युद्ध पुकारतील. संभाजी राजांचा वकील आलेला पाहताच सिद्दीने आपले आरमार बंदराबाहेर नांगरले. संभाजी राजांच्या आरमाराला तोंड द्यावयाची त्याची तयारी नव्हती. सिद्दीचा कायमचा बंदोबस्त झाला नाही तर त्याच्या अमानुष लूटमारीच्या बंदोबस्तासाठी किनाऱ्यावर सतत दहा हजार माणसे निष्कारण अडवावी लागतील. संभाजी राजे इंग्रजांशी मैत्री ठेवण्यास तयार असले तरी ते यापुढे हा उपद्रव सहन करणार नाहीत. सिद्दीची मदत ताबडतोब थांबवून त्याला आरमारासह बाहेर काढले नाही आणि त्याची मदत चालूच राहिली तर महाराजांनी मुंबईवर स्वारी करण्याचा निश्चय केला आहे."[५]

संभाजी महाराजांनी इंग्रजांना जी धमकी दिली त्यामुळे सुरतकरांपुढे पेच निर्माण झाला. लंडनला माल पाठविण्याचा तोच मोसम असल्याने लंडन-कडील गलबते जाईपर्यंत संभाजी राजांच्या वकिलाला आणि सिद्दीला नाखूष करून चालले नसते. स्वार्थासाठी इंग्रज दुटप्पी धोरण ठेवून वागत होते. गलबते भरून पाठविण्याची वेळ आल्यामुळे सुरतकरांनी मुंबईकरांना दि. ८-१२-१६८० च्या

१. शिपसासं–क्र. २२९३

२. कित्ता

३. Sur to Bom 24–12–1680, 1–1–1681, Bom Vol 9, p. 3

४. Bom to Sur, 27–11–1680, Bom Vol 9, p. 52

५. Bom to Sur 27–11–1680, Bom Vol 9, p 50-52; Bom to Lon, 1–1–1681, Bom Vol 9, p 8–13

पत्रात हुकूम केला की, "संभाजीकडून आलेल्या माणसांना कामाचे महत्त्व आणि त्यांचा दर्जा यांना शोभेल असे वागवावे. मात्र तो बातमीदाराचे काम करणार नाही अशाकरिता त्याच्यावर नजर ठेवावी. त्याला गैरविश्वास न वाटेल याची खबरदारी घ्यावी. त्याला लवकरच घालविता आले तर बरे असे आम्हांस वाटते. त्याला दिरंगाई करीत टोलवीत ठेवल्यामुळे सिद्दीशी अगदीच भांडण येण्याचा प्रसंग येत नसेल तर तसाही त्याला रोखून ठेवल्यास चालेल. तात्पर्य, गलबते निघून गेल्यावर याचा काय निकाल करावा तो विचार पुढे करता येईल. तोपर्यंत सिद्दीला त्याच्या गैरवर्तनाचे दुष्परिणाम समजावून सांगून (संभाजी) राजाला समाधान वाटेल अशा त्याच्याकडून काही लेखी अटी मिळू शकल्या तर मिळवाव्या."[१]

इंग्रजांची सिद्दी आणि मराठे या दोघांनाही दुखविण्याची इच्छा नसली तरी त्यांच्या अडचणीच्या वेळी संभाजी राजांनी त्यांना दम दिल्यामुळे थोडा फार फायदाच झाला. १६८० सालच्या नोव्हेंबर महिन्याच्या शेवटी सिद्दी काही काळ मुंबई बंदराच्या बाहेर गेला. त्याच्याजवळ लोकांना देण्यास पैसा नव्हता. त्यावेळी मराठ्यांचे आरमार समुद्राचे आधिपत्य करीत होते. अशा सर्व परिस्थितीचा विचार करून इंग्रजांनी कॅ. गॅरी आणि रॉबर्ट थारविन यांना दि. २०-१२-१६८० रोजी सिद्दीशी बोलणी करावयासाठी पाठविले. त्यांनी मराठ्यांच्या प्रदेशात लूटमार न करण्याची तोंडी व लेखी वचने मोडली असल्याची जाणीव सिद्दीला करून दिली. पुढेही तो तसाच वागला तर इंग्रज त्याच्याशी शत्रुत्व स्वीकारून, मुघल बादशहाशी असलेला तह इंग्रज मोडणार असल्याचे वकिलांनी सिद्दीला बजावले. कोर्ले. नागोठणे, पेण, आपटे वगैरे भागात उपद्रव देणार नाही, असे तो लेखी लिहून देण्यास तयार नसेल तर त्याला आरमारासह मुंबईच्या बाहेर जावे लागेल असे त्याला बजावण्यात आले.[२] वकिलांच्या सूचनांचा थोडाबहुत उपयोग झाला.

आवजी पंडित मुंबईत ठाण मांडून बसल्यामुळे थोडेसे वातावरण निवळून इंग्रज आणि सिद्दी यांना जरब बसली. पाच महिने तेथे राहिल्यानंतर आवजी पंडित परत निघाला तेव्हा त्याच्याबरोबर राजाला रु. १५० किंमतीचा नजराणा आणि वकिलाला ३ वार स्कार्लेट देण्याचे ठरले. जूनच्या सुरुवातीस तो नजर-नजराणे व पत्रे घेऊन रायगडास गेला.[३]

मधल्या काळात वेंगुर्ल्याला गेलेला सिद्दी मार्च महिन्यात मुंबईस परतला. तेथूनच तो सुरतेला जाणार होता. जाता जाता त्याने ५०० माणसे व ६ गलबते

१. Sur to Bom, 8-12-1680; शिपसासं--क्र. २३००. २. Bom to Sur, 16-6-1681, Bom Vol 19, p 51-56; Orme Vol 116-117, p 257-60. ३. Cons--23-5-1681; Bom to Sur 16-6-1681

उंदेरीवर आणि ३०० माणसे माजगाव बंदरात ठेवली. या लोकांनी पूर्वीप्रमाणेच चाचेगिरी व लूटमार चालू केली. दि. १६ मार्च १६८१ रोजी सिद्दीने मुंबईस जाणारी मराठ्यांची २ गलबते आणि त्यातील ४ माणसे पकडली. मराठे सिद्दीच्या हालचालीवर बारकाईने लक्ष ठेवीत असत. चेऊलला ३००० सैन्यासह एक अधिकारी बसला होता. त्याने गलबतांची रास्त मागणी केली. ती परत न केल्यास ही हकीकत संभाजी राजांस कळविण्याची धमकी देताच मुंबईकरांनी सिद्दीकडून ती मिळवून चेऊलला पाठविली.[१]

इंग्रजांच्या सहकार्याने मुंबईत आणि उंदेरीवर राहून सिद्दी मराठी मुलखाची नासधूस करीत असल्यामुळे सिद्दीकडून उंदेरी घ्यावयाचे संभाजी राजांच्या मनात पहिल्यापासून घोळत असे. मराठ्यांची २२ गलबते आणि ३००० नाविकदल नागोठाण्यास सज्ज होते. त्यांना प्रोत्साहन मिळावे म्हणून महाराजांनीं सहा महिन्यांचा पगार अगाऊच दिला. जो मोहीम यशस्वी करण्याचा प्रयत्न करील त्याला त्याला दोन दोन शेर सोने बक्षीस द्यावयाचे महाराजांनी कबूल केले.[२] ऑगस्ट १६८० मध्ये उंदेरी काबीज करावयाचा प्रयत्न फसल्यावर दुसरा प्रयत्न करावयाचे ठरविण्यात आले. सिद्दीला उंदेरीवरून हुसकला आणि त्याला मुंबईतही थारा मिळाला नाही तर सिद्यांच्या हालचालींना पायबंद बसेल अशी संभाजी राजांची कल्पना होती.

या दृष्टीने मराठ्यांनी दि. १८-७-१६८१ ला पहाटे उंदेरीवर हल्ला चढविला. मराठे आणि सिद्दी चार तास सतत एकमेकांवर हल्ले करीत होते. त्यात काही माणसे मेली व पुष्कळ पकडली गेली. अखेर सिद्दीने हा हल्ला परतवून लागला.[३]

आतापर्यंत केवळ मराठी मुलखाचीच नासधूस करणारा सिदी दि. १६-८-१६८१ पासून इंग्रजांनाही त्रास देऊ लागला. त्याने इंग्रज दलालांकडून पैशाची मागणी केली आणि मुंबईच्या वखारीची नासधूस केली.[४] मुंबईकरांनी ही तक्रार सुरतकरांना कळविताच त्यांनी कोणाही इंग्रज नागरिकाने सिद्दीच्या नोकरीत जाऊ नये, कोणी गेल्यास त्याला दंड करण्यात येईल असा हुकूम काढला.[५] मुंबईकरांनी हा हुकूम ताबडतोब अंमलात आणला.

---

१. Bom to Sur 16-3-1681, 12-4-1681, Bom Vol 9, pp 23,27, 30
२. Bom to Sur, 16-7-1681
३. Bom to Sur, 4--8--1681
४. Bom to Sur, 16--8--1681, Sur Vol 90, p 58-60
५. Sur to Bom, 29–8–1681, Bom Vol 19, p 34

इंग्रजांनी सिद्दीला दम दिला तरी त्याची चाचेगिरी चालूच होती. इंग्रज सिद्दीचा बंदोबस्त करण्याची गोष्ट मनात घेऊन प्रामाणिकपणे प्रयत्न करीत नाहीत अशी मराठ्यांची समजूत होती. सिद्दीने केलेल्या लुटीबद्दल इंग्रजांना जबाबदार धरून मराठ्यांनी कोलैला आलेली त्यांची दहा गलबते अडविली. हे कळताच डेप्युटी गव्हर्नरने मराठ्यांच्या सुभेदाराशी वाटाघाटी केल्याने सिद्दीचे पारिपत्य करण्याचे आश्वासन दिल्यावर काही गलबते सोडण्यात आली.[१] इंग्रजांनी मुंबईत आलेल्या सिद्दीला दि. २७-१०-१६८१ ला कोलैंत लूटमार करणार नाही या अटीवर ठेवून घेतले. परंतु तो इंग्रजांच्या धमकावण्यांना मुळीच भीत नव्हता. त्याने १६८१ सालच्या डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यात मराठी हद्दीतील नागोठाण, आपटे शहरे लुटली आणि जाळली.[२]

हे कळताच नागोठाणचा सुभेदार सुंदरजी बाजी याने इंग्रजांची भात घेऊन जाणारी तीन गलबते पकडली. हे प्रकरण चिघळले असते परंतु सुंदर बाजीच्या मध्यस्थीने ते मिटले आणि इंग्रजांची गलबते सोडण्यात आली.[३] संभाजीने आपल्या किल्ल्यांत धान्याचा पुष्कळ साठा करून ठेवल्यामुळे इंग्रजांना धान्याची अडचण निर्माण झाली होती.[४]

इंग्रजांवर दडपण आणून सिद्दीचा बंदोबस्त होईना. त्याची लुटालूट चालूच राहिली. नागोठाण व आपटे येथील जाळपोळ करून सिद्दीने चेऊलच्या वरच्या भागात लूट आणि जाळपोळ केली आणि अनेकांना कैद केले. सिद्दीच्या या कृत्यांकडे संभाजी राजांचे लक्ष होते. वरवर पाहिले तर किरकोळ वाटणाऱ्या या कृत्यांनी मराठी प्रदेशाचे मोठे नुकसान होत होते. संभाजी राजांनी सिद्दी-विरुद्ध आक्रमक धोरण स्वीकारले. त्यापूर्वी इंग्रजांची त्याला मदत होणार नाही याची खात्री करून घेऊन, इंग्रजांची काही जहाजे पकडून ठेवून, त्यांना पुरेसा दमही भरण्यात आला.

उंदेरीवर चढाई न करता यावेळी संभाजी महाराजांनी जंजिऱ्यावर लक्ष केंद्रित केले. जंजिरा जिंकून घेणे ही फार अवघड गोष्ट होती. पूर्वी शिवाजी-महाराजांनी जंजिरा घेण्याचा प्रयत्न केला होता तेव्हा त्यांत त्यांनाही यश मिळाले नव्हते. त्यामुळे सिद्दी शिरजोर बनला होता. त्या किल्ल्याभोवती समुद्र असल्याने हे बेट रमणीय होते. या बेटावरील वस्ती खडकावर वसलेली आहे. ओहोटी

१. Bom to Sur, 12--10--1681, Bom Vol 9, p 94-96

२. Bom to Sur, 20--12--1681, Bom Vol 9, p 1-2; Sur Vol 108 p 28

३. Bom to Sur, 3--1--1682, Bom Vol 9, p 4

४. कित्ता

असली म्हणजे खडकावर बांधलेला किल्ल्याचा कोट थोडासा उघडा पडतो. कोटाच्या भिंती सुमारे ५० फूट उंच असून त्याच्या प्रत्येक बुरुजातील अंतर ९० फूट आहे. राजापुरीच्या किनाऱ्यापासून किल्ल्यात येण्याजाण्याकरिता नेहमी तर चालू असते. किल्ल्याच्या आत राजवाडा आहे. आत गोड्या पाण्याची दोन तळी असून रस्ते फरसबंद आहेत. दारुगोळा, तोफखाना ठेवण्याच्या जागा फार विचित्र आहेत.

शिवाजीमहाराजांप्रमाणेच संभाजी राजांनी जंजिरा सिद्दीकडून घेण्याचा प्रयत्न केला. जंजिऱ्याच्या वेढ्याच्या वेळी संभाजी राजे जातीने हजर होते. या वेढ्यासंबंधी म. रा. चिटणीस बखरीत माहिती दिलेली असली तरी संभाजी राजे स्वतः या स्वारीत होते याचा उल्लेख त्यात नाही याचे आश्चर्य वाटते.

कोंडाजी फर्जन्द याने जंजिऱ्यावर जाऊन फितुरी करतो असे म्हटल्याने त्याला तिकडे पाठविण्यात आले. तिकडे गेल्यावर त्याने चाकरी धरली. त्याने तेथे एक बटकी खरेदी केली आणि कबिल्यासुद्धा तो तेथे नोकरी करू लागला. जंजिऱ्यातील दारुखाना इत्यादींना आग लावून देण्याचा त्याचा विचार होता. कोंडाजी फर्जन्दचा हा डाव सिद्दीला कळला आणि सिद्दीने त्याचे डोके मारले. काही लोकांना बुडविले. काही पळाले. ही हकीकत संभाजी महाराजांना कळली तरीही काहीही करून जंजिरा घेतलाच पाहिजे असे त्यांनी ठरविले.[1]

१६८१ साली डिसेंबर महिन्याच्या अखेरीला संभाजी राजांनी आपल्या बरोबर शहाजादा अकबरला आणि घाटावर असलेल्या २०००० सैन्याव्यतिरिक्त मोठे सैन्य घेऊन दंडाराजपुरीला वेढा दिला. सतत पंधरा दिवस तोफांचा भडिमार केल्यामुळे कोटाच्या भिंती जमीनदोस्त झाल्या. सिद्दी आणि त्याचे लोक खडकांच्या मागे बचावासाठी लपून राहिले. या वेढ्यासंबंधी मुंबईकर लिहितात : खासा संभाजी हा वेढा चालवीत आहे. दंडाराजपुरीवर होत असलेल्या तोफखान्याच्या मारामुळे सिद्दी खैरातला तेथे निवारा न राहिल्यामुळे निसटून जावे लागणार आहे. " Sambhaji is resolved not to raise the siege so long as he hath a ragy to his back or else to gain peace. Report saith he will cleare all seas of Christians and take all places to himself. He hath got such army of men with him that hath made all provisions extraordinary dear....if Siddy winters here we must strengthen our guards and keep strict watches in all parts for the continual alarms from Sambhaji will be

१. मराचिव—पृष्ठ १३

without intermission, he being so mightily incessed against the Siddy..we can not procure enough for our inhabitants "[१]

मुघलांचा सुभेदार याकुतखान हा दंडाराजपुरीस होता. त्याने कळविले होते की, " शिवाजीचा मुलगा संभाजी याने पाच तोफा जंजिऱ्यावर लावल्या आहेत. किल्लेदाराबरोबर मुकाबला केला. तोफा चालविल्या. दारूचे गोळे किल्ल्यात सतत फेकले जात होते. प्रत्येक तोफगोळ्याचे वजन पावणे चार शेर होते."[२] या माऱ्यामुळे सिद्दी खैरात आणि सिद्दी कासम यांना एका लहान टेकडीवर आसरा घ्यावा लागला. त्यांच्या होड्या वाटेत सारख्या खेपा घालीत असल्यामुळे मराठी सैन्याला जंजिऱ्यावर जाण्यात अडचण निर्माण झाली. सैन्याला जाण्याचा मार्ग काढण्यासाठी संभाजीराजांनी आठशे चौरस वार रुंद आणि तीस वार लांब जंजिऱ्याची खाडी दगड, लाकूड, कापसाच्या गाठी यांनी भरून काढण्याचा प्रयत्न केला. परंतु त्यावेळी समुद्र खवळलेला असल्यामुळे या प्रयत्नांचा फारसा उपयोग झाला नाही.[३]

संभाजीराजांना जातीने या वेढ्यासाठी फार काळ हजर राहाणे शक्य झाले नाही. कारण अकबराला पकडण्यासाठी आलेल्या औरंगजेबाने मराठ्यांच्या सरहद्दीवरील सर्व गडकोटांना वेढे घातलेले होते. दि. ४-२-१६८२ च्या पूर्वी काही दिवस हसनअलीखान या मुघल अधिकाऱ्याने कल्याण-भिवंडीला वेढा घातल्याची बातमी कळताच संभाजी महाराजांना या वेढ्यातून अंग काढून घेणे भाग पडले. सिद्दीपेक्षाही मुघलांशी मुकाबला करणे महत्त्वाचे होते. १६८२ च्या फेब्रुवारी महिन्याच्या अखेरीस संभाजी आणि अकबर जंजिऱ्याच्या आघाडीवरून माघारे आले. राजे गांगोलीला आणि अकबर शहापूरला गेला.[४]

राजांनी जरी स्वतः या वेढ्यातून अंग काढून घेतले तरी या वेढ्याचे काम थांबविलेले नव्हते. ते त्यांनी दादाजी व विसाजी रघुनाथांकडे सोपविले. दादाजीने वेढा चालू ठेवला.[५] त्याच्याबरोबर मैया नाईक, गोविंदराव काटे,

१. Bom to Sur, 19--1--1682, Bom Vol 9, p 4-5, Sur Vol 108, p 45-46

२. अख : २४--२--१६८२

३. HF--RO, p 118

४. अख : २४-२-१६८२; Bom to Sur, 4-2-1682, Bom Vol 9, p 7–8

५. **टीप :** दादाजी आणि विसाजी रघुनाथ हे मुरार बाजीच्या वंषातले. मुरार बाजी युद्धात पडले त्याजउपरि संभाजी महाराज याजपासी आमचे वडील दादाजी व विसाजी रघुनाथ यांसी संभाजी माहाराज राजे राजपुरींचे मसलतीस रवाना करणार ते समई दादाजी व विसाजी रघुनाथ

[ पुढील पानावर

दौलतखान, कावजी मोहमद, गोविंद कान्हो, गोविंदजी जाधव आणि संभाजी पावला आणि ४००० सैनिक होते. या दुर्घट कामात उत्तेजन मिळावे म्हणून महाराजांनी अर्धा शेर सोने किंवा चांदीची कडी बक्षिस दिली. सिद्दी कासमचे आरमार मुंबईस गेल्याचे कळताच दादाजीच्या सैन्याने एके दिवशी मध्य रात्रीच्या वेळी जंजिऱ्याच्या कोटाला शिड्या लावून आत शिरण्याचा प्रयत्न सुरू केला. किल्ल्यातील लोकांनी केलेल्या दगडांच्या वर्षावात मराठ्यांचे ५०० लोक मेल्यामुळे निराश होऊन दादाजी रघुनाथ सैन्याला घेऊन निघून गेला.[1]

मराठी साम्राज्याच्या छोट्या बखरीत या वेळ्यातील हालचालींची माहिती पुढीलप्रमाणे दिलेली आहे. " ...तो जंजिरेकर हपशी यांनी बहुत शेरवी केली. त्यावर कवि कलश यांनी दादाजी रघुनाथला रवाना केले. त्याजबरोबर आरमार, माय नाईक व गोविंदराव काथे सरदार देऊन रवाना केले...दादाजी नरस प्रभू राजपुरी पावेतो (गेला.) त्याने मारगिरी साधून आगरा व पत्रदुर्ग यांजवर आरमार रोखून लगट करून मारगिरी केली. मेहेतर लोक कुंडातून आले. मोठी तोफ सव्वा खंडी दारूची होती. तिच्या योगाने आत्याजी पंत व रामाजीपंत यांनी यत्न करून हपशी जेर केला. रात्रीं पळोन जावे असे हपशी यांचे वर्तमान ऐकून तलावावरून मारगिरी करू लागले. तो कवि कलशास सरकारातून सांगितले की पैका बहुत खर्च केला. अद्यापि राजपुरी हातास येत नाही. राजे मजमदार परभूचे घरी गेले आहेत. आणि हरएक कामात त्यांचा उत्कर्ष. राजपुरीचे काम जालिया पुढे दुसरा कोणी नाही. हे विषम सरकारकुनांचे चित्ती येऊन कवि कलशासी

---

मागील पानावरून ]

याणी माहाराजांपासी मजकूर करून तुमचे वडील संक्राजी बाजी यांसी वादासी नेले-तेंव्हा शंकराजी बाजी यांनी निवेदन केले कीं वतन दादाजी व विसाजी रघुनाथ (यां)चे व आमचे आहे. परंतु आमचे वडील ...... (हि)शावर होते याचे वडील वतनावरी होते. रोजगा(रा)मुळे आमचा उपभोग वतनाचा जाला नाही. परंतु दादाजी व विसाजी रघुनाथ यांचा व आमचा मूळ पुरु(ष) एक त्यापासून वतन आहे म्हणून निवेदन केले. त्यावरून वौशावल मनास आणिता संक्राजी बाजी व दादाजी व विसाजी रघुनाथ याचे बोलणियावरून चौघांचे मतें संक्राजी बाजी व दादाजी व विसाजी यांचे मूळ पुरुष येके ठाइ होते. त्यापासोन ऐसे खरे जाहाले परंतु संभाजी माहाराज याजपासी दादाजी व विसाजी रघुनाथ यांचा सला चालत होता म्हणौन यानी तुमचे वडील संक्राजी बाजी यासी भोगवटा रोजगारा मधे नाही या अर्थावरी संक्राजी बाजी याजपासून वतनास आपला वारसा नाही म्हणोन लिहून घेतले. ( ऐसा-आ- जो, लेख ६४, पृष्ठ ९९ )

१ Car to Sur, 30-7-1682, Sur Vol 108, p 120, Orme Vol 117-18

नानाप्रकारे समजाविले. त्यांनी महाराजास सांगितले कीं दादाजी परभू याणे बहुत पैका खर्च केला. त्यास उठोन आणावे. त्याजवर महाराजांनी हुजुराचे भले लोक पाठवून हात धरून उठवून आणले. खर्च करून थोडक्यासाठी कामाचा नाश केला. आरमार होते ते घेऊन गोविंद कान्हो व मायनाक भंडारी, गोविंदराव जाधव व काथे हे उरणचे खाडीतून नागोठण्यावरून देववटणेस गेले." [१]

संभाजीमहाराजांनी वेढ्यात पुढाकार घेतला होता. खाडी भरून काढण्याची अचाट कल्पनाही कार्यान्वित करण्याचा त्यांनी प्रयत्न केला. त्यामुळे केवळ फार खर्च झाला म्हणून दादाजीला परत बोलावण्यात आले असेल असे वाटत नाही. मुघलांनी सर्वत्र आक्रमण केल्यामुळे लष्करावरील खर्च फार वाढला होता यात शंका नाही. त्यामुळे खर्च फार झाल्याने त्याला परत बोलाविले या विधानात थोडासा सत्याचा अंश असावा असेही मानण्याकडे कल होतो. कविकलशाने दादाजीला अमात्यपद देण्याचे कबूल केलेले असल्यामुळेही तो आघाडीवरून माघार घेण्यास तयार नसावा. १६८१ सालच्या अखेरीस सुरू केलेला वेढा १६८२ च्या ऑगस्ट महिन्यापर्यंत चालू होता. स्वतः महाराज आणि इतर अनेक सरदारांनी या वेढ्यात महत्त्वपूर्ण कामगिरी करूनही यश पदरात पडले नाही. शिवाजीमहाराजांच्या पावलावर पाऊल टाकून जंजिऱ्यासारखा अवघड किल्ला घेण्याचा प्रयत्न, संभाजीराजांना अपयश आले असले तरीही, कौतुकास्पद होता यात शंका नाही.

सिद्दी आणि इंग्रजांसमोर टिकाव धरता यावा म्हणून संभाजीमहाराजांनी अरबांशी दोस्ती करून त्यांचे साहाय्य घेतले. जंजिऱ्याला वेढा घालण्यापूर्वीच महाराजांनी 'एलिफंटा' जवळचे एक बेट घेऊन तेथे कोट बांधण्यास सुरुवात केली होती. जंजिऱ्याचा वेढा चालू असतानाच त्यांनी समुद्रावरून इंग्रज आणि पोर्तुगेजांना घालवून देण्याचे ठरविले होते. इंग्रजांजवळ त्यांच्या नोकरांना पुरेल इतके धान्य होते. मराठ्यांनी आपले लोक सर्वत्र ठेवल्यामुळे इंग्रजांना धान्यही महाग मिळत होते. चोरून मारून धान्य मिळविण्याचे त्यांना प्रयत्न करावे लागत होते. संभाजीराजांच्या म्हणण्यासाठीच नव्हे तर इंग्रज ज्या पेचात सापडले होते त्यासाठी सिद्दीला मुंबईत ठेवू नये असे इंग्रजांना वाटत होते. जंजिऱ्याच्या मदतीस न जाता सिद्दी कासम पावसाळ्यात मुंबईत राहणार होता. या भीतीने मुंबईकरांनी सुरतेला दि. १९-१-१६८२ ला कळविले की, "सिद्दी येथेच पावसाळा काढणार असेल तर आपल्याला चौकी पहारा वाढविला पाहिजे. संभाजीराजांकडून सिद्दीवर केव्हा छापे येतील त्याकडे जागता पहारा ठेवून लक्ष ठेवावे लागेल. संभाजीराजे सिद्दीवर फार चिडलेले आहेत. आपल्याच रहिवाशांना पुरेसे धान्य

१. मसाछेब–पृष्ठ ६०–६१

नाही मग आम्ही त्यांच्या माणसांना धान्य कोठून पुरवावे ? काही तरी करून पावसाळ्यात सिद्दी मुंबई बंदरात न राहिला तरच आम्हाला संभाजीराजांशी शांततेने व मैत्रीने राहता येईल."[१] मुंबईकरांनी इतके बजावूनही सिद्दी १६८२ च्या जानेवारीच्या अखेरपर्यंत मुंबईत राहिला. सिद्दीला मुंबईत राहू देऊ नये अशी विनंती सुरतकर इंग्रजांनी सुरतेच्या सुभेदाराजवळ केली पण ती अमान्य करण्यात आली. मात्र सुभेदाराने कोळगाव, नागोठाण, आपटे, बट्टी या भागात सिद्दी उपद्रव करणार नाही असे अभिवचन इंग्रजांना दिले होते. सिद्दीने हे करार पाळले तर संभाजीमहाराज सिद्दीचे आरमार मुंबईत राहिले तरी तिकडे दुर्लक्ष करणार होते.[२]

मुंबईकरांनी वेळोवेळी कळवूनही सुरतकर आपले सिद्दी-धार्जिणे धोरण सोडावयास तयार नव्हते. मुंबईकरांनी दुटप्पी धोरण अंगीकारावे असे ते सुचवीत होते. संभाजीची भीती बाळगण्याचे कारण नाही; सर्व बंदोबस्त करीत आहो, अरब आणि संभाजी यांच्या मैत्रीमुळे घाबरू नये, राजांशी गोडीगुलाबीने वागावे असा ते नेहमीच सल्ला देत होते. असे धोरण अवलंबून संभाजी आणि सिद्दी यांना खूष ठेवणे मुंबईकरांना जड जात होते. संभाजीराजांप्रमाणे सिद्दीही इंग्रजांकडे तक्रार करीत होता. इंग्रजांनी मराठ्यांना दारूगोळा विकल्याबद्दल सिद्दीने फेब्रुवारी १६८२ मध्ये तक्रार केली. यावेळी दुटप्पी धोरणाने कसे वागावे हे सांगताना सुरतकर दि. १०-२-१६८२ ला लिहितात, "सिद्दीची तक्रार खोटी आहे यात शंका नाही. परंतु राजांना मदत देणे जरूरच असेल तर ती गुप्तपणे द्या. औरंगजेब सध्या तिकडेच स्वारीवर आहे. त्याच्याजवळ फार मोठे सैन्य आहे. तरी सिद्दीला दुखवू नका."[३]

मुघल सुभेदार हसन अलीखान कल्याण-भिवंडीला गेल्यावर दारूगोळा, पैसा आणि धान्य यांच्या मागणीस नकार द्यावा असे सुरतकरांनी मुंबईकरांना सांगितले. त्याचप्रमाणे संभाजीमहाराजांकडे कोणीही माणूस पाठवू नये असे बजावले. १६८२ च्या फेब्रुवारीत चेऊलच्या पोर्तुगेजांनी सिद्दीला धान्यपुरवठा केल्याबद्दल संभाजीराजांनी त्यांच्याकडे विचारणा केली. पोर्तुगेजांनी इंग्रज सिद्दीला उघड उघड मदत करीत असल्याचे सांगितले. मुघलांच्या भीतीमुळे सिद्दीबद्दल काहीच हालचाल करावयाची नाही असे सुरतकरांनी ठरविले. मुघलांच्या हुकमाप्रमाणे महमुद रझाक याला मुंबईत राहू देऊन त्याची बडदास्त ठेवावी असे

१. Bom to Sur 19–1–1682, Sur Vol 108, p 456

२. Sur to Bom 31–1–1682, 10–2–1682, 12–3–1682, 24–4–1682; Bom Vol 19, pp 5, 6, 9, 11, 13

३. Bom to Sur, 10–2–1682, Sur Vol 90, p 51

मुंबईकरांना सुचविले.[१] सुरतकरांच्या सूचनांप्रमाणे वागणे मुंबईकरांना जड जात होते. ते पुन:पुन्हा आपल्या अडचणी सुरतकरांना निवेदीत होते. त्यांनी स्पष्ट-पणेच लिहिले की, सिद्दीसारख्या खुनशी आणि दुष्ट लोकांना राहू दिल्यास संभाजीराजे नुकसानीचा जाब मागतील; त्यांना तोंड देणे कठीण पडेल. आपल्या जवळ एकही जहाज नाही की सैन्य नाही. अशा परिस्थितीत संभाजीराजांसारख्या शत्रूपासून बचाव करणे कठीण आहे. त्यांनी दंडाराजपुरी घेतली तर ते किनाऱ्याचे मालक होतील. तरी सिद्दी पावसाळ्यात न राहील अशी व्यवस्था करावी.[२] यावर सुरतकरांनी मुंबईकरांना बजावले की, इंग्रजांशी व्यापार करण्यात फायदा असल्यामुळे आपण सिद्दीला मदत देत असूनही संभाजीराजे आपल्याशी सरळ वागत आहेत. असे असले तरी राजे केव्हाही छापे घालतील अशी पोटातून त्यांना भीती वाटत होतीच. त्यामुळे एप्रिल १६८२ मध्ये मराठ्यांच्या मुलखात पहारा करण्यासाठी होड्या ठेवाव्या असे सुरतकरांनी मुंबईस लिहिले.[३]

एप्रिल १६८२ मध्ये मुंबईकरांनी सिद्दीला येऊ दिले नाही. परंतु सुरत-करांच्या दडपणामुळे दि. ९ मे १६८२ रोजी सिद्दीला बंदरात घेणे मुंबईकरांना भाग पडले. सुरतकरांनी स्वतःच्या धोरणाचे समर्थन करण्यासाठी मुंबईकरांना कळविले की, " तुमच्या मदतीला आता सिद्दी ठेवलेला असल्याने संभाजीराजे आता तुम्हाला त्रास देणार नाहीत. "

संभाजीराजे आणि त्यांची माणसे सिद्दी आणि इंग्रज यांच्या हालचालीवर जागरूकपणे लक्ष ठेवीतच होती. फेब्रुवारी १६८२ मध्ये संभाजीराजांनी चेऊल येथे तटबंदी करण्यासाठी माणसे पाठविली. सिद्दी तेथे राहात असल्याने त्याच्यावर जागता पहारा ठेवण्यासाठी बरीच माणसे ठेवणे जरूर होते. परंतु गोव्याच्या व्हाइसरॉयकडून मान्यता आल्यावर तटबंदी बांधण्याची परवानगी मी देऊ शकेन असे तेथील पोर्तुगेज गव्हर्नरने सांगितले. सिद्दीला चेऊलजवळ राहण्यास इंग्रजांनी परवानगी दिलेली असून त्याला पाणी व इतर धान्यपुरवठाही केला आहे असेही त्याने सांगितले. याबद्दल संभाजी निषेध केल्यावाचून राहणार नाही असे मुंबईकरांनी सुरतकरांना कळविले होते.[४]

सिद्दी कासम मुंबईत येऊन राहिल्याचे कळताच मराठ्यांच्या आरमारातील ४० गलबते १५ मेला दुपारी २ वाजता खाडीतून बाहेर पडली. त्याबरोबर

१. Sur to Bom, 12–3–1682, 19-4–1682, Sur Vol 90

२. Sur to Bom, 12–3–1682, 19–4–1682, Sur Vol 90, pp 58-81

३. Sur to Bom, 25–4–1682, Sur Vol 90, p 83, 86

४. Bom to Sur, 25–2–1682

सिद्दीही २ जहाजे आणि ८ गलबते घेऊन निघाला. त्याचा हल्ला होण्यापूर्वीच मराठ्यांची गलबते खंदेरीवर गेली. त्यामुळे १६ मेला सिद्दी कासम माघारी गेला.

मराठ्यांनी आपली नाविक शक्तीही वाढविली होती. मायनाकाचा आणि सिद्दी संबुळचा मुलगा आणि त्याचा मेव्हणा सिद्दी मिस्त्री यांच्या हाताखाली ८५ गलबते आणि ५००० माणसे होती. हे आरमार उंदेरी, चेऊल किंवा मुंबईतील सिद्दीच्या आरमारावर झडप घालण्यासाठी टपून बसलेले होते. मुंबईचे एक ठाणे मराठ्यांनी खंदेरी जवळ लुटले आणि जळाऊ लाकडे नेणारी एक होडी मे महिन्याच्या अखेरीस जाळली. जून महिन्याच्या अखेरीस महाराजांनी आपले ५ हजार सैनिक थळ येथे ठेवले होते. त्याच रात्री हल्ले करून या सैन्याने उंदेरी घेण्याचा प्रयत्न केला. परंतु उंदेरीवरून सिद्दीने तोफा उडविल्यामुळे मराठ्यांच्या गलबतांना माघारे फिरावे लागले.[1] संभाजीराजांच्या खंदेरी येथील आरमाराने आठ महिन्यांत इंग्रजांचे रु. ४५०० चे नुकसान केले होते. रक्षणासाठी त्यांना वेगळा खर्च करावा लागला होता.[2] संभाजीराजांनी मुंबईजवळच्या आणखी एका खडकाळ बेटावर तटबंदी उभारण्याचा प्रयत्न चालविला होता. अलीबाग किनाऱ्याजवळ सुमारे दोन मैलांवर असलेला ‘ कुलाबा कोट ’ हे ते ठिकाण असावे.

इंग्रजांना वारंवार सांगून, धमक्या देऊन, सिद्दीच्या प्रदेशात आक्रमक हालचाली करूनही सिद्दीची लूटमार थांबलेली नव्हती. मुंबई बंदरात थारा मिळत असल्याने मराठी मुलखात त्रास देणे त्याला सोपे जात होते. त्याने कोर्लै येथे लूट करून ती उंदेरीला नेली होती. इतकेच नव्हे तर त्याने दि. २८–८–१६८२ रोजी नागोठाण्यास जाऊन अनेक लोकांना त्रास दिला, बऱ्याच लोकांची नाके कापून एका हवालदाराला पकडून मुंबईस नेले. संभाजीच्या भीतीने मुंबईकरांनी त्याला उंदेरीस नेण्यास सांगितले.[3] त्याच्या या कृत्यांनी रागावून मराठ्यांनी दौलतखान व त्याचे ८० गलबतांचे आरमार नागोठाण्यास हजर ठेवले होते. सिद्दी मिस्त्री ३० गलबते घेऊन सज्ज होता. तो दि. ४–१०–१६८२ रोजी कोर्लै येथील भात आणण्यासाठी नागोठाण्याहून बाहेर पडला. सिद्दीला हे समजताच त्याने सिद्दी कासमच्या नेतृत्वाखाली १६ गलबते मराठ्यांच्या गलबतांवर पाठविली. कोलगावजवळ चकमक उडून मराठी आरमार माघारी फिरले. सिद्दीने मराठ्यांची ७ गलबते, ४५ माणसे आणि याकूबखानाचा मुलगा सैदी संबूल यांना कैद केले. याशिवाय जखमी झालेला सिद्दी मिस्त्रीही पकडला गेला. माजगावला नेण्यात आल्यावर मुंबईकरांनी त्याला औषधोपचारासाठी

१. FR; Bom to Sur, 16–5–1682

२. FR: Bom to Sur, 24–7–1682

३ FR: Bom to Sur, 28–8--1682

ठेवून घेतले. तों दि. ५–१०–१६८२ रोजी मरण पावला.[१] ही बातमी सुरतचा मुत्सद्दी कारतलबखान यास कळविण्यात आली होती. बरा झाल्यावर सिद्दी मिस्त्रीला त्याच्याकडे पाठविण्यात येणार होते. त्याच्या बरोबरच्या माणसांत जे लोक मुसलमान असतील त्यांना जीवे मारू नये. जे हिंदू मुसलमान होत असतील त्यांना कैदेत ठेवावे. जे मुसलमान होण्यास नकार देतील त्यांना ठार करावे.[२]

सिद्दीला सर्व प्रकारची मदत देण्यास सुरतकर मुंबईकरांना सांगत होते. रु.१००००,सर्व प्रकारचा माल आणि सिद्दीची कुटुंबे मुंबईत राहू द्यावी असेही सुरतकरांनी बजाविले.[३] सुरतकरांचे हे धोरण पसंत नसल्याने मागील वेळेप्रमाणेच याही वेळी सिद्दीचे लोक राहिल्याने अन्नाचे दुर्भिक्ष वाढेल, दुष्ट लोकांना आसरा देऊन त्यांच्याशी सामोपचाराने वागणे कठीण असल्याचे मुंबईकरांनी कळविले.[४]

सुरतकरांच्या या धोरणामुळे मुंबईकरांच्या पोटात भीती वाटत होती. ते दि. ५–१०–१६८२ रोजी लिहितात, "सिद्दी संभाजी राजांची सारखी आगळीक करीत आहे. तो येथून गेल्यावर मात्र आमची धडगत राहणार नाही, तरी सैनिक आणि आरमारी मदत ताबडतोब पाठवावी. संभाजी राजांनी अन्नधान्य आणण्याची सक्त मनाई केलेली असून पोर्तुगेजांनीही मुंबईला धान्य देऊ नये म्हणून जाहीरनामा काढला आहे."[५] सुरतकरांनी मुंबईकरांच्या अडचणीकडे लक्षच दिले नाही.

सिद्दीच्या संबंधात बोलणी करण्यासाठी आणि इंग्रजांची मैत्री संपादण्यासाठी संभाजी राजांनी आपल्या वतीने न्यायाधीश प्रल्हाद निराजीला पाठविण्याचे ठरविले. मुघल सैन्य कल्याण–भिवंडीला वेढा देऊन बसलेले होते. मुघलांनी सर्वत्र आक्रमक पवित्रा घेतलेला होता. अशा वेळी सिद्दी, इंग्रज आणि मुघल एक झाले तर मराठी राज्याला भयंकर धोका उत्पन्न होण्याची भीती होती. अशा परिस्थितीत इंग्रजांची मैत्री संपादून मुघलांना मदत करण्यापासून त्यांना परावृत्त करणे आवश्यक झाले होते. या दृष्टीने आपण होऊन संभाजी महाराजांनी प्रल्हादपंतांना इंग्रजांकडे पाठविण्याचे ठरविले असावे असे दिसते. दि. २४–१०–१६८२ पूर्वी ते महाराजांचे अनेक निरोप घेऊन इंग्रजांना भेटण्यासाठी निघाले. त्यांनी महाराजांचे अनेक हुकूम इंग्रजांना कळविले. मराठे इंग्रजांना पैशाची व सैन्याची ( मुंबईच्या संरक्षणासाठी असावी ) मदत करावयास

१. Bom to Sur, 5–10–1682
२. अख : ४–११–१६८२
३. Sur to Bom, 3–9–1682
४. Bom to Sur 29–9–1682
५. Bom to Sur, 5–10–1682

तयार होते. त्यांची मैत्री मिळविण्यासाठी संभाजी राजे इंग्रजांची झालेली नुकसानी, त्यांनी आपली माणसे पाठविल्यास भरून द्यावयासही तयार होते. या विषयांबरोबरच महाराजांना दुर्मिळ वस्तू, कुत्री, लहान मोठी पिस्तुले, मोठे बिलोरी आरसे इत्यादी गोष्टी हव्या असल्याचेही प्रल्हादपंतानी सांगितले.[१]

प्रल्हादपंतांच्या मागण्यांना मुंबईकरांनी ताबडतोब उत्तर दिले नाही. त्यांनी दिलेली पत्रे सुरतेला पाठविली. सुरतेहून उत्तरे येईपर्यंत मुंबईकरांनी प्रल्हादपंतांना १५ दिवस ठेवून घेतले. प्रल्हादपंत मुंबईस असताना महाराजांनी त्यांच्याकडे दोन दूत पाठविले होते. सिद्दी त्यांच्या प्रदेशात रोज त्रास देऊन माणसे पळवीत असल्याचे समक्ष पाहिल्याचे या दूतांनी सांगितले. मुंबईकरांनी आम्ही वारंवार सिद्दीकडे तक्रारी करीत आहो, असे त्यांना सांगितले. इंग्रजांजवळच दाणागोटा नसल्याने ते सिद्दीला मदत करण्यास असमर्थ होते. सिद्दीने मुघल आरमार येण्यापूर्वीच लुटालूट करून स्वतःची भर करण्याचे ठरविले होते. त्यामुळे मुंबईकरांनी मुघल आरमार येण्यापूर्वीच स्वसंरक्षणाच्या खटपटीस लागल्याचे सुरतकरांना कळविले.[२] सिद्दी जोपर्यंत सुरतेला परत जात नाही तोपर्यंत महाराजांनी आपल्या मुलखातून धान्य नेऊ देण्यास सक्त मनाई केली होती.[३] या सर्व अडचणींची मुंबईकरांनी कल्पना दिली. मुंबईकरांच्या अडचणींचा विचार करून, संभाजी राजे किंवा त्याचे मंत्री यांवर विश्वास ठेवू नये, मराठी पत्रांची इंग्रजी भाषांतरे करून पाठवावी, या सूचनांसह महाराजांच्या पत्राचे उत्तर लिहून वकील पाठविल्याचे सुरतकरांनी कळविले. त्यांचे दुसरे पत्र आल्याशिवाय इंग्रज वकील पाठवू नका, आणि मराठ्यांच्या वकिलाजवळ गोड गोड बोलून धान्य आणविण्याची परवानगी मिळवा असे मुंबईकरांना बजावले.[४]

सुरतकरांनी प्रल्हाद निराजी बरोबर हेन्री स्मिथला पाठविण्याचे ठरविले. मुंबईहून आणखी कोणी तरी त्याच्या बरोबर जाणार होते. सुरतकर राजांना फार भारी किंमतीचे बक्षीस द्यावयास तयार नव्हते. चंदी प्रदेशातल्या बंदराशी व्यापार करण्यासाठी फर्मान मिळविण्याविषयी, कारवार येथील इंग्रज वखारीस त्रास देणाऱ्या सुभेदाराची बदली करण्यासंबंधी आणि संभाजी राजांना हव्या असलेल्या चापाच्या बंदुका आणि पिस्तुले शिल्लक नसल्याचे कळविण्यास त्यांनी मुंबईकरांस सूचना दिल्या होत्या.[५]

१. FR: Bom to Sur, 23–10–1682, 27–10–1682
२. FR: Bom to Sur, 31–10–1682
३. Ibid
४. FR: Sur to Bom, 6–11–1682
o Bom, 17–11–1682

सुरतकरांचे हे पत्र बरेच उशिरा पोचल्यामुळे प्रल्हाद निराजी वाट पाहून कंटाळला होता. तो तेथे फार काळ राहण्यास तयार नव्हता. प्रल्हादपंताबरोबर आपण वकील पाठविला नाही तर संभाजी राजे आणि त्यांचे अधिकारी अपमान झाल्याचे समजतील अशा आशयाचे पत्र मुंबईकरांनी पाठविले आणि बक्षिस आणि माणसे ताबडतोब पाठवावी असे सुरतकरांना बजावले.[१]

मुंबईकरांजवळ हेन्री स्मिथबरोबर पाठविण्यास माणूस नव्हता. राजांना बक्षिस देण्यासारख्या चांगल्या वस्तू त्यांच्याजवळ नव्हत्या. राजांना चांगले बक्षिस पाठवावे अशी मुंबईकरांची इच्छा होती. इंग्रज सिद्दीला सर्व प्रकारची मदत करीत होते. ते पाहिल्याने प्रल्हादपंतही चिडलेले होते. सिद्दीच्या उपद्रवाला कंटाळून मराठ्यांनी गुरेढोरे आतील भागात दूरवर नेलेली असल्यामुळे, इंग्रजांना राजांच्या मुलुखातून तेल-तूपही मिळत नव्हते इत्यादी गोष्टींसंबंधी मुंबईकरांनी तक्रार केली.[२]

बऱ्याच विनवण्या करून बक्षिसाच्या वस्तू आल्यावर दि. २०-१२-१६८२ रोजी प्रल्हादपंत, स्मिथ आणि त्याच्या बरोबरील माणसांची रवानगी करण्यात आली. वाटेत सिद्दीने त्यांना अडविल्यामुळे ते सरळ जाऊ शकले नाहीत. दुसऱ्या दिवशी एक शिबार बरोबर देऊन ‘ बलून ’ मधून त्यांना करंजाला पाठविण्यात आले. ते करंजाला न जाता नागोठाण्यास गेले. सिद्दीच्या चार गलबतांनी त्यांना अडविले. शेवटी इंग्रजांनी प्रल्हादपंताला लपवून ठेवले. शिबार, त्यातील प्रल्हादपंताचे सामान आणि राजाचे नजराणे घेऊन सिद्दी उंदेरीला गेला. प्रल्हादपंतांना ढोपरभर चिखलात उतरून किनाऱ्यावर जावे लागले.[३] अशा तऱ्हेने दोन महिन्यांनी प्रल्हादपंत सिद्दीच्या तावडीतून सुटून परत आले.

मुंबईच्या मुक्कामात सिद्दीच्या हालचालींचा, सुरतकरांच्या काळकाढूपणाचा, त्यांच्या सिद्दी–धार्जिण्या धोरणाचा प्रल्हादपंतांना प्रत्यय आला होता. प्रल्हादपंत चांगलेच चिडले होते. याच सुमारास मुघलांचे आरमार मुंबईत यावयाचे असल्याने सिद्दीने त्यापूर्वीच बाहेर पडण्याचे ठरविले होते. मुंबईकरांच्या तोफांच्या टप्प्याबाहेर तो नांगरून राहिला. त्याची मराठी मुलखात पूर्ववत लूटमार चालूच होती. त्याने पेण येथे लुटालूट करून २०० माणसांना कैद केले होते; जखमी लोकांना माजगाव येथे टाकले होते. या गोष्टींचा सुरतकर काहीच बंदोबस्त करीत नव्हते. अशा परिस्थितीत संभाजी राजांकडून चांगली, मैत्रीची वागणूक मिळणार नाही असे मुंबईकरांनी सुरतकरांना बजावले.[४]

१. FR: Bom to Sur, 21–11–1682

२. FR: Bom to Sur, 29–11–1682

३. FR: Bom to Sur, 20–12–1682

४. FR: Bom to Sur, 28–12–1682, O. F. p 150

डिसेंबर १६८२ च्या सुमारास संभाजी विरुद्ध लढत असलेल्या अधिकाऱ्यांना दाणागोटा पुरविण्यासाठी मुघल आरमार मुंबईला गेले. या आरमारात २२ मोठी जहाजे, ११० गुरावे आणि १२००० माणसे होती.[१] त्यांनी मुंबईकरांना त्रास दिला. त्यांचा बंदोबस्त मुंबईकरांना करावा लागला; तरी मर्यादेपलीकडे त्यांना काहीच करता आले नाही. मुंबईत मुघल आरमार आल्यावर सिद्दीविरुद्ध आक्रमक धोरण चालू न ठेवता मराठ्यांना संरक्षणात्मक धोरण आखणे भाग होते. इंग्रजांचेही धोरण सिद्दी आणि मुघल यांच्याचकडे कलते असल्यामुळे संभाजी राजांना न दुखविता त्यांना वळवून घेणे भाग होते. इंग्रज आणि मराठे यांचे संबंध बिघडलेले नव्हते. तरी १६८३ सालाच्या सुरुवातीस असा एक छोटा प्रसंग घडला की त्यामुळे इंग्रज आणि मराठ्यांच्यात चकमक उडाली. इंग्रजांचे 'प्रेसिडेंट' हे जहाज मलबारच्या किनाऱ्यावरून मुंबईस जात असताना अरब आणि मराठे यांनी त्या जहाजावर हल्ला केला. त्यात ११ इंग्रज मेले आणि ३५ जखमी झाले. ते जहाज पोर्तुगेजांचे असावे असे समजून त्यावर हल्ला करण्यात आलेला होता. या चकमकीत मराठ्यांची ३ गलबते बुडाली. काही दिवसांनी 'प्रेसिडेन्ट' सुरतेला गेले.[२]

प्रल्हादपंतांबरोबर हेन्री स्मिथ फर्मान आणण्यासाठी रायगडावर गेला. तो २–३ महिने मराठी मुलखात राहिला. त्याच्याबरोबरच संभाजी राजांच्या सही–शिक्क्याचे फर्मान येईल असे सुरतकरांना वाटत होते. ते उत्सुकतेने वाट पाहात होते. या संबंधात प्रल्हादपंताने ८ ऑक्टोबरपूर्वी चार्लस वॉर्डला पत्र धाडले होते. त्याचे प्रथम पोर्तुगीज भाषांतर होऊन नंतर त्याचे इंग्रजी भाषांतर करण्यात आले. इंग्रज वकील कसा वागला यासंबंधांत प्रल्हाद निराजी लिहितो, "इंग्रज वकील आणि राम शेणवी येथे आल्यावर एक करार होऊन तो आणि इतर पत्रे तयार झाली. इंग्रजांना द्यावयाचा शिरपाव (मानाची वस्त्रे) तयार होता. वकिलाने परतण्याची घाई दाखविल्यामुळे त्याला जाण्याची परवानगी दिली. नंतर शिरपाव आणि पत्रे नेण्यासाठी वकिलाला निरोप पाठविले पण कोणी आले नाही. राम शेणव्याला पाठविल्यास आम्ही शिरपाव व पत्रे पाठवू. आम्हाला करार मान्य आहे. स्मिथ बरोबर आमचा वकील येऊन आम्हाला करार मान्य असल्याचे सांगेल."[३]

प्रल्हादपंताने स्मिथच्या वागणुकीबद्दल दोष दिल्याने स्मिथने पत्र पाठवून आपली बाजू मांडली. तो दि. २७–१०–१६८३ च्या पत्रात लिहितो, "मी

१. FR: Bom to Lon, 8–1–1683
२. FR: Sur to Lon, 10–4–1683; Sur to Persia, 20–2–1683
३. FR: Bom to Sur, 8–10–1683

निघण्यापूर्वी तीन दिवस सगळी कागदपत्रे तयार झाली होती. मला रात्री १० वाजता राजवाड्यात बोलाविले. तेथे राजाने पोषाख देऊन मला जावयास सांगितले. मी पत्रे माझ्याजवळ देण्यास सांगितले पण त्यांनी उत्तर दिले नाही. मी तीन वेळा विनंती केल्यामुळे राजे रागावले. मला त्यांनी जाण्याची आज्ञा दिली....राजे कल्याण-भिवंडीकडे जाण्यासाठी तातडीने निघाले...मी राम शेणव्याला मागे ठेवण्यास तयार होतो; परंतु राजे ऐकेनात. फक्त वकिलाने राम शेणव्याचा एक नोकर मागे ठेवावयास सांगितले. प्रल्हादपंताने मला चेऊल येथे २-३ दिवस राहावयास सांगितले होते. जमल्यास कागदपत्रे तो तेथे पाठविणार होता. मी अद्याप तेथेच अडकून पडलो असतो...त्याचा तो दिवस फार उशिरा उगवला असता. कारण राजे त्याच दिवशी रात्री रायरीहून निघून पाच्छापुराहून लगेच कल्याणच्या टेकडीजवळच्या मढगढीस गेले....खर्चासाठी खिशात पैसा नसताना मी पायाने वाट तुडवीत गेलो असतो. शिवाय तसे करण्याने राजांच्या स्पष्ट हुकमांचे उल्लंघन होऊन राजे नाखूष झाले असते."[१]

स्मिथला चेऊलला राहण्यास सांगितले असता त्याने आपण होऊन जाण्यासाठी राजांची परवानगी मागितली होती. प्रेसिडेन्ट जहाज आणि मराठ्यांची गलबते यांच्यात झालेल्या चकमकीसंबंधात राजे विचारतील तर त्याला उत्तर देण्यास स्मिथ घाबरला. त्याला सर्व गोष्टींची लाज वाटली. कविकलश किंवा इतर सरकारकुनांना न विचारता तो निघून गेला. शेवटी सुरतकरांनी कोणी तरी प्रभू किंवा शेणव्यास पाठवून फर्मान आणावयास सांगितले.[२]

संभाजी राजांनी इंग्रजांच्याच पद्धतीने फर्मान व सहीशिक्क्याचे कागद द्यावयाची टाळाटाळ केली. प्रल्हादपंताला मुंबईत जसे अडकून पडावे लागले होते तसेच हेन्री स्मिथला बरेच दिवस अडकवून ठेवण्यात आले होते. प्रल्हाद निराजीला दिलेल्या वागणुकीमुळे स्मिथशी वागताना संभाजी राजांनी थोडीशी घुश्श्यात बोलणी करून आपला राग व्यक्त केला होता.

मुंबईकरांनी वरचेवर सांगूनही सुरतकरांनी सिद्दीचा बंदोबस्त केला नव्हता. परंतु संभाजी महाराजांनी पोर्तुगेजांविरुद्ध गोव्यात स्वारी केल्यावर सिद्दीला ऑक्टोबर १६८३ मध्ये वेंगुर्ल्यास जावे लागले. त्यामुळे काही काळ त्याचा उपद्रव कमी झाला होता.[३] मुंबईत मुघल आरमार आल्यावर त्यांना जास्तच धोका वाटू लागला. त्याच सुमारास मराठ्यांनी माहीम, कोळवा, दंतोरा, सारगाव,

१. FR: Henry Smith's answer, 27-10-1683

२. FR: Sur to Bom, 29-10-1683; Pralhad Niraji to Bom, 16-2-84

३. FR: Sur to Bom, 2-10- 1683, 29-10-1683

सुपारा, ही ठाणी घेतल्यामुळे मुंबईकरांना धास्ती वाटू लागली.[१] मराठ्यांनी करंजा घेतल्यानंतर इंग्रजांना सुरक्षिततेची काळजी वाटू लागून त्यांचा धीर सुटला. १६८३ सालच्या अखेरीस संभाजीच्या फौजांनी मुंबईजवळ येऊन मुंबईला घेरलेच होते. सुरतकरांनी मुंबईच्या संरक्षणाची काहीच व्यवस्था केलेली नसल्यामुळे मराठ्यांनी हल्ला केला असता तर त्यांचे संरक्षण होणे कठीण होते. केवळ कोटाच्या भिंतींचेच त्यांना संरक्षण होते. मुंबईकरांची परिस्थिती इतकी वाईट झालेली होती की त्यांच्याजवळ रहिवाशांना पुरेल इतकीहि अन्नसामग्री नव्हती. संभाजी राजे नागोठाण्यास २००० माणसे सज्ज ठेवून योग्य संधीची वाट पाहात होते. राजांना तटबंदी करण्यासाठी अनेक ठिकाणे होती. भीतीमुळे मुंबईकरांना या संकटाला कसे तोंड द्यावे हे कळेना. मुंबईजवळच्या एका बंदराचा मराठ्यांना ताबा मिळाल्यामुळे मुंबईकर घाबरले आणि त्यांनी यातून मार्ग काढण्यासाठी सुरतकरांना सल्ला विचारला.[२]

या गंभीर परिस्थितीची कल्पना देऊनही सुरतकरांनी काहीच बंदोबस्त केला नाही. उलट त्यांनी दि. ३०–१२–१६८३ च्या पत्रात मुंबईकरांना कळविले की, "संभाजी राजे आजपर्यंत आपल्याशी भांडले नाहीत तेव्हा इतरत्र ते लढाईत गुंतलेले असताना आजच आपल्याशी कुरापत काढतील असे वाटत नाही. करंजाहून मुंबई बेटावर येण्यास ते काही समुद्राचे मालक झालेले नाहीत. संभाजीराजांच्या मुलखातून तुम्हाला मुबलक तांदूळ मिळत असताना तुम्हाला गुरेढोरे आणि मांस कशासाठी हवे ? हल्ली आपला राजांशी तह झालेला आहे. त्यांच्या बापाबरोबर जेव्हा लढा चालू होता आणि राजांचे आरमार आपल्या आखाताजवळ होते तेव्हाही असली भीती आणि तक्रारी उद्‌भवल्या नव्हत्या. सिद्दीचे आरमार सुरतेला गेल्यामुळे शत्रूची आता भीती नाही."[३]

सुरतकरांच्या धोरणामुळे मुंबईकर कंटाळले होते. रहिवाशांनी कंटाळून शेवटी तेथे बंड केले. चाइल्ड आणि वॉर्ड यांच्या जुलमी वर्तणुकीमुळे मुंबईकरांचे जीवित धोक्यात होते. त्यामुळे मुंबईत सरकारी अंमल सुरू करावा लागला होता. ईस्ट इंडिया कंपनीची सत्ता झुगारून देऊन त्या लोकांना मिळणाऱ्या जुलमी आणि अन्याय्य वागणुकीमुळे त्यांनी क्रांती केली. दि. २८-१२-१६८३ रोजी इंग्लंडच्या चार्लस राजाने मुंबई बेट ताब्यात घेतल्याचे जाहीर केले. आणि मुंबईला गव्हर्नर म्हणून रिचर्ड केजविनची नेमणूक करण्यात आली.[४] त्याने गव्हर्नर होताच

१. FR: Bom to Sur, 23–12–1683
२. FR: Bom to Sur, 23–12–1683
३. FR: Sur to Bom, 30–12–1683
४. FR: Bom-30--2--1684; Proclamation--24--12--168?

मराठ्यांबरोबर ठेवलेले धरसोडीचे, दुटप्पी धोरण सोडून खंबीर धोरण स्वीकारले. संभाजीराजांशी मैत्री करून मुंबईच्या संरक्षणाची सर्व जबाबदारी त्याने घेतली. १६८३ साली मराठे आणि पोर्तुगेज यांचे युद्ध सुरू झाले होते. सिद्दी आणि पोर्तुगेज एक होऊन त्यांनी चेऊल प्रांतातील कुदे, बापोली, आणि सिडकोली ही गावे लुटली. त्यांनी इतकी लूटमार केली की तेथील रहिवासी परागंदा झाले.[१] चेऊल येथे श्री उत्तर नारायणाची प्राचीन मूर्ती सेणव्याकडे होती. सिद्दी व पोर्तुगेज यांच्या धामधुमीत त्याने ती भूमिगत केली होती. पुढे पाऊणशे वर्षांनी म्हणजे १७७५ च्या सप्टेंबर महिन्यांत हरिजन खत्री यांचे वाडीमध्ये दांडा घोड नाईक...जस नाईक खणीत असता त्याला १६८३ मध्ये पुरलेली मूर्त लागली. ते देवालये अपूज्ये जाणून अलिबागास मुहर्त आणून देवालय बांधिले.[२] या हालचालीची माहिती चेऊलच्या बखरीत आढळते. ती अशी : शके १६०४ ते १६०७ (सन १६८२ ते १६८५) संभाजी राज्य करीत असता हबशी फौज घेऊन आरमारासह पालवचे खाडीत आला. तेथून रात्रीचे समयी छापा घालून चेऊलची धरें दग्ध केली. मालमत्ता लुटून नेली.[३]

मुंबईच्या बंडाची हकीकत वॉर्डने सुरतेला कळविली. " मुंबईचे रहिवाशी सुरतकरांवर चिडल्याचे आणि गव्हर्नर केजविन हा मुंबई बंदर संभाजीराजांना ४०००० पागोड्यांना विकणार असल्याचे त्याने लिहिले होते.[४]

केजविनने चार्लस राजाला संभाजी, पोर्तुगेज यांच्यातील लढ्याची माहिती कळवली. इकडील राजकीय परिस्थितीचीही कल्पना दिली. याशिवाय संभाजी-राजांच्या शक्तीची, त्यांच्या मागण्यांची माहिती त्याने राजाला कळविली होती. केजविनचे हे पत्र महत्त्वाचे आहे. तो दि. २८-१-१६८४ च्या पत्रात लिहितो, " आपल्या शेजारी असलेल्या संभाजीसारख्या बलवान राजाने पोर्तुगेजांचा ४० मैल लांबीचा प्रदेश बेचिराख करून लिंगभेद न मानता ख्रिश्चनांची कत्तल केली आहे. आता तर त्याने आपल्या ताब्यातील एलिफंटा आणि करंजाही घेतले आहे. ३०००० सैन्य घेऊन **आपला बलवान शेजारी, संभाजी,** सरहद्दीवर आपल्याला धमकी देत आहे. आमच्याजवळ फक्त १५० इंग्रज आणि २०० काळे टोपीवाले (टोपासी) आहेत. मुंबईत राजकीय बदल झाला तेव्हा संभाजी राजांचा एक वकील मुघलांच्या कैदेत होता. त्याचा शिरच्छेद करावयाचा त्यांचा विचार होता. परंतु मुंबईत तुमचा अंमल सुरू झाल्याचे समजताच तो कैदी माझ्याकडे पाठ-

१. शिचसा-- खंड ९ लेख ६०

२. आंकाअ--आ, पृष्ठ ३२

३. चेऊल बखर, खंड ३, पृष्ठ ३१०

४. C Ward to Sur, 5--1--1684.

विण्यात आला. मी त्याला सुखरूपपणे संभाजीकडे पाठविले. संभाजीराजांनी आमच्याकडून ४०० पिपे बंदुकांची दारू, ६० मोठ्या तोफा, ४००० पौंड कथिल, ४०० वार कापड, ( Broad Cloth ) १५० लहान बोटी आणि एक मोठी बोट इत्यादी गोष्टींची मागणी केली आहे. या गोष्टी पुरविल्या नाहीत तर राजाने आपला नाश करण्याची धमकी दिली आहे.[१]

संभाजीने केलेल्या मागणीत पिण्याच्या दारूची पिपे मागितलेली नसून ती बंदुकीसाठी लागणारी दारू आहे.

सरहद्दीवरील ३०००० मराठी सैन्याने मुंबईपासून तीन मैलांवर असलेले पलतात ( Paltata पलते ? ) हे बेट घेण्याचा विचार केला होता. मुंबई बेट इंग्लंडच्या राजाच्या ताब्यात गेल्यापासून केजविनने तेथे गुरेढोरे आणि ती सांभाळण्यासाठी दोन कुटुंबे त्या बेटावर ठेवली होती. मराठ्यांचे सैन्य तेथे उतरण्याची शक्यता असल्याने तेथे सैन्यही ठेवलेले होते.[२] ही माहिती केजविनने राजाला कळविली होती. संभाजीराजांशी तह करावा अशा हेतूनेच तो राजाला सर्व गोष्टी कळवीत होता.

२६ एप्रिल १६८४ पूर्वी केजविनने तहाच्या वाटाघाटींसाठी कॅप्टन गॅरीला संभाजीराजांकडे पाठविले. या वकिलाने राजांची बिरवाडी येथे गाठ घेतली. त्यानंतर गॅरी, थॉमस विल्किन्स आणि राम शेणवी हे तिघे महाराजांना भेटले. त्यांनी गव्हर्नरची मैत्री करण्याची इच्छा राजांना सांगितली. संभाजी-राजांनी केजविनला पत्र लिहिले. त्यात ते म्हणतात, " वकिलाने तुमचा मनोदय सांगितला. त्याच्याबरोबर आम्ही आमची मान्यता पाठविली. तुमचा मनोदय तुम्ही तपशीलवार लिहून पाठविला त्या तहाच्या अटींना आम्ही संमती पाठविली आहे ती मिळेलच. तरी तुम्ही या अटींचे परिपालन करावे. आम्हीही त्या पाळू. आमच्या वचनावर विश्वास ठेवून वागावे. दिवसेंदिवस आपल्या मैत्रीचे संबंध दृढ होत जातील असे करावे. ज्या ज्या वेळी आमच्या प्रीतीतील कवि कलश किंवा आमचे वकील तुम्हाला भेटतील त्या त्या वेळी आपण त्याची नीट दखल घेत जावी. कॅप्टन गॅरीने सिद्दीशी तुमचे वितुष्ट आले आहे असे आम्हाला सांगितले. त्याला काढून लावण्यासाठी आम्ही साहाय्य करावे अशी तुमची अपेक्षा आहे. तरी सिद्दी आमचा शत्रू आणि तुम्ही मित्र म्हणून सर्वतोपरी साहाय्य करणे आम्हास आवश्यक आहे. तुमचा मित्र तो आमचा मित्र आणि तुमचा शत्रू तो आमचा शत्रू. हे जाणून तुमच्या परीने तुम्ही सिद्दीचा नाश करण्याचा प्रयत्न करावा. आम्ही तसेच करीत आहोत. तुमच्या शत्रूचा नाश करणे तुम्हाला सोपे जावे म्हणून

१. Capt Keigwin to the king, 28--1--1684
२. FR: Keigwin to the king, 22--2--1684

आम्ही तुम्हास सर्वतोपरीने मदत करू. आपली मैत्री वृद्धिंगत होवो. अधिक काय लिहिणे."[१]

या तहाच्या मसुद्यात मुंबईसाठी ३० आणि कर्नाटकासाठी ११ कलमे होती. या तहातील काही अटींची चर्चा "राज्यकारभार" या प्रकरणातील व्यापार, आर्थिक धोरण आणि न्यायदानविषयक उपप्रकरणांतून केलेली आहे.

'संभाजी राजा छत्रपती, राजशक १० मुंबईच्या गव्हर्नरने कॅप्टन रिचर्ड केजविन, कॅ. हेन्री गॅरी आणि थॉमस विल्किन्स यांना वकील म्हणून आणि राम शेणवी यास दुभाषा म्हणून पाठविले.[२] त्यांनी कर्नाटकात वखारी काढण्या-बद्दल मनसुबा सांगितला. त्यांच्या विनंतीचा विचार करून पुढील अटींसंबंधी करार करून देत आहोत. त्यातील काही अटी येथे दिल्या आहेत :

( १ ) इंग्रजांशी व्यापार करण्यासाठी जे व्यापारी, रंगारी व विणकर येतील आणि ज्यांच्याजवळ इंग्रजांचा माल असेल त्यांस हवालदार किंवा सुभेदारांनी त्रास देऊ नये. उलट त्यांस शक्य ती मदत करावी.

( २ ) माझ्या राज्यातील एखादा व्यापारी किंवा रहिवासी यांनी काही जिन्नस किंवा व्यापारी माल घेऊन इंग्रजांचे किंवा त्यांच्या व्यापाऱ्यांचे देणे लागत असेल व ते देत नसेल तर त्याला सुभेदाराकडे किंवा अधिकाऱ्याकडे नेले जाईल व तो जर खरोखरच देणे लागत असेल तर त्याच्या मान इतमामाकडे न पाहता कर्जफेड करावयास लावली जाईल.

( ३ ) वादळामुळे किंवा अन्य उत्पातामुळे जर एखादे जहाज, गुरब, किंवा होडी माझ्या राज्यातील एखाद्या बंदरात लागली तर ती जप्त करून सरकार-जमा होऊ नये. हा रिवाज इतर ख्रिश्चन लोकांच्या बाबतीत रूढ असेल तर ती सवलत इंग्रजांसही देण्यात येईल.

( ४ ) इंग्रजांची सूचना अशी की जर इतर ख्रिश्चन व्यापाऱ्यांना वर निदर्शित केलेल्या सवलतींपेक्षा अधिक सवलती मिळत असतील तर त्या त्यांनाही मिळाव्यात. तरी अशा सवलती इंग्रजांना मिळतील.

याचप्रमाणे 'संभाजी राजा छत्रपती...' असा प्रारंभीचा मजकूर ठेवून मुंबईसाठी खाली दिल्याप्रमाणे तहाची कलमे ठरली.

( १ ) माझ्या नोकरांकडून जो काही त्राप इंग्रजांस दिला गेला किंवा माझ्याशी जे त्यांचे भांडण झाले ते त्यांनी विसरून त्याचा विचार काढू नये किंवा त्याबद्दल आकस ठेवू नये. मीही तसेच करावे. हा तह करार झाल्यानंतर जर

१. FR: Sambhaji to Keigwin, Bombay, April 1684;

२. भाइसंमं--त्रैमासिक अंक २ रा, १९२२, पृष्ठ ३१

काही कमी जास्ती चुकून घडले तर त्याचाही विचार न करता एकमेकांशी बोलून मैत्री राखावी. हा मुद्दा मान्य आहे.

(२) माझा आणि इंग्रजांचा जो तह झाला आहे त्यात जर कोणी मतभेदाचा प्रश्न काढला तर तो दोघांनी विचारविनिमय करून मिटवावा. तहास कोणत्याही प्रकारे बाध आणू देऊ नये. दोघांस मान्य.

(३) माझे आणि मुघलांचे सारखे युद्ध चालू आहे. त्यात माझ्या लोकांनी मुघल प्रदेशात लूटमार करताना जर इंग्रजांच्या वखारीची लूट केली व माल नेला तर तो माल सुभेदारांनी किंवा हवालदारांनी परत करावा. तसेच एखादे वेळी जर आमच्या वखारीचे लोक किंवा अडते कैद केले गेले तर त्यांस त्रास न देता सोडून द्यावे.

(४) माझी आणि मुघलांची गलबते समुद्रात वावरतात. तरी मुघलांचे एखादे जहाज माझ्या लोकांनी धरले आणि त्यात जर इंग्रजांचा माल असला व त्याच्यावर त्यांच्या खुणा वगैरे असल्या तर त्या खुणा वगैरे पटवून दिल्यास त्यांना त्यांचा माल परत मिळावा. इंग्रजांनीही धरलेल्या जहाजात, होड्यात माझ्या प्रजेचा माल आढळल्यास तो त्यांनी माझ्या प्रजेस परत द्यावा. दोघांस करार मान्य.

(५) पोर्तुगीज, डच व इंग्रजांत लढा चालू आहे. तरी आम्ही इंग्रजांना किंवा त्यांना लढ्यात मदत करणार नाही. इंग्रज व माझ्यात झालेला तह विनाविरोध दोघांकडून पाळला जावा.

(६) फोर्ट सेंट जॉर्जच्या कलमातील ३, ६, ७, ९ व ११ कलमे मुंबईकरांनाही लागू होतात.

(७) इंग्रजांनी सूचना केली आहे की सुभेदारांनी मुंबईस वकील पाठवू नये. माझ्याशिवाय कोणीही वकील पाठविणार नाही. मोठा व महत्त्वाचा प्रश्न असेल तर मीच वकील पाठवीन. परंतु इतर वेळी सामान्य बाबतीत सुभेदार एखाद्या माणसाबरोबर पत्र पाठवतील व उत्तर नेतील.

(८) इंग्रजांनी असे सुचविले की त्यांचे सिद्दीशी वाकडे आले आहे. तेव्हा जर अशा परिस्थितीत माझी मदत लागली तर ती मी देईन.

(९) इंग्रजांनी असे सुचविले की त्यांच्या फत्तेमारीस जाण्यायेण्यास पूर्ण मुभा असावी. त्यांनी आणलेली व नेलेली पत्रे बिनविरोध जाऊ द्यावी. असल्या फत्तेमारीशी इंग्रजांच्या सीलासह जी पत्रे आणली जातील तेवढीच फक्त सील तपासल्यानंतर अडविली जाणार नाहीत.[१]

वरील तहात इंग्रजांनी काही गोष्टींबाबत नुकसानभरपाई मागितली होती. पण इंग्रजांकडे अधिक काही जाऊ नये, योग्य तेच त्यांना मिळावे म्हणून

१. भाइसंमं--त्रैमासिक-१९३२

संभाजी महाराजांनी आपल्या अधिकाऱ्यांना तसे कळविले. त्यांनी अधिकाऱ्यांना यासाठी ज्या सूचना दिलेल्या आहेत त्या पाहिल्या की संभाजी राजांची राज्य-कारभारातील दक्षता दिसून येते.

( १ ) गोंदजी जाधव, मुख्य दर्यासारंग यांस : सन १६८१ मध्ये सुलतान खानाकडे आरमाराचा सुभा होता. तेव्हा त्याने फागी महमूद व अबाजी ढंग यांजकडून ३७ रु. रोख, १२१/२ रुपयांची तांब्याची भांडी व ४५० रुपयांचे १५ मुढा धान्य घेतले होते. जर त्याने हा माल 'सापडलेला' म्हणून घेतला असून सरकारी पुस्तकात दाखल असेल तर तो तपासून भांडी परत करावी व धान्य साहित्याची किंमत काय लावली आहे ते शोधून कळवावे. म्हणजे त्या देण्याबद्दल निकाल करून कळविले जाईल. जर तो माल विकला असेल तर मला त्याची रास्त किंमत व पैसे कळवा म्हणजे त्या संबंधात मीच निर्णय देईन.

सिद्दी मिश्री आरमाराचा मुख्य होता तेव्हा सिंपवडा ( Simpavara ) कडून रु. १५१ चा माल विकत घेतला होता. त्याचे पैसे अजून दिले नव्हते. हा माल कोणता ते वह्या पाहून तपास घ्यावा. जर हा माल होडी फुटल्यामुळे जप्त केला असेल तर परत करू नये. परंतु लुटून किंवा चोरून आणला असेल व भांडी शिल्लक असतील तर ती परत द्यावी व बाकीचा हिशेब पाठवावा. म्हणजे भरपाई करण्याबद्दल मी निर्णय करून आज्ञा देईन.

( २ ) गोंदजी जाधव, आरमाराचा मुख्य दर्यासारंग : आरमाराचा सुभेदार गोविंदराव कान्हो यांनी चार वर्षांपूर्वी सिद्दीशी झगडा केला. तेव्हा त्याने लाकूडफाटा भरलेल्या इंग्रजांच्या चार होड्या सिद्दीच्या म्हणून धरल्या होत्या. जर त्या खरोखरच मुंबईकरांच्या असतील आणि सिद्दीच्या नसतील तर इंग्रजांकडून मागणी आल्यास द्याव्या. इंग्रजांच्या असतील हे सिद्ध झाले तर त्याची खजिन्याच्या वहीत ( Treasure book ) नोंद करू नये. त्यांच्याकडून माणूस आल्यास खात्री करून द्यावी व दिल्याची पावती घ्यावी.

( ३ ) कुलाबा कोटाचा सुभेदार व मुजुमदार : मुंबईचा व्यापारी वेणू ( Ventu ) धर्माजी याची रु. १५० किंमतीची होडी कुलाब्याच्या अधिकाऱ्याने पकडली. जर ती जबरदस्तीने किंवा निष्कारण पकडण्यात आली असेल तर ती मालकास परत करून पावती घ्यावी. परंतु ती वादळामुळे वगैरे फुटून आल्यावर पकडलेली असेल आणि खजिना वहीत नोंदविलेली असेल तर ती परत करू नये.

( ४ ) अंताजी लक्ष्मण सुभेदार व मुजुमदार, सुभा अथणी : कारवारच्या इंग्रज वखारवाल्यांना कारभाऱ्यांकडून त्रास पोचतो, अशी मुंबईकर तक्रार करतात. तरी आपली जकात घ्यायची ती रीतसर घ्यावी. परंतु व्यापारी माणसांना निष्कारण त्रास न होईल असे पाहावे.

(५) गोपाळ दादाजी, पालमकोटचा सुभेदार : फारिंग पेठेत (Faring-pett) इंग्रजांची वखार होती. वखारवाले आणि तुमचे काही कारणांवरून भांडण झाले व तुम्ही त्यांचा माल धरला आहे. आता इंग्रजांशी तह झाला असून त्यांना वखारी काढण्यास परवानगी दिली आहे. तरी कराराप्रमाणे जकात घ्यायची ती घेऊन त्यांस सुखाने व्यापार करू देणे. त्यांचे रक्षण करणे.[१]

इंग्रजांनी केलेल्या तहाला लंडनहून मान्यता मिळाली. लंडनहून सुरतकरांना तह पाळण्यासंबंधात हुकूम देण्यात आला त्यामुळे सुरतकरांची कुचंबणा झाली.

इंग्रजांशी तह करून संभाजी राजांनी सिद्दीचा उपद्रव कमी करावयाचा प्रयत्न केला. अशाच प्रकारचा एक तह शिवाजी महाराजांनी १६८० सालच्या जानेवारी महिन्यात केला होता. त्या तहाप्रमाणे इंग्रज वागत नव्हते. चार वर्षे विविध प्रकारांनी खटपट केल्यानंतर संभाजीमहाराजांना इंग्रजांशी तह करून परस्पर सिद्दीचा बंदोबस्त करावयाच्या प्रयत्नात यश आले. १६८४ सालापर्यंत सिद्दी, मुघल आणि पोर्तुगेज यांच्याशी संभाजीराजांचे संबंध बिघडलेले होते. अशा परिस्थितीत इंग्रजांसारख्या आरमारी सामर्थ्य पाठीशी असलेल्या व्यापाऱ्यांना आपल्या बाजूला वळवून घेण्यात यश आल्यामुळे किनाऱ्यावरील शत्रूच्या हालचालींचा जोर कमी होऊ शकला. इंग्रज आणि मराठे यांच्यातील तहात सिद्दीचा बंदोबस्त करावयाची कलमे होती; त्यांत दोघांनी मिळून मुघलांचा बंदोबस्त करावा असे कलम नव्हते. सुरतकरांची वखार मुघलांच्या हद्दीत असल्यामुळे ते त्यांना दुखविण्यास तयार नसावे.

१६८४ च्या मार्च महिन्याच्या सुरुवातीस मुघल आरमार आणि सिद्दी गोव्याहून माघारी फिरले. एप्रिल महिन्याच्या सुरुवातीस सिद्दी कासम बळजबरी करून मुंबईत गेला, तेव्हा त्याला कोटाजवळ अडविण्यात आले. रीतसर परवानगी घेतल्यावरच त्याला माजगावला जाता आले.

तेथे जाताच त्याला कडक बंदोबस्त आणि तटही दिसला. फक्त पाणी हवे असेल तर मिळेल असे इंग्रजांनी त्याला बजावले. आतापर्यंत त्याला मुंबईत केव्हाही थारा मिळत आल्याने ही व्यवस्था पाहून त्याला आश्चर्य वाटले. त्याच्याविरुद्ध असा बंदोबस्त प्रथमच केलेला होता. संभाजी राजे प्रथमपासून सिद्दीला मुंबईकरांनी थारा देऊ नये असे सांगत होते. त्याची अंमलबजावणी व्हायला चार वर्षे लागली. ही व्यवस्था सुरतकरांनी केली नसती. ईस्ट इंडियाकडून हे बेट गेल्यामुळे केजविनने ही गोष्ट अंमलात आणली.

.....................

१. FR: Sur Vol 109, p 63-66; भाइसंमं, त्रैमासिक, Vol II १९३२, पृष्ठे २७--३७

सिद्दीला मुंबईत मिळालेल्या वागणुकीमुळे राग आला. दाणागोटा आणण्यासाठी तो उंदेरीला गेला. तेथे त्याला माल मिळेना. पाण्यासाठी त्याला माजगाव बंदरावर अवलंबून राहावे लागले.

तहात ठरलेल्या अटींप्रमाणे त्याला मुंबईत थारा न मिळाल्यामुळे १६८४ च्या सप्टेंबर महिन्यात त्याला सुरतेस जावे लागले. मुंबईत मदत मिळाल्यावाचून सिद्दीला या बाजूस राहाणे शक्य नव्हते.[१]

सुरतकर मुंबईचे बेट कंपनीकडे परत मिळावे म्हणून खटपट करीत होते. जॉन चाईल्ड आणि जॉन सेंट जॉन यांनी मुंबईतील बंडखोरांशी बोलणी करावयाचा प्रयत्न केला. थॉमस ग्रॅन्थॅम दि. ३०-१०-१६८४ रोजी सुरतेहून निघाला आणि दि. ३-११-१६८४ या दिवशी मुंबईस पोचला. त्याने केजविनशी बोलणी केली. वाटाघाटी करून त्याने दि. १९-११-१६८४ रोजी मुंबई बेटाचा ताबा घेतला.[२]

१६८५ च्या सुरवातीस केजविन ग्रॅन्थॅमबरोबर लंडनला गेला. त्याच्या बरोबर निळोपंत पेशव्याने दिलेली कौलासंबंधीची आणि इतर काही कागदपत्रे गेल्यामुळे मुंबईकरांना तांदूळ, लाकूड फाटा मिळण्यात अडचण उत्पन्न झाली.[३] फेब्रुवारी महिन्यात मराठ्यांनी निळोपंत पेशव्यांच्या नेतृत्वाखाली मुघल प्रदेशात जी लुटालूट केली त्यात इंग्रजांची धरणगावची वखार लुटली गेली. त्यांचे एकूण तीन चार हजारांचे नुकसान झाले.[४] ( याचा सविस्तर वृत्तांत मराठा मुघल संघर्षात पहावा. ) झालेल्या नुकसानीबद्दल सुरतकरांनी खेद व्यक्त केला.[५]

मध्यंतरी डच लोकांनी संभाजी राजांशी व्यापारी करारासंबंधी बोलणी सुरू केली होती. परंतु राजांकडून त्यांना पुरेशा सवलती मिळाल्या नाहीत.[६]

---

१. FR: Sur to Lon, 25–9–1684; Child to Keigwin 1–2–1684, 18–2–1684; St John to king 20–9–1684

२. Sir T. Grantham to Sur 8–12–1684, Bom to Lon 9–12–1684

३. FR: Bom to Sur, 12–1–1685

४. FR: Jetpad to Sur, 12–2–1685

५. FR: Sur to Dorangaon, 3–3–1685

६. FR: Car to Sur, 3–1–1685

संभाजी महाराजांशी झालेल्या तहातील कलमे समजावयास अडचण पडल्याने त्यांनी तो करार सुरतकरांकडे पाठविला.[१] संभाजीशी वागताना योग्य ती काळजी घेऊ असे सुरतकरांनी लंडनला कळविले.[२]

मुंबईत थारा न मिळाल्याने सिद्दी १६८४ च्या सप्टेंबरपर्यंत सुरतेला राहिला. तो तेथे नसल्याचा फायदा घेऊन मराठ्यांची ५–६ गुरावे, गलबते १६८५ च्या एप्रिल महिन्यात राजापूरहून कारवारला गेली. या आरमाराने पोर्तुगेजांची काही गलबते पकडली.[३] संभाजी राजे आपली जहाजे पकडतील अशा भीतीने इंग्रजांनी उंदेरीला सिद्दीच्या आरमारात रोज दोन माणसे पाठवून त्याचा बंदोबस्त करावयाचा प्रयत्न केला. परंतु सिद्दीने त्यांना मदत केली नाही.

मुंबई बेट सुरतकरांच्या ताब्यात जाताच सिद्दीने आपल्याला मुंबईत राहू द्यावे म्हणून खटपट सुरू केली. सिद्दी कासमने वडिलांप्रमाणे महंमद बेगला (काझी अब्दुल्लाचा मुलगा) मुंबईत राहू द्यावे म्हणून सुरतकरांना पत्र लिहिले. सिद्दीशी कोणत्या धोरणाने वागावे यासंबंधात मुंबईकरांनी सुरतकरांकडून सूचना मागविल्या. मुंबईकरांना योग्य वाटेल तसे करावे असे सुरतकरांनी कळविले.[४] सिद्दीला मुंबईत पाणी घेऊ देणार नाही, तंबाखूच्या निर्यातीवरही त्याच्याकडून कर घेऊ, सिद्दीने धान्याची मागणी केली तरी पुरवठा करणार नाही, असे मुंबईकरांनी सुरतकरांना कळविले.[५]

१६८५ सालच्या जुलैत मराठ्यांच्या आरमाराने मंगलोरहून कारवारकडे जाणारे मुंबईतील रहिवाशांचे जहाज पकडले होते. या जहाजाची मागणी करण्याविषयी मुंबईकरांनी कारवारकरांना विनंती केली.[६]

सुरतकर सिद्दीला मुंबईत राहू देणार आहेत अशी बातमी निळोपंत पेशव्यांना समजताच, त्यांनी त्यासंबंधी विचारणा केली. तेव्हा सर्वांनाच मुंबईत राहण्यास परवानगी आहे असे त्यांना उत्तर देण्यात आले.[७]

त्यांनी असे उत्तर दिलेले असले तरी मराठ्यांशी वागण्यात सुरतकर सौम्य झाले होते. कोर्लै भागातील भात आणि जळणावर मराठ्यांनी जकात बसविलेली होती. या संबंधात वाटाघाटी करण्यासाठी रिचर्ड स्टॅन्लेला पेशव्यांकडे पाठविण्यात

१. FR: Bom to Sur, 7–3–1685
२. FR: Sur to Lon, 21–4–1685
३. FR: Car to Sur, 8–4–1685
४. FR: Sur to Bom, 8–5–1685
५. FR: Bom to Sur, 18–7–1685
६. FR: Bom to Car, 4–7–1685
७. FR: Bom to Stanley, 15–10–1685

आले. दि. ९-१०-१६८५ रोजी तो वानापूरला ( Vanoapur ) गेला. त्याला निळोपंत श्रीप्रबळ ( Sera Prabul ) ला गेल्याचे तेथे कळले. ते एका टेकडीवर राहात होते. त्यांना तो तेथे भेटला. प्रथम त्याने आपण आल्याचा धोंड्बरोबर निरोप पाठविला. दि. १२-१०-१६८५ ला पेशवा निळोपंत आणि प्रल्हाद निराजी व स्टॅन्ले यांची भेट झाली. मराठ्यांचे सुभेदार आणि हवालदार इंग्रजांपासून कर ( Canalarian Boone ) घेतात, अशी स्टॅन्लेने त्यांच्याकडे तक्रार केली. निळोपंताने विचारले, "करारा‌प्रमाणे तुम्ही वखारी कोठे काढल्या ? या शिवाय व्यापाऱ्यांपासून आम्ही जकात घेतो." तेव्हा स्टॅन्ले म्हणाला, "आम्हाला सुरक्षित वाटले नसल्यामुळे आम्ही वखारी काढल्या नाहीत." त्यावर निळोपंत म्हणाले, "सिद्दीला अद्यापही लुटालूट करावयास तुम्ही येऊ देता" ते असे म्हणताच स्टॅन्लेने उत्तर दिले की सिद्दी मुंबईहून येत नसून उंदेरीहून येतो. शेवटी निळोपंतांनी सिद्दीची ही गोष्ट खरी की खोटी हे पाहण्यासाठी मुंबईत आम्ही वकील ठेवतो, तुमचाही वकील तुम्ही पाठवावा असे सांगितले. ही बोलणी झाल्यानंतर स्टॅन्ले परत निघाला. निळोपंताने दोन बंदुका मागितल्या त्या पाठविण्यात आल्या.[१]

मराठ्यांना सुरुवातीपासूनच खंदेरी शेजारी असलेले सिद्दीचे उंदेरी बेट घ्यावयाचे होते. पूर्वी त्यांचे प्रयत्न फसले असले तरी १६८५ साली त्यांनी पुन्हा उंदेरी घेण्याचा प्रयत्न केला. "शिवाजीमहाराजांच्या निरणाची व्यथा बरी करणारा व चेऊलचा रहिवाशी वैद्य पिलाजी न्हावी याचा मुलगा बजाजी याने उन्मत्त होऊन संभाजीतर्फे हबशीकडील उंदेरी घेण्याचा प्रयत्न केल्यामुळे शके १६०७ ( सन १६८५ ) संवत्सरी हबशी येण्हे चेऊल मारिले, लोक जागा जागा मेले."[२]

१६८५ साली ईस्ट इंडिया कंपनीने आजपर्यंत हिंदुस्थानातील सत्ताधीशांशी वागताना जे धोरण अंगिकारलेले होते त्यात बदल करून नवीन प्रयोग करावयाचे ठरविले. सन १६१६ मध्ये थॉमस रो याने आखलेले धोरणच आतापर्यंत चालू होते. १६८० साली त्यांनी खंदेरी आणि उंदेरी घेण्याचा प्रयत्न केला होता. त्यांनी मुघल, सिद्दी आणि मराठे यांच्याकडून झालेले अपमान त्यावेळी सहन केले होते. १६८५ सालापर्यंत इंग्रजांची भूमिका फक्त व्यापार करण्याची होती. दक्षिणेत असुरक्षित वाटल्याने त्यांनी आपल्या धोरणात बदल

१. F. R. : Richard Stannley from Sera Prabul to Bom, 11–10–1685 and Bom to Stanley, 15–10–1685

२. राम ग्रं, भाग ४२ वा, पष्ठ ६२, ६३, ६९, ७९

करून, व्यापार हे अंतिम ध्येय असले तरी, सत्ताधीशांकडून होणाऱ्या जुलमाचे उत्तर शस्त्रास्त्राने द्यावयाचे ठरविले होते.

१६८५ सालापासून इंग्रज आणि मुघलांचे संबंध बिघडले. त्याच सुमारास शाहिस्तेखान बंगालमध्ये सुभेदार असताना त्याने इंग्रजांकडून तेथील स्थानिक कर वसूल करण्यास सुरुवात केली. ईस्ट इंडिया कंपनीने उघड उघड औरंगजेबाच्या सत्तेला विरोध केला. बंगालच्या सुभेदाराच्या मागण्यांचा प्रतिकार केला. यांतूनच इंग्रज व मुघल यांचे संबंध बिघडून त्यांच्यात जवळ जवळ युद्धच सुरू झाले. चित्तगाव घेण्यासाठी लढाऊ जहाजे पाठविण्यासाठी इंग्लंडच्या दुसऱ्या जेम्सचे मन वळविण्यात आले होते. त्यामुळे औरंगजेबाला राग येऊन त्याने इंग्रजांच्या सुरत, मसलीपट्टण व हुगळी येथील वखारी हस्तगत करण्याचा हुकूम दिला.[१]

मुघल आता मराठे आणि इंग्रज या दोघांचाही शत्रू झाला. १६८४ साली ईस्ट इंडिया कंपनीच्या मंडळाचा अध्यक्ष सर जोसेफ ॲश याने इंग्रजांच्या व्यापाराचे संरक्षण करण्यासाठी मद्रास आणि मुंबई येथे तटबंदी करावयाचे हुकूम दिले. १६८६ साली कंपनीचा अध्यक्ष सर जोसिया चाईल्डने ॲशच्याच धोरणाचा पुरस्कार केला. इंग्लंडचा राजा दुसरा जेम्स हा कंपनीत एक भागीदार असल्याने कंपनीचा फायदा व्हावा अशी जेम्सचीही इच्छा होती. हिंदुस्थानातील इतर सर्व सत्ताधीशांशी इंग्रज आता स्वतंत्र सत्ताधीश म्हणून वागावयास प्रारंभ करणार होते. त्यांचा अपमान झाला किंवा कोणी त्यांच्यावर आक्रमण केले तर ते आक्रमकांबरोबर युद्ध करणार होते. सुरतेच्या वखारीच्या अध्यक्षाला "कॅप्टन जनरल आणि ॲडमिरल ऑफ ऑल फोर्सिस बाय सी इन नॉर्दर्न पार्टस आफ इंडिया" हे पद देण्यात आले.

सुरतेच्या गव्हर्नरचा त्याच्यावर ताबा राहणार नव्हता. मुख्य प्रशासन केंद्र मुंबईला राहून सुरतेला केवळ वखार राहणार होती. १६८५ च्या प्रारंभी सुरतकरांनी मायदेशी कळविले की, "औरंगजेब ख्रिश्चनांचा मित्र राहिलेला नाही. मुघल सुरतेचा अपमान करतो. कारवारची वखार धोक्यात असून संभाजीचे राज्य वेगात नाहीसे होत आहे."[२] ( Sambhai is fast sinking ) असे इंग्रज म्हणत असले तरी यावेळी संभाजीराजे मुघलांविरुद्ध लढत होते. मराठी मुलखात यश न आल्याने औरंगजेबाने विजापूर गोवळकोंड्याची राज्ये घेण्यासाठी १६८५ मध्येच प्रयत्न सुरू केले.

---

१. MR IIM; part II, p 150--151

२. FR: Surat to Directors, 23--1--1685

बदलत्या धोरणानुसार इंग्रजांनी मुघलांच्या जुलमाचा प्रतिकार करण्याचे ठरविले. या कामात त्यांना कोणाकडून तरी साहाय्य हवे होते. ते फक्त मराठ्यांकडूनच मिळण्याची आशा होती. साहजिकच इंग्रजांनी संभाजीशी मैत्री ठेवून त्याचे साहाय्य मिळविण्याची खटपट सुरू केली. औरंगजेब विजापूर, गोवळकोंडा घेतल्यानंतर मराठी राज्यावर पुन्हा सर्व शक्तिनिशी मोर्चा वळविण्याचा संभव होता. अशा प्रसंगी संभाजीराजांनाही केवळ इंग्रजांचेच साहाय्य मिळण्याची शक्यता होती. दोघांनाही एकमेकांच्या मदतीची गरज होती. मराठे मुघलांविरुद्ध गेली ३-४ वर्षे एकाकीच लढत होते. त्यादृष्टीने संभाजीने ही संधी डावलली नाही.

थॉमस ग्रॅहम आणि केजविन लंडनला गेले. त्यांचा अनुभव जमेस धरून कंपनीने तह करावयाच्या हेतूने दि. २८-१०-१६८५ रोजी लंडनहून सुरतकरांना संभाजीशी चांगले संबंध ठेवण्याच्या सूचना देणारे पत्र धाडले. या पत्रात ते म्हणतात :

You should enter into a close confederacy and friendship with Sambhajee Rajah and maintain always strict friendship with him, and then you need not feare the anger of the Mogol or the portuguese having Sambhajee's country and his armes always to friend ...... You are not to permit the Mogols Admiral or siddeey, nor other ships of any Nation whatsoever to come within reach of our guns, or to have the freedom of our port of Bombay without paying due respect to his Majesty's flag.... our president sir John Child shall reside at Bombay or the Government and Chiefship of Rajapor if you can obtain good terms of Sambhajee Rajah.[1]

"संभाजीराजाच्या गटात सामील होऊन त्याची मैत्री संपादन करा. त्याच्याशी नेहमी मित्रत्वाचे संबंध राखल्याने तुम्हाला, मुघल किंवा पोर्तुगेजांना भिण्याचे कारण राहणार नाही. मुंबईजवळ सिद्दी, मुघल किंवा इतर कोणालाही येऊ देऊ नका किंवा त्यांना मुंबईत स्वातंत्र्य देऊ नका. याशिवाय जेव्हा जेव्हा तुम्ही कुत्बशहा, संभाजी किंवा इतर राजे किंवा राष्ट्रे यांजबरोबर तह कराल त्यावेळी आमचा बादशहाचा एखादा प्रजाजन किंवा इंग्रज माणूस प्रेसिडेंटच्या परवानगीवाचून त्यांच्या देशात जाऊन राहिल्यास व त्याची मागणी केल्यास त्याला प्रेसिडेन्टकडे दिले पाहिजे.[2] अशी अट घालून घ्या असे मद्रासकडील

1 Lon to Sur, 28--10--1685

2 FR: Lon to Fort st. George, 24--2--1686

फोर्ट सेंट जॉर्जच्या वखारवाल्यांना बजावण्यात आले. या पत्रावरून लंडनमध्ये त्या काळात संभाजीराजांचे महत्त्व व मान किती होता हे दिसून येते. मुघलां-विरुद्ध टक्कर देण्यासाठी इंग्रजांना सिद्दीच्या छाव्याची मदत घेणे भाग होते. ही गोष्ट १६८५ सालच्या अखेरची आहे. दारूच्या किंवा स्त्रियांच्या नादात मश्गूल होऊन राहणाऱ्या राजाची धूर्त आणि चाणाक्ष इंग्रजांनी मदत मिळण्याची अपेक्षा ठेवली असती असे वाटत नाही. इंग्रजांनी स्वतःच्या सोयीसाठी—आणि राजकारणात असेच चालते—जरी संभाजीराजाची मैत्री ठेवण्याचा प्रयत्न केला असला तरी मुघलांचा प्रतिकार करण्यासाठी त्यांचा त्यांनी उपयोग करून घ्यावयाचा ठरविले होते.

इंग्रज आणि सिद्दी यांच्यात तहाची आणि मैत्रीची बोलणी होत होती. तहाची अंमलबजावणी होण्यापूर्वी सिद्दी पूर्ववत् लूटमार करीत होता. मुघल आरमाराचा प्रमुख याकूतखान हा काही जिन्नस खरेदी करण्यासाठी १६८५ मध्ये आरमारासह दंडाराजपुरी येथे मराठ्यांच्या मुलखात गेला होता. त्या सुमारास भडोच येथे बते कौमाने ( बद कौम ? ) बंड उभारून तेथील फौज-दाराला कैद केले. ही गोष्ट मराठ्यांनी घडविली असावी. औरंगजेबाला हे समजताच त्याने याकूतखानाला बंड मोडण्याची आज्ञा दिली. बादशहाच्या आज्ञे-प्रमाणे तो भडोच येथे जावयास निघाला. दरम्यान गुजरातचा बादशाही सुभेदार कारतलबखान याने स्वतःच भडोचला जाऊन बंडवाल्यांना कापून काढले. भडोच बादशाही कबजात आणले. हे समजताच याकूतखान दंडाराजपुरीस परतला. तेथे येताच मराठ्यांचे आरमार दाभोळच्या खाडीत एकत्र होऊन खेम सावंताच्या बाजूला म्हणजे मालवण-वेंगुर्ल्याकडे जाण्याच्या तयारीत असून शहाजादा अकबरही त्यांच्या बरोबर जाणार आहे असे याकूतखानाला कळले. याकूतखानाने मराठ्यांच्या आरमारावर स्वारी केली. त्याने मराठी आरमाराचा प्रमुख गोविंद कान्हो आणि ५ गुराबे पकडली, ७-८ बुडविली आणि कित्येक शिपाई कापून काढले. इतकेच नव्हे तर मराठ्यांचे जे लोक दंडाराजपुरी आणि चेऊल यांच्या आसपास बळ धरून राहिले होते त्यांचाही याकूतखानाने निकाल लावला.[1] ही माहिती याकूत खानाने खेम सावंताला दि. २९–८–१६८६ रोजी लिहिलेल्या पत्रात आढळते.

१६८६ च्या फेब्रुवारीत सिद्दी कासम दंडाराजपुरीहून कल्याणला वेढा घालण्यासाठी निघाला होता. कासम कल्याण घेईल असें इंग्रजांना वाटले होते. पण दोन दिवसांतच त्याला वेढा उठवावा लागला. तो दंडाराजपुरीला जाऊन तेथून शहाजादा अकबराचा पाठलाग करणार असल्याने सिद्दीची कटकट थांबली.

---

१. शिचसा, खंड १३, लेख ५, पृष्ठ १०.

१६८५ मध्ये संभाजीराजांशी मैत्री करण्यासंबंधी लंडनहून सुरतकरांना हुकूम आला होता हे मागे सांगितलेच आहे. मुघलांशी संबंध सुधारण्याची आता आशा नसल्यामुळे १६८६ च्या मार्च महिन्यात लंडनहून सुरतकर आणि मुंबईकरांना पुन्हा सूचना देण्यात आल्या. मुंबईत टांकसाळ काढून तेथे दुसऱ्या राजांची आणि इंग्रजांची नाणी पाडण्याचे ठरले होते. संभाजी राजांच्या राज्यातही इंग्रजांची नाणी चालावी म्हणून संभाजीकडून फर्मान मिळविण्याची खटपट करण्यासाठी लंडनहून दि. २६-३-१६८६ रोजी सुरतकरांना पत्र पाठविण्यात आले. संभाजीची मैत्री टिकविण्यासाठी इंग्रज त्याच्या तोफखान्याच्या आणि दारुगोळ्याच्या मागण्या पुरविण्यास तयार झाले होते. सुरतकर आणि मुंबईकर यांना या संबंधात जी पत्रे दि. ३१ मार्च १६८६ ला गेली, त्यात म्हटले होते,

"It will be necessary for you to make and alwayes keepe a strict confederacy with Sambhajee Rajah who is a WARRLIKE PRINCE and tho' he be not the most careful of his honour or of his keeping his leagues, all those Indian princes will keepe their confederacyes, so long as they agree with their interests and it is possible for you to make such terms with him as shall be now and for many years his Interest to preserve to sweaten him wherein, you may among other things agree to furnish him constantly with so much powder, great gunns and shotts and small arms, on reasonable terms as he shall desire annually, for which purpose we have now sent you a double proportion of powder and if you should want more you may write for what you will to Fort Saint George, we have 2600 barrells in store, which it is full time disposed of"[१]

सिद्दीच्या हालचाली पूर्ववत चालूच होत्या. १६८६ साली सिद्दीने चेऊल येथे जी लुटालूट व जाळपोळ केली त्याने चेऊलचे रहिवाशी परागंदा झाले होते. दोन वर्षे तो मुलूख ओसाड पडला होता. १६८६ च्या सप्टेंबर महिन्यात सिद्दीने मराठ्यांचे काही गड घेतले. त्याने एका गडावरील तोफ मुंबईहून दुसरीकडे नेण्यासाठी मुंबईच्या डेप्युटी गव्हर्नरकडे हाउसर्स, दोन कॅप्टन आणि

१. FR: Lon to Bom, Sur & Ft. St. G., 31--3--1686

दोन मोठे ठोकळे ? ( Housers, two capt and large blocks ) मागितले होते पण डेप्युटी गव्हर्नरने परवानगी दिली नाही.[१]

संभाजी राजांचे काही गड घेतल्यावर सिद्दी खंदेरी घेईल असे मुंबईकरांना वाटत होते. सिद्दीने इंग्रजांकडे तोफाही मागितल्या होत्या. पण जाण्याच्या बेतात होते. मुंबईला यामुळे धोका उत्पन्न होईल असे वाटल्याने संभाजीकडे माणूस पाठवून खंदेरीची मागणी करावी असे मुंबईकरांनी सुरतकरांना सुचविले.[२] मुघल अधिकारी सिद्दी मिरगा ३ जहाजे, ३ गलबते व २ मचवे घेऊन उंदेरी किंवा दंडाराजपुरीला जाण्यासाठी मुंबईत आरमार नांगरून पडला होता. सिद्दीचे आरमार १६८७ च्या जानेवारीत उंदेरीला पोचले. सिद्दी कासमने नागाव खाडीच्या तोंडावर असलेल्या कळवाच्या कोटाला वेढा दिला होता. अकबराचा शोध करण्यासाठी त्याला जैतापूरला जावे लागल्यामुळे त्याला हा वेढा उठवावा लागला. जैतापूरच्या खाडीत सिद्दी आणि मराठ्यांची गाठ पडून चकमकी उडाल्या. या लढाईत सिद्दीचे ४०० लोक जखमी झाले. सिद्दी कासमला चार मोठ्या जखमा झाल्या. परंतु तो कसाबसा वाचला. मराठ्यांनी त्याची ४ गलबते पकडली.[३]

संभाजी राजांनी खंदेरी इंग्रजांना देण्याचा विचार मान्य केला नाही. सिद्दीलाही शेवटपर्यंत खंदेरी, पद्मदुर्ग, कुलाबा जिंकता आले नाही.

पूर्वी रिचर्ड स्टॅन्ले आणि निळो मोरेश्वर यांच्यात ठरल्याप्रमाणे दोघांचे वकील ठरलेल्या ठिकाणी गेले. १६८७ सालच्या फेब्रुवारी महिन्यात निळोपंताने मुंबईकरांना कळविले की, पूर्वी आपल्यात बोलणी करणारा वकील म्हातारा होऊन मेल्यामुळे दुसऱ्या वकिलाची योजना केली आहे. त्याला नेण्यासाठी बोट पाठवावी. या नव्या वकिलाचे नाव त्रिंबक गोपाळ. दि. १७–९–१६८७ रोजी जॉर्ज वेल्डन आणि रॉबर्ट ग्रॅहम संभाजी राजांशी बोलणी करण्यासाठी रायगडास गेले.[४]

संभाजी राजे आणि निळोपंत प्रधान यांनी इंग्रजांशी तह केला. प्रधानाने इंग्रजांना लिहिले होते की, सिद्दी खाडीतून येऊन मराठ्यांचा मुलूख लुटून खराब करतो. इंग्रज आणि संभाजी यांच्यात दोस्ती असल्यामुळे इंग्रजांनी समुद्रातून खाडीचे रक्षण करून सिद्दीला जोर करू देऊ नये. मराठ्यांनी पंडित त्रिंबक

१. FR: Bom to Sur, 6--10--1686

२. कित्ता.

३. FR: Swally to Ft-St-G. 16--2--1687; Bom to Sur 21--2--1687, 25--2--1687

४. FR: Bom to Sur, 1--3--1687; Bom to Lon, 20--9--1687

गोपाळ हेजीब पाठविला. त्याने तह केला की, "तुम्हास खर्च बसेल त्यास आम्ही आपल्या मुलखातून नख्त रु. ५०००० आणि मुंबईप्रमाणे २००० मुढे भात देऊ. तरी तुम्ही दर्यामधे खाडी राखा. आम्ही खुशकीवरी मजबुती करून खुशकी राखोन." याला मान्यता देऊन इंग्रजांनी १ मोठे जहाज, बोटी, गलबते, आरमार पाठवून खाडीचा अशा तऱ्हेने बंदोबस्त केला की, सिद्दीचे काही चालेना. यावेळी मराठ्यांनी खुशकी राखावयाचे कबूल करून ती राखली मात्र नाही. इंग्रजांनी हे खाडीच्या संरक्षणाचे काम १६८७ सालाच्या सप्टेंबरमध्ये अंगावर घेतले. ते तीन महिने चालले. या तीन महिन्यात इंग्रजांना खूप त्रास सहन करावा लागून ते हैराण झाले. त्यांचे अनेक लोक जखमी झाले. सिद्दीचे बरेच लोक मेले. मराठ्यांनी इंग्रजांना पैसे देण्याचे कबूल केले होते; परंतु प्रत्यक्षात पैसे दिले नव्हते. त्यांना भातही फक्त १०० मुढेच दिले होते. तीन महिन्यांत इंग्रजांचा २०००० असर्फी खर्च झाला होता. जादा खर्च करावयास ते तयार नव्हते. त्यांनी दि. ६–१२–१६८७ रोजी संभाजी राजांना कळविले की, "१५ रोजात जाब आला तरी खूब; नाही तरी आम्ही आपले आरमार बोलावून आणू. मोहिबा बोलतील की पैकियावरि नजर देता. तरी तैसे नाही. आधी मोहिबाच्या लोकांसी पहिले काम पडिले आहे; बोलाचा भरवसा नाही. अमा दोस्तीवर नजर देऊन आजीलग या कामाची शर्ती केली. मालूम होणे. जादा काय लिहिणे. हे किताबत.[1]

१६८६ सालानंतर मराठी राज्यातील परिस्थिती गंभीर झाली होती. १६८० पासून मराठे सिद्दी, पोर्तुगेज, आणि मुघल यांच्याशी सतत लढत होते. शत्रूने मराठी मुलखाची नासधूस केल्यामुळे मुलूख ओसाड पडलेला होता. त्यातच १६८५, १६८६ आणि १६८७ साली कुलाब्यास दुष्काळ पडलेला होता.[2] अनेक आघाड्यांवर लढा द्यावा लागल्यामुळे १६८७ सालानंतर सैन्यशक्तीही कमी पडू लागली असावी. अतोनात पैसा खर्च करावा लागलेला. त्यामुळे संभाजी राजांनी सिद्दीशी लढा देताना व त्याच्या समोर टिकाव धरण्यासाठी किती पैसा आणि सामर्थ्य लागते व कशी हैराण अवस्था होते हे ध्यानात यावे म्हणून इंग्रजांना तहाप्रमाणे धान्य आणि पैसा दिला नसेल. खरोखरच संभाजी राजांना दोन्हीची चणचण भासत असली पाहिजे. प्रथमपासून इंग्रजांनी सिद्दीला आसरा दिल्याने मराठी मुलखाची बरीच नासधूस होत होतीच. मराठे सिद्दीला तोंड देताना द्रव्यबळ आणि माणूसबळाने हैराण झाले होते यात शंका नाही. इंग्रजांना खाडीचे संरक्षण करावयास लावून याची परस्पर चुणूक दाखवावी आणि

१- FR: Bom to Ft. St. G. 30--11--687; राम--ग्रं. ४२. ले. ४६

२. आंकाअ--श्रा, पृष्ठ ६ ते ८

त्यांच्याकडून जमेल तितके दिवस परभारे काम भागवावे हाही हेतू राजांच्या मनात नसेलच असे सांगता येत नाही. सिद्दीच्या उलाढालीकडे कानाडोळा करून मुघलांवर लक्ष केंद्रित करणे मराठ्यांना भागच होते. पुढे १६८८ सालापासून इंग्रजांना सिद्दीपासून चांगलाच त्रास सहन करावा लागला.

सिद्दीच्या उपद्रवाची कथा शिवाजीमहाराजांपासूनच सुरू झालेली आहे. त्याच्या हालचाली मराठी राज्याला फारच हानिकारक होत. त्याचा बंदोबस्त करण्याच्या हेतूने महाराजांनी खंदेरीवर तटबंदी केली; इंग्रजांशी तहही केला. या तहाचा उपयोग न होता त्याचा उपद्रव चालूच राहिला. इंग्रज तह कसा पाळतात या गोष्टीकडे संभाजी राजांचे प्रारंभापासूनच लक्ष होते. त्यांच्या राजवटीत सिद्दीची चाचेगिरी आणि लूटमार वाढून मुलखाची नासधूस होऊ लागली. शेतीचे उत्पन्न बुडून दोन वर्षे जमिनी ओसाड पडल्या. मराठी प्रजेला परागंदा व्हावे लागले आणि राज्याच्या उत्पन्नावरही परिणाम झाला.

सिद्दीच्या बंदोबस्तासाठी संभाजी राजांनी उंदेरी आणि दंडाराजपुरीवर चढाई केली पण त्यात यश लाभले नाही. सिद्दीच्या बंदोबस्तासाठी इंग्रजांवर दडपण आणले. सिद्दीला मुंबईत थारा देऊ नये म्हणून त्यांना सांगितले. ते तहाच्या अटी पाळीत नाहीत हे निश्चितपणे दिसल्यावर मुंबईवर हल्ला करावयाची धमकी दिली. सुरतकर इंग्रज सिद्दीधार्जिणे होते तर मुंबईकरांना संभाजीशी सलोख्याचे धोरण ठेवून स्वसंरक्षण करावे असे वाटत होते. सुरतकर इंग्रजांचे धोरण दुटप्पी होते. जेव्हा सिद्दी आणि मुघल यांनी मुंबईवरच हल्ला केला तेव्हा इंग्रजांना आपली चूक कळली. त्यांनी संभाजीशी तह केला. सुरुवातीला मराठ्यांना शस्त्रास्त्रे देण्याची ते टाळाटाळ करीत. मुघलांशी वाकडे आल्यावर ते धोरण बदलून संभाजी राजांना हवी ती शस्त्रास्त्रे देण्याचे त्यांनी ठरविले. सिद्दीचा बंदोबस्त करावयासाठी प्रत्यक्ष इंग्रज काहीच करीत नसत. परंतु त्यांचा जेव्हा मराठ्यांच्या शत्रूंशी झगडा सुरू झाला, तेव्हा शत्रूचा शत्रू तो आपला मित्र या राजकीय न्यायाने इंग्रजांनी संभाजीशी मैत्री केली. त्यांच्या मागण्या पूर्ण करावयाचे ठरविले. या मैत्रीचा लाभ घेऊन संभाजीमहाराजांनी सिद्दीची कोर्लै येथील लूटमार थांबावी म्हणून खाडीचे संरक्षण करावयाचे काम इंग्रजांच्या गळ्यात टाकले. सिद्दी हा किती त्रासदायक आहे याची इंग्रजांना चांगलीच कल्पना आली. ते अगदी हैराण झाले. त्यांनी पूर्वीच सिद्दीच्या चाळ्यांना आवर घातला असता तर त्याचे इतके स्तोम माजले नसते. मराठ्यांची स्थिती खालावल्यामुळे असेल किंवा संभाजी राजांच्या मनात इंग्रजांना सिद्दीच्या संकटाची पर्यायाने जाणीव करून द्यावयाचा हेतू असेल; परंतु मराठ्यांनी भात आणि पैसा इंग्रजांना ठरावाप्रमाणे दिला नाही एवढे खरे.

सिद्दीचा उपद्रव शिवाजीमहाराजांपासून चालू होता, तसाच तो संभाजी राजांच्यानंतरही चालूच होता. संभाजी राजांनी या निमित्ताने नाविक दलात वाढ केली. या लढ्यातून कान्होजी आंग्रे यांच्यासारखा नाविक सेनानी निर्माण झाला. संभाजीने सिद्दीबरोबर भांडण उकरून काढलेले नव्हते. संभाजी राजांनी याबाबतीत जागरूकता दाखविली आणि आपल्या पित्याच्याच धोरणाचा अवलंब केला. पण सिद्दी प्रकरणाचा निर्णय लावण्यात दोन्हीही पितापुत्रांना अखेरपर्यंत यश आले नाही हे मात्र खरे.

* * *

# ७. मराठे आणि पोर्तुगेज फिरंगी

आज्ञापत्रकाराने हिंदुस्थानात आलेल्या पाश्चात्य व्यापाऱ्यांच्या स्वभावाचे आणि त्यांच्या मनातील हेतूंचे वर्णन अगदी मार्मिक शब्दात केलेले आहे. ते लिहितात, “साहुकारांमध्ये फिरंगी, इंग्रज आणि वलंदेज व फरासीस तसेच डिंगमारादि टोपीकर हेही लोक साहुकारी करितात. परंतु ते वरकड साहुकारांसारखे नव्हेत. त्यांचे यांचे खावंद प्रत्येक प्रत्येक राज्यच करीत आहेत. त्यांचे हुकमानें त्यांचे होत्साते हे लोक या प्रांती साहुकारीस येतात. राज्य करणारास स्थललोभ नाहीं असे काय घडों पाहते? तथापि टोपीकरांस, या प्रांती प्रवेश करावा, राज्य वाढवावें, स्वमतें प्रतिष्ठावीं, हा पूर्णाभिमान. तदनुरूप स्थळोस्थळीं कृतकार्यही झाले आहेत. त्यास ही हट्टी जात, हातास आलें स्थळ मेल्यानेंही सोडावयाचे नव्हेत. यांची अमरदफती आले गेले इतकीच असों द्यावी. त्यास केवळ नेहमी जागा देऊ नये.”[१]


व्यापाराच्या निमित्ताने भारतात आलेल्या पाश्चात्यांत, प्रथम पोर्तुगेजांची गणना होते. इंग्रज, फ्रेंच, डच या व्यापाऱ्यांच्या पूर्वी त्यांनी भारतात सत्ता स्थापन केली, आणि १५१० मध्ये पादाक्रांत केलेल्या गोव्यातून पोर्तुगेजांना १९४७ साली भारत स्वतंत्र झाल्यानंतर १४ वर्षांनी हाकलून देण्यात आले.

१७ व्या शतकाच्या अखेरीपर्यंत इंग्रज व फ्रेंच यांनी हिंदुस्थानात वखारी घातल्या असल्या तरी त्यांचा हेतू प्रामुख्याने व्यापार हाच होता. १५१० मध्ये पोर्तुगेजांनी आदिलशहाकडून गोवे शहर काबीज केले. हळूहळू प्रदेश ताब्यात घेत घेत १५८० पर्यंत दीव, दमण, मुंबईसह वसई प्रांत, चेऊल, गोवा बेट, साष्ट व बारदेश; होनावर, बार्सेलोर व मंगळूर, काननूर, क्रांगानूर, कुलाम (क्विलॉन) व कोचीन, नेंगपट्टण व मेलियपूर, बंगालमधील हुगळी आणि सातिगांव असा भारतातील प्रदेश पोर्तुगेजांच्या सत्तेखाली आला. परंतु त्यानंतर, पोर्तुगेजांनी जिंकलेला प्रदेश मुघल बादशहा, कुत्बशहा, डच इत्यादींनी जिंकला. इ. स. १६६५ मध्ये मुंबई बेट पोर्तुगेजांनी इंग्रजांच्या स्वाधीन केले. तसेच शिवाजीमहाराजांच्या स्वराज्यस्थापनेच्या काळात, दीव, दमण, वसई, चेऊल,


१. आप--जो--पृष्ठ २५

अंत्रुजच्या नावेवरील करासंबंधीचा अडकोळण (फोंडे-गांवे)
गांवचा शिलालेख





संभाजी महाराजांच्या मूळ समाधीच्या जागी
बांधलेली मेघडंबरी



संभाजीराजांच्या मूळ समाधीचे
भग्नावशेष

गोवा, बेट साष्ट व बारदेश असा मराठी मुलुखाशेजारील प्रदेश त्यांच्या ताब्यात होता.

**संभाजी राजे व गोव्याचे फिरंगी :**

शिवाजी महाराजांच्या अखेरच्या काळात त्यांचे व फिरंगीयांचे संबंध फारसे सलोख्याचे नव्हते. इ. स. १६७५ मध्ये शिवाजी महाराजांनी आदिलशहाच्या ताब्यातील फोंडा गड जिंकून घेतला. त्यानंतर कारवार, शिवेश्वर, आणि अंकोल्यापर्यंतचा मुलूख त्यांच्या ताब्यात होता. तसेच घाटाखालील मिरजनच्या नदीपर्यंतचा सर्व विजापुरी प्रदेश मराठ्यांच्याच आधिपत्याखाली होता. फोंडा किल्ला घेतल्यामुळे अंत्रूज, अष्टागार, हेमाडबार्से, बाळी, चंद्रवाडी व काकोडे म्हणजेच हल्लीचे फोंडे, सांगे, केपें, व काणकोण हे महाल मराठ्यांच्या कबजात होते. शिवाजी महाराजांना फोंडा किल्ल्याच्या विजयानंतर गोव्यावर स्वारी करावयाची होती. परंतु मुघलांबरोबर युद्ध चालू असल्यामुळे त्यांनी फिरंग्याबरोबर हे युद्ध टाळले. त्यामुळेच शिवाजीराजांच्या मृत्यूने फिरंगीयांना हायसे झाले होते.

शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर, पन्हाळ्याला असतानाच, संभाजीने प्रत्यक्ष राज्यसूत्रे हातात घेण्यापूर्वीच मराठी मुलुखाभोवती असलेल्या परकीय सत्ताधीशांशी पत्रव्यवहार सुरू केला होता. वस्तुतः अनभिषिक्त छत्रपती असताना देखील, शिवाजी राजानंतर आपण राज्याचे वारस आहोत अशा भूमिकेतूनच त्यांनी गोवेकर विजरईशी ( व्हाइसरॉयशी ) पत्रव्यवहार सुरू केला होता, आणि त्यामुळे संभाजीने आपल्या अंतर्गत आणि वारसाहक्कासंबंधी चालू असलेल्या कलहाचा सुगावा आपल्या शेजाऱ्यांना लागू दिला नाही. दि. ५ मे १६८० च्या सुमारास संभाजीने रामजी नाईक ठाकूर या वकिलाबरोबर गोव्याचा विजरई अंतोनियो–पाइस–द–सांदे यास सलोख्याचे पत्र पाठविले होते. या पत्रात संभाजीने आपल्या वडिलांच्या दुःखद निधनाची बातमी देऊन आपण सत्ताधारी झाल्याचे कळविले आणि पोर्तुगेज व मराठे यांच्यात मैत्रीचा तह करण्यास सुचविले. संभाजींच्या या पत्राचे गोव्याच्या गव्हर्नरला कौतुक वाटले.[1] त्याच वेळी कोकणात शांतता राखण्यासाठी गेलेल्या रायाजी पंडिताने गोव्यात जाऊन विजरईची भेट घेतली. विजरईने संभाजीला उत्तर धाडून शिवाजी महाराजांच्या मृत्यूबद्दल दुखवटा व्यक्त केला आणि संभाजीने स्वतःच्या हातात सूत्रे घेतल्याबद्दल समाधान दर्शविले. शिवाजी महाराजांच्या वेळेपासून असलेले शत्रुत्वाचे संबंध बदलल्याचेही त्याने संभाजीला कळविले. वर उल्लेख केल्याप्रमाणे, संभाजीच्या तहाच्या सूचनेस

१. PM—PP, p 2

गव्हर्नरने मान्यता देऊन तह कायम करण्याचे सुचविले. विजरईने रायाजी पंडिताला सांगितले की, 'मी माझ्या साष्ट व कुडाळ येथील फिरंगी अधिकाऱ्यांना युद्धविषयक हालचाली बंद करण्याचे हुकूम दिले आहेत. रायाजी पंडिताला परतण्याची घाई असल्यामुळे विजरईने पत्र न देता तहासंबंधी तोंडीच सांगून संभाजीला भेट म्हणून सोन्याचा मुलामा दिलेली बंदूक आणि चार कापडाचे नग दिले.[१]

पोर्तुगेज व मराठे यांच्यात शांतता राखण्याची बोलणी चालू असताना डिचोली येथील सुभेदार पोर्तुगेजांशी पूर्वीच्याच धोरणानुसार वागत होता. २ ऑगस्ट १६८० रोजी मराठ्यांनी बारदेश मधील 'सिओलिम' ( Siolim ) हे गाव लुटून तीन माणसांना पकडले. तसेच डिचोलीचा सुभेदार मोरो दादाजी याने गोंव्याकडे मौल्यवान रत्ने घेऊन जाणाऱ्या व्यापाऱ्याला पकडले. या गोष्टी कळताच विजरईने मोरो दादाजीला दि. ४–१–८१ रोजी पत्र लिहून पकडलेली माणसे सोडण्यास सांगितले. या माणसांना सोडले नाही तर संभाजीला पोर्तुगेजांशी मैत्रीचे संबंध नको आहेत असेच विजरई मानणार होता. वरील हालचालींचा विजरईने निषेध केला आणि धर्माजी नागनाथ व मोरो दादाजीला पत्र पाठवून त्याऱ्या प्रांतातील व्यापार बंद केला.[२]

मे १६८१ च्या सुमारास संभाजी राजा डिचोलीस काही दिवस राहिला होता.[३] संभाजी डिचोलीला गेल्यासंबंधीचा उल्लेख पोर्तुगेज कागदपत्राशिवाय इतरत्र कोठेही आढळत नाही. तो तिकडे का गेला हेही समजू शकत नाही. कदाचित पोर्तुगेज प्रदेशाची माहिती काढावयाच्या हेतूनेही तो तिकडे गेला असेल. ( १६८० मध्ये शहाआलम डिचोलीला गेला तेव्हा त्याने संभाजी व अकबर यांचे वाडे जाळल्याचा उल्लेख आहे. ) संभाजी जून १६८१ मध्ये काही दिवस पन्हाळ्याहून मलकापूर प्रांतात गेला होता तेव्हा तुळाजी देसाई याने आपल्या देशमुखीसंबंधी तक्रार केली होती.[४] यावरून संभाजी राजे मलकापुराहून डिचोलीला गेले असावेत. संभाजीचा डिचोलीस मुक्काम असताना विजरईने त्यास पत्र लिहून शिवाजीच्या मरणानंतर ज्या काळी संभाजीला सर्व गोष्टी अनुकूल वाटल्या नव्हत्या, त्यावेळी त्यांच्याशी कशी वर्तणूक ठेवली होती, त्याची आठवण करून दिली. विजरईने संभाजीला डिचोलीच्या सुभेदाराच्या हालचाली थांबविण्याविषयी सुचविले. दि. ४–६–८१ रोजी विजरईने अण्णाजी दत्तोला पत्र लिहून पोर्तुगेज

१. PM—PP, p 2,4
२. PM—PP, p 4, 5
३. PM—PP, p 5.
४. शिचसा, खंड ६, ले. १११

व हिंदू राजे यांच्यातील तहाचे फायदे काय आहेत हे स्पष्ट केले. या सर्व गोष्टी कळल्यावर संभाजीने जूनच्या अखेरीस येसाजी गंभीरराव या आपल्या वकिलास सलोख्याची बोलणी करण्यासाठी गोव्यास पाठविले. पूर्वीचा वकील रामजी नाईक ठाकूर याचा संभाजीविरुद्ध झालेल्या कटात हात असल्याने संभाजीच्या आज्ञेवरून कोंदि द आल्व्होर याने त्यास अटक केली होती.[१] रामजी नाईक याची सुटका झाल्यानंतर कानरा (Canara) येथे जाऊन त्याने आदिलशहाकडे नोकरी पत्करली.[२] जुलैच्या मध्यात अण्णाजी दत्तो डिचोलीला गेला. पोर्तुगेजांनी याचा फायदा घेऊन नारायण शेणवी यास अण्णाजीकडे पाठविले. त्याने डिचोलीच्या सुभेदाराच्या वागणुकीबद्दल तक्रार केली.[३] ऑगस्ट १६८१ पूर्वी संभाजी विरुद्ध झालेल्या कटात अण्णाजी सामील होता. पोर्तुगेज कागदपत्रावरून याच सुमारास तो डिचोलीस गेला होता. विजरईची दि. २१–७–८१ व दि. २३–७–८१ची अण्णाजीला लिहिलेली दोन पत्रे आहेत. त्यामुळे संभाजीच्या आज्ञेवरून अण्णाजी डिचोलीला काही कामासाठी गेला का विषप्रयोगाच्या कटात आपला हात आहे हे संभाजीला कळू नये म्हणून तेथे गेला हे समजू शकत नाही. डिचोलीहून एक महिन्याने तो पन्हाळा किंवा रायगडला परतला तेव्हा त्याला कटात सामील असल्याबद्दल ठार मारण्यात आले. गोव्याला गेलेला येसाजी गंभीरराव पुष्कळ दिवस गोव्याच्या दरबारात राहिला होता. येसाजी जरी तहाच्या वाटाघाटीच्या निमित्ताने गेला होता तरी संभाजीने स्वतःच्या सहीशिक्क्याचे पत्र देऊन कोठल्याही तऱ्हेने आपला हात अडकवून घेतला नव्हता. राज्यावर आल्याबरोबर कोणाचेही शत्रुत्व ओढवून घ्यावयास नको म्हणून संभाजीने वकिलामार्फत बोलणी सुरू केली असावीत. येसाजी गंभीररावाने डिचोलीच्या सुभेदाराच्या वागणुकीसंबंधी संभाजीला कळविले. संभाजीने पोर्तुगेजांच्या कागाळ्यांचा विचार केला आणि डिचोलीचा सुभेदार मोरो दादाजी यास बदलून त्याच्याऐवजी जिवाजी विनायक ह्याची नेमणूक केली (१६८१ डिसेंबरअखेर). याच सुमारास गोव्याच्या अधिकारपदात फेरबदल होऊन, 'दो फ्रान्सिस्कु द ताव्हर कोंदि द आल्व्होर' याची विजरई म्हणून नेमणूक झाली.[४]

संभाजी व पोर्तुगेज यांच्यात चांगले संबंध राहावेत म्हणून बोलणी चालू असतानाच, १६८२ च्या जानेवारीत, संभाजीने कारवारजवळील अंजदीव बेट घेऊन त्यावर किल्ला बांधण्याची तयारी केली. संभाजीने दगड व चुना अंजदीव

१. PM—PP, p 7, 11

२. शिचसा, खंड १३, ले १५, १८, १०६, १०७

३. PM—PP, p 7

४. PM—PP, p 8

बेटाकडे पाठवून या कामास जो पैसा लागेल तो खर्च करण्याची आज्ञा दिली होतीच. याशिवाय त्याने **नकाशा काढण्याची** आज्ञा देऊन सामानाची जमवाजमव करण्यास सांगितले. ही माहिती विजरईचा सेक्रेटरी दोतोर लुईस गोंसाल्व्हीस कोत याने २९–४–८२ रोजी पत्र लिहून विजरईस कळविली. ही बातमी कळताच विजरईने पणजीच्या किल्ल्यात आपल्या मंत्र्यांची बैठक घेतली. अंजदीव पूर्णपणे मराठ्यांच्या हातात पडण्यापूर्वी विजरईने त्या बेटावर माणसे व सामान पाठवून किल्ला बांधण्याची व तोफा ठेवण्याची आज्ञा केली. पोर्तुगेजांच्या दृष्टीने हे बेट मराठ्यांच्या हातात जाणे धोक्याचे होते. कारण धान्यसामग्री कर्नाटकातून समुद्रमार्गे गोव्यात जात असे. शिवाजीमहाराजांनी खंदेरीस किल्ला बांधल्यापासून पोर्तुगेजांच्या चेऊलला उपद्रव होऊ लागला होता. त्याचप्रमाणे संभाजीने अंजदीव बेटावर किल्ला बांधला असता तर गोव्यास उपद्रव होऊ लागला असता. यामुळे पोर्तुगेजांना संभाजीविरुद्ध हस्तक्षेप करण्यास आणखी एक सबब मिळाली. संभाजीने सिद्दीशी युद्ध करण्याच्या उद्देशाने अरबांशी संगनमत करून त्यांच्या आरमाराची मदत घेतली होती. अरब व संभाजी यांची मैत्री दिवसेंदिवस वाढत होती. अरब हे पोर्तुगेजांचे शत्रू. त्यामुळे अंजदीव बेट संभाजीच्या ताब्यात जाण्याची भीती विजरईला वाटू लागली. दि. ५ मे १६८२ रोजी पोर्तुगेजांनी अंजदीव बेटाचा ताबा घेतला. दि. २–७–८२ रोजी कॅप्टन आमारु सिमोंइस पेरैर याने तेथील किल्ल्याचा पहिला दगड बसवून सहा महिन्यांच्या आत किल्ला बांधून काढला. पावसाळ्यात अंजदीव बेटावर ७०० सैनिक आणि इतर गवंडी, सुतार व लोहार, मजूर इ. मिळून १००० माणसे काम करीत होती. ही गोष्ट संभाजी राजांना कळली. त्यांनी आपल्या वकिलामार्फत व अंकोल्याच्या सुभेदाराकडून विजरईकडे वरील कृत्याबद्दल तक्रार केली. परंतु हे बेट पोर्तुगेजांचेच असून त्याबाबत बोलण्यास संभाजीला अधिकार नाही असे विजरईने उत्तर दिले. अंजदीव बेटासंबंधी पोर्तुगेज व मराठे यांच्यात वाद निर्माण झाला,[१] आणि हळुहळू त्यांच्यातील मैत्रीचे संबंध दुरावत चालले. दि. १९–३–८२ रोजी डिचोलीचा सुभेदार जिवाजी विनायक याने सैन्यासह चोरो ( Chorao ) बेटावर प्रवेश केला. हा प्रवेश नारबाराव देसायाच्या प्रदेशातून करण्यात आला होता. या देसायातर्फे पोर्तुगेजांनी मराठ्यांविरुद्ध शस्त्र उपसले.[२] अशा बारीकसारीक कागाळ्या एकमेकांविरुद्ध चालू असल्या तरी त्यामुळे पोर्तुगेज–मराठे संबंध पूर्णपणे बिघडले नव्हते, आणि त्यांचा पत्रव्यवहार पूर्ववत चालू राहिला होता. मराठ्यांच्या

१. PM—PP, p 8, 9, 10; F. R; Car to Sur; 28-4-82, 30–7–82

२. PM—PP; p 10

वकिलामार्फत संभाजीला पुत्र झाल्याचे जेव्हा विजरईला समजले तेव्हा त्याने दि. २८–७–८२ रोजी संभाजीला पत्र लिहून त्याचे अभिनंदन केले आणि नवीन जन्मलेल्या राजपुत्रास ( शाहूस ) एक दागिना नजर केला.[१]

संभाजी राजाने येसाजी गंभीरराव बरोबर विजरईला दुसरे पत्र लिहून कळविले की, डिचोली व कुडाळ यांच्या परिसरात आपण दोन दारूचे कारखाने उभारले असून, कर्नाटकात व मलबारमध्ये तोफा, गंधक, सोरा हे सामान विकत घेण्याची परवानगी मिळाली आहे, तरी त्यास पोर्तुगेज आरमाराकडून अडथळा होऊ नये. दि. २८-७-८२ रोजी संभाजीला विजरईने पत्र लिहून त्याच्या सर्व मागण्या मान्य केल्या. तरीही मराठी सुभेदारांकडून पोर्तुगेजांना चांगली वागणूक मिळत नसून, उत्तरेकडील बंदरातील पोर्तुगेजांची गलबते मराठा सुभेदारांकडून पकडली जातात व त्यामुळे पोर्तुगेज प्रजेला त्रास होत असल्याची त्याने तक्रार केली होती. मराठ्यांच्या ४-५ गलबतांनी चेऊल जवळ कँबेकडे जाणारे व्यापारी जहाज पकडले होते. हे जहाज गोव्यातील गुजराथी व्यापारी रामचंद्र बजाजी याचे होते, ते त्याला परत करावे आणि पोर्तुगेज व मराठे यांच्यात सलोख्याचे संबंध राहण्यासाठी वरील गोष्टी बंद कराव्यात, अशा आशयाचे तक्रारवजा पत्र विजरईने लिहिले होते. संभाजी राजांनी अरबांबरोबर मैत्री करून त्यांना स्वतःकडे नोकरीत ठेवून घेतले होते. स्वतःच्या हद्दीत वखारी उघडण्यासाठी संभाजीने अरबांना परवानगी दिली होती. अरब हे पोर्तुगेजांचे शत्रू असल्यामुळे विजरईने संभाजी आणि अरबांच्या संबंधाविषयी निषेध व्यक्त केला. अशाच तऱ्हेचे तक्रारवजा पत्र विजरईने निळकंठ मोरेश्वरास लिहिले आणि येसाजी गंभीररावाबरोबर तहासंबंधी संभाजीचे अधिकारपत्र देण्याविषयी कळविले. विजरईच्या इच्छेनुसार निळकंठ मोरेश्वराने डिचोलीच्या सुभेदारास व्यापाऱ्याचे जहाज परत करण्यास सांगितले. जिवाजी विनायकासंबंधी संभाजीकडे तक्रार जाताच नोव्हेंबर १६८२ मध्ये जिवाजी विनायकाला कैद करून त्याच्या जागी मोरो दादाजीला नेमण्यात आले.[२] अशा तऱ्हेने संभाजीनेही मैत्रीचे संबंध राखण्याचा प्रयत्न केला. परंतु येसाजी गंभीरराव याला ज्या कारणासाठी गोवेकरांच्या दरबारात पाठविले होते तो तह अपुराच राहिला. तह करण्याविषयी विजरईने निकड लावली. पण संभाजीने आपले अधिकारपत्र न दिल्यामुळे प्रत्यक्ष तह होऊ शकला नाही. संभाजीने असे अधिकारपत्र देण्याचे मुद्दाम टाळले असावे.

---

१. PM—PP, P 11

२. PM—PP, p 11, 12

**संभाजीविरुद्ध पोर्तुगेजांना औरंगजेबाची चिथावणी :**

सुलतान अकबराने संभाजीकडे आश्रय घेतल्यापासून, औरंगजेबाने त्या दोघांविरुद्ध हालचाली सुरू केल्या होत्या. त्याने संभाजीविरुद्ध युद्ध सुरू करून अकबराला पकडण्याचे प्रयत्न सुरू केले. औरंगजेब दक्षिणेत बऱ्हाणपूर येथे सैन्यानिशी आल्यापासून त्याने दक्षिणेतील इतर सत्ताधीशांचे संभाजीविरुद्ध सहाय्य मिळविण्याचे प्रयत्न सुरू केले. त्या दृष्टीने त्याने पोर्तुगेज विजरईला दि. २०-६-८२ रोजी पत्र धाडले.[१] हे पत्र विजरईस सहा महिन्यांनंतर मिळाले. १६८२ च्या ऑगस्टमध्ये विजरईस बातमी लागली की, मोगल बादशहा मोठ्या सैन्यानिशी संभाजीविरुद्ध येत आहे. यासाठी १६८२ च्या डिसेंबर महिन्यात औरंगजेबाच्या विनंतीनुसार विजरईने ठाण्याजवळील पोर्तुगेज हद्दीतून मोगली गलबतांना जाण्यास परवानगी दिली. याच महिन्यात विजरई कोंदि द आल्व्होर याने उत्तरेतील अधिकारी लोबो द सिल्व्हेरा आणि चेऊल, वसई व दमण येथील अधिकाऱ्यांना पत्रे लिहून पोर्तुगेज हद्दीतून मुघल आरमार जाऊ देण्याची परवानगी देण्यास सांगितले.[२]

शेख महंमद हा औरंगजेबाचा वकील दि. २०–१–८३ रोजी गोंव्यास पोहोचला. त्याचे गोव्यात चांगल्या तऱ्हेने स्वागत झाले. शेख महंमदने विजरईस सांगितले की, मोगल बादशहा औरंगजेब याने संभाजीविरुद्ध युद्ध करण्याचे योजले असल्यामुळे, पोर्तुगेजांनीही संभाजीविरुद्ध युद्ध पुकारावे, अशी त्याची इच्छा आहे. मुघलांच्या सैन्यास पोर्तुगेज प्रदेशातून धान्य विकत घेण्यास परवानगी द्यावी आणि सुरतेहून मुंबईला येणाऱ्या मुघलांच्या तारव्यांस व काफिल्यांस पोर्तुगेजांनी उपद्रव देऊ नये अशी विनंती त्याने विजरईकडे केली. मुघल बादशहाची इतर बाबतीतील विनंती विजरईने मान्य केली; परंतु संभाजीशी सलोखा असल्यामुळे मराठ्यांशी युद्ध करण्याचे नाकारले. पोर्तुगेज दरबारातच असलेल्या येसाजी गंभीररावाला विजरई व शेख महंमद यांच्यातील वाटाघाटींचा सुगावा लागला. मुघल वकील विजरईस भेटून जाताच येसाजी गंभीररावाने दि. १०–२–८३ रोजी विजरईची भेट घेतली. त्याने मुघल व विजरई यांच्यात चाललेल्या वाटाघाटींची विचारणा केली. विजरईने शेख महंमदाशी केलेल्या बोलण्याची येसाजीला माहिती दिली.[३] याच संबंधात रामचंद्र पंडितानेही विजरईस विचारणा केली होती. दि. १७–२–८३ च्या पत्रात विजरई रामचंद्र पंडितास लिहितो, "संभाजी राजांनी आमची पकडलेली गलबते व मचवे परत केले नाहीत. जे गाव जाळले

१. PM—PP, p 21
२. PM—PP, p 16
३. PM—PP, p 18

त्याची नुकसानभरपाई दिली नाही, या गोष्टी केल्याखेरीज येसाजी गंभीर-रावाच्या वाटाघाटीचा उपयोग नाही. राजे यांनी येसाजीला तह करण्यासाठी अधिकारपत्रे दिलेली नाहीत. ते केवळ वेळ काढीत आहेत. आता मुघल दक्षिणेत उतरत असून, त्यांनी मदत मागितली आहे. मी वकिलास परत पाठविले आहे. वेळ येईल तेव्हा संभाजीस आमच्या मदतीचे महत्त्व कळून येईल. मुघलांच्या वकिलास आम्ही उत्तर देण्यापूर्वीच काय ते कळवा. या बाबतीत काय करावयाचे ते लवकर करा."[१]

हे पत्र पाहिले म्हणजे सहज असे वाटते की, संभाजीला पोर्तुगेज मदत देण्यास तयार असूनही ती त्याने घेतली नाही. संभाजीला दोष देत जरी विजरईने रामचंद्र पंडितास दमदाटीचे पत्र लिहिले असले तरी प्रत्यक्षात गोवेकरांनी डिसेंबर १६८२ पासूनच मुघलांना मदत देण्यास सुरुवात केली होती. एकीकडे संभाजीने पत्र दिले नाही म्हणून तक्रार करीत दुसरीकडे त्यांनी मुघलांशी संधान बांधले. दि. १२–४–८३ रोजी विजरईने औरंगजेबास लिहिलेल्या पत्रावरून विजरईची खरी भूमिका लक्षात येते व त्याच्या दुटप्पी राजकारणाचा बोध होतो. हे पत्र पाहिले म्हणजे संभाजीची भूमिका योग्यच होती हे सिद्ध होते.

गोव्यात गेलेला मुघल वकील एप्रिल १६८३ मध्ये पोर्तुगेज जहाजातून परत जावयास निघाला. त्या जहाजाचा कॅप्टन फेलिसिनो कापेलो ( Feleciano Capelo ) हा होता. विजरईने दमणच्या अधिकाऱ्यास पत्र लिहून मुघल वकिलास सर्व तऱ्हेचे सहाय्य देण्यास व त्याला जरूर पडली तर खरेदीला पैसा देण्यास सांगितले होते. हा वकील परत जाताच विजरईने दि. १२–४–८३ रोजी औरंगजेबास एक महत्त्वाचे पत्र लिहिले. तसेच विजरईला पोर्तुगालच्या राजाकडून संभाजीचा नायनाट करण्यासंबंधी पत्र आले होते. विजरईने औरंगजेबाला लिहि-लेल्या पत्रात पोर्तुगेजांचे मराठ्यांविषयी धोरण काय होते व त्यांचा मुघलांकडे कल कसा होता हे स्पष्ट केले होते. तसेच मुघल–मराठा संघर्षाचा फायदा घेऊन पोर्तु-गेजांना दक्षिण कोकणावर आपला अधिकार प्रस्थापित करावयाचा होता. विजरई औरंगजेबाला लिहितो, " आपले पत्र जरी दि. २०–६–८२ रोजी लिहिलेले असले तरी ते मला जानेवारी ८३ च्या अखेरीस मिळाले. या पत्रात आपण म्हटले होते की, आमची धान्यसामुग्री घेऊन जाणारे तारवे तुमच्या तारव्या-बरोबर जातील. संभाजीचा नायनाट करण्यासाठी आपले पत्र येण्यापूर्वीच पोर्तु-गालच्या राजाच्या आज्ञेनुसार मी सर्व व्यवस्था केलीच होती. ती व्यवस्था म्हणजे उत्तरेकडील अधिकारी डॉम मॅन्युयल लोबो द सिल्व्हेरिया ( Dom Manuel Lobo de Silveria ), आणि चेऊल, वसई व दमण येथील अधिकाऱ्यांना मी

१. PM—PP, p 19

लिहिले होते की, मुघल सैन्यास आपल्या हद्दीतून जाण्यास अडचण करू नये. त्यांना दाणागोटा विकत घेण्यासंबंधी परवानगी द्यावी. आपण सांगितल्याप्रमाणे सहा लढाऊ गलबते तयार करून तुमच्या आरमाराच्या सहाय्यास तयार ठेवली. या सर्व गोष्टी शत्रूला ( संभाजीला ) कळल्या. त्याने मला पत्र लिहून मुघलांना मदत न करता आम्हाला करावी म्हणून लिहिले. माझा ओढा तुमच्याकडे असल्या-मुळे मी संभाजीने केलेली विनंती अमान्य केली. या सहाय्याबद्दल आपल्याला मी विनंती करतो कीं, मी केलेल्या मदतीबद्दल जो कोंकणचा प्रदेश तुम्ही जिंकून घ्याल तो आम्हास बहाल करावा. इतकेच नव्हे तर कल्याण–भिवंडीकडे जाणाऱ्या तुमच्या तारव्यांस प्रतिकार करण्यासाठी संभाजी राजाने पारसिक[1] येथे किल्ला बांधण्याची तयारी केली असता आम्ही ती जागा ताब्यात घेतली व तेथे किल्ला बांधला. धान्य घेऊन जाणाऱ्या तुमच्या सैन्यास अडचण करावी हा संभाजीचा उद्देश मी सफल होऊ दिला नाही. तुम्हाला मदत करण्याच्या उद्देशाने मी सहा गलबते बांधून घेतली. त्यासाठी आलेला खर्च तुम्ही आम्हाला द्यावा. ”[२]

विजरईला मुघल मराठे संघर्षातून स्वतःचा फायदा करून घ्यावयाचा होता. मुघल व मराठे यांच्या लढाईत संभाजीचा खात्रीने पराजय होईल असे विजरईला वाटत होते. तेव्हा वाहत्या गंगेत हात धुऊन मुघलांकडून दक्षिण कोकण कबजात आणावयाचा त्याने प्रयत्न केला. सबंध दक्षिण कोकणचा प्रदेश गोव्यास जोडणे हा

---

१. **पारसिकचा किल्ला :**

कल्याणच्या खाडीच्या मुखाशी हा एक लहान किल्ला आहे. सध्या पडिक अवस्थेत असलेला हा किल्ला पाण्यापासून सुमारे २५ फूट उंचीच्या चोहोकडून सारख्या तुटलेल्या एका खडकावर बांधलेला आहे. किल्ल्यात जाण्याचा दरवाजा खाडीच्या बाजूस असून खडक फोडून वर चढण्यास पायऱ्या तयार केलेल्या आहेत. या किल्ल्याची तटबंदी फार जुनी आहे असे सांगतात. तटाची उंची बारा फुटां-पासून २० फुटापर्यंत होती आणि नदीच्या अंगास मेढेकोट (?) बांधलेला असून तेथे सहा तोफा ठेवता येतील अशी व्यवस्था केलेली होती. बाकीच्या बाजूंनी तटातून बंदुका मारण्यासाठी फक्त भोके ठेविलेली होती. इ. स. १८८१ मध्ये या किल्ल्याचा मागमूसही शिल्लक राहिला नव्हता. त्याचे दगड काढून त्यांचा उपयोग बहुधा आगगाडीचा रस्ता बांधण्यासाठी केला असावा असे क्यांबेल लिहितो. ठाणे स्टेशन सोडून पुढे गेले म्हणजे जे दोन बोगदे लागतात, ते पारसिक डोंगरातले आहेत.

२. PM—PP, p 20–24

पोर्तुगेजांचा फार जुना हेतू होता. विजरई कोंदि द आल्व्होर याची वागणूक त्या धोरणाला अनुसरूनच होती.[१]

पोर्तुगेज व मुघल यांच्यातील तहामुळे संभाजी राजांनीही आपले सामोपचाराचे धोरण बदलून चढाईचे धोरण स्वीकारले. यातूनच पुढे पोर्तुगेज–मराठा युद्ध सुरू होऊन ही लढाई प्रथम चेऊल, वसई, दमण या पोर्तुगेजांच्या उत्तरेकडील प्रदेशात सुरू झाली.

उत्तरेकडील प्रदेशात प्रत्यक्ष लढाई सुरू होण्यापूर्वीच पोर्तुगेज व मराठे यांच्यात १६८१ च्या मे पासूनच चकमकी चालू होत्या. त्या भागात पोर्तुगेजांनी मराठ्यांना मारल्यामुळे, मराठ्यांनी सूड म्हणून दमण येथील काही घरे जाळली.[२] इ. स. १६८२ च्या फेब्रुवारीच्या सुमारास संभाजीने आपली माणसे चेऊलला पाठवून तेथील विजरईकडून योग्य जागा घेण्यासाठी परवानगी मागितली. सिद्दीप्रमाणेच आपणही जागा घेऊन, तेथे तटबंदी उभारून अडीअडचणीच्या वेळी राहण्याची सोय करावी असा त्या मागणीमागे उद्देश होता. परंतु गोव्याच्या विजरईकडून परवानगी आल्याशिवाय संभाजीला जागा देण्याचे उत्तरेकडील गव्हर्नरने नाकारले.[३]

इ. स. १६८२ मध्ये नारायण देव राणे हा रामनगरचा राजा होता. ह्यालाच चौथिया राजा म्हणत. पोर्तुगेज या चौथिया राजाला कर व चौथाई देत असत. संभाजीने रामनगरच्या राज्याचा बराच भाग काबीज केल्यावर, पोर्तुगेज रामनगरच्या राजाला जो कर देत होते तो त्यांनी मराठ्यांना द्यावा, अशी संभाजीने मागणी केली. रामनगरचा सबंध प्रदेश तुम्ही जिंकला तरच तो कर देऊ असे पोर्तुगेजांनी उत्तर दिले. ( हा कर मराठ्यांच्या चौथाईसारखा नाही. )

पोर्तुगेजांनी ठाणे खाडीतून धान्य घेऊन जाणाऱ्या मुघली आरमारास परवानगी दिली.[४] तेव्हापासून मराठे पोर्तुगेज यांचे संबंध बिघडले, आणि संभाजी राजांनी पोर्तुगेज अंमलाखालील उत्तर कोकणात चढाईस सुरुवात केली. येथूनच मुघली सैन्यास वाट देण्यात आली होती. याच प्रदेशातील पोर्तुगेजांचे दोन किल्ले इ. स. १६८३ च्या जानेवारीमध्ये मराठ्यांनी जिंकले. तेथे त्यांना तोफखाना तयार करवून सुरतेहून बहाद्दूरखानाकडे जाणाऱ्या जहाजांना अडवावयाचे होते. हे कळताच बहाद्दूरखानाने सैदी याकूतखानाला तेथे धाडले. या सैदी याकूतखानाने मराठ्यांनी घेतलेल्या दोन गडांपैकी एक जमीनदोस्त करून पुष्कळ

१. पोम–पि.--पृष्ठ ९१

२. F. R : Mahim to Bom, 17–5–1681

३. F. R : Bom to Sur, 25–2–82

४. PM—PP, p 14; Bom to Sur, 8–1–83

लोकांची कत्तल केली. दुसरा किल्ला त्याला मराठ्यांकडून घेता येईना म्हणून बहादूरखान तेथे पोहोचला. दि. ५–१–८४ रोजी (वद्य १४ पौष १६०४) त्याची मराठ्यांबरोबर लढाई झाली. गड घेऊन बहादूरखान कल्याण–भिवंडीकडे गेला.[१] या दोन गडांची नावे कळू शकत नाहीत. मुघल फौजेला समुद्रमार्गाने येणारी रसद अडविण्यासाठी व पोर्तुगेजांना जरब बसविण्यासाठी संभाजीने पोर्तुगेजांचे हे दोन गड घेतलेले होते.

दि. १५–४–८३ रोजी संभाजीने स्वतः १००० घोडदळ व २०० पायदळ घेऊन तारापूरवर हल्ला केला आणि ते शहर जाळले. याशिवाय मराठ्यांनी दमणपासून वसईपर्यंत असलेल्या डहाणू, आसेरीम, सैबाना आणि इतर काही गावांवर हल्ले केले. त्यांनी काही गावे लुटली, काही जाळली, होड्या व पडाव हस्तगत केले आणि दोन पोर्तुगेज पाद्रीही कैद केले. तारापूरचा अधिकारी मॅनुअल अलवारेस तेथे गेला व त्याने झाडाझुडपांचा आडोसा तयार करून मराठ्यांवर हल्ले केले.[२] पोर्तुगेजांनी बदला म्हणून कर्नाटकातून तांदूळ घेऊन येणारे वेंगुर्ल्याच्या व्यापाऱ्याचे काही पडाव व मचवे गोव्यास धरून नेले. गोवे दरबारातील येसाजी गंभीररावाला कैद केले. मराठ्यांच्या वकिलास कैद केल्यामुळे अकबराच्या वकिलाने त्यासंबंधी पोर्तुगेजांकडे विचारणा केली होती. तेव्हा कौंदि द आल्व्होर याने सांगितले होते की, संभाजीने पूर्वसूचना न देता एकदम आमच्याशी युद्ध सुरू करून, मराठ्यांच्या प्रदेशातून विश्वासाने जाणाऱ्या पोर्तुगेज पाद्र्यास कैद केले. याशिवाय पोर्तुगेजांसाठी धान्य घेऊन येणाऱ्या लमाणास मराठे पकडून ठेवणार हे कळल्यावरून मराठ्यांच्या वकिलास पहारेकऱ्यांच्या देखरेखीत ठेवण्यात आले होते. काही दिवसांनंतर येसाजी गंभीरराव यास गोव्याहून परत जाण्यास परवानगी देण्यात आली.[३]

अशा तऱ्हेने पोर्तुगेज–मराठे याचे संबंध बिघडत गेले आणि त्याचे पर्यवसान त्याच्या युद्धात झाले. ते संबंध किती बिघडले होते हे विजरईच्या उद्‌गारावरूनच लक्षात येते. संभाजीने कल्याण–भिवंडीस मुघलांवर जय मिळवला तेव्हा त्याचे अभिनंदन करण्याची सूचना विजरईस दि. ४–५–१६८३ रोजी देण्यात आली होती. तेव्हा कौंदि द आल्व्होरने म्हटले, "आमचा संभाजीशी संबंध आता निराळा आहे आणि त्यामुळे त्याच्या अभिनंदनाचे कारणच आता राहिले नाही."[४] संभाजीनेही उघडपणे जाहीर केले होते की, आपण डिचोलीला जाणार

१. अख : ८--३--१६८३

२. PM—PP, p 26

३. पोम--पि, पृष्ठ ९२

४. कित्ता

आहोत. त्याने आपल्या एका अधिकाऱ्यास वेढा देण्यासाठी चेऊलला धाडले. येथूनच पोर्तुगेज–मराठे युद्धास प्रारंभ झाला. हे युद्ध सुरू होताच विजरई कोंदि द आल्व्होर यास संभाजी राजाला जिवंत पकडण्याची इच्छा झाली. ( कदाचित् औरंगजेबाने त्याला तसे करण्यास सुचविले असण्याचा संभव वाटतो. )

भतग्रामातील नारवे येथे गोकुळअष्टमीस जत्रा भरत असे. त्यावेळी हजारो लोक पंचगंगा नदीत स्नान करण्यासाठी जात. ह्या नदीच्या दक्षिण तीरावर पोर्तुगेजांच्या अंमलाखाली दिवाडी हे बेट होते. नदीच्या उत्तर तीरावरील भतग्रामातील नारवे संभाजीच्या राज्यात होते. संभाजी राजा नारव्याच्या नदीत स्नान करण्यासाठी येणार असल्याची बातमी विजरईस दि. १२-८-८३ रोजी लागली. तो प्रत्यक्ष आला तर त्याच्यावर अचानक छापा घालून त्यास पकडण्याचा पोर्तुगेजांचा विचार होता. परंतु संभाजीने स्नान करण्याचा विचार रहित केल्यामुळे कदाचित विजरईचा हा बेत फसला असावा. कारण या गोष्टीसंबंधी पुढे काय झाले हे पोर्तुगेज कागदपत्रात आढळत नाही.[1]

### उत्तर कोकणातील हालचाली :

कुलाबा जिल्ह्यातील नागावच्या पुढे चेऊल हे बंदर आहे. त्याला लागूनच रेवदंडा आहे. इ. स. १५८० पासूनच वसई प्रांत व चेऊल पोर्तुगेजांच्या ताब्यात होते. चेऊलला त्यांनी कोट बांधूनच त्याला सागरी किल्ल्याचे स्वरूप आणले. चेऊलच्या पश्चिमेस समुद्र आणि दक्षिणेस कुंडलिका खाडी आहे. उरलेल्या दोन दिशांना पोर्तुगेजांनी खंदक खोदून तो थेट पाण्याला नेऊन भिडविला. रेवदंडा हा गाव चेऊलचाच एक भाग आहे. पोर्तुगेजांनी तेथे तट बांधून ते व्यापाराचे स्वतंत्र ठाणे केले होते. कप्तान सोज याने १५५८ मध्ये हा किल्ला बांधावयास प्रारंभ केला.

### चेऊलचा वेढा :

त्यावेळी तेथे असलेल्या फादर पिएर जोसेफ द ऑर्लीन्स याने संभाजी महाराजांच्या गोव्यातील लढाईची थोडक्यात माहिती दिलेली आहे. ती पोर्तुगेज कागदपत्रातील माहितीशी जुळते. संभाजी राजांनी चेऊलला वेढा दिला त्या संबंधात तो लिहितो,[2] " The counterblast of this affair fell on the Portuguese, for Sambhaji irritated that they had allowed free passage to the Mogul troops through the lands possessed in the

१. कित्ता

२. ERS, D' Orleans, p 340

Deccan; attacked one of their fortresses close to Chaul; when they were least expecting it, and not being able to carry it by assault, he besieged Chaul itself. ''

प्रत्यक्ष वेढ्याला सुरुवात करण्यापूर्वीच इ. स. १६८२ च्या जूनमध्ये मराठ्यांनी चेऊल प्रांतात जाऊन किल्ल्याला घेरले होते. त्यावेळी तेथे असलेला किल्लेदार शेख हबीबुल्ला याने मराठ्यांवर हल्ला केल्यामुळे मराठे पळाले.[1] यानंतर मराठ्यांनी दि. २३–७–८२ रोजी रेवदंड्याच्या किल्ल्यावर हल्ला केला. एकाच वेळी त्यांनी ह्या किल्ल्यावर व सदरहू शहराच्या तटावर आणि कोरलाईच्या किल्ल्यावर हल्ला केला.[2]

वरील हालचालीनंतर, एक वर्षाने, वद्य ११, जेष्ठ १६०५ म्हणजेच दि. १०–६–८३ रोजी संभाजी राजे राजापुरास गेले. फिरंगियांसी बिघाड होऊन रेवदंड्यास वेढा घातला.[3] संभाजी राजे यांचा वेढा फिरंगाणास आला अशी नोंद अधिकारी शकावलीत आढळते. ( फिरंगाण = कोर्लई, बोर्लई, साष्ट, बारदेश )[4] पोर्तुगेज कॅलेंडर इंग्रजी कॅलेंडरपेक्षा १० दिवसांनी जास्त धरले जाते. त्या दृष्टीने हा वेढा २० जूनला घातला असे होते. हा किल्ला घेण्याच्या उद्देशाने मराठ्यांच्या २००० घोडदळ व ६००० पायदळ असलेल्या तुकडीने दि. २२ अथवा २३ जुलैच्या रात्री चेऊलवर हल्ला चढविला. इंग्रज वखारवाल्यांना या वेढ्याची माहिती होती. संभाजी राजांनी मोठ्या सैन्यानिशी चेऊलला वेढा दिला असून, ते तो घेण्याच्या बेतात असल्याचे सुरतकरांनी आपल्या दि. ३१–७–८३ च्या पत्रात स्पष्ट केले होते.[5] रात्रीच्या पावसामुळे किल्ल्यावरील बरेचसे पहारेकरी घरी गेले होते. जे थोडे होते ते दमले होते. याचा फायदा घेऊन मराठ्यांनी शिड्या लावून किल्ल्यात प्रवेश केला. वर चढणाऱ्यांना किल्ल्यावरील पोर्तुगेजांनी ढकलून दिले, आणि लावलेल्या शिड्या फेकून दिल्या. अशा तऱ्हेने पोर्तुगेजांनी मराठ्यांचा हा हल्ला परतवून लावला. डॉम फ्रान्सिसको द कोस्ता याने हातातील बंदुकीने गोळीबार केला.

चेऊलवर हल्ला केला त्याच दिवशी मराठ्यांनी कोरलाईच्या किल्ल्यावरही ( Marro de Chaul ) हल्ला केला. मराठ्यांकडील सहा गुप्तहेरांनी आवाज न करता गडावर चढून जाण्याचा प्रयत्न करून तेथील पहारेकऱ्यांना मारले. तटा-

१. अख : २०–६–८२

२. पोम--पि, पृष्ठ ९३

३. शिचप्र, पृष्ठ ३२

४. आंकाअ–आ, पृष्ठ २

५. F. R. : Sur to Bom, 31–7–1683

वरून चढणारे मराठे पकडले गेले. त्यामुळे पोर्तुगेजांना हल्ल्याची कल्पना आली. त्यांनी तोफा उडवून मराठ्यांचा हल्ला परतवून लावला. चेऊल येथील मेरीच्या चर्चला मराठ्यांनी दिलेला वेढा पाच महिने चालू होता.

दि. १२–९–८३ रोजी वसई तालुक्यातील अंझोर गावावर मराठ्यांनी हल्ला केला. या हल्ल्यात मराठे चपळाईने आणि मोठ्या शिताफीने लढले. मराठ्यांच्या एका लहानशा तुकडीने अंझोरमध्ये जाऊन तेथील कापणीला आलेली शेते उद्ध्वस्त केली. हे कळताच पारसिक गडावरील अधिकाऱ्याने मराठ्यांना हाकलून देण्यासाठी २५ माणसे पाठविली. ही माणसे तेथे पोहोचताच मराठ्यांनी पळण्याचा आव आणला. पोर्तुगेज सैनिक मराठ्यांच्या मागे धावत सुटले. त्यांना आपल्या अंगावर घेत घेत मराठे पोर्तुगेजांना कल्पना नसलेल्या जागी दडी मारून बसले. मराठ्यांनी बांधलेल्या खंदकाजवळ पोर्तुगेज पोहोचताच लपून बसलेल्या लोकांनी त्यांच्यावर अचानक हल्ला केला. या हल्ल्यामुळे पोर्तुगेज घाबरले आणि त्यांनी पळ काढला. मराठे हे जातीनेच चपळ असल्यामुळे त्यांना पोर्तुगेज सैनिकांचा पाठलाग करण्यास काहीच वाटले नाही. पोर्तुगेज सैनिकांना मारल्यानंतर मराठे तेथून पळाले.[१]

जून–जुलैमध्ये सुरू केलेला चेऊलचा वेढा चालूच होता. या आघाडीवर संभाजीराजांनी पंतप्रधान निळो मोरेश्वर याला रवाना केले. इ. स. १६८३ च्या सप्टेंबर महिन्यात ८००० कुमक घेऊन ते चेऊलला पोहोचले. या तुकडीने उत्तरेकडील पोर्तुगेजांची अनेक खेडी उद्ध्वस्त केली; अनेक खेडी जाळली. वेढा निकराने चालविण्यासाठी, आक्टोबरच्या पहिल्या आठवड्यात, निळो मोरेश्वराने चेऊल जवळील एका टेकडीवर चार बुरुज उभे केले. मोठ्या तोफा तेथे नेण्यात आल्या. मराठ्यांनी केलेल्या हल्ल्यामुळे पोर्तुगेजांची दैना उडून त्यांना वेढ्यास तोंड देणे कठीण झाले. कित्येक अधिकारी लढाई सोडून गोव्याला पळून गेले. ४००० फिरंगीयांनी मुंबईत आसरा घेतला. चेऊल संकटात सापडले.[२] मराठ्यांविरुद्ध निभाव लागेना म्हणून तेथील लोकांनी गोव्याच्या विजरईकडून मदत मागितली.

गोव्याहूनही चेऊलला धाडण्यास पुरेशी सैन्यशक्ती नसल्याने गोव्याच्या विजरईने मुघल अधिकारी याकुदखान आणि खैरातखान यांना अनुक्रमे १३ आणि २० नोव्हेंबर रोजी पत्रे लिहून त्यांच्याकडून चेऊलच्या प्रतिकारासाठी मदत मागविली. या मागणीचा विचार करून सिद्दी याकुदखानाने ४०० सैनिक पाठविले. त्यातील ७० बुडाले. वसईचा जनरल मानुयेत लोबो द सिल्व्हेर याच्या

१. PM—PP, p 32

२. F. R: Bom to Sur, 8–10 83; Bom to Sur, 22–9–83

जवळ असलेली पायदळाची तुकडी व याकुदखानाने पाठविलेली कुमक समुद्रमार्गाने रेवदंड्यास धाडण्यात आली. सिद्दी याकुतखानाची जहाजे करंज्यास नांगरून राहिल्यामुळे नागावला असलेल्या मराठ्यांच्या ७५ गलबतांना करंज्याला जाता येईना. सिद्दी याकुदखानाने दिलेल्या मदतीबद्दल काही अपेक्षा ठेवली नव्हती. तरी सुद्धा दिलेल्या मदतीची जाणीव ठेवून पोर्तुगेजांनी पुढे १६९४ मध्ये सिद्दी याकुदखानाला एक जहाज बक्षिस दिले.[१] चेऊलच्या गव्हर्नरने गोव्याच्या विजरईला मदत मागताच त्याने काही जहाजे जनरल द कॉस्ता याच्या नेतृत्वाखाली पाठविण्याचे ठरविले. परंतु याच वेळेला संभाजीराजांनी जुवे, साष्ट व बारदेश येथे चढाई केल्याने विजरईला तयार ठेवलेली जहाजे पाठविता आली नाहीत. गोव्याच्या संरक्षणाला महत्त्व देणे जरूर असल्याने चेऊलकडे तोफखाना घेऊन एक लहान जहाज धाडण्यात आले. परंतु ही मदत पुरेशी नसल्याने चेऊलची स्थिती शोचनीय झाली.[२]

मराठ्यांना चेऊलच्या किल्ल्याचा वेढा उठविणे भाग पडावे म्हणून विजरईने फोंड्यावर स्वारी केली. परंतु मराठ्यांनी चेऊलचा वेढा न उठविता फोंडा लढविला. निळोपंताने उत्तरेकडील पोर्तुगीज हद्दीत हल्ले चालूच ठेवून चेंबूर, तळोजा व कोळवे जिंकले. इ. स. १६८३ च्या डिसेंबर महिन्यात फिरंगीयांच्या हद्दीतील माहिम, दंतोरा, सारगाव, सुपारा व सात किल्ले मराठ्यांनी जिंकून घेतले, आणि साबाजे गाव जाळून टाकले. मराठ्यांनी करंजा येथील एक टेकडी घेतली. या टेकडीवर एक चर्च होते. ( Siggnor de Penn ) नागोठाण्याजवळ २०० सैनिक सज्ज असल्याने मराठ्यांना ते गाव सोडण्याचे कारण नव्हते.[३]

लवकरच मराठ्यांनी करंजा व एलिफंटा घेऊन फिरंगीयांच्या ताब्यातील ४० मैलांचा टापू उद्ध्वस्त केला. सहा महिन्यांनंतर मराठ्यांनी चेऊलचा वेढा उठविला. याच सुमारास पोर्तुगेज व मराठे यांच्यात तहाच्या वाटाघाटी सुरू झाल्या, परंतु शेवटपर्यंत त्यांच्यात सलोखा मात्र झाला नाही. उत्तर कोकणात संभाजीने चालविलेल्या मोहिमेची माहिती दोतोर लुईज गोंसाल्व्हिस कोत याने मे १६८४ च्या सुरुवातीस विजरईस कळविली. " शत्रूने चेऊलचा वेढा उठविला. पण वसईच्या प्रदेशामध्ये त्याने पुष्कळ नुकसानी केली आहे. कल्याण, सायबान आणि मनोर ही तर घेतलीच पण असेरीचा गडही पुन्हा काबीज केला. करंजा, माहिम व तारापूर ह्या किल्ल्याकरिता तो लढत असून कसवे वसईचा मद्रापूर-

१. ASNT–PP, p 455, Doc. No. 170, 27-4-1698
२. PM—PP, p 41
३. PM—PP, p 41

पर्यंत त्याने ताबा घेतला आहे. ‘ आंतोनियु तैशेर द मासेदु ’ हा बेलापूरचे आणि ‘ आंतोनियु कामेलु ’ शसाष्टी बेटाचे रक्षण करीत आहे. असेरीच्या किल्लेदारास मराठ्यांनी कैद केले. तारापुरास पळालेल्या सैनिकांना कैदेत टाकण्यात आले. ” वसईहून आलेला पाद्री आंतोनियु व्हाज रिस्काद याने सांगितले की, ‘ पोर्तुगेजांचे पुष्कळ लोक कैदेत आहेत. त्यात स्त्रिया, पुरुष व मुले आहेत. त्यापैकी पुष्कळांचे हात, पाय, कान, नाक शत्रूने छाटले असून सर्व लोक भयभीत झाले आहेत. ज्या ठिकाणी शत्रू पोहोचला तेथील चर्चे त्याने ताब्यात घेतली. मनोर येथील किल्ला व चर्च त्याने जमीनदोस्त केले. ”[१]

मध्यंतरी पोर्तुगेज व संभाजी यांच्यात तह झाला होता. परंतु हा तह कृतीत न आल्यामुळे पोर्तुगेजांनी मराठ्यांबरोबर युद्ध चालूच ठेवले. कोकणातील बऱ्याचशा देसायांशी संगनमत करून त्यांना संभाजीविरुद्ध बंड करण्यास पोर्तुगेजांनी प्रवृत्त केले. विजरईने देसायांशी दि. ८–२–८५ रोजी गुप्त करार केला. त्यांनी उठाव करून एकाच वेळी निरनिराळ्या ठिकाणी छापा घातला.[२]

उत्तर कोकणात संभाजीने पोर्तुगेजांपासून काबीज केलेला प्रदेश त्यांनी परत मिळविला. दिनांक २७ ऑगस्ट आणि १२ सप्टेंबर १६८५ रोजी अनुक्रमे जिवधन ( Givdana ) आणि कमणदुर्ग ( Caman drugo ) हे किल्ले पोर्तुगेजांनी मराठ्यांकडून हस्तगत केले. पोर्तुगेजांचा असेरीचा किल्ला संभाजीने घेतला होता तो त्याने इ. स. १६८७ च्या आक्टोबर मध्ये परत मिळविला. पोर्तुगेजांकडून लाच घेऊन हा किल्ला त्यांच्या हवाली करण्यास मराठे तयार होते. पण आपण तो किल्ला जिंकून घेतला असेच विजरईने पोर्तुगालच्या राजास कळविले.

संभाजीच्या राज्यातील लहान तारवांस ( Embarcoes ) समुद्रात फिरण्यासाठी प्रत्येकी चार आण्यांपेक्षा जास्त पैसे न देता दस्तक द्यावा अशी विजरईने दि. ११ मे १६८६ रोजी कॅप्टनला आज्ञा केली.[३]

अशा तऱ्हेने मराठ्यांनी इ. स. १६८३ मध्ये पोर्तुगेजांच्या उत्तर हद्दीत सुरू केलेल्या हालचाली इ. स. १६८७ पर्यंत चालूच होत्या.

### मराठे–पोर्तुगेज युद्धाची दुसरी आघाडी :

गोवेकर विजरईने औरंगजेबाला लिहिलेल्या पत्रानुसार, पोर्तुगेजांना कोकण प्रांत जिंकावयाचा होता. संभाजी राजे यांनी उत्तरेकडे हालचाली सुरू केल्या हे निमित्त करून विजरईने मराठी सरहद्दीवर आक्रमण करण्याचा निश्चय केला. दॉम

१. पोम–पि, पृष्ठ १२५

२ पोम–पि, पृष्ठ १२५

३. पोम–पि, पृष्ठ १२७

फ्रान्सिस्को द ताव्होर चेऊलपासून लांब असल्याने त्याला ते मराठ्यांच्या तावडीतून सोडविता येईना. चेऊलच्या किल्ल्याचा वेढा उठविणे मराठ्यांस भाग पाडावे या उद्देशाने विजरईने फोंड्यावर स्वारी करण्याचे योजले.[१] खालील कारणांसाठी विजरईला फोंड्यावर चढाई करावयाची होती.

( १ ) शत्रूस चेऊलचा वेढा उठविण्यास भाग पाडणे.

( २ ) पोर्तुगेज अंमलातील गोवे ( गोवा बेट, साष्ट व बारदेश ) यांचे रक्षण करणे सोपे होण्याकरिता दक्षिण कोकणचा सर्व प्रदेश ( बांद्यापासून मिरजनपर्यंत ) मिळविणे.

( ३ ) संभाजीच्या जुलुमामुळे कोकणातील जनतेस आपणांवर पोर्तुगेजांची सत्ता असावी अशी इच्छा आहे, म्हणून तिला आपल्या अंमलाखाली आणणे.

( ४ ) कोकणचे उत्पन्न मोठे असल्यामुळे तो प्रदेश ताब्यात घेणे.

( ५ ) मोगलांनी दक्षिण कोकण घेण्यापूर्वी ते हस्तगत करणे.[२]

दि. २७–८–८३ रोजी विजरईने जाहीर केले की, संभाजी राजे मोठे सैन्य घेऊन गोव्यावर चाल करून येणार आहेत तरी सर्वांनी गोव्याच्या संरक्षणाच्या व्यवस्थेस लागावे. दि. ७–९–८३ रोजी विजरईने हुकूम काढला की, ' बारदेश, साष्ट आणि गोवा येथील स्थानिक लोकांनी ७-८ तारखेस संभाजीच्या सरहद्दीत शिरावे. ' सर्व लोक एका चर्चमध्ये जमले. नदी ओलांडून पोर्तुगेजांनी मराठी मुलुखातील खेडी व शेते जाळली. परंतु पावसामुळे त्यांच्या हाती काहीच लागले नाही. सप्टेंबर आणि आक्टोबर महिन्यात विजरईने फोंड्याच्या वेढ्याची तयारी केली. फोंड्यास वेढा देण्याचा विजरईचा बेत बराच आधी ठरला असावा. कारण दि. १९–९–८३ रोजी विजरईच्या आज्ञेनुसार दोन बोटी भरून माणसे आली. या बोटीत सर्व सैनिक असतील असे विजरईस वाटले. परंतु प्रत्यक्षात ३ ते ४ हजार माणसांपैकी फक्त १५० च सैनिक होते व बाकीच्या स्त्रिया आणि मुले होती.

विजरई आगाशी येथे सैन्यासह जाऊन राहिला. विजरईची तयारी पाहूनही स्वस्थ बसणाऱ्यांपैकी संभाजी राजे खासच नव्हते. त्यांनीही गोवेकरांच्या दुटप्पी धोरणाचा पुरा मोड करावयाचे ठरविले आणि विजरई फोंड्याला वेढा देणार हे कळताच राजे जातीने त्याला तोंड देण्याच्या तयारीस लागले.

**फोंड्याचा संग्राम :**

फोंडा गड हा पोर्तुगेज-मराठी सरहद्दीवर होता. त्यामुळे तो एक महत्त्वाचा गड मानला जात असे. हा गड फारच मजबूत होता. आणि जुन्या पद्धतींप्रमाणेच

१. ERS–D'Orleans, p 340–341

२. पोम–स, पृष्ठ ९८

याच्या भिंती २५ विती रुंद असून, भोवताली बुरुज होते. कोटाभोवती खंदक असून काही ठिकाणी त्यात पाणी असे. बाहेरच्या बाजूस एक भक्कम तट असल्यामुळे सुरक्षिततेच्या दृष्टीने तो मजबूत होता. या वेढ्यासंबंधीची माहिती फक्त पोर्तुगेज कागदपत्रातच मिळते. तसेच इतके विस्तृत वर्णन इतर लढायांच्या बाबतीत मिळत नसल्याने येथे ते सविस्तरपणे दिले आहे.

दि. २७–१०–८३ रोजी फोंड्याला वेढा देण्यासाठी विजरई सैन्यानिशी आगाशीस पोहोचला. विजरईचा फोंड्याकडे जाण्याचा मार्ग जुने गोवे, आगाशी, दुर्भाट, कवळे व फोंडा असा होता. विजरईबरोबर एकंदर ३२०० लढाऊ लोक, पंचवीस घोडेस्वार आणि चार तोफा होत्या. तो फोंड्याला वेढा देण्याच्या उद्देशानेच निघाला होता.[1] संभाजीने विजरईकडे दोन शिकाऊ हेर पाठवून त्यास सांगितले की फोंडा गडावर अमाप संपत्ती आहे. आणि या संपत्तीसाठीच विजरई फोंड्याकडे निघाला, असे कारण मानुत्चीने दिले आहे.[2] मानुत्चीचे हे विधान बरोबर नाही.

मुघलांनी कोकण घेण्यापूर्वी दक्षिण कोकणावर कबजा करण्याचा विजरईचा बेत असल्यामुळे त्याने फोंड्यास वेढा दिला. दि. २८–१०–८३ रोजी विजरई सैन्यासह संभाजीच्या फोंडे महालातील दुर्भाट बंदरात उतरला. येथे पोर्तुगेजांची ३०० मराठ्यांच्या तुकडीबरोबर चकमक उडाली. दि. १–११–८३ रोजी पहाटे या तुकडीचा प्रतिकार करून विजरईचे सैन्य दुर्भाटहून फोंड्यास गेले. फोंड्याचा देसाई दुलबा नायक हा फितूर होऊन पोर्तुगेजांना दुर्भाट येथे ७० शिपायांसह विजरईस मिळाला. त्यांनी फोंडा किल्ल्याजवळ दारुगोळ्याची व्यवस्था केली.

**फोंड्याला वेढा** : विजरई दुर्भाट येथे उतरताच त्याला दि. १–११–८३ रोजी मराठ्यांच्या एका तुकडीने विरोध केला. परंतु या छोट्या तुकडीचा पराभव करून विजरई फोंडा गडाकडे निघाला.

या गडावर येसाजी कंक सरनोबत आणि त्याचा मुलगा कृष्णाजी हा पदाती नायक होता. किल्ल्यात मराठ्यांचे ६०० शिपाई होते. शिवाय सुमारे २०० शिपाई रानात योग्य संधीची वाट पाहात लपून बसले होते. मराठ्यांनी गडावर तोफा डागल्या होत्या. दि. १–११–१६८३ रोजी मराठ्यांनी तोफांचा भडिमार सुरू केला. मराठ्यांनी डागलेल्या तोफा काढण्याचा त्यांनी प्रयत्न केला. तीन दिवस तोफांचा भडिमार केल्यानंतर पोर्तुगेजांना मराठ्यांनी डागलेल्या तोफा उतरविण्यात यश आले. नंतर पोर्तुगेजांनी गडाच्या तोंडाशी असलेल्या रस्त्यावर

१. पोम–पि, पृष्ठ ९५

२. SM–NM, p 262

तोफा डागून येथून दारुगोळयाचा मारा सुरू केला. गडाच्या बाहेरील तटबंदीला भगदाड पडले. यावेळी मराठ्यांकडून फारसा विरोध न झाल्याने पोर्तुगेज सैनिकांना आपण गड सहज घेऊ असे वाटले. नंतर विजरईने भगदाडाच्या तोंडाशी कुंपण करण्यासाठी तीन तुकड्या धाडल्या. भगदाडापाशी त्यांनी तारांची भेंडोळी रचली. गडाच्या दुसऱ्या बाजूस दॉम रोद्रिगो द कॉस्ता याने हल्ला सुरू केला. तटाला पडलेल्या भगदाडातून पोर्तुगेजांनी प्रवेश केला आणि तटाच्या आतील बाजूस जाण्यासाठी खंदक ओलांडला. पोर्तुगेजांनी दरवाज्यापर्यंत जाऊन दरवाजा उघडण्याचा प्रयत्न केला पण तो उघडेना.

मराठ्यांनी त्यांना दरवाजापर्यंत येऊ दिले आणि मग ते त्यांच्यावर तुटून पडले. पोर्तुगेजांवर गडावरून गोळयांचा वर्षाव करण्यात आला. संधीची वाट पाहात दडून बसलेल्या मराठ्यांनी 'हर हर महादेव' म्हणत पोर्तुगेजांना देमाय धरणी ठाय करून सोडले. मराठ्यांनी इतक्या निकराने हल्ले केले की पोर्तुगेजांना माघार घेण्याशिवाय गत्यंतरच उरले नाही. या लढाईत अनेक पोर्तुगेज मेले व अनेक जखमी झाले.

संभाजीराजांचे या वेढ्याकडे विशेष लक्ष होते. पोर्तुगेजांचा मारा पाहताच दि. ४-११-८३ रोजी घोड्यांच्या ४ तुकड्या आणि २०० पायदळाची कुमक धाडण्यात आली. हे सैन्य किल्ल्याच्या पायथ्याशी पोहोचताच पोर्तुगेजांनी या तुकडीवर हल्ला केला. चकमकी उडाल्या आणि त्यात मराठ्यांचे चार अधिकारी मेले. सेनापती दॉम रॉद्रिगो द कॉस्ता याच्यावर मराठ्यांचा एक सरदार धावून गेला. तो त्याच्या पाठीत तलवार खुपसणार तेवढ्यात फ्रान्सिस्तो द आलविझ याने दॉम रॉद्रिगोस वाचविले.

पोर्तुगेजांनी वेढ्याचे काम पाच दिवस चालू ठेवूनही काहीच प्रगती झाली नसल्याचे विजरईच्या ध्यानात आले. ज्या लोकांनी त्याला चिथावणी देऊन गड एका दिवसात घेऊन देतो म्हणून कबूल केले होते तेच त्याला माघार घेण्यास सांगत असल्याने तो खूप निराश होऊन आपल्या तंबूत जाऊन बसला. दोनदा मरणातून वाचलेल्या दॉम रॉद्रिगोशिवाय तो कोणाशीही बोलेना. मराठे हिरीरीने लढत होते. त्यांचा प्रतिकार व येणारी वाढती कुमक पाहून विजरईने किल्ल्यातील तटबंदीवर तोफखाना चालू ठेवण्यास हुकूम दिला. यामुळे किल्ल्यातील तटाला भगदाड पडले. तोफखान्याचे काम चालूच होते. परंतु गोलंदाज तरबेज नव्हते. त्यामुळे त्यांनी मारलेले गोळे तटात न जाता ते तटाबाहेरच पडत होते, तर काही हवेत उडत होते. काही मराठे पडलेला गोळा पाहण्यासाठी गेले. तो गोळा फुटल्यामुळे ७० जण जखमी झाले. फोंड्यासारखा गड लढविताना मराठ्यांनी तोफेचा गोळा पाहिला नसेल हे खरे वाटत नाही. पोर्तुगेजांनी केलेले हे वर्णन अतिशयोक्तीचे वाटते.

या आठनऊ दिवसांच्या लढाईतच सरनोबत येसाजी कंक व त्याचा मुलगा कृष्णाजी कंक हे शौर्याने व धैर्याने लढले. येसाजीच्या लढण्याचे किती कौतुक करावे! शिवाजीमहाराजांच्या वेळचा हा सरनोबत. त्याला देखील शिवछत्रपतीच्या मुलाला लढाईत सहकार्य देण्यात केवढा आनंद वाटत असेल. शूर वीराला केव्हाही रणांगणावर शौर्य गाजवितानाच आनंद वाटणार. या बाप-लेकांच्या शौर्याची जाणीव ठेवूनच त्यांना या महत्त्वाच्या आघाडीवर संभाजीराजांनी नेमले असावे.

दि. ९-११-८३ रोजी तटाला पडलेल्या भगदाडातून किल्ल्यात शिरण्याचा दिवस मुक्रर करण्यात आला. अखेरचा हल्ला करण्याची तयारी होत असतानाच लढाईचा रंग पालटला. पोर्तुगेजांची वाढती प्रगती झाल्याचे ऐकून उत्साह, स्वराज्याविषयीची कळकळ आणि प्रेम संभाजीराजांना राजापुराला स्वस्थ बसू देईना. पोर्तुगेजांना धान्य आणि दारूगोळा पुरवू नये असे आश्वासन राजापूरच्या मुक्कामात त्यांनी राजापूर येथील फ्रेंच वखारीच्या प्रमुखाकडून घेतले. ते फ्रेंचांनी पाळलेले दिसते. याच मुक्कामात कदाचित संभाजीराजांनी फ्रेंचांकडून १५०० पागोडे ( पागोडा = ३$\frac{१}{२}$ रु. ) कर्ज घेतले असावे.[1]

फोंड्याच्या आघाडीवर जातीने जाण्याचा त्यांनी निश्चय केला. त्यांना विचार करीत बसण्यास वेळच नव्हता. राजे तातडीने राजापुराहून फोंड्यास पोहोचले, आणि पोर्तुगेजांच्या नजरेसमोर त्यांनी सुमारे ८०० स्वारांच्या संरक्षणाखाली आपले ६०० शिपाई किल्ल्यात घातले. अशा परिस्थितीत आपण मराठ्यांच्या तावडीत सापडू म्हणून आणि राजे जातीने या वेढ्यास उपस्थित असल्याने विजरईला छत्रपतीपुढे लढाई देण्याची हिंमत झाली नाही. संभाजी महाराजांच्या तुकडीत पायदळाच्या दोन्ही बाजूंस घोडदळाची तुकडी शिस्तीने चालली होती. जे ६०० सैनिक फिरंगीयांच्या नजरेसमोरून किल्ल्यात गेले त्यांना अडविण्याची ताकद एकाही फिरंगीयाला झाली नाही.

राजे आल्याचे कळताच येसाजी आणि कृष्णाजीचा ऊर निश्चितच भरून आला असेल. शंभुराजांच्या नेतृत्वाखाली लढण्यात त्यांना धन्यता वाटून त्यांना अवसान आले असावे. त्यांनी खाडीवर पोर्तुगेजांची गाठ घेऊन त्यांच्याशी झुंज दिली. बहुत कष्ट घेतले. त्यांनी शत्रूला मारून काढला. शत्रूचा पराभव झाला. पण? दोघेही जखमी झाले. त्यांच्या जखमा काही साध्यासुध्या नव्हत्या. हा प्रसंग पाहिला म्हणजे बाजीप्रभूंनी पावनखिंड लढविली त्या वेळच्या प्रसंगाची आठवण आल्याशिवाय राहात नाही. रणांगणावर जखमी झालेल्या पितापुत्रांच्या जखमा

1. FMR–H, p 26

शंभुराजांनी डोळ्यांनी पाहिल्या. जखमांमुळे घायाळ झालेल्या येसाजी आणि कृष्णाजी यांना घरी जावयास सांगून महाराज गड लढवू लागले.

विजरई मराठ्यांच्या हद्दीत शिरल्यापासून सतत पाऊस पडत होता. वादळी हवा, थंडी, पाऊस आणि मराठ्यांचे निकराचे हल्ले यामुळे पोर्तुगेज वैतागले होते. मराठ्यांची कुमक गडावर पोहोचताच विजरईने माघार घेण्याचे ठरविले. त्याने सर्व अधिकाऱ्यांची बैठक बोलावून सर्वांना सांगितले की, " आपली फौज मराठ्यांच्या मानात थोडी आहे. आपण वेळेवर माघार घेतली नाही तर परत जाणेच शक्य होणार नाही. विजरईच्या म्हणण्यास सर्व सैनिकांनी मान्यता दिली आणि आनंदाच्या भरात ते पळत सुटले. दि. १० नोव्हेंबर १६८३ रोजी पोर्तुगेजांनी माघार घेण्यास सुरुवात केलेली पाहताच मराठ्यांनी त्यांच्यावर छापे घातले. फिरंगीयांनी परत जाताना तोफा व बंदुका घेऊन जाण्याचा प्रयत्न केला. परंतु मराठ्यांच्या गोळीबारापुढे पोर्तुगेजांना हात हलवीत परत जावे लागले. खाद्यपदार्थ, भाताची ३०० पोती आणि २०० गाढवांवर राहील एवढे सामान त्यांना मागे ठेवावे लागले. विजरईला मराठ्यांचा गनिमी कावा आणि त्यांचे झाडीत दडून बसणे परिचयाचे होते. म्हणूनच आंबराईतून जाताना नासधूस करण्याची आज्ञा विजरईने आपल्या सैनिकांना दिली. मराठ्यांचे घोडदळ नदी ओलांडून येत असलेले पाहून त्यांना चुकविण्यासाठी पोर्तुगेज घोडदळही आंबराईत शिरले. नदीपार होताना फिरंगीयांना सर्व तऱ्हेचे हाल सोसावे लागले.

११ नोव्हेंबर रोजी फिरंगी दुर्भाटला पोहोचले. तेथून ते नदी ओलांडून आपल्या हद्दीत जाणार होते. वाटेवर मराठ्यांनी घेतलेली एक टेकडी होती. या टेकडीवरून फिरंगीयांना धोका असल्यामुळे त्यांनी ती ताब्यात घेण्याचा प्रयत्न केला. फिरंगी टेकडीवर येताच शत्रूला अंगावर घेण्यासाठी मराठ्यांनी पळण्याचा आव आणला. परंतु हे पळणे साधेसुधे नव्हते. त्यात युद्धकौशल्य आणि चातुर्य होते. फिरंगीयांनी मराठ्यांचा पाठलाग केला. मराठ्यांना हेच हवे होते. याच वेळी विजरईने उरलेले सैन्य जनरल दॉम रॉद्रिगो द कॉस्ता याच्या ताब्यात देऊन घोडदळाला त्याच्या मागे जाण्यास सांगितले. जनरल टेकडीवर चढताच मराठ्यांनी त्याच्यावर हल्ला केला. या वेळी मराठी घोडेस्वार घोड्यालगत वाकून, स्वतःच्या पाठी ढालीने झाकून, निश्चयाने फिरंगीयावर हल्ला करीत होते. पोर्तुगेज सैनिकांना पळणेही कठिण झाले. मराठ्यांनी त्यांच्यावर धावून जाऊन अनेकांना पायदळी तुडविले. भर दुपारी मराठ्यांच्या तलवारी आणि लहान तोंडीच्या बंदुकांच्या कचाट्यात पोर्तुगेज सापडले. त्यावेळी जर ५० मुसलमान फिरंगीयांच्या मदतीसाठी गेले नसते तर एकही फिरंगी जिवंत राहिला नसता. या धामधुमीत मानुयल द सिल्व्हा आणि इतर २०० सैनिक मारले गेले. घोडदळाखाली सापडलेले काही निसटले. येथेच पोर्तुगेज विजरई कौंदि द आल्व्होर होता. मराठ्यांनी

त्याला पाहताच भाल्याने मारण्याचा प्रयत्न केला. या हल्ल्यातून तो दोनदा निसटला. संभाजी राजांना पोर्तुगेज विजरईने मारण्याचा बेत केला होता. याचा बदला अशा तऱ्हेने मराठ्यांनी घेतला.

मराठ्यांच्या हल्ल्यामुळे मोठे अधिकारी पाण्यात पळाले. त्यातील काही पोहत होते तर काही मानेइतक्या पाण्यात उभे होते. विजरई आपल्याच लोकांची फजिती पाहण्यास नदीवर गेला तेव्हा सर्व घाबरलेले लोक त्याच्या दृष्टीस पडले. या युद्धात पोर्तुगेज पायदळाच्या तुकडीतील बहुतेक सर्व शिपाई मारले गेले होते.[1]

सुरुवातीला मराठ्यांना पोर्तुगेजांच्या दारूगोळ्यापुढे आपला निभाव लागणार नाही असे वाटले होते. फोंडा गड मराठ्यांच्या ताब्यात राहावा, तो शत्रूच्या हाती पडू नये, स्वामींची फत्ते व्हावी म्हणून तेथील हवालदार, सरनोबत, सबनीस, नाईकवाडी हे फोंड्याच्या पिरास नवस बोलले होते. स्वामींची फत्ते झाल्यावर दि. २–१–८४ रोजी कवि कलशाने धर्माजी नागनाथाला लिहून पिरास दर वर्षी ५० होन उदफूल, दिवा इत्यादीसाठी दिले.[2]

घरी गेलेल्या कृष्णाजीच्या जखमा बऱ्या न झाल्याने त्यातच तो मरण पावला. म्हाताऱ्या येसाजीला आपल्या डोळ्याने आपल्या मुलाचा मृत्यू पाहावा लागला. शिवाजी महाराजांनी कोंडाणा घेतला, तेव्हा तानाजीला वीराचे मरण येऊन म्हातारा शेलारमामा मागे राहिला. त्याचप्रमाणे फोंडा गड मराठ्यांकडे राहिला तेव्हा कृष्णाजी जखमी होऊन मरण पावला. येसाजी मागे राहिला तो आपल्या पुत्रनिधनाचे दुःख सहन करण्यास !

कृष्णाजीच्या घरी त्याची बायको व तीन वर्षांचा कृष्णाजी नावाचाच मुलगा होता. कृष्णाजीच्या नावाने सुभा चालवावा आणि लोकांच्या जमावास चाहुजी कंक याला कारभारी नेमावे अशी येसाजीची इच्छा होती. येसाजी संभाजी राजांना भेटला. आणि त्याने ही विनंती केली, तेव्हा संभाजी राजांनी येसाजी कामाचे, मर्द, स्वामिकार्यात तत्पर आणि मुलगाही स्वामिकार्यावरच गेला म्हणून येसाजीला १००० होंन आणि कृष्णाजीला १००० होन पारितोषिक म्हणून दिले. कृष्णाजीच्या मुलास सुभा दिला आणि लोकांचा जमाव करण्यासाठी, नेहमी चाकरीत राहावे म्हणून चाहुजी कंकला कारभार चालवावयास सांगितला. कृष्णाजीच्या सुभ्याची आसामी चालवावी व त्याचा अज्ञान पालनकर्ता म्हणून चाहुजीला वार्षिक ६०० होन द्यावयाचे ठरले. त्यातील ४०० होन खासा जातीस व २०० चाकरीसाठी होते.[3]

१. PM—PP, p 34-38

२. शिचसा, खंड ८, ले. ४६

३. शिचसा, खंड २ ले. ३९७; मइसा, खंड १५, ले. ३६५

दि. १२-११-१६८३ रोजी ८ वाजण्याच्या सुमारास पोर्तुगेज सै दुर्भाट सोडून गोव्यास परतले. विजरई कोंदि द आल्व्होर हा निराश होउ जुन्या गोव्यातील बों जेजूस या चर्चशेजारील मठात जाऊन राहिला. युद्ध पराभव झाल्यामुळे त्याने कोणाचीही भेट घेतली नाही. विजरईने दि. १६-१ ८३ रोजी पोर्तुगालला या लढाईचा वृत्तांत खालीलप्रमाणे सादर केला, " दुर्भा वरून मी फोंड्यास गेलो व तेथे नऊ दिवसपर्यंत मोठे युद्ध केले. पण पावसाच्य जोरामुळे हालचाली करण्यास आम्हास उशीर लागला. त्यामुळे खास संभाजीला फोंड्याच्या मदतीला येण्यास वेळ मिळाला. त्याने आपल्या घोडदळाच्य जोरावर रणमैदानावर ताबा मिळविला. कुमकेची आशा नसल्याने आम्ही माघा घेण्याचे एकमताने ठरविले. मी शत्रूशी लढत-लढत सावकाश माघार घेतली त्यामुळे अवघा एक कोस कूच करण्यास मला दोन दिवस लागले व मी नेलेल्य सर्व तोफा व सामान मजबरोबर आणले.[1]

मराठ्यांनी आपल्या पराक्रमाने पोर्तुगेजांचा पराभव करून त्यांना वेढ उठविण्यास भाग पाडले असले तरी सुद्धा पोर्तुगेज विजरईने पोर्तुगालला स्वतःचे पराभवाचे वृत्त कळविताना कौशल्य दाखविण्याचा कसा केविलवाणा प्रयत्न केल आहे हे दिसते.

हा किल्ला पोर्तुगेजांच्या माऱ्यापुढे टिकाव धरणार नाही असे या लढाईत संभाजीच्या लक्षात आले. जो गड घेण्यास आपल्या वडिलांना तीन महिने लागले त्या गडाला फिरंगीयांनी नऊ दिवसांत भगदाड पाडलेले पाहून, राजांनी फोंडा गड पाडून त्याच दगडांनी जवळच्या एका टेकडीवर नवीन गड बांधला. या गडाचे नाव ' मर्दनगड ' असे ठेवण्यात आले.[2]

संभाजी व पोर्तुगेज यांच्या युद्धात पोर्तुगेजांचे कोकणातील बहुतेक देसायांशी सख्य होते. पेडण्याचा केशवप्रभु, डिचोलीचा देसाई, साखळीचे राणे हे पोर्तुगेजांना मदत करीत असत. सत्रोजी राणे हा पोर्तुगेजांतर्फे लढत असताना, मराठ्यांनी त्याला कैद केले होते. केशवप्रभूने तर कुडाळपासून अंकोल्यापर्यंतच्या कोकणातील देसायांची माहिती देऊन, ते संभाजी विरुद्ध लढण्यास तयार असल्याचे सांगितले होते. इतके करूनही तो थांबला नाही, तर त्याने अंकोल्यापासून राजापूरपर्यंत असलेल्या संभाजीच्या कोकणातील किल्ल्यांची तपशीलवार माहिती दिली.[3]

१. पोम–पि, पृष्ठ ९७

२. F. R : Car to Sur 26–11–1683; पोम--पि, पृष्ठ 102–103, PM–PP, p 41

३. पोम–पि, पृष्ठ ९९–१००

औरंगजेबाचा वकील शेख महंमद विजरईकडे जाण्यापूर्वी मानुत्ची हा इटालियन प्रवासी गोव्यात होता. त्याला मुघल दरबाराच्या चालीरीती माहीत होत्या आणि फारशी भाषाही येत होती. पोर्तुगेजांनी त्याचे सहाय्य घेतले तरी मानुत्चीला पोर्तुगेज-मुघल किंवा मराठे यांच्या संबंधाबद्दल फारच थोडी माहिती असावी असे दिसते.

फोंड्याचा वेढा उठविल्यानंतर संभाजी राजे पन्हाळ्यास जातील अशी विजरईची समजूत होती.[1] परंतु ही समजूत चुकीची ठरली. मराठ्यांचे सैन्य पोर्तुगेज परिसरात असल्याचा फायदा घेऊन, संभाजीने फिरंगीयांची पुरी फजिती करावयाचे ठरविले. पोर्तुगेजांनी मुघल आरमारास आपल्या हद्दीतून जाण्याची परवानगी दिली होती. मुघल आरमार धान्य घेऊन गोव्यातून कोकणात जाणार होते. ही मदत थांबावी म्हणून संभाजीने आपले सैन्य गोव्याच्या परिसरात नेले होते. त्याचाच फायदा घेऊन मराठ्यांनी गोव्यावर स्वारी केली. या स्वारीचे वर्णन रॉबर्ट ऑर्म, मानुत्ची, इंग्रज वखारवाले व मराठी बखरी यातून मिळते. यातील काही वर्णने पोर्तुगेज कागदपत्रांशी जुळतात. तर काही जुळत नाहीत. पोर्तुगेज कागदपत्रात संभाजीच्या हालचालींसंबंधी विस्तृत वर्णने आहेत. त्यामुळे त्याआधारेच या प्रकरणातील बहुतेक माहिती दिलेली आहे.

**जुवे ( सांतु इस्तेव्हंव ) बेटावर वेढा :**

सांतु इस्तेव्हंव हे छोटे बेट जुन्या गोव्यापासून एका नदीमुळे अलग झालेले आहे. हे बेट धावजी ह्या तिसवाडीतील गावाच्या पैलतीरास आहे. ओहोटीच्या वेळी पायवाटेने गोवेशहरात जाता येते. या पायवाटेच्या रक्षणासाठी पोर्तुगेजांनी जुने बेटावरील डोंगरात हा किल्ला बांधला होता. धावजीच्या ( Dongium ) बाजूने नदीच्या किनाऱ्यावर बुरुज बांधले होते. जुवे बेटाच्या एका बाजूस भतग्राम व फोंडे हे नदीच्या अलीकडील भाग मराठी राज्यातील प्रदेशात मोडत असत. दुसऱ्या बाजूस मांडवी नदीच्या पलीकडे गोवे शहराचा भक्कम तट होता. दि. २४-११-८३ रोजी रात्री ८ वाजता ४० मराठ्यांची एक तुकडी वरील बेटावर गेली. त्यावेळी किल्ल्यावर पहारेकरी नव्हते. मराठ्यांनी शिड्या लावून किल्ल्यात प्रवेश केला तेव्हा त्यांना कोणीही प्रतिकार केला नाही. गडावरील किल्लेदार व काही गोवेकर खिस्ती यांना मारण्यात आले. गडावर पोहोचल्यानंतर मराठ्यांनी दुसऱ्या बाजूस असलेल्या सैनिकांना इशारा देण्यासाठी तोफा उडविण्यास सुरुवात केली. यामुळे पोर्तुगेजांना ही बातमी लागली.

१. PM—PP, p 43

शहरातील लोकांनी व पाद्र्यांनी मराठ्यांवर हल्ला करण्याची इच्छा दर्शविली. रात्री दहा वाजता गोवे शहरात घंटा वाजवून संकटाची सूचना देण्यात येताच नदीच्या बाजूस असलेल्या शहराच्या तटाकडे काही सशस्त्र पाद्री धावत गेले. धावजीच्या दिशेने मराठे येतील म्हणून विजरई सबंध रात्र सैन्यासह तेथे जाऊन राहिला. तोपर्यंत मराठ्यांनी गड ताब्यात घेतला असल्याची विजरईस बातमी लागली. जवळची शेते पाण्याने भरून दोन सशस्त्र तुकड्यांनी मधली वाट अडवावी असे दों मानुयल मस्कारेन्हास ( Dom Manuel Mascarenhas ) या अधिकाऱ्याला वाटत होते. हे काम विजरईने ( Dom Fernanda de costa ) दो फेरनन्डा द कॉस्ता याच्याकडे सोपविले. परंतु त्याने काहीही केले नाही.

दि. २५ नोव्हेंबर १६८३ रोजी सकाळी सात वाजता विजरईने ४०० शिपायांसह जुवे बेटावर कूच केले. गडावर संभाजीचे सैन्य सज्ज होते. विजरईने त्यांच्यावर हल्ला करून लढाईस प्रारंभ केला. मराठ्यांनी आपल्या नेहमीच्या शिरस्त्याप्रमाणे पळून जाण्याचा आव आणला. पळत असतानाच ३०० सैनिकांची कुमक त्यांना मिळाली. या सर्वांनी मिळून पोर्तुगेजांवर जोराचा हल्ला केला. जीव वाचविण्यासाठी अनेक पोर्तुगेज शिपाई डोंगरावरून नदीतीराकडे पळत सुटले. या धामधुमीत मराठ्यांकडील चार घोडेस्वारांनी विजरईवर तलवारीने हल्ला केला. विजरईवर कैद होण्याचा प्रसंग आला होता. दों रोद्रिग्रो द कॉस्ता हा घोडा घेऊन विजरईच्या संरक्षणासाठी धावला नसता तर विजरईवर अनर्थ ओढवला असता. तरीदेखील विजरई घायाळ झालाच. मराठ्यांनी माघार घेणाऱ्या पोर्तुगेजांवर वरून मोठाले दगड ढकलून दिले. ते वर येणाऱ्या पोर्तुगेजांवर पडून, काही लोक मेले. ३०० लोकांपैकी एकही जखमी झाल्याशिवाय राहिला नाही. **त्या दिवशी गोवेकरांनी पूर्वेकडील लढाईत कधी अनुभवला नव्हता असा दुर्दैवी प्रसंग येथे बघितला.** या प्रसंगामुळे विजरईला काही सुचेना. शेवटी एका खंदकातून सर्वांनी परत जावयाचे ठरले. एका मचव्यातून विजरई व इतर अधिकारी माघारी जाण्यास निघाले. त्यांचे घोडे मराठ्यांनी ताब्यात घेतलेच होते. मराठ्यांच्या हातात जुवे बेट पडल्यावर गोवे शहराच्या बाजूस नदीला लागून ज्या शेतजमिनी होत्या त्यांचे बांध पोर्तुगेजांनी फोडून टाकले असल्यामुळे साहजिकच नदीचे पात्र मोठे झाले होते. पळून जाणाऱ्या पोर्तुगेजांपैकी बरेच जण मातीत गाडले गेले. मराठ्यांनी त्यांना कापून काढले. काहीजण वाचले ते वाढत्या पाण्यामुळे बुडाले. अशा तऱ्हेने मराठ्यांनी पोर्तुगेजांचा पराभव करून गोव्यानजीकचे हे बेट व किल्ला ताब्यात घेतला. ही चढाई संभाजी राजांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली होती. वरील प्रसंग अनेकांनी लांबून पाहिला. ही लढाई पाहण्यास इतकी गर्दी झाली होती की आजूबाजूच्या सर्व टेकड्या लोकांनी फुलून गेल्या होत्या. खुद्द जुन्या गोव्यातील लोकांनी हे भयंकर दृश्य पाहिले. पण कोणीही

त्यांच्या मदतीस गेले नाहीत.[१] असे सांगतात की, या प्रसंगानंतर संभाजीने गोवे शहरावर हल्ला करण्याचे ठरविले होते. परंतु नदीला भरती आल्यामुळे (पूर) ते शक्य झाले नाही. खंडो बल्लाळ चिटणीस याच्या त्रोटक हकीगतीवरून वरील गोष्टीस दुजोरा मिळतो. या हकीगतीत म्हटले आहे, "ते दिवशी गोवे घ्यावयाचेच. परंतु फिरंगीयांचे दैव समुद्राने रक्षिले." या भरतीच्या वेळी संभाजीचा घोडा पहुणीस लागला असावा. आणि याच वेळी खंडो बल्लाळाने स्वतःच्या जीवाची पर्वा न करता नदीत उडी टाकून राजांचे रक्षण केले असावे. संभाजीने त्याबद्दल खंडो बल्लाळास योग्य ते बक्षिस दिले.[२]

मराठ्यांनी हा गड केवळ एकाच दिवसात ताब्यात घेतल्यानंतर, आतील पुतळ्यासह गडावरील चर्च जाळले. लेडी व्हर्जिन (Lady Virgin) ची मूर्ती फोडली. तिच्या कडेवर असलेल्या बाळ जिझसचे डोके उडविले. तसेच क्रूसावर असलेल्या ख्रिस्ताच्या मूर्तीचे पाय तोडण्यात आले. अशाच तऱ्हेने मराठ्यांनी अनेक चर्चे उद्ध्वस्त करून त्यातील मूर्ती फोडल्या.[३] हिंदूंच्या अति सहिष्णू वृत्तीमुळे झालेल्या या गोष्टी लोकांना सहसा आवडणार नाहीत. परंतु आतापर्यंत मुघलांनी, पोतुगेजांनी हिंदुस्थानातील अनेक देवळे पाडून त्यावर आपली चर्चे किंवा मशिदी बांधल्या आहेत. भारतीय इतिहासात हिंदूंनी या लोकांचा सूड म्हणून त्यांच्या मशिदी किंवा चर्चे पाडल्याची उदाहरणे क्वचितच आढळतात. संभाजी राजांना पोर्तुगेजांच्या दुटप्पी धोरणाचा पहिल्यापासून अनुभव होता. मुघलांशी संधान बांधून कोकण काबीज करण्याचा त्यांचा बेत राजांनी आपल्या युद्ध-कौशल्याने हाणून पाडला होता. 'जशास तसे' या न्यायाने वागून संभाजीराजांनी पोर्तुगेजांना आपल्या क्षात्रतेजाचे दर्शन घडविले असे दिसते.

दि. २६ नोव्हेंबर १६८३ रोजी सकाळी १२ वाजेपर्यंत मराठ्यांचे सैन्य या बेटावर होते. परंतु त्याच दिवशी एकाएकी घाईघाईने मराठे हे बेट सोडून परत गेले. संभाजीराजांना मुघलांची फौज येत असल्याचा सुगावा लागल्यामुळे, परत जाताना मराठ्यांनी आपल्या बंदुका आणि पुष्कळ सामानसुमान किल्ल्यातच टाकले. अशा वेळी आपण त्या गडावर अडकून पडू नये म्हणूनही त्यांनी माघार घेतली असावी. जुवे बेटास पोर्तुगेजांच्या आरमाराकडून वेढा पडण्याचा संभव होता. संभाजीच्या आरमाराने गोव्यात प्रवेश करू नये यासाठी मांडवी नदीच्या मुखावर असलेल्या आग्वाद, रेईसमागुस, काबु, मुरगाव या किल्ल्यांत पोर्तुगेजांनी

१. PM—PP, p 35–40

२. सनदापत्रे, ले ६१, पृष्ठ २१८--१९

३. PM—PP, p 45--46

संरक्षणासाठी आपले आरमार सज्ज ठेवले होते. जुवे बेट घेतल्यासंबंधी मराठी कागदपत्रात उल्लेख आढळत नाही.

"मार्गशीर्ष मासी फिरंगीयांचे कुंभार जुवे घेतले." अशी नोंद फक्त जेधे शकावलीत आहे. परंतु पोर्तुगेज कागदपत्रात, विजरईच्या पत्रात, इंग्रजांच्या पत्रव्यवहारातून किंवा मानुत्चीने दिलेल्या माहितीत संभाजीने कुंभार जुवे घेतल्याची माहिती आढळत नाही. यावरून जेधे शकावलीतील कुंभार जुवेविषयीची जी नोंद आहे ती येथे वर्णन केलेल्या जुवे संग्रामाविषयी असावी. कुंभारजुवे हे बेट जुवे उर्फ सांतु इस्तेव्हंव या बेटाजवळ असल्यामुळे नावाचा घोटाळा झाला असण्याचा संभव आहे.

इ. स. १६८३ तील संभाजीराजांची गोव्यावरील स्वारी आणि इ. स. १५७० मधील आदिलशहाने केलेल्या हल्ल्यात युद्धशास्त्रदृष्ट्या बरेच साम्य आहे. या लढाईत संभाजीराजांबरोबर अकबरही होता. पोर्तुगेजांशी मध्यस्थी करण्यात भाग घेण्याची इच्छा अकबराने प्रदर्शित केली होती.

दि. २९–११–१६८३ रोजी संभाजीने राय कीर्तिसिंग हा वकील विजरईकडे धाडला होता. तो दि. २ डिसेंबर १६८३ रोजी विजरईच्या राजवाड्यात पोहोचला. संभाजीचे अधिकारपत्र आहे का? असे विजरईने वकिलास विचारले. वकिलाजवळ संभाजीचे अधिकारपत्र नाही असे कळताच विजरईने त्यास परत पाठविले.[1] कदाचित् संभाजीराजांना पोर्तुगेजांच्या हद्दीतून सुरक्षितपणे बाहेर पडावयाचे असल्याने त्यांनी वेळ काढण्यासाठी हा वकील पाठविला असावा.

मराठे–पोर्तुगेज यांच्यातील लढाई चालूच होती. मुघलांचे सैन्य दक्षिण कोकणात पोहोचण्यापूर्वीच संभाजी राजांनी आपल्या सैन्याचा उपयोग गोव्यात करून घ्यावयाचे ठरविले. दि. ११ डिसेंबर १६८३ रोजी मराठ्यांनी साष्ट व बारदेश या पोर्तुगेजांच्या मुलुखावर हल्ले केले. यावेळी मराठ्यांच्या सैन्यात ६००० घोडेस्वार व ८ ते १० हजार शिपाई असावेत. संभाजीकालीन एका पोर्तुगेज बखरकाराने लिहिले आहे की, "संभाजीने २० हजार शिपाई आणि ४ ते ५ हजार स्वार, १० हत्ती घेऊन गोव्यावर हल्ला केला."

**साष्ट :**

मराठ्यांची १ हजार घोडदळ व ३ हजार पायदळ असलेली तुकडी साष्ट मध्ये शिरली. त्यांनी त्या भागात बरीच लूटमार केली. मार्गांव ( मडगाव ) च्या लोकांनी जवळच्या एका चर्चमध्ये आश्रय घेऊन तेथून १० दिवस मराठ्यांचा प्रतिकार करण्याचा प्रयत्न केला. चर्चमधील पाद्र्यांनी मराठ्यांपुढे लढाई देणे शक्य नसल्याने गोवेकर ख्रिस्त्यांना शरण जाण्याची विनंती केली. लोकांनी

1 PM--PP, p 48

शरणागती पत्करल्यानंतर मराठ्यांनी त्यांना रात्री बाहेर जाण्यास परवानगी दिली. बाहेर जाताना मराठ्यांनी त्यांच्या जवळच्या सर्व वस्तू काढून घेतल्या. त्यातील काहींना तुरुंगात टाकण्यात आले. येथील चर्चमध्ये २०० स्त्रिया होत्या. मराठ्यांनी त्यांच्याजवळ असलेल्या सर्व वस्तू काढून घेतल्या. मराठे सैनिकांनी त्यांच्यावर खूप अत्याचार केले. पाच-सहा सैनिकांनी एकेका स्त्रीशी संभोग केला. म्हणून काही स्त्रियांनी विहिरीत उड्या टाकल्या, तर काहींनी जाळून घेतले. स्वतःची लाज राखण्यासाठी सर्व स्त्रिया बोटींची वाट पाहात पाण्यात बसल्या.

यानंतर मराठे असोळणे येथे शिरले. चर्चच्या संरक्षणासाठी ३०० बंदूकधारी तेथे होते. मराठे कुंकळी येथे शिरल्याचे कळताच ते तेथून मुरगावला पळाले. चर्चमधील लोकांनी दारुगोळा नदीत टाकून राचोलच्या दिशेने पळ काढला. थोडे पळत जाताच त्यांनी आपापसात चर्चा केल्यानंतर मराठ्यांच्या ताब्यात घरे सोडून पळून जाणे चुकीचे आहे हे त्यांच्या लक्षात आले. पण तेवढ्यात कुंकळीच्या लोकांनी ते फिरंगीयांना देत होते तेवढे पैसे मराठ्यांना देण्याचा करार केल्याचे समजताच त्यांनी तसाच करार करून ते गाव मराठ्यांच्या लुटीपासून वाचविले. १८ हजार क्रूसेडो देण्याचे कबूल केल्यानंतर त्यांनी मराठ्यांना गावे लुटण्यास मदत केली. साष्टमधील रायतूर व मुरगाव हे दोन किल्ले सोडून बाकीचे किल्ले मराठ्यांनी जिंकले होते. रायतूरला मराठ्यांनी ६ दिवस वेढा घातला होता. साष्टमधील सर्व चर्चेसमध्ये शत्रूपासून संरक्षण करण्यासाठी दारुगोळा व अन्य सामुग्री भरलेली असे. परंतु पाद्री लोक तेथून पळून गेल्याने मराठ्यांना सर्व जागा मोकळ्याच झाल्या.

बारदेश :

मराठ्यांनी साष्ट आणि बारदेशमध्ये एकाच वेळी हल्ले सुरू केले होते. बारदेश हे द्वीपकल्पासारखे असून त्यात तीन किल्ले होते. या तिन्ही किल्ल्यांत दारुगोळा असे. मराठ्यांनी थिअे या किल्ल्याला वेढा दिला. पोर्तुगेजांनी या किल्ल्याच्या संरक्षणार्थ गोवेकर खिस्ती शिपाई ठेवले होते. मराठ्यांनी वेढा दिल्यानंतर पोर्तुगेजांनी १० दिवस किल्ला लढविण्याचा प्रयत्न केला. या किल्ल्यात पाण्याची सोय नव्हती. त्यांना किल्ल्याबाहेरील विहिरीतून पाणी आणावे लागत होते. मराठ्यांनी त्या बाहेरच्या विहिरीत मेलेली जनावरे आणि विषारी झाडे टाकून पाणी दूषित केले. अशाच तऱ्हेने गोवा शहराला ज्या ठिकाणाहून पाण्याचा पुरवठा होत असे त्या बागायतीच्या झऱ्यात मराठ्यांनी विष घालून पाणी दूषित केले होते. परंतु फोंड्याचा नाईकवाडी रामाजी नाईक याने पोर्तुगेजांना ही बातमी देऊन वरील संकट टाळले. मराठ्यांनी पोर्तुगेजांच्या रोजच्या

गरजेची वस्तूच नाहीशी केली होती. दुसरीकडून मदत येण्याचा संभव नसल्याने पोर्तुगेजांनी माघार घेतली. मराठ्यांनी किल्ल्यावरील चर्च उद्ध्वस्त करून त्यातील मूर्तीही फोडल्या. या गडावरील शिपायांना मराठे आल्याचे कळताच ते तेथेच शस्त्रे टाकून पळाले. अशाच तऱ्हेने दुसऱ्या गडावरील शिपायांनी देखील शरणागती पत्करली. या किल्ल्यावरील सैनिकांची शस्त्रे मराठ्यांनी काढून घेतली. त्यांचे हात बांधून त्यांना कैदी बनविले. मराठ्यांनी शापोरा नदीवरील शापोरा उर्फ कायसूव या किल्ल्याला वेढा दिला. तेथील पाद्र्यास गोळीने ठार करून, किल्ल्यात प्रवेश केला. तसेच या गडावरील ४० लोकांना कैद केले.

बारदेशमधील रेईस मागुस आणि आग्वाद या किल्ल्यांचे पोर्तुगेजांनी मराठ्यांच्या वेढ्यापासून संरक्षण केले. बारदेशमधील किल्ल्यातील ४६ तोफा संभाजीने काढून नेल्या. बारदेशमधील पुष्कळ स्त्री-पुरुष आणि मुले यांना मराठ्यांनी पकडले होते. त्यातील काहींना गुलाम म्हणून खुद्द आपल्या शिपायांस मुशाहिऱ्याबद्दल स्वाधीन केले. काहींना वेंगुर्ले बंदरात असलेल्या अरबास किंवा तेथील डच वखारवाल्यास विकले. या गोष्टीबद्दल पोर्तुगेजांनी संभाजीकडे तक्रार केली होती. मराठे साष्ट व बारदेश मध्ये २६ दिवस होते. या हल्ल्यानंतर मराठे व पोर्तुगेज यांच्यातील हालचाली काही काळापुरत्या थांबल्या. या लढाईत मराठ्यांनी पोर्तुगेजांचे फारच हाल केले. पोर्तुगेजांचे आर्थिक दृष्ट्यादेखील फार नुकसान झाले. या लढाईनंतर पोर्तुगेजांनी पणजीहून आपली राजधानी हलविण्याचे ठरविले. पोर्तुगेजांची परिस्थिती किती बिकट झाली होती यासंबंधी सुरतेतील फ्रेंच अधिकारी फ्रांसिस मार्ता (Francis Martin) लिहितो, "पोर्तुगेजांची गोव्यातील परिस्थिती फार बिकट होती. विजरई आपल्या शक्तीप्रमाणे प्रतिकार करीत असून शत्रूचा त्या बेटात अथवा शहरात प्रवेश होऊ नये ह्यासाठी त्याची खटपट चालू होती. मुघलांच्या मदतीची ते वाट पाहात असून त्यावरच त्यांचा भर होता."[1] मराठ्यांचे साष्ट व बारदेशवरील हल्ले चालू असतानाच, संभाजी गोवे बेट जिंकून घेतो की काय अशी धास्ती विजरईस वाटत होती. विजरई इतका हताश झाला होता की, तो गोव्यातील बों जेजुस या चर्चमध्ये गेला. तेथील सेंट फ्रान्सिस झेवियरच्या शवाच्या हातात आपल्या हातातील राजदंड देऊन संकट-निवारणार्थ त्याने करुणा भाकली.[2]

मराठे गोवे बेटावर हल्ले करून ते घेण्याच्या मार्गावर होते. इतक्यात औरंगजेबाचा मोठा मुलगा शहा आलम १ लाख सैन्य घेऊन गोव्याजवळ आल्यामुळे मराठ्यांना गोवे हद्दीतून आपले सैन्य माघारी घ्यावे लागले. पोर्तु-

१. पोम--पि, पृष्ठ १०९

२ ERS : D'Orlean's–p 341–342

गेजांनी फोंड्याला दिलेला वेढा उठविण्यासाठी मराठी सैन्य पोर्तुगीज हद्दीत गेले होते. या संधीचा फायदा घेऊन संभाजीला पोर्तुगेजांची पूर्ण फजिती करून त्यांना नेस्तनाबूत करावयाचे होते. जमल्यास गोव्यावर देखील ताबा मिळवावयाचा होता. परंतु शहा आलमचे सैन्य आल्यामुळे संभाजीराजांना आपला पवित्रा बदलावा लागला. न पेक्षा एका बाजूला पोर्तुगीज सैन्य व दुसऱ्या बाजूला मुघल सैन्य यांच्या कचाट्यात मराठी सैन्य सापडले असते. दोन शत्रूंनी मिळून कदाचित कोकण प्रांत जिंकूनही घेतला असता, असा पेचप्रसंग निर्माण झाल्यामुळे आणि आपल्या सैन्याला तेथून नीटपणे निसटता यावे म्हणून संभाजीराजांनी वेळ काढण्यासाठी पोर्तुगीजांशी तहाची बोलणी सुरू केली. शहाआलम फिरंगीयांचे हद्दीत पोहोचल्याचे कळताच संभाजीराजे गोवे हद्दीतून कूच करून दि. २३-१२-८३ रोजी रायगडास पोहोचले. कवि कलशाला त्यांनी कुलयेखत्यार पद दिले.[१]

या संबंधात ऑर्लीन्स लिहितो, "Sambhaji, however, did not consider himself strong enough to resist such a number and thought only of securing his safety by a masterly retreat which he effected so cleverly that he retreated to his fastnesses before the Mogul army could engage him in combat."

संभाजीशी गाठ पडण्यापूर्वी विजरई कोंदि द आल्व्होर यास मराठ्यांच्या युद्धपद्धतीची आणि त्यांच्या सैन्याची यथार्थ कल्पना नव्हती. शहाजादा अकबराच्या वकिलाकडून विजरईस कळले होते की, संभाजीचे सैन्य हे पळपुट्या शिपायांनी भरलेले आहे. त्यामुळे विजरईस वाटले की, आपले मूठभर कवायती शिपाई मराठ्यांना भारी होतील.

संभाजीशी झालेल्या युद्धामध्ये विजरईस कळून आले की, मराठ्यांविरुद्ध गोवे शहराचे रक्षण करणे ही एक अशक्य गोष्ट आहे. गोवे शहरास तट असून जागोजागी बुरुज होते. तेथे मोठा दारुखाना असून नदीच्या मुखावर मुरगाव, आग्वाद, रेईस मागूस व काबु यासारखे बळकट किल्ले देखील होते. असे असूनही विजरईस मराठ्यांच्या भीतीने राजधानी गोवे शहरातून हलविण्याची गरज भासली.[२] औरंगजेबावर झालेल्या या लढाईच्या परिणामांसंबंधांत रॉबर्ट ऑर्म लिहितो,

"The report of the country said that Sambhaji would take Goa, which Aurangzib did not deem improbable, and although he always affected to despise the European settlements, saw what would be the importance of the acquisition of Goa. Sambhaji's

१. शिचप्र, पृष्ठ २३

२. पोम--पि, पृष्ठ ११६

power and the views of Sultan Akbar, and therefore moved from Aurangabad to Ahmednagar to nearer the protection of Goa..."[1]

**मराठे–पोर्तुगेज तह :**

तहाची बोलणी करण्यासाठी संभाजी राजांनी कवी कलशाची नेमणूक केली आणि सुलतान अकबर यास मध्यस्थ म्हणून नेमले. या तहाच्या वाटाघाटी डिसेंबर १६८३ मध्ये सुरू झाल्या. दि. २८ नोव्हेंबर १६८३ रोजी संभाजीचे वकील गोव्यास गेले. पोर्तुगेजांनीही दि. ३१ डिसेंबर १६८३ च्या सुमारास आपले वकील संभाजीकडे पाठविण्याचे ठरविले. याप्रमाणे मानुयेल सारायव्ह यास दि. ६–१–८४ रोजी (रविवारी) संभाजीकडे निघण्याची तयारी करण्यास सांगण्यात आले. तो मानुत्चीला[2] दुभाषा म्हणून बरोबर नेणार होता. परंतु आजाराचे निमित्त करून तो गेला नाही. पूर्वी तो वकील म्हणून तेथे गेला असल्याने, आता दुभाषी म्हणून सारायव्ह बरोबर जाण्याची त्याची इच्छा नव्हती.

जेधे शकावली प्रमाणे माघ शुद्ध १ रोजी (दि. ७–१–८४) कवी कलश अकबरास घेऊन भिमगडच्या झाडीत गेले. "फिरंगीयांसी सल्ला केला." अशी नोंद आहे. परंतु ह्या तहाच्या वाटाघाटीसंबंधी विस्तृत माहिती पोर्तुगेज कागदपत्रांतच आढळते. पोर्तुगेज कागदपत्रांत भिमगड येथे तह झाल्याची नोंद मिळत नसली तरी त्याला दुजोरा मिळतो. दि. ३ जानेवारी १६८४ रोंजी मराठ्यांनी धावजी येथे ४ वकील पाठविले व तह करण्याविषयी विनंती केली. तीन दिवसांनंतर म्हणजे दि. ७ जानेवारी १६८४ रोजी पोर्तुगेजांचा वकील मानुयेल सारायव्ह द आल्बुकेर्की हा तहाच्या कामासाठी मराठ्यांकडे गेला. तहासंबंधी प्राथमिक बोलणी भिमगडास झाली असावीत. यासंबंधी पोर्तुगेज कागदपत्रांत उल्लेख आढळत नाही. प्रत्यक्ष तह मात्र फोंडे येथे दि. २५ जानेवारी १६८४ ते ४ फेब्रुवारी १६८४ च्या दरम्यान झाला. फोंडे येथेच तह झाल्यासंबंधी पोर्तुगेज कागदपत्रात माहिती मिळते. भिमगडापेक्षा फोंड्यास सुरक्षितता असल्याने तेथेच तह झाला असावा.

मानुयेत सारायव्ह द आल्बुकेर्की आणि विजरईने आग्रह केल्यामुळे मानुत्चीही दि. १३ जानेवारी १६८४ रोजी राईस येथे पोहोचला. तेथूनच त्याने तहाची कलमे ठरविली. परंतु मुघल सैन्य घाटावरून कोकणात उतरल्याने तहनाम्यावर प्रत्यक्ष सह्या झाल्या नव्हत्या. पोर्तुगेज वकिलाबरोबर संभाजीस देण्या-

१. HF–RO, p 125

२. अशाच वाटाघाटींच्या प्रसंगी संभाजीशी भेट झाली असे मानुत्चीने लिहिले आहे. संभाजीने त्यास सन्मानाने वागविले. त्याला आपली तलवार दाखविली. आणि त्या तलवारीनेच आपण राजद्रोह्यांचा शिरच्छेद केला असे संभाजीने सांगितल्याचे त्याने कौतुकाने लिहिले आहे.

साठी खालील नजराणा दिलेला होता. "सोन्याचे तीन नग शहाजाद्यासाठी, त्याने बोलणी केली तरच; सोन्याचे तीन नग संभाजीराजे यास; दुर्गादास यास दोन नगांपैकी एक सोन्याचा आणि दुसरा नग चहासाठी; संभाजीच्या चिटणिसास दोन नग. हे तर पाहिजेतच. ( असा उल्लेख होता. ) "

गरज लागल्यास इतरांसाठी दहा चिनीमातीची भांडी होती.[1]

दि. ७–१–८४ रोजी संभाजी व पोर्तुगेज यांच्यातील तहाच्या वाटाघाटी भिमगडच्या जंगलात सुरू झाल्या असाव्यात. परंतु मुघल आक्रमणासुळे त्या तहकूब होऊन शेवटच्या वाटाघाटी मर्दनगडच्या किल्ल्यात झाल्या.

**तहाच्या अटी :**

( १ ) संभाजीने पोर्तुगेजांचे जे प्रदेश व किल्ले हस्तगत केले असतील, ते तेथील तोफा व हत्यारे यांसह परत करावे.

( २ ) युद्ध सुरू झाल्यापासून व त्यापूर्वी जी एकमेकांची जहाजे एकमेकांनी घेतली असतील, ती त्यातील सामानासह एकमेकांस परत करावी.

( ३ ) उभयतांनी पकडलेले कैदी सोडून द्यावेत.

( ४ ) वसईच्या मुलुखातील गावखंडी व दमण प्रांतातील चौथाई ज्याप्रमाणे रामनगरच्या राजाला देत असत त्याप्रमाणे संभाजी राजास पोर्तुगेजांनी द्यावी. आणि त्याच्या बदल्यात संभाजीने त्या प्रदेशाचे रक्षण करावे.

( ५ ) उभयतांना एकमेकांच्या मुलुखात पूर्वीप्रमाणे व्यापारास मोकळीक असावी व एकमेकांच्या प्रदेशातून व्यापारानिमित्त सामानासह जाण्यायेण्यास कोणतीही अडचण असू नये.

( ६ ) पोर्तुगेजांच्या किल्ल्यातील तोफखान्याच्या संरक्षणाखाली धान्यसामुग्री घेऊन मुघल फौजेकडे जाणाऱ्या जहाजांना पोर्तुगेजांनी परवानगी देऊ नये. पण ज्या प्रदेशात पोर्तुगेजांचा तोफखाना नसेल तेथे त्यांस हे कलम लागू होणार नाही.

( ७ ) संभाजी राजांनी कोला ( Colla ) येथे सुरू केलेले गडाचे बांधकाम थांबवावे.

( ८ ) जे कोकणातील देसाई संभाजी विरुद्ध बंड करून गोव्यात पोर्तुगेजांच्या आश्रयास राहिले होते त्यांस माफी देण्यात यावी.

( ९ ) दुसऱ्या कलमान्वये पोर्तुगेजांच्या मुलुखाच्या सीमांशेजारी संभाजीने किल्ला बांधू नये.

१. पोम--पि, पृष्ठ १११

दि. २५-१-८४ नंतर व दि. ४-२-८४ पूर्वी संभाजी व पोर्तुगेज यांच्यात तह झाला. तह पूर्ण होण्याआधीच मराठे व पोर्तुगेज यांच्यातील लढाई थांबली होती.

हा तह करण्यासाठी संभाजीराजांनी सुलतान अकबर, राय कीर्तिसिंग आणि महादजी नाईक यांना गोव्याच्या विजरईकडे पाठविले. गोव्याच्या विजरईने महादजी नाईकाबरोबर संभाजीराजांना देण्यासाठी एक पत्र व बक्षिस पाठविले. विजरईने पत्रात लिहिले होते की, “ संभाजीराजांनी ठरल्याप्रमाणे तह पाळावा. मी माझ्या बाजूनेही तहातील कलमे अमलात आणून तह पाळीन. दोन्ही राज्यांत मैत्री व व्यापार व्यवस्थितपणे चालावा व शांतता राहावी. ”

लढाईमध्ये झालेल्या फेरफारामुळे संभाजीराजे नेमके कोठे असतील हे माहीत नसल्याने हे पत्र विजरईला आपल्या वकिलाबरोबर प्रत्यक्ष पाठविता आले नव्हते. १५ दिवसांनंतर विजरईने रामकृष्ण नाईकाबरोबर कवी कलशास पत्र पाठवून तहाची पूर्तता करण्याबद्दल विनंती केली. परंतु प्रत्यक्षात संभाजीराजांकडून हा तह पाळला गेला नाही. संभाजीराजांनी हा तह का पाळला नाही याचे कारण ग्रँट डफने अगदी वेगळेच दिले आहे. त्याच्या मताप्रमाणे संभाजीराजांनी विजरईकडे ५ करोड रुपयांची मागणी केल्यामुळे हा तह फिसकटला. परंतु पोर्तुगेज कागदपत्रांप्रमाणे वरील कारण योग्य वाटत नाही. तह फिसकटण्याची कारणे वेगळीच आहेत. कवी कलश, अंकोल्याचा राजा, अकबराची पत्नी आणि अकबर यांना हा तह पसंत होता. परंतु निळोपंत पेशवा आणि केशवपंत यांना हा तह मान्यच नव्हता. पोर्तुगेजांच्या उत्तरेकडील हद्दीतील अधिकाऱ्याने लिहिले होते की, कवी कलशाने ठरविलेला तह मान्य होऊ नये म्हणून पेशव्याने काही प्रश्न उपस्थित केले होते. हा तह होत नव्हता म्हणून दि. २३-३-८४ रोजी विजरईने नरहर पंडिताला कळविले की, “ तहात ठरविल्याप्रमाणे शत्रूकडून वर्तणूक होत नाही. उलट त्यांनी लढाई चालूच ठेवली आहे. पेशव्याने उत्तरेकडील जिंकून घेतलेला प्रदेश सोडलेला नाही. तसेच संभाजीराजांनी कोला येथे चालू केलेले गडाचे बांधकामही थांबविलेले नाही. अजूनपर्यंत भिमगडचे कैदीही सोडलेले नाहीत. आमची मैत्री त्यांस हवी असल्याने त्याने ह्या गोष्टींकडे लक्ष द्यावे. तसेच देसायांना नोकरीत घ्यावे. ” या पत्रावरून विजरई तह घडवून आणण्यास बराच उत्सुक होता असे दिसते.

१६८४ च्या मार्च महिन्याच्या अखेरीस पोर्तुगेजांनी रायगडास आपला वकील पाठविला. तसेच संभाजीराजांकडून तह मंजूर करून घेण्यासाठी जी वकिलात पाठविली त्यात आगुस्टीन पाद्री, फ्रायर आंतोनियु द सांव जोसेफ, फादर व्हर सिसीमो द कॉन्सिको, आंतोनियु अल्हारा थेमुडो व इतर काही मंडळी होती. याशिवाय त्यांच्याबरोबर विजरईच्या विश्वासातील रामकृष्ण नाईक हा होता.

विजरईने अकबर, कवी कलश आणि गंगाधर पंडितांना लिहिलेल्या पत्राची उत्तरे रामकृष्ण नाईकानेच आणली होती. या दोन राज्यांत झालेल्या वाटाघाटीसंबंधी त्याला पूर्ण माहिती होती. रामकृष्ण नाईक आणि कवी कलश यांचे संबंध चांगले असून तो कवी कलशाचे घरी जात–येत असे.

१६८४ च्या मार्चअखेर ही सर्व वकील मंडळी गोव्याहून निघाली. प्रथम ते पाटगावला गेले व तेथून पुढे रायगडला पोहोचले. रायगडावर पोर्तुगेज वकील, कवी कलश आणि इतर मंत्री यांच्यात वाटाघाटी झाल्या. संभाजीराजांना मनातून पोर्तुगेजांशी तह करावयाचा नव्हता. केवळ वेळ काढण्यासाठीच त्यांनी पोर्तुगेजांशी तहाची बोलणी सुरू केली होती. पोर्तुगेज वकील जेव्हा प्रत्यक्ष तह मंजूर करण्यासाठी आले तेव्हा मानुयेल सारायव्ह द आल्बुकेर्की याने आम्ही अंजदीव बेट सोडू आणि वकिलाबरोबर संभाजी राजांना मोठे बक्षिस पाठवू असे वचन दिले होते असा नवीनच प्रश्न राजांनी उपस्थित केला.

तहात नमूद न केलेल्या वरील दोन गोष्टींसंबंधी पोर्तुगेज व संभाजीच्या वकिलामध्ये मतभेद झाले. पोर्तुगेज वकील रायगड येथे गेला असता, शहाजादा अकबर, दुर्गादास आणि गंगाधर या तिघांनी दि. १८–४–८४ रोजी विजरईस पत्रे लिहून अंजदीव सोडण्याबद्दल व संभाजीस एक मौल्यवान भेट पाठविण्याबद्दल लिहिले होते. या गोष्टी पोर्तुगेजांनी मान्य केल्या नव्हत्या म्हणून उत्तर हद्दीतून पेशवा हलला नाही व त्याने जिंकलेल्या जागाही सोडल्या नाहीत. तसेच कोला येथे सुरू केलेले बांधकामही थांबविण्यात आले नव्हते; भिमगड येथील कैद्यांना सोडण्यात आले नव्हते व बारदेश येथे पकडलेल्या तोफा परत केल्या नव्हत्या.

तहाच्या बाबतीत नवीन उपस्थित केलेल्या प्रश्नासंबंधी विजरईने दि. १७ एप्रिल १६८४ रोजी आपल्या वकिलास पत्र लिहून तहात नमूद न केलेल्या गोष्टींबद्दल आश्चर्य व्यक्त केले. नव्याने उपस्थित केलेल्या प्रश्नासंबंधी विजरईने मानुयेल सारायव्ह द आल्बुकेर्की यास विचारणा केली होती. या वकिलाने विजरईस लिहिले की, ‘ आम्हीच अंजदीव बेटाचे मालक असल्याने, आम्ही ते बेट सोडणार नाही आणि त्या गोष्टीचा विचार देखील करणार नाही. ’ तसेच वकिलाने सुलतान अकबरास कळविले की, ‘ मैत्रीप्रीत्यर्थ आम्ही काहीतरी बक्षिस देऊ. पण ते भारी किंमतीचे असेल असे कबूल केले नव्हते. ’ पोर्तुगेज वकिलाने या संबंधात कवी कलशालाही पत्र लिहिले. या पत्रात तो म्हणतो, “ आम्ही अंजदीव बेट सोडावे हे ऐकून मला आश्चर्यच वाटले. यासंबंधी मी तुम्हास काहीच कबूल केले नव्हते. वरील मुद्यासंबंधी गैरसमज झालेला दिसतो. हा गैरसमज केवळ दुभाषांच्या भाषांतरामुळेच झाला असावा. मी असे ऐकले की, आमच्या कौन्सिलमध्ये तहासंबंधी ठरलेल्या अनेक गोष्टी तुम्ही रहित केल्या

आहेत. अंजदीव बेट सोडण्यासंबंधी आपण तीन रात्री चर्चा केली पण मी ही गोष्ट तुम्हास कबूल केली नाही. याबद्दल कोण साक्षीदार उभे करू? परंतु मी तुम्हास कबूल करतो की, बेटावरील हवा पोर्तुगेज लोकांना मानवणारी नसल्याने ते दोन वर्षांत बेट सोडून देतीलच. इंग्रजांनी सुद्धा प्रथम हे बेट ताब्यात घेतले तेव्हा त्यांचीही स्थिती अशीच होऊन त्यांना हे बेट सोडावे लागले होते. त्या बेटाचा तुम्हाला किंवा आम्हाला काहीएक उपयोग नसल्याने त्यासंबंधीची चर्चा आपण थांबवू. छत्रपतींना भेट म्हणून द्यावयाच्या वस्तूसंबंधी आमच्या कौन्सिलमध्ये चर्चा झाली नव्हती. परंतु या संबंधात अकबराने तुम्ही असा नजराणा दिला तर बरे होईल असे सांगितले होते. संभाजीराजे देखील मैत्रीदाखल एक हत्ती पाठविणार होते. विजरईने जर बक्षिसादाखल काहीही दिले नाही तर (अर्थात् तो देईल याची मला खात्री आहे.) तह घडावा म्हणून मी माझ्या घरून बक्षिस पाठवीन. या किरकोळ गोष्टींमुळे मतभेद होऊन तह लांबवावा ही गोष्ट बरी वाटत नाही. पुष्कळांना तह घाटत असल्याबद्दल बरे वाटत नव्हते. या गावातील मल्हार जाधव यानेही त्याबद्दल माझ्या घरात कटुता प्रदर्शित केली. तो म्हणाला की, 'पोर्तुगेज लोक संभाजीकडे तह करण्यासाठी पुष्कळ पैसे पाठवतील.' ही गोष्ट मला न आवडून मी त्याला तंबी दिली. या संबंधात रंगाजी लक्ष्मीधरला विचारा कारण त्यावेळी तो हजर होता."[1]

पोर्तुगेजांनी अंजदीव बेट व बक्षिस या गोष्टी तहनाम्यात नसल्याने त्यांना नकार दिला. शेवटी संभाजी राजांनी आपले वकील गोव्यास पाठवून त्या दोन मुद्द्यासंबंधी विजरईकडून शेवटचे काय ते उत्तर आणण्याचे ठरविले आणि तोपर्यंत लढाई तहकूब करावी असे दि. ६ सप्टेंबर १६८४ रोजी पोर्तुगेज वकील आणि कवी कलश यांच्यात ठरले. आंतोनियु द सांव जोसेफ व त्याच्या बरोबरची इतर मंडळी आक्टोबरमध्ये रायगडाहून निघाली आणि ती चेऊलमार्गे नोव्हेंबर महिन्यात गोव्यास परतली. या वकिलांबरोबर मराठ्यांकडील वकील गोव्यास गेले नाहीत. त्यानंतर १६८४ च्या डिसेंबर अखेरीस रंगाजी लक्ष्मीधर, सिधोजी फर्जंद हे फोंड्यास पोहोचले. रंगाजीस पोर्तुगेज भाषा येत होती. गोवे शहरात 'मौंति'च्या पायाजवळ दोन घरांमध्ये या वकिलांची पोर्तुगेज सरकारने सोय केली होती. या वकिलांना दि. २०-१-८५ नंतर विजरईने भेटीस बोलाविले. ते गोव्यात असतानाच दि. २३-२-८५ च्या रात्री मराठ्यांनी बारदेशवर हल्ला केला. त्याचा बदला म्हणून संभाजीच्या दोन्ही वकिलांवर पहारा ठेवण्यासंबंधी विजरईने आज्ञा केली. त्यामुळे रंगाजी लक्ष्मीधरने दि. ११ एप्रिल १६८५ आणि दि. १३ मे १६८५ रोजी आंतोनियु द सांव जोसेफला

१. पोम-पि, पृष्ठ १२२

पत्र लिहून तक्रार केली. या पत्रात तो म्हणतो, "आपण आम्हास रायरीहून येथे आणिले, त्याप्रमाणे मी आपणास रायरीस नेले असते व आमच्याप्रमाणे आपणांवर पहारा ठेवला असता, तर चोवीस तासांच्या आत मी आपणास सोडविले असते व हे शक्य न झाल्यास मी दाड (?) मिश्या छाटून जोग्याप्रमाणे छत्रपतीपुढे जाऊन उभा राहिलो असतो ! संभाजीने किंवा त्याच्या वडिलांनी राजद्रोही व बंडखोर माणसास देखील दिलेला शब्द आतापर्यंत केव्हाच मागे घेतला नाही !"

सिधोजी फर्जंदने दि. १० मार्च १६८५ रोजी आंतोनियु द साव जोसेफ यास लिहिलेल्या पत्रात म्हटले आहे की, "छत्रपति साहेबांचा हुकूम कीं, फिरंगी यासी दोन गोस्टीची किताबती लिहिली आहे. एक गोस्टी की अंजदीव सोडून द्यावे; दुसरी गोस्टी पोख्ती भेटी देतील ते घेवुनु यावें. ह्या दोनी गोस्टीबद्दल ईमोहिबास सिनोर विजरई अजमाचे मुलाखतीस पाठविले होते. याखेरीज आणिखी काही मजकुरास पाठविले नाही. हा मजकुर मोहिबांसही मालूम आहे. ऐसियासि रद्दबदलमुळे विजरई आजम या दोनी गोस्टी मान्य करीत नाही, तरी आम्ही येथे असिलियाचे काय सार्थक आहे ? त्याहीमध्ये मोहिबाचे इमानावर आम्ही गोवियास आलों आहो. आता कार्यहि नाही आणि येथे कस्टी होत राहावें हेहि वाजीब नाही."[1]

अशा तऱ्हेने दीड वर्ष चाललेल्या तहाच्या वाटाघाटीतून काहीच निष्पन्न झाले नाही आणि अखेरीस पोर्तुगेज व मराठे यांच्यात मैत्री झालीच नाही.

मुघल सैन्य परत जाताच मराठ्यांनी पोर्तुगेजांवर स्वारी करण्याची तयारी चालू केली (८–३–८४). पोर्तुगेजांनी सुद्धा आपला गेलेला मुलूख परत घेण्याचे प्रयत्न सुरू केले. काही ठिकाणी विजरईला यश आले नाही. मार्च १६८४ मध्ये झालेल्या चकमकीत पोर्तुगेजांकडील चारपाचशे सैनिक मरण पावले. त्यामुळे विजरईने पोर्तुगालहून मदत मागविली. ऑगस्ट १६८४ च्या सुमारास मराठे पुन्हा गोव्यावर स्वारी करण्यासाठी फोंडा येथे जमत होते. कारवार येथील मराठ्यांच्या आरमाराने पोर्तुगेजांकडील तांदूळ घेऊन जाणारी काही जहाजे पकडली. याशिवाय साष्ट येथेही मराठ्यांनी पोतुगेजांची लाकडे वाहून नेणारी जहाजे पकडली.

पोर्तुगेज व मराठे यांच्यामधील युद्धात मराठ्यांच्या सरहद्दीवरील दळवी देसाई यांनी पोर्तुगेजांची बाजू घेतली. तसेच गोव्याच्या परिसरातील साखळी, डिचोली, पेडणे व फोंडे येथील देसाई, कुडाळचे खेमसावंत, तान सावंत, राम दळवी वगैरे देसाई संभाजीविरुद्ध फितूर होऊन पोर्तुगेजांना मिळाले. साखळीचे

१. पोम–पि, पृष्ठ १२१–१२२

रुद्राजी राणे व येसोबा राणे यांनी संभाजीविरुद्ध बंड करून आपली कुटुंबे पोर्तुगाल सरकारच्या आश्रयास पाठविली. या देसायांप्रमाणेच कारवारच्या देसायाने संभाजी-विरुद्ध बंड पुकारले. या देसायांनी आपले कबिले अंजदीव बेटात ठेवले. मराठ्यांच्या ताब्यात असलेला कारवारचा किल्ला त्यांनी आपल्या ताब्यात घेतला. इतके करूनही हे देसाई थांबले नाहीत. कारवारचा किल्ला व त्याच्या परिसरातील भटकळपासून अवर्सा नदीपर्यंतचा प्रदेश कारवारच्या देसायाने सवंदेकरांच्या स्वाधीन केला. सवंदेकरांनी आपले सैन्य पाठवून रामाच्या भूशिरापासून अंकोल्यापर्यंतचा प्रदेश हस्तगत केला. मुघलांचे सैन्य घाटावरून खाली उतरत असताना कारवारच्या देसायाने कारवारजवळील मराठ्यांचे आरमार हस्तगत केले. या आरमारात सात लढाऊ गलबते ( Galvets ), दहा पाले ( Palas ) व कारवारच्या नदीत तयार झालेली दोन नवीन जहाजे आणि सर्व तारवांतील मिळून ३०० तोफा कारवारच्या देसायाने सवंदेकरांच्या स्वाधीन केल्या. मराठ्यांच्या ताब्यातील खोलगड, कुर्म गड उर्फ सिंपी गड, सिवेश्वरचे कोट कदरे येथील कोट आणि मधुरगड, अंकोलेचा कोट व महेंद्रगड हे ७ किल्ले त्याने सवंदेकराच्या स्वाधीन केले. संभाजीराजांनी दक्षिण कोकणातील देसायांच्या वतनातील बराचसा भाग स्वतःकडे ठेवल्यामुळे हे देसाई त्याच्यावर रुष्ट झाले होते. कदाचित् युद्धपरिस्थितीमुळे संभाजीला असे करणे प्राप्त झाले असेल. डिचोली, साखळी व पेडणे येथील देसायांनी पोर्तुगेजांशी तह करून ते पूर्वी आदिलशहाला दरसाल जी रक्कम देत होते तेवढी पोर्तुगेजांना देण्याचे कबूल केले. संभाजी व पोर्तुगेज यांच्यात युद्ध सुरू झाल्यापासूनच पोर्तुगेजांनी देसायांशी संगनमत केले आणि त्यांना संभाजीविरुद्ध बंड करण्यास प्रवृत्त केले होते. शेवटी दि. ८–२–१६८५ रोजी पोर्तुगेज व देसाई यांच्यात एक गुप्त करार झाला. या कराराप्रमाणे दि. १२–२–१६८५ रोजी त्यांनी एकदम उठाव करून संभाजीच्या राज्यात निरनिराळ्या ठिकाणी छापे घालून लूट मिळविली. मराठ्यांकडील मुलूख हस्तगत करण्यासाठी पोर्तुगेजांनी सावंतास आरमाराचे सहाय्य देण्याचे व वेळ पडल्यास पैशाची मदत करण्याचे आश्वासन दिले. सावंत जो मुलूख जिंकील त्यातील एक हिस्सा त्याच्याकडे राहील व दोन हिस्से पोर्तुगेजांना द्यावे असे या करारात ठरले.

कुडाळकर खेम सावंत हा इतर देसायांचा पुढारी असल्याने विजरईने त्याच्याशी करार केला होता. इ. स. १६८९ च्या सुरुवातीपर्यंत फोंडा व मर्दनगड मराठ्यांच्या ताब्यात होते. पोर्तुगेजांनी जरी देसाई व सावंत यांचे सहाय्य घेतले असले तरी त्यांना त्यांचा फारसा उपयोग झाला नाही. संभाजीशी लढाई चालू असताना पोर्तुगेजांची जशी परिस्थिती झाली होती तशीच परिस्थिती जानेवारी १६८८ पर्यंत राहिली होती. अशा तऱ्हेने पोर्तुगेज-मराठा संघर्ष संपुष्टात आला.

वरील सर्व बारीकसारिक हालचाली पाहिल्या म्हणजे सहजच एक विचार समोर उभा रहातो. संभाजीने या लढाईतून मिळविले काय आणि गमावले काय ? मुघलांसारखा शत्रू दाराशी येऊन मराठी राज्य नष्ट करण्याच्या विचारात असताना संभाजीने पोर्तुगेजांशी लढाई करून आपली सैन्यशक्ती निष्कारण खर्ची घातली नव्हती काय ? संभाजीने पोर्तुगेजांविरुद्ध लढाई करून आपली सैन्यशक्ती व पैसा खर्च केला असे काही इतिहासकारांचे व इतिहासाच्या अभ्यासकांचे मत आहे. त्यांच्या मते संभाजीने ही लढाई करावयास नको होती. कारण त्यामुळे त्याचा मुघलांविरुद्ध प्रतिकार कमी पडला. संभाजीराजांनी पहिल्यापासूनच सावधगिरीने वागून शिवाजीमहाराज व पोर्तुगेज यांच्यातील संबंध लक्षात घेऊन राज्यावर येताक्षणीच पोर्तुगेजांशी मित्रत्वाचे संबंध प्रस्थापित केले. पोर्तुगेजांनी मुघलांची मदत घेऊन, तहात ठरल्याप्रमाणे या दोन शत्रूंनी एकत्र होऊन कदाचित् कोकण प्रांत १६८३–८४ मध्ये सहज हस्तगत केला असता. अशा आणीबाणीच्या प्रसंगी राजे जातीने फोंड्यास गेले आणि त्यांनी दक्षिण कोकणात असलेला महत्त्वाचा फोंडागड शत्रूच्या तावडीतून वाचविला. मराठी सैन्य गोवाहद्दीत गेलेच होते त्याचा फायदा घेऊन गोव्याच्या परिसरात संभाजीने चढाई करून पोर्तुगेजांची फटफजिती केली. पोर्तुगेजांच्या आशियातील इतिहासात संभाजीने त्यांच्या केलेल्या फजिती-इतकी फजिती कोणीही केली नाही, हे त्यांनीच मान्य केले आहे. अशा तऱ्हेने संभाजीने कोकण प्रांत जिंकण्याचा त्यांचा बेत हाणून पाडला. पोर्तुगेजांच्या उत्तर हद्दीतील चेंबूर, तळोजा, दंतोरा, कोळवे, करंजा, असेरी इत्यादी गड जिंकून घेतले. गोवा हद्दीतील मार्गोवा ( मडगाव ), कुकळी, असोळणे, बारदेशमधील कायसुव, थिये इत्यादी गडही जिंकले. साष्ट व बारदेश मधून मराठ्यांनी लूट मिळविली. तसेच जमेल तेवढा तोफखाना सुद्धा हस्तगत केला. गेलेला मुलूख परत मिळविण्यासाठी पोर्तुगेजांना दोन वर्षे खटपट करावी लागली. संभाजीराजांनी या गोष्टी केल्या नसत्या तर १६८३ मध्येच मुघल व पोर्तुगेजांनी एकत्र येऊन कोकणप्रांत सहज हस्तगत केला असता आणि त्यामुळेच १६८४ मध्येच घडणाऱ्या गोष्टी ३–४ वर्षे लांबणीवर पडून १६८९–९० पर्यंत पुढे गेल्या.

अशा तऱ्हेने संभाजी राजांनी आपल्या दोन्ही शत्रूंवर, वयाच्या आणि शक्तीच्या मानाने चांगलीच दहशत बसविली. तरीही पोर्तुगेजांविरुद्ध लढाई चालू असताना त्यांनी मुघलांच्या प्रतिकाराकडे दुर्लक्ष केल्याचेही दिसत नाही. उलट याच वेळी मुघलांनी दोन आघाड्यांवर ( उत्तर व दक्षिण कोकण ) चढाई केल्याचे पहाताच राजांनी मराठी सैन्य वाढविण्याचे प्रयत्न केले. औरंगजेबाचा मोठा मुलगा शहाअलम दक्षिण कोंकणच्या स्वारीवर येत असल्याचे पाहताच राजांनी आपला पवित्रा बदलला आणि पोर्तुगेजांशी तहाच्या वाटाघाटी सुरू केल्या आणि शहा आलमचे सैन्य कोकणात उतरण्यापूर्वीच संभाजी राजे तत्परतेने रायगडावर परतले.

राजांना पोर्तुगेजांशी खऱ्या अर्थी तह करण्याची इच्छा नव्हती. परंतु प्रसंग बाका आहे हे पाहून त्यांनी चढाईचे धोरण बाजूस सारले. दीड वर्ष राजे व पोर्तुगेज यांच्यात तहाच्या वाटाघाटी चालू होत्या; परंतु प्रत्यक्ष तह नको होता म्हणून तहाच्या वाटाघाटीत न ठरलेल्या नवीनच अटी त्यांनी उपस्थित केल्या. या दृष्टीने राजांनी पोर्तुगेजांबरोबर जे धोरण स्वीकारले होते ते योग्यच होते.

* * *

# ८. विजापूर आणि गोवळकोंडा

शिवाजी महाराजांच्या उदयापूर्वी शतक दीड शतक बहामनी राज्यातून अहमदनगरची निजामशाही ( १४८९ ), विजापूरची आदिलशाही ( १४८९ ) वऱ्हाडची इमादशाही ( १४९० ), गोवळकोंड्याची कुत्बशाही ( १५१२-१३), आणि बीदरची बरीदशाही ( १५२६ ) या पाच शाह्या स्थापन झाल्या होत्या. शिवाजी महाराजांच्या जन्मापूर्वीच वऱ्हाडची इमादशाही ( १५७४ ) आणि बीदरची बरीदशाही ( १६१८–१९ ) या दोन शाह्या नष्ट झाल्या. शिवाजी महाराजांच्या जन्मानंतर सहा वर्षांनी म्हणजे १६३६ मध्ये अहमदनगरची निजामशाही नष्ट झाली. त्यामुळे शिवाजी महाराजांच्या स्वराज्यस्थापनेच्या काळात दक्षिणेत विजापूरची आदिलशाही आणि गोवळकोंड्याची कुत्बशाही या दोन शाह्याच अस्तित्वात होत्या. युसुफ आदिलशहा हा आदिलशाही राज्याचा संस्थापक. आदिलशाहीत एकूण नऊ सुलतान होऊन गेले. शिवाजी आणि संभाजी महाराजांच्या कारकीर्दीत महंमद आदिलशहा ( १६२६–१६५६ ), दुसरा अली आदिलशहा ( १६५६–१६७२ ) आणि शिकंदर आदिलशहा ( १६७२–८६ ) हे सुलतान होऊन गेले. कुली कुत्बशहा हा कुत्बशाहीचा संस्थापक. इब्राहिम, मुहमद कुली, त्याचा पुतण्या व जावई मोहमद. मोहमदचा मुलगा अब्दुला हुसेन आणि त्याचा जावई अबुल हसन ( १६७२–८७ ) हे सुलतान या शाहीत होऊन गेले.

शिवाजी महाराजांनी स्वराज्याची स्थापना व प्रसार आदिलशाही मुलूख जिंकून केला होता. त्यामुळे महाराजांचे व आदिलशाही सुलतानांचे सख्य असणे संभवनीय नव्हते. तरीसुद्धा ज्यावेळी मुघलांचे आक्रमण आदिलशाहीवर होई तेव्हा शिवाजी महाराज आदिलशाही सुलतानास सर्व तऱ्हेचे साहाय्य देत असत.

आदिलशाहीतील अली आदिलशहा दि. २४–११–१६७२ रोजी मरण पावला. त्यानंतर चार वर्षांच्या शिकंदर आदिलशहाला सुलतान करण्यात आले. पठाण बहलोल खानाने दि. ११–११–१६७५ रोजी आदिलशाही वजीर खवासखान यास कैद केले आणि त्याला ठार मारून ( जाने. १६७६ ) सर्व सत्ता

आपल्या हातात घेतली.[१] खवासखानाच्या कारकीर्दीतील दक्षिणी लोकांना काढून बहलोलखानाने राज्यात पठाणांचा भरणा केला. शिकंदर आदिलशहा सात वर्षांचाच असल्याने ते तख्त व छत्र बहलोलखानाच्या कबजात गेले. त्यामुळे या राज्यात खवासखानाचा दक्षिणी पक्ष आणि बहलोलखानाचा पठाणी पक्ष, असे दोन पक्ष निर्माण होऊन त्यांच्यात सत्ता स्पर्धा सुरू झाली. बहलोलखानाच्या नेतृत्वाखाली पठाणी पक्षाचा जोर वाढत होता. त्यामुळे उत्तरेतील मुघलांना दक्षिणेत पाय रोवण्यास चांगली संधी मिळणार होती. त्या दृष्टीने मुघली सरदार बहाद्दूरखानाने विजापूरवर स्वारीही केली. यावेळी कर्नाटकाच्या स्वारीवर जाण्यासाठी म्हणून शिवाजी महाराजांनी विजापूरच्या बहलोलखानाशी जरी तह केला असला तरी त्यांना तेथे पठाणांची सत्ता वाढू द्यावयाची नव्हती.

शिवाजी महाराज ज्यावेळी कर्नाटकच्या स्वारीवर गेले त्यावेळी त्यांनी वाटेत गोवळकोंड्याच्या शहाची भेट घेतली. शिवाजीचे आणि गोवळकोंड्याच्या अबुल हसनचे संबंध मित्रत्वाचे होते. या भेटीमुळे ते अधिकच दृढतर झाले. "आपली पातशाही वाढवावी, पठाणांची नेस्तनाबूत करावी, दक्षिणची पातशाही आम्हा दक्षिणियांच्या हातात राहील ते करावे. उत्तरेतील मुघलांचा हात इकडे शिरकू देऊ नये."[२] हे दूरदर्शीपणाचे धोरण शिवाजी महाराज व अबुल हसन यांच्यात ठरले.

हे धोरण अमलात आणण्यासाठी दक्षिणी पक्षात विजापूरचे सरदार सामील करून घेण्याचे ठरले. आदिलशाही राज्यात बाजी घोरपड्याचा मुलगा मालोजी घोरपडे हा एक प्रमुख सरदार होता. शिवाजी महाराजांनी मार्च १६७७ मध्ये त्याला एक विस्तृत पत्र लिहून सर्व दक्षिण्यांनी एकत्र होऊन पठाणी सत्तेला आळा घालण्याची आणि ती नेस्तनाबूत करण्याची योजना मांडली. राजे लिहितात, "दक्षिणचे पातशहा तीन. निजामशहा, आदिलशहा आणि कुत्बशहा. त्यांमध्ये निजामशाही पादशाही बुडाली ते समई निजामशाही उमदे वजीर होते. त्यांनी आदिलशाहीसी रुजवाती ( स्नेहसंबंध ) करून आपणास रोजगारास जागा केली. हल्ली आदिलशाही बहलोलखान पठाणी घेतली. पातशाहा लहान लेकरूं नाम मात्र. ते आपले कैदेत ठेवले आहेत. आणि तख्त व छत्र ( आणि ) विजापूरचा कोट पठाणाने काबीज केला आहे. ऐशियास दक्षिणचे पातशाहीस पठाण जाला हे गोष्ट बरी नव्हे. पठाण बळावला म्हणजे एका उपरी एक कुली ( सर्व ) दक्षिणियांची घरे बुडवील. कोणास तगो देणार नाही. ऐसे आम्ही समजोन हरजर कुत्बशाहा पातशाहा यांसी रुजवात राखिली होती.

१. विआपा-(बु.-स.), पृष्ठ ५००
२. शिचप्र, पृष्ठ २७

"...त्यावरून सांप्रत हजरत कुत्बशाहानी मेहेरबानी करून ' हुजूर भेटीस येणे ' म्हणून दस्तखत मुबारक व दस्त पंजियानिसी फर्मान सादर केला...या उपरी राजकारण विषयी हजरत कुत्बशाहानी मादण्णापंतास व आम्हास एकत्रित करून ऐसा तह केला की जो काय उभयवर्गी तह व्हावा तो आपण कबूल करावाच ऐसा कुल मनसबा मदार आम्हावरी टाकला आहे की, ' आपली पातशाही जितकी वाढवू ये तितकी वाढविणे. पठाणाची नेस्तनाबूत करणे. दक्षिणची पातशाही आम्हा दक्षिणियांच्या हाती राहे ते करावे म्हणून त्यास हा मनसुबा ये प्रसंगी आमचे हातास आलीया उपरी आम्ही हाच विचार केला की, जे काही आपले जातीचे मराठे लोक आहेती ते आपल्या कटात येऊन कुत्बशाहासी त्यांची रुजवात करावी. दौलत देवावी...आपल्या जातीच्या मराठिया लोंकांचे बरे करावे हे आपणास उचित आहे...तुम्ही मराठे लोक कामाचे, तुमचे बरे करावे ऐसे मनी धरून हजरत कुत्बशाहासी बहुत रीती बोलोन तुम्हास हजरत कुत्बशाहाचा कौलाचा फर्मान घेऊन पाठविला आहे...आणि पठाणास जरी कुत्बशाहा व आम्ही तमाम दख्खनी मिळोन चालोन घेऊन बुडवितच आहो."[१] अशा तऱ्हेने एक राजकीय मनसुबा ठरला. शिवाजी महाराजांनी वैयक्तिकरीत्या जरी मुघलांविरुद्ध विजापूरकरांना मदत दिली होती तरी मुघलांच्या सत्तेला दक्षिणेत पायबंद घालण्यासाठी दक्षिणेतील दोन शाह्या व मराठी सत्ता यांच्यात वरीलप्रमाणे प्रथमच तह होत होता.

जानेवारी १६८० मध्ये मुघलांचा सेनापती दिलेरखान विजापूरवर चालून गेल्याचे कळताच ठरल्याप्रमाणे शिवाजीमहाराजांनी आणि आदिलशाही सरदार मसूदखान यांनी गोवळकोंड्याच्या सुलतानाकडे मदत मागितली. त्याप्रमाणे सुलतानाने मदत पाठविण्याची तयारी केली. ही बातमी कळताच गोवळकोंड्यातील मुघल वकिलाने सुलतानास दम दिला की, जर मदत पाठविली गेली तर मुघली सैन्य विजापूरहून गोवळकोंड्यावर चालून जाईल. म्हणून अबुल हसनने प्रत्यक्ष मदत न पाठविता, गुप्तपणे पैशाची मदत पाठवून राजांना विजापूरकरांना सैन्याची मदत देण्यास सांगितले.[२]

उत्तरेतील मुघली सत्तेविरुद्ध दक्षिणी सत्ताधाऱ्यांचा गट करून शिवाजीमहाराजांनी जणू काय दक्षिणेत येणाऱ्या भावी संकटाची कल्पना येऊन आपल्या मुलासाठी संरक्षणाची फळी निर्माण करून ठेवली होती.

संभाजीराजे गादीवर आल्यानंतर त्यांना अंतर्गत व परसत्ताक परिस्थितीला ज्या तऱ्हेने तोंड द्यावे लागले त्यातून त्यांचे कुत्बशहा व आदिलशहा सुलतानांशी

१. सरस्वती मंदीर इतिहास मंजिरी, पृष्ठ ९७

२. ERS–No. 473

संबंध बिघडण्याचे कारणच उद्‌भवले नव्हते. शिवाजी व कुत्बशाही सुलतानांचे जसे मैत्रीचे संबंध होते तसेच संभाजी व त्या सुलतानांचे राहिले होते. १६८० च्या डिसेंबरच्या दुसऱ्या आठवड्यात मुघलांचे सैन्य कुत्बशाही राज्यावर चालून गेले. त्यावेळी कुत्बशहाने हरजी राजाचा धनी संभाजी राजे याला चार लक्ष पागोडे पाठवून त्यांच्याकडून सैन्याची व मदतीची अपेक्षा केली होती. मादण्णा व आकण्णा यांनी सुलतानानंतर संभाजीलाच राज्य देण्याचे कबूल केल्याची बातमी पसरली होती.[1]

आदिलशाही सुलतान व संभाजी राजे यांचे संबंध घनिष्ठ मित्रत्वाचे नसले तरी ते शत्रुत्वाचे नव्हते. अधूनमधून मराठे व आदिलशाही सैन्यात किरकोळ चकमकी उडत.

१६८२ मध्ये ऑक्टोबर–नोव्हेंबरच्या सुमारास माण परगण्यातील नाझरे कर्यातीमधील मौजे सेखापूर येथे संभाजीच्या व मुघलांच्या झालेल्या धामधुमीत पिकाची बरीच नासधूस झाली. त्यामुळे तेथील रयत परमुलखात गेली. मराठ्यांनी मुद्दाम आदिलशाही मुलखाची खराबी केली नव्हती.[2] मुघलांविरुद्ध मराठ्यांना लढावे लागे. त्यात केव्हातरी अशी नुकसानी होई. परंतु त्यामुळे आदिलशाही सुलतान व संभाजी राजे यांच्या संबंधावर विशेष परिणाम झाला नाही.

१६८२ मध्ये तेरदळ परगण्यातील सर्जापूर पेठेतील महानाडचे शेतकरी मुघली शहाजाद्याने तेथे केलेल्या नुकसानीमुळे परागंदा होऊन मुधोळच्या ठाण्यात राहावयास गेले. तेव्हा तेथील रयतेने पेठ मामुरी करण्याकरिता आदिलशहाकडून कौलनामा ( अधिकारपत्र ) मागितला. तेव्हा दि. ३–७–१६८३ रोजी तेरदलचा आदिलशाही सुभेदार भगवंतराव याने सर्जापूर पेठेतील सिवया मुछोर्डाला लिहिले की, " हजरत...साहेबी नजर इनायत करून मुदेमवाफिक तपासिले कौल मऱ्हामत करून पाठविले कौल प्रमाणे आम्ही चालवून घेवून यासी काही फरक होऊ देणार नाही...छत्रपतीचे कौल आणौन देऊन...ते प्रमाणे सरंजामी करून देऊ"[3] संभाजी महाराज कौलनामा देतील अशी खात्री आदिलशाही सरदाराने दिली होती. हे संभाजीचे केवळ तोंडी आश्वासन नव्हते तर साबाजी घाटगे यांनी संभाजी राजांकडून पेठेच्या मामुरीकरिता पत्रे रवाना केली होती.[4] यावरून हे स्पष्ट होते की येथपर्यंत संभाजीराजे, आदिलशाही व कुत्बशाही सुलतानांचे संबंध मैत्रीचे होते. पुढे ते वृद्धिंगतच होत गेले.

१. F. R : Diary Ft. St. G. 29–12–1681

२. शिचसा, खंड ७ ले. ६५

३. शिचसा, खंड २ ले. २७१ पृष्ठ ३६८

४. कित्ता, ले. ३७६

औरंगजेब एका विशिष्ट ध्येयाच्या पूर्तीसाठी दक्षिणेत आला होता. संभाजी राजांकडे आश्रय घेतलेल्या मुलाला पकडणे आणि दक्षिणेतील आदिलशाही, कुत्बशाही व मराठी राज्य पादाक्रांत करणे हे ध्येय त्याच्या पुढे होते. प्रथम त्याने आपली नजर मराठी राज्यावर केंद्रित केली. त्यासाठी सर्व तऱ्हेचे प्रयत्न तो करीत होता. प्रथम त्याने आदिलशाही सुलतानाचे संभाजी विरुद्ध मन वळविण्यास सुरुवात केली. औरंगजेब दक्षिणेत येण्यापूर्वीच त्याने व त्याच्या शेहाबानू बेग ( शिकंदर सुलतानाची बहीण ) या सुनेने सर्जाखान व शिकंदर आदिलशहा यांना पत्रे पाठविली. दोन्ही पत्रांचा मथितार्थ असा होता की, "अकबर संभाजीकडे गेला आहे. संभाजी व अकबर यांच्या पारिपत्यासाठी बादशहा दक्षिणेत येणार आहे. तरी या संधीचा फायदा घेऊन आदिलशहाने, मुघल सैन्याच्या मदतीने, मराठ्यांनी घेतलेला आपला मुलूख परत मिळवावा, आणि पूर्वीचे संबंध प्रस्थापित करावेत."[1] या पत्रांचा फारसा उपयोग झाला नाही.

औरंगजेब १६८२ च्या मार्च महिन्यात औरंगाबादला येऊन दाखल झाला.[2] तो आल्यानंतर आदिलशाही व कुत्बशाहीचे मोठमोठे नामांकित सरदार त्याला जाऊन भेटले. त्यांना योग्य ते मानमरातब देण्यात आले.[3] मुघलांनी आदिलशहाला सैन्याच्या खर्चासाठी ९ लाख रुपये दिले. मुघल बादशहा व आदिलशहा यांच्यात चाललेल्या वाटाघाटीतून निरनिराळ्या बातम्या उठत होत्या. कारवारकर दि. ३०–७–१६८२ च्या सुरतकरांच्या पत्रात लिहितात, "मुघलाने आदिलशहास सैन्याच्या खर्चासाठी ९ लाख रुपये दिले, तो आपल्या कित्येक उमरावांसह सर्जाखान व सिद्दी मसूदच्या मुलास व आदिलखान यास घेऊन घाटावरील मजबूत अशा मिरजच्या किल्ल्यात आला आहे. बरोबर २० हजार घोडेस्वार आहेत. अशी बातमी आहे की संभाजीने वकील पाठवून त्याच्या खास आश्रयाची मागणी केली आहे. परंतु पन्हाळा किल्ला आदिलशहास दिल्याविना त्याला संभाजीच्या संरक्षणास हमी देता येत नाही. संभाजी त्याच्यावर विश्वासेल की नाही हे नक्की सांगता येत नाही. काहींना वाटते तो त्यास पन्हाळा देईल. परंतु बऱ्याच लोकांस तो आदिलशहावर विसंबणार नाही असेच वाटते."[4] या कारवारकरांच्या बातमीत काहीच अर्थ नव्हता. १६८६ मध्ये मुघलांनी मिरज घेतली आणि पन्हाळा संभाजी राजांच्या अखेरीपर्यंत तरी मराठ्यांच्या ताब्यात होता. संभाजी राजे स्वतंत्रपणे मुघली आक्रमणाला तोंड देत होते.

---

१. विआपा. (बु.–स.) पृष्ठ ५८२, ५८५, ५९०

२. मवऔ–प, पृष्ठ २२

३. कित्ता, पृष्ठ २३

४. F. R : Car to Sur 30–7–1682

आदिलशाही राज्यात राजकीय परिस्थिती विस्कटलेली असल्याने औरंगजेबाने देऊ केलेल्या मदतीचा फारसा उपयोग झाला नाही. सिद्दी मसूद याने आदिलशाही कारभार सुधारण्याचा प्रयत्न केला. पण त्यात त्याला यश आले नाही. ज्यावेळी परिस्थिती सुधारण्याची आशा दिसेना तेव्हा त्याने वजीरपदाचा राजीनामा दिला आणि तो आदोनीला जाऊन बसला. आक्काखुसरो वजीर झाला पण तो थोड्याच दिवसांत मरण पावला. मसूदखानाने वजिरी सोडल्यामुळे आदिलशाही कारभारात अंदाधुंदी माजली. शेवटी शिकंदर आदिलशहाने सय्यद मखदम सर्जाखान यास वजिरी दिली.[1]

संभाजीचे राज्य जिंकण्यात विजापूरकरांचा फारसा उपयोग होत नाही हे औरंगजेबाच्या लक्षात आले. राग व्यक्त करण्यासाठी त्याने आदिलशहाने दिलेल्या नजराण्याचा स्वीकार केला नाही. आदिलशहाचा वकील यादगर अली यास १० हजार रुपये आणि सय्यद मसूदचा वकील शेख हसन यास १ हजार रुपये बक्षिस देऊन माघारी पाठविला. आदिलशहाने पाठविलेला हत्ती व एका अंगठीची पेशकश बादशहाने मान्य न करता परत दिली.[2]

एकीकडे राग व्यक्त करीत असताना औरंगजेबाचे आदिलशहावर दडपण आणण्याचे प्रयत्न चालूच होते. औरंगजेब आणि त्याचा मुलगा शहा आलम यांनी शिकंदर पादशहाकडे अनुक्रमे दि. ३०–४–१६८४ आणि १७–४–१६८४ रोजी फर्माने पाठविली. यात खालील मुख्य कलमे होती. (१) स्वारीचा खर्च व रसद काही एक सबब न सांगता पोहोचविणे, (२) आपले मुलखातून फौजेचा व रसद येण्याजाण्याचा मार्ग मोकळा ठेवणे, (३) संभाजीची मित्रता व सख्य बाह्यात्कारी व अंतर्यामी करून सोडून देणे व सर्वांनी एक दिल होऊन संभाजीचा निर्मूळ फडशा करण्याकरिता विचार करणे[3].

फर्मानातील बहुतेक कलमे शिकंदर शहाने मान्य केली. परंतु प्रत्यक्षपणे त्याला तसे वागणे शक्य नव्हते. आर्थिक मदत देऊन, करारपत्रे करून, दम देऊन काहीही उपयोग झाला नव्हता. औरंगजेब वरकरणीच शिकंदरशी मित्रत्वाचा आव आणीत होता. औरंगजेबाने धाडलेल्या फर्मानातील एकाही कलमाची शिकंदरकडून अंमलबजावणी झाली नव्हती. रसदही येऊन पोहोचली नव्हती, तेव्हा बादशहाला फितुरी व वाकडेपणाची शंका आली. आदिलशहा संभाजीशी मित्रता व सख्य करतो असा त्याला संशय येऊ लागला. औरंगजेब वाकडेपणाचे कारणच शोधत होता. त्यातच मराठ्यांविरुद्ध सुरू केलेल्या मोहिमेत

१. विआपा, (बु.–स.) पृष्ठ ५९३–९४

२. MA-JS, p 135

३. विआपा, (बु.–स.) पृष्ठ ५९४

मुघलांना बहुतेक सर्व आघाड्यांवर अपयश आले होते. संभाजी, शिकंदर आदिलशहा आणि अबूल हसन यांच्यात एकजूट होईल असाही त्याला संशय येऊ लागला. संभाजी विरुद्ध युद्धात टिकाव लागेना म्हणून औरंगजेबाने दि. ३०–१०–१६८४ रोजी आदिलशाहीविरुद्ध स्वारी केली.[1]

**औरंगजेब आणि गोवळकोंड्याचा अबुल हसन :**

औरंगजेब दक्षिणेत उतरताच कुत्बशाही राज्यात त्याने काही मामुली हालचाली केल्या असल्या तरी कुत्बशहाने त्याची फारशी दखल घेतली नाही. अबुल हसन आपणहून कोणत्याही तऱ्हेने मुघलांशी वाकडेपणा येऊ नये म्हणून पूर्वीपासूनच खटपट करीत असे. तो स्वतः मुघलांचे शत्रुत्व ओढवून घेण्यास तयार नसे. दि. २–१–१६८२ रोजी दारा शिकोचा मुलगा, मोहमद शहा वकील म्हणून गोवळकोंड्यास गेला. दि. १४–५–१६८२ रोजी कुत्बशहाचा वकील मोहमद मासूमने बादशहाची भेट घेऊन दोन लाख चव्वेचाळीस हजार रुपये पेशकश सादर केली.[2] संभाजी विरुद्ध लढाई सुरू करताच औरंगजेबाने आपले हेजीब गोवळकोंड्याच्या सुलतानाकडे धाडून वरकरणी सख्य राखण्याचा देखावा चालू ठेवला असला तरीही त्या शाहीत अंतर्गत यादवी माजेल असे प्रयत्न सुरू केले.

विजापूरकरांवर मुघली सैन्य चालून गेले तेव्हा संभाजीराजे व कुत्बशहा यांनी आदिलशाहीला मदत पाठविली असल्याने गोवळकोंड्याच्या सुलतानावर औरंगजेबाचा राग होताच.[3] त्यातच कुत्बशाही राज्यात आकण्णा व मादण्णा व त्यांच्या नातेवाईकांना बरेच महत्त्व प्राप्त झाले होते. आकण्णा राज्याचा मुख्य अधिकारी झाला होता. मादण्णा आणि आकण्णा हे अधिकारपदावर होते तो-पर्यंत कुत्बशाही राज्य दुर्बळ होण्याची चिन्हे दिसेनात.

मुघल चालून येतील अशी भीती कुत्बशाही राज्यात उत्पन्न झाली होती. औरंगजेबाच्या स्वारीची कुत्बशहाला भीती वाटत असे. त्यामुळे स्वारी टळावी म्हणून तो जास्तीत जास्त प्रयत्न करी. सय्यद मुजाफर कुत्बशहाच्या कैदेत होता. औरंगजेबाने त्याला मुक्त करण्याचा आदेश देताच कुत्बशहाने त्याला मुक्त तर केलेच पण त्याला नजराणा देऊन रवाना केले. याशिवाय जडाऊ हार, मोतियाची

१. MA-JS, p 146
२. Ibid
३. F. R : V. Raghava to Ft. St. G. 6-9-1682

आरसी, दोन हत्ती त्याने बादशहाकडे पाठविले. इतकेच नव्हे तर त्याने ६० लाख रुपये देऊन मुघलांची मैत्री संपादण्याचा प्रयत्न केला.[१]

औरंगजेबाने मराठी मुलखातील हालचाली कमी करून विजापूर घेण्याच्या इराद्याने जेव्हा स्वारी केली, त्यावेळी आदिलशाही सुलतानाने जंजिऱ्याचा सिद्दी, कुडाळचा देसाई, सावंतवाडीचा देसाई यांना पत्रे धाडली. त्यात मुघलांबरोबर मैत्री ठेवू नये, मार्गाच्या रहदारीचा बंदोबस्त राखावा वगैरे गोष्टी त्याने लिहिल्या होत्या.[२]

१६८४–८५ च्या सुमारास शिकंदर आदिलशहाने कुडाळच्या खेम सावंतास लिहिले, " ...... तुम्ही आपले वडिलार्जित बादशहाचे चाकरीवर आला आहा व पुढाही कराल सबब मेहरबानी तुम्हावर होणार. तुम्ही सर्व प्रकारे खातरजमा ठेवून कोणते तऱ्हेने राजा संभाजीशी ममता राखून मोंगल याजबरोबर मैत्री न ठेवावी. बादशाही मुलूख खराबी झाला त्याची मेहनत बहुत चांगली करावी. तुमचे वाडवडिल या सरकारातून इनाम पावले त्याप्रमाणे तुम्ही भोगून सर्फराजी पावाल व तुमची योग्य चाकरी हुजूरच्या समजात येईल...चाकरीवर निष्ठेने खंबीर पायी व निश्चयाने राहणे जाणिजे."[३]

वरीलप्रमाणे प्रयत्न करूनही शिकंदर आदिलशहाला सहकार्याचा प्रतिसाद मिळाला नाही. सिद्दी व देसाई यांच्याकडे मदतीसाठी केलेले प्रयत्न असफल झाले. परंतु यावेळी संभाजी राजांनी आणि गोवळकोंड्याच्या सुलतानाने मदतीचा हात पुढे केला.

१६८४ च्या सुरुवातीस संभाजी राजांचे जानोजी, जाजूजी व इतर तीन सरदार १८००० घोडदळासह विजापूरच्या बाजूस घुसले. हे कळताच रूहुल्लाखानाने अक्कलकोटपासून अलीकडे दहा कोसांवर असलेल्या अफझलपूर गावाहून स्वारी केली. इंडी गावाजवळ सामना झाला. याच वेळी विजापूरकरांचीही ३००० स्वारांची फौज मदतीसाठी गेली. मराठ्यांच्या तुकडीतील १००० माणसे ठार झाली व काही जखमी झाली. या चकमकीत मुघल विजयी झाले.[४]

औरंगजेबाने विजापूरला दिलेल्या वेढ्याची विस्तृत माहिती येथे दिलेली नाही. ती देण्याचे येथे कारण नाही. केवळ संभाजी राजांनी दिलेल्या मदतीचाच भाग येथे घेतलेला आहे. विजापूरकर व मुघल यांचा झगडा चालू असताना

१. F. R. : V. Raghava to Ft. St. G, 17–5–1682, 6–9–1682

२. MI–JS, p 140–143, Lucas Conjeevaram to Mad, 19–7–1683, 30–7–83

३. सासंइ, ले. १४–१५

४. अख : १२–१–१६८४

संभाजी राजे आदिलशाहीच्या सुलतानाला मदत करीत होते. कारवारकर इंग्रज १५-६-१६८४ रोजी या हालचालीसंबंधी सुरतकरांना कळवितात, "मुघली सैन्याच्या एका मोठ्या तुकडीने विजापूर भोवती किल्ल्यास वेढा दिला आहे...मुघल आदिलशहाला आपल्या सैन्यानिशी संभाजी राजांवर लढाई करण्यास भाग पाडील किंवा त्याचा सर्व मुलूख काबीज करील. बिचारा आदिलशहा मात्र पेचात सापडला आहे...संभाजीराजे त्याला पैशाची व माणसाची फुकट मदत करीत आहेत."[१]

आदिलशाहीवर चाललेल्या चढाईचा प्रतिकार करण्यासाठी दक्षिणेतील तीन सत्ताधीश एकत्र झाले होते. १६७० मध्ये शिवाजी महाराजांनी घडवून आणलेल्या मनसुब्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्याची वेळ येऊन ठेपली होती. मुघलांच्या फौजा विजापूरच्या भोवती वेढा देऊन बसताच, तेथील सुलतानाला संभाजी राजांनी व कुत्बशहाने मदत पाठविली. संभाजीराजे, आदिलशहा आणि कुत्बशहा यांचा एक गट निर्माण होऊन, हे त्रिकूट मुघलांशी सामना देण्याची तयारी करीत होते. कारवारकरांना वाटत होते की एका वर्षात या झगड्याचा निकाल लागून तिघांचा गट या प्रांताचा मालक होईल.[२]

संभाजीराजे व आदिलशाही सुलतान यांच्यात एकमेकांना मदत करण्यासंबंधी वाटाघाटी चालू होत्या. दि. २२-२-१६८५ रोजी संभाजी राजांचा दिवाण मेलगिरी पंडित रायरीहून निघोन जोगी मठानजिक उतरला. दि. २५-२-८५ रोजी सिकंदर पादशहा जोहरापूरचे बुर्जावर येऊन बसला. संभाजीकडील सरदार लोकांनी पादशहास मुजरा केला. संभाजीचा वकील मेलगिरी पंडित दिवाण याजला पादशहाने मोआतेमदराव असा किताब दिला.[३]

या त्रिकुटाच्या कारस्थानाची कल्पना कुत्बशहा सुलतानाने शिकंदर आदिलशहाला लिहिलेल्या पत्रावरून सहज करता येते. जे धोरण शिवाजीमहाराजांनी मालोजी घोरपडे याला लिहिलेल्या पत्रात होते, तेच धोरण अबुल हसनने अंगीकारलेले होते. अबुल हसन आदिलशहाला लिहितो, 'अलमगीर पादशहा दौलताबादेस आल्यानंतर त्याने आमच्याकडे एक हेजीब पाठविला. आम्ही छत्रपती संभाजीवर डोळा ठेवून आलो आहोत तरी आपण आपला फौजफाटा आमच्या मदतीस द्यावा. असा त्याने निरोप दिला. त्यावर आम्ही उत्तर पाठविले की, दक्षिणेची पादशाही व आमची पादशाही निराळी नाही तेव्हा मुघल आपलेवर चालून आला असला तरीसुद्धा भिण्याचे कारण नाही. आम्ही पैसे पुरवू. आपण

१. F. R : Car to Sur, 7-5-1684

२. F. R : Car to Sur 15-9-1684

३. विआपा. ( बु.-स. ), पृष्ठ ५२९

सर्जाखानास दिलदिलासा देऊन सर सुभा त्याला देऊन, मुघलावर रवाना करावा. महाराज संभाजी राजांकडे एक पत्र हेजीबाबरोबर देऊन मुघलांचा फन्ना उडविण्यासाठी घोडदळाची मदत मागावी. आम्ही खासे कंवर बांधून गुलबर्ग्यास जात आहोत. तुम्हीही कंबर बांधून तयार राहा. संभाजी राजे सज्ज होऊन आले म्हणजे तिघे मिळोन मुघलांवर तुटून पडू. यात तुमच्या राज्यास धक्का लागणार नाही. माधवराव हेजीब तुमच्याकडे पाठविला आहे. ते तुम्हास सर्व सांगतील. आपल्यासाठी एक दोन मेवा (?), एक दोन घोंडे, चार हत्ती, सहा सारंगी घोडे पाठविले आहेत...संभाजी राजांकडे चार हिशे करड्या घोड्यांची संचणी केली आहे. कर्नाटकाच्या राजांनाही बोलावले व त्यांनी त्या बाजूने काही जोर केला तर बरे होईल. संभाजी राजांनी आम्हाकडे रामचंद्रपंत हेजीब पाठविला आहे. त्याने अनेक गुप्त गोष्टी सांगितल्या; त्या सर्व गोष्टी ऐकून आम्ही त्यास तुमच्याकडे पाठविला आहे. ते ज्या गोष्टी सांगतील त्यावरून तुम्ही खूष व्हाल."[१]

वर दिलेल्या पत्राप्रमाणे संभाजीराजांनी विजापूरकरांना मदत पाठविली. १६८५ च्या मार्च महिन्याच्या सुरुवातीस मराठ्यांची फौज आणि आदिलशाही सैन्य विजापूरपासून १५ कोसांवर एकत्र झाले. मोठ्या हुशारीने ते मुघली सैन्यावर हल्ला करण्याच्या विचारात होते. हे कळताच अज्जम शहाने रातोरात हल्ला केला. दोन्हीकडील सैनिक मरण पावले.[२]

जून-जुलै १६८५ मध्ये संभाजीराजांनी आदिलशहाला मदत करण्यासाठी कवी कलशास पाठविले. त्याने पन्हाळ्याला जाऊन तेथून फौजा रवाना केल्या.[३]

कलशाने धाडलेली फौज ऑगस्ट १६८५ च्या अखेरीस विजापूरला पोहोचली. सप्टेंबर महिन्याच्या सुरुवातीस आदिलशाही सरदार शिरजा-गिरजा (सर्जाखान), हैद्राबादचे आणि संभाजीचे सैन्य मिळून पन्नास हजार फौज एकत्र जमली होती. गाजीउद्दीनखानाने दि. ४-९-१६८५ रोंजी उपनैदिर (?) येथे मुक्काम केला होता. तेथून तो शत्रूशी मुकाबला करण्यासाठी रवाना झाला; फार मोठी लढाई झाली. दक्षिणी पक्षाचे २००० सैनिक मेले, बरेच जखमी झाले. नाल्यातून पळता पळता काही पडले. पुढे जाऊन त्यांनी छावणी केली. दि. ५-९-१६८५ रोजी गाजीउद्दीखान तेथे पोहोचला. पुन्हा चकमकी उडाल्या. सर्जाखान जखमी झाला. गाजीउद्दीन खानाला सर्व सैनिकांना नष्ट करण्याची हिंमत होती. त्याने जमालुद्दीन हैद्राबादी आणि ३०० सरदारांना जिवंत पकडले. त्यापैकी २७० तलवारीने व हत्तीच्या पायी देऊन मारले.

१. शिचसा, खंड २, ले. ३९४

२. अख : १२-३-१६८५

३. शिचप्र; पृष्ठ ३३

बाकीच्यांना रसूलपूर येथे पाठविण्यात आले. गाजीउद्दीनखानाला २०० बंदुका, १५० भाले, ढाल–तलवारी, एक नगारा, सरदारांची ४ निशाणे मिळाली. या लढाईत मुघल विजयी झाले.[१]

१६८५ च्या नोव्हेंबर महिन्याच्या अखेरीस नागोजी बल्लाळ ७०००ची फौज घेऊन विजापूरकरांच्या मदतीसाठी निघाला होता. हे कळताच गाजीउद्दीनखान त्याचा पाठलाग करण्यासाठी कृष्णा नदीच्या बाजूस गेला. दोघांच्यात लढाई झाली. झालेल्या लढाईत बरेच मराठे मृत्युमुखी पडले. नागोजी बल्लाळ माघारी फिरला.[२]

डिसेंबर महिन्यात हंबीरराव सैन्यासह विजापुरास पोहोचला.[३]

आदिलशाहीवर सुरू असलेले आक्रमण हे एकट्या आदिलशाहीवरील संकट नसून हे संकट सर्व दक्षिणीयांवर आहे असे समजून गोवळकोंड्याचा सुलतान व संभाजी वागत होते. दोघेही आदिलशाही सुलतानास मदत करीत होते. आदिलशाहीचा प्रतिकार वाढविणे, त्यांचा विनाश लांबणीवर टाकणे हे कुत्बशहाला आणि संभाजीराजांना फायद्याचे होते. आदिलशाही राज्य मुघलांच्या हाती पडू नये म्हणून मराठे शेवटपर्यंत प्रयत्न करीत होते. शिवाजीमहाराज नेहमी मुघलांची स्वारी विजापूरवर आली तर विजापूरची जागा आपलीच समजून त्यांच्या मदतीला धावून जात. तेच धोरण मराठ्यांनी संभाजी राजांच्या काळात चालू ठेवले होते. दि. १५ मार्च ते १२ एप्रिल १६८६ मध्ये मुघलांनी मिरज घेतली.[४] यानंतर बक्षी रोहिला खान (रुहुल्लाखान) व रणमस्तखान आणि हंबीरराव मोहिते यांच्यात कोल्हापूर व पन्हाळ्याच्या दरम्यान चांगलीच लढाई झाली. हंबीररावाने त्यांना पन्हाळा, कोल्हापुराहून हटविले तेव्हा मुघली सैन्य बेळगावच्या बाजूला गेले. मिरजेचा किल्लेदार असदखान याने उतावीळ होऊन मिरज मुघलांना दिल्यामुळे त्यांना तेथे राहावयास जागा मिळाली. अशाच तऱ्हेने बेळगावचा कोटही मुघलांच्या ताब्यात जाणार होता. मुघलांना न जुमानता हंबीरराव मुघलांचा पाठलाग करीतच होता. विजापूर झाले तरी पहिल्यापासून आमचेच आहे असे समजून त्याने बेळगावचा किल्लेदार खानेअजम मुरादखान यास "मुघलांना आसरा देऊ नका. तुम्ही आम्ही मिळोन गनिमाला सजा देऊ" असे पत्र पाठविले. त्या मुलखातील गोपाळराव हा आदिलशाही सरदार मराठ्यांना सामील झाला होता. त्याचे व हुकेरीच्या देसायाचे संबंध चांगले असल्याने हंबीररावने हुकेरीच्या

१. अख : १५–१०–१६८५

२. अख : ३–१२–१६८५

३. विआपा. (बु.–स.), पृष्ठ ६०२

४. शिचप्र, पृष्ठ ३३

देसायाला पत्र लिहून त्यास बजावले की वाटेने शत्रू जात आहे तरी त्याला थारा देऊ नका. आम्ही लष्करानिसी त्या प्रातांत असता तुम्हाला कोणत्याच बाबतीत भिण्याचे कारण नाही. रूपाजी भोसले व संताजी जगताप यांनाही त्यावेळी तेथे बोलविण्यात आले आणि सर्वांनी मिळोन मुघलांना गर्देस मेळविण्याची केलेली खटपट हंबीररावने लिहिलेल्या पत्रात स्पष्ट होते. या पत्राचा उपयोग होऊन १६८६ मध्ये तरी बेळगावचा कोट मुघलांच्या ताब्यात गेला नाही. तो पुढे १६८८ मध्ये त्यांनी घेतला. हंबीरराव शिवाजी महाराजांच्या वेळेपासून सरनोबत होता. त्याला महाराजांचे धोरण माहीत होते. म्हणून तो या पत्रात स्पष्ट म्हणतो, "गनिमाचा हिसाब धरीत नाही एक विजापूर जाले तरी काय जाले. विजापूर हा जागा पहिले पासोन आमचाच आहे. त्याची मदत हर बावेने आम्हास करणे लागते." मिरज व बेळगाव हे आदिलशाहीच्या ताब्यात होते. मिरज मुघलांच्या हाती पडल्यानंतर बेळगाव त्यांच्या हातात जाऊ नये म्हणून हंबीररावाने जोराचा प्रयत्न केला होता.[1]

मराठ्यांच्या प्रमाणे कुत्बशाही सरदारही विजापूरकरांना मदत करीत होते. कुत्बशाही सुलतान पूर्वीचे संबंध लक्षात घेऊन मुघलांविरुद्ध शस्त्र उचलण्यास शक्य तो टाळीत होता. परंतु मुघलांनी सुलतान अनाथ व दुर्बळ आहे असे पाहून विजापूरला जेव्हा वेढा दिला तेव्हा तो पेचात सापडला. त्यावेळी विजापूरकरांच्या सैन्यास एका बाजूने संभाजीराजांनी आपल्या अगणित लोकांनिशी मदत केली व गोवळकोंड्याच्या सुलतानाने खलिलुल्लाहखानाच्या सेनापतित्वाखाली चाळीस हजार घोडेस्वार दुसऱ्या बाजूने मुघलांना तोंड देण्यास पाठविले होते. मुघली दरबारातील आपल्या हेजीबास सूचना पाठविण्यासाठी लिहिलेल्या पत्रात वरील तपशील गोवळकोंड्याच्या सुलतानाने लिहिला आहे. नेमके हेच पत्र औरंगजेबाच्या हाती पडले.[2]

औरंगजेबाला काही करून त्रिवर्ग संघांच्या हालचालींचा बंदोबस्त करणे भाग होते. वाटेल त्या मार्गाने त्याने त्रिवर्ग संघ मोडण्याचा प्रयत्न केला. त्याने गोवळकोंड्याच्या सुलतानास आक्रमणाची धमकी देऊन काही अटी मान्य करावयास लावल्या. त्यात खालील अटी महत्त्वाच्या होत्या :

(१) कुत्बशहाने ताबडतोब मादण्णा व आकण्णा यांना दूर करावे.

(२) राहिलेली खंडणी व पेशकश देऊन सैरम व कोहीर हे प्रांत परत मुघलांस द्यावे. याशिवाय सर्वात उत्तम असा जो हिरा कुत्बशाहाजवळ आहे तो त्याने मुघलांस द्यावा. सुलतानाला सर्व अटी मान्य करणे अशक्य होते.

१. शिचसा, खंड १२, ले. ७

२. M A–JS. p 159

त्याने वीस लाख रुपये किंमतीचा हिरा मुघलांस देऊन औरंगजेबाशी मिळते घेण्याचा प्रयत्न केला. कुत्बशहाने औरंगजेबाबरोबर चांगले संबंध ठेवण्याचा प्रयत्न केला, तरी शेवटी औरंगजेबाने कुत्बशाही राज्यावर आक्रमण करण्याचा निर्णय घेतला. त्रिकूट संघ मोडण्याचा तेवढाच मार्ग उरला होता. चढाईचे दुसरे कारण म्हणजे मादण्णा व आकण्णा या हिंदू अधिकाऱ्यांना दूर करण्यास कुत्बशाही सुलतान तयार नव्हता. याचे प्रमुख कारण म्हणजे त्या दोघांचा त्या राज्यातील शासन यंत्रणेवर चांगलाच ताबा होता. त्यांच्या सेवेची सुलतानाला अत्यंत आवश्यकता होती. सुलतानाने हा प्रयत्न केला तरी अखेरीस मादण्णा व आकण्णा यांचा विश्वासघाताने खून झालाच.

औरंगजेब व आदिलशाही सुलतान यांच्यातील युद्ध जिंकून औरंगजेबाने दि. १२–९–१६८६ ला आदिलशाहीच संपुष्टात आणली. त्यानंतर त्याने आपले सर्व लक्ष गोवळकोंड्यावर केंद्रित करून त्याप्रमाणे गोवळकोंडा किल्ल्यास वेढा दिला. सुलतानाने क्षमायाचना केली व औरंगजेबाला या कार्यातून परावृत्त करण्याचा यत्न केला. औरंगजेबास कुत्बशहाने संभाजीशी केलेली मैत्री व त्याने दिलेले आर्थिक सहाय्य ठाऊक असल्याने त्याने कुत्बशहाची विनंती धुडकावून लावली. येथे औरंगजेब नि आदिलशहा आणि औरंगजेब नि कुत्बशहा यांच्यातील युद्धाची हकीगत पाहण्याचे कारण नाही. औरंगजेब जेव्हा गुलबर्ग्याहून गोवळकोंड्याकडे निघाला तेव्हा अबुल हसनने क्षमेची याचना केली, संभाजीस एक लाख पागाडे दिल्याच्या आरोपावरून ती झिडकारण्यात आली. औरंगजेबाने सुलतानाविरुद्ध तीन तक्रारी केल्या—( १ ) त्याने नास्तिक व कमनशिबी संभाला मदत करण्याची शक्य तेवढी कोशीस केली त्यामुळे तो ईश्वराच्या व माझ्या लोकांच्या असंतोषास कारण झाला आहे. ( २ ) आम्ही फर्माने काढून व चांगले लोक पाठवून सल्ला दिला तरी त्याने तो धुडकावून लावला. ( ३ ) अगदी थोड्याच दिवसांपूर्वी संभास एक लाख होनांची नवी मदत पाठविली.

गोवळकोंडा किल्ल्याला वेढा दिल्यानंतर काही काळ अवर्षणामुळे आणि मुघल सैन्यात प्लेगची साथ पसरल्यामुळे असंख्य लोक मेले. त्यातच भर म्हणजे संभाजीचे जे सैन्य सुलतानाच्या मदतीला जात होते त्याने मुघल सैन्याला बाहेरून येणारी रसद लुटण्याचा सपाटा चालविला होता. अखेरीस फितुरी करून औरंगजेबाने २२ सप्टेंबर १६८७ ला गोवळकोंड्याचा किल्ला जिंकून कुत्बशाही राज्याचा शेवट केला.

आदिलशाही व कुत्बशाही बुडाल्यानंतर दक्षिणेत मुघल व मराठे असे दोनच प्रतिस्पर्धी उरले. या दोन शाह्या बुडाल्यानंतर औरंगजेबाने आपली सर्व शक्ती पुन्हा मराठी राज्यावर केंद्रित केली.

१६७७ मध्ये शिवाजी महाराजांनी मालोजी घोरपडेला पत्र लिहून आदिलशाही राज्यात पठाणांचे वर्चस्व वाढू देऊ नये आणि दक्षिण दक्षिणी पक्षाच्या हातात ठेवावी असा प्रयत्न केला होता. दक्षिणेतील सर्व राजांनी एकत्र येऊन मुघलांचा बंदोबस्त करावा अशी त्यासाठी त्यांनी योजना आखली होती. या योजनेची अंमलबजावणी करण्याची वेळ संभाजी राजांवर येऊन ठेपताच, त्याप्रमाणे त्यांनी पावले टाकली. संभाजी राजे व दोन्ही शाह्यांचे सुलतान एकत्र झाले आणि त्यांनी मुघलांना टक्कर देण्याचा जास्तीत जास्त प्रयत्न केला. परंतु ही एकजूट फार काळ टिकू शकली नाही. औरंगजेबाने त्या शाह्यांतील आणि या राज्यांच्या व मराठी राज्याच्या सरहद्दीवरील देसायांना प्रलोभने दाखवून आपल्या पक्षात ओढून घेतले. आदिलशाही व कुत्बशाही ही दोन्ही राज्ये शिवाजी महाराजांच्या वेळेपासूनच मोडकळीस येत चालली होती. त्यांची मुघलांबरोबर टिकाव धरण्याची ताकद नव्हती. संभाजी राजांनी आपल्या शक्तिनुसार, स्वतःच्या राज्याचे संरक्षण करीत असताना आदिलशाहीला मदत दिली हेच कौतुकास्पद होते. त्रिकूटांचा संघ स्थापन करून संभाजी राजांनी आदिलशहाला मदत दिली नसती तर ते राज्य व गोवळकोंड्याचे राज्य औरंगजेबाने ताबडतोब गिळंकृत केले असते, नि मराठी राज्यावर अधिकच लवकर संकट ओढविले असते. १६८६ पर्यंत ही दोन्ही राज्ये टिकून होती म्हणून काही काळ तरी मराठी राज्यावरील औरंगजेबाचे आक्रमण लांबणीवर पडले. संभाजी राजांनी कुत्बशहा व आदिलशहा यांना मदत केली; परंतु स्वतःवरील संकटाच्या वेळी मात्र त्यांना कोणाचेही सहाय्य मिळाले नाही. १६८१ ते १६८८ पर्यंत सर्व आघाड्यांवर त्यांना एकाकीच लढा द्यावा लागला.

* * *

## ९. मराठा–मुघल संघर्ष : भाग १ ला

संभाजीची उभी कारकीर्द औरंगजेबाच्या विरुद्ध झालेल्या युद्धाने व्यापलेली आहे. मराठ्यांचे स्वातंत्र्ययुद्ध शिवाजीमहाराजांनी संभाजी राजे जन्मले त्या वर्षी म्हणजे १६५७ मध्ये प्रथम जुन्नरवर छापा घालून सुरू केले. हे सुरू केलेले युद्ध १७०७ मध्ये औरंगजेब मेल्यानंतर थांबले. मराठ्यांच्या स्वातंत्र्ययुद्धाचे तीन भाग पडतात. पहिला लढा शिवाजीमहाराजांच्या कारकीर्दीतला असून, त्याचा काळ १६५७ ते १६८०. या काळात औरंगजेब स्वतः दक्षिणेत युद्धासाठी आला नव्हता. शिवाजीमहाराजांच्या विरुद्ध लढण्यासाठी त्याने शाएस्तेखान, मिर्झा राजा जयसिंग, शहाजादा मुअज्जम, महाबतखान, बहाद्दूरखान, दिलेरखान, या मातबर सरदारांना पाठवून स्वराज्याच्या स्थापनेस वारंवार अडथळे निर्माण केले होते. १६७४ मध्ये शिवाजीमहाराजांनी स्वतःला राज्याभिषेक करून स्वतंत्र मराठी राज्याची स्थापना केली. या गोष्टीची बादशहाला चीड येऊन त्याने १६७६ मध्ये बहाद्दुरखानास शिवाजीशी युद्ध करण्यासाठी हुकूम दिला. हे युद्ध फार काळ न टिकता शिवाजीमहाराजांच्या निधनामुळे तात्पुरते थांबले.

मराठ्यांच्या स्वातंत्र्ययुद्धाचा दुसरा भाग संभाजीराजे यांच्या कारकीर्दीत सुरू झाला. या युद्धातील संभाजीची कारकीर्द महत्त्वाची मानावी लागेल. शिवाजी महाराजांच्या मृत्यूने मराठी राज्य नष्ट करण्याचा आपला हेतू तडीस जाईल अशी औरंगजेबास आशा वाटू लागली. त्यातच संभाजीराजे यांनी औरंगजेबाचा चवथा मुलगा शहाजादा अकबर याला आश्रय दिल्यामुळे मराठ्यांविषयी बादशहाचा द्वेष वाढला. औरंगजेबाला काबूलपासून कन्याकुमारीपर्यंत सर्व हिंदुस्थान, आपल्या एकछत्री अमलाखाली आणावयाचा होता. या इच्छेविरुद्ध जे जे येतील ते सर्व औरंगजेबाचे शत्रू बनले. त्याच्या या इच्छेविरुद्ध संभाजी व अकबर यांची युती आड येऊ लागली. शहाजादा अकबर याला संभाजीराजांनी आश्रय दिला हे पाहून औरंगजेबाला आपल्यावर फार मोठे संकट आले आहे याची जाणीव झाली. कारण राज्यपद मिळविण्यासाठी आपल्या लहान वयात जी नीती औरंगजेबाने अवलंबिली होती तिचेच अनुकरण अकबर करीत होता. अकबर मराठ्यांना मिळाल्याचे निमित्त करून औरंगजेबाने दक्षिण जिंकण्याचे, फार दिवस लांबणीवर पडलेले काम, आपण स्वतःच तडीस नेण्याचे ठरविले. संभाजीराजे यांनी अकबराला

आश्रय देऊन औरंगजेबाचे आव्हान स्वीकारल्याने संभाजी व अकबर यांचा मोड करण्यासाठी औरंगजेब आपली सर्व शक्ती केंद्रित करून दक्षिणेत उतरला. यामुळे मराठा–मुघल संघर्षाचे स्वरूप पार बदलले.

दक्षिणेस निघण्यापूर्वी औरंगजेबाने उत्तरेत रजपुतांविरुद्ध सुरू असलेले युद्ध थांबविले. त्यांच्याशी तह करून दिनांक ५-९-१६८१ रोजी तो अजमेरहून निघाला. दि. १३-११-१६८१ रोजी तो बऱ्हाणपुरला पोचला. स्वतः निघण्यापूर्वी त्याने दि. ३१-७-१६८१ रोजी आपला मुलगा शहाजादा आज्जम याची दक्षिणेच्या स्वारीवर जाण्यासाठी नेमणूक केली होती. औरंगजेबाबरोबर त्याचे मुलगे शहाजादा मुअज्जम ( शहाअलम ), शहाजादा कामबक्ष; शहाजादा मुइझुद्दीन व शहाजादा बेदारबख्त हे नातू, याशिवाय असदखान, जुल्फिकारखान, शहाबुद्दीन ऊर्फ गाजीउद्दीन फीरोजजंग, महमंद अमीन, बख्शी रुहुल्लाखान, हसनअलीखा, रणमस्तखान पन्नी, दाऊदखान, बहाद्दूरखान, मातबरखान, मोहमंद मुरादखान, तरबियतखान, राव दलपत बुंदेला, लुत्फुल्लाखान, इ. अनेक सरदार त्याच्याबरोबर होते. त्याचे सैन्यबळही मराठ्यांच्या मानाने अफाट होते. त्याच्या सैन्यात जवळ-जवळ ३ ते ४ लाख घोडदळ व चार लाख पायदळ असावे.

या प्रकरणातील सर्व लढायांचा तपशील मुख्यतः फारसी अखबार आणि श्री. सेतुमाधवराव पगडी यांनी मातबरखानाच्या प्रसिद्ध केलेल्या अप्रकाशित पत्रांवरून, फारसी व इतर साहित्यावरून घेतलेला आहे. मराठी कागदपत्रांत यासंबंधी अतिशय त्रोटक माहिती मिळत असल्याने आजपर्यंत या लढाया इतिहासाला अज्ञातच होत्या. अर्थात ही माहिती केवळ शत्रुपक्षाकडील आहे हे ध्यानात ठेवले पाहिजे. हे फारसी अखबार म्हणजे औरंगजेबाच्या सरदारांनी पाठविलेली बातमीपत्रे आहेत. सरदारांचा पराभव झाला किंवा त्यांच्या हातून काही चुका झाल्या तर आलमगीर बादशहा त्यांच्या मन्सबी कमी करून त्यांना पदावनत करीत असे. त्यामुळे औरंगजेबाला या बातम्या पाठविताना ते आपले पराभव आणि चुका शक्य तितक्या दडवून आणि जयाच्या हकीकती फुगवून कळविण्याचा प्रयत्न करीत असत. अशा परिस्थितीत शत्रुपक्षाकडील एकांगी माहितीवर संपूर्णपणे विश्वास ठेवता येत नाही. या लढायांची आज तरी इतरत्र माहिती उपलब्ध नसल्यामुळे फारसी कागदपत्रांची उपयुक्तता मोठी आहे. या साधनांवरून मराठ्यांशी सतत कराव्या लागलेल्या युद्धामुळे प्रबळ मुघलही सैनिकी आणि आर्थिक दृष्टींनी कसे जेरीस आलेले होते हे स्पष्ट दिसते.

**राज्यविस्तार :**

संभाजी आणि औरंगजेब यांच्यातील संघर्षाचे स्वरूप कळण्यासाठी प्रथम मुघल, गोवळकोंडेकर, विजापूरकर आणि मराठे यांच्या राज्याचा विस्तार किती

होता हे पाहणे आवश्यक आहे. मुघल साम्राज्य जवळ जवळ सर्व हिंदुस्थानभर पसरले होते. दक्षिणेत मुघलांचा राज्यविस्तार नर्मदेच्या दक्षिणेकडील प्रदेशापासून भीमा व मांजरा नदीपर्यंत म्हणजे धरणगाव, अजंठा, दौलताबाद, संगमनेर, जुन्नर चांभारगोंदे, परिंडा, कल्याणी पर्यंत होता.

विजापूरकरांचे राज्य उत्तरेत पंढरपूर-कल्याणीपर्यंत; पश्चिमेकडे मिरज, बेळगाव, बंकापूर; दक्षिणेत बेदनूर–बेल्लारी; पूर्वेकडे यादगीर व कृष्णा व पेन्नर नदीच्या मधील प्रदेशात पसरलेले होते.

गोवळकोंडेकरांकडे उत्तरेत गोदावरी नदीच्या दक्षिणेकडील प्रदेश, पश्चिमेकडे बेदनूरपासून यादगीरपर्यंत, दक्षिणेत कृष्णा व पेन्नर नद्यांच्या मधील प्रदेश होता.

मराठ्यांचा राज्यविस्तार लहान होता. सध्याच्या महाराष्ट्राच्या एकपंचमांश भागापेक्षा तो जास्त नव्हता. शिवाजीमहाराजांचे राज्य नाशिक जिल्ह्यातील बागलाण म्हणजे मुल्हेर, साल्हेर, कण्हेरगड, दिंडोरी ते नाशिकपर्यंत होते. जंजिऱ्याचा मुलूख व मुंबई सोडून कुलाबा, पुणे ( जुन्नर सोडून ), सातारा, कोल्हापूर, सांगली ( जत सोडून ), रत्नागिरी, ठाणे ( पोर्तुगीज प्रदेश वगळून ) हे जिल्हे स्वराज्यात होते. दक्षिणेत कारवार, अंकोला, बदामी, लक्ष्मेश्वर, कोपळ, बालापूर, कोलार, बेंगळूर आणि तामिळनाडमधील जिंजीलगतचा प्रदेश, असा सुमारे दहा हजार चौरस मैलांचा भाग मराठ्यांच्या ताब्यात होता.

औरंगजेब दक्षिणेत उतरताच त्याने मराठी राज्यावर आक्रमण सुरू केले. या आक्रमक हालचालींच्या आणि मराठ्यांच्या चढाईच्या हालचालींच्या हकीकती कळण्यासाठी खालीलप्रमाणे विभागणी केलेली आहे :

( १ ) पश्चिम महाराष्ट्राच्या उत्तरेतील हालचाली.
( २ ) पश्चिम महाराष्ट्राच्या मध्यभागातील हालचाली.
( ३ ) पश्चिम महाराष्ट्राच्या दक्षिणभागातील हालचाली.

**( १ ) पश्चिम महाराष्ट्राच्या उत्तरेकडील आक्रमण :**

दक्षिणेत येण्यापूर्वी औरंगजेब रजपुतांचे बंड मोडण्यात गुंतला होता तेव्हा त्याने दक्षिणेतील हालचालींवर लक्ष देण्यासाठी दि. १-३-१६८० रोजी खानजहान बहाद्दूर कोकलताश याला दक्षिणेचा सुभेदार नेमले. दि. ९ जूनला खानजहान बहाद्दूर औरंगाबादला पोचला. लगेच त्याने मराठ्यांच्या ताब्यात असलेल्या हनुवंतगडास ( अहिवंत गड ) वेढा घातला. मराठ्यांनी या वेढ्याला यशस्वीपणे तोंड दिल्यामुळे मुघलांना हा वेढा उठविणे भाग पडले. दि. ७ जुलै

१६८० रोजी रणमस्तखान आपल्या ४०० सैनिकांच्या तुकडीसह हनुवंतगड येथे पोचला त्यावेळी खानजहान बहाद्दुर धूपगडास गेला ( ऑगस्ट १६८० ).[१]

१६८० च्या ऑगस्ट महिन्यात पावसाळ्यानंतर मुघलांशी उघड उघड सामना देऊ असे संभाजीराजांनी खानजहान बहाद्दुर यास कळविले होते.[२]

औरंगजेब दक्षिणेत उतरताच त्याने नाशिक जिल्ह्यातील गडांना वेढा देण्यास सुरुवात केली.

**साल्हेर :** साल्हेरचा किल्ला नाशिक जिल्ह्यात, बागलाण तालुक्यात, सटाणाच्या वायव्येस ८ मैलांवर आहे. खानदेशातून आणलेली लूट मराठे या किल्ल्यावर ठेवीत असत. साल्हेर गडाच्या जवळच मुल्हेरगड आहे. हा किल्ला मुघलांच्या ताब्यात होता. १६८१ च्या सप्टेंबर महिन्यात मुल्हेरच्या किल्लेदाराला हुकूम देण्यात आला होता की त्याने मुल्हेरची व्यवस्था करून मराठ्यांचा बंदोबस्त करण्यासाठी तयार राहावे. या हुकुमाची अंमलबजावणी तेथील किल्लेदार राजा देवीसिंह याने केली होती.[३] १६८१ च्या नोव्हेंबर महिन्याच्या अखेरीस शहाबुद्दीनखान[४] मुल्हेरला पोचला. साल्हेरच्या परिसरात असलेल्या काल्या किंवा काळ्या येथे मराठे सज्ज होते. हे कळताच मराठ्यांना तेथून हटविण्यासाठी डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यात शहाबुद्दीनखान साल्हेरच्या मुलखात शिरला. तो काल्यापासून सात कोस लांब पोचताच मराठे आणि मुघल सैन्यात चकमक उडाली. दोन्ही बाजूंची माणसे मेली; अनेक जखमी झाली. शहाबुद्दीन खानाने मराठ्यांचा दोन कोस पाठलाग केला. त्याने साल्हेरपासून १०-१५ कोसांवर छावणी घातली.[५] मराठ्यांविरुद्ध आक्रमण सुरू केल्यापासूनच औरंगजेबाने प्रत्यक्ष लढाईबरोबर फितुरीच्या मार्गाने गडकोट घेण्याचे प्रयत्न सुरू केले होते. साल्हेरच्या किल्ल्यात संभाजीच्या बाजूने परशुराम जोशीचा भाऊ लढत होता. मुघलांनी काही लोकांना प्रलोभने दाखविण्यास सुरुवात केली. रुहुल्लाखान आणि जोशी यांच्यात गडासंबंधी वाटाघाटी झाल्या असाव्या. १६८२ च्या ऑगस्ट महिन्यात जोशाने रुहुल्लाखानास कळविले होते की, जर बादशाही फौजा माझ्याबरोबर दिल्या तर साल्हेरचा किल्ला मी बादशाही अंमलात आणून देईन.[६] ही गोष्ट कळताच

१. शिचप्र, पृष्ठ ३०; ERS : No. 514, p 315

२. ERS : No. 514, p 315

३. अख : २४--९--१६८१

४. यालाच पुढे गाजीउद्दीनखान ही पदवी मिळाली. याचाच मुलगा पुढे निजामउल्मुल्क म्हणून प्रसिद्धीस आला.

५. अख : ५--१२--१६८१

६. अख : २९--८--१६८२

त्याला हुजुरास पाठविण्याचा हुकूम आला होता. परंतु प्रत्यक्षात या जोशाकडून मुघलांच्या हवाली गड गेला नव्हता. मार्च १६८३ पर्यंत तरी साल्हेर गड मुघलांच्या हाती पडलेला नव्हता. किल्ले दहकमा (?) येथील जमीनदार लोकांच्या साहाय्याने तो किल्ला पारसचा ठाणेदार मुहम्मद वदी वलखी मुघलांच्या अंमलाखाली आणणार होता. त्याने तेथे ठाणेही कायम केले होते. त्या जमीनदारांना दिलासा देऊन त्यांना २०० रुपये रोजही कबूल केलेला होता. या लोकांचे बादशहापाशी उर्जित झाले असते तर साल्हेरचा किल्ला मुघलांच्या तेव्हाच ताब्यात आला असता.[1] या संबंधाची हकीकत खाफीखान आणि ईश्वरदास नागर हे देतात. ईश्वरदास नागर म्हणतो, " साल्हेरचा किल्ला बागलाणात प्रसिद्ध आहे. पूर्वी खानजहान बहाद्दूर, दिलेरखान, इखलासखान, राजा जयसिंग, कुतुबुद्दीन रव्वेशगी आणि मुघल सरदारांनी हा किल्ला प्रचंड सैन्यानिशी जिंकून घेण्याचे प्रयत्न केले होते. पण तो फत्ते झाला नाही आणि मुघल सरदारांना वेढा उठवून परत जावे लागले. मुल्हेरचा किल्लेदार नेकनामखान हा मोठा शहाणा आणि दूरदृष्टीचा मनुष्य होता. खटपट करून साल्हेरचा किल्ला ताब्यात येण्यासारखा आहे असे त्याला वाटले. त्याने काही शहाणी माणसे साल्हेरचे गडकरी असोजी कृष्णाजी ( हाच परशुराम जोशीचा भाऊ असावा ) यांजकडे पाठविली. नेकनामखानाने कृष्णाजीला गोडगोड बोलून आणि सोने, नाणे, घोडे इत्यादि वस्तू भेटीदाखल देऊन त्याचे मन आपल्याकडे ओढून घेतले. त्याने कृष्णाजीला सागितले की ' किल्ला मुघलांच्या हवाली करावा म्हणजे बादशहाकडून मोठी मन्सब मिळून मानसन्मान वाढेल. ' अनेक मराठे बादशहाच्या पदरी लागून मोठमोठ्या जागेवर नेमले गेले होते हे कृष्णाजीला दिसत होते. त्याने किल्ला मुघलांच्या हवाली केला. नेकनामखानाच्या शिफारसीवरून बादशहाने कृष्णाजीला तीन हजार जात आणि दोन हजार स्वार यांची मन्सब दिली. कृष्णाजीला त्याच प्रांतात जहागीर देण्यात आली. नेकनामखान यास पाचशे जात आणि पाचशे स्वार अशी त्याच्या मन्सबीत वाढ करण्यात आली. त्याला झेंड्याचा मान देण्यात आला. मिर्जाफर्रुकबेग हा पाचशेचा मन्सबदार होता. साल्हेरचा किल्लेदार म्हणून त्याची नेमणूक करण्यात येऊन किल्ल्याचे नाव सुलतानगड ठेवण्यात आले. "[2]

खाफीखानानेही साल्हेरगड फितुरीमुळे गेला असेच म्हटले आहे. तो म्हणतो, " शहाजादा महंमद आज्जम याला साल्हेरचा किल्ला घेण्याच्या कामावर नेमण्यात आले.[3] त्या किल्ल्याला वेढा घालणे अशक्य होते, कारण तो इतर

---

१. अख : ३१--३--१६८३

२. मोमसं--५, पृष्ठ २३-२४; MA–JS, p 183

३. ही गोष्ट १६८० मध्ये घडली.

किल्ल्यांप्रमाणे नव्हता. त्याच्या भोवती प्रचंड अशा खोल दऱ्या होत्या. तेथून समुद्रही जवळ होता. लाखो स्वार, शिपाई जरी त्या गगनचुंबी किल्ल्याभोवती जमविले तरी त्याला चहूकडून वेढा घालणे अशक्य होते. बागलाणचा फौजदार आणि मुल्हेरचा किल्लेदार नेकनामखान याने त्या प्रदेशात उत्तम व्यवस्था ठेवली होती. साल्हेर आणि मुल्हेर यामधील अंतर सहा कोसांपेक्षा अधिक नाही. साल्हेर किल्ला जिंकण्याच्या कामी झालेली शहाजादा आज्जमची नेमणूक अद्यापि जाहीर झाली नव्हती. नेकनामखानाने साल्हेरच्या मराठा किल्लेदाराला फोडला. त्याने त्याला गोड आश्वासने दिली. त्याच्याकडे भेटीदाखल वस्तू पाठविल्या आणि मानसन्मानाची प्रलोभने दाखविली. त्याने किल्लेदाराकडे भक्कम रक्कम आणि इतर जिनसा पाठविल्या. त्याच्याकरिता नेकनामखानाने चार हजारी मन्सबदारीच्या नेमणुकीचे हुकूम मागविले. महंमद आज्जम साल्हेरपाशी आला पण नेकनामखानाने अशी व्यवस्था केली होती की शहाजाद्याला वेढा घालण्याचे कामच पडले नाही. युद्धाची वेळ न येताच किल्ला मुघलांच्या हाती पडला. ही गोष्ट शहाजाद्याच्या मर्जीविरुद्ध घडली. त्याने बादशाहापाशी अनेक प्रकारे नेकनामखानाची कागाळी केली. पण युद्धाचा प्रसंग होऊ न देता किल्ला हाती आल्यामुळे बादशाहाला समाधान वाटले. त्यामुळे नेकनामखानाचे प्रशस्तिपत्रक वाटले."[१] हा किल्ला १६८६ सालच्या अखेरीस मुघलांच्या ताब्यात आला.

ईश्वरदास नागर आणि खाफीखानाच्या तपशिलात बरेच साम्य आहे. दोघांच्या मते किल्ला फितुरीमुळे मिळाला असे आहे. किल्लेदार असोजी याला औरंगजेबाकडून खिलतीची वस्त्रे, नगारे, झेंडा, घोडा हत्ती व २०,००० रुपये बक्षिसी मिळाली.[२]

१६८१ सालच्या एप्रिल-मे महिन्यापासून नाशिक जिल्ह्यात मुघलांनी आक्रमक हालचाली सुरू केल्या होत्या. या जिल्ह्यात दिंडोरी तालुक्यात, रामसेजच्या उत्तरेस दोन मैलांवर असलेल्या इंदोर गावात मराठे दक्ष आहेत असे कळताच, खानजहान बहाद्दूरने आपला मुलगा मुजफ्फरखान याला सैन्य देऊन मराठ्यांचा पाठलाग करण्यासाठी रवाना केले. मुघली सैन्य मराठ्यांचा पाठलाग करीत ५० मैल दूर ठाणे जिल्ह्यातील डहाणू व जवाहर तालुक्याच्या हद्दीवर असलेल्या धरमपूरपर्यंत गेले. धरमपूर येथेच मराठे आणि मुघल यांच्यात चकमक उडाली.[३]

१. मस्वायु--प, पृष्ठ ८--९

२. MA--JS, p 181; अख : २९–९–१६८८

३. अख : एप्रिल–मे १६८१

**रामसेजचा वेढा :**

रामसेज किल्ला नाशिक जिल्ह्यातील दिंडोरी तालुक्यात दिंडोरीच्या दक्षिणेस चार मैलांवर नाशिकच्या उत्तरेस आहे. किल्ल्याच्या पुढील भागात एक मोठा दरवाजा आहे. किल्ल्याकडे जाण्यासाठी असलेल्या वाटेस चोरवाट म्हणतात. तटाच्या आत दोन-तीन दारुगोळ्याची कोठारे आहेत. १६६४ मध्ये शहाबुद्दीन खानाने या गडाला वेढा दिला होता. परंतु त्यास त्यात यश आले नव्हते. या किल्ल्याची शहाबुद्दीनला माहिती असल्यामुळे औरंगजेबाने १६८२ च्या एप्रिल महिन्यात त्याला रामसेजच्या किल्ल्याला वेढा देण्यासाठी पाठविले. या वेढ्याची माहिती खाफीखान व भीमसेन सक्सेना यांनी दिली आहे. भीमसेन सक्सेना हा बहाद्दूरखानाचा अधिकारी म्हणून रामसेजला गेला होता. खाफीखानही रामसेजच्या वेढ्याच्या वेळी हजर होता. खाफीखान लिहितो, " बादशहाने रामसेजचा किल्ला जिंकून घेण्याच्या कामावर शहाबुद्दीनखान याची नेमणूक केली (एप्रिल १६८२); किल्ल्याला वेढा घालणे, सुरुंग लावणे, मोर्चे बांधणे, दमदमे तयार करून वर चढविणे, इत्यादि सर्व गोष्टी शहाबुद्दीनखानाने केल्या. पण रामसेजचा किल्लेदार हा सर्व मराठ्यांत अत्यंत अनुभवी आणि कसलेला होता. त्याच्या प्रयत्नामुळे आणि सावधगिरीमुळे मोंगल फौजेचे काही चालेना, प्रस्तुत ग्रंथकार ( खाफीखान ) हा त्यावेळी तेथे असलेल्या मोंगल फौजेत होता. किल्ल्यात लोखंडी तोफा नव्हत्या. पण कातडे बरेच होते. किल्ल्यातील लोकांनी लाकडाच्या तोफा बनविल्या. त्यात ते कातडे भरून तोफ उडवीत. अशी एक एक तोफ दहा तोफांचे काम करी. "

" नंतर बादशहाने शहाबुद्दीनखानाला परत बोलाविले आणि त्याच्या जागी खानजहान बहाद्दुर कोकल्ताश यास किल्ला घेण्यासाठी पाठविले. त्याने पण या वेढ्यात शिपाईगिरीची शर्थ केली. त्याचे तपशीलवार वर्णन मी केले तर ती अतिशयोक्ती वाटेल. पण काम काही पार पडले नाही. "

एके दिवशी रात्री खानजहान कोकल्ताश म्हणाला, " किल्ल्याच्या एका बाजूला आपण हल्ला करणार म्हणून पुकारा करावा. तिकडे तोफा आणाव्या. दारुगोळा न्यावा. तोफखान्याची माणसे, लष्करातील लोक आणि बाजारबुणगे यांनी तिकडे खूप गडबड उडवून द्यावी. म्हणजे किल्ल्यांतील लोक तिकडे गोळा होऊन बंदोबस्त करू लागतील.

त्याच वेळी किल्ल्याच्या दुसऱ्या बाजूस योग्य जागा शोधून काढून शे–दोनशे शूर शिपायांनी जावे. किल्ले चढून जाण्यात ते पटाईत असावेत. त्यांनी काही आवाज न करता गुपचुपपणे जावे. त्यांच्याबरोबर हल्ला करण्याचे सामान किंवा मशाली वगैरे उजेड पाडणाऱ्या वस्तू असू नयेत. त्यांनी अगदी सापाप्रमाणे जावे, आणि दोराच्या साह्याने आणि हरप्रयत्नाने किल्ल्यावर पोहोचावे. "

पण किल्लेदाराला बहाद्दुरखानाचा हा बेत समजला. त्यानेही युक्ती केली. त्याने असे ठरविले की ज्या बाजूने मोंगल बाजारबुणगे आणून हल्ला आरडा-ओरडा करतील त्या बाजूने आपणही किल्ल्यातील शूर शिपायांना गोळा करावे आणि नगारे–नौबती–कर्णे इत्यादींचा घोष करावा. मोंगलावर वरून दगड लोटून द्यावे, तेलाने माखलेले कपडे पेटवून वरून टाकावे. त्या कामात कसूर करू नये. आणि ज्या जागी खानजहानची माणसे गुपचूप चढून येणार होती त्या ठिकाणी किल्लेदाराने शूर, निवडक आणि सर्व प्रकारच्या शस्त्रांनी युक्त असलेले शिपाई घेऊन दबा धरून बसावे. त्यांनी कोणत्याही प्रकारचा आवाज करू नये. अशा रीतीने दबा धरून मराठे त्या आगंतुक पाहुण्यांची ( मिहमोन ना ख्वांदा ) म्हणजे मोंगलांची वाट पाहात बसले.

ठरलेल्या वेळी मोंगलांची दोन माणसे वर चढली. त्यांची डोकी दिसताच किल्ल्यातील सैनिकांनी आपल्या प्राणहरण करणाऱ्या शस्त्रानी त्यांच्यावर इतक्या जोराने आघात केला की त्यांचे डोळेच बाहेर आले. ते मोठ्या कष्टाने वाट चढून आले होते. तिकडेच ते फेकले गेले. इतर माणसे त्यांच्या मागे चढत होती. पण ती वरून पडणाऱ्या माणसांबरोबरच खाली पडली.

एके दिवशी खानजहान बहाद्दुरचा मोतदार ( सईस ) म्हणाला, " भुते वश करण्याच्या कामात मी पटाईत आहे. शंभर तोळे वजनाचा एक सोन्याचा साप तयार करा. तो माझ्या हाती द्या आणि हल्ल्याच्या वेळी मला आघाडीवर ठेवा. मी भुतांच्या मदतीने किल्ल्याच्या प्रवेशद्वारापर्यंत कोणतीही अडचण न येता जाऊ शकेन अशी मला आशा आहे. " खानजहान बहाद्दुरने त्याच्या म्हणण्या-प्रमाणे व्यवस्था केली.

तो मोतदार हल्ल्याच्या वेळी पुढे होता. अर्ध्या वाटेपर्यंत तो पोहोचला होता. इतक्यात किल्यावरून गोफणाचा गोळा येऊन त्याच्या छातीवर इतक्या जोरात लागला की, मोतदाराच्या हातून सोन्याचा नाग उडाला आणि मोतदार खाली कोसळून पडला.

सारांश–खानजहान बहादुरने खूप परिश्रम केले. पण काम काही निघू शकले नाही. शेवटी बादशहाच्या आज्ञेने तोही वेढा उठवून निघाला. मोर्चे आणि किल्ल्यावर चढण्याची साधने तयार करण्यासाठी म्हणून मोंगलांनी खूप लाकडे जमविली होती. त्यात त्यांना बराच खर्च आला होता. कूच करण्याच्या दिवशी खानजहानच्या आज्ञेने मोंगलांनी लाकडांना आग लावून दिली. या वेळी किल्ल्या-तील लोक तटावर जमले होते. ते नगारे चौघडे इत्यादि वाजवीत होते. तोंडाने ते जे काही म्हणत होते ते उच्चार करण्यासारखे नाही ( हरफहाते नागुफ्तनी बजबान आवर्देद, आक्टोबर १६८२ ). कासिमखान किरमाणी हा शूर आणि तडफदार सरदार होता. त्याची या वेढ्याच्या कामावर नेमणूक झाली. त्यानेही

खूप परिश्रम केले, पण काम काही पार पडले नाही. शेवटी बादशहाने वेढ्याचे काम तहकूब केले. कासिमखानला दुसऱ्या कामगिरीवर रवाना करण्यात आले."[1]

खाफीखानाने दिलेल्या माहितीप्रमाणे भीमसेन सक्सेनानेही या वेढ्यासंबंधी माहिती दिली आहे. भीमसेन सक्सेना म्हणतो, "शहाबुद्दीन याने किल्ल्याला मोर्चे लावले. किल्ल्याच्या बुरुजासमोर शहाबुद्दीन याने लाकडाचा एक प्रचंड बुरूज उभा केला. त्यावर चढून पाचशे माणसे एका वेळी किल्ल्यावरील लोकांवर गोळ्यांचा मारा करू शकत, इतक्यात बातमी आली की किल्ल्यातील लोकांच्या मदतीसाठी मराठ्यांचे सैन्य चाल करून येत आहे. बादशहाने बहाद्दुरखानाला ताबडतोब मोंगलांच्या कुमकेस जाण्याची आज्ञा केली. बहाद्दुरखानाने आपले बाजारबुणगे आणि जड सामान बहाद्दुरगडाला ठेवले आणि तो गुलशनाबादेस (नाशिक) पोहोचला. बादशहाने त्याला तेथेच छावणी करण्याची आज्ञा दिली. त्याप्रमाणे बहाद्दुरगडचा तळ हलवून गुलशनबादेस नेण्यात आला. मी (भीमसेन) आणि सय्यद कबीर हे बुणग्यांबरोबर गुलशनाबादेस पोहोंचलो. दलपतराय याची गाठ घेण्यासाठी मी रामसेज येथे गेलो. रामसेज येथे शहाबुद्दीन याने लाकडी बुरुज उभा केला होता तो मी पाहिला. खरोखरच तो प्रेक्षणीय होता. शहाबुद्दीनखान याने रामसेजच्या किल्ल्यावर हल्ला चढविला. पण त्याला यश आले नाही. मोंगलांची अनेक माणसे मारली गेली. दलपतराय याला दगडाच्या मारामुळे जखमा झाल्या. शहाबुद्दीन हा जुन्नरकडे रवाना झाला. बहाद्दुरखानाने रामसेजचा वेढा चालू ठेवला. त्याने किल्ल्यावर हल्ला करण्याचा प्रयत्न केला. पण त्याचा काही उपयोग झाला नाही. शेवटी बादशहाच्या आज्ञेने त्याने किल्ल्याचा वेढा उठविला. शहाबुद्दीन याने अफाट खर्च करून लाकडी बुरूज तयार केला होता. त्यात पेंढा आणि दारू भरून बुरुजाला पेटविण्यात आले. प्रचंड जाळ झाला."[2] भीमसेन व खाफीखान यांच्या माहितीत बरेच साम्य आढळते.

औरंगजेबाच्या बातमीपत्रातून त्याने कोणत्या सरदाराला केव्हा धाडले, वेढा किती दिवस चालला होता, मराठ्यांनी कशा तऱ्हेने प्रतिकार केला इ. गोष्टींचा बोध होतो. रामसेज जिंकून घेण्यासाठी औरंगजेबाने शहाबुद्दीन खान, पीरगुलाम, खानजहान बहाद्दुर, कासीमखान, मुहमंद खलील, सुबकरण बुंदेल, रामसिंह इ. मातब्बर सरदारांना रवाना केले होते. जेधे शकावलीप्रमाणे शके १६०४ चैत्र महिन्यात म्हणजे मार्च-एप्रिल १६८२ मध्ये शहाबुद्दीनखानाने रामसेज किल्ल्यास वेढा घातला.[3] अखबारांप्रमाणे दि. १६–४–१६८२ पूर्वी काही

१. मस्वायु–प, पृष्ठ ९–१०

२. माआम–प, पृष्ठ ८०–८१

३. शिचप्र, पृष्ठ ३१–३२

दिवस शहाबुद्दीनखानाने रामसेजला वेढा घातला. हा वेढा सुरू झाल्यानंतर शहाजादा अकबर याने शहाबुद्दीन नावाच्या एका सरदाराबरोबर मराठ्यांच्या मदतीसाठी कुमक पाठविली होती. शहाबुद्दीन व मुघली सैन्य यांच्यात चकमक उडाली. मराठ्यांनी मुघली सैन्यावर हल्ले सुरू केले. दि. ८–५–१६८२ रोजी सुबकरण बुंदेलाचा मुलगा दलपत बुंदेलाच्या मोर्चावर मराठ्यांनी हल्ला केला. त्यामुळे बुंदेल्याकडील अनेक माणसे मेली; काही जखमी झाली. यानंतर मराठे रतन-राठोडचा मुलगा रामसिंह याच्या मोर्चावर तुटून पडले. दोन्ही बाजूंची माणसे झालेल्या चकमकीत जखमी झाली. रामसेजचा किल्लेदार चांगल्या तऱ्हेने वेढा लढवीत होता. त्याला मदत करण्यासाठी दि. १२–५–१६८२ पूर्वी रूपाजी भोसले निघाला. तो नाशिकच्या जवळपास पोहोचला; त्याच सुमारास पीरगुलाम हा मुघली अधिकारी रामसेजपासून दोन मैलांवर असलेल्या बाणगंगेपर्यंत गेला. रूपाजी भोसलेला थोपविण्यासाठी तो नाशिकला पोहोचला. मुघलखान याने लिहिलेल्या माहितीप्रमाणे मराठ्यांची मोठी फौज रामसेज येथे एकत्र जमली होती म्हणून कासीमखानाला शहाबुद्दीनखानाच्या मदतीसाठी जाण्याचा हुकूम मिळाला. रूपाजी भोसले व मानाजी मोरे नाशिकच्या परिसरातच वावरत होते. त्यामुळे शहाबुद्दीन खान रामसेजहून गणेशगावाजवळ गेला.[१] गणेशगाव नाशिकच्या पश्चिमेस दहा मैलांवर आहे. शके १६०४ वैशाखात [एप्रिल-मे १६८२] रूपाजी भोसले व मानाजी मोरे यांनी शहाबुद्दीनखानाशी गणेशगावाजवळ लढाई दिली. झालेल्या चकमकीत मराठ्यांनी मुघलांच्या पाचशे घोड्यांचा पाडाव केला.[२] यानंतर शहाबुद्दीनखानाने मोर्चे लावून, लाकडी बुरुज उभारून किल्ला घेण्याचा प्रयत्न केला. मराठ्यांच्या विरुद्ध त्याचा टिकाव लागेना. शहाबुद्दीनखानाला वेढ्याच्या बाबतीत यश येत नाही असे दिसताच औरंगजेबाने खान जहानबहाद्दुरला १२ मे १६८२ च्या सुमारास हुकूम केला की, “ नसरतखानाला माझ्या दरबारात पाठवून तू मराठ्यांना तंबी देण्यासाठी पेडगावाहून नीघ. ” हुकुमाप्रमाणे खानजहान बहाद्दुर १४–१५ मेच्या सुमारास रामसेजला पोहोचला. खानजहान बहाद्दुर व शहाबुद्दीनखान हे मराठ्यांना तंबी देण्यासाठी निघाले. मे १४ ला मराठ्यांनी त्याच्या सैन्यावर छापा घातला. शहाबुद्दीनखानाचा भाऊ मुहमंद अरीफ व मराठे यांच्यात चकमकी उडाल्या. मराठे सतत हल्ले करीत राहिले, म्हणून मे १५ ला शरीफखान नाशिकहून रामसेज येथे रसद घेऊन पोहोचला.[३] मराठ्यांनी चारी बाजूंनी मुघली सैन्यावर अचानक हल्ला केला

१. अख : १०–४–१६८२, १२–५–८२, १३–५–८२, ११–८–८२

२. शिचप्र, पृष्ठ ३२

३. अख : १२–५–१६८२, १७–५–१६८२, १९–५–१६८२; मवऔ–प, पृष्ठ २२

तेव्हा भयंकर लढाई झाली. रामसेजच्या किल्लेदाराच्या मदतीसाठी मराठ्यांची कुमक वरचेवर जात होती. सात हजार मराठ्यांच्या तुकडीने डोंगराच्या दरीतून मुघली सैन्यावर पुन्हा हल्ला केला. मे १४–१५ ला त्यांची शरीफखानाच्या सैन्याशी लढाई झाली. झालेल्या लढाईत जाहिदखान, फैजुल्लाखान, व अनेक नेसरदार मारले गेले. महमंद अरीफही जखमी झाला. ही बातमी कळताच बादशहा म्हटले की, "मी तुम्हाला सांगतच होतो की मराठे थांबून थांबून हल्ले करतात, तरी सावधगिरीने रहा." वरील चकमकीत मराठ्यांच्याकडील पाचशे–सहाशे माणसे दगावली व दोन हजार जखमी झाली.[1] या चकमकीत मुघलांचा जय झाला. असे शरीफखानाने कळविले होते पण प्रत्यक्षात मात्र मराठ्यांचा पराभव झालेला नव्हता.

महिना सव्वा महिना रामसेजला वेढा देऊन झाला होता; तरी मुघलांना यश मिळाले नव्हते. औरंगजेबाने शहाबुद्दीनखानाच्या मदतीसाठी एकामागून एक सरदार रवाना केले. २० मे १६८२ च्या थोडे दिवस आधी कासीमखानाला हुकूम देण्यात आला की तू ताबडतोब शहाबुद्दीनच्या मदतीला जाऊन किल्ला ताब्यात घेण्याचा प्रयत्न कर. किल्ला जिंकता आला नाही तर तोफखाना वगैरे सामान शहाबुद्दीनजवळ ठेवून परत फीर[2]. गड लवकर ताब्यात यावा म्हणून बादशहाने हायतखान यास सजावल [तांतडीची अंमलबजावणी करविणारा अधिकारी] नेमला.[3] दि. ३० मे पूर्वी शहाबुद्दीन खानाने गडाच्या बुरुजावरील दरवाज्यावर गोळीबार केला. दरवाज्याजवळील भिंत कोसळली. बरेच सैनिक जखमी झाले. अशा तऱ्हेच्या चकमकी एप्रिलपासून जूनपर्यंत चालू होत्या. गणेशगावाजवळ लढाई दिल्यानंतर रूपाजी भोसले रामसेजला पोहोचला. २१ जून १६८२ च्या सुमारास शहाबुद्दीनखानाच्या सैन्यातील करणसिंह व रूपाजी भोसले यांच्यात दोन तीन वेळा चकमकी उडाल्या. मुघलांनी मराठ्यांना हटविण्याचा प्रयत्न केला त्यात रूपाजी भोसले व इतर काहीजण जखमी झाले. जून महिन्याच्या अखेरीस शहानबुद्दीनखानाने लढत लढत रामसेजच्या दरवाजापर्यंत मोर्चा पोहोचविला होता. त्याला २०० मण दारू व २०० गोळे इत्यादी गोष्टींची आवश्यकता असल्यामुळे सलाबतखान याला सामान घेऊन जाण्यास सांगितले.

शहाबुद्दीनखान व कासीमखान यांनी दि. ११ जुलै १६८२ रोजी रामसेज किल्ल्याला वेढा दिला. त्यांनी किल्ल्यावर हल्ले सुरू केले. किल्ल्याचा दरवाजा बराच उंच होता. मुघली सैन्य किल्ल्याच्या दरवाजापर्यंत पोहोचले. परंतु

---

१. अख : १९–५–१६८२, २२–५–१६८२, ३०–५–१६८२

२. अख : २०–५–१६८२

३. मवऔ–प, पृष्ठ २२

त्यांना किल्ल्यांत शिरता आले नाही. मराठ्यांनी किल्ल्यावरून मोठमोठे दगड ढकलून दिल्यामुळे मुघली सैन्यातील अनेक लोक मरण पावले. वरील जागा चढण्यास बरीच कठीण आहे हे लक्षात येताच मुघली सैन्य आपल्या सैन्यात परत गेले. यानंतर शहाबुद्दीनखान व खानजहानबहाद्दूरने रामसेजवर दोन-तीनदा हल्ला केला. १८ जुलैला शहाबुद्दीनखानाने आपल्या सैन्यासहित किल्ल्यावर हल्ला केल्यानंतर चार माणसे आत शिरली; परंतु मराठ्यांनी त्यांना कापून काढले, इतर माणसे जखमी झाली. इतके करूनही मुघलांना कोठेच यश मिळेना तेव्हा शहाबुद्दीनखान आपल्या मोर्चाकडे परत गेला. औरंगजेबाने खानजहानला परत बोलाविले. मुघलांच्या प्रत्येक हल्ल्याला मराठे यशस्वीपणे तोंड देत होते. सतत केलेल्या प्रतिकारामुळे तेथे शिबंदी कमी पडणे साहजिकच होते. संभाजीराजांचे या वेढ्याकडे लक्ष होतेच. दिनांक ३०-७-१६८२ च्या सुमारास संभाजीराजांनी एक हजार सैन्याची तुकडी रामसेज येथील अधिकाऱ्याच्या मदतीसाठी धाडली. या तुकडीने मुहमंद खलीलच्या मोर्चावर हल्ला केला. खानाकडील माणसे मेली. शहाबुद्दीन खानही पळाला, म्हणून महासिंग कदोरियाला मुकाबला करण्यासाठी पुढे धाडण्यात आले[1] इतक्या निकराने झालेल्या वेढ्यासंबंधी इंग्रज वखारवाल्यांना फारशी माहिती नव्हती. दि. ३०-७-१६८२ रोजी कारवारकर सुरतेला कळवितात की, 'हंबीरराव जखमी झाला व रामसेजगड मोंगलानी घेतला.[2] पण त्यांच्या बातमीत तथ्य नव्हते.

मुघल सैन्य रामसेजच्या किल्ल्याकडे जातच होते. २१-८-१६८२ च्या सुमारास ५००-६०० मेवाडी लोक बालाकुंडच्या रस्त्याने रामसेजच्या जवळ घुसले. त्यांनी बैलगाडीवाल्यांना बोलविण्यासाठी मोठ्याने आरोळ्या ठोकल्या. त्या आवाजाने मराठ्यांना जाग आली. मुघल सैन्य येत आहे हे पाहताच मराठ्यांनी वरून दगड फेकले. पुन्हा चकमकी झाल्या. मुघलांकडील बरेच लोक जखमी झाले. शेवटी आपले सामान शहाबुद्दीन खानाजवळ ठेवून बादशहाच्या भेटीस जावे असा कासमखानाला हुकूम देण्यात आला.[3] औरंगजेबाने अनेक सरदार धाडूनही रामसेजगड मुघलांना जिंकता आला नव्हता. दि. २०-९-१६८२ रोजी शहाबुद्दीनखानाने चारी बाजूंनी गडाला वेढा दिला त्यावेळी किल्ल्याचा एक बुरूज बादशाही अमलाखाली गेला होता. प्रत्यक्षात जेधे शकावली प्रमाणे शहाबुद्दीनखानाने अश्वीनमासी ( २० सप्टेंबर ते २ आक्टोबर १६८२ )

---

१. अख : ३०-५-१६८२, २१-६-१६८२, २-७-१६८२, १२-७-१६८२, १६-७-१६८२, २४-७-१६८२, ३०-७-१६८२

२. Carwar to Surat--30--7--1682; Sur. Vol. 109

३. अख : २७-८-१६८२

वेढा उठविला.[१] त्याने किल्ला घेण्याबाबत खूप कष्ट घेतले होते. स्वतःच्या जिवाचीही पर्वा केली नव्हती. बादशहाने त्याला हुकूम दिला की त्याने तोफखाना खानजहान बहाद्दूरच्या जवळ सोडून अंतूरचा ठाणेदार अहमद याच्याजवळ जावे. रामसेजगड खानजहानबहाद्दुरच्या अधिकाराखाली होता. १६८२ च्या सप्टेंबर महिन्याच्या अखेरीस खानजहान बहाद्दुरने किल्ल्याला वेढा घातला. त्याला वाटत होते की किल्ला लवकरच आपल्या ताब्यात येईल. प्रत्यक्षात खानजहान बहाद्दुरला काही प्रगती करता आली नव्हती. आक्टोबर महिन्यात खानजहानबहाद्दुरला हुकूम देण्यात आला होता की त्याने रामसेज किल्ल्याच्या जवळ थोडे लोक सोडून तळकोकणच्या खोऱ्यात बहाद्दुरखानाच्या मदतीस जावे. प्रत्यक्षात खानजहानबहाद्दुर रामसेजलाच होता. १६८२ च्या आक्टोबर महिन्याच्या अखेरीस उम्वतुल्मुल्क याने रामसेजच्या किल्ल्याला वेढा घालून मोर्चे कायम केले होते. परंतु बादशहाने त्यालाही हुकूम दिला की त्याने जमे अतिस वेढ्यात ठेवून स्वतः तळकोकणच्या खोऱ्यात जावे.[२] औरंगजेबाने रामसेजच्या वेढ्याचे लक्ष कमी करून तळकोकणात सर्व सैन्य धाडण्याचे ठरविले होते. रामसेज किल्ल्याचा मराठे यशस्वीपणे प्रतिकार करीत होते. त्रिंबकगडावरून केशव त्रिमल रामसेजला युद्धसाहित्य पुरवीत होता.[३] नोव्हेंबर महिन्याच्या पहिल्या आठवड्यात मराठे एक तोफ त्रिंबकगडावरून रामसेजला नेत असताना मुघलांनी मराठ्यांना अडवून त्यांच्याकडून ती तोफ घेतली. खानजहानबहाद्दुरने किल्ला जिंकून घेतो म्हणून बादशहाला कबूल केले असले तरी प्रत्यक्षात त्यालाही यश आले नव्हते. खानजहान बहाद्दुरला या वेढ्यात ३७,६३० रु. खर्च आला होता.[४] कदाचित् खाफीखानाने म्हटल्याप्रमाणे खानजहानबहाद्दुरने जादूटोण्यासाठी, नाग वगैरे केलेल्या गोष्टींमुळे इतका खर्च आला असेल; रामसेज किल्ल्यातून कूच करून तो तळकोकणच्या खोऱ्याकडे रवाना झाला.

या वेढ्यासंबंधी जेधे करीन्यात थोडक्यात पण मुद्देसूद माहिती दिलेली असून ती वर दिलेल्या माहितीशी जुळणारी आहे. "किल्ले रामसेजेस वेढा घालावयास शाब (हा ?) दीखान पाठविला. वेढा घातला धमधमे गनीमाने बांधोन बहुत लगट केला परंतु राजश्री केसो त्रिमाल पेशवे यांनी त्र्यंबकगडी

१. शिचप्र, पृष्ठ ४८

२. अख : ३०–९–१६८२, १९–१०–१६८२, २६–१०–१६८२

३. शिचप्र, पृष्ठ ४८

४. अख : १२–११–१६८२, ७–१२–१६८२

राहोन सामा पुरविला. हरभातेने मदती केली. सहा महिने किल्ला आडविला. किल्ला न येई याकरिता पातशहानी शाब (हान) दीखानास बोलावून नेला. "[१]

१६८४ पर्यंत रामसेज किल्ला मुघलांना जिंकता आला नव्हता. १६८४ च्या डिसेंबर महिन्यात मराठ्यांची फौज मोंगली गावांवर हल्ला करण्यासाठी किल्ल्याच्या जवळपास जमली होती. ही बातमी कळताच नाशिकहून इकरामखान बहाद्दुरने दि. १२–१२–८४ रोजी मराठ्यांबरोबर मुकाबला केला. मराठ्यांच्याकडील २०० माणसे मेली. या चकमकीत मुघल विजयी झाले.[२] अशा प्रकारे अनेक तऱ्हेच्या चकमकी किती दिवस चालू होत्या हे समजत नाही. मुघलांनी १६८२ च्या फेब्रुवारी–मार्चमध्ये प्रथम रामसेज घेण्यासाठी वेढा दिला. १६८४ पर्यंत त्यांना गड घेण्यात यश आले नव्हते. रामसेजच्या किल्लेदाराने वेढा परतवून लावला म्हणून संभाजीने किल्लेदाराकडे खिलतीचा पोषाख, रत्नजडित कडे आणि नगद रक्कम पाठवून त्याचा गौरव केला. इतर किल्लेदारांच्या मानाने तो श्रेष्ठ म्हणून त्याचा मानसन्मान करून आपल्या प्रमुख किल्ल्यावर त्याची बदली करण्यात आली. रामसेजवर दुसरा किल्लेदार आला.[३] इतक्या चांगल्या तऱ्हेने ज्याने किल्ला लढविला, त्या किल्लेदाराचे नाव आणि त्याला कोणत्या गडावर प्रमुख नेमले यासंबंधी काहीही माहिती उपलब्ध नाही. खाफीखानांच्या म्हणण्याप्रमाणे संभाजीराजे यांनी किल्लेदाराला दुसऱ्या गडावर नेमले. त्यानंतर सुमारे २–३ वर्षांनी रामसेजभागात असलेल्या अबदुल करीम नावाच्या एका जमीनदारामार्फत मुल्हेरचा किल्लेदार नेकनामखान याने रामसेजच्या नवीन किल्लेदाराला वश करून घेतले.[४] ईश्वरदास नागर लिहितो, 'परमेश्वराच्या कृपेने आणि बादशहाच्या भाग्याने रामसेजचा किल्ला मोंगलाच्या ताब्यात आला आहे. बादशहाने अब्दुलकरीम यास खिलतीचा पोशाख, जडावाचा खंजीर, एक हत्ती, पांचशेची मन्सब आणि १०००० रु. रोख बक्षीस म्हणून दिले.[५] अशा प्रकारे १६८७ मध्ये रामसेज किल्ला केवळ फितुरीमुळे मोंगलाच्या ताब्यात गेला. इतर मुलूख किंवा काही गड ज्याप्रमाणे मुघलांनी फितुरीने घेतले तशाचप्रकारे रामसेज गडही घेतलेला आहे.

### त्रिंबक गड :

मुघली सैन्याच्या एका वेळी अनेक ठिकाणी आक्रमक हालचाली चालू होत्या. रामसेजला वेढा घातलेला असतानाच मुघल त्रिंबकगड घेण्याचा प्रयत्न

१. शिचप्र, पृष्ठ ४८
२. अख : २२–१२–१६८४
३. मस्वायु--प, पृष्ठ ११
४. कित्ता
५. मोआम–प, पृष्ठ २३

करीत होते. हा गड नाशिकच्या आग्नेयेस २० मैलांवर आहे. रामसेजच्या वेढ्याच्या वेळी केशव त्रिमल याच गडावरून रामसेजला दारुगोळा व युद्धसाहित्य पुरवीत असे.[1] १६८२ च्या डिसेंबर महिन्याच्या पहिल्या आठवड्यात मराठ्यांची फौज त्रिंबकगडाच्या बाजूला गेल्याने खानजहानबहाद्दूरचा मुलगा मुजफरखान याला फौजेच्या जोरावर तंबी देण्यासाठी नेमण्यात आले. मुजफरखान आणि मराठ्यांच्यात चकमक झाली. त्यानंतर बहारामतखानाने त्रिंबकगडाच्या तीन वाड्या जाळल्या. या विजयाबद्दल त्याला १००० रु. किंमतीचा हत्ती देण्यात आला.[2] संभाजीच्या बाजूने राघो खोपडा याने १६८३ च्या फेब्रुवारी महिन्यापूर्वी अनामतखानाकडे चाकरी करण्याची इच्छा व्यक्त केली. त्याच्यावर बादशाही कृपा झाली असती तर तो मुघलांना त्रिंबकगड मिळवून देणार होता. यासाठी त्याला ७०० जात व २०० स्वारांचा मान देऊन काही रोख रक्कमही देण्यात आली. राघो खोपडा फितुर होऊन त्रिंबकगडाच्या किल्लेदाराकडे गेला. किल्लेदार मुघलांना वश होऊन त्यांना किल्ला देईल अशी राघो खोपडा याची समजूत होती. परंतु तो फितुर न होता संभाजी राजांशी एकनिष्ठ राहिला. राघो खोपड्याचे कारस्थान अयशस्वी झाल्याने तो तेथून पळाला. त्याच्या हातून काम झाले नाही म्हणून त्याच्या मार्फत मध्यस्थी करणाऱ्या जमनाजीची स्वाराची वाढ कमी करून इहतमामखानाने त्याला कैद केले. माझा राघो खोपड्याशी संबंध नाही असे जमनाजीने सांगितल्यावर त्याला जामिनावर सोडण्यात आले.[3] लढण्यापेक्षा फितुरीने गड घेण्याचे मुघलांचे प्रयत्न सतत चालत असले तरी त्यांना नेहमीच यश मिळत होते असे दिसत नाही.

बहारामतखानाने पूर्वी त्रिंबकगडाच्या जाळलेल्या तीन वाड्या मराठ्यांनी पुन्हा वसविल्या. मराठ्यांच्या हालचालींचे निरीक्षण मुघल अधिकारी नाशिकहून करीत असत. १६८४ च्या नोव्हेंबर महिन्यात अकरमतखान आणि मरहमतखान स्वार होऊन त्रिंबकगडास गेले. त्यांनी पुन्हा वाड्या जाळल्या आणि लोक व जनावरे हस्तगत केली. झालेल्या चकमकीत मराठ्यांचा पराभव झाला.[4]

रामसेज आणि त्रिंबकगड येथे मुघलांनी वेढे दिले तेव्हा १६८२ च्या ऑक्टोबर महिन्यापूर्वी त्यांनी नाशिकला ठाणे घातले. त्यानंतर मराठ्यांची एक तुकडी नाशिकला जाऊन तिने जवळपासची काही गावे लुटून त्या गावांना आगी लावल्या.[5] नाशिकचा ठाणेदार अकरामखान याने १६८४ च्या ऑक्टोबर महिन्यात मराठ्यांच्या २४ लोकांना अटक केली. त्यात रामसेजच्या किल्लेदाराचा एक औरस पुत्र आणि दुसरा तळकोकणातील देशमुखाचा मुलगा होता. या

१. शिचप्र, पृष्ठ ४८
२. अख : ६–१२–१६८२
३. अख : ८–२–१६८३
४. अख : २६–११–१६८४
५. अख : १४–१०–१६८२

दोघांकडून माहिती काढून घेऊन त्यांना इहतमामखानाकडे पाठवावे असा हुकूम देण्यात आला होता.[१]

मुघल अधिकाऱ्यांची नाशिकला ये-जा चालू असे. १६८४ च्या डिसेंबर महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात बऱ्हाणपूरचा सुभेदार सय्यद मुनव्वरखान नाशिकला पोचला. तेव्हा पिंपळगाव येथे ठाणे कायम करण्याचा त्याला हुकूम देऊन सावध राहण्यास सांगण्यात आले. संभाजीकडे नाशिकच्या भागातून अन्नधान्य जात असल्याने मुनव्वरखानाला ते जाऊ देऊ नये असे बजावण्यात आले होते. मराठ्यांकडील कोणालाही या प्रांतात येऊ देऊ नये असेही त्याला सांगण्यात आलेले होते.[२] इंग्रजांच्या बातमीप्रमाणे यावेळी मराठ्यांच्या प्रदेशात महागाई झालेली दिसते.[३] संभाजी राजे सैनिकांना अन्नधान्य कमी पडू नये म्हणून अहमदाबाद, सुरतेहून, गुजराथेतून पुरवठा करण्याचा प्रयत्न करीत असावे.

१६८५ सालच्या जानेवारी महिन्याच्या सुरुवातीला संभाजीचा सरदार तात्याराव (कात्याराव) ५०० स्वारांसह नाशिकजवळ सिन्नर आणि भगोरच्या (भगूर) भागात मुकाबला करण्यासाठी गेला होता. तेव्हा शिवनेरचा ठाणेदार मुहम्मद खलील व भगोरचा ठाणेदार गोविंदराव हे त्याला सामना देण्याची कामगिरी बजावीत होते.[४] मराठ्यांची फौज नाशिकच्या बाजूस गेल्याचे तेथील ठाणेदार अकरामखान व सय्यद मुनव्वरखान यांच्याकडून समजताच लुतफुल्लाहखान व इअतकादखानास फौजेसह मराठ्यांना तंबी देण्यास सांगितले.[५] त्याचप्रमाणे अतिशखानही मराठ्यांना तंबी देण्यासाठी फौजेसह नाशिककडे गेला.[६] नाशिक शहराच्या संरक्षणासाठी तेथील ठाणेदार अकरामखान यास तेथेच ठेवून सय्यद मुनव्वरखानाने त्याच्या लोकांसह आणि नियुक्त केलेल्या २०० स्वारांसह नाशिक जिल्ह्यात आलेल्या मराठ्यांना तंबी देण्यासाठी स्वारी केली.[७] अतिशखान नाशिकला पोचल्यावर त्याला तेथे गुप्तचरांकडून मराठ्यांची फौज नाशिकहून बागलाणात गेल्याचे समजले. तेव्हा अतिशखानाच्या मुलाने बुणगे व जास्तीचे सामान मुहम्मदपूर येथे ठेवून मराठ्यांचा पाठलाग केला. मराठ्यांची फौज नाशिकहून वऱ्हाडात गेली होती. म्हणून अकरामखानाने काही लोक सय्यद मुनव्वरखानाजवळ ठेवून उरलेल्या लोकांसह मराठ्यांचा पाठलाग केला. अतिशखान नाशिकला पोचेपर्यंत सय्यद मुनव्वरखानाने तेथेच राहावे असा

१. अख : १२–१०–१६८४
२. अख : २४–१२–१६८४
३. FR : 2–12–1684
४. अख : ५–१–१६८५
५. अख : ५–१–१६८५
६. अख : २–२–१६८५
७. अख : ४–२–१६८५

त्याला हुकूम होता.[१] याच वेळी घोडेस्वारांसह मराठ्यांना तंबी देण्यासाठी गाजी-उद्दीनखान नाशिकला गेला.[२] मराठ्यांनी मुघलांना बराच त्रास देऊन सतावले असावे असे मुघलांच्या या धावपळीवरून दिसते.

१६८२ आणि १६८४ मध्ये त्रिंबकगड घेण्याचा मुघलांचा प्रयत्न फसल्यानंतर मुघल सरदार मातबरखान याने तो गड घेण्यासाठी १६८८ च्या ऑगस्ट महिन्यात वेढा घातला.

१६८८ मध्ये औरंगजेबाने मातबरखानाच्या नावाने फर्मान सादर केले. त्यात म्हटले होते की, "तुमची अर्जी ( अर्जदाश्त ) मिळाली. मजकूर आमच्या नजरेस आला. तुमची कामगिरी पसंत केली जात आहे. तुम्हाला खिलतीची वस्त्रे, एक हत्ती, वीस हजार रुपये रोखही देण्यात येत आहेत. तुमच्या मन्सबीत पाचशेची वाढ करण्यात येत आहे. तुमची विनंती आम्ही मान्य करतो. त्याचा तपशील बख्शी उल्मुल्क बहरामखान याच्या पत्रावरून कळून येईल. मुहंमद अफझलच्या मन्सबीत वाढ करण्यात आली आहे. बादशाही कृपेबद्दल तुम्ही आभारी राहावे आणि बादशाहाची अधिकाधिक सेवा करावी. त्र्यंबकचा किल्ला घेण्याचा हरप्रकारे प्रयत्न करावा. त्याचे चीज होईल हे जाणावे."[३]

मातबरखानाने पट्टागड आणि इतर गड जिंकल्यानंतर १६८८ च्या ऑगस्टच्या अखेरीस त्रिंबकगडाला वेढा घातला. त्या वेढ्यासंबंधात बादशाहाला कळविताना मातबरखान लिहितो, "त्र्यंबकच्या किल्ल्याला मी सहा महिन्यांपासून वेढा घातला होता. किल्ल्याभोवती मी चौक्या बसविल्या होत्या. सहा महिन्यांपासून किल्ल्याच्या लोकांना ये–जा करणे मुष्कील झाले होते. किल्ल्यात रसदेचा एक दाणा पोहोचू नये अशी मी व्यवस्था केली होती. यामुळे किल्ल्यातील लोक हवालदिल झाले. त्यांनी शरण येण्याची तयारी दाखविली.

"गुल्शनाबाद नाशिकच्या ठाण्यात आमचे सैन्य थोडे होते. या भागात मराठ्यांच्या हालचाली सुरू झाल्याच्या बातम्या पसरल्या. ही परिस्थिती पाहून मी त्र्यंबकच्या किल्लेदारांना बादशाही कृपेची आश्वासने दिली. जुलूस बत्तीस रबिलावल महिन्याच्या सव्वीस तारखेस (८ जानेवारी १६८९) त्र्यंबक किल्ल्याचे अधिकारी तेलंगराव आणि श्यामराज हे किल्ल्यावरून खाली उतरले. आपल्या कृपेने त्र्यंबकचा किल्ला आमच्या ताब्यात आला. तेलंगराव आणि श्यामराज यांना कोणत्या मन्सबी द्यावयाच्या याचा तपशील सोबतच्या यादीवरून दिसून येईल. त्यांची अर्जी आणि किल्ल्याच्या किल्ल्या या काका मन्सबदार याच्या भावाबरोबर पाठविल्या आहेत. त्या आपल्या पाहण्यात येतील..."

१. अख : ६–२–१६८५ २. अख : ८–२–१६८५

३. नवभारत, सप्टेंबर १९६९, पृष्ठ २०

त्र्यंबकच्या किल्ल्याच्या मोहिमेत औगडचा ( औंढा ? ) किल्लेदार श्यामसिंग याचा मुलगा हरीसिंग याने आपल्या जमेतीनिशी कामगिरी केली आहे. त्याच्याबरोबर तीनशे स्वार आणि एक हजार पायदळ देऊन मी त्याला त्र्यंबकचा किल्ला सांभाळण्याच्या कामावर नेमले आहे. नवीन किल्लेदार नेमून येईपर्यंत तो हे काम सांभाळील. त्याच्या मन्सबीत पन्नास ( जात ) आणि पन्नास स्वार अशी वाढ करण्यात यावी ही आज्ञा तो बाळगून आहे. ''[1]

हा किल्ला ताब्यात आल्यानंतर औरंगजेबाने मातबरखानास फर्मान पाठविले. ते असे ( १६८९ फेब्रुवारी ) : '' मातबरखानाने जाणावे की तुमची अर्जी पोचली. आपण त्र्यंबकचा किल्ला जिंकून घेतला असून त्र्यंगलवाडीच्या किल्ल्याला वेढा घातला आहे असे तुम्ही कळविले आहे. त्र्यंबकच्या किल्ल्या तुम्ही पाठविल्या त्या आमच्या नजरेखालून गेल्या. तुमची कामगिरी पसंत करण्यात येत आहे. तुमच्या स्वतःच्या मन्सबीत ( जात ) पांचशेची वाढ करण्यात येत आहे. तुमच्या मन्सबी ( स्वार ) तील सहाशे स्वार हे विनशर्त राहातील. तुमची पूर्वीची आणि आताची मन्सब मिळून तीन हजारी ( दोन हजार जात आणि एक हजार स्वार दो अस्था ) होईल. तुम्हाला खिलतीचा पोशाख, झेंड्याचा मान आणि तीस हजार रुपये रोख देण्यात येत आहेत. याबद्दल तुम्ही आभार मानावे आणि प्रथम बालाघाटातील किल्ले जिंकून घेण्याचा प्रयत्न करावा. त्यानंतर घाटा खालचे किल्ले जिंकून घ्यावे. त्र्यंबकची किल्लेदारी कदीमकुलीखान याजकडे देण्यात आली आहे.

कदीमकुलीखान तिकडे पोहोचताच तुम्ही कोकणांत उतरावे आणि माहुली आणि त्या भागातील इतर किल्ले ताब्यात आणावे. कल्याण, भिवंडी वगैरे महालांत ठाणी बसवावी आणि त्या जिल्ह्याचा बंदोबस्त तुम्ही करावा. ''[२]

ईश्वरदास नागरने दिलेल्या माहितीप्रमाणे मुघल सरदार मोतिमदखानाने ( मातबरखान ) त्रिंबकचा किल्ला जिंकून घेतला होता. त्याला बक्षीस म्हणून ३०,००० रुपये देण्यात आले.[३]

**नाशिक जिल्हा :**

साल्हेर, मुल्हेर, रामसेज, त्रिंबकगड येथील मुघल आक्रमणाला मराठे चांगले तोंड देत होते. नाशिक जिल्ह्यात औंढा-पट्टा, कंचनगड, अंकाई–टंकाई, हनवंतगड, आवळा–झवळा इत्यादी ठिकाणी मराठे आणि मुघल यांच्यात चकमकी उडाल्या. या लढाया मोठ्या नसल्या तरी त्यावरून मराठ्यांच्या हालचालींचा विस्तार सहज ध्यानात येतो. १६८२ च्या जून महिन्याच्या पहिल्या आठवड्यात

१. नवभारत, सप्टेंबर १९६९, पृष्ठ २०–२१

२. कित्ता

३. मोमसं–प, पृष्ठ २६

मराठे व मुघल यांच्यात औंढा–पट्टा गडावर लढाई झाली. औंढा गड नाशिक जिल्ह्यातील सिन्नर तालुक्याच्या नैऋत्येस आणि देवळालीच्या दक्षिणेस १० मैलांवर आहे. पट्टा गड अहमदनगर जिल्ह्याच्या अकोला तालुक्यातील अकोल्याच्या वायव्येस १६ मैलांवर आहे. हे दोन्ही गड मराठ्यांच्या ताब्यात होते. मुघलांनी या गडांना वेढे दिले तेव्हा मराठे व मुघलांच्यात चकमकी झाल्या. पण त्यात यश न आल्याने खानजहानबहाद्दूरने मुजफ्फरखान, रणमस्तखान व मोहरमसिंह यांना रवाना केले. मराठ्यांनी तेथून त्यांच्या विशिष्ट युद्धतंत्रानुसार पळाल्याचा आव आणला आणि संधी मिळताच पुन्हा हल्ला केला. पुन्हा झालेल्या लढाईत दोहोकडील माणसे मेली.[1] मुघलांना हे दोन्ही किल्ले जिंकता आले नाहीत. १६८५ च्या फेब्रुवारी महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात रूपाजी भोसले मोठी फौज घेऊन औंढा–पट्टा येथून मुघलांच्या प्रदेशात शिरला. तेव्हा नाशिकला असलेला गाजिउद्दीन फिरोजजंग तेथे धावून गेला. मराठे तेथून पुढे गेले. मराठ्यांच्या फौजेतील बरीच माणसे मेली,[2] असा मुघलांचा दावा आहे.

### पट्टागड :

१६८८ साली मातबरखानाने बागलाणातील अनेक गड घेण्यास सुरुवात केली होती. पट्टा गडासंबंधी १६८८ मध्ये मातबरखानाने औरंगजेबाकडे अर्ज पाठविला. त्यात तो लिहितो, "हा सेवक मातबरखान अर्ज करतो कीं या सेवकाने काही दिवसांपासून सुमारे एक हजार कोळी, भिल्ल आणि मावळे यांचे पायदळ पथक चाकरीत घेतले होते. मराठ्यांच्या ताब्यात असलेले पट्टा आणि इतर किल्ले यांच्या लगतच्या जमीनदारांना रकमा पुरविण्यात आल्या आणि त्यांना मन्सबी आणि इतर बक्षिसे यांची प्रलोभने दाखवून त्यांना बादशाही कृपेचे उमेदवार बनविण्यात आले. हरजी जाखडे याचे आणि तरतीबखान याचे आपसात वाकडे आले होते. त्यामुळे हरजी हा सिन्नर परगण्यातील सोना या आपल्या गावी जाऊन बसला होता. त्याला रोख रक्कम, घोडा आणि शिरपाव ही दिली होती; उभे केलेले पथक त्याच्या दिमतीला देण्यात आले आणि पट्टा किल्ला जिंकून घेण्याच्या कामगिरीवर तो रवाना झाला. तो किल्ला घेण्याची योग्य संधी शोधीत होता पण ही मोहीम पार पडेना. त्याला कारण तरतीबखानाने निर्माण केलेल्या अडचणी होत.

याच सुमारास बादशहानी मला गुल्शनाबाद नाशिकच्या ठाणेदारीवर नेमले. मी हरजीची हरप्रकारे समजूत घातली. बादशहाच्या राज्यारोहणाच्या एकतिसाव्या वर्षी ( जुलूस एकतीस ) रबिलावल महिन्याच्या सतरा तारखेस

१. अख : ९–६–१६८२ २. अख : १८–२–१६८५

( ११ जानेवारी १६८८ ) मी सरकारी सैन्य आणि माझी पथके किल्ला घेण्याच्या कामावर रवाना केली. रबिलावलच्या तेवीस तारखेस ( १७ जानेवारी ) माझे सैनिक मध्यरात्रीच्या सुमारास दोर लावून किल्ल्याच्या तटावर चढले आणि त्यांनी किल्ला जिंकून घेतला. या मोहिमेत उभय पक्षांपैकी जे मारले गेले आणि शत्रूपैकी जे कैद झाले त्यांचा तपशील पाठविण्यात येईल.

या मोहिमेसाठी मला पंचेचाळीस हजार रुपये कर्ज काढावे लागले. ती रक्कम मोहिमेत खर्च झाली आहे. आपल्या कृपेने अल्पावधीत इतर किल्ले जिंकून घेण्याची आशा बाळगून आहे. मुहंमद अफझल याला मी संगमनेरहून या मोहिमेसाठी बोलावून घेतले होते. त्याच्या बरोबर पट्टा किल्ल्याच्या किल्ल्या पाठवीत आहे. केशवदास बुंदेला याच्याबरोबर भगूर ( नाशिकजवळ ) चा ठाणेदार गोविंदराव याचे निम्मे पथक देऊन केशवदासला तूर्त किल्ला सांभाळण्यास सांगितले आहे. किल्ल्याच्या पायथ्याच्या इलाख्यावर मी गोविंदरावची फौजदार म्हणून नेमणूक केली आहे. त्याचा पुतण्या राजाराम याची नेमणूक भगूरचा ठाणेदार म्हणून करावी. केशवदास हा शिपाईगडी असून कामाचा मनुष्य आहे. त्याची मन्सब वाढवावी. लवकरच चांगली मन्सब असलेल्या किल्लेदाराची आणि हशमाची तैनात व्हावी ही विनंती.

हा किल्ला मोठा असून याच्या भोवती मराठ्यांचे किल्ले आहेत. या किल्ल्याच्या संरक्षणासाठी कमीत कमी दोन हजार तोपची ( बंदुकधारी-मस्केटीयर) लागतील. त्यास पाठविण्यात आले तर योग्य होईल. नसल्यास मला आज्ञा करावी म्हणजे दोन हजार पायदळ नव्याने उभारून मी किल्ल्याची खात्रीलायक व्यवस्था ठेवीन. तोपत्याना औरंगाबादच्या सरकारी खजिन्यातून दोन महिन्यांचा पगार आगाऊ देण्याची व्यवस्था व्हावी. "[1]

पट्टा गड जिंकल्यानंतर मातबरखानाने कलंग, बाबहार, तबाका, रोहतगड हे गड जिंकून घेण्याची तयारी सुरू केली. त्या संबंधात बादशहाला १६८८ साली पाठविलेल्या अर्जात तो लिहितो, " रोहतगड हा घाटाच्या माथ्यावर आहे. कुलंगच्या किल्ल्यात मराठ्यांनी आपले ठाण मांडले होते. त्यांनी तेथे मोठ्या इमारती बांधल्या होत्या. मी कोळी, भिल्ल आणि मावळे यांची पथके चाकरीत घेतली आणि त्यांना कुलंगच्या ( कुलंग इगतपुरीपासून नऊ मैल आहे. ) किल्ल्याकडे पाठविले. माझी पथके जवळच्या दऱ्यातून दबा धरून बसली. चौकी पहारे ढिले झाले की किल्ला ताब्यात घ्यावा असा त्यांचा बेत होता. पण कुलंगचा किल्ला मजबूत आहे. दौलताबादच्या किल्ल्याप्रमाणेच हा डोंगरी किल्ला चारपाचशे गज डोंगर तासून बनविला आहे. उघड हल्ला करून अगर दोर लावून

१. नवभारत, सप्टेंबर १९६९, पृष्ठ १९–२०

किल्ल्यावर चढून तो जिंकून घेणे कठीण होते. या किल्ल्यातील सैनिकांची बायकामुले तळकोकणात प्रबळगड ऊर्फ मुरंजन किल्ल्याच्या पायथ्याच्या खेड्यातून राहात होती. त्यांना कैद करण्यासाठी मी एक हजार शिपाई पाठविले. त्यांनी प्रबळगडच्या पायथ्याच्या गावावर रात्री छापा घातला. या दंगलीत बरीच माणसे ठार अगर जखमी झाली. शेवटी अनेक बायका-मुलांना कैद करून गुल्शनाबाद नाशिक येथे आणण्यात आले.

याच सुमारास किल्ल्याजवळच्या दऱ्याखोऱ्यात आमची माणसे दबा धरून बसली होती. त्यांनी किल्ल्यावर काही दोर लावून चढून अनेकांना ठार मारले. आणि कित्येकांना किल्ल्यावरून खाली दरीत ढकलून दिले. हे पाहून किल्ल्यावरचे लोक घाबरले. त्यांची बायकामुले आमच्या कैदेत सापडली होती. ते आम्हाला शरण आले आणि किल्ले आमच्या हवाली करण्याची त्यांनी तयारी दाखविली. त्यांना योग्य बक्षिसाची आणि मानमरातबाची आश्वासने देण्यात येऊन किल्ले ताब्यात घेण्यात आले. त्याच्या किल्ल्या पाठविण्यात आल्या आहेत. त्या आपल्या पाहण्यात येतील.

यावेळी या सेवकाने किल्ले आउंधा, किल्ले कवनी, किल्ले हरीशगड, किल्ले त्रिंगलवाडी, किल्ले मदनगड आणि किल्ले मोरदंत यांना वेढे घातले आहेत. परमेश्वर करील तर आपल्या कृपेने हे किल्ले मी अल्पावधीत जिंकून घेईन. त्यानंतर मी त्र्यंबकचा किल्ला जिंकून घेण्याचा प्रयत्न करीन. वरील किल्लेदारांना मी आश्वासने दिली आहेत. ती मान्य व्हावीत. म्हणजे या सेवकावर त्यांचा विश्वास बसेल. जिंकून घेतलेल्या किल्ल्यावर किल्लेदारांच्या नेमणुका व्हाव्या. हशम आणि रसद ही पाठविण्यात यावी. म्हणजे किल्ल्याची समाधानकारक व्यवस्था होईल आणि त्यांच्या सुरक्षिततेची खातरजमा होईल."[१]

**सोनगड** :–प्रतापगड किल्ला मुघलांच्या ताब्यात होता. सोनगड किल्ला सिन्नर तालुक्यात सिन्नरच्या दक्षिणेस ७–८ मैलांवर आहे. मराठ्यांनी जुलै १६८२ मध्ये दोरीचा जिना करून या गडात शिरण्याचा प्रयत्न केला. परंतु तेथील किल्लेदार असदुल्लाखान याच्या सावधगिरीने ते सोनगड जवळच्या परताबगड ( प्रतापगड ) येथे गेले. तेथे छोटीशी गढी बांधून एकत्र जमण्याचा त्यांचा विचार होता. ही गोष्ट असदुल्लाखानाने खानजहानबहाद्दुरला कळविली.[२]

यानंतर मराठ्यांची फौज ऑक्टोबर १६८२ मध्ये बागलाणात घुसली होती म्हणून मामूरखान याला त्यांचा बंदोबस्त करण्यासाठी रवाना करण्यात आले होते.[३] अशीच एक तुकडी चांदोरकडे गेली होती. तेव्हा तेथील ठाणेदार

..........................

१. नवभारत, सप्टेंबर १९६९, पृष्ठ २०

२. अख : १४–७–१६८२ ३. MA–JS

अब्दुल्लाह याने मराठ्यांना तंबी देण्यासाठी स्वारी केली नाही म्हणून त्याची मन्सब कमी करण्यात आली.[१]

कंचन-मंचनचा किल्लेदार अल्लाहयारखानाला ऑक्टोबर महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात बातमी समजली की मराठ्यांनी कन्हेरी गडाला वेढा देण्यासाठी त्या परिसरात प्रवेश केला होता. म्हणून त्याने मराठ्यांशी मुकाबला करण्यासाठी फौज रवाना केली. मराठ्यांकडील काही लोक जिवंतच पकडण्यात आले.[२] काचणागड ( कंचन ) कळवण तालुक्यात कळवणच्या आग्नेयेस ५–६ मैलांवर आहे. डिसेंबरमध्ये मराठ्यांची फौज या गडापर्यंत पोचली तेव्हा अंकाई-टंकाईचा ठाणेदार ( अंकाई-टंकाई येवला तालुक्यात येवल्याच्या उत्तरेस ६–७ मैलांवर आहे. ) अहमदखान तेथे पोचला. त्याने मराठ्यांबरोबर मुकाबला केला, आणि त्यांचा १० मैलांपर्यंत पाठलाग केला. या चकमकीत १५० माणसे जखमी झाली व ४० जणांची कत्तल करण्यात आली. मराठ्यांच्या १३० तलवारी व ५० घोडे मुघलांच्या हाती पडले.[३] मराठे कांचनगडावरून निघून हनवंतगड, आवळा-झवळा येथे चौथाईच्या वसुलीसाठी गेले. ( हनवंतगड कळवण तालुक्यात कळवणच्या नैर्ऋत्येस ६ मैल व झवळा गड ८ मैलांवर आहे. ) ही बातमी समजताच धोडपगडचा किल्लेदार नेकनामखान हा सामना देण्यासाठी तेथे गेला. झालेल्या चकमकीत दोन्हीकडील लोक मारले गेले. पकडलेल्या लोकांना अंकाई-टंकाईचा ठाणेदार अहमदखान याच्या स्वाधीन करण्यात आले.[४]

नाशिक जिल्ह्यातील मराठे व मुघल यांच्या हालचाली १६८३ ते १६८५ पर्यंत थंडावलेल्या दिसतात. १६८५ च्या सुमारास मराठे या भागात चढाईसाठी पुन्हा गेले होते. १६८५ च्या फेब्रुवारी महिन्यात मराठ्यांची फौज हनवंतगडावर चालून गेली होती. चांदोरचा ठाणेदार तेथे पोचला आणि त्याने मराठ्यांबरोबर सामना दिला. झालेल्या चकमकीत मराठ्यांकडील फक्त ३० माणसे मेली, १७ जणांना पकडले. मुघल सैनिकांच्या हाती १ निशाण, छत्री, भाले इत्यादी सामान मिळाले.[५]

## मराठ्यांची मुघल प्रदेशात चढाई : भाग १ ला

संभाजी राजांनी अंतर्गत कटांचा बंदोबस्त केल्यानंतर वातावरण थोडेसे स्थिरस्थावर झाले होते. ते राज्यावर येताक्षणी सिद्दीवाचून कोणाबरोबरही युद्ध करावयाचा मराठ्यांना प्रसंग आलेला नव्हता. या सुमारास औरंगजेबही रजपुतां-

१. अख : १–११–१६८२
२. अख : १८–१०–१६८२
३. अख : १३–१२–१६८२
४. अख : २६–१२–१६८२
५. खअ : १८–२–१६८५

विरुद्ध लढण्यात गुंतला होता. त्यातच त्याचा मुलगा अकबर याने बंड करून तोही रजपुतांना सामील झाला होता. साहजिकच औरंगजेबाचे दक्षिणेकडे थोडेसे दुर्लक्ष होते. ही संधी साधून मराठ्यांनी मुघलांच्या प्रदेशात आक्रमक हालचाली केल्या.

**बऱ्हाणपूर** : शिवाजी महाराजांनी आपल्या शेवटच्या काळात (सन १६७९–८०) मुघली हद्दीत लूटमार करणे, मुलूख उद्ध्वस्त करणे इत्यादी गोष्टी सुरू केलेल्या होत्या. गादीवर आल्यावर संभाजीने आपल्या वडिलांच्याच धोरणाचा अवलंब केला. १६८० सालच्या नोव्हेंबर डिसेंबर महिन्यात हंबीररावाने बऱ्हाणपुरास जाऊन ते लुटले.[1] या लुटीची थोडीशी झळ तेथील इंग्रज वखार-वाल्यांनाही लागली होती. नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यात शिवाजीचे सैन्य बाहेर पडल्यामुळे चोपड्याजवळ भीतीचे वातावरण निर्माण झाल्याचे, मराठ्यांची एक तुकडी सुरतेवर, दुसरी बऱ्हाणपुरास आणि तिसरी बहाद्दूरखानाला हुलकावणी देत गुंतवून ठेवणार असल्याची बातमी चोपड्याच्या इंग्रजांनी आपल्या १०–११–१६८० च्या पत्रात नमूद केली होती.[2] संभाजीच्या सैन्याने धरणगाव लुटल्याचे आणि वखारीची बरीच नुकसानी केल्याचे धरणगावच्या वखारवाल्यांनी आपल्या ११–२–१६८१ च्या पत्रात कळविले होते.[3] या लुटीची विस्तृत हकीकत खाफीखानाने दिलेली आहे. याशिवाय यासंबंधी अखबारात माहिती दिलेली आहे. जेधे शकावली आणि अखबारात बऱ्हाणपूरच्या लुटीचे उल्लेख आहेत. खाफीखानाने बऱ्हाणपूरच्या लुटीचे वर्णन दिलेले आहे. खाफीखान लिहितो, "बऱ्हाणपूरला खानजमान हा सुभेदार होता. त्याचा नायब काकरखान अफगाण हा जिजिया कराच्या वसुलीच्या कामावर होता. बऱ्हाणपुरात त्यावेळी तोच हजर होता. त्याच्यापाशी दोनतीनशेपेक्षा अधिक स्वार नव्हते. सुमारे वीस हजार स्वारांनिशी तो दुष्ट संभाजी वऱ्हाडात उच्छाद घालीत फिरत होता. बुऱ्हाणपुरा-पासून वऱ्हाडचा सुभा पस्तीस कोसांवर आहे. तो मुलूख उद्ध्वस्त करून तो पस्तीस कोसांची मजल मारून एकाएकी बुऱ्हाणपुरावर चालून आला. काफरांची फौज कुठल्याही दिशेने बुऱ्हाणपुरावर येईल अशी मुळीच कल्पना नव्हती. तशी बातमीही पसरली नव्हती. बुऱ्हाणपुरापासून दीड कोसावर बहाद्दुरपुरा म्हणून एक पुरा आहे. तो अतिशय संपन्न होता. लक्षाधीश असे सराफ सावकार तेथे राहात. देशोदेशीचे जिन्नस, जडजवाहीर, सोने, नाणे, रत्ने असा लक्षावधी रुपयांचा माल येथील दुकानांतून साठविला होता. शहराच्या तटबंदीच्या बाहेर

१. शिचप्र, पृष्ठ ३१

२. FR : Chop to Sur, 10–11–1680

३. FR : Dur to Sur, 11–2–1681

बहाद्दुरपुरा आणि इतर सतरा पुरे होते. त्यांना मराठ्यांनी घेरले. विशेषतः बहाद्दुरपुऱ्यावर ते इतक्या अनपेक्षितपणे तुटून पडले की त्या पुऱ्यातून एक माणूस किंवा एक पैसा लोकांना हलविता आला नाही. पुऱ्यात आगी लागून त्यांचा धूर आकाशापर्यंत पोचला. तेव्हा कुठे बऱ्हाणपूरचा नायब आणि शहरातील इतर लोक यांना मराठे आल्याची खबर कळली. काकरखानाला मराठ्यांचा प्रतिकार करण्याची शक्ती नव्हती. त्याने शहराचे दरवाजे बंद केले आणि तट, बुरुज, वेशी इत्यादींचा बंदोबस्त करू लागला. हसनपुरा, शाहगंज, शहाजहानपुरा, खुर्रमपुरा, नबाबपुरा इत्यादी सतरा पुरे शहराच्या तटाला लागून होते. ती जणू काही शहराची केंद्रे होती. प्रत्येक पुऱ्यात लाखो रुपयांचा माल सराफ, व्यापारी इत्यादींच्या पाशी होता. मराठ्यांनी ते सर्व पुरे ताब्यात घेतले. त्यांची लूट करून त्यांना आगी लावून दिल्या. काही अब्रूदार माणसांनी आपल्या बायकांना ठार मारले आणि ते स्वतः लढत लढत मारले गेले. कित्येक जण परमेश्वरावर हवाला ठेवून बसले. शहराच्या तटाला लागून असलेले अनेक लोक आपल्या बायकापोरांना घेऊन त्या भयंकर संकटातून मोठ्या कष्टाने निघून शहराच्या आत पोचले. तीन दिवसपर्यंत मराठे निःशंकपणे पुरे लुटीत होते. त्यांना मुबलक लूट मिळाली. अनेक वर्षांची जमिनीखाली पुरलेली संपत्ती त्यांच्या हाती पडली. या संपत्तीचा घरमालकांनाही पत्ता नव्हता. ती मराठ्यांनी शोधून काढून हस्तगत केली. मराठ्यांनी शिड्या लावून तटावर चढण्याचा प्रयत्न केला. शहरातील सर्व मन्सबदारांनी वेशी, तट, बुरुज इत्यादी ठिकाणी मोर्चे बांधून निकराने मराठ्यांचा प्रतिकार केला. त्यामुळे ते शहरात दाखल होऊ शकले नाहीत. मराठ्यांनी सोने, चांदी, जडजवाहीर आणि मूल्यवान सामान घेतले. इतर जिनसांची त्यांनी पर्वा केली नाही. त्यांनी भांडीकुंडी, काचेचे सामान, धान्य, मसाले, वापरलेली वस्त्रे इत्यादी सर्व लुटली होती पण ती वाहून नेणे शक्य नाही म्हणून त्यांनी ते सामान टाकून दिले व नंतर ते निघून गेले. ते गेल्यानंतर रस्त्यात जळलेल्या आणि इतर वस्तूंचा इतका सडा पडला होता की, त्याचे वर्णन करणे अशक्य आहे.

मराठे बऱ्हाणपूरच्या भागात पसरल्याची बातमी हेरांच्या द्वारे औरंगाबादेस सुभेदार खानजहानबहाद्दूर कोकलताश याला कळली. त्याने ताबडतोब कूच करून तीन चार दिवसांचा मार्ग एका दिवसात आक्रमिला. तो फर्दापूरच्या घाटापाशी पोहोचला. औरंगाबादेहून हे ठिकाण ३२ कोसांवर आहे. सैन्य कूच करून येत होते त्याच्या हालचालीसाठी आणि जनावरांना विश्रांती देण्यासाठी म्हणून खानजहान तेथे तीन-चार प्रहर थांबला.

पण खानजहानाच्या हितशत्रूंनी उठविले की, संभाजीचा वकील खानजहान याला भेटला. त्याने त्याला भक्कम पैसे चारले आणि चारपाच प्रहर आपण येथेच रेंगाळावे म्हणून खानजहानला विनंती केली. मराठ्यांच्यापाशी लुटीचे ओझे बरेच

होते. खानजहान आपल्या पाठलागावर आहे याची बातमी त्यांना लागली होती. त्यांचे किल्लेही दूर होते. तेथपर्यंत पोहोचणे त्यांना शक्य नव्हते पण त्यातल्या त्यात जवळ असलेला त्यांचा किल्ला म्हणजे साल्हेरचा असून तो बागलाणात होता. मराठे परगणे चोपडा ऊर्फ मुस्ताफाबादच्या वाटेने चालले होते.

अशा स्थितीत खानजहानने फर्दापूरहून डावीकडे वळून धरणगाव आणि चोपडा या गावांची वाट धरून काफरांचा मार्ग अडविण्यास हवा होता. पण गनिमाच्या वकिलाच्या विनंतीवरून तो सारासार विचाराच्या विरुद्ध वागून उजवीकडच्या वाटेने एदलाबादकडे रवाना झाला. गनिमांनी ही बातमी ऐकली. बरे झाले असे त्यांना वाटले. बरोबर असलेली सोने-चांदी इत्यादींची लूट जितकी त्यांना नेता आली तितकी त्यांनी नेली. त्यांनी सगळे कैदी बरोबर घेतले. खानजहान बऱ्हाणपूरला जाऊन पोहोचेपर्यंत मराठे चोपड्याच्या वाटेने तडक निघून चार-पाच दिवसांत साल्हेरला पोहोंचले.

बऱ्हाणपूरचे प्रतिष्ठित नागरिक, मौलवी, विद्वान् इत्यादींनी बादशहाकडे एक अर्जी पाठविली. काफरांचा जोर झाला आमची अब्रू आणि संपत्ती नष्ट झाली. यापुढे शुक्रवारची नमाज बंद पडेल असे अर्जीत लिहिले होते. यावर बादशहाने खानजहानाला चिडून पत्र लिहून कळविले की, दक्षिणेत काफरांचा बीमोड करण्यासाठी मी स्वतः येत आहे. बादशहा खानजहानावर अतिशय चिडला. त्याला मन्सबीची वाढ झाली होती, ती त्याने वहिवाटीविरुद्ध नामंजूर केली. दक्षिणेतील उच्छाद आणि शहाजादा अकबर याचें पलायन या दोन्ही गोष्टींचा विचार करून बादशहाने आपले डेरे बऱ्हाणपुराकडे पाठविण्याचा हुकूम केला.[१]

सुलतान अकबराने आपल्या वडिलांना लिहिलेल्या पत्रात बऱ्हाणपूरच्या लुटीची हकीकत लिहिली आहे. तो म्हणतो, "दक्षिण प्रांताची अशीच दुर्दशा झाली आहे. वास्तविक पाहता हा विस्तीर्ण दक्षिण प्रदेश म्हणजे भूवरील स्वर्गच होय. आणि बऱ्हाणपूर म्हणजे विश्वरूपी सुंदरीच्या गालावरील तीळ होय. पण ते शहर आज उद्ध्वस्त होऊन गेले आहे.[२] या वर्णनावरून मराठ्यांनी बऱ्हाणपूरची किती शोचनीय स्थिती केलेली होती हे ध्यानात येते. मराठ्यांनी बऱ्हाणपूरचे केलेले नुकसान पाहून औरंगजेबाने खानजहानबहाद्दुरची बऱ्हाणपुराहून बदली केली, आणि त्या जागी ईरजखानाची नेमणूक केली.[३]

१६८० सालाच्या नोव्हेंबर, डिसेंबर महिन्यात मराठयांनी सुरू केलेली लूट पुढे बरेच दिवस चालू होती. त्याचे परिणाम त्या परिसरातील डचांच्या व्यापारावर पुढे सहा महिने झाले. उत्तरेतील रजपुतांच्या हालचालींमुळे आग्रा आणि

१. मस्वायु–प, पृष्ठे २ ते ४ २. मोमसं–प, पृष्ठ ६०

३. मवऔ–प, पृष्ठ २०

अहमदाबाद येथील मार्गात सुरक्षितता नव्हती. रस्ते जवळजवळ बंद झाले होते. त्यामुळे डचांना सर्व माल बऱ्हाणपूरमार्गे न्यावा लागत होता. परंतु संभाजी राजांनी बऱ्हाणपुरावर हल्ला केल्यामुळे त्यांना त्या मार्गानेही मालाची ने-आण करणे धोक्याचे झाले होते. १६८१ सालच्या जून महिन्यापर्यंत त्यामुळे डचांच्या व्यापाराचे बरेच नुकसान झाले.

बऱ्हाणपूरच्या लुटीनंतर परत येताना संभाजी राजे आपल्या सैन्यासह सुरतेपासून पाच कोसांवरच्या प्रदेशात थांबले. त्यांनी तो प्रदेश लुटून गाजियापूर ( Gasiapoor ) शहराला आग लागली. तेथील रहिवाशांनी या कृत्याचे कौतुक केले होते.[१]

ईरजखानाला बऱ्हाणपूरचा सुभेदार नेमले होते; परंतु त्याला तेथून वऱ्हाडच्या सुभेदारीवर पाठवून त्याच्या जागी दि. १ जुलै १६८१ रोजी खान-जमातखानाला नेमण्यात आले.[२]

संभाजी राजांनी बऱ्हाणपूरच्या भागात केलेल्या लुटीचा बंदोबस्त करण्यासाठी आणि अकबराला पकडण्यासाठी औरंगजेब निघाला आणि तो दि. १३–११–१६८१ रोजी बऱ्हाणपूरला पोहोचला. तो तेथे येऊन राहिला तरी मराठ्यांनी त्याला न जुमानता पूर्ववत् चढाई चालूच ठेवली होती. ते बऱ्हाणपूर आणि भोवतालच्या प्रदेशाची नासधूस करीतच होते. दि. २३–११–१६८१ ला बऱ्हाणपुरातील राजवाड्याला ( किले अर्क ) लागून असलेल्या दोन कोठारात दारूचा स्फोट झाला. त्यामुळे बरीच माणसे ठार झाली. त्याच रात्री लालबागेजवळ असलेल्या लुत्फुल्लाखान कोका याच्या तळावर डाका पडला. सहा माणसे मारली गेली; वीस जखमी झाली आणि तेथील मालमत्ता लुटण्यात आली.[३] या हालचाली मराठ्यांच्याच होत्या.

डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यात मराठ्यांनी बऱ्हाणपूर गावातील बहाद्दुरपुरा पूर्णपणे लुटला. तेथे अनेक सावकार राहात आणि देण्याघेण्याचे अनेक व्यवहार होत. मराठ्यांनी वरच्यावर लूटमार केल्यामुळे बऱ्हाणपुऱ्यातील रहिवाश्यांनी तेथे एक तटबंदी ( किल्ला ! ) करावी म्हणून सुचविले होते. त्यामुळे औरंगजेबाने मुहम्मद अलीखानाला तेथील जागेची पाहणी करण्यासाठी धाडले. त्याने जागा पाहून किल्ला बांधावयास तेथे सोयीची जागा नसल्याचे कळविले होते. शेवटी बहाद्दूरपुऱ्यातून बऱ्हाणपुरातील तटबंदीत येऊन सावकारांनी आपला धंदा करावा असे सांगण्यात आले.[४]

१. DR–DR, Vol 29; 18–20 June, 21st June, 19th July 1681, pp 379, 382, 427

२. मवऔं–प, पृष्ठ २०     ३. मवऔ–प, पृष्ठ २१     ४. अखबार :

१६८२ सालच्या फेब्रुवारी महिन्यापर्यंत विजापूरच्या राज्यावर आक्रमण करण्यासाठी आणि संभाजीराजांच्या हालचालींवर नजर ठेवण्यासाठी औरंगजेब बऱ्हाणपुरातच राहिला होता. मराठी मुलखातील सर्व प्रदेशावर त्याने सैन्य रवाना केले होते. यामुळे मंदावलेल्या डचांच्या व्यापाराला पुन्हा तेजी आली होती. परंतु संभाजी, रजपूत आणि मुघल यांच्या व्यापारी काफिल्यावरील ( Trade Kafilas ) हल्ल्यामुळे व्यापाऱ्यांना अडथळा निर्माण होऊन त्यांचे बरेच नुकसान झाले होते.[१]

**वऱ्हाडातील लूट :**

१६८० आणि १६८१ सालांमध्ये बऱ्हाणपूर लुटून धुमाकूळ उडवून दिल्यानंतर मराठ्यांनी आपला मोर्चा वऱ्हाडात वळविला. यावेळी औरंगजेबाचा आणि मराठ्यांचा संघर्ष सुरू होण्याच्या बेतात होता. अशा वेळी संभाजी आणि मराठी फौजांनी न डगमगता मुघली प्रदेशात चढाईचे धोरण चालूच ठेवले होते. १६८१ सालात मराठे बऱ्हाणपुरातून वऱ्हाडात पोहोचले. १६८१ सालच्या डिसेंबर महिन्यात अकोला जिल्ह्यातील मूर्तिजापूर तालुक्यातील कारंजा आणि खकूलो ( ? ) येथे लूटमार करावयासाठी मराठे गेले. ही बातमी कळताच वऱ्हाडचा सुभेदार ईरजखान ताबडतोब तेथे गेला. मराठे लूट घेऊन जात असता ईरजखानाने त्यांना अडविले, काहींना मारले व जखमी केले. त्याने मराठ्यांच्या हातून लुटलेले सामान काढून घेण्याचा प्रयत्न केला. तो त्यांचा पाठलाग करीत राहिला.[२]

येथून मराठ्यांची फौज मलकापूरला गेली. मलकापूर कारंजाच्या नैर्ऋत्येस मूर्तिजापूर तालुक्यात ३ मैलांवर आहे. त्यांच्याशी मुकाबला करण्यासाठी रुहुल्लाखान तीनचार हजार स्वार घेऊन तेथे पोंचला. त्याच्या मदतीसाठी अब्दून-नबी कामदद यालाही धाडण्यात आले होते. डिसेंबरच्या अखेरीस किंवा जानेवारी महिन्याच्या प्रारंभी त्यांच्यात मलकापूरपासून सात कोसांवर धामणगाव येथे लढाई झाली. यानंतर मराठे कारंजाच्या बाजूला पळाले. मराठे आणि मुघल यांच्यात शिवाशिवीचा खेळ चालू राहिला. मराठे कारंजापासून वीस कोसांपर्यंत पौसाना घाटापर्यंत पळत राहिले. तेथील एका गढीत मराठे व मुघल यांच्यात लढाई झाली. मराठे लूट घेऊन पळाले. रुहुल्लाखानाने मराठ्यांकडून परत हस्तगत केलेली लूट व सामान ईरजखानाकडे सोपवून तो मलकापूरला निघून गेला.[३]

**चौथाईची वसुली आणि लूट :**

मलकापूरच्या लुटीनंतर मराठे चौथाईच्या वसुलीसाठी गेले असता त्यांच्यात आणि बहरोजखान व अतिशखान यांच्यात कासा व थालैना (थालेनो ?)

१. DR–DR, Vol 24, 26, 30, May 1682, p 580, 647

२. अख : १–१–१६८२

३. अख : १०–१–१६८२

येथे झटापट उडाली. खानाने जासूदांना सूचना देऊन हल्ला केला. त्यात मराठ्यांकडील १००० माणसे मेली. मुघलांच्या हातात बरेच समान पडले.[१] वऱ्हाडात मराठे लुटालूट करीत असता त्यांच्यातील एक तुकडी चांदा जिल्ह्यातील खुद्द चांदा येथे पोचली. तेथील जमीनदार रामसिंग हा त्यावेळी तेथे हजर नव्हता. तो तेथे परतण्यापूर्वीच मराठ्यांनी चांदा येथे लुटालूट केली. रामसिंग आणि मराठ्यांच्या सैन्यात झटापटी झाल्या. रामसिंगाच्या सैन्यातली १५० व मराठ्यांची ५०० माणसे मारली गेली. शाही फर्मान मिळून वऱ्हाडचा सुभेदार ईरजखान आपल्या मदतीस येईल असे त्याला वाटत होते.[२]

वऱ्हाडात मराठ्यांनी धुमाकूळ घातला होता. काही ठिकाणी ते चौथाई वसूल करीत तर काही ठिकाणी लुटालूट करीत होते. अकोला जिल्ह्यात लूट केल्यानंतर १६८२ सालच्या फेब्रुवारी महिन्यात मराठे बालाघाट (मेहेकरजवळ) आणि देवलगाव येथे गेले. तेथे त्यांनी चौथाई वसूल केली. हे कळताच ईरजखानाला लिहिण्यात आले की त्याने मराठ्यांचा पूर्ण बंदोबस्त करावा व काय करीत आहे ते कळवावे.[३]

१६८२ सालच्या एप्रिल महिन्यातील पहिल्या आठवड्यात नागोजी बल्लाळ हा १२००० फौज घेऊन बुलढाण्यातील मेहेकर येथे गेला. त्याने त्या भागात बरीच लूट केली, आणि लुटलेले सामान व जनावरे खोलापूर परगण्यापर्यंत नेले. (यवतमाळ जिल्हा, दारव्हा तालुका). ही बातमी समजताच मुकर्रमखान २५ कोस चालत तेथे गेला. त्याने मराठ्यांना घेरले. मराठे आणि मुघल यांच्यात चकमकी उडाल्या.[४] नागोजी बल्लाळाची तुकडी वाशिम किल्ल्याजवळ जमली होती. त्यामुळे बालापूरहून ईरजखान आणि त्याच्या मदतीसाठी मुकर्रमखानही तेथे गेला. त्यांनी मराठ्यांबरोबर सामना दिला. दोन्ही बाजूंचे लोक जखमी झाले आणि मरण पावले.[५] हे दोघे आणि कादरखान यांनी बालापूरला ठाणे उभारले. बालापूरहून मराठे पळून गेले.[६]

याच सुमारास वऱ्हाडातून मुघलांचा खजिना अलाहाबादहून औरंगजेबाकडे पाठविण्यात येत होता. मराठे हा खजिना लुटण्याच्या विचारात आहेत असा जमीनदारांनी अर्ज केल्यामुळे सुभेदार सैफखान ३५ मैल दौड करून गेला आणि त्याने तो परत आणला.[७]

१. अख : १६–१–१६८२
२. अख : २९–१–१६८२
३. ,, : १५–२–१६८२
४. ,, : १२–४–१६८२
५. ,, : १५–४–१६८२
६. ,, : २०–४–१६८२
७. ,, : १९–४–१६८२

मराठ्यांनी मुघलांच्या प्रदेशातील समृद्ध गावांवर रोख धरला होता. अहमदाबादच्या जवळपास तालाब-साकोंदा ( सारोंदा ) येथे अनेक सावकार होते. मराठ्यांच्या ४० स्वारांच्या तुकडीने या सावकारांच्या हुंड्या वसूल केल्या. तेव्हा जमीनदार जसवंत याला हुकूम देण्यात आला होता की त्याने मराठ्यांकडून त्या हुंड्या हस्तगत कराव्या. त्याचप्रमाणे ते कोठून येतात व कोठे जातात याची त्याला चौकशी करण्यास सांगितलेले होते.[१]

मुघलांनी मराठी सरहद्दीवरील व इतर गडांना वेढे दिले होते. ते परतवून लावण्याच्या कामात मराठे गुंतले असले तरी मुघलांचा मुलूख उद्ध्वस्त करून तेथे लूटमार करण्याचे धोरण ठेवून त्यांच्या हालचाली चालूच होत्या. वऱ्हाड समृद्ध असल्यामुळे तेथे लूटमार करावयास मराठ्यांना चांगला वाव होता. अशा प्रकारच्या हालचालीत मराठ्यांचा दुहेरी फायदा होत असे. सैन्य वाढवून ते पोसण्यासाठी पैसा उपलब्ध होई आणि शत्रूच्या मुलुखातच जाऊन व्यापारी शहरांची नासधूस केल्याने शत्रूचेही चांगलेच नुकसान होत असे.

१६८३ सालच्या मार्च महिन्याच्या पहिल्या आठवड्यात खानजहान-बहादूरला मराठे वऱ्हाडात पोचल्याचे कळताच तो त्यांना तंबी देण्यासाठी गेला.[२] बऱ्हाणपूरचा नाजीम सय्यद मुनव्वरखान याला बातमी समजली की मराठ्यांची फौज अकोल्याकडे गेली आहे. आपल्या मुलांना अजिमुद्दीनाच्या चाकरीत ठेवून तो मराठ्यांना तंबी देण्यासाठी रवाना झाला.[३] यानंतर मराठ्यांची एक तुकडी बाळापूर जिल्ह्यात चौथ वसूल करण्यासाठी गेली. त्यामुळे बाळापूरचा फौजदार मुहम्मद हुसेन स्वारी करून तेथे गेला. परंतु मराठ्यांच्या लुटीपैकी त्याच्या हातात काहीच पडले नाही. फक्त दोन घोडे आणि पाच लोकांना त्याने पकडून नेले.[४]

मराठे जामोद्याजवळ चौथ वसूल करण्यासाठी गेले. तेव्हा तेथील फौजदार शेखजहा याने मुनव्वरखानास कुमक घेऊन बोलाविले. मुनव्वरखान स्वतः न जाता त्याने शेखजहा यालाच कुमकेस जाण्यास सांगितले. हुकुमाप्रमाणे तो ४–३–१६८३ ला येथे पोचला. मराठे आणि शेखजहा यांच्यात मोठी लढाई होऊन मराठ्यांकडील अनेक लोक मारले गेले; अनेक जखमी झाले. ७० घोडे-घोड्या, ४७ भाले इत्यादी सामान मुघलांच्या हातात पडले.[५] नेकराय आणि संभाजीचे चार सरदार यांनी मोठ्या जमिअतीसह बादशाही मुलखातील अकोला तालुक्यात मौजे मकनगाव येथील लोक आणि जनावरे लुटली. हे कळताच

---

१. अख : १–८–१६८२
२. अख : ३–३–१६८३
३. ,, : १०–३–१६८३
४. ,, : १२–३–१६८३
५. ,, : १८–३–१६८३

सैफुल्लाहखानाने मुखेडजवळील वाशिम गावाहून आपल्या लोकांसह शत्रूला तंबी देण्यासाठी स्वारी केली. मराठे आणि मुघलांच्यात चकमकी उडाल्या. दोन्ही बाजूंचे लोक जखमी झाले. मराठ्यांनी नेलेले लोक आणि जनावरे मुघलांनी परत मिळविली. सैफुल्लाहखान मराठ्यांचा पाठलाग करीत राहिला.[1]

यानंतर मराठे तळगाव जवळ गेले. तेव्हा खानजहान बहाद्दूर तेथे गेला. त्याने मराठ्यांबरोबर सामना दिला, तेव्हा मराठे चांद्याच्या वाटेने हैद्राबादेकडे निघून गेले.[2] खानजहान बहाद्दूर त्यांचा पाठलाग करीत राहिला. तळगाव जवळ मराठे गेले असताना वऱ्हाडचा सुभेदार ईरजखानाने स्वारी केली. तेथून काही मराठे एलिचपूरला गेले.[3]

मराठ्यांनी ठिकठिकाणी असे हल्ले चालविले असल्याने आणि मराठी मुलखात घातलेले वेढेही फारसे यशस्वी होत नसल्यामुळे औरंगजेब हैराण झाला होता. मराठ्यांच्या डावपेचांचे वर्णन त्याच्या कानावर जाताच त्याने मुकर्रमखान, शहाबुद्दीनखान, बहरोजखान आणि इतर अनेक अधिकाऱ्यांना मराठ्यांच्याकडील लोकांना कैद करावे किंवा त्यांचा पाठलाग करावा असे हुकूम दिले. मराठ्यांचे सैन्यबळ जास्त असेल तर मुघल अधिकाऱ्यांनी एकमेकांना मदत करून मराठ्यांना तंबी द्यावी. इतके करूनही मराठे वरील अधिकाऱ्यांच्या मुलखात शिरले तर औरंगजेबाने त्यांची मन्सब थांबविण्याची पूर्वसूचना दिलेली होती.[4]

मराठे आपल्या थोड्याशा सैन्याने चपळ आणि गनिमी हालचाली करून मुघलांना किती त्रासदायक होत याची यावरून कल्पना येते.

**धरणगाव :**

१६८५ साली औरंगजेब विजापूर व गोवळकोंडा घेण्यात गुंतला होता. ही संधी साधून मराठ्यांनी पुन्हा एकदा धरणगावावर चढाई केली. १६८५ च्या फेब्रुवारी महिन्याच्या पहिल्या आठवड्यात भिमाजी मोरे वऱ्हाडात गेला होता. तेथे एका मुघल अधिकाऱ्याने त्याचा पाठलाग केला, तेव्हा तो धरणगावला पोचला. धरणगावची लूट आणि जनावरे घेऊन जात असता सय्यद मुनव्वर-खानाने त्याचा पाठलाग केला. याच वेळी निळो मोरेश्वर आणि रंकराव हे दोघे सहासातशे स्वारांसह धरणगावला गेले. मराठ्यांनी सकाळी ८ वाजताच, जवळ थोडे सैन्य असूनही, शहर लुटून अनेक घरांना आगी लावल्या. मराठ्यांनी यावेळी धरणगाव येथील इंग्रजांची वखारही जाळली. ही लूट एक आठवडाभर चालू होती. या लुटीत इंग्रजांचे तीन-चार हजारांचे नुकसान झाले. औरंगजेबाने

१. अख : १९-३-१६८३
२. अख : २१-३-१६८३
३. ,, : २४-३-१६८३
४. ,, : १६८३

आपले अधिकारी धरणगावला धाडले. दि. ७–२–१६८५ रोजी मराठे व मुघल यांच्यात चकमकी उडाल्या.[१] मोठे मुघल सैन्य आल्यामुळे मराठे तेथून निघून गेले. लुटीपैकी मुघलांच्या हाती ५०० घोडे, भाले, छत्र्या इत्यादी सामान आले. मुघलांनी मराठ्यांचा १४ मैल पाठलाग केला. भिमाजी मोरे याने धरणगावच्या वायव्येस ४ मैलांवरील महानकला येथे आश्रय घेतला. भिमाजीच्या मदतीने किल्ल्यावरील गोलंदाजाने धुमधडाक्याने दारूचे गोळे फेकण्यास सुरुवात केली. त्यामुळे मुघलांनी एकदम हल्ला न करता, किल्ल्याच्या चारी बाजू रोखून धरल्या होत्या.[२] या लुटीचा स्थानिक लोकांवर बराच परिणाम झाला. धरणगावात घरे मिळणे दुरापास्त झाले. प्रांतातही बराच गोंधळ माजला होता. सर्व लोक हताश होऊन भयग्रस्त वातावरण निर्माण झाले होते. औरंगजेबाने आपला मुलगा सुलतान कामबक्ष याला १२ हजार स्वारांसह त्याला त्या प्रांताच्या संरक्षणासाठी पाठविले. या लुटीबद्दल सुरतकर इंग्रजांनी खेद व्यक्त केला होता.[३] काही घरे इंग्रजांची आहेत असे त्यांच्या एका नोकराने मराठ्यांना सांगितले. तरी त्याला दोन मराठी अधिकाऱ्यांच्या पुढे नेऊन, मारपीट करून, १०० रुपये आणि ५०० घोडे देण्याची लालूच दाखवून इंग्रज कोठे पळाले ही माहिती मिळविण्याचा त्यांनी प्रयत्न केला. त्याने माहिती पुरविली नाही तर त्याचे डोके उडविण्याचाही त्याला दम दिला. इंग्रज बऱ्हाणपूरला पळाले यापेक्षा त्याच्याकडून अधिक माहिती मिळत नाही असे ध्यानात येताच त्यांनी त्याचेच १५ रुपये काढून घेऊन त्याला हाकलून दिले. **एवढ्या थोड्या सैन्याने इतक्या थोड्या वेळात मराठ्यांनी बराच धुमाकूळ घातल्याचे** " त्यांनी नमूद केले आहे.

वऱ्हाड, खानदेश आणि बागलाणातील लुटीसंबंधी ईश्वरदास नागर लिहितो, "बादशहा विजापुरास होता (१६८५). तेव्हा त्याला वऱ्हाड, खानदेश आणि बागलाण या प्रांतांतून पुढील बातम्या कळविण्यात आल्या :– संभाजी आणि हंबीरराव हे आपल्या सैन्यासहित बादशाही मुलखात पसरले. त्यांनी गावेच्या गावे उद्‌ध्वस्त केली. विशेषतः त्यांनी मुसलमानांतील सय्यद, शेख, विद्वान मुल्ला–मौलवी यांची फारच दुर्दशा केली. पुष्कळ प्रतिष्ठित माणसे कोंकणात जाऊन राहिली होती, त्यांचा छळ करण्यात आला. मोंगल अधिकारी त्यांच्याशी लढले, पण त्यांपैकी कित्येकांना पकडण्यात आले. रस्ते बंद करण्यात येऊन, अनेकांना कैद करून त्यांना किल्ल्यात नेऊन छळण्यात आले. सारांश,

१. FR : 6–2–1685; 12–12–1685

२. अख : १२–२–१६८५

३. FR–Jetpad to Sur 12–2–1685; Sur to Dur 8–3–1685

मराठ्यांचा उच्छाद अतिशय झाला म्हणून त्यांचा मोड करण्यासाठी बादशहाने विजापुराहून प्रयाण केले. ''[१]

हंबीरराव १६८०–८१ आणि १६८५ या दोन वर्षांत वऱ्हाडात गेला होता. त्यावरून ईश्वरदास नागरने दिलेली माहिती वरील दोन हालचालींसंबंधी असावी असे वाटते.

**औरंगाबाद :**

ही मुघलांची दक्षिणेतील राजधानी होय. त्यावर मराठ्यांनी स्वारी केली होती. १६८१ ते ८३ पर्यंत मराठ्यांनी वऱ्हाडमध्ये मुघलांच्या प्रदेशात धुमाकूळ घातलाच होता. मुघलांच्या आक्रमणाला तोंड देत ते त्यांच्या भागात हल्ले करीतच होते. १६८१ च्या एप्रिल-मे महिन्यात मराठ्यांची एक तुकडी औरंगाबादच्या परिसरात गेली होती. तिने मुघलांचा प्रदेश उद्ध्वस्त केला. रणमस्तखान, मुझफ्फरखान, दाऊदखान आणि इतरांनी मराठ्यांशी सामना दिला. मराठ्यांनी केलेली लूट त्यांनी परत मिळविली.[२] जवळजवळ १५०० मराठे सैनिक मेले. राव अनुपसिंगाने मराठ्यांशी लढण्यात खूप शौर्य दाखविले[३] असा अखबारात उल्लेख असला तरी त्या संबंधात सुलतान अकबराचे पुढे दिलेले पत्र अधिक बोलके आहे.

औरंगाबादच्या या लुटीचे वर्णन भीमसेन सक्सेनाने केलेले आहे. त्याचे घरही तेथे होते. तो लिहितो, '' बहादुरखानाने औरंगाबादपासून सोळा कोसांवर बाबुळगाव येथे आपली छावणी केली. रात्रीचा प्रहर राहिलेला असताना बातमी आली की, मराठे अहमदनगर आणि मुंगीपैठण या मार्गाने येत असून औरंगाबादवर हल्ला करण्याचा त्यांचा हेतू आहे. बहादुरखानाने त्याच वेळी निघण्याची तयारी केली. बाजारबुणगे मागाहून आणण्याची त्याने ताकीद केली. त्यांच्या रक्षणासाठी त्याने थोडे सैन्य मागे ठेवले आणि तो दुपारी तातडीने निघून औरंगाबादेस पोहोचला. तो इतक्या तातडीने आला नसता तर अनर्थ ओढवला असता. बाईपुऱ्याच्या उपनगरात आणि जवळील सातारच्या खेड्यात मराठ्यांचे सैन्य जमले आहे अशी बातमी आली. राजा अनूपसिंग तयार होऊन आपल्या पुऱ्यातच उभा राहिला. पुढे चाल करून जाणे त्याच्याने शक्य होईना. बहादुरखान तातडीने पोहोचला पण तो येण्यापूर्वीच मराठे बाईपुऱ्यापर्यंत चाल करून आले होते. त्यांनी तेथे धामधूम माजविली पण बहादुरखानाशी युद्ध न करता ते निघून गेले. बहादुरखानाने जसवंतसिंगाच्या तलावाच्या काठावर आपला तळ दिला.

१. मोमसं–प. पृष्ठे २७–२८
२. अख : एप्रिल–मे, १६८१
३. अख : २४–१०–१६८१

माझ्याबरोबर बायका माणसे होती. मी मध्यान्हाच्या वेळी औरंगाबादेत दाखल झालो. जे दृश्य दिसले ते विलक्षण होते. लोकांनी आपापल्या घरांचे दरवाजे बंद केले होते. ते आपापल्या वाड्यात तयार होऊन उभे होते. बाजारात आणि गल्ल्यातून मनुष्य दिसत नव्हता. कोतवालीच्या ओट्यावर मला फक्त तीन शिपाई बसलेले आढळले. माझा चुलत भाऊ हरराय आणि इतर हे औरंगाबादेत होते. माझ्या येण्याने ते निश्चित झाले.

पावसाळा आला म्हणून बहाद्दुरखान औरंगाबादेतील जुन्या राजवाड्यात राहू लागला. मराठ्यांची धामधूम पाहता औरंगाबाद शहराभोवती तट बांधावा अशी बादशहाने आज्ञा केली. हे काम बहाद्दुरखानाने हाती घेतले.

मी बऱ्याच दिवसांनंतर औरंगाबादेस आलो होतो. आमच्या घराची डागडुजी करणे मला आवश्यक वाटले. माझे चुलते धर्मदास यांच्या सल्ल्याने मी घराच्या डागडुजीचे काम हाती घेतले, पावसाळ्यातही बांधकाम चालू होते. मला या कामावर बराच खर्च आला." [१]

या वर्णनावरून औरंगजेब बादशहाच्या नावाने वसविलेल्या शहराची मराठ्यांनी कशी अवस्था केली होती आणि मराठ्यांचे आक्रमक धोरण औरंगजेबाला कसे आणि किती त्रासदायक होत होते याची चांगली कल्पना येते.

मराठ्यांनी औरंगाबाद शहरावर केलेल्या हल्ल्याचे वर्णन सुलतान अकबराने आपल्या वडिलांना–औरंगजेबाला–लिहिलेल्या पत्रात केले आहे. तो म्हणतो, " औरंगाबाद शहर हे आपल्याच नावाने वसविण्यात आले आहे. पण शत्रूच्या सैन्याच्या आघाताने ते पाऱ्यासारखे अस्थिर झाले आहे. " [२] ऑक्टोबर महिन्यात मुहम्मद आजमशहा औरंगाबादला जाणार होता. तेथे तो पोचताच खानजहानबहाददूरही मराठ्यांना तंबी देण्यासाठी निघणार होता. [३]

१६८२ च्या एप्रिल महिन्यात मराठे जालनाच्या बाजूस चौथाईच्या वसुलीसाठी गेले. जालना शहर औरंगाबादच्या पूर्वेस २० मैलांवर आहे. १०००० मराठे सैनिक जालना येथे गेले. त्यांनी जालना येथील शेख जान मुहम्मद या फकीराला निरोप पाठविला की त्याच्या रक्षणाखाली आलेल्या लोकांना बाहेर काढावे. सरदार संभाजीने ( आका ? ) सांगितले आहे की फकीराची भीड न बाळगता चौथ वसूल करा. फकिराने मराठ्यांना निरोप दिला की माझ्या

१. मोआम–प, पृष्ठ ७५–७६


२. मोमसं–प, पृष्ठ ६०

३. अख : ३१–१०–१६८१

आश्रयाखाली आलेल्या लोकांना मी काढून कसे टाकू ? त्याने मराठ्यांना जाण्यास सांगितले तेव्हा त्यांनी जालना शहर लुटले. आग लावली; तेथील लोकांना मारले; हातात आलेले सामान लुटले.[१] अशा चकमकीत मराठे मुघलांच्या हाती सापडत किंवा मुघल अधिकारी मराठ्यांच्या हाती पडत. १६८२ च्या ऑगस्ट पूर्वी झालेल्या हालचालीत कन्नडचा ठाणेदार शहा अलीलनरा जखमी झाला. मराठ्यांनी त्याला कैद करून नेले. तो ऑगस्टमध्ये मराठ्यांच्या कैदेतून सुटला आणि खानजहानबहाद्दूरला मिळाला.[२] ऑगस्ट महिन्याच्या सुरुवातीस मराठ्यांची एक तुकडी अन्तूर भागात ( औरंगाबादपासून ४० मैल, कन्नडच्या ईशान्येस ६ मैल ) शिरली असता तेथील ठाणेदार अहमद याने मुकाबला केला. मराठ्यांनी काही वेळ पळाल्यासारखे केले; परंतु १०–१२ हजारांची जमीयत पुन्हा तेथे गेली. ते लूटमार करणार होते. इतकी मोठी फौज आलेली पाहताच अन्तूरचा ठाणेदार घाबरला. त्याने लिहिले की जर मला वेळेवर कुमक आली नाही तर मराठे या ठाण्यावर कबजा करतील आणि मी बरबाद होईन. तेव्हा शहाबुद्दीनखानाला त्याच्या मदतीस जाण्यास सांगण्यात आले. तो लगेच मदतीसाठी रवाना झाला. परंतु मराठ्यांच्या इतक्या ठिकाणी हालचाली सुरू होत्या की त्यामुळे मुघलांच्या अधिकाऱ्यांची धावपळ होत असे. एके ठिकाणी जावयाचा हुकूम व्हावयाचा तोच दुसरीकडे जावे लागे. शहाबुद्दीनखानाला ताबडतोब अहमदनगरला जाण्यास कळविण्यात आले. मराठे अन्तूरमध्ये शिरले तेव्हा अब्दुल अजीजखानाचा मुलगा अब्दुल खैरखान लोकांसह तेथे वेळेवर पोचला. त्याने आणि अहमद याने मराठ्यांशी सामना दिला.[४] ऑक्टोबर महिन्याच्या अखेरीस मराठे अन्तूरहून वैजापूरकडे लूटमार करण्यासाठी गेले, म्हणून खानजहान बहाद्दुरचा मुलगा मुजफरखान याला तेथे नेमले.[५]

१६८२ सालच्या डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यात चौथ वसूल करण्यासाठी मराठे पुन्हा जालनाच्या परिसरात गेले. त्यांनी बीदर ( पूर्वीच्या हैद्राबाद राज्यात आणि आता म्हैसूर राज्यात असून महाराष्ट्रातील उस्मानाबाद जिल्ह्याला लागून आहे. ) येथील चौथाईच्या वसुलीसाठी काही गावे लुटली. जनावरे व पुष्कळ सामान घेऊन ते वऱ्हाडकडे निघून गेले. मुकर्रमखानाने ही बातमी कळूनही मराठ्यांचा बंदोबस्त केला नाही म्हणून त्याची मन्सब कमी करून त्याला बादशहाने भेटीस बोलाविले.[६]

१. अखं : ६–४–१६८२
२. अखं : २२–८–१६८२
३. ,, : २१–९–१६८२
४. ,, : ३–१०–१६८२
५. ,, : ३१–१०–१६८२
६. ,, : १६–१२–१६८२


मराठ्यांची मोगल प्रदेशावर चढाई
चोपडा
बऱ्हाणपूर
धरणगांव
एदलाबाद
अकोट
तळेगांव
खोलापूर
अमरावती
धुळे
एरंडोल
जळगांव
मलकापूर
दर्यापूर
एलिचपूर
धामण
अकोला
मुर्तिजापूर
धामणगांव
फर्दापूर
अजंठा
बुलढाणा
बाळापूर
करंजा
अंतोर
कन्नड
सिलोड
चिखली
संगळूरपीर
बाघाकडे
मेहकर
वेरूळ
देऊळगाव राजा
वाशिम
दौलताबाद
वैजापूर
औरंगाबाद
जालना
पिंपळगाव राजा
गंगापूर
अंबड
सारंगपूर
नेवासे
पैठण
५० कि.मी.
५० मैल.
०
०

१६८३ च्या जानेवारीत खानजहानबहाद्दूर बादशहाला भेटण्यासाठी औरंगाबादपासून तीन कोसांवर आला असता बादशहाने त्याला भेटीस न येता बीदरच्या बाजूला कूच करण्याचा हुकूम पाठविला.[१]

१६८३ च्या फेब्रुवारी महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात ७००० मराठे जालनापासून १४ मैलांवर गेले. त्यांनी प्रवाश्यांचे उंट वगैरे लुटून चौथ वसूल केली.[२]

यानंतर मराठ्यांनी जालनापासून २४ मैलांवर असलेले शहा आलमचे हत्ती आणि बहुतेक लोकांचे उंट लुटून नेले. त्या जिल्ह्यात फौजदारीवर अमानतखानाचा मुलगा होता. त्याने मराठ्यांनी लुटून नेलेला माल परत मिळवावा नाही तर स्वतः त्याची भरपाई करावी असा हुकूम देण्यात आला. त्याच्या हातून मराठ्यांचा बंदोबस्त होऊ शकणार नाही म्हणून बुणग्यांना पाठीमागे ठेवून मामूरखानाला जालन्याकडे जाऊन मराठ्यांना तंबी देण्यास सांगण्यात आले.[३]

भीमसेन सक्सेना नांदेड येथे जाऊन राहिलेला होता. मराठ्यांच्या या भागातील हालचालीसंबंधी तो लिहितो, "मराठे नांदेड भागात पसरले. त्यांचा मोड करण्यासाठी शहाजादा मुअज्जम याचा मुलगा शहाजादा मुइज्जुद्दीन याला बादशहाने तिकडे रवाना केले. बहाद्दूरखानाने शहाजादा मुइज्जुद्दीन याच्या बरोबर राहावे अशी आज्ञा झाली. बहाद्दूरखानाने आपले बाजारबुणगे बोलावून घेतले व औरंगाबादपासून १६ कोसांवर गोदावरीच्या काठी रामइ मुक्कामी शहाजादा मुइज्जुद्दीन याची गाठ घेतली.

शहाजादा मुइज्जुद्दीन याने नांदेड येथे काही दिवस मुक्काम केला. नांदेडचा फौजदार रशीदखान हा शहाजाद्याबरोबर बीदरपर्यंत गेला. त्या दिवशीच बातमी आली की बादशहाचे आणि शहाजादा मुअज्जम याचे हत्ती चरण्यासाठी म्हणून पाथरी भागात ठेवण्यात आले होते त्यांच्यावर मराठ्यांनी हल्ला केला. हे ऐकून बहाद्दूरखानाने शहाजाद्याला बाजारबुणग्यांसह बीदरजवळ सोडले. तो निवडक सरंजाम घेऊन निघाला. इतक्यात बातमी आली की, मराठ्यांनी हत्ती हाकलून नेले...जड सामान नांदेडचा फौजदार रशीदखान याच्याकडे रवाना करून बहाद्दुरखानाने मराठ्यांचा पाठलाग करून हत्ती सोडविले. मराठे पळून गेले. जाता जाता ते काही हत्ती घेऊन गेले. बहाद्दुरखान मराठ्यांच्या पाठलागावर निघाला...गोवळकोंड्याच्या सरहद्दीजवळ त्याने मराठ्यांना गाठून बाकीचे हत्ती सोडविले...या मोहिमेत सैनिकांना अतिशय त्रास झाला. बहाद्दुरखानाचा

१. मवऔ –प, पृष्ठ १४

३. अख १–३–१६८३

२. अख : २७–२–१६८३

तंबूही त्याच्याबरोबर नव्हता. जेवणाखाण्याचेही हाल झाले. मोहिमेत अनेक सैनिक ठिकठिकाणी मागे राहात गेले. ते बऱ्याच दिवसांनी छावणीत आले.'[1]

पुढे एक वर्षभर मराठ्यांच्या या भागातील हालचाली मंदावल्या होत्या, त्या १६८४ मध्ये पुन्हा सुरू झाल्या. बीड जिल्ह्यात लढाई केल्यानंतर मराठ्यांची फौज औरंगाबाद जिल्ह्यातील आंबड तालुक्यात आंबडच्या ईशान्येस ४ मैलांवर असलेल्या सारंगपूर गावात शिरली. मुझफरखान मराठ्यांचा पाठलाग करीत होता. त्याची मराठ्यांशी लढाई झाल्यावर मराठे पैठणच्या भागात गेले. बहरामंदखानाला त्यांचा मोड करण्यासाठी रवाना करण्यात आले.[2] खानजहान बहादूरचा मुलगा मुझफरखान सारंगपूरला पोचला. रात्रीच्या वेळी त्याने बुणग्यांवर हल्ला केला.[3]

मराठ्यांनी १६८५ साली पुन्हा बऱ्हाणपूरवर चढाई केली. त्याच वेळी ते जानेवारी महिन्यात जालन्याजवळील गड उतरून जालन्याच्या ईशान्येस ३–४ मैलांवर असलेल्या कदिराबादच्या जवळपास लूटमार करण्यास निघणार होते. त्यामुळे सैय्यद ओगलान सैन्यासह तेथे पोचला.

मराठ्यांची फौज बरीच असून त्या प्रमाणात माझ्याजवळ सैन्य कमी आहे असा अर्ज कादिराबादपासून ४ मैलांवर येताच त्याने केला. त्यामुळे शहाआलम बहाद्दुर याचा बक्षी मुलतफतखान याला कादिराबादच्या जवळ जाण्यास हुकूम देण्यात आला.[4] हा सरदार तेथे पोचण्यापूर्वीच मराठे तेथून निघून गेले. कादिराबादच्या बाजूला गस्त घालण्यासाठी गझनफरखान तेथे गेला. त्याने मराठ्यांचा पाठलाग चालू ठेवला. मराठ्यांचा पाठलाग करीत कोठपर्यंत जावे हे त्याला कळेना. त्याने भीमा नदीपर्यंत जावे आणि मराठे भीमा ओलांडून पलीकडे गेले नसतील तर त्यांना तंबी द्यावी, असा त्याला हुकूम देण्यात आला.[5]

अशा प्रकारे १६८१ सालापासून १६८५ पर्यंत मुघलांच्या हद्दीत शिरून लूटमार करीत, छापे घालीत, माघार घेत पळून जाऊन आणि संधी मिळताच पुन्हा फिरून मुघलांचे अनेक सरदार आणि बरेच मोठे सैन्य इकडे गुंतवून ठेवण्याची योजना राजांनी आखलेली असावी असे दिसते.

## मराठा–मुघल संघर्ष : भाग २ रा

मराठा-मुघल संघर्षापैकी स्वराज्यातील पश्चिम महाराष्ट्राच्या मध्य भागातील हालचाली फार महत्त्वाच्या आहेत. औरंगजेबाने ज्यावेळी साल्हेर, रामसेज आणि

१. मोआम–प, पृष्ठ ८२–८३ २. मवऔ–पं, पृष्ठ २६
३. अख : ८–१–१६८४ ४. अख : २१–१–१६८५
५. ,, : ३१–१–१६८५, १–२–१६८५

नाशिक जिल्ह्यातील गडकोटांवर आक्रमण सुरू केले त्याच वेळी त्याने तळकोकण, कल्याण–भिवंडी, कोथळागड आणि पुणे जिल्ह्यातील आक्रमक हालचालींना प्रारंभ केला. प्रत्येक ठिकाणी औरंगजेबाने आपले अनेक नामांकित सरदार धाडले होते. या आक्रमणाला मराठ्यांनी तडफदारपणे तोंड दिले.

**तळकोकण** : औरंगजेबाने दि. ७–११–१६८१ च्या सुमारास हसन-अली खानाला १४,००० घोडदळ देऊन तळकोकणच्या मोहिमेवर रवाना केले. त्याच्या बरोबर त्याचा मुलगा हुसेन अलीखान यालाही बढती देऊन पाठविण्यात आले होते.[1] हे दोघेही १६८२ च्या जानेवारी महिन्याच्या अखेरीस तळकोकणात पोहोचले. मराठ्यांवर हल्ला करण्याची संधी ते पाहात होते. फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यात हसन अलीखान आणि लोदीखान तळकोकण सोडून ( दरेंत-नदीत ? ) प्रदेशात शिरले. घुसणाऱ्या डाव्या बाजूच्या तुकडीवर हल्ला न करता, राजा महासिंग कदोरिया व जादुराय दखनी असलेल्या उजव्या बाजूवर मराठ्यांनी हल्ला केला. लोदीखानाचा मुलगा मेहमूद डाव्या बाजूच्या तुकडीत होता. तो उजव्या बाजूच्या तुकडीला मदत करण्यास गेला. झालेल्या चकमकीत दोन्ही पक्षांचे लोक जखमी झाले. जाधवराव, राजा महासिंग बहादुरीया, दलपत शुभकरण बुंदेला आणि मेहमूद हे मुघल सैन्यातील अधिकारी जखमी झाले.[2] राणाजी आणि रावजी जखमी होऊन पडले असता मराठ्यांनी त्यांना उचलून नेले. या आणि कल्याण-भिवंडी येथील हालचालींचे त्रोटक वर्णन भीमसेन सक्सेनाने दिले आहे, “ कोकण भागातील गनिमांचा मोड करण्यासाठी हुसेनअलीखान ( हसन अलीखान ) कल्याण–भिवंडीकडे रवाना झाला. या मोहिमेत राव दलपत हा त्याच्या बरोबर होता. कोकणात अनेक युद्धप्रसंग झाले. त्यात राव दलपत याने उत्कृष्ट कामगिरी केली. जाधवराव दखनी ( शिंदखेडचा जाधव ) मारला गेला. त्याचा नातू जगदेवराय याला मन्सब आणि नगारे, नोबतीचा मानही देण्यात आला. जाधवरावाचा मुलगा वयाने लहान होता. त्याला बापाची जहागीर आणि मन्सब देण्यात आली. या मोहिमेत राव कर्ण याचा मुलगा पदमसिंग हजारी शौर्याने लढत असता मरण पावला. ”[3] १६८२ च्या फेब्रुवारीच्या दुसऱ्या आठवड्यात हसन अलीखान तळकोकणातून निघून नाशिकला पोचला.[4] औरंगजेबाने ऑगस्ट १६८२ मध्ये तळकोकणातील हालचाली पुन्हा सुरू केल्या. जुलैच्या अखेरीस जमीनदार राणूजीला ( कानुजी ) तळकोकणातील मुलूख नष्ट करण्यासाठी इनाम, खिलअत, ५००० प्यादे देऊन रवाना केले. त्याच्याबरोबर बसवंतरावाला

१. अख : ७–११–१६८१

२. अख : १–२–१६८२, १०–२–१६८२

३. मोआम–प, पृष्ठ ७९

४. ,, : २५–२–१६८२

३००० प्यादे देऊन मराठ्यांच्या मुलुखात पाठविण्यात आले.[१] संभाजीचा मुलूख उद्‌ध्वस्त करण्यासाठी आणि कबजात आणण्यासाठी खानजहान बहाद्दुरला त्याच्या साथीदारांसह ऑगस्ट १६८२ च्या अखेरीस तळकोकणात पाठविलेले होते. तेथे जाण्यापूर्वी औरंगजेबाने त्याला शहाजादा शहाआलम यास भेटण्यास सांगितलेले होते.[२]

मुघलांच्या चालू असलेल्या सर्व हालचाल संभाजीराजे रोखण्याचा प्रयत्न करीत होते. तळकोकणात मुघल सैन्याची अडवणूक करण्यासाठी संभाजीराजांनी आपल्या अधिकाऱ्यांना हुकूम देऊन मुघलांच्या वाटा अडविण्यास सांगितले. तळकोकणातल्या ठाण्यांवरील अधिकाऱ्यांना बोलावून त्यांनी येणाऱ्या संकटाची कल्पना दिली. अधिकाऱ्यांनी हुकुमाची ताबडतोब अंमलबजावणी केलेली दिसते. १६८२ च्या ऑक्टोबरात तळकोकणचा एक अधिकारी अली चौधरीने एक सरदार, १००० स्वार व २००० प्यादे आपल्याला दिले तर सुरतपासून तळकोकणापर्यंतचा मुलूख तो लुटू शकेल असे त्याने सांगितले.[३] या वाटेवर संभाजीच्या सैन्याची ये-जा चालू असल्याने मुघली अधिकाऱ्यांना व पायदळाला तळकोकणात मराठ्यांनी शिरू दिले नाही.

कान्होजीच्या बरोबर असलेल्या पायदळाला चाकरीत ठेवण्यासाठी मीर वहदत गुर्जबदार गेला होता. मावळेजातीच्या प्याद्यांना चाकरीत ठेवावे असा औरंगजेबाचा हुकूम होता. परंतु संभाजीराजांनी दऱ्याखोऱ्यातील सर्व रस्ते बंद करून पायदळाला खोऱ्यात शिरू दिले नाही. खोऱ्याची वाट बंद असल्यामुळे घोडेस्वारांना आणि मुघली पायदळाला तळकोकणात शिरता आले नाही.[४]

१६८२ सालच्या नोव्हेंबर महिन्याच्या पहिल्या आठवड्यात खानजहान बहाद्दूर रामसेजच्या किल्ल्यातून उतरून तळकोकणात गेला आणि तेथून तो चांदोरला रवाना झाला. याच सुमारास शहाबुद्दीनखान जुन्नर येथे होता. जादा सामान आणि बुणग्यांना जुन्नर येथे सोडून तो तळकोकणाच्या खोऱ्यात शिरला. या तालुक्यातील जवळजवळ २० गावे त्याने लुटून जाळली. त्याने अनेकांना मारले. खोऱ्यातच मुक्काम करून जवळपासची गावे लुटून त्यानंतरच खोऱ्याबाहेर पडण्याचा त्याचा विचार होता.[५] तळकोकणचा एक इनामदार इसा याने आपल्याला तातडीचा अंमलबजावणी करणारा अधिकारी नेमले तर तेथे त्याची वहिवाट असल्याने तळकोकण लुटता येईल अशी विनंती केली होती. याला शहाबुद्दीन खानाने आपल्या डाव्या फळीवर ठेवून तळकोकणात दौड केली.

१. अख : २–८–१६८२ २. अख : ३०–८–१६८२
३. ,, : ११–१०–१६८२ ४. ,, : २४–१०–१६८२
५. ,, : १०–११–१६८२, २३–११–१६८२

दोघांनी खोऱ्यातील काही गावे लुटून अनेकांना मारले. १००० मराठ्यांना कैद करून त्यांची ४००० जनावरे पकडली. नंतर शहाबुद्दीनखान जुन्नरला गेला. थालनेरच्या बाजूस मराठ्यांचा बंदोबस्त करण्यासाठी नोव्हेंबरच्या अखेरीस तो जाणार होता. मराठे तळकोकणच्या खोऱ्यात मुघलांची खोडी काढीत असत. संरक्षणासाठी खबरदार राहून मराठ्यांचा पाठलाग करून त्यांना तंबी द्यावी असा शहाबुद्दीनखानाला हुकूम देण्यात आला.[1]

१६८३ च्या सुरवातीस बहाद्दूरखानाला तळकोकणच्या खोऱ्याच्या सरहद्दीवर नेमण्यात येऊन यशवंतरावाला प्याद्यांसह त्याच्या मदतीस जाण्यास सांगण्यात आले.[2] फेब्रुवारी १६८३ पर्यंत बहाद्दूरखान तेथेच होता. मराठे त्याला सामना देत होते. मराठ्यांविरुद्ध एकट्याने टक्कर देणे बहाद्दूरखानाला कठीण जात असावे. त्यामुळे फेब्रुवारी १६८३ च्या अखेरीस कासिमखान यास बहाद्दूरखानाच्या कुमकेसाठी जावयाचा हुकूम देण्यात आला. त्याला तळकोकणाच्या बाजूची माहिती नसल्याने त्याने तिकडे जाण्याचे टाळले. त्यामुळे औरंगजेबाने रुहुल्लाखानाला फौजेसह कासिमखानाला बरोबर घेऊन बहाद्दूरखानाच्या कुमकेसाठी तळकोकणाच्या खोऱ्यातील वाटेच्या तोंडाशी जाण्यास सांगितले.[3] रुहुल्लाखान आणि बहाद्दुरखान तेथून १५ मार्च १६८३ च्या सुमारास कल्याण-भिवंडीच्या किल्ल्याला वेढा घालण्यासाठी रवाना झाले.[4] १६८१ च्या नोव्हेंबर महिन्यात मुघलांनी हसनअलीखान, लोदीखान, त्याचा मुलगा मेहमूद, सुबरकरण बुंदेला, राजा महासिंग, जाधवराव, खानजहानबहाद्दूर, शहाबुद्दीनखान, इसा, बहाद्दूरखान इत्यादी मातब्बर सरदारांना तळकोकणात धाडून कसोशीचे प्रयत्न केले तरी येथे त्यांना यश मिळाले नव्हते.

**कल्याण-भिवंडी :**

कोकण पट्टीच्या उत्तरेच्या भागात ठाणे जिल्ह्यात हे गड आहेत. हे ताब्यात असले तर मराठी मुलुखात शिरणे सोपे होते. जुन्नर येथे मुघलांचे ठाणे असल्याने तेथून त्यांना या प्रदेशात आक्रमक हालचाली करणे सोईचे होते. औरंगजेबाने नाशिक जिल्ह्यातील गडांना वेढे घातले त्याच वेळी त्याने ठाणे जिल्ह्यातील मोक्याचे गड घेण्याचा प्रयत्न केला आणि रामसेजप्रमाणेच या जिल्ह्यातील कल्याण-भिवंडी आणि कोथळागडाला वेढे दिले. मराठ्यांनी मुघलांचे हे वेढे परतवून लावण्याचा चिकाटीने प्रयत्न केला. तळकोंकणातील मोहिमा कोंकण पट्टीत शिरकाव करण्याच्या दृष्टीनेच केलेल्या असल्याने तेथे प्रवेश केल्या-वर मुघलांना कल्याण-भिवंडीपर्यंत पोचणे सोपे झाले.

१. अख : १४–१–१६८२
२. अख : ७–१–१६८३
३. ,, : २३–२१–६८३
४. ,, : १३–३–१६८३

हसनअलीखान हा १६८२ च्या जानेवारीत तळकोकणात शिरला. येथून पुढे तो कल्याण-भिवंडी येथे गेला.[१] जेधे शकावलीप्रमाणे माघ मासी (जानेवारी १६८२) हसनअलीखान कल्याण-भिवंडी जाळून फिरोन गेला.[२] तळकोकणात शिरताना हसनअलीखानाजवळ १४ हजार सैन्य होते.[३] कल्याण-भिवंडी येथे शिरताना त्याचे सैन्य वाढलेले दिसते. या सैन्यात २० हजार स्वार व १५ हजार पायदळ होते. कल्याण येथे पोहोचेपर्यंत हसनअलीखानाने संभाजीच्या मुलुखात जाळपोळ करून कल्याण येथे तळ दिला. वाटेत त्याने पोर्तुगेजांच्या होड्या जाळल्या. हसनअलीखान व घाटावरून आलेल्या संभाजीच्या सैन्याची लढाई झाली. या लढाईत नबाबाची सरशी झाली. परंतु या बातमीची सत्यासत्यता नीट समजली नाही असे मुंबईकरांनी सुरतकरांना कळविले होते.[४] हसनअलीखानाजवळ कल्याण-भिवंडीकडे जाताना पुरेसा दाणागोटा व दारूचा साठा नव्हता, म्हणून त्याने सिद्दी महंमद याला पत्र देऊन दि. ३–२–१६८२ रोजी इंग्रज वखारवाल्यांकडे धाडले.[५] हसनअलीखान कल्याण येथे राहणार असता तर इंग्रजांना त्याच्या मागण्या पुऱ्या कराव्या लागल्या असत्या. संभाजीराजे यांना सुगावा लागू न देता इंग्रजांना हसनअलीखानास दाणागोटा द्यावयाचा होता. यासंबंधी सुरतकर दि. २४–२–१६८२ रोजी कळवितात की, "हसनअलीखानाच्या समाधानासाठी तुम्हाला देता येण्यासारखी जादा दारू व इतर वस्तू रोख पैसे घेऊन द्या. परंतु त्या अगदी गुप्तपणे द्या. संभाजीला हा व्यवहार न समजेल अशी दक्षता घ्या...धान्यसामुग्रीबाबत मात्र स्पष्ट सांगा की, ती आपल्याजवळ नाही."[६] हा दाणागोटा मिळण्यापूर्वीच हसनअलीखानास माघार जावे लागले. कारण बादशाही लष्कराची व संभाजीच्या सैन्याची अलमालच्या नजीक लढाई झाली. अलमगीर पादशाहाकडील हसनअलीखान लढाईत जखमी झाला; बरेच लोक जखमी झाले, पुष्कळ मेले; संभाजीकडील सैन्याची फत्ते झाली. अशी माहिती बुसातिन-उस-सलातीनमध्ये दिली आहे.[७] फेब्रुवारी महिन्याच्या अखेरीस हसनअलीखान हा तळकोकणातून निघोन नाशिकला पोहोचला.[८]

---

१. अख : ३१–१–१६८२

२. शिचप्र, पृष्ठ ३१

३. अख : ७–११–१६८१

४–५. Bom. to Sur : 4–2–1682, Sur. Vol 108, p 61

६. Sur. to Bom : 24–2–1682, Sur. Vol 90, p 54, 55

७. बुसा–उस्–सला, पा, पृष्ठ ५९१

८. अख : २५–१२–१६८२

१६८१ सालच्या नोव्हेंबरमध्ये फ्रेंचांनी मराठ्यांना तोफा आणि दारुगोळा पुरविल्याबद्दल सुरतेच्या मुघल सुभेदाराने निषेध व्यक्त केला होता. १६८२ साली त्याने फ्रेंचांकडून मराठ्यांविरुद्ध लढण्यासाठी जहाजे आणि खलाशी यांची मागणी केली होती, परंतु पुरेशी जहाजे व खलाशी उपलब्ध नसल्याच्या सबबीवर फ्रेंचांनी मुघलांची मागणी फेटाळली होती.[१]

एप्रिल महिन्यात हसनअलीखानाला १९ हजार फौजेची सरदारी देऊन संभाजीच्या राज्यात रवाना केले होते.[२] या सैन्याला दाणागोटा मिळावा आणि समुद्रमार्गेही ह्या आघाडीवर हल्ला करावा म्हणून मेच्या अखेरीस मीर मुहम्मद मोमिन याला ६ हजाराची फौज घेऊन जहाजातून सुरतमार्गे रवाना केले होते.[३] ह्या आघाडीवरील हालचाली नोव्हेंबरमध्ये पुन्हा निकराने सुरू झाल्या. नोव्हेंबरमध्ये रणमस्तखान कल्याणला येऊन बसला होता.[४] हा वेढा रामसेजच्या वेढ्याप्रमाणेच निकराने चालू होता. हे गड घेण्यासाठी औरंगजेबाने आपले अनेक अनुभवी सेनापती रवाना केले होते. परंतु ह्या सर्वांना संभाजीच्या ध्येयनिष्ठ सरदारांनी परतवून लावले. कल्याण–भिवंडीपासून ५ मैलांवर असलेल्या मेहेंदळी गावात मराठ्यांच्या दोन हजार स्वारांनी मुघल ठाण्यांची लुटालूट केल्याची बातमी समजल्यावरून मुकर्रमखान २० नोव्हेंबरला जादा सामान व बुणग्यांना किल्ल्यात सोडून मराठ्यांना तंबी देण्यासाठी धावला. मुकर्रमखान व मराठे यांच्यात मेहेंदळी गावाच्या अलीकडे ३० कोसांवर असलेल्या उरण खेड्याजवळ लढाई झाली. दोन्हीकडील सैनिक मेले, काही जखमी झाले. त्यानंतर मुकर्रमखानाने मौजे मेहेंदळी येथे डेरा उभा केला.[५]

रणमस्तखान कल्याणला येऊन बसला असताना बहादूरखान कोकणात उतरला[६] म्हणून मराठ्यांची ७ हजार स्वारांची आणि ८ हजार प्याद्यांची तुकडी कल्याण-भिवंडीजवळ गेली. ही बातमी कळताच बहादूरखान तेथे पोहोचला. त्याने तेथे गढी तयार करून ठाणे मजबूत केले. २८ नोव्हेंबर रोजी बहादूरखान व मराठे यांच्यात लढाई झाली. मराठ्यांनी पळून जाण्याचा आव आणला.[७] यानंतर रणमस्तखानाबरोबर मुकाबला करण्यासाठी संभाजीराजे यांनी नोव्हें.–डिसेंबरमध्ये रूपाजी भोसले, केसोपंत व निळोपंत यांना रवाना केले.[८]

१. FMR–H, p 26
२. अख : ६–४–१६८२
३. अख : ३०–५–१६८२
४. शिचप्र, पृष्ठ ३२
५. ,, : २६–११–१६८२
६. ,, : ११–१२–८२, Dorngon to Sur 12–11–1682, Sur. Vol 108, p 203
७. अख : २३–१२–८२
८. शिचप्र, पृष्ठ ३१

त्यांच्याबरोबर १० हजार स्वार व १२ हजार पायदळ होते. ४ डिसेंबर रोजी बदाद्‌दूरखान व या सैन्यात लढाई झाली. मराठ्यांकडील बरेचसे सामान मुघलांच्या हाती लागले. त्यानंतर बहाद्‌दूरखान स्वार होऊन त्याने मराठ्यांच्याकडील किल्ले बितिंगा ( ? ) तेथील वाडीस आग लावली.[1] डिसेंबरच्या दुसऱ्या-तिसऱ्या आठवड्यात मराठ्यांनी रणमस्तखानाच्या सैन्यावर दोन–तीन वेळा हल्ले केले. बहाद्‌दूरखानाने ते परतवून लावले. मराठ्यांनी पुन्हा एकदा रात्रीचा हल्ला केला. बहाद्‌दूरखानाने कल्याणचा किल्ला दुरुस्त करण्याचा प्रयत्न केला. तटाच्या भिंतीचे काम अपुरेच राहिले होते. त्याने पहाऱ्यासाठी २००० माणसे नेमली[2] हे कळताच संभाजीराजे यांनी तुकोजी सरदाराबरोबर मोठे सैन्य धाडले. या सैन्याने कल्याणपासून आठ मैलांवर असलेल्या गावी मुक्काम केला. तेथे त्याने मोर्चे लावले व खंदक खणले. ही बातमी कळताच बहाद्‌दूरखानाने याकुतखान, रुमीखान, दाऊदखान यांच्या तीन तुकड्या तयार करून मराठ्यांना तंबी देण्यासाठी रवाना केले. सिद्दी याकुतखान हा मुघल सैन्यासाठी दाणागोटा घेऊन आला होता. या तिन्ही तुकड्यांनी मराठ्यांवर हल्ले केले. या चकमकीत बंदुका व धनुष्य-बाणांचा उपयोग करण्यात आला होता. याच एका चकमकीत तुकोजी व त्याचे साथीदार मारले गेले. मराठ्यांनी मुकाबला केल्यानंतर ते डोंगरात निघून गेले. मुघल सैन्याने त्यांचा १० मैलांपर्यंत पाठलाग केला. मराठ्यांनी पुन्हा बाणांचा वर्षाव केला. हातघाईचा सामना झाला.[3]

वर दिलेल्या मजकुरात व मल्हार रामराव चिटणीसाच्या बखरीतील मजकुरात बरेचसे साम्य आहे. चिटणीस लिहितो, “ रणमस्तखान कल्याणप्रांती येऊन उपद्रव केला. हे वर्तमान महाराजांस कळल्यावरि रायगडाहून निघोन फौजेसुद्धा कल्याणास गेले. रणमस्तखान यांशी युद्ध देऊन रसदबंदी [ करून ] व कही मारून जेर केले असता याकुतखान जंजिऱ्याहून कुमकेस गेले. त्यांनी जहाजातून उतरून, मधी मोरचे देऊन रणमस्तखान यास रसद पोचविणे वगैरे पुरावा केला. तो घाटावर रोहिलाखान होते त्यास कळालियावरि तेही कुमकेस येऊन रणमस्तखान यास निभावून घेऊन घाट चढून गेले. महाराज माघारे रायगडास आले. ”[4] चिटणीसाला कल्याण-भिवंडी येथे झालेल्या संग्रामाची विस्तृत माहिती नसावी. त्याने त्यातील काही हालचाली दिलेल्या आहेत, स्वतः संभाजीराजे या संग्रामात कल्याणला गेल्याची माहिती चिटणीसबखरीत आणि बुसातिन-उस् सलातीन यात दिलेली आहे. या आघाडीवर रुपाजी भोसले, केसोपंत, निळोपंत, हंबीरराव सेनापती, तुकोंजी या सर्वांना जावे लागले होते. हे सर्व

१. अख : २३–१२–१६८२ २. कित्ता

३. ,, : ८–१–१६८३ ४. मराचिब, पृष्ठ १५

शर्थीने लढत होते. तुकोजी मारला गेला होता, हंबीरराव जखमी झाला होता. प्रसंग बाका आहे असे पाहून राजे त्या आघाडीवर गेले असावेत.

१६८३ च्या जानेवारी-फेब्रुवारीत कल्याण-भिवंडीचा संग्राम चालूच होता. रणमस्तखानाबरोबर बहाद्दुरखानही कल्याण-भिवंडीला ठाणे घालून बसला होता. बहाद्दूरखानाच्या मदतीस यशवंतराव या मुघल अधिकाऱ्याला त्याच्याजवळ असलेल्या प्याद्यासह जाण्याचा हुकूम रुहुल्लाखानाने दिला होता.[१] रणमस्तखान यास दाणागोट्याची आवश्यकता होती. जहाजातून हा दाणागोटा याकुतखान पुरवीत असे. ठाणे ते कल्याणपर्यंत जहाजातून दाणागोटा आणण्यासाठी पोर्तुगेजांनी मुघल सैन्याला परवानगी दिली होती. ही परवानगी दिल्यामुळे पोर्तुगेज व संभाजी राजे यांचे संबंध बिघडले होते. कल्याण-भिवंडीकडे जाणाऱ्या मुघलांच्या तारवास प्रतिकार करण्यासाठी मराठ्यांनी पारसिक येथे किल्ला बांधण्याची तयारी केली होती. ही बातमी समजताच पोर्तुगेजांनी ती जागा ताब्यात घेऊन तेथे आपला किल्ला बांधला.[२] जहाजातून दाणागोटा आणण्यासाठी मुघलांनी इंग्रजांकडे परवानगी मागितली होती. इंग्रज संभाजीराजांचे शत्रुत्व ओढवून घेण्यास तयार नसले तरी दुसरीकडे मुघलांना नाखूष करण्यास तयार नव्हते. इंग्रजाकडे मुघलांनी परवानगी मागताच मुंबईकरांनी लंडनला आपल्या दि. ८-१-१६८३ च्या पत्रात कळविले होते की, "मुघल आरमारास आपण आपल्या बंदरात येऊ दिल्यास संभाजीराजा त्याबद्दल तीव्र नापसंती दाखवील व रागावेलही. त्याने याच कारणावरून पोर्तुगेजांना शत्रू लेखून त्यांच्या कित्येक होड्या जाळल्या. त्यांनी नबाब रणमस्तखानाचे हाताखालील मुघल सैन्यास अन्नसामुग्री पुरविल्यावरून आणि जाऊ दिल्यावरून संभाजीराजे त्यांचेवर चिडले आहेत. त्यातून हल्ली तर संभाजीची शंभर गलबते खाडीत आपल्या समोर नांगरून उभी आहेत".[३] मराठ्यांनी ठाणे-वसई भागातील पोर्तुगेजांचे दोन किल्ले जिंकले होते. तेथे तोफखाना तयार ठेवून सुरतेहून बहाद्दूरखानाकडे जाणाऱ्या जहाजांना अडवणूक करण्याचा त्यांचा विचार होता, म्हणून बहाद्दूरखानाने याकुतखानाला तेथे धाडले. त्याने एक किल्ला मोडून टाकला व दुसरा किल्ला त्याला घेता येईना म्हणून बहाद्दूरखान दि. १६-१-१६८३ रोजी तेथे पोहोचला. मराठ्यांबरोबर लढाई करून त्याने तो गड ताब्यात घेतला. त्यावेळी रसदीचे जहाजाचे मार्ग आपल्याच ताब्यात आले[४] असे त्याला वाटले. तरी मुघल फौजेला दाणागोटा मिळणे मराठ्यांनी कठीण करून ठेवले होते.

१. अख-७-१-१६८३
२. पोमसं-पि, पृष्ठ ९१
३. Bom. to Lon, 8-1-1683, O. C. Vol. 42
४. अख-८-१-१६८३

फेब्रुवारी महिन्यात संभाजीराजे ( भूजी ) किंवा त्यांच्या एखाद्या सरदाराने ४००० घोडदळ व पायदळ घेऊन मुघलांच्या वाटा अडविल्या होत्या. ही बातमी समजताच रुहुल्लाखानाने पदमसिंह यास धाडून त्याला डावी बाजू आणि दुसऱ्या अधिकाऱ्यांना उजवी बाजू संभाळण्यास सांगितले. दि. १९–२–८३ रोजी दोन्ही सैन्यांत लढाई झाली. या चकमकीत मराठ्यांच्या कडील ४०० सैनिक मेले. काही जखमी झाले. बहादूरखानाचे लष्कराने मराठ्यांचा सहा ( ? ) मैल पाटलाग केला. या चकमकीत पोर्तुगेज सैनिकही मुघलांना मदत करीत होते.[1] औरंगजेब जसे आपले एकएक अधिकारी रवाना करीत होता त्याचप्रमाणे संभाजीराजेही कल्याण-भिवंडीच्या आघाडीवर आपल्या लढाऊ आणि शूर सेनापतीबरोबर कुमक धाडीत होते. फेब्रुवारी महिन्याच्या तिसऱ्या आठवड्यात हंबीरराव व इतर तीन मोठे सरदार २०००० घोडदळ व १०००० पायदळ घेऊन कल्याण-भिवंडी येथे पोहोचले होते. ते पूर्ण तयारीनिशी गेले होते. त्यांच्या सैन्यात हत्यारे, भाले, छऱ्या, तंबू इत्यादी सामान होते. मुघलांच्या बाजूने बहाद्दूरखान व पदमसिंह हे उजव्या बाजूची आघाडी सांभाळीत होते. याशिवाय त्यांच्या सैन्यात भगवंतसिंह, त्याचे वडील माकूजी, रामसिंह, हरिसिंह, रघुनाथसिंह, काबुलीसिंह हे अधिकारी होते. दि. २७–२–८३ रोजी दोन्हीकडील बड्या सैन्यात चकमकी उडाल्या. हंबीरराव व पदमसिंह हे शौर्याने लढत होते. झालेल्या चकमकीत हंबीरराव जखमी झाल्यामुळे तो रणातून माघारा फिरला. त्याच्या बरोबर असलेले तीन अधिकारी मरण पावले. या लढ्यात मुघल अधिकारी ही जखमी झाले, आणि काही मेले. पदमसिंहाला ३५ जखमा झाल्या. भगवंतसिंह व त्याचे वडील मेले. पदमसिंह मेल्याचे समजल्यावरून रतन राठोडचा मुलगा रामसिंह हा आजारी असूनही चिलखत घालून मराठ्यांशी मुकाबला करण्यासाठी निघाला. परंतु आजारात दांडगाई केल्यामुळे तो मरण पावला. इतर २५ सरदार जखमी झाले. हरिसिंह हा मैदानात पडला असता मराठ्यांनी त्याला उचलून नेले. अशा तऱ्हेने मोठी फौज धाडूनही मुघलांना कल्याण-भिवंडीच्या आघाडीवर प्रगती करता आली नाही.[2]

मार्च महिन्याच्या पहिल्या आठवड्यात सलाबतखानास हुकूम झाला होता की त्याने कल्याण-भिवंडी जवळ असलेल्या फर्दापूरच्या ठाण्यास जाऊन सावध राहावे. मार्च महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात बहाद्दूरखानाच्या मदतीस रुहुल्लाखान जाऊन मिळाला. आतापर्यंतच्या हालचालींवरून कल्याणचा किंवा भिवंडीचा गड पडलेला असावा. यापैकी कोणतातरी किल्ला दुरुस्त करून तेथे बहाद्दूरखानास

१. अखः १५–३–१६८३

२. ,, : १७–३–१६८३, २–४–१६८३

पावसाळ्यात राहता येईल की नाही असे तळकोकणात राहणाऱ्या मुहम्मद अफझल याला विचारण्यात आले होते. मुहम्मद अफझलने उलट कळविले होते की पावसाळी हवेत तेथील घोडे मरतात. परंतु तेथून अलीकडे बारा कोसांवर मवेली नावाच्या ठिकाणी राहता येईल. कारण वाटेत कोठे राहण्यास पठार नाही. मुघल सैन्याची अशा तऱ्हेने तयारी चालू असता संभाजीराजे यांच्या सैन्याने जहाजामार्गे मुघलांकडे जाणारी अन्नधान्याची रसद लुटली होती. पठारमार्गे रसद पोहोचण्यास बरीच अडचण निर्माण केली होती.[1] रुहुल्लाखान दि. १५-३-१६८३ रोजी बहाद्दूरखानाच्या फौजेस मिळाला. तेव्हा बहाद्दूरखानाने रुहुल्लाखानास कल्याण-भिवंडी येथील किल्ल्यात उतरण्यास सांगितले. किल्ला लहान असून रुहुल्लाखानाजवळ मोठा जमाव होता म्हणून तो बाहेरच डेरा टाकून राहिला. दुसरे दिवशी त्याने बहाद्दूरखानास निरोप दिला की एके ठिकाणी बसून राहणे ठीक नाही. गस्त घालण्यासाठी स्वारी केली पाहिजे. बादशाही फर्मान आल्यामुळे रुहुल्लाखानाने मराठ्यांची फौज दिसताच त्यांच्यावर हल्ला केला. दोन्हीकडील सैनिक मेले. रुहुल्लाखानाचा मराठ्यांविरुद्ध टिकाव लागणे कठीण होते, कारण त्याला दक्षिणी लोकांच्या लढाईची माहिती नव्हती. त्याने सरदारकीच्या कामात ढिलाई न करता त्या परिस्थितीतही तो २४ मैल पुढे गेला. त्याने बहाद्दूरखानास आपल्या फौजेबरोबर आणून शत्रूची माहिती करून दिली. मराठ्यांनी खोडी काढून पिछाडीवर हल्ला केला त्यात पद्मसिंग व इतर लोक मेले. रुहुल्लाखानाला दक्षिणी लोकांच्या लढाईची माहिती नसतानासुद्धा तो धडाडीने पुढे गेला याबद्दल शहाआलमकडे ( औरंगजेबाचा मोठा मुलगा ) त्याचे कौतुक करण्यात आले होते. कारण तो औरंगजेबाच्या मावस बहिणीचा मुलगा होता.[2]

एप्रिलमध्ये रुहुल्लाखानाचा मुलगा सैफुल्लाखान यालाही कल्याण-भिवंडीच्या आघाडीवर धाडले होते. मुघल सैन्याचा प्रतिकार करण्यासाठी संभाजीराजे यांनी या आघाडीवर रूपाजी भोसले आणि मानाजी मोरे यांना धाडले होते. हंबीरराव जखमी होऊन माघारी आला होता. म्हणून कल्याण-भिवंडीपासून १४ मैलांवर रूपाजी भोसले व मानाजी मोरे यांच्या नेतृत्वाखाली मराठ्यांचे सैन्य एकत्र जमून शत्रूच्या सैन्याची खोडी काढण्याच्या विचारात होते. हे कळताच एप्रिलच्या पहिल्या आठवड्यात सैफुल्लाखान तेथे पोहोचला, दोन्ही सैन्यांत लढाई झाली. सैफुल्लाखानाने दोन तीन गावे जाळली. छऱ्या, हत्यारे टाकून मराठे जंगलात लपले. झालेल्या चकमकीत जखमी झालेले रूपाजी भोसले व मानाजी मोरे मेले अशी

१. अख : ५-३-१६८३, १३-३-१६८३
२. ,, ३१-३-१६८३, ३-४-१६८३

सैफुल्लाखानाने पीरगुलामकडे बातमी दिली होती. परंतु या बातमीत तथ्य नव्हते. मुघल अधिकारी आपली प्रौढी मिरविण्यासाठी अफवाही उठवत असावेत, कारण प्रत्यक्षात रूपाजी भोसले संभाजीराजे यांच्या अखेरीपर्यंत जिवंत होता व मानाजी मोरे दि. २९–१०–८४ रोजी अन्य कारणासाठी संभाजीच्या कैदेत होता.

वरील चकमकीनंतर सैफुल्लाखान कल्याण-भिवंडीला जाऊन नंतर तो नाशिककडे रवाना झाला.[1] वर दिलेल्या माहितीसंबंधी जेधे शकावलीत त्रोटक हकीकत दिली आहे. १९ मार्च ते १६ एप्रिलच्या दरम्यान ( चैत्र मास, शके १६०५ ) रोहिलाखान कोलवणातून ( पौड खोऱ्यात कल्याणजवळ ) उतरून गेला व रणमस्तखान घाटावर येऊन गेला. तेव्हा त्याशी रूपाजी भोसले याने तिटोलिया-जवळ ( टिटवाला कल्याणच्या ईशान्येस ४$\frac{1}{4}$ मैल ) लढाई केली. पद्मसिंग रजपूत व इतर कित्येक थोर लोक ठार केले.[2] रुहुल्लाखानाला बादशहाने बोलविल्याचे फर्मान दि. ८–४–८३ च्या सुमारास देण्यात आले. त्याप्रमाणे तो मे महिन्यात बादशहाच्या भेटीस गेला.[3]

कल्याण-भिवंडी येथील त्रोटक प्रसंग एकत्र करून मराठी साम्राज्याच्या छोट्या बखरीत खालील मजकूर दिला आहे : "तो रणमस्तखान मनसबदार पातशहाकडील फौजेनिशी कल्याणास आला. त्याजवर संभाजीराजे फौज सरंजामा-निशी गेले. मुकाबला लढाईचा झाला. मोगलाचे लष्करात दाणा न मिळे. राजाचे फौजेत आरमारावरून भरती सामान पुरविले. युद्ध भारी झाले. रणमस्तखान बहुत जेर केला. मोगलाचे कटकास धरून मोरचे लाविले. त्याजवर रुहुल्लाखान धावून येऊन रणमस्तखान याजला काढून घेऊन गेला. रणमस्तखानाने बहुत युद्ध केले. महाराज रायगडास आले."[4] या बखरकाराला वर दिलेली विस्तृत माहिती नसली तरी त्याने दिलेली माहिती चुकीची नाही. दोन्ही बखरकार राजे स्वतः या आघाडीवर गेल्याचे नमूद करतात. परंतु फारसी साधनात किंवा जेधे शकावलीत त्यासंबंधी माहिती दिलेली नाही. दि. १५–३–८३ च्या अखबारामध्ये भूजी असा जो उल्लेख आहे तो संभाजीराजे यांनाच उद्देशून असावा. कारण भूजी याचा अर्थ शिवी असा आहे. संभाजीराजे यांना शिवी देऊन उल्लेख केल्याचे अनेक दाखले आहेत; किंवा संभुजीमधील सं राहून गेला असेल, अशीही शक्यता आहेत.

१६८२ च्या जानेवारीत कल्याण-भिवंडी येथे आक्रमण सुरू झाले. रण-मस्तखान, हसनअलीखान बहाद्दूरखान, रुहुल्लाखान, सैफुल्लाखान, पदमसिंह व

१. अख : ९–४–१६८३ २. शिचप्र–पृष्ठ ३२

३. मवऔ, पृष्ठ २४–२५

४. मसाछोब–मो (काव्येतिहाससंग्रह,) क्र. २९, पृष्ठ ६१

इतर अनेक मातब्बर अधिकारी धाडूनही यश न मिळाल्याने १६८३ च्या एप्रिलमध्ये औरंगजेबाला या आघाडीवरून सैन्य मागे घ्यावे लागले होते. हंबीरराव, रूपाजी भोसले, मानाजी मोरे, तुकोजी व इतर अनेक अधिकारी यांनी स्वराज्याच्या रक्षणासाठी यशस्वीपणे मुघलांच्या आक्रमणाला तोंड दिले होते. १६८८ च्या अखेरीपर्यंत कल्याणचा प्रांत संभाजी राजे यांच्या ताब्यात होता. १६८८ पर्यंत मुघल सैनिक या प्रांतात लुटालूट करीत होते. कल्याण प्रांतातील हातनोली, वडगाव, असडोली या गावचा प्रयागजी दिनकरराव हा मुघलांचा बंदोबस्त करीत होता. मुघलांनी स्वाऱ्या करून गावे मारून नेली. त्यामुळे तेथील रहिवासी गावे सोडून गेले होते. गनिमाला मारून काढण्यासाठी लोकांना इनामजमिनी, वतने हवी होती. रयतेला धीर-भरवसा देण्यासाठी, आणि शत्रूचा बंदोबस्त करण्यासाठी, प्रयागजी दिनकररावाने वतने, इनामे मागितली होती. औरंगजेबाविरुद्ध लढा देण्यास उद्युक्त करण्यासाठी संभाजीराजे यांनी वतने, इनामे दिली होती. कल्याण प्रांतातील मुघलांचा प्रतिकार करण्यासाठी संभाजीराजे यांच्या मुख्य प्रधानाने, नीळकंठ मोरेश्वराने दि. ९–११–८८ रोजी प्रयागजी दिनकरला कल्याण प्रांतातील हातनोली, वडगाव या गावचे वतन दिले होते.[1]

कल्याण-भिवंडी येथे झालेल्या लढायांत संभाजीच्या नेतृत्वाखाली मराठ्यांनी मुघलांच्या ताब्यातील प्रदेश उजाड केला होता. तेथील मशिदी आणि मद्रसे (धार्मिक शिक्षण देणाऱ्या शाळा) उद्ध्वस्त केल्या होत्या. या मशिदी व मद्रसांची दुरुस्ती करण्यासाठी बादशहाने पुढीलप्रमाणे आज्ञा केली होती. "सय्यद कुतुबुद्दीन सज्जादान शीन यांनी पुढीलप्रमाणे अर्ज केला आहे. नर्कवासी संभाजीने धर्मद्वेषामुळे तळकोकणचे मद्रसे आणि मशिदी उद्ध्वस्त केल्या. मी (कुतुबुद्दीन) दोन जुम्मामशिदी आणि एक मद्रसा ही दुरुस्त केली आहेत. पण इतर मद्रसे आणि जुम्मामशिदी अद्याप नामशेष आहेत. इकडील पाऊस तर सर्वांना माहीत आहे. एखाद्या प्रामाणिक अधिकाऱ्याला हुकूम व्हावा की काळजीपूर्वक रक्कम खर्चून पवित्र इमारती दुरुस्त कराव्या. म्हणजे बादशहांच्या साहाय्याने ठिकठिकाणी मशिदी आणि मद्रसे चालू होतील.

"तर तुम्ही त्या भागातील मशिदींच्या परिस्थितीवर प्रतिवृत्त (रिपोर्ट) पाठवावे. वस्तुस्थिती अशी आहे की पूर्वी या भागात मुसलमानांची वस्ती बरीच होती. कसब्यातून मशिदी आणि मद्रसेही होती.

"मराठ्यांच्या धामधुमीच्या काळात हा भाग पूर्णपणे उजाड झाला. काफराने (संभाजी) सगळ्या मशिदी पाडून टाकल्या. आता परमेश्वरकृपेने हा प्रदेश बादशहांच्या ताब्यात आला आहे. विद्वान आणि धर्मशास्त्रज्ञ मुसलमान परागंदा

१. शिचसा, खं. १२, लेख ११२, पृष्ठ ७५–७५

झाले होते. ते परत आपापल्या गावी आले आहेत. कल्याण, इस्लामाबाद (भिवंडी), पनवेल आणि शेणोला या ठिकाणी मुसलमान वस्ती बरीच आहे. आपण बादशहांना हे कळवून हे कार्य होईल असे करावे. हे काम सय्यद कुतुबुद्दीनच्या देखरेखीखाली करविण्यात यावे. मनुष्य विद्वान आणि साधुवृत्तीचा आहे. तो व्यवस्थितपणे आणि काटकसरीने हे काम पार पाडील."[1]

दि. ११–३–१६८९ रोजी संभाजी राजांचा वध झाला. त्याच दिवशी मातबरखान नाशिक ठाण्यातून बाहेर पडून कल्याण-भिवंडीकडे निघाला. मातबरखान एप्रिल १६८९ ला बादशहाला अर्ज करतो, "आपण मीरहसन व इतर गुर्जदार यांच्याबरोबर फर्मान पाठवून आज्ञा केली होती की कोकणात उतरून माहुली घ्यावी आणि कल्याण-भिवंडी प्रांतांत ठाणी बसवून तेथील बंदोबस्त करावा. आपल्या आज्ञेप्रमाणे मी बतीस जुलूस एकोणतीस जमादिलावल रोजी (११ मार्च १६८९) गुल्शनाबाद (नाशिक) ठाण्यातून बाहेर पडलो. भोवतालच्या ठाणेदारांना बोलावून आणण्यासाठी गुर्जदार गेले होते. ठाणेदार येईपर्यंत मी माझ्याजवळ असलेल्या फौजेत तैनात झालेल्या मन्सबदारांना घेऊन तेथेच काही दिवस राहिलो. जमादिखानीच्या बावीस तारखेस (३ एप्रिल १६८९) मी पुढे निघून खोरती (घोटी) घाटावर पोहोचलो. तेथे रजब महिन्याच्या पांच तारखेस (१५ एप्रिल) गुर्जदार हे ठाणेदारांना घेऊन आले. तेथून मी घाट उतरलो. रजबच्या सात तारखेस (१७ एप्रिल १६८९) मी तरोड्याला आलो. तेथून माहुलीचा किल्ला सात कोसांवर आणि कल्याण-भिवंडी तीस कोसांवर आहे. येथून मी मजल दरमजल करीत पुढे जात आहे. लवकरच कल्याणला पोहोचून मी शत्रूचा मोड करण्याचा प्रयत्न करीन. कल्याण प्रांत उद्ध्वस्त झाला आहे. तेथे पाणी व चारा यांचा तुटवडा आहे. ही हकीकत मी यापूर्वी कळविली आहे. ती आपल्यापर्यंत पोहोचली असेल. अद्याप तोफखान्याची सामग्री आली नाही. दारूगोळा, बंदूकची, गोलंदाज, बाणदार, जंगल तोडणारे, पाणी पुरवणारे, बेलदार इत्यादींची रवानगी झाली नाही. या प्रांतांत ठाणी बसविणे आणि लहान गढ्या बांधणे इत्यादीसाठी वरील सामग्री अतिशय आवश्यक आहे. लवकर पाठविण्याची कृपा व्हावी म्हणजे वेळेवर कामी येईल.

"धान्य वगैरे रसद पाठविण्याविषयी सुरतेच्या अधिकाऱ्यांना हुकूम व्हावा, हा प्रांत वैराण झाला आहे. तेथे धान्य मुळीच पिकत नाही.

"माझ्याकडे जे सरकारी अधिकारी तैनात झाले आहेत त्यांची यादी सोबत पाठवीत आहे. पेठचा जमीनदार अब्दुल्करीम याला हुजुरांनी आपल्याकडे बोलावून घेतले आहे. अंकोल्याच्या ठाण्याचे पथक आणि बरेच मन्सबदार आले

१. नवभारत, डिसेंबर १९६९, पृष्ठ २६

नाहीत. हुजुरांच्या तैनातीतील माणसे पाठविल्यास बरे होईल. मोठी मोहीम होणार आहे.''[१]

दि. २७–४–१६८९ रोजी मातबरखान कल्याणच्या परिसरात पोचला. त्याने दुर्गाडीच्या किल्ल्याला वेढा घातला. तो किल्ला आणि इतर किल्ले जिंकण्याची त्याला खात्री होती. मोहिमेसाठी त्याने साधनसामुग्री मागविली होती.[२]

दुर्गाडीच्या हालचालीसंबंधी याकूतखानाला कळविताना तो लिहितो, "आपले पत्र मिळाले, आनंद झाला. मी कल्याणला आलो तरी आपल्याला कळविले नाही याबद्दल आपण आश्चर्य व्यक्त केलेले आहे. मी रजब महिन्याच्या सतरा तारखेस ( १६८९ एप्रिल अखेर ) कल्याणला पोहोचलो आणि दुर्गाडीच्या किल्ल्याला वेढा घातला. किल्ला जिंकून घेतल्यावर आणि बंदोबस्त केल्यावर आपल्याला लिहावे असे ठरविले. पण कामामुळे जमले नाही. आपले पत्र मिळाले. आपण मुंबईवर चालून गेलात आणि इंग्रजांना वेढा घालून त्यांना चांगलीच शिक्षा केलीत आणि सरकारी कामगिरी पार पाडलीत हे ऐकून अतिशय आनंद झाला. हे अवघड काम आपल्या हातून पार पडले. आपण दोघे एकमेकांजवळ आहोत. शत्रूचा मोड होईल आणि या लोकांना काढून लावणे ठरल्यास तेही अमलात आणता येईल. आपल्याला काही काम लागल्यास मला कळवावे. कल्याणचा प्रदेश उद्ध्वस्त झाला आहे. आपल्याकडील व्यापाऱ्यांना धान्य आणि इतर जिन्नस इकडे आणून योग्य भावात विक्री करण्याची ताकीद करावी म्हणजे लष्करच्या लोकांची ओढाताण होणार नाही.''[३]

ऑक्टोबर १६८९ ते सप्टेंबर १६९० या वर्षभराच्या काळात मातबरखानाने तळकोकणातील किल्ले जिंकून घेतले. त्यानंतर त्याने कल्याण गावात एक मशीद, हवेली, स्नानगृह, बाग, दिवाणखाना आणि स्वत:साठी एक अनेक दालनांचा मोठा आकर्षक वाडा बांधला आणि कल्याण गावाभोवती तटबंदी बांधली.[४]

**माहुली गड :**

हा गड ठाणे जिल्ह्यातील शहापूर तालुक्यात, शहापूरच्या वायव्येला ४ मैलांवरील माहुली नावाच्या डोंगरावर बांधलेला आहे. त्याची उंची २८१५ फूट

१. नवभारत, सप्टेंबर १९६९, पृष्ठ २२, २३
२. कित्ता, पृष्ठ २३
३. नवभारत, डिसेंबर १९६९, पृष्ठ २१, २२
४. नवभारत, ऑक्टोबर १९६९, पृष्ठ २८

असून त्याचा रस्ता पूर्वेकडून माचीवरून जातो. १६६१ साली शिवाजीमहाराजांनी हा गड मुघलांकडून जिंकला. पुढे जयसिंगाबरोबर झालेल्या तहात तो मुघलांकडे गेला. पुन्हा तो मोरोपंत पिंगळे यांनी १६७० साली जिंकून घेतला. संभाजी राजांच्या कारकीर्दीत तो १६८८ सालापर्यंत मराठ्यांच्याच ताब्यात होता. १६८७–८८ च्या सुमारास मातबरखान फौजदार म्हणून काम करीत असताना त्याला बादशहाचे फर्मान मिळाले. त्यावर त्याने बादशहाला १६८८ मध्ये एक अर्ज पाठविला. त्यात तो म्हणतो, "कोकणात उतरून माहुली आणि इतर किल्ले घेण्याची शर्थ करीन. बालाघाटाचे किल्ले घेण्यात मी जिवाची पर्वा केली नाही. त्याचप्रमाणे घाटाखालचे किल्ले घेऊन तिकडील महालांचा बंदोबस्त करीन. बादशाही सेवेत मी काही कसूर करणार नाही.

"काफर संभाजीला कैद केल्याचे ऐकून मी परमेश्वराचे आभार मानले. आपल्याला असेच विजय मिळत राहोत.

"मी तळकोकणातील माहुली आणि इतर किल्ले जिंकून घेण्यास तयार आहे. गुल्शनाबाद (नाशिक) ठाण्यावर तैनात असलेले पथक एक हजार स्वारांहून अधिक नाही. बख्शींना आज्ञा करण्यात यावी की पथकांची आणि सरंजामांची उणीव भरून काढावी. रघू आणि काका मन्सबदार यांनी आपल्या जमेतीनिशी किल्ले जिंकून घेण्यात निष्ठेची कामगिरी बजावली आहे. त्यांच्या मन्सबीत जी वाढ व्हावी म्हणून मी अर्जी केली तीच मुळी कमी आहे. ते अधिकाधिक बादशाही कृपेचे उमेदवार आहेत. त्यांच्यावर मन्सबी आणि इतर मानमरातब यांच्याद्वारे कृपा व्हावी. कारण पुढे कित्येक मन्सुबे आहेत. नाहीतर काका मन्सबदार आणि रघू यांचा विरस होईल.

"शेख अब्दुल्ला हा एक साधुपुरुष आहे. मी किल्ल्यांच्या मोहिमेत गुंतलो असताना त्याच्या सेवेत हजर झालो. किल्ले जिंकले जातील म्हणून त्याने भाकीत केले. त्याप्रमाणे किल्ले माझ्या हातात आले. त्याचा अधिकार जाणून आणि त्याचे कुटुंब मोठे आहे हे पाहून त्याला मदत म्हणून मी त्याच्या मुलांना माझ्या पाटोदा महालाच्या जहागिरीतून तीनशे रुपये उत्पन्नाचा एक गाव दिला आहे. या बाबतीत आपल्याकडून सदरहू खेडे इनाम म्हणून दिल्याचा फर्मान यावा अशी आशा तो बाळगून आहे. म्हणजे तो दौलतीचे अभीष्ट चिंतन करीत धर्मकर्मे करीत राहील."[1]

दि. २१–८–१६८८ रोजी माहुलीचा मराठ्यांचा किल्लेदार द्वारकोजी अब्दुल कादरला भेटला आणि म्हणाला की, "साल्हेरचा किल्लेदार आसोजीप्रमाणे मला मन्सब दिली तर मी किल्ला खाली करीन, आणि ४०००० रुपये

१. नवभारत, सप्टेंबर १९६९, पृष्ठ २२

रोख, १० घोडे, खिलअत इनाम आणि राहण्यासाठी जुन्नरजवळची दोन गावें वतन म्हणून दिली तर मी स्वतः दरबारात हजेरी देण्यासाठी येईन." बादशहाने ही गोष्ट मान्य करून बहेरमंदखानाला अब्दुल कादर यास लिहिण्यास सांगून किल्लेदाराला दरबारात बोलावून इनाम देण्याचे कबूल केले.[1]

माहुलीचा किल्ला मुघलांना दिल्याबद्दल किल्लेदार द्वारकोजी याला अडीच हजार अश्रफ्या मिळाल्या.[2]

औरंगजेब १६८९ सालातल्या फर्मानात म्हणतो, "माहुलीचा किल्लेदार आणि इतर यांना मन्सबी आणि बक्षिसे द्यावीत अशा अर्थाची अर्जी आमच्या नजरेखालून गेली; तुमची विनंती मान्य करण्यात येत आहे. तुमच्याकडे अडीच हजार अश्रफ्या पाठविण्यात येत आहेत. घोडे आणि वस्त्रे ही अतिवृष्टीमुळे पाठविणे शक्य होत नाही. किल्लेदारांच्यासाठी पाठविलेल्या वस्तू त्यांच्याकडे देऊन किल्ले लवकरच ताब्यात आणावे.

"माहुलीच्या किल्ल्यावर किल्लेदारखान याची नेमणूक करण्यात आली असून तो लवकरच तेथे पोहोचेल. इतर किल्ल्यांवरील नेमणुका किल्लेदारखान आपल्या लोकांतून करील.

"मूर्तुजाखान हा दौलताबादेचा किल्लेदार आहे. त्याच्या माणसांना इतक्या लांब पाठविणे होणार नाही. तुमच्याकडे किल्ल्यातील जी माणसे तैनात झाली आहेत ती तुम्हाला येऊन मिळतील. दौलतमंदखान हा चौल बंदराच्या फौजदारी संबंधी उत्सुक नाही. अहमदखान किंवा इतर कोणी यांस पाठवावे. त्यांनी घाटाच्या पायथ्यावर आणि कल्याणवर देखरेख ठेवावी.

"मुहंमद सफी ( मुहसिनखानाचा जावई ) हा चौक बंदरचा दरोगा आहे. तो शेवता घाटावरून एतिकादखानाकडे ( जुल्फिकारखान ) जात आहे. त्याला जहागीर देण्यात येईल. तुमच्या विनंतीप्रमाणे द्वारकोजीच्या नावे ( माहुलीचा किल्लेदार ) फर्मान पाठविण्यात आले आहे."[3]

मातबरखानाने ऑगस्ट १६८९ मध्ये जो अर्ज पाठविला त्यात तो म्हणतो, "हुजुरांचे फर्मान हबीबुल्ला बेग गुर्जदार याच्याबरोबर पाठविलेले जुलूस तेहतीस शव्वालच्या वीस तारखेस ( २८ जुलै १६८९ ) मिळाले. आपल्या आज्ञेप्रमाणे माहुलीचा हवालदार द्वारकोजी याच्याकडे आपले फर्मान आणि अडीच हजार अश्रफ्या पाठवीत आहे. किल्ला ताब्यात घेत आहे. नवीन किल्लेदार नेमून आला की किल्ला त्याच्या हवाली करीन. दौलतमंदखानाकडे कल्याणचा परिसर आणि घाट यांच्यावर देखरेख ठेवण्याचे काम देण्यात येईल.

१. अख : २१–९–१६८८
२. नवभारत, डिसेंबर १९६९, पृष्ठ २९
३. नवभारत, सप्टेंबर १९६९, पृष्ठ २४

" माहुऱ्याजवळ जी पथके तैनात होणार होती ती अद्याप आली नाहीत. याबाबतीत बक्षींना आज्ञा करण्यात यावी. म्हणजे सजावल ( अंमलबजावणीचे अधिकारी ) पाठवून पथके आणि त्यांचे अधिकारी इकडे येतील अशी ते व्यवस्था करतील.

" मला पूर्वी जहागिरी देण्यात आल्या होत्या. पण दुष्काळामुळे चाळीस हजाराने उत्पन्न कमी झाले. माहवार ( महिन्याचा हिशेब ) मध्ये तीस हजाराची तफावत आली. दोन्ही मिळून सत्तर हजारांचे नुकसान झाले. दरवर्षी नुकसान होत आहे. मी घोडदळाचा तिसरा भाग डाग देण्यासाठी ( सरकारी घोड्यांना डाग देऊन खूण करीत. ) पाठवीत आहे. याशिवाय सरकारी कामासाठी पथके बाळगली आहेत. जहागीरखात्याचे दिवाण पै पैचा हिशेब करून पगार देतात आणि तोही बहुतेक बाबतीत तीन किंवा चार महिन्यांच्या कराराने. यात माझेच फार नुकसान आहे. आपण आज्ञा केली की डाग दिलेल्या घोड्यांच्या संख्येप्रमाणे जहागीर दिली जाईल; याबद्दल मी आभारी आहे. माझी विनंती की माझ्या नुकसानीच्या प्रमाणात मला सूट मिळावी, म्हणजे सहामाहीच्याप्रमाणे शिपायांच्या पगाराची व्यवस्था करता येईल.

" सीरमतच्या परगण्यात मला एक लाख वीस हजार दामची जहागीर आहे. त्याच परगण्यात मुहंमद रशीर वाकेनिगार ( आता त्याला कामावरून कमी केले ) याला सात लाख दामची जहागीर, तो परगणा मला तनखा जहागीर म्हणून दिला तर मी त्या परगण्याची व्यवस्था चांगली करीन. "[१]

माहुलीचा किल्ला जिंकल्यानंतर औरंगजेबाने मातबरखानाला दिलेल्या फर्मानात म्हटले की, " तुम्ही माहुलीचा किल्ला जिंकून घेतला. इतर किल्लेही जिंकून घेण्यात तुम्ही कामगिरी बजावली. "[२]

१६८९ साली मातबरखानाने बादशहाला अर्जी पाठवून कळविले की, " माहुलीचा किल्ला म्हणजे तळकोकणची राजधानीच. तिच्या ( माहुली मराठ्यांच्या ताब्यात असताना ) भोवती मुघलांची ठाणी टिकून राहणे अशक्य. किल्ल्यावर रसद, सरंजाम मुबलक. किल्ला अतिशय मजबूत. किल्ल्याभोवती वेढा घालून चौक्या बसविल्या तर त्यासाठी पाच सहा हजार पायदळ सहज लागेल. किल्ला जिंकून घेणे लांबणीवर पडेल. खर्चही बराच येईल. म्हणून मी नरसू महाडीक याला मध्यस्थ नेमले. माहुलीचा हवालदार द्वारकोजी आणि किल्ल्यातील इतर इसम यांनी बादशाहाची ताबेदारी पत्करण्यास मने वळविली. त्यांना बादशाहाकडून मन्सबी, बक्षिसे व इतर कृपेच्या वस्तू देण्यात येतील अशी मी

१. नवभारत, सप्टेंबर १९६९, पृष्ठ २४

२. नवभारत. ऑक्टोबर १९६९, पृष्ठ २८

त्यांना आशा दाखविली आहे. बादशाहाकडून हवालदारांना मन्सबीच्या सनदा मिळाल्या आणि किल्ला बादशाही अधिकाऱ्याच्या ताब्यात देण्याचे फर्मान आले की माहुलीचा किल्लेदार आणि लगतचे महींद्रगड, पळासगड आणि इतर किल्ल्यांचे किल्लेदार शरण येतील, आणि किल्ले सुपुर्द करतील. माझी विनंती मान्य झाल्यास योग्य ते फर्मान, रोख रक्कम, घोडे इत्यादि सादर व्हावेत म्हणजे किल्लेदाराकडे त्या पोहोचत्या करता येतील आणि किल्ले आपल्या ताब्यात घेता येतील. बालाघाटावरील किल्ले जिंकून घेण्याच्या कामात मला फार खर्च झाला. तीन वर्षांपासून माझ्या जहागिरीत दुष्काळ पडला आहे. एक लाख रुपये सरकारात येणे राहिले आहे. माझी फार शोचनीय परिस्थिती आहे. आता कर्जही मिळत नाही म्हणून नादार म्हणून आपल्याला विनंती करीत आहे. ''[१]

माहुलीगड घेतल्यानंतर मातबरखानाने जवळच्या घाटाच्या पायथ्याशी, तरोडा गावी तळ दिला. त्या संबंधात तो मे १६८९ मध्ये लिहितो, " तेथून मी खर्डी या गावी आलो. दुसऱ्या दिवशी मी तेथून निघालो. हेरांनी बातमी आणली की माहुलीच्या किल्ल्यातून मराठ्यांचे एक हजार पायदळ सैन्य बाहेर पडले आहे. ज्या वाटेवरून आमचे लष्कर मोठ्या मुष्किलीने जाऊ शकेल ती वाट त्यांनी अडविली आहे. ही बातमी कळताच मी हाजी अहमद बेगबख्शी, जव्हारचा जमीनदार विक्रम श्रीपत आणि इतर अधिकारी यांना स्वार, पायदळ, बर्कंदाज इत्यादींचे सैन्य बरोबर देऊन मराठ्यांचा मोड करण्यासाठी पाठविले. तीन घटिका उभय दळांची लढाई झाली. काफरांपैकी कित्येकजण ठार अगर जखमी झाले. यानंतर शत्रूने पळ काढला. आमच्या सैनिकांनी जिवापाड मेहनत केली. हाजी अहमद बेग बख्शी याने आपल्या हाताने तीन माणसे ठार मारली. त्याला स्वतःला बाणाच्या दोन जखमा झाल्या. हाजी अहमद बेग बख्शी, हा शिपाई गडी आहे, आणि उत्साही आहे. यापूर्वीही त्याने पट्टा वगैरे किल्ले जिंकून घेण्याच्या मोहिमेत कामगिरी बजावली होती. त्याला शंभर ( जात ) आणि पन्नास स्वार अशी बढती द्यावी असे मी त्र्यंबक किल्ल्याच्या प्रकरणात सुचविले होते; पण हुजुरांनी शंभर ( जात ) ने मन्सब वाढविली पण तिला बशर्ते खिदमत ( नोकरीची अट ) घातली. इतर अधिकाऱ्यांना ही अट न घालता बढत्या मिळाल्या आहेत, तशीच बढती आपल्यालाही मिळेल अशी आशा तो बाळगून आहे. असे झाले तर यापुढेही तो श्रम साहसाची कामे करील. ''[२]

१६८८ सालच्या जुलै महिन्याच्या शेवटी सैय्यद अब्दुल्लाखान ( प्रसिद्ध सैय्यद बंधूंचा बाप ) याने आपला मुलगा हसनअलीखान यास सैन्य घेऊन होलगड

१. नवभारत, सप्टेंबर १९६९, पृष्ठ २३

२. नवभारत, सप्टेंबर १९६९, पृष्ठ २३

( हा लोहगड असावा ) किल्ला जिंकून घेण्यासाठी पाठविले होते. तेथील किल्लेदाराने त्याच्याशी झुंज दिली, परंतु मुघल सैन्यापुढे त्याचा निभाव लागला नाही. मुघलांनी किल्ला जिंकल्यावर सैय्यद अब्दुल्लाने होलगडाच्या किल्ल्याची सोन्याची किल्ली बादशहाकडे रवाना केली.[1]

**कोथळागड**—औरंगजेबाने तळकोकण व कल्याण-भिवंडी येथील आपले सैन्य काढून घेतले तरी त्याने उत्तर कोकणात आक्रमक हालचाली १६८४ मध्ये पुन्हा सुरू केल्या. कोथळागड तळकोकणातील तेल्याघाटाच्या डोंगरात असून, ठाणे जिल्ह्यात, शहापूर तालुक्यात, शहापूरच्या ईशान्येस १०–१२ मैलांवर आहे. कोथळागडाच्या वेढ्यासंबंधीची माहिती मराठी, इंग्रजी कागदपत्रात मिळत नाही. औरंगजेबाच्या बातमीपत्रातून ह्या वेढ्यासंबंधी तपशीलवार माहिती उपलब्ध झालेली आहे.

औरंगजेबाने दि. १२–११–८४च्या सुमारास अब्दुल कादर ( मुखलीसखानाचा जावई ) व अलिबिरादरकानी, हैदरचा पुतण्या, यांना संभाजीच्या ताब्यातील किल्ले घेण्यासाठी धाडले. यापूर्वीच काजी हैदरने औरंगजेबाला लिहून कळविले होते की, कोथळागड महत्त्वाचा असून, जो कोणी तो ताब्यात ठेवील त्याचा ताबा तळकोकणावर राहील. अब्दुल कादर या गडाच्या जवळपास गेला. त्याने तेथे राहणाऱ्या अनेक लोकांना नोकर म्हणून ठेवून घेतले. कोथळागड येथे मराठ्यांचा हत्याराचा साठा असे. ह्याच किल्ल्यातून ते लढण्यासाठी हत्यारे नेत असत. हे कळताच अब्दुल कादर व त्याचे ३०० बंदुकधारी दि. ८–११–८४ रोजी कोथळागडच्या पायथ्याशी पोहोचले. मराठ्यांनी या लोकांना मागे हटविले, तरीदेखील काही लोक किल्ल्याच्या मगरकोट दरवाज्याजवळ पोहोचले. दरवाजा उघडा म्हणून त्यांनी आरडाओरड केली. किल्ल्यावरील मराठी सैनिकांना वाटले की, आपलीच माणसे हत्यारे नेण्यासाठी आली आहेत. किल्ल्यातील सैनिकांनी किल्ल्याचे दार उघडताच मुघल सैनिक किल्ल्यात शिरले. किल्ल्यात मराठ्यांची फौजही होती. मराठे व मुघल यांच्यात लढाई झाली. तेवढ्यात अब्दुल कादरही गडावर चढला. पुन्हा मुकाबला झाला. अब्दुल कादरच्या मदतीसाठी माणकोजी पांढरेही गेला. झालेल्या चकमकीत मुघलांना यश आले. दि. ९–११–८४ रोजी म्हणजे दुसऱ्याच दिवशी मराठ्यांनी अचानकपणे किल्ल्याला घेरले. धनुष्यबाणांची फार मोठी लढाई झाली.[2] यामुळे अब्दुल कादरची स्थिती कठीण झाली. अब्दुल कादर गडावर गेल्यापासून त्याच्या मदतीसाठी कोणीही गेले नव्हते, म्हणून त्याने बादशहाला लिहिले की माझ्या मदतीसाठी कोणी आले नाही तर मी जगेन असे नाही. मराठ्यांनी किल्ला वेढला; बाणांची व बंदुकांची लढाई झाली. किल्ल्यातील

१. अख : ९–८–१६८८    २. अख : १२–११–१६८४

दारूगोळा अग्नीच्या भक्ष्यस्थानी पडला. गडावर जाणारी सामुग्री मराठ्यांनी लुटली[१] असल्याने मुघल सैन्याला दारूगोळा व दाणागोटा मिळेना. १९–२० तारखेच्या सुमारास जुन्नरचा किल्लेदार अब्दुल अजिजखान याने आपला मुलगा अब्दुलखान याला सैन्यासह अब्दुल कादरच्या मदतीसाठी पाठविले. अब्दुलखान तेथे पोहोचला तेव्हा मराठ्यांचा सरदार नारोजी त्रिंबक याने मुघली सैन्याची वाट अडविण्यासाठी तेथील खोरे रोखून धरले होते, म्हणून अब्दुलखानाने हल्ला केला. तलवार, खंजिरानी हातघाईची लढाई झाली. झालेल्या लढाईत नारोजी पकडला गेला. मराठ्यांनी किल्ल्याचे खोरे रोखून धरल्यामुळे करोराचा ठाणेदार अब्दुल कादिरखान, शिकारपूरचा ठाणेदार माणकोजी, करडे-निमोणीचा ठाणेदार रअद अंदाजखान येथे पोहोचले. मराठे व मुघल यांच्यात चकमकी होऊन नारोजी त्रिंबक व इतर सरदार धारातीर्थी पडले व कोथळागड दि. १६–११–८४ रोजी मुघलांच्या हाती पडला. इहतमामखानाने नारोजी त्रिंबकचे डोके रस्त्यावर टांगले. किल्ला जिंकून घेतला म्हणून गडाची सोन्याची किल्ली औरंगजेबाकडे पाठविण्यात आली.[२] जेधे शकावलीत कोथळागड मोंगलांनी दि. ७–११–८४ ( शके १६०६, कार्तिक शुद्ध ११ ) रोजी घेतला म्हणून नोंद आहे.[३] मुघलांनी कोथळागडला मिफ्ताहुलफतह असे नाव दिले. अब्दुलखानाने किल्ल्यात प्रथम प्रवेश केला व गड जिंकला म्हणून त्याला १०००० रु. बक्षिस देण्यात आले.[४] औरंगजेबाचा आपल्या अधिकाऱ्यांवर विश्वास नसे. त्याला १६८१ पासून मराठ्यांविरुद्ध आक्रमक हालचाली करून फारसे यश मिळाले नव्हते. हा गड घेतल्याचे कळताच तो गड मुळात आहे की नाही याची खात्री करून घेण्यासाठी आतीशखानाला पाठविण्यात आले. त्याने कळविले की काजी हैदरने सांगितल्याप्रमाणे खरोखरच कोथळागड किल्ला ताब्यात आल्यामुळे तळ-कोकणच बादशाही अंमलाखाली आल्यासारखे आहे. औरंगजेबाने खात्री करून घेण्यासाठी कोथळागडचा नकाशाही मागविला होता. ४० दगड फोडणारे लोक गडाच्या दुरुस्तीसाठी पाठविण्यास, दक्षिण तोफखान्याचा अधिकारी आतीशखान याला हुकूम धाडण्यात आला होता. हा गड घेण्यातही फितुरी झालेली दिसते. कारण गोविंदराव व इतर मावळ्यांनी मन्सबीच्या आशेने कोथळागड घेण्यास मदत केल्यामुळे त्यांना २५०० होन बक्षिस म्हणून देण्यात आले होते. ज्या

१. अख : १४–११–१६८४
२. ,, : १६–११–८४, २०–११–८४, २१–११–८४. MA–JS p 157
३. शिचप्र, पृष्ठ ३३
४. अख : ३–१२–८४, ९–१२–८४, १४–१२–८४, २१–१२–८४, १३–१–८५

मावळ्यांनी किल्ल्यात प्रथम प्रवेश मिळविला त्यांनाही सोन्याचे व चांदीचे कडे बादशहाने दिले.[1]

एकीकडे अशा तऱ्हेची फितुरी झालेली दिसत असली तरी दुसरीकडे ध्येयनिष्ठ मराठ्यांनी कोथळागड परत घेण्याचे प्रयत्न सुरू केलेले दिसतात. १६८४ च्या डिसेंबर महिन्याच्या अखेरीस मराठ्यांनी गडाकडे जाणाऱ्या मुघल सैन्यास अडविले. तसेच पायदळाच्या एका तुकडीने किल्ल्यात प्रवेश मिळविला. किल्लेदार सय्यद अब्दुल करीमखानाबरोबर बाण व बंदुकीची चकमक उडाली. अब्दुलखानाला यापूर्वीच गडावर मदत पोहोचविण्यास सांगितले होते. मराठ्यांनी त्याला अडविले असल्याने तो तेथे वेळेवर पोहचू शकला नाही. यानंतर मऱ्हामतखान हा कोथळागडाकडे मदत घेऊन निघाला. त्याला ७००० मराठ्यांच्या तुकडीने अडविले. त्यांच्याशी सामना झाला; परंतु त्यात मराठ्यांना यश लाभले नाही. मऱ्हामतखान दि. २४–१२–८४ रोजी कोथळागडावर पोहोचला. मुघलांनी किल्ला घेतल्यानंतर मराठी फौजेतील ४०० पायदळ मावळ्यांचा जमादार राजजी हा चाकरीच्या आशेने गडाच्या नव्या मुघल किल्लेदाराकडे गेला. अशा गोष्टी घडत असल्या तरी काही सैनिकांनी किल्ला परत घेण्याचे प्रयत्न सोडले नाहीत. ७०० पायदळाच्या तुकडीने हत्यारे व दोर घेऊन किल्ल्यात शिरण्याचा प्रयत्न केला.[2] दि. १९–४–८५ रोजी दोरीच्या शिडीने २०० लोक किल्ल्यात शिरले. त्यांची अब्दुल कादरशी चकमक झाली. पण याही प्रयत्नात मराठ्यांना यश आले नाही. दोन्हीकडील माणसे जखमी झाली. पकडलेली माणसे व शिड्या बादशहाकडे पाठविण्यात आल्या.[3] मुघलांनी जरी कोथळागड जिंकला तरी मराठ्यांनी तो परत घेण्याचे प्रयत्न केले. परंतु त्यात त्यांना यश लाभले नाही. कोथळागडासारखा दारूचा साठा असलेल्या, तळकोकण ताब्यात ठेवणाऱ्या महत्त्वाच्या गडाला मराठ्यांना मुकावे लागले. मराठ्यांना अनेक आघाड्यांवर लढावे लागत असल्यामुळे त्यांना येथे कदाचित कुमक कमी पडली असण्याचा संभव होता.

संभाजीराजे व त्यांचे ध्येयनिष्ठ सेवक मुघली आक्रमणाविरुद्ध स्वराज्याच्या रक्षणासाठी कशा तऱ्हेने लढत होते हे वरील दोन वेढ्यांवरून सहज लक्षात येईल.

---

१. या कोथळागडालाच कोंडाणा समजून सर जदुनाथ सरकार यांनी भाषांतर केल्यामुळे मुघलांनी सिंहगड घेतला असा त्यांचा समज झाला. तो अत्यंत चुकीचा आहे. किल्ला घेणारा अब्दुल कादर, तात्पुरता नेमलेला किल्लेदार अब्दुल करीम आणि किल्ला घेतल्याची तारीख वर दिलेल्या कोथळागडाशीच जुळते; कोंडाणा गडाशी नव्हे.

२. अख : १–१–८५, १३–१–८५     ३. अख : २८–४–८५

## पुणे जिल्हा : दक्षिण बाजू

पुण्याजवळच जुन्नर, अहमदनगर इत्यादि ठिकाणी मुघलांची ठाणी होती. या ठाण्यांवरून त्यांना पुणे जिल्ह्यात येणे फारसे कठीण नव्हते. तळकोकणात जाण्यापूर्वी अजमशहाने हसन अलीखान यास खिल्लत, आणि १०००० फौज देऊन १६८१ च्या अखेरीस पुरंदरच्या बाजूस रवाना केले.[१] संभाजीकडे १००० जाट व २०० स्वार असलेला एक मन्सबदार शेख इब्राहीम याला मुघलांनी ५००० स्वार किंवा प्यादे मुकर केले तर तो त्यांच्या बाजूने पुरंदरच्या बाजूचा बंदोबस्त करावयास तयार होता. दऱ्याखोऱ्यातून पुरंदरकडे येण्याच्या मराठ्यांच्या वाटा तो रोखणार होता. पण त्याच्या मागणीचा विचार झालेला दिसत नाही. मुगलखानाला ३६१५ स्वारांच्या फौजेचा सरदार करून त्याला पुरंदरच्या बाजूस जाऊन मराठ्यांना तंबी देण्याचा हुकूम मिळाला.[२]

१६८२ च्या डिसेंबरच्या अखेरीस शहाआलमचा मुलगा आणि औरंगजेबाचा नातू मुइज्जुद्दीन पुरंदरच्या पायथ्यापर्यंत पोचला. त्या दोघांनी २७ खेड्यांना आग लावून ती नाश केली. मुघल सैन्याने काही मराठ्यांची कत्तल केली आणि काहींना कैद केले. मुइज्जुद्दीन आणि मुगलखा यांच्याबरोबर मुकाबला करण्यासाठी धाकू वंजाऱ्याचा मुलगा आणि संभाजीचा नोकर माणकोजी गेले होते. पण तेथून ते निघून गेले.[३] मुघल सैन्य पुण्याच्या आजूबाजूचा प्रदेश उद्ध्वस्त करी किंवा तेथे लूटमार करीत असे. त्यांच्या बंदोबस्तासाठी १६८३ च्या जानेवारीच्या सुरुवातीस मराठी सैन्य राजगड, पुरंदर आणि शिवापुरात जमा झाले होते. मुघल मुल्ख उद्ध्वस्त करावयाचा त्यांचा विचार होता. ही बातमी शहाबुद्दीनखानाला समजली म्हणून तो पुरंदर, राजगडच्या परिसरात शिरला. त्याने मराठ्यांबरोबर मुकाबला केला. झालेल्या चकमकीत मुघलांच्या हाती ४० तलवारी, नगाऱ्याचा १ जोड आणि झालरीची एक पालखी सापडली.[४]

मुघलांनी पुरंदर, शिवापूर, शिरवळ येथे सतत लूटमार सुरू केली होती. साताऱ्याच्या आजूबाजूस लूटमार केल्यानंतर १६८२ च्या जानेवारीत खानजहान बहादूरने शिवापूरचा कसबा लुटला. पुढे १६८४ च्या ऑक्टोबर महिन्याच्या सुरुवातीस मुघलांनी शिवापूर जिंकले व त्या प्रदेशावर अब्दुर्रसूलखान यास ठाणेदार म्हणून नेमले.[५] परंतु मराठे पुन्हा शिवापूर घेण्यासाठी केव्हा हल्ला करतील याचा नेम नव्हता. शिवापूरच्या ठाण्यावर आपला भाऊ अजमत याच्या-

१. अख : १५–१२–१६८१
२. अख : १८–१२–१६८१
३. ,, : १–१–१६८३
४. ,, : १६–१–१६८३
५. ,, : ४–१०–१६८४

जवळ निम्मे लोक ठेवून अब्दुर्रसूल स्वतः गाजीउद्दीनखानाच्या मदतीस गेला. सय्यद मन्सूर वल्दजानबाज खानाला भाऊबंदांसह शिवापूरवर जाण्याचा आणि तेथील बंदोबस्त करण्याचा हुकूम देण्यात आला होता.[१]

थोड्याच दिवसांत मुघलांनी शिरवळजवळ ठाणे कायम केले,[२] तेथील ठाणेदार बहरामंदखान याला मराठ्यांना तंबी देण्यासाठी हुकूम देण्यात आला होता. हे ठाणे कायम होण्यापूर्वी मराठ्यांनी मुघलांशी सामना दिला होता. या किंवा पुढील चकमकीत कृष्णाजी दादाजी नरसप्रभूने चांगली मर्दुमकी केली होती. शिरवळला बहरामंदखानाला धान्याची जरूरी होती. सरकारकडून त्याच्याकडे २००० बैल धान्य जात असताना मराठ्यांनी ते लुटले. लुटीतून उरलेले धान्य पुण्याला पोहोचविण्यात आले. या लुटीमुळे बहरामंदखानाला सावध राहण्याविषयी हुकूम देण्यात आला.[३]

पुणे प्रांतात मुघलांनी धूमाकुळ घातला होता. किल्ले शाबूत राहिले असले तरी खिंडी, घाट, खोरी आणि मैदाने यात मराठे आणि मुघल यांच्यात चकमकी उडत होत्या. अशा प्रसंगांत सर्जेराव जेधे याचा भाऊ शिवाजी जेधे हा शिरवळ येथे मुघलांना मिळाला. त्याच्या पाठोपाठ सर्जेरावही गेला. आपल्यासाठी रदबदली करण्याची त्याने रोहिड्याचा किल्लेदार संताजी निंबाळकर याला विनंती केली होती. संताजीकडून ही गोष्ट संभाजी राजांना समजताच त्यांनी सर्जाराऊ जेधे याची कडक शब्दात हजेरी घेतली.[४] मुघलांच्या शिरवळ ठाण्यावर मराठ्यांचे हल्ले करणे चालूच होते. १६८५ च्या नोव्हेंबर महिन्यात मराठ्यांची फौज शिरवळच्या आसपास गेली. या फौजेत बिजलीसारखे चांगले शिपाई होते. मराठे आणि मुघल यांच्यामध्ये झालेल्या चकमकीत नाहरखानाचे तीन मुलगे जखमी झाले आणि मराठ्यांचा वाकेनिगार पकडला गेला.[५] यानंतर मुघल सैन्य रोहिडखोऱ्यात शिरले.

मुघलांनी शिरवळ घेतल्यानंतर त्यांनी मावळप्रांतात चाल केली. मुघलांच्या प्रत्येक हालचालीचा मराठे तत्परतेने प्रतिकार करीत होते. रोहिडखोऱ्यात कृष्णाजी दादाजी नरस प्रभू सबनीस होता. शत्रू कसा येतो, कोठे जातो याची बारीकसारीक माहिती कळून त्यांचा बंदोबस्त करावा म्हणून शंकराजी नारायण १६८५–८६ मध्ये कृष्णाजी दादाजी नरस प्रभू देशपांडे यास लिहितात, " मावळप्रांती गनिमांनी चाल केली म्हणोन समजले. त्यास कोरळखिंड, ढवळाघाट

१. अखः २७-१२–१६८४ २. अखः १३–१–१६८५

३. ,, : १५–१–१६८५; १७–१–१६८५

४. ,, : ५–१०–१६८५; शिचसा, खंड. २, पृष्ठ २३४; मइसा. खंड १५, ले ३४२

५. ,, : १८–११–१६८५

व मांडरदेवचा सडा येथील जागा जागा चौक्या घालून गनिमाची खबर ठेऊन कमकसुर खास बातमी पावती करणे. राजगडी कळविताच, तुमची कुमक रोहिडा वगैरे जागाहुन होईल. तुम्ही शिरवली मर्दुम चांगली केली. हे खबर येथे समजली. यावेळी गनीम नामोहरम सर्वांनी करावा. तुम्ही जमेदार व सरचाकर महाराजांचे वेळचे (नामोश) करोन दाखवतील हा भरवसा आहे. बहुत काय लिहिणे. "[१]

दि. ४–३–१६८७ पर्यंत रोहिडागड मराठ्यांच्या ताब्यात होता. यानंतर केव्हा तरी तो मुघलांनी घेतला. संभाजी, निळो मोरेश्वर यांच्या विनंतीला मान देऊन सर्जेराव जेधे राजांच्या भेटीस गेला होता. त्यावेळी राजांनी मुघलांकडून हा गड घेण्याची त्याला आज्ञा केली होती. १६८८ सालापर्यंत रोहिडा, पुरंदर, श्रीवर्धन, राजमाची इत्यादी गड मराठ्यांच्या ताब्यात होते.[२] राजे पकडले गेल्यानंतरच हे गड मुघलांना घेता आले हे ध्यानात ठेवले पाहिजे.

**पुण्याची आग्नेय बाजू :**

पुण्याच्या दक्षिण भागात मुघल सैन्य ठाणी कायम करीत होते त्याच वेळी त्यांनी पुण्याचा आग्नेय प्रदेश काबीज करण्याचा प्रयत्न केला होता. १६८३ च्या ऑक्टोबरपर्यंत मराठ्यांच्या ताब्यात सुपे, इंदापूर ही ठाणी होती. तसेच १६८४च्या सुरुवातीस तरी कऱ्हे पठारावर त्यांचा अंमल दिसतो.[३] याच सुमारास मुघल अधिकारी मामूरखान याने या भागात मराठ्यांवर हल्ला करून त्यांचा मोड केला होता. त्याने सुपे येथे ठाणे कायम केल्यावर तेथे रसूलखान मयाणी याला नेमले.[४] यानंतर या ठाण्यावर १६८४ च्या ऑक्टोबर महिन्यात फकरुद्दीन यास नेमण्यात आले.[५] मराठ्यांची फौज सुपे घेण्यासाठी त्या परिसरात गेल्याचे समजताच गाजीउद्दीनखान तावडतोब तेथे गेला. मराठे आणि मुघल यांच्यात चकमकी उडाल्या.[६] या चकमकीनंतर बहुधा सुप्याच्या ठाण्यावर रअद अंदाजखान याची नेमणूक करण्यात आली. सुपे येथे मराठ्यांची ये-जा चालूच राहिली. या ये-जा करणाऱ्या मराठ्यांच्या फौजेशी सामना देण्याकरिता रअद अंदाजखान याच्याजवळ पुरेशी सैन्यशक्ती नसल्यामुळे लुतफुल्लाहखानाला स्वार नेमण्याचा हुकूम देण्यात आला.[७] यानंतर रअद अंदाजखान पुण्यास गेला. १६८७ च्या अखेरीस पाटस, नीरथडी, सांडस, कऱ्हेपठार येथे मुघलांचा अंमल बसला.[८]

१. मइसा, खंड १५, ले २८०
२. शिचप्र, पृष्ठ ३४; शिचसा, खंड १, ले ६९
३. शिचसा, खंड १, लेख ६८; खंड २, लेख, ६९
४. मवऔ–प, पृष्ठ २६, Dec. 1863 राखं, २०, पृष्ठ ५०
५. कित्ता
६. अख : ३–११–१६८४
७. अख : ७–१–१६८५
८. मइसा, खं. १८, ले ३२

**पुण्याची ईशान्य बाजू :**

१६८२ च्या अखेरीपासूनच मराठ्यांनी पुण्याच्या ईशान्य भागात मुघलांच्या शिरूर तालुक्यात चढाई केली. मुघल ठाणेदार माणकोजी हा शिक्रापूर येथे होता. संभाजीच सरदार नारोजी त्रिमल मोठी फौज घेऊन शिक्रापूरच्या परिसरात घुसला. माणकोजी व नारोजी यांच्यात चकमक उडाली. मराठयांकडील अनेक लोक जखमी झाले व काही मारले गेले. माणकोजीच्या हातात ५० घो डेव ४० तलवारी सापडल्या.[1] करडे—निमोणे येथे खोजा हमीद ठाणेदार होता. करडे शिरूरच्या दक्षिणेस ५ मैलांवर असून निमोणे हे करडयाच्या आग्नेयेला ५-६ मैलांवर आहे. १६८५ च्या जानेवारीच्या पहिल्या आठवडयात मराठे या भागात मुघलांना सतावीत होते. खोजा हमीद जवळ मराठ्यांना सामना देण्यास पुरेसे सैन्यबळ नव्हते. आहे त्या फौजेनेच मराठ्यांना तंबी द्यावी असे त्याला कळविण्यात आले होते; आणि मराठ्यांची फौज असली तरी त्याने त्याच ठिकाणी राहावे अशी त्याला आज्ञा देण्यात आली होती.[2] यानंतर मराठ्यांची ७०० सैन्याची एक तुकडी मलठण येथे शिरली. (मलठण हे शिरूरच्या पश्चिमेला ७ मलांवर आहे.) हे कळताच खोजा हमीदने बुणग्यांना पाठीमागे ठेवून मराठ्यांना तंबी देण्यासाठी स्वारी केली. तो तेथे पोहोचेपर्यंत मराठ्यांची सेना शिरूरमध्ये शिरली असल्यामुळे खोजा हमीदने त्यांचा पाठलाग केला. त्याच्या मदतीसाठी शिक्रापूरचा ठाणेदार माणकोजी याचा भाऊ जीवाजी आपल्या लोकांसह तेथे गेला. त्यानंतर खोजा हमीद करडे—निमोणे येथे परतला. मराठ्यांनी धुमाकूळ घातल्याने बुणग्यांना ठेवण्यासाठी खोजा हमीदला सुखरूप जागाच राहिलेली नव्हती. त्यासाठी गढीच्या भोवती तट बांधण्यास त्याला सांगितलेले होते आणि स्वारीच्या वेळी बुणग्यांना आत ठेवून जावे असाही त्याला हुकूम देण्यात आला होता.[3] मराठ्यांनी मुघल सैन्याला सतावले होते. करडे—निमोणेपासून ७ कोसांवर असलेल्या रादूल (?) गावी जाऊन मराठे रात्रीच्या वेळी हल्ले करीत असत. हुकूम आला असता तर रात्रीच्या वेळी खोजा हमीद हल्ला करून मराठ्यांना तंबी देणार होता. परंतु त्याला तशी परवानगी न देता मरहमतखानाला पाठविण्यात आले होते.[4]

फेब्रुवारी महिन्यात संभाजीचा सरदार खंडोजी याने आपल्या लोकांसह सरसगावला वेढा घातला होता. हे गाव निमोणेच्या दक्षिणेस ७-८ मैलांवर आहे. या स्वारीची बातमी लागताच खोजा हमीद तेथे पोचला आणि त्याने मराठ्यांशी मुकाबला केला. मराठ्यांनी मुघलांचे उंट आणि जनावरे पळविली होती ती खोजा

---

१. अख : ५—२—१६८२     २. अख : १२—१—१६८५

३. ,, : २१—१—१६८५     ४. ,, : २९—१—१६८५

हमीदने पुन्हा हस्तगत करून मराठ्यांचा भीमेपर्यंत पाठलाग केला.[1] खोजा हमीद या विजयाने खूष झाला.

## पुण्याची उत्तर बाजू :

मराठे १६८२ सालच्या ऑक्टोबर महिन्यात मुघल प्रदेशातील चाकणच्या भोवतालच्या भागात स्वारीसाठी गेले होते. चाकणचा किल्लेदार जानबाजखान आजारी असल्यामुळे त्याच्या जवळचे लोक घाबरले. ते किल्लेदारापासून लांब जावयास तयार नव्हते. त्यामुळे शहाबुद्दीनखानाला तेथे जाण्याचा हुकूम देण्यात आला होता.[2] परंतु मराठे तेवढ्यात जुन्नरच्या आसपास गेले. तेव्हा जुन्नरजवळच्या आलाबंद ठाण्यावर जाऊन त्या बाजूने मराठ्यांना प्रवेश करू देऊ नये असा शहाबुद्दीनखानाला हुकूम देण्यात आला.[3] तो ताबडतोब जुन्नरला पोहोचला. गुरुवार दि. ९–११–१६८२ ला जादा सामान आणि बुणग्यांना जुन्नर येथे ठेवून मराठ्यांचा पाठलाग करून त्याने त्या प्रदेशातील जवळ जवळ २० गावे लुटली, जाळली. काही जनावरे त्याच्या हातात पडली. अनेकजण मेले. आणखी काही गावे लुटल्यानंतर तो खोऱ्याच्या बाहेर पडणार होता.[4]

ऑक्टोबरच्या अखेरीस किलिचखान भामानदीपासून ४० कोसांवर असलेल्या मराठ्यांच्या मुलखात शिरला. तेव्हा संभाजी राजांच्या २० हजार स्वार व प्यादे यासह हंबीरराव आणि विठोजी सामना देण्यासाठी त्याला सामोरे गेले. तेव्हा किलिचखानाने सरअफराजखान, यलबर्शखान, कमालुद्दीनखान व किशोरसिंग हाडा वगैरेंना सात हजार स्वारांसह डाव्या बगलेस नेमून स्वारी केली. दोन्ही सैन्यांत जोरदार चकमकी झाल्या. मराठ्यांचे ४०० लोक मरण पावले, पुष्कळ जखमी झाले. मुघल सैन्याने मराठ्यांचा पाच कोस पाठलाग केला. मराठे डोंगरात लपले. किलिचखानाने सय्यद औघलान यास लिहिले की, "हंबीरराव वगैरे शत्रूच्या जमीअतीस उत्तम तंबी दिली. बादशाही सुदैवाने मोठा विजय मिळविला. बादशाही कृपेची आशा करीत आहे." हुकूम आला की आपले निशाण उभारले नसावे. खान मजकुराने लिहिले आहे की इतके शत्रूचे लोक मारले की शबेहुनूबप्रमाणे तो दिवस उजळला होता. शत्रूच्या लोकांना जर मारलेले आहेस तर बादशाही लोक कामास कसे आले? आणि ह्याशिवाय तू मुहम्मद अज्जमशहाकडे परत कशासाठी आलास? अर्ज आला की तो चाकर

१. अख : ७-२-१६८५
२. ,, : १९–१०–१६८२; २१–१०–१६८२
३. ,, : ७–१०–१६८२
४. अख : १३–११–१६८२

असा नाही की जो खोटे सांगेल.[1] या पत्रव्यवहारावरून औरंगजेबही अधिकाऱ्यांच्या प्रतिवृत्तावर संपूर्णपणे विश्वास ठेवू शकत नसे व ठेवीतही नसे हे स्पष्ट दिसते.

डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यात शहाबुद्दीनखान चाकणमध्ये होता. मराठ्यांची फौज लोहगडच्या बाजूस आल्याची बातमी त्याला समजली तेव्हा तो तेथे पोहोचला. झालेल्या चकमकीत त्याने ६० माणसांची कत्तल केली. तेथेच त्याला मराठे विसापूरमध्ये चौथ वसूल करण्यासाठी गेल्याचे कळले; म्हणून शहाबुद्दीनखान तेथे पोचला. त्याने मराठ्यांबरोबर सामना दिला. त्यांचा शिवा-शिवीचा खेळ चालू होता. तो जेथे जाईल तेथे त्याला मराठे दुसऱ्या ठिकाणी गेल्याचे समजत होते. तो विसापूरला पोहोंचताच त्याला मराठे कुसुरपुरात जमा झाल्याचे कळले; म्हणून तो कुसुरपूरला गेला. (कुसुरपूर जुन्नर तालुक्यात खानापूरच्या पश्चिमेस ४ मैलांवर आहे) तेथे शहाबुद्दीन आणि मराठे यांच्यात फार मोठी लढाई झाली. दोन्हीकडील सैनिक जखमी झाले. शहाबुद्दीनखानाने मराठ्यांची १८ खेडी बरबाद केली. मुघलांच्या हातात २७ तलवारी, बंदुका, ४३ भाले, १ पालखी, २ नगारे जोड व ५ निशाणे सापडली.[2] या यादीवरून मराठी फौजेजवळ कोणते साहित्य असे हे कळते. यानंतर शहाबुद्दीनखानाने पुण्यास तळ ठोकला आणि तेथूनच रायगडाच्या बाजूस त्याने लढाई सुरू केली.

१६८४ च्या जानेवारीच्या पहिल्या आठवड्यात मराठे लोहगडच्या आसपास गेल्याचे कळताच टोके उमराचा ठाणेदार फकरुद्दीन याने स्वारी करून मराठ्यांशी सामना केला.[3] ऑक्टोबर महिन्यात संभाजीचे स्वार व प्यादे मुघ-लांच्या जुन्नर येथील ठाण्यावर चढाईसाठी गेले असताना जुन्नरचा किल्लेदार अब्दुल अजीजखान त्यांच्यावर चालून गेला. चकमकीत मराठ्यांकडील हत्यारे मुघलांच्या हाती पडली आणि मराठ्यांचा मुख्य अधिकारी मुघलांच्या हातात सापडला व मारला गेला. गळा कापून त्याचे शीर अब्दुल अजीज घेऊन गेला.[4]

शिवनेर प्रांतात चौथ वसूल करण्यासाठी मराठ्यांचा सरदार अघलराव याला नेमले असता तो चाकरीच्या आशेने शिवनेरचा मुघल ठाणेदार मुहम्मद खलील यास भेटला.[5]

जुन्नर तालुक्यातील वेल्हा गावा जवळच्या किल्याजवळ मराठे चढाईसाठी गेले असता ते वेल्हा ठाण्याच्या आसपास खोडी काढून गेले. त्यावेळी जुन्नरचा

१. अख : ३–११–१६८२, ७–११–१६८२

२. ,, : १८–१२–१६८२ ३. अख : ७–१–१६८४

४. ,, : ९–१०–१६८४ ५. ,, : २३–१०–१६८४

किल्लेदार अब्दुल अजीजखान आणि त्याचा मुलगा यांनी स्वारी केली नाही म्हणून त्यांची मनसब कमी करण्यात आली.[1]

पुण्याच्या वायव्येला २०-२२ मैलांवरील नवलाख उमरा येथे मराठ्यांची फौज गेली. तेथे त्यांनी पुंडाई चालू केली. तेथील मुघल ठाणेदार अब्दुल खैर याच्याजवळ फारशी फौज नव्हती म्हणून काळजीपूर्वक व्यवस्था करून अतिश-खानाने पुण्याहून नवलाख उमरा गावी जावे असा त्याला हुकूम देण्यात आला.[2]

१६८५ सालच्या मार्च महिन्यापर्यंत मुघलांनी पुण्याच्या परिसरातील मुलखात लूटमार करून मुलूख उद्‌ध्वस्त केला असला तरी त्यांना पुणे प्रांतावर पूर्णपणे ताबा मिळविता आलेला नव्हता. भोर, वीर, न्हावी ( भोरच्या पूर्वेस ५ मैल ) इत्यादी प्रदेश मराठ्यांच्या ताब्यात होता.[3]

१६८५ च्या जानेवारीत पुण्याच्या ठाणेदारीवर फकरुद्दीन हा मुघल अधिकारी होता. मराठे त्याच्यावर चालून गेले. फकरुद्दीनने त्यांच्यावर स्वारी केली. व मराठ्यांचा पराभव केल्याचे त्याच्या अधिकाऱ्याला कळविले.[4] त्याच सुमारास पुण्यात रअद अंदाजखान व कमरुद्दीन हे हजर होते. ते कदाचित् सिंहगडाच्या बाजूस निघाले असावे. त्यावेळी संभाजीराजे १०००० स्वारांसह चालून गेले. तेव्हा रअद अंदाजखान आणि फकरुद्दीन यांनी स्वारी केली. ही लढाई बरेच दिवस चालू होती. मुघलांचे सैन्य कमी होते म्हणून अधिकाऱ्यांनी कुमक मागविली. अतीशखानाबरोबर १४५५ स्वार आणि रु. २००० ची मदत पाठविण्यात आली. या लढाईत मराठे विजयी झालेले दिसतात[5].

१६८५ च्या नोव्हेंबर महिन्यात पुण्याला कादरखान ठाणेदार होता. पुण्याच्या जवळपासच्या गडावर दि. २९–१०–१६८५ रोजी मराठ्यांनी दोरीचे जिने आणि दोरखंड घेऊन वेढा दिला. दहा दिवस धनुष्यबाणांची लढाई झाली. मराठ्यांचे ३०० सैनिक मेले, अनेक जखमी झाले आणि मराठे तेथून पळाले. चाकावर घातलेली तोफ, ३० मण दारू, १०० भाले, १०० घोडे मुघलांच्या हाती सापडले.[6] ही लढाई रोहिडा येथील असावी असे वाटते. मुघलांनी रोहिडा घेतल्यामुळे संभाजी राजांनी सर्जेराव जेधेला हा गड घेण्यास पाठविले होते. दि. ३–४–१६८७ रोजी सिंहगड मराठ्यांच्या ताब्यात होता हे स्पष्ट आहे; कारण ' मोरो भास्कर कारखानीस किल्ले सिंहगड तकदमा ५॥ १५ देविले असत.

१. अख : २९–१२–१६८४
२. अख : १३–१–१६८५
३. पेद, ३१, लेख ४४, पृष्ठ १६२
४. ,, : १२–१–१६८५
५. अख : १३–२–१६८५
६. ,, : २५–११–१६८५

आदा करणे, पावल्याचा जाब घेणे या अन्वये वरात ' अशी नोंद सापडते.[१] मराठ्यांनी रोहिडा किल्लाही मुघलांकडून जिंकून परत घेतला होता.[२]

पुण्याच्या काही भागात १६८६ पर्यंत मुघलांचा अंमल बसला होता. पुणे प्रांतातील मुघल अधिकारी, पुण्याच्या परिसरातील देशमुख, देशपांडे यांना भेटावयास बोलावीत असता मराठी अधिकारी त्यांना भेटावयास गेले नव्हते. तेव्हा मुघल अधिकारी त्यांना लिहितो, ' आमची स्वारी प्रांत मजकुरी एउनी, तुम्ही भेटावयासी न आलेती ऐसे सुस्त आणि प॥ म॥र करारवाके होत नाही. खालसे फैल टाकीत नाही तरी तुम्ही समानगीर राहाणे. आम्ही प्रांत मजकुरी स्वारी करून येतो तो पौतो तयारी करून ठेवणे. '[३] मराठी माणसे मुघलांशी सहकार्य करण्यास नाखूष होती असे या पत्रावरून दिसते.

अशाच प्रकारची अभय पत्रे १६८८ च्या सुमारास रोहिडखोऱ्याच्या देशमुखांना, पुरंदरच्या बाजी घोलप आणि बकाजी नावडकर यांना पाठविण्यात आली होती. प्रत्यक्ष बादशहाला भेटल्यावाचून वतनाची सनद देण्यात येणार नाही असाही त्यात दम देण्यात आला होता.[४]

पुण्याच्या पूर्वेकडील आणि पश्चिमेकडे म्हणजे राजमाची गडापासून गुंजण मावळ, प्रचंडगडापर्यंत आणि बावधन, कोथरूड, भुकूम, भूगाव, चिंचवड इत्यादी प्रदेश संभाजी राजांच्या अखेरीपर्यंत मराठ्यांच्या ताब्यात होता.

### पुण्याचा नैर्ऋत्य भाग—खुद्द राजधानीवर हल्ले :

पुण्याच्या चारही बाजूने मराठे आणि मुघलांच्या सतत चकमकी चालू होत्या. शहाबुद्दीनखान रामसेजच्या वेढ्यात अयशस्वी झाला होता म्हणून औरंगजेबाने त्याला पुण्यास रवाना केले. १६८३ सालच्या ऑक्टोबर–नोव्हेंबर महिन्यात ( शके १६०५, कार्तिक ) शहाबुद्दीनखान पुण्यास येऊन राहिला.[५] पुण्याला ठाण मांडून त्याने पुण्याच्या नैर्ऋत्येस आणि उत्तर कोकणातील रायगडच्या परिसरात चढाई केली. दि. २७–१२–१६८३ रोजी शहाबुद्दीन आणि माणकोजी पुण्याहून दौड करून देवघाट उतरून ( पुणे–कुलाबा सरहद्दीवर निजामपूरच्या ईशान्येस उंबारडीजवळ देवघाट आहे ) ते रायगडाच्या उत्तरेस गेले. रायगडाच्या वायव्येस निजामपूर गावावर त्यांनी हल्ला केला. त्यांनी निजामपूर आणि त्याच्या आसपासची खेडी लुटली. या लुटीत २००० कैदी आणि

१. मइसा, खंड १८, लेख ५७
२. शिचसा–खंड २, पृष्ठ २३४
३. मइसा, खंड १८, लेख २८
४. मइसा, खंड १५, लेख ३४४
५. शिचप्र, पृष्ठ ३२

६००० जनावरे त्यांच्या हाती लागली. नंतर ते पुरंदरच्या बाजूस निघून गेले. सरबुलंदखान यास शहाबुद्दीनखानाच्या मदतीला जाण्याचा हुकूम झाला होता.[१] संभाजीराजे यावेळी गोव्याच्या स्वारीवर गेले आहेत असे पाहून ही स्वारी करण्यात आली असावी. या हल्ल्यापूर्वी दोनतीनच दिवस गोव्याहून रायगडला येण्यासाठी राजे निघाले होते.[२] रायगडाच्या परिसरात केलेल्या हल्ल्यांबद्दल शहाबुद्दीनखानाला गाझीउद्दीनखान बहाददूर हा किताब मिळाला. माणकोजीच्या मन्सबीत वाढ करण्यात आली.[३]

१६८४ वर्षाच्या मार्चमध्ये गाझीउद्दीनखान बहाददूर ( निजाम उल्मुल्कचा बाप ) याला पुणे आणि गढ नमुना या प्रदेशात रवाना करण्यात आले. त्याला दोन मण सोने, धनुष्यबाण आणि दहा हजार रुपये रोख देण्यात आले.[४] सप्टेंबर महिन्यात त्याला रायगडाच्या मोहिमेवर रवाना करण्यात येऊन त्याला खिलतीची वस्त्रे देऊन आणि पाच घोडे इत्यादी वस्तू देण्यात आल्या.[५] त्याचा मुलगा कमरुद्दीन ( निजाम उल्मुल्क ) याला एक तलवार व गाझीउद्दीनच्या इतर अधिकाऱ्यांना वस्त्रे देण्यात आली.[६]

गाझीउद्दीनखान १६८४ च्या अखेरीस पुण्यास पोचला. रायगडाच्या मोहिमेवर निघण्यापूर्वी बोरघाट साफ करण्यासाठी त्याने माणसे मागितल्यामुळे १०० लाकूडतोडे आणि ५० दगड फोडणारी माणसे पाठविण्यात आली.[७] १६८५ च्या जानेवारीच्या प्रारंभी गाझीउद्दीनखान रायगडाला निघाला. यावेळी त्याने आपला मार्ग बदलला होता. देवघाटाने न जाता तो बोरघाटाने उतरून निजामपूरच्या परिसरात पोचला. निजामपूरजवळची तीन ठिकाणे त्याने नष्ट केली. नंतर तो रायगडच्या बाजूस निघाला. संभाजीराजे रायगडावरच होते. शहाबुद्दीनखानाने रायगडच्या पायथ्याच्या खेड्यांना आग लावली. तेव्हा राजे आपल्या बायका-मुलांना घेऊन बालेकिल्ल्यात गेले असे शहाबुद्दीन म्हणतो. खानाने रायगड किल्ल्याजवळील मौजे पानुसवाडी ( पाचोरवाडी ) जाळून, ४ मैलांवर त्याने छावणी घातली. स्वतः राजे आणि त्यांचे अधिकारी मुघलांच्यावर हल्ले करण्यात दक्ष होते. सेनापती हंबीरराव आणि रूपाजी भोसले यांना राजांनी १५००० स्वारांसह त्याच्यावर पाठविले. दोघा शत्रूत बाण, बंदुका, गोळे यांनी लढाई झाली. आपण शौर्याने कसे लढलो हे शहाबुद्दीनखानाने बादशहाला

१. अख : ३–१–१६८४, मोआम–प, पृष्ठ ८४
२. शिचप्र, पृष्ठ ३२
३. मवऔ–प, पृष्ठ २६; अख : ३–१–१६८४
४. मवऔ–प, पृष्ठ २७
५. मवऔ –प, पृष्ठ २८
६. कित्ता
७. अख : १४–१२–१६८४

कळविले; परंतु आपल्याकडील कागदपत्रे उपलब्ध नसल्याने रायगडाजवळील लढाईच्या या एकतर्फी माहितीवर भरवसा ठेवावा लागतो. खानाने मराठ्यांना घेरले, खूप मोठी लढाई झाली, चौदा मैल मराठ्यांचा पाठलाग केला, चकमकीत अनेकजण जखमी झाले, काही मेले.[1] पाठलाग करीत मुघल सैन्य गांगोलीस पोचलेले दिसते. त्यावेळी कवी कलशाने त्यांच्याशी सामना केला आणि खानाला घाटावरी घातला.[2] तेव्हा खान कोथळागडास निघून गेला. यासंबंधातली माहिती मात्र मुघल अखबारात मिळत नाही. कवी कलशाने खानाशी केलेल्या झुंजीचे कौतुक अकबराने संभाजीराजांना पाठविलेल्या पत्रात केलेले वाचावयास मिळते.

मुघलांनी स्वराज्याच्या प्रत्यक्ष राजधानीवरच दोन वेळा हल्ले केले आणि रायगड घेण्याचा प्रयत्न केला. मराठ्यांनी हे हल्ले यशस्वीपणे परतविले होते. संभाजीराजे पकडले गेल्यानंतरच रायगड मुघलांच्या हाती पडला.

**सातारा :**

पुण्यात आक्रमक हालचाली सुरू करण्यापूर्वी मुघलांनी १६८२ च्या सुरुवातीसच साताऱ्याच्या परिसरात चढाई केली होती. या आघाडीवर खानजहान बहाद्दूरला नेमलेले होते. १६८२ वर्षाच्या जानेवारीच्या पहिल्या आठवड्यात तो साताऱ्च्या परिसरात शिरला. त्याने रहिमतपूर आणि इतर मौजे लुटली. या लुटीत मराठ्यांचे काही लोक व जनावरे मुघलांना सापडली. खानजहान बहाद्दूरने सातारागड, आदल, सुबदल, रहिमतपूर या भागातील जंगल ताब्यात घेतले आणि काही ठिकाणी आगी लावल्या; सरदार भीमराव आणि त्याच्या मुलांना पकडले. त्याचबरोबर त्याच्या हातात पंचवीस हजार कैदी सापडले, त्यातील दहा हजार मुसलमानच होते. ८००० जनावरेही त्याने पकडली. ही सर्व लूट पेडगाव येथे ठेवून मराठी मुलखात तो पुन्हा हल्ले करणार होता.[3]

यानंतर ऑक्टोबर-नोव्हेंबर मध्ये सातारा जिल्ह्यातल्या माण तालुक्यातील मौजे सेखापूर कर्यात नाझरे येथे मराठे आणि मुघल यांच्यात चकमकी उडाल्या. त्यामुळे तेथील रयत परमुलखास गेली होती; शेताचीही नासाडी झाली होती.[4] रुस्तुमखान ऊर्फ सर्जाखान विजापुरी याला साताऱ्च्या बाजूस मराठ्यांविरुद्ध लढण्यासाठी अज्जमशहाकडे रुजू होण्यास सांगितले असता तो मराठ्यांनाच मिळाला. तेव्हा त्याच्या भाऊबंदांना बडतर्फ करण्यात आले.[5] याबद्दल भीमसेन लिहितो, " रुस्तमखान याला सात हजाराची मन्सब देण्यात आली होती. आणि त्याला

१. अख : २२–१–१६८५ २. शिचप्र, पृष्ठ ३२; कित्ता
३. अख : ९–१–१६८२; १–९–१६८२
४. शिचसा, खंड ७, लेख ६५ ५. अख : २७–१–१६८३

सातारा प्रांत ताब्यात आणण्याच्या कामगिरीवर नेमलेले होते. मराठ्यांनी त्याच्यावर हल्ला करून त्याला कैद केले आणि जबर खंडणी घेऊन सोडले.[१]

१६८४ च्या नोव्हेंबर महिन्यातील पहिल्या आठवड्यात संभाजी राजांचा सरदार नारूजी भोसले १०००० स्वार घेऊन सातार्‍यात गेला. तेथूनच शत्रूची खोडी काढण्याचा त्याचा विचार होता. ही बातमी पुण्यात गाझीउद्दीनखानाला कळल्यावर तो २४ कोस दौड करून तेथे पोचला. त्यांच्यात चकमकी झाल्या. दोन्ही पक्षातील माणसे मेली आणि जखमी झाली.[२]

१६८५ च्या फेब्रुवारी महिन्यात मराठ्यांची एक तुकडी चंदन-वंदन येथे पोचली. तेव्हा अमानुल्लाखान त्यांच्यावर तुटून पडला. चकमकीत मुघलांच्या हातात २५ घोडी, २० बंदुका, २ निशाणे व १ नगारा सापडला.[३]

१६८५ च्याच मे महिन्यात हंबीरराव सातार्‍याच्या डोंगराच्या आसपास गेला होता. हे कळताच गाझीउद्दीनखानाने दि. २५–५–१६८५ पूर्वी मुजाहिद आणि इतर लोकांना मराठ्यांशी मुकाबला करण्यासाठी रवाना केले. चकमकीत काही मराठे मृत्युमुखी पडले आणि काही पळाले. खटाव भागात मुघलांनी ठाणे घातले. सातारा, चंदन, वंदन येथे मराठी सैन्ये एकत्र जमत असत. नागोजी बल्लाळ ५००० फौज चंदन, वंदन, सातारा येथे एकत्रित करीत होता. ही तयारी येथून विजापूरकरांच्या मदतीसाठी चालू होती.[४] या सैन्याचा प्रतिकार करण्या-इतके सैन्य खटावचा ठाणेदार महादजीजवळ नव्हते. त्याने जादा कुमक मागितली असता त्याला नकार देण्यात आला होता. नागोजी पुढे विजापूरकरांच्या मदतीसाठी गेला.

याच सुमारास १०००० सैन्याची तुकडी घेऊन नारोजी भोसले सातार्‍याजवळ पोचला. हे समजताच शिरवळ येथे असलेल्या गाझीउद्दीनखानाने मराठ्यांचा पाठलाग केला. दोन्ही सैन्यांत मोठी लढाई झाली. दोन्हीकडील लोक मेले आणि जखमी झाले. ही लढाई अनिर्णितच राहिली.[५]

१६८७ सालातील मराठ्यांची सर्वात मोठी हानी म्हणजे सेनापती हंबीरराव मोहिते याचा मृत्यू होय. त्याने मुघलांविरुद्ध कल्याण, भिवंडी, पन्हाळा इत्यादी अनेक ठिकाणी लढून मुघलांना यशस्वीपणे थोपवून धरले होते. विजापूर जिंकल्यानंतर तेथील मुख्य सरदार सर्जाखान यास औरंगजेबाने मराठी मुलखावर पाठविले होते. सर्जाखान वाईपर्यंत आला. तेव्हा तेथे हंबीररावाचा तळ होता. तेथे झालेल्या लढाईत मराठ्यांना जय मिळून बरीच लूट मिळाली. परंतु निकराची

१. मोआम–प, पृष्ठ ९४
२. अख : २०–११–१६८४
३. अख : २७–२–१६८५
४. ,, १५–१०–१६८५
५. ,, १५–१०–१६८५

झुंज देताना स्वतः हंबीरराव गोळा लागून ठार झाला. त्याच्या अंगी इमान, स्वामिसेवा हे लोकोत्तर गुण होते. अफरातफर केल्यावाचून लुटीचा ऐवज तो नेहमी धन्याच्या पायाजवळ आणून ठेवीत असे. संभाजीशी तो शेवटपर्यंत एकनिष्ठ होता. राज्य कारभाराच्या भानगडीत मात्र तो पडलेला दिसत नाही. शिवाजी महाराजांच्या कारकीर्दीत तयार झालेला तो एक उत्तम सेनापती होता.

१६८८ च्या डिसेंबर महिन्यांत निहारखान घोरी वाईचा देशमुख आणि ठाणेदार होता. मनाजी शंकर निळकंठराव हा स्वराज्यात होता. पुरंदर तालुक्यात चामिली, किकवी, जेजोरी, नारायणपूर येथे त्याचे इनाम होते. त्याला कौल देऊन जिहारखानाने शिरवळास आणले होते. त्याच्या मागून त्याचा कबिला येत असता आसवलीजवळ मराठ्यांनी तो लुटला होता.[1]

मराठ्यांनी १६८२ सालापासून सातारा भागात आक्रमक हालचाली करून लूटमार केली असली तरी त्यांना गडकोटांवर ताबा मिळविता आला नाही. १६८९ सालच्या सप्टेंबरपर्यंत मराठ्यांच्या ताब्यात सातारा, परळी, निंब इत्यादि प्रदेश होता. संभाजी महाराजांच्या मृत्यूनंतर वाईच्या सूर्याजी पिसाळाने मुघलांना रायगड मिळवून देण्याची बढाई मारली. खोटे कागदपत्र दाखवून त्याने वाईची देशमुखी मिळविण्याचा प्रयत्न केला होता.[2]

## मुघल प्रदेशात चढाई : भाग २ रा

संभाजीराजांच्या अधिकाऱ्यांनी अहमदनगर जिल्ह्यात आणि विजापूर राज्यात आक्रमक हालचाली केल्या. अहमदनगर, सोलापूर, उस्मानाबाद, आणि बीड जिल्ह्यात मुघलांप्रमाणेच मराठ्यांनी मराठा-मुघल सरहद्दीवर आपले लक्ष केंद्रित केलेले होते. या हालचाली येथे कालानुक्रमाने न घेता अहमदनगर जिल्ह्याच्या उत्तरेपासून खाली दक्षिणेकडील गावांप्रमाणे त्यांची माहिती दिलेली आहे.

### अहमदनगर जिल्हा :

**संगमनेर** : संगमनेर हे संगमनेर तालुक्यात, अकोल्याच्या पूर्वेला ८ ते १० मैलांवर आहे. १६८२ सालच्या मे महिन्यातील पहिल्या आठवड्यात संगमनेरपासून ८ मैलांवरील गावात २०० मराठे घोडेस्वारांची तुकडी शिरली. ही बातमी समजताच संगमनेरचा ठाणेदार नारूजी याने इंद्रसिंह कछवाह आणि

१. शिचसा, खंड १ व ३, लेख, ९१ आणि ४०३

२. शिचसा, खंड ९

सैय्यद मुजफ्फरखान यांना मुकाबला करण्यासाठी रवाना केले. हे दोघे तेथे पोचताच मराठ्यांनी नेहमीच्या पद्धतीने पळाल्याचा आव आणला. तेव्हा मुघल सैन्याने त्यांचा पाठलाग केला. तेवढ्यात एका ओढ्याच्या काठी लपून बसलेले ४००० मराठे सैनिक मुघलांच्या सैन्यावर तुटून पडले. लढाईत इंद्रसिंह कछवाह जखमी होऊन मराठ्यांना जय मिळाला. ही बातमी कळताच नारूजी आणि सुलेमान वेग मदतीसाठी कुमक घेऊन तेथे गेले. पुन्हा लढाई झाली त्यांत मराठ्यांचा एक मोठा सरदार आणि ६०० घोडेस्वार मरण पावले. सुलेमान वेगच्या डोक्याला जखम झाली.[१]

यानंतर ऑगस्ट महिन्यात कसबे सिन्नर, ( सुनेर ? नाशिक जिल्ह्यापासून २ मैलांवर ) येथे मराठ्यांची २०० स्वार आणि ५०० प्याद्यांची एक तुकडी गेली. त्यांनी तेथील १५०० जनावरे ताब्यात घेतली. ही बातमी ऐकून संगमनेरचा ठाणेदार नारूजी स्वारी करून तेथे गेला; परंतु मराठ्यांना सामना देता येईल इतकी फौज त्याच्याजवळ नसल्याने तो परत फिरला.[२]

सप्टेंबर महिन्यात तळकोकणातून येऊन मराठे संगमनेर जवळच्या दावरी ( ? ) गावाहून जात होते. संगमनेरचा ठाणेदार रावजी याने आपल्याला त्या ठाणेदारीवर नेमले तर शत्रूचा बंदोबस्त मी करू शकेन असे कळविले.[३] संगमनेर जवळ मराठ्यांच्या हालचाली सतत चालू होत्या. २८ नोव्हेंबरपूर्वी मराठ्यांची ६–७ हजार स्वारांची तुकडी संगमनेर जवळ चौथाई वसूल करण्यासाठी गेली होती. तेव्हा तेथील ठाणेदाराने मुजफ्फरखान आणि राव मोहकमसिंग यांच्या बरोबर सैन्य पाठवून त्यांना औंढा-पट्टाच्या बाजूचे रस्ते अडविण्यास सांगितले. नारूजीही तेथे पोचला आणि त्याने मराठ्यांना घेरले. सिन्नरच्या दक्षिणेस ५–६ मैलांवर असलेल्या भोजापुराजवळ बरीच मोठी लढाई झाली. त्यांत लक्ष्मण किंवा लखुजी हा मराठ्यांचा सरदार रणांगणावर पडला. त्याचे शीर कापून खानजहान् बहाद्दूरकडे पाठविण्यात आले. मुख्य सरदार पडताच मराठे तेथून पळाले.[४]

१६८३ सालात मराठ्यांनी या भागात काही हालचाल केलेली दिसत नाही. १६८४ च्या जानेवारीत संभाजीचा सरदार हिंमतराव हा १५०० स्वार घेऊन या प्रदेशात घुसला. त्यावेळी कन्करचा ( ? ) ठाणेदार शिवसिंह याने त्यांचा सामना केला. चकमकीत काही जण जखमी झाले व काही मेले. हिंमतराव शत्रूच्या हातात सापडून कैद झाला. त्याला औरंगजेबाकडे पाठविण्यात आले.[५] याच वर्षाच्या डिसेंबरात मराठे संगमनेरच्या आसपास गेले. त्यांचा मोड करण्यासाठी

१. अख : ११–५–१६८२
२. अख : २–९–१६८२
३. ,, : ६–९–१६८२
४. ,, : २८–११–१६८२
५. ,, : १६–१–१६८४

एतिकादखानाला रवाना करण्यात आले.[१] यानंतर १६८५ च्या जानेवारी महिन्यात संगमनेरच्या आसपासचा मुलूख उद्ध्वस्त करून तेथील जनावरे आणि लोकांची लूट केली, तरीही तेथील ठाणेदाराने मराठ्यांवर स्वारी केली नाही. म्हणून त्याची मन्सब कमी करण्यात आली आणि यापुढे त्याला सावध राहण्याचा हुकूम देण्यात आला.[२] अशा तऱ्हेने १६८२ ते १६८५ पर्यंत जमतील तेव्हा हालचाली करीत संगमनेरच्या आसपासचा मुलूख आक्रमीत मराठ्यांनी तेथील ठाणेदार नारूजी याला हैराण केले होते.

**अहमदनगर** : हे मुघलांचे मुख्य ठाणे होते. येथे एक भुईकोट किल्ला आहे. तो १५५३ ते १५६५ सालच्या सुमारास हुसेन निजामशहाने अहमदनगरच्या पूर्वेस बांधला. हा गड १६०० साली मुघलांनी घेतला. १६५७ साली शिवाजी महाराजांनी अहमदनगरवर अचानक हल्ला केला होता. संभाजीराजे गादीवर आल्यावर त्यांनी या किल्ल्यावर सतत हल्ले सुरू केले होते. १६८१ च्या नोव्हेंबर महिन्याच्या पहिल्या आठवड्यात संभाजीराजांचे २५००० प्यादे अहमदनगर लुटण्यासाठी तेथे पोचले. येथून हुलकावणी देऊन ही फौज विजापूरकडे रवाना झाली. विजापूरपासून २२ मैलांवर बुलंदखान पोचला. त्याने दिवस मावळण्याच्या वेळी मराठ्यांबरोबर लढाई केली. त्यात मराठ्यांची हत्यारे शत्रूच्या हातात पडली आणि मराठे तेथून पळाले. दोन्ही कडचे सैनिक मारले गेले. अहमदनगरचा किल्लेदार मुकीमखानाने मराठ्यांना किल्ल्यात शिरू दिले नाही. ज्या मराठ्यांनी किल्ल्यात घुसण्याचा प्रयत्न केला त्यांना किल्लेदाराने मारले. या कामगिरीबद्दल बादशहाने किल्लेदाराला ५०० जात व १०० स्वारांची तैनात दिली.[३] मराठे तेथून पळाले तरी त्यांनी अहमदनगर आणि भोवतालच्या प्रदेशात लूटमार चालूच ठेवली. ही बातमी औरंगजेबाला कळताच त्याने मुकीमखान आणि त्याच्या मुलाला देऊ केलेली तैनात बंद केली, आणि मराठ्यांना तंबी देण्याचा हुकूम केला.[४] १६७८ साली संभाजी जेव्हा मुघलांना मिळाला तेव्हा त्याच्या बरोबर त्याची बायको दुर्गाबाई आणि बहीण ( जाधवरावाकडे दिलेली ) होती. मुघलांच्या तडाक्यातून एकटा संभाजी निसटला तरी या दोघी मागेच राहिल्या. दिलेरखानाने त्यांना कैद करून अहमदनगरच्या किल्ल्यात ठेवले. संभाजी गादीवर आल्यावर संधी मिळताच त्याने बायको व बहिणीला सोडविण्याचे प्रयत्न सुरू केले. मराठ्यांची फौज वरचेवर अहमदनगरच्या किल्ल्याजवळ जाऊन राजांची बायको आणि बहीण यांना तेथून सोडविण्यासाठी किल्ल्यात घुसण्याची

१. MA–JS; अख : ६–१–१६८५ २. अखबार

३. अख : ७–११–१६८१

४. ,, २०–११–१६८१

संधी पाहात होती. किल्लेदाराजवळ मराठ्यांचा मुकाबला करण्याला पुरेल इतकी फौज नव्हती. तो अगदी हैराण झाला होता. किल्लेदाराने आपली हलाखी रुहुल्लाखानाला कळविल्यावर त्याच्या मदतीसाठी आज्जमशहा आणि सैय्यद मुनव्वरखान यांना नेमण्यात आले.[१] यावरून मराठ्यांनी केलेल्या हल्ल्यांची तीव्रता ध्यानात येते. शहाजादा आज्जमने आपली जमीयत सैय्यद मुनव्वरखानाच्या मदतीसाठी रवाना केली. तेवढ्यात मराठ्यांनी किल्ल्यावर अचानकपणे हल्ला केला. मराठे आणि मुघलांच्यात चकमकी उडाल्या. ही बातमी समजताच किल्लेदाराला मदत करण्यासाठी किलीचखान रवाना झाला. त्याने मराठ्यांच्या सैन्यातील निम्या लोकांबरोबर मुकाबला केला. एका बाजूने किलीचखान आणि दुसऱ्या बाजूने मुनव्वरखान यांनी मराठ्यांना घेरले. पुन्हा चकमकी झाल्या. दोन्हीकडील लोक मेले. ज्यांना मारले त्यांची यादी औरंगजेबाकडे पाठविण्यात आली.[२] यानंतर बादशहाने संभाजीच्या बायकोला आणि बहिणीला दौलताबादच्या किल्ल्यात हलविलेले दिसते.[३] तिच्यासाठी रोज दोन रुपये मुकरर केले होते. मध्यंतरी ४-५ महिने मराठ्यांनी अहमदनगरच्या किल्ल्यावरील हल्ले थांबविले होते. परंतु मराठ्यांच्या आक्रमक हालचालींनी सावध होऊन औरंगजेबाने २३-५-१६८२ रोजी रुहुल्लाखानाला मराठ्यांचा मोड करण्यासाठी अहमदनगरच्या दिशेने पाठविले.[४] मे महिन्याच्या अखेरीस मराठ्यांनी अहमदनगरवर हल्ला केला. तेव्हा हसन अलीखानाने दिलावरखान आणि शेखजी यांना तेथे धाडले. कालव्याजवळ लढाई झाली. मराठे छापा घालून जनावरे आणि सामान लुटून नेत असताना मुघलांच्या सैन्याने ते हस्तगत केले.[५]

औरंगजेबाने अहमदनगर किल्ल्याच्या आणि शहराच्या रक्षणासाठी दि. २८–९–१६८२ रोजी शहाजादा महंमद मुइजुद्दीन (शहाआलमचा मुलगा) याला आठ हजार प्यादे आणि सहा हजार स्वारांचा मन्सबदार बनवून त्याला रत्नजडित कंठा, एक घोडा आणि खिलतीची वस्त्रे देऊन, मराठ्यांचा मोड करण्यासाठी अहमदनगरच्या दिशेने रवाना केले.[६] तो तेथे पोचण्यापूर्वीच ऑक्टोबरच्या प्रारंभी शहाबुद्दीनखान यास अंतूरच्या ठाणेदाराच्या कुमकेस न जाता अहमदनगर येथे रवाना होण्याचा हुकूम देण्यात आला.[७] ऑक्टोबरच्या पहिल्या आठवड्यात मराठ्यांचे ५००० सैन्य अहमदनगरजवळ गेले. किल्लेदार सैय्यद ख्वाजा अहमद याला कसे नाहीसे करावे याचा मराठे विचार करीत होते.

१. अख : २७–११–१६८१
२. अख : ६–१२–१६८१
३. ,, ३–४–१६८२
४. मवऔ–प, पृष्ठ २२
५. ,, २–६–१६८२
६. मवऔ–प, पृष्ठ २४
७. ,, ३–१०–१६८२

त्यामुळे पेडगावला न जाता अहमदनगर येथेच राहण्यास शहाजादा मुइज्जुद्दीन याला कळविण्यात आले. मराठ्यांपासून सावध राहण्याची त्याला सूचना मिळाली.[१] अहमदनगर भोवताली मराठ्यांची फौज थांबून थांबून घिरट्या घालीत असे. १६८३ च्या फेब्रुवारी महिन्यात तिरंदाजखान आणि इतरांना अहमदनगर भोवतालच्या जमीयतीचा बंदोबस्त करण्यासाठी रवाना केले.[२] यानंतर मराठ्यांनी अहमदनगरवर हल्ले केले नाहीत.

औरंगजेबाने मराठ्यांच्या अनेक गडांना वेढे घातलेले असूनही प्रत्यक्षात कोठेच त्याच्या पदरात यश पडले नाही. बादशहाच्या मताप्रमाणे मराठ्यांचा मोडही झाला नाही, किंवा किल्लेही हस्तगत झाले नाहीत. त्यामुळे बादशहाने आपली छावणी अहमदनगर येथे नेली.[३] दि. १३–११–१६८३ ला औरंगजेब अहमदनगर येथे पोचला.[४]

१६८४ च्या ऑक्टोबर महिन्यात अहमदनगरच्या किल्ल्यात जे बंदुकधारी सैनिक होते त्यांचे भाऊबंद संभाजी राजांकडे नोकरी करीत असत. त्यांच्यापासून खतरा आहे हे किल्लेदाराच्या ध्यानात आल्यावर काय करावे असे त्याने बादशहाला विचारले. अशा नोकरांना ताबडतोब पकडण्याचा त्याला हुकूम मिळाला.[५] प्रत्यक्ष हल्ले करूनही घुसता न आल्याने मराठ्यांनी तेथील बंदुकधारी सैनिकांशी संगनमत करून किल्ल्यात फितुरी करण्याचा प्रयत्न केला होता असे दिसते.

दुर्गाबाई आणि संभाजीच्या बहिणीला सोडविण्यासाठी हे हल्ले होत असल्याने बहुधा औरंगजेबाने त्या दोघींना दौलताबाद किल्ल्यावरून बहादुरगडावर हलविले असावे असे वाटते. कारण १६८४ सालच्या मे महिन्यात संभाजीच्या दोन बायका ( दोघी कोण ते कळतच नाही ), एक मुलगी आणि तीन दासी आपल्या ताब्यात घेतल्याची सहीशिक्याची पोचपावती बहादुरगडाचा किल्लेदार अब्दुर्रहमान याने बादशहाला पाठविली असल्याचे आढळते.[६] या किल्ल्यातील कैदेत दुर्गाबाई असल्याचा उल्लेख आहे. तिला सोडविण्यासाठी गिर्जोजी यादवला संभाजीराजांनी पाठविले होते. तो दुर्गाबाईला भेटला होता. त्याने परत येऊन संभाजी आणि येसूबाई यांना त्यासंबंधी माहिती दिली होती.[७] दुर्गाबाईला सोडविण्यात गिर्जोजीला यश आले नाही. अखेर तिचे काय झाले हे

१. अख : १९–१०–१६८२
२. अख : २३–२–१६८३
३. मोमसं–प, पृष्ठ १९
४. मवभौ–प, पृष्ठ २९
५. अख : ११–१०–१६८४
६. मवभौ–प, पृष्ठ २८
७. ताकाका–प, पृष्ठ,१९५,४८४,५४८

आज तरी इतिहासाला अज्ञात आहे. दुर्गाबाई येसूबाईच्या बरोबर दक्षिणेत आल्याचा उल्लेख सापडतो.

**पारनेर :**

अहमदनगरच्या पश्चिमेस १६ मैलांवर पारनेर आहे. १६८४ सालाच्या अखेरीस मराठ्यांनी पारनेरच्या आसपास चढाई केली, म्हणून मराठ्यांचा मोड करण्यासाठी एतिकादखानाला बादशहाने रवाना केले.[१] याच सुमारास बहरामंदखान पारनेरच्या जवळ होता. त्याच्याशी लढाई करण्यासाठी संभाजीचे सैनिक गेल्यामुळे इअतकादखान मिर्झाखानासह २७८० स्वार घेऊन मराठ्यांना जरब बसविण्यासाठी रवाना झाला.[२] या हालचालीत संभाजीराजे स्वत: गेले असावे. ते स्वतः जाण्याचे कारण समजत नाही. कदाचित् त्यांच्या बायकोला व मुलीला पेडगावला हलविल्यामुळे त्यांनी पारनेरला जाऊन तेथून त्यांना सोडवून आणण्याचा प्रयत्न केला असावा. पारनेरजवळील मराठ्यांची तुकडी त्याच परिसरात वावरत होती. पारनेरजवळ मराठे गेल्याचे कळताच गझनफरखानाने ७०० स्वारांच्या फौजेसह जाऊन शत्रूला शासन करावे असा हुकूम देण्यात आला. त्याचप्रमाणे पारनेरचा ठाणेदार अब्दुल करीम आणि करडे-निमोणे येथे असलेला खोजा हमीद यांनी एकमेकांच्या सहकार्याने वागून मराठ्यांना कापून काढावे असे लुत्फुल्लाहखानाने त्यांना कळविले होते. गझनफरखानालाही मराठ्यांना तंबी देण्यासाठी पाठविले होते.[३]

**पेडगाव** ( बहाद्दूरगड ) :

श्रीगोंदे तालुक्यात श्रीगोंद्याच्या दक्षिणेस पेडगाव आहे. पेडगाव येथेच बहाद्दूरगड आहे. संभाजी राजांनी ३१–१०–१६८१ पूर्वी औरंगाबाद आणि सोलापूर येथे सैन्य धाडण्यासाठी जमवाजमव केली त्याच वेळी त्यांनी पेडगावच्या बाजूला फौज धाडण्यासाठी नेमणुका केलेल्या होत्या.[४] दि. ५–११–१६८२ रोजी मुइज्जुद्दीनला पेडगावास धाडण्यात आले व मराठ्यांना पेडगावजवळ प्रवेश करू देऊ नये अशा सूचना देण्यात आल्या. मराठे पेडगावच्या परिसरात शिरले असल्याने मुइज्जुद्दिनने तेथे पोचताच त्यांना तंबी देण्यासाठी लोक नेमले. तो स्वतः बारा कोस गेला, परंतु मराठे तेथून पळून गेल्यामुळे परत आला.[५] नोव्हेंबरच्या अखेरीस राजा दुर्गासिंग वलद, राजा देविसिंग बुंदेला मराठ्यांच्या बंदोबस्ता-

१. मवऔ–प, पृष्ठ २९
२. अख : ४–१–१६८५
३. अख : २०–१–१६८५
४. ,, ३१–११–१६८१
५. ,, १४–११–१६८२

साठी पेडगाव येथे होता. तेवढ्यात थाकू बंजारी तेथे आल्यामुळे इहितमामखानाला तेथे जाण्याचा हुकूम देण्यात आला. तो पेडगावपासून १५ कोसांवर पोचल्यानंतर त्याने मराठे चौथ वसूल करण्यासाठी आले तर मला कळवा म्हणजे मी त्यांचा बंदोबस्त करीन असे जमीनदारांना सांगितले. माणको बल्लाळ पंडित आणि लखमाजी ३००० स्वारांसह पेडगाव जवळ, परगणे कोठा येथे चौथाईच्या वसुलीसाठी गेले. हे कळताच दुर्गासिंगाने त्यांच्याशी सामना केला; बारक्या हत्यारांनी लढाई झाली. त्यात माणको बल्लाळ आणि इतर ३०० लोक ठार झाले. लखमाजी पळून गेला. निशाण, तुरा, छत्री, सरदाराच्या स्वारीचा एक घोडा आणि ९८ घोड्या मुघलांच्या हातात पडल्या. त्यांच्याकडील लोक जखमी झाले त्यात दुर्गासिंग धूप लागून जखमी झाला.[1] १६८३ सालच्या जानेवारी महिन्यात आज्जमशहा टेंभुर्णीच्या मार्गाने पेडगावला जाणार होता.[2] वाटेत संभाजी राजांच्या मुलखातील रहिमतपुरा येथे असलेले महादेवाचे देवालय पाडण्याची त्याने परवानगी मागितली होती. परवानगी मिळाल्यावर ते देवालय पाडून तो पेडगावला जावयाचा होता. त्याच वेळी सलाहखानाला तेथे पोचण्यास बजावलेले होते.[3] मार्च महिन्यात मराठ्यांची एक तुकडी पेडगाव येथे हल्ला करावयास गेल्याबरोबर आज्जमशहाने त्यांना तंबी देण्यासाठी दिलावरखानाला पाठविले आणि मामूरखानास त्याच्या कुमकेसाठी जाण्याचा हुकूम दिला. मामूरखान पोचताच[4] मराठे तेथून निसटले आणि ३५ कोसांवर उतरले. त्यामुळे मामूरखान, दिलावरखान आणि कमालुद्दीनखान यांनी बुणग्यांना पेडगाव येथेच ठेवून ते मराठ्यांवर चालून गेले. दि. २५-३-१६८३ रोजी मराठे आणि मुघल यांच्यात लढाई होऊन दोन्हीकडील बरेच लोक मरण पावले.[5] ऑक्टोबरमध्ये मराठ्यांनी बहाद्दूरगडावर ( पेडगाव ) हल्ला केल्यामुळे दि. १३-११-१६८३ रोजी ख्वाजा याकूब सर बुलंदखान याला मराठ्यांचा मोड करण्यासाठी तिकडे रवाना करण्यात आले.[6] मराठे केव्हा हल्ला करतील याचा नेम नसल्याने १६८४ च्या जानेवारीत दिलेरखानाला पेडगावच्या आवतीभोवती ७-८ कोसांपर्यंत गस्त घालण्यासाठी ५०० स्वारांची नेमणूक करावी असे सांगण्यात आले. परंतु त्याच्याजवळ पुरेसे सैनिक नव्हते.[7] यानंतर बहाद्दूरगड येथे असलेल्या सरबुलंदखानाच्या मदतीसाठी शहाजादा आज्जम आणि त्याचा मुलगा बेदारबख्त यांनी दि. १३-२-१६८४ रोजी बादशहाचा निरोप घेतला व ते बहाद्दूरगडाकडे गेले.[8] आज्जमशहा बहाद्दूरगडास

१. अख : २-१२-१६८२
२. अख : १९-१-१६८३
३. ,, १-२-१६८३
४. ,, २६-३-१६८३
५. ,, ३१-३-१६८३
६. मवऔ-प, पृष्ठ २६
७. ,, १३-१-१६८४
८. मवऔ-प, पृष्ठ २७

पोचल्यावर मराठ्यांचा सरदार तिमाजी याने फौजेसह त्याच्या छावणीवर आणि भोवतालच्या प्रदेशात हल्ले केले. त्यामुळे किशोरसिंग हाडा त्यांच्यावर धावून गेला. या लढाईत मराठ्यांचा पराभव झाला. मुघलांनी तिमाजीला पकडले.

यापूर्वी मराठ्यांची एक तुकडी जामखेड तालुक्यात, जामखेडच्या पश्चिमेस असलेल्या पातोडा येथे चौथाईच्या वसुलीसाठी गेली होती. तेथील ठाणेदाराचा भाऊ मुहम्मद शरीफ याने त्यातील २ स्वार आणि १ पायदळातील सैनिक कैद केला होता. त्यांना आज्जमशहाकडे पाठविण्यात आले.[१]

मुघल हद्दीतील महत्त्वाच्या ठाण्यांवर आणि गडांवर मराठ्यांनी वारंवार हल्ले केल्यामुळे मुघल सैन्याची धावपळ होत असे. ते पाहून औरंगजेबाने इखलास-खानाला सर्व गडांची पाहणी करून जरूर तेथे दुरुस्त्या करण्याचा हुकूम दिला. जागजागी सर्व प्रकारचा पुरवठा आहे किंवा नाही याचीही त्याला पाहणी करावयास सांगितले होते. त्याला अहमदनगर, पेडगाव या मार्गाने जाऊन संगमनेर, नेवासे या बाजूने परत येण्यास बजावलेले होते.

**सोलापूर जिल्हा :**

**टेंभुर्णी** : सोलापूर जिल्ह्यात पंढरपूरच्या उत्तरेस १६ मैलांवर आहे. आज्जमशहाने १६८२ च्या ऑक्टोबर महिन्यात तेथे छावणी केली होती.[२] नोव्हेंबर–डिसेंबर महिन्यात मराठे टेंभुर्णी येथे वारंवार हल्ले करीत होते, त्यामुळे बहाद्दूरखान तळकोकणातून टेंभुर्णी येथे गेला. तेथून एका मुक्कामाच्या अंतरावर त्याने एक किल्ला तयार करवून घेतला; त्या जिल्ह्यातील जमीनदारांना एकत्र केले. मराठ्यांचे हल्ले चालूच असल्याने बहाद्दूरखानाच्या फौजेत अन्नधान्याची चणचण होती. त्याच्या लष्करात एक रुपयास ९ ते १० शेर धान्य व एक रुपयास एक शेर तेल व तूप होते.[३] मराठ्यांची २० हजार स्वारांची फौज खवासपूर पासून १६ मैलावर गोळा झाली होती. (खवासपूर सांगोला तालुक्यात सांगो. ल्याच्या पश्चिमेस ८ मैलांवर आहे.) हे कळताच मुहम्मद आज्जमशहाने हसन-अली खान आणि इतर काहींना मराठ्यांशी मुकाबला करण्यासाठी पाठविले. मुघलांचे सैन्य तेथे पोचल्यावर मराठ्यांनी त्यांना सामना दिला. फार मोठी लढाई देऊन मराठे तेथून पळाले. शहाजादा खजिल झाला. त्याच्या हुकुमानुसार मुघलांनी मराठ्यांचा ४ कोस पाठलाग केला.[४]

मंगळवेढे या विजापूरकर आणि मुघल यांच्या सरहद्दीवरील गावातील जहागिरदारांना आपल्याकडे नोकरीस घ्यावयासाठी संभाजी राजांनी प्रयत्न केले

१. अख : १३–१–१६८४
२. अख : २२–१०–१६८२
३ ,, : ११–१२–१६८२
४. ,, : १५–११–१६८२

होते. १६८३ च्या जानेवारी महिन्यात राजांनी मियाखान, बहामनी खानाचा मुलगा सैय्यदखान, हसनखान, मेहमन्द आणि बहादूदूरखान पन्नी, अब्दुल करीम दाऊजी इत्यादी मंगळवेढ्याच्या जहागिरदारांना पत्रे लिहिली होती. या पत्रात जहागिरदारांनी आपल्याकडे चाकरी करावी असे सुचविले होते. राजे स्वतःच्या मुलखात त्यांना जहागीर द्यावयास तयार होते. पहिली जहागीर मान्य करून किंवा दुसरी जहागीर देण्याची त्यांची तयारी होती. परंतु हे विजापुरी सरदार मुसलमान असल्याने संभाजी राजांकडे नोकरी करावयास तयार झाले नाहीत. दिलेरखानाने या जहागीरदारांना बहादूदूरखानाकडे जहागिरी दिल्यास मंगळवेढे बादशाही अंमलाखाली आणण्यास ते तयार असल्याचे सांगितले.[१]

दिलेरखानाने वरील माहिती शेख मरब्दुम मुन्शी यालाही लिहिली होती. बादशाही कुमकेमुळे मंगळवेढे हाती येईल तर ठीक असे त्याला वाटत असावे. हे ठिकाण मरब्दुम मुन्शीच्या हातात राहणार असले तर बादशहाने त्याला कुटुंबासह बोलाविले होते. त्याला वतनासारखी जहागीर देण्यात येणार होती. ज्यावेळी विजापुरी अधिकाऱ्यांना संभाजी राजे जहागिरीची आमिषे दाखवून आपल्या बाजूला वळविण्याचा प्रयत्न करीत होते त्यावेळी औरंगजेबानेही तसाच प्रयत्न चालू केलेला होता.[२]

१६८५–८६ सालात मुघल आणि विजापूरकर यांच्यात लढाई चालू होती. संभाजी राजांचे सैन्य विजापूरकरांच्या मदतीसाठी गेले होते. १६८६ च्या ऑक्टोबरात संभाजी राजांनी आपले सैन्य मंगळवेढ्यास पाठविले. त्यांचा मोड करण्यासाठी एतिकादखान यास रवाना करण्यात आले.[३] मराठे विजापूरकरांच्या मदतीसाठी गेले तेव्हा काही गडांवर संभाजी महाराजांतर्फे अधिकारी नेमण्यात आले होते. १६८७ साली माणकोजी संभाजी राजांच्या वतीने सालोना (सांगोला) येथे अधिकारी होता. सांगोल्याच्या किल्लेदाराने मुघलांबरोबर लढाई दिली. परंतु त्याचा पराभव होऊन तो कैद झाला. किल्लेदाराला बादशहाकडे पाठविण्यात आले.[४] हा किल्ला मुघलांनी घेतल्यावर मे १६८७ मध्ये माणकोजी औरंगजेबाला भेटला. तेव्हा त्याला खिलतीची वस्त्रे, दोन हजार जात एक हजार स्वार यांची मन्सब देण्यात आली.[५]

**सोलापूर :**

मराठ्यांनी सोलापूर जिल्ह्यात अनेक ठिकाणी आक्रमण केले. सोलापूरचा किल्ला विजापूरकर आणि मुघल यांच्यातील १६६८ च्या तहानुसार मुघलांना

१. अख : २३–१–१६८३　　२. अख : २८–१–१६८३

३. ,, : ऑक्टोबर १६८६, मवऔ–प, पृष्ठ ३३

४. मोमसं–प, पृष्ठ २१　　५. मवऔ–प, पृष्ठ ३४

मिळाला होता. संभाजी गादीवर येताच त्यांनी या किल्ल्यावर हल्ले सुरू केले होते. खानजहान बहाद्दूरच्या आज्ञेनुसार या किल्ल्यावरील २५ तोफा दुसरीकडे नेण्याचे काम चालू होते. ऑगस्ट १६८० मध्ये मराठ्यांनी त्या हस्तगत केल्या. अली आगामी, जगतसिंग हाडा आणि राजा जसवंतसिंग बुंदेला यांच्यावर तोफा हलविण्याचे काम सोपविलेले होते. त्यांची मन्सब कमी करून त्यांच्याकडून नुकसानभरपाई घेण्यात आली. १६८० च्या डिसेंबर महिन्यात संभाजी राजे जातीने सोलापूरजवळ गेले होते त्याचा हेतू कदाचित त्या मुलखाची पाहणी करण्याचा असावा. रणमस्तखान आणि इतर मुघल अधिकाऱ्यांनी त्यांच्याबरोबर मुकाबला केला. लढाई झाली त्यात दोन्ही पक्षांचे लोक जखमी झाले.[1] ऑक्टोबर महिन्यात ज्यावेळी औरंगाबाद आणि पेडगाव येथे फौजेची नेमणूक झाली त्याच वेळी संभाजी राजांनी सोलापूर येथेही सैन्य धाडण्याची व्यवस्था केलेली होती. त्यामुळे खानजहान बहाद्दूरने आपला डेरा उठविला. ज्यावेळी मुहम्मद आज्जमशहा औरंगाबादच्या सुभ्यात पोचणार होता त्यावेळी खानजहान बहाद्दूर मराठ्यांना तंबी देण्यासाठी कूच करणार होता.[2] सोलापूरला योजिलेली मराठ्यांची फौज सोलापूर किल्ल्याजवळ गेली. नोव्हेंबरच्या अखेरीस संभाजी राजांनी ६००० स्वारांची फौज सोलापूर उद्ध्वस्त करण्यासाठी रवाना केली. ती सोलापूरला पोचताच राजा मनोहरदास गौर किल्ल्यावरून मुकाबला करावयास निघाला. खानजहान बहाद्दुरने रघबतखानाला गौरच्या मदतीसाठी पाठविले. मराठे व मुघल यांच्यात लढाई होऊन मराठ्यांचे बरेच लोक कामास आले. मुघलांना जय मिळाल्याने मराठे तेथून पळाले.[3]

१६८३ च्या एप्रिल महिन्यात मनोहरदास गौरचा मुलगा किशोरदास याला सोलापूरचा किल्लेदार नेमण्यात आले.[4] १६८५ च्या एप्रिलच्या दुसऱ्या आठवड्यात संभाजी राजांचा एक सरदार सुदजी सोलापूर तालुक्यात घुसला होता. तेव्हा शिरवळच्या ठाणेदाराने मुहम्मद ठाणेदाराला रवाना करून, लवकर जाऊन मराठ्यांचा पराभव करण्यास सांगितले. ठाणेदार दि. २२–४–१६८५ रोजी तेथे पोचला. दोन्ही सैन्यांत लढाई होऊन अनेकजण मेले आणि जखमी झाले. मराठे तेथून पळाले. मराठ्यांनी लुटलेल्या सामानापैकी ३१ घोडे आणि भाले मुघलांच्या हातात पडले. सुदजी सरदाराचा कबिला नदरबल्ला (?) येथे होता. ही बातमी समजताच अबूमुहम्मद इत्यादी लोकांनी तेथे जाऊन कबिला पकडला.[5]

१. अख : ऑगस्ट १६८०
२. अख : ३१–१०–१६८१
३. „ : १-१२-१६८१
४. मदबा–प, पृष्ठ २५
५. „ : ६-५-१६८५

**उस्मानाबाद जिल्हा :**

**परिंडा :** विजापूरच्या राज्यातील बिदर, कल्याणी आणि परिंडा गड औरंगजेबाने १६५७ साली जिंकले. परिंडा गड उस्मानाबादच्या वायव्येस ३३ मैलांवर आहे. मराठ्यांचे सोलापूर, अहमदनगर, औरंगाबाद इत्यादी ठिकाणी आक्रमण चालू असतानाच त्यांनी मुघलांच्या इतर मुख्य ठाण्यांवर लूट चालूच ठेवली होती. दि. ७–१२–१६८१ पूर्वी काही दिवस मराठे वारंवार परिंडाच्या परिसरात लूटमार करीत होते. त्यामुळे तेथील किल्लेदार सोहराबखान खूपच त्रासला होता. त्याची जहागीर परिंड्याच्या आसपासच होती. त्याचेही बरेच नुकसान झाले. त्याला हुकूम मिळाल्यास खानजाद या आपल्या मुलाला किल्ल्यावर सोडून स्वतः अनामतखानाला भेटावयाचा किंवा स्वतः किल्ल्यावर थांबून मुलाला तिकडे धाडण्याचा त्याचा विचार होता; किंवा त्याला आपल्या हलाखीविषयी अर्ज करावयाचा होता. जेव्हा अमानतखान औरंगाबादला पोचेल तेव्हा त्याला बोलावण्यात येईल असे सोहराबखानाला कळविण्यात आले.[१] मध्यंतरी मराठ्यांच्या परिंड्याकडील हालचाली थंडावल्या. तरी वऱ्हाडात आणि इतर मुघल प्रदेशात त्यांच्या आक्रमक हालचाली सुरू होत्या. १६८३ च्या जानेवारीत नळदुर्गला रुहुल्लाखानाकडे न जाता, फौजेसह परिंड्याला जाण्याचा कासीमखानाला हुकूम देण्यात आला.[२] १६८५ साली मुघल आणि विजापूरकर यांच्यात लढाई सुरू होती. या संधीचा फायदा घेऊन मराठ्यांनी परिंडा गडावर पुन्हा हल्ले सुरू केले. १६८५ सालाच्या फेब्रुवारीच्या मध्यावर संभाजीचा सरदार राणा जयसिंग परिंडा किल्याच्या बाजूस गेला. त्यामुळे नामदारखानाचा मुलगा मरहमखान यास ५००० रु. किंमतीचा हत्ती आणि रोख रु. १०००० देऊन मराठ्यांना जरब बसविण्यासाठी रवाना करण्यात आले. खानाजाद भालवणीहून २५ कोसांवर थांबला. १६८५ च्या जानेवारी महिन्याच्या अखेरीस मराठ्यांनी परिंड्याकडे जाऊन खोडी काढली. त्यांना इअतकादरखानाने तिकडे जाऊन तंबी द्यावी; परंतु तो आजारी पडल्यामुळे त्याची फौज घेऊन गझनफरखानाला मराठ्यांना तंबी देण्यासाठी हुकूम देण्यात आला.[३]

इंदापूर आणि उदगाव यांच्यामध्ये मराठे आणि मुघल यांच्यात चकमक उडाली. खानाजादने राणा जयसिंगास मारले. मराठ्यांकडील बरेच लोक जखमी झाले; काही मेले. २०० घोडे, भाले, छऱ्या वगैरे सामान मुघलांच्या हातात पडले.[४]

---

१. अख : ७–१२–१६८१
२. अख : ३०–१–१६८३
३. ,, : ३१–१–१६८५
४. ,, : २७–२–१६८५

**नळदुर्ग :**

उस्मानाबादच्या अग्नयेला ३० मैलांवर नळदुर्ग आहे. १६८१ च्या मार्च–एप्रिल महिन्यात संभाजीराजांची फौज नळदुर्ग येथील प्रदेश लुटावयास गेली. तेथील मुघल किल्लेदार कालंदरखान याने मराठ्यांबरोबर मुकाबला केला. खानजहान बहाद्दूरने रणमस्तखान आणि इतर अधिकाऱ्यांना मराठ्यांना तंबी देण्याकरिता नेमले. मराठे आणि मुघल यांच्यात लढाई झाली.[1] १६८३ च्या जानेवारीच्या अखेरीस संभाजीचा सरदार माणको बल्लाळ ५००० स्वार घेऊन नळदुर्गपासून ५ कोस अलीकडे गेला. ही बातमी कळताच कासीमखान तेथे पोचला. मराठे आणि मुघल यांच्यात फार मोठी लढाई झाली. छत्र्या, निशाण इत्यादी वस्तू मुघलांच्या हाती पडल्या. मुघलांकडील अबीद दिवान सैना आणि इतर गुर्जबदार लढाईत मेले.[2] फेब्रुवारीत नळदुर्ग येथे गेलेले मराठे त्या महिन्याच्या अखेरीपर्यंत नळदुर्ग आणि कल्याणीच्या आसपास लूट करीत राहिल्यामुळे खानजहान बहाद्दूर त्या बाजूस निघाला.[3]

**बीड जिल्हा :**

१६८४ च्या जानेवारी महिन्याच्या पहिल्या आठवड्यात खानजहान बहाद्दूर मराठ्यांना तंबी देण्यासाठी फौजेसह औशास पोचला. औशा उस्मानाबादच्या पूर्वेस १५।१६ मैलांवर आहे. मराठ्यांची फौज उदगीरला जाणार असल्याची बातमी तेथे त्याला समजली. उदगीर उस्मानाबादच्या ईशान्येस ६० मैल आहे. खानजहान बहाद्दूर आपला मुलगा मुजफरखान यास तेथे धाडणार होता. तों वऱ्हाडातून येत असताना मराठे औरंगाबाद जिल्ह्यातील अंबडच्या ईशान्येला ४ मैलांवरील सारंगपूर येथे आल्याची बातमी मिळताच त्याने तेथे मराठ्यांबरोबर लढाई दिली. तेथून मराठे बीड जिल्ह्यातील बीडच्या वायव्येला असलेल्या सोनगावपर्यंत पळत गेले. मुजफरखानाने त्यांचा सोनगावपर्यंत पाठलाग केला. २० कोस अंतर काढून तो मौजपुरीला पोचला. तेथे दोघात लढाई झाली. मराठ्यांच्या फौजेतील मुख्य सरदार जाधवराव आणि काकोजी हे दोघे जखमी झाले. काही सैनिकही जखमी झाले. मराठ्यांचे सामान मुजफरखानाच्या हातात पडले. त्याने मराठ्यांचा ५ कोसपर्यंत पाठलाग करून तेथेच आपली छावणी घातली.[4]

त्याच वेळी मराठ्यांची एक तुकडी बीड जिल्ह्यातील पाटोदे (बीडच्या नैऋत्येस) येथे चौथ वसूल करण्यासाठी गेली होती. तेव्हा तेथील ठाणेदार मुल्ला

१. अख : मार्च–एप्रिल १६८१
२. अख : ३–२–१६८३
३. ,, : १–३–१६८३
४. ,, : ८–१–१६८४

अहमद याचा नातेवाईक मुहम्मद शरीफ याने चौथ वसूल करणारांना अटक केली, आणि त्यांना आज्जमशहाकडे पाठविण्याचे ठरविले.[१]

संभाजीराजांनी १६८५ पूर्वी विजापूरकरांकडील काही किल्ल्यांप्रमाणे धारूरचा किल्ला घेतला होता. तो बीड जिल्ह्यात केजच्या उत्तरेस ४ मैलांवर आहे. तो पुन्हा मुघल अधिकारी मुहम्मद अज्जमने १६८५ च्या फेब्रुवारीत जिंकून घेतला. या किल्ल्याची सोन्याची किल्ली त्याने बादशहाकडे पाठविली.[२]

## बंगाल आणि पाटणा येथील चढाई :

गंगाराम गुजराथी नावाचा वाणी बहाद्दूरखानाचा नोकर होता. त्याला बहाद्दूरखानाने आपल्या उत्तर हिंदुस्थानातील जहागिरीच्या व्यवस्थेसाठी पाठविले. तेथे गेल्यावर गंगाराम आणि बहाद्दूरखान यांच्यात गैरसमज झाले. गंगारामाला त्याने परत बोलाविले तरी तो आला नाही. उलट त्याने धामधूम सुरू केली.[3] यानंतर गंगारामाने अलाहाबाद येथे बंड केले.[४]

बहाद्दूरखानाची नोकरी सोडून गंगाराम बऱ्याच संपत्तीसह संभाजी आणि अकबर यांच्या आश्रयास आला. मुघली दरबारात गंगारामाला त्यांच्या कपटीपणाचा आणि लबाडीचा अनुभव आला होता. संभाजी राजांनी गंगारामाला १०,००० सैन्याची तुकडी देऊन बंगालच्या सरहद्दीवर पाठविले. तेथे गंगारामाने गुप्तरीतीने माहिती काढून, रक्तपात न करता पाटणा आणि मोंगीर ही शहरे घेतली. तेथील रहिवाशांचे त्याने काही नुकसान केले नाही. ही चढाई तेथील प्रजेविरुद्ध नसून राजाला पदच्युत करण्यासाठी केलेली होती. गंगाराम १६८२ च्या जुलै-ऑगस्ट महिन्यात पाटण्यास गेला होता. त्याच वर्षाच्या डिसेंबर महिन्यात गंगारामाला पाटणा येथून हाकलल्यामुळे तो दक्षिणेत आला. तेव्हा त्याचे सैन्य २५ ते ३० हजारापर्यंत वाढले होते. पुन्हा एकदा अकबराच्या नावाने बंगालमध्ये जाण्याचा त्याचा बेत होता.[५] रजपुतांच्या साहाय्याने संभाजी राजांनी रचलेल्या मोठ्या मनसुब्याबरोबरच औरंगजेबाचे लक्ष दक्षिणेतून उत्तरेकडे वळविण्यासाठी संभाजी राजांनी हा एक प्रयत्न केला असावा.

## मराठा–मुघल संघर्ष : भाग ३ रा

संभाजीराजांचे राज्य नष्ट करण्यासाठी औरंगजेबाने १६८२ सालापासून एकाच वेळी अनेक आघाड्या सुरू केल्या. त्यात पहिली आघाडी उत्तर भागात

---

१. अख : १३–१–१६८४ २. अख : २१–२–१६८५
३. मोआम–प, पृष्ठ ८० ४. MA–J S, p 127
५. DR–DR, 1682 Vol II p 979, 1442

होती. दुसरी आघाडी स्वराज्याच्या मध्यभागात आणि तिसरी स्वराज्याच्या दक्षिण भागात होती. तिसऱ्या आघाडीची सुरुवात सुलतान आज्जमने केली. तो पन्हाळा-कोल्हापूर येथे स्वारी करण्यासाठी १६८२ च्या जानेवारी महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात निघाला. आज्जम पन्हाळ्यापासून सहा कोसांवर आल्यावर सेनापती हंबीरराव १५००० घोडदळ आणि ५००० पायदळ घेऊन त्याला तोंड देण्यास निघाला; त्याने शहाजाद्याच्या डेऱ्याच्या पिछाडीवर तुटून पडण्याचा विचार केल्यामुळे स्वतः शहाजादा आणि फिरोजखान यांनी किलीचखान, हसन अलीखान, राव अनुपसिंग, अनिरुद्धसिंग हाडा आणि सरफराजखान वगैरे लोकांना डाव्या आणि उजव्या बाजूला नेमून स्वारी केली. ढाल, तलवार आणि खंजीर इत्यादी हत्यारांनी मुघल शत्रूशी लढले. त्यांनी ८०० मराठ्यांना मारले व जखमी केले आणि ७०० लोकांना पकडले. छत्र्या, निशाणे, बंदुका इत्यादी गोष्टी मुघलांच्या हातात पडल्या. मुघलांचेही बरेच लोक मेले. फिरोजखान आणि त्याचा मुलगा जखमी झाला. किलीचखानाला बंदुकीने जखम झाली. त्याने हंबीररावाबरोबर झालेल्या लढाईसंबंधी औरंगजेबाकडे एक विनंती–अर्ज पाठवून त्याच्या कृपेची याचना केली. बादशहाने या अर्जाचा विचारच केला नाही. उलट त्याला लिहिले, " तू यशस्वी झाला म्हणतोस तर आपले इतके सैन्य रणांगणावर का पडले? आणि तू एकटाच आज्जमकडे का परतलास ? " याचा अर्थ एकच की मुघलांना या लढाईत खरा विजय मिळालेला नव्हता.[१] या लढाईनंतर १८ जानेवारी १६८३ च्या सुमारास शहाजादा कोल्हापूरच्या बाजूस गेला. हंबीररावाने त्याच्या सैन्याचा पाठलाग केला. हा पाठलाग जवळ जवळ महिनाभर चालू होता. शेवटी हंबीररावाने शहाजाद्याला भवरेच्या अलीकडे हटविले.[२] आज्जम माणिकघाट उतरून टेंभुर्णी मार्गे पेडगावास जाणार होता.[३]

सुलतान आज्जमने दक्षिण कोकणात पहिली स्वारी केली तर दुसरी सुलतान मुअज्जमच्या नेतृत्वाखाली झाली. औरंगजेबाने दि. १५–९–१६८३ रोजी शहाआलम बहादूर ( शहाजादा मुअज्जम ) ची कोकण, रामदरा आणि मराठ्यांच्या इतर प्रदेशातील पाळेमुळे खणून काढण्याच्या कामावर नेमणूक केली. त्या दिवशी शहाजाद्याचे तंबू औरंगाबादच्या बाहेर उभारण्यात आले; शहाजणे वाजविण्यात आली.[४] स्वतः बादशहा औरंगाबादहून अहमदनगरकडे रवाना झाला.[५] शहाआलम बरोबर मोठे सैन्य आणि पुढील मोठे आणि नामां-

१. अख : २४–१२–१६८२; १–१–१६८३
२. शिचप्र, पृष्ठ ३२
३. अख : १९–१–१६८३
४. मवऔ–प, पृष्ठ २५
५. मवऔ–प, पृष्ठ २५

कित सरदार होते. तोफखान्याचा दारोगा अतिशखान, लतीफ शहा, दखनी ऊर्फ सरफराजखान, बहलोलखानाचा भाऊ इखलासखान, नागोजी मराठा ( हा नामांकित आणि त्या प्रदेशाचा जाणकार होता ), ख्वाजा मकारम हा शहाजाद्याचा एकनिष्ठ सेवक असून त्याला नुकतीच नऊशेची मन्सब देण्यात आलेली होती. वीस हजार फौज तयार करण्यात आली होती. सादतखान ऊर्फ महंमद मुरादखान हा तमाम दक्षिणेचा वाकेनिगार होता. त्याला शहाजाद्याच्या फौजेचीही वाकेनिगारी देण्यात आली. सर्वांना खिलतीचे पोशाख, हत्ती, घोडे वगैरे देऊन त्यांच्यावर कृपा करण्यात आली.[१] आत्तापर्यंत मुघलांनी अनेक ठिकाणी आक्रमण केले असले तरी त्यांना यश मिळालेले नव्हते. शहाआलम मोठ्या जिद्दीने कोकण जिंकण्यासाठी मोठा लवाजमा घेऊन निघाला होता. त्याच्या सैन्याची संख्या प्रारंभी वीस हजार होती. मानुत्ची हा इटालियन प्रवासी त्याच्याबरोबर होता. त्याने या सैन्याचा आकडा ५ चाळीस हजार असा दिलेला आहे. त्यावरून असे वाटते की औरंगाबादेहून कूच करताना मुअज्जमचे सैन्य वीस हजार असले तरी वाटेत इतर सरदार मिळाल्यावर त्याच्या सैन्याची संख्या पंचेचाळीस हजारापर्यंत गेली असावी. पोर्तुगेज कागदपत्रात मुघल सैन्याची संख्या ४० हजार घोडेस्वार, ६० हजार पायदळ, १९०० हत्ती आणि २० हजार उंट अशी दिलेली आहे.[२]

शहाआलम दक्षिण कोकणच्या स्वारीवर निघाला तेव्हा सुरतकर इंग्रजांना काय वाटले ते त्यांनी लंडनला दि. ३०–१०–१६८३ रोजी लिहिलेल्या पत्रात नमूद केलेले आहे, " मुघल बादशहाने आपला मोठा मुलगा फार मोठ्या सैन्यानिशी राजांच्या विरुद्ध धाडला आहे. त्यामुळे सर्वांचा असा समज झाला आहे की युवराजाने ( शहाआलम ) जर का बापाचे सर्व हुकूम निष्ठेने पाळले तर संभाजी मोठ्या आपत्तीत सापडल्याशिवाय राहणार नाही. ही स्वारी टाळावयाची असेल तर राजाला शहाजादा व त्याचे अधिकारी यांना पैशाची लाच दाखवावी लागेल. आम्हाला या गोष्टीत अडचण दिसत नाही. कारण संभाजीजवळ उमरावांना द्यावयास पैसा आहे, आणि हे उमराव पैशाच्या आशेने बादशाही हुकूम आणि हित विकावयास तयार होतील. सैन्य दलातील सर्वच सैनिक संभाजी राजांना मानतात. कारण तेच त्यांचे अन्नदाते आहेत. त्यामुळे ते सैनिक स्वार्थासाठी संभाजी राजांचा नाश करणार नाहीत. त्यांना माहीत आहे की संभाजी राजे आहेत म्हणून नोकरी व पैसा मिळू शकेल. असे बोलले जाते की राजे आणि शहाजादा यांचा गुप्त पत्रव्यवहार चालू आहे.[३]

१. मस्वायु–प, पृष्ठ १३ — २. PM–PP, p 59

३. FR : Sur to Lon 30–11–1683, Sur Vol 91, p 229

शहाआलमच्या या मोहिमेविषयी खाफीखान, ईश्वरदास नागर आणि मानुत्ची यांनीही माहिती दिलेली आहे. याशिवाय पोर्तुगेज कागदपत्रांतही त्याच्या हालचालींची माहिती मिळते.

दि. १३-९-१६८३ रोजी शहाजादा कोकण प्रांताकडे रवाना झाला. हसनअलीखान भीमेच्या काठावर होता. शहाजादा मुअज्जम याला येऊन मिळावे अशी त्याला आज्ञा देण्यात आली. मुअज्जमने मजल दरमजल करीत कृष्णा ओलांडली.[१] वाटेत मराठ्यांच्या फौजेने प्रतिकार केला. वाटा अवघड आणि अरुंद असल्याने शहाजाद्याच्या आघाडीवरील फौजेशी शत्रूची प्रखर युद्धे झाली. मुघलांचे अनेक लोक मारले गेले आणि शत्रू पराजित होऊन पळून गेला. मुघल फौज संपगावच्या किल्ल्यापाशी पोचल्यावर किल्ल्याला वेढा घालण्याचा हुकूम देण्यात आला. मुघल सरदारांनी उत्कृष्ट शौर्य दाखविले. जाननिसारखान आणि इतर दोन तीन नामांकित सरदारांना जखमा झाल्या. अल्पावधीत किल्ला फत्ते झाला.[२] शहाजाद्याने संपगड ( संपगावचा क़िल्ला ) सुमारे १६८३ सालच्या डिसेंबरात बादशाही अंमलाखाली आणून अब्दुल फैयाजखानाला तेथील किल्लेदार नेमले. हा गड जिंकल्यावर सोन्याची किल्ली, आणि चांदीची ढाल यांसह शहा-आलमने बादशहाकडे अर्ज केला.[३]

रामघाट उतरत असतानाचे वर्णन करताना ईश्वरदास नागर लिहितो, "शहाजादा मुअज्जम घाटाच्या तोंडाशी पोचला. त्या भागात घनदाट अरण्ये होती. नाइलाजाने शहाजाद्याने घाटाच्या तोंडाशी चार मुक्काम केले. सैन्य आणि बुणगे यांना घाट ओलांडण्यास फार कष्ट झाले. यानंतर शहाजादा मुअज्जम हा आपली स्वतःची पथके घेऊन घाट ओलांडून कोकणात उतरला.[४]

यावेळी संभाजी राजे गोव्यात लढत होते. मराठ्यांची फौज पोर्तुगेज आणि मुघल सैन्याच्या कैचीत सापडू नये म्हणून संभाजी राजे चपळाईने रायगडला माघारे गेले. दि. २३-१२-१६८३ ला रायगडला जाताच त्यांनी कविकलश याला कुलयेखत्यार केले.[५] वाटेत संभाजी आणि अकबर यांची मुघल सैन्याशी जी गाठ पडते आणि चकमकी उडतात. यासंबंधात ईश्वरदास नागर लिहितो " तेथून शहाजादा मुअज्जम पुढे दोन मजला पार करून गेला असेल नसेल तोच शहाजादा महंमद अकबर आणि संभाजी हे प्रचंड सैन्य घेऊन त्यांच्यावर चालून आले. मोठे निकराचे युद्ध झाले. उभय पक्षांचे अनेक लोक ठार झाले. शेवटी गनिमांचा धीर सुटून ते रणांगणातून पळून गेले, आणि रायरी व राजगड या

१. मोमसं-प, पृष्ठ १८
२. मस्वायु-प, पृष्ठ १३
३. अख : ८-१-१६८४
४. मोमसं-प, पृष्ठ १८
५. शिचप्र, पृष्ठ ३३

किल्ल्यांच्या आश्रयाला जाऊन राहिले." ईश्वरदास नागरने म्हटल्याप्रमाणे मराठ्यांचा धीर मात्र सुटलेला नव्हता. संभाजी राजे पोर्तुगेजांची संपूर्ण फजिती करून आपले सैन्य पोर्तुगेज आणि मुघल यांच्या कचाट्यात सापडू नये म्हणून जलदीने रायगडलाच निघालेले होते. वाटेवर त्यांची मुघलांशी गाठ पडलेली होती. उलट या ठिकाणी शहाआलमची पुरी फजिती उडालेली होती. त्यामुळे मराठ्यांनी येथे धीर सोडला असे वाटत नाही. या संबंधात ऑर्लीन्स म्हणतो, "Sambhaji's movements at the sight of this redoubtable force, showed how much he feared it, and it was soon discovered that it was the mogul army, which was endeavouring to force the besieger to battle. Sambhaji, however, did not consider himself strong enough to resist such a number and thought only of securing his safety by a masterly retreat which he affected so cleverly, that he retired to his fastnesses before the Mogul army could engage him in combat."[१]

गोव्याहून परत जाताच, संभाजीराजांना शहाआलमच्या दक्षिणेत उतरणाऱ्या अफाट सैन्यबळाची कल्पना असल्यामुळे, त्यांनी ताबडतोब या स्वारीला तोंड देण्यासाठी सैन्यशक्ती वाढविण्याचे प्रयत्न सुरू केले. त्याची कल्पना पुढील पत्रावरून येते. दि. ४–१–१६८४ ला राजे वाईच्या देशमुखाला लिहितात, "सुलतान मोजम आणि शाबदीखान गनीम दोहीकडून कोकणात उतरला, या प्रसंगे हशमांचे बहुत प्रयोजन आहे. करिता रा. संताजी यमाजी सरमिरा + यांला नौसंचणी हशमांचा जमाव करावयाबद्दल वरघाट प्रांते पाठविले असे. ते सांगतील तेण्हेप्रमाणे नौसंचणी करून पाठऊन देणे. हे काम बहुत नाजूक आहे. याप्रसंगी जरी हशमांचा पोख्त जमाव जाला तरी गनिमांचा काय जुमान लागला. बुडविलाच जातो. जमाव पाठविणे. स्वामी संतोषी होतील. आजीवरी स्वामीने तुमचे चालविले ते सार्थक ह्या दिवसात करून आपला मुजरा करून घेणे. तलाश तरतूद करून हशम पाठवून देणे."[२]

मुघल सैन्याचे यावेळी जे हाल झाले त्याचे वर्णन करताना खाफीखान लिहितो, "मोगली सैन्याने मुलूख उद्ध्वस्त करून गगनचुंबी डोंगर आणि खोल दऱ्या असलेल्या मुलखात प्रवेश केला. तो प्रदेश काटेरी वृक्षांनी आणि घोर अरण्यांनी व्यापला होता. अनेक काफरांना ठार मारण्यात आले. ख्वाजा अबुलकलाम हा शहाजाद्याचा जुना आणि एकनिष्ठ सेवक होता. त्यालाच पुढे जाननिसारखान ही पदवी मिळाली. तो आणि इतर बादशाही सरदार यांनी या

१. ERS, p 341 २. शिचसा, खंड २, ले. २७१; खंड ५, ले. ९४४

मोहिमेत डोळ्यात भरण्यासारखे शौर्य गाजविले. पण त्या देशात कुळीथ इत्यादी निकृष्ट धान्ये मिळतात. इतर भागातील लोक आणि प्रवासी यांनी ते अन्न खाल्ले तर त्यांच्यावर विषारी अन्न खाल्ल्यासारखा परिणाम दिसून येतो. वरील धान्ये, नारळ आणि पोफळी याशिवाय दुसरे काही मिळत नाही. घोडे आणि उंट यांना तेथील हवा मुळीच मानवत नाही. या मोहिमेत अनेक माणसे व जनावरे नाश पावली. सैन्यात घोडे शिल्लक राहिले नाहीत. शेवटी परिस्थिती अशी आली की शहाजाद्याच्या खास पाग्यांतही स्वारी करण्यायोग्य घोडा राहिला नाही. काफरांनी चोहोंकडून वाटा अडविल्या. "[१]

दि. २८–१२–१६८३ रोजी शहाआलमने कुडाळ आणि बांदे जाळले.[२] यानंतर तो दि. १५–१–१६८४ ला डिचोलीस पोचला.[३]

संभाजीराजांच्या कारकीर्दीच्या प्रारंभापासून कुडाळ प्रांतावर छत्रपतींची सत्ता चालत आली होती.[४] १६८३ सालच्या जुलैपर्यंत छत्रपतींची सत्ता त्या परगण्यावर आहे. १६८३ च्या डिसेंबर महिन्यात शहाआलम रामघाटाने उतरून कुडाळ आणि बांदे जाळतो. त्यानंतर त्या भागावर आदिलशाही सत्ता सुरू झाली.[५] पण आधीची सत्ता छत्रपतींची असल्यामुळे आणि छत्रपती संभाजी आणि आदिलशहा ह्यात तह झालेला असल्यामुळे हा परगणा पुन्हा छत्रपतींकडे एप्रिल १६८४ मध्ये आला. म्हणून कवि कलशाच्या पत्रात ' हली साहेबास मुलूख अर्जानी जाला ' म्हणजे संभाजीराजांच्या ताब्यात हा परगणा आला, असे आहे.[६] १६८६ सालच्या ऑक्टोबरपर्यंत कुडाळप्रांत स्वराज्यात होता.[७]

शहाआलमच्या डिचोली येथील मुक्कामासंबंधी ईश्वरदास नागर लिहितो,

" यानंतर मोगलांचे सैन्य कूच करीत बिचोली ( डिचोली ) मुक्कामी आले. तेथे मोगलांनी छावणी केली. डिचोली हे मोठे शहर असून तेथे इंग्रज, डच, फ्रेंच आणि पोर्तुगीज राहतात. त्यांनी तेथे मोठे वाडे बांधले आहेत. ते किल्ल्याप्रमाणे मजबूत आहेत. त्यांनी आकर्षक अशा मोठ्या बागाही तयार केल्या असून त्यातून विविध प्रकारची फळझाडे लाविली आहेत. शहरातून कालवेही काढण्यात आले आहेत. याशिवाय महंमद अकबर आणि संभाजी यांनीही तेथे मोठ्या हवेल्या बांधल्या आहेत. शहराला लागून एक खोल नदी वाहते. तिला हिंदू पंचगंगा या नावाने ओळखतात. दरवर्षी भोवतालच्या प्रदेशातून हिंदू लोक या नदीत स्नाने करावयास येतात. सारांश शहाजादा मुअज्जमने अकबर आणि

१. मस्वायु–प, पृष्ठ ८
२. शिचप्र, पृष्ठ ३२
३. मोमसं–प,–पृष्ठ ११२
४. मइसा–खंड २०, लेख २७१, २८१
५. शिचसा–खंड २, लेख ३३०
६. सासंइ–लेख १२१; पेद ३१ लख १८४
७. शिचसा–खंड ४, लेख ७३८

संभाजी यांनी बांधलेल्या हवेल्या पाडून टाकल्या आणि बागा नष्ट केल्या. यानंतर कूच करीत तो गोव्याजवळ आला...गोव्याजवळ पोचल्यानंतर मोगल सैन्यास रसदेची फार महर्गता झाली. धान्य कोठेच मिळेनासे झाले. उपासमारीने लोकांचे प्राण कंठाशी आले."[1]

शहाआलमच्या गोव्यातील मुक्कामाची माहिती पोर्तुगेज कागदपत्रांतून मिळते. डिचोली शहर बेचिराख करून मुघलांचे सैन्य भतग्रामातल्या नारवेच्या बाजूस नदीच्या तीरावर जाऊन राहिले. मुघलांनी डिचोली जवळच्या पिळगाव येथील श्रीरामाचे देवालय आणि मूर्ती उद्ध्वस्त केली. श्री सप्तकोटीश्वरादी भत्-ग्रामातील देवालयेही मोडली. कुडाळ आणि बांदे जाळून वेंगर्ले लुटले होते.[2]

शहाआलमच्या सैन्यात धान्यसामुग्रीची जरूरी होती. "मोगल सैन्यात रसदेची फार महर्गता झाली. ही महर्गता इतकी वाढली की कधी कधी तीन तीन चार, चार रुपये देऊनही एक शेर गव्हाचे पीठ मिळेनासे झाले. फौजेतील माणसांपैकी जे मृत्यूच्या दाढेतून वाचले, त्यांच्या शरीरात तर अर्धेच प्राण शिल्लक राहिल्याप्रमाणे होते. ते रोड आणि हैराण झाले होते. प्रत्येक श्वासागणिक त्यांना वाटे की तेवढेच आयुष्य लाभले; हीच खैर झाली. एकाही सरदाराच्या तबेल्यात स्वारीयोग्य असा एकही घोडा राहिला नाही. मग शिपायांची काय कथा? उपासमारीने लोकांचे प्राण कंठाशी आले. मोगल सैन्याची झालेली ही दुर्दशा बादशहाला कळविण्यात आली. त्याने सुरतेच्या खैरीयतखान आणि याकूत खान यांना आज्ञा करून शक्य तितके धान्य जहाजांत भरून समुद्राच्या मार्गाने शहाजाद्याच्या सैन्याकरिता पाठविण्यास सांगितले."[3]

डिचोलीहून गोवेकरांकडे वकील आणि पत्र पाठवून धान्यसामुग्री घेऊन सुरतेकडून येणाऱ्या आरमाराला मांडवी नदीतून नारवेकडे जाण्यास शहाआलमने परवानगी मागितली. विजरईने कायसूवच्या नदीतून या आरमाराला जाण्याची परवानगी दिली. मांडवी नदीतून हे आरमार गेले असते तर गोवे शहरास धोका उत्पन्न होण्याचा संभव होता. दि. २३–१–१६८४ रोजी सायंकाळी विजरईने आपला वकील शहाआलमकडे पाठविला. तो डिचोलीला पोचण्यापूर्वीच शहाआलम वेंगुर्ल्यास गेला होता. पोर्तुगेज वकील वेंगुर्ल्यास जाऊन त्याने शहाजाद्याची भेट घेतली. त्यांचे झालेले बोलणे विजरईने मुघल बादशहाला दि. २०–३–१६८४ रोजी लिहिलेल्या पत्रात नमूद केलेले आहे. विजरईने शहाआलमला पावसाळ्यात कोकण सोडू नये अशी विनंती करून संभाजीविरुद्ध युद्ध चालू ठेवण्याचे सुचविले होते. मराठ्यांनी पोर्तुगेजांशी

१. मोमसं–प, पृष्ठ १९ २. पोम–पि, पृष्ठ ११८

३. मोमसं--प, पृष्ठ १९; मस्वायु--प, पृष्ठ १४

केलेल्या युद्धात वीस लाख असुर्प्यांपेक्षा (वीस लक्ष रुपये) जास्त नुकसानी केल्यामुळे पोर्तुगेजांना पैशाची चणचण असून मुघलांनी ही रक्कम आणि ६०० घोडे द्यावे अशी विजरईने अट घातली होती. याशिवाय पोर्तुगेजांनी बांद्यापासून मिरजनपर्यंतच्या कोकणच्या भागाचीही मागणी केली होती.[१]

या विजरईच्या मागणीसंबंधात प्रत्यक्ष काहीच घडले नाही. मुघलांनी पाठविलेली रसद मराठ्यांचे समुद्रकाठावर ठिकठिकाणी किल्ले असल्याने शहाआलमला मिळू शकली नाही. सुरतेहून जहाजे निघाल्याची मराठ्यांना बातमी लागताच त्यांनी हल्ले करून ती लुटली. या हल्ल्यातून जी थोडी जहाजे वाचली त्यातील धान्य कितीसे असणार? लष्करातील प्रत्येक सरदाराच्या बाजारात ३०–४० पल्ल्यांपेक्षा अधिक धान्य पोचले नाही. अखेर शहाजाद्याला परत यावयाची बादशहाने आज्ञा दिली.[२]

पावसाळ्यापूर्वीच कोकण सोडण्याचे मुअज्जमने ठरविले. पोर्तुगेज विजरईने पावसाळ्यापर्यंत थांबावयाची विनंती केली असली तरी या सर्व त्रासाला कंटाळून शहाआलम ताबडतोब परत निघाला. रामघाट चढत असताना रसदेच्या टंचाईमुळे, मराठ्यांच्या हल्ल्यांनी आणि रोगराईमुळे मुघल सैन्याचे अत्यंत हाल झाले. परतीच्या वाटेत त्यांना मराठ्यांशी सतत झगडा देत पुढे जावे लागत होते. या प्रवासात शहाआलमबरोबर मानुत्ची हा इटालियन प्रवासी होता. तो म्हणतो, "आम्ही रामघाट चढू लागलो. ही चढण तीन मैलांची आहे. घाट अतिशय अवघड असून वाट अरुंद आहे. भोवताली दाट आणि काटेरी झाडाझुडपांचे जंगल आहे. संभाजीने मनात आणले असते तर तो आमचे सैन्य गारद करू शकला असता. पण त्याने तसा प्रयत्न केला नाही. त्याचे आणि मुअज्जमचे संगनमत झाले असल्याची अफवा होती. परंतु जे संभाजीने केले नाही ते परमेश्वराच्या प्रकोपाने घडवून आणले. मुघल सैन्यात रोगांची इतकी भयंकर साथ पसरली की सात दिवसांत या रोगाने पछाडलेला प्रत्येक मनुष्य मेला. अशा रीतीने सैन्यातील तिसरा हिस्सा माणसे मृत्युमुखी पडली. हा रोग माणसांनाच झाला असे नाही; हत्ती, घोडे, उंट इत्यादी जनावरेही त्याला बळी पडली. सगळी हवा दूषित होऊन गेली. अरुंद आणि अडचणीच्या रस्त्यामुळे रसदही नीट मिळेना. मी म्हटल्याप्रमाणे यावेळी लष्करात मुबलक गहू होते; परंतु ते वाहून नेण्यासाठी जनावरे नव्हती. त्यामुळे शिपायांचे फार हाल झाले. ज्यांचे घोडे मेले त्यांना घोडे विकत घ्यावयासाठी पैसे नव्हते, आणि घोडे विकावयास लष्करात कोणीच तयारही नव्हता. अनेकांना पायी रखडपट्टी करावयाचा प्रसंग आल्याने उन्हामुळे आणि तहानेमुळे अनेक लोक मरण पावले. आम्ही घाट ओलांडून वर

१. पोम--पि, पृष्ठ ११८–११९

२. मस्वायु–प, पृष्ठ १४

आल्यावर विजापूर राज्याच्या दिशेने जाऊ लागलो. मराठे आमच्यावर सतत टेहेळणी करून संधी मिळताच आमच्यावर आणि बुणग्यांवर हल्ले करीत होते.[१]

शहाजादा मुअज्जम रामदऱ्याच्या घाटातून बाहेर पडून बादशहाकडे जाण्यास निघाला. तो इंडीपासून दहा कोसांवर आला तेव्हा त्याच्याजवळ फार थोडे घोडेस्वार होते. बहुतेक माणसे पायीच येत होती. मराठ्यांचे हल्ले चालूच होते. शहाआलमला भेटून बहाद्दूरखानाने त्याला लागणारा सर्व सरंजाम दिला.[२] दि. २०–२–१६८४ या दिवसाच्या जेधे शकावलीतील नोंदीत "शहाआलम घाटावर जातो व जाताना लष्कर फार मरते" असे नमूद केलेले आहे.

कारवारच्या प्रदेशात मुघलांनी बरेच नुकसान केले होते. डचांचे जसे नुकसान झाले त्या मानात इंग्रजांचे नुकसान झाले नव्हते.[३]

१६८४ सालच्या एप्रिल–मे महिन्यात शहाआलम विजापूरजवळील शेक्स येथे जाऊन राहिला.[४] जून महिन्यात तो भीमेच्या काठावर पोचला. तेव्हा त्याची मराठ्यांच्या ५००० स्वारांच्या तुकडीबरोबर लढाई झाली. या चकमकीत शहाआलम जखमी झाला, आणि त्याचे बुणगे व पेशखाना मागे राहिला. २५००० मराठे सैनिक २५ कोस येऊन बुणग्यांवर कोसळले आणि त्यांनी त्यांना लुटले. शहाजाद्याने नगारे वाजवून त्यांना परत जाण्यास सांगितले.[५]

शहाआलमच्या या स्वारीने मुघलांचा काहीच फायदा झाला नाही. त्याच्या सैन्याचे पुष्कळ नुकसान झाले. द्रव्यशक्ती आणि सैन्यशक्तीचा खर्चच अतोनात झाला. "संभाजीच्या मुलखात मोठे सैन्य घेऊन शहाआलम गेलेला असला तरी त्याला एकही गड घेता आलेला नाही. त्याने मराठी प्रदेशाचे नुकसान केले आहे." असे सुरतकर इंग्रज हुगळीच्या वखारवाल्यांना कळवितात.[६]

१६८४ सालच्या कोंकणच्या स्वारीत शहाआलमला कोकण जिंकता आला नसल्याने तो औरंगजेबाच्या मर्जीतून उतरला.[७]

**औरंगजेबाची मनःस्थिती :**

१६८२ सालच्या प्रारंभापासून औरंगजेब मराठ्यांच्या सरहद्दीवरील अनेक गडांना वेढे देऊन तो स्वतः सरहद्दीवर मोठे सैन्य घेऊन बसलेला होता. त्यामुळे एक प्रकारचे भीतीचे वातावरण निर्माण झालेले होते. संभाजीराजांना

१. SM–NM, Vol 2, p 287–88 २. हिंस्वआमो, प, पृष्ठ ५४

३. FR : Car to Sur, ११–२–१६८४

४. शिचप्र, पृष्ठ ३३ ५. अख : १६–६–१६८४

६. FR : Sur to Hugli, २८–३–१६८४

७. ताकाका, ५ लेख ३७, पृष्ठ ५९

स्वतःच्या राज्याला मुकावे लागणार असे इंग्रजांना वाटत होते. दि. ३०–७–१६८२ च्या पत्रात कारवारकर सुरतेला कळवितात, "असे खात्रीपूर्वक समजते की संभाजीराजांचे बरेच नुकसान झाले असून थोड्याच दिवसांत त्यांचे राज्य खलास होईल. औरंगजेब स्वतः अफाट सैन्यानिशी सरहद्दीवर बसला असून, संभाजी राजांच्या कित्येक गडांना वेढे घालून त्याने त्यातील २ किंवा ३ गड घेतलेही आहेत. त्यातील मुख्य गड म्हणजे त्रिंबक जवळील रामसेज. संभाजीचा सेनापती हंबीरराव शत्रूला आडकाठी करण्यासाठी १८००० पायदळ घेऊन वेढा उठविण्यासाठी गेला; पण त्याला माघार घेऊन सातान्यास जावे लागले. औरंगजेब संभाजी राजांवर इतका चिडलेला आहे की त्याने आपल्या डोक्यावरची पगडी फेकून दिली. राजांना पकडल्याशिवाय किंवा ठार मारल्यावाचून ती पुन्हा डोक्यावर घालणार नाही असा त्याने पण केला आहे."[1]

इंग्रजांच्या पत्रात ज्या रामसेज गडाचा उल्लेख आहे तो १६८२ मध्ये मुघलांनी घेतलेला नव्हता; त्यांनी तो १६८७ साली घेतला. औरंगजेबाच्या अफाट सामर्थ्यापुढे संभाजीराजांचा टिकाव लागणार नाही अशी इंग्रजांची समजूत होणे स्वाभाविक होते. औरंगजेबाने रामसेज, त्रिंबक, साल्हेर, पुरंदर, पुणे, सातारा येथे वेढे घातलेले असले तरी तोपर्यंत प्रत्यक्षात त्याला साल्हेरशिवाय कोठेच यश मिळालेले नव्हते. सर्वत्र एकाच वेळी आक्रमण केले की संभाजीचे राज्य चुटकीसारखे नाहीसे करता येईल अशी औरंगजेबाची समजूत होती. मराठ्यांनी मुघलांना प्रत्येक आघाडीवर तोंड दिले व त्यांचे हल्ले परतविले. औरंगजेबाने ज्या प्रमाणात पैसा आणि शक्ती पणाला लावलेली होती त्या मानात त्याला जवळ जवळ यश लाभलेच नाही असे म्हटले पाहिजे. मराठ्यांच्या प्रतिकार-शक्तीची, शौर्याची, धाडसाची आणि तंत्राची कल्पना आल्यामुळे औरंगजेब चिडला आणि त्याने आपल्या डोक्यावरची पगडी फेकून दिली. १६८३ च्या जून महिन्यापर्यंत परिस्थितीत काहीच फरक झालेला नव्हता. अनेक ठिकाणचे वेढे मुघलांना उठवावे लागले होते. मराठ्यांनी वऱ्हाड आणि अहमदनगर जिल्ह्यात केलेल्या लुटीचा आणि आक्रमक हालचालींचा त्याला बंदोबस्त करावा लागला होता. या अपयशामुळे औरंगजेब निराश होऊन दिल्लीला परत जावयाच्या विचारात होता. त्याच्या मनःस्थितीचे वर्णन सुरतकरांनी दि. १९–६–१६८३ च्या पत्रात नमूद केलेले सापडते. "मोगल (औरंगजेब) अद्यापपावेतो तेथून हललेला नाही. अशी वदंता आहे की संभाजीराजे आणि सुलतान अकबर यांच्या विरुद्ध केलेले युद्ध आपल्या उमरावांवर सोपवून तो माघारा दिल्लीला जाण्याच्या विचारात आहे. तो अतिशय चिडखोर बनला असून मनात अस्थिर झालेला

१. FR : Car to Sur, 30–7–1682

आहे. त्याचे उमरावही असमाधानी झालेले आहेत. जर त्याचे आयुष्य लवकर संपुष्टात आले नाही तर कटकटी वाढतील आणि आपल्याला सतत भीतीच्या वातावरणात दिवस काढावे लागतील." [१]

फारसी बातमीपत्रातही औरंगजेब लढाईची सारी सूत्रे आपल्या अधिकाऱ्यांवर सोपवून दिल्लीला जावयाचा बेत करीत असल्याचे नमूद केलेले आहे. औरंगजेबाने उत्तरेत परतण्याचा आपला विचार उमरावांना सांगितल्यावर ते म्हणतात की, तुम्ही स्वतः दक्षिणेत असूनही मराठ्यांविरुद्ध लढण्यात यश मिळत नाही तर तुम्ही गेल्यानंतर आमचे कसे होणार ? औरंगजेबाच्या या मनःस्थितीचा विचार केला म्हणजे त्याच्या अफाट सामर्थ्याला आव्हान देऊन मराठ्यांनी त्याला किती हैराण केले असेल याची चांगली कल्पना येते. औरंगजेबाच्या तुलनेत विचार केला तर संभाजीचे वयही लहान होते. त्याचा अनुभव कमी होता तशीच त्याची ताकदही कमीच होती. सैन्यशक्ती आणि आर्थिक बळ कमी असूनसुद्धा संभाजीराजांच्या नेतृत्वाखाली १६८२–८४ सालातील मुघलांचे हल्ले मराठ्यांनी यशस्वी रीतीने परतवून लावलेले होते असेच म्हणावे लागते.

मराठ्यांविरुद्ध यश मिळत नाही असे दिसताच औरंगजेबाने आपला पवित्रा बदलला. मराठी राज्यावरील आपले आक्रमक धोरण बदलून त्याने आपल्या अधिकाऱ्यांना अनेक ठिकाणचे वेढे उठविण्यास सांगितले आणि आपली छावणी अहमदनगर येथे हलविली. [२]

संभाजीराजे, विजापूरचा सुलतान आणि गोवळकोंड्याचा सुलतान या तिघांनी तह करून औरंगजेबाला तोंड देण्याची तयारी केली होती. औरंगजेबाने संभाजीराजांशी मैत्री करणाऱ्या आणि त्यांच्या प्रभावाखाली असलेल्या दोन्ही सुलतानांच्या राज्यांवर स्वारी केली. १६८५ सालच्या एप्रिल महिन्यात औरंगजेबाने विजापूरचा वेढा सुरू केला. औरंगजेबाने एकीकडे लढाईचा पवित्रा बदलला आणि दुसरीकडे मराठी राज्याच्या सरहद्दीवर असलेल्या दळवी, देसाई यांना संभाजीराजांपासून फोडण्याचा प्रयत्न सुरू केला. त्याच्या अधिकाऱ्यांनी सरहद्दीवरील या वतनदारांना आपल्या पक्षात ओढण्याचे प्रयत्न सुरू केले.

औरंगजेबाचा मुख्य वजीर असदखान सावंतवाडीच्या खेम सावंताला दि. ४–१०–१६८३ रोजी लिहिलेल्या पत्रात म्हणतो, "पादशाही हुकूम यैसे सादीर आहे जे येरिन्तयार होऊन खिजमत करणे. जातीस च्यार हजारी मनसब व च्यार हजार स्वारांचे दौलत पावोन आणिकही पादशाहांचे मरहमता व नवाजीस पाविजेल ये बाबे बहुत कोसीस करणे व हे फलश्रुतीचे उमेदवार असोन आपल

१. FR : Sur to Fort St George; १९–६–१६ ३

२. अख : १३–११–१६८३

फाइदा समजणे."[1] असदखानाने खेम सावंताला चार हजारी आणि चार हजार स्वारांची मनसब देऊन पादशहाची मर्जी राखली तर अधिक फायदा होईल असे त्याला आश्वासन दिले होते. याप्रमाणेच छोटाराम दळवी, तान सावंत, देव सावंत, यांना पत्रे पाठविली होती. खेम सावंत आणि तान सावंत मराठ्यांशी लढून त्यांचा प्रदेश बादशाही कबजात आणण्याचा प्रयत्न करीत होते. ही माहिती शेख मुहम्मदाने बादशहाला यापूर्वीच कळविलेली होती. बादशहाने त्यांना प्रोत्साहन देणारी पत्रे पाठविली. विजापूर जिंकल्यानंतर औरंगजेबाच्या फौजा, पादशहाजादा आणि बुबराव कोकण प्रांतात उतरणार होते. खेम सावंत आणि तान सावंत यांनी केलेल्या मुघलांच्या सेवेला पादशहाची मान्यता मिळाली होती.[2] दळवी देसाईना वतनाचे आमिष दाखविले की ते मुघलांच्या बाजूने लढत. सरशी असेल त्याची बाजू घ्यावयाचे त्यांचे धोरण असे. औरंगजेबाच्या बलाढ्य सामर्थ्यापुढे मराठ्यांचा टिकाव लागणे कठीण आहे असे वाटू लागताच ते मराठ्यांच्या शत्रु-पक्षात सामील होत. अशाच धोरणाने सर्जा आणि खानगौडा या बंकापूरच्या देसायांना सरकारातील गावे इनाम देण्याचे कबूल केलेले होते.[3] अशा दळवी देसायांच्या स्वार्थी धोरणामुळेच औरंगजेबाला मराठी राज्यातील मुलूख जिंकणे सोपे झाले.

## काही फितुरांची नावे :

दळवी—देसायांप्रमाणेच औरंगजेबाने संभाजीराजांकडे असलेल्या नोकरांना, अधिकाऱ्यांना जहागिरी, मन्सब यांचे आमिष दाखवून त्यांना आपल्या नोकरीत घेतले. संभाजीराजांना अशा फितुरांचा त्रास झाला आणि त्यामुळेच त्यांचा शेवटही झाला.

शिवाजीमहाराजांच्या काळापासूनच मराठी जनतेला वतनांचे आकर्षण होते. वतनांचा सांभाळ करण्याच्या हेतूने अनेक मंडळी मुघलांना मिळाली. संभाजी आणि राजाराम असे दोन पक्ष पडल्यामुळेही अनेक मंडळी शत्रुपक्षात गेली.

( १ ) दि. ६–४–१६८२ रोजी संभाजीचा सेवक आणि खडगगडाचा जमीनदार चिमणाजी बादशाही सेवेत रुजू झाला. त्याला खिलतीची वस्त्रे देण्यात आली.

( २ ) दि. १८–८–१६८२ ला गणोजी आणि येसूबाईचा चुलत भाऊ कान्होजी हा तानाजी शिर्क्यांचा मुलगा बादशहाला भेटला. त्याला पाच हजारी

१. शिचसा– खंड ३, पृष्ठ ९
२. शिचसा– ,, १३, पृष्ठ ७–८
३. शिचसा– ,, ६, लेख ७७–७८

आणि पाच हजार स्वारांचा मन्सबदार करण्यात आले.[१]

(३) शिवाजी महाराजांचा मेव्हणा बजाजी हा १६८२ साला पूर्वीपासूनच मुघलांकडे मन्सबदार होता. १६८२ च्या ऑगस्ट महिन्याच्या सुरुवातीस बजाजी मरण पावला. त्याचा मुलगा महादजीची बादरा इत्यादी चारथाना येथे ठाणेदारी मुक्रर करण्यात आली. ४००० जात आणि ३००० स्वारांची मन्सब त्याला देण्यात आली. याशिवाय त्याचा भाऊ भूदोजी याला त्याच्या तैनातीत नेमले. इतर भावांना खानजहानबहाद्दूरच्या तैनातीत नेमण्यात आले.[२]

महादजी औरंगजेबाशी एकनिष्ठ होता. त्याला बहाद्दूरगडाची ठाणेदारी दिलेली होती. त्यानेच दि. १३–९–१६८६ या दिवशी खेम सावंताला पत्र पाठवून त्याचे बादशहाकडे येण्याविषयी मन वळविले. पत्रात, " या समान दुसरा कोणी नाही " अशी बादशहाची तरफदारी केलेली आहे. इतकेच नव्हे तर औरंगजेबाने विजापूरच्या राज्याची जी गत केली आणि भागानगर किंवा गोवळकोंड्याच्या मोहिमा संपल्या म्हणजे संभाजीचीही खोड तो मोडणार आहे, तेव्हा त्यापूर्वीच खेम सावंत बादशहाला मिळाला तर त्याचा फायदा होईल असेही त्याने आपल्या पत्रात स्पष्ट केलेले आहे.[३]

(४) दि. ९–१०–१६८२ पूर्वी संभाजी राजांचा नायब शेख इब्राहिम हा १००० जात आणि २०० स्वारांच्या मन्सबीवर होता.[४]

(५) दि. २९–६–१६८३ ला शिवाजी महाराजांचा मुन्शी काजी हैदर बादशहाचा सेवेत हजर झाला. त्याला दोन हजारी मन्सबदार करण्यात येऊन, दहा हजार रुपये आणि खिलतीची वस्त्रे देण्यात आली.[५]

१६८४ सालानंतर फितुरीला जास्त वाव मिळाला. त्याची नावनिशीवार यादी खाली दिली आहे :

(६) दि. २५–१०–१६८४ रोजी गाजीउद्दीनखान बहाद्दूर याने पदाजी, एकोजी मल्हार आणि राव सुभानचंद्र यांना बादशहाकडे पाठविले. त्यांना वस्त्रे देण्यात आली.[६]

(७) दि. १–८–१६८४ ला संभाजी राजांचा खास नोकर पुरषा याने मुघलांची नोकरी धरली. आज्जमशहाच्या नोकरीत त्याला १५०० जात आणि

१. मवऔ–प, पृष्ठ २२, २३

२. अख–७।८–८–१६८२

३. शिचसा–खंड १३, लेख ८

४. अख –९–१०–१६८२

५. मवऔ–प, पृष्ठ २५

६. कित्ता, पृष्ठ २८

१००० स्वारांची मनसब देण्यात आली.[१]

(८) अशाच पद्धतीने भद्रोजी, खंडोजी, रंभाजी, शंकराजी यांनी मुघलांची नोकरी पत्करली. त्यांना मन्सब बहाल करण्यात आली.[२] या लोकांची संपूर्ण नावे किंवा आडनावे समजत नाहीत.

(९) १६८५ सालच्या जानेवारीत दिनाजी, किशनराव, भगवंतराव, निंबाजी, अंकाजी या नोकरांना शहाआलमकडे मन्सब देण्यात आली.[३]

(१०) १६८५ च्या मार्च महिन्यात परसूजी, राघूजी, विश्वंतराव, दुंदाजी हे मुघलांना मिळाले.

(११) दि. ३०-४-१६८५ ला संभाजीचा चुलत भाऊ अरजूजी (अर्जुनजी ?) याला दोन हजारी आणि एक हजार स्वार यांचा मन्सबदार करण्यात आले.[४]

(१२) १६८५ वर्षाच्या मे महिन्यात जाऊजी, संताजी, मानाजी, मालोजी, अंताजी हे शत्रु पक्षाला मिळाले.[५]

(१३) मलिकबेग, शेखहसन, अलीराजा हे संभाजीराजांकडे नोकरीस होते. १६८४ सालापासूनच मुघलांना मिळण्याचा त्यांचा विचार होता. ही मंडळी प्रत्यक्ष १६८५ च्या ऑगस्टमध्ये औरंगजेबाकडे गेली.

(१४) संभाजी राजे यांचा नायब सामाजी किंवा रामाजी हा अमानुल्लाच्या बरोबर गेला. रामाजी, वंगोजी, नागोजी व शहाजी यांना मन्सब देण्यात आली.[६]

(१५) १६८६ च्या सुरुवातीस शिवाजी महाराजांचा जावई अचलाजी याला पाच हजारी आणि दोन हजार स्वारांचा मन्सबदार बनविण्यात आले. त्याला नगारे, नौबतीचा मान, ध्वज, रत्नजडित अलंकार आणि एक हत्ती या वस्तू भेटीच्या वेळी देण्यात आल्या.[७]

(१६) असोजी (येसाजी) दखनी हा संभाजी तर्फे साल्हेरचा किल्लेदार होता. तो बादशहाला (गोवळकोंड्याच्या मुक्कामात) भेटला. त्याला वस्त्रे, ध्वज, नगारे-नौबतीचा मान; घोडा, हत्ती आणि २० हजार रुपये रोख देण्यात आले.[८]

१. अख : १-८-१६८४
२. ,, : २४-९-१६८४
३. ,, : २२-१-१६८५
४. मवऔ-प, पृष्ठ ३०
५. अख : २१-५-१६८५
६. कित्ता
७. मवऔ-प, पृष्ठ ३२
८. कित्ता, पृष्ठ ३४

याच वेळी माणकोजी सालोना ( सांगोला ) च्या मराठ्यांच्या किल्ल्यावर अधिकारी होता. मुघलांनी हा किल्ला जिंकल्यावर तो बादशहाला भेटला. त्याला खिल्लतीची वस्त्रे आणि दोन हजारी व एक हजार स्वारांची मन्सब देण्यात आली.[१] सांगोला मुघलांकडे जाईपर्यंत माणकोजी स्वराज्याशी एकनिष्ठ होता. किल्ला पडल्यावर तो मुघलांना मिळाला.

( १७ ) शिवाजी जेधे आणि सर्जाराव जेधे व त्याचा मुलगा बाजी सर्जाराव हेही मुघलांना मिळाले होते. संभाजी राजे आणि निळकंठ मोरेश्वर यांनी जेधे मंडळींनी परत मराठी राज्यात येऊन आपली निष्ठा व्यक्त करावी अशी विनंतीही केली. संभाजी महाराजांनी सर्जारावाला खडसावणारे पत्रही पाठविले होते ते इतरत्र दिले आहेच.[२]

**फितुरांच्या कारवाया :**

औरंगजेबाने विजापूरचा वेढा चालू केला त्याच वेळी म्हणजे १६८५ च्या प्रारंभी शहाजादा आज्जम बेळगाव-धारवाड भागात उतरला. तेव्हा रामचंद्र पंडित आणि धर्माजी पंडित यांच्याकडे या भागाच्या बंदोबस्ताचे काम होते. मराठे आणि मुघलांच्या हालचाली चालू असल्याने कारवारच्या इंग्रज वखारवाल्यांना मालाची ने-आण करण्यात अडचण येत होती. मराठ्यांनी घाटावरील वाटा अडविल्या होत्या. ते दि. ४ आणि १६–१०–१६८४ ला या हालचालीसंबंधी सुरतेला कळवितात की, "...जोपर्यंत मुघलांची फौज माघारी गेली नाही तोपर्यंत माल पाठविण्यास आम्ही संमती देऊ शकत नाही...कारण संभाजी राजांनी मुघल फौज इकडे उतरू नये म्हणून घाटावरील सर्व वाटा बंद करण्याचे हुकूम दिले आहेत...रामचंद्र पंडिताने घाटावरील आपला रस्ता रोखून धरला आहे. त्यामुळे काहीही खरेदी करता आले नाही.[३]

१६८५ सालच्या फेब्रुवारी महिन्याच्या सुरुवातीस मुघल फौज कारवार शहराजवळ गेली होती. कारवारच्या इंग्रजांच्या बातमीप्रमाणे कारवारचा किल्ला आणि शहर मुघलांनी घेतले. याशिवाय त्यांनी विजापूरकरांकडून गोकाक आणि हुबळी घेतली. मुघल सैन्य या भागात राहिले तर ते बंकापूर वगैरे गावे घेतल्याशिवाय राहणार नाही अशी कारवारच्या इंग्रजांची कल्पना होती.[४] मार्च १६८५

१. मवऔ–प, पृष्ठ ३४

२. राखं, १५, लेख ३४२, ३४१, २८१; शिचप्र–पृष्ठ ३४; शिचसा–खंड ३२ लेख–३२२

३. FR : Car to Sur 4–10–1684, 16–10–1684

४. FR : Car to Sur, 19–2–1685

मध्ये आज्जम गदग येथे येऊन बसला होता. मुघलांचे सैन्य या भागात वावरत असताना १६८५ च्या जानेवारी-फेब्रुवारी महिन्यात "कुडाळकर देसाई, खेम सावंत पारखा जाला, त्यास फिरंगियांनी आश्रय दिला."[१] या खेम सावंताविषयी कारवारकर इंग्रज दि. १९–२–१६८५ च्या पत्रात लिहितात, "गोव्याजवळ राहणारा देसाई (खेम सावंत) याने थोड्या दिवसांपूर्वी संभाजी राजाविरुद्ध बंड करून तो पोर्तुगीजांना मिळाला. पोर्तुगीजांनी त्याला ३०० लोकांची मदत धाडली असून त्यांच्या मदतीने सावंताने गोव्याजवळचा प्रदेश लुटला आणि जाळला आहे. कुडाळ आणि सोंदे येथील देसायांनीही राजाविरुद्ध बंड पुकारले आहे. यात राम दळवीही सामील झाला आहे. १५००० च्या तुकडीने बंडखोरी केल्यामुळे कित्येक भागात संभाजी राजांच्या प्रजेची स्थिती वाईट झालेली आहे."

कादरा येथील देसायानेही बंड करून संभाजी राजांच्या प्रजेची घरे लुटली आणि जाळली होती. राजांच्या सुभेदाराचेही घर जाळल्यामुळे तो जंगलात पळून गेला होता. परंतु फोंड्याजवळच्या देसायाविरुद्ध असलेला दळवी त्याला मिळाला असल्याने तो परत येऊन केव्हाही खोडी काढण्याचा संभव होता.[२] कारवारकरांना असे समजले होते की सर्जाखान बंडखोरात सामील असून तो ६००० स्वारांसह रामघाटात उतरला आहे. त्यामुळे रामचंद्र पंडित आणि धर्माजी पंडित हत्ती वगैरे मागे टाकून पळून गेले.[३]

मुघल सैन्याच्या आगमनामुळे आणि देसायांच्या बंडामुळे कारवारच्या इंग्रजांच्या व्यापाराचे बरेच नुकसान झाले. १६८६ च्या जानेवारीपर्यंत कारवारची वखार दळवी आणि राजांच्या प्रजेमुळे धोक्यात होती. संभाजी राजांच्या विरुद्ध उठलेले लोक बलाढ्य झाल्याने संभाजी राजाचा लवकर नाश होईल असे मत सुरतकरांनी आपल्या दि. २३–१–१६८६ च्या पत्रात व्यक्त केले होते.[४]

अशा प्रकारे कारवार आणि गोव्याच्या सरहद्दीवरील देसायांनी बंड करून स्वराज्यावर संकटे आणली होती.

कारवारच्या बाजूला देसाई व सावंत यांची बंडखोरी चालू असताना मुघल सैन्य खेळणा, पन्हाळा, मिरज, बेळगाव इत्यादी ठिकाणी घुसण्याचा प्रयत्न करीत होते. १६८४ सालच्या अखेरीस किंवा १६८५ च्या सुरुवातीस संभाजीराजे खेळण्याकडे रवाना होणार होते. तसे त्यांनी अकबराला कळविले असावे. त्यावरून दि. १८–१–१६८५ रोजी अकबर पत्र लिहून संभाजीराजांना कळवितो

१. शिचप्र–पृष्ठ ३३
२. FR : Car to Sur, 8–4–1685
३. Ibid
४. Ibid, 23–1–1686

की, “ तुमच्या लिहिण्याप्रमाणे तुम्ही खेळण्याकडे रवाना झाला असाल; तसे असल्यास कळवावे. म्हणजे मी पण येऊन या मोहिमेत तुमच्याबरोबर राहीन. ” खेळण्याकडील या मोहिमेचा उलगडा होत नाही. ज्या अर्थी स्वतः राजे तिकडे जावयाचे होते त्या अर्थी कोणती तरी महत्त्वाची मोहीम असावी. प्रत्यक्ष ते खेळण्याकडे गेले किंवा नाही ते कळण्यास मार्ग नाही. १६८५ च्या प्रारंभी शहाजादा आज्जम बेळगाव, धारवाड भागात उतरलेला होता हे पूर्वी सांगितले आहेच.

१६८६ सालच्या मार्चपासून मिरज, कोल्हापूर, पन्हाळा या भागात मुघलांच्या आक्रमक हालचाली चालू झाल्या. १५ मार्च ते १२ एप्रिल १६८६ ( शक १६०८ चैत्र मासी ) मुघलांनी मिरज घेतले.[1] त्यामुळे मुघलांना राहावयास जागा मिळाली. मिरजेचा आदिलशाही किल्लेदार असदखान याने उतावळी करून गनिमास ( मुघल ) मिरज दिली होती.[2] यानंतर मुघलांचे सैन्य कोल्हापूर, पन्हाळा, वेळगाव या भागात शिरले. स्वॉली मरीन ( Swally Marine ) हून दि. ३०–११–१६८६ या दिवशी लंडनला लिहिलेल्या पत्रात मुघल सैन्याने पन्हाळयाला वेढा घातल्याचा उल्लेख आहे. याच पत्रात थोड्याच दिवसांत संभाजी राजे आणि इतर छोटे जहागिरदार मुघलांना शरण जातील अशी इंग्रजांनी भीती व्यक्त केली होती. परंतु प्रत्यक्षात मात्र हंबीररावाने मुघलांना हटविले होते. मिरज येथे असलेला रुहुल्लाखान व रणमस्तखान दि. २०–१२–१६८५ पूर्वी पन्हाळयापर्यंत गेले. या दोघांबरोबर हंबीररावाने मुकाबला करून मुघलांना जेरीस आणले. त्यांची अगदी फजिती झाली.[3] शेवटी रुहुल्लाखान आणि रणमस्तखान खट्टू होऊन कोल्हापुराहून बेळगावच्या बाजूला गेले. तेव्हा हंबीररावाने सेना-समुदायानिशी मुघलांचा पाठलाग केला. सेनापती शत्रूचा हिशेब धरीत नव्हता. हंबीरराव विजापूरकरांना आपलेच समजून त्यांच्या मदतीस धावून गेला. मुघलांनी मिरज घेतल्यानंतर बेळगावकर आपला कोट त्यांना द्यावयास तयार झाले असल्यामुळे मुघल सैन्य बेळगावकडे निघाले होते. हे कळताच हंबीररावाने बेळगावचा किल्लेदार खानेअजम मुरादखान याला पत्र लिहून कळविले की मुघलांना आसरा देऊ नका. आम्ही एके जागी होऊन मुघलांना सजा देतो.

कोल्हापुराहून मुघल सैन्य बेळगावकडे जाणार असल्यामुळे वाटेत हुकेरीचे देसाई मुघल अधिकाऱ्यांना आपल्या बाजूला ओढून घेणारच हे लक्षात घेऊन

नये आणि मुघल सैन्याला आसरा देऊ नये. हंबीररावाने आपण मुघलांना कोल्हापूरपासून बेळगावपर्यंत कसे हटवीत नेले आहे तेही लिहिलेले आहे. हंबीरराव लिहितो, "या मुलकात राजश्री गोपालराऊ होते. ते लस्करास सामील जाले आहेत. यानी तुमचे विशई कितेक रदबदल केली की आपणासी येक खुसीने चालत आहेत तरी हे गोस्टी बहुतच उत्तम आहे. गनीम वाटेने जात अहे तुम्हास कागदपत्र पाठवील तरी येकंदर गनिमास न भेटणे, असिरा न देणे, अम्ही लस्करानसी या प्रांते असता तुम्हास कोण्हे गोस्टीचे काही कसे नाही? राजश्री रूपाजी भोसले व राजश्री संताजी जगताप यासिही बोलाविले अहे. येके जागा होऊन गनीम मारून गर्देस मेलवीतच अहो. तुम्ही आपले वर्तमान साकळ्ये लिहून पाठविणे. बहुत काय लिहिणे. शा छ १४ सफर."[१]

दक्षिणेत आदिलशाही आणि कुत्बशाही बुडाल्यावर मराठे आणि मुघल अशा दोनच प्रतिस्पर्धी सत्ता उरल्या. दोन्ही सत्ता वतनदार देसायांना आपापल्याकडे ओढण्याचा सतत प्रयत्न करीत होत्या. येथे उद्‌धृत केलेल्या हंबीररावाच्या पत्रावरून शिवाजी महाराजांच्या तालमीत तयार झालेल्या लोकांचा आत्मविश्वास किती दांडगा होता हे प्रत्ययास येते. आमचे लष्कर या प्रांतांत असताना तुमच्या सारख्या वतनदाराने भिण्याचे कारण नाही असे आत्मविश्वासाने हंबीरराव लिहितो.

देसायांच्या मार्फत औरंगजेब मराठ्यांचा मुलूख काबीज करण्याचा प्रयत्न करीत होता. दि. ४–५–१६८६ रोजी बादशहाच्या अधिकाऱ्याने खेम सावंताला पत्र लिहून चार हजार जात व चार हजार स्वारांच्या मन्सबीचे प्रलोभन दाखविले होते.[२] त्याचा हेतू त्यांना वश करून मराठ्यांचा मुलूख मिळविण्याचा होता.

१६८६ च्या ऑगस्ट महिन्यात अशी पत्रे लानगो (लहान) राम दळवी तान सावंत, देव सावंत यांना मुघल अधिकाऱ्यांनी पाठविली होती. तान सावंताला दि. २१–८–१६८६ रोजी अशाच प्रकारचे पत्र गेले. त्यात औरंगजेबाने विजापूर जिंकल्यानंतर बादशाही फौजा, पादशहाजादा (शहा आलम) आणि बुबराव कोकण प्रांतात उतरणार, त्यापूर्वी खेम सावंत आणि तान सावंत यांनी मुघलांसाठी केलेली सेवा बादशहाला मान्य झाली म्हणजे ठीक असे म्हटले होते. ते दोघे गनिमांशी म्हणजे मराठ्यांशी लढून त्यांचा प्रदेश पादशाही कबजात आणण्याचा जो प्रयत्न करीत होते त्याची माहिती शेख मुहम्मदाने बादशहाला कळविली

१. शिचसा, खंड १२ ले. ७

२. शिचसा, खंड १३, लेख ४

होती, आणि बादशहाने प्रोत्साहन देणारी पत्रेही पाठविली होती.[1]

दि. १३–९–१६८६ रोजी शिवाजीचा जावई महादजी नाईक याने खेम सावंताला पत्र लिहून पादशहाकडे येण्यासाठी त्याचे मन वळविण्याचा प्रयत्न केला होता. अशीच प्रलोभने हुकेरीच्या मोघेगौडा देसायालाही दाखविली होती. १६८६ च्या नोव्हेंबर–डिसेंबरात हुकेरीच्या देसायाला पत्रे लिहून " मोघे गौडाने हुकेरी परगण्यात काही गडबड करू नये, त्याला नेसरी, नूल आणि कापशी या तीन कर्यातीची देसगत ( देशमुखी ) धन्याकडून मिळवून देऊ व पुढील वर्षी ( संभाजी ) राजाकडून उपर्युक्त परगण्याची कमावीस करण्याचा प्रसंग आला तर सोलापूर आणि कबूर या दोन कर्यातींमधून चौथाईची रक्कम त्यास द्यावी."[2] असे कळविले होते. बंकापूरचा सैद आदम करीम सर्जा आणि खानगौडा लक्ष्मेश्वर यांना पादशाही कामावर रुजू होऊन शत्रूने ( मराठे ) पादशाही किल्ल्याभोंवतालचा प्रदेश उद्ध्वस्त केला असताना कुमक पोचवून सरकारी फौजेत सामील झाल्याबद्दल आणि शत्रूस पिटून काढण्याबद्दल निरनिराळी इनामे दिली होती.[3]

असेच प्रयत्न संभाजी राजे आणि कवी कलश यांनीही केले होते. औरंगजेबाने आदिलशाही बुडविल्यावर तेथील सरदारांना मराठ्यांकडे जाण्याची इच्छा होती. खान आजम इभराहीमखान आणि मुस्तफारखान यांनी आपला हेजीब राजश्री वेदाजी केशव याला कवी कलशाकडे पाठवून संभाजी राजे आणि त्यांच्यात स्नेहाची घटाई करून घेतली होती. त्याच वेळी त्याने हुकेरीच्या मोघे गौडा देसायाची रदबदली केली होती. हे कळताच कवि कलशाने त्याला संभाजी राजांशी एकनिष्ठ राहण्याची विनंती केली. दि. २४–११–१६८६ रोजी कवि कलश त्यास लिहितो, "...त्यांनी ( वेदाजी केशव ) तुमची कित्येक रतबदल केली. तरी त्या प्रांतात राजश्री सामराज पाठविले आहेत. जो आपला मुदा असेल तो त्याला सांगणे आणि आपली रुजवात एकनिष्ठता दाखवून सेवेचा मजरा करून घेणे. मशारनिल्हे तुमची सेवा आणि तुमचा मुदा लेहून पाठवितील तो मनास आणून त्यासारखी सरफराजी होईल. मोगलास व बाजे हरामखोरास एकंदर सुलूख लावाया गरज नाही. महाराज छत्रपती स्वामीच्या पायाशी एकनिष्ठपणे राहोन आपली दौलतशाही जाहीर करणे. ये बाबे रा. वेदाजी केशव सांगतील त्यावरून कळो येईल."[4] अशा रीतीने कवी कलशाने वेदाजी केशवच्या मार्फत हुकेरीच्या मोघेगौडा देसायाला आपल्या पक्षात ओढण्याचा प्रयत्न केलेला दिसतो.

---

१. शिचसा, खंड १३, लेख ७

२. शिचसा, खंड १२ लेख १

३. कित्ता, खंड–६, लेख ७७, ७८, ७९

४. शिचसा, खंड १२, लेख २, पृष्ठ ५

हंबीररावाच्या लष्करात सामील झालेले गोपालराऊ यांनी हंबीररावाकडे इकेरीच्या अलगौडा देसायाची रदबदली केली होती. त्याला हंबीररावाने पाठविलेले पत्र मागे दिलेच आहे.

**एकनिष्ठांचे प्रयत्न :**

दि. १९–३–१६८६ पर्यंत लक्ष्मेश्वरचा खानगौडा देसाई संभाजी राजांशी एकनिष्ठ होता. त्याने संभाजी राजांसाठी काही स्वारी-शिकारीचे काम केले होते. म्हणून राजांनी आनंदाने हसशीत होऊन मौजे नरती हे गाव त्याला इनाम दिले.[1] याच देसायाने आणि किल्ले कोपलच्या नाडगौडा देसायाने १६८७ च्या जून-जुलै महिन्यात महत्त्वाची कामगिरी बजावली होती. औरंगजेबाने विजापूर घेतल्यावर या विजयाचा लाभ उठविण्यासाठी व भोवतालचा प्रांत जिंकण्यासाठी सैन्याची नेमणूक केली. त्या सैन्याने कोपळ, भुजबळगड या प्रांतात ठाणी बसविली व मुलूख जिंकला. पाळेगारांनीही कित्येक गडकोट हस्तगत केले. रजबखान नावाच्या सरदाराने असाच उद्योग केला. या गडबडीत कोपळ आणि बहाद्दूरबंडा हे मराठ्यांचे किल्ले मुघलांच्या ताब्यात जाण्याचा प्रसंग आला. तेव्हा खानगौडा आणि नाडगौडा या लक्ष्मेश्वर आणि कोपळच्या देसायांनी कोपळ आणि बहाद्दूरबंडा या दोन्ही किल्ल्यांवर घाला घातला. त्या किल्ल्यावरचे कित्येक हशम पळून गेले. तेव्हा देसायांनी आपले हशम किल्ल्यात घालून किल्ल्याची मजबुती केली. तेथे स्वार ठेवले. या सर्व गोष्टी त्यांनी संभाजी महाराजांशी एकनिष्ठ राहून केल्या. संभाजी राजे आपले सैन्य घेऊन तेथे गेले तेव्हाही देसायांनी मदत केली. ही एकनिष्ठता पाहून संभाजी राजांनी किल्ले कोपळजवळचे अलगंडी गाव अजराहा मऱ्हामत देसायांना इनाम दिला.[2]

१६८६ सालच्या जुलै महिन्यात दोडवाड आणि बेलवडी येथे धारवाडकर गनिमानी ( मुघलांनी ) ठाणे घातले होते. त्यास मारून काढण्यासाठी भुजबळगडचा सर सुभेदार यादव कोनेरी जमाव करून भगवंतपुराला गेला. मुरगोडच्या देसायाकडील जमाव मदतीला घ्यावा आणि तह करावा म्हणून तो तळूरास गेला. तेव्हा मनपा देसायाने त्याची भेट घेतली. त्याने सांगितले की आमचे वडील रुद्रप्पा शिवाजी महाराजांशी एकनिष्ठ होते. पादशहापूरकर रहिमदखान याने एक दोन वेळा प्रांत मजकूरमध्ये येऊन त्रास दिला तेव्हा मनपा देसायाने त्यांना मारून काढले. इतर देसाई धारवाडकर व पादशहापूरकर यांना मिळाले. तसा मनपा देसाई त्यांना मिळाला नाही. त्याने सुभेदाराबरोबर जमाव, घोडे, स्वार देऊन

१. शिचसा–खंड ६, ले ७५, पृष्ठ ४२

२. कित्ता–खंड ६, लेख ७६, पृष्ठ ४२

आपली संभाजी राजे आणि मराठे यांच्याशी एकनिष्ठता व्यक्त केली होती. त्यामुळे यादव कोनेरी सरसुभेदाराने दि. २–८–१६८६ रोजी मोरगळचा सुभेदार नरहरी बल्लाळ याच्या सल्ल्याने एक गाव उमली त्याला इनाम देण्यास सांगितले. एखादे गाव दिल्याने काही उणे पडत नाही पण देसाई एकनिष्ठ राहणे महत्त्वाचे आहे असे या पत्रात म्हटले आहे.[१]

कोपळ प्रांतातील मौजे गुडलानूरचा हणमाजी बनवरस देसाई संभाजी राजांशी एकनिष्ठ होता. त्याने मराठ्यांच्या बाजूने उत्कृष्ट कामगिरी केल्यामुळे दि. २८–५–१६८६ रोजी उमली गाव त्याला इनाम दिला होता. हा शेवटपर्यंत मराठ्यांशी एकनिष्ठ होता. किल्ले बहाद्दूरबंडा येथील सबनीस गणेश रघुनाथ व कासी त्रिमल यांनी रायाजी सामराजाला हणमाजी देसाई हा आपण मराठ्यांशी कसे एकनिष्ठ आहों हे समजून देण्यासाठी त्याला भेटू इच्छितो असे कळविले होते. त्यावर दि. २१–७–१६८८ रोजी रायाजी सामराजाने हणमाजी देसायाला अभय पत्र देऊन अनमान न करता भेटीस बोलाविले होते.[२]

मुघल अधिकारी खेम सावंताच्या मार्फत मराठ्यांचा मुलूख जिंकून घेण्याचा प्रयत्न करीत असत हे मागे सांगितलेच आहे. बेळगावच्या पश्चिमेस ३० मैलांवर असलेला पारगड मराठ्यांकडून जिंकून घ्यावा असे खेम सावंतला सांगण्यात आले. पारगडाचा लढा शक १६१० पौष शुद्ध ४ ते वद्य ८ म्हणजे सन १६८८ डिसेंबर ते ४ जानेवारी १६८९ च्या दरम्यान झाला. मुघल अधिकाऱ्यांनी पारगड तुमच्या हद्दीत असल्याने तो हस्तगत करून इकडे यावे असे खेम सावंताला लिहिले होते. त्यानंतर तीन चार दिवसांत काही घडले नाही असे दिसल्यावर मुघलांनी खेम सावंताला पुन्हा पत्र पाठवून जलालखान, दुलभानाईक आणि खेम सावंत या तिघांनी पारगड घ्यावा आणि त्याची व्यवस्था लावून हुजूर यावे असा हुकूम दिला. त्याप्रमाणे पारगडला न जाता खेम सावंत घाटाखाली उतरला अशी बातमी मुघल अधिकाऱ्यांना मिळाली. त्यामुळे खेम सावंत, शहाबाजखान आणि इतर जमिनदार यांनी एकत्रितपणे पारगडाला वेढा द्यावा अशी त्याला आज्ञा करण्यात आली. तरीही तो पारगडास गेल्याची बातमी न आल्यामुळे मुघल अधिकाऱ्यांनी खेम सावंताकडे पुन्हा विचारणा केली. खेम सावंताने तात्काळ आपले सैन्य पारगडाकडे पाठवून, त्याने राम दळवीला घेऊन मुघल अधिकाऱ्याकडे जावे असा हुकूम देण्यात आला. पारगड जिंकून घेण्याचा माप सावंत, कान सावंत आणि राम दळवी हे प्रयत्न करणार होते. त्यांच्याबरोबर खेम सावंतानेही आपले सैन्य घेऊन जावे असे त्याला सांगण्यात आले. पारगड

१. शिचसा, खंड १२, लेख ९०

२. शिचसा, खंड ६, लेख ४६, ४७


फत्ते झाल्यावर तुमचे ऊर्जित होईल असेही मुघल अधिकाऱ्यांनी खेम सावंताला लिहिले. खेम सावंत गप्प बसल्यामुळे मुघल अधिकाऱ्यांना पारगडाबद्दल उत्सुकता आणि काळजी वाटत होती. दि. ५ जानेवारी १६८९ रोजी खेम सावंताने जादा फौज पुरवून स्वतः मावारी यावे असा हुकूम देण्यात आला. मुघलांनी इतकी धडपड केली तरी पारगड जिंकण्यात कांहीच प्रगती झाली नाही. दुर्दैवाची गोष्ट अशी पारगडासंबंधी या पत्रव्यवहाराव्यतिरिक्त अधिक माहिती मिळत नाही. या लढ्यात मराठ्यांचे कोणकोणते अधिकारी शर्थीने लढत होते हेही कळू शकत नाही.[1]

## मराठा-मुघल संघर्षाचे सार :

सन १६८० ते १६८९ पर्यंत झालेल्या मराठा-मुघल संघर्षाचे, मुघलांच्या आक्रमणाचे आणि मराठ्यांच्या चढाईचे सविस्तर वर्णन वाचल्यावर संभाजी महाराजांच्या काळात अनेक आघाड्यांवर मराठे मुघलांचा कसा प्रतिकार करीत होते हे ध्यानात येते. त्यांच्या कारकीर्दीतील ८-९ वर्षांच्या अटीतटीच्या संघर्षा-नंतर संभाजी राजांनी काय गमावले आणि औरंगजेबाच्या पदरात काय पडले याचे सार काढणे आवश्यक आहे.

स्वराज्याच्या, पश्चिम महाराष्ट्राच्या उत्तरेच्या भागात, नाशिक-बागलाणात १६८१ साली मुघलांचे आक्रमण सुरू झाले. या भागात १६८६ सालापर्यंत मुघलांना गड जिंकून घेता आले नाहीत. संभाजी राजे मुघलांच्या हातात सापडण्या-पूर्वी एक-दोन वर्षे बागलाणातील मराठ्यांचे किल्ले मुघलांच्या हातात पडू लागले. हे खरे असले तरी यातील फारच थोडे गड मुघलांनी जिंकून घेतले हे ध्यानात घेतले पाहिजे. सरळ सरळ सामना करून यश मिळत नाही असे पाहिल्यावर औरंगजेबाने फितुरीचा आश्रय केला. १६८६ च्या अखेरीस साल्हेरचा किल्ला किल्लेदार असूजीने शत्रूकडून मन्सब स्वीकारून मुघलांच्या हवाली केला. रामसेजचा किल्लाही १६८७ साली मुघलांना फितुरी करूनच द्यावा लागला. १६८८ सालच्या शेवटी किंवा १६८९ च्या प्रारंभी मुघलांनी हरीशगड, त्रिंगलवाडी, मदनगड, मोरदंत, आऊंधा ( औंढा ), कवनी हे किल्ले फितुरीने घेतले. १६८९ च्या सुरुवातीस मातबरखानाने त्रिंबकगड श्यामराज आणि तेलंगराव यांना मन्सब आणि रोख रक्कम देऊन आपल्या ताब्यात घेतला. पट्टागडाचा तेवढा याला अपवाद आहे. तो मुघलांनी लढाई करून जिंकला. यावरून बागलाणातील जवळ-जवळ सर्व मुलूख १६८६ पर्यंत मराठ्यांच्या ताब्यात होता. त्यानंतर १६८७ सालापासून त्या भागात फितुरीला यश आले.

१. शिचसा, खंड १३, लख १३ ते १८


धुळे
साल्हेर
मुल्हेर
बागलाण
गिरणा नदी
हनवंत गड
अवळा गड
दमण
दिंडोरी
पिंपळगांव
रामसेज
नाशिक
वेरूळ
खुलताबाद
डहाणू
गणशगांव
देवळाली
जव्हार
त्रिंबकगड
भगूर
सिन्नर
वैजापूर
दौलताबाद
औरंगाबाद
तारापूर
अौंढा गड
गोदावरी नदी
मनोर
पट्टागड
प्रताप गड
गंगापूर
माहीम
संगमनेर
नेवासे
अकोला
प्रवरा नदी
मुळा नदी
पैठण
शेवगांव
वसई
भिवंडी
ठाणे
कल्याण
जुन्नर
बेल्हे
अहमदनगर
पाथर्डी
शिवनेरी
तळोजा
पारनेर
मुंबई
उरण
करंजा
राजमाची
खांड
चाकण
आष्टी
पण
पाली
सुधागड
नागोठण
रोहा
पुरंदर
मोरगाव
जंजिरा
तळे
माणगाव
रायगड
बारामती
इंदापूर
टेंभुर्णी
श्रीवर्धन
महाड
मांदरदेव
वाई
फलटण
धर्मपुरी
अकलूज
पोलादपूर
प्रतापगड
माळशिरस
कोरेगांव
दहिवडी
(माण)
पंढरपूर
सोलापूर
दाभोळ
चिपळूण
सज्जनगड
रहिमतपूर
सांगोला
शृंगारपूर
जयगड
कराड
संगमेश्वर
रत्नागिरी
साखरपा
पन्हाळा
सांगली
मिरज
विजापूर
कोल्हापूर
राजापूर
जैतापूर
कागल
हुकेरी
पाटगांव
पवित्र गड
सिंधुदुर्ग
मालवण
कुडाळ
सावंतवाडी
काकती
वेंगुर्ले
आंबा
बेळगाव
शहापूर
मुरगोड
संपगांव
भीमगड
पणजी
गो
वा
फोंडा
दोड्‍वाड
धारवाड
कारवार
० १० २० ३० ६० ९० कि. मीटर
० ८ १६ ३२ ४८ मैल
शिवाजी महाराजांची राज्य सीमा
संभाजी राजांची राज्य सीमा
( स्थूलमानाने )

स्वराज्याच्या पश्चिम महाराष्ट्राच्या मध्यभागात म्हणजे तळकोकण, कल्याण-भिवंडी, कोथळागड पुणे, आणि साताऱ्याच्या भागात मुघलांनी १६८१ सालीच आक्रमण सुरू केले. संभाजी राजांच्या वधानंतर मातबरखान नाशिकच्या ठाण्यातून बाहेर पडला. कल्याण, भिवंडी भागात ठाणी बसविणे किती कठीण होते हे त्याने बादशहाला पूर्वी लिहिलेच होते. ऑक्टोबर १६८९ ते सप्टेंबर १६९० या वर्षभराच्या काळात मातबरखानाने कल्याण-भिवंडी, दुर्गाडी आणि तळकोकणातील इतर किल्ले जिंकले.

ठाणे जिल्ह्यातील शहापूरच्या वायव्येस ४ मैलांवर असलेला माहुली गडही मातबरखानाने दि. २१–८–१६८८ रोजी तेथील किल्लेदार द्वारकोजी याला अडीच हजार अश्रफा लाच देऊन ताब्यात घेतला. १६८४ सालच्या अखेरीस ठाणे जिल्ह्यातील शहापूरच्या ईशान्येस असलेला कोथळागड जिंकून घेण्यात तेवढे मुघलांना यश आले.

पुणे जिल्ह्यातील ठाणी घेण्यासाठी औरंगजेबाने १६८१ च्या अखेरीस आपले सरदार पाठविले होते. १६८४ च्या मध्यावर मुघलांनी शिवापूर, शिरवळ आणि सुपे जिंकले असले तरी संभाजी राजांच्या हयातीत रोहिडा, पुरंदर, श्रीवर्धन, राजमाची, सिंहगड, राजगड, रायगड हे सर्व किल्ले मराठ्यांच्या ताब्यात होते. राजांना पकडल्यानंतर हे गड मुघलांना घेता आले. १६८७ च्या अखेरीस पुण्याच्या अग्नेयेस असलेले पाटस, नीरथडी, सांडस, कऱ्हेपठार येथे मुघलांचा अंमल बसला. पुण्याच्या पूर्वेला आणि पश्चिमेकडे म्हणजे राजमाची गडापासून गुंजळ मावळ, प्रचंडगडापर्यंत आणि बावधन, कोथरूड, भुकूम, भूगाव, चिंचवड, मुळशी, वेल्हे महाल, भोर इत्यादी प्रदेश संभाजी राजांच्या अखेरीपर्यंत मराठ्यांच्या ताब्यात होते.

१६८२ सालापासून सातारा भागात आक्रमक हालचाली करून मुघलांनी लूटमार केलेली असली तरी त्यांना गडकोटांवर ताबा मिळविता आलेला नव्हता. १६८९ च्या सप्टेंबरपर्यंत सातारा, परळी, निंब, चंदन-वंदन, कऱ्हाड, माजगाव, मसूर इत्यादी प्रदेश मराठ्यांच्या ताब्यात होता. १६८८ सालपासून वाईला मुघल ठाणेदार निहारखान घोरी कायम झाला.

दक्षिण कोकणात संगमेश्वर, राजापूर, पन्हाळा, मलकापूर, खेळणा, पारगड, कोपल, बहादूदूरबंडा, शिरोळे, फोंडे इत्यादी प्रदेश संभाजी राजांच्या कारकीर्दीत मराठ्यांच्याचकडे होता.

गोव्याच्या अंतरूज महालात १६८९ च्या फेब्रुवारी महिन्यात मुघल अंमल सुरू झाला.

उत्तर कोकण भागात कुलाबा, खंदेरी, राजकोट, सागरगड, पद्मदुर्ग चेऊल हा परिसर स्वराज्यातच होता.

कर्नाटकात बंगलोर, दोड्डबाळापूर, तुमकूर, चिकनहळ्ळी, ही गावे १६८७–८८ च्या सुमारास हातची गेली तरी जिंजी, तंजावर व त्याच्या भोवतालचा प्रदेश मराठ्यांच्या ताब्यात राहिला होता.

शिवाजी महाराजांनी निर्माण केलेले हिंदवी स्वराज्य जिंकण्याच्या इर्षेने स्वतः औरंगजेब प्रचंड सैन्यसंभार बरोबर घेऊन दक्षिणेत उतरला होता. या लढ्यात औरंगजेबाने आपली तीनही मुले–शहाजादा मुअज्जम, शहाजादा आज्जम, सुलतान कामबक्ष, आपले नातू, अनेक अनुभवी सरदार-सेनापती, प्रचंड सामुग्री, अफाट मनुष्यबळ आणि द्रव्यबळ पणास लावले होते. स्वराज्याच्या सुमारे वीस हजार चौरस मैलांच्या लहानशा प्रदेशात औरंगजेबाने अनेक आघाड्या उघडून एकाच वेळी आक्रमण सुरू केलेले होते. आठ वर्षे सतत झगडून, सर्व शक्ती केंद्रित करून, वारंवार आपल्या सरदारांच्या बदल्या करूनही, उत्तरेत सर्व हिंदुस्थान काबीज केलेल्या औरंगजेबाला दक्षिणेतील मराठी राज्यात फारसे यश मिळाले नाही. शिवाजी राजांनी निर्मिलेल्या छोट्याशा राज्यात आपल्या आयुष्याची सतत पंचवीस वर्षे औरंगजेबाला खर्च करावी लागली. संभाजी राजांविरुद्ध लढून यश येत नाही असे दिसताच त्याने फितुरीचे शस्त्र उपसले होते. संभाजी महाराजांच्या वधानंतर १६९० च्या सुमारास मराठी राज्याच्या बऱ्याच भागावर औरंगजेबाचा अंमल बसला. त्यानंतर मराठ्यांनी राजाराम आणि ताराबाई यांच्या नेतृत्वाखाली औरंगजेबाला आणि त्याच्या अधिकाऱ्यांना दे माय धरणी ठाय करून सोडले होते. महाराष्ट्रात २५ वर्षे लढूनही त्याला आयुष्याच्या अखेरीस अपेक्षित यश मिळाले नाही. महाराष्ट्रात निर्वेध सत्ता त्याला स्थापन करता आली नाही. एकूण विचार केला तर औरंगजेबाचे दक्षिणेतील धोरण अयशस्वीच ठरले असे म्हणावे लागते. शिवाजीमहाराजांच्या मृत्यूनंतर आपण चुटकीसरशी, सहजपणे मराठी राज्य जिंकू असे त्याला वाटत होते. पण दक्षिणेतील मराठेशाहीच्या संबंधात अनुभवी व धोरणी औरंगजेबाचा अंदाज संपूर्णपणे चुकला होता.

औरंगजेबाच्या महाराष्ट्रातील अपयशासंबंधी इतिहासकार कै. जदुनाथ सरकार आणि व्हिन्सेंट स्मिथ यांनी काढलेले पुढील उद्‌गार सर्वस्वी यथार्थ आहेत :
" If Napoleon could say that ' it was the Spanish ulcer which ruined me, ' Auranzeb could also say that the Deccan wars not only undid his own work but also those of his predecessors–

No wonder, Vincent Smith remarks that ' the Deccan was not only the grave of his body but also of his empire. ' "

औरंगजेबाप्रमाणेच त्याच्या साम्राज्याचेही थडगे महाराष्ट्रातच बांधले गेले.

* * *

# १०. मराठ्यांच्या कर्नाटकातील हालचाली

शहाजीराजांना कर्नाटकची जहागीर आदिलशाहाकडून मिळाली होती. या जहागिरीवर शिवाजीमहाराजांचा सावत्र भाऊ एकोजी ( व्यंकोजी ) राहात होता. शिवाजीमहाराजांना स्वतःप्रमाणेच व्यंकोजीला विजापूरच्या नोकरीतून मोकळे करावयाचे होते. यासाठी आणि इतर अन्य कारणांसाठी शिवाजीमहाराजांनी कर्नाटकात स्वारी केली. या स्वारीत त्यांनी जिंजी, वेलूर, तंजावर, कोलार, होसकोट, दोड्डबाळापूर हा प्रदेश जिंकला होता.

शिवाजीमहाराजांच्या मृत्यूपूर्वी संभाजी चिक्कबाळापूर तालुक्यात नंदी गडावर राहात होता असे दिसते. दि. २१ डिसेंबर १६७९ रोजी संभाजीराजे मोगलाईतून पळून पन्हाळ्यावर आले. दि. १३ जानेवारी १६८० ला शिवाजीराजे आणि संभाजी यांची पन्हाळ्याला भेट झाली.[१] या भेटीत, तुला कर्नाटकचे राज्य देतो, असे शिवाजीराजांनी संभाजीला सांगितले.[२] त्यानंतर १६८० सालच्या जानेवारी महिन्याच्या शेवटी संभाजीराजे नंदीदुर्ग येथे राहावयास गेले असावे.

संभाजी दिलेरखानाच्या तावडीतून निसटला असल्याने त्याचा संभाजीवर राग होताच. दिलेरखानाने एखाद्या सरदाराला चिक्कबाळापुरावर हल्ला करण्यासाठी धाडले असावे. दि. २१ मार्च १६८० च्या शिलालेखात या हल्ल्याची हकीकत आढळते. " कर्नाटकाच्या पूर्वेस असलेल्या उंच आणि अवघड नंदी[३] डोंगरावर जाण्याचा एकच मार्ग असून तेथे चंपक व अश्वत्थ वृक्ष आहेत. शत्रूपासून संरक्षण करण्यासाठी या डोंगरावर तटबंदी केलेली आहे. हा गड घेण्यासाठी म्लेंछाने स्वारी केली, पण त्याचा पराभव झाला. छत्रपतीचा पुत्र संभाजी राजे चिक्कबाळापुरी राज्यात शांततेने राज्य करीत आहे. जगदेव किल्ल्याचा

१. शिचप्र, पृष्ठ ३०

२. सभाव, पृष्ठ ७७–७८

३. नंदिदुर्ग : म्हैसूरमधील कोलार जिल्ह्याच्या पश्चिम भागातील ४८५१ फूट उंचावरील या टेकडीवर तटबंदी केलेली आहे. हे ठिकाण बंगळूरच्या उत्तरेला ३१ मैलांवर आहे. वर एक सपाट मैदान आणि अमृतसरोवर नावाचे तळे आहे. ही टेकडी बराच काळ मराठ्यांच्या ताब्यात होती. योगनंदीश्वराच्या देवळात संभाजीचा हा शिलालेख आहे.

बाळाजी कृष्ण दुर्गाधिकारी होता. त्याने रघुनाथ पंडिताच्या आज्ञेवरून नंदी किल्ल्याचा अधिकार आपल्याकडे घेतला."[१]

महाराजांच्या मृत्यूनंतर अंतर्गत परिस्थितीशी आणि परकीय सत्ताधीशांशी सामना देत असताना संभाजीराजांनी महाराष्ट्रापासून लांब असलेल्या कर्नाटकातील प्रदेशाकडे दुर्लक्ष केले नाही. १६८० च्या अखेरीस संभाजीमहाराजांच्या विरुद्ध झालेल्या कटात रघुनाथ नारायण हणमंते या कर्नाटकाच्या सुभेदाराचा हात असल्याच्या संशयावरून त्यास अटक करण्यात आली होती. या लांबच्या प्रदेशात विश्वासू माणूस नेमणे आवश्यक होते, म्हणून संभाजीराजांनी आपला मेव्हणा हरजी राजे महाडीक याची नेमणूक केली. त्याच्याबरोबर शामजी पुंडे यास कर्नाटकाचा कारभार सांगितला.[२]

हरजी राजे यांच्या नेतृत्वाखाली कर्नाटकातील मराठ्यांच्या हालचाली कशा होत होत्या हे पाहण्यापूर्वी कर्नाटकातील त्यावेळची राजकीय परिस्थिती काय होती, पाळेगार कोण कोण होते हे पाहणे आवश्यक आहे. कर्नाटकात म्हैसूर, मदुरा, तंजावर, रामनाड, इक्केरी इत्यादि छोटी छोटी पाळेगारांची राज्ये होती.

**म्हैसुर**—इतर पाळेगारांच्यापेक्षा म्हैसूरच्या नायकाचे राज्य सर्वांत मोठे होते. १६७२ ते १७०४ पर्यंत म्हैसूर राज्यात चिक्कदेवराय राज्य करीत होता. त्याने आपल्या पूर्वजांचे आक्रमक धोरण अंगीकारून आपल्या राज्याचा विस्तार केला होता. हा विस्तार त्याने शेजारच्या मदुरेच्या राज्यातून केला. चिक्कदेवरायला संपूर्ण कर्नाटकात आपली सत्ता प्रस्थापित करावयाची होती. शिवाजीमहाराजांनी कर्नाटकात स्वारी केल्यामुळे त्यांचे आणि चिक्कदेवरायाचे संबंध बिघडले. एकोजीने आपली राजधानी बंगलोरहून तंजावरला हलविली. त्यामुळे बंगलोरच्या उत्तरेकडील प्रदेशात राज्यविस्तार करण्यास चिक्कदेवरायाला वाव मिळाला. त्याच्या हातात हा प्रदेश पडू देण्याची शिवाजीराजांची इच्छा नव्हती. शिवाजीमहाराजांपेक्षाही संभाजी आणि चिक्कदेवराय यांचे संबंध जास्त आले. अर्थात् ते मित्रत्वाचे नव्हते; पूर्वीप्रमाणे बिघडलेलेच होते. कुमारय्या ह्या म्हैसुरी सेनापतीने आपल्या राजाला राज्य वाढविण्याच्या कामी बरीच मदत केली होती. म्हैसूरकरांच्या आक्रमक धोरणामुळे मदुरेच्या नायकाशी व इतर पाळेगारांशी त्यांचे संबंध बिघडले होते.[३]

**मदुरा**—मदुरेच्या चोक्कनाथाला ( १६५९–१६८२ ) तंजावरच्या राजाच्या मुलीशी लग्न करावयाचे होते. या लग्नाला तंजावरच्या नायकाचा विरोध होता.

१. MMR–BM, pp 157, 159; EC

२. शिचप्र, पृष्ठ ३०–३१; Cons. Ft. St. G. 8–1–1681

३. HNM–A, 171–172

या मतभेदातून चोक्कनाथ व तंजावरचा नायक यांच्यात तंटा उपस्थित होऊन त्यांच्यात वैर निर्माण झाले. चोक्कनाथाच्या काळात मदुरेच्या राज्याचा ऱ्हास होऊ लागला. चोक्कनाथानंतर त्याचा मुलगा रंगा कृष्ण मुट्टू विरप्पा हा १६८२ मध्ये गादीवर बसला. त्याच्या राज्याचा बराचसा भाग, म्हैसूरचा राजा, संभाजी राजे, एकोजी आणि रामनाडच्या सेनापतीने जिंकला. रंगा कृष्ण मुट्टूने आपल्या राज्याचा गेलेला मुलूख परत मिळविला.[१]

**तंजावर**—मदुरेच्या चोक्कनाथाने तंजावरच्या विजय राघवाचा १६७३ मध्ये पराभव करून तेथे आपला सावत्र भाऊ आलागिरी नायक यास प्रमुख सुभेदार नेमले. १६७४ मध्ये आलागिरी नायक तंजावरच्या राज्याचा राजा झाला. त्याने राज्यात शांतता प्रस्थापित केली. स्वतःला राजा म्हणवून घेऊ लागल्याने आलागिरी नायकाला चोक्कनाथाची सहानुभूती मिळेनाशी झाली. तंजावरच्या काही जुन्या अधिकाऱ्यांना आलागिरीचे राजेपद पसंत नव्हते. त्यांनी विजापूरकरांच्या सहाय्याने पहिल्या राजास तंजावरच्या गादीवर बसविण्याचे प्रयत्न सुरू केले, म्हणून आदिलशहाने एकोजीच्या हाताखाली सैन्य धाडले. एकोजीने या भांडणाचा फायदा घेऊन तंजावरचे राज्य जिंकले. पहिल्या राजाला गादीवर बसविण्याऐवजी एकोजीने स्वतःला तंजावर आणि जिंजीचा राजा म्हणून जाहीर केले. तो लवकरच तेथील प्रजेत लोकप्रिय झाला. पहिल्या राजाच्या कारकीर्दीत झालेल्या लोकांच्या यातना एकोजीने दूर केल्या. त्याने राज्याच्या उत्पन्नातही बरीच भर घातली. मदुरेचा नायक एकोजीवर स्वारी करण्याच्या विचारात असताना शिवाजी महाराजांनी कर्नाटकवर स्वारी केली. शिवाजी महाराज परत गेल्यानंतर एकोजीने आपला गेलेला मुलूख परत मिळविण्याचा प्रयत्न केला. एकोजी तंजावरचा नायक म्हणून राहिला. वेलोरच्या भोवतालच्या प्रदेशात शिवाजी महाराजांनी आपले प्रतिनिधी ठेवले होते.[२]

**मारवाड किंवा रामनाडचे सेतुपती**—१६७४ मध्ये तिरुमलाई सेतुपतीनंतर राजा सूर्य रामनाडच्या गादीवर बसला परंतु त्याचा खून झाला. यानंतर किलाव्हानला रामनाडचा सेतुपती नायक निवडले गेले. त्याने रामनाडच्या राज्यकारभारात व्यवस्थितपणा आणला.

**इक्केरीचे नायक**—चन्नम्मा राणीचा नवरा वेडसर असल्याने तीच राज्यकारभार पाहात असे. राज्यावर होत असलेल्या आक्रमणाला तिला तोंड द्यावे लागत असे. म्हैसूरकरांविरुद्ध चन्नम्माला लढा द्यावा लागत होता.[३]

१. HNM–A. p 190, 195
२. Ibid, p 165–166, 183, 184
३. NI–KS. p 119

हे सर्व पाळेगार आपापली राज्ये टिकविण्याचा प्रयत्न करीत होते. जेव्हा जेव्हा मदुरेकरांवर म्हैसूरकरांची स्वारी होत असे त्यावेळी इतर पाळेगार मदुरेकरांना मदत करीत असत. सतत होणाऱ्या एकमेकातील लढायांमुळे या सर्व पाळेगारांच्या एकंदर राजकीय परिस्थितीत गोंधळच होता.

संभाजी राजांच्या आज्ञेवरून हरजी राजे, शामजी नाईक पुंडे, जैताजी काटकर आणि दादाजी काकडे हे सैन्यासह दि. ११ मार्च ते ८ एप्रिल १६८१ च्या दरम्यान कर्नाटकात निघाले.[१] ही सर्व मंडळी जुलै महिन्यापूर्वी बालापूरमला पोहोचली. तेथून ती कोलार, मोलेव्हा, येथून तिरुमल्लाईला जाणार होती. रघुनाथ नारायण हणमंते याचा सहायक पोर्टो नोव्होचा हवालदार गोपाळ दादाजी आणि इंग्रजांचा वकील चंद्रशेखर हे हरजी व इतरांना भेटण्यासाठी मोलेव्होला गेले. संभाजी राजांनी शामजी नाईक पुंडे यास अटक करण्यास सांगितले असल्याचे गोपाळ दादाजीला वाटेतच समजले. संभाजी महाराजांवर झालेल्या विषप्रयोगाच्या कटात शामजीचा हात असल्याच्या संशयावरून, हरजी महाडीकने शामजीस १६८१ च्या ऑगस्टमध्ये महाराजांच्या आज्ञेवरून कैद केले.[२]

परंतु थोड्याच दिवसांत त्याला सोडलेले दिसते.[३]

व्यापारामुळे मराठ्यांचा आणि डच वखारवाल्यांचा संबंध आला होता. तेघनापट्टणहून (Teghnapatnam[४]) हरजी राजे विजापूर आणि कर्नाटकातील प्रदेश श्यामजी नाईकपासून घेण्यासाठी गेल्याची बातमी डचांना समजली. डचांनी हरजीचे स्वागत केलेले नसल्याने तो रागावला होता. त्यामुळे त्यांनी संभाजी राजांच्या प्रतिनिधीला नजराणा देऊन संभाजीराजांनाही लवकरच नजराणा पाठविण्याचे आश्वासन दिले होते. व्यापार करण्यास डच कंपनीला राजे परवानगी देतील अशी त्यांची समजूत होती.[५]

हरजी वगैरे मंडळी कर्नाटकात गेल्यापासून संभाजीराजांचा आणि म्हैसूरच्या चिक्कदेवरायाचा संबंध आला होता. स्वतः कर्नाटकात लक्ष घालवयास संभाजी राजांना वेळ नसल्यामुळे त्यांनी हरजीला कर्नाटकाचे सर्वाधिकार आणि कर्नाटकातील सर्व गडकोटांचा अधिकार सोपविला होता. राजांनी तेथील सर्व सुभेदार व इतर अधिकाऱ्यांना हरजीच्या आज्ञेत वागण्याविषयी आज्ञा केली होती.[६]

---

१. शिचप्र, पृष्ठ ३१ २. कित्ता

३. ABORI, Vol XX 1938–39, p 244

४. Teghnapatnam—म्हणजे आजचे फोर्ट सेंट डेव्हिड–ते कडलेरच्या उत्तरेस दीड मैलावर आहे. ५. DR–DR, Vol 29, p. 687

६. Gopal Dadaji to Ft. St. G. 16–9–1681, 20–9–1681

कर्नाटकातील कृष्णाजी काशी यानेही हरजीच्या आज्ञेत काम करावे म्हणून राजांनी आज्ञा केली होती.[१]

इंग्रज वखारवाल्यांनी कर्नाटकात वखार काढण्यासाठी रघुनाथ नारायण हणमंते यांच्याशी बोलणी सुरू केली होती. परंतु तो कैदेत असल्याने त्यांनी नवीन येणाऱ्या सुभेदाराशी बोलणी करण्याचे ठरविले. इंग्रजांनी आपल्या मागण्यांसंबंधी संभाजी राजांना पत्रे लिहिली होती; परंतु त्यांना त्या संबंधात काहीही उत्तरे आलेली नव्हती. हरजी महाडीक कर्नाटकात पोहोचताच त्यांना भेटण्यासाठी दि. ७ ऑगस्ट १६८१ रोजी गोपाळ दादाजी आणि इंग्रजांचा वकील चंद्रशेखर पोर्टो नोव्होहून निघाले. इंग्रजांनी हरजीला दोन मोठे नजराणे, त्याच्या बायकोस (संभाजी राजांच्या बहिणीस) मोठा नजराणा; हरजीचा पेशवा नरसो व्यंकटाद्रि आणि दिवाण कारभारी यांना नजराणे देण्याचे ठरविले होते.[२]

१६८० च्या अखेरीस अटक केलेल्या रघुनाथ नारायण हणमंते यास, १६८२ मध्ये कैदेतून मुक्त करण्यात आले. त्यांनी संभाजी राजांना भेटीस येतो म्हणून पत्र पाठविले होते. संभाजी राजे व रघुनाथ हणमंते यांची भेट १६८२ च्या अखेरीस झाली.[३] या भेटीचा वृत्तांत मल्हार रामराव चिटणीसांचे बखरीत पुढीलप्रमाणे दिलेला आहे. "चंजीचे रघुनाथ पंतांनीं भेटीस येतो म्हणून लिहून पाठवून पांच हजार स्वार व दहा हजार पायदळ बरोबर घेऊन दर्शनास आले. समागमें तीस चाळीस लाख होन तिकडील रसद घेऊन आले. बिरवाडीस नदी-किनारा मांडव घालून भेटी समारंभ करून जाल्या. महाराजांस मेजवानी पंतांनीं केली. सरकारकून वगैरे यांचे बहुमान केले, व महाराजांनी [ ही ] पंतांचा बहुमान केला. त्याजवरि जनार्दनपंत व निळो मोरेश्वर प्रधान व आबाजी सोनदेव, प्रल्हाद निराजी व उमाजीपंत, संक्राजीपंत व त्रिंबकजी खासनवीस व रूपाजी भोसले व हंबीरराव मोहिते सेनापती व नेतोजी पालकर व शिर्के, महाडीक व आणखी कित्येक लोक मजालसीत बसले असतां रघुनाथपंतांनी महाराजांस विचारले की, 'राज्य दिवसेंदिवस वृद्धी व्हावी तें कमीच होत चाललें, याचें कारण काय? हबशी वगैरे पुंड पाळेगार बळावत चालले हे काय? लोक बेदिल, कित्येक ब्राह्मण वगैरे सरदार लोक हे अन्यायी तरि त्यांस बेड्या घालून किल्ल्यावर ठेवून मारावें ते शिरच्छेद करून, कर्ते मारिले. असो. पुढे सबळ शत्रू औरंगजेब येऊन भिडला, याचा विचार काय केला आहे? महाराज कैलासवासी होऊन बहुत दिवस जाहले नाहींत तो प्रांत उजाड जाले व पाळेगार बळाविले. महाराज कांहीं घेऊन गेले

१. ऐसंसा. खंड ६ ले: १–२

२. Cons, at Ft. St. G, 8–1–1681

३. मराचिब, पृष्ठ ३०–३२

नाहीत. ' ऐसा पंतांनी प्रश्न केला असतां महाराजांस हितावह वाटावें तें न घडलें. वाईटच वाटून, ' राज्याचा खर्च वाढला आहे,' इतकेंच उत्तर केलें. मजालस जाहलियावरि आपलें बोलणें महाराजांस वाईट वाटलें, हें पंतांस समजलियावरि व दिवसेंदिवस एक प्रकारची रीत व कबजीचें प्राबल्य, त्यास राजे परमवश व लाहान माणसें जवळ बोलाविलीं, महाराजांस त्यांची बोलणीं व करणी हितकर वाटतात, आपण आलों असतां पुढील राज्यभार अथवा मसलत [ यांजबद्दल ] कांहीं एक विचार नाही. "[1] चिटणीस बखरींत रघुनाथ पंडिताच्या तोंडी वरील उद्‌गार घातलेले असले तरी प्रत्यक्षात १६८२ पर्यंत राज्याचा कोणताच भाग शत्रूच्या हातात पडलेला नव्हता. मराठे यशस्वीरीतीने मुघलसैन्यास तोंड देत होते आणि लढायांमुळे खर्च पुष्कळच वाढलेला होता.

या भेटीनंतर म्हणजे १६८२ अखेरीस संभाजीराजांनी रघुनाथपंतास मुजुमदार पद दिले. परंतु पुढे चार पाच महिन्यांतच दि. ४–५–१६८३ रोजी ते वलग़ी येथे मृत्यू पावले.[2] नंतर त्याचा मुलगा तिमाजी यास मुजुमदार केले.[3]

हरजी महाडीक जिंजीला पोहोचताच त्याने आपल्या हालचालींना सुरुवात केली. हरजीने म्हैसूरकरांशी असलेले पूर्वीचेच धोरण चालू ठेवले. पाळेगारांच्या आपापसातील दुहीचा त्याने पूर्ण फायदा घेण्याचे ठरविले. म्हैसूरच्या नायकाचा सेनापती कुमारय्या याने मदुरेच्या चोक्कनाथाच्या राजधानीत त्रिचनापल्लीच्या किल्ल्यास वेढा दिला. यामुळे गोंधळून गेलेल्या चोक्कनाथाने हरजी आणि एकोजी यांना मदतीसाठी बोलाविले. मारवाडच्या सेतुपतीने चोक्कनाथाच्या मदतीसाठी सैन्य पाठविले; परंतु त्या सैन्याने मदत करण्याऐवजी मिळेल तेवढी लूट केली. एकोजी व हरजी महाडीक यांनी आपण चोक्कनाथाच्या मदतीस आलो आहो असे भासविले, पण प्रत्यक्षात म्हैसूरकरांना मदुरेच्या राज्यातून त्यांना हुसकावून द्यावयाचे होते. मराठ्यांनी म्हैसूरचा सेनापती कुमारय्या याला हुसकावून देऊन मदुरेच्या राज्यातील बराच मुलूख काबीज केला. कुमारय्याला मराठ्यांबरोबर लढणे कठिण जात असल्याने त्याने चोक्कनाथाबरोबर बोलणी सुरू केली. त्या दोघांच्यात तह होऊन एकोजी व हरजी यांना मदुरेच्या हद्दीतून हाकलून देण्याचे ठरले. परंतु चोक्कनाथाचा कुमारय्यावर विश्वास नसल्यामुळे हा तह अमलात येऊ शकला नाही. चोक्कनाथ तहास तयार होत नाही हे लक्षात येताच कुमारय्याने हरजी राजांना पैशाचे आमिष दाखवून त्यांना जिंजीला परत जाण्याची विनंती केली. म्हैसूरच्या नायकाकडून मदत येईपर्यंत कुमारय्याने मराठ्यांशी बोलणी सुरू

१. मराचिब, पृष्ठ १५ व १६

२. शिचप्र, पृष्ठ ३२

३. इऐति, भाग ५ वा, पृष्ठ ४१

केली होती. परंतु प्रत्यक्ष मदत न आल्याने कुमारय्याला माघार घ्यावी लागली. माघार घेत असताना कुमारय्या मराठ्यांच्या हाती सापडला. त्यावेळच्या लढाईची त्रोटक माहिती जेधे शकावलीत आढळते, ती पुढे दिली आहे. "चैत्र शके १६०४, मार्च-एप्रिल १६८२; कर्नाटकात श्रीरंगपट्टणकर व हरजी महाडीक, जइतजी काटकर, दादाजी काकडे हे त्रिचनापल्लीस मदतीस गेले. २००० घोडी पाडाव झाली. श्रीरंगपट्टणकरांचा सरदार कुमार हाही पाडाव झाला."[१]

कुमारय्यासारख्या शूर सेनापतीच्या पराभवाचा फायदा घेऊन हरजी महाडीकने म्हैसूरकरांना त्रिचनापल्लीहून आणि मदुरेच्या हद्दीतून हाकलून दिले. मदुरेच्या नायकाकडून म्हैसूरकरांनी घेतलेले सर्व गड मराठ्यांनी जिंकून घेतले. या प्रगतीमुळे हरजीराजे दूरच्या प्रदेशात कारभार करण्यास किती योग्य आहेत हे संभाजीराजांच्या ध्यानात आल्यावाचून राहिले नाही. हरजीला कर्नाटकात पाठविण्याचा संभाजीमहाराजांचा निर्णय योग्य ठरला होता.

कुमारय्या आणि हरजी हे दोघेही कुशल सेनानी होते. आपणच युद्धकलेत निष्णात आहो असा कुमारय्याचा समज होता. परंतु हरजीने रणक्षेत्रावर आपलेही श्रेष्ठत्व सिद्ध केले होते. दोघेही युद्धकलानिपुण असले तरी दोघांचे स्वभाव मात्र वेगळे होते. हरजीला प्रतिभाशाली व्यक्तिमत्त्व असल्याने दूरवर पसरलेल्या सैन्यावर त्याचा ताबा राहात असे. शत्रूचे डावपेच पाहून हरजी आपल्या डावपेचात लवकर जरूर ते बदल करीत असे. थोडाही विलंब युद्धात घातकी ठरतो हे जाणीत असे. म्हैसूरच्या सैन्यातील शैथिल्य लक्षात येताच हरजी त्यांच्यावर चारही बाजूंनी तुटून पडत असे. सुसज्ज सैन्य आणि पुरेसा पुरवठा या गोष्टींचा त्याला फायदा झाला; तसा कुमारय्याला मिळाला नाही. चिक्कदेवरायाच्या सांगण्यावरून कुमारय्याने सैन्याची मोठी तुकडी म्हैसूरला धाडली; त्यामुळे उरलेले सैन्य हरजीच्या आणि इतर पाळेगारांच्या सैन्याबरोबर लढा देण्यास पुरेसे नव्हते. कुमारय्याने कुमक मागविण्यासाठी जी पत्रे धाडली ती मराठ्यांच्या हाती सापडल्यामुळे म्हैसूरकरांची लंगडी बाजू मराठ्यांच्या ध्यानात आली, आणि मराठ्यांच्या हल्ल्याने कुमारय्याचा पराभव झाला. तो मराठ्यांच्या हातात सापडला. डॉ. मुद्दाचारी यांनी युद्धकौशल्याबद्दल हरजीचे कौतुक केले असले तरी ते संभाजीराजांशी राजनिष्ठ नव्हते असे मत व्यक्त केले आहे. परंतु ते योग्य वाटत नाही. हरजी तेथे सर्वाधिकार गाजवीत असल्याने त्यांचा असा गैरसमज झालेला दिसतो.

त्रिचनापल्लीच्या यशामुळे हरजीची सत्ता पूर्व कर्नाटकात इतकी वाढली की तो तेथे सर्वसत्ताधीश झालेला होता. सर जदुनाथ यांनी यासंबंधात पुढील मत व्यक्त केलेले आहे. " The Maratha Kings absorption in vice, the baneful predomi-

१. शिचप्र, पृष्ठ ३१–३२

nance of the favourite Kavikalash in his council, the consequent disorder in the kingdom, the increasing Mughal pressure on Maharashtra under the personal direction of Aurangzeb all tended to extinguish Sambhaji's authority in the faroff province of Jinji and make a loyal Viceroy his own master. Further, Harji proved disloyal to his master. He declared that he was a king. He assumed the title of Maharaj. He gave up the practice of submitting the annual accounts of the revenue to his Soverign at Raigarh."

आपण आतापर्यंत पाहिलेल्या संभाजीमहाराजांच्या सतत चाललेल्या हालचालीं-वरून त्यांना व्यसनाधीनतेत वेळ घालवावयास संधी होती किंवा ते बेजबाबदारपणे वागत होते असेही दिसत नाही. कवि कलश याच्यासंबंधीची उपलब्ध माहिती विस्तृत रीतीने 'राज्यकारभार' या प्रकरणात दिलेली आहे.

डॉ. मुद्दाचारी यांनी कन्नड साधने, शिलालेख आणि जेझुइट धर्मप्रसार-कांच्या बातमीपत्रांवरून संभाजीराजांनी कर्नाटकात दोनदा स्वारी केली होती असे मत त्यांनी व्यक्त केले आहे. इतर आघाड्यांवरील स्वाऱ्यांप्रमाणेच त्यांच्या या स्वाऱ्याही गौरवास्पद मानल्या पाहिजेत. संभाजीराजांनी आपला अधिकार कर्नाटकात प्रस्थापित केल्याने तेथील प्रजा त्यांच्या वर्चस्वाखाली जाण्याचा संभव असल्याचे मत फोर्ट सेंट जॉर्जच्या इंग्रजांनी व्यक्त केले होते.[१] संभाजीराजांना उत्तरेतील मुघलांविरुद्ध दक्षिणेतील सत्ताधीशांच्या बरोबर एक फळी उभी करावयाची होती.[२] म्हैसूरकरांनी मारवाडांच्या साहाय्याने मदुरेच्या राज्यातील काही गड जिंकले होते. म्हैसूरकरांनी मदुरेच्या त्रिचनापल्ली या राजधानीपर्यंत केलेल्या प्रगतीने मराठ्यांना धास्ती निर्माण झालेली होती. म्हैसूरच्या चिक्कदेवरायाने त्रिचनापल्ली घेतली असती तर मराठ्यांच्या ताब्या-तील जिंजी, तंजावर इत्यादी प्रदेशांना धोका निर्माण झाला असता. म्हैसूरकरांच्या आक्रमक धोरणामुळे संभाजीराजांनी म्हैसूर राज्यात स्वारी करण्याचे ठरविले.

संभाजी राजांना चिक्कदेवरायाच्या सामर्थ्याची जाणीव असल्याने कर्नाट-काच्या स्वारीवर जाण्यापूर्वी इक्केरीचा नायक आणि गोवळकोंड्याच्या सुलतानाशी त्यांनी तह केला होता.[३] या दोघांचे आर्थिक आणि सैनिकी सहकार्य मिळवून संभाजी राजांनी म्हैसूर राज्यावर स्वारी केली. चिकमंगळूरच्या ईशान्येला

१. Ft. St. G., 10–12–1681

२. शिचसा, खंड २, लेख ३९४

३. HNM–A, p 290; शिचवृसं, खंड १, अप्रतिम वीरचरितम्, पृष्ठ ३२

आणि चिकनहळ्ळीच्या पश्चिमेस असलेल्या बाणावर येथे राजांनी तळ ठोकला.[1] अनपेक्षितरीतीने आलेल्या मराठ्यांच्या सैन्यामुळे चिक्कदेवरायला आश्चर्य वाटले. जून १६८२ च्या सुमारास संभाजी आणि चिक्कदेवराय यांच्यात मोठे युद्ध झाले. चिक्कदेवराय मराठ्यांच्या सैन्यावर तुटून पडला. या लढाईसंबंधी अप्रतिम वीरचरितम् मध्ये म्हटले आहे , "या मनुजरूपी उपेन्द्राने (विष्णूने) बाणपुरामध्ये सामना द्यावयास आलेले शुंबू व बसव यांचा मद उतरविला. सिंहाला पाहून जंगलातील इतर जनावरे भयभीत होतात, बहिरी ससाण्याला पाहून इतर पक्षी घाबरतात, वाघाला पाहून ससे घाबरतात, त्याप्रमाणे संभाजी, शहा व बसप्पा इक्केरीचा नाईक हे नरसिंहाप्रमाणे दिसणाऱ्या चिक्कदेवरायाला पाहून भयभीत झाले.[2] चिक्कदेवरायच्या विजयावर रचलेल्या या काव्यमय भाषेत वस्तुस्थितीचे चित्रण दिसत नाही. औरंगजेबासारख्या बलाढ्य शत्रूपुढेही जो सिंहाचा छावा घाबरला नाही तो एखाद्या पराभवामुळे चिक्कदेवरायपुढे इतका भयभीत झाला असेल असे मानण्याचे कारण नाही. श्रीरंगपट्टणच्या शिलालेखात संभाजी, कुत्बशहा आणि बसप्पाच्या या पराभवाचा उल्लेख आहे.

एकोजी संभाजी राजांच्या मदतीसाठी बाणावर येथे गेला; पण चिक्कदेवरायाने त्याचाही पराभव केला. त्यामुळे बाणावर ही म्हैसूर आणि वेदनूरमधील हद्द ठरली. कर्नाटकात चिक्कदेवरायाचे वजन वाढून म्हैसूरकर आणि मराठे यांचे पूर्वापार बिघडलेले संबंध सुधारण्याची आशा दुरावली.[3]

संभाजी राजांनी बाणावर येथे पराभव झाल्यावर म्हैसूरकरांना मदुरेच्या राज्यातून पूर्णपणे हटविण्याचे ठरविले. युद्धाचा तळ बाणावर येथून त्रिचनापल्लीला हलविण्यात आला. हरजी राजांच्या साहाय्यानेच हे धोरण आखण्यात आले. तंजावर-जिंजी या मराठ्यांच्या प्रमुख केंद्रांतूनच संभाजी राजांना साहाय्याची अपेक्षा होती. या चढाईत बसप्पा नाईक आणि कुत्बशहा यांनी मदत केली. कुमारय्याचा पराभव केल्यानंतर हरजी महाडीकनेही म्हैसूरकरांना मदुरेच्या राज्यातून हाकलून देण्याचे ठरविले होते. त्याने मदुरेच्या नायकाकडून पैशाची व सैन्याची मदत मिळविण्यासाठी त्याला गेलेले राज्य परत मिळवून देण्याचे कबूल केले. हरजीने आपले वचन न पाळताच म्हैसूरकरांना मदुरेच्या राज्यातून हाकलून देण्याचा सपाटा लावला. हरजीने जिंकलेला मुलूख आता संभाजी राजांच्या ताब्यात होता. मदुरेच्या राज्यातील मदुरा आणि काही गड अद्यापही म्हैसूरकरांच्या ताब्यात होते. त्यांना मारवाडांचे साहाय्य होते. मदुरेच्या नायकाची

१. EC-III, Sr 14, p 36
२. शिचवृ, खंड १, पृष्ठ ३२
३. MMR–BM, p 102

यावेळी शोचनीय स्थिती झालेली होती. त्याच्याच सैन्याने त्याचा राज्यातील प्रदेशावरचा, त्याच्या उत्पन्नावरचा आणि संपत्तीवरचा हक्क हिरावून घेतला होता. दुसरीकडे संभाजीराजांनी त्रिचनापल्लीला निकराने वेढा घातला होता. चिक्कदेवरायाने पूर्वी घातलेल्या वेढ्यापेक्षा हा वेढा जोरदार होता. अखेर निराश होऊन दुःखाने मदुरेचा नायक चोक्कनाथ मरण पावला. त्याच्यावर प्रजेचे प्रेम आणि विश्वास नसल्याने प्रजेवर त्याच्या मृत्यूचा काहीच परिणाम झाला नाही. या क्रूर राजाच्या हातातील सत्ता दुसऱ्या राजाच्या हातात गेल्याने उलट त्यांना आनंदच झाला.[१]

यानंतर संभाजीराजांनी तेघनापट्टण व पोर्टो नोव्हो ही शहरे जिंकून घेतल्यामुळे तेथील डच व्यापाराचे नुकसान झाले होते. या लढाईपूर्वी तेथे बराच माल विकला जात असे. आता व्यापार खूपच घटला होता. या लढाईत एकोजीने, मदुरेच्या आणि ट्यूव्हर्सच्या ( Teuverse ? ) लोकांनी संभाजी राजांना साहाय्य दिले होते.[२]

संभाजी, एकोजी आणि हरजी यांच्या हालचालीमुळे दक्षिणेत म्हैसूरकरांपुढे नवे प्रश्न उभे राहिले. चिक्कदेवरायाला कोणी मित्र राहिलेला नव्हता. चोक्कनाथाच्या मरणानंतर मदुरेच्या गादीवर आलेला मुट्टू विरप्पा नायक हा दुर्बल असून मराठ्यांच्या हातातील बाहुले बनल्यामुळे, चिक्कदेवरायला त्याच्या मदतीवर अवलंबून राहता येईना. याच्या उलट संभाजी राजांच्या बाजूला बसप्पा नायक, कुत्बशहा, हरजी आणि एकोजी यांच्यामुळे बळकटी आली होती. या परिस्थितीत चिक्कदेवरायला औरंगजेबाची मदत मागण्यावाचून गत्यंतर नव्हते.

मुघलांची मदत येईपर्यंत त्याला एकट्यालाच कठीण परिस्थितीला तोंड द्यावे लागले. संभाजीराजांनी म्हैसूरकरांची पाठ सोडली नाही. मदुरेच्या आजूबाजूच्या प्रदेशात चढाई चालू असताना मराठ्यांनी उत्तरेच्या प्रदेशातही हल्ले करून काही गड घेतले. धर्मपुरीच्या भोवतालचा प्रदेशही मराठ्यांनी हस्तगत केला. या सर्व हालचालींमुळे मदुरेचे फारच थोडे राज्य शिल्लक होते. मदुरेच्या नायकाजवळ सैन्यशक्तीही नव्हती. म्हैसूरकर, मारवाड, संभाजी, एकोजी यांच्यात मदुरेचे राज्य विभागले गेले होते. मदुरेच्या राज्यातील म्हैसूरकरांची सत्ता जवळ जवळ नाहीशी झाली होती. चिक्कदेवरायाला स्वतःच्याच राज्यात मराठ्यांच्या सैन्याविरुद्ध लढावे लागल्याने मदुरेच्या राज्यात त्याला कुमक पाठविता येईना. मराठ्यांविरुद्ध टिकाव

१. HNM–A, p 288, 289

२. DR–DR, Vol II, p 1396

धरणे कठीण असल्यामुळे म्हैसूरकरांना माघार घ्यावी लागली. बेदनूरच्या राणीनेही या लढाईत मराठ्यांना साहाय्य दिले होते.[१]

चिक्कदेवरायाने संभाजी राजांशी तहाची बोलणी सुरू करून मराठ्यांना खंडणी देण्याचे कबूल केले. १६८३ च्या सुरुवातीस राजे महाराष्ट्रात परत गेले.[२] मराठी साधनात या स्वारीची माहिती मिळत नसल्याने डॉ. मुद्दाचारी यांची विधाने सर्वस्वी ग्राह्य धरता येत नाहीत.

राजे परत फिरल्यामुळे चिक्कदेवरायाला थोडी शांतता मिळाली. अशा प्रकारचा ताण त्याला अनेक वर्षांत पडला नव्हता. बाणावर येथील पराभवाचा वचपा शंभूराजांनी त्रिचनापल्लीच्या लढाईत काढला. या लढायांमुळे आणि राजांनी म्हैसूरकरांकडून खंडणी मागितल्यामुळे दोघांचे संबंध अधिकच बिघडले.

गोवळकोंडेकर आणि विजापूरकर यांनी संभाजी राजांना खंडणी देऊन, नजराणे पाठवून त्यांचा मोठेपणा वाढविला होता. त्यामुळे रागावून चिक्कदेवरायाने मुघलांची मदत मागितली. पेशकश घेऊन म्हैसूरचा वकील मुघल दरबारात गेला. दि. १७-४-१६८४ रोजी औरंगजेबाने सुजायतखानाला श्रीरंगपट्टण येथे पाठवून म्हैसूरच्या नायकास साहाय्य दिले.[३] ही मदत येण्यापूर्वी म्हैसूरकर व मराठे यांच्यात लढाईचे आणि एकमेकांच्या प्रदेशात जाऊन लूटमार करण्याचे प्रकार चालूच होते.

म्हैसूरच्या नायकांनी मागितलेली मुघलांची मदत ऑगस्ट १६८४ मध्ये म्हैसूरमध्ये पोहोचली. मुघल व म्हैसूर यांच्या जोड सैन्याला तोंड देण्यासाठी मराठ्यांचे प्रयत्न चालूच होते.[४] १६८४ च्या एप्रिल महिन्याच्या अखेरीस मराठ्यांनी धर्मपुरीला जो वेढा घातला होता त्याची माहिती 'अप्रतिम वीरचरितम्' मध्ये दिली आहे. ही माहिती जेझुईट पत्रातील हकीकतींच्या सर्वस्वी उलट आहे.

म्हैसूरचा राजा चिक्कदेवराय (१६७२-१७०४) याच्या पदरी तिरुमलार्य हा कवी होता. त्याने 'अप्रतिम वीरचरितम्' हा ग्रंथ लिहिला. यात चिक्कदेवरायाच्या पराक्रमाचे गुणवर्णन केलेले आहे. मराठ्यांनी म्हैसूर राज्यातील मुलूख पादाक्रांत केल्यामुळे साहजिकच राजा चिक्कदेवराय आणि त्याच्या स्तुतिपाठकांचा मराठ्यांवर राग होता. हा राग वरील ग्रंथात निदर्शनास येतो. हरजी राजे, दादाजी काकडे, जैताजी काटकर यांच्या संबंधी आणि धर्मपुरीच्या वेढ्यासंबंधी यात माहिती आढळते. 'अप्रतिम वीरचरितम्' मध्ये म्हटले आहे, "...या

१. HNM–A, p 94, 290, 291
२. MMR–BM; Cuda to Ft. St. G. 14–11–1683
३. MA–JS, p 148
४. Ft. St. G. to Lon 28–8–1684

चिकदेव राजाच्या अवतारामध्ये आपणास एक नरपति असे मानून चालले तरी दानववंशात जन्म घेतलेले जैताजी, दादाजी, हरजी, शहाजी, शंभूजी इत्यादि मराठ्यांचे समूळ उत्पाटन केलेले अवलोकन केले असता आपण साक्षात तो नारायणच आहात हे व्यक्त होते. ”

“ चला, चिकदेवाच्या चरणी वंदन करावयास तुम्ही जात असाल तर मी तुमच्या आड येणार नाहीं. पण त्याच्याशी दोन हात करण्यास जात असाल तर मीही तुमच्याबरोबर येते ” असे जैताजीची पत्नी तो बाहेर निघाला असता त्यास बोलती झाली. येथे तुम्ही त्याच्याबरोबर संग्रामास जाऊ नका हा निषेधरूपी आशय तुम्ही जाऊन या अशी संमती सुचवून, पण युद्ध कराल तर मी अनुगमन करीन असे बोलून व्यक्त केला आहे.

“ हे अप्रतिम, तुझे खंदे वीर धर्मपुरीमध्ये निकराने झुंजत असता दुष्टबुद्धीचे ते मराठे दक्षिणेच्या धर्मपुरी प्रांतांत घुसले. ” याचे पुढे स्पष्टीकरण केलेले आहे ते असे :—

“ हरजी, दादाजी, जैताजी आदि मराठे पूर्वेच्या प्रदेशातल्या धर्मपुरी नावाच्या किल्ल्यास आठ महिनेपर्यंत वेढा देऊन मोर्चे व कुंपण बांधीत असता, तेथील महिशूरच्या शूर सैनिकांनी बाहेर पडून ते मोर्चे व कुंपण उखडून टाकले. या कारणाने संताप पावलेले मराठे त्या किल्ल्यावर हल्ला चढवून तो हस्तगत करावा अशा इराद्याने दक्षिणेच्या प्रदेशांत असलेल्या धर्मपुरी नावाच्या संयमिनी पट्टणाकडे चाल करून गेले.

“ .. या गर्वामुळे फुगून शंभोजी ताडकन् कन्नड देशांत घुसला. तेव्हा चिकदेवरायाने युद्धात त्याला हतबल केलें, त्याचा सेनापति जैतजी काटकर यांस घोड्याच्या टांचाखाली खूप तुडविलें. त्याचे नाक, कान, मान, हात, पाय तोडून त्या तुकड्यांनी भूतप्रेतांना संतुष्ट केले. तसेच दादाजी काकडे याचा गळा चिरून, त्याच्या ओल्या शिराची मिरवणूक काढली. पुढे त्याने आवेशाने शंभोजी यास भीतीच्या समुद्रात बुडविले. त्याच्या सहायार्थ आलेल्या एक्कोजीला जन्म नको नकोसा केला. त्याचा महाप्रधान असा जो एसवंतराव त्याचे नाक कापले.

त्यानंतर गोलकोंडेकरांनी व विजयापुरकरांनी शंभोजीला खंडणी देऊन व नजराणा पाठवून त्याचा मोठेपणा वाढविला. यास्तव चिकदेवराय त्यांच्यावर रुष्ट झाला. [१] ”

अशाच प्रकारे अतिशयोक्तिपर वर्णन ‘ बिन्नपम् ’ नावाच्या काव्यातही केलेले आहे.

---

१. शिचवृसं खंड १, पृष्ठ २९, ३२

म्हैसूर आणि मराठे यांच्यातील लढाई केव्हा झाली, दादाजी काकडे व इतर मराठे कधी व कोणत्या लढाईत जखमी झाले, ती केव्हा संपले हे दि. १८–१२–१६८४च्या अखबारावरून समजू शकते.

संभाजी राजांचा सरदार दादाजी काकडे ३००० स्वार व २००० पायदळ यासह मराठ्यांच्या कर्नाटकातील मुलुखातील मन्तोरच्या[१] किल्ल्यात ठाण मांडून होता. ही बातमी कळताच श्रीरंगपट्टणचा जमीनदार जगदेवराव याने आपल्या एका सरदाराला ७००० स्वार आणि १५००० पायदळ देऊन मराठ्यांचा मुकाबला करण्यासाठी रवाना केले. या व मराठ्यांच्या सैन्यात लढाई झाली. दादाजी काकडे, त्याचा मुलगा, आणि भाऊ भिमाजी यांना मुघल सैन्याने जिवंत पकडले. तिमाजी जखमी झाला, १००० माणसे मेली आणि पुष्कळ जखमी झाली. मुघल नि म्हैसूरकर यांच्या हाती १००० घोडे घोड्या, हत्यारे, छत्र्या वगैरे लूट मिळाली. मन्तोर हा किल्ला मुघलांनी जिंकला.[२]

## संभाजीराजांची कर्नाटकातील दुसरी स्वारी :

१६८३ साली झालेला तह चिक्कदेवरायाने पाळला नव्हता, खंडणीही दिली नव्हती. संभाजी, विजापूरकर आणि गोवळकोंड्याचे सुलतान औरंगजेबाविरुद्ध एकत्र येऊन लढत होते, तेव्हा इतर पाळेगारांबरोबर चिक्कदेवराय या गटात सामील झाला नव्हता. तटस्थ न राहता त्याने औरंगजेबाला विजापूरच्या लढाईत सर्व प्रकाराने साहाय्य दिले होते. त्यामुळे म्हैसूर राज्यातील अनेक गडांवर पुरेशी शिबंदी नव्हती. म्हैसूरकरांची मदुरेतील सत्ता कमी झाली होतीच. सत्तेखाली असलेले अनेक छोटे पाळेगार त्याच्या विरुद्ध उठले.

या सर्व गोष्टींचा विचार करून संभाजी राजांनी १६८६ मध्ये म्हैसूर राज्यात स्वारी केली असे डॉ. मुद्दाचारी म्हणतात. विजापूर आणि गोवळकोंड्याची राज्ये जिंकून घेण्यात औरंगजेब गुंतलेला असताना संभाजीराजे काय करीत होते असा प्रश्न अनेक इतिहासकारांना पडतो. डॉ. मुद्दाचारी यांचे वरील विधान मान्य केले तर त्या काळात राजे म्हैसूर राज्यातील लढाईत गुंतलेले होते असे म्हणता येईल. या स्वारीत मोरस, तिगुड ( तामीळ ), कोडग व मलेय येथील नायकांनी संभाजीराजांना मदत केली.[३] या नायकांना संभाजीराजांनी मानमरातब देण्याचे आमिष दाखवून त्यांना घेऊन संभाजीराजांनी म्हैसूर राज्याचे केंद्रस्थान-श्रीरंगपट्टण-

१. श्रीरंगपट्टणच्या ईशान्येस असलेला मड्डूर किल्ला असावा.

२. अख : १८–१२–१६८४

३. शिचवृसं, खंड १, पृष्ठ ३०; HNM–A, p 292


वर हल्ला केला. मोरस, तिगुड, कोडग, मलेय या प्रांतांच्या नायकांनी मराठ्यांच्या शौर्यावर भिस्त ठेवून दोन्ही बाजूंनी चिक्कदेवरायला त्रास दिला.[१] या लढाईमुळे चिक्कदेवराय आर्थिक मदत मिळविण्यासाठी त्याच्या राज्याच्या पूर्वेकडील प्रांतात जाऊन राहिला. त्याने तेथील प्रजाजनांकडून बळजबरीने जबर खंडणी घेण्यास सुरुवात केली. त्यामुळे चिडून त्याचे मंत्री आणि प्रजेने चिक्कदेवरायविरुद्ध बंड केले. या लोकांनी विष्णू आणि शैव पंथाच्या दोन ब्राह्मणांना प्रमुख नेमून सैन्याच्या दोन मोठ्या तुकड्या केल्या. एका तुकडीने खुद्द म्हैसूरलाच वेढा देऊन चिक्कदेवरायाला वेढले. दुसऱ्या तुकडीने सत्यमंगलमूवर हल्ला केला.[२] त्यामुळे चिक्कदेवरायने मदुरेच्या किल्ल्यातील सैन्य परत बोलाविले. परंतु मराठ्यांनी त्यांच्यावर हल्ले केले. संभाजी राजांच्या चढाईमुळे चिक्कदेवरायला मदुरेत अडकलेल्या सैन्याला मदत पाठविता आली नाही; तरीही त्याने काही संन्याशांच्या करवी त्यांना १०,००० पागोडे धाडले. मारवाडांनी चिक्कदेवरायला मदत दिल्याने मराठ्यांना जय मिळणे कठीण झाले,[३] आणि मुदरेत अडकलेले सैन्य त्याच्या मदतीस आले.

श्रीरंगपट्टणचा वेढा चालू असतानाच मराठ्यांनी म्हैसूर राज्यातील प्रदेश लुटला. या संबंधात एडवर्ड स्कॉट वॉरींग लिहितो, "Sambhaji, in 1686, was engaged against the forts and districts belonging to Bijapur Government in the Karntik" औरंगजेब विजापूर जिंकून घेणार असे दिसताच संभाजीराजांनी विजापूर राज्यातील गड घेण्यास सुरुवात करून चिक्कदेवराय आणि औरंगजेबावर आघाडी मारली.

औरंगजेब पन्हाळ्याला वेढा देईल म्हणून संभाजी राजे घाईने कर्नाटक सोडून पुण्यास गेले. या युद्धाचा परिणाम म्हणजे एकोजीला बंगलोर–चिक्कदेवरायला द्यावे लागले. चिक्कदेवराय आणि संभाजी यांचे संबंध चांगले असते तर, आणि त्याने शिवाजी–संभाजी यांची मैत्री संपादिली असती तर मुघलांच्या दक्षिणेतील सत्तेला आळा बसला असता. या लढाईने कोणाचाच फायदा न होता औरंगजेबाचे मात्र फावले.[४] डॉ. मुद्दाचारी यांनी दिलेली संभाजीराजांच्या दुसऱ्या स्वारीची माहिती मराठी साधनात उपलब्ध नाही हे त्यांचेवरील विवेचन वाचताना ध्यानात ठेवले पाहिजे.

कर्नाटकात १६८६ नंतर हरजी महाडिकला मुघलांविरुद्ध लढा द्यावा लागला. मुघलांचे सैन्य कर्नाटकात उतरणार अशी बरेच दिवस बातमी पसरलेली होती. हे सैन्य येत आहे असे दिसताच मदुरेचे व म्हैसूरचे नायक हरजीला

१. कित्ता, खंड १, पृष्ठ २९
२. HNM–A, p 292
३. Ibid, p 294
४. MMR–BM




कर्नाटकातील काही हालचाली

विरोध करू लागले. हरजी महाडिकचा मुक्काम कुडालूरपासून एका मैलावर होता. तेथून जवळच असलेल्या एका कोटाच्या किल्लेदाराला गड देण्याविषयी हरजीने विनंती केली. परंतु किल्लेदाराने हरजीची विनंती अमान्य केली. हरजी राजाने तेथेच तळ ठोकला, आणि पुलिकतला पुढे पाठविलेले सामान आपल्या मेव्हण्याच्या ताब्यात असलेल्या किल्ल्यात घेण्याविषयी आणि तळ ठोकण्यासाठी विनंती केली. सुभेदाराने हे मान्य केले परंतु तेथील लष्कराने विरोध दर्शविला. हरजीने त्यास स्वारी करण्याची धमकी दिली.[१]

मुघलांनी गोवळकोंड्याचे राज्य जिंकल्यानंतर त्यांचे सैन्य कर्नाटकात उतरू लागले तेव्हा मराठ्यांनी उत्तर अर्काटच्या प्रदेशात स्वारी केली होती. १६८७ च्या सुरुवातीस कावेरी पाक आणि चेटपॅट या किल्ल्यांना मराठ्यांनी वेढे दिले. त्यामुळे या प्रदेशात घबराटीचे व दहशतीचे वातावरण निर्माण झाले होते. लोक सुरक्षिततेसाठी जागा शोधू लागले. पाळेगारांच्या राज्यात एकूण गोंधळच होता. मराठ्यांनी याचा पुरेपूर फायदा घेऊन अनेक गड व शहरे हस्तगत केली. त्यांना कोणीही विरोध करू शकत नव्हते.[२]

मुघलांचे सैन्य कर्नाटकात उतरताच हरजी महाडिकने कांजीवरम् येथे असलेल्या गोपाळ दादाजी आणि विठ्ठल पल्लीरावला मुघलांचा बंदोबस्त करण्यास रवाना केले. त्याच्या आज्ञेनुसार त्या दोघांनी मुघलांचा पाठलाग करून, त्यांना पळवून लावले; दादाजी आणि विठ्ठल पल्लीराव यांनी आपले अधिकारी चेनापट्टम येथे पाठवून त्याभोवतालचा प्रदेश त्यांना घेण्यास सांगितले.[३]

विजापूर व गोवळकोंडा औरंगजेबाच्या हाती पडल्यानंतर, तो महाराष्ट्रात आणि कर्नाटकात पुन्हा निकराचा लढा सुरू करणार हे उघड होते. संभाजीराजांना महाराष्ट्रातील स्वराज्याचा बंदोबस्त करणे आवश्यक होते. त्याचबरोबर कर्नाटकातील मराठ्यांच्या प्रदेशाचे संरक्षण करणेही तितकेच अगत्याचे होते. संभाजीराजांनी सुरुवातीपासून या दूरवरच्या प्रदेशाकडे दुर्लक्ष केलेले नव्हतेच. संभाजीराजांना तेथील परिस्थितीची जाणीव होती. मुघल आणि म्हैसूरकरांच्या विरुद्ध हरजी महाडिकला एकट्याला तोंड द्यावे लागू नये म्हणून राजांनी ऑक्टोबर–नोव्हेंबर १६८६ मध्ये केशव त्रिमल आणि संताजी घोरपडे यांना तिकडे जाण्याची आज्ञा केली. या आज्ञेनुसार ते दोघे फेब्रु. १६८७ मध्ये १२००० सैन्यासह कर्नाटकात पोहोचले.[४]

१. Cuda. Cons. 29–12–1686
२. Ft. St. G. to coni. 8/10–1–1687
३. Gopal Dadaji to Governor of chennpatam, 16–1–1686
४. शिचप्र, पृष्ठ ३३–३४, HF–RO p 155

केशव त्रिमल कर्नाटकात पोहोचताच तो स्वतः मुख्य सुभेदार आहो असे भासवू लागला. कर्नाटकात चालू असलेल्या संघर्षामुळे तेथे अस्थिरता निर्माण झाली होती. त्यातूनच वाटेल त्या अफवा उठत होत्या किंवा तर्क केले जात होते. संभाजी मेला असून रामराजा राजा झाल्यामुळे हरजी महाडिकचे दरबारातील संबंध बिघडून, तो जिंजीला जाईल तेव्हा त्याला नजरबंद करावे, अशा तऱ्हेच्या अफवा उठत होत्या. हरजी महाडिकला सर सुभेदारीवरून दूर करून केशव त्रिमल याला सरसुभेदार नेमण्यासंबंधी बऱ्याच बातम्या पसरल्या होत्या. केशव त्रिमलने गोपाळ दादाजी ऐवजी चिमाजी पंडितला सुभेदार म्हणून नेमल्याने बाजार गप्पा व अफवा उठण्यास जास्तच वाव मिळाला.[1] या तंट्यात इंग्रजांना कसे वागावे हेच समजेना. १६८४ मध्ये इंग्रज व मराठे यांच्यात तह झाला होता. १६८६ मध्ये या तहानुसार मराठ्यांना दारूगोळा देण्यासंबंधी आणि इंग्रजांनी कर्नाटकात वखारी काढण्यासंबंधी वाटाघाटी चालू होत्या. मराठ्यांशी चांगले संबंध राहावे म्हणून इंग्रज नवीन आलेल्या सुभेदाराला नजराणाही देणार होते. परंतु लवकरच त्यांच्या ध्यानात आले की, केशव त्रिमलला सर्वाधिकार दिलेले नसून, त्याने हरजीच्या आधिपत्याखाली वागावे असाच हुकूम होता. त्यामुळे काही मागण्यांसंबंधी केशव त्रिमलच्या नावाने लिहिलेले पत्र इंग्रजांनी हरजी महाडिकच्या नावाने बदलून दिले. परंतु हरजी व केशव त्रिमल मुघलांच्या प्रतिकारासाठी गेल्यामुळे त्याना इंग्रजांचे पत्र मिळण्यास विलंब झाला.[2]

**कर्नाटकातील मराठा–मुघल संघर्ष :**

गोवळकोंडा राज्य औरंगजेबाने जिंकून घेतल्यानंतर त्यातील जो भाग कर्नाटक राज्यात होता ती काबीज करण्यासाठी त्याने मुघल सैन्य रवाना केले. म्हैसूरच्या मदतीसाठी पाठविलेले सैन्य एप्रिल १६८७ च्या सुमारास कर्नाटकात पोहोचले. मुघल सैन्य कुडाप्पापासून जवळच असलेल्या चिकबाळापूरपर्यंत गेले होते. त्यांनी कोंडपिला हा महत्त्वाचा गड घेऊन मछलीपट्टम ( ? ) पर्यंत लूटमार केली होती. तुमकूर, चिकनहळ्ळी, चंद्रगिरी, पेनुगोंडा ही म्हैसूर राज्यातील शहरे त्यांनी जिंकली. ते बंगलोरपर्यंत गेले.[3]

मुघलांची प्रगती पाहून एकोजीला त्याच्या बंगलोर आणि आजूबाजूच्या प्रदेशाची काळजी वाटू लागली. त्या भागातील त्याची सत्ता कमीच होऊ लागली होती. आतापर्यंत संभाजी, एकोजी व हरजी यांचे संबंध चांगले होते. संभाजी राजे

१. Cuda to Ft. St. G. 22–3–1687
२. Cuda to Ft. St. G. 8/ 30–7–1687
३. Cons. at Ft. St. G. 29–7–1687

महाराष्ट्रात असले तरी हरजी जिंजी आणि त्याच्या भोवतालच्या प्रदेशाच्या संरक्षणासाठी जिंजीच्या आसपासच होते. मुघलांना म्हैसूरकरांची मदत असल्याने एकोजीची धास्ती जास्तच बळावली. चिक्कदेवरायपुढे आपला निभाव लागणार नाही असे त्याला वाटू लागले. बंगलोरपर्यंत मुघल सैन्य येत आहे असे कळताच एकोजीने चिक्कदेवरायबरोबर बोलणी सुरू केली. त्याने चिक्कदेवरायला तीन लाख रुपयांना बंगलोर विकण्याचे ठरविले. ही बोलणी सुरू असताच मुघल सरदार कासिमखान बंगलोरपर्यंत आला. यासंबंधात जेधे शकावलीत म्हटले आहे की, " शके १६०९ प्रभव संवछरे, आषाढ शु. १० ( म्हणजे दि. १०–७–१६८७ ) बंगळीर म्हैसुरकरी मदत आणून कासीमखानास फौजेनिसी घेतले. "[१] याचा अर्थ म्हैसूरकरांनी कासिमखानाच्या फौजेच्या मदतीने बंगलोर घेतले. चिक्कदेवरायने हरजी वगैरेंचे साहाय्य घेऊन कासिमखानास त्याच्या सैन्यासह बंगलोरमधून घालवून दिले असा याचा अर्थ होत नाही. जेधे शकावलीतील वर दिलेल्या नोंदीचा अर्थ डॉ. मुद्दाचारी आणि कै. शं. ना जोशी यांनी असा लावलेला असला तरी तो चुकीचा वाटतो. मराठे आणि म्हैसूरकरांचे संबंध शिवाजीराजांच्या काळापासून जसे बिघडलेले होते तसेच ते १६८७ मध्येही बिघडलेले होते. त्यामुळे बंगलोरच्या प्रश्नात चिक्कदेवरायने मराठ्यांना मदत केली असेल अशी शक्यता दिसत नाही.

कासिमखानाने बंगलोर घेतले त्याचवेळी हरजी आणि केशवपंत बंगलोर त्याच्या हातात पडू नये म्हणून तेथे गेले होते. तेथे जाईपर्यंत कासिमखानाने बंगलोर सर केल्याचे कळल्यामुळे ते जिंजीला परत गेले. चिक्कदेवराय आपल्याला उपयोगी पडेल हे कासिमखान जाणत होता, त्यामुळे बंगलोर घेतल्यावर ते त्याने चिक्कदेवरायला विकत दिले.[२]

इंपीरियल गॅझेटीयरमध्ये अशीच माहिती आहे.[३]

एकोजीच्या हाती पैसा न येताच बंगलोर त्याच्या ताब्यातून गेले. एकोजीने हरजीचा किंवा संभाजीराजांचा या संबंधात सल्ला घेतला नसावा. हरजीला या गोष्टीची थोडी कल्पना आली असती तर त्याचे सैन्य अगोदरच बंगलोरमध्ये येऊन बसले असते.

१. शिचप्र, पृष्ठ ३४ २. Wilks

३. " Venkoji ( Ekoji ) had agreed to sell Bangalore to the Mysore Raja for 3 lakhs of Rupees but Kasimkhan first seized it and then carried out the bargain pocketing the money himself " ( Imperial Gazetteer' " Mysore and Coorg ' p 20 )

एकोजीच्या निधन काळाबद्दल मतभेद आहेत. जेधे शकावलीत त्याच्या मृत्यूचा दिवस पौष १६०६ म्हणजे डिसेंबर, जानेवारी १६८४,८५ असा दिलेला आहे.[१] परंतु ऑर्म, विल्क्स आणि राजदप्तरात एकोजी १६८७ मध्ये मरण पावला असे नमूद केलेले आहे. डॉ. मुद्दाचारी १६८७ सालच खरे मानतात. बंगलोर हातचे जाऊन पैसाही पदरात न पडल्यामुळे, त्या धक्क्याने एकोजी मरण पावल्याचा संभव अधिक योग्य वाटतो.

शिवाजी आणि संभाजी यांच्याप्रमाणेच एकोजीचे चिक्कदेवरायशी मित्रत्वाचे संबंध नव्हते. म्हैसूरकरांविरुद्ध चालू असलेल्या युद्धात एकोजीने संभाजीराजांना मदत केली होती.

एकोजीच्या मरणानंतर मराठी मुलखाच्या संरक्षणासाठी हरजीच दक्षिणेत राहिला. मुघल आणि म्हैसूरकरांच्या सैन्याविरुद्ध कर्नाटकातील मराठी मुलखाचे संरक्षण करावयाची जबाबदारी त्याच्यावरच आली.

बंगलोर घेतल्यानंतर कासिमखानाने तिकडील मराठी सत्तेचे केंद्रस्थान दोड्डबाळापूर घेतले. " अलमगीर बादशहा औरंगजेब याच्या कारकीर्दीत बाळापूर किल्ला संभाजीच्या घराण्याकडे होता. कर्नाटकचा फौजदार कासिमखान याने शिवपुत्र संभाजी याच्या ताब्यातील बाळापूर जिंकून घेतले " असा मजकूर एका शिलालेखात आहे. त्यानंतर कासिमखानाने जिंकलेला मराठ्यांचा प्रदेश चिक्कदेवरायबरोबर त्यांनी विभागून घेतला.[२]

या आक्रमणामुळे सर्वत्र अंदाधुंदी माजली होती. कोठेही सुरक्षितता नव्हती. त्रिंबकजी भोसले याने आपली मालमत्ता सुरक्षित राहावी म्हणून ती इंग्रजांच्या वखारीत हलविण्याची परवानगी मागितली होती.[३]

मुघल सैन्याने बंगलोर, सेवा गुंडा ही शहरे काबीज केल्यामुळे मराठ्यांना तेथून माघार घ्यावी लागली. हरजीराजे जिंजीजवळ ८ मैलांवर असलेल्या मात्येनूर आणि संताजी तिरुवन्नमलाई येथे परतले. मात्र मुघलांचा प्रतिकार करण्यासाठी केशव त्रिमल जगदेवगडच्या परिसरातच थांबला.[४]

इ. स. १६८७ च्या सप्टेंबर महिन्यात गोवळकोंडा राज्य मुघलांच्या हाती पडल्यानंतर, औरंगजेबाने कर्नाटकातील गोवळकोंड्याच्या सुलतानाच्या राज्यातील सर्व मुलूख ताब्यात घेण्याचे ठरविले. कर्नाटकातील अनेक गड मुघलांनी घेतले. पुलिकत आणि सॅन थोमा येथील सुभेदार मुघलांना शरण गेले. कासीमखानाच्या

१. शिचप्र, पृष्ठ ३३

२. MMR–BM

३. Cons. at Ft. St. G. 1–8–1687

४. Coni to Ft. St. G. 16–8–1687, 5–9–1687

नेतृत्वाखाली जिंजी आणि त्या भोवतालचा प्रदेश घेण्यासाठी मुघल सैन्य निघाले. दुसरी एक तुकडी मच्छलीपट्टणच्या बाजूस रवाना झाली होती.[१]

केशव त्रिमल कर्नाटकात गेल्यापासून त्याच्यात आणि हरजी राजांच्यात मतभेद सुरू झाले होते. हे मतभेद शेवटपर्यंत तसेच राहिले. त्यामुळे परिस्थिती बिघडून मुघल लवकरच तो प्रदेश जिंकतील असे इंग्रजांना वाटू लागले होते.[२]

या हेव्यादाव्यांमुळे हरजी महाडीकने कुडालूरपासून ४ मैलांवर असलेल्या तेघनापट्टमूच्या गडावर जाण्याचे ठरविले. त्या दृष्टीने सुभेदार व इतर अधिकाऱ्यांनी तेथे तटबंदी सुरू केली. आपल्या स्वागताची तयारी करण्यासाठी हरजीने गडावरील लोकांना हुकूम पाठविले.[३]

हरजी राजे व इतर सर्व मराठ्यांनी मुघलांचा प्रतिकार चालूच ठेवला. पूर्वीच्या गोवळकोंडा राज्यातील अनेक शहरे मराठ्यांनी घेतली. हरजीने विठ्ठल पिलाजी, नेमाजी गायकवाड, गोपाळ दादाजी यांच्याबरोबर अर्काटला वेढा देण्यासाठी सैन्य रवाना केले. त्यांनी मुघलांकडून अर्काट जिंकून घेतले. तेथील सुभेदाराला आणि इतर अधिकाऱ्यांना ठार केले. या लढाईमुळे त्या भागात भीतीचे वातावरण निर्माण झाले. कांजीवरम् शहरातून अनेकांनी पलायन केले. मद्रासपासून ६ कोसांवर मराठे लुटीसाठी गेले. मराठे फोर्ट सेंट जॉर्जवर हल्ला करण्याचा संभव असल्याने इंग्रजांनी स्वतःच्या संरक्षणाची तयारी केली. मराठ्यांनी सैदापेट लुटले; कावेरी पाक येथील कापसाची व्यापारी पेठ जाळून टाकल्यामुळे त्या भागात घबराट उत्पन्न झाली होती.[४]

पूर्वीच्या गोवळकोंडा राज्यातील मुलूख हस्तगत करण्यासाठी हरजी संताजी घोरपडेला मदतीस बोलाविले. लढा चालू ठेवण्यासाठी त्याने संताजीकडे पैशाची मागणी केली. संताजीने पैसे देण्यास विरोध केला. हरजीने त्याच्या सुभेदारी खालील मुलूख ताब्यात घेण्याचा संताजीला दम दिल्यामुळे संताजीने हरजीला सहकार्य देण्याचे ठरविले. या प्रदेशातील अस्थिर वातावरणामुळे बऱ्याच अफवाही पसरत असत. हरजी गुप्तपणे मुघलांची मैत्री करून जिंकलेला प्रदेश त्यांना देणार असल्याचे समजल्यावरून संभाजीराजांनी त्याला पकडण्यासाठी हुकूम पाठविले आहेत अशा तऱ्हेच्या अफवा उठत होत्या. अर्थात त्यात फारसे तथ्य नव्हते.

१. Cons. at Ft. St. G. 29–10–1687 Mad to Coni 22–11–1687

२. Coni to Ft. St. G. 7–12–1687, Cuda–Cons. 15–12–1687 Cuda to Ft. St. G. 16–12–1687

३. Cuda. Cons. 15–12–1687, Cons. at Ft. St. G. 21–12–1687

४. Cons. at Ft. St G. 26–12–1687, Cons. 27–12–1687

तेघनापट्टम्च्या गडावर राहून हरजी कारभार पाहात होता. त्याच्या हुकुमाप्रमाणे कोनिमेरपासून ३ मैलांवर असलेल्या गावी मराठ्यांनी मुक्काम केला. तेथून ते प्रतिकाराची तयारी करीत होते. गाढवांवरून दारूगोळा आणि तोफेचे गोळे नेऊन मराठ्यांनी कोनिमेरपासून ९ मैलांवर असलेले माराकान गाव लुटले. या लुटीत त्यांना जडजवाहिर, खजिना, घोडे, गाईही मिळाल्या; मुघली सैनिकांना त्यांनी कैद केले.[१]

यानंतर मराठे मद्रासच्या बाजूस गेले. त्या भागात त्यांनी बराच मुलूख लुटला. इ. स. १६८८ च्या सुरुवातीस त्यांनी दोन गड घेऊन कावेरीपाक आणि चेटपॅट या गडांना वेढे दिले होते. त्या भागात मराठ्यांना कोणीही विरोध केला नाही. मराठ्यांनी अनेक गड व शहरे घेतल्यामुळे त्यांच्याविषयी दहशत उत्पन्न झाली होती. इंग्रजांनी मराठ्यांपासून बचाव करण्यासाठी संरक्षणाची तयारी ठेवली होती.

५०० सैनिकांच्या तुकडीने कांजीवरम् लुटल्यामुळे तेथील रहिवासी गाव सोडून गेले. इ. स. १६८८ च्या जानेवारीच्या पहिल्या आठवड्यात २ हजार घोडदळ आणि ५ हजार पायदळ असलेल्या मराठ्यांच्या तुकडीने, मद्रासच्या दक्षिणेस असलेल्या चिंगलपुटला वेढा दिला, आणि ते गाव लुटले. मराठ्यांच्या हल्ल्यामुळे इंग्रजांनाही भीती उत्पन्न झाली होती.[२]

कांजीवरम् येथे मराठ्यांचे सैन्य वाढत होते. फोर्ट सेंट जॉर्जपासून १२ मैलांवर असलेल्या गावी मराठ्यांचे २०००० घोडदळ आणि पायदळ सज्ज होते; शहरे घेणे आणि लूट मिळविणे चालूच होते.[३]

मराठ्यांच्या या विजयामुळे औरंगजेबाने कर्नाटकात कुमक धाडली. इ. स. १६८८ च्या फेब्रुआरी महिन्यात महंमद सादिक, याचप्पाखान नाईक यांच्या नेतृत्वाखाली ४००० घोडदळ आणि ७००० पायदळाच्या तुकड्या मराठ्यांच्या बंदोबस्तासाठी मद्रासच्या बाजूस गेल्या.[४]

इस्माइलखान मका, याचप्पाखान नाईक व महंमद सादिक यांनी कांजीवरमूला वेढा देऊन ते शहर हस्तगत केले. हे कळताच दि. २२–३–१६८८ रोजी हरजी राजे त्रिचनापल्लीहून कांजीवरमूला गेले.[५] मोत्रामालोरच्या पलीकडे

१. Coni to Mad 3–1–1688

२. Coni to Mad. 3–1–1688; Mad to Coni **6–1–1688**, Cons. at Ft. St. G. 13–1–1688

३. Ft. St. G. to Sur. 1–2–1688

४. Cons. at Ft. St. G. 13 & 27–2–1688

५. शिचप्र, पृष्ठ ३४

जाऊन मराठ्यांनी काही शहरे लुटली. परंतु याचप्पा नाईक २००० घोडदळ आणि ४००० पायदळाची तुकडी घेऊन वांदिवाशला गेला. मराठे व मुघल यांच्यात लढाई होऊन दोन्ही पक्षांचे बरेच नुकसान झाले. कांजीवरम् येथून महंमद सादिक याचप्पाच्या मदतीस धावून गेला.[१]

हरजी राजे आणि केशव त्रिमल यांच्यातील तंटे चालू असले तरी त्याचा परिणाम मुघलांबरोबर चालू असलेल्या युद्धावर झाला नाही. केशव त्रिमल आणि सुंदर बाळाजी हरजीच्या आज्ञेत वागत नसत. त्यांच्यातील भांडणाला थोडेसे तीव्र स्वरूप आले होते. केशव त्रिमल हा संभाजीच्या आज्ञेवरून हरजी राजांच्या हातातून सत्ता काढून घेण्यासाठी गेला होता. केशव त्रिमलकडे संताजी घोरपडे, त्रिंबकजी भोसले असले तरी त्याच्याकडे सैन्यशक्ती पुरेशी नव्हती. हरजी राजाजवळ पुष्कळ संपत्ती होती. केशव त्रिमलला संभाजीचा पाठिंबा होता,[२] असे मत तेथील इंग्रजांनी व्यक्त केले होते. एकमेकांत हेवेदावे असले तरी मुघलांविरुद्ध लढण्यात ते एक होत असत. याचप्पा नाईक वांदिवाशहून तोफा आणण्यासाठी कांजीवरमूला गेला होता. संताजी ४००० घोडदळाची तुकडी घेऊन कांजीवरमूला गेला. तेथे मुघल व मराठे यांच्यात लढाई झाली; परंतु मुघलांनी तोफांचा भडिमार केल्यामुळे मराठ्यांचा पराभव झाला. याच वेळी मुघलांची एक तुकडी मराठी मुलुखातील तोंडूर आणि माल्येनूर येथे गेली. मुघलांनी तेथे सोने-चांदी व इतर सामान लुटले. कांजीवरमूपासून १२ मैलांवर मराठे व मुघल यांच्यात लढाई झाली, त्यात मुघलांचा पराभव झाला.[३] इ. स. १६८८ अखेरपर्यंत मराठे व मुघल यांच्यात संघर्ष चालूच होता. हरजी राजे मुघलांनी घेतलेल्या गोवळकोंड्याच्या प्रदेशात लूटमार करीतच होता.[४] जिजी, अर्काट, सॅन थोमा आणि त्या भोवतालचा प्रदेश मराठ्यांच्याच ताब्यात होता.

संभाजीच्या आज्ञेवरून हरजीने पाँडिचेरीच्या फ्रेंचांना राजापूरच्या फ्रेंचांकडून घेतलेल्या कर्जापैकी एक हप्ता दिला होता. यासंबंधाची माहिती ‘ आर्थिक धोरण ’ या राज्यकारभाराच्या उपप्रकरणात दिली आहे.

**मराठे-फ्रेंच आणि डच :**

संभाजीराजे आणि फ्रेंच यांचा संबंध १६८१ आणि १६८३ साली आला. त्यांचे संबंध मित्रत्वाचे होते. त्यानंतर मराठ्यांचा आणि फ्रेंचांचा संबंध

१. Cons. at. Ft. St. G. 13 & 27–2–1688, Cons at. Ft St. G. 9–3–1688

२. Coni to Ft. St. G. 10–3–1688

३. Cons. at Ft. St. G. 27–4–1688, Mad to Con 30–4–1688; Ft. St. G. to Gambroon 13 & 21–9–1688, Mad to Eng. 30–9–1688

४. Ft. St. G. to Sur 13–11–1688

१६८८ मध्ये कर्नाटकात आला. तेथे मराठ्यांचे मुघलांशी युद्ध सुरू होताच मराठ्यांशी मित्रत्वाचे संबंध असलेल्या फ्रेंचांना आपल्या सुरक्षिततेची धास्ती वाटू लागली. या युद्धात मुघल यशस्वी होतील अशा समजुतीने पाँडिचेरीचा गव्हर्नर फ्रॅन्सिस मार्तां याने मुघल अधिकारी महंमद सादीक याची मैत्री संपादण्याचा प्रयत्न करून मराठ्यांचे शत्रुत्व ओढवून घेण्याचा धोका पत्करला. स्थानिक अधिकाऱ्यांना नजराणे देऊन फ्रेंचांनी पाँडिचेरीच्या वखारीवर तटबंदी सुरू केली. तटबंदीच्या कामाची प्रगती पाहून तेथील मराठा अधिकाऱ्यांनी तरीही परवानगीवाचून बांधकाम सुरू केल्याबद्दल हरजीराजे यांच्याकडे तक्रारी केल्या. १६८८ सालच्या जुलै महिन्यात तटबंदीचे काम थांबविण्याचा हुकूम देण्यात आला. बांधकामाची परवानगी मिळविण्यासाठी फ्रेंच वकील हरजीराजे यांना भेटावयास जिंजीस गेला. वकिलाने या तटबंदीमुळे मराठी मुलखाचे आणि तेथील मराठी प्रजेचे संरक्षण होईल हे हरजीला पटवून दिले. फ्रेंच अधिकाऱ्यांचे हे प्रयत्न पाँडिचेरीच्या मराठ्यांना आवडले नाहीत. त्यामुळे त्यांनी फ्रेंचांना त्रास देण्यास सुरुवात केली. परवानगी लवकर मिळविण्यासाठी मार्तांने एम्-जरमेन ( M. Jermain ) या वकिलाला हरजीकडे पाठविले. हरजीने तिमाजी केशव या सुभेदाराला फ्रेंच वकिलाशी बोलणी करण्यास सांगितले. फ्रेंच वकिलाला तिमाजी केशवचा पूर्वानुभव चांगला नसल्याने, वाटाघाटी न करताच जरूर पडल्यास बांधकाम थांबवून, पाँडिचेरीची जागा सोडून तंजावरच्या वखारीत जाऊ, असे त्याने तिमाजीस सांगितले. तेव्हा मराठ्यांना ५००० चक्र ( chakras. १ चक्र=१–१२ आणे ) देऊन तटबंदीच्या चार बुरुजांची उंची ठरविण्याचे अधिकार मराठ्यांकडे ठेवल्यास बांधकामाची परवानगी मिळेल असे तिमाजी केशवने सांगितले. या मागणीसंबंधात मार्तां टाळाटाळ करीत असला तरी जरमेन याने ताबडतोब संमती देऊन पैसे जिंजीला पाठविले. आणखी ६०० चक्र पाठविल्यानंतर दि. ९–१–१६८९ रोजी फ्रेंचांना तटबंदीसंबंधी अधिकृत फर्मान मिळाले. हे फर्मान ही पाँडिचेरीच्या इतिहासातील महत्त्वाची घटना आहे.

ही घटना डचांना आवडली नाही. यूरोपात League of Augsburg चे युद्ध सुरू झाल्याने डचांनी हिंदुस्थानात फ्रेंचांवर हल्ले सुरू केले आणि मराठ्यांची मदत मिळविण्यासाठी त्यांनी हरजीशी बोलणी सुरू केली. या वाटाघाटी चालू असतानाच संभाजीराजांना मुघलांनी कैद करून ठार केले.[1]

डचांनी मराठी अधिकाऱ्यांना नजराणे आणि इतर अभिवचने देऊन, फ्रेंचांना मदत करण्यापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न केला. संभाजीराजांच्या

१. FMR–H, pp 27, 32

हृदयद्रावक मृत्यूमुळे हरजी खचलाच होता. आत्तापर्यंत तो परिस्थितीला खंबीरपणाने तोंड देत होता. डचांनी हरजीला देऊ केलेल्या मोठ्या रकमेची हकीकत त्याने फ्रेंच प्रतिनिधीला सांगितली. तेव्हा मराठ्यांनी दिलेले वचन आणि फर्मानासंबंधी दिलेला शब्द पाळावा असे फ्रेंच प्रतिनिधीने उत्तर दिले. तरीही हरजीने डचांनी देऊ केलेल्या रकमेसंबंधी मार्तोला कळविले. त्याचप्रमाणे फ्रेंचांनी ५ ते ६ हजार पागोडे दिले नाहीत तर पाँडिचेरी डचांना द्यावी लागेल असेही हरजीने लिहिले. याच सुमारास हरजीकडे झालेल्या लग्नसंमारंभात मार्तोने हरजीला नजराणा पाठवून त्याचे मन वळविण्याचा प्रयत्न केला. ही संधी साधून हरजीने फ्रेंचांकडे १०,००० पागोडे कर्ज मागितले. हा व्यवहार पूर्ण होण्यापूर्वीच दि. २९ सप्टेंबर १६८९ रोजी हरजी मरण पावला.

त्यानंतर राजाराम जिंजीला असताना त्याने डच आणि फ्रेंच यांच्याशी पाँडिचेरीसंबंधात वाटाघाटी सुरू केल्या. राजारामाने १८ रुपये शेकडा व्याजाने फ्रेंचांकडून ६०० चक्र कर्ज घेतले. बरीच चर्चा झाल्यावर राजारामाने डचांना पाँडिचेरी दि. ८–९–१६९३ रोजी २५००० पागोड्यांना विकली.[1]

मुघलांनी संभाजी राजांना पकडल्याची विपरीत बातमी ऐकून हरजी राजांनी दि. ९–३–१६८९ रोजी केशव त्रिमल यास त्रिणामली येथे कैद केले[2] हरजी राजे आणि केशव त्रिमल यांच्यात सत्तेसाठी चढाओढ किंवा काही वितुष्ट असले तरी ते दोघेही संभाजीशी एकनिष्ठ होते. मुघलांविरुद्ध लढताना ते दोघे एक होत असत. हरजी राजे मुघलांना जाऊन मिळतील अशा अफवा पसरल्या होत्या. परंतु त्यात तथ्य नव्हते. शिवाजी महाराजांनी जिंकलेला मुलूख त्यांनी सांभाळला व त्यात थोडीफार वाढही केली असे दिसते.

संभाजीराजांनी कर्नाटकाच्या बाबतीत शिवाजी महाराजांचेच धोरण चालू ठेवले. याशिवाय हरजी राजे, केशव त्रिमल, संताजी घोरपडे, दादाजी काकडे, जैताजी काटकर इत्यादि मंडळींना कर्नाटकात धाडून तेथील मुलूख सांभाळण्याची व्यवस्था केली. कर्नाटकातील मराठी सैनिकांनी मुघल आक्रमणाला तोंड देऊन मुलूख सांभाळल्यामुळेच राजारामाला संकटकाळी कर्नाटकात आश्रय घेता आला.

हरजीने कर्नाटकाचा बंदोबस्त उत्तम केला. कपटभावाने स्वतःवर चालून आलेल्या केशवपंतांकडून त्याने राष्ट्राची कामगिरी करवून घेऊन राज्यवृद्धी केली.

१. FMR–H, pp. 52–59

२. शिचप्र, पृष्ठ ३५

हरजीसारखा दूरदर्शी आणि धोरणी मुत्सद्दी कर्नाटकात असल्यामुळे काही हिंदू पाळेगारांचा चांगला लाभ होऊन मराठ्यांच्या प्रांताचे संरक्षण झाले. हरजीसारखा शहाणा व धूर्त मुत्सद्दी तेव्हा कर्नाटकात होता म्हणूनच चंदी प्रांतातील मराठ्यांची सत्ता कायम राहिली आणि त्याचा पुढील काळात राजाराम महाराजांना फारच चांगला उपयोग झाला.

* * *

# ११. संभाजीराजांचा राज्यकारभार

**पूर्वग्रह :**

देशाचा राजा म्हणून राजाने राजधर्म पाळावयाचा असतो. या राजधर्मात राज्याचे रक्षण, धर्मरक्षण, चोख न्यायदान, प्रजादक्षता, प्रजेचे अभय, रयतेची कळकळ इत्यादी अनेक कर्तव्ये समाविष्ट होतात. संभाजीने राज्याचे रक्षण करावयाचे कसे प्रयत्न केले त्याची हकीकत ' मराठा–मुघल संघर्ष ' या प्रकरणांतून विस्ताराने दिलेली आहे. प्रस्तुत प्रकरणात संभाजी महाराजांच्या काळात राज्यकारभार कसा चालू होता याची चर्चा केलेली आहे. आतापर्यंत त्यांच्या राज्यकारभाराविषयी फारशी माहिती नव्हती. उपलब्ध असलेल्या कागदपत्रांच्या अभ्यासाने आणि संकलनावरून संभाजी राजांच्या कारकीर्दीतील राज्यव्यवस्थेचा बोध होऊ शकतो. संभाजी महाराजांनी राज्यकारभाराकडे दुर्लक्ष केले, त्यांच्या कारकीर्दीत बजबजपुरी माजून सर्वत्र विस्कळितपणा आलेला होता, अशी सर्वसामान्य समजूत आहे.

मल्हार रामराव चिटणीस संभाजी राजांच्या कारभाराविषयी लिहितो, " दिवसेदिवस कबजीचे स्वाधीन अधिकच होत चालले. इतबार मनसबा सर्व त्याचेच स्वाधीन. कोणीही पुरातन राज्यातील इतबारी त्याची प्रतिष्ठा ठेवावी अथवा मसलतीत घ्यावा हे गोष्ट राहिली. उग्रपणे शासन कोण्ही वर्णविचार न करितां शिरच्छेद करावा, ऐसे करीत चालले. कबजीचे सहवासे त्याचे वाममार्ग कर्म तेणेकरून फारच विचार राहिला नाही. माणूस मात्र फारच त्रास पावते जाले. सर्व प्रजेचीही क्षोभता जाली. न्यायाची रीत राहिली नाही. देवब्राह्मणांचे ठायींही निष्ठा राहिली नाही असे आचरण धरिले. एक कबजी सांगतील ते प्रमाण. दैवयोगे करून होणार काल प्राप्त झाला...मातबर व बुद्धिवंत व शूर होते ते हतवीर्य झाले. महाराजांनी नूतन पराक्रम करावा, नवे राज्यसाधन करावे. हे राहिले नाही. सुभेदार प्रांतातील वगैरे तसेच गड किल्ले यांचे कारभारी, यांजवरि हा कारभार खातो म्हणून चुगली करितांच त्याचा विचार न करितां त्यास आणावा, मारावा, नागवावा. अंतरच असलिया शिरच्छेद करावा. या भयेंकरून मातबर चार होते ते कोण्ही जवळ बोलून पावत. त्यांस आपली आपलीच अबरू

प्रतिष्ठा जतन होणे हेच येऊन पडले. कबजीचे सांगणे मात्र प्रमाण. त्या नादे महाराज चालणार. त्यासच अनुमोदन देणे. मग विचार काय राहिला ? तमकरे घ्यावे ( लुच्चेगिरीने दुसऱ्याचे वित्त हरण करणे ), घरे बुडवावी, नागवावे. माणूस राज्यात वाढले ते काही परराज्यातून आणून वाढविले ऐसे घडत नाही. ऐशी राज्यक्षयाची लक्षणे होत चालली...वडिलोपार्जित सेवकांच्या प्रतिष्ठा राहिल्या नाहीत...राज्यातील सर्व कारभारी किल्ले सुभे यांणी रोजमुरा वाटणे इत्यादिक बारीक मोठी वर्तणूक करणे ते आज्ञा नेऊन करावी, तसे चालावे. हे थोरल्या महाराजांनी रीत घातली. बंदोबस्त हुकुमाशिवाय काडी न हालावी असे केले होते. त्या चालीने सर्व जागजागांची लिहिली जावी. ते समयी सर्वाध्यक्ष कबजी ( यांजवर ) अतिप्रीती, त्यांणी इतका कारभार कोठवर करावा ऐसे म्हणावे व त्यास ' छंदोगामात्य कवि कलश पंडितराव ' ऐसा किताब दिल्हा. तेव्हा सर्व आला कारभार, ' त्याजकडे जा ' म्हणावे. बाबांनी कागद पाहणे केलेलेच आहे, तथापि लिहिणार इतके काय म्हणून लिहितात, यात काय आहे, हंशील कलम ल्याहावे, ते चराठी कशास लिहितात व चंदीपर्यंत किल्ले घेऊन काय समजोन करणारांनी केले कळत नाही. "[१]

इतिहासाची अस्सल आणि पुरेशी साधने उपलब्ध नसल्यामुळे इतिहासकारांची मतेही बखरीत लिहिलेल्या गोष्टीसारखीच असत. कै. गो. स. सरदेसाई आपल्या ' उग्र प्रकृती संभाजी ' या पुस्तकात लिहितात की, " संभाजीचा राज्यकारभार मराठी राज्याला हितकारक नव्हता. "[२] डॉ. सेन आपल्या " Administrative system of the Marathas " या पुस्तकात म्हणतात की, " Sambhaji had subverted his father's system of administration and he had no mind to improve it "[३] ( pp 55/80 ) कै. न्या. महादेव गोविंद रानडे आपल्या " Rise of the Maratha power " या पुस्तकात म्हणतात की, " .. for Sambhaji can never be said to have ruled the country. The Ashta Pradhans, being virtually set aside, ceased to bear the responsibility of rule in Sambhaji's time. The civil and military arrangements of his father were neglected, the soldiers were not paid regularly, the hill forts were not properly garrisoned or provisioned and district revenues were farmed to the highest bidder. Anarchy prevailed every where, and it was just at

१. मराचिब, पृष्ठ १९–२० २. उंस–स, पृष्ठ १०३

३. ASM–SNS, p 55 to 80

this time that Aurgnzeb descended into the Deccan with an army estimated at three lakhs of all arms...."[1]

पूर्वी याच बखरींच्या आधारावर नाटके लिहिण्यात आली. त्यामुळे या नाटकांतूनही संभाजी महाराजांच्या गैर कारभाराबद्दल उल्लेख आढळतात. 'राजसंन्यास' या कै. राम गणेश गडकरी यांच्या नाटकात संभाजीने राजधर्म सोडला या मुद्यावरच भर दिलेला आहे. कै. औंधकरांनी तर 'बेबंदशाही' हे नाव आपल्या नाटकाला देऊन संभाजी राजांच्या कारकीर्दीत अंदाधुंदी माजल्यावरच आपले कथानक आधारलेले आहे. "पिढ्यान् पिढ्या पसरलेल्या पारतंत्र्याची अंधारी रात्र ओसरून नुकता कुठे मराठ्यांचा स्वातंत्र्यसूर्य उगवला नाही तोच बेबंदशाहीने ग्रासले. या बेबंदशाहीत केव्हा काय घडेल याचा भरवसा राहिलेला नाही." असा उल्लेख केला आहे.

उपलब्ध असलेल्या मराठी साधनातून संभाजी महाराजांचा कारभार कसा चालत होता याचे विवेचन या प्रकरणात करावयाचे योजिले आहे.

**राजाचे अधिकार :**

शिवाजीमहाराज हे राजा म्हणून शासनाचा मध्यबिंदू होते. ते शास्त्रांच्या आधाराने कायदेकानू करणारे, न्यायदानाचे प्रमुख आणि सेनाप्रमुख होते. म्हणजे ते सार्वभौम होते. राज्याचे प्रमुख म्हणून समाज-व्यवस्थाही त्यांच्याचकडे होती. मराठ्यांच्या राज्ययंत्रणेची ती एक अपरिहार्य स्थिती होती. शिवाजीमहाराज विविध धर्मांच्या प्रजेच्या स्वास्थ्याची आणि स्थैर्याची हमी देत असत. 'राजा कालस्य कारणम्' ही उक्ती शिवाजी राजे किंवा इतर प्राचीन राजांच्या बाबतीत अगदी सत्य होती.

संभाजी राजेही शासनाचे मध्यबिंदू होते. ते शास्त्राच्या आधाराने कायदेकानू करणारे, न्यायदानाचे प्रमुख आणि सेनाप्रमुख होते. तेही विविध धर्मांच्या प्रजेच्या स्वास्थ्याची आणि स्थैर्याची हमी देत असत. संभाजीने राज्याचे वारस म्हणून सर्व सत्ता आपल्या हातात घेतली. त्यांचा राज्याभिषेक होऊन अष्टप्रधानांची नेमणूक होईपर्यंत त्यांनी स्वतःच्या अधिकारात अनेक ठिकाणी पत्रव्यवहार केला. अशी सुमारे २०–२५ पत्रे उपलब्ध आहेत. त्याशिवाय त्यांच्या नावाची इतर अनेक पत्रेही उपलब्ध आहेत.[२] शिवाजीमहाराज निधन पावल्यानंतर एक महिन्याने लिहिलेल्या म्हणजे दि. ६ मे १६८० रोजी लिहिलेल्या पत्रात त्यांच्या नावाचा शिक्का उपलब्ध आहे.

संभाजीराजांचा शिक्का :[३] "श्री. शंभोः शिवजातस्य मुद्राद्योरिवराजते ।

१. RMP–MGR, p 78 २. संकाप–जो,

३. अमराअ–जो, भाग १ ला, पृष्ठ २२२

यद कसेविनी लेखा वर्तते कस्यनो परि ॥ याचा अर्थ असा : संभाजीची ही मुद्रा सूर्यप्रभेप्रमाणे शोभते व ज्या मुद्रेचा आश्रय करणारी लेखासुद्धा कोणावरही सत्ता चालविते, ती ही शिवाजी पुत्र शंभूची–संभाजीची मुद्रा प्रकाशित होत आहे.

दि. ५ मे १६८० पासून संभाजीने पोर्तुगीज व्हॉइसरॉयशी पत्रव्यवहार सुरू करून आपण राजा झाल्याचे जाहीर केलेले होते. सर्व सत्ता हातात घेण्याच्या दृष्टीने त्यांनी योग्य तीच पावले टाकलेली होती.

शिवाजीमहाराजांप्रमाणेच त्यांनी सर्व बाबतींत आपल्याकडे अधिकार घेतलेले होते. या अधिकारांची अंमलबजावणी करावयाची वेळही त्यांच्या कारकीर्दीच्या पहिल्या वर्षा दीडवर्षातच आली. त्यांच्याविरुद्ध झालेल्या दोन कटांमुळे मे १६८० च्या दुसऱ्या आठवड्यात रायगडावर काही लोकांना आणि मोरापंत–प्रधान, अण्णाजीपंत–सचीव आणि न्यायाधीश प्रल्हादपंत यांस कैद केले. परंतु चार महिन्यांनीच त्यांना मुक्त करण्यात आले. प्रल्हादपंतांना दोन महिन्यांनी मुक्त केलेले दिसते.[1] १६८१ सालच्या जानेवारीत संभाजीमहाराजांचा राज्याभिषेक झाला. परंतु १६८१ च्या ऑगस्ट महिन्यात त्यांच्यावरील विषप्रयोगाच्या कटानंतर संभाजीराजांनी कविकलशाच्या सांगण्यावरून अण्णाजी दत्तो, बाळाजी आवजी चिटणीस, सोमाजी दत्तो, हिरोजी फर्जंद आणि इतर २०।२५ लोकांना देहदंडाची शिक्षा दिली.

शिवाजीमहाराजांच्या पद्धतीनुसार संभाजीराजांच्या राजमंडळात ते स्वतः आणि ९ प्रधानांचा समावेश होता. हे राजमंडळ आठ शाखांत विभागलेले होते. (१) स्वारी राजश्री स्वामी (राजा स्वतः), (२) स्वारी अष्टप्रधान, (३) सुभे लष्कर, (४) सरदेशमुखी (राजाचे खाजगी वतन), (५) किलेहाय, (६) हाशमराव, (७) सुभे मामलेदार, (८) वतनदार.[2]

राजाचे दरकदार हे पुष्कळवेळा राजमंडळाचे मंत्री म्हणून काम करीत. ते पुष्कळ वेळा निर्णय देण्यासाठी असलेल्या मजलीसमध्ये ( A Court or assembly in geueral: a Royal Court ) भाग घेत. मजलीसमध्ये राजमंडळातील इतर सभासद असत.[3] संभाजीच्या कारकीर्दीत राजमंडळाचा उल्लेख आढळतो.[4]

राज्याच्या राजमंडळातील सर्व वरच्या दर्जाच्या अधिकाऱ्यांची, मंत्र्यांची नेमणूक राजाकडून होत असे. राजमंडळ हे कारभारी मंडळ आणि न्यायमंडळ

१. शिचसा, खंड १२, लेख ८९, पृष्ठ ५५
२. JSM–G
३. कित्ता
४. शिचसा, खंड ९, ले. ६५–६६; खंड २, ले, ३९७, पृष्ठ ३९९

अशा दुहेरी कक्षेत काम पाहात असे. राजमंडळातील राजाचे मंत्री व दरकदार यांना राज्यात निघालेल्या हुकुमांवर ते बरोबर असल्याची मान्यता द्यावी लागे.

**अष्टप्रधान :**

संभाजी महाराजांनी पूर्वीची अष्टप्रधानांची पद्धत तशीच चालू ठेवलेली होती. ती पुढे दिल्याप्रमाणे होती.

**( १ ) पेशवा :**

शिवाजी महाराजांच्या काळातील मोरोपंत पिंगळे हा पेशवा संभाजी राजांच्या कारकीर्दीच्या प्रारंभीचे काही दिवसच पेशवा होता. महाराजांना पकडण्याच्या कटात त्यांचा हात असल्यामुळे मे-जून १६८० च्या सुमारास त्यांना कैद केले. ते रायगडी २९ सप्टेंबर ते १२ ऑक्टोबर १६८० च्या दरम्यान वारले. मध्यंतरी संभाजी राजांनी कोणालाही पंतप्रधान पदावर नेमले नसावे. दि. २८–८–१६८० च्या महाराजांच्या पत्रावर प्रल्हाद निराजीची मुद्रा आहे.[१] पण त्यावरून त्यांचा नेमका हुद्दा समजत नाही. मोरोपंतांबरोबर त्यांचा मुलगा निळो मोरेश्वरही कैदेत होता. दि. २९ सप्टेंबर ते १२ ऑक्टोबर १६८० च्या दरम्यान निळोपंतांना मुक्त करून पेशवाई दिली.[२] संभाजी महाराजांच्या अखेरीपर्यंत निळोपंत पेशवा होता. दि. ९–७–१६८१ पासून दि. ९–१२–१६८८ पर्यंतच्या काळातील निळोपंतांची २०–२१ पत्रे उपलब्ध आहेत.

महत्त्वाच्या कागदपत्रांवर " श्री शंभुभुज नोत्कंठ मोरेश्वर सुत निलकंठ " असा त्यांचा शिक्का आहे.

निळोपंतांकडे कल्याण-भिवंडी प्रांतांचा सरसुभा होता. निळोपंत आघाडीवरही जात असे. १६८५ सालच्या मार्चमध्ये थोडे दिवस निळोपंतांचा भाऊ गंगाधर मोरेश्वर हा प्रधान होता. जून १६८५ सालचे निळो मोरेश्वरचे पत्र उपलब्ध आहे.[३] हा इंग्रजांशी बोलणी करीत असे.[४]

**( २ ) मुजुमदार किंवा अमात्य :**

संभाजी महाराजांच्या कारकीर्दीच्या सुरुवातीस रघुनाथ नारायण अमात्य होता. संभाजी महाराजांच्या दानपत्रावर ( सन १६८० ) रघुनाथ नारायण याचा अमात्य म्हणून शिक्का आहे. परंतु अण्णाजी दत्तोला दि. २९ सप्टेंबर ते १२

१. शिचसा, खंड १२, ले ८९, पृष्ठ ५५ २. शिचप्र, पृष्ठ ३०

३. सनदापत्रे पृष्ठ १३२, ले ४; शिचसा खंड २, ले ३९७

४. शिचप्र, पृष्ठ ३०

ऑक्टोबर १६८० च्या दरम्यान अटकेतून मुक्त करून त्याला मुजुमदार केले.[१] त्यानंतर दि. १२-१२-१६८० ते ९-१-१६८१ च्या दरम्यान रघुनाथ नारायण हणमंते यांस चंदी येथे कैद केले.[२]

अण्णाजी दत्तोकडे मुजुमदारीचा कारभार १६८१ च्या ऑगस्ट पर्यंत होता. विषप्रयोगाच्या कटांत त्यांचा हात होता म्हणून त्यांना मारले तेव्हा सारा कारभार खंडेराव पानसंबळ यांजकडे दिला होता.[३] कैदेत असलेल्या रघुनाथ नारायण हणमंते यांस १६८२ च्या डिसेंबर महिन्यापूर्वी केव्हा तरी मुक्त केले. त्यानंतर ते कर्नाटकातून येऊन संभाजीला भेटले. डिसेंबर १६८२ ते जानेवारी १६८३ या काळात (पौष १६०४) संभाजीराजे आणि त्यांची भेट झाली. त्यानंतर राजांनी रघुनाथ नारायण हणमंते यांस मुजुमदार केले.[४] मुजुमदारपद मिळाल्यापासून चार-पांच महिन्यांतच म्हणजे दि. ४ मे १६८३ रोजी ते वलणी येथे मृत्यू पावले.[५]

त्यानंतर त्यांचा मुलगा नारायण रघुनाथ याला अमात्यपद दिले. दि. १९-९-१६८५ व दि. १६-३-१६८६ ची त्यांची दोन पत्रे उपलब्ध आहेत.[६] रघुनाथ नारायणचा दुसरा मुलगा तिमाजी याला कर्नाटकात मुजुमदार म्हणून नेमले होते.[७]

## (३) सचीव-सुरनीस :

शिवाजी महाराजांच्या काळात हे पद अण्णाजी दत्तोकडे होते. त्यांचा कटात हात असल्याने मे-जून १६८० मध्ये अटक करण्यात आल्यावर सचीव पद काही काळ आबाजी सोनदेव यांच्याकडे देण्यात आले. १६८० च्या ऑगस्ट महिन्यात राजांनी केलेल्या दानपत्रावर आबाजी सोनदेव यांचा सचीव म्हणून शिक्का आहे. आबाजी सोनदेव मरण पावल्यावर हे सचीवपद रामचंद्र निलकंठ भादणेकर याला दिले.[८] कुडाळपासून तुंगभद्रेपर्यंतचा प्रांत त्याच्या ताब्यात होता. त्याने १६८३ मध्ये पोर्तुगेजांशी पत्रव्यवहार केला होता. त्याची पत्रे उपलब्ध आहेत.[९] त्याच्याकडे १६८५ सालापर्यंत सचीवपद होते. मे १६८५ मध्ये ते शंकराजी

१. शिचप्र, पृष्ठ ३०
२. कित्ता
३. भाइसंम, द्वितीय वृत्त, शके १८३६, पृष्ठ ६२
४. शिचप्र, पृष्ठ ३२
५. कित्ता.
६. श्रीसाका, लेख ५९; मइसा, खंड ८ लेख ४०
७. इऐति-शके १८४०, वर्ष ३ रे, पृष्ठ ४१
८. JSM-G, p 270
९. पेद, ३१, ले. १८४, पृष्ठ १६९

नारायण गांडेकर याला दिले. हे पद त्याच्याकडे संभाजीराजांच्या अखेरपर्यंत राहिले. त्याच्याकडे मावळ व उत्तर कोकण सुभा सोपविला होता. शंकराजीची चार पत्रे उपलब्ध आहेत.[1] सचीव म्हणून काम करण्यापूर्वी शंकराजी नारायण संभाजीच्या कारभारात अधिकारी होता.

## (४) डबीर सुमंत :

शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाच्या वेळी जनार्दन नारायण हणमंते यांची नेमणूक सुमंत पदावर केलेली होती. त्यांच्या मृत्यूपर्यंत म्हणजे दि. २७–६ १६८३ पर्यंत ते या पदावर होते.[2] यांच्याकडे पन्हाळ्याचा सुभा होता. त्यांनी दि. २८–७–१६८० रोजी सोम नाईकास पत्र लिहिलेले आहे.[3] संभाजीराजांनी रामसिंगाला लिहिलेल्या पत्रात जनार्दन पंडिताचा उल्लेख आढळतो.[4]

परंतु डबीरी पुढे वासुदेव जनार्दनकडे चालू राहिली असावी. त्यानंतर बाळकृष्ण वासुदेव यांजकडे ती गेली. पुढे वासुदेव जनार्दनाने संभाजी महाराजांजवळ सेवा केली होती.[5]

## (५) सरनोबत : सरसेनापती :

हंबीरराव मोहिते हा शिवाजी महाराजांच्या वेळेपासून सेनापती होता. (एप्रिल १६७४). संभाजीच्या कारकीर्दीत तो त्याच्या मृत्यूपर्यंत त्याच पदावर होता. एका साक्ष पत्रावर हंबीररावाचा शिक्का आहे.[6] हा शिक्का असा :

श्री "मंछि व माहानुभाव सेनाधीश हंबीरराव."

युद्धकलेत हंबीरराव तरबेज असून त्याने अनेक आघाड्यांवर मुघलांना चांगल्या प्रकाराने प्रतिकार करून युद्धात उत्कृष्ट कामगिरी बजावलेली आहे.

दि. २० डिसेंबर १६८६ च्या सुमाराचे हंबीररावाचे एक महत्त्वाचे पत्र उपलब्ध आहे. या पत्रात कोल्हापूर–पन्हाळा भागात झालेल्या मुघल हल्ल्याला हंबीररावाने प्रतिकार केल्याचा उल्लेख आढळतो. त्यावरून शिवाजी महाराजांच्या तालमीत तयार झालेल्या लोकांचा आत्मविश्वास कोणत्या प्रकारचा होता हे चांगले समजते. १६८७ च्या ऑक्टोबरमध्ये मुघलांनी वाईपर्यंत धडक मारली होती. त्या झुंजीत हंबीरराव गोळा लागून ठार झाला. हंबीररावाच्या मृत्यूनंतर

१. मइसा, खंड १५, ले. २८९, ३१५; मइसा, खंड १७, ले. १८/१९

२. शिचप्र, पृष्ठ ३२
३. मासव–स, खंड २, ले. ४५७

४. HOS–JS, p 209/4

५. सातारा नोंदणी नं. ३५५ : हणमंते–सातारा Vol No. 15. पे. द.

६. मइसा खंड १५, ले. १०–११ पृष्ठ ३९–४०

मालोजी घोरपडे सेनापती झाला. तोही फेब्रु. १६८९ मध्ये झालेल्या लढाईत मरण पावला.

## ( ६ ) पंडितराव किंवा दानाध्यक्ष :

१६७३ सालापासून मोरेश्वर पंडितरावाकडे दानाध्यक्षाची कामगिरी होती. संभाजीच्या कारकीर्दीतही हे पद त्यांच्याकडे चालू होते. १६८१ते१६८६ सालातील त्यांची पंडितराव म्हणून ८–९ पत्रे उपलब्ध आहेत.[1]

अनुपुराणात केशव पंडित पंडितराव असल्याचा उल्लेख आढळतो. परंतु त्याच्या नावाची पत्रे मिळत नाहीत. याच केशव पंडिताने संभाजीला लहानपणी रामायण सांगितले होते.

## ( ७ ) वाकेनिवीस :

शिवाजीमहाराजांच्या काळात दत्ताजी त्रिमल यांच्याकडे वाकनिसाचे काम होते. त्याच्या ताब्यात कर्नाटक होता. " वरघाट वाईपासून कोपल तुंगभद्रेपावेतो देश नेमून दत्ताजी वाकनीस याचे स्वाधीन केले. त्याच्या मृत्यूनंतर त्याचा मुलगा रामचंद्र मुतालिक होता.[2] "

## ( ८ ) मुख्य न्यायाधीश :

शिवाजीमहाराजांच्या वेळेपासून प्रल्हाद निराजी हा न्यायाधीश होता. संभाजीराजांच्या कारकीर्दीत नोव्हेंबर १६८८ सालापर्यंत म्हणजे तो पकडला जाईपर्यंत त्याच पदावर होता. १६८० च्या ऑगस्टमध्ये काही काळ तो मुख्यप्रधान असावा.[3] त्याच्या नावाची पत्रे उपलब्ध आहेत.[4] त्याने इंग्रजांशी पत्रव्यवहार केला होता.[5]

न्यायदानाच्या बाबतीत सर्व अधिकार प्रल्हाद निराजीकडे होते. त्याने दिलेले निर्णय कविकलश अमलात आणीत असे.

त्याचा शिक्काही उपलब्ध आहे.[6] ही मुद्रा अशी :

" लक्ष्मीनृसिंभ । क्तश्रीनीररायाब्धि । सन्मणेः ॥
प्रल्हादव । र्धिनी मुद्रा । प्रल्हादस्य । विजयते ॥ "

१. संकाप–जो
२. ऐसंसा, खंड ५, लेख २५
३. शिचसा, खंड १२, लेख ८९
४. कित्ता; मइसा, खंड २१, लेख ४५
५. FR : Pralhad Niraji to Bom, 16–2–1684
६. मइसा, खंड १५, लेख ११, पृष्ठ ४०; शिचसा, खंड १२, लेख, ८९

**कविकलश-छंदोगामात्य :**

संभाजी राजांच्या कारकीर्दीत छंदोगामात्य या पदाची अष्टप्रधानात भर पडली असा समज असला तरी शिवाजीमहाराजांच्या राज्याभिषेक प्रसंगी, " उत्तरेस छंदोगामात्य प्रधान रघुनाथ पंडितराव सुवर्ण कलश मधुपूर्ण घेऊन उभे राहिले. " असा उल्लेख आढळतो.[१]

संभाजी महाराजांच्या कारकीर्दीत कविकलश याचा प्रामुख्याने उल्लेख येतो. संभाजी राजांशी अनेकजण एकनिष्ठ होते. अशाच स्वामिनिष्ठ सेवकांत कविकलशाची गणना करावी लागेल. कविकलशासंबंधी अनेक गैरसमजुती प्रचलित आहेत. काव्यातून, बखरीतून, त्याच्याविषयी बराच विपर्यास केलेला दिसतो. कविकलशाला कबजीबाबा, कलुशाकबजी म्हणून म्हणत असत. काही ठिकाणी त्याला कलीचा अवतार समजून शिवाजी महाराजांनी सुरू केलेल्या राज्याचे व धर्मसंस्थापनेचे उच्छेदन करण्याकरिताच तो प्रकट झाला होता असेही म्हटले आहे. काही जुन्या लेखांचा रोख असा होता की कलुशा हा औरंगजेबाकडून संभाजी राजास भ्रष्ट करण्याकरिता व कुमार्गास लावून, त्याला धरून बादशहाचे स्वाधीन करण्याकरिता विडा उचलून आला होता.

मल्हार रामराव चिटणीस बखरीत कविकलशाविषयी खालील माहिती दिली आहे : " कवि कलुषा कबजी म्हणोन कनोजी ब्राह्मण बहुत विद्वान, मंत्रशास्त्र विद्या आगम त्यास बहुत गम्य, असे होते. त्याची स्त्रीही चतुर होती. त्यांणी महाराज वश करावे म्हणून वशीकरण मंत्रप्रयोग करून महाराजांची बहूत जवळीक व कृपा संपादून अगोदर समीप राज्याभिषेकापूर्वी होतेच. वशीकरण-मार्गा विशी अनुष्ठाने प्रयोगसंपत्तीकारणे व राज्यवृद्धी होणे, यश येणे असे समजावून प्रयोग अनुष्ठान करविले. पुढे दिवसेंदिवस बुद्धीस भ्रंश पडून त्या मार्गात अनुसरावे असे केले. रेडे मारून त्यांचे ओले कातड्यावर अनुष्ठाने व मद्यमांस पशुवधाची बहूत करु लागले. ब्राह्मणापासून प्रयोग करविणे यांत महाराजांचे अंतःकरण बहुत व्याप्त जाहले. कोणी हे करणे युक्त नव्हे असे बहुत सांगून कळविले असता त्यासच दरबार मना करून कैद करावे, असे होऊ लागले."[२] वर दिल्याप्रमाणे इतरही बखरीत कविकलशाविषयी असेच वर्णन केलेले आढळते. बखरीच्याच आधारे लिहिलेल्या संभाजीराजांवरील नाटकातही संभाजीला दारू आणि इतर व्यसनांच्या स्वाधीन करणारा एक सूत्रधार म्हणून कविकलशाचे व्यक्तिचित्र रेखाटले आहे. एका नाटकात त्याला मुख्यप्रधानपदही अर्पण करण्यात आलेले आहे. तुळशी आणि संभाजी यांच्या व्यभिचाराला उद्युक्त करणारा,

१. इतिसं-पा, सन १३०९, पुस्तक २ रे, अंक ३ रा, पृष्ठ ९; सशिचिव, पृष्ठ ३३०
२. मराचिव, पृष्ठ ९

कपटवृत्तीने संभाजीला संगमेश्वरला आणून मोगलांच्या स्वाधीन करून देणारा खलपुरुष म्हणून तो रंगविलेला आहे. ईश्वरदास नागर, मानुत्‌ची, रॉबर्ट ऑर्म या समकालीन लेखकांनी कलशाने फितुरी केली असे आरोप केलेले आहेत.

परशुराम चरित्रात कविकलशाविषयी खालील उल्लेख केलेले आहेत :

"पाछा पासोनी मंत्रशास्त्री कबजी आला नृपा आश्रये। संभाजीवर मोहोमंत्र पडता दुर्बुधी झाला वस्ये। मंत्री मुख्य करूनि तोचि कबजी होणार इच्छा हरी।"[१] संभाजी महाराजांच्यावरील एका पोवाडयात कविकलशाचे वर्णन आढळते : "संभाजी राजा राज्य करू लागला ।। कबजी बाबास कारभार दिघला ।। तेणे मोगल संतोषला ।। येऊन पुण्यात बैसला ।। मोगले हीकमती जे केली विलाती वोस पाडिली ॥ बापडी मावळे गड टाकून पळाली। यकापुढं यक पळती गडापुढं गड सांडिती ॥ बापडी हवालदारे सबनिसे दीने होती ॥ यैसी गडाची गति। तैसीच घोडयाराऊताची व्याती। पंच हजारीस पांच तटे उरती।। बावाने केले बावापण ।। राज्य बुडवीले आपण ।। बांधोन दील्हे संभाजी तुज जाण ।।"[२] हा पोवाडा अपूर्णच आहे.

बहिरो विठ्ठल लोणकर याच्या चाकरीच्या संदर्भात कवि-कलशाचा संबंध आला होता. तुकोजी कृष्ण लोणकर हा वाडवडिलांपासून शिवाजीमहाराजांकडे नोंकरीस होता. हा बारा मावळचा मुजुमदार होता. नोकरीत असता बराच पैसा खाऊन तुकोजी श्रीमंत झाला होता.. अण्णाजी दत्तो कमाविसदार आपल्याकडे केव्हातरी पहाणीस येईल या भीतीने तो संपत्ती झाकून असे. अण्णाजी दत्तो एकदा फिरत फिरत मावळात गेला. त्यावेळी तो तुकोजीच्या घरी गेला. तुकोजीने अण्णाजीला मेजवानी दिली, व आपली संपत्ती न झाकता त्याचे प्रदर्शनच केले. अण्णाजीने जेवण झाल्यावर त्याचे घर जप्त केले. यासंबंधी अण्णाजीने सर्व माहिती महाराजांना कळविली. त्याची सर्व मालमत्ता घेऊन शिवाजी महाराजांनी तुकोजीला बोलाविले. त्याला चाळीस हजार खंड बसवून, त्याचा रोजगार बंद करून त्यास महाराजांनी वाराणशीस जाण्यास सांगितले. यात्रेला जाताना तुकोजीने महालचा मोहसबा बहिरो विठ्ठलाकडे दिला. तुकोजीपंत यात्रेला गेला असताना शिवाजी महाराज मरण पावले.

संभाजी महाराज राज्य करू लागताच एकब्राह्मण व दोन माणसे घेऊन बहिरो विठ्ठल लोणकर दरबारात गेला. त्याने पेशवे, सुरनीस, अष्टप्रधान, यांच्याकडे रोजगारासाठी विनंती केली. तेव्हा ते त्याला म्हणाले की, "या राज्यात काही रदबदल चालत नाही. अवघी रदबदल कविकलस कबजीबाबा

१. ताकाका-प, क्र. ३ पृष्ठ १४

२. ऐपो—कै, पृष्ठ ३३८

यांजकडे जाली आहे. त्याकडे जाणे. त्याचा उपार्जना करणे ते रोजगार सांगतील." परंतु कविकलशाने, जो रोजगार मागावयास येईल त्याने आपणास येऊन भेटावे, आपण त्यास प्रायश्चित्त देऊन आपले पंक्तीस आपले बायकोचे हाते भोजन घालावे, मग त्यास रोजगार घालावा, अशी प्रथा पाडली होती. हा करार ऐकून बहिरो विठ्ठल कबजीकडे गेला नाही. संभाजी महाराज गांगोलीस जाण्यास निघाले तेव्हा बहिरो विठ्ठलने त्यांची घाटात गाठ घेतली, आणि रोजगार मिळविण्याची खटपट केली.[१]

त्या काळी महाराष्ट्रीय ब्राह्मण तद्देशीय ब्राह्मणांना कमी लेखीत असत. कविकलश हा कनोजी ब्राह्मण असल्यामुळे महाराष्ट्रीय ब्राह्मण त्याच्याशी सहभोजन करीत नसावेत. या रूढीतून दिसून येणारा स्वतःचा कमीपणा नाहीसा करण्यासाठी जो ब्राह्मण नोकरी मागण्यास येईल त्याला प्रायश्चित्त देऊन आपल्या पंक्तीस भोजन देऊन त्यांना आपल्यासारखे करण्यासाठी कविकलशाने वरीलप्रमाणे करार केला असावा.

कविकलश शाक्त पंथाचा होता. त्याला मुख्य प्रधानपद दिल्यामुळे राज्यकारभारात तांत्रिक पंथाच्या लोकांचे वर्चस्व वाढले होते असे अनुपुराणात म्हटले आहे.[२]

कविकलशाच्या वर वर्णन केलेल्या चरित्रापेक्षा अगदी वेगळे चित्र संभाजीराजांच्या काळातील अस्सल ऐतिहासिक कागदपत्रातून पाहावयास मिळते. कविकलश हा एक उत्तर हिन्दुस्थानी कनोजी ब्राह्मण. हा हिंदी कवी होता. शिवाजी महाराज आग्र्याहून सुटून आले तेव्हा त्यांनी कबकलश नावाच्या भोसल्यांच्या कुलोपाध्यायास, काही पैसे व रत्ने देऊन संभाजी याला बनारस येथे त्याच्या स्वाधीन केले. शिवाजी महाराजांनी त्यास सांगितले की "मी सुखरूप पोहोचल्याचे तुला पत्र लिहिले की सांगितलेल्या मार्गाने त्याला परत आणावे,"[३] असे खाफीखान म्हणतो. खाफीखानाची माहिती ग्राह्य धरली तर संभाजीचा बालपणापासूनच कविकलशाशी संबंध आला होता असे दिसते. यानंतर शिवाजी, संभाजी व कविकलश यांची गाठ केव्हा पडली यासंबंधी कागदपत्रे उपलब्ध नाहीत. उपलब्ध कागदपत्रांवरून संभाजीराजे व कविकलश यांचा संबंध राजे गादीवर आल्यानंतरच आलेला दिसतो.

**राज्यकारभारात प्रवेश :**

शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर वारसा हक्कावरून झालेल्या कलहात अष्टप्रधान मंडळात दोन गट पडले. सोयराबाई व राजाराम यांच्या पक्षाचे

१. श्री. य. न. केळकर यांनी भा. इ. सं. मंडळात वाचलेले एक अप्रकाशित टिपण

२. पका-स

३. शिचवृ, खंड ३

काही मंत्री होते, तर काही संभाजीराजे यांच्या पक्षाचे होते. अशा परिस्थितीत महाराजांना आपल्या बाजूचा आणि आपल्या विश्वासातला कोणीतरी असावा असे वाटणे साहजिकच होते. या परिस्थितीतून कविकलशाचा राजकारणात प्रवेश झालेला असावा. अजितोदय नामक संस्कृत ग्रंथाप्रमाणे संभाजी राजे व कविकलश यांचा संबंध औरंगजेबाचा चौथा मुलगा सुलतान अकबर हा आश्रयास येण्यापूर्वी (मे–जून १६८१) केव्हा तरी आला.

१६८१ च्या ऑगस्ट–सप्टेंबरपासून संभाजीने कलशाला विश्वासात घेऊन त्याच्या सल्ल्यानुसार काही राजकीय निर्णय घेतले होते. स्वतःविरुद्ध झालेल्या विषप्रयोगाच्या कटानंतर संभाजी राजांनी कविकलशाच्या बोले (सांगण्या-वरून) मागती अण्णाजी दत्तो सचीव याजवर इतराजी करून मार दिल्हा त्या माराने राजश्री अण्णाजी पंत व बाळ प्रभु व सोमाजी दत्तो व हिरोजी फर्जन परळी खाले कैद करून मारिले,[१] असा जेधेशकावलीत उल्लेख आहे. जेधे-शकावलीतील व उपलब्ध मराठी साधनात कलशाविषयी हाच पहिला उल्लेख आढळतो.

कविकलशाला छंदोगामात्य हे पद दि. ३–८–१६८४ पूर्वी केव्हातरी दिलेले असावे; कारण त्याच पत्रात प्रथम त्याच्या नावापुढे छंदोगामात्य हे पद जोडलेले आढळते. छंदोगामात्य ह्या शब्दाबद्दल ग्रँड डफ छंदगौमात्य असे लिहितो आणि या शब्दाचा अर्थ Expounder of Veda's असा टीपेत देतो. परंतु या दोन्हीही गोष्टी बरोबर नाहीत. शुद्ध शब्द छंदोगामात्य असा असून त्याचा अर्थ "सामवेदाध्यायी प्रधान." असा आहे. छंदोगामात्य म्हणजे सामवेदी ब्राह्मणांची व्यवस्था करणारा अधिकारी. या इसमाची दुसरी पदवी कविकलश होती असे ग्रँड डफ म्हणतो. कलश ह्या शब्दावरून तत्कालीन मराठ्यांनी कलुशा हे कुविख्यात विशेषनाम निर्माण केले. फारसी व उर्दू भाषेत कलुशा म्हणजे कुंटण असा अर्थ आहे. कविकलश या नावातील कवि ही अक्षरे गाळून कलश या शब्दाचा कलुशा असा उच्चार थट्टेखोर व मत्सरग्रस्त लोक करू लागले. विक्रमांकदेव चरित्रात बिल्हणाने आपल्या पूर्वजांची राजकलस, जेष्ठकलस, मुक्तीकलस, अशी नावे दिलेली आहेत. त्याच धर्तीचे हे कविकलश नाव असावे. ग्रँड डफ म्हणतो त्या-प्रमाणे ही पदवी नाही. कविकलश व छंदोगामात्य या दोन्ही संबंधांतील ग्रँड डफची विधाने निराधार व अज्ञानमूलक आहेत. कविकलशाला "पंडीतराई" (पंडीतराव) हे पद दिले होते असे ग्रँड डफ म्हणतो, पण तेही निराधार आहे. कारण संभाजी महाराजांच्या कारकीर्दीच्या सुरुवातीपासून मोरेश्वर पण्डीतराय

१. शिचप्र, पृष्ठ ३१

यांची १६८६ पर्यंतची अनेक पत्रे उपलब्ध आहेत.[१] कविकलशाला दिलेले छंदोगामात्य हे पद पुढे पेशवाईतही चालू होते. सन १७२८ मध्ये नारो प्रल्हाद याला छंदोगामात्य पद लावलेले आढळते.[२]

१६८१ मध्ये अष्टप्रधानांच्या नेमणुका झाल्यानंतर कलशाकडे काही कामे सोपविली होती. संभाजीराजे व जयपूरचा राजा रामसिंग यांनी औरंग-जेबाची सत्ता उलथून पाडण्यासाठी एक मनसुबा रचला तेव्हा. रामसिंगला लिहिलेल्या पत्रात ( १६८२ ) संभाजीने कलशाचा उल्लेख केला होता.[३] १६८३ च्या डिसेंबर महिन्यात कलशास ' कारभाराचे अध्यक्ष ' किंवा ' कुलयेख्तीयार ' म्हणून नेमलेले दिसते.[४] हा अधिकार त्याला पोर्तुगेजांशी तह करण्यासाठी दिलेला दिसतो. कलशाच्या नावाचा शिक्का दि. २३–३–१६८५ च्या पत्रात प्रथम आढळतो. तो शिक्का असा आहे :

विधिरार्थिमनीषाणामवधिर्नयवर्त्मनां
शेवधिः कार्यसिद्धीनां मुद्रा कलशहस्तगा[५]

—म्हणजेच सर्व याचक लोकांची इच्छा पूर्ण करणारी, राज्यव्यवहाराचे नियंत्रण करणारी आणि कार्यसिद्धीचा निधी असलेली अशी मुद्रा कलशाच्या हातात आहे.

दि. ३–७–१६८३ पासून कविकलशाची राज्यकारभारविषयक अनेक पत्रे मिळतात. आत्तापर्यंत उपलब्ध झालेल्या पत्रात कलशाचे पहिले पत्र दि. ३–७–१६८३ चे आहे. सोमनायक नरनायक हा सैतवडे येथे देशमुख होता. सोमाजीने सरकारी वसुलाची अफरातफर केली आहे अशी तक्रार संभाजी-महाराजांच्या कानावर घालण्यात आली. कविकलशाने या गोष्टीचा शहानिशा करून सोमाजीस लिहिले की, " तुझ्याकडे चोरीमारीचे लिगाड नाही-कोणे गोष्टीची चिंता न करता आपले गावात येऊन राहणे ",[६]

१६८३ मध्ये फोंडा पोर्तुगेजांच्या वेढ्यातून जिंकून घेण्यासाठी मराठ्यांच्या हवालदार, ' सरनौबत ' सबनीस, नायकवडी यांनी तेथे असलेल्या पिरास नवस केला होता; म्हणून कलशाने दि. २–१–१६८४ रोजी फोंड्याचा सुभेदार धर्माजी नागनाथ यास फोंडानजीक असलेल्या पिरास नवसाची फेड करण्याविषयी लिहिले होते.[७]

१. शिचसा खंड २, ले. २४१, माइसंप १८३५ इवृ, पृष्ठ १७७. मइसा, खंड ८ ले. ४०
२. मइसा खंड २०, ले. ४७, पृष्ठ ७२ ३. HOS–JS, pp 205–208
४. शिचप्र, पृष्ठ ३२–३३; ताकाप-प, ले. १४३, ३६१, पृष्ठ १९५, ५४९
५. पेद खंड ३१, पृष्ठ ४० ६. मासघ–स ले. ७, पृष्ठ १४
७. शिचसा, खंड ८ ले. ४६

कविकलशाकडे कुडाळ भागाचा सुभा होता. १६८४ च्या एप्रिलमध्ये त्याचा मुक्काम पाटगावी होता. ज्याप्रमाणे लोक संभाजी राजांकडे तक्रारी घेऊन जात त्याचप्रमाणे कविकलशाकडे लोक आपली गाऱ्हाणी घेऊन जात असत. पाटगावच्या मुक्कामात पितांबर शेणवी चिटणिसाचा मुलगा जिवाजीराम चिटणीस हा कलशाला भेटला. पितांबर शेणवी यास शिवाजी महाराजांनी चिटणिसीबद्दल सालिना ४०० होनांची सनद दिलेली होती. पितांबर शेणवी मेल्यानंतर जिवाजीराम चिटणिसीचे काम करू लागला, परंतु त्याला वतन बारमाहे पाच होनांचा तह करून दिला होता. पालखी होती तीही बंद केली होती. इतक्या थोड्या रकमेत भागेना व उदरनिर्वाह करणेही कठीण होते म्हणून त्याने कलशाकडे तक्रार केली. त्यावर कविकलशाने त्याला १०० होनांची सनद करून दिली. जिवाजीराम याच्याकडून चिटणिसीचे काम घेत जावे म्हणून कलशाने कुडाळच्या भानजी गोपाळ सुभेदारास यासंबंधी कळविले होते.[1]

एप्रिल १६८४ मध्ये संभाजीराजे व इंग्रज यांच्यात तह झाला होता. इंग्रजांशी झालेल्या तहाच्या बाबतीत महाराजांनी प्रल्हादपंत वकील आणि कविकलश यांना विश्वासात घेतले होते. वकील किंवा कविकलश यांनी इंग्रजांना काही लिहिले तर त्यासंबंधी नीट दखल घेण्यास महाराजांनी मुंबईचा गव्हर्नर केजविन् यास लिहिले होते.[2] या तहापूर्वी प्रल्हाद निराजी न्यायाधीश व मुंबईकर यांच्यात झालेल्या पत्रव्यवहारात प्रल्हाद निराजीने इंग्रजांचा वकील, कविकलश व इतर सरकारकून यांना न भेटता परत गेल्याबद्दल खेद व्यक्त केला होता.[3] पोर्तुगेजांशी १६८३-८४ मध्ये झालेल्या तहात संभाजीने कलशालाच मुख्य अधिकार दिले होते.[4] अशातऱ्हेने अंबरचा राजा रामसिंग पोर्तुगेज, इंग्रज व संभाजी राजे यांच्यात झालेल्या राजकीय घडामोडीत कविकलश वाटाघाटी करीत असे. या सर्वांशी झालेल्या राजकीय हालचालीत कविकलशाने कोठेही फितुरी केलेली दिसत नाही.

**एकजुटीचे प्रयत्न :**

संभाजीमहाराज व कविकलश हे लोकांची एकजूट करण्यासाठी आणि त्यांची मने राजी राखण्यासाठी प्रयत्न करीत असत. १६८३ मध्ये संभाजीराजांनी बकाजी नावडकर यास कानदखोऱ्याच्या देशमुखाकडे काही मुद्यांची चर्चा

१. सासंइ-चा, ले. ३१, पृष्ठ २७
२. FR : Sambhaji to Bombay ( Keijwin ) April, 1684
३. FR : Pralhad Niraji to Bombay, 16-2-1684
४. पोम-पि, पृष्ठ ११२-११३

करण्यासाठी पाठविले होते. काही गोष्टी देशमुखांच्या मनासारख्या न झाल्यामुळे ते नाराज झाले होते. म्हणून कलशाने छत्रपतींना विनंती करून त्यांना राजांच्या भेटीस बोलाविले होते. दि. ३-८-१६८४ रोजी कलशाने देशमुखाला लिहिले की, "... ...त्यावरून आम्ही रा. छत्रपतीस्वामीस विनंती करून तुम्हास भेटीस यावयाची आज्ञा केली आहे. येणे मुदा मनास आणून तदनुसार पारपत्य करून देऊ. या प्रसंगी अवघे वतनदार एकमते राहोन गनिमास सजा द्यावी. आपली सरफराजी करून द्यावी."[१] हे पत्र फार महत्त्वाचे आहे. राज्यात देशमुख नाराज व असंतुष्ट झाले तर त्यांची प्रत्यक्ष संभाजीराजांशी गाठ घालून त्यांचे समाधान करण्याचा प्रयत्न कलशाने केलेला दिसतो. वतनदारांची एकजूट करून त्यांनी एकमताने वागून मुघलांचे पारिपत्य करावे म्हणून कविकलशाने प्रयत्न केले होते. वरील पत्रावरून कलशाला शत्रूच्या बंदोबस्ताचे महत्त्व कळलेले दिसते. तो स्वतः शत्रूशी फितुर दिसत नाही. उलट वतनदारांनी एकत्र येऊन मुघलांशी सामना द्यावा म्हणून त्याने प्रयत्न केलेले दिसतात.

कविकलश सर्वच बाबतीत स्वतःच्या अधिकारात एकटाच निर्णय घेत नसे. पुष्कळ प्रसंगी तो इतर प्रधान मंडळींच्या सल्ल्याने निर्णय घेई. महादजी जगदाळा व संताजी घाडगा यांच्या शेतातील अनेक वस्तू सितोजी व त्याचा भाऊ सटवोजी भोसले यांनी चोरल्या होत्या. सितोजी भोसले यांनी चोरले किती याविषयी साक्षी गोळा केल्यानंतर मुख्य प्रधान नीळकंठ मोरेश्वर, प्रल्हादपंत न्यायाधीश, हंबीरराव सेनापती व कविकलश यांनी एकत्र बसून निर्वाह केला होता की, जर खोट्या गोष्टी दिसून आल्या तर संभाजी राजे कोणाची गय करणार नाहीत. चोरीच्या निकालपत्रावर प्रधान, न्यायाधीश व सेनापती यांचे शिक्के आहेत. पण त्यावर कलशाचा मात्र शिक्का नाही.[२]

१६७४ पूर्वी चेऊल भागात पडिक जमिनीवर काही जादा कर घेतले जात होते. पडिक जमिनीवर लादलेले कर ( खरावे ) कमी करावे म्हणून चेऊलचा सुभेदार बहिरो त्रिमल यांनी शिवाजीमहाराज व मोरोपंत पेशवे यांना सांगितले होते की जमिनीत उबार राहिला नसल्याने हरि शिवदेवला दहा-बारा वर्षे कर देता आला नव्हता. १६७४ मध्ये शिवाजीमहाराज व पेशवे यांनी कर रद्द करण्याची आज्ञा दिली होती परंतु शिवाजीमहाराज कोलवंडतर्फे स्वारीस गेल्यामुळे हरि शिवदेऊला सनद मिळाली नाही. अशा तऱ्हेचे खरावे इतर ठिकाणी घेतले जात नव्हते. ते फक्त चेऊलमध्येच घेतले जात असल्यामुळे दि. १६–८–१६८४ रोजी हरि शिवदेऊ याने कविकलशाला जादा कर रद्द करण्याविषयी विनंती केली.[३]

१. शिचसा, खं. ५, ले. ८७२ २. मइसा, खं. १५, ले. ११

३. पेद, खंड ३१, ल. ४३, पृष्ठ ३८–३९

शहाजी महाराज व शिवाजी महाराज यांच्या वेळेपासून पुण्यातील देशमुख व देशकुलकर्णी यांना अनुक्रमे ३०५ व ९५ होनाची इनामती खंडणीची मोइन करून दिली होती. मुलूख खराब पडल्यामुळे दस्तमाफीक इनामती खंडणी देशमुखांपासून देशमुखांची, व देशकुलकर्णी यांची देशकुलकर्णी यापासून, घेतली जावी म्हणून मोरो विठ्ठल देशकुलकर्णी याने अर्ज केला होता. त्यांना ज्या सवलती मिळाल्या होत्या त्या सवलती कविकलशाने दि. २२–३–१६८५ रोजी पुण्याचा बाबाजी तानदेऊ सुभेदार व कारकून यांना पत्र लिहून मोरो विठ्ठल याला सवलती देण्यास लिहिले होते.[1]

## वतनाचा निवाडा :

शहाजी–शिवाजी यांच्या वेळेपासून वतनासाठी वतनदारांत नेहमी तंटे होत असत. पुष्कळवेळा एकाचे वतन काढून दुसऱ्याला दिले जात असे किंवा जबरदस्तीने एखाद्याचे वतन घेतले जात असे. चिपळूण येथील एका वतनाच्या वादात कविकलशाचा संबंध आला होता. काळों परशुरामची बायको गोतमाई हिने नवरा मेल्यानंतर व विनाजी व नरसो हे पुतणे विजापुरकराकडे नोंकरीस गेले होते म्हणून, चिपळूण येथील आपल्या वतनाचा कारभार पाहण्यासाडी तिमाजी भास्कर व गंगाजी भास्कर यांना नेमले. हे दोघे वतनावर हक्क सांगू लागले. त्यामुळे गोतमाईने आपल्या बहिणीचा मुलगा कृष्णाजी सोमनाथ याची वतनावर नेमणूक केली. तेवढ्यात गोतमाईचा पुतण्या विनाजी परत आला. तेव्हा त्याने तिमाजी व गंगाजी भास्कर यांना दूर करून कृष्णाजी सोमनाथ याच्या नावाने वतन करून दिले. गोतमाईला मुलगा नव्हता. तिने कृष्णाजी पंताचा एक मुलगा दत्तक घेण्याचे ठरविले. तिच्या सांगण्यावरूनच कृष्णाजीचा मुलगा जनार्दन याला विनाजीच्या मांडीवर दत्तक देण्यात आले. तेवढ्यात विनाजीला मुलगा झाला. काही दिवसांनी विनाजीने कृष्णाजीपंतास लिहून दिले की त्याच्या दोन मुलांनी व कृष्णाजीचा मुलगा हरीने एकदिलाने वंशपरंपरेने वतनाचा उपभोग घ्यावा.

संभाजी महाराजांच्या कारकीर्दीत या वतनासंबंधी वाद निर्माण झाला. अण्णाजी दत्तोने संगमेश्वरच्या देशकुलकर्णीस कोणी खावंद नाही म्हणून महाराजांकडून संगमेश्वरचे देशकुलकर्णीचे वतन करून घेतले. हे कळताच राहूजी सोमनाथानेही अण्णाजी दत्तोच्या शिवेशेजारी वतनाची मागणी केली. त्या सुमारास तिमाजी भास्करचा पुतण्या ( ज्याला गोतमाईने दूर केले होते ) रायगडास होता. त्याने राहूजीस व अण्णाजीपंतास सांगितले की, चिपळूणच्या देशकुलण्यांचे वतनावर कोणी नाही. तिमाजीने चिपळूणचे देसकुलकर्णवतन राहूजी सोम-

१. पेद, खं. ३१; ले. ४५, पृष्ठ ३९–४०

नाथाच्या नावाने करून दिले. ही गोष्ट कृष्णाजीपंताला कळली म्हणून फडास जाऊन या वतनाकरिता त्याने ६ महिने वाद घातला. सरकारकुनांपुढे कृष्णाजी व राहूजी यांच्या वादाचा निकाल लागला नाही. एका प्रसंगी कविकलश संगमेश्वराहून परशुरामाला गेला होता. राहूजी सोमनाथ चिपळूणला गेला. कलश परशुराम येथे भोजनास थांबला असता कृष्णाजीने विनाजी व त्याचे दोन पुत्र यांना कलशाच्या पायांवर घालून जुलूम होत आहे, दाद मिळावी म्हणून अर्ज केला. तेव्हा कलशाने कारभारी कोनेरपंत यास रागानेच विचारले की, " हे प्रकरण माझ्यापर्यंत का आले, तुम्हीच याचा निकाल लावावयास हवा. " त्यावर कोनेरपंताने कृष्णाजीस निवाडा करून देतो म्हणून सांगितले.

कोनेरपंत व कृष्णाजी रायगडला गेले. तेथे कोनेरपंताने कृष्णाजीच्या तोंडून सर्व हकीकत ऐकून घेतली. सहज एकदा कविकलश भोजनास बसला होता. त्यावेळी पंडितांनी येऊन न्यायनीतीच्या शास्त्राची चर्चा केली. त्यामध्ये एकाची वृत्ती छेद करून दुसऱ्यास देणे या पापाला जोड नाही अशी वाक्ये उच्चारली गेली. ही संधी साधून कोनेरपंताने कलशास सांगितले की, कृष्णाजीचे वतन खरे आहे. निष्कारण त्याच्यावर अन्याय होत आहे. शास्त्राच्या बोलण्यात व त्याच्या सांगण्यात एकवाक्यता झाल्यावरून कलशाचे मन द्रवले. त्याने निश्चय केला की राहूजीपंताचे वतन दूर करून कृष्णाजीचे वतन त्याचे त्यास द्यावे. तेवढ्यात राहूजीपंताने त्वरा करून चिपळुणास जाऊन महजर करून लोकांस तश्रीफा द्यावयाची ताकीद केली. कृष्णाजीने विनाजीला सांगितले की जेथे सभागण जमले असतील तेथे जाऊन जुलुम होतो म्हणून बोंब मार. सुरवातीला अपशकून नको म्हणून राहुजीचे लोक आपापल्या घरी गेले. राहुजीपंत एवढेसे तोंड करून परशुरामास गेला. तेथे कलशाची भेट झाली झाली. तेव्हा कलश राहुजीला म्हणतो, " तुम बुढे होकर राज्याजीका निशा कर कर गरीब बमणका वतन लेकर तुम लेते हो ये मनसुफी हम जानता नही। राज्याजीने दिया तुम राज्या देखकर लेवा। " म्हणून निःभृंसून सांगितले. नंतर कलश निघून गेला. राहूजीपंत डोलीत बसून निघाला असता वाटेत कृष्णाजी पंताने आपली डोली उभी केली व त्यास म्हणाला की, " राहुजीनाना तु म्हातारा जाला आहेस. उद्या मरोन जासील, तुजपासी पटकुल अपरांपर असता तुझ्या पुत्रास काय उणे आहे ? हे टाकून माझ्या आंगावरील घोंगडी जुनी बलात्कारी हिरोन घेतोस. "

कृष्णाजीपंताने वतनाचा मामला सोडला नाही. त्याने रायगडास जाऊन भगवे कपडे घालून उपोषण आरंभिले. संभाजीराजे रोज बाहेर येताच त्यांना तो मुजरा करू लागला. महाराज एकदा गांगोलीस गेले. तेथेही कृष्णाजी गेला. डोहात होड्या टाकून राजे तेथे गेले, तेव्हा तेथे कृष्णाजीपंत उभा राहिला व त्याने महाराजांना हाका मारल्या, " साहेब सर्वज्ञ, शास्त्रार्थाचा अर्थ स्वतः

पंडिताचा निशा होय, ऐसा करितातो ऐसे असोन माझे पारिपत्य होत नाही."
महाराजांनी कृष्णाजीपंतांची कहाणी ऐकून घेतल्यानंतर त्यांनी न्यायाधीश प्रल्हादपंतास योग्य तो न्यायनिवाडा करण्यास सांगितले. प्रल्हादपंतानी सांगितले की, "थोरले महाराज होते ते थोराची भिड पडली तऱ्ही एकाचे वतन काढून दुसऱ्यास सहसा दिल्हे नाही. आणि साहेब महाराज पुत्र भीडेमारने या ब्राह्मणचे खरेखुरे असता बलात्कारे काढून दिले." त्यावर महाराजांनी राहूजीपंताचे कुलकर्ण दूर करून कृष्णाजीपंतास करार करून राजश्री प्रल्हादपंती राजपत्र व आपले पत्र दाभोळचे सुभेदार वेंकाजी निमदेव ह्यास दिले. कृष्णाजीपंत वतन उपभोगू लागला. वतनाच्या करीन्यात संभाजीच्या काळातील रघुनाथ नारायण पंडित, प्रल्हाद पंडित, रामचंद्र पंडित, शंकरजी पंडित, परशुराम पंडित, कोनेरपंत व कवजीबाबा अशी नावे आहेत.[1]

या वतनाचा वाद राजारामाच्या कारकीर्दीत पुन्हा उद्‌भवला. राहूजी सोमनाथ व कृष्णाजी सोमनाथ मरण पावले होते. कृष्णाजीपंताचा मुलगा हरि राजारामास भेटला. वतनाच्या कागदात हरीचे नाव नव्हते. परंतु त्याने आपल्या पुत्रांनी व हरिपंतांनी मिळून वतनाचा उपभोग घेण्याविषयी विनाजीचे पत्र दाखविले. पत्रात हरिपंतांचे नाव घातले. राजारामाच्या कारकीर्दीत पैशाची अडचण निर्माण झाली होती. हरिपंतांच्या नावे दोनशे रु. येणे होते. तेवढ्यात राहूजीपंतांच्या मुलांनी राजारामास सांगितले की चिपळूणचे कुलकर्णाचे वतन संभाजी राजांनी दिले आहे. त्यावर राजाराम बोलले की, "दाजीने एकाचे वतन काढून दुसऱ्यास काय समजोन दिल्हे ?" त्यांनी राहूजीपंतांच्या मुलांच्या नावे वतन करून दिले.[2] अशा तऱ्हेने कृष्णाजीवर झालेला अन्याय संभाजी महाराजांच्या कारकीर्दीत दूर होऊन त्याचे वतन त्यास मिळाले होते. गोतमाईच्या हकीकतीवरून कृष्णाजीच्या मुलांचाच वतनावर अधिकार होता, परंतु राजारामाच्या कानावर राहूजी सोमनाथाच्या मुलांनी अर्धवट मजकूर घालून आपल्या नावाने पुन्हा वतन करून घेतले.

कविकलश राज्यकारभारातच लक्ष देत होता असे नाही; वेळप्रसंगी तो इतर सरकारकुनांप्रमाणे युद्धाच्या आघाडीवरही जात असे. १६८५ सालापर्यंत संभाजी महाराजांचे अनेक ध्येयनिष्ठ सेवक धारातीर्थी पडले होते. अनेक आघाड्यांवर मराठ्यांना मुघलांबरोबर मुकाबला करावा लागत होता. दि. १४–१–१६८५ च्या सुमारास मुघल अधिकारी शाबदीखान रायगडावर चढाई करण्यासाठी पुण्याहून दौड करून बोरघाट उतरून गांगोलीस गेला. त्यावेळी

१. भाइसंमं, द्वितीय संमेलन वृत्त, १८३६ पृष्ठ ५२ ते ६७
२. पेद. खं.३१, ले. ७९, पृष्ठ ७०–७१

कविकलशाने त्याच्याशी सामना देऊन त्याला परतविले होते.[1] अशा तऱ्हेने आलेल्या संकटाला इतर सरदारांबरोबर कलशानेही तोंड दिले होते.

एकीकडे संभाजी राजे व त्यांचे अनुयायी स्वराज्याचे संरक्षण करीत होते; तर दुसरीकडे महाराज मुघलांच्या आक्रमणाविरुद्ध विजापूरकर व गोवळकोंडेकर यांच्या मदतीस धावून जात होते. १६८५ च्या जून-जुलैमध्ये संभाजी राजांनी कविकलशास विजापूरकरांना मदत देण्यास सांगितले तेव्हा कलशाने पन्हाळ्यास जाऊन तेथून विजापूरकरांच्या मदतीस फौजा रवाना केल्या.[2]

सुलतान अकबरला गोव्याच्या हद्दीतून परत आणल्यानंतर संभाजी राजांनी त्याचा उपयोग पोर्तुगेजांबरोबर झालेल्या तहात मध्यस्थ म्हणून करून घेतला. त्यानंतर अकबर साखरपा, राजापूर या परिसरात वावरत होता. येथून तो संभाजी राजे व कविकलश यांच्याशी पत्रव्यवहार करीत राहिला. दि. २७–७–१६८४ ते डिसेंबर १६८४ पर्यंत अकबराने कविकलशाला पाच पत्रे लिहिली.[3] या पत्रव्यवहाराची सविस्तर माहिती अकबर प्रकरणात दिलेली आहे. १६८४ च्या ऑगस्टमध्ये कविकलश आजारी होता. त्याच्या आजारपणासंबंधी अकबराने आपल्या पत्रात उल्लेख केलेला आहे.[4] कविकलश आजारी असल्यामुळे गोवेकरांनी त्यास फिरंगी औषधे पाठविली होती.[5] पोर्तुगेजांबरोबर झालेल्या तहात कविकलश व निळो मोरेश्वर प्रधान यांच्यात मतभेद झाले होते.[6]

१६८६ मध्ये औरंगजेबाने विजापूर व गोवळकोंडा ही राज्ये हस्तगत केली. त्यावेळी मराठ्यांच्या सरहद्दीवरील देसायांची मनःस्थिती विचलित झाली होती. औरंगजेबाने अनेक सरदारांना जहागिऱ्या देऊन त्यांना आपल्या पक्षात ओढण्याचा प्रयत्न केला होता. या देसायांपैकी काहींना दिलासा देऊन स्वराज्याशी एकनिष्ठ राहण्याविषयी संभाजी महाराज व कविकलश प्रयत्न करीत होते. दि. २४–११–१६८६ रोजी मोंधेगौडा देसायाला कलशाने पत्र लिहून त्याची मैत्री व एकनिष्ठता संपादण्यासाठी प्रयत्न केले होते.[7] कलश स्वतः शत्रूला फितूर झालेला नव्हता. उलट देसायांनाच मराठ्यांच्या बाजूने लढण्याविषयी त्याने प्रयत्न केलेले दिसतात.

## हुकमांची अंमलबजावणी :

कविकलशाला मुख्य प्रधान किंवा न्यायाधीशाचे पद दिलेले नव्हते. पंतप्रधानाने किंवा न्यायाधीशाने दिलेल्या हुकुमाची अंमलबजावणी कविकलश आपल्या प्रांतातील अधिकाऱ्याकडून करवून घेत असे. राजापूर प्रांतातील रागदे

१, २. शिचप्र, पृष्ठ ३३ — ३, ४. मोमसं–प, पृष्ठ ६५–६७

५, ६. पोम–पि, पृष्ठ ३२७, ११५ — ७. शिचसा, खं. १२, ले. २, पृष्ठ ५

प्रभू व चांद प्रभू, देशमुख यांचे वारसदार गोविंद प्रभू याच्याकडे देशमुखीच्या वृत्तीसंबंधी पहिल्या तक्षिमा ठरल्या होत्या. तरी तो उगाच भांडण काढून जास्त हक्क तक्षिमा मागत होता म्हणून निळो मोरेश्वरने महाराजांच्या आज्ञेनुसार दि. १०–५–१६८५ रोजी राजापूरचा देशाधिकारी देवाजी विठ्ठल यास लिहून कळविले होते की, "गोविंद प्रभू कथला करून जाजती हक्क तक्षीम मागतो म्हणून हुजूर कळो आले त्यावरून तुम्हास आज्ञापत्र सादर असे याच्या तक्षिमा पहिल्या जाहाल्या असता जो कथला करील त्याला ताकीद करून हालखुद ठेवणे ज्याजस्ती करू न देणे."[१] वरील निर्णयाप्रमाणेच कविकलशानेही दि. २५–६–१६८५ रोजी राजापूरचा देशाधिकारी गंगाजी बाबाजी याला कळवून अंमलबजावणी करण्यास सांगितले होते.[२]

**फितुरीचे आरोप :**

ईश्वरदास नागरने आपल्या फुत्हाते आलमगिरी यात कविकलशाच्या फितुरीसंबंधी वर्णन केले आहे. "कविकलश हा संभाजीचा मंत्री होता. राज्यव्यवस्था उत्तम ठेवणे आणि किल्ल्यांची निगा राखणे इ. कामे तो झटून करीत असल्यामुळे संभाजीची त्याच्यावर कमालीची मर्जी बसली होती. संभाजीच्या कारभाऱ्यांपैकी काहींना कवि कलशाच्या उत्कर्षासंबंधी मत्सर वाटला. त्याला त्याच्या हुद्द्यावरून खाली आणावे आणि त्याच्या जागी दुसऱ्याची स्थापना करावी असे त्यांनी ठरविले. या उद्देशाने ते रात्रंदिवस त्याच्या मागे लागले. त्याच्या चांगल्या कामाचाही विपर्यास करून त्यांनी त्याला बदनाम केले. शेवटी त्यांनी त्याला हुद्द्यावरून खाली ओढले. कवि कलश हा फजीत पावून खेळण्याच्या किल्ल्यात जाऊन बसला.

"कविकलशचे खेळण्याच्या आश्रयाने जाऊन बसणेही त्याच्या विरोधकांना आवडले नाही. त्याचा सर्वनाश करावा म्हणून ते झटू लागले. खेळण्याच्या किल्ल्यातही आपल्याला सुरक्षितता नाही असे कवि कलशाला वाटू लागले. संभाजीचे काही सरदार संभाजीवर चिडले होते. कविकलश आणि वरील सरदार सेवेत हजर झाले. बादशहाकडून त्यांचा योग्य तो मानसन्मान करण्यात येऊन त्यांना मन्सबी देण्यात आल्या......कविकलश आणि त्याच्याबरोबर गेलेले सरदार यांचे बादशहापाशी अर्जित होत असलेले पाहून संभाजीचे इतर सरदारही बादशहाच्या सेवेत हजर होऊन त्याची चाकरी करू लागले."[३] यानंतर संभाजी राजांनी कविकलशास पत्र लिहून आपल्याकडे बोलावून घेतले. नंतर कविकलश संभाजीकडे येऊन, त्याने फितुरी करून राजांना मुघलांच्या हाती पकडून देण्याचे कारस्थान केले, असे ईश्वरदास नागर लिहितो.

१. व २. ऐसंसा, खं. ११, ले. १, २, पृष्ठ १ ३. मोमसं–प, पृष्ठ २८–२९

औरंगजेबाला सरळ मार्गाने संभाजीमहाराजांविरुद्ध लढून यश मिळेना. कट, कारस्थाने करून, फितुरीने महाराजांना पकडण्यासाठी औरंगजेबाने कविकलशाला पत्रे लिहिली. नजराणे व पैसा दिल्याने कलशाने संभाजीला पकडून देण्याचे बादशहाला कबूल केले.[1] असे इटालियन प्रवासी मानुत्‌ची याने लिहिले आहे. मानुत्‌ची, ईश्वरदास नागर व रॉबर्ट ऑर्मे यांनी कलश फितुर झाला असे म्हटले आहे. परंतु इतर फारसी व मराठी साधनांत फितुरीचा पुरावा मिळत नाही.

मुघल सरदार सय्यद अब्दुल्लाखान हा रायगडला वेढा घालण्याच्या विचारात होता. बादशहाने आज्ञा केली की संभाजी राजांचा मेव्हणा महादजी याने रायगड किल्ल्याची मेणाची प्रतिकृती तयार करावी. या कामात कविकलशाचा मुलगा याने महादजीला मदत करावी.[2] असे ईश्वरदास नागरने नमूद केले आहे.

१६८८ सालापासून तो कवि कलशाचे संभाजी राजांप्रमाणेच हालहाल होऊन शेवट होईपर्यंतची हकीकत “ दुर्दैवी शेवट ” या प्रकरणात दिलेली आहे. त्यातही कोठेच कलशाचे गैरवर्तन किंवा फितुरी दिसत नाही.

राजारामाच्या काळात कविकलशाच्या बायकोचे व मुलांचे खूप हाल झाले. शेवटी कंटाळून ही मंडळी मारवाडात निघून गेली. अशा तऱ्हेने संभाजीशी आठनऊ वर्षे एकनिष्ठ राहिलेल्या कलशाचा व त्याच्या कुटुंबियांचा शेवट झाला.

## मुलकी खाते : राजकीय विभाग व त्यावरील अधिकारी

महाल हा सर्वांत लहान राजकीय विभाग होय. हे देशमुखांच्या परगण्यावर ठरविलेले असत. त्यामुळे महालांची आणि परगण्यांची नावे बहुतेक एकच असत. परगण्याप्रमाणे महालही लहानमोठा असे. हवालदार हा महालावरचा अधिकारी. त्याचा दिवाण मुजुमदार–हवालदार व कारकून मुजुमदार या जोड नावाने त्याला पत्रे जात.[3] महालातील वसुलाच्या बाबी, दिवाणी–फौजदारी स्वरूपाचे दावे आणि राजकीय उलाढाली यावर हवालदाराची देखरेख असे आणि मुजुमदार हिशेबी व्यवहार उलगडी. महालाच्या व्यवस्थेकरिता हवालदाराच्या हाताखाली शिपायांची तुकडी असे. या तुकडीचे अंमलदार नाइकवाडी या नावाने ओळखले जात.[4] गाव वतनदार आणि परगणे वतनदार आपली कामे कशी करतात ते हवालदार पाही. परगणा मोठा असल्यास त्याच्या तर्फातर्फाने

१. SM–NM, Vol. II. p 310 २. मोमसं–प, पृष्ठ २६, २७

३. शिचसा, ले. ६७; शिचसा, खं. २ ले. १३७; शिचसा, खं ९ ले. १४९, १७७, शिचसा, खं. ५ ले. ९९४

४. शिचसा, खंड ८ ले. ४९

हवालदार नेमले जात. पुणे आणि वाई असे मोठे परगणे होते. त्याशिवाय कुडाळचा परगणा होता.[१]

अनेक हवालदार व परगणे वतनदार यावरील सुभेदार हा वरिष्ठ अंमलदार होय. याची कचेरी तो सुभा. सुभेदार म्हणजे देशाधिकारी. सुभेदाराला मुजुमदार, 'निधावान' (त्याच्या खालचा कारकून) असून त्याच्याजवळ शिबंदीही असे. त्याला चिटणीस, दप्तरदार, पोतनीस, सभासद वगैरे निरनिराळ्या हिशेबी विभागांच्या कामांकरिता कारकून असत. सुभेदार किंवा देशाधिकारी ह्यांचे प्रत्यक्ष नाव दिलेले असून त्याच्या जोडीस कारकून, असे कारकुनाचे नाव न देता नुसतेच म्हटलेले असे; 'सुभेदार व कारकून किंवा देशाधिकारी व देशलेखक'. सुभेदार व देशाधिकारी हाच मुख्य व त्यासच संभाजीराजांच्या काळात अनेक पत्रे लिहिलेली आढळतात.[२] संभाजी सुभेदार वारंवार बदलीत असे. सुभेदाराने हयगय केली तर त्याला जरबेचे पत्र लिहिले जात असे.[३] लाख, सव्वा लाख उत्पन्नाच्या प्रदेशावर एकेक सुभेदार असे. ( सुभेदारांची व देशाधिकाऱ्यांची यादी परिशिष्टात जोडलेली आहे. )

**सरसुभेदार** : सुभेदाराच्या वरचा अधिकारी सरसुभेदार आणि त्याचा देशी प्रतिशब्द 'मुख्य देशाधिकारी' ह्या सुभेदाराच्या जोडीलाही 'कारकून', एवढेच मोघम लिहिलेले असते. ही सरसुभेदारी सूचित करताना महालानिहाय म्हणजे अनेक परगणे असे लिहिलेले असते. मुख्य देशाधिकारी व 'देशलेखक' या नावाने पत्रव्यवहार होत असे. पुण्याचा नागोजी बल्लाळ, दामाजी रघुनाथ; कुडाळचा धर्माजी नागनाथ; चेऊलचा तुळजोजी गे; कऱ्हाडचा वेंकाजी रुद्र असे पाच सरसुभेदार होते.

राज्याच्या व्यवस्थेसाठी पूर्वीप्रमाणेच राज्याची विभागणी पुणे, मावळ, कल्याण, इंदापूर, सुपे, माऊली, सातारा, वाई, कऱ्हाड, मलकापूर, राजापूर, कुडाळ, कोपल, दाभोळ या प्रांतांत केलेली होती. महाराज व सुभेदार, मुख्य देशाधिकारी व सुभेदार, अष्ट प्रधान व सुभेदार असा निरनिराळ्या सुभ्यातील सुभेदारात पत्रव्यवहार होत असे. या पत्रव्यवहारावरून महाराज, अष्टप्रधान व इतर अधिकारी राज्यकारभारात जातीने कसे लक्ष देत होते याचा बोध होतो. संभाजीमहाराजांना राज्यात गैरकारभार, अफरातफर केलेली खपत नसे. कोणावरही अन्याय झालेला चालत नसे. त्यांची एक प्रकारची शिस्तशीर, काटेकोरपणाची आणि कडक वागणूक त्यांच्या पत्रव्यवहारावरून दिसून येते. रयतेची गाऱ्हाणी संभाजीमहाराज आणि त्यांचे प्रधान ऐकून घेत. त्यांच्या शंकांचे निरसन

१. मइसा, खंड २०; ले. २८१; सासंइ–चा ले. ३१; पेद ३१–ले. १८४
२. संकाप–जो,
३. शिचसा, खं. १०-ले. १५

करीत. बेकायदेशीर किंवा गरवर्तणुकीच्या गोष्टी घडल्या तर ते योग्य ती कारवाई करीत.

**शिस्तीची उदाहरणे :**

राज्यात बेकायदेशीर गोष्टी घडल्या तर त्यांचे निराकरण कसे होई याचा बोध खालील उदाहरणावरून होईल. १६८१ च्या सुमारास परगणे शिराळे येथील तुळाजी देसाई निकम याच्याकडे देशमुखीच्या बिलासी तर्फेचा बारा गावांचा भोगवटा चालत असता सोमाजी बांदल याने बळेच वारणेचे देशमुखीकडे ते कमाविशीस लावले होते. १६८१ साली मे-जूनच्या सुमारास संभाजी-महाराज पन्हाळ्याहून शिराळेच्या बाजूस गेले होते. त्यावेळी तुळाजी देसायाने त्याच्यावर झालेल्या अन्यायाचे वर्तमान राजांना विदित केले. तेव्हा त्यांनी वारणेचे देशमुखीकडे ओढत असलेले बारा गाव सिरालेकडे लावून देशमुखीचा कारभार तुळाजीच्या हातून भोगवट्याप्रमाणे घेत जावा म्हणून कृष्णाजी भास्कर या सुभेदारास आज्ञा केली. सोमाजी बांदल याने हरामखोरी केली म्हणून स्वामींनी त्याला शिक्षा केली. त्याची वारणेची मिरासी देशमुखी दिवाणात अमानत केली. खंडेराव पानसंबल यानी तुळाजी कद्रूला कमाविशेस पाठविले होते. तो त्या बारा गावासंबंधी भांडत राहिला. त्यासंबंधी स्वामींनी पारपत्य करावे म्हणून तुळाजी देसायाने त्यांना कित्येक तपशिलाच्या गोष्टी सांगितल्या. तेव्हा महाराजांनी दि. १२–६–१६८१ रोजी मलकापूरच्या राजश्री बापूजी त्रिंबक देशाधिकारी व लेखक यास राजाज्ञा देऊन कळविले की, "...तुळाजी कद्रू यासी कथला करावया काय गरज. या उपरी रोखा देखताच बिलासी तर्फेचे बारा गावीचे देशमुखी तुळाजी निकम देशमुख याचे भोगवटा महत कदम चालत आला असेल तेणे प्रमाणे बाराही गावीचे देशमुखीचा कारभार याचे हाते ( घेत जाणे ). दिरंग व उजूर न करणे. सदरहू बारा गाव बिलासी तर्फेच सिरालियाखाले दिधले आहेती तरी पा। मा।कड बारा गाव देऊन तेथील देशमुखीचे कार्ये तुळाजी निकम देशमुख याचे हाते घेत जाणे उजूर न करणे." या पत्रावरून गैर कायदेशीर गोष्ट घडल्यास विलंब न लावता संभाजी राजे अन्याय दूर करीत असत असे दिसते.[1]

१६८४ सालापूर्वी मामले चेऊल येथील दादाजी महादेऊ देसाई व देसकुलकर्णी यांच्यात व माजी सुभेदार राघो विश्वनाथ यांच्यात काही निमित्ताने भांडण झाले होते. म्हणून दादाजी महादेऊ हा राजश्री निळोपंत पेशवे हे महागडी होते तेव्हा तेथे गेला. त्याने पंतांना सर्व वर्तमान विदित केले. तेवढ्यात राघो विश्वनाथ सुभेदाराने दादाजी महादेऊच्या अपरोक्ष त्याच्या घरातील हीण रुपये,

१. शिचसा, खंड ६, ले. १११

५ सनगे, मण्याची कंठमाला, २ रुद्राक्षाच्या माला, कुडकियाचे मोती, ६ मण रोकड, पितळ्याची थाली, पाखाडीचे तपेले, खुर्द तपेले अशी सवा अठरा शेराची भांडी नेली, म्हणून दादाजी निळोपंतांजवळ वर्तमान विदित केले. हे कळताच पेशवे निळोपंत यांनी दि. ११–२–१६८४ रोजी संभाजी महाराजांचे राजाज्ञा-पत्र देऊन सुभेदाराकडून नगनगोटी व वस्तभाव सुभ्यात जमा करण्याविशी राजश्री सुभेदार व कारकून यास लिहून कळविले होते. या पत्रावरून एखाद्या सुभेदाराने बळजबरीने कोणावर अन्याय केला तर संभाजी राजे व निळोपंत पेशवे त्याचे त्यास परत देऊन अन्याय कसा दूर करीत हे दिसते.[१]

संभाजी महाराजांच्या कारकीर्दीत सर्व बाबींप्रमाणेच धार्मिक बाबींच्या व्यवहारातही दक्षता घेण्यात येई. चाफळ देवस्थानचा गैरकारभार, रामदास स्वामींच्या शिष्यांची भांडणे, यात्रेकरूंना दिलेला त्रास व केलेली अफरातफर या-संबंधी विस्तृत चर्चा 'संभाजीचे आर्थिक धोरण' या प्रकरणात केलेली आहे.

मराठी राज्यात राहण्याऱ्या इंग्रजांनाही संभाजी महाराजांनी कोणत्याही जादा सवलती दिल्या नाहीत. शिवाजी महाराजांनी १६८० साली इंग्रजांबरोबर तह केला होता. त्या तहातील अटींबरोबरच जादा कडक अटी घालून संभाजी राजांनी १६८४ साली इंग्रजांशी तह केला. या तहाच्या अटी संभाजी महा-राजांचा राज्यकारभार, न्याय आणि शिस्त या विषयात अत्यंत बोलक्या आहेत. इंग्रजांनी कर्नाटकातील मराठी राज्यात वखारी घालण्याची परवानगी मागितली होती; संभाजीने त्या वखारी ठराविक जमिनीत आणि आकारात बांधण्याची अट घातली होती. वखारीसाठी ६० कोविद ( Covid ) लांब आणि १५ कोविद रुंद जमीन द्यावी; वखारीची उंची २$\frac{1}{2}$ कोविद आणि भिंतीची रुंदी $\frac{1}{2}$ कोविदपेक्षा जास्त नसावी; ही जागा अपुरी पडली तर त्याच लांबीचे एक घर बांधावे किंवा इतरांप्रमाणे बाजारात दुकान बांधावे; तटबंदीसारख्या मोठ्या वखारी बांधू नये अशा अटी घातलेल्या होत्या. ज्या इंग्रजांना कॅ. रिचर्ड केजविन याने मान्यता दिली असेल अशा इंग्रजांनाच या वखारींची परवानगी मिळावयाची होती.

मराठी राज्यात मालाची ने-आण करताना इंग्रजांना मजूर व रखवाली-साठी नोकर ठेवावे लागत. यांच्या संख्येवरही बंधन घातलेले होते. "अशी माणसे मालाच्या दृष्टीने जरूर तेवढीच ठेवावीत आणि तसे केल्यास सुभेदार किंवा इतर अधिकारी त्यांना अडवणार नाहीत. परंतु ते जर जरूरीपेक्षा अधिक ठेवतील तर त्यास परवानगी मिळणार नाही." असे इंग्रजांना बजावण्यात आले होते.

प्रत्येक प्रांतात तेथील अधिकारी आपापली कामे व्यवस्थित करीत असत. कोणत्याही तऱ्हेने विलंब होऊ दिला जात नसे. केसो त्रिमल याने दि.

१. शिचसा, खंड ९, ले. ६१ पृष्ठ ६२

१२–८–१६८३ रोजी चेऊलच्या बाबाजी महादेऊ देशकुलकर्णी यास पत्र पोचताच स्वार होऊन येण्याविषयी लिहिले होते. येताना महालीचे कर व समजाविसी कागद घेऊन येण्यास बजावले होते.[१] त्याचप्रमाणे रंगाजी सबनीस यांनी चेऊलचा सुभेदार चिमणाजी आऊजी याला पत्र पाठविले होते. त्याचे उत्तर चिमणाजी आऊजीने पाठविले होते. त्यावरून मजकूर काय आहे ते दामाजी कुलकर्णी यास कळले होते. हे कळूनसुद्धा दामाजी कुलकर्णी चिमणाजीला भेटला नव्हता. दि. ११–२–१६८५ रोजी चिमणाजीने दामाजीस विलंब न लावता ताबडतोब येण्यास कळविले होते.[२] (या पत्रावर चिमणाजीची लांबट वर्तुळाकार मुद्रा आहे.)

**देशमुखांचे महत्त्व :**

संभाजीमहाराजांनी रयतेचा विश्वास देशमुखांवर असतो हे जाणले होते. त्यांनी त्यांच्याशी चांगले संबंध ठेवण्याची खटपट केलेली दिसते. मुघलांच्या आक्रमणाच्या संकटात आणि राज्यात निर्माण झालेल्या अंतर्गत फुटीच्या प्रसंगी देशमुखांना सांभाळणे श्रेयस्कर होते.

देशाधिकाऱ्यांनी त्यांच्या बाबतीत हयगय केली तर ती संभाजीराजांना खपत नसे. या संबंधात राजे दि. ३–१–१६८४ रोजी प्रांत जावळीचा देशाधिकारी विठ्ठल शंकर यास लिहितात, "दत्ताजी केशवजी पिसाळ देशमुख, तर्फ जोरखोरे, यांसी कै. स्वामींनी (शिवाजीमहाराजांनी) हक्कवतन करून दिल्हे आहे. त्याप्रमाणे मोईन चालत आले. हल्ली कुसूर होतो तरी हे दिवसात गनीम कोकणात पेशक (शत्रू कोकणात घुसलेला). याप्रसंगे हशमाचा जमाव करावया देशमुख मा निल्हेस आज्ञा केली असे व पुढे कितेक काम याचे हातून घेणे असता उगेच माणूस दिलगीर करावे आणि स्वामीकार्याचा नाश करावा हे कोण कारकुनी. हे गोष्टीने स्वामीचा तरी फायदा? तरी कौडीइतकी गोष्ट नाही. ऐसे असता असे करावया गरज काय? या उपरी देशमुख तरी रंजीस न करणे. त्यांचा एक हक सालाबादप्रमाणे चालवणे. कसूर काडीइतकी न करणे. पुढे बोभाट आल्यास स्वामी तुमची भीड धरणार नाहीत हे नेमस्त समजणे–लेखनालंकार."[३] संभाजीराजांच्या या पत्रावरून त्यांना त्यावेळी राज्यावर आलेल्या गंभीर परिस्थितीची जाणीव असल्याचे स्पष्ट दिसते.

देशमुखांचे बंड घातक ठरले असते. त्याचप्रमाणे रयतेचीही त्यांना काळजी घेणे भाग होते; मुलखाची त्यांना आबादानी करावयाची होती. परगण्यादिकांचे

१. शिचसा; खं. २ ले. ५९ पृष्ठ ६१ २. कित्ता, ले. ६२, पृष्ठ ६३

३. सप–मापा, पृष्ठ १६१

देशमुख आपल्या विलायतेची लावणी संचणी करून त्याची भरभराट करीत. जमीन कसणारी कुळे फुटू न देता ती गावी स्थिर कशी राहतील हे देशमुखांना पाहावे लागे. वाई प्रांताचा देशाधिकारी अंताजी सबदेव हा तेथील मुलखाचा तहरह लावणी संचणी तेथील देशमुखाच्या मताने करीत नव्हता. त्यामुळे रयतेलाही दिलासा मिळत नव्हता. या गोष्टी गैर फायद्याच्या होतील हे जाणून संभाजी महाराजांनी दि. २१–११–१६८५ रोजी वाईचा देशाधिकारी अंताजी सबदेव यास जो तहरह करणे तो देशमुखाच्या मताने करीत जावे, गैरफायद्याची गोष्ट करू नये म्हणून लिहिले होते. देशमुखांना नाराज करावयाचे नसले तरी त्याचबरोबर शेतीचे कोणत्याही प्रकारे नुकसान होऊ नये म्हणून संभाजी राजे काळजी घेताना दिसतात.[1]

संभाजी महाराजांनी वतनदारांचे मिरासी हक्क व इनामती ( हकलाजिमा, इनामती व इसाफतीची ) जप्त केल्या होत्या. दादाजी नरस प्रभू भोर व उत्रोली तपे रोहिडखोर या देशकुलर्णीच्या वतनाची हरदू खोरियाची गावगनाची जप्त झाली असता ते तर्फ मजकूरचा वसूल घेत होते. हे कळताच शंकराजी नारायण यांनी १६८६ मध्ये दादाजी नरसप्रभूला अशा तऱ्हेने वसूल घेतला म्हणून स्वार पाठवून त्याच्याकडून रु. २५ मसाला घेतला.[2]

## आर्थिक धोरण :

त्या काळात शेती हेच उत्पन्नाचे मुख्य साधन असे. दक्षिणेत रूढ असलेल्या मलिक अंबरच्या जमीनमहसुलात शिवाजीमहाराजांनी बऱ्याच सुधारणा केल्या होत्या. राज्यातील जमिनीची पाहणी व मोजणी करण्यापूर्वी त्यांनी जमिनी मोजण्याचे एक प्रमाण ठरवून दिले. याबाबतीत अण्णाजी दत्तो सचिवाने, प्रांताची पाहणी करून, मोजमाप करून सारा-आकारणी केली. त्याने नापीक जमिनी पिकाऊ करण्याचा प्रयत्न केला. गावकरी, शेतकरी आणि पिके यांच्या रक्षणाची काळजी घेतली. सामान्यतः प्रत्येक वर्षी जमीनझाडा पाहून कोणती जमीन पड आहे आणि कोणती 'वाहाती कास' म्हणजे लागोपाठ पिकाऊ ठेवलेली आहे ते पाहून त्या त्या गावांचे जमाबंदीचे पाहणीपत्रक तयार करीत असत. अण्णाजी दत्तोने जमिनीची विभागणी, निमताना व प्रतबंदी ठरवून सरकारी साऱ्याचा आकार ठरविताना त्या कामाचें तीन प्रकार पाडले होते. चावराणा, बिघावणी, चकबंदी मिळून एक भाग. अवल, दुम, सीम किंवा चारदम म्हणजे प्रतबंदी हा दुसरा भाग. लावणी, बी, खरीप, एकपिकी, दुपिकी,

१. शिचसा, खं. २, ले. २७२, पृष्ठ २६८

२. मइसा– . १५, ले. ३१५

कोरडवाहू म्हणजे जिराईत व बागाईत; बागाईतीतही मोटस्थळ व पाटस्थळ, बागमळा, राई असा तिसरा भाग केलेला होता.

जमाबंदीच्या पाहणीस दोरीच्या ऐवजी काठीचे माप ठरविलेले असे. ही मोजणी कशी व कोणत्या प्रमाणाने करीत असत हे खाली दिलेल्या उदाहरणावरून ध्यानात येईल. ही जमाबंदी अण्णाजी दत्तोने रत्नागिरी जिल्ह्यातील पोलादपूर भागात केली होती. ही येथे हेतुतःच विस्तृत दिलेली आहे. शिवाजी महाराजांच्या कारकीर्दीत सुरू केलेली ही मोजणी आणि धारा संभाजीराजांच्या काळातही चालू होता. सरकारी सारा आकारणे आणि तो कायम करणे याबाबत दक्षता घेण्यात येत असे.

शिवाजीमहाराजांनी अण्णाजी दत्तो यास प्रांताची पाहणी करावयास हुकूम दिला. त्यावरून त्यांनी जमाबंदी केली. त्यांच्या शिरस्त्याप्रमाणे जमाबंदीचे पहाणीस "काठी, पाच जणांचे पाच हात व पाच घोडमुठी लांबीची काठी चौऱ्यांशी तसूची करून जमाबंदी केली." त्याचा शिरस्ता खालीलप्रमाणे होता!

"भातजमिनीची मोजणी केली त्या काठ्या लांबी तुलाच्या वीस व रुंदी आर्जाच्या वीस झाल्या, म्हणजे एक बिघा जमीन होत असे. या प्रमाणे मोजणी केली. चालती काठी टाकावी, त्याचा मान पाडीव काठ्या साडेबेवीस भरत. अशा मानानी चालती काठी टाकून जमाबंदी केली. तलवटी, वरकसी, डोंगरी गावचे पिकाचा मान पाहून दर बिघा ठराऊन दिल्हा. भात दस्त केली.

१ मौजे कापडे बु।। व पोलादपूर या हरदू गावी दोन शिरस्ते

१ प्रा शिरस्ता दर बिघा ( खंडी ) ·।।· प्रो

१ प्र।। खराबा जमिनीस राज्यपाल दरबिघा ·।= प्रो २

१ वरकड गावी सिरस्ता दर बिघा ·।≶ प्रो

१ वरकसी सेनास नजरमापक पाच जणांनी जमीन तपासून आजमास करून खंडीचे पिकास थल नजरास येईल त्यास धारा घ्यावयाचा शिरस्ता

१ नागरीचे सेतास धारा

- १ आवट जमिनीस खंडीचे पिकास ०≶ कैली. } २
- १ डोंगरी जमिनीस खंडीचे पिकास ०=।। कैली.

१ वरीचे सेतास धारा दर खंडीचे पिकास

- १ आवट जमिनीस आडीच मण प्रो। } २
- १ डोंगरी जमिनीस दोन मण प्रो।

१ हरीक सेत खडीचे पिकास धारा कैली ०=।। प्रो

१ तील, उडीद, तुरी या सेतास मण दोन मणाचे येके नजरेस आल्यास आधोली, पायली दीड पायली प्रो सदरहू आनवये नजर माना करून धारा घ्यावयाचा सिरस्ता ठरवून वहिवाट करीत. कोठे रयतेची समजूत न होय तर

काठीने मोजणी करण्याचा सिरस्ता. चालती काठी टाकून मोंजणी करावी ते पंचवीसाचे मानानी टाकावी. चालत्या काठ्या वीस त्याच्या पंचवीस येत अशा मानानी टाकून येक बिघा जमीन येईल त्यात झाड झाडोरा व खुरवेट दगड व बरड खरसील वजा देऊन बाकी जमीन राहील त्यास सवाई सूट देऊन बाकी जमिनीचा धारा खेरीज हाकदार.

| | |
|---|---|
| १ नागली दर बिघा — | १ आवट जमिनीस ०≡।।। |
| | १ डोंगर जमिनीस ०=।। |
| १ वरी दर बिघा -- | १ आवट ०=।। |
| | १ डोंगरीस ०=प्रो |
| १ हरीक दर बिघा | १ माल जमिनीस ०=।। |
| | १ डोंगरी ०= |

१ तील उडीद तुरी दर बिघा : ०।।। प्रो

सदरहू प्रो वहिवाट माहाराज यांचे कारकीर्दीत आणाजी दत्तो (देश) कुलकर्णी ता॥ संगमेश्वर तालुके रत्नागिरी याणी जमाबंदी करून ठराऊन दिल्ही ते कारकीर्द आखेरपर्यंत वहिवाट...संभाजीराजे यांचे कारकीर्दीत वहिवाट होत असे.[1]

जमीन महसुलात प्रथम साळी-भात, तांदूळ धान्य असे. तूप, पेंड, मीठ अशा वस्तूंच्या रूपाने वसूल केला जाई. पूर्वी मलिक अंबरने जी आकारणी केली त्या आकारणीशी अण्णाजी दत्तोने केलेल्या आकारणीत किती फरक पडेल त्या दृष्टीने पद्धतशीर पाहणी केली. एका मोठ्या जमिनीच्या डागामध्ये इतर अनेक जरी लहानमोठ्या पट्ट्या म्हणजे जमिनीचे पोटफोडी होऊन लागवड झाली असली तरी तितक्या तितक्याही तोड्या पिकाची प्रत कळून त्यावर सारा आकारणीचे प्रमाण ठरविले जात असे. तसेच एकजात व मोठ्या जमिनीतही हेच पीक असेल तर तेथील सारा आकारणीचे प्रमाण वेगळे असे. तालुक्यातील गावन् गाव, त्यातील संपूर्ण जमिनीच्या पाहणी आकारणीसह चार जाणत्या मंडळींनी एकमताने ठरवून देशमुख व पाटलांना अण्णाजी दत्तो यास कळवावा लागे. देशमुख-पाटील ह्यांजकडून पोटफोडी जमीन, तीमधील पिके, त्यासंबंधी केलेला अंदाज आणि त्याच जमिनीबद्दल मलिक अंबरी सारा आकारणी किती हे पाहून जरी पहाणी खर्डा आला तरी अण्णाजी पंतांनी त्यातीलच तीन गाव तीन प्रतीचे त्या गावातील भिन्न भिन्न जमिनी व त्यातील पिके यांची चाचणी घेतल्यानंतरही पंतांनी स्वतः पहाणी करून सारावाढ केली होती.[2]

---

१. ऐप्रगं–आजो, क्र. २, पृष्ठे १११–११३

२. अमराअ–जो, पृष्ठे १५४–१५५

सुरुवातीला सरासरी उत्पन्नाच्या ३३ टक्के कर ठरविलेला होता. पुढे जादा कर रद्द केल्यानंतर ४० टक्के सारा आकारणी ठरविली होती. हीच पहाणीची व मोजणीची पद्धत संभाजी महाराजांच्या कारकीर्दीत चालू होती.

चेऊल येथे जिरायेताचे तसैराचा (?) तह राजश्री केसोपंतांनी करून दर खंडीस लारी (सुमारे तीन आण्याइतक्या किंमतीचे जुने नाणे) बसरी ४०८ प्रमाणे नख्त घेण्याचे ठरवून जागजागी दिवाण दर खंडीस ४०८ लारीप्रमाणे घेत होते. परंतु १६८३ सालापासून दर खंडीस लारी ४५ प्रमाणे वसूल घेण्यास सुरुवात केली होती.[1]

चेऊल प्रांतात १६८४ मध्ये बागाईत नारेल व सुपारीच्या वाड्यांची[1] बागांची पहाणी करून कर आकारला होता. १६८५ साली चिमणाजी आऊजी तेथे गेला. १६८४ साली जी झाडे होती त्या झाडांवर १६८२ सालातल्या पहाणीत प्रत्येक झाडावर जो सरासरी कर आकारण्यात आला होता तोच त्याने आकारला आणि त्याच सालात जमा केला. त्यातून पहाणीनुसार ठरविलेला कर वजा करून बाकी काढली.

सामान्यतः प्रत्येक वर्षी जमीन झाडा पाहून म्हणजे कोणती जमीन पड आहे आणि कोणती 'वाहाती कास' जमीन आहे हे पाहून त्या त्या गावांचे जमाबंदीचे पहाणी पत्रक तयार करीत. एखाद्याने इनाम जमीन असून ती पड ठेवली तर लगेच त्याचा इनाम मना केला जाई. परंतु त्याने वहितीला आणली तर पुढील वर्षी सनद पुन्हा सादर होत असे.[2]

शंकराजी निलकंठराऊ याच्याकडे मौजे किकवीची इनाम जमीन कास रुके ८४॥ होती. ती पडीक होती. परंतु किर्दीस उमेद धरून ती त्याला पिकाऊ करावयाची होती. म्हणून त्याने पुणे परगण्यातील तर्फ निरथडीच्या दिवाणाना जाऊन विनंती केली. निपिकी जमीन पिकाऊ करण्याबद्दल शंकराजी निलकंठराऊ यांचा इनाम जमीन सेत कास रुके ८४॥ लावणी दुमाले केले होते. या प्रमाणे पुण्याच्या सुभ्याहून निरथडीच्या दिवाणास सालाबादप्रमाणे जैसे चालिले तैसे चालविण्याविशी सांगण्यात आले होते. या प्रमाणे निरथडीच्या दिवाणाने मौजे किकवीच्या मोकदमाना दि. २०–६–१६८२ रोजी सुभ्याचे खुर्दखत आहे तेणे प्रमाणे वर्तणूक करून इनामती पडीक आहे यैसियास याचे दुमाले किर्दी करण्या-विशी लिहिले होते. पुढील वर्षी राजश्री छत्रपती स्वामींचा हातरोखा आणितील तेणेप्रमाणे विल्हे होईल. तालिक लेहून घेऊन असल फिराऊन देणे म्हणून बजावले होते.[3] पडीक जमिनीत एखाद्याने किर्दीस उमेद धरली तर

१. शिचसा-खंड ९, ले. ६३, पृष्ठे ६४–६५

२. मइसा, खंड १५, ले. १३३–१३४

३. शिचसा, खंड १, ले. ६६, पृष्ठ ८३

त्यास त्याचे इनाम पूर्ववत चालविले जात असे. जमीन पडीक राहू नये म्हणून दक्षता घेतली जाई. उमेद धरून परस्पर कामे केली जात होती.

घरबांधणी व बागाईती शेती करणाऱ्यांना दिलासा दिला जात असे. माहादजी कमळाकर रबडे तर्फ हवेलीतील मौजे चिंचवडच्या कुलकर्णीचा मिरासीचा वाडा त्यांच्या बापाभावाच्या समाईकीत होता. त्यांच्या वाटणीतून त्याच्याकडे थोडी जमीन आली होती. म्हणून त्याने कुनबावा थलातील शेतापैकी कासखडी १।=॥ पैकी वजा धुपणी मण ०=॥ ( अडीच ) बाकी कास खडी १। (सवा) हे मिरासी करून कुनबियानी दिली आणि वाडा पांढरी नवी वसाहत हणवतानजीक सेताचे पाहटे ( ? ) त्यावरी त्याने वसाहत केली. त्यामध्ये त्याला वाडा मिळाला. हा पूर्वेपासून पश्चिमेस ४९ हात व उत्तर दक्षण ६६ हात होता. या ठिकाणी रबडे याने विहीर पाडून अंबराईची लावणीची उमेद धरली होती. म्हणून त्याने परगण्यातील देशमुख व देशकुलकर्णी यांना आंबराई बारदार ( फळे धरू लागल्यावर ) झाल्यानंतर दर पडास रुके ·॥· काा मलिक अंबर चालले होते. इनामती आंबराईपैकी लावणी करून त्यास पड लावणी माफीक दर सदे पाच व मोकदम १ व कुलकर्णी १ पोशी १ व महार देशमुख १ देशकुलकर्णी १ येणेप्रमाणे चालवावे म्हणून विनंती केली होती. देशमुख व देशकुलकर्णी यांनी ही माहिती पुणे येथील सुभेदार राजश्री विनायेक उमाजी याला त्याप्रमाणे कालनामा सादर करण्यास सांगितला होता. त्यानुसार दि. ५–७–१६८२ रोजी सुभेदाराने माहादाजी कमळाकर रबडे याला कौलनामा देऊन लावणीस इनाम दिले. कोणत्याही बाबतीत शक आदेशा न धरता तुमच्या बाबतीत तुमच्या घराखेरीज भाऊबंदाचा संमंध नाही म्हणून कौल दिला. या कौलनाम्यावर वाटोळ्या मराठी शिक्यात " श्री प्रीत्या शंभु । छत्रपति उमाजी त। नूज मना। विनायकस्य मुद्रेषां श्रिय। + + तेतराम " हा मजकूर आहे.[1]

राजश्री माहादाजी गोसावी सेकीन मोरेश्वर यांना तर्फ करे पठार येथे जिराईत हिवर टिके कास रुके ०≡॥ बागाईत, पांढरी ०≡ बिघे अशी इनाम दिली असून सालाबाद चालत होती. १६८४ मध्ये त्याने कीर्दी करणार म्हणून कळविले होते. म्हणून पूर्वीप्रमाणेच चालविण्याविषयी दि. २१–१–१६८४ रोजी पुण्याच्या सुभेदाराने–विनायक उमाजीने तर्फ करे पठारचा सुभेदार जिवाजी नारायण यास लिहून कळविले होते.[2]

शिवाजी महाराजांनी देशमुखांची रयतेवरील सत्ता कमी करण्याचा प्रयत्न केला. परंतु देशमुखीचे काम त्यांच्याकडेच सोपविले. लावणी संचणीची कामे

१. शिचसा, खं. ७, ले ६३, पृष्ठे १०३–१०४
२. शिचसा, खं. २, ले. १६७, पृष्ठ १८६

रयतेने त्यांच्याशी तह करूनच करावी असा शिरस्ता होता. १६८५ च्या सुमारास वाई प्रांताचा देशाधिकारी व लेखक अताजी सबदेव हा तहरह लावणी संचणीची कामे प्रांत मजकुरच्या देशमुखाच्या मताप्रमाणे करीत नव्हता. त्यामुळे रयतेला दिलासा रहात नव्हता, आणि गैरफायदा होत होता. म्हणून संभाजी महाराजांनी दि. २१–११–१६८५ रोजी वाईचा देशाधिकारी अताजी सबदेव याला देशमुखाच्या मताने तहरह करून मुलूख संपन्न होईल असे करण्याविषयी व रयतेला दिलासा मिळावा म्हणून लिहिले होते.[1] कोणत्याही कारणाने शेतीचे नुकसान होऊ नये म्हणून काळजी घेण्यात येत होती. मुलखाची आबादानी होण्यासाठी महाराजांना कळकळ होती.

इ. स. १६८२–८३ साली संभाजीने जमिनीवरील धारा फार वाढवून मक्त्याने मामलती दिल्यामुळे रयतेने त्रासून गाव टाकले असे ग्रँट डफ यांनी विधान केले आहे.[2] या विधानाला आधार दिसत नाही. या प्रकरणातील उदाहरणांवरून रयतेने शत्रूच्या हल्ल्यामुळे आणि लुटीमुळे गावे सोडली असली तरी परागंदा झालेल्या लोकांना वसाहत करण्यासाठी अनेक सवलती संभाजीराजांच्या काळात दिल्याचेच आढळते.

**इतर उत्पन्ने :**

शेतीच्या उत्पन्नाखेरीज उत्पन्नाच्या इतरही बाबी असत. कोकणात सुपारी, भात, नारळ यांच्या उत्पन्नावर कर आकारला जात असे. चेऊल प्रांतात १६८५ पूर्वी १०० नारळांमागे ५॥९ व सुपारीवर दर मणास ९८ कर घेतला जाई. १६८७ मध्ये नारळावरील कराचा दर ६॥ टक्के आणि सुपारीस दर मणास १०॥ असा तह करून जमाबंदी केली होती. कोटवाडा खासगी व मामले यांच्या शाकारणीसाठी माडाच्या मालकाला दर माडामागे २ झाप द्यावे लागत. याशिवाय घरावर, मिठावर कर असे. शहरात व्यापार करणाऱ्या व्यापाऱ्यांवरही काही कर बसविला होता.[3]

प्रचंड गडावरील कोळी व मेटकरी गडाचे घेरियात राहात होते. त्यांपैकी कित्येक लोक गडमजकुरी चाकर होते. कित्येक सोनजी इतबारराऊ याचे दिमतीस होते. त्यांच्याकडे गुरे, म्हशी व गाई होत्या. हवालदार, रजपूत, नाईकवाडी यास दोन्ही गुरांची वणीसोड ( कर ) करून वरकड बद्दल मु॥ बार केल्याची सनद शिवाजी महाराजांनी करून दिली होती. त्या सनदेप्रमाणेच सनद मिळावी म्हणून त्या लोकांनी शंभू छत्रपतींकडे अर्ज केला होता. त्या लोकांच्या

१. शिचसा, खं. २, ले. २७२, पृष्ठ २६८ २. ग्रँट डफ : १४७–१४८

३. शिचसा, खंड ९ ले. ६९, ७०, पृष्ठ ७३, ७५, ७७, ७८

विनंतीनुसार संभाजी राजांनी गाईवरचा एकंदर कर माफ केला होता. म्हशीवरील कराविषयी दर एकास म्हशीची वर्णी सोड दिली होती. हवालदाराला २ म्हशी, नाईक वाडियास व रजपुतास २-२ म्हशींची सोड देऊन ज्याच्या जितक्या म्हशी उरतील त्याची जी वणी होईल त्यास, गड मजकुरी चाकर असतील त्यांची वणी त्यांच्या नावे लिहून बाकी वजा करावीत असे संभाजी महाराजांनी दि. ३१–३–१६८१ रोजी प्रचंडगडाचा मुद्रधारी राजश्री रघोजी अहिरराव यास कळविले. सोनजी इतबार रायाचे दिमतीस असलेल्या लोकांची जी वणी होईल ती त्यांच्या नावे तपशीलवार खर्च लिहून नावनिशी हुजुरांकडे पाठवावी. असे बजाविले होते. त्यांना घरटकाही माफ करण्यात आला होता.[1] संभाजी राजांच्या कारकीर्दीत गाई-म्हशींवरील कर पूर्वीप्रमाणेच चालू होता.

एखाद्याने दत्तक घेतला तर दत्तक घेणाराला सरकारला कर द्यावा लागे. पिलाई कोम केशवजी याने सिवाजी सुरो कारभारी व रामचंद्र दत्ताजी मुतालीक यांच्या सांगण्यावरून पिलाईचा दीर गंगाजी याचा मुलगा पिलाईने दत्तक घेतला होता. त्यावरून देसगतीची मोकरर सनद दिली पाहिजे म्हणून शिवाजी महाराजांकडे विनंती करण्यात आली. त्यावेळी ५००० होन शेरणी कबूल केली होती. केशवजी दत्ताजी नाईक याला खंड बांधून दिला होता. याप्रमाणेच संभाजी महाराजांनी चालवावे अशी विनंती करण्यात आली. त्याप्रमाणे करार केला होता. ५००० होनांपैकी पूर्वी २००० होन पावले होते. दि. ६–४–१६८१ रोजी संभाजी राजांनी दत्ताजी केशवजी नाईकास कळविले होते की कैलासवासी स्वामींनी ठरविल्याप्रमाणे चालविले जाईल. जे ३००० होन बाकी येणे असेल त्याबाबत खिस्ती ( हप्ते ) बांधून त्याप्रमाणे वसूल करण्यात येईल असे अभयपत्र दिले होते.[2]

देशमुखीच्या व सरदेशमुखीच्या सरकारी देण्याघेण्याबाबत चोख व्यवस्था होती. सरकारी येणे मिळाले की पावती देण्यात येत असे. १६८८ सालच्या सप्टेंबरमध्ये कवि कलशाने सरदेशमुखीचे जे येणे शिराळ्याच्या तुळाजी देसायाकडून घेतले होते,[3] त्याला पावतीही दिलेली होती.

**आयात–निर्यात कर :**

शिवाजी महाराजांच्या वेळेपासून आयात-निर्यात मालावर जकात घेण्यात येत असे. संभाजी महाराजांनी तीच पद्धत चालू ठेवली होती. जकातीसंबंधी

१. मइसा, खंड २०, ले. २७३, पृष्ठ ३९५
२. ऐसंसा, खं. ५, ले. २५, पृष्ठ २५
३. शिचसा, खं. ३, ले. ६४५

तपशीलवार माहिती संभाजी राजे आणि इंग्रज यांच्यात १६८४ साली झालेल्या तहात आढळते.

(१) इंग्रजांना व त्यांच्या व्यापाऱ्यांना माझ्या राज्यात व बंदरात येण्याची मुभा असावी. व्यापारासाठी माल आयात व निर्यात करणे तो नेहमीची ठरीव जकात देऊन करावा. जकातीवरील अधिकाऱ्यांनी निष्कारण इतर त्रास देऊ नये. अशीच सवलत माझ्या व्यापाऱ्यांना व प्रजेला इंग्रजांच्या बंदरात मिळेल.

(२) इंग्रजांची जहाजे, गुराबे किंवा होड्या व्यापारी माल आणण्या-नेण्यास रवाना झाल्या असता, त्यातील एखादे वादळी हवेमुळे जर एखाद्या बंदरात शिरले तर त्याला हवा निवळताच परत जाण्यास विनात्रास आणि जकात न घेता परवानगी द्यावी. परंतु एखादे जहाज वादळाने फुटून जर किनाऱ्यास लागले व माझ्या सुभेदारांनी वगैरे पकडले तर त्यांनी शक्य ती त्यास मदत करून त्यातील जो माल आयात होईल त्यावर नेहमीप्रमाणे जकात घ्यावी. **माझ्या वडिलांचे वेळी जो शिरस्ता होता तोच मी पाळीन** व इतर खिश्चन व्यापाऱ्यांना ज्या सवलती मिळतात त्या माझ्याही बंदरात मिळतील.

(३) जो माल इंग्रज आयात करतील त्यावर $२\frac{१}{२}$ टक्के जकात देतील. आणि निर्यात करतील त्यावर जकात नाही व इतर काही ताप होणार नाही.

(४) इंग्रजांनी सुचविले की राजापुराहून बालाघाटकडे जाणाऱ्या त्यांच्या मालावर आदीलशाहीत जशी जकात घेतली जाईल तशी घ्यावी. तरी जी जकात आज रूढ असेल तीच घेतली जाईल.

(५) इंग्रजास व त्यांच्या व्यापाऱ्यास माझ्या राज्यात व बंदरात माझ्या रहिवाशांकडून व व्यापाऱ्यांकडून न्याय्य किंमतीत वाटेल तो माल विकत घेण्यास मुभा असावी. सुभेदार किंवा इतर अधिकाऱ्यांनी रीतसर जकात घ्यावी. त्या खेरीज आकसाने किंवा इतर कारणाने अडवू नये.

(६) मुंबई बेटावर जळणाची वाण असल्याने इंग्रजांना माझ्या प्रदेशात ते विकत घेण्यास व जकातीविना नेण्यास परवानगी असावी अशी सूचना होती. परंतु मागील प्रघात पुढे चालू राहील; जशी मागे जकात घेत असत तशीच ती घेण्यात येईल.

(७) इंग्रजांनी नागोठणे व पेण येथे वखारी काढाव्यात परंतु त्यांना घाटावरून आयात-निर्यात केलेल्या सर्व मालावर राजापूरला जशी जकात असेल तशी द्यावी लागेल. त्यांना इतर त्रास होणार नाही.

(८) इंग्रजांनी फक्त टांकसाळीतच नाणी पाडण्याकरिता सोने व चांदी आणावी, इतरत्र नाही. अशा सोन्याचांदीवर नेहमीचे व्याज द्यावे लागले.

(९) इंग्रजांनी ते ज्या ठिकाणी माल विकत घेतात तेथे एकदाच जकात द्यावी असे सुचविले. नंतर तो माल नेत असता वाटेत जकात अटकाव होऊ नये. परंतु

**जी चाल माझ्या वडिलांपासून चालत आहे तीच यापुढे चालेल.** ती सुरुवातीपासूनच लागू आहे.

शिवाजी महाराजांचे इंग्रज वखारवाल्यांशी देण्याघेण्याचे काही व्यवहार झाले होते. जो व्यवहार अपूर्ण राहिला होता त्याबाबत संभाजी महाराजांनी खालील अटी घातल्या होत्या :

(१) इंग्रजांची राजापूरला वखार होती, त्यावेळी राजापूरचे व्यापाऱ्यांस माल विकला होता. त्याबाबत इंग्रजांचे येणे आहे. तरी सुभेदार व हवालदार यांनी चौकशी करून न्याय्य तो वसूल करून घेणे.

(२) इंग्रजांकडून खुदा बंदापूर व इतर ठिकाणांहून जो माल घेतला होता त्याबाबत माझे वडील शिवाजी राजे यांनी १० हजार पाछाई होन देण्यास संमती दिली होती. त्या रकमेपैकी राजापूरची वखार बांधण्यास जो खर्च आला व त्यावर जो खर्च आणखी होणार तो आणि जी रक्कम आतापर्यंत दिली गेली ती वजा करून जी बाकी उरेल ती इंग्रजांना नारळ व सुपारी यांच्या रूपाने मी देईन.

इंग्रजांशी तह झाल्यानंतर राजापूरच्या वखारीसंबंधीच्या देण्याघेण्याबद्दल संभाजी महाराजांनी राजापूरचा सुभेदार व मुजुमदार दिनाजी विठ्ठल यास लिहिले होते, " शिवाजी महाराजांनी नुकसानभरपाईबद्दल ( शिवाजी महाराजांनी राजापूरची वखार लुटली त्याबद्दल ) इंग्रजांस दहा हजार पादशाही पागोडे देण्याचे कबूल केले होते. त्यापैकी ३३६७ त्यांना दिलेले असून बाकी ६६३३ शिलकेतून राजापूरची वखार बांधण्यास आतापर्यंत खर्च आला आहे तो व ती पूर्ण करण्यास लागणारा खर्च वजा करून बाकीची रक्कम मुंबईकरास देणे. तसेच शिवाजी राजे व इंग्रज यांचे वैमनस्य आले त्यावेळी राजापूरच्या वखारीतील माल जप्त केला होता. शिल्लक असेल तर तो माल देणे. नसेल तर त्याची किंमत काढून तपासून अंतिम निर्णयार्थ पाठविणे. "[1]

काही वेळेला मराठी राज्याच्या अधिकाऱ्यांनी इंग्रजांचा माल पकडला असला तर इंग्रज त्या मालाची मागणी करीत. या बाबतीतही इंग्रजांकडे जास्त किंमतीचा माल जाऊ नये म्हणून संभाजी महाराज कोल्हापूर प्रांतातील सुभेदार व मुजुमदार गोपाळ परशराम यास कळवितात, " घाटात निरनिराळ्या ठिकाणी सर्व किरकोळ माल २५९० पातशाही पगोडे किंमतीचा गोपाळरावाने पकडून नेलेला परत करण्यासाठी इंग्रजांची मागणी आहे. त्यांच्याशी मैत्री झालेली आहे. तरी पत्रात दिलेला तपशील आपल्या जमावहीत शोधून तपासून घ्या. जो माल नोंदला असून तुमच्या खजिन्यात आहे तो द्या. परंतु जो विकला गेला असेल

१. भाइसंमं, त्रैमासिक Vol II, p 27–37 ( १९३२ )

त्याचा व रोखीचा हिशेब आमचेकडे पाठवा. नंतर अंतिम निर्णय घेऊन कळवू." यावरून हिशेबाच्या काही बाबतीत राजे स्वतः लक्ष घालीत असत असे दिसते.[१]

इंग्रजांची सूचना अशी की माझ्या राज्यातील कोणी सुभेदार यांना जो माल लागेल तो ते देतील. परंतु राजांच्या किंवा वरील अधिकाऱ्यांव्यतिरिक्त जे माल घेतील तो देणे किंवा न देणे इंग्रजांच्या इच्छेवर राहावे. तरी माझ्या सरकारकुनांचे पत्र असेल तर माल दिला पाहिजे. परंतु त्याविना माल देणे किंवा न देणे इंग्रजांच्या मर्जीवर अवलंबून राहील.

या जकातीच्या आणि देण्या-घेण्याच्या व्यवहारावरून संभाजी महाराजांच्या कारकीर्दीत कारभार कसा होता याची कल्पना येऊ शकते. त्याचप्रमाणे इंग्रजांशी व्यवहार करताना संभाजी राजांनी शिवाजी महाराजांची नीती व धोरण चालू ठेवले होते; आपल्या वडिलांच्या काळात कसा व्यवहार झाला असेल हे ध्यानात घेऊनच ते देण्या-घेण्याचा विचार करीत असत असे दिसते.

**गुलामांवरील कर :**

इंग्रज वखारवाले हिंदुस्थानात गुलाम विकत घेऊन त्यांची विक्री करीत असत. शिवाजी महाराजांनी प्रत्येक गुलामामागे दोन ते तीन पागोडे कर म्हणून घेण्याची प्रथा पाडली होती. संभाजी महाराजांनी हा गुलामांवरील कर २–३ पागोड्यांपासून १२ पागोड्यांपर्यंत वाढविला. त्यामुळे सरकारी उत्पन्नात भर पडून गुलामांच्या व्यापाराला आळा बसला.[२]

**खंडणी व चौथाई :**

आतापर्यंत दिलेल्या उत्पन्नाच्या बाबींव्यतिरिक्त खंडणी आणि चौथाई ही उत्पन्नाची साधने असत. १६८० सालापूर्वी शिवाजी महाराजांनी मुरगोडचा देसाई रुद्रप्पा याच्याकडून १०००० होन खंडणी घेण्याचे ठरविले होते. महाराजांच्या निधनानंतर या देसायाविषयी कटोरगडचा हवालदार देवजी श्रीखंडे याने संभाजी राजांकडे विनंती केली की शिवाजी महाराजांनी पूर्वी बांधून दिलेल्या खंडणीप्रमाणेच संभाजी राजांनी खंडणी घ्यावी. या विनंतीनुसार दि. ७ मे १६८० रोजी संभाजी राजांनी पूर्वीप्रमाणेच खंडणी घेतली जाईल असे रुद्राप्पा देसायाला कळवून अभयपत्र दिले होते.[३]

१. भाइसंमं, त्रैमासिक Vd II, p 27–37 ( १९३२ )

२. FR : Car to Sur, 5–6–1686

३. शिचसा, खं. १८, ले. ८६–८७, पृष्ठे ५४।५५

उत्पन्न वाढविण्यासाठी परकीय किंवा शत्रूंच्या राज्यात लुटमार करण्यात येत असे. मुघल आणि आदिलशाही प्रदेशात मराठ्यांना लूटमार करण्यास पुष्कळ वाव होता. १६८० ते १६८२ पर्यंत मराठ्यांनी बऱ्हाणपूर आणि औरंगाबाद येथे लुटालूट करून बरीच संपत्ती मिळविली होती. या लुटीत मराठ्यांनी करंजा, खकोला, मलकापूर, चांदा, तलाब, सरोंदा येथील सावकारांना लुटले होते. मराठ्यांनी सोलापूर, अहमदनगर व परिंडा किल्ल्याची अशाच प्रकारची लूटमार केली होती. सन १६८२ ते १६८५ च्या दरम्यान मराठे आणि पोर्तुगेज यांच्यात लढाई चालू असताना मराठ्यांनी गोव्याच्या परिसरात असलेल्या साष्ट आणि बारदेश या प्रांतातून बरीच लूट मिळविली होती.

संभाजी महाराजांच्या कारकीर्दीत मराठ्यांनी ठिकठिकाणी चौथाई वसूल केल्याचे अनेक उल्लेख फार्सी अखबारात सापडतात. मुघली मुलखातील वऱ्हाडातील कासो, थालेनो, बालाघाट, देवळगाव, जालना, बीदर येथून मराठ्यांनी जानेवारी १६८२ ते जून १६८२ च्या दरम्यान चौथाई वसूल केली होती.

कापड घेऊन एक मराठ्यांचे जहाज पोर्टो नोंव्हो येथून १६८१ च्या ऑक्टोबर महिन्यात मलाक्काला ( हे आजच्या मलायाच्या संघराज्यात आहे. )गेले. तेथे जहाजातील सर्व माल विकण्यात आला. कोरोमँडलचा डच गव्हर्नर पिट याच्या विनंतीमुळे या जहाजाच्या नावाड्यास ( Nakhuda ) सर्व प्रकारचे साहाय्य देण्यात आले.[1]

या डच पत्रावरून संभाजीराजांच्या काळात परदेशात व्यापारवाहतूक चालू असावी असे दिसते.

### अंतर्गत व्यवहार :

देण्याघेण्याचे, कर्जरोख्याचे अंतर्गत व्यवहारही सुरळीतपणे चालत होते. शिवाजी महाराजांच्या वेळेपासून दतसेटी सेटिया हा सावकार कर्ज देत असे. हिरोजी इंदुलकर हा रायगडावर बांधकामे करीत असे. दि. २७-९-१६८३ व १६८६ मध्ये त्याच्या नावाने कर्जव्यवहार असल्याची नोंद होती. या कर्जाची गोपाळसेट सेटीया याने हमी घेतली होती. या कर्जापैकी कोंडाजी दामोदर सबनीस बीन फुटनाईक याला महिन्याच्या पगाराचे १७ होन दिले होते. त्याचप्रमाणे गोपाळसेट याच्या नावाने हुंडी होती. त्यात त्याने हिरोजी इंदुलकराची हमी घेतल्याचे लिहिलेले होते.[2] दि. २८-९-१६८५ रोजी निळकंठ मोरेश्वरने दनसेट्याला लिहिले होते की, " तुजकडे हरकी ब।। इमारती किले पुरंदर ब।। सेरणी

१. DR-DR, Vol 29 1681 p 641

२. मइसा, खं. १८, ले. ५७, पृष्ठ ७९, ८२

बाकी औढत आहे. त्यापैकी मुशाहरा बदल देणे. शामजी केशव दफ्तरदार किले अहिवंतगड पा। होन २० आदा करणे. पालियाचा कागद घेणे–वरात."[1]

नरससेट उधाप्पा याने रायगडनजीक पाचाड पेठा येथील कारकुनाला कर्ज दिले होते. घेतलेले ६० होन त्याने परत केले होते. म्हणून ते पावल्याचे कागद देण्याविषयी दि. २९–१–१६८७ ची नोंद केली होती.[2]

या सर्व उदाहरणांवरून अंतर्गत देण्या-घेण्याचे व्यवहार सुसूत्रपणे चालू होते असे स्वच्छ दिसते.

**एक शिलालेख :**

फोंड्याजवळ अंत्रुज येथे तरीवर ( नावेवर ) मुसलमानांच्या राज्यात अंगभाडे घेत नसत. हा कर शिवाजीमहाराजांनी केव्हा घेण्यास सुरुवात केली हे कळत नाही. अंगभाडे घेत नसत तेव्हा व्यापारी लोक सुखी होते. अंगभाडे घेण्यास सुरुवात झाल्यापासून मालाची ने-आण कमी झाली. त्यामुळे हे अंगभाडे घेऊ नये म्हणून सामनायक निमनायक या व्यापाऱ्याने छत्रपती संभाजी राजांना विनंती केली. हे अंगभाडे तेव्हा अर्धा कोसाला चवदा पैसे घेत असत. अंत्रुज तरीवरून कोणत्या तरी देवस्थानच्या यात्रेला जाण्याचा मार्ग असावा. सामनायकाच्या विनंतीप्रमाणे दि. २२–३–१६८८ रोजी संभाजीराजांनी फोंड्याचा मुख्य देशाधिकारी यास आज्ञापत्र सादर केले, आणि भाणस्तरी, पारवगवि, मांदुस येथील अंगभाडे सोडून देण्यास सांगितले. त्यात शेवटी लिहिले कीं " सहसा धर्मकृत्यास नाश करू नये. करतील त्यास महापातक आहे. " या दोन वाक्यांवरून हे अंगभाडे कोठल्यातरी यात्रेकरूंवर बसत असावे असे वाटते.

संभाजीराजांचे हे आज्ञापत्र एका शिलालेखावर कोरलेले आहे. गोवे प्रांतात, फोंडे महालात अडकोळण गावी कुंडईपासून भाणस्तरीहून देवीच्या देवळाकडे जाणाऱ्या डाव्या बाजूच्या दक्षिणाभिमुख एका चौथऱ्यावर हा शिलालेख सुबक कोरलेला आहे. दगड काळा व शिळेची बैठक जमिनीत गाडलेली असून संपूर्ण शिळा शाबूत आहे. शिळेची लांबी ३६ इंच आणि रुंदी २२ इंच आहे. चारी बाजूस समास सोडून मुख्य लेख खोदण्याकरिता २१"×१७" इतक्या क्षेत्रफळात अर्धा इंच खोल खोदलेले आहे. त्यावर लेखाच्या एकूण २० ओळी असून राहिलेल्या शेवटच्या दोन ओळी शिळेच्या खालच्या समासावर लिहिलेल्या आहेत. खालच्या समासावर या दोन ओळींच्या खाली उजव्या आणि डाव्या बाजूला गाईची दोन चित्रे काढलेली असून, मध्यभागी " शुभं भवतु " असे शब्द कोरलेले

१. मइसा, खं १८, पृष्ठ ८१

२. कित्ता, पृष्ठ ७९

आहेत. आता मजकूर पुसट होत आला आहे. मथळ्याकडील समासात सूर्य, अष्टदलकमल व चंद्र कोरलेले असून सर्वात् वर " श्री रामाय " ही रामदासी अक्षरे निराळ्या वळणात दुसऱ्या कोण्या खोदणाराने खोदली असावी असा संशय येतो. मुळातच ती खोदलेली नसतीलच असे म्हणता येत नाही. मुसलमान अगर फिरंगीयांच्याकडून शिळेच्या त्या भागाला इजा झाली असण्याचा संभव आहे. शिलालेखावर २२–३–१६८८ हा दिनांक आहे.[१]

प्रस्तुत शिलालेखाचे छायाचित्र इतरत्र दिले आहे ते पाहिल्यास शिलालेखाची चांगली कल्पना येईल. महाराजांच्या आज्ञेनुसार तरीवरील अंग भाडे धर्माजी नागनाथाने व्यापाऱ्यांच्या हितासाठी माफ केलेले होते असे या शिलालेखावरून दिसते.

**दुष्काळ आणि उत्पन्नाची घट :**

आर्थिक व्यवहाराची काही उदाहरणे येथपर्यंत नमूद केली आहेत. त्यावरून अंदाधुंदी किंवा गैरकारभार झालेला दिसत नाही. १६८५ सालानंतर मराठ्यांची आर्थिक स्थिती ढासळली असावी. संभाजी राजांच्या कारकीर्दीत लष्कराचा खर्च बराच वाढलेला होता. गादीवर आल्यापासून संभाजी महाराजांना जंजिऱ्याच्या सिद्दीबरोबर बरेच दिवस युद्ध करावे लागले होते. उत्तर कोकणात सिद्दी सतत लूटमार करीत असे. त्याचा बंदोबस्त करण्यासाठी १० हजारांची खडी फौज सतत ठेवावी लागत होती. त्याचप्रमाणे पेण, नागाव, नागोठणे येथील खाड्यांतून नाविक दल सज्ज ठेवावे लागत होते. इंग्रजांना तीन महिने मुंबईच्या खाडीचे संरक्षण करण्यासाठी २० हजार अश्रफी खर्च करावे लागले होते.[२] यावरून त्यांच्याइतका नसला तरी मराठ्यांनाही बराच खर्च करावा लागला असावा हे उघड आहे. १६८२ सालापासून औरंगजेबाच्या सैन्याने नासिक, पुणे, सातारा, कोल्हापूर या परिसरातील गडांना वेढे घातलेले होते. या सर्व आघाड्यांवर मराठे तोंड देत होते. त्यामुळे सैन्यावरील खर्च वाढला होता. पोर्तुगेजांबरोबरही मराठ्यांना लढावे लागले होते. विजापूरकर आणि गोवळकोंडेकर यांच्याही मदतीसाठी सैन्य धाडावे लागले होते.

अशा तऱ्हेने एकीकडे खर्च वाढला होता तर दुसरीकडे सरकारी उत्पन्न कमी झाले होते. सिद्दी, फिरंगी आणि मुघल यांनी मराठ्यांच्या हद्दीत युद्ध सुरू केल्यामुळे लूटमार होऊन दोन तीन वर्षे मुलूख ओसाड पडला होता. लोकांना शेती करणे शक्य नव्हते. आणि त्यांना शेतीसाठी कर्ज द्यावे लागले होते. देशमुख

१. भाइसंमं, वार्षिक इतिवृत्त शके १८३५; ले. ५० पृष्ठे २११ ते २१३

२. रारा–ग्रं, भाग ४२, ले. ४६

आणि देशकुलकर्णी यांच्याकडून येणारी खंडणीही कमी करावी लागली होती.[1] किती व कशा प्रकारच्या सवलती देण्यात येत याची माहिती इतरत्र दिलेलीच आहे. परकीय आक्रमणामुळे करांची व इतर उत्पन्नाची वसुली करणे कठीण झाले होते. वसुलीच्या धास्तीने लोक परागंदा होत होते आणि वसुलीसाठी सरकारी अधिकाऱ्यांना तगादा लावावा लागत होता.

१६८६-८७ सालाच्या दरम्यान मराठी राज्यात दुष्काळ पडला होता. विजापूर आणि हैद्राबाद येथे पडलेल्या दुष्काळाचे व साथीचे वर्णन फार्सी आणि इंग्रजी पत्रात मिळते. १६८५ मध्ये चाकणच्या बाजूला पाऊस पडला नाही त्यामुळे तेथील ६४ खेड्यांतील मोकदमांनी अकरा दिवस अनुष्ठान केले. कचेश्वर भट, सिद्धेश्वर भट ब्रम्हे यांच्या हरिकथेमुळे पाऊस[2] पडला असा उल्लेख सापडतो.

१६८६ च्या नोव्हेंबर महिन्यात सातारा जिल्ह्यात दुष्काळ पडला होता. मौजे बोरगावचा अनाजी हरजी व जानोजी, तुकोजी, सोनजी, रेवजी पटेल यांना एका दिवसाचेही खावयास राहिले नव्हते. तेव्हा ते धनाजी जाधवकडे गेले आणि आम्हाला वाचवा म्हणून अनाजी हरजी वगैरे लोकांनी धनाजीला दि. २४-११-१६८७ रोजी आपल्या तक्सीमपैकी तकसीम विकण्याविषयी लिहिले.[3]

त्याचप्रमाणे सातारा जिल्ह्यातील परगणे माण येथेही दुष्काळ पडला होता. सांगोल्याचा देशकुलकर्णी सांगोजी बाबाजी आणि नागोजी बाबाजी यांच्यावर दुष्काळामुळे कठीण प्रसंग आला होता. त्यांना साहाय्य करण्यास कोणी नव्हते. म्हणून त्यांनी त्रिंबक काकाजी, राघोजी काकाजी का।। सांगोला परगणे माण यांच्यापासून ५०० होन घेतले. त्याबद्दल कर्याती सांगोल्याचे देशकुलकर्ण्यांच्या तकसीमपैकी चवथा भाग दि. ४-४-१६८७ रोजी दिला. त्याचप्रमाणे त्यांचे जे भालवण, म्हैसवड आणि कासेगाऊ येथे वतन होते ते वारसदार रेटून खात होते. होनाजी बाबाजीत वतन सोडवून घ्यावयाची ताकद नव्हती. त्यामुळे त्याने त्रिंबक काकाजी, राघो काकाजी यांना पाठीराखी करण्यास आणि दरबारात खर्च देऊन वतन सोडविण्यास सागितले. ते स्वतः फक्त देखरेख करणार होते.[4]

असाच दुष्काळ पुणे जिल्ह्यातील पुरंदर तालुक्यात पडला होता. या दुष्काळामुळे माळशिरस येथील गाव खराब पडला होता. काळ कठीण आलेला होता. कित्येक लोक सुजोन मेले. कित्येकांची घरे बुडाली. कित्येक उठोन देशावर गेले. माळशिरसचा मालजी रामजी यादव याचा मुलगा रामाजी व सुभानजी हे

१. शिचसा, खं. ५, ले. ९७१; पेद, ३१, ले. ४४, १८३; मइसा, खं. १८ ले. ४६

२. १८३५ शक भाइसंमं. इतिवृत्त पृष्ठ २४७।२५४; सनदापत्रे पृष्ठ १६१ ले. २

३. मइसा, खं. ३, ले. ५६०

४. मइसा खंड २०, ले. २१२-२१३

पोटासाठी सुजोन मेले. त्याची बायको मेली व मालजी आणि त्याची सून मागे राहिली. त्यांना खाण्यास अन्न मिळेना. त्यांचे हातपाय सुजले. त्याच्याजवळ मोकदमीची सनद व कागद होते. ते बुडतील. तो आपले घर नाव नागर शेत देऊन जीव वाचविण्यास निघाला. इतर कोणाला ते देण्यापेक्षा आपल्या भाऊबंदांनाच द्यावे असे त्याने ठरविले. त्याने दि. ३०–७–१६८७ रोजी गोपजी राघोजी यादव याला वडिलांची मिरासी हक्क लाजिम दिले. तो जिवंत असेपर्यंत गोपजीने त्यास अन्नवस्त्र द्यावे, मेल्यावर मूठमाती द्यावी असे सांगून त्याने वतनावरील हक्क सोडला. जो या गोष्टीला हरकत घेईल तो दिवाणीचा गुन्हेगार ठरणार होता.[१] या दोन तीन उदाहरणांवरून दुष्काळाची तीव्रता ध्यानात येईल. दुष्काळामुळे लोक आपली वतने, घरेदारे विकण्यास तयार होते.[२]

अशा रीतीने मराठी राज्यातील शेतीचे उत्पन्न कमी होऊन राज्यावर खर्चाचा बोजा वाढला. लूटमार, दुष्काळ, शत्रूचे हल्ले यामुळे लोकांना सर्व प्रकारच्या सवलती द्याव्या लागल्या. कर्ज द्यावे लागले. संभाजी राजांना या आर्थिक ओढाताणीची कल्पना होती. खर्चाची तोंडमिळवणी करण्यासाठी त्यांनी राजापूरच्या फ्रेंचांकडून, पाँडिचेरीच्या खजिन्यात परतफेड करण्याच्या कराराने, १५०० पागोडे[+] कर्ज मागितले. हे कर्ज देण्यात आले. फ्रेंच कंपनीचा डायरेक्टर जनरल मार्तान याला वरात मिळाली. संभाजी राजांचा मेव्हणा हरजी राजे महाडिक जिंजी आणि पाँडिचेरी प्रांताचा सुभेदार होता. मार्तानने या रकमेची वरात हरजीला दिली. या १५०० होन कर्जापैकी हरजी राजे यांनी फक्त २८० पागोडे परत केले, आणि बाकीची फेड होण्यापूर्वीच हरजी राजे मरण पावला. पुढे राजाराम गादीवर आल्यानंतर मार्तानें ती वरात राजाराम छत्रपतींना दाखवून उरलेल्या पैशाची मागणी केली. राजाराम महाराजांना ही रक्कम परत देता येईना. उलट आर्थिक ओढाताणीमुळे त्यांनीच फ्रेंचांकडून ६००० चक्र[×] कर्ज १८ रु. व्याजाने घेतले. या पैशाबद्दल तारण म्हणून पाँडिचेरीतील आयात, निर्यात, सर्व गाव, तेथील वसाहतीचा सर्व भाग, बाजार, जोंकड नदीत मासे मारण्याचा हक्क, हे सर्व अधिकार वरील रक्कम फिटेपर्यंत फ्रेंचांना देण्यात आले. या पैशाची फेड होऊन पुन्हा पाँडिचेरी मराठ्यांच्या ताब्यात आली नाही.[३]

१. मइसा, खं. २०, ले. २२

२. मइसा, खंड १५, ले. १०, पृष्ठे ३४ ते ४०

+ पागोडे = साडेतीन रुपये

× चक्र = १ रु. १२ आणे

३. भाइसंमं, त्रैमासिक ४२, वर्ष ११, अंक २ रा, पृष्ठे २७ ते ३३

## प्रजादक्षता :

संभाजीमहाराजांना अंतर्गत आणि परसत्ताक प्रश्न सोडविण्यात बरीच शक्ती खर्च करावी लागली होती. त्यांना आणीबाणीच्या अनेक प्रसंगांना तोंड द्यावे लागत होते. स्वराज्याला चारी बाजूंनी शत्रूने वेढले होते. अशा परिस्थितीतून जात असताना त्यांनी प्रजेकडे दुर्लक्ष केलेले दिसत नाही. शत्रूने मुलूख लुटला तर तेथील रयतेला सवलती देण्यात येत असत. कोणी काही कारणाने परागंदा झाले तर त्यांना प्रोत्साहन देऊन पुनर्वसन करण्यासाठी सूट दिली जाई. ओसाड पडलेल्या जमिनीत लोकांनी पुन्हा शेती करावी म्हणून जास्तीत जास्त सवलती देण्यात येत असत. संभाजीमहाराज आणि त्यांच्या अधिकाऱ्यांकडून अभयपत्र, कौलनामा दिला जात असे. काही लोक बाकी थकली म्हणजे धास्तीने गाव सोडून जात. अशा प्रसंगी त्यांनी आपापल्या गावी येऊन राहावे म्हणून अधिकारी त्यांना पत्रे देऊन अभय देत. कोणत्याही कारणाने शेतीचे नुकसान होणार नाही याची दक्षता घेतली जाई. लोकांना हर प्रकारे दिलासा देऊन राज्यात स्थिरस्थावर राहून कारभार नीट चालावा म्हणून काळजी घेण्यात येई.

शिवाजीमहाराजांनी चंद्रराव मोरेवर स्वारी केली असता तीत बाजीने भाग घेतला नव्हता. त्यावेळी दिपाईने आपला मुलगा सरनौबताबरोबर पाठविला होता. शिवाजीने जावळी प्रकरणात दोनदा हस्तक्षेप केला होता. पहिल्या वेळी बाजी अंशभागी होता तर दुसऱ्या वेळी नव्हता. तेव्हा दिपाई बांदलने कोणता मुलगा पाठविला हे कळू शकत नाही. कदाचित नातूही पाठविला असेल. त्याबद्दल दिपाईला शिवाजीमहाराजांनी साडी चोळीसाठी मौजे पऱ्हेर खुर्द येथे इनाम दिले होते. या इनामाच्या सनदेप्रमाणे अधिकारी वागत नसल्याने दिपाईचा नातू, शंकराजी रायाजीचा लेक संभाजीराजांना भेटला. त्याने सर्व हकीगत सांगितली. त्यावरून संभाजीराजांनी दि. १८–११–१६८१ ला (राज्याभिषेक शके ८ दुर्मतीनाम संवत्सरे कार्तिक बहुल तृतीया भृगुवासरे) मावळ प्रांताच्या राजश्री गोपाळ रायाजीला लिहिले की, "...कैलासवासी स्वामीने सन इहिदे खमसेनान दिपाई । स बांदल (लास) साडी चोळी म्हणऊन इनाम मौजे पऱ्हेर...चालत आले आहे. हाली तुम्ही स्वामीचे सनदेची उजूर करिता म्हणऊन दिपाईचा नातू शंकराजी, रायजीचा लेक हुजूर येऊन विदीत केले व कैलासवासी स्वामीची पत्रे दाखविली त्यावरून कळो आले. ऐसियासी मौजे पऱ्हेर बांदल साडी चोळी म्हणून दिपाईस इनाम दिल्हे अवलाद अफवाद चालवित जाणे ताजे सनदेची उजूर करीत न जाणे"[१]

१. भाइसंमं, वर्ष ४७ अं. १–४; ऐसंनि, खंड १०, पृष्ठ १३

चेऊलचा बाळाजी कुलकर्णी याच्याकडे बाकी थकलेली होती. त्या धास्तीने तो चेऊल सोडून रेवदंडा येथे राहावयास गेला. दि. २४–२–१६८२ रोजी चेऊलचा सुभेदार, राघो विश्वनाथ सुभेदार याने त्याला पत्र लिहून बाकीच्या धास्तीने रेवदंड्यास जाऊन राहावयाचे कारण नाही असे कळविले. बाकीसंबंधी विल्हे करून देऊ. आपल्या गावी येऊन सुखे राहाणे. कोणत्याही तऱ्हेचे तजवीज लागणार नाही म्हणून त्याला कौलपत्र दिले.[१]

फेब्रुवारी १६८४ सालापूर्वी पोर्तुगेजांनी आणि सिद्दीने चेऊल प्रांतातील कुदे, ब(दा)पोली व सिडकोली ही गावे लुटली. त्यामुळे तेथील रयत दिलगीर होऊन परागंदा झाली होती. त्यांच्यात काही दम राहिला नव्हता. यासंबंधी चेऊलच्या हवालदाराने संभाजी राजांना कळविले. त्यावरून त्यांनी चिमणाजी आऊजीस चौकशी करण्यास सांगितले आणि ते लिहून कळवतील त्याप्रमाणे विल्हेवाट लावली जाईल असे राजांनी आश्वासन दिले.

मौजे वारले येथे दादाजी कुलकर्णी याचा शेताचा वसूल होता. त्यातील सर्वच राजभाग आणि प्रजाभाग एकत्र होऊन खर्च झाल्याचे दादाजीने कळविले होते. म्हणून दि. ५–२–१६८४ रोजी चिमणाजी आऊजी यास हुकूम देण्यात आला की राजभाग वजा घालून उरलेला प्रजाभाग, जितका होईल तितका दादाजीला परत द्यावा.[२] सरकारात प्रजेचा वसूल जमा झाला तर त्याचा त्याला परत मिळवून देण्याचा प्रयत्न करण्यात येत असे.

यानंतर निळकंठ मोरेश्वर प्रधान यांना चेऊलचे अधिकारी व देशमुख भेटले. चिमणाजी आऊजीने ज्याप्रमाणे कौल देऊन संचणी (?) केली होती त्याप्रमाणे अधिकारी व देशमुख तयार होते. तसा कदबा लिहून दिला होता. चेऊलची काही गावे अमानत होती. त्याची लावणी, संचणी करण्यास निळकंठ मोरेश्वराने चेऊलचा सुभेदार हरि शिवदेऊ यास दि. २–६–१६८४ रोजी लिहून गावच्या रयतेस सागरगडाहून, ५० खंडी गला लावणी संचणी करण्यासाठी देऊन जो जास्त वसूल होईल तो पुढल्या वर्षी जमा करण्यास बजावले होते.[३]

**सवलतींची मागणी :**

शेती ही लोकांच्या उपजीविकेचे साधन आणि सरकारी उत्पन्नाची बाब असे. त्यामुळे सर्व प्रकारांनी शेतीचे नुकसान होणार नाही याची काळजी घेण्यात येई. १६८५ सालच्या एप्रिल महिन्यापूर्वी थोडे दिवस चेऊलच्या रयतेत काही

१. रारा.–ग्रं, ले. ४२

२. शिचसा. खं. ९, ले. ६०,

४. रारा–ग्रं, ४२, ले. ४४

कारणामुळे उबार राहिला नव्हता. रयत असहाय्य होऊन तिला गावात राहण्याची ताकद राहिलेली नव्हती. त्यामुळे सर्व लोक एकत्र होऊन आपापल्या अडचणी सांगण्यासाठी चेऊलच्या सुभेदाराकडे जाणार होते. मृग नक्षत्रास महिना दीड महिना राहिला होता. अडचणीत रयत गुंतून राहिली असती तर शेतीचे नुकसान झाले असते. याचा विचार करून त्यांना दिलासा देऊन कीर्दीस लावण्यासाठी चेऊलचा खोत, पाटील वगैरे लोकांकडून चेऊलच्या सुभेदाराला विनंती करण्यात आली. त्यांनी जे मुद्दे लिहून पाठविले होते त्याप्रमाणे त्यांना दि. ६–४–१६८५ रोजी कौल सादर करण्यात आला. हा कौलनामा ७ कलमी असून त्यात नारळ, सुपारी, बागायेत, जिरायेत, राजभाग इत्यादी गोष्टी नमूद केलेल्या होत्या. त्यांनी खालील गोष्टींसाठी सवलती मागितलेल्या होत्या.

( १ ) बागाईत नारळ, सुपारीवरील कराची आकारणी १६८२ सालच्या पाहणीप्रमाणे जमा धरून काढलेल्या बाकीप्रमाणे कर न घेता, १६८४ च्या पाहणीप्रमाणे तो घ्यावा. ( २ ) १६८४ च्या सुमारास जिराईतीच्या उत्पन्नावरील दर खंडीस लारी ( ३ आण्याचे नाणे ) ४५८ प्रमाणे नख्त घेतले जात. पूर्वी केसोपंताने केलेल्या तहाप्रमाणे दर खंडीस लारी बरूरी ४०८ प्रमाणे नख्त येते त्याचप्रमाणे घ्यावे. ( ३ ) दिवाणे देणे घेऊन गेल्यानंतर वरातदार दूर करून ज्याच्याकडे रास्त बाकी असेल त्याच्यापासून ती घेऊन ज्यांच्याकडे बाकी नाही त्यांच्यावरील वरातदाराचा तगादा दूर करावा. ( ४ ) जिराईतीच्या संचणीच्या वेळी अडाणी वेठबिगार नेहमी पाठीस लागल्यामुळे कीर्दी राहिली नव्हती. पुढील वर्षी संचणीची तसवीस लागू नये आणि पुढील वर्षात हंगामाची पाहणी करून त्याप्रमाणे येईल तो कर घ्यावा. जास्त तसवीस लागू नये म्हणून ही मागणी. ( ५ ) राजभागाचा ( सरकारचा ) वसूल हंगामशीर किलेकोटास व सनदेवाइकास रयत ऐवज देत असे. त्याशिवाय तेथे भात नेण्यात येत असे. त्यामुळे रयतेचे नुकसान होते. ठरलेल्या पैशापेक्षा सरकारी अधिकाऱ्यांनी जास्त मागणी करू नये, रास्त तेवढेच घ्यावे म्हणजे नुकसान होणार नाही म्हणून मागणी. ( ६ ) जिराईती व बागाईतीचे वाडवल व आनाडी यांच्या पाठीशी वेठबिगार लागली होती ती दूर करावी. वेठबिगारीमुळे शेताच्या कष्टाची कामे, वाडीचे कुंपकुडण व झाडाचे शेतपाणी होत नव्हते. म्हणून वेठबिगार दूर करण्यासाठी मागणी. ( ७ ) राजकोटास भाडे ( तोफा ) पावल्यावर आणखी वेठीची तसवीस लागणार नाही म्हणून बजाविले होते.

या सर्व सवलती चेऊलचा सुभेदार व कारकून हरी शिवदेव याने देऊन त्याप्रमाणे कौलनामा दिला.[१]

१. शिचसा, खं. ९, ले. ६३, पृष्ठे ६३ ते ६५

**खंडणी व करात सवलत :**

खंडणी हेही एक उत्पन्नाचे साधन असे. देशमुख व देशकुलकर्णी यांच्यापासून किती खंडणी घ्यावी याचे प्रमाण दादाजी कोंडदेवाने ठरवून दिलेले होते. ही खंडणी दरवर्षी पातशाही होन ४०० द्यावी लागत असे. त्यातील ३०५ होन देशमुख आणि ९५ होन देशकुलकर्णीने द्यावे असा तह झालेला होता. सन १६७३–७८ च्या दरम्यान शत्रूच्या स्वारीमुळे पुण्याचा मुलूख खराब पडला होता. त्यामुळे वसाहतही जुजबी झाली होती आणि देशमुख आणि देशकुलकर्णी यांच्या हक्काच्या कराची वसुली होईना. तरीही दिवाणात वरकड पूर्वीप्रमाणे घेतले जात होते. त्यामुळे देशकुलकर्णींचा उदरनिर्वाह होणे कठीण होत होते. म्हणून पुण्याचे देशकुलकर्णी केसो त्रिमल यांस भेटले आणि त्यांनी आपली हकीकत सांगितली. त्यांना छत्रपतींची सेवा करण्याची इच्छा होती आणि ते एकनिष्ठपणाने सेवा करीतही होते. ४०० होनांचा तह ज्यावेळी परगणा कीर्दी होता त्यावेळी केलेला होता. १६८३ सालच्या सुमारास शत्रूच्या आक्रमणामुळे परगणा खराब पडल्याने देशमुख व देशकुलकर्णी यांचाच वसूल होत नव्हता. त्यामुळे वसुलीच्या मानातच खंडणी घ्यावी अशी त्यांनी विनंती केली. दि. १९–१०–१६८३ रोजी केसो त्रिमल याने विनायक उमाजी सुभेदार यांस लिहून कळविले की, "ऐसियास हाली इनामती खंडणीचा तह केला. ऐनदस्त साल ब साल होईल त्यास दस्त माफीक. चौथा होनाची बेरीज दस्ताप्रमाणे बसेल ते यापासून घेत जाणे. हाली दस्तही कमी आहे."[1]

१६८५ सालापर्यंत हक्काचे व इनामतीचे दस्त कमी वसूल झाले तरी सदरहू ४०० होन जावक व इनामती दस्त ( कर ) होईल त्याजवरी दस्त माफीक इनामती खंडणीची जी बेरीज बसेल ती देशमुखाचे निसबतीने देशमुख आणि देशकुलकर्णी यांच्यापासून घेतली जात असे. १६८५ सालापूर्वी परगणा खराब पडला आणि कराची वसुली पुरी होत नव्हती म्हणून पुण्याचा मोरो विठ्ठल कुलकर्णी छत्रपतींना भेटला आणि त्याने वरील अडचण सांगितली. संभाजीराजांनी दि. २०–३–१६८५ रोजी पुण्याचा देशाधिकारी बाबाजी तानदेऊ यांस लिहून कळविले की, देशमुख व देशकुलकर्णी यांच्यापासून ४०० होनांवर ३०५ व ९५ या प्रमाणात जी वसुली होईल त्या मानात त्यांच्याकडून खंडणीची वसुली करावी.[2] या पत्रातील हुकुमाप्रमाणे कविकलशाने पुण्याचा सुभेदार बाबाजी तानदेऊ यांस दि. २२–३–१६८५ रोजी लिहून कळविले होते.[3]

१. मइसा, खं. १८, ले. २५
२. पेद ३१, ले. १८३, पृष्ठे १६८–१६९
३. पेद ३१, ले. ४४, पृष्ठे ३९–४०

चेऊलच्या रयतेला कर ( रयतपणा ) देता येत नसल्यामुळे त्यांनी शेतीच्या बाबतीत चुकवाचुकवी सुरू केली होती. त्यावेळी १६८५ मध्ये निळकंठ मोरेश्वराने त्यांना कौलनामा सादर करून कोणत्याही बाबतीत शंका न आणता कीर्दी मामुरी खुशाल करावयास सांगितले. त्यांनी तसे चिमणाजी आऊजीला लिहिले. ते कौलबोल देतील त्याप्रमाणे निळकंठ मोरेश्वर त्यांचे चालवून घेण्यास तयार होता. लोकांच्या मनातील भीती काढून रयतेने लावणी–संचणीची टाळाटाळ करू नये म्हणून पंतप्रधानाने रयतेला दिलासा दिला होता.[1]

चेऊलचा दादाजी महादेव देशकुलकर्णी याने निळकंठ मोरेश्वर प्रधानास छत्रपतींकडून १२५ होनांची हुंडी पाठविण्यात आल्यावर सरकारी अधिकाऱ्यांनी बरीच कटकट केल्याचे कळविले होते आणि स्वामींना मनारोखा पाठवावा अशी विनंती केली होती. त्याप्रमाणे निळोपंताने दि. १९–५–१६८५ रोजी दादाजी महादेव देशकुलकर्णी यास कळविले की, अधिकाऱ्याला मनारोखा पाठविला आहे. तो आला तरी त्याला वाटेला लावावे. हुंडी आली असेल तर ती परत पाठवावी. रयतेला कर देण्याची ताकद नसल्याने पंतप्रधान हुंडीही रोखून तगादा लावणार नाही असे आश्वासन देत.[2]

**पुनर्वसनासाठी कौलनामा :**

जंजिरेकर सिद्दी आणि मुघल सैन्य कुलाबा जिल्ह्यात सतत लूटमार करीत असे. सन १६८५ मध्ये त्यांनी चेऊल प्रांतात लुटालूट केली. त्याबद्दल देशमुखांनी सुभेदार रायाजी सदक प्रभूला सांगितले. राजापूरकर गनीमांनी येऊन शहर जाळून, लूटमार केल्याने रयत परागंदा होऊन दोन वर्षे मुलूख ओसाड आहे. रयत पुन्हा चेऊलमध्ये येऊन वसाहत करण्यास तयार असली तरी त्यांना सवलती हव्या होत्या. व्यापारी व सराफही गाव सोडून गेले होते. त्यांना कौल मिळाला तर तेही पुन्हा तेथे येऊन आपला धंदा पुन्हा सुरू करणार होते. रयतेच्या अनेक अडचणी होत्या. पंतप्रधानांचा कौलनामा आणून देतो असे सांगून सुभेदाराने पुन्हा वसाहत करून व्यापार, शेती करण्यास सांगितले होते.

हा कौलनामा खूप मोठा असला तरी त्यातील तपशील पाहिला म्हणजे रयतेच्या अडचणी कोणकोणत्या होत्या आणि त्यांनी काय सवलती मागितलेल्या होत्या हे लक्षात येते. २५|२६ कलमांचा हा कौलनामा दि. ३०–१०–१६८७ रोजी सादर करण्यात आला होता.

( १ ) चेऊलमधील सिद्दीच्या लुटीने रयत परागंदा झाल्यामुळे तेथील घरे, राहाट, राहाटवड, माड, सुपारीची झाडे यांचे नुकसान झाले होते. राजापूरकरांच्या धास्तीने रयतेने वसाहत केली नव्हती. बागाईत करण्यास जागा

१. रारा–ग्रं. ४२, ले. ४५

२. शिचसा, खंड ९, ले. ६७, पृष्ठ ७०

नव्हती. दोन वर्षांत चोरांनीही मन मानेल तशी सुपारीची झाडे, माड तोडून नेले होते. दुष्काळामुळे बरीच माणसे मेली. जे लोक राहिले होते ते आपल्या जागी खोपटे घालून राहावयास आणि वसाहत करण्यास तयार होते. जे माड शिल्लक असतील त्यांची मशागत करणार होते. परंतु त्यावर्षी खराबाचे जितके देणे घेतले होते तितकेच देणे बाकी राहिले होते. वसाहत करताना त्याची माफी करावी अशी रयतेने मागणी केली होती. झाडांचा कष्ट केल्यावर ती बारास येतील तेव्हाच पाहणी करून जमाबंदी करावी अशी त्यांची मागणी होती. तोपर्यंत बाकीचीही तसवीस लागू नये अशी त्यांनी विनंती केलेली होती. बाकीची तसवीस लागणार नाही आणि पुढल्या वर्षी पाहणी झाल्यानंतरच बेरीज येईल त्याप्रमाणे वसूल घेतला जाईल असे आश्वासन देण्यात आले होते.

( २ ) पूर्वी १०० नारळांना ५।।८ व सुपारीवर दर मणाला ९८ कर होता. आगर खराब पडून वसाहत नव्हती तरी १६७७ प्रमाणे ( सन सबाकारणे ) हल्ली १०० नारळांचा दर ६।। टक्के आणि सुपारीचा दर मणास १०।। टक्के जास्त किंमत लावून जमाबंदी केली. पूर्वी सरकारकुनांनी केलेला कर द्यावा, जास्त बसविलेला घेऊ नये अशी मागणी होती. त्याप्रमाणे कौल देऊन जास्तीची तसवीस लागणार नाही असे आश्वासन दिलेले होते.

( ३ ) अनाडी कुळाकडून घरटका आणि मीठ कर माफ करावा व वेठबिगारीची तसवीस लागू नये अशी मागणी होती. एका वर्षाकरिता मीठ टका घेऊन घरटका व वेठबिगारची तसवीस लागणार नाही असे आश्वासन देण्यात आले होते.

( ४ ) सरदेशमुखांनी जमाबंदी करून जो आकार बसविला असेल त्यातून सरदेशमुखी वजा करून बाकी राहील त्याचा वसूल घेऊन जास्ती तसवीस लागू नये ही विनंती मान्य करण्यात आली.

( ५ ) महाल मजकुराचे कारकुनांनी वतनदारांनी झाडे व माड विकण्याची रीत नसता ते रयतेच्या पोटची लेकरे ( झाडे ) तोडत किंवा खराब करीत. ही झाडे तोडू नयेत अशी ताकीद फर्माविण्यास महाराजांचा कौल मागितला होता. त्यावर निळोपंतांनी, जी झाडे तोडली असतील त्यांची यादी करवून व भरपाई देऊन कारकून आणि वतनदारांना ताकीद करण्याचे आश्वासन दिले.

( ६ ) कोळ्यांनी सुपारी व माड तोडून नेले होते. पाहणीनंतर त्यांची किंमत करून ती वजा घालून गुन्हेगाराकडून गुन्हेगारी घ्यावी, गुन्हा नसेल त्याला तसवीस लागू नये अशी विनंती करण्यात आली होती. ती मान्य करून त्याबाबत जास्त कटकट करील त्याला देशमुख मोख्तसर आणि सरदेशमुख यांनी बसून मनसुफी करून शिक्षा केली जाईल असे मान्य करण्यात आले.

( ७ ) जे लोक शहरात वसाहत करून राहतील त्यांना घरटका व मीठटका माफ करावा. त्यांना एक वर्षापुरता घरटका माफ करण्यात आला.

( ८ ) किल्ल्यावरील व सुभ्यातील जुमलेदार, पाव लोक, घोडेस्वार स्वारीवर जाताना रयतेचे भात व बीज घरातून, मार्गात व विलायेतीहून लुटून नेत असल्याने रयत हैराण झाली होती. सर्व कटकटी दूर व्हाव्या, हक्काचे असेल तेवढेच घ्यावे, जास्त वसूल घेऊ नये अशी विनंती होती. ज्या गावास स्वारी शिकारी होतील त्या तर्फेच्या गावांना व एकंदर तसवीस लागणार नाही म्हणून कौल दिला.

( ९ ) १६८५ पासून १६८७ पर्यंत रयत परागंदा झाली होती. जागा उद्ध्वस्त झाली होती. वेळेवर खावयास मिळत नव्हते. रयत वसाहत करून, जीव वाचवून कष्टास तयार होती. दरम्यान कोणी दबावितील त्याची दहशतीची तसवीस लागू नये व जो गैर करील त्यास ताकद देण्याच्या मागणीप्रमाणे कौल दिला.

( १० ) रयतेच्या राहाट, राहटवड, देरिया, रूख इत्यादी गोष्टी नेल्या होत्या. कोणास राहावयास जागा नव्हती. तरी या गोष्टींसाठी मागितलेले कर्ज मंजूर करण्यात आले. ज्याच्याजवळ बैल नसेल त्याला बैल देण्याचे आश्वासन देण्यात आले. ज्याच्या त्याच्या पात्रतेप्रमाणे आश्रय देण्याचे कबूल करण्यात आले.

( ११ ) शत्रूच्या त्रासाबरोबर जंजिरे खंदेरी, कुलाबा, पद्मादुर्ग येथील कोळ्यांनी झाडे, चापे, फणस, उडी, राहाट, राहटवड, माड हे कराच्या निमित्ताने तोडून नेले होते. त्याची यथायोग्य किंमत ठरवून वसाहत करण्यासाठी योग्य तो पैसा द्यावा अशी मागणी होती. कोळी बंदरी गलबते नेऊन ठिकठिकाणी कारकून हुडकर ( ? ) जमा करून किल्याचे नावे खर्च लिहून हुडे व बाजे सिवार बंदरात आणून गलबते भरून किल्ल्यात नेत असत. कोळी दंगा करून मासळी मारण्यासाठी माड, खुंटास नेत, त्यांचा त्रास दूर व्हावा व किल्यात जितकी झाडे नेली असतील त्याचा नावनिशी तपशील कळविल्यावर झाडाची तसवीस लागणार नाही असे आश्वासन मिळाले.

( १२ ) कोटवाडा व खासगीसाठी शाकारणी करण्यासाठी हवालदारांना व मुजुमदारांना झाप द्यावे लागत. त्याऐवजी जुमले, फूट, हवाले यांस झाप दिले जात. त्यामुळे आगर खराब होत असल्याने तसवीस दूर करावी अशी मागणी होती. तेव्हा कोटवाडा, खासगी व मामला यांचा शाकार करण्यासाठी दर माडास २ झाप देऊन वरकड होतील त्याची रास्त किंमत देण्याचे कबूल करण्यात आले.

अशा अनेक गाऱ्हाण्यांसंबंधी व परागंदा झालेल्या रयतेच्या पुनर्वसनासाठी ज्या सवलती दिल्या त्या दि. ३०–१०–१६८७ रोजी मान्य करण्यात आल्या.

**व्यापाऱ्यांना सवलती :**

शेतीप्रमाणे गनीमांमुळे व्यापाऱ्यांचेही नुकसान झालेले होते. दोन वर्षे चेऊल प्रांत ओसाड पडला होता. तेथील व्यापार-उदीम, सोनार निरनिराळ्या जागी निघून गेले होते. शहर खराब पडल्याने व्यापार उदीमही बसला होता. वसाहत झाल्यावर व्यापारी शहरात जाऊन व्यापार सुरू करणार होते. तेव्हा हिसेब मनास आणून, विल्हे करून देऊन बारमाही वसूल घेऊन साल मजकुरी देणे माफ करावे. ही त्यांची विनंती मान्य करण्यात आली.

काही व्यापाऱ्यांचे मागील कर्ज दिवाणाकडे, मामलाकडे व महालाकडे होते. ते कर्ज मिळाल्यावर व्यापार सुरू करणार होते. त्यांच्याही मागण्या मान्य करण्यात आल्या.

चेऊल शहरात वसाहत झाल्यावर सोनार, सराफ तेथे वस्ती करणार होते. त्यांच्याकडून कोणी कर्ज व उसनेपासने मागितल्यास त्यांना ते देणे शक्य झाले नसते. म्हणून त्यांना कौल देऊन कोणी कर्ज देऊ नये व जो कोणी ते बळजबरीने मागेल त्यास ताकीद केली जाईल असे आश्वासन देण्यात आले.

एकदोघा सोनारांना कोटवाडा खासगीमधे धरून नेऊन त्यांचे पैसे घेतले होते. अशी तसवीस पुन्हा लावणार नाही म्हणून कबूल केले. काही सोनारांना मुलखात फिरत असता भलताच किलेकरी धरून धाकदपटशा दाखवून त्यांच्याजवळील दाणे, पैसे घेई. ज्याच्याकडून तसवीस लागेल त्याचा ठावठिकाणा कळविल्यास पारपत्य करण्याचे त्यांना आश्वासन देण्यात आले.

दिवाण लोक कामे करवून घेऊन त्याची मशागत देत नसत. म्हणून जे कामे करतील त्यांना मजुरी मिळण्याची व्यवस्था करण्यात आली. अशा तऱ्हेने जवळ जवळ १५।१६ कलमी कौलनामा चेऊलच्या व्यापाऱ्यांना व वसाहत करणाऱ्यांना दि. ३०–१०–१६८७ रोजी सादर करण्यात आला.

मुलखाची आबादानी व्हावी म्हणून संभाजी राजे आणि त्यांचे अधिकारी देशमुख, देशपांडे त्यांना दिलासा देत असत. पुष्कळ वेळा रयतेला वरातदारांचा त्रास होत असे. तोही दूर करण्याचे प्रयत्न करण्यात येत. १६८६ च्या अखेरीस चेऊलच्या देशमुख, अधिकारी, देशकुलकर्णी यांनी आपल्या काही तक्रारी सुभेदार रायाजी सदक प्रभू व दत्ताजी विठ्ठल मजालसी सुभा यांच्याकडे लिहून पाठविल्या. म्हणून जिवाजी हरि सुभेदार, राजश्री तुलजोजी सरसुभेदार आणि नरसो सुरो सुभेदार यांनी एकत्र बसोन कलमाचा कलम मनास आणोन त्यांना कौल सादर केला होता. या कौलनाम्याप्रमाणे दि. १०–१–१६८७ रोजी सुधागडचा सुभेदार व कारकून जिवाजी हरि याने चेऊलच्या देशमुख, देशकुलकर्णी व रयतेस कळविले की, “ तुम्ही कौलनाम्याप्रमाणे गावचा गाव मामुरा

करणे, कीर्दमशा...ची बेगमी करून स्वामी कार्ये (करणे कीर्द करणे) तुम्ही याउपर स्वामीकार्यास हरकत फितवा सर्वथा न करणे. तुम्हास वरातदाराचा तगादा होता तोही दूर केला आहे. कोण्ही वरातदारही तगादा लावणार नाही. हर येकविसी तुमचे चालउनु सर्वथा आम्हापासून अंतर पडणार नाही. तुम्ही आपले समाधान असो देणे."[1] या पत्रावरून असे दिसते की चेऊलच्या देशमुख देशकुलकर्ण्यांनी राज्यकारभारात काहीतरी अडचण निर्माण केली होती. त्या सरकारी अधिकाऱ्यांचा तगादा दूर करून त्यांनी महाराजांपाशी एकनिष्ठ राहून जमीन संपन्न करावी म्हणून त्यांना कौल देण्यात आलेला होता.

मेघःशाम ढेरे हा कर्याती मावळचा, मौजे पाषाण मुकूम, भुगाव, कोथरूड, हिंगणे या पाच गावांचा कुलकर्णी होता. सरकारकडून त्याच्याकडे वजाई (कराची मागणी) आली होती. त्या धास्तीने तो परागंदा झाला होता. त्याच्या संबंधी श्रीयाजी सिवप्रभू हवालदार यांनी सांगितल्यावरून संभाजी राजे आणि निळकंठ मोरेश्वराने कौल सादर केला होता. त्याने आपल्या गावी येऊन वसाहत करावी म्हणजे त्याच्यावरील वजाई दूर केली जाईल. कोणत्याही बाबतीत शंका मनात आणू नये. मेघःशाम ढेरे निळकंठ मोरेश्वराला भेटल्यावर त्यांनी त्याला गावावर पाठविले. निळकंठ मोरेश्वराने पुण्याच्या कर्याती मावळातील पाच गावच्या मोकदमाला त्याच्यापासून पूर्वीप्रमाणे कारभार घेण्याविषयी दि. ११–९-१६८८ रोजी लिहिले होते. त्याला हरकत घेईल त्याची अब्रू राहणार नाही असेही बजावण्यात आले होते. त्याप्रमाणे भूगाव व बावधण (पुण्यापासून ५ मैल) येथील मोकदमाना दि. १३–१०–१६८८ रोजी मावळातील दिवाणांनी लिहिले की, "मेघःशाम ढेरे कुलकर्णी यांचे कुलकर्ण हुजरात पंतस्वामींनी याचे दुमाला केले आसे. तरी तुम्ही येकदिल असोन याचे हाते कुलकर्णाचे काम घेत जाणे. गाव आबादान करून कीर्दी मामुरी करणे. देहाये मजकुरी याची माणसे गुरुढोर वस्तभाव असेल त्यास हिला हरकत करीत नव जाणे. याचा साल दरसाल सांभाल करीत जाणे."[2] या तीनही पत्रांवरून संभाजी महाराजांच्या कारकीर्दीच्या अखेरीपर्यंत राज्यकारभाराचे गाडे व्यवस्थितपणे चालू राहिलेले होते असे स्पष्ट दिसते.

### ओढ्याची दिशा बदलण्याची कल्पकता :

जमीन सुधारण्यासाठी, जास्तीत जास्त जमीन लागवडीखाली आणण्यासाठी केलेल्या प्रयत्नांना सरकारकडून साहाय्य मिळत असे. रत्नागिरी जिल्ह्यातील संगमेश्वर तालुक्यातल्या तर्फ देवळे मौजे शिपोशी या गावी मोहळचा परिया (ओढा) व दाभोळच्या सीमेवरील ओढा असे दोन ओढे होते. विशाळगडचे

१. शिचसा, खंड ९, लेख ६८ २. संकापसं–जो, ले. २६५, २६९, २७०

पोतदार मल्हार रंगनाथ यांनी हे दोन ओढे मोडून नवे भातशेत करण्यासारखे आहे असे देवळे येथील ठाणेदारांना कळविले होते. मल्हार रंगनाथ मशागत करणारे असले तरी हे काम फार कष्टाचे होते. त्या जागी बराच खर्चही करावा लागणार होता. भातशेत तयार होऊन लागवडीस येण्यास बरीच वर्षे लागली असती. मल्हार रंगनाथ आणि देवळे येथील सरकारी कामगार यांनी ती जागा पाहून, तेथील मल्हार, गुरव यांना बोलावून सर्वांसमक्ष नदीस मिळालेला मोहोळाचा ओढा मोडून उत्तरेच्या बाजूने डोंगरात चर काढून नदीस मिळविण्यासाठी तो १४०० हात लांबीचा खणावा अशी योजना होती. त्यासाठी त्यांना देवळे तर्फ्याचे ठाणेदार यांनी मल्हार रंगनाथ याला १६८२ साली कौलनामा सादर केला होता. ओढ्याची दिशा बदलण्याची आणि त्याखालील जमीन भातशेतीखाली आणण्याची योजना, त्या काळचा विचार करता, अत्यंत कौतुकास्पद होती असे वाटते. या कल्पनेला संभाजी राजांच्या अधिकाऱ्यांनी प्रतिसाद दिला. मल्हार रंगनाथ आणि काशी रंगनाथ यांनी डोंगरातून जो चर खणला त्याची लांबी १४०० हात, रुंदी १८ ते २० हात आणि खोली ५ ते ७ हात होती. त्यांना या कामासाठी ८ हजार रुपये खर्च आला. श्रम, साहस व कष्ट मशागत करून केलेले हे बांधकाम फुटले. पुन्हा खर्च आणि श्रम करण्यासाठी हुशारी यावी म्हणून शिपोशीपैकी नदीच्या पूर्वेकडील सर्व भाग कोंड म्हणून स्वतंत्र करून द्यावा यासाठी काशी रंगनाथ याने १६९२ साली विशाळगडचे अमात्य रामचंद्र निळकंठ यांना विनंती केली होती. त्याप्रमाणे त्यांना सनद देण्यात आली होती. सदर मोहोळापर्यंत बांधलेला बांध आणि काढलेला चर अद्यापही प्रत्यक्ष दिसतो. हा बांध कित्येक जागी १५ ते २० हात रुंद असून आज त्याचा अवशिष्ट भाग दोन अडीचशे हात लांब आहे. खोदून तयार केलेला चर कित्येक ठिकाणी १० ते २० हात रुंद असून ७–८ हात उंचीचा आणि दोनअडीचशे हात लांबीचा आहे. या ठिकाणाला हल्ली 'चराची पट्टी' असे म्हणतात. त्याचप्रमाणे दाभोळ गावाच्या सीमेच्या ओहोळासही बांध घालून बाजूने चर खणून, तो नदीपर्यंत नेलेला होता, आणि त्या ठिकाणी शेत तयार केलेले होते. मोहोळाच्या ओढ्यातील बांध फुटल्यामुळे ते काम अपुरेच राहिले होते. चर खणण्याचे आणि बांध घालण्याचे काम १६८२ साली सुरू होऊन ८–९ वर्षे चालू होते.[1]

## वतनवृत्ती :

वतनदार आपल्या वतनाला फार जपत असत. वतनवृत्तीसंबंधी पिढ्यान् पिढ्या वाद चालत. शिवाजीमहाराजांपासून चालत आलेले तंटे कशा तऱ्हेने सोडविले

१. आघइ–आ, प्रथम खंड, ले. ६ व १०; पृष्ठे १९, २९, ३०

जात, व एकाची वृत्ती दुसऱ्याला जाऊ नये म्हणून कशा रीतीने योग्य निर्णय दिले जात हे खाली दिलेल्या उदाहरणांवरून स्पष्ट होईल.

पुणे देशकुलकर्णी राजर्षी घराणे राजकारणी आखाड्यात दक्षिण कर्नाटकात हरजी राजे महाडीक यांच्या हाताखाली काम करीत होते. कृष्णाजी कासी, राजर्षी तिकडे कामावर असताना पुणे येथील त्यांच्या वतनाविषयी ते छत्रपती महाराजांना दि. २३–१०–१६८१ रोजी पत्र लिहून कळवितात की, " आमची कुलकर्णपणाची वृत्ति अमानतच आहे तशी असू द्यावी. आमचे घराण्यातील कोणी येऊन काही सांगून वृत्ति मोकळी करा म्हणतील, पण मोकळी करू नये, अमानतच असो द्यावी. " हे पत्र छत्रपतींना दि. २५–११–१६८१ ला मिळाले. लगेच दुसऱ्या दिवशी म्हणजे दि. २६–११–१६८१ रोजी महाराजांनी कृष्णाजी कासी यांस लिहून वृत्ती अमानत राहील व कोणी दाईज आला तरी मोकळी करणार नाही म्हणून आश्वासन दिले. याशिवाय हरजी राजे यांच्या आज्ञेत राहण्याविषयी कृष्णाजी कासी यास बजावले.[1]

इतक्या तातडीने संभाजीराजांनी पाठविलेले पत्र उद्धृत केल्यावर त्यांच्यावरील आक्षेपाला उत्तर देण्याची जरूरी वाटत नाही.

**यादवांची देशमुखी :** परगणा कऱ्हाड येथे पूर्वापार चालत होती. परंतु आदिलशाही कारकीर्दीत मुधोजी निंबाळकर याने पुंडावा केला असता यादवांचे वाडवडील त्याला मिळाले म्हणून बादशहाने हे वतन खालसा केले. ते त्याने प्रथम रणदुल्लाखानास आणि नंतर शहाजी राजे यांना दिले. शहाजी राजांपासून ते वारसाहक्कानुसार शिवाजी महाराजांकडे असताना त्यांच्या पदरी असलेल्या अर्जोजी यादव याने ते परत मिळविण्याची खटपट केली. शक्यतो देशमुखीसारखी वतने वंशपरंपरेने द्यावयाची नाहीत असा महाराजांचा कटाक्ष होता. त्यांनी यादवाकडून जनार्दन नारायण हणमंते यांचा अधिक्षेप झाल्याच्या गुन्ह्यावरून त्यांची कसबा–औंधची देशमुखीही सरकारजमा केली. अर्जोजीने ही दोन्ही वतने परत मिळावी म्हणून महाराजांची विनवणी केली. त्यांनी तिकडे लक्षच दिले नाही. कऱ्हाडची देशमुखी बादशहाकडून आम्हाला मिळाली असल्याने त्या वतनाशी यादवांचा संबंध नाही. तथापि त्यांना कऱ्हाडची देशमुखी द्यावयाची तर ती त्यांना आमची म्हणून देऊ असे त्यांनी यादवांना सांगितले. वतन देण्याचे कबूल केले पण वतनाची पत्रे द्यावयाची राहून गेली.

अर्जोजी यादव हा मोठा स्थापत्यविशारद होता. शिवाजी महाराजांच्या आज्ञेनुसार त्याने प्रतापगड आणि पावनगड या किल्ल्यांचे बांधकाम केले. संभाजी महाराज सिंहासनारूढ झाल्यानंतर त्यांनी अर्जोजी यादव यास रायगडीचे इमा-

१. ऐसंसा, खंड ६, ले. १, पृष्ठ १

रतीचा सुभा सांगितला. पाचवडात राजमंदिर उत्तम बांधले. या बांधकामावरून संभाजी राजे आणि येसूबाई खूष होऊन त्यांनी इमारतीच्या लोकांस तीन हजार होन व अर्जोजी यादव यास पाच हजार होन बक्षीस दिले. खासा जातीचे पाच हजार होन दिले. या संधीचा फायदा घेऊन अर्जोजी यादवाने राजांकडे अर्ज केला की औंधच्या देशमुखीचे वतन आम्हाला थोरल्या महाराजांनी दिले, परंतु कागदपत्रे झाली नाहीत तरी स्वामींनी दिलेले पाच हजार होन सेरणी म्हणून घेऊन औंधची देशमुखीची पत्रे करून दिली पाहिजेत. त्यावर संभाजी महाराज बोलले की, "कैलासवासी स्वामींनी वतन दिल्हे ते आम्हीही दिल्हे असे. राजश्री कबजी बावा पनालेस आहेत त्याची व साहेबांची भेटी जहालियावरी पत्रे करून देऊ म्हणोन बोलोन बक्षिसाचे होन पाच हजार पोता घेतले." त्याचप्रमाणे कबजी बावाने पाचवडामध्ये विहीर खणण्याचा हुकूम दिला होता. विहीर पुरी झाल्यावर अर्जोजीला १२०० होन बक्षीस दिले. ते बक्षीसही त्याने महाराजांना सेरणी म्हणून देऊन देशमुखीचे वतन मागितले.

संभाजी राजे पन्हाळ्यास गेल्यावर त्यांची कविकलशाशी भेट झाली. त्यावेळी अर्जोजीने वतनाचा अर्ज केल्यावर महाराजांनी कबजी बावाला वतनाची पत्रे करून देण्याची आज्ञा केली. कविकलश पत्रे करून देणार तोच कऱ्हाडच्या देशमुखीवर असलेला तुळाजी कडू पन्हाळ्याला आला. त्याने यादवांना औंधची देशमुखी दिली तर कऱ्हाडची देशमुखी जाईल असे कविकलशाला सांगितले. त्यामुळे त्याने वतनाची पत्रे देण्याचे लांबणीवर टाकले. अर्जोजी यादवने वतनाचा मामला सोडला नाही. काही दिवसांनी त्याने येसाजी फर्जंदबरोबर १००० होन व नाणे होन १०० आणि एक उत्तम अरबी घोडा महाराजांना बक्षीस दिला. तुळाजीकडूने मधे अडथळा आणला तरी महाराजांनी कविकलशास पत्रे देण्याची परवानगी दिली. (तुळाजी कडू वारणेच्या देशमुखीसाठी नसते भांडण करीत होता म्हणून दि. १२-६-१६८२ रोजी त्याच्याकडून बारा गावचा कारभार काढून तुळाजी कदमला दिला होता.[१])

यानंतर संभाजी आणि कविकलश अकबराची राजापुरास रवानगी करून रायगडला निघाले. कबजीबाबा पन्हाळ्यास रवाना झाले. त्यावेळी अर्जोजी यादवने पत्राची विनंती केली. त्यामुळे महाराजांनी कबजीला त्याच्याजवळ असलेल्या डबले (?) यात त्यांच्या वतनाच्या सनदा करून देण्यास सांगितले. त्याने महाराजांची आज्ञा मान्य करून वतनाचे कागद करून देतो असे अर्जोजीला सांगितले. कोणीतरी आप्त माझ्याबरोबर द्या, असे सांगितल्याने अर्जोजीने पदाजी यादवला कविकलशाबरोबर पाठविले व स्वतः महाराजांबरोबर रायगडास गेला. कविकलशाकडून पदाजी

१. शिचसा, खंड ६, ले. १११

यादव वतनाचे कागद मागत असता तुलाजी कडू पन्हाळ्यास गेला. पदाजी यादव आणि नरसिंग राऊ हे जमीनदारी करीत असता त्यांच्याकडून १६००० फाजील आहेत ते घेऊन वतनाचा कागद करून द्यावा असे तुलाजी कडूने कलशास सांगितले. तुलाजीने काही तरी भांडण काढले म्हणून पदाजी निघून गेला. ही गोष्ट कबजीने महाराजांस कळविली. त्यावर संभाजी राजांनी अर्जोजी व गिरजोजी यादव याला विचारले की, तुम्ही कितीजण भाऊ ? त्यावर अर्जोजीने उत्तर देताच स्वामी बोलले, कबजीबाबा जवळी वतनाच्या पत्रानिमित्त ठेविला होता तो कोण ? त्यावर अर्जोजी म्हणाला, ' पदाजी आमचा काही नव्हे. ' या गोष्टीमुळे वतनाची पत्रे देणे राहून गेले. अर्जोजीला लगेच ती करून घेण्याची संधी मिळाली नाही. अखेर संभाजी राजे आणि कविकलश शिर्क्यांचा बंदोबस्त करून रायगडला जाण्यासाठी जेव्हा संगमेश्वरला थांबले होते तेव्हा तेथे अर्जोजी आणि गिरजोजी यांनी त्यांना भेटून वतनपत्रे द्यावयाची विनंती केली. महाराजांना त्यांनी २००० होन सेरणी दिली आणि त्यांना पत्रे द्यावयाची परवानगी मिळाली. त्याप्रमाणे वतनपत्रे सिद्ध झाली. त्यावर राजमुद्राही झाल्या. सरकारकुनाच्या शिक्के निशाणासाठी पत्रे गेली. त्याच दिवशी राजांवर तो दुर्धर प्रसंग ओढवला. शेख निजामाने वेढा दिला त्यात त्या सनदा गेल्या, आणि संभाजी राजे आणि कविकलश पकडले गेले.

शिवाजी महाराजांच्या काळापासून अर्जोजी व गिरजोशी वतनपत्रे मिळविण्याचा प्रयत्न करीत होते; संभाजी राजांच्या कारकीर्दीत त्यांनी दोन-तीन वेळा प्रयत्न केले, अखेर सनदा तयारही झाल्या. परंतु शत्रूचा वेढा नेमका त्याच वेळी पडल्याने वतनाचे कागद यादव बंधूंच्या पदरात पडले नाहीत. शेवटी सन १७१६ मध्ये ताराबाईंच्या कारकीर्दीत हे वतन त्यांना मिळाले.[१] या हकीकतीवरून अर्जोजी–गिरजोजी आणि संभाजी राजे यांचे संबंध किती जवळचे होते ते दृष्टीस पडते. शिवाजी महाराजांनी योग्य ते मान्य केलेच होते. तेच धोरण सांभाळणाऱ्या संभाजी राजांनीही यादव बंधूंना वतन देण्याचे मान्य केले होते.

एखाद्या वतनाविषयी वाद चालू असेल तर तो मिटेपर्यंत किंवा वतनाला कोणी वारस नसेल तर ते अमानत करावयाची पद्धत शिवाजी राजांपासून चालत होती. तीच पद्धत संभाजीराजांच्याही कारकीर्दीत चालू होती असे दिसते.

उपाध्येपणाच्या वतनाबद्दल देवळे महालातील आठल्ये व रेमणे यांच्यात कित्येक वर्षे वाद चालू होता. तो १६७२ पर्यंत अनिर्णित राहिला. त्या वर्षी शिवाजीमहाराजांच्या कारकीर्दीत त्याचा निकाल लागून आठल्ये यांचे उपाध्येपणाचे वतन खरे ठरले. संभाजीराजांच्या कारकीर्दीत रेमणे आणि आठल्ये

१. ताकाका–प, ले. ३२२

यांच्यात पुन्हा वाद निर्माण झाला. रघुनाथ रेमणे याला ३०० होन तैनात, घोडा, अबदागीर देऊन सरकारात ठेवलेले होते. संभाजीच्या काळातील धामधुमीत रेमणे याने शौर्य दाखवून महाराजांना संतुष्ट केले आणि ते हे वतन अनुभवू लागले. दोन तीन वर्षांनंतर प्रल्हाद निराजी संगमेश्वराला आलेले असताना आठल्ये यांनी त्यांना भेटून आपले गाऱ्हाणे त्यांना सांगून शिवाजीमहाराजांच्या वेळची कागदपत्रे दाखविली. प्रल्हादपंतांनी रेमणे यास बोलावून, महाराजांची पत्रे असताना जबरदस्तीने वतनाचा उपभोग करण्याची गरज काय असे स्पष्टपणे त्याला विचारले. ही गोष्ट संभाजीमहाराजांच्याही कानावर आठल्ये यांनी घातली आणि ते निघून गेले. यानंतर संभाजीराजे गोव्याच्या स्वारीवर असताना आठल्ये यांनी भेटून आपले वृत्त महाराजांना निवेदन केले. महाराजांनी त्यांना संगमेश्वरास जावयास सांगितले तेव्हा आठल्ये म्हणाले की रेमणे जबरदस्तीने वतन खातो तरी आम्ही कैसे जावे ? म्हणून महाराजांनी वतन अमानत करून महादेव ज्योतिषी याचे मुतालिक नारायण जोशी यास बारागावचे उपाध्येपण दिले.[१]

आदिलशहाच्या कारकीर्दीपासून परगणा वारूणचे नाडगौडीचे वतन येसाजी गाईकवाड याच्याकडे होते. तेथे त्यांनी आपला मुतालीक नागोजीपंताला ठेवलेले होते. येसाजी मरण पावल्यावर राजश्री संभाजी राजांनी त्याचे वतन दिवाणात अमानत केले.[२]

**पुरंदरगडावरील तास :** तासवाजविण्याच्या वृत्तीसंबंधी पुरंदरे आणि ठकार यांच्यात शिवाजी महाराजांपासून वाद चालू होता. १६६९ साली मराठ्यांनी पुरंदरगड मुघलांपासून घेतला. त्या वेळेपासून निळो सोनदेवाने वेदमूर्ती राजश्री विश्वनाथभट ठकार व सखंभट ठकार यांना प्रत्येकी १५ लारी म्हणजे एकूण ३० लारी जमीन दाभोळी देऊन तासाची सेवा सांगून ठेविले. या तासाचा मिरासदारी हक्क सिवभट व नारायण भट यांचा होता. आम्हीच तासाची सेवा करू म्हणून त्यांनी निळो सोनदेवाकडे विनंती केली. परंतु त्याने ते मानले नाही. शिवाजी महाराज पुरंदर गडावर गेल्यावर सिवभट व नारायणभट पुरंदरे महाराजांना भेटले. त्यावेळी शिवाजी महाराजांनी ' वृत्तासियाची वृत्ती व तास द्यावी, ज्याचे त्यास द्यावे ' म्हणून सखंभट व विश्वनाथभट ठकार यांच्याकडील तास बंद केला. परंतु नारायणभट व सिवभटास तासाची सनद दिली नाही. तासच अमानत केला. पुरंदरे बंधूंनी दोन तीन वेळा महाराजांस भेटण्याचा प्रयत्न केला. परंतु काही ना काही कारणाने त्यांची व महाराजांची गाठ पडू शकली नाही.

संभाजी राजांच्या कारकीर्दीत नारायणभट व सिवभट यांनी संभाजी महाराज व निळो मोरेश्वर प्रधान यांना विनंती केली की, " पुरंदर सारिखा

१. आवइ–आ, प्रथम खंड, लेख ४८, पृष्ठ ७६–७७

२. ताकाका–प, लेख २४०, पृष्ठ ३५७

किला सदरेचा आणि नामोश्याचा तेथे तास असलाच पाहिजे. आणि **वृत्तीवंताचे संस्छापन करने हे स्वामीसही अगत्यच आहे.** तरी स्वामींनी ब्राह्मणावरी कृपाळू होऊनु यास तासाची सेवा सांगितली पाहिजे. तासाची सेवा येकटी यास चाकरी होवेना तरी दोंघेजण तासकरी नारायेणभट व सिवभट यांस तासाची सेवा सांगितलीयाने किलाचा मामला चौकस राईल. किला नामोश्याचा आहे तरी तासाची सेवा पुरंदरे उभयेता सांगितली पाहिजे." अशी विनंती केली. त्या दोघांना तास द्यावा हे योग्यच आहे असे निळो मोरेश्वरास वाटले. त्यांना दरबारची रीत माहीत होती. **येकाचे मिरासीवर दुसरीयास तास द्यावा हे गोस्टी युक्त नव्हे. आपले दरबारी येकाची वृत्ती यकास द्यावी हे गोस्टी चालत नाही.** हे जाणून त्याने नारायणभट व सिवभट यास तास देण्यास पुरंदरचा हवालदार बाजी घोलप यास दि. १६–१०–१६८३ रोजी लिहून कळविले. परंतु त्यांना सनद देण्यात एक अडचण होती. पुरंदर किल्ला घेतल्यापासून पुरंदरे बंधूंनी तासाची चाकरी केली नव्हती. त्यामुळे पुरंदरे बंधूकडून सेरणी घेऊन सनद करून देण्याचे ठरले. ते गरीब ब्राह्मण होते. त्यांना सांगितलेली सेरणीची रक्कम देता येईना. म्हणून त्यांच्या वतीने मल्हार मुकुंद सुभेदाराने योग्य ती सेरणी घेण्याविषयी प्रधानाला विनंती केली. त्यावरून निळो मोरेश्वरने नारायणभट यास १५ व सिवभट यास १५ लारी दरमहा देण्यास सांगून त्यांच्याकडून तासाची सेवा घेण्यास सांगितले. सेरणी खंडणी ५० होन ठरवून दिली. या खंडणीपैकी १० होन त्या वर्षी, नंतर प्रत्येक वर्षी ८ होन घेण्यास बाजी घोलप यास सांगितले. सखंभट व विश्वनाथभट यांची तैनात जाबिना ओढत होती ती बंद करण्यास हुकूम दिला. याशिवाय प्रत्यक्षात तास ज्या घटकेपासून सुरू करतील त्यावेळेपासोन त्यांना सिंहगड गडी मोईन दिली असेल त्याप्रमाणे दररोज तेल देत जाण्याविषयी निळो मोरेश्वराने बाजी घोलपास कळविले होते.[1] हे पत्र महत्त्वाचे आहे. अंतर्गत व्यवहार किती सुरळीतपणे चालू होते याचाही या पत्रावरून बोध होतो. ज्या दिवसापासून पुरंदरे बंधू तास सुरू करणार होते त्या दिवसापासून त्यांना तासासाठी तेल मिळणार होते. प्रत्येक गडावर तेल किती द्यावयाचे हे ठरलेले होते. सिंहगडाप्रमाणेच पुरंदर किल्ल्यावर तासासाठी तेल मिळणार होते. चोख व शिस्तशीर कारभाराचे हे चांगले उदाहरण आहे असे म्हटले पाहिजे.

पाटिलकीवरून नेहमी तंटे होत असत. सुपे खुर्द येथील पाटीलकी रायाजी काटकर, शंकराजी निळकंठ राऊ व हाउजी धणगर या तिघांची होती. यात रामोजी व खंडोजी जगताप नसती कटकट करीत होते. हा वाद १६७६ पासून चालू होता. जगतापांनी धनगरांची माणसेही पकडून ठेवली होती. शिवाजी-

१. शिचसा खंड १, ले. ६७, पृष्ठे ८४–८५

महाराजांनी पाटीलकी निळकंठराऊ, धनगर आणि काटकर यांच्याकडे चालेल, नसती कटकट करू नये असे सांगितले. हा वाद पुन्हा निर्माण होऊ नये म्हणून दि. ९–७–१६८१ रोजी निळकंठ मोरेश्वर प्रधानाने इंदापूर व सुपे येथील सुभेदार नागोजी बल्लाळ यास लिहून त्या तिघांच्या नावे पाटीलकी चालविण्यास सांगितले. परंतु १६८३ साली या पाटीलकीसंबंधी त्याने पुन्हा कटकट करून त्रास देण्यास सुरुवात केली. तेव्हा दि. २१–१०–१६८३ रोजी इंदापूर व सुपे येथील सुभेदारास लिहून कळविले की पूर्वीप्रमाणे तिघांची पाटीलकी आहे, त्याप्रमाणेच चालविणे. जगताप यास कटकट करण्याचे कारण नाही, नवा तंटा उत्पन्न करू देऊ नये.[1]

रामचंद्र नीलकंठ १६८५ च्या अखेरीस कुडाळ येथे होता. तेथे मुराररराऊ, तिमाजी नीलकंठ व तिमाजी बाबाजी यांचे हेजीब त्यांना भेटले. त्यांनी आपल्या वृत्ती-वतनासंबंधी वर्तमान सांगितले. त्यांनी देसाई व देशकुलकर्णी यांच्या वतनाची दुमालापत्रे करून दिली. मुराररराऊ देशकुलकर्णी परगणे मजकूर याच्या नावाने अभयपत्र देऊन, संभाजी महाराजांनी सुभ्यास व देसाई यास आज्ञापत्रे दिली होती. त्याप्रमाणे ते वर्तणूक करतील. मुराररराऊस शिवाजीमहाराजांनी वस्त्रे व बक्षीस दिले होते. त्याप्रमाणेच दि. ७–१२–१६८५ रोजी रामचंद्र नीलकंठ याने तिमाजी नीलकंठ व तिमाजी बालाजी यांस लिहून कळविले की, "हल्ली मुरार-रायास राजश्री वैकुंठवासी स्वामींनी वस्त्रे व बकसीस दिल्ही होती. तेण्हेप्रमाणे आम्हीही कृपाळू होऊन वस्त्रे व बकसीसे देऊन याचे खासा ज्या रिकाबीचे इनामत चावराना आहेत ते कुली दुमाला करून आज्ञा देऊन विलायतीस पाठविले आहे तुम्ही व मुराररराऊ येकदील होऊन दिवाण शेवावरी तत्पर असणे व हेजीब ज्या रिकाबीचे इनाम याचे खासा अलाहिदा तुम्हाखेरीज आहे, त्यास तुम्हास संमंध नाही...हे इनाम अलाहिदा फर्मानी मुराररायाचे आहे....एकंदर इनाम-तीचे वाटे न जाणे."[2] रामचंद्र पंताने व संभाजी महाराजांनी मूळच्या वतन-दारावर कोणी हक्क सांगू लागला तर त्याला तसा हक्क दाखविण्यास मनाई केली होती. राजांच्या कारकीर्दीतील रामचंद्र नीलकंठाचे हे पहिलेच पत्र उपलब्ध आहे.

मोरो विठ्ठल होनप, पुण्याचा देशकुलकर्णी, याची जमीन मौजे न्हावी (भोरच्या पूर्वेस ५ मैल) व वीर (सासवडच्या दक्षिणेस ८ मैल) येथे पूर्वी-पासून होती. त्याने त्यासंबंधी नवीन सनद करून द्यावी म्हणून लिहिले होते. म्हणून गंगाधर मोरेश्वर प्रधान याने दि. २३–३–१६८५ ला पुण्याचा सुभेदार

१. शिवसा, खंड १, ले. ६०, पृष्ठे ६५–६८

२. पेद. ३१, ले. १८४, पृष्ठ ९९–१००

बाबाजी तानदेऊ यास पूर्वीप्रमाणे चालत असेल त्याप्रमाणे नवीन सनद देण्यास लिहिले.[१]

आडकुळे यांचे मौजे पाडळी, तर्फ हवेली, प्रांत सातारा येथे वंशपरंपरा वतन होते. त्यावर वाळिंबे आपला हक्क सांगू लागले. शिवाजी महाराजांच्या काळात वतनासंबंधी वाद निघाला असता राघो बल्लाळ अत्रे, मोकदम व बारा बलुते, देशमुख, देशपांडे यांच्या समक्ष आडकुळे यांचे वतन खरे, वाळिंबे यांचा अधिकार नाही असा निर्णय देण्यात आला. आडकुळे अभय घेऊन आपल्या गावास गेला. संभाजी राजांच्या कारकीर्दीत राजश्री केसो त्रिमल पन्हाळ्यास असताना जिवाजी विश्वनाथ वाळिंबा त्यांना जाऊन भेटला. हे कळताच आडकुळा पन्हाळ्यास गेला. त्याने राजश्री प्रल्हादपंतास सर्व हकीकत सविस्तरपणे सांगितली. न्यायाधीशांनी भोगवटा व मौजे मजकूरचे पाटिलांनी श्रीकृष्णेची क्रिया केली त्यात आडकुळे खरे झाले. त्यानंतर केलेल्या दिव्यातही वाळिंबे खोटे ठरले.[२]

**जेधे यांना समज** : औरंगजेबाच्या अफाट सैन्याने स्वराज्यावर जे आक्रमण केले त्यावेळी स्वराज्यातील काही अधिकारी आणि वतनदार माणसे मुघलांच्या प्रलोभनाला किंवा धाकाला बळी पडून त्यांना मिळू लागली. कोण कोण शत्रूला मिळून फितूर झाले त्यांची यादी ‘ मराठा–मुघल संघर्षात ’ दिलेली आहे. शत्रूचे सैन्य आले की वतनदारांची घालमेल होत असे. वतने, इनामे सांभाळण्यासाठी ते मुघल अधिकाऱ्यांपाशी रुजू होत. अशाच पद्धतीने कारीचा शिवाजी जेधे हा १६८४ च्या सुमारास मुघलांना जाऊन मिळाला होता. त्याने कारीच्या आणि त्याच्या भावाच्या ( सर्जेरावाच्या ) महालातील गुरे वळवून नेली; मुलूख उद्‌ध्वस्त करून उपद्रव दिला म्हणून विचित्रगडचा हवालदार संताजी निंबाळकर, गडकरी आणि सर्जेराव जेधे एकत्र बसले. मुलखाचा बंदोबस्त कसा करता येईल याचा त्यांनी विचार केला. त्याने मुघलांकडे जाऊन मुलखाची वसाहत कशी होईल असे विचारावे असा संताजी निंबाळकराने सर्जेरावाला सल्ला दिला. सर्जेरावाने मुघल अधिकाऱ्यांची भेट घेऊन सर्व हकीकत सांगितली. त्यावरून शिवाजी जेधे वगैरे लोकांस मुघलांनी दूर करून गावगनाची वसाहत करावयाची आज्ञा केली. सर्जेरावाने मुलखाची वसाहत केल्यावर झालेली गोष्ट संताजी निंबाळकर यास कळविली. आपण मुघलांकडे गेलो तरी “ आपण रा. स्वामींच्या ( संभाजी ) पायाशी एकनिष्ठच आहोत. स्वामी कृपाळू होऊन, आपले वतन, देशमुखी आपले स्वाधीन करतील आणि अभयपत्र सादर होईल आपण सेवेसी एउनु एकनिष्ठ होऊन सेवा करीन म्हणून ” त्याने पत्रात लिहिले. हे सर्व

१. सनदा पत्रातील माहिती, ले. ४, पृष्ठ १६२ २. बनि–मापा, पृष्ठ २–३

मुद्दे संताजी निंबाळकराने छत्रपतींना कळविले. तेव्हा महाराजांनी सर्जाराव जेधेला आज्ञापत्र लिहिले व त्याची कडक शब्दांत हजेरी घेतली. या पत्रावरून संभाजी राजांचा जागरूकपणा व देशमुखांनी आणि हवालदारांनी परस्पर कारवाई केल्याबद्दल त्यांची पोटतिडीक दृष्टीस पडते; त्यांच्या व्यक्तिमत्त्वावरही चांगला प्रकाश पडतो. दि. ५ ऑक्टोबर १६८५ रोजी संभाजी महाराज, सर्जारावास लिहितात, " स्वामी कृपा होऊन आपले वतन देशमुखी आपले स्वाधीन करतील आणि अभयपत्र सादर होईल तरी आपण शेवेस एउनु एकनिष्ट होउनु शेवा करीन म्हणून तरी तुमचा मुद्दा मा इले हवालदार एही स्वामीचे शेवेसी हुजूर लिहिला त्यावरून कळो आला. त्यावरून हे आज्ञापत्र तुम्हास लिहिले आहे तरी आधी तुम्हीच सरासरी हरामखोरी केली की वतनदार होउनु इमाने इतबारे वर्तावे ते गोष्ट न करिता स्वामीचे अन्न बहुत दिवस भक्षिले त्याचे सार्थक केलेत की स्वामीच्या पायासी दुर्बुद्धी धरून दोन दिवसांचे मोगल त्यांकडे जाउनु राहिलेस तुमचा भाऊ शिवाजी गनीमाकडे गेला तो तुम्हास बरे पाहेना—ऐसे होते तरी तुम्ही स्वामिसन्निध हुजूर यावे होते म्हणिजे तुमचे इतबारपण कळोन एकनिष्ठता कळो एती. ते केले नाही तरी बरीच गोष्ट जाली या उपरीहि गनीमाकडे राहाणेच असेली तरी सुखेच राहाणे. तुमचा हिसाब तो काय आहे. ए क्षणी स्वामी आज्ञा करितात तरी गनीमादेखिल तुम्हास कापून काढवीतच आहोत हे बरे समजणे. दुसरी गोष्ट की तेथे राहाणेच नाही एकनिष्ठेने स्वामीच्या पायाजवळी वर्तावे ऐसे असेली तरी तुम्ही परभारे मुद्दे सांगोन गडकिलियाकडे राबिते काय म्हणून करिता हे गोष्ट स्वामीस मानत नाही. जो राबिता करणे तो स्वामीकडेच करून हुजूर वर्तमान लेहून पाठवावे. स्वामी तुमचा मुद्दा मनास आणून आज्ञा करायाची ते करितील. तरी ऐसी गोस्ट करावया प्रयोजन नाही. उजरातीखेरीज दुसरियाकडे एकंदर राबिता न करणे. जे वर्तमान लिहिणे ते स्वामीस लिहीत जाणे. तुमचे ठाई एकनिष्टताच आहे ऐसे स्वामीस कळलियावरी जे आज्ञा करणे ते करून आज्ञापत्र सादर होईल तेणेप्रमाणे वर्तणूक करणे. "[१]

संभाजी महाराजांनी पत्र लिहिल्यानंतर जवळ जवळ सव्वा वर्ष सर्जेराव जेधे स्वराज्यात परत आला नव्हता. राजांच्या कडक पत्रामुळे त्याला लगेच परत येण्यात संकोच वाटला असावा. मुघलांकडे गेला असला तरी त्यांची सेवा करताना त्याला मानसिक कष्ट होत होते. त्याला स्वामींच्या सेवेत येऊन कष्ट मेहनत करावयाची होती. त्यांच्याकडून सन्मान करून घ्यावयाचा होता. त्याची इच्छा निळकंठ मोरेश्वरास कळली. सर्जेरावाला परत यावयास संकोच वाटू नये म्हणून दि. १ फेब्रुवारी १६८७ रोजी निळकंठ मोरेश्वराने सर्जारावाला अभयपत्र देऊन

१. मइसा, खंड १५, ले. ३४२; पृष्ठे ३७१–३७२

महाराजांच्या वतीने कौल दिला. मुख्य प्रधान सर्जारावाला लिहितात, "...म्हणून कलो आले. तरी तुम्ही कदीम लोक तुमचा भरवसा राजश्री स्वामीचे बहुत अन्न भक्षिले आहेत. क्रिया धरनु आणि यावयाचे केले तरी बहुत उत्तम केले कदाचित गनिमाकडे गेले होतेस त्या गोष्टीकरिता यावयाचा अनमान कराल तर सरवस्वी न धरने बेशक येणे. तुमचे बरे करणे सुभे होऊन सर्फराजी करून बहुत चालऊन अंतर न पडे. समाधान असो देणे आणि येणे दरीबाब कबूल असे."[१]

हे अभयपत्र मिळाल्यानंतर सर्जाराव स्वराज्यात परत आला व त्याने संभाजी राजांची प्रत्यक्ष गाठ घेतली. मध्यंतरी रोहिडागड मुघलांनी घेतला होता (केव्हा ते कळत नाही.) तो परत घेण्याची कामगिरी सर्जारावास सांगून छत्रपतींनी त्याला रवाना केले. महाराजांच्या आज्ञेप्रमाणे सर्जाराव गड घेण्यास निघण्यापूर्वी कारीस गेला. मुलामाणसांना तेथे राहावेना म्हणून त्यांना वाई परगण्यातील जांबळीस ठेवून लोकांचा जमाव करून त्याने किल्ले रोहिडा हस्तगत केला. नंतर त्याने महाराजांची भेट घेतली. त्यांनी मेहेरबान होऊन सर्जेरावास शिरपाव दिला.[२]

रोहिडा गड मुघलांनी केव्हा घेतला याची तारीख कळत नसली तरी मराठ्यांनी हा गड १६८५ नंतर आणि ४ मार्च १६८७ पूर्वी म्हणजे फेब्रुवारी मार्च महिन्यात केव्हातरी घेतलेला दिसतो. सर्जेरावाने स्वराज्यात यावे म्हणून १–२–१६८७ ला पत्र गेले आणि ४–३–१६८७ च्या मुख्य प्रधानांच्या पत्रात रोहिडा स्वराज्यात आहे असे दिसते.[३]

सन १६८७–८८ मध्ये सर्जाराव राजमाचीस प्रधानांच्या जवळ सेवेस होते.[४]

सर्जेराव जेधे प्रमाणे त्याचा मुलगा बाजी सर्जाराव हा १६८६ च्या मे महिन्यापूर्वी केव्हातरी मुघलांना मिळाला होता, आणि त्यांच्या तावडीत सापडून कैदेत होता. बाजी युक्तीने तेथून निसटला. नंतर त्याने पुरंदरच्या बाजी घोलप हवालदार व कारकुनास पत्र लिहून पुढे काय करावे म्हणून विचारले होते. या पत्राला दि. २८–५–१६८६ रोजी बाजी घोलपने उत्तर पाठविले की, "...कळो आले. उत्तम गोष्टी बरीच केली आत्ता राजश्री छत्रपति स्वामींचे भेटीस जाऊन आपले उर्जित करून घेतले पाहिजे. राजश्रीचे दरशण होताच बरीच सरंजमी होईल जाणिजे."[५] या पत्रावरून बाजी घोलपची निष्ठा दिसते; तो खात्रीपूर्वक संभाजी

१. मइसा, खंड १५, ले. २८१, पृष्ठ २८८

२. शिचसा, खंड २ रा, लेख २३९, पृष्ठ २३४

३. मइसा, खंड १५, ले. २८१ ४. शिचप्र, पृष्ठ ३४

५. मइसा, खंड १५, ले. ३४१, पृष्ठे ३७०–३७१

राजांच्या वतीने आश्वासन देऊन त्याला महाराजांची भेट घेण्यास सांगतो. हे आश्वासन मिळाल्यावर बाजी जेधेने निलकंठ मोरेश्वर प्रधानास निरोप पाठविला, " मला स्वराज्याशी एकनिष्ठता दाखवून आपल्या वृत्तीवर यावयाचे आहे. मुले माणसे कबिला परत आणून सेवा करावयाची आहे. अन्याय झाला असेल तो माफ करावा. " छत्रपति बाजीला अभयपत्र देतील अशी निळकंठ मोरेश्वरला खात्री होती. त्याने दि. ४ मार्च १६८७ रोजी बाजीला कळविले की, " ...तुम्ही आधीच या प्रांतीहून नव जावे आणि गेलेस तरी बहुत तरी सर्व अन्याये तुमचे असतील, तुम्ही येकनिस्टता महाराज राजश्री स्वामीच्या पायासी धरून आलिया कुल माफच केले असेती. तुम्ही राजश्री स्वामीच्या अभयपत्राचा उजूर तरी सहसा न करणे. तेहि पत्रे आणून देऊनु तुम्ही आलियाने तुमच्या कबिल्याची खाया खर्चायाची विळे मामला करून देऊनु. तुम्हापासी जे जे लोक आसतील तेहि तुम्ही घेऊन आमचे भेटीत कबिला घेऊनु येणे. " निळो मोरेश्वराने बाजीबरोबर गेलेल्या इतर लोकांना परत आणण्याविषयी व त्यांचीही सोय केली जाईल म्हणून आश्वासन दिले. कबिला रोहिडगडी ठेवून बाजीला प्रधानाने श्रीवर्धनगडी भेटण्यास सांगितले होते. "[१] मुघलांना मिळालेल्या लोकांना परत आणून स्वराज्याच्या कार्यात एकनिष्ठ माणसे लावावयाच्या छत्रपति आणि मुख्यप्रधानांच्या प्रयत्नाची उदाहरणे नमूद करण्यासारखीच आहेत.

## स्वामिनिष्ठ सेवक :

शत्रूने दाखविलेल्या जहागिरीच्या किंवा मन्सबीच्या लालचीने काही मंडळी फितूर होऊन शत्रूला मिळाली असली तरी बहुतेक प्रजा संभाजी राजांशी एकनिष्ठ होती. निळो मोरेश्वर, प्रल्हाद निराजी, हरजी महाडिक, रूपाजी भोसले, हंबीरराव मोहिते, मालोजी घोरपडे, अर्जोजी व गिरजोजी यादव, येसाजी आणि कृष्णाजी कंक, केशव त्रिमल, कविकलश, यांच्याप्रमाणेच बहुसंख्य अधिकारी संभाजीशी एकनिष्ठ होते. यावाचून खालील एकनिष्ठ मंडळींचा उल्लेख करणे जरूर वाटते :

( १ ) बाजी मुरार शिवाजी महाराजांच्यापाशी मावळ्यांचे सरदार होते. त्यांचा मुलगा महादजी बाजीही मावळ्यांच्या जमावाची सरदारी करून संभाजी राजांपाशी चाकरी करीत होता. संभाजी राजांनी त्याला पोतनीस केले.[२]

( २ ) शिवाजी महाराजांचा सरनोबत असलेला नेताजी पालकर संभाजी-राजांचीही सरनोबत म्हणून सेवा करीत होता. नेताजी पालकरानेच शहाजादा अकबराची व्यवस्था केली.[३] तो वृद्ध होऊन मरण पावला.

१. शिचसा, खंड २, ले. २२२, पृष्ठ २२१

२. दसकै, पृष्ठ १०५

३. शिचसा, खंड १०, पृष्ठ ५६

( ३ ) संभाजी राजांनी जिंतीकर भोसले यास सेनासाहेब सुभा याची वस्त्रे दिली.[1]

( ४ ) जोत्याजी केसरकर संभाजीराजांचा स्वामिभक्त सेवक होता. तो राजांच्या नेहमी जवळ राहात असे. स्वारी–शिकारीत, लढाईत त्याने कधी धन्याची पाठ सोडली नाही. संभाजी राजांच्या मृत्यूनंतर येसूबाईजवळ हाच विश्वासू मनुष्य होता.

( ५ ) पंताजी गोपीनाथ बोकील यांचा पुतण्या महादजी यमाजी संभाजी-राजांच्या वाकनिसाच्या मुतालिकीचे काम करीत असे. तो व त्याचा पुतण्या भगवंत गंगाधर हे येसूबाई आणि शाहूबरोबर पकडले जाऊन मुघलांच्या कैदेत होते.

## न्याय व कायदा :

शिवाजी महाराजांच्या वेळी केंद्रीय आणि स्थानिक असे न्यायदानाचे दोन भाग होते. केंद्रात राजा आणि हुजूर मजलीस किंवा धर्मसभा असे दोन विभाग होते. १६७४ मध्ये शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक झाल्यापासून तेच न्याय-शाखेचे मुख्य होते. या क्षेत्रातील कर्तव्य पार पाडण्यासाठी त्यांनी आपल्या अष्ट प्रधानांत न्यायाधीश व पंडितराव ( धर्मादायाचा मुख्य मंत्री ) यांचा समावेश केलेला होता. जुन्या परंपरेप्रमाणे महाराज धर्मसभेत किंवा हुजूर हजीर मजलीस यात इतर मंत्र्यांच्या साहाय्याने फिर्यादीची चौकशी करून निर्णय देत. मजलीस आणि गोताच्या विचाराने चालू असलेली चौकशीची स्थानिक पद्धत त्यांनी सुरू केली. न्यायदानाच्या बाबतीत ते एकटेच निर्णय घेत नसत. न्यायाधीश व पंडितराव हे राजाच्या खालोखालचे अधिकारी. त्यांची नेमणूक राजा करी आणि ते राजालाच जबाबदार असत. न्यायाधीशाचे अधिकार मुलकी असले तरी निराजी रावजी, प्रल्हाद निराजी, होनाजी अनंत यांना सेनापतीची कामे करावी लागत होती. न्यायाधीशाचा पगार वार्षिक एक हजार होन होता.

राजा आणि न्यायाधीश यांच्याशिवाय हुजूर हजीर मजलीस किंवा धर्मसभा न्यायदानात महत्त्वाची कामगिरी बजावीत असे. शिवाजीमहाराज प्रारंभी विजापूर-करांचे जहागीरदार होते. त्यावेळी ते अधिकाऱ्यांच्या व गोताच्या मदतीने मजलिसीमार्फत न्याय देत. राजपद मिळाल्यानंतर महत्त्वाच्या फिर्यादीचे निकाल ते धर्मसभेच्या मदतीने देत. स्थानिक राज्यकारभारात रूढ असलेली मजलीसची पद्धतच त्यांनी केंद्र सरकारात लागू केली होती. परगण्यातील मजलीसच्या विकासातून धर्मसभा स्थापन झाली. यात राजमंडळातील सभासद व इतर अधि-कारी ( राजमुद्रा ) व गोत यांचा समावेश असे. धर्मसभेत राजमुद्रा ही कायमची

१. दसकै, पृष्ठ ९२–९३

घटक सभा असे. इतर सभासद ज्या प्रकारचा दावा समोर असेल त्याप्रमाणे बदलण्यात येत.

**प्रांतिक न्यायपद्धती :**

दाव्याची सुनावणी मजलीसमार्फत करावयाची पद्धत स्थानिक कारभारातही महाराजांनी चालू ठेवली होती. राज्यकारभारातील तीन विभागांचे अधिकारी आणि सरसुभेदारापासून तर्फच्या हवालदारापर्यंतचे अधिकारी हे गोत आणि फिर्यादी यांच्यात मध्यस्थ म्हणून काम करीत. राज्यातील तीन विभागांच्या मंत्र्यांना त्यांच्या कक्षेत येत असलेल्या विभागात मुख्य न्यायाधीशाचे अधिकार दिलेले होते. त्यांना कनिष्ठ आणि वरिष्ठ न्यायालयाचे ( Original as well as appelate ) अधिकार दिलेले होते. सरसुभेदार त्यांना साह्य करीत. दिवाण किंवा सुभ्यात सुभेदार व सभासद हे न्यायाच्या दृष्टीने महत्त्वाचे अधिकारी असत. सुभेदाराला सुभे मजलीस मधील कारभाराची पाहणी करावी लागे. त्याला मूळच्या आणि पुनर्विचारासाठी आलेल्या फिर्यादींबाबत ( Jurisdiction over original and appelate suits ) निर्णय देण्याचा अधिकार असे. एखादा दावा सरसुभ्याकडे गेला तर सुभेदाराला सरसुभ्याने दिलेल्या निकालाप्रमाणे वागावे लागे. केंद्रीय राजमंडळापासून ते सुभ्याच्या दिवाणापर्यंत सभासदाच्या हुद्याची जागा असे. कृष्णाजी अनंत हा राजारामाच्या राजमंडळाचा सभासद होता. दाभोळच्या सुभ्यात बाळाजी विश्वनाथ हा सभासद होता. मजलीसमध्ये तो सरकारतर्फे मुख्य अधिकारी असे. सुभे, तर्फ आणि खेड्यातही मजलीसची पद्धत होती. ठाणे मजलीसमध्ये दिवाण ठाणे आणि गोत यांचा समावेश असे. खेड्यात मोकदम आणि इतर अधिकारी असत.[१]

संभाजी महाराजांच्या कारकीर्दीत न्यायाची रीत राहिली नव्हती. 'विचार न करता शिरच्छेद करावा, सुभेदार प्रांतातील वगैरे तसेच गडकिल्ले यांचे कारभारी, याजवरि हा कारभार. खातो म्हणून चुगली करताच त्याचा विचार न करिता त्यास आणावा, मारावा, नागवावा, अंतरच असलिया शिरच्छेद करावा' इत्यादी गोष्टी बखरकारांनी नमूद केल्या आहेत. परंतु प्रत्यक्षात पाहता यापूर्वी नमूद केलेली शिवाजी महाराजांची न्यायाची पद्धत संभाजी राजांच्या काळात केंद्र सरकारपासून सुभे, तर्फपर्यंत पूर्ववत चालू होती असे आढळते. शिवाजी महाराजांच्या काळातील प्रल्हाद निराजी १६८० ते १६८८ पर्यंत न्यायाधीश होता. मोरेश्वर पंडितराव हाच पंडितराव होता. हजीर मजलीसमार्फतच न्यायनिवाडा केला जात असे. पुढे नमूद केलेल्या न्यायनिवाड्यांच्या आणि खटल्यांच्या

१. JSM–G, p 33–34

उदाहरणांवरून संभाजी राजांच्या कारकीर्दीतही पूर्वीचीच पद्धत कशी तंतोतंत पाळली जात असे हे ध्यानात येईल.

आपाजी बीन मलजी नाईक निगडे आणि विठोजी बीन गोरखजी यांच्यात वृत्तीतील वडीलपणाबद्दल आपापसात भांडणे लागली होती. भावंडात वाटणी झाली त्यात दिवाणात तश्रीफा मानपान विठोजीस दिले होते: परंतु प्रत्यक्षात बहीरजी वडीलपणाचा मान अनुभवीत होता. हे कसे म्हणून बहीरजीस विचारले तेव्हा तो म्हणाला की वाटणी झाली तेव्हा त्याचे वडील आपाजी बीन मलजी हे चंदीस गेले होते. ते ४–५ वर्षांनी परत आले. तेव्हा त्यांनी विठोजी बीन गोरखजीस विचारले की मी वडील असता तुम्ही स्वतःच्या नावाने वडीलपण कसे काढले ? या वादाचा निकाल लावण्यासाठी शिवाजी महाराजांच्या सन्निध जाऊन निवाडा करून घ्यावा म्हणून दोघेही कसबे हरणसास ता|| वेलवंड खोरे येथे जाऊन राहिले. तेथील देशमुखांनी उभयताना कोठे जाता म्हणून विचारले. तेव्हा त्यांनी आपले वर्तमान सांगितले. त्यावर देशमुखांनी त्यांना सांगितले की, "तुम्ही दिवाणात जाण्याची जरूरी नाही. आम्ही गोत बसोन हे स्थळी तुमचे समजावीस करून देऊ. उभयतांनी आपली कैफियत लिहून द्यावी." त्याप्रमाणे दि. ३–१२–१६८० ला तर्फ वेलवंड खोऱ्यात कसबे हरणस तेथे हजीर मजलसीत लिहून दिले. या मजलसीत वेदमूर्ती हरभट, मोरेश्वर जोसी, मल्हार दत्ताजी कुलकर्णी, कृष्णाजी नाईक देशमुख व इतर देशमुख होते. त्याप्रमाणे उभयतांनी तकरिरा लिहून दिल्या. समस्त गोतवाले ब्राह्मण मिळोन श्रीच्या देवळात बसोन गोतात निवाडा करून दिला. आपाजी बीन मलजी नाईक निगडे याचेच वडील–धर असून विठोजी बीन गोरखजी याचे धाकटे घर असून त्यांनी वडीलपणाचा कारभार केला तरी वडीलपण कोणी घेणार नाही. दोन्ही कडील देशमुखांनी निवाडा करून दिला की आपाजी बीन मलजी निगडे याचे वडील घर असून त्यास मानपान विडा, टिला व सिका नांगर व वडीलपणास जमीन एक चावर व पाच होन आहेत. त्यानेच वडीलपणाचा कारभार करावा. विठोजी बीन गोरखजी निगडे याला वडीलपणाचा व कारभाराचा संबंध नाही. जो खोटा ठरेल त्याने दिवाणात ५०० होन द्यावेत.[1]

संभाजीराजे राज्यकारभार पाहू लागल्यापासून सुरुवातीच्या सहा-सात महिन्यांत तर्फ वेलवंड खोऱ्यात व्यवस्थितपणे कसा न्याय करण्यात येत होता त्याचे हे चांगले उदाहरण आहे.

---

१. मइसा, खंड २०, ले. ५४, पृष्ठे ९२–९४

**पाटीलकीचा वाद :**

पुणे प्रांतातील माणकोजी बीन नावजी पाटील चिंचवडे व केरोजी बीन साहसी चिंचवडे यांच्यात मौजे चिंचवडच्या मोकदमीसंबंधी वाद निर्माण झाला होता. माणकोजीचे वडील, आजोबा, पणजोबा हे चार पिढ्या पाटीलकी करीत होते. माणकोजीचे वडील गेल्यानंतर त्यानेही काही दिवस पाटीलकी केली. असे असता केरोजी व कमलोजी यांनी कारण नसता उगीच भांडण काढून वाद निर्माण केला. म्हणून माणकोजी चिंचवडा निळकंठ मोरेश्वर प्रधान आणि रामचंद्र नीलकंठ सचीव यांना भेटून त्याने सांगितले की आमच्या चार पिढ्या पाटीलकी करीत असता केरोजीने भांडण काढले आहे. तेव्हा प्रधान व सचीव यांनी पुण्याच्या देशमुख व देशकुलकर्णी यांना सदरहू वादासंबंधी गोताच्या साहाय्याने निवाडा करण्यास आज्ञापत्र दिले. नवी जिकीर होऊ नये म्हणून बजावले. या आज्ञापत्राप्रमाणे मौजे चिंचवड येथे गोत जमा झाले. त्यात अजहत सितोळे देशमुख, प्रांत पुणे येथील दोघे, हडपसर, तर्फ हवेलीमधील पिंपरी, पिंपले, कोरगाव येथील मोकदम, प्र॥ पुणे येथील देशपांडे, तर्फ पाटस मौजे बोरीब्याल येथील जोसी कुलकर्णी, मौजे ताथवडे, आकूर्डी, जांबे या गावांचे मोकदम, बारा बलुते इत्यादी जमा झाले. दोघांनी आपला राजीनामा लिहून चौगुले, थलकरी, बारा बलुते देवळे बसोन बेल अंगारा पंचांच्या शिरी घालून बेचाळीस पूर्वजांच्या सफता घालून तकरीर लिहून दिल्या. शेवटी सदरहू हाजीर मजालसीने निवाडा देऊन त्यात माणकोजी खरा ठरला. या निवाड्यात साक्षीदारांची वये दिली आहेत. तत्कालीन कार्यपद्धतीच्या दृष्टीने महजर महत्त्वाचा आहे. शिवाजीमहाराजांनी घालून दिलेली पद्धत अधिकारी व्यवस्थितपणे पाळून योग्य तो निवाडा करून रयतेवरील अन्याय दूर करीत.[1]

**पाटीलकीची विक्री :**

दुष्काळाच्या आपत्तीने एखाद्याला आपली पाटीलकीची तकसीम विकण्याची वेळ आली तर ती घेणारा आणि देणारा हे दोघेही कायद्याने योग्य ती पद्धत आचरणात आणीत असत. संताजी बीन भिवजी चव्हाण याची दुष्काळामुळे हलाखीची स्थिती झाली होती. हा मौजे कोणे गाऊचा पाटील होता. त्याचा चुलता विठोजी पाटील पटेलगी वडीलपण करीत होता, तो मेला. त्याचा मुलगाही दुष्काळात मेला. त्यामुळे संताजी एकटाच राहिला. शेती करावी तर त्याच्याजवळ बैल ढोरे नव्हते. खावयास अन्न न मिळाल्याने तो सुजू लागला. आपल्या तकसीमदार भाऊबंदांकडे गेला. परंतु ते त्याला अनुकूल होईनात. तेव्हा

१. JSM–G, p 270–273; क्र. ४

तो कर्यात् मसूर येथील थोर नाईक महादजी पटेल जगदळे यांच्याकडे गेला. सुरुवातीला त्यांनीही लक्ष दिले नाही. संताजीने महादजीकडे बरेच हेलपाटे घातले, व त्यास सांगितले की "माझी सर्व नातेवाईक मंडळी मेली असल्याने मला कोणाचाच आधार नाही. खावयास काही नाही. काळ कठीण पडला. अन्न देऊन माझे रक्षण करावे. मी आपली पटेलगीची जमीन विकण्यास तयार आहे." महादजी पटेल त्यास म्हणाला की, 'तुझे तकसीमेमध्ये तकसीम घ्यावी हे गोष्टी काही मधे होत नाही. परगणे मजकूरचे देशाधिकारी व तुझे बापभाऊ या विद्यमाने त्यास राजी करून देत असतील तर जरूर घेऊ' हे कळल्यानंतर संताजीने आपल्या भाऊबंदांना विचारून रक्षणार्थ आपली मिरासी पैकी एक चावर खाजगत ठेऊन उरेल जमीन चावर १$\frac{3}{4}$ व वडीलपण होन २० त्याला विकण्याचे ठरविले. त्यासंबंधी क्रयपत्र हे राजमुद्रा देशक व गोत भोवर गांवापैकी पाच सहा गावचे मोकदम कुलकर्णी बाप भावाच्या साक्षीने करून दिले. या क्रयपत्रासाठी ठाणा राजमुद्रा व देशक आणि गोत यांचा महजर करून द्यावयाची शर्त आहे म्हणून संताजीसाहेब व सदर देशक प॥ भोर व गोत यापाशी गेला. या महजराबद्दल महादजी जगदळे यास पुढील खर्च पडला. कोनेर रंगनाथ सरसुभेदारास हरकी ब॥ होंन १००; देशमुख व सरदेशमुख होन ५०; देशकुलकर्णी होन २५; यांखेरीज गांवकरी यांस व परगणियाच्या पाटिलास तश्रिफा १०० होन दिले. संताजी भिवजीने पूर्वी रुद्राजीपंत देशकुलकर्णी याला चावर ·॥१४ ठिकाणे दोन विकत दिली होती. ती पण त्याच्याकडून मागून घेतली. त्याला सारंगा घोडा होन १५० किंमतीचा दिला. संताजी चव्हाणाकडे राहिलेला १ चावरही जगदालेनी ३० होनास विकत घेतली. याखेरीज खर्च जहाला. येणेप्रमाणे महजर होऊन त्यावर सह्या झाल्या.[1]

परगणे वाईतील मौजे आभेपुरीच्या सूर्याजी व कृष्णाजी मांढरे व दुरगोजी व इतर मांढरे वऱ्होलीकर यांच्यात गावाच्या पाटीलकीच्या तकसीमीविषयी १६८२ साली वाद निर्माण झाला. त्याचा निकाल हाजीर मजालसीत लावला. त्यात "राजमुद्रा गोत प्र॥ वाई हलीकमावीस सुभा त॥ जावली, राजमुद्रा (६) नेताजी पालकर शिक्या सहित, त॥ जोर व जांभुळखोरे येथील मुजुमदार व हवालदार कासी रंगनाथ, फडणीस, प्रांत मजकूरचे देसाई १, देशकुलकर्णी १, गावगनातील मोकदम व पाटील १४, कुलकर्णी ६, सेटिये ४, एकूण ३२ सभासद मजालसीत होते. निवाड्याबद्दल देशमुखाच्या वरास देशमुखांनी गोत बसवून, हरदोंजणाचा आहावाल तमाम मनास आणून...पुसिले कीं गोत करतील त्या राजी असाल तर श्रीकृष्णेची आंघोळ करून येऊन 'इमा' देणे की गोत

१. मइसा, खंड १५, ले. १०$\frac{1}{2}$, पृष्ठे ३४ ते ४०

करतील तेणे प्रमाणे वर्तावे. " याप्रमाणे दि. २-८-१६८२ रोजी निवाडा होऊन दुरगोजी खरा ठरला. पा। वाईचा मोकदम मुसलमान आहे. सेरणीबद्दल नाणे होन २५ जमा सुभा जाऊली ते सदरहू तीन ठिकाणी वाटून व्यावयाचे ठरले.[१]

१६८४ साली रामनाक भंडारीकडे राजगृहीच्या राजभागापैकी काही येणे होते. दरम्यान राजमंडळातील सेवक खंडोजी मोहिते याने त्याचे दोन टोणगे व दहा मण धान्य घेऊन गेला म्हणून रामनाक भंडारीने चेऊलच्या चिमणाजी आऊजीकडे तक्रार केली, त्यावर त्याने चौघांच्या मते टोणग्याची किंमत आणि धान्याची किंमत बरोबर आहे की नाही याची चौकशी केली. ती खंडोजीच्या नावावर टाकण्यास बाबाजी कुलकर्णी यास सांगितले असल्याचे निळोपंत प्रधान याने दि. २१-१२-१६८५ रोजी चेऊलचा हवालदार व कारकून रायाजी सदक प्रभू यास लिहून त्यालाही ही गोष्ट चौकशी करून ( नंतर ) कळविण्याविषयी लिहिले होते.[२]

**चोरीचा निवाडा :**

संभाजी राजांच्या कारकीर्दीत न्यायनिवाडा कसा चालत असे त्याची काही उदाहरणे येथपर्यंत दिली आहेत. त्या काळात चोरीमारीचेही प्रकार होत. एखाद्याने चोरी केली तर त्याची तपासणी कसून होत असे. ज्याची चोरी झाली असेल त्याला न्याय मिळावा म्हणून अधिकारी आपली कामगिरी बजावीत असत. काही गान्हाणी रायगडपर्यंत जात असत. तर्फ उमरज, कसबे मसूर येथील महादजी जगदाळा व मौजे सिवडे व मौजे वराडे येथील संताजी घाडगा याच्याकडे सितोजी आणि सटवोजी भोसले यांनी चोरी केली होती. चोरीस काय गेले व शेतातून काय नेले यासंबंधीची सविस्तर माहिती निवाड्यात दिलेली आहे. महादजी पटेलच्या मौजे कोणे गव्हाण व मौजे सिवडे येथील १०० बिघ्यांपैकी कोणे गव्हाण येथील ५० बिघ्यात सटवोजी भोसले याने आपली गुरे व शेरड्या घालून त्यांना चरावयास घातले. सिवडे येथील ५० बिघ्यातील काही मालिस्त करून नेले व काही गुरांकडून चारिले. महादजीच्या आकणीच्या सोप्याची मोडतोड करून त्यातील २२ तुळया, माळी व सोप्यातील ३० खांब, १०० कड्या, ४२ हसणी सटवोजीने रात्रीच्या वेळी नेले. या भानगडीत महादजी पाटील व सटवोजी भोसले यांच्यात दंगा झाला. त्यावेळी सटवोजी भोसलेने महादजीच्या अंगावरील १ तलवार, १ कोचकी, १ शेला, १ तांबडी पासोडी, मोत्यासकट कुडियांचा जोड या गोष्टी नेल्या. याशिवाय बारा हजार

१. JSM–G, p 203, कारी व आंबवडे जेधे देशमुख
२. शिचसा, खंड ९, ले. ६४, पृष्ठ ६६

कडबा, तुरीचे कटाची व बाजे हरजिनसी कूट व पावसाळ्यातील शाकरणी करण्यासाठी असलेले २०० भारे सटवोजी भोसले याने नेले.

संताजी घाटगा याच्या पिकलेल्या शेतातील ४१½ बिघे मालिस्त करून नेले. त्याच्या आकणीच्या माळ्या दोन जाळल्या. सितोजीने संताजीच्या पेके गह्ळियाचे राळे सोंळुले नवसेरी २½ खंडी होते ते नेले होते.

या सर्व गोष्टी चोरल्यासंबंधी महादजीने रायगडला जाऊन सर्व कारकून आणि कविकलश यांच्याकडे तक्रार केली. या सर्वांनी बसोन निर्वाह केला की देशाधिकारी व पारपत्यगार यांना आज्ञापत्र देऊन शंभर बिघ्यात सटवोजीने किती चोरिले व किती मालिस्त करून नेले याची चौकशी देशमुख व देशकुलकर्णी यांच्याकडे करण्यास सांगितले. ज्या सुतारांनी महादजीचे घर बांधले होते त्यांच्याकडे जाऊन चौकशी करण्यात आली. चोरलेल्या तुळ्या सुताराने खरेच वापरल्या होत्या का याची साक्ष लिहून द्यावी म्हणून हुकूम देण्यात आला होता. महादजीच्या अंगावरील वस्तू नेल्या त्या त्याच्या अंगावर होत्या की नाही व कुडलिया मोती कानात होते की नाही व असल्यास मोती कोठे खरेदी केले व त्याची किंमत महादजी सांगतो त्याप्रमाणे ११½ होन आहे की नाही याची चौकशी करून साक्षी लिहून देण्याविषयी आणि चोरीस गेलेल्या इतर गोष्टींची खात्रीलायक चौकशी करून सर्वांनी आपल्या साक्षी लिहून द्याव्या म्हणून आज्ञापत्र देण्यात आले. यात खोट्या गोष्टी दिसल्या किंवा वैमनस्य दिसले तर ते संभाजी महाराजांना चालणार नाही असे सरकारकुनांनी व कविकलशाने देशाधिकारी व पारपत्यगार यांना बजावले होते. हा निवाडा दि. ३१–१–१६८५ रोजी केला. यावर निळो मोरश्वर, प्रल्हाद निराजी व हंबीरराव यांचे शिक्के आहेत.

चोरीसंबंधी पूर्ण चौकशी केल्यानंतर रायगडला दि. ४–२–१६८५ रोजी छत्रपती स्वामी व हाजीर मजालसीत हंबीरराव मोहिते, शेसो बापूजी देसकुलकर्णी, सातारा किल्ल्याचा निबिस्ते बिलालराऊ, पुण्यातील परिंचे येथील आबाजी बीन धारोजी जाधव पाटील, कऱ्हाड पुणे येथील पाटील सेकोजी बीन मतनोजी काळे देसाई, अंताजी लक्षुमण, सबनीस लश्करी हुजराती कऱ्हाड व पुणे येथील पाटील यांच्या समक्ष आपण नसता कथला केला. महादजीच्या शेतातील गोष्टी चोरल्या, आपण दिवाणीचे गुन्हेगार आहोत म्हणून साक्षपत्र लिहून दिले. या साक्षपत्रावर वर दिलेल्या लोकांची नावे असून हंबीरराव मोहित्यांचा शिक्का आहे. हा निवाडा दि. ३१–१–१६८५ ला केला. चोरीसंबंधी देशाधिकारी आणि पारपत्यगार यांनी दि. ३१–१–८५ रोजी माहिती दिल्यानंतर दि. ४–२–८५ रो[illegible] म्हणजे अवघ्या चार दिवसांत साक्षपत्र लिहून घेतले. १६८५ च्या मा[illegible]स स्वराज्यावर सर्व बाजूने आक्रमण होत असताना व त्याच्या प्रतिकारात [illegible] आणि

त्यांचे अधिकारी गुंतलेले असताना या कठीण व धामधुमीच्या काळातही न्याय-निवाड्याचे काम तत्परतेने व चोखपणे होत होते हे ध्यानात ठेवले पाहिजे.[१]

**पटेलगीचा वाद :**

पटेलगीच्या वृत्तीसंबंधी नेहमी तंटे होत. काही तंट्यांची बातमी छत्रपतींच्या कानावर घातली जाई. माणकोजी बीन राहूजी जगदाळा पटेल मौजे शिराडे तर्फ उंबरज व शिवाजी नाईकडा व नरसोजी नाईकडा कुणबी मौजे मजकूर यांच्यात निम्या पटेलगीवरून वाद निर्माण झाला. या वादाबद्दल माणकोजीचा भाऊ माहादाजी पटेल कर्यात मसूर याने छत्रपती स्वामींना भेटून आम्हा जगदाळियांची वृत्ती कदीम सालाबाद पहिल्यापासून चालत असता शिवाजी नाईकडा निमे पटेलगीसाठी भांडत आहे म्हणून सांगितले. संभाजी राजांनी कऱ्हाडचा मुख्य देशाधिकारी राजश्री कोनेर रंगनाथ याला आज्ञापत्र सादर करून माणकोजी जगदाळाला त्याच्याकडे पाठविले. शिवाजी नाईकडा यास सुभ्यात बोलावून त्याची जबानी लिहून देशमुख, देशकुलकर्णी, गावातील मोकदम, मौजे मजकूरचे बारा बलुते असे वृद्ध जमा करून श्रीचे देवळात नेऊन त्यांच्याकडून मौजे मजकूरची पटेलगी कोणाची, किती दिवस चालली आहे हे विचारून घेण्यास सांगून साक्षपत्र व त्यावर मुद्रा घालून रायगडास पाठविण्यास कोनेर रंगनाथला सांगण्यात आले.

या आज्ञापत्राप्रमाणे कोनेर रंगनाथ, १ कुलकर्णी, १ कुणबी, १ खोत, १ चौगुला, ७ बलूती, ११ पाटील व बलुते या साक्षीदारांच्या समोर आणि श्री कृष्णेची क्रिया व आपल्या वेचाळीस पिढ्यांच्या शफता घेऊन जगदळे पाटील खरे व नाईकडा निष्कारण पटेलगीस झोंबतो म्हणून साक्षपत्र दि. २१–४–१६८५ रोजी रायगड येथे रुजू केले. ही बखेर त्यांनी संभाजीमहाराजांना दि. २२–४–१६८५ ला सादर केली. ज्या दिवशी जगदळे व नाईकडा कुणबी यांच्या तक्रारीचा निकाल लागला त्यानंतर ते दोघे आपापल्या घरी परतले. त्याच दिवशी नाईकडा कुणबी पळून गेला. नाईकडाच्या जमीनदाराला बोलविले तर तो गैरहजर राहिला. जगदाळे पाटील खरे आहेत हे निवाडपत्र देण्यास स्वामी धनी आहेत म्हणून बखेर सादर केली. त्यावरून महाराजांनी निवाडा दि. १९–६–१६८५ रोजी सादर केला. साक्षपत्र, बखेर, करीना व भोगवट्यावरून मिरासी पटेलगी ही जगदाळियांची आहे हे खरे झाले. नाईकडा नसते भांडण करीत होता म्हणून त्याला दूर केले. जगदळे यांच्या बाजूने निकाल लागला म्हणून त्यांच्याकडून २५ होन आणि नाईकडा हा खोटा ठरला म्हणून त्याच्याकडून ५० होन घेऊन ७५ होन सरकारात जमा करण्यास सांगितले.[२]

१. मइसा, खंड १५, ले. १०–११ २. मइसा, खंड १५, ले. १५, पृष्ठे ४६ ते ५०

**वतनाची विक्री :**

१६८५–८६ मधील वतन घेतल्याची व त्यासंबंधी न्यायनिवाड्याची एक चित्तवेधक गोष्ट चेऊल प्रांतात घडली होती. वतन विकत देणे व घेणे यासंबंधी संभाजीराजे, प्रल्हादपंत न्यायाधीश हे शिवाजीमहाराजांनी घालून दिलेले नियमच अंमलात आणीत होते. हे ध्यानात येण्यासाठी येथे एक हकीकत जरा विस्तृतपणेच दिलेली आहे.

विठोजी बापूजी व गोंदोबा नारायेण व बालाजी रघुजी आणि मल्हारजी व शामजी तान्हाजी यांनी आणि त्यांच्या वतनातील इतर वाटेकऱ्यांनी कसवे चेऊल, तपे अष्टमी येथील वाडी सूर्याजी विसाजी प्रभू याला आत्मसंतोषाने विकली होती. सर्व वाटेकऱ्यांनी आपली निशाणे घालून खरेदी खत करून दिले होते. यात तिमाजीचा वडील मुलगा सजणाजी होता. तो मेल्यानंतर त्याची मुले जिवाजी प्रभू, निलाजी प्रभू आणि गोजोबा प्रभू हे लहान असल्याने आपल्या आजोळी पेणला गेले. तेथे मोठे झाले. खरेदी खतात त्यांचा उल्लेख नव्हता. सूर्याजी प्रभूला त्याची माहिती नव्हती. सूर्याजीने विकत घेतलेल्या वाडीत पदरचा पैसा घालून विहीर खणली. नवे घर बांधले. सूर्याजी प्रभू रोजगारासाठी रायगडास गेला असता तेथे शिवाजी प्रभूने प्रल्हाद निराजीला सूर्याजीने बळजबरीने वाडी घेतली म्हणून सांगितले. प्रल्हादपंतांनी खरेदी खत पाहिले. त्यात ती आत्मसंतोषाने विकली असे लिहिलेले होते. तेव्हा त्यांनी जिवाजीस आज्ञा केली की त्याने आपल्या ज्या वारसदारांनी वाडी विकली त्यांनाच विचारावे. त्यावर जिवाजी प्रभू म्हणाला की आपल्या वाटेकऱ्यांचे काही देणे होते. त्यावेळी सूर्याजी प्रभू मुजुमदार होता. बाकी येण्याच्या त्रासातून वाडी जुलमाने विकत घेतली. त्यावर सूर्याजी म्हणाला की बाकी येण्याबद्दल हुंड्या केल्या असतील परंतु वाडी जुलमाने घेतली नाही. यानंतर जिवाजी रायगडहून चेऊलला गेला. त्याने विठोजी, गोदोबा, बालाजी यांना समजावून सांगून जुलमाने वाडी विकत घेतल्याच्या तक्रारी रायगडला न्यायाधीशांकडे घेऊन जाणार तोंच मुघलांनी कोकणात लूटमार केली.

सूर्याजीची काही माणसे पालीत व काही अष्टमीत होती. चौकशीसाठी तो त्यांच्याकडे गेला. जिवाजी प्रभू पाचाडला गेला. सूर्याजी आपल्या माणसांची व्यवस्था करून रायगडास गेला. तेव्हा जिवाजी प्रभू रोजगार करून गेल्याचे त्याला कळले. मनसुबी तैसीच राहिली. त्यानंतर सूर्याजीने विठोजी, गोदोबा, बालाजी, रघुजी, शामजी यांना विचारले की तुम्ही जिवाजीला जुलमाने वाडी विकत घेतल्याचे लिहून दिले आहे तरी या गोष्टीचा निकाल लावा. तु[illegible] [illegible] वाडी पाहिजे असल्यास वाडीत खर्च केलेसा पैसा व बांधलेल्या घराचे पै[illegible] देऊन वाडी विकत घ्या. ते ऐकेनात म्हणून चेऊलचा सुभेदार राजश्री ये[illegible]राव अनंत

यांस सर्व वर्तमान सांगितले. विठोजी व गोदाबा यांना बोलावून नेल्यावर त्यांनी जुलमाने वाडी विकत घेतल्याची तक्रार लिहून दिली. सूर्याजी, विसाजी व जिवाजी निलाजी, गोदोबा प्रभू यांच्यातील वाद मिटविण्यासाठी सुभेदाराने बजाबा माहाले दि|| ग्यानबंक हुजरी लोक यास फडशा करावयास सांगितला. त्यांनी हाजीर मजालसीत बसून मनसुबा आरंभला. राजमंडळात अंताजी सिवराव कवस, येसाजीराव दरेकर सुभेदार, हाशमपाव लोक, बहिरजी पवार सुभेदार, हशमपाव लोक, दत्ताजी विठ्ठल प्रभू, सिताराव पनवेलकर याशिवाय खंदेरी, कुलाबा व सरसगड येथील अंताजी भास्कर मुजूमदार, २ तट हवालदार, देसाई, अधिकारी अष्टमीमधील देशमुख, चेऊलचे सुभेदार, मुजूमदार, हवालदार, जंजिरे राजकोट येथील मुजूमदार इत्यादींच्या समक्ष महजरनामा सादर झाला. हाजीर मजालीसमध्ये सूर्याजी खरा ठरला. विठोजी व गोदोबा, बालाजी, शामजी, निलाजी, जिवाजी यांचा अर्थाअर्थी संबंध नाही असा निवाडा झाला.[1]

हाजीर मजालसीत जरी वरील निकाल झाला तरी जिवाजीचे समाधान झाले नव्हते. तो पुन्हा रायगडला गेला. सूर्याजीही तेथे गेला. दोघेही तक्रारी सांगण्यासाठी प्रल्हादपंतांकडे गेले. जिवाजी आणि सूर्याजी यांनी आपापल्या साक्षी आणून देतो म्हणून लिहून दिले. त्यावरून राजांचे माजी देशाधिकारी हरि सिवदेव, माहालीचे हवालदार, वतनदार यांना यासंबंधी आज्ञापत्रे सादर करण्यात आली होती. त्यावरून हरि सिवदेव याचे विनंतीपत्र आणि हवालदार, देशमुख, वतनदार यांची विनंतीपत्रे आणि जिवाजी प्रभूच्या साक्षीदारांची पत्रे रायगडला पाठविण्यात आली. त्यात सूर्याजीने बलात्काराने जिवाजी प्रभूच्या तक्षीमदारापासून वाडी विकत घेतली असे लिहिलेले होते. या सर्व पुराव्यावरून सूर्याजी खोटा पडला. त्यावर प्रल्हादपंतांनी पूर्वी शिवाजी महाराजांनी केलेल्या हुकमाप्रमाणे वतनदाराचे वतन विकत घेऊ नये, देणाऱ्यांनी देऊ नये, विकत घेईल त्यास शिक्षा करून गुन्हेगारी घ्यावी, वतन देईल त्यास ताकीत करावी असा न्यायनिवाडा दिला.

शिवछत्रपतींनी वतने सवंग होऊ दिली नाहीत आणि दिली ती अपवाद म्हणूनच दिली. वतनाची वारंवार खरेदी-विक्री होऊ लागली तर ती बाजारी वस्तू होते आणि वतन देणारा-घेणारांची किंमत कमी होते. वतन ही एक पवित्र वस्तू आहे आणि वतनदार हा देशातला एक कर्तबगार व निष्ठावंत माणूस असला पाहिजे अशी वतनदाराबद्दल छत्रपतींची भावना होती. हेच धोरण संभाजी राजांनी आणि प्रल्हाद निराजीने चालू ठेवले होते. वरील दृष्टिकोनातून पाहता सूर्याजीला वाडी विकत घेण्याचे प्रयोजन नव्हते. सूर्याजी प्रभूने जिवाजीच्या वाडीत जे झाडपेड लावले असेल त्याची रास्त किंमत वतनदारांच्या आणि भल्या लोकांच्या

१. शिचसा, खंड ९, ले. ६६, पृष्ठे ६७–७०

साक्षीने ते ठरवितील ती किंमत जिवाजीने सूर्याजीस द्यावी. वाडीत जे घर बांधले ते बांधण्याचे सूर्याजीला प्रयोजन नाही. वाडीची किंमत ठरवावी असा निवाडा प्रल्हादपंतानी केल्यावर सूर्याजी पळून गेला. तेव्हा त्यांनी येसाजी अनंत या देशाधिकाऱ्याला आज्ञापत्र सादर केले. सूर्याजीने चेऊलची मजमू करून जिवाजी प्रभूचे तक्षीमदार विठोजी बापूजी व गोविंद नारायण यांच्याकडे जाऊन बलात्काराने वाडी घेतल्याच्या खोट्या तक्रारीस मजहर करून दिल्या म्हणून त्याच्या माणसास अटक करून ठेवले. त्यानंतर विठोजी बापूजी आणि गोविंद नारायण यांनी प्रल्हादपंताकडे जाऊन तक्रार केली. हवालदार, देशमुखांनी विनंतीपत्रे पाठवूनही सूर्याजी मनास वाटेल तशी लबाडी करीत होता म्हणून प्रल्हाद निराजी रागावले आणि त्यानी दि. १७–१–१६८७ रोजी चेऊलचा देशाधिकारी येसाजी अनंत यांस लिहिले, " विठोजी बापूजी व गोविंद नारायेण हुजूर आले असता याचे माणसांस व जमानास अटक करावयासी काये गरज आहे वाडीचा निवाडा ...चे हवालदाराने व देशमुखाने विनंतीपत्रे हुजूर पाठविली असता सूर्याजी प्रभू मनास माने तैसी लबाडी करितो. जिवाजीचे तक्षीमदारास परागंदा केले आणि तुम्ही सुभेदार **तमासा पाहाता आणि सूर्याजीची कोसीस करिता** यावरून तुमची कारकुनी जाहीर जाली. या गोष्टीचा **प्रसंग राजश्री...स्वामीजवळ होईल आणि सूर्याजी** लवकरच नतीजा पावेल तरी तुम्ही बेमुलाहिजा सूर्याजी प्रभूस ताकीद करून हलखुद ठेवणे व सूर्याजी प्रभूने तरफदारास सांगोन आकस कोसीने विठोजी बापूजी व गोविंद नारायेण याजवर वराता केल्या आहेत. त्या तुम्ही मनास आणून हक हिसाबी करणे गैर माकुल व हरकसी सर्वथा करू न देणे व विठोजी बापूजी व गोविंद नारायेण हुजूर आले आहेत यांचे माणसास व यांचे जमानास येकंदर तगादा न लावणे. "[१]

प्रल्हाद निराजींचे हे पत्र फारच चांगले व बोलके आहे. त्यांनी सुभेदाराची खरडपट्टी काढलेली असून ज्या पद्धतीने त्यांनी सूर्याजीसाठी प्रयत्न चालविलेले होते त्याबद्दल सुभेदारांना त्यांनी बजाविले की या गोष्टी संभाजी राजांपुढे नेण्यात येऊन सूर्याजीला शिक्षा करण्यात येईल. चेऊलचा देशाधिकारी येसाजी अनंतला सूर्याजीस ताकीद देण्यास सांगून विठोजी बापूजी व गोविंद नारायण यांच्यावर द्वेषाने वराता केल्या होत्या. त्यात अयोग्य असे काही घेऊ नये आणि विठोजी व त्याच्या इतर माणसांना तगादा लावू नये असे बजाविले होते. गावच्या हजीर मजालसीत लागलेला निकाल तक्रार करणाराला पटला नाही तर ती तक्रार रायगडपर्यंत जाऊन तेथे त्याचा योग्यप्रकारे निकाल कसा लागत होता हे या उदाहरणावरून स्पष्ट होते. संभाजी राजांना गैरकायदेशीर गोष्टी खपत नसत. ए[illegible]ने

१. शिचसा, खंड १०, ले. १५, पृष्ठ २३–२४

ताकीद देऊनही ऐकले नाही तर त्याला राजांपुढे उभे करण्यात येत असे. कोणावर अन्याय झाला तर त्याची दखल घेऊन अन्याय दूर करण्याची व्यवस्था केली जाई. निवाड्यातील अनेक उदाहरणांत कोणाला हत्तीच्या पायी किंवा कडेलोटाची शिक्षा केलेली दिसत नाही. फक्त त्यांच्यावर झालेल्या कटासारख्या राजद्रोही लोकांनाच राजांनी अशा कडक शिक्षा केलेल्या दिसतात.

न्यायनिवाड्याच्या दृष्टीतून त्यांनी केलेल्या इंग्रजांच्या तहाकडे पाहिले तर तहात संभाजी राजांनी इंग्रजांनाही काही नियम घालून दिलेले दिसतात. उदा.,

(१) एखादा इंग्रज किंवा त्यांचा अधिकारी गुन्हा करून मराठी हद्दीत पळाला आणि त्याबाबत माझ्या अधिकाऱ्यांकडे मागणी केली तर त्याला पकडून इंग्रजांच्या ताब्यात देण्याची माझे अधिकारी खबरदारी घेतील.

( २ ) माझ्या प्रजाजनांपैकी कोणी जबरदस्तीने इंग्रजांच्या वखारीत शिरेल आणि भांडण करील तर त्याच्या गुन्ह्याचे पारिपत्य सुभेदार चौकशी करून करतील, आणि दोष जर इंग्रज माणसाकडे असेल तर त्यास सुभेदार शृंखलाबद्ध करतील व मुंबईस कळवतील. त्यांचे उत्तराप्रमाणे त्याला शासन करतील किंवा सोडून देतील.

( ३ ) माझ्या राज्यात इंग्रजांची किंवा त्यांच्या व्यापाऱ्यांची व्यापार करताना चोरी झाली तर त्या चोराला सुभेदार किंवा हवालदारापुढे नेऊन त्यांचेकडून न्याय करून चोराकडून भरपाई करून मिळेल.[1]

एखाद्याचे वतन असेल तर पुष्कळ वेळा दुसरा एखादा त्यावर आपला हक्क सांगत असे. त्यामुळे तंटे निर्माण होत. गोपजी व सूर्याजी विठ्ठल प्रभू, हे चुलते–पुतणे, उपनाव कर्णिक देशपांडे, यांचे प्रांत कल्याण, पंचमहाल पेण, परगणे साकसे येथे वतन होते त्यांच्या वतनावर दत्ताजी गंबाजी आणि वामनाजी गोविंद हक्क सांगू लागले. यासंबंधात गोपजी आणि सूर्याजी यांनी शिवाजी महाराजांकडे तक्रार केली. त्याच सुमारास महाराज कर्नाटकाच्या स्वारीवर गेल्यामुळे हा तंटा तसाच राहिला. १६८८ सालच्या ऑक्टोबर–नोव्हेंबरच्या सुमारास गोपजी व सूर्याजी विठ्ठल यांनी संभाजी महाराजांना भेटून सर्व हकीकत सांगितली. त्यांनी प्रल्हाद निराजी यांना या वृत्तीचा निवाडा करण्यास आज्ञा दिली. त्यांनी आणि मोरेश्वर पंडितराव यांनी या तक्रारीचा विचार करून, साक्षी पुरावे घेऊन गोपजी व सूर्याजी यांची वृत्ती न्याय्य असल्याचा निवाडा केला. गोपाळ दत्ताजी व वामनजी गोविंद यांच्या वडिलांना मुतालकी सांगितली होती. त्यांनी यांचे खून करून ते वृत्तीचा उपभोग घेत असल्याचे सिद्ध झाले या गोष्टी प्रल्हाद निराजी आणि मोरेश्वर पंडितराव यांनी राजांच्या कानावर घातल्या.

१. B. I. S. Mandal, Quarterly Vol II p 27–37

राजांनी सूर्याजी आणि गोपजी प्रभू यांना वतनपत्रे करून देण्याची आज्ञा दिली. तेवढ्यात संभाजीराजांना शिर्के यांच्या बंदोबस्तासाठी खेळण्यास जावे लागले. तेथून ते संगमेश्वरला गेले. त्यामुळे गोपजी आणि सूर्याजी प्रभू यांची वतनपत्रे व्हावयाची राहून गेली.[1]

परगणे वाई आणि कसबा खुम व बावधन येथील कुलकर्णीपद गंगाजी शंकर देशपांडे यांच्या वडिलांकडे पिढ्यान् पिढ्या होते. वाईला कमालखान वजीर होता. त्यावेळी जानोबा व जाऊबा थिटे यांनी या वतनासंबंधी कटकट सुरू केली. गंगाजी शंकर यांचे वडील गोपाल ळाहिदेव याने कमाळखानाला भेटून आपल्या वतनाच्या सहीशिक्याचे कागद करून घेतले. गावास परत येताना जानोबा व जाऊबा थिटे यांनी त्याला ठार मारले. त्या गर्दीत हे कागदपत्र व येजितपत्र (अजिंक्य असल्याचे कागद) नाहीसे झाले. थिटे बंधूनी लाज वाटून देशांतर केले. पुन्हा कागद झाले तरी हा वाद चालूच राहिला. गंगाजी शंकर याने या वादाचा कायमचा निकाल लावण्यासाठी थिटे मंडळींची भेट घेऊन त्यांच्यापैकी कोणी वाद निर्माण केला तर काय करावयाचे असे विचारले. या वादाचा अंतिम निर्णय लावण्यासाठी दि. २६–१०–१६८८ ला महजर सभा होऊन त्यात रामभट बिन शिवभट बिन गावदेभट ठिह्वा (थिटे ?) यांनी राजश्री गंगाजी शंकर यास येजितपत्र लिहून दिले. ते असे, "तुम्हामधील हर कोण्ही वृत्तिची गोष्टी करितातिं...तो तुमच्या वृत्तिची गोष्टि काढाल आणि फजित पावेल. अम्ही त्या कथळात (भांडणात) नाहि. तुमचे वाडवडिल आम्हावरि जैसे कृपा करित गेले तैसे तुम्हीहि कृपा करीत जाणे. तुमच्या वतनाचे नांव गोष्टि जो कोण्ही आम्हातीळ करिळ तो दिवाणीचा गुन्हेगार व ब्रह्मसभेचा आन्याई. आमच्या वड वडिलांनि हे वृत्ति कधी भक्षिळी नाही अगर आपली वृत्ति ऐसे आम्हासहि सांगितले नाहि जाऊबा व जानोबा माघे झोंडपणे गत्ळा पाडिले होते तेहि फजित पावळे. येकाची. वृत्तिस अपळी वृत्ति म्हणणे हे ईश्वरास मानत नाही. नीति नव्हे नींवंश होईल... अम्ही पुरातन तुमचे आश्रीतु ब्राह्मण. तुम्हास अशीर्वाद देऊन असोन समस्त थिट्याच्या विद्यमाने पत्र ळेहुन दिल्हे."[2]

१६८८ च्या ऑक्टोबर महिन्यात या महजराची सभा झाली. त्यात नमूद केलेल्या गोष्टींवरून ग्रामपंचायतीत चालणाऱ्या कामकाजाच्या पद्धतीची कल्पना येते. हा महजरनामा बराच मोठा असून त्यावरून त्याकाळच्या लेखन-पद्धतीचा बोध होतो. सभावृत्त म्हणजे महजर कोणी लिहावयाचा हेही ठरलेले असे. हा महजर पूर्वी सागितल्याप्रमाणे येजितपत्र असल्याने त्यातील प्रमुख

१. वानि–मापा, वतनपत्र १०, पृष्ठ ४७

२. शिचसा, खंड ५, पृष्ठ २१३; मकास–जो, पृष्ठ ७५ ते ८७

लिखाण थिटे मंडळीपैकी रामभट बिन शिवभट बिन गावदे भट यांनी केलेले आहे. ही सभा होईल त्यावेळी सभेस उपस्थित असलेल्यांची कच्ची यादी करून नंतर त्यांच्या स्वांक्षऱ्या ( खुद्द दस्तूर अथवा खुद्द कलम ) घेण्याचे काम चाले. या महजरात हाकीम मंडळींची नावे आणि वाई परगण्याच्या देशमुखाचे नाव एकाच हस्ताक्षरात आहेत, इतर १२ देशमुखांची नावनोंद वेगवेगळ्या हस्ताक्षरात आहे. वाई, हिरडसमावळ, कुडाळ ( हुमगाव ), मेढे, शिरवळ, उत्रोली, रोहिड-खोरे, रायगड, सातारा, वंदन, फलटण, परळी येथील देशमुखांची नावे त्यावर मिळतात. या कागदात ६० ब्राह्मण, येजितखत लिहिणारा, हकीम, १४ देशमुख, २० पाटील, १ गुरव, अशी एकूण ९७ हस्ताक्षरे असून त्यावर २० नांगर, २ तराजू, १ चौगुलाचिन्ह आणि १३ मुद्रा आहेत.

या महजराची सभा शके १६१० कार्तिक शु. द्वादशी म्हणजे दि. २६-१०-१६८८ या दिवशी होऊन माघ वद्य १२ ला, ( दि. ९-२-१६८९ रोजी ) म्हणजे साडेतीन महिन्यांनी सभेचे वृत्त लिहिले गेले.

लढाईच्या ऐन धामधुमीत गावचा कारभार, ग्रामराज्य पद्धतीतील पंचायत लेखन पद्धती कशी होती, त्याची नियमबद्धता कशी होती अशा अनेक गोष्टींचा या महजरनाम्यावरून बोध होतो.

## सैनिकी व्यवस्था :

शिवाजी महाराजांनी त्यांच्या काळाला अनुसरून आणि गरजांना अनुरूप जी साधनसामुग्री उपलब्ध झाली त्याप्रमाणे आपले युद्धतंत्र आणि आपली सैनिकी व्यवस्था निर्माण केली होती. स्वराज्याचा प्रारंभ त्यांनी एका लहानशा पुण्याच्या जहागिरीतून केला. मुघल साम्राज्याच्या मानात मराठी राज्य फारच लहान होते. महाराजांनी शत्रूच्या अफाट सैन्यासमोर उभे राहण्याच्या दृष्टीने गनिमी काव्यासारखे युद्धतंत्र वापरून शत्रूला नामोहरम केले. संख्याबळ आणि साधनांची समृद्धी असलेल्या शत्रूपुढे टिकाव धरता यावा म्हणून महाराजांनी आपल्या सैन्यात वक्तशीर, गुणवान, हुषार आणि शूर मावळे सैनिक तयार केले. सह्यगिरीतील चपळ आणि काटक मावळ्यांचा त्यांनी पुरेपूर उपयोग करून घेतला. सह्याद्रीच्या दऱ्याखोऱ्यातील दुर्गम आणि शत्रूला अपरिचित असलेल्या प्रदेशात स्थानिक काटक लोकांच्या थोड्या बळावर लढत असताना, पुढे प्रसिद्धीस आलेली, मराठ्यांची गनिमी काव्याची युद्धपद्धति उदयास आली. महाराजांनी डोंगरी किल्ल्यांचा उपयोग करून गडकोटांचा नैसर्गिक तटबंदीसारखा वापर केला. या गडकोटांमुळे महत्त्वाच्या मार्गांचे सुलभपणे संरक्षण करता येत असे. त्या गडांवरून नुसते दगडधोंडे सोडले तरी चढून येणाऱ्या मोठ्या सैन्याचा

निःपात करता येत असे. गडकोटांचा महाराजांनी आक्रमक आणि संरक्षक अशा दोन्ही प्रकारच्या हालचालींसाठी चतुरपणे उपयोग केला.

अमात्यांनी आपल्या राजनीतीत शिवाजी महाराजांच्या गडकोटांची व्यवस्था कशी होती आणि त्याचे महत्त्व काय हे उत्तम रीतीने खालील शब्दात सांगितले आहे : "संपूर्ण राज्याचे सार ते दुर्ग. दुर्ग नसता मोकळा देश परचक्र येतांच निराश्रय, प्रजा भग्न होऊन देश उध्वस्त होतो. देश उध्वस्त झाल्यावरी राज्य असे कोणास म्हणावे? याकरितां पूर्वी जे जे राजे झाले त्यांणी आधी देशामध्यें दुर्ग बांधून तो तो देश शाश्वत करून घेतला, आणि आलेले परचक्र-संकट दुर्गाश्रयीं परिहार केले. हे राज्य तर तीर्थरूप थोरले कैलासवासी स्वामींनी गडांवरूनच निर्माण केले. जो जो देश स्वशासनवश न होय त्या त्या देशीं स्थलविशेष पाहून गड बांधिले; तसेच जलदुर्ग बांधिले, त्यावरून आक्रमण करीत करीत सालेरी अहिवंतापासून कावेरीतीरपर्यंत निष्कंटक राज्य संपादिले. औरंगजेबासारखा महाशत्रू चालून येऊन विजापूर भागानगरांसारखीं महासंस्थानें आक्रमिली, संपूर्ण तीस बत्तीस वर्षे पर्यंत या राज्यांशी क्रांतिश्रम केला, त्याचे यत्नास असाध्य काय होते? परंतु राज्यात किल्ले होते म्हणून अवशिष्ट तरी राज्य राहिलें. पुढे पूर्ववत करावयास अवकाश जाहला."

"गडकोटांचा आश्रय नसता फौजेच्याने परमुलखी टिकाव धरून राहवत नाही. फौजेविरहित परमुलखीं प्रवेश होणेंच नाही. इतक्याचें कारण तें गडकोटविरहित जें राज्य त्या राज्याची स्थिति म्हणजे अभ्रपटलन्याय आहे. याकरितां ज्यास राज्य पाहिजे त्यांणी गडकोट हेंच राज्य, गडकोट म्हणजे राज्याचे मूळ, गडकोट म्हणजे खजिना, गडकोट म्हणजे सैन्याचे बळ, गडकोट म्हणजे राज्यलक्ष्मी, गडकोट म्हणजे आपली वसतिस्थळें, गडकोट म्हणजे सुखनिद्रागार, किंबहुना गडकोट म्हणजे आपले प्राण संरक्षण, असें पूर्ण चित्तांत आणून कोणाचे भरवशावर न राहता आहे त्याचे संरक्षण करणे; व नूतन बांधण्याचा हव्यास स्वताच करावा, कोणाचा विश्वास मानू नये."[1]

शिवाजी महाराजांच्या सैनिकांजवळ मोठा लवाजमा नसे. लंगोटी लावलेले मावळे एका कांबळ्यानिशी, कंबरेला तलवार लावून सहज घोड्यावर बसून युद्धास सतत सज्ज असत. अशा मावळ्यांना गनिमी काव्यासारखी युद्धकला सहज अवगत होत असे.

महाराजांजवळ त्या काळात ठेवता येण्याजोगी लढाईची सर्व सामुग्री सज्ज होती. त्यांच्याजवळ घोडदळ, पायदळ, तोफखाना आणि आरमार होते.

१. आप–जो, पृष्ठ ३१

घोडदळात पागा आणि शिलेदार असे दोन विभाग होते. पागेच्या रचनेत दर घोड्यास एक बारगीर व पंचवीस बारगिरांस एक मराठा धारकरी ' हवालदार '. पाच हवाल्यांवर एक ' जुमला ' व दहा जुमल्यांवरचा अधिकारी तो ' हजारी '. पाच हजाऱ्यांवरचा अंमलदार तो ' पंच हजारी '. पाच पंच हजाऱ्यांवरचा ' सरनोबत. ' पंच हजारी म्हणजे लष्करी सुभेदार व त्यासारखा ' सप्त हजारी ' तो लष्करी सर सुभेदार. हजारी, पंच हजारी, सरनोबत यांजजवळ वाकनिसांचे कारकून, हरकारे व जासूद असत. जासुदांचा मुख्य नाईक बहीरजी जाधव.

हशम व पावलोक—पायदळ—या खात्यात बहुधा मावळे लोकांची भरती असे. दहा लोकांस एक नाईक, पन्नास लोकांस पंच-नायकी, त्यावर हवालदार. असे दोन दोन हवाले मिळून एक जुमलेदार व दहा जुमल्यांचा एक ' हजारी '. सात हजाऱ्यांचा ' सरनोबत ' अशी पायरी असे. नेताजी पालकर, मालोजी घोरपडे आणि येसाजी कंक सरनोबत पदावर होते.

संभाजी महाराजांच्या काळात हीच सैन्याची व्यवस्था कायम होती. त्यांनी महाराजांनी निर्मिलेल्याच युद्धकलेचा अवलंब केला. संभाजी राजांच्या काळातील सैनिकी व्यवस्थेचा तपशील अभ्यासण्यापूर्वी संभाजी राजे आणि त्यांच्या सैन्याने कोणत्या मोहिमा आखल्या आणि कोणकोणत्या आघाड्या सांभाळल्या ते पाहणे आवश्यक आहे :

( १ ) मराठ्यांनी सिद्दीकडील दंडाराजपुरी, पोर्तुगेजांकडील चेऊल, उंदेरी, सांतु इस्तेव्हंव, तिवीम, मुघल हद्दीतील अहमदनगर, सोलापूर, कण्हेरी इत्यादी ठिकाणी वेढे घातले.

( २ ) शत्रूच्या सैन्याने फोंडा, रामसेज, त्रिंबकगड, पट्टागड, कल्याण-भिवंडी, रायगड, रोहिडा, पुरंदर, कोल्हापूर, पन्हाळा, इत्यादी ठिकाणी वेढे दिले; ते मराठ्यांनी परतवून लावले.

( ३ ) **आक्रमणे** : मराठ्यांनी आपल्या हद्दीपलीकडील मुघलांच्या हद्दीतील औरंगाबाद, बऱ्हाणपूर, परिंडा; चांदा, मलकापूर, जालना, सोलापूर, नळदुर्ग इत्यादी ठिकाणी आक्रमक हल्ले केले. त्याचप्रमाणे पोर्तुगेज हद्दीतील एलिफंटा, करंजा, तारापूर, असेरी, गोव्याजवळचे सालसेत, बारदेश येथे आक्रमक हालचाली केल्या. कर्नाटकात म्हैसूर आणि मदुरा राज्यात श्रीरंगपट्टण, बाणावर, मद्दूर, मदुरा, त्रिचनापल्ली, फोर्ट सेंट जॉर्ज इत्यादी ठिकाणी मराठ्यांनी आक्रमण केले.

मराठ्यांनी वऱ्हाड, खानदेश, बऱ्हाणपूर, औरंगाबाद, मद्रास, सैदापेठ, परिंडा येथे व अशा अनेक ठिकाणी छापे घातले. मुघलांनी १६८२ सालापासून मराठी हद्दीवर आक्रमणे सुरू केल्याने मराठ्यांना स्वतःच्या राज्याबाहेर जाऊन छापे घालण्यास किंवा प्रत्याक्रमणे करण्यास फारशी संधी मिळाली नाही.

मुघलांनी मराठी राज्याच्या उत्तरेपासून दक्षिणेपर्यंत पसरलेल्या रामसेज, साल्हेर, मुल्हेर, कल्याण–भिवंडी, चेऊल, रायगड, पुणे, सातारा, पन्हाळा, कोल्हापूर, कोपळ, भुजबळगड इत्यादी ठिकाणी वेढे घातल्यामुळे मराठ्यांना संरक्षक धोरण पत्करावे लागले. १६८४ सालपर्यंत वरील सर्व ठिकाणी मुघलांचे वेढे असले तरी आपल्या युद्धकौशल्याने मुघलांना ते वेढे उठविण्यास मराठ्यांनी भाग पाडले. १६८५ नंतर मुघलांनी आपली सैन्यशक्ती गोवळकोंडा व विजापूर या राज्यांवर केंद्रित केली असली तरी त्यांनी पुणे, कोल्हापूर, पन्हाळा, खेळणा, कोपळ इत्यादी ठिकाणी चढाई चालूच ठेवली होती. मराठ्यांनी या सर्व हल्ल्यांचा प्रतिकार करून राज्यरक्षणाचे आटोकाट प्रयत्न केले. मराठ्यांनी सतत आठ वर्षे शत्रूविरुद्ध टिकाव धरून शत्रूला आपल्या युद्धकलेची चुणूक दाखविली. या मराठ्यांच्या लढाया पाहिल्या म्हणजे संभाजी राजांची सैनिकी व्यवस्था सुस्थितीत होती असेच प्रत्यंतर येते.

संभाजी राजांच्या कारकीर्दीत महत्त्वाच्या जागांवर कोण अधिकारी होते, त्यांचे सैन्य व नाविक दल किती होते, गडकोटांवर रसद कशी पुरवीत आणि लढाईची पद्धत कशी होती ते आता पाहू.

**सैनिकी अधिकारी** : संभाजीराजे स्वतः जंजिरा, चेऊल, तारापूर, फोंडा, सांतु इस्तेव्हंव, खेळणा, बाणावर व श्रीरंगपट्टण या आघाड्यांवर गेले होते. १६८८ साली शिर्क्यांबरोबर झालेल्या युद्धात ते जातीने हजर होते.

( १ ) हंबीरराव मोहिते हे सरनोबत असून जवळ जवळ सर्व आघाड्यांवर ते लक्ष ठेवीत असत. कल्याण–भिवंडी, रायगड, कोल्हापूर, पन्हाळा, या ठिकाणच्या आघाड्या त्यांनी सांभाळल्या. निळो मोरेश्वर पेशवे यांनी कल्याण–भिवंडी, चेऊल येथील आघाडी सांभाळली; १६८५ साली निळोपंतांच्या आधिपत्याखाली बऱ्हाणपूरवर छापा घालण्यात आला त्यावेळी त्यांच्या बरोबर चार सेनापती होते. ( अ ) पुरंदर ( किंवा पुणे ) किल्ल्यावर सरदार राणा जयसिंग लढत होता. या लढाईत ( फेब्रु. १६८५ ) तो मारला गेला. ( ब ) सुजाणराव–११ डिसेंबर १६८५ च्या लढाईत मरण पावला.

बाकीची नावे उपलब्ध नाहीत.

( २ ) सरनोबत येसाजी कंक आणि कृष्णाजी कंक यांनी फोंड्याची आघाडी सांभाळली.

( ३ ) गोव्याच्या आघाडीवर खंडो बल्लाळाने संभाजी राजांना सर्व प्रकारचे साहाय्य केले.

( ४ ) कवि कलश, छंदोगामात्य याने रायगड, पन्हाळा, आणि गोवा येथील आघाड्या सांभाळल्या. मुघलांबरोबर संगमेश्वर येथे झालेल्या चकमकीत त्याला बाण लागला.

( ५ ) सर्जेराव जेधे आणि वाईच्या देशमुखांनी मावळ प्रांत आणि रोहिड्याची आघाडी सांभाळली. कोथळागडावर लढत असलेला नारुजी त्रिंबक मारला गेला.

( ६ ) सरदार भीमराव साताऱ्याच्या परिसरात लढत होता. नोव्हेंबर १६८४ च्या सुमारास नारुजी भोसले यांच्या नेतृत्वाखाली २००० घोडदळ साताऱ्यास जमा होते.

( ७ ) बारदरमल सरदाराने पुण्याचा बंदोबस्त केला.

( ८ ) कृष्णाजी दादाजी नरस प्रभू याने दंडाराजपुरी, शिरवळ, मावळ, व संगमेश्वर येथे मर्दुमकी गाजविली.

( ९ ) रूपाजी भोंसले याने रामसेज, कल्याण, भिवंडी, रायगड आणि कोल्हापूर पन्हाळा येथे मुघलांना हटविले.

( १० ) लालबेगचा मुलगा मलीक बेग हा १६८४ पूर्वी मराठ्यांच्या अधिकाऱ्यात होता. त्याच्या हाताखाली १००० मुसलमान घोंडेस्वार व तिरंदाज होते. त्याला वर्षाकाठी १५०० होन आणि त्याचा साहाय्यक शेख हुसेन याला वर्षाला ५०० होन पगार होता.

( ११ ) रामसेजचा किल्लेदार रूपा मोजदा याने रामसेजचा वेढा उठविला.

( १२ ) मानाजी मोरे आणि संताजी जगताप हे रुपाजी मोजदास मदत करीत होते.

( १३ ) सरदार तुकोजी कल्याण-भिवंडी येथे लढत होता.

( १४ ) जानराव जानोजी विजापूरच्या बाजूस लढत होता.

( १५ ) हिंमतरावाने संगमनेरच्या बाजूस चढाई केली.

( १६ ) हंबीररावाच्या निधनानंतर मालोजी घोरपडे सरनोबत झाले. मालोजी, त्यांचा मुलगा संताजी आणि विठोजी चव्हाण यांनी संगमेश्वर येथे मुघलांना सामना दिला.

( १७ ) कोपळचा खान गौडा देसाई आणि हुकेरीचा देसाई यांनी कोपळ, भुजबळगड, कोल्हापूर येथे मुघलांस हटविले.

( १८ ) हरजी राजे महाडीक यांनी कर्नाटकातील मुलखाचा बंदोबस्त केला. त्यांच्या बरोबर शामजी नाईक पुंडे, जैतजी काटकर आणि दादाजी काकडे हे मदतनीस होते. डिसेंबर १६८४ मध्ये दादाजी काकडे ३००० घोडदळ व २००० पायदळ घेऊन तालुका सकिला मन्नोर ( किंवा मद्दूर ) येथे होते. येथील लढाईत ते आणि त्यांचा मुलगा मारला गेला. त्यांचा दुसरा मुलगा समाजी याला शत्रूने पकडले. याच लढाईत मराठ्यांचा आणखी एक सरदार पेमाजी खमी झाला.

( १९ ) केशव त्रिमलने कल्याण-भिवंडी आणि रामसेजची आघाडी सांभाळली. १६८६ मध्ये त्याला कर्नाटकात हरजीच्या मदतीस पाठविण्यात आले.

उपलब्ध साधनांवरून ही यादी दिली आहे. त्यात प्रत्येकाचा नेमका हुद्दा कळत नसला तरी कोणी कोणती आघाडी सांभाळली याची कल्पना येऊ शकते.

**मराठयांचे सैन्यबळ :**

संभाजी राजांच्या कारकीर्दीत मराठ्यांचे एकूण सैन्यबळ नेमके किती होते हे सांगणे कठीणच आहे. तुकड्या अनेक वेळा एका आघाडीवरून दुसऱ्या आघाडीवर जात असत. तरीही निरनिराळ्या आघाड्यांवर किती सैन्य लढत होते याची कल्पना पुढील माहितीवरून येईल.

संभाजी राजे पन्हाळ्यावरून प्रथम ( जुलै १६८० ) रायगडला गेले तेव्हा त्यांच्याजवळच्या सैन्याची संख्या २०,००० होती.

निरनिराळ्या आघाड्यांवरील सैन्याचे जे आकडे उपलब्ध आहेत ते येथे दिले आहेत :

( १ ) बऱ्हाणपूरवर छापा घालण्यासाठी ३०,००० सैन्य तयार होते.

( २ ) १२,००० मराठ्यांनी बालाघाटाजवळ कांसा येथे मुघलांबरोबर लढाई केली. संभाजीराजांनी २०,००० सैन्य घाटाच्या अलीकडे तयार ठेवले होते.

( ३ ) रामसेजजवळ सैन्याची मोठी तुकडी लढाईच्या तयारीत होती. या वेळ्यात ७००० सैन्याच्या तुकडीने रामसेजच्या एका बाजूने हल्ला केला. याशिवाय १००० ची कुमक रामसेजला पाठविण्यात आली.

( ४ ) १०,००० सैन्याने भीमा नदी ओलांडून मुघल हद्दीत प्रवेश केला होता.

( ५ ) संभाजी राजांनी ६००० सैन्याची तुकडी सोलापूर लुटण्यासाठी धाडली होती.

( ६ ) ५००० मराठयांनी अहमदनगरवर हल्ला केला होता.

( ७ ) १०००० सैनिक मलकाथवर चालून गेले होते.

( ८ ) संभाजीराजांबरोबर असलेल्या १००० घोडदळ आणि २००० पायदळाने तारापूरवर हल्ला केला होता.

( ९ ) खवासपूर येथे २०,००० सैन्य हजर होते.

( १० ) ६००० पायदळ आणि २००० घोडदळाच्या तुकडीने चेऊलवर हल्ला केला होता.

( ११ ) संभाजीराजे फोंडा येथे गेले त्यावेळी त्यांच्याजवळ १५,००० सैनिक आणि ४ ते ५ हजार घोडदळ होते. गोव्यात मराठ्यांची एकूण फौज

२०,००० असावी. फोंडा किल्ल्यात मराठ्यांनी ६०० बंदुकधारी ( Musketeers ) सैन्य ठेवले होते. याशिवाय २०० लोक डोंगरात लपले होते.

( १२ ) मराठ्यांनी सांतु इस्तेव्हंववर हल्ला केला तेव्हा प्रथम ४० लोकांनी गडात प्रवेश केला. नंतर ८०० बंदुकधारी गड चढून गेले. मागाहून ३०० पायदळाची कुमक पाठविण्यात आली.

( १३ ) दि. ११–१२–१६८३ रोजी १००० घोडदळ व ३००० पायदळाने सालसेतमध्ये प्रवेश केला. अशीच एक तुकडी बारदेशामध्ये शिरली.

( १४ ) ७००० घोडदळ आणि ८००० पायदळ कल्याण–भिवंडीजवळ गेले.

( १५ ) २०,००० घोडदळ घेऊन हंबीररावाने कोल्हापूर येथे तळ दिला.

( १६ ) बारलाल ( ? ) च्या नेतृत्वाखाली ५००० घोडदळ नळदुर्ग येथे गेले.

( १७ ) १८,००० घोडदळ घेऊन जानराव जागोजी विजापूरच्या बाजूस गेला.

( १८ ) १५०० घोडदळाची तुकडी घेऊन हिंमतराव संगमनेरच्या बाजूस गेला.

( १९ ) लोहगड, विसापूरच्या जवळ असलेल्या मानापूर येथे १२,००० घोडदळ हजर होते.

( २० ) संभाजीचे ३०० लोक मुंबईच्या आजूबाजूस होते.

( २१ ) निळोपंत पेशव्याने ६ ते ७ हजार फौज घेऊन बऱ्हाणपूरवर छापा घातला.

( २२ ) मराठ्यांची फौज कर्नाटकात सज्ज असे. हरजी राजे त्याच भागात असत. १६८३ मध्ये त्यांनी ८००० घोडदळ घेऊन म्हैसूर राज्यात छापे घातले.

( २३ ) केशव त्रिमल व संताजी घोरपडे १२,००० घोडदळ घेऊन १६८७ मध्ये जिंजी येथे गेले.

( २४ ) हरजी राजांच्या हाताखालच्या २००० घोडदळ आणि ५००० पायदळाने गोवळकोंड्याचा मुलूख घेतला.

( २५ ) २००० घोडदळ आणि ५००० पायदळाने फोर्ट सेंट जॉर्जला वेढा घातला.

( २६ ) संभाजी राजांनी आदिलशहाला मदत करण्यासाठी चार हिस्से करड्या घोड्यांची संचणी केली होती.

**सैन्यातील पदे व साजसरंजाम :**

पायदळात आणि घोडदळात पूर्वीप्रमाणेच सुभेदार, जुमलेदार, कारकून, हवालदार, बारगीर, अफराद, नाईकवाडी, सबनीस इत्यादी लोक असत.

मराठे जेव्हा आघाडीवर जात तेव्हा दोन्ही बाजूला घोडदळ आणि मध्यभागी पायदळ असे. सैन्यात चांगली शिस्त असल्याचे पोर्तुगेजांनी नमूद केलेले आहे. बहुतेक तुकड्यांबरोबर भगवी निशाणे, पालख्या, छत्री व माल वाहण्यासाठी जनावरे असत. याशिवाय सैनिकांजवळ ढाल-तलवारी, भाले, मोठे चाकू, चापाच्या बंदुका, तोफा ( लहान, मोठ्या ), धनुष्यबाण आणि जिने तयार करावयासाठी दोर असत. मुघल सैन्यासारखा मोठा लवाजमा त्यांच्याबरोबर नसे. सर्व हालचाली वेगात आणि चपळाईने करण्यावर त्यांचा भर असे.

**नाविक दल :**

संभाजी राजांनी आपल्या सैनिकी यंत्रणेत नाविक दलाकडेही दुर्लक्ष केलेले दिसत नाही. त्यांच्या कारकीर्दीत आरमाराची वाढ झालेली दिसते. शिवाजी महाराजांनी पूर्वी बांधलेल्या जंजिरे कोट येथे आरमाराची व्यवस्था पूर्ववत चालू होती.

गोविंद कान्होजी आंग्रे, गोविंददास जाधव, दौलतखान, दादाजी प्रभू देशपांडे, मैया नाईक भंडारी हे नाविक अधिकारी होते. कान्होजी आंग्रे यांचे आरमार फिरते असे. ते सर्व बंदरांवर नजर ठेवीत असे. कावजी मुहमद, संताजी पवळा, सिद्दी मिस्त्री ( सिद्दी सांबूलचा मेव्हणा ) हेही आरमारात नेतृत्व करून लढत असत.

खंदेरी आणि कुलाबा येथे जागोजी फर्जन्द आणि नागोजी वाघमारे हवालदार होते. अंताजी भास्कर हा तेथे मुजुमदार होता. हे पेण, नायगाव, नागोठणे, चेऊल येथील खाड्यांचे संरक्षण करीत.

खाली दिलेल्या ठिकाणी मराठ्यांची गुराबे, गलबते आणि नौदलातील सैनिक तयार असल्याचे आकडे मिळत असले तरी नौदलाच्या एकूण संख्येची कल्पना करणे कठीणच आहे :

( १ ) राजापूर येथे ४ ते ५ हजार लोक सज्ज असून त्यांच्याजवळ ६० गलबते ( Galvetts ) आणि गुरावे होती.

( २ ) पेण येथे ३ हजार नाविक फौज होती.

( ३ ) सुंदरजी बाजी या सुभेदाराच्या हाताखाली २२ गुराबे, व ३००० खडी फौज होती.

( ४ ) मुंबईवर हल्ला करण्यासाठी ८५ गलबते आणि ५००० लोक तयार ठेवले होते. यापैकी ४५ गलबते उंदेरीवर हल्ला करावयास गेली.

( ५ ) थल येथे ५००० नौसैनिक होते.

( ६ ) दादाजी नरस प्रभूच्या नेतृत्वाखाली ४००० लोक दंडाराजपुरीवर हल्ला करण्यासाठी गेले होते.

( ७ ) सिद्दी मिस्रीच्या हाताखाली ३० गलबते आणि दौलतखानाच्या जवळ ८० गलबते होती.

( ८ ) खंदेरी येथे ३० आणि नायगाव येथे ३५ गलबते होती.

( ९ ) संभाजीने मुंबईजवळच्या खाडीत १०० गलबते तयार ठेवून नायगाव-ठाणा येथे २००० सैनिक सज्ज ठेवले होते.

( १० ) मराठ्यांच्या आरमारात बरीच तारवे होती. १६८३ च्या सुमारास नायगावच्या नदीत ७६ लढाऊ गलबते तयार होती.

( ११ ) १६८५ च्या सुमारास संभाजीच्या आरमारात ६० लढाऊ गलबते, १० पाल ( Palas ) आणि कारवारच्या नदीत नुकतीच तयार झालेली दोन नवी जहाजे होती. सर्व तारवांत ३०० पेक्षा अधिक तोफा होत्या.

कारवारच्या देसायाने तो प्रदेश जिंकून घेतल्यावर संभाजीचे आरमारही मिळविले.

( १२ ) कोर्ले, नागोठणे आणि चेऊल येथील प्रदेशात १५००० लोक ठेवलेले होते. दंडाराजपुरी येथे १००० लोक आणि आरमारात १२० गलबते, १५ गुराबे तयार होती. त्याचप्रमाणे नायगाव येथे ७६ गलबतेही तयार होती.

**गडकोट :**

गडकोटांवरील दैनंदिन व्यवस्था कशी होती याची पुरेशी माहिती उपलब्ध नाही. प्रत्येक ठिकाणी जे हवालदार, दफ्तरदार, पोतनीस, कारखानीस, सबनीस होते त्यांची नावे मिळतात. त्यावरून थोरल्या महाराजांनी रूढ केलेलीच व्यवस्था संभाजीराजांच्या काळातही चालू होती असे वाटते. बहुतेक गडांवर धान्य आणि इतर सामुग्रीचा भरपूर साठा केलेला असे. प्रत्येक गडावर या गोष्टी किती किती होत्या हे सांगता आले नाही तरी जे थोडे संदर्भ मिळतात त्यावरून संभाजी महाराजांच्या कारकीर्दीतही साठा करण्याचेच त्यांचे धोरण होते असे दिसते.

**काही संदर्भ :**

(१) " राजभागाचा गला हंगामसीर किले कोटास व सनदेवाइकास ऐवज दिला जात होता. याशिवाय जादा भात नेल्याबद्दल रयतेची तक्रार होती. "[१]

( २ ) चेऊल भागात शेतकऱ्यांनी गडावर दिलेल्या धान्याची नीटपणे मोजदाद केली जात असे.

........................

१. शिचसा, खंड ९, ले. ६३, पृष्ठ ६५

( ३ ) गडकोटांवर साठा करण्यासाठी मराठे धान्य नेत असल्याने मुंबईच्या आसपासच्या प्रदेशातून इंग्रजांना धान्यधुन्य मिळण्यास टंचाई पडत होती.

( ४ ) गडकोटांवर साठा करण्यासाठी शेतकऱ्यांकडून धान्य गोळा करण्यात येत असे. चेऊल भागात सिद्दी आणि पोर्तुगेज यांनी तो प्रदेश उद्‌ध्वस्त केल्यामुळे शेतकऱ्यांचे बरेच नुकसान झाले होते. निळो मोरेश्वराने सागरगडच्या कोठारातून ५० खंडी धान्य रयतेला देऊन लावणी संचणी करण्यास दिलासा दिला होता.

**दारूगोळा आणि शस्त्रास्त्रे :**

अनेक आघाड्यांवर मराठ्यांना लढावे लागत असल्यामुळे त्यांना शस्त्रास्त्रे आणि दारूगोळा यांची नेहमी चणचण भासत असे. संभाजी राजांनी राज्यावर आल्यापासूनच इंग्रजांकडे तोफा आणि दारूगोळा देण्याची मागणी केली होती. १६८१ च्या नोव्हेंबर महिन्यात फ्रेंचांनी मराठ्यांना तोफा आणि दारूगोळा पुरविला होता.

१६८२ च्या सुमारास डिचोली आणि कुडाळ येथे दारूगोळ्याचे दोन कारखाने उभारण्यासाठी लागणारा गंधक, सोरा वगैरे माल कर्नाटक आणि मलबार येथून समुद्रमार्गाने आणताना पोर्तुगेजांनी अडथळा करू नये अशी विनंती केलेली होती.

**शिबंदी :**

मराठी फितुरांनी ( देसाई वगैरे ) गडकोटांवरील शिबंदीची पुरविलेली माहिती पोर्तुगेज कागदपत्रात मिळते. त्यावरून आपल्याला वेगवेगळ्या गडांवर कोणती शिबंदी होती हे कळू शकते; ती यादी येथे दिली आहे :

( १ ) आंकोला तालुक्यात एक गड आणि किला कोट्ट येथे शिबंदी आणि तोफा आहेत.

( २ ) कडवाड तालुक्यातील किल्ला नदीच्या किनाऱ्यावर असून फॅक्टरी-जवळ थोड्या तोफा आहेत.

( ३ ) अंतरूज तालुक्यातील कोटात ब्राँझ व लोखंडाच्या तोफा असून किल्ल्याच्या आत ३०० व किल्ल्याबाहेर ४०० माणसे आहेत.

( ४ ) सतर व सांकली तालुक्यातील भीमगडावर शिबंदी आणि तोफा आहेत.

( ५ ) खारेपाटण येथील किल्ला नदीकिनारी असून तेथे शिबंदी व तोफा आहेत.

( ६ ) सिंवेस्वर तालुक्यातील किल्ल्यात काही इंग्रज, शिबंदी आणि तोफा आहेत.

( ७ ) कदरे तालुक्यातील किल्ल्यामध्ये तोफा ठेवण्याचा विचार आहे. आणि सुपे येथील कोटात ' फाल्कोंइस ' ' वेर्सुस ' जातीच्या काही तोफा आहेत.

( ८ ) मणेरी तालुक्यातील पारगड येथे शिबंदी व तोफा आहेत.

( ९ ) बांदे तालुक्यातल्या मनोहर गडावर शिबंदी आणि तोफा आहेत.

( १० ) रांगणा गडावर शिबंदी आणि तोफा आहेत.

( ११ ) सेंदुदुर्ग हा किल्ला कुडाळच्या परगण्यात बेटामध्ये आहे. तेथे तोफा व शिबंदी आहे.[१]

**नवे गड :**

संभाजी राजांनी काही नवे गड बांधण्याचा प्रयत्न केला होता.

( १ ) फोंडा किल्ला पोर्तुगेजांच्या माऱ्यापुढे टिकाव धरू शकणार नाही हे फोंड्याच्या वेढ्यात लक्षात आल्यामुळे हा गड पाडून संभाजी राजांनी जवळच्या डोंगरावर नवीन गड बांधला. त्याचे नांव मर्दनगड असे ठेवले.

( २ ) कल्याण-भिवंडीकडे जाणाऱ्या मुघल आरमाराला अडथळा करण्यासाठी मराठ्यांनी पारसिक येथे किल्ला बांधण्याची तयारी सुरू केली होती. परंतु पोर्तुगेजांनी ती जागा ताब्यात घेऊन आपला किल्ला बांधला.

( ३ ) संभाजीने साष्ट ( Salsette ) प्रदेशात खोला येथे किल्ला बांधण्यास सुरुवात केली होती. पोर्तुगेजांवर हल्ले करण्यासाठी एखादे ठिकाण असावे म्हणून हा किल्ला बांधण्यात यावयाचा होता.

( ४ ) संभाजीने १६८२ साली कारवारजवळील अंजदीव बेट घेऊन त्यावर किल्ला बांधण्याची तयारी सुरू केली होती. तेथे चुना आणि दगड पाठवून या कामाला जो पैसा लागेल तो खर्च करण्याची आज्ञा देऊन **या किल्ल्याचा नकाशा त्यांनी काढून मागितला होता.**

( ५ ) संभाजी राजांनी मुंबईजवळच्या आणखी एका खडकावर—बेटावर तटबंदी उभारण्याचा प्रयत्न सुरू केला होता.

( ६ ) पोर्तुगेजांनी सिद्दीला चेऊलजवळ उतरण्यासाठी जागा दिल्याचे कळताच संभाजी राजांनी आपली माणसे पाठवून, विजरईकडून चेऊलच्या जवळ जागेची मागणी केली होती. ती जागा ताब्यात मिळाल्यावर तेथे संभाजी राजांचा तटबंदी उभारण्याचा बेत होता.

प्रत्येक गडाच्या अधिकारकक्षेत कोणती गावे समाविष्ट करावयाची ते ठरलेले असे. देवपाल, पाल बुद्रुक, बालवडी ही तीनही गावे प्रचंड गडाच्या कक्षेत होती. त्या संबंधात गुंजण मावळच्या वतनदारांनी भांडण काढले होते.

१. पोम–पि, पृष्ठ ९९–१००

प्रचंडगडाचा सबनीस विसाजी माणकेश्वर याने शंकराजी नारायण सचीव यांना या विषयात विनंती केल्यामुळे त्यांनी संताजी सिलिमकर देशमुख व देशकुलकर्णी तर्फ गुंजण मावळ आणि किल्ल्याच्या घेराचा सरनाईक मालोजी इतबारराव व चाहूजी नाईक देवगिरीकर यांना बोलावून किल्ल्याच्या घेराची हद्द ठरवून घेऊन या भांडणाचा निकाल लावला होता.[१]

हे प्रकरण फारसे महत्त्वाचे नसले तरी गडकोटांच्या अधिकारकक्षांच्या व्यवस्थेची त्यावरून कल्पना येते.

## कोठे आहे बेबंदशाही ?

संभाजीराजांच्या राज्यकारभारातील विविध विभागांची तपशीलवार माहिती पाहिल्यावर त्यांच्या कारकीर्दीत अंदाधुंदी आणि गैरकारभार होता या रूढ विधानांना काहीच आधार राहात नाही. शिवाजी महाराजांनी निर्मिलेली अष्टप्रधान-पद्धती त्यांच्या काळात पूर्ववत चालू होती. यात छंदोगामात्य हे पद कविकलश याजकडे असले तरी तो काही सर्वाधिकारी नव्हता. महत्त्वाच्या विषयांचे निर्णय प्रधान आणि सरकारकून यांच्या सल्ल्याने घेण्यात येत. निळो मोरेश्वर हे मुख्य प्रधान होते. न्यायनिवाड्याचे सर्वाधिकार प्रल्हाद निराजीकडे होते. दानाध्यक्षाचे कार्य संभाजी राजांनी प्रारंभी स्वतःकडे घेतले असले तरी राज्याभिषेकानंतर हे काम मोरेश्वर पंडितरावांकडे आले.

रायगड राजधानीपासून प्रांत, सुभा, तर्फ व मौजेपर्यंत म्हणजे केंद्रापासून अगदी लहान गावापर्यंत सुरळीतपणे कारभार चालू होता. राजे रायगडला असोत किंवा स्वारी-शिकारीवर असोत रयत त्यांच्याजवळ किंवा प्रधानांकडे आपापली गाऱ्हाणी घेऊन जात असे. दुर्गोजी, अर्जोजी यादव, आठल्ये, माहादाजी पटेल, जिवाजी प्रभू, कोनेर रंगनाथ, गंगाधर रघुनाथ, संकराजी रायाजी बांदल, हरबा देसाई, गोपजी व सूर्याजी विठ्ठल प्रभू इत्यादी लोकांच्या तक्रारी संभाजीराजांनी समक्ष ऐकल्याची कागदपत्रे उपलब्ध झालेली आहेत. बेकायदेशीर किंवा गैरवर्तणूक त्यांना खपत नसे. "स्वामिकार्याचा नाश करावा हे कोण कारकुनी, कौडी-इतकी गोष्ट नाही. असे असता असे करावया गरज काय ? गैरसनदी मागत होता म्हणोन कळो आले तरी हे ढंग स्वामीस कैसे मानो पहाता...धामधूम करील त्याला कडक शासन केले जाईल." "ऐवजाबाबे कुसूर करावया गरज काय ?" अशा प्रकारची कडक भाषा राजांच्या पत्रात सापडते.

शिवाजीमहाराजांच्या काळात अण्णाजी दत्तो, रामचंद्रपंत इत्यादींनी जमिनीची पाहणी करून केलेल्या प्रतबंदीची अंमलबजावणी संभाजीराजांनीही केलेली

१. मइसा, खंड १७, ले. १८

दिसते. मुलखाची आबादानी करणारांना, पडीक जमीन लागवडीस आणणारांना, बागाईती, जिराईती शेती करणारांना, घरे, विहिरी बांधणारांना प्रोत्साहन, सवलती व अनुदाने दिली जात.

शिवाजी महाराजांनी इंग्रजांसारख्या परकीयांना जादा सवलती दिल्या नव्हत्या. तेच धोरण संभाजी राजांनीही अवलंबिलेले दिसते. परकीय व्यापाऱ्यांकडून पूर्वीचेच कर, जकात घेण्यात येत असली तरी त्यात काही वाढही केलेली दिसते. पूर्वीच्या देण्या-घेण्याच्या व्यवहारांच्या आधारानेच पुढील धोरण ठरविण्यात येई. संभाजी राजांनी इंग्रज व फ्रेंच यांच्याकडून दारूगोळा, शस्त्रे, तोफा मिळविण्याचा प्रयत्न केला. इतकेच नव्हे तर कुडाळ आणि डिचोली येथे तोफा व दारूगोळा तयार करावयाचे दोन कारखाने त्यांनी उभारल्याचे उल्लेख सापडलेले आहेत. त्यांनी काही नवे गड बांधण्याचा प्रयत्न केला. स्वराज्यासाठी धारातीर्थी मृत्यू पावलेल्यांच्या कुटुंबियांची व्यवस्था केल्याची उदाहरणे आहेत.

वतन ही विक्री करण्याची वस्तू नव्हे, हे थोरल्या छत्रपतींचे धोरणच संभाजी राजांनी चालू ठेवले होते. शत्रूला मिळालेल्या लोकांची कडक शब्दांत हजेरी घेण्यात येई. परंतु स्वामींची भेट घेऊन एकनिष्ठ राहण्याचे आश्वासन दिल्यावर तितक्याच प्रेमाने अभय दिले जाई. देशमुखांसारख्या वजनदार माणसांकडून सैन्यभरतीची व इतर महत्त्वाची कामे करून घेण्यात येत. सरकारी अधिकाऱ्यांनी त्यांना त्रास देऊ नये म्हणून काळजी घेण्यात येई.

न्यायदान चोख असे. रायगडच्या मजलिसीपासून प्रांत, सुभा, तर्फ व मौजेपर्यंत चौकशी करून अविलंब निर्णय दिले जात असत. स्थानिक मजलिसीतील निर्णयाविरुद्ध राजधानीतील वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून न्याय मागता येत असे. धार्मिक किंवा इतर बाबतीत वैर, खोटेपणा दिसल्यास तो स्वामींना चालणार नाही असे लोकांना अधिकारी बजावीत असत.

चहूबाजूंनी आक्रमण चालू असले तरी देण्याघेण्याचे व्यवहार व्यवस्थितपणे पाळण्यात येत असे दिसते. संभाजीराजांना आपल्या कारकीर्दीत राजकीय आपत्तीबरोबरच आर्थिक संकटालाही तोंड द्यावे लागले. मुघल, सिद्दी, पोर्तुगेज यांच्या आक्रमणामुळे करांचे उत्पन्न घटले होते. अनेक आघाड्यांवर सतत लढाया चालू असल्याने राज्याचा खर्च फार वाढला होता. सैन्याला व रयतेला धान्यपुरवठा व्हावा म्हणून अहमदाबाद, सुरतकडून धान्य आणावे लागत होते. माणसे सुजून मरण्याइतका दुष्काळ होता, आणि शत्रूच्या हल्ल्यामुळे तीन तीन वर्षे स्वराज्यातील मुलूख ओसाड पडलेला होता. त्यामुळे रयतेला पुनर्वसनासाठी आधुनिक काळासारख्या सवलती दिलेल्या आढळतात.

संभाजी राजांच्या ९ वर्षांच्या कारकीर्दीत लढाईची धामधूम आणि दुष्काळासारखी नैसर्गिक आपत्ती आलेली असूनही राज्यकारभार सुरळीत, शिस्तशीर व काटेकोर होता असेच मान्य करणे भाग आहे.

* * *

## १२. संभाजीराजांचे धार्मिक धोरण

शिवाजी महाराजांच्या स्वराज्यस्थापनेच्या वेळी मराठा सरदारांची आत्मनिष्ठ आणि स्वराज्यविघातक वृत्ती समर्थांच्या ध्यानात आल्यामुळे ते लिहितात,

मराठा तितुका मेळवावा । महाराष्ट्र धर्म वाढवावा ॥
येविषयीं न करता तकवा । पूर्वज हांसती ॥
मरण हाक तो चुकेना । देह वाचविता वाचेना ॥
विवेकी होऊनि समजाना । काय करावे ॥
देवद्रोही तितुके कुत्ते । मारुनि घालावे परते ॥
देवदास पावती फत्ते । यदर्थीं संदेह नाही ॥
देव मस्तकी धरावा । अवघा हलकल्लोळ करावा ॥
मुलुख बुडवा कीं बडवावा । धर्मस्थापनेसाठी ॥

महाराजांनी स्वराज्यस्थापनेच्या कार्यात जे जे आडवे आले, ज्यांनी अडथळे आणले त्यांचा निःपात करून स्वराज्याची स्थापना केली. त्यानंतर रामदास स्वामी म्हणतात,

बुडाला औरंग्या पापी । म्लेंछ-संहार जाहाला ॥
मोडली मांडली छत्रे । आनंदवन भुवनी ॥
बुडाले भेदवाही ते । नष्ट चांडाळ पातकी ॥
ताडिले पाडिले देवें । आनंदवन भुवनी ॥
गळाले पळाले मेले । जाले देशोधडी पुढे ॥
निर्मळ जाहाली पृथ्वी । आनंदवन भुवनी ॥
उदंड जाहले पाणी । स्नानसंध्या करावया ॥

महाराजांनी स्वराज्यस्थापना केली त्याचा रामदासांना आनंद झाल्यावर त्यांनी असे लिहिले असले तरी प्रत्यक्षात औरंगजेब बुडाला नव्हता. तो स्वसामर्थ्याने स्वराज्य नष्ट करण्यासाठी स्वतःच दक्षिणेत आला. संभाजी राजांना स्वसंरक्षण करता करता महाराष्ट्र धर्म वाढविण्याचे काम करावयास अवसर आणि संधीच

मिळाली नाही. राज्यरक्षणात राजांची बहुतेक शक्ती खर्च होत असली, तरी त्यांनी धार्मिक विषयांकडे दुर्लक्ष केले नाही.

बखरकारांना संभाजीच्या धार्मिक कामगिरीबद्दल आणि त्यांना असलेल्या संतमहात्म्यांच्या आदराविषयी अज्ञानच होते. संभाजी राजांनी शाक्त पंथाचा स्वीकार केला होता असे ते लिहितात. मल्हार रामराव चिटणीस म्हणतो, "कवि कलुषा कबजी म्हणोन कनोजी ब्राह्मण बहुत विद्वान, मंत्रशास्त्रविद्या आगम, त्यास बहुत गम्य, असे होते. त्यांची स्त्रीही चतुर होती. त्यांणी महाराज वश करावे म्हणून वशीकरण मंत्र प्रयोग करून महाराजांची बहुत जवळीक व कृपा संपादून अगोदर समीप राज्याभिषेकापूर्वी होतेच. वशीकरण मार्गाविशी अनुष्ठाने प्रयोग, संपत्तीकारणे व राज्यवृद्धी होणे, यश येणे असे समजावून प्रयोग अनुष्ठान करविलें. पुढे दिवसेंदिवस बुद्धीस भ्रंश पडून त्या मार्गात अनुसरावें असें केलें. रेडे मारून त्याचे ओले कातड्यावर अनुष्ठानें व मद्यमांस पशुवधाचीं बहुत करू लागले. ब्राम्हणापासून प्रयोग करविणे यात महाराजांचे अंतःकरण बहुत व्याप्त जाहले. कोणी हे करणे युक्त नव्हे असे बहुत सांगून कळविले असता, त्यासच दरबार मना करून कैद करावे असे होऊ लागले."[१] परंतु बखरीत वर्णन केल्या प्रमाणे संभाजी राजांचा बुद्धिभ्रंश झालेला दिसत नाही. ते दोघेही व्यवस्थितपणे कारभार करीत होते असेच दिसते.

शाक्त पंथाचे उपासक पश्चिम बंगालमध्ये आढळतात. महाराष्ट्रातील उपासकांनी बंगालमधील किंवा बनारस येथे स्थायिक झालेल्या बंगाल्यांकडून शक्ती-पंथाचा किंवा तंत्रविद्येचा अभ्यास केला. बंगालमध्ये शाक्त पंथाच्या सांप्रदायाने बरीच प्रगती केलेली आहे. चैतन्यांच्या वैष्णव धर्माचा प्रसार होईपर्यंत बंगालमध्ये तंत्रविद्येची उपासना व अभ्यास, उच्चवर्गातील ब्राह्मण करीत असत. तंत्रविद्येच्या अभ्यासातून तेथे उच्च तत्त्वज्ञान आणि संस्कृत साहित्य निर्माण झाले. विषयासक्तीने संतोष पावणे हा तंत्रविद्येत मुख्य हेतू नसतो. शरीरावर आणि मनावर ताबा मिळविणे हे तंत्रविद्येचे किंवा शाक्तपंथाचे ध्येय असते. मन आणि शरीर यावर एकदा ताबा मिळाला की अदृश्य जगातील भुतांना आपले गुलाम करता येते. त्यात प्रावीण्य मिळविले की विषयासक्त मनावर उपासकाला ताबा मिळविता येतो. रोग बरे करता येतात, मुले होत नसली तर होऊ शकतात. निर्वाण मुक्ती किंवा मोक्ष मिळविणे हेच या विद्येचे अंतिम ध्येय आहे.[२]

शिवाजी महाराजांच्या काळात बंगालमधील शाक्त पंथ महाराष्ट्रात रूढ झाला. चितपावन ब्राह्मण शिवयोगी तंत्रविद्येचा अभ्यास करावयासाठी, सिद्ध योग्यांची कीर्ती ऐकून बंगालमध्ये गेला. तेथे तपश्चर्या केल्यावर त्याला तांत्रिक

१. मराचिब–पृष्ठ ९     २. TNS–W

पुरोहित म्हणून दीक्षा मिळाली. कोकणात परत आल्यानंतर त्याने शृंगारपूरला मठ स्थापन केला. त्याची कीर्ती बरीच पसरली होती. शृंगारपूर हे तांत्रिक उपासनेचे मुख्य केंद्र बनले. निश्चलपुरी या तांत्रिक पुरोहिताने वैदिक ब्राह्मणांनी केलेला राज्याभिषेक अमान्य करून शिवाजी महाराजांना दुसरा राज्याभिषेक करावयास भाग पाडले. गणेश अनंत जांभेकर आणि केशव उपाध्याय हे तांत्रिक पुरोहित शृंगारपूरला राहात असत.

अनुपुराणात याच शाक्य पंथाचे, शिवयोग्याचे विस्तृत वर्णन केलेले आहे. शिवयोगी वाममार्ग पाळीत असल्यामुळे देवरुखे, कऱ्हाडे, सारस्वत आणि चित्तपावन ब्राह्मण त्याची निंदा करीत असत. शिवयोगी, केशव आणि गणेशभट यांनी संभाजीला तुळजेची किंवा देवीची उपासना करण्यास सांगितले. संभाजी शिवयोग्याला मान आणि दान देत असे.[१] अनुपुराणातील शिवयोग्याचे विस्तृत वर्णन येथे देण्याची आवश्यकता नाही. या काव्यावरून संभाजी शाक्त पंथाचा उपासक झालेला दिसतो. दि. २३–३–१६७८ ला गणेश भट व केशव भट यांनी संभाजीला शृंगारपूर येथे कलषाभिषेक केला.[२] हा कलषाभिषेक तांत्रिक सिद्धी प्राप्त होण्यासाठी करतात. "संभाजीने आपणास कलषाभिषेक करून स्वयंपूर्ण झाल्याचे विधिपूर्वक जाहीर केले होते" असे श्री. वा. सी. बेंद्रे म्हणतात. परंतु त्यात काही अर्थ दिसत नाही. हे जॉन वूड्रॉफ यांच्या पुस्तकातील[३] यापूर्वी दिलेल्या माहिती वरून सहज ध्यानात येईल.

चिटणीस बखरीत केलेले शाक्त पंथ, संभाजी आणि कविकलश यांचे वर्णन अतिशयोक्तीचे आणि एकांगी वाटते. शाक्त पंथातील हिडीस प्रकार शृंगारपूरला चालू असते तर शिवाजी महाराजांनी, आपल्या गैरहजेरीत, आपण होऊन संभाजीला शृंगारपूरला ठेवले नसते. महाराजांच्या राज्याभिषेकापूर्वीच शिवयोगी शृंगारपूरला येऊन राहिलेला होता, आणि तेव्हापासूनच वैदिक ब्राह्मण आणि शाक्त ब्राह्मण यांचा महाराष्ट्रात तंटा सुरू होता.

शिवयोग्याच्या सांगण्यावरून संभाजीने पुत्रप्राप्तीसाठी 'पुत्रकामेष्टि' यज्ञ करून बराच दानधर्म केला होता. असाच 'पुत्रकामेष्टि' यज्ञ राजा दशरथाने पुत्रप्राप्तीसाठी केला होता. या यज्ञाचा आणि शाक्तपंथाचा काहीही संबंध नाही.

केशव पंडिताला 'पंडितराव' हे पद मिळाल्याचे अनुपुराणात म्हटले असले तरी १६८१ ते १६८६ पर्यंतची मोरेश्वराची 'पंडितराव' म्हणून अनेक पत्रे आढळतात.[४] लहानपणापासून संभाजीला पुराणांची आवड होती. केशव

---

१. पका–स, पृष्ठ ११४–१५०   २. कित्ता, पृष्ठ १४०

३. TNS–W

४. सपसासं–जो

भटाकडून संभाजीने प्रयोगरूप रामायण ऐकल्याबद्दल त्याला इनामही दिले होते.[1] केशव भटाने संभाजीला राजनीती शिकविली होती.[2] त्याच्या विद्वत्तेमुळेही अनुपुराणात त्याला पंडितराव म्हटले असणे शक्य आहे. केशव पंडिताने आपल्या 'राजाराम चरितम्' या काव्यात "सकलशास्त्र विचारशील आणि धर्मज्ञ शास्त्रकोविद" असे संभाजीचे वर्णन केलेले आहे.

राज्यपद मिळविण्यात अडचणी आल्यामुळे संभाजी राजांनी नवस केला होता. प्रत्यक्ष राज्यपद मिळाल्यावर त्यांनी तो नवस फेडला. त्याप्रसंगी त्यांनी केलेले दानपत्र म. म. पोतदार यांच्या संग्रही असून हा मौलिक ठेवा संस्कृतमध्ये आहे. छत्रपति संभाजी महाराजांच्या या संस्कृत दानपत्रावर शक १६०२, भाद्रपद शुद्ध १० सोमवार ( म्हणजे इ. स. १६८० ऑगस्ट २४; जंत्रीत वार मंगळवार दिला आहे. ) असून "मतं मे शिवराजपुत्रस्य श्रीशंभुराज छत्रपते यदत्रोपरि लेखितम् ॥ छ ॥ श्री ॥" असे आलेले असून ते सर्वथा न्याय्य परंपरेला मान्य असेच आहे. या दानपत्रावर संभाजीची 'श्री शंभोः शिवजातस्य' ही मुद्रा आहे. स्मृति-वचनात सांगितल्याप्रमाणे संभाजी राजांनी स्वतःच्या हाताने ह्या दानपत्र लेखनास संमति दिल्याचे लेखन केले आहे. ह्याप्रमाणे महाराष्ट्र राज्याचा कारभार परंपरापुनीत व काही पद्धतीबद्ध चालला होता असे दिसून येते.[3]

या दानपत्रातील महत्त्वाच्या भागाचे मराठी भाषांतर येथे दिले आहे :

## श्रीछत्रपती संभाजी महाराजांचे दानपत्र

[ मूळ संस्कृत दानपत्राचा सारांश ]

( १६ बुरजी पिंपळपानी शिक्का 'श्री । शंभोः शिव । जातस्यमुद्राद्यौ । रिव जायते ॥ यदं । क सेविनो लेखा । वर्तते कस्य नो । परि' सात ओळींचा )

* ॥ मतं मे श्री शिवराजपुत्रस्य श्रीशंभुराज ॥
॥ छत्रपतेः यदत्रोपरिलेखितं ॥ छं ॥ श्री ॥

जामदग्न्यगोत्री, कऱ्हाडे, बाकरे आडनावाचे, रामक्षेत्रातील ( परशुराम क्षेत्र, कोकण ) कुडाळ गावचे, नामदेव भट्टाचे पुत्र, आश्वलायन सूत्री, ऋग्वेदान्तर्गतशाकलशाखाध्यायी, श्रेष्ठ मांत्रिक महाशयस्वामी यांना शिखर शिंगणापूरच्या यात्रेला गेला असताना, शूराग्रण्य देवब्राह्मण प्रतिपालक मालोजी राजे यांचा पणतू ( प्रपौत्र ), रात्रियुद्धप्रवीण, निजामशाहीतील श्रेष्ठ प्रधान मलिकंबर यांचा पराभव

१. सनदापत्रे, ले. ४४, पृष्ठ १५७; पेद्र २. पका-स, पृष्ठ १५२
३. मकास-जो, पृष्ठ २४८
* ही अक्षरे श्री शंभूछत्रपतींच्या हातची आहेत.

करणारा, स्वतःचा जीव धोक्यात घालून देवालयांचे रक्षण करणारा, शंकराचे कृपास्थान ( शहाजी ), मोगल इत्यादींचा काळपुरुष, हैंदवी धर्माचा जीर्णोद्धार करणारा, अशा ( शहाजी ) श्री शहाजी राजांचा नातू, प्रबळ अफझुलखानाला बिछू ( बिचवा )च्या सहाय्याने मारून त्याच्या रक्ताने न्हालेला, पंचाहत्तर हजार घोडदळाने वेढलेला–पराक्रमी राजपुत्रांनी संरक्षित अशा दिल्लींद्राचा मामा ( शाहिस्तेखान ) याचा पराभव करणारा, म्लेंच्छांच्या क्षयाची दीक्षा घेतलेला, विजयपुराधीश्वरादिकांना खंडणी द्यावयास लावणारा, कर्नाटक राज्य जिंकणारा, क्षत्रिय कुलावतंस महापराक्रमी अशा श्री छत्रपती शिवराजांचा पुत्र, अनेक देवतांच्या प्रार्थनेने जन्माला आलेले, दिल्लीपतीने केलेल्या मल्ल युद्धाच्या आशेचा भंग सोडला तर आपल्या अत्यंत गोड भाषणाने दिल्लीश्वराचे चित्त ज्यांनी आकृष्ट केले, चक्रवर्तित्वाची सामुद्रिक चिन्हे धारण करणारे, सुरू झालेल्या प्रबल वैरात प्रविष्ट झालेल्या दुष्ट मंत्र्यांच्या 'जेष्ठ पुत्राला राज्यदान करू नये' या दुष्ट सल्ल्यामुळे जिचे हृदय कलुषित झालें आहे, वस्तुतः निळ्या पिवळ्या पार्श्वभूमीत असलेल्या स्फटिकमध्या प्रमाणे जिचे हृदय स्वच्छ, सौजन्ययुक्त आहे, अशा राणीविषयीं पक्षपातामुळे शिवराजाचे मत आपल्या विरुद्ध असल्याचे समजून सुद्धा केवळ तेवढ्याच कारणाने पितृभक्तीत अंतर पडू न देणारे, कर्तव्यपालनात दाशरथी-रामाचा विक्रम गाजविणारे, पायाशी असलेली दीडकोटी संपत्ती, अनेक किल्ले आणि राजपद यांना तृणाप्रमाणे तुच्छ मानून त्याग करणारे, बरोबर थोडे घोंडे-स्वार घेतले होते. तथापि औरंगजेबाच्या घोडदळाच्या सेनापतीशी संगनमत करून त्याचेकडून सात हजार घोडेस्वार मिळवून त्यांच्या बळावर भूपाल किल्ला ज्यांनी सर केला, दलेलासुर ( दिलेरखान ) याने गुडघा लावल्यामुळे संतप्त झालेल्या कवि कलशाच्या प्रोत्साहनाने लाल झालेल्या डोळयांनी इष्ट देवतेची अनुज्ञा ज्यांनी मिळविली आहे अशा शंभूराजांनी शके १६०२ रौद्रनाम संवत्सर, भाद्रपद शुद्ध १० सोमवार या काळी झालेल्या राज्यप्राप्तीच्या वेळी आश्वासिलेले, राज्याभिवृद्धी वगैरे फलांच्या सिद्धीसाठी गुरुपादुका पूजनपूर्वक श्रीपादुकापूजनाच्या निमित्ताने केलेले, २४ गुंजा सोन्याचे एक याप्रमाणे १० हजार सुरती नाण्यांचे दान दरवर्षी स्वतः ( शंभूराजे ) व स्वामी ( महाशय स्वामी ) यांच्या पुत्र–पौत्रादिपरंपरेने अनुक्रमे चालवावे व उपभोगावे ( यापूर्वीचे ) स्वामींचे वर्षासन यातच अंतर्गत समजावे.

नारायणाध्वरींद्रस्य रघुनाथमिधः सुतः । आमात्यो दानपत्रेस्मिन्लेखनालंकृतिं व्यधात् । लेखनालंकार

संमत आबाजी

सोनदेऊ सचीव

चंद्र ११ मास भाद्रपद
मास भाद्रपद ऊर्फ साबान
सन इहिदे समा बनि अलफ
बार सुद बार शुध बार
अनुमतं च दानाध्यक्ष मोरेश्वर पंडितरायास्य शुभमस्तु छ
लक्ष्मी नृसिंहभक्त श्रीनीरेरायोयाब्धिसन्मणेः ।। प्रल्हादवर्धिनी मुद्रा प्रल्हादस्य विजृंभते मर्यादेयं विजयते (वाटोळा शिक्का)

**संभाजीकालीन साहित्य :**

संभाजीराजांचा बुधभूषण हा संस्कृत ग्रंथ केव्हा रचलेला असावा हे निश्चित सांगणे कठिण आहे. कदाचित् त्यांनी तो शृंगारपूरला १६७८ मध्ये रचलेला असावा; (त्यावेळी शिवाजी महाराज कर्नाटकात गेलेले होते) किंवा शिवाजी महाराजांच्या पश्चात संभाजीने हा ग्रंथ त्याच्या आश्रयास असलेल्या विद्वान व संस्कृतज्ञ पंडितांकडून तयार करून घेतला असावा. संभाजीचा संस्कृत काव्यादी ग्रंथांशी चांगला परिचय असल्याने त्याने आश्रयास असलेल्या पंडितांच्या मदतीने हा ग्रंथ रचला असावा असे अनुमान करण्यास हरकत दिसत नाही. पूर्वीच्या काळी तशी पद्धत रूढ होती.

'बुधभूषण' या ग्रंथाचे तीन भाग करण्यात आलेले आहेत. पहिल्या भागात १९४ सुभाषिते दिलेली आहेत. सुरुवातीच्या १७ श्लोकांत ग्रंथकर्त्यांने आपल्या पूर्वजांचा त्रोटक इतिहास दिलेला आहे. त्यात शिवाजी महाराजांविषयी लिहिलेले श्लोक फार महत्त्वाचे असून स्वराज्यस्थापनेच्या महाराजांच्या ध्येयाचे वर्णन मार्मिक आणि लक्षात ठेवण्यासारखे आहे. पुढील ११ श्लोकांत भवानीचे, १५ श्लोकांत निरनिराळ्या देवतांचे स्तवन केलेले आहे. त्याच्या नंतरच्या ८ श्लोकांत प्राचीन प्रसिद्ध संस्कृत ग्रंथांतील आशीर्वादरूपी वचने आहेत. शेवटच्या भागातील १३० श्लोकांत अन्योक्ती दिलेल्या असून शेवटचे तीन श्लोक अंतलीपिकेचे (कोडी) आहेत.

दुसऱ्या भागात ६३२ श्लोक असून मत्स्य पुराण, विष्णुधर्मोत्तर पुराण आणि कामंदकीय नीतिसार या ग्रंथातील वचने त्यात आहेत. राजा आणि त्याचे गुण, राजाचे मदतनीस, मुख्य प्रधान, राजपुत्र, त्याचे शिक्षण व त्यांची कर्तव्ये, राजाचे सल्लागार, राज्याचे इतर घटक, कोश, दुर्ग आणि त्याची सजवणूक, बल अथवा सैन्य, राजाची कर्तव्ये, हेर, राजाचे नोकर, राजसभा व तिचे सभासद दूत, राजांची कर्तव्ये, राजाची व्यसने, परमुलखावर स्वारी अशी राज्यकारभारविषयक माहिती दुसऱ्या भागात आहे. तिसऱ्या भागात संकीर्ण माहितीचा संग्रह

असून त्याला “ मिश्रकनीति प्रकरण ” असे नाव दिलेले आहे. या ग्रंथात राजाची सर्व कर्तव्ये दिलेली आढळतात.

संभाजी महाराज राज्य करू लागल्यावर त्यांनी गागाभट्टाकडून “ समयनय ” हा ग्रंथ ( पोथी ) लिहून घेतला. गागाभट्टाने तो संभाजीच्या सांगण्यावरून शके १६०२, जुलै १६८० ते मार्च १६८१ या काळात लिहिला. ‘ समयनय ’ या ग्रंथाची एक प्रत इटलीतील फ्लॉरेन्स येथील हस्तलेखसंग्रहात आहे. हा नीतिपर ग्रंथ संभाजीकरता केला, असे संस्कृत ग्रंथ सूचीकार आफ्रेट यांनी सूचीच्या दुसऱ्या भागाच्या १३९ पृष्ठावर म्हटले आहे. तो म्हणतो, “...हा ग्रंथ छत्रपतीच्या निधनानंतर लवकरच लिहिण्यात आला. तो नीतिपर असून संभाजी राजांकरिता लिहिलेला असल्यामुळे उपलब्ध झाल्यास पितापुत्रांच्या चरित्रावर बराच नवा प्रकाश पडेल.” असे मत वरील आधारावर शिवचरित्र-प्रदीप या पुस्तकात श्री. स. म. दिवेकर यांनी व्यक्त केले आहे.[१] परंतु प्रत्यक्षात सूची संग्रहाच्या दुसऱ्या भागात पृष्ठ १६६ वर ‘ समयनय ’ हा ग्रंथ धर्मशास्त्रावर आहे असे आफ्रेट ( Aufrecht ) नमूद करतात. या ग्रंथाच्या तिसऱ्या प्रतीचा उल्लेख हरप्रसाद शास्त्रींनी केलेल्या संस्कृत हस्तलिखिताच्या सूची संग्रहात केलेला आहे. ही प्रत अपूर्ण असून त्यात लेखकाचे नाव आढळत नाही.

भांडारकर प्राच्यविद्या संशोधन मंदिराच्या लिमये संग्रहालयात या ग्रंथाची प्रत डॉ. प. कृ. गोडे यांना आढळली. ती संपूर्ण आहे. ती १४ पानांची असून प्रत्येक पृष्ठ १२"×४" मापाचे असून त्यावर प्रत्येकी १० ओळी आणि सुमारे ५० शब्द आहेत. यात एकूण २६८ श्लोक आहेत. ते धर्मशास्त्रावर असून त्यात धार्मिक समारंभासाठी आणि सणांसाठी ज्योतिष शास्त्रीय दृष्टीने मुहूर्तांची माहिती दिलेली आहे.[२]

संभाजी राजांसाठी “ धर्म कल्पलता ” हा धर्मशास्त्रावरील ग्रंथ केशव पंडिताने १६८२ मध्ये लिहिला. यातील ‘ दंडनीति ’ प्रकरणाची प्रत तंजावरच्या ग्रंथ संग्रहालयात ‘ दंडनीति प्रकरण from नीतिमंजरी of शंभुराज ’ या नावाने आहे. शामजी नाईक पुंडे याने ही प्रत १६८२ साली केली. पुंडे कर्नाटकात सुभेदार होता.

याचा प्रारंभ व शेवट असा आहे :

( १ ) प्रसन्नवदन असलेल्या रामाचे स्मरण करून धर्मकल्पलतेच्या सिद्धीसाठी केशव नीतिमंजरी करीत आहे. ( २ ) पृथ्वीवरील इंद्र, ज्याची कीर्ती पसरलेली आहे, धर्ममूर्ती लोक ज्याला प्रिय आहेत असा हा शंभू विजयी असो. ज्याच्या दानाने...सुखी होतात. ( ३ ) मनुस्मृत्यादि शास्त्रे व मिताक्षरादि निबंध

१. शिचप्र, पृष्ठ २२५  २. PIHC–1939

यांचा चांगला विचार करून, त्यांच्यातून सार (?) घेऊन केशवाकडून या (ग्रंथा)मध्ये दण्डनीती रचली जाते. (४) महाराज, क्षत्रिय कुलालंकार, सिंहासनाधिपती छत्रपती श्री शंभुराज यांनी करविलेल्या बुधभूषण ग्रंथामधील पुरोहित दामोदरभट्टपुत्र श्री केशवपंडित याने केलेल्या धर्मकल्पलता ग्रंथांतर्गत नीतिमंजरी-मधील दण्डनीती प्रकरण समाप्त झाले ![1]

या संस्कृत ग्रंथांशिवाय काही मराठी साहित्यही संभाजी राजांच्या कारकीर्दीत लिहिले गेले.

(१) सुप्रसिद्ध श्रीधरस्वामी नाझरेकर यांचा जन्म १६७८ मध्ये झाला. त्यांचे वडील ब्रह्मानंद यांनी 'आत्मप्रकाश' म्हणून ओवीबद्ध वेदांतपर ग्रंथ शके १६०३ म्हणजे सन १६८१ साली लिहिला. यात १४ प्रकरणे असून श्रीधरस्वामीने ३२ ओव्यांनी उपसंहार केलेला आहे.[2]

(२) एकनाथ स्वामींचा मुलगा शिवराम याने 'गीता-चंद्रिका' नावाचा ग्रंथ शके १६०५ मार्गशीर्ष शुद्ध ७ गुरुवार (दि. १५-११-१६८३) रोजी लिहून समाप्त केला. ही पोथी अत्यंत जीर्ण व लिवलिवीत आहे. पानांची लांबी-रुंदी ११"×६½" असून अक्षर शिवकालीन आहे. या टीकेत १८ अध्याय असून ग्रंथकाराने ज्ञानेश्वरीतील शब्द व वाक्ये उतरली आहेत. एकनाथी परंपरेत ज्ञानेश्वरीचा अर्थ कसा करीत हे कित्येक ठिकाणी या टीकेवरून स्पष्ट होते.[3]

(३) शिवकालीन प्रसिद्ध कर्तृत्ववान मुत्सद्दी रघुनाथपंत हणमंते यांचा मुलगा त्रिंबक याने 'अशौच निर्णय' नामक संस्कृत पोथी लिहिली. यात मुख्यत्वे शौचाशौच निर्णय स्पष्ट केला आहे. या पोथीची ९ पाने असून प्रत्येक पृष्ठावर ८ किंवा ९ ओळी आहेत.[4]

## साधुसंतांना साहाय्य :

शिवाजी महाराजांच्या प्रमाणे देव देवता, सत्पुरुष यांच्या आशीर्वादावर आणि कृपेवर संभाजी महाराजांचा नितांत विश्वास होता. वडिलांच्या मृत्यूनंतर वारसाहक्कासाठी त्यांना जे लढावे लागत होते त्या दुःखद मनःस्थितीत त्यांना संतमहंतांचा आशीर्वाद हवा होता. त्यामुळे पन्हाळ्यावरून रायगडला जाताना ते मौजे कोरटी येथे सदाव्रती मल्हार गोसावी यांना भेटले.[5] ते प्रामाणिक ईश्वरभक्त आहेत असे संभाषण केल्यावर राजांच्या ध्यानात आले.

१. ABORI, Vol XX, 1938–39, p 243–244
२. भाइसंमं–अहवाल शके १८३३, पृष्ठ ११२
३. भाइसंमं–अहवाल, शके १८३३, लेख २, पृष्ठ ५५–७७
४. ,, अहवाल, वाइवृ १८३६, ले. १५, पृष्ठ ४९
५. सनदापत्रे, पृष्ठ १३५

दि. १९–१०–१६८० रोजी ज्या बाबा याकूद अवलिया फकीर यांची शिवाजी महाराजांनी स्थापना केली होती त्यांचे संभाजी महाराज यांनी केळशी येथे दर्शन घेतले व २५–१०–१६८० रोजी ते रायगडला परत आले.[१]

शिवाजी महाराजांनी अनेक देवस्थाने, मठ, सत्पुरुष यांना वार्षिक नेमणुका ( मोईन ) करून दिल्या होत्या. संभाजी राजांनी रायगडला जाताच स्वतःच्या अधिकारात नवीन सनदा करून दिल्या. अशा सनदा प्रत्येक शासक करीत असे. परंतु संभाजी महाराजांच्या धार्मिक प्रवृत्तीबद्दल विपर्यस्त माहिती रूढ असल्याने येथे सविस्तरपणे ही माहिती देण्यात येत आहे.

दि. १९–८–१६८० रोजी संभाजी राजांनी पुण्याच्या विनायक उमाजी या देशाधिकाऱ्याला लिहून संत तुकारामांचा मुलगा महादोबा यास वर्षासन दिले.[२]

पाटगावी मौनी गोसावी हे ईश्वरपुरुष होते. त्यांना वाजंत्री व पालखी होती पण पालखीला भोई नव्हते. संभाजी राजांनी कुडाळ प्रांतात देशाधिकारी गणोराम याला गोसाव्यासाठी त्याचा शिष्य तुरुतगिरी यास १२५ होन देण्यास सांगितले. त्यातले वाजंत्रीसाठी २५ आणि भोयांसाठी १०० होन होते. ते काम सुरू करतील तेव्हापासून ते त्यांना वार्षिक मिळावयाचे होते.[३]

पुणे परगण्यातील तर्फ निरथडी येथे कन्हेरी मठात वासुदेव गोसावीचे वास्तव्य होते. त्यांना जिराईत जमीन ९ कास रुके, पुष्पवटिकेस मांढरदेवीतील ४ बिघे आणि जावळीपैकी ९ बिघे जमीन देण्याचा वाईच्या देशाधिकाऱ्याला हुकूम केला.[४]

कऱ्हाडचे वे. नरसीभट शेषभट मुंज्येमणी, मसूर तालुक्यातील कांदळगावचे वे. अनंत भट, महादेव भट यांना प्रतिवर्षी जोंधळे व तांदूळ देण्यात आले.[५] महाबळेश्वरचे वेदमूर्ती रामभट यांचे वडील गोपाल भट यांनी शिवाजी महाराजांना मंत्रोपदेश देऊन त्याप्रीत्यर्थ अनुष्ठान केले होते. त्यांना पूर्वीप्रमाणे वर्षासन देऊन संभाजी महाराजांनी रोख रक्कम आणि जिन्नसही दिले.[६]

कऱ्हाडला राहणारे वे. शिवभट नीलकंठभट अग्निहोत्री, पावसचे वेदमूर्ती हरिभट पटवर्धन, रामचंद्र केशवभट पंडित, निंब येथील सदानंद मठाचे अनंतगिरी गोसावी यांना वर्षासनाच्या सनदा दिल्या.[७]

१. शिचप्र, पृष्ठ ५३, मराचिव–पृष्ठ ७ २. पेद, ३१, ले. ४२
३. मइसा, खंड २०, ले. २८१ ४. श्रसिं, ले. २, पृष्ठ ५५९–५६०
५. ऐसंसा, भाग ५, ले. २९; मइसा, खंड २०, ले. २७१
६. भाइसंमं–वाइवृ, १८३४. पृष्ठ ३२८
७. सपसासं, पत्र क्र, ३५, १२५, २३०, ७९

कऱ्हाडला राहणारे रुद्रभट नीलकंठभट अग्निहोत्री आणि खानापूरचे श्रीनिवास आपा जोशी करकरा या दोघांची जमीन व काही रक्कम अमानत करण्यात आली होती. ते दोघे निराश्रित झालेले पाहून त्यांना दरवर्षी जोंधळे, तांदूळ देण्यासाठी मोरेश्वर पंडितरावाने १६८१ च्या मार्च आणि मे महिन्यात पत्रे लिहून त्यांची व्यवस्था केली.[१]

शिवाजी महाराजांनी महादेवभट विष्णुभट शेंडये हे पुराणवेत्ते आहेत असे जाणून त्यांना श्री गणपती पुळयास देवासमोर नेहमी पुराण सांगावयासाठी वृत्ती, आणि घर बांधावयास व शाकभाजी करावयासाठी वतनी जमीन दिली होती. पुढे संभाजीराजांनी त्यांचा मुलगाही योग्य वैदिक ब्राह्मण आहे असे पाहून त्याला मोरेश्वर पंडितरावांकडून दि. २४–१०–१६८४ रोजी कोठी मापे दहा मण धान्य दिले.[२]

याचप्रमाणे संभाजीमहाराजांनी चिंचवड, मोरगाव, सज्जनगड, चाफळ इत्यादि देवस्थानांची व्यवस्था नीट चालावी म्हणून पूर्वीची वृत्ती व इनामे चालू ठेवली.[३]

संभाजी महाराजांनी राज्याच्या मुलकी व न्यायालयीन विषयांप्रमाणेच धार्मिक कारभाराकडे जातीने लक्ष दिलेले दिसते. ज्या देणग्या दिल्या जात त्यांची अंमलबजावणी व उपयोग नीट होतो किंवा नाही याकडे त्यांचे बारकाईने लक्ष असे.

मोरगाव येथील मोरेश्वर गोसावी यांना शिवाजी महाराजांनी मौजे लोणी, पणदरे, कासड, सेलगाऊ येथे इनाम दिले होते. तेच संभाजीराजांनी चालू ठेवले. ही सनद चालू ठेवण्यासाठी पुण्याचा सरसुभेदार नागोजी बल्लाळ याने सुपे व इंदापूर येथील हवालदार आणि कारकून यांना दि. ७–२–१६८१ रोजी लिहिले. कुटुंबासमवेत मोरेश्वर गोसावी राहात असत. त्यांना लष्करातील सुभेदार, जुमलेदार व कारकून यांचा उपद्रव होऊ नये अशी संभाजीराजांची इच्छा होती. ते दि. ६–११–१६८० रोजी त्यांना आज्ञा करतात, "राजश्री मोरेश्वर गोसावी कऱ्हेपठार येथे कुटुंबेसी राहातातो. तरी तुम्ही येता जाता त्यांच्या माणसास, सेतापोतास गुराढोरांस काडीची तसवीस देत नव जाणे. निरोपद्रव सुखरूप राहेती ते करणे. जेथे त्याला अनकूल पडेल तेथे जाऊन राहिले तरी सुखे राहो देणे. त्यांचे वाटेस नव जाणे. ताकीद असे जाणिजे (नि) लेखनालंकार.[४]

१. शिचसा, भाग २, ले. २४२; ईस, गोईसा, ले. ३४

२. भाइसंमं, त्रैमासिक ( १७३–१७६ ); ऐसंनि, खंड ८, ले. ९, पृष्ठ ४९

३. सनदापत्रे, पृष्ठ १६२, ले. ३; शिचसा, खंड २, ले. ५५८–५५९; श्रीसांका

४. शिचसा, खंड ३ ले. ५५९

श्री देव चिंचवडकर यांना निजामशहा, मलीकंबर, आदिलशहा, शहाजी आणि शिवाजी महाराजांच्या वेळेपासून बागा व इनाम चालत आले होते. श्री देव स्वामी पिढी दरपिढी राहून, अन्नछत्र, गरीबगुरीब व फकीर जो कोणी येतो त्यास अन्न उदक देत असत. यासाठी गाव इनाम करून दिला होता. संभाजी राजांना हे चालविणे अगत्य वाटल्यावरून त्यांनी दि. २२-१-१६८३ रोजी पुणे येथील देशाधिकाऱ्यास पूर्वीप्रमाणे इनाम चालविण्याविषयी लिहिले.[१]

**श्री समर्थ आणि संभाजी :**

या प्रकरणात रामदास स्वामी आणि त्यांचे शिष्य यांचे संभाजी राजांशी संबंध कसे होते हे पाहणे अगत्याचे वाटते. संभाजी महाराजांनी रामदासी मठांच्या व्यवस्थेत जातीने लक्ष घातलेले पाहिले म्हणजे त्यांना स्वामीजी आणि त्यांच्या शिष्यगणाविषयी किती आदर वाटत होता हे सहज ध्यानात येते. समर्थांनी संभाजी राजांना केलेला उपदेशच सर्वांना माहीत आहे, पण उलट राजांना त्यांच्या-विषयी किती आदर होता यासंबंधी सर्वसाधारणपणे अज्ञानच आढळते.

बखरीत शिवाजी महाराजांनी संभाजीला रामदासांकडे शिक्षणासाठी पाठविले होते, असे म्हटले आहे त्याची चर्चा इतरत्र केलीच आहे. मुघलांना मिळण्यापूर्वी १६७८ च्या डिसेंबर महिन्यात संभाजी सज्जनगडाला गेला होता.[२] परंतु तेथे समर्थांची आणि त्यांची भेट झाली होती किंवा नाही हे कळत नाही. राज्यारोहणानंतर जेव्हा शिवाजी महाराज सर्व राण्यांसह सज्जनगडावर गेले होते तेव्हा संभाजीही त्यांच्या बरोबर होता.[३] शिवाजी राजांच्या निधनानंतर संभाजी महाराज रामचंद्रपंत अमात्य यांच्यासह ज्येष्ठ मासी सज्जनगडावर येऊन समर्थांचे दर्शन घेऊन गेले.[४]

चाफळ येथे श्रीरामाचा उत्सव करणे हे राज्यव्यवस्थेचे अंग होते. श्री समर्थांची आज्ञा मान्य करून श्रीच्या कार्याचा अंगीकार करणे, श्रीचा उत्सव चालविणे, हा एक राजकारणाचा भाग आहे असे शिवप्रभू अखेरपर्यंत समजत असत. शंभू छत्रपतींनी तेच धोरण अंगीकारले. त्यांनी कऱ्हाड, सातारा, सज्जनगड, चाफळ इत्यादी ठिकाणच्या अधिकाऱ्यांना आज्ञा करून उत्सवाच्या व्यवस्थेसंबंधी पत्रे पाठविली. संभाजी महाराजांनी ज्याप्रमाणे इतर देवस्थानांची व्यवस्था आणि सत्पुरुषांची वर्षासने पूर्ववत चालू ठेवली होती त्याचप्रमाणे त्यांनी चाफळ येथील श्री रामदास स्वामींच्या श्री रघुनाथ देवाच्या पूजा-नैवेद्यासाठी आणि देवाच्या सेवकांना जी मोईन शिवाजी राजांनी १६७५ सालातील वर्षप्रतिपदेस करून

---

१. सनदापत्रे, ले. ३, पृष्ठ १६२

२. शिचप्र, पृष्ठ २९

३. श्रीसच–आ, पृष्ठ ३७२

४. कित्ता, पृष्ठ ३६३–३६४

दिली होती ती संभाजी महाराजांनी दि. १८–१०–१६८० रोजी तशीच चालविण्याची आज्ञा देशाधिकारी व देशलेखक, कासी रंगनाथ, प्रांत जावळी यास दिली.[१]

श्री रामदास स्वामींना अतीत-अभ्यागत आदि नित्यनैमित्तिक चालविण्यासाठी शिवाजी महाराजांनी बारीक सडीक तांदूळ, कणिक, डाळी, तूप, मीठ, सुपारी, दिव्यास तेल, कात, असे एकूण एक मण, साडे एकोणतीस शेर, साडेचार टाक आणि दरमाहे तीन तीन शेर, ५०० विड्याची पाने आणि एक दुभती म्हैस अशी मोईन करून दिली होती. ही मोईन अशीच चालू ठेवून संभाजी राजांनी जावळीच्या अधिकाऱ्याला सांगितले की, जोंपर्यंत म्हैस दुभती असेल तोपर्यंतच ठेवावी. म्हैस दूध देईनाशी झाली की ती जमा करून दुसरी द्यावी. नंदादीपासाठी देण्यात येणारे तेल रामदासांच्या समुदायाला देण्यास बजाविले. जावळीच्या सुभ्यातून पूर्वी फाटी आणि गवत देत असत ते साताऱ्च्या सुभ्यातून देण्याची आज्ञा दिली. सर्व सामान स्वामींकडे पोंचते करून सामुग्री कमी पडणार नाही याची काळजी घेण्यास राजांनी अधिकाऱ्यांना बजावले होते. शिवाजी महाराजांच्या वेळेपासून श्रींच्या सेवेसाठी एक हरकारा होता. त्याला दरमहा २ होन वेतन होते. ते सुभे मजकुरापैकी दिले जात होते. त्याचा खर्च धर्मादाऊ म्हणून संभाजीराजांनी लिहिण्यास सांगितले होते.[२] ही सनद महत्त्वाची असल्याने विस्तृतपणे दिली आहे. शिवाजीमहाराजांची सनद उपलब्ध नसल्याने या सनदेला महत्त्व आहे. त्यात संभाजी राजांनी समर्थांच्या व्यवस्थेत दाखविलेली तत्परता आणि बारकावा कौतुकास्पद आणि पुरेसा बोलका आहे.

रामदास गोसावी यांनी चाफळमध्ये श्री हणमंत देवाची प्रतिष्ठा केली. रघुनाथ भटाकडे देवतार्जनाचे काम सोपविलेले होते. नैवेद्यासाठी, दीपासाठी व किरकोळ उपसाहित्यासाठी अण्णाजी दत्तोने ठिकाणे २, रक्कम ५० ( नाटोली सेत २५ व वेणाबाई सेत २५ ) आणि मौजे वाकुरडे विलासी येथे इनाम दिले होते ते तसेच चालविण्याविषयी शंभू छत्रपतींनी मलकापूरच्या अधिकाऱ्याला कळविले होते.[३]

चाफळ येथील श्री रघुनाथ देव स्वामींच्या मंदिरात दरवर्षी रामनवमीचा मोहोत्सव करण्यासाठी दत्ताजी त्रिमळ यांनी विविध सामानांची मोईन करून दिली होती. या सनदेत कापड गैर किंमतीचे असल्याने सनगे मोघम दिले होते. तेव्हा दिवाकर गोसावी यांनी १४ सनगे असून त्याची किंमत ११½ होन पावत असल्याचे कळविले. गेल्या वर्षी ज्या किंमतीचे सनगे पावले असतील त्याच

१. श्रीसांका, ले. ३६ २. कित्ता, ले. ३४
३. श्रीसांका, ले. ३३

किंमतीचे सनगे देण्यास सांगून दशमीला ब्राह्मण भोजन, श्री द्वारी समाराधना, २१ ब्राह्मणांस यथासांग सामुग्री आणि दर ब्राह्मणाला पूर्वीप्रमाणेच चार आणे द्यावे असे संभाजीराजांनी कऱ्हाडच्या अधिकाऱ्यास कळविले.[१]

अशाच प्रकारे सज्जनगड, शिंगणवाडी, महाबळेश्वर, खुद्द चाफळ येथील निरनिराळ्या सनदा संभाजीराजांनी पूर्ववत चालू ठेवल्या.[२]

चाफळ येथे दरवर्षी यात्रा भरे आणि सर्वदाहि महोत्सव होत असे. तेथे कटकीचे शिपाई आणि वरकड लोक श्रींची मर्यादा चालवीत नव्हते. यात्रेकरूंना त्रास होत असे. दिवाण लोक कटकटी करीत. त्यामुळे यात्रेत आणि इतर वेळी उपद्रव होऊ नये म्हणून शिवाजी महाराजांनी नाणेघोल तर्फेचे आणि प्रांताचे कारकून यांनी बरोबर जाऊन यात्रा सुखरूप पार पाडावी, मुसलमान व हरकोणाचा उपद्रव लागू देऊ नये, रामदास गोसावी यांच्या स्थळाचा परामर्श घेत जावा असे दत्ताजी त्रिमल वाकनीस याला पत्र लिहून कळविले होते. तशीच व्यवस्था करून यात्रा सुखरूप पार पाडावी म्हणून शंभू छत्रपतींनी दि. १९–१०–१६८० रोजी वासुदेव बाळकृष्ण याला आणि दि. २८–१०–१६८० ला कृष्णाजी भास्कर यास कळविले होते.[३]

१६८१ सालच्या जानेवारीपर्यंत संभाजीराजांचा राज्याभिषेक झालेला नसल्यामुळे येथपर्यंत दिलेली पत्रे त्यांनी स्वतःच्या अधिकारात लिहिलेली आहेत. त्यानंतर 'पंडितरावां'ची नेमणूक झाली. या सर्व पत्रांवर शेवटी 'लेखनालंकार' हे शब्द खुद्द छत्रपति संभाजीच्या हातचे आहेत.[४]

१६८० सालच्या चाफळ येथील रामनवमीच्या उत्सवाला रामदासस्वामी गेले नव्हते. तेव्हा समुदायी लोकांत कलह होऊन शिराळेकर रुसून गेले. त्यांचे समाधान करण्यासाठी दिवाकर गोसावी गेले असता समर्थांकडे जाऊन भांडणाचे मूळ कारण सांगून यापुढे अविच्छिन्न उत्सव चालेल असे आज्ञापत्र त्यांच्याकडून लिहून घ्यावे असे ठरले. मध्यंतरी शिवाजी महाराज मरण पावल्याने दिवाकर गोसावी रायगडास गेला असताना एकटेच शिराळेकर समर्थांकडे गेले. तेव्हा समर्थांनी दिवाकर लवकरच परत येईल. तो आल्यावाचून निश्चय करू नये, त्याची वाट पाहू असे सांगितले. समर्थांना राज्याभिषेकाचे आमंत्रण करावयास दिवाकर गोसावीबरोबर राघो अनंत सज्जनगडास गेले. 'आपणास येणे होत नाही म्हणून समर्थांनी दिवाकर गोसावी यास पाठविले.'[५] श्री रामदासस्वामी यास वस्त्रे व देवाला पोशाख, जवाहीर इत्यादी

१. श्रीसांका, ले. ३२
२. कित्ता, ले. ३६, ३८, ३९
३. कित्ता, ले. ३७, ४१
४. कित्ता
५. श्रीसच–आ, पृष्ठ ३६४

देण्यासाठी कारकुनांना राजांनी पाठविले.[१] त्यानंतर समर्थांनी संभाजी महाराजांना ओवीबद्ध पत्र लिहिले, ' अखंड सावधान असावें। दुश्चित कदापि नसावे॥ तजवीजा करीत बसावे। एकांत स्थळी ॥ १ ॥ काही उग्रस्थिती सोडावी। काही सौमता धरावी। चिंता लागावी परावी। अंतर्यामी ॥ २ ॥ मागील अपराध क्षमावे। कारभारी हाती धरावे। सुखी करून सोडावे। कामांकडे ॥ ३ ॥ पाटातील तुंब निघेना। तरि मग पाणी चालेना। तैसे जनांच्या मना। कळले पाहिजे ॥ ४ ॥ जनाचा प्रवाहो चालला। म्हणजे कार्यभाग आटोपला। जन ठायीं ठायीं तुंबला। म्हणजे खोटे ॥ ५ ॥ श्रेष्ठीं जे जे मिळविले। त्यासाठी भांडत बैसले। मग जाणावे फावले। गनीमासी ॥ ६ ॥ ऐसे सहसा करू नये। दोघे भांडता तिसऱ्यास जय ( तिसऱ्यास फावे )। धीर धरुनि महत्कार्य। समजूनि करावे ॥ ७ ॥ आधीच पडली धास्ती। म्हणजे कार्यभाग होय नास्ती। या कारणे समस्ती। बुद्धी शोधावी ॥ ८ ॥ राजी राखिता ( राखता ) जग। मग कार्य भागाची लगबग। ऐसे जाणोनि सांग। समाधान राखावे ॥ ९ ॥ सकळ लोक एक करावे। गनीमा लोटोनि काढावे। ( निवटून ) येणे करिता ( ऐसे करिता ) कीर्ती धावे। दिगांतरी (दिगंतरी) ॥ १० ॥ आधी गाजवावे तडाखे। तरि मग भूमंडळ धाके। ऐसे न होता ( करिता ) धक्के। राज्यास होती ॥ ११ ॥ समय प्रसंग वोळखावा। राग निपटून सांडावा ( काढावा )। आला तरी कळों न द्यावा। जनामध्ये ॥ १२ ॥ राज्यामध्ये सकल लोक। सलगी देऊन करावे साक ( सेवक )। लोकांचे मनामध्ये धाक। उपजोंचि नये ॥ १३ ॥ बहुत लोक मिळवावे। एक विचारे भरावे। कष्ट करोनी घसरावे। म्लेंछावरी ॥ १४ ॥ आहे तितुके जतन करावे। पुढे आणिक मेळवावे। महाराष्ट्र राज्यची ( राज्य ) करावे। जिकडे तिकडे ॥ १५ ॥ लोकी हिंमत धरावी। शर्तीची तरवार करावी। चढती बढती ( वाढती ) पदवी। पावाल येणे ( तेणे ) ॥ १६ ॥ शिवराजास आठवावे। जीवित तृणासमान मानावे। इहलोकी परलोकी तरावे। कीर्तिरूपी ॥ १७ ॥ शिवराजाचे आठवावे रूप। शिवराजाचा आठवावा साक्षेप। शिवराजाचा आठवावा प्रताप। भूमंडळी ॥ १८ ॥ शिवराजाचे कैसे बोलणे। शिवरायाचे कैसे चालणे। शिवराजाची सलगी देणे। कैसी असे ॥ १९ ॥ सकळ सुखाचा त्याग। करोनि साधिजे तो योग। राज्य साधण्याची लगबग। कैसी केली ( असे ) ॥ २० ॥ त्याहूनि करावे विशेष। तरिच म्हणावे पुरुष। या उपरि आता विशेष। काय लिहावे ॥ २१ ॥[२] श्री समर्थ रामदासांनी पाठविले हे ओवीबद्ध पत्र संभाजीमहाराजांना उपदेश करण्यासाठी पाठविलेले असले तरी सदासर्वकाळ कोणत्याही राज्यकर्त्याला उपयोगी ठरेल असेच आहे.

---

१. मराचिव, पृष्ठ ६ २. श्रीसच–आ, पृष्ठे २९७–९८; मराचिव, पृष्ठ ६–७

समर्थ आपला अंतकाळ जवळ आला आहे असे म्हणून ते उपदेशपर अनेक वचने बोलले. त्यात संभाजी राजांना उद्देशून केलेली वचने येथे दिली आहेत : श्री शिवराज कैलासवासी यांचे वंशपरंपरेसी राज्यभोग बहुत आहे. वर्षे पांचपर्यंत अति कठीण आहे, दैवीं प्रार्थ ( ना ) सावधानतेने रक्षिले पाहिजे. पूर्वी राजश्रीस ( शिवाजी ) राजधर्म व क्षात्रधर्म व आखंड ( साव ) धान ऐसी पत्रे पाठविली होती ती पत्रे प्रसंगानुसार वाचून मनासि आणून वर्तणूक होईल तरी ( त्या ) वचनाचा अभिमान श्री देवासि आहे.[१] शके १६०३, माघ वद्य नवमी म्हणजे दि. २२-१-१६८२ रोजी श्री रामदासस्वामींनी अवतार पूर्ण केला.[२] स्वामींच्या निधनाची बातमी संभाजीराजांना कळताच त्यांनी रामचंद्रपंत अमात्य यांना पुष्कळ द्रव्य देऊन सज्जनगडावर पाठविले. अमात्यांनी राजगुरूंना शोभेल अशा रीतीने दानधर्म करून उद्धवांकडून समर्थांचे उत्तरकार्य केले. दहनस्थळी समाधी बांधून चंदनाचा ओटा समर्थ शिष्य तारळेकर गोसावी यांच्याकडून करवून त्यावर पादुकांची स्थापना केली.[३]

त्यानंतर राजे रामचंद्रपंतास घेऊन समाधीच्या दर्शनास गेले. तेव्हा त्यांनी देवालय मोठे करण्याविषयी रामचंद्रपंतास आज्ञा केली. पंतांनी समाधीसह मोठे देवालय बांधून स्वामींच्या पुण्यतिथीचा उत्सव माघ वद्य १ पासून ९ पर्यंत करून दशमीचे लळीत करण्याचे ठरविले, आणि त्या कामाकरिता खर्चाची नेमणूक करविली.[४]

रामदास स्वामींनी अवतार पूर्ण करण्यापूर्वी, "श्री रघुनाथदेव, मुक्काम चाफळ याकडील कार्यभाग व राजगृहास जाणे येणे वे. दिवाकर यांनी करावे; आपणाकडील वित्तविषय असेल त्याचा व्यय देवालयी चाफळास करावा; सज्जनगडी चित्तस्थानी श्री हनुमंताचे देवालय बांधावे; गडमजकुरी भानजी व रामाजी गोसावी आहेत व आपणाकडील समुदायही उभयतांचा आहे तैसा असो द्यावा." अशी आज्ञा केली होती. या सर्व आज्ञा पाळण्याविषयी शंभू छत्रपतींनी सज्जनगडावर आणि मठांच्या जागी आज्ञापत्रे धाडली. श्री स्वामींनी ज्या ठिकाणी अवतार पूर्ण केला तेथे त्यांच्या आज्ञेप्रमाणे संभाजी राजांनी श्री हनुमंताचे देवालय बांधले.[५]

समर्थांविषयी संभाजीमहाराजांना नितांत आदर असल्यामुळे स्वामींनी केलेली व्यवस्था त्यांचे शिष्यगण पाळतात की नाही याबद्दल त्यांनी दक्षता बाळगली

१. श्रीसांका, ले. ४३, पृष्ठ ७९

२. श्रीसांका, ले. ४३, पृष्ठ ७९

३. श्रीसच-आ, पृष्ठ ३७०-३७१

४. पंअसंबा-ब, पृष्ठ ३२

५. श्रीसच-आ, लेख ४४

होती. समर्थांच्या मृत्यूनंतर हनुमान मंदिर दोन महिन्यात बांधून पूर्ण झाल्यावर त्यांनी दि. १३–३–१६८२ रोजी जावळीचा देशाधिकारी व देशलेखक कासी रंगनाथ यास कळविले की, "... त्या स्थानी श्री हणमंताचे देवालय करविले त्यासी व चाफळच्या रथोत्सवाकरता कर्नाटकातून देवाच्या मूर्ती असतील त्यासी नित्यपूजेस व समारंभास व शिष्यसमुदायासाठी धर्मादाय मोईन पेशजीप्रमाणे चालवून ती दिवाकर गोसाव्याचे विद्यमाने करीत जाणे."[1] रामदासांच्या देवस्थानचे पारपत्य दिवाकर गोसावी यांच्या विद्यमाने चालविण्याविषयी व सर्वत्र पूर्वीचीच व्यवस्था चालू ठेविण्याविषयी संभाजी महाराजांनी कऱ्हाड, सातारा येथील अधिकाऱ्यांना कळविले होते.[2]

छत्रपतींनी केवळ मठांच्या व देवस्थानच्या व्यवस्थांची काळजी घेतली नाही तर रामदास स्वामींच्या शिष्यवर्गात निर्माण झालेले तंटेही सोडविले. स्वामींनी आपल्या पश्चात सर्व अधिकार दिवाकर गोसाव्याला दिले असले तरी भानजी आणि रामजी गोसावी यांनी सज्जनगडावरील स्वामी समुदायाची व्यवस्था पाहावी असे ठरले होते. द्रव्यलोभाने उद्धव गोसाव्याने कटकटी सुरू केल्या, त्यात सज्जनगडावरील अधिकारीही सामील झाला. या गोष्टी संभाजी राजांच्या कानावर जाताच त्यांनी दि. २–६–१६८२ रोजी सज्जनगडाचा मुद्राधारी जिजोजी काटकर यास आज्ञापत्र लिहिले की, "श्री स्वामी अवतार पूर्ण करण्याअगोदरच आज्ञा केली होती...ऐसे असतां उद्धव गोसावी उगीच द्रव्यलोभास्तव भानजी व रामाजी गोसावी यांसी कटकट करितात, तुम्ही ही उधव गोसावी यांसी द्रव्य पात्रें व वस्त्रे भानजी व रामाजी गोसावी याकडून श्री स्वामींची देवविलीं म्हणून कळों आले तरी तुम्हास ऐसे करावयास प्रयोजन काये व उधव गोसावी यासी कटकट (करावया) गरज काये. या उपरी जे जे वस्त्राभाव व द्रव्य उधव गोसावी याचे आधीन तुम्ही करविले असेली तें मागतें भानजी व रामाजी गोसावी याचे स्वाधीन करणे. उधव गोसावी यांसी कटकट करूं न देणे श्री स्वामीचे पहिलीच आज्ञा करणे...वेदमूर्ति दिवाकर गोसावी यांचे विद्यमाने आम्हास श्रुत होऊन होणे तो होईल...या उपरी ये घालमेलीत पडावया प्रयोजन नाही. श्री स्वामींच्या समुदायांसी काडीइतके अंतर पडो न देणे...या पत्राप्रमाणे राहाटी करणे."[3]

समर्थ गेल्यानंतरही नेहमीप्रमाणे चाफळ येथे रामनवमीचा उत्सव होई. ही यात्रा आणि समारंभ सुखरूप पार पाडण्यासाठी संभाजीराजांनी कऱ्हाडचा मुख्य देशाधिकारी वेंकाजी रुद्र याला यात्रेच्या ठिकाणी जावयास सांगून, कोणी कुसुर कथला करील त्यास करू देऊ नये आणि पूर्वापार यात्रा चालत आली

१. व २. श्रीसांका–ले. ४६, ४७    ३. कित्ता, ले. ४८

तशी चालविण्याची आज्ञा केली.[1] साताऱ्याचा अधिकारी अंबाजी मोरदेऊ यालाही शिवाजी महाराजांनी चाफळला दिलेल्या सनदेप्रमाणे चालविण्यास आणि वे. दिवाकर गोसावीच्या विद्यमाने चालविण्यास बजावले.[2]

शिवाजी महाराजांप्रमाणेच संभाजी राजांना यात्रेमध्ये कोणी उपद्रव करून रयतेला रंजीस आणलेले खपत नसे. चाफळच्या वार्षिक उत्सवाला कित्येक लोक जात. कऱ्हाडच्या सुभ्यात नाणे घोल, तारले येथे या यात्रेचा कर जमा होत असे १६८५ साली गोविंद गंभीरराऊ यात्रेकरूकडून उसने व कर्जाऊ पैसे घेऊ लागल्यामुळे सुभ्यात पैसा जमा होईनासा झाला. या गोष्टी दिवाकर गोसावी यांनी निदर्शनास आणल्याच; परंतु नारायण रघुनाथ अमात्य यांच्याही ते ध्यानात आले. त्यांनी दि. १९–९–१६८५ रोजी कऱ्हाडचा सुभेदार व कारकून यांना लिहिले की, "...तरी या उपरी त्याचे ऐवज देविले असत त्यास पाववणे, हरयेक विसी श्रीच्या कार्यास अनकूलता करीत जाणे. अंतर पडो न देणे. यामध्ये अठराही खूप वाणी बकाल ( जाती, वाणी, दुकानदार ) येत असतात. श्री...ची यात्रा तेथे कोण्हास जुलूम जाज (ती) उचापती करावीया गरज नाही असे राजश्री...**साहेबांचे** ( संभाजी ) **शासन आहे**. यात्रेमध्ये कोणी उपद्रव सहसा देऊ नये ऐसीयास राजश्री गोविंदराऊ यांनी उचापती केली आहे. तारले व नानेघोल ये ( थील ) ऐवज देविला आहे त्यास ताकीद करून ठेवणे. रयत लोकास रंजीस सहसा होऊ न देणे."[3] संभाजी राजांच्या शासनाची शिस्त व त्यांचे धार्मिक गोष्टीतले लक्ष येथे स्पष्ट होते.

चाफळच्या देवांच्याकडील यात्रेची, नंदादीपाची, लिहिणार आणि पांथस्थ यांच्या वेतनाची मोईन दिल्याप्रमाणे एका वर्षाचा ऐवज संभाजी राजांनी दिला होता. हा ऐवज एकाच गावातून वसूल न होता गावोगाव हुंड्या करून दिलेल्या होत्या. त्यामुळे ऐवज मिळत नव्हता हे राजांच्या कानावर आल्यावर त्यांनी दि. २–११–१६८५ ला तगाद्याचे हुकूमवजा पत्र लिहिले की, "...तो ऐवज तुम्ही पावीत नाही. श्री चे कार्यास खलखल करिता गाऊगाव वराता करून देता येथून ऐवज पावत नाही. म्हणून कलों आले तरी श्री...चे कार्यास हैगै करा ( या तु ) म्हाला गरज काय ? जो ऐवज देविला तो बिला कुसुर पावता करावा ते ( गोष्टी ) तुम्ही करीत नाही याकरिता हा रोखा सादर केला असे. तरी पेसजी सनदप्रमाणे जे द्यावयाची मोईन करून दिल्ही आहे त्या ऐवजाचा रोखा येकच गावावरी सरस ऐवज पाहून नेमून देणे म्हणजे तेथून बिला कुसुर ऐवज पावेल. श्री चा मोहोच्छाव यात्रा समारंभ येथासांग घडोन येईल ( तरी ) हे जाणून

१. श्रीसाका, ले. ५७     २. कित्ता, ले. ५८

३. कित्ता, ले. ५९

करावे. चाफळ मौजे सिंगणवाडी येथे सारे ऐवजाची वरात करून ( सर्व गावा ) चा ऐवज तेथे पावेल. उरला ऐवज दिवाणात उसुल घेणे. याचे ऐव ( जात ) नून होईल तरी अणीखे जागा ऐवज देउनु झाडीयानसी पावता करणे. यात्रे ( म ) धे कोण्ही दिवाण लोक येताती ते वाणीयाजवलुनु उचापती करितात. ते धा (स्ती) ने यात्रा मोडों पाहातें. तरी ऐसी गोष्ट न करणे. उचापती यात्रे मध्ये येकदर ने ( कर ) णे. पहिले ज्याकडे उचापती असेल त्याकडून रोख पैके पावते करणे. श्री चा मोहोच्छाव तुम्ही जाउनु करवीत जाणे. जाणिजे. या पत्राची तालीक लिहून घेऊन असल पत्र वेदमूर्ती दिवाकर गोसावी या जवळ परतोन देणे. जाणिजे लेखनालंकार." हे पत्र लिहिल्यानतर एक महिना बारा दिवसांनी रवाना झाले. हा विलंब कां लागला असावा तें कळत नाही.

संभाजी महाराजांनी ताकीद दिल्यानंतरही उद्धव गोसावी घालमेली करीत होता. त्याने नसत्या कटकटी करू नयेत म्हणून १६८५ साली संभाजी राजांनी निरोप पाठविला. या कटकटींची कविकलश यांनाही माहिती होती. दिवाकर गोसावी याने प्रतिवर्षाप्रमाणे उत्सव चालवावा आणि त्याला कविकलशाने साहाय्य करावे म्हणून महाराजांनी दि. २–११–१६८५ रोजी कलशाला पत्र पाठविले होते.[१]

सातारा प्रांतातील शाहापूर तर्फ उंबरज येथे रामदास स्वामींच्या मठाजवळील श्रीचे देवालयातील पुजाऱ्याने देवाची सेवा करून स्वामींच्या शाहापूरच्या इनामापैकी जे उत्पन्न द्यावयाचे ते वे. दिवाकर गोसावीने घ्यावे असे ठरले होते. त्यात पुजाऱ्याने काही घालमेल केली आणि मौजे वाहगाव येथे जाऊन कृष्णाजी पाटील याच्या पाठीस लागला. हा गोंधळ संभाजी महाराजांच्या कानावर जाताच त्यांनी दि. २–११–१६८५ रोजी साताराच्या देशाधिकाऱ्याला आज्ञापत्र पाठविले. दिवाकर गोसाव्याचे उत्पन्न कृष्णाजी पाटील आणि पुजाऱ्याने खाऊन देवाची सेवा सोडली. ' पुजाऱ्याने सेवा केली तर त्याला चाकरी द्यावी पण खाल्लेले उत्पन्न गोसाव्यास स्वाधीन करावे व यात कोणी निष्कारण तंटे करील तर त्यास ताकीद दिली. पत्रावर लेखनालंकार असे संभाजी राजांच्या हाताने लिहिलेले असून मोरेश्वर प्रधानाचा पत्रावर शिक्का आहे.[२] धामधुमीच्या काळातही राजांचे कारभारात काटेकोरपणे लक्ष होते असे या पत्रावरून दिसून येते.

चाफळ आणि सज्जनगड येथील खर्चाची मोईन छत्रपतींनी सायगाव आणि जावळी सुभ्यातून सादर केली होती. मढे येथील पारपत्यगार आणि लेखक मोईनीमधून " चिठी मसाले देऊन वराता काढून ऐवज खोरून नेत होते. " हे कळताच

१. श्रीसांका, ले. ६१ २. कित्ता, ले. ६२

संभाजी राजांनी दि. ३–८–१६८६ रोजी पारपत्यगाराला आज्ञापत्र देऊन श्रीचे कार्यात अंतर पडू देऊ नये असे बजावले.[१]

येथे दिलेल्या पत्रांवरून संभाजी महाराजांना रामदास स्वामींबद्दल किती आदर होता आणि त्यांच्यामागे सर्व कार्ये सुरळीत चालावी म्हणून सर्व प्रकारांनी ते स्वतः कसे साहाय्य करीत होते हे ध्यानात येईल.

राजांची पत्नी येसूबाईलाही चाफळ येथील यात्रा सुखरूप पार पडाव्या असे वाटत असे. संभाजी महाराजांच्या कारकीर्दीतले तिचे फक्त एकच पत्र उपलब्ध आहे. या संबंधात येसूबाईने दिलेले अभयपत्र असे आहे, "श्री देवाची यात्रा आली आहे. यात्रेस लोंक यावयास अनमान करिताती की आपले लोक दौड करून यात्रेस तसवीस देतील. ऐसीयासी अभयेपत्र अलियाने...देवाचा मोहछाये करीतील म्हणौन हुजूर मालूम जाले. त्यावरून यात्रेस अभयेपत्र दिल्हे आहे. आमचे तर्फेने कोणी वाटे जाणार नाही. गावोगावी कागद पाठवून यात्रकरी बोलाऊन श्री चा समारंभ करणे. आमचे अभये असे. जैसे सालाबाद चालिले आहे तेणेप्रमाणे आपलेही पत्र पाहिजे म्हणौन राजश्री माधव गोसावि यांनि सांगीतले. तेरी आमचेही अभयेपत्र आहे. देवाचे इनाम स्थळ तुमचे अध्येन आहे. आमचे तर्फेने आजार लागणार नाही. मार्तंब सुद देवाचा प्रसाद पाठविला तो आम्हास पावला."[२] मराठे आणि मुघलात लष्करी धामधूम चालली असताना मराठ्यांच्या सैन्याकडून यात्रेकरूंना त्रास होऊ नये म्हणून येसूबाईने हे अभयपत्र दिलेले असावे असे वाटते.

१६८३–८४ मध्ये मराठे आणि पोर्तुगेज यांच्यात युद्ध चालू होते. सौंदेकरांनी पोर्तुगेजांना मदत केल्यामुळे राजे स्वतः त्यांच्यावर चालून गेले होते. मराठ्यांच्या आरमारात काही मुसलमान होते. त्यातल्या एका अधिकाऱ्याने कारवारला एक गाय विकत घेऊन खाण्यासाठी तिला मारले. ही बातमी संभाजी राजांना समजताच त्यांनी त्याला जाहीर रीतीने फाशी दिले.[३] 'गोब्राह्मण प्रतिपालक' या बिरुदावलीने प्रसिद्ध असलेल्या शिवप्रभूंच्या कीर्तीला शोभेल असेच हे संभाजी राजांचे कृत्य होते.

१६८४ सालच्या ऑगस्ट महिन्यात सुलतान तारा याने लष्करासमवेत तोरगल, नवलगुंद येथे स्वारी केली. नवलगुंद हे धारवाड जिल्ह्यातील वायव्येकडील तालुक्याचे ठिकाण आहे. सुलतानाने तेथे मुक्काम करून घरे, वाडे, पेठा मोडून आणि जाळून नष्ट केल्या. गावातील साक्षात देवस्थाने छिन्नविच्छिन्न केली. मोठी देवालये उध्वस्त केली. गावात रोगराई होऊन माणसे मेली. रयत, वाणी,

१. श्रीसाका, ले. ६६ २. कित्ता, ले. ६७

३. FR : Car to Sur, 15-9-1684

दिवाण लोक गावे सोडून जाऊ लागली. अभयाचा कौल दिल्यानंतर तेथे देवतांची स्थापना करण्यात आली. ग्राम देवस्थानाच्या दिवसापासून पांढरी बसली होती. पुरातन स्थळातील मूर्ती दुरात्म्यांनी विच्छिन्न केल्या होत्या. "महाराज राजश्री महाराष्ट्रराजा आहे. देवस्थाने छिन्नभिन्न असो नये. या कारणे देवालये बांधावी उरजा चालवावी. ह्यात आपण व स्वामी मिळोन जे करणे ते करीत आहो. तूर्त नवलगुंदासारखे गावात देवस्थान देवळेच नाहीतसे झाले आहे.... देवळे इमारती बांधाव्या. तूर्त मूर्तिस्थापना करून पूजा चालवावी. नित्य पुराणश्रवण चालावे...सर्वांच्या मते विचार पडला की, ' हिंदुकीची गोष्ट खरीच. उदंड खर्चवेच महाराजांचे दरबारात होऊन जातो, अगर पड जंगलही पडते. त्यापरीस श्रीचे उरजे अर्पित राजगृहातून जरी वेच जाहला नाही तरी ' ज्याचे नांव त्याचे पुण्य ' महाराज छत्रपति साहेबांस श्रेय येईल. "[१] हे पत्र दि. २२–८–१६८५ रोजी नवलगुंदच्या दिवाणाने मोकदमाना लिहिले.

**धर्मान्तर :**

हिंदुस्थानात परकीयांची राज्ये स्थापन झाल्यापासून हिंदूंना बाटविण्याचे कार्य जोरात चालत असे. खिश्चन आणि इस्लामी धर्म हिंदू धर्मापेक्षा अगदी वेगळे आणि विरोधी. एखादा हिंदू बाटला की त्याला हिंदू समाजात बहिष्कृत करण्यात येत असे. सिंध प्रांतात जुलूमजबरदस्ती फार होऊन मोठ्या प्रमाणात बाटवाबाटवी झाली. त्यामुळे देवल स्मृतीने शुद्धीकरणाची प्रथा सुरू केली. महाराष्ट्रात स्वतंत्र राज्याची स्थापना करून शिवाजी महाराजांनी हिंदूधर्माला राजकीय प्रतिष्ठा प्राप्त करून दिल्यानंतर बाटलेले लोक शुद्ध होऊन परत हिंदू धर्मात आल्याची उदाहरणे आढळतात. महाराजांनी हिंदूधर्माला बाधक ठरणारी, त्यांचे संख्याबल कमी करणारी ही प्रथा बंद पाडण्यासाठी जुलमाने बाटविलेल्या लोकांना परत हिंदू धर्मात घेण्याचा उपक्रम सुरू केला. बजाजी निंबाळकर आणि नेताजी पालकर यांना शुद्ध करून त्यांनी त्यांना स्वतःच्या पंगतीस बसवून घेतले, आणि बजाजी निंबाळकरांच्या मुलाला स्वतःची मुलगी दिली.

शंभू छत्रपतींनी आपल्या पित्याचे अनेक बाबतीत अनुकरण केले, तसेच याही विषयात त्यांनी केलेले आढळते. हिंदूंना इंग्रज, पोर्तुगेज आणि मुसलमान बाटवीत असत. स्वराज्यातील मुले, माणसे विकत घेऊन इंग्रज त्यांना गुलाम करीत किंवा बाटवीत असत. मराठे आणि इंग्रज यांच्यात १६८४ मध्ये जो तह झाला त्यात संभाजी राजांनी एक अट घातली होती ती अशी : " इंग्रजांनी

१. सनदापत्रे, पृष्ठ १६३, ले. ५

माझ्या राज्यातून गुलाम करण्यासाठी किंवा ख्रिश्चन धर्मात बाटविण्यासाठी माणसांना विकत घेण्यास परवानगी नाही."[1]

मराठा-मुघल युद्धात हिंदू आणि मुसलमान एकमेकांच्या तावडीत सापडत असत. हिंदूंनी मुसलमान धर्म स्वीकारला तर त्यांना कैदेत ठेवण्यात येत असे. मुसलमान धर्म स्वीकारण्यास नकार देतील त्यांची कत्तल करण्यात येई. १६८२ च्या अखेरीस एका चकमकीत ४५ हिंदूंना मुसलमानांनी कैद केले. त्यातील ३२ लोकांनी मरणाच्या भयाने मुसलमान धर्म स्वीकारला; बाकीच्या तेरा लोकांना ठार करण्यात आले.

एका शुद्धी प्रकरणात कविकलशाचा संबंध आला होता. १६८०–८१ मध्ये औरंगाबाद प्रांतातील कसबे हरसूल येथील गंगाधर रंगनाथ कुलकर्णी हा ब्राह्मण मुघलांकडे नोकरीस होता. औरंगजेबाने त्याला बळजबरीने बाटविले होते. तीन महिने त्याला कैदेत ठेवले. नंतर त्यास मन्सब देऊन पुन्हा चाकरीत घेतले. त्याने पाच वर्षे मुघलांच्याकडे नोकरी केली. परंतु त्या ब्राह्मणाला स्नान-संध्यादिक कर्मे करता आली नाहीत. पाच वर्षांत त्याने अन्नोदकसंसर्ग केला नाही. १६८५ मध्ये तो रायगडला आला. तो दरबारात जाऊन महाराज, सरकारकून, न्यायाधीश, उपाध्ये, दानाध्यक्ष व भलेभले ब्राह्मण यांच्याशी शरण येऊन प्रायश्चित्त मागत होता. हे वर्तमान छंदोगामात्यास विदित झाले. या ब्राह्मणाचे कष्ट व अनुताप बघून कलशाने संभाजी राजांना वृत्तान्त विदित केला. त्यानंतर छत्रपतींनी प्रायश्चित्त देण्याची आज्ञा दिली. उपाध्ये, मोरेश्वर पंडीतराय, यांनी छंदोगामात्यांच्या सभेत विद्वद्वैदिक ब्राह्मणांच्या संमतीने मिताक्षरादी निबंध पाहून प्रायश्चित्त संकल्प सांगितला. त्या ब्राह्मणास त्रिंबकेश्वरास पाठविले. श्री त्रिंबकेश्वर व श्रीगिरी प्रदक्षिणा झाल्यानंतर त्याला पूर्वीच्या गंगाधर या नावाने शुद्ध करून घेतले. श्रीक्षेत्रीची पत्रे आल्यानंतर प्रायश्चित्त विधी पार पडला. हा सगळा वृत्तान्त कविकलशाला सांगण्यात आला. त्यानेही कारकून, न्यायाधीश यांच्या अनुमताने आपल्या पंक्तीस भोजन देऊन शुद्धीपत्र देण्यास आज्ञा केली. जो कोणी याच्या ब्राह्मण्याविषयी संदेह मानील तो देवब्राह्मणद्वेषी, महापातकी जाणीजे, असे मोरेश्वर पंडीतराय याने दि. १६–३–१६८६ ला औरंगाबादच्या उपाध्ये, वेदमूर्ती व महाराष्ट्रातील कोकणस्थ-देशस्थ वैदिक गृहस्थांना कळविले. या शुद्धी पत्रावर मोरेश्वर पंडितराय दानाध्यक्ष, राजश्री नारो रघुनाथ आमात्य, कविराज महेशदास, समंत केशव पंडितराय, सोमनाथभट दशग्रंथी, संगमेश्वरकर, राजश्री केसो त्रिमळ पिंगळे, हरजी राजे महाडिक, गंगाधर मोरेश्वर प्रधान, राजश्री प्रल्हाद निराजी न्यायाधीश, रघुनाथ कोर्डे, कविकलश व इतर अनेकांच्या सह्या आहेत.[2]

१. भाइसंमं, त्रैमासिक १९२५, वर्ष २, पृष्ठ ३५ २. मइसा, खंड ८, ले. ४०

या पत्रात कविकलशाला समस्त राजकार्यधुरंधर वर्णाश्रमधर्मप्रतिपालक छंदोगामात्य असे म्हटले आहे. बाटविलेल्या हिंदूंना प्रायश्चित्त देऊन शुद्ध करून घेण्याचे शिवाजी महाराजांचे धोरण संभाजी राजे व कविकलश यानी चालू ठेवले होते.

चेऊलला एक निपुत्रिक बाई राहात होती. तिची मिरासी जमीन २० वर्षे मशागत न करता राहिली होती ती त्या बाईने चिंचवडच्या श्री देव संस्थानास दान दिली होती. त्याप्रमाणे संभाजी राजांनी दि. १-११-१६८६ रोजी चेऊलच्या देशाधिकाऱ्याला बाईच्या दानपत्राप्रमाणे तिची मिरासी जमीन चिंचवड संस्थानाला दिल्याचे कळविले.[1]

शिवाजी राजांच्या कारकीर्दीत दादंभट आणि रामभट यांना पुरंदर किल्ल्यावरील श्री पुरंदरेश्वर व केदारेश्वर यांना रोज अभिषेक करावयाची आज्ञा केलेली होती. मुघलांना १६६५ साली पुरंदर द्यावा लागल्याने तेव्हापासून त्यांना अभिषेकाची मोईन मिळत नव्हती. महाराजांनी किल्ले पुरंदर पुन्हा जिंकला तरी पुरंदरे बंधूंनी हुजूर जाऊन वर्षासन करून घेतले नाही. त्यामुळे देवाला नैवेद्य आणि नंदादीप चालत असला तरी अभिषेक होत नव्हता. संभाजीकडे सिवभट आणि नारायण भट (मुलगे) यांनी अभिषेकाची मोईन करून द्यावयाची विनंती केली. त्यावरून संभाजी महाराजांनी हुकूम केल्याप्रमाणे नीलकंठ मोरेश्वर प्रधान यांनी दि. ७-४-१६८७ रोजी आज्ञा करून केदारेश्वरास नारायण भट आणि पुरंदरेश्वरास शिवभट यांनी अभिषेक करून स्वामींना आशीर्वाद देतील म्हणून मोईन करून दिली.[2]

संभाजी महाराजांना आपल्या लष्करी अधिकाऱ्यांनी देवस्थानाच्या जागी उपद्रव दिलेला खपत नसे. मौजे चिंचवड प्रांत पुणे हा गाव श्री देव यांच्याकडे चालत असे. सुभेदार, जुमलेदार, हवालदार, बारगीर, बाजे लष्कर हुजरात, हशम हे सर्व चिंचवडच्या देवस्थानाला उपद्रव देत होते; मनास येईल तशी वसुली करीत होते. त्यामुळे शंभू छत्रपती त्यांना दि. ४-८-१६८७ या दिवशी आज्ञा करतात, "...असे असतां तुम्ही रहदारीस नाहक दरफ्ती करता उपद्रव देऊन धामधूमहि करितां. रयतीकडून गैरसनदी मनास येईल ते मागत होता म्हणोन कळो आले. तरी **हे ढंग स्वामीस कैसे मानो पाहतात**? या उपरि ही बदराहा वर्तणूक केलिया तुमचा एकंदर मुलाहिजा होणार नाही. जो धामधूम करील त्यास स्वामी जिवेच मारितील. हे जाणून मौजे मजकुरास तसदी न देणे. ताकीद असे."[3]

१. भाइसंमं, श्री. गं. ना. मुजुमदारांच्या संग्रहातील अप्रकाशित पत्र

२. शिचसा, खंड १, ले. ६९, पृष्ठ ८६, ८७

३. सनदापत्रे, ले. ८, पृष्ठ १६६

प्रस्तुत पुस्तकात संभाजी राजांची किंवा अष्ट प्रधानांची आणि अधिकाऱ्यांची अनेक पत्रे दिलेली आहेत. त्यात किंवा इतर पत्रव्यवहारात स्वामी ‘ जिवे मारतील ’ असा दम याच एका पत्रात दिलेला आढळतो हे येथे मुद्दाम नमूद करून ठेवावेसे वाटते.

संभाजी महाराजांच्या काळात त्यांचे अधिकारी ऐवज योग्य ठिकाणी पोंचता करीत नसत, असे आढळले की त्यांना जरबेची पत्रे लिहिण्यात येत. शिवाजी महाराजांनी वाई प्रांतातील कसबे निंब येथील श्री सदानंद गोसावी यांना मठातील अन्नछत्रासाठी ऐवजाची मोईन करून दिलेली होती. परंतु तेथील कारकून ऐवज देण्यात हयगय करीत असे. राजश्री आनंदगिरी गोसावी यांनी ही तक्रार छत्रपतींकडे करताच संभाजीराजे दि. २२–८–१६८७ रोजी लिहितात, “...पहिले पासून अन्नछत्र चालिले असतां मधे ऐवजाबाबे कुसूर करावया काय गरज ? या उपरी ऐवज पाववावया बाबें सुस्ती न करणे. पहिले पासून द्यावयाचा मोईन असेल तेण्हे प्रमाणे पाववीत जाऊन अन्नछत्र चालो देणे. धर्मकार्यास खलेल न करणे. जाणिजे. अन्नछत्राचा मामला पूर्वीपासून.. सालगुदस्ता चालिला असेल ते मनास आणून त्याप्रमाणे चालवणें. उजूर न करणे. लेखनालंकार. ”[१]

चेऊलच्या अधिकारी दप्तरातील सन १७०० मधील एका करीन्यात म्हटले आहे की, “ संभाजीराजे याही प्रांतात धर्मस्थापणा करून महाराष्ट्र धर्माची वृधी करून प्रांतात चोर फुडावे याचा बंदोबस्त केला. ”[२]

प्रसिद्ध इतिहाससंशोधक कै. त्र्यं. शं. शेजवलकर आपल्या “श्री-शिवछत्रपति ” या ग्रंथात म्हणतात की, “ हिंदूसभेच्या अनुषंगाने हिंदूंचे ऐतिहासिक धर्मवीर शोधून काढण्याचा मनु सुरू झाला व संभाजीला महाराष्ट्राच्या स्वातंत्र्येतिहासातील धर्मवीर ठरविण्यात आले. ऐतिहासिक माहितीचा साकल्याने विचार करतां धर्मवीर म्हणण्यासारखे संभाजीच्या हातून विशेष काही घडलेले दिसत नाही. ”[३]

हिंदूमहासभेसारख्या राजकीय पक्षाने संभाजी राजांना कोणत्या हेतूने धर्मवीर म्हणावयास प्रारंभ केला असेल या प्रश्नात येथे शिरावयाचे कारण नाही. परंतु या प्रकरणात दिलेली १६८० सालापासून १६८७ पर्यंत संभाजीराजांच्या धार्मिक धोरणाची उपलब्ध माहिती पाहिली म्हणजे संभाजी महाराजांची धार्मिक प्रवृत्ती तर दिसतेच परंतु ते निश्चित धर्माभिमानी होते असेच म्हणावे लागते. शास्त्रे, पुराणे, नीतिशास्त्र यांचा अभ्यास आणि धार्मिक बैठकीतून उत्पन्न झालेली त्यांची जीवित तृणासमान मानण्याची प्रवृत्ती यामुळे ते अखेरचे दिव्य इतक्या ताठ मानेने करू शकले असे वाटते.

* * *

१. मइसा, खंड १५ ले. १५९, पृष्ठ १८२ २. ऐसा–जोआ, ले. ४०, पृष्ठ ४९

३. श्रीशिछ–शे, पृष्ठ १५१

# १३. दुर्दैवी शेवट

संभाजी राजांना शत्रूने पकडणे आणि त्यांचा अत्यंत क्रूरपणाने अंत करणे या मराठ्यांच्या इतिहासातील दोन अत्यंत दुर्दैवी घटना आहेत. इतिहासात अशा प्रकारच्या अनेक घटना घडल्याची उदाहरणे आहेत. नेपोलियनसारख्या पराक्रमी राजाला कैदेत हेलेना बेटावर मृत्यू आला. हर हिटलरला दुसऱ्या महायुद्धात पराभव झाल्यावर मित्र राष्ट्रांनी पकडून सूड घेऊ नये म्हणून अखेर आत्महत्या करावी लागली. संभाजी राजे शत्रूकडून पकडले जाणे ही घटना मराठ्यांना मान खाली घालावयास लावणारी असली तरी ज्या असामान्य आणि अतुलनीय धैर्याने अत्यंत अमानुष प्रकारच्या हालअपेष्टांना तोंड देत उंच मानेने ते मृत्यूला सामोरे गेले ती मराठ्यांच्याच नव्हे तर जागतिक इतिहासातही एक देदीप्यमान ठरेल अशी घटना आहे. या हौतात्म्याच्या पार्श्वभूमीवरच संभाजी राजांच्या नंतर मुघलांना जिद्दीने तोंड देत देत मराठ्यांनी औरंगजेबासारख्या बलाढ्य शत्रूला आपले ईप्सित साध्य करू दिले नाही. औरंगजेबाला अखेर निराश होऊन मृत्यू आला.

या दुर्दैवी घटनेची माहिती सर्व बखरकार, रॉबर्ट आर्म, मानुत्ची, खाफीखान, साकी मुस्तैदखान, ईश्वरदास नागर आणि इंग्रज यांनी दिलेली आहे. ही सर्व माहिती ऐकीव बातम्यांवर आधारलेली असून त्यात एकवाक्यता आढळत नाही. याचे कारण असे की, ही घटना प्रत्यक्ष घडली त्यावेळी या घटनेचे वर्णन करणारांपैकी कोणीही हजर नव्हते.

संभाजी महाराजांना पकडल्यापासून त्यांचा अंत करण्यात येईपर्यंतच्या घटनांची माहिती वेगवेगळी आहे. त्यामुळे एकाच लेखकाच्या माहितीवर सर्वस्वी अवलंबून राहता येत नाही. फार थोड्या लेखकांनी संभाजी राजे रायगडावर जावयास का निघाले आणि वाटेत त्यांनी संगमेश्वरला मुक्काम का केला याची माहिती दिलेली आहे. या कारणांमुळे कोणी काय काय लिहिले आहे ते पाहून, त्यावेळच्या कागदपत्रातून जी माहिती मिळते त्यांचा तुलनात्मक विचार करणे अवश्य आहे.

मल्हार रामराव चिटणीस लिहितो, “ पिलाजी शिर्के व तानाजी शिर्के, गणोजी शिर्के हे महाराजांचे आप्त. यांणी राजा वेडा जाला, कबजीने वश केले,

राज्य बुडते, त्या अर्थी हिय्या करून शिवाजी राजे (शाहू) शिर्के यांचे भाचे, यांस घेऊन राज्यावर बसवावे, राजाराम काढून त्याचे हस्ते कारभार चालवून राज्य रक्षावे. ऐसे राजकारण केले. ते समयी महाराज यांस समजले, फुटले. आधीच क्रूर मर्जी, यांत यांजपासून अंतर ऐसे समजले तेव्हा इतराजी केली. घरी जप्ती पाठविली. (घरे) लुटली, जाळली. एक दोन शिर्के सापडले ते मारिले. शिर्के जेथे असतील तितके मारावे ऐशी आज्ञा करून शिरकाण करविले. ते समयी दौलतराव शिर्के, गणोजी शिर्के व देवजी शिर्के वगैरे पळोन सर्व शिर्के तितके कुटुंबसुद्धा हबसाणात गेले. चहूकडे चार जाऊन मोगलाईत जाऊन चाकऱ्या करू लागले."[1]

शिर्के आणि संभाजी यांच्यातील बेबनावासंबंधी जेधे शकावलीत माहिती मिळते. "शके १६१० कार्तिक (ऑक्टोबर १६८८) कविकलश याजवरी शिर्के पारखे झाले. कलश पळोन खिळणियावर गेले. तेच मासी संभाजी राजे रायगडाहून कलशाचे मदतीस आले. समागमे स्वारी सिरकियांसी युद्ध करून त्यास पलवून आपण खेळणियास आले." या माहितीवरून शिर्के आणि कवि कलश यांच्यात काही तरी महत्त्वाच्या मुद्यावरून भांडण झालेले दिसते. ज्या अर्थी राजे स्वतःच्या नातेवाइकांविरुद्ध कविकलशाच्या मदतीकरता धावून गेले त्या अर्थी शिर्के मंडळींनी काही तरी गंभीर कारस्थान केले असावे असे वाटते. चिटणीस बखरीत म्हटल्याप्रमाणे शिर्क्यांनी कदाचित् शाहूला गादीवर बसवून आपल्या हातात सत्ता बळकावण्याचा प्रयत्न केला असण्याचा संभव आहे. या भांडणानंतर दौलतराव, गणोजी आणि देवाजी शिर्के मंडळी मुघलांना मिळाली, असे बखरीत म्हटले असले तरी प्रत्यक्षात ती १६८२–८३ सालच्या सुमारास ती मुघलांना मिळाली होती असे दिसते. यावरून चिटणीस बखरीतील माहिती सर्वस्वी ग्राह्य कशी मानता येत नाही हे ध्यानात येईल.

चिटणीसाने राजे पकडले गेले त्यावेळचीही अशीच माहिती दिलेली आहे. "हे वर्तमान पादशाहानी मोहीम करून फौज रवाना केली. ते आलियावरी महाराजांनी बावास कळवावे सांगितले. बावानी विचार सांगितला, हे फौज आलियाची काय मुजाका आहे. प्रयोगास प्रारंभ करून एक क्षणात नाश होये ऐसे करतो . इलाची वेग विशाळगडचे घाटें उतरून हजार पांचशेनिशीं पुढे आला. बातमी गेली. त्यात महाराज बेहोष, तजवीज तयारी काही एक नाही. त्या अर्थी वकिलीस आलों ऐसा बहाणा करून, पुढे पत्र पाठवून, दौड करून, संगमेश्वरी जाऊन पोहचला. ते समयी सर्व लोक राहिले तेही पळाले आणि रायगडावर गेले. येसूबाई साहेब व शिवाजी राजेही रायगडीच होते. फौज येऊन पावली.

१. मराचित्र– पृष्ठ २१

इलाची बेग आला म्हणोन महाराजांस बातमी सांगितली. तेव्हा बावा कोठे आहेत त्यास बोलवा. कां आले ते शोध करून त्यांस पुढे भेटीस जावयास सांगा ऐसे म्हणतात तो दरवाज्याजवळ येऊन पावले. तेव्हा लोकांनी अद्यापि सावध व्हावे आपणास पाठीशी बांधून काढून पन्हाळयास नेतो ऐसे बोलले असता न ऐकत. तो जवळ शेपन्नास मात्र माणूस राहिले. खांसाच उठोन दरवाज्यात आले. तो इलाची बेग पुढे होऊन धरले आणि कैद केले." या माहितीत फारसे तथ्य दिसत नाही.

मराठी साम्राज्याच्या छोट्या बखरीत विचित्र आणि असंदिग्ध माहिती दिलेली आहे. या लेखकाला संभाजीच्या कारकीर्दीत औरंगजेब दक्षिणेत होता याचाच विसर पडलेला दिसतो. "शिर्के यांनी विचार केला की या कलशाने राज्य बुडविले. यासि नेऊन मारावे. म्हणोन २५ हजार इसम मेळविले. हे वर्तमान कबजीकडील कारभारी यांणी कबजीस श्रुत केले. त्याने महाराजांस लिहून शिरके यांजवर हल्ला करविला. लोक बहुत मारिले. त्याजवर पिलाजी खिजमतगार व गणूजी शिरके मोगलईत गेले." येथपर्यंत दोन्ही बखरीतील माहिती पाहिली तर दोघांचा राग कबजीवर दिसतो. चिटणीस बखरीत कबजीने राज्य बुडविले म्हणून शिर्के त्याच्यावर रागावले आणि शाहूच्या नावाने राज्यकारभार करावयाचा असे ठरल्याने शिर्के आणि संभाजी यांच्यात भांडण झाले असे म्हटले आहे. तर कबजीने राज्य बुडविल्यामुळे शिर्के यांनी त्याला मारण्यासाठी सैन्य पाठविले म्हणून संभाजी राजे त्याच्या मदतीस आले असे दुसरी बखर म्हणते. या दोन बखरी आणि जेधे शकावलीतील नोंद यावरून दिसते ते इतकेच की कोणत्या तरी कारणावरून शिर्के व कलश यांचे जोरदार भांडण झाले असावे. गणोजी शिर्के १६८८ सालापूर्वीच मुघलांना मिळाला होता. त्यामुळे १६८८ मध्ये शिर्के आणि कलश यांचे भाडण झाल्यावर तो मुघलांना मिळाला हे म्हणणे चूक आहे.

१६८८ सालातील संभाजी राजांच्या हालचालींचा विचार करता म. सा. छोट्या बखरीत जी माहिती दिलेली आहे ती वस्तुस्थितीशी विसंगत आणि हास्यास्पद आहे. "तदनंतर अवरंगशहा बादशहा याणी गाजी उद्दीखां यास दक्षिणेच्या बंदोबस्ताकरिता पाठविले. त्यानी बऱ्हाणपुरास येऊन साताऱ्यास संभाजी राजे महाराज यांजला पत्र पाठविले की, तुम्ही निघून बऱ्हाणपुरास यावे. तेव्हा संभाजी महाराज बऱ्हाणपुरास आले. त्यास गाजीउद्दीखा बोलले की तुम्ही दिल्लीस चलावे. दक्षिणच्या साडेसहा सुभ्याच्या सनदा पादशहाकडून देववितो. तुम्ही सनदा घेऊन बंदोबस्त करावा. असे सांगितल्यावरून संभाजी बोलिले की तुम्ही पुढे चलावे. आम्ही साताऱ्यास जाऊन येतो. असा मनसबा होऊन गाजीउद्दीखा दिल्लीस गेले. महाराजांनी साताऱ्यास येऊन दिल्लीस

जाण्याची तयारी केली. चाळीस हजार फौज शिवाय पागे व सरदार निंबाळकर, घाडगे वगैरे मानकरी मिळून ऐंशी हजार फौजेचा भरणा व कान्होजी भोसले बरोबर घेतले, आपले पुत्र शिवाजी महाराजही बरोबर घेतले आणि कूच करून गुजराथ किनाऱ्याने चालले. मार्गी पुंड व जमिनदार व मवासी यांची पारिपत्ये करून खंडण्या घेऊन पुढे गिरासे यांचे मुलुखांतून त्यांची पारिपत्ये करून सातपुड्यातील भिल्ल लुटून मारिले. मेवाती लुटून माळव्यात गेले. मारवाडची खंडणी घेऊन बुंदेलखंडात जाऊन खंडणीऐवजी मुल्रख बुंदेल खंडाचा घेतला तेथून दिल्लीस गेले...वजिराने दक्षिणेचे वर्तमान पादशाहास समजाविले. अर्ज केला की दक्षिणचे हे राजे माहितगार यांस दक्षिणचे वसुलापैकी चौथाईच्या सनदा करून द्याव्या. साडेसहा सुभे दक्षणचे मेहबत करून, कुल मवासी जेर करून सरकारचा पैसा वसुलात आणितील. तेव्हा पातशाहानी संभाजीकडेस पाहिले. राजे उठोन मुजरा करून उभे राहिले. उभयतांची मर्जी खुषवख्त असता सहजात पातशाहा बोलले की तू मुसलमान होतोस की काय? राजाने ऐकून उत्तर दिले, 'जहांपन्हां तकसी माफ. अपनी बेटी बेगम पातशाहाजादी इनायत होय तो मय कबूल.' असा जाबसाल पातशाहानी ऐकून संभाजी राजे यांचे डोळे काढविले आणि चिणून टाकिले. वजीर व शिवाजी राजे भयभीत होऊन आपले फौजेत आले." हा बखरीतील उतारा विस्तृतपणे येथे मुद्दामच दिला आहे. या माहितीचा संभाजी राजांच्या कारकीर्दीतील हालचालींशी काहीच संबंध जुळत नाही. संभाजी उत्तरेत गेल्यावर त्याला पकडला; त्याचा पन्हाळा, संगमेश्वर, रायगड या ठिकाणांशी काहीच संबंध नाही असे लिहिले आहे. साडेसहा सुभ्यांचा उल्लेख शाहूला लागतो, संभाजीला नाही. अशा हास्यापद गोष्टी बखरीत दिलेल्या असल्यामुळे त्यावर अवलंबून राहता येत नाही. या माहितीचा अर्थातच विचारही करण्याचे कारण नाही.

'मराठी दप्तर रुमाल' यातही कबजीचे अनुष्ठान करून रेडे मारून त्याचे रक्तात धोतरे भिजवून पाणी सिंचून बैसले अशी विपरीत माहिती दिलेली आहे.

सन १८०३ च्या तंजावरच्या श्रीबृहदीश्वराच्या शिलालेखात संभाजी राजे यांच्या शेवटच्या प्रसंगाची खालीलप्रमाणे माहिती दिली आहे :

"...ते फौज राजावरी युद्धास आली. तेव्हा संभाजी राजांनी युद्ध करून आली सेना व सेनानायकास हतकरून पळविले. हत शेषानी जावून बाच्छयास जाणविल्यावरी परतून बाच्छायानी भूराशी सनातोसच सेनानायक वजीरासही पाठविले. त्यानी येऊन संभाजीराजासी काही युद्ध काही कृत्रिम येकीकडून करून संभाजीराजास धरून नेऊन बाच्छायापासी सोडिले. बाच्छायानी संभाजीराजास पाहून लवून खुरनिशी करा सोडितो म्हणाले. तेव्हा संभाजीराजानी आता आम्ही तुमच्या हाती सांपडल्यासारिखे तुम्ही सांपडते तरी कळो येते म्हणाले.

अवरंगजेबास राग येऊन पुन्हाही कैदेत ठेविले. थोडे दिवस गेल्यावरी संभाजीराजानी लवावे म्हणून येकीकडे लहान दरवाजा करून संभाजीराजास त्या वाटेन भेटीस बलाविले. तेव्हा राजेमजकूर पुढे पाय सोडून आले. ते पाहून बाच्छायानी संतोष मानून हा केवल शूर आहे याला मारू नये म्हणून तुम्ही तुरुक व्हा तुम्हास सोडून देतो म्हणाले. तेव्हा संभाजी राजानी तुमची लेक कन्या आहे तिला द्या तुरुक होतो म्हणाले. तो शब्द कठोर वाटून बाच्छायानी मारून टाकणेस हुकूम दिल्हे. तेणेप्रमाणे मारुन टाकिले. " बखरीपेक्षा ही माहिती निराळी असली तरी इतर पुराव्याच्या अभावी तिला महत्त्व देता येत नाही.[१]

यानंतर संभाजीराजांच्या समकालीन लेखकांनी काय काय माहिती दिलेली आहे त्याचा विचार करू.

निकोलाय मानुत्ची हा इटालियन प्रवासी संभाजी राजांच्या कारकीर्दीत मराठी राज्यात व गोव्यात वावरत होता. राजांना पकडण्यापूर्वी चार वर्षे तो मद्रासच्या बाजूस गेला होता. त्यामुळे ही हकीकत त्याने तेथपर्यंत पोचलेल्या ऐकीव बातम्यांवरून लिहिलेली आहे. मानुत्ची लिहितो, "संभाजीला सरळ मार्गाने पकडता येत नाही हे ज्यावेळी औरंगजेबाच्या ध्यानात आले तेव्हा त्याने आपल्या सरावातल्या फितुरीच्या मार्गाने कारस्थाने सुरू केली. त्याने कविकलशाला पत्र लिहून, मंत्र्यांना पैसे चारून, संभाजी या मंत्र्याकडून हाती येईल असे प्रयत्न सुरू केले. कविकलशाने औरंगजेबाच्या मागणीस मान्यता देऊन संभाजीला पकडून देतो असे कबूल केले. कविकलशाने संभाजीला सांगितले कीं तो राहात होता तेथून (कोठे?) दोन तीन कोसांवर एक सुंदर नववधू राहात आहे. इतके सांगणे पुरले. संभाजीने त्या गावात मुक्काम करून आपल्या कामवासना पुऱ्या करण्याचे ठरविले. संभाजीचा पवित्रा कळताच कवि कलशाने औरंगजेबाला कळविले कीं तू ५००० घोडेस्वारांची तुकडी पाठव म्हणजे संभाजी तुझ्या तावडीत सापडेल...संभाजी ठरलेल्या जागी पोचताच औरंगजेबाच्या सैन्याने त्याला पकडून औरंगजेबापुढे उभे केले, आणि त्याला हालहाल करून मारण्यात आले."[२] मानुत्चीने दिलेली ही माहितीही विपर्यस्त आहे. संभाजी कोठल्या गावास आहे हे तो सांगत नाही. त्याच्या म्हणण्याप्रमाणे कलशाने फितुरी केली; परंतु १६८८ सालापर्यंच्या उपलब्ध पत्रांवरून कलशाने कोठल्याही प्रकारे गैरवर्तन केल्याचे दिसत नाही. तो शेवटपर्यंत राजांच्या बरोबर असून त्याला धन्याबरोबरच देहदंडही सोसावा लागलेला आहे. मानुत्चीला या दोघांच्या हालचालीची माहिती होती असेही दिसत नाही. त्याचप्रमाणे तो एक थापाड्या आणि बाजारगप्पांवर विश्वास ठेवणारा म्हणून प्रसिद्ध आहे.

१. मोवंच, पृष्ठ ४९    २. SM–NM, Vol 2

अशाच तऱ्हेची हकीकत रॉबर्ट ऑर्म या लेखकानेही दिलेली आहे. त्याने आपले ' फ्रॅग्मेंटस ' संभाजीच्या मृत्यूनंतर ६०-७० वर्षांनी लिहिलेले आहेत. " औरंगजेबाला हे कळून चुकले होते की उघड सामन्यात संभाजी तावडीत सापडणार नाही. म्हणून त्याने अन्य मार्ग काढला. संभाजीच्या अंगी असलेला दोष ( स्त्रियांची आसक्ती ) त्याच्या नाशाला कारणीभूत होणार हे शिवाजीला कळलेले होते. हा दोष त्याच्या वाढत्या वयाबरोबर वाढतच गेला. संभाजीने कुठलीही संधी दवडली नाही. त्याला विविध स्त्रियांचा भोग घेण्यात विशेष आनंद वाटत असे. चांगल्या स्त्रीची माहिती कळली की ती आपल्याला केव्हा मिळेल याकडे तो लक्ष देत असे. असे करताना तो आपले कूळ, धर्म काय आहे हे पाहात नसे. पूर्वी सांगितल्याप्रमाणे कविकलश संभाजीला स्त्रिया पुरवीत असे. त्यामुळे अंगात कर्तृत्व नसताना संभाजीच्या राज्यकारभारात त्याला महत्त्वाचे स्थान मिळाले. त्याच्या नांवावरून आणि वागण्यावरून तो मुसलमान वाटतो. अशा माणसाकडून आपले काम करून घेणे औरंगजेबाला फारसे जड गेले नाही. औरंगजेबाने सर्व गोष्टी कविकलशावर सोपविल्या. संभाजीला विषप्रयोग किंवा त्याचा खून करण्याचा प्रयत्न करून, आपला जीव धोक्यात न घालता, फितुरी करण्याच्या संधीची कविकलश वाट पाहात बसला. ही संधी त्याला जून महिन्यात मिळाली.

" हे सर्वश्रुतच आहे की हिंदूंमध्ये आई-वडील आपली मुले लहान असतानाच त्यांची लग्ने जमवितात. वधू आणि वर आपापल्या मातापित्यांकडेच राहतात. मुली वयात आल्या म्हणजे त्यांना वाजत गाजत नवऱ्याच्या घरी नेतात. रात्री दिव्यांच्या उजेडात अशा मिरवणुका काढतात. या मिरवणुकांच्या मागे धार्मिक भावना असल्यामुळे त्यांना फारसा अडथळा येत नाही. एका मोठ्या घराण्यातील देखण्या नववधूची मिरवणूक निघून ती आपल्या सासरी चालली होती. पूर्वी आपण तिला पाहिले आहे असे कविकलशाने सांगून तिला पकडण्यासाठी संभाजीचे मन वळविले. संभाजी घोडेस्वारांची एक लहान तुकडी घेऊन निघाला. वाटेत गडबड झाली तर मदत असावी म्हणून कवि कलश मोठी तुकडी घेऊन संभाजीच्या मागे राहिला. कोणत्या गडावरून ही मिरवणूक आणि संभाजीची तुकडी केव्हा निघाली हे समजले नाही. बहुधा ती पन्हाळ्यावरून निघाली असावी. संभाजीने वरात उधळली. त्यावेळीच मुघलांच्या एका तुकडीने त्याला घेरले. त्याच्यावर हल्ला केला तरी ठार न मारता त्याच्या समशेरीच्या प्रतिहल्ल्याला तोंड देऊन त्याला फक्त पकडले, नंतर ते घोडदळ कविकलशावर चालून गेले. कविकलशाने प्रतिकाराचा फक्त देखावा केला. "

कविकलश मुसलमान असावा असेही तो म्हणतो. ऑर्म आणि मानुत्ची या दोघांनाही शिर्के आणि कलश यांच्यातील भांडणाची कल्पना दिसत नाही. संभाजी खेळण्याहून गेल्याची आणि शिर्के यांच्याबरोबर झालेल्या लढाईचीही

त्यांना माहिती दिसत नाही. ऑर्मने ऐकीव बातम्यांवरून मुलीची वरात, संभाजीची स्त्रीलालसा यांची माहिती दिलेली आहे. अशा प्रकारच्या वरातीची बातमी इतर कोणीही दिलेली नाही हेही लक्षात ठेवण्यासारखे आहे.

आता मुघल इतिहासकार किंवा लेखक संभाजी राजांच्या आयुष्यातील या दुर्दैवी प्रसंगाविषयी काय लिहितात ते पाहू. खाफीखान या लेखकाने या प्रसंगाचे सविस्तर वर्णन केलेले आहे. तो लिहितो, " दुष्ट संभाजी धामधूम आणि उच्छाद देण्यात नरकवासी शिवाजीपेक्षा दहापट अधिक ताकदवान ठरला. तो स्वतःला सवाई शिवाजी म्हणवून घेत असे. त्याच्या दुष्ट बापापेक्षा धामधूम करण्यात संभाजीचा अधिक दुर्लौकिक झाला होता. त्याचा छडा लावण्याची विशेष कामगिरी मुकर्रबखानाने आपल्या हेरांकडे सोपविली. " असे लिहिताना खाफीखान शिवाजी आणि संभाजीला शिव्याशाप देत असला तरी ती माहिती या पितापुत्रांचा गौरव करणारीच आहे असे वाटते.

" योगायोग असा की तो दुष्ट आपल्या रायरीच्या स्थानाहून निघून खेळण्याला पोचला " तो खेळण्याला योगायोगाने आला असे त्याला वाटते. " तेथे त्याने रसद वगैरेचा बंदोबस्त केला. त्याची खातरजमा करून घेतल्यानंतर तो परत फिरला. त्याचे ग्रह फिरले. बादशाही फौजा चालून येत होत्या याबद्दल तो गैरसावध राहिला. संगमनेर ( संगमेश्वर ) परगण्याच्या हद्दीजवळ मानगंगा आहे. ते स्थळ ( संगमेश्वर ) समुद्रापासून एका मजलेत आहे. मानगंगेत स्नाने करावी आणि सहल करावी म्हणून तो तेथे आला. " त्यावेळची राजकीय आणीबाणी पाहता संभाजीला सहलीला फुरसत मिळणे अशक्य वाटते.

" संगमेश्वर हे दुर्गम अशा डोंगरदरीत वसले आहे. त्या नालायक कुत्र्याचा ( संभाजी ) अपवित्र दिवाण कविकलश याने त्या स्थळी मोठा वाडा बांधला होता. ( हा वाडा सरदेसाई नावाच्या गृहस्थांचा असून अद्याप त्यांचे वंशज तेथे राहतात. ) तो त्याने विविध प्रकारे शृंगारला होता. त्याचप्रमाणे तेथे फुलाफळांच्या झाडांनी भरलेली बाग तयार केलेली होती. तेथे संभाजी, त्या दुष्टाचा मुलगा शाहू; बायकामाणसे ( तेथे संभाजी एकटाच गेला होता, शाहू आणि येसूबाई रायगडावर होते. ), कविकलश, इतर हितचिंतक आणि दोन तीन हजार स्वार तेथे पोचले. मृत्युरूपी बहिरी ससाणा आपल्यावर झडप घालणार याची त्यांना कल्पना नव्हती. त्यांनी स्नाने केली. संगमेश्वर हे अशा स्थळी आहे की तेथे जाण्याची वाट अत्यंत तापदायक आहे. रस्त्यांचे चढउतार भलतेच आहेत. शिवाय काटेरी अरण्याची गर्दी. हे सगळे लक्षात घेऊन संभाजी तेथे राहिला होता.

" संभाजीचा बाप श्रम साहस करणारा आणि काटक ( जफाकार ) होता. संभाजीची वागणूक त्याच्या अगदी उलट होती. दारू पिणे आणि पुष्पासारखे ( लालारुखसार ) गाल असलेल्या आणि चंद्राप्रमाणे ज्यांचा भालप्रदेश आहे अशा

स्त्रियांचा सहवास यांची त्याला फार आसक्ती ( रगबते तमाम ) होती. तो विलासात गुंग झाला ( बऐश परदाख्त ). मुकर्रबखानाचे चपळ हेर फिरत होते. विलास ( लहू व लाब ) करण्याने दुष्ट आणि जुलमी लोकांची घरे बरबाद होतात.

" संभाजी हा गाफील असून लहू व लाब ( विलास, क्रीडा )मध्ये मश्गूल आहे अशी बातमी हेरांनी मुकर्रबखानाला कळविली. त्या दुष्टाची ( संभाजी ) पाळेमुळे खणून काढण्याचा मुकर्रबखानाने बेत केला. संगमेश्वर किती दुर्गम आहे याचा त्याने विचार केला नाही. स्वतःच्या प्राणाचीही त्याने पर्वा केली नाही. त्याने निर्धार करून कंबर कसली. कोल्हापूरला त्याचे ठाणे होंते. तेथून त्या दुष्टाचे स्थळ ( संगमेश्वर ) ४५ कोसांवर आहे. मुकर्रबखानाने आपल्या बरोबर दोन हजार स्वार आणि शूर असे एक हजार पायदळ निवडून घेतले आणि तो रवाना झाला. त्याच्या सोबत्यांनी त्याला मना केले. रस्ता दुर्गम आहे. वाटेत अंबाघाट ( ? ) यासारख्या खोल दऱ्या आहेत, अशा ठिकाणी ३०–४० पायदळ शिपायांनी वाट अडवून दगडांचा वर्षाव केला तर मोठमोठी सैन्ये घाट उतरून जाणे कठीण आहे, या सर्व अडचणी मुकर्रबखानाच्या सोबत्यांनी त्याच्या समोर मांडल्या.

" पण तो शूर शिपाई जिहादाच्या उद्देशानेच निघाला होता. आपण त्या काफराला ( संभाजीला ) जेर केला तर गाजींच्यामध्ये आपला लौकिक होईल आणि दैव विपरीत होऊन मृत्यू आला तर आपण शहीद होऊन जाऊ, असा त्याने विचार केला. तों तडक मजला मारीत निघाला. अवघड वाट दिसली तर पायउतारा होऊन चाले. त्याचे सहकारी त्याच्याबरोबर होते. घनदाट वृक्षांनी भरलेल्या अरण्यातून ते विजेसारखे पार आले. संभाजीचे दैव फिरले होते. त्याचा मृत्यू जवळ आला होता. मुकर्रबखान आणि त्याचे सहकारी त्याच्याजवळ पोहोचले. असे म्हणतात की, ( खाफीखानाने ऐकीव गोष्टीच पुढे दिलेल्या आहेत) त्या अपवित्र कुत्र्याच्या ( संभाजी ) हरकऱ्यांनी बादशाही म्हणजे मुघल लष्कर आल्याची त्याला खबर केली. संभाजी गफलतीच्या धुंदीत होता. अशा ठिकाणी मुघल येतील म्हणणे म्हणजे केवळ शंका बाळगणे आहे. हा विचारच खोटा आहे असे तो समजला. त्याला भारी गर्व चढला होता. याशिवाय त्या माणसाला सर्वनाश करणाऱ्या दारूची धुंदी चढली होती. त्याने हरकऱ्यांच्या जिभा उपटून काढण्याची आज्ञा केली. ( हे सगळे अतिरंजित वाटते ! ) त्याने स्वारीची अगर मोर्चे बांधण्याची तयारी केली नाही. तो शूर सरदार ( मुकर्रबखान ), त्याचा मुलगा आणि पुतणे, दहाबारा शूर आप्त आणि दोन तीनशे स्वार हे विजेप्रमाणे, नागव्या तलवारी घेऊन, वध करण्यायोग्य आणि ज्यांची बुद्धी नष्ट झाली आहे अशा लोकांवर ( संभाजी आणि त्याचे साथीदार ) तुटून पडले. पण संभाजी गफलतीच्या धुंदीत होता आणि आता तर वेळ निघून गेली होती. त्याच्याबरोबर

जी फौज होती त्यापैकी बहुसंख्य फरार झाले. उरलेल्यांना घेऊन तो हत्यारे चढवून लढण्यास तयार झाला. संभाजीच्या शूर सोबती सल्लागारात त्याचा प्रधान हा एकनिष्ठ म्हणून प्रसिद्ध होता. त्याने संभाजीला आपल्या बरोबर घेतले. नामांकित सरदार बरोबर ठेवून लढण्यासाठी चालून आला. लढाईच्या सुरवातीसच त्याच्या ( कलश ) हाताला बाण लागला. त्यामुळे त्याचा उजवा हात निकामी झाला. तो घोड्यावरून खाली आला आणि ओरडून म्हणाला कीं मी मागे राहिलो. संभाजी पळून जाण्याच्या विचारात होता. त्याने घोड्यावरून उडी घेतली. तो म्हणाला, पंडितजी मी थांबतो. चार पाच मराठे मारले गेले. बाकी सगळे पळून गेले. कविकलश कैद झाला. दैव उलटलेला संभाजी एका देवळाच्या आश्रयाला गेला. तेथे तो कोंडून घेऊन लपला. मुघलांनी शोध केला. त्यांना संभाजीचा पत्ता लागला. तो निष्फळ धडपड करू लागला. शेवटी त्याच्या लोकांपैकी काही मारले गेले. नंतर संभाजी, त्याची बायका-मुले, लहान मुलगा, दोन बायका ( यापैकी तेथे कोणीच नव्हते ) काही आप्त आणि काही मातब्बर सोबती अशी मंडळी तेथे होती. एक रामराजा ( राजाराम ) त्यात नव्हता ( हे बरोबर आहे. ) कारण तो एका किल्ल्यात बंधनात होता. मुघलांनी सर्वांचे हात बांधले. त्यांचे केस धरून ओढीत त्यांना मुकर्रबखानाच्या हत्तीच्या पायापाशी नेण्यात आले. तोपर्यंत संभाजीने आपले केस काढून टाकले होते. अंगाला राख फासली होती आणि वेष बदलला होता. पण त्याच्या वस्त्राखाली मोत्याची माळ होती. मुघलांना संभाजीचा घोडा सापडला. त्याच्या पायात सोन्याचे तोडे होते. यावरून त्यांनी संभाजीला ओळखले. ”

संभाजी राजे पकडले गेले तेव्हा खाफीखान कोठे होता ते माहीत नाही. मुघलांनी १६८२ साली रामसेजला वेढा घातला त्यावेळी तो मुघलांच्या छावणीत होता. त्यानंतर त्यांनी १६८९ साली रायगड जिंकला तेव्हा तो अब्दुर्रजाकचा मदतगार म्हणून रायगड येथे होता ( १६९० ते १६९३ ). त्याने वर दिलेली हकीकत संभाजीच्या मरणानंतर ४४ वर्षांनी लिहिलेली आहे. संभाजी रायगडहून खेळण्यास आला हे खाफीखान सांगत नाही. तो शिर्के यांचा बंदोबस्त करण्यासाठी संगमेश्वरला गेला तेव्हा त्याची बायका-मुले रायगडावर होती. ती संगमेश्वरला नव्हती. संगमेश्वर अवघड जागी वसलेले आहे एवढे त्याचे वर्णन आणि राजाराम नजरकैदेत होता हे विधान बरोबर आहे. दारूच्या धुंदीत आणि विलासात राजे दंग होते ही त्याची माहिती अतिशयोक्तीतच जमा केली पाहिजे. शेवटच्या प्रसंगाची माहिती ऐकीव आहे हे ‘ असे म्हणतात की... ’ या त्याच्या विधानावरून उघड होते.

भीमसेन सक्सेना हा १६८९ साली बहादूरगडाच्या छावणीत होता. तो १६८६ ते १६८८ पर्यंत नळदुर्ग येथे नोकरीत होता. त्यानंतर तो मुघल छावणीत

आला. त्यामुळे त्याने दिलेल्या माहितीचा विचार करणे आवश्यक आहे. भीमसेन सक्सेना म्हणतो, “ रायगडला जाण्याचे संभाजीने ठरविले होते. त्यासाठी त्याने आपले कुटुंबीय आणि सैन्य पुढे रवाना केले. संभाजी स्वतः कविकलश ब्राह्मण याची वाट पाहत बसला. संभाजी त्याला आपला गुरू समजत असे. कविकलश हा पूजा व अनुष्ठान करण्यात गुंतला होता. आकस्मिकपणे संभाजी आणि कवि-कलश हे शाही फौजांच्या हाती सापडून कैद झाले. ” त्यांना बहाद्‌दूरगडला नेले होते त्यामुळे बहाद्‌दूरगडाच्या छावणीत भीमसेन सक्सेनाला जी माहिती कानावर आली आणि ज्या गोष्टी त्याला प्रत्यक्ष पाहावयास मिळाल्या तेवढ्याच त्याने दिल्या आहेत.

‘ बुसातिन उस् सलातिन ’ मध्येही संभाजी राजांवर ओढवलेल्या प्रसंगाची हकीकत दिलेली आहे. “ शेख निजाम दख्खनी...अलमगीर पादशाहाचे दरबारात येऊन चाकर मंडळीत दाखल जाहाला व मुखरबखान असा किताब मिळवून पन्हाळयाचा किल्ला हस्तगत करण्याचे कामावर नेमिला गेला होता. इतक्यात संभाजी हे त्याच दिवसात राहेरी येथून खेळण्याचे किल्ल्यास जाऊन तेथील बंदोबस्त करून संगमनेर ( संगमेश्वर ) येथे संभाजीचा दिवाण कबकलश याणे हवेली व बाग बांधली होती, तेथे राहून संतोषात व सुखात ( ऐषोइश्रतमें मश्गूल रहा ) निमग्न जाहला व यानंतर खान फिरुरजंग याला संभाजीचा निर्मूल फडशा करण्याच्या कामावर नेमिले होते...त्याचे डोळे गेले होते. यास्तव महमद अजमशहा याजला त्याचे बदलीवर नेमिले आणि अद्यापि शोधातच होते व संभाजी हाती लागला नव्हता. तोच येकायेकी संभाजीची खबर शेख निजाम यांजला समजली. ”

आतापर्यंत दिलेल्या लेखकांची माहिती पाहिली तर असे दिसते की चिटणीस बखर आणि म. सा. छो. बखर व भीमसेन सक्सेना कबजीचे अनुष्ठान आणि राजांची बेहोषी यामुळे संभाजी पकडला गेला असे म्हणतात, तर मानुत्‌ची आणि ऑर्म हे स्त्रीविषयक आसक्ती हे कारण देतात. पर्शियन लेखक मद्य आणि मदिरा या दोन्ही कारणांमुळे तो पकडला गेला असे म्हणतात. या सर्व माहितीचा एकत्र विचार केला तर ‘ संभाजी महाराज दारू पीतच नव्हते ’ असे निश्चयाने म्हणता येत नाही. तसेच त्यांच्या स्त्रीविषयक आसक्तीबद्दलही ठामपणे काही म्हणणे कठीण वाटते. कदाचित् ते थोडीफार दारु पीत असत असे मानले तरी त्यांनी ८-९ वर्षांच्या कारकीर्दीत ज्या पद्धतीने राज्यकारभार केला—जो आतापर्यंत कागदपत्रांच्या आधाराने दाखविण्याचा प्रयत्न केला आहे—त्याचा विचार केला तर स्वतःचाच नाश ओढवून घेण्याइतके संभाजीराजे दारूच्या बेहोषीत राहिले असतील असे वाटत नाही. मद्य-प्राशनाचा विपर्यास करून ऐकणारांनी आणि लेखकांनी त्यात तिखट-मीठ घालून राईचा पर्वत केला असण्याचा संभव आहे. या लेखकांच्या लिखाणात एकवाक्यता दिसत नाही हेही ध्यानात ठेवले पाहिजे.

उपलब्ध कागदपत्रांवरून हा दुर्दैवी प्रसंग कसा घडला असावा हे पुढे देण्याचा प्रयत्न केला आहे. १६८० ते १६८९ सालापर्यंत संभाजी महाराजांच्या कारकीर्दीचा साकल्याने विचार केला तर ही ८–९ वर्षे अत्यंत धामधुमीची होती असे दिसते. त्यामुळे दारूच्या धुंदीत राहावयास राजांना फारसा वेळ होता असे वाटत नाही. परकीय आक्रमणे आणि अनेक अंतर्गत प्रश्नांना त्यांनी तोंड दिलेले आहे. ते पकडले जाण्यापूर्वी काही महिने त्यांच्या नातेवाईकांनी बंड केल्यामुळे त्यांना बराच मानसिक त्रास झाला असावा. गोवळकोंडा आणि विजापूर पडल्यानंतर औरंगजेब मराठी राज्यावर सर्व शक्ती केंद्रित करणार हे उघड होते. अनेक मराठे वीर मृत्युमुखी पडलेले होते. सैन्यशक्ती कमी होऊन राज्यकारभारात पैशाचीही चणचण भासू लागली होती. त्यातच नातेवाईकांच्या बंडामुळे राजे वैतागून गेले असले तर नवल नाही. अशा अत्यंत आणीबाणीच्या काळात ते निराश झाले असणेही संभवनीय मानले पाहिजे. ते मुळात दारू पीत असतील तर वैतागाच्या आणि निराशेच्या भरात त्यांनी दारू घेतली असणे शक्य वाटते. शिर्के आणि कविकलश यांचे भांडण विकोपाला गेले नसते तर कदाचित् संभाजी राजांनी रायगड सोडलाही नसता आणि हा शेवटचा निर्घृण प्रसंग ओढवलाही नसता. इतिहासात काय किंवा व्यवहारात काय असे 'जर आणि तर' चे विचार मनात येणे स्वाभाविक असले तरी त्यामुळे प्रत्यक्ष ओढवलेले संकट चुकत नाही. संगमेश्वरसारख्या अवघड, दुर्गम, खोल जागी राजे पकडले गेले हे खरे असले तरी या स्थळाच्या वर्णनावरून ते पुरेसे सावध नव्हते, त्या ठिकाणी संरक्षणाची साधने पुरेशी नव्हती असे दिसते.

१६८८ सालच्या ऑक्टोबर–नोव्हेंबरच्या सुमारास संभाजीराजे रायगडला होते. कविकलश रायगडावर नसून तो पन्हाळा, मलकापूर, खेळणा या भागात वावरत होता. १६८८ च्या जानेवारी महिन्याच्या पूर्वी देवरुख येथील तिमाजी ना॥, कान्होबा ना॥, देशमुख व रामजी गोविंद यांच्यात देशमुखीच्या व्यवहाराबद्दल भांडण चालू होते तेव्हा ते दोघे प्रल्हाद निराजीकडे गेले. संभाजी राजांनी असे ठरविले होते की ज्याचे वृत्तीस ३०–३५ वर्षे भोगवटा चालला असेल तोच खरा देशमुख. या निर्णयाला कविकलशाने संमती दिली होती. प्रल्हाद निराजीने महाराजांच्या निर्णयानुसार दि. ६–१–१६८८ रोजी राजापूरच्या गंगाजी दादाजी सुभेदारास कळविले होते की, "तिमाजीच खरा. रामाजी गोविंद कथला करतो, त्यास कथला करावयास संबंध नाही."[1] प्रल्हादपंतांच्या निर्णयानुसार कविकलशाने दि. ८–१–१६८८ रोजी राजापूरच्या अधिकाऱ्यास वरील हुकमांची अंमलबजावणी करण्यास सांगितली होती.[2] मे व सप्टेंबर १६८८ च्या

१ मइसा, खंड २१, लेख ४५, ४६ २. कित्ता

दोन उपलब्ध पत्रांवरून कविकलशाचे राज्यकारभारात व्यवस्थित लक्ष होते असे दिसते. २७ मे १६८८ च्या पत्रात कविकलश तुळाजी देसायाला लिहितो, "तुजकडे वारणाकडेत पैकी हुजूर दप्तरी बाकी वोढत आहे. त्यापैकी बद्दल देणे ऐवज दाणा पागा सरसुभा रा. सेनापती, गला कैली नवसेरी सोळुले माप खंडी १० रास देविले असत. खुदनिस्बतपैकी आदा करून पावलियाचा कागद घेणे मलकापुरी पागा मशारनिले कडील छावणीस आहे. तेथे देणे पा। हुजूर" या तुलाजी देसायाकडे सरदेशमुखीचे कर्ज राहिले होते. तेव्हा ९ सप्टेंबर १६८८ रोजी कलशाने गला खंडी २० पैकी बदल देणे खर्चास मिरबातखान, दिलेरखानाचा भाऊ हुजूर आहे त्यास तकदीम होन ५॥ ४० रास देविले असेत. रवैश प्रमाणे आदा करणे."[1] असे पत्र तुलाजी देसायास लिहिले होते. कविकलशाने दिलेलखानाच्या भावास खर्चासाठी होन प्रमाणे ४० रास दिले होते.[2]

यावरून असे दिसते की कविकलश आपल्या मलकापूर प्रांतात व्यवस्थितपणे कारभार करीत होता. कान्होजी शिर्के हा प्रसंग घडण्यापूर्वी मुघलांना मिळाला होता. मुघलांनी आपले सैन्य पन्हाळगडाच्या परिसरात ठेवून कोल्हापूरला लष्करी छावणीही घातली होती. त्यांचा पन्हाळगडाला वेढा घालण्याचा हा तिसरा प्रयत्न होता. संभाजी राजांना पकडल्यानंतर मुघलांनी पन्हाळा, संगमेश्वर, मलकापूर येथील मुलूख बेचिराख केला.

मुल्तफितखानाचा अर्ज बादशहाला देण्यात आला. खानाच्या सैन्यात नागोजी (माने?) होता. संभाजीराजांच्या किल्लेदारांनी नागोजीकडे बातमी दिली की जर बादशाही सेना त्यांच्या प्रदेशात जाईल तर ते स्वराज्यातील किल्ले मुघलांना द्यावयास तयार होते. हे कळताच मुल्तफितखान सैन्य घेऊन खालौन (खेळणा?) गडाच्या बाजूला ८ कोसांवर मराठ्यांचा पराभव करण्यासाठी गेला. त्याने मराठ्यांच्या नारूगड (प्रचितगड (?) नायरी गावाजवळ) किल्ल्याच्या वाडीस आग लावली. किल्लेदार लढाईत मेला. मराठ्यांनी निकराने लढाई दिली. त्यात त्यांची २०० माणसे मेली. बरेच सामान आणि जनावरे मुघलांच्या हातात पडली. तेवढ्यात तोंडी बातमी आली की खान नारूगडावर पोहोचला तेव्हा मराठ्यांनी त्याच्याशी युद्ध केले. खान तेथून निघून गेल्याने बहरामंदखान (वजीर असदखानाचा भाचा) यास लिहून त्याला आपल्या मन्सबदारासह नारूगडाजवळ येण्याचा हुकूम देण्यात आला. नागूजी इत्यादी सरदारांना मुकर्रबखानाच्या सैन्यात जाण्यास सांगण्यात आले.[3]

---

१. शिचसा, खडं ३, ले. ६४४ २. कित्ता, ले. ६४५

३. अख : २९–९–१६८८

स्वराज्यावर मुघलांची प्रचंड चढाई होणार हे दिसत होते. अशा वेळी शिर्क्यांनी संधी साधून बंड केले असावे. ऑक्टोबर–नोव्हेंबर १६८८ मध्ये कविकलश आणि शिर्के यांच्यात काही तरी भांडण उपस्थित झाले. नेमके काय झाले असावे याची माहिती मिळत नाही. जेधे शकावलीत "शके १६१० कार्तिक मध्ये कविकलश याजवर शिरके पारखे झाले. कलश पळोन खिलणियावर गेला." अशी नोंद आहे. बखरीत म्हटल्याप्रमाणे शिर्के मंडळींनी शाहूला गादीवर बसवण्याचा कट केला असल्यास त्याला कविकलशाने विरोध केला असावा. त्यामुळे शिर्के रागावल्यामुळे कलश घाबरून खेळणा गडावर गेला असावा. संभाजीला कलशाबद्दल आपुलकी असली तरी शिर्के ही तर राजांची सासुरवाडीची मंडळी. अशा नाजूक नात्यातील भांडण ही काही साधी गोष्ट मानता येत नाही. झालेल्या भांडणाची आणि वर दिलेल्या नागोजीच्या फितुरीची माहिती कलशाने महाराजांना तावडतोब कळविली असावी. कारण राजे लगेच रायगडावरून कलशाच्या मदतीसाठी खेळण्यास आले. राजांनी शिर्क्यांच्या गावी जाऊन, त्यांच्याशी युद्ध करून त्यांना पळवून लावले आणि स्वतः पुन्हा खेळण्यास आले. जेधे शकावलीप्रमाणे, " तेच मासी ( कार्तिक १६१० म्हणजे ऑक्टोबर-नोव्हेंबर १६८८ ) संभाजी राजे रायेगडावरून कलशाचे मदतीस आले. समागमे स्वारी शिरकियांसी युद्ध करून त्यास पलऊन आपण खेलणियास आले." यावरून हे स्पष्ट होते की, शिर्क्यांचा अपराध किरकोळ स्वरूपाचा नसावा. कलश आणि शिर्के यांच्यातील भांडण किरकोळ स्वरूपाचे नव्हते असे पुढील उताऱ्यावरून वाटते. " शिर्के व भोसले यांच्या युद्धात प्रभावली प्रांतातील बराच मुलूख भोसले यांनी लुटून खराब केला होता."[1] खेळणागडाची डागडुजी करून तेथील बंदोबस्त राजांनी व्यवस्थित आहे की नाही हे पाहिले. संभाजी आणि कविकलश या दोघांनाही तेथून रायगडावर परत जावयाचे होते. प्रत्येक लेखकाने यासंबंधी उल्लेख केलेला आहे.

शिर्के यांचे प्रकरण मिटल्यानंतर संभाजी राजे रायगडावर परतण्यासाठी पन्हाळयाला गेलेले दिसतात. तेथे त्यांनी नरहर मल्हारच्या चुलत भावाची महाजनकीची तक्रार ऐकली. कृष्णाजी कोनेर स्वतः संभाजीराजांना भेटला. याबद्दल सन १७११ मधील नरहर मल्हारच्या एका तक्रारीत उल्लेख आहे. तो असा, " सन सीत समानीना ( १६८८ ) मधे राजश्री संभाजी राजे किले पनालियास आले. ते समयी कृष्णाजी कोनेर, आमचा चुलत बंधु, यानी हुजूर जाऊन माहाजनकीचे वर्तमान आद्यांती विदित केले. त्यावरून राजश्री संभाजी राजे यानी राजश्री प्रल्हादपंत न्यायाधीशे याजकडे मनसफी करावयाची आज्ञा केली. त्यावरून

१. सासंद्र, ले. १६, पृष्ठ १६

राजश्रीपंती प्रांतमजकूरचे देसक व देसकुलकर्णी व नाईकवाडी व पाटील कुलकर्णी गावोगावचे आणून मनसुफी निवाडा करावा तो किले पनालाहून राजश्री संभाजीराजे रायगडास चालिले. संगमेस्वरचे मुकामी सेख निजाम गनीम आला ते समयी वाताहात झाले."[1] यावरून प्रल्हादपंत १६८८ मध्ये पन्हाळयास होता. राजांनी मनसफी करावयाची आज्ञा केल्यानंतर थोड्याच दिवसांत शके १६१० मार्गशीर्ष म्हणजे नोव्हेंबर–डिसेंबर १६८८ मध्ये "संभाजीराजे याणी कलशाच्या बोले प्रल्हादपंत व सरकारकून व कित्येक लोकांस धरिले." शिर्के प्रकरणानंतर दुसऱ्याच महिन्यात ज्या अर्थी प्रल्हादपंत आणि इतर सरकारकुनांना अटक झाली त्या अर्थी या मंडळींचा शिर्के प्रकरणात हात असावा. शिर्के यांना ज्या ज्या लोकांनी मदत केली त्यांना कैद करण्यात आले होते असे दिसते. विठ्ठल नारायण याची मौजे पाडली तर्फ देवळे येथे खोती होती. तो शिर्क्यांना मिळाला म्हणून कलशाने त्याची खोती काढून त्यास खेळण्यास अटकेत ठेवले होते. त्याची खोती काढून खेळणागडाचा हवालदार कृष्णाजी कोंडा यास दिली. पुढे राजारामाने त्यास मुक्त करून त्याची खोती त्यास परत दिली.[2] या मंडळींनी दुसरे काही तरी फितुरीसारखे कटकारस्थान केलेले असावे. कारण दि. ९ मे १६८९ ला मुंबईकर लंडनला लिहितात, "रामराजा हा संभाजीचा भाऊ. एका फितुराने त्याला तीन महिन्यांपूर्वी मुघल उमरावांच्या हाती देण्याचा प्रयत्न केला. परंतु या राजद्रोह्याला संभाजीने ठार मारले."[3] कुठला तरी राजद्रोहासारखा गंभीर कट शिजलेला असल्यावाचून थोड्याच दिवसांपूर्वी महाजनकीचा निवाडा करण्यास सांगितलेल्या प्रल्हादपंतासारख्या न्यायाधीशाला इतक्या आणीबाणीच्या प्रसंगी राजांनी अटक केली नसती असे वाटते.

शिर्क्यांचा बंदोबस्त करून राजे पन्हाळयास गेले. तेथून ते रायगडावर जाणार होते. पन्हाळ्यावरून थेट रायगडावर जाणे राजांना सुरक्षित वाटले नसावे असे वाटते. कारण तोपर्यंत मुघल फौजा कोल्हापूरच्या परिसरात आलेल्या होत्या.[4] गोवळकोंडा जिंकल्यानंतर औरंगजेबाने मुकर्रबखानाची नेमणूक कोल्हापूर प्रांतावर केली होती. औरंगजेब भागानगरची मोहीम संपल्यानंतर संभाजीचीही खोडकी मोडणार असे सांगून, हे सर्व होण्यापूर्वी खेम सावंताने बादशहास मिळावे म्हणजे त्याचा फायदा होईल असे महादजी नाईक (निंबाळकर?) याने दि. १३–९–१६८६ च्या पत्रात कुडाळच्या खेम सावंताच्या निदर्शनास आणले

१. इऐति शिवकालीन घराणी, भाग ५ वा. ले. ३७०, पृष्ठ १०० व १०५

२. ताकाका–प, ले. ३२, पृष्ठ ५३

३. FR : Bom to Lon 9–5–1689

४. शिचसा, खंड १२, ले. ३८, पृष्ठ २३

होते.[1] १६८७ पासूनच मराठी राज्यावर निकराचे आक्रमण करण्याचा औरंगजेबाचा डाव होता.

औरंगजेबाच्या अधिकाऱ्यांनी हुकेरीच्या देसायाला पत्र लिहून ( डिसेंबर १६८८ ) आपल्या गोटात ओढण्याचा प्रयत्न केला होता. मिया शाकिर माहामद कोल्हापुरास होता. तेथे हुकेरीच्या देसायाला भेटण्यास बोलाविले होते.[2] हुकेरीचा देसाई मुघल अधिकाऱ्यांना न भेटल्यामुळे त्याला परवाना सादर झाल्यावर कोल्हापुरास बोलाविले होते.

पन्हाळ्यालाच या सर्व गोष्टींचा सुगावा लागल्यामुळे संभाजी राजांनी पन्हाळा, कऱ्हाड, सातारा, वाई, महाड मार्गे रायगडावर न जाता पन्हाळ्याहून संगमेश्वरला जाऊन तेथून चिपळूण, खेड मार्गाने रायगडावर जाण्याचे ठरविले असावे. संगमेश्वरची वाट अवघड असल्याने त्यांनी हा मार्ग पत्करला असावा. खाफीखान वर्णन करतो त्याप्रमाणे खरोखरच हे दुर्गम डोंगरदरीत वसलेले स्थान निवडणे योग्यच होते. मुघलांची फौज कोल्हापूरच्या परिसरात आल्यामुळे त्यांना वाट बदलावी लागून ते संगमेश्वरला गेलेले दिसतात.

संभाजी आणि कविकलश जानेवारी १६८९ मध्ये संगमेश्वरला गेले असावेत. तोपर्यंत शिर्के यांच्या कटकटी संपल्या नव्हत्याच. त्या इतक्या विकोपाला गेल्या होत्या की शिर्के घराण्यात आणि खोत मंडळीत खून-मारामाऱ्या होत होत्या. यातील एक प्रकरण असे : " विठोजी सिर्के याची भावजय कासीबाई यांस कोतळुक व मासू हे गाव मोकासा संभाजी राजे यांनी दिले असता तेथे शिर्क्यांची पागा होती. दाणेकरी गावगना जाऊन बलात्कारे खल्यावरून दाणे भरून नेत. मौजे मासू हा गाव हरबा देसाई याकडे बाधेरीतीने खोती हक्काने होता. त्यापैकी बावल तुरवटे येथील भातही एकदोन वेळा नेइले. देसाई व सिर्के यांचे राउतात कटकट होऊन सिर्क्यांचा रखवालदार धर्मा माहार कवटेकर होता त्यास ठार करून पेंढ्यात घालून आग दिल्ही. मग देसाई यांनी सिर्क्यांची पागा मोडून टाकली व संगमेश्वरी संभाजी राजे यांसी वृत्त सांगून सिर्क्यांकडील मोकासा काढून सरकारात गाव ठेवले. "[3]

राजे संगमेश्वरला गेल्याचे माहीत असल्यामुळे देसाई त्यांना भेटावयास गेला. त्याने देसाई आणि शिर्के यांच्यामधील वाद सांगितला. त्यावर संभाजी महाराजांनी शिर्क्यांकडील मोकासा काढून गाव सरकारात ठेवले. संभाजी राजे यांना पकडण्यापूर्वी काही दिवस अगोदर ही घटना घडली. शेवटपर्यंत लोक त्यांना आपली गाऱ्हाणी दूर करून घेण्यासाठी भेटत असत हे या उदाहरणावरून स्पष्ट

१. शिचसा, खंड १३, ले. ८, पृष्ठ १३

२. शिचसा, खंड १२, ले. ३८, पृष्ठ २३

३. पेद, खंड ३१, ले. ४६

होते. आपला राजा चैनीत आणि दारूच्या नशेत असतो हे लोकांना माहीत असते तर प्रजा त्यांना भेटू शकली नसती असे वाटते. मग गाऱ्हाणी दूर करणे लांबच राहिले. प्रजेचा राजावर विश्वास होता आणि ते आपली प्रजापालनाची कर्तव्ये शेवटपर्यंत पार पाडीत होते असे म्हणावयास काही हरकत वाटत नाही. ऑक्टो-बर–नोव्हेंबर १६८८ साली त्यांनी रायगड सोडल्यानंतरच्या ३–४ महिन्यांत घडलेल्या या गोष्टीचे बखरकार, ऑर्मे आणि मानुत्ची या लेखकांना अज्ञान आहे.

संभाजी राजे प्रत्यक्ष कसे पकडले गेले हे पाहणेही आवश्यक आहे. राजांचा मुक्काम संगमेश्वरला असताना शेख निजाम पन्हाळा घेण्यासाठी कोल्हापुरापर्यंत गेला होता. संभाजीला जिवंत पकडण्याची औरंगजेबाची इच्छा होती. त्याच्या मनात हा विचार जुलै १६८८ पासून चालू असावा. या संबंधात इंग्रजांना काही सुगावा लागलेला दिसतो. मद्रासकडून लंडनला गेलेल्या पत्रात ते लिहितात : " राजाचे ( संभाजी ) मदतनिसांचा काटा काढल्याने व त्यांचा समूळ नाश झाल्याने आता खास आपल्यावर होणाऱ्या स्वारीला आपणास कसे तोंड देता येईल या चिंतेने राजा अगदी व्यग्र झाला आहे. मुघलांच्या छावणीतून...भवानी-दास नावाचा एक नागर ब्राह्मण येथे आला आहे. तो सांगतो की औरंगजेब तर संभाजीला जिवंतच पकडण्याची भाषा बोलतो आहे. "[१]

संभाजीराजे शिर्क्यांच्या भांडणामुळे रायगड सोडून निघाल्यामुळे औरंग-जेबाला आयतीच संधी मिळाली. त्यांनी रायगड सोडल्याचे कळताच औरंग-जेबाने आपला अधिकारी आसदखान याला पत्र लिहिले की, " तुम्ही ज्या मुकर्रब-खानाला पन्हाळा घ्यावयास पाठवला आहे त्यास तातडीने कळवा की त्याने ताबडतोब तेथील जहागिरदारावर ( संभाजीवर ) चालून जावे. तो जहागिरदार रायरीहून एकटाच खेळण्याला गेला आहे. त्याचे जाण्याचे कारण म्हणजे शिर्क्यांशी ( The tribe of Bargi ) भांडण देणे आहे. बहुत करून खान त्या जमिन-दाराला ( संभाजीला ) कैद करू शकेल आणि मुसलमानांची छळणूक करणारा व दुराचारी यावर सूड घेईल. "[२] या पत्रावरून औरंगजेब अशा संधीची वाट पाहत होता असे ध्यानात येते. बादशहाला नागोजी आणि शिर्के मंडळींनीच ही संधी मिळवून दिली. शिर्के मंडळी मुघलांना यापूर्वीच मिळालेली होती. औरंगजेबाच्या सल्ल्याने त्यांनीच संभाजीला रायगडावरून बाहेर काढण्याच्या हेतूने काही तरी भांडण उकरून काढले असणे शक्य आहे.

संभाजीस कसे पकडले याची सविस्तर माहिती मराठी कागदपत्रात किंवा इंग्रजांच्या पत्रव्यवहारात मिळत नाही. ती फक्त बखरकार आणि फारसी लेखक

१. FR : Ft. St. G. to Lon, 18–7–1688

२. RA, Letter CX. p 110–111

विस्तृतपणे देतात. जेधे शकावलीत नोंद सापडते ती अशी, "माघ वद्य सप्तमी शुक्रवासर (सन १६८९ फेब्रुवारी १) संभाजीराजे व कविकलश खेळण्याहून रायगडास जावयास संगमेश्वरास आले असतां शेख निजाम कोल्हापुराहून दौड करून येऊन उभयतांस जिवंतच धरून नेले. वरकड लोक पळून रायगडास गेले."[१] खेळण्याहून रायगडला जाताना वाटेत त्यांनी संगमेश्वरला मुक्काम केला असे यात स्पष्टपणे म्हटलेले आहे. हे दोघे संगमेश्वरला काही कामाकरिता गेले का चैन आणि अनुष्ठान करण्यासाठी गेले याचा जेधे शकावलीत काहीच उल्लेख नाही. इतिकदखानाने १६८८ सालच्या डिसेंबर महिन्यात रायगडला वेढा घातला होता. त्यामुळे त्यांना रायगडला जाण्याची घाई होती.

संभाजी राजांना पकडून बहादूरगड येथे औरंगजेबासमोर उभे करण्यात आले. औरंगजेबाचा चिटणीस आणि चरित्रलेखक साकी मुस्तैदखान आणि भीमसेन सक्सेना हे त्यावेळी तेथे होते. त्यामुळे इतर लेखकांच्या माहितीपेक्षा या दोघांनी दिलेली माहिती विश्वसनीय मानावी लागते. साकी मुस्तैदखान लिहितो, "शेख निजाम हैद्राबादी याला मुकर्रबखान पदवी होती. त्याला पन्हाळगड घेण्यासाठी विजापुराहून रवाना करण्यात आले होते. हा किल्ला गनिमांच्या ताब्यात होता. मुकर्रबखान अतिशय हुशारीने आणि सावधपणे वागत होता. त्याने संभाजीची बातमी काढून आणण्यासाठी स्वतःचे हेर नेमले. एकाएकी त्याला बातमी लागली की संभाजी आणि त्याचे आप्त असणारे शिर्के मंडळी यांचे भांडण झाले. याकरिता तो रायरीहून खेळण्यास गेला. त्यांचा त्याने बंदोबस्त केला. खेळण्याच्या किल्ल्यात सगळी सामुग्री आहे याची त्याने खात्री करून घेतली. यानंतर तो संगमेश्वर येथे आला. तेथे त्याचा कारभारी कवि कलश याने बागा आणि वाडे बांधले होते. तेथे संभाजी विलासात दंग झाला आहे."

"ही बातमी ऐकून मुकर्रबखान कोल्हापुराहून निघाला. तेथून संगमेश्वर ४५ कोसांवर होते. मुकर्रबखानाबरोबर निवडक लोक होते. तो एकाएकी चाल करून गेला. संभाजीच्या हेरांनी त्याला बातमी दिली की मोगलांची फौज चाल करून येत आहे. पण संभाजीने तिकडे लक्ष दिले नाही. पण मुकर्रबखान एकाएकी चालून आलेला पाहून संभाजीने चार पाच हजार दखनी (मराठे) भालाइतांना घेऊन हल्ला केला. योगायोग असा की मोगलांचा एक बाण कविकलशाला लागला. थोड्या मारामारीनंतर तो पळाला. संभाजी कोल्ह्याच्या वृत्तीचा. तो कविकलशाच्या हवेलीरूपी बिळात लपला. त्याला वाटले की आपल्याला कोणी पाहिले नाही. बातमीदारांनी चौकशी करून मुकर्रबखानाला कळविले की तो

१. शिचप्र, पृष्ठ ३४–३५, ४८

हवेलीत लपलेला आहे. मारामारीत जे पळून चालले होते त्यांचा मुकर्रबखानाने पाठलाग केला नाही. त्याने हवेलीला वेढा घातला. मुकर्रबखानाचा मुलगा इखलासखान हा आपल्या शूर सहकाऱ्यांसह जिन्याच्या वाटेने आत घुसला. संभाजीचे केस धरून ओढीत त्याने मुकर्रबखानाच्या स्वारीच्या हत्तीच्या पायापाशी आणले. कबजी हा आधीच पकडला गेला होता. संभाजी बरोबर त्याची प्रतिष्ठित अशी पंचवीस माणसे आपल्या कुटुंबियांसह कैद झाली. ”

साकी मुस्तैदखान संभाजी राजांना कविकलश यांच्या वाड्यात पकडले असल्याचे वर्णन करीत असला तरी महीपतगडचा सुभेदार रामचंद्र बल्लाळ भगवंतराव त्रिंबक प्रतिनिधी यांस दि. १९–१०–१७७१ च्या पत्रात राजांना नावडी येथे पकडल्याचे लिहितो.[१] त्यावरून राजे लढाई दिल्यानंतर वाड्यात किंवा देवळात गेलेले दिसत नाहीत. मुघलांच्या हातून निसटण्यासाठी त्यांनी संगमेश्वरातून पळून जाण्याचा प्रयत्न केलेला असावा. कसबा संगमेश्वरपासून दक्षिणेस संगमेश्वर बंदर असून तेथे नावडी हे खेडे आहे. संभाजी राजे आणि मुकर्रबखान यांच्या-तील चकमकीनंतर संभाजी राजे बंदरातून निसटण्यासाठी नावडी येथे गेले असावे. प्रत्यक्ष संगमेश्वराची आणि भोवतालच्या परिसराची प्रस्तुत लेखकाने पाहणी केल्यानंतर सरदेसाई यांच्या वाड्याकडे जाण्यापेक्षा संभाजी राजे नावडी गावाकडे, बंदराकडेच जाऊन तेथील बंदरातून निसटून जाण्याचा प्रयत्न करणे अधिक संभवनीय वाटते.[२] सरदेसाई यांच्या कसबा संगमेश्वर येथे असलेल्या वाड्याकडे गेल्यावर तेथून पुन्हा पळावयास योग्य मार्ग नसावा असे वाटते. ते त्या वाड्यात राहात असले ( होतेच ) तर त्याच वाड्यात लपावयास जाणे फारच कठीण वाटते.

कविकलशाने संगमेश्वरला वाडे बांधले होते या म्हणण्यात मात्र तथ्य नाही. संभाजी राजे यांना ज्या वाड्यात पकडले (?) तो सरदेसाई यांचा वाडा आहे. संभाजी आणि कविकलश त्यांच्याच वाड्यात उतरत असत अशी माहिती सर-देसाई घराण्याच्या कागदपत्रात मिळते. संभाजी राजे तेथे विलासात दंग होते असे मात्र निश्चितपणे म्हणता येत नाही. कारण त्यांनी तेथे जो पुढील निवाडा दिला आहे त्यावरून तेथेही ते राज्यकारभार पाहात होते हे स्पष्ट दिसते.

**अखेरचा निर्णय :**

अर्जोजी यादव आणि गिरजोजी यादव यांच्या कऱ्हाड व औंध येथील वतनाचे भांडण शिवाजी महाराजांच्या काळापासून चालू होते. तो वाद संभाजी

---

१. पेद, खंड ३९, ले. १३८

२. खाडीतून जयगड बंदर सुमारे१२मैल अंतरावर असल्यामुळे तेथून गेलेल्यांचा घोड्यावरून पाठलाग करणे कठीण होते. खाडीतून दक्षिणेकडे राजापूर किंवा उत्तरेकडे दाभोळमार्गे रायगडला जाणे संभाजीराजांना शक्य होते.

राजांच्या कारकीर्दीच्या शेवटपर्यंत चालू होता. अर्जोजी यादव संभाजी राजांना भेटण्यासाठी संगमेश्वरला गेला. त्यावेळी राजांनी अर्जोजी यादवला वतनपत्र करून दिल्यावर त्याच्यावर राजमुद्राही करून दिल्या. ही कागदपत्रे ज्या दिवशी सरकारकुनांकडे सही-शिक्क्यासाठी पाठविण्यात आली त्याच दिवशी संभाजी राजे पकडले गेले.[१] शेवटच्याच दिवशीच्या या उपलब्ध पत्रावरून राजे चैनीतच दंग न राहता आपली कर्तव्येही करीत होते असे मान्य करावे लागते. गिरजोजी यादवावर संभाजी राजांची मर्जी होती. त्यानेच दुर्गाबाई या राजांच्या बायकोला सोडवून आणण्यासाठी श्रमसाहस केले होते. या जाणिवेतूनही क्वचित राजां संगमेश्वरास असताना त्याला वतनपत्रे करून दिली असावी.

मुघलांचा तळ कोल्हापूरला पडलेला होता. त्यांचे सैन्य संगमेश्वरसारख्या दुर्गम स्थळी येईल याची राजांना कल्पना नसावी.

संभाजी राजे संगमेश्वरला असताना श्रीसमर्थांचा शिष्य, पाली येथील मठाचा रंगनाथ स्वामी त्यांच्या बरोबर होता.[२] हे स्वामी तेव्हा राजांच्या जवळ असल्याने त्यांच्या हातून गैरवर्तणूक, अपेयपान होण्याचा संभव फार कमी वाटतो.

राजे प्रत्यक्ष पकडले जाण्यापूर्वी मराठे आणि मुघल यांच्यात चकमकी झाल्या याविषयी कोणाचाही मतभेद नाही; मतभेद आहेत ते मराठ्यांच्या व मुघलांच्या सैन्यशक्तीविषयी. या चकमकीच्या वेळी म्हालोजी घोरपडे संभाजी राजांच्या मदतीस धावून गेले. कदाचित मुकर्रबखान कोल्हापुराहून राजांना पकडण्यासाठी निघाला हे कळल्यावरून म्हालोजी पन्हाळ्याहून राजांच्या मदतीस गेले असतील; किंवा राजे पन्हाळ्याहून संगमेश्वरास गेले तेव्हाच ते त्यांच्याबरोबर असतील. मुघल व मराठ्यांची जी चकमक उडाली त्यात हे दुसरे सरनोबत स्वामींसाठी धारातीर्थी पडले. घोरपडे वंशावळीत या चकमकी संबंधी खालील मजकूर आढळतो “ ... राजाराम साहेब रायेगडी होते. नंतर संभाजी महाराज यांणी म्हलोजी घोरपडे यांसी स ( रंजामी ) देऊन मुखत्यारी सांगोन सरनोबतची वस्त्रें दिल्ही आणि किले पनोळेस ठेऊन आपण रायेगडास गेले. पुढे राज्यांत फौजा येऊन संभाजी महाराज मुलुक सर करीत होते. इतक्यात अवरंगजब पादशहा याची फौज चालून आली सबब म्हलोजी घोरपडे महाराजाकडे संगमेश्वरास गेले. तेथे पादशाहकडील फौजेची व महाराजाची लढाई होऊन संभाजी महाराज यासी धरुन नेहले त्या गर्दीत म्हलोजीबाबा घोरपडे ठार जाहले.”[३] अशाच तऱ्हेचा मजकूर काव्येतिहास संग्रहातील पत्रे, यादी मध्ये आहे. परंतु त्यातील शक

---

१. ताकाका—प, ले. ३२२, पृष्ठ ४७२; ले. १४३, पृष्ठ १९५. हा निवाडा पृष्ठ ३९३ वर दिलेला आहे.

२. श्रीसांका, लेख ३४५, पृष्ठ ३४७

३. वाइवि, भाइसंमं, शके १८३६, ले. २०, पृष्ठ ६०

१६१० विभव जेष्ठ शुद्ध १० मंदवासरी (२९ मे १६८८) ही तारीख चुकलेली आहे. कविकलश आणि संभाजी राजांना पकडले तेव्हा त्यांच्याबरोबर असलेले रंगनाथ स्वामी तेथून निघाले आणि वाघापुरीस गेले. तेथेच त्यांनी श्रीरामांच्या मूर्तीचे रक्षण केले.[1]

या दोघांना पकडल्यानंतर मुघलांनी संगमेश्वरला छावणी केली. याच वेळी औरंगजेब विजापुराहून निघून अकलूजला पोचला. संभाजी आणि कविकलश यांच्या मिरवणुकीची विस्तृत हकीकत खाफीखान देतो. "इराणच्या पद्धतीप्रमाणे त्यांना डोक्यावर लाकडी फळ्यांच्या लांबट टोप्या घालण्यात आल्या. त्यांच्या अंगावर विदूषकी थाटाचा पोशाख घालण्यात आला. त्यांचा सारखा छळ करण्यात येत होता. लाखो (?) लोकांना त्यांची विटंबना चाललेली दिसत होती. त्यांना उंटावर बसविण्यात आले होते. शिंगे, कर्णे, नगारे इत्यादि वाद्ये वाजविण्यात येत होती. अशा स्थितीत कैद्यांना लष्करात आणण्यात आले. लोकांचे कान ज्यांना ऐकण्यासाठी आतुर झाले होते ते विजयसूचक नगारे झडू लागले. लाखो हिंदू आणि मुसलमान त्या दुष्ट आणि बंडखोर काफरांच्या छळामुळे होरपळून निघालेले होते. ते दुःखी होते. त्यांना या विजयसूचक नगाऱ्यांचा संदेश सुखदायक वाटला. त्यांचा आनंद गगनात मावेना."

"असे म्हणतात की, मुकर्रबखान येत असल्याची बातमी आली. तो येऊन पोहोचेपर्यंतच्या चार पाच दिवसांत बायका काय, पुरुष काय सर्वांना हर्षवायू झाला. आनंदाने त्यांना झोपा आल्या नाहीत. जागजागी गोळा होऊन ते धन्यवाद देत मुकर्रबखानाचे स्वागत करीत होते. वाटेत असलेल्या प्रत्येक खेड्यात आणि भोवतालच्या प्रदेशात जेथे जेथे ही बातमी पोहोचली तेथे चौघडे झडू लागले. जिकडून जिकडून म्हणून कैद्यांना नेण्यात आले तिकडे सर्व जागा स्त्रीपुरुषांनी भरून जात. मुकर्रबखानाचे हर्षभराने स्वागत करण्यांत येई. काही दिवस तर रात्री शबेबरात (सण) आणि दिवसा ईद (सण) अशी लोकांची स्थिती झाली."[2]

त्यानंतरची हकीगत साकी मुस्तैदखानाने दिलेली आहे. तिचा सारांश असा, "बादशहाने सरदारखान आणि हमीदुद्दीनखान यांस आज्ञा केली की, 'तुम्ही मुकर्रबखानास सामोरे जावे आणि संभाजीला बेड्या घालून आणावे' मुकर्रबखान युक्ती प्रयुक्तीने मराठ्यांच्या मुलखातून बाहेर पडला. आलमगीर बादशहाच्या भाग्याने संभाजीच्या साहाय्यकांपैकी आणि पाठीराख्यांपैकी कोणीही त्याच्यासाठी काही धडपड करू शकले नाही. जेव्हा बादशाही सैन्याने अकलूजहून कूच करून बहादूरगड येथे (दि. १५–२–१६८९) छावणी केली तेव्हा

१. श्रीसांका, ले. ३४५, पृष्ठ ३७४ २. मस्वायु–प, पृष्ठ १८–१९

कैद्यांना लष्करात आणण्यात आले. बादशहाने आज्ञा केली की, संभाजीला लष्करापासून दोन कोसांवर तख्ता कुलाह ( इराणमध्ये गुन्हेगारांच्या अंगावर घालीत तसा पोशाख आणि विदूषकासारखी उंच लाकडी टोपी ) चढवावे. त्याच्या सहकाऱ्यांच्या अंगावर विदूषकी वस्त्रे घालावी. त्यांना तऱ्हेतऱ्हेने पीडा देऊन त्यांची विटंबना करावी. त्यांना उंटावर स्वार करावे आणि ढोल बडवीत आणि शिंगे, कर्णे वाजवीत त्यांना लष्करात आणि दरबारात आणावे. सारांश सर्वांना लष्करातून धिंड काढून फिरविण्यात आले. दिवाणे आममध्ये बादशहा बसला होता. त्यावेळी संभाजीला दरबारात आणण्यात आले. बादशहाने आज्ञा केली की, ' त्यांना कैदखान्यात घेऊन जा.' त्याच वेळी बादशहा आपल्या आसनावरून खाली उतरला. गालीच्याच्या कोपऱ्यावर बसून त्याने अल्लाचे आभार मानले. बादशहाच्या नेत्रांतून अश्रुबिंदू प्रकट होऊ लागले. "

ईश्वरदास नागरही १६९५ च्या पुढे ब्रह्मपुरीच्या छावणीत आला. त्याने दिलेली हकीकत साकी मुस्तैदखानाने दिलेल्या माहितीशी बरीचशी जुळते. याप्रसंगी संभाजी राजांची वागणूक कशी होती त्याविषयी लिहिताना तो म्हणतो, " दिवाणखान्याच्या प्रवेशद्वारापर्यंत ते येऊन पोचल्यावर बादशहाच्या आज्ञेने त्यांना न्यायालयासमोर उभे करण्यात आले. बादशहाने संभाजीकडे पाहिले. त्याची दुर्दशा पाहून बादशहाच्या मनावर परिणाम झाला. यानंतर बादशहा सिंहासनावरून खाली उतरला आणि त्याने प्रार्थना करून परमेश्वराचे आभार मानले. "

हे कविकलशाने पाहिले त्यावेळी त्याचे सर्व अवयव जखडून टाकलेले असल्यामुळे त्याला दृष्टी आणि वाचा यांचाच उपयोग करणे शक्य होते. तो चांगला हिंदी कवी होता. या कठीण प्रसंगातही त्याने संभाजीराजांना उद्देशून पुढील अर्थाची हिंदी कविता म्हटली असे खाफीखानाने नमूद केलेले आहे. " हे राजन, तुला पाहून, तुला ताजीम देण्यासाठी आलमगीर बादशहाही आपल्या आसनावरून खाली आला आहे. "

" पण संभाजी हा गर्विष्ठ होता. त्याची इतकी अवस्था झाली तरी त्याने बादशहाला ताजीम देण्यासाठी म्हणून यत्किंचितही मान लवविली नाही. इखलासखान आणि हमीदुद्दीनखान यांनी त्याला पुष्कळ समजाविले. पण त्याचा काही उपयोग झाला नाही. "—ईश्वरदास नागर.

एकीकडे संभाजीची ही बाणेदार वर्तणूक दिसते तर बखरीत आणि दंतकथांतून दुसरीच हकीकत प्रचलित आहे. म. रा. चिटणीसांनी बखरीत वरील मजकुराशी अगदी विसंगत अशी माहिती दिलेली आहे. " संभाजी बत्तीस पस्तीस वर्षांत तारुण्य, पूर्ववयात बहूत स्वरूप सुंदर होते. पातशाहांनी पाहून विचार केला की, यास बाटवावा, मुसलमान करून नंतर मन्सब सरदारी देऊन ठेवावा. म्हणजे मुसलमानी झाली. हा पुरुष चांगला व थोरले घरंदाज ( कुळातील ) आहे म्हणून

विचारावयास पाठविले की 'तुम्ही बाटावे म्हणजे जीव वाचवून तुमची दौलत तुमचे स्वाधीन करतो.' त्यावरून राजे याणी उत्तर केले की, 'बाटा म्हणता तरी हे गोष्ट घडावयाची नाही. ज्या अर्थी कैदेत आलो, तेव्हा वाचणे ते काय? तुमचे विचारास येईल ते करावे. तथापि तुमची बेटी द्यावी म्हणजे बाटतो' ऐसे उत्तर सांगून पाठविले. त्याजवरून पादशाहास कोप आला. आणि सर्व वजीर, अमीर यांस विचारले की, 'यास काय करावे?' तेव्हा सर्वांनी सल्ला दिली जे 'हा आहमक आहे. वेहोष व उद्दाम आहे. याचा शिरच्छेद करावा.' याप्रमाणे बोलताच आयुर्दाय सरला तशी पादशाहास बुद्धी होऊन शिरच्छेद करावयास सांगितले. तेव्हा तत्काळ आणून तुळजापुरावरी शके १६१० विभवनाम संवत्सर मारिले. संभाजी राजे सुरतपाक (सुंदर चेहऱ्याचे) म्हणोन पादशाहा बोलून ठेवीत होते. त्यांणी उत्तर केले की, 'तुमची बेटी द्यावी.' त्याजवरून पादशाहा त्यांचा वध करितात, हे बेगमेस कळोन, सांगोन पाठविले की, 'वध करू नये.' तो मारिले. याजमुळे बेगम* बोलली जे, 'त्याचा प्राण माझे नावे करून गेला. या उपरि आपण दुसरा भ्रतार करणार नाही.' ऐसा निश्चय करून राहिली."[1]

* **टीप :** औरंगजेबाची मुलगी झेबुन्निसा हिचा शंभुछत्रपतींशी प्रेमसंबंध होता, त्यास तिने मनाने वरल्यामुळे, त्याव्यतिरिक्त दुसऱ्यापाशी लग्न करणे अधर्म्य होय अशी झेबुन्निसाची समजूत असल्यामुळे ती जन्मभर अविवाहित राहिली व शंभुछत्रपतींचा मुलगा शाहू यास तिने वात्सल्य-प्रेमाने सांभाळिले, इतकेच नव्हे तर शाहूच्या सुटकेस तीच कारणीभूत झाली वगैरे हकीकत सर्व बखरींतून, शालेपयोगी पुस्तकांतून आढळते.

या झेबुन्निसाची हकिकत अशी; औरंगजेबाचे लग्न शहानवाजखानाची मुलगी दिलरस-बानूशी १६३७ मध्ये होऊन, तिच्या पोटी औरंगजेबास पाच अपत्ये झाली. त्यांतील झेबुन्निसा (लावण्यलतिका) हिचा जन्म दि. १५–२–१६३८ रोजी झाला. ही लहानपणापसून हुषार होती. फारशी व अरबी या भाषांतील अक्षरे काढण्यात ही तरबेज होती. तिचा पुस्तकांचा संग्रह मोठा होता. ती उत्तम प्रकारची कवायत्रा होती. औरंगजेबविरुद्ध सुलतान अकबराने बंड केले, त्यात तिचा हात असल्याने औरंगजेबाने तिला सालिमगड येथे कैदेत ठेविले. अकबराशी झालेला तिचा पत्रव्यवहार उघडकीस येताच तिचा तनखाही बंद करण्यात आला, मालमत्ता जप्त करण्यात आली. बंदिवासात तिचे फार हाल झाले. तेथेच ती दि. २६–५–१७०२ मध्ये मरण पावली. यावरून झेबुन्निसा दक्षिणेत आलीच नाही हे उघड आहे.

औरंगजेब बादशहाबरोबर त्याची दुसरी मुलगी वृद्ध कुमारिका जिनतुन्निसा ऊर्फ पादशाही बेगम होती. ती आपल्या बापाबरोबर दक्षिणेत त्याची व्यवस्था पाहात असे. शाहूला जिनतुन्निसाच्याच ताब्यात देण्यात आलेले होते. बापानंतर ही पुष्कळ वर्षे जिवंत होती.

१. मराचिब, पृष्ठें २५–२६

पंतप्रतिनिधीच्या बखरीत सुद्धा हे बाटविणे आणि कन्येचे प्रकरण दिलेले आहे.[१]

शेडगावकर बखरीत असाच मजकूर आहे. याशिवाय, "कबजी बावा याचे डोकीत लोखंडाचा सोटा घालून त्यास ठार मारले...संभाजी प्रधान समवेत घेऊन तुळापुरास नेले...अवरंगजेबे...संभाजीस बोलावून नेले...ते कुर्निसात न करिता...कचेरीत उजवे बाजूस बसले."

दि. १६-१-१६९१ ला गोव्याच्या विजरईने पोर्तुगालला लिहिले की मुघल बादशहाने संभाजीला पकडून त्याचा वध केल्यावर तो त्याचे राज्य जिंकण्याच्या मार्गास लागला.[२]

संभाजीला ठार मारल्याच्या हकीकतीतही, पर्शियन आणि मराठी लेखकात एकवाक्यता दिसत नाही. हा दुर्दैवी प्रसंग मुघलांच्या छावणीत घडल्याने पर्शियन लेखकांवरच या हकीकतीसाठी जास्त अवलंबून राहावे लागते. ऑर्म आणि मानुत्ची यांनीही यासंबंधी विशेष माहिती दिलेली नाही. संभाजीच्या अखेरच्या दिवसांसंबंधी बखरीत अनेक दंतकथा दिलेल्या आहेत. औरंगजेबाने संभाजी राजांना धर्मांतर करावयास सांगितले आणि राजांनी झेबुन्निसा बेगम या औरंगजेबाच्या मुलीचीच मागणी केली या गोष्टी खोट्या असून त्यांना काही आधार नाही.

साकी मुस्तैदखान आणि ईश्वरदास नागर या दोघांनी संभाजी राजांना मारण्यापूर्वी काय घडले ते लिहून ठेवले आहे. मुस्तैदखान म्हणतो, "त्याच रात्री ( दि. १५-२-१६८९ ) संभाजीचे डोळे काढण्यात आले. दुसऱ्या दिवशी कवि कलशाची दुष्ट जीभ उपटण्यात आली. संभाजीने मुसलमानांना मारले होते, त्यांना बंधनात टाकले होते आणि त्यांना विविध प्रकारे पीडित केले होते. त्याने इस्लामी राज्यातील नगरे गारद केली होती. त्याला जिवंत ठेवण्याऐवजी त्याला नाहीसा करणे बरे असे बादशहाचे मत झाले. धर्मशास्त्रज्ञांनी संभाजीच्या वधाचा फतवा दिला. त्याबरोबर अमीर उमरावांनीही हाच सल्ला दिला. त्यास अनुसरून संभाजीचा वध करणे आवश्यक आहे असे ठरविण्यात आले. बादशाही सैन्य ( ३-३-१६८९ रोजी ) कोरेगाव ऊर्फ फतेयाबाद येथे आले. तेथे ( ११ मार्च १६८९ ) रोजी संभाजी आणि कवि कलश यांना तरवारीच्या योगे ठार मारण्यात आले."

ईश्वरदास नागर याने औरंगजेब व संभाजी यांच्यात रुहुल्लाखान याच्या मध्यस्थीने काय संवाद झाला तो नमूद केला आहे. ईश्वरदास म्हणतो, "यानंतर दोन दिवसांनी बादशहाने रुहुल्लाखान यास खालीलप्रमाणे आज्ञा केली,

१. भावर्ष, खंड १, पृष्ठ २५ ते ३१ २. ताकाका-प, ले. ३७, पृष्ठ ५९

‘तुम्ही जाऊन संभाजीपाशी चौकशी करावी की तुझे खजिने, जडजवाहीर आणि इतर संपत्ती कुठे आहे, तसेच बादशाही सरदारांपैकी कोण कोण तुझ्याशी पत्रव्यवहार करून संबंध ठेवीत होते.’ पण माणसाची जीविताची आशा सुटली की तो मनात येईल ते बडबडत सुटतो. संभाजी हा गर्विष्ठ होता. त्याने बादशहासंबंधी घाणेरडे शब्द उच्चारले आणि त्याची निंदानालस्ती केली. त्याने जे काही म्हटले ते जसेच्या तसे रुहुल्लाखानाने बादशहास सांगितले नाही. पण ते बोलणे अशा प्रकारचे होते याचा त्याने बादशहाला इशारा दिला. यावर बादशहाने आज्ञा केली की, ‘संभाजीच्या डोळ्यात सळई फिरवून त्याला नवीन दृष्टी द्यावी.’

डोळे काढल्यानंतरही संभाजी कसा स्वाभिमानाने वागला यासंबंधी ईश्वरदास नागर लिहितो, “संभाजीचे डोळे काढण्यात आले. पण संभाजी गर्विष्ठ आणि स्वाभिमानी होता. त्याने त्या दिवसापासून जेवणखाण सोडले. त्याच्या पहारेकऱ्यांनी त्याला अन्न सेवन करण्यास पुष्कळ सांगितले, पण त्याचा उपयोग झाला नाही. त्याला काही उपवास घडले. शेवटी ही बातमी बादशहाला कळविण्यात आली. संभाजीचे दिवस भरले होते. बादशहाच्या आज्ञेने त्याला वधस्थानाकडे नेण्यात आले. तेथे त्याच्या शरीराचे तुकडे तुकडे करण्यात आले.”

अशा अमानुष रीतीने मराठ्यांच्या राजाचा, एका शूर पुरुषाचा दुर्दैवी शेवट झाला. औरंगजेबाने सिकंदर आदिलशहा ( विजापूर ) आणि अबुल हसन ( गोवळकोंडा ) यांची राज्ये जिंकली, त्यांना पकडले आणि कैदेत टाकले पण ठार मारले नाही. मग संभाजी राजांनाच औरंगजेबाने का ठार मारले असावे ? शिवाजी महाराज आग्र्याहून औरंजेबाच्या कचाट्यातून सुटले तेव्हापासून धुमसत असलेला सूड ‘तुझ्या बापाला नाही तर तुला हात दाखवतो’ अशा रागाने त्याने उगवला. मराठ्यांच्या रूपाने उभे राहणारे हिंदवी स्वराज्य नष्ट करण्यासाठी औरंगजेबाने मराठ्यांच्या या बत्तीस वर्षांच्या राजाला हालहाल करून ठार मारले. नियतीने औरंगजेबाच्या हाताने मराठ्यांच्या राजाला नाहीसे केले पण त्याच औरंगजेबाला हिंदवी स्वराज्याचा नाश करण्याची महत्त्वाकांक्षा मात्र सफल करू दिली नाही.

संभाजी राजांना तुळापूरला* मारले असे मागे एका ठिकाणी आलेले असले तरी त्यांना वढू येथे ठार मारण्यात आले. यासंबंधीचा उल्लेख धनकवडीच्या कुळकर्णींच्या कागदपत्रात सापडतो. ( दि. १४–१–१७१९ ) तो उल्लेख असा :

---

* वढूला शिरच्छेद केल्यानंतर तुळापूर येथील संगमावर संभाजीराजांचे दहन केले असावे, याला कागदोपत्री आधार मिळत नाही. संभाजीमहाराजांच्या शवाला जे शिवले त्यांना शिवले पाटील हे नाव मिळाले असा समज असला तरी ती एक भाकड कथाच आहे. शिवपूर्वकाळापासून ‘सिवले पाटील’ नावाचे उल्लेख आढळतात.

" पातशाहा वढू कोरेगावी येऊन मुक्काम केला. तेथून लष्कर पाठवून, सिवाजी राजे पहिलेच गेले होते, त्याचा लेक संभाजी राजे धरून आणिला आणि ( कोा किंवा मौजे ) वढू कोरेगावात मारिला. मग त्याचा लेक शाहू राजा व बाईका आपल्या जालीत ठेविली.'[1]

यावरून संभाजी राजांना वढूलाच ठार मारले असे दिसते. संभाजी राजांचा छिन्नविच्छिन्न देह वढू बुद्रकात फेकण्यात आला. शाहू आणि येसूबाई औरंगजेबाच्या कैदेतून सुटून आल्यानंतर त्याच जागी शाहू महाराजांनी १७१५ सालापूर्वी आपल्या वडिलांचे वृंदावन बांधले. त्या वृंदावनाची दररोज व्यवस्थित पूजा व्हावी म्हणून पूजेअर्चेसाठी, नैवेद्य, नंदादीप व धूप आणि बाग करून तुळशी लावण्यासाठी भिकाराम गोसावी आणि वासुदेव भट यांना जमीन इनाम दिली. यासंबंधी दि. १८ जानेवारी १७१५ चा एक कागद पेशवे दप्तरात आहे. " राजमंडल–वृंदावने: वृंदावन: महाराज राजश्री कैलासवासी संभाजी राजे स्वामी. दर जागा मौजे वढू, ता।। पाबळ, प्र।। जुन्नर भिकाराम गोसावी व वासुदेवभट बिन शामभट धर्माधिकारीणी वृंदावनाचे शुश्रूषेबद्दल देविले आहेत. नैवेद्य व नंदादीप व धूप व बाग करावयास व तुलसी लावावयास व अन्नछत्राबद्दल इनाम जमीन छ २२ मोहरम सन खमस अशर मौजे मजकूरपैकी इनाम जमीन नूतन ८५ बागाईत जमीन ८१० वहीत जमीन सेत चौसुक वृंदावनानजिक आहे. त्यापैकी ·।।|· १५ पड जमीन–तीन प्रतीची १|— असामी इनाम जमिनी घातली आहे. "[2] या वृंदावनासमीप गोविंद गोपाळ ढगोजी मेगोजी हा झाडलोट करून सेवा करीत असे म्हणून त्याला शाहूने काही जमीन इनाम दिली होती.

पेशवे दप्तरातील दि. १९-५-१७२३ च्या कागदाप्रमाणे, " गोविंद गोपाळ ढगोजी मंगोजी हे तीर्थरूप राजश्री कैलासवासींचे वृंदावन मौजे वढू तर्फ पाबळच्या राणांत आहे तेथे हे राहून वृंदावनाची सेवा करिताती. याजनिमित्य स्वामी याणी कृपाळू होऊन मौजे वढू तर्फ पाबळ येथील खालसा पड जमीनपैकी अवल दुम सीमती प्रतीची जमीन बिघे कुलबाब कुलकानु इनाम दिली. ८५..."[3]

अशा प्रकारे येसूबाई आणि शाहू यांनी वढू येथील संभाजी महाराजांच्या वृंदावनाची व्यवस्था लावून त्यांच्या धैर्याची, शौर्याची आणि स्वाभिमानाची स्मृती जागृत ठेवण्याची काळजी घेतलेली आहे. संभाजीराजांच्या वृंदावनाजवळ कवी कलशाचे वृंदावन आहे.

१. पेद : पुणे जमाव, वढू बुद्रुक, रुमाल क्र. १११३

२. शाहूदप्तर, रुमाल क्र. ११, पेद

३. शाहू रोजनिशी : क्र. ८८ पृष्ठ ३६; शाहू दप्तर रुमाल क्र. १, पुडके क्र. १४, ४४, पेद

आपण आज त्या ठिकाणी गेलात तर या वृंदावनावर तेथील गावकऱ्यांनी एक सुंदर मेघडंबरी बांधलेली आपणास पाहता येईल. त्याच्या भोवती बाग असून तेथे मोठे कुंपण घातलेले आहे. तेथे प्रतिवर्षी गावकरी आणि जिल्हा परिषद फाल्गुनी अमावस्येला मोठ्या उत्साहाने उत्सव साजरा करतात.

१६८९ मध्ये रायगडला शत्रूचा वेढा पडला तेव्हा भोसले घराण्यातील सर्वच मंडळी शत्रूच्या हाती सापडू नयेत म्हणून येसूबाईने मनाचा मोठेपणा दाखवून ती स्वतः शत्रूच्या हाती जावयास तयार झाली. तिने राजारामाला गडाबाहेर पडण्याचा रास्त सल्ला दिला. संभाजी राजांच्या मृत्यूनंतर येसूबाई अहमदनगर येथे मुघलांच्या कैदेत होती. औरंगजेबाने शाहू आणि येसूबाई यांची व्यवस्था केलेली असली तरीही तिला पैशाची चणचण भासली तेव्हा तिने चिंचवडच्या देवांना पत्र लिहून पैशाची मागणी केली होती.[1] तिचा कैदेतील एक शिक्का उपलब्ध आहे. "एसूबाई वालिद ए साहू राजह सने आहद' हा शिक्का १७०७ मधील आहे.[2] येसूबाईच्या आयुष्याचा उत्तरार्ध शत्रूच्या कैदेतच गेला. तिने तिच्यावर आलेल्या संकटांना धैर्याने तोंड दिले. तिने भोसले घराण्याला सून शोभेल अशीच शेवटपर्यंत वर्तणूक ठेवली. संभाजी राजांच्या सहवासात असताना राजांना तिने सर्व प्रकारचे सहकार्य दिले. संभाजी राजांनी अखेर मृत्यूला सामोरे जाताना जे धीरोदात्त वर्तन केले तसेच धैर्य तिने रायगड सोडताना दाखविले. संभाजी आणि येसूबाई ही पतिपत्नीची जोडी आपल्या धैर्याने, धीराने, कर्तृत्वाने, कणखर बाण्याने मराठ्यांच्या म्हणजेच भारताच्या इतिहासात अजरामर झालेली आहे.

* * *

१. मइसा, खंड २, पृष्ठ १९ ते २३

२. वाइवृ– मस्वाय. ११, ले. १७०, पृष्ठ २९८–९९

# १४. सिंहावलोकन

संभाजी महाराजांच्या केवळ बत्तीस वर्षांच्या आयुर्मर्यादेत त्यांना बालपणात आजीचे प्रेम, ममता आणि छत्र लाभले. तेवढा त्यांच्या आयुष्यातील शांततेचा काळ सोडला तर इतर वेळी त्यांच्याविषयी सतत गैरसमजच पसरत होते. ते त्यांच्या हौतात्म्यानंतर जवळजवळ तीनशे वर्षे रूढ आहेत.

त्यांना सर्व दृष्टींनी अत्यंत अलौकिक असा पिता लाभला. जिजाबाईंचे मातृतुल्य प्रेम लाभले. रामायण, महाभारत, शास्त्रे, पुराणे, संस्कृत, संगीत, धनुर्विद्या या विषयांचा त्यांनी सखोल अभ्यास केला. ते स्वभावतःच शूर आणि राजपुत्र असल्याने त्यांना बालपणापासूनच युद्धकलेचे शिक्षण मिळाले. स्वतः शिवाजी महाराजच त्यांना मोठ्या सैन्याचे नेतृत्व देऊन प्रत्यक्ष रणांगणावर नेत असत. सर्वच दृष्टींनी पाहता राजपुत्राला योग्य असे त्यांना मार्गदर्शन लाभले होते.

शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक होईपर्यंत संभाजी राजांचे आयुष्य सुरळीत होते. त्यांना युवराजपद मिळाल्यापासून त्यांच्या सावत्र आईने–सोयराबाईने, आपल्या मुलाला–राजारामाला–राज्यपद मिळावे यासाठी प्रयत्न सुरू केले. तेव्हापासून भोसले राजघराण्यात गृहकलह सुरू झाला आणि संभाजीराजांच्या आयुष्याला कलाटणी मिळाली, आणि त्यांच्या जीवनात जो झंझावात सुरू झाला त्याचा त्यांच्या दुर्दैवी अंतानेच शेवट झाला.

शिवाजी महाराजांसारख्या अद्वितीय पित्याच्या कर्तृत्वपूर्ण पार्श्वभूमीवर संभाजीची तुलना होते. ख्यातनाम पित्याच्या मुलांना इतर लाभाबरोबरच हा तोटा नेहमीच सहन करावा लागतो. जीवनात यशस्वी होण्यासाठी कर्तृत्वाबरोबरच भाग्याचीही जोड लागते. शिवाजीमहाराजांच्या अंगी अलौकिक कर्तृत्व आणि दूरदृष्टी होती. त्याचप्रमाणे दैवही त्यांचा सतत पाठपुरावा करीत असे. त्यांनी घेतलेली अफझुलखानाची भेट, त्यांच्या जीवनातले आग्रा प्रकरण यांचा विचार केला तर ते सुदैवीही नसते तर अपयशही त्यांच्या पदरात पडले असते असे वाटते. महाराजांचे शौर्य, धैर्य, दूरदृष्टी, योजकता, कल्पकता अचाट होती. पण यांच्याच जोडीला दैवानेही त्यांना हात दिला नसता तर या प्रसंगात काय झाले असते याची कल्पनाही करवत नाही. संभाजी राजांचे जीवन याच्या अगदी उलट होते. ते शूर होते; धैर्यवान, धाडसी, साहसी, योजक आणि निपुण होते. परंतु या सर्व

गुणांबरोबर नियती त्यांच्या राजमुकुटात यशाचा तुरा लावावयास विसरली होती असेच त्यांच्या आयुष्याचे विहंगमावलोकन करू लागले म्हणजे वाटते.

आपल्या पाठीमागे गादीवर कोण यावे याचा निर्णय महाराजांनी करून ठेवलेला नसल्यामुळे संभाजीराजांना राजपदही झगडा करून मिळवावे लागले. त्यावेळी अष्टप्रधान आणि सेनापती हंबीरराव मोहिते यांच्यात दोन गट निर्माण झाले. शिवाजीमहाराजांच्या मृत्यूची बातमी दडवून ठेवण्याचा प्रयत्न करून अण्णाजी दत्तो, मोरोपंत पंडित यांनी संभाजीला पकडण्याचा कट करून राजारामाचे मंचकारोहण उरकून घेतले. त्यामुळे राग येऊन संभाजीने आपली सावत्र आई, सोयराबाईला भिंतीत चिणून मारले आणि अण्णाजी दत्तो वगैरे मंत्र्यांना ठार केले इत्यादी दोषारोप संभाजीवर करण्यात येतात. त्याचप्रमाणे संभाजी हा रागीट, उग्र प्रकृती, दारू पिणारा, स्त्रियांशी अनैतिक वर्तन करणारा असे अनेक आरोपही त्याला चिकटविण्यास सुरुवात झाली.

संभाजीच्या अंगी विलक्षण शौर्य आणि बेडरपणा होता हे सर्वांनाच मान्य आहे. परंतु त्याच्याजवळ दूरदृष्टी नव्हती, व्यसनाधीनतेमुळे त्याच्या गुणांचे चीज झाले नाही, त्याच्याजवळ विवेक आणि विचार यांचा अभाव होता, असा सर्वत्र समज आहे. परंतु नव्या आणि जुन्या माहितीचा आणि साधनांचा एकत्रित आणि साकल्याने अभ्यास केल्यानंतर त्याच्याजवळ विचार, विवेक, दूरदृष्टी नव्हती असे म्हणणे अशक्य आहे.

रागाच्या आवेशात त्याने क्रूरपणे कोणाला मारले अशी इतिहास साक्ष देत नाही. त्याला पन्हाळ्याला पकडून कैदेत टाकण्याचा कट करणाऱ्या अण्णाजी दत्तो, मोरोपंत, सोयराबाई वगैरे मंडळींना रागाच्या भरात त्याने ठार केले हे म्हणणे खरे ठरत नाही. याच्या उलट प्रथम संभाजीने त्यांच्याशी सामोपचाराचेच धोरण ठेवले होते असे दिसते. कटवाल्यांना त्याने कैदेत टाकले. मोरोपंत कैदेत असताना नैसर्गिकपणे मरण पावले. संभाजीने आपल्या सावत्र आईची रागाच्या भरात हत्या केली हा प्रवादही खोटा ठरला आहे. तिचा संभाजीला पकडण्याच्या कटात हातच नव्हे तर इतर मंत्र्यांबरोबरीचा संबंध असला तरी रायगडावर येताच संभाजीने तिला ठार मारलेले नाही. ती नेमकी केव्हा मरण पावली हे सांगता येत नाही. वर्ष सव्वा वर्षानंतर संभाजीला ठार मारण्याचा दुसरा कट शहाजादा अकबरामुळे उघडकीस आला. हा कट उघडकीस आल्यानंतर तिने स्वतः विषप्राशन करून आत्महत्या केली असावी किंवा कोणीतरी विषप्रयोग केल्याने तिला मृत्यू आला असावा. या दोन्ही गोष्टी संभवनीय आहेत. पहिल्या कटानंतर संभाजीने राज्यपद ताब्यात घेतले. त्यानंतर त्याचे राज्यारोहण झाले. तेव्हा संभाजीने मोरोपंतांचा मुलगा निळो मोरेश्वर याला पेशवा नेमले. अण्णाजी दत्तोचे सचीवपद काढून त्याला मुजूमदार केले. पुढे मराठ्यांच्या राजालाच ठार मार-

ण्याचा कट फुटल्यावर या कटात हात असलेल्या लोकांना संभाजीने ठार केले आणि इतर शिक्षा दिल्या. या क्रूर वाटणाऱ्या शिक्षा संभाजीने राजद्रोहासाठी दिलेल्या शिक्षा आहेत हे ध्यानात घेतले पाहिजे. राजद्रोहाला दुसरे कोणते शासन मिळू शकते ? देहान्त शासन हेच एक क्रूर आणि दहशत उत्पन्न करणारे कृत्य आहे. हत्तीच्या पायाखाली देणे, सुळावर देणे, कडेलोट करणे या ऐतिहासिक काळापासून ते आठराव्या शतकाच्या अखेरपर्यंत चालत असलेल्या देहदंडाच्या रूढ पद्धती आहेत. आता विसाव्या शतकाच्या शेवटी देहान्त शासनच देणे बंद करावे असा मोठा सूर निघत असताना देहदंडाचे हे प्रकार क्रूर वाटणे साहजिक आहे. तरीही विसाव्या शतकातल्या विचारपद्धतीने १७ व्या शतकातील पद्धतीचे मूल्यमापन करणे चूक आहे. आपण ज्या इंग्रजांना अगदी सुधारलेले समजतो त्यांच्या इंग्लंडमध्ये एकोणिसाव्या शतकात सुद्धा चोरी करण्याच्या किंवा एखादी वस्तू लपविण्याच्या गुन्ह्यासाठी देहदंड देत असत. युरोपात फ्रान्स, नेदर्लंड येथील क्रांतीत, रशियन क्रांतीत आणि नंतर हिटलरच्या कारकीर्दीत जे अत्याचार झाले त्यांची वर्णने आजही आपल्या अंगावर शहारे आणतात. तेव्हा त्या काळातील रूढ शिक्षा राजद्रोही कृत्यासाठी संभाजीने दिल्या, त्यात त्याने विशेष क्रौर्य केले असे वाटत नाही.

संभाजीने शिर्के मंडळीचे शिरकाण केले असा जो प्रवाद आहे तोही खोटाच आहे. शिरकाण या शब्दाचा अर्थ शिर्क्यांची कत्तल असा नसून, फिरंग्यांचा प्रदेश म्हणजे फिरंगाण, हबशांचा प्रदेश हबसाण, तसेच शिर्क्यांच्या प्रदेशाला शिरकाण असे म्हणतात.

संभाजी राजांवर जबरदस्त स्त्री-विषयक आसक्तीचे आणि मद्यपानाचे आरोप करण्यात येतात. या दोन्ही व्यसनांच्या आधीन गेलेला माणूस स्वतःचाच नव्हे तर सर्व कुटुंबाचा नाश करतो. अशा व्यसनाधीन माणसाच्या हातात राज्य असले तर ? संभाजीला ही दोन्ही व्यसने होती आणि ते त्यांच्या आधीन होते यासंबंधी ऐतिहासिक दृष्टीने निर्णायक पुरावा मिळत नाही. जवळ जवळ सर्व बखरी व काही तत्कालीन लेखक संभाजीवर हे दोन्ही आरोप करतात. तत्कालीन पोर्तुगेज पत्रव्यवहार, अखबार आणि मराठी पत्रव्यवहारात यासंबंधी उल्लेख आढळत नाही. परंतु या व्यसनासक्तीमुळे संभाजीच्या हातून काही गैरकृत्ये झाली का, किंवा त्या व्यसनामुळे राजधर्म पाळण्यात काही उणेपणा आला होता का याचा विचार करावयास हवा. तो एकांतात बसून आपली विषयवासना तृप्त करी का इतरांच्या बायकांचे अपहरण करी ? सुरापानामुळे किंवा त्याच्या अतिरेकामुळे त्याने कोणाला उपद्रव दिला काय ? या संबंधात सर्वसाधारण वाचकाचा ग्रह नाटककार आणि कादंबरीकारांनी अत्यंत कलुषित करून ठेवलेला आहे. हे ललित लेखक आपल्या कलाकृतीला उठाव आणण्यासाठी कोणाही ऐतिहासिक श्रेष्ठ

व्यक्तीचे अगदी पोतेरे करून टाकतात. या विषयात प्रत्यक्ष इतिहास लेखकांपेक्षा या ललित लेखकांनीच आघाडी मारलेली दिसते.

हिंदुस्थानातील लोकांना पाश्चात्यांसारख्या प्रत्येक गोष्टी टिपून ठेवण्याची सवय नसल्यामुळे आणि येथे आलेल्या शत्रूंनी तोटकी साधनेही नष्ट करण्याचा सपाटा ठेवल्याने, मराठ्यांच्या इतिहासाची सुसूत्र जुळणी करणे कठीण जाते. संशोधनपूर्व ग्रंथ निर्माण झाले तरी ते वाचण्यापेक्षा सर्वसामान्य वाचक हलकी-फुलकी मनोरंजक ललितकृती पसंत करतो. त्यामुळे अनैतिहासिक, विकृत, असत्य, काल्पनिक, भाबडी, चमत्कारांवर भर देणारी कथानके आणि कथा जनतेत लोकप्रिय होतात. ललित लेखकांनी ऐतिहासिक व पौराणिक व्यक्तींची कथानके निवडताना आणि त्यांच्यावर कथा रचताना, त्या त्या व्यक्तीचे आणि काळाचे जे इतिहासमान्य मूळ स्वरूप असेल त्याला धक्का न लावता, तो मूळ गाभा छिन्न-विच्छिन्न न करता, इतर बाबतीत आपली प्रतिभा सैल सोडली तरी विकृत इतिहास निर्माण होऊन राष्ट्राच्या सर्वांगीण चित्राला हानी पोचणार नाही.

संभाजीराजांना भेटण्यासाठी डिसेंबर १६८२ मध्ये इंग्रज अधिकारी स्मिथ, १६८४ साली इंग्रज वकील कॅ. गॅरी, थॉमस विल्किन्स, १६८७ सालच्या सप्टेंबर महिन्यात जॉर्ज वेल्डन, रॉबर्ट ग्रॅहम हे वकील रायगडला गेलेले होते. तहाच्या वाटाघाटींसाठी त्यांचा अनेक दिवस तेथे मुक्काम होता. १६८० साली डच वकील रेसिडेंट लेफेबर ( Lefeber ) राजांना पन्हाळ्याला भेटला होता. १६८५ मध्ये पोर्तुगेज वकिलात राजांना रायगडावर भेटली. त्यात फ्रै आंतोनियु द सांव जुझेफ आणि इतर अनेक माणसे होती. या परकीयांपैकी कोणीही संभाजीच्या व्यसनाधीनतेविषयी कोणत्याही रीतीने आपल्या प्रमुखांना कळविलेले दिसत नाही. शत्रुपक्षाकडील उणीदुणी टिपून, त्यांची नोंद करून, जमेल तर त्या दोषांपासून लाभ उठविण्यात वकिलातीचे लोक तत्पर असतात. हे ध्यानात घेतले म्हणजे संभाजीवर घेण्यात येणारा व्यसनाधीनतेचा आरोप खोटा ठरतो. संभाजी राजांनंतरच्या इतिहासात दारू वगैरे मागितल्याचे उल्लेख सापडतात. पहिला बाजीराव यावनी मस्तानीच्या प्रेमात सापडला होता. तो मद्य-मांसाहार करीत असे. अशा सर्वांचे राजकारणातील स्थान त्यांच्या शौर्यावरून आणि इतर कामगिरीवरून न ठरविता, ते विलासी, मदिराभक्त, स्त्रीलंपट होते म्हणूनच ते सर्व दृष्टीने वाईट होते असे निकष लावणे चुकीचे आहे. या व्यसनाधीनतेने त्यांच्या पराक्रमी, तुफानी जीवनावर दुष्परिणाम होऊन राज्य बुडालेले दिसत नाही.

संभाजी राजांनी राज्यशकट हातात घेतल्यानंतर थोडीफार स्थिरस्थावर होते न होते तोच औरंगजेबाचा चवथा मुलगा शहाजादा अकबर त्यांच्या आश्रयासाठी आला. अकबराला आश्रय द्यावा न द्यावा अशा विचारात ते असतानाच

तो प्रत्यक्ष मराठी राज्यात येऊन पोहोचला. आलमगीराचा मुलगाच मराठ्यांकडे आल्यामुळे मुघल अमीर–उमराव अकबराला पाठिंबा देतील तर औरंगजेबाला त्याच्याच राज्यातील बंडांना तोंड द्यावे लागेल अशी कल्पना होती. परंतु बादशहाच्या भीतीने रजपूत किंवा मुघल यांपैकी कोणीच अकबराच्या पक्षाला उभे राहिले नाहीत. उत्तरेतील सत्ताधीशांपैकी कोणी पाठिंबा दिला तर संभाजीच्या साहाय्याने उत्तरेत आपल्या पित्याविरुद्ध उठाव करावा अशी अकबराची कल्पना होती. संभाजी राजांनी अंबरचा ( जयपूरचा ) राजा रामसिंग याला पत्रे पाठवून उत्तरेत उठाव करावयाचा मनसुबा केला. राजा रामसिंगाने अकबराला मदत करून त्याला दिल्लीच्या तख्तावर नामधारी राजा म्हणून बसवावे आणि सत्ता हिंदूंनी राबवावी अशी कल्पना होती. अकबर उत्तरेत गेला की औरंगजेबही उत्तरेत परत गेला असता; जमले तर बादशहाला कैद करावयाचाही मनसुबा होता ! या मनसुब्याला पाठिंबा देण्याऐवजी, बादशहाला विरोध न करता त्याचे सार्वभौमत्व मानावे असा राजा रामसिंगाने प्रथम सल्ला दिला. अकबराने इराणचा शहा आणि राजा रामसिंग यांना पत्रे लिहिली. अकबराला आश्रय देण्यात तुम्ही ( संभाजी ) योग्य ते केलेत. आपण सगळे हिंदू आहोत म्हणून या परिस्थितीत जे करणे योग्य आहे असे तुम्हाला वाटते ते करावयास मी तयार आहे असे रामसिंगाने पुढे लिहिले. या धाडसी मनसुब्यापैकी प्रत्यक्ष काहीच घडले नाही. तरीही त्या संबंधात संभाजी राजांनी रामसिंगाला जे पत्र लिहिले ते त्यांच्या धाडसी, आक्रमक आणि कल्पक दृष्टीवर चांगला प्रकाश पाडते यात शंका नाही. या मनसुब्यात राजा रामसिंगानेच पुढाकार घ्यावा, हिंदू तत्त्वशून्य झाले आहेत, त्यांना धर्माभिमान राहिलेला नाही असे औरंगजेबाला वाटत असले तरी श्रुती-स्मृतींनी धर्म आणि जाती यांच्याविषयी जी कर्तव्ये नेमून दिली आहेत त्यांची पायमल्ली आम्ही सहन करणार नाही, असे सांगून संभाजी महाराज पुढे लिहितात, ' प्रजापालनाचा आमचा धर्म आम्ही टाळू शकत नाही. या दुष्ट यवनांशी युद्ध करण्यात आम्ही आमची संपत्ती, आमचा देश, आमचे दुर्ग, सारांश सर्व काही पणाला लावण्यास तयार आहो. याच उद्देशाने आम्ही अकबर आणि दुर्गादास राठोड यांना आश्रय दिला आहे. आम्ही यवनाधिपतीच्या अनेक सेनानायकांचा वध केला, कित्येकांना कारागृहात टाकले, काहींना खंडणी घेऊन सोडून दिले... आता अशी वेळ आली आहे की त्या यवनाधमाला ( औरंगजेबाला ) पकडून कारागृहात घालणे शक्य होईल. मग आपल्या देवतांची पुन्हा स्थापना करून धर्मकृत्ये निर्विघ्नपणे पार पाडण्याची व्यवस्था करता येईल. " या संभाजीच्या पत्रात त्याची गरुडझेप दिसते. परंतु उत्तरेत पाठिंब्याचा अभाव आणि अकबराजवळही असलेला शौर्याचा आणि धाडसाचा अभाव या दोन गोष्टींमुळे या योजनेला मूर्त स्वरूप येणे शक्य झाले नसावे. काही असले तरी संभाजी राजांचे हे

पत्र शिवाजी महाराजांनी राजा जयसिंगाला लिहिलेल्या त्या सुप्रसिद्ध पत्राची आठवण करून देते यात शंका नाही !

अकबराला मराठ्यांनी आश्रय दिल्यामुळे औरंगजेब थोडा लवकर दक्षिणेत उतरला हे खरे असले तरी औरंगजेबाचे हे संकट संभाजी राजांनी ओढवून घेतले हे मात्र खरे नाही. अकबराला संभाजीने आश्रय दिला नसता तरीही हे संकट टळले नसते. संभाजी महाराज औरंगजेबाच्या रोषाची पर्वा न करता त्याच्या मुलाशी अत्यंत काळजीपूर्वक वागले, त्यांनी त्याला अंतर्गत राजकारणात कुठेही वाव दिला नाही, यावरून त्यांचे धोरण सुसंगत व धाडसी असून त्यांची वागणूक जागरूक होती हे ध्यानात येते.

संभाजी राजांची एकूण कारकीर्द जेमतेम नऊ वर्षांची ! त्यांत त्यांनी पोर्तुगेजांशी लढा देऊन त्यांची आशियात कधीही झाली नव्हती एवढी फजिती केली, तरुण वयात त्यांना अद्दल घडविली. अनेक विजय संपादन केले. इंग्रजांचा सारखा पाठिंबा मिळत असून सुद्धा सिद्दीला त्यांनी चांगले तोंड दिले. इंग्रजांना सतत दमात ठेवले. कर्नाटकात हरजीराजे महाडिक यांच्याकरवी राज्याची वाढ केली. रजपुतांचे बंड मोडून व त्यांचा बंदोबस्त करून औरंगजेब बादशहा आपले सरदार, आपली मुले, आपले नातू, आपले अफाट सैन्य आणि जंगी सामुग्री घेऊन दक्षिणेत आला. शिवाजी महाराजांच्या काळात मराठ्यांना नेस्तनाबूत करण्यासाठी राजा जयसिंग आला होता त्यापेक्षा ही आपत्ती फारच मोठी होती. महाराजांना त्यावेळी जयसिंगाशी तह करून जवळजवळ २७ गड सोडावे लागून, अपरिहार्य अशी शरणागती पत्करावी लागली होती. परंतु आता स्वतः औरंगजेबच मराठी राज्याचा नाश करावयासाठी आला होता. उत्तरेत त्याला शत्रू राहिलेला नव्हता. दक्षिणेतील विजापूर, गोवळकोंडा, आणि मराठे यांचा नायनाट करण्याची आपली दीर्घकाळची महत्त्वाकांक्षा पूर्ण करावयासाठी बादशहा दक्षिणेत उतरला होता. त्याचा सेनासंभार मराठ्यांच्या सामर्थ्यापेक्षा किती तरी पट अधिक समृद्ध आणि सुसंपन्न होता. बादशहाचे अमीर-उमराव अनुभवी होते. स्वतः औरंगजेबासारखा ‘ सर्वगुणसंपन्न ’ बादशहा मार्गदर्शन करीत होता. औरंगजेब वयाने मोठा होता. त्याचे राजकारणातील कूटनीतीचे कौशल्य आणि त्याचा अनुभव संभाजीराजांच्यापेक्षा पुष्कळच जास्त होता. अखिल हिंदुस्थानाचा बादशहा होऊन इस्लामी राज्य स्थापन करण्याची त्याची महत्त्वाकांक्षा होती. अशी सर्व दृष्टींनी वरचढ असलेली आपत्ती टीचभर स्वराज्यावर कोसळली होती. अखबारातून व इतर फार्सी साधनांतून उपलब्ध झालेले सविस्तर वृत्त ‘ मराठा-मुघल संघर्षा ’त दिलेच आहे. त्यावरून असे दिसते की संभाजी राजांनी औरंगजेबाला आपल्या अधिकाऱ्यांची सतत बदली करण्यास भाग पाडले. मुघलांचे अवाढव्य सैन्य आणि त्यांचा बादशाही सरंजाम कोठेही स्थिर होऊ शकला नाही. मराठ्यांनी कोणाही मुघल सेना-

पतीला यश मिळू दिले नाही. औरंगजेबाचा मुलगा शहा आलम दक्षिण कोकणात गेला तेव्हा त्याच्या लाखभर सैन्याची मराठ्यांनी दाणादाण उडवून दिली. त्याला कोकणातून सुखरूप परत येता यावे म्हणून औरंगजेबाला कुमक पाठवावी लागली. माणसे, घोडे, मालवाहू जनावरे, धान्य यांचा मराठ्यांनी गनिमी काव्याने नाश केला. या हल्ल्यातून वाचलेली माणसे औरंगजेबाने धाडलेल्या मदतीमुळेच कोकणातून जीव वाचवून विजापुराकडे जाऊ शकली. सुरतेकडून समुद्रमार्गाने येणारी रसदही शहा आलमच्या पदरात पडू न देता मराठ्यांनी ती लुटून नेली. त्यानंतर मराठ्यांनी शहा आलमला जखमी केले.

औरंगजेबाचा दुसरा मुलगा शहा अज्जम याने मोठ्या सैन्यासह कोल्हापूर–पन्हाळ्याला दोन वेळा वेढा घालण्याचा प्रयत्न केला. पहिल्या हल्ल्याच्या वेळी मराठ्यांचा सेनापती सरनोबत हंबीरराव मोहिते याने शहा अज्जमला भिवरा नदीच्या पलीकडे पिटाळले. दुसऱ्या वेढ्याच्या वेळी हंबीररावाने त्याला कोल्हापूर, पन्हाळ्यापासून बेळगावपर्यंत हटवीत नेले. मिरज मुघलांच्या ताब्यात गेली तेव्हा हंबीररावाने बेळगावच्या किल्लेदाराला आत्मविश्वासाने पत्र पाठवून कळविले की मुघलांना थारा देऊ नये. मराठ्यांचे सैन्य तुमच्या मदतीला येत असल्याने तुम्हाला भिण्याचे कारण काय? एवढ्या मोठ्या आपत्तीतही मराठ्यांच्या सेनापतीचा आणि सैनिकांचा आत्मविश्वास कसा होता हे येथे कळते.

रामसेजच्या वेढ्यात मुघलांना समर्थपणे तोंड देणाऱ्या आणि तो वेढा परतवून लावणाऱ्या मराठा किल्लेदाराचे नाव इतिहासाला आजही अज्ञात असले तरी त्याने केलेल्या पराक्रमामुळे पहिल्या तडाख्यातच मुघलांना मराठ्यांची चुणूक दिसली.

कल्याण, भिवंडी, रायगड, पुरंदर वगैरे जवळजवळ सर्वच मराठी मुलखात औरंगजेबाला सतत तीन वर्षे यश न मिळाल्यामुळे त्याला आपला मोहरा विजापूर–गोवळकोंड्याकडे वळवावा लागला. औरंगजेबाने आपल्या डोक्यावरची पगडी फेकून देऊन संभाजीचा पराभव केल्यावाचून ती पुन्हा घालणार नाही असा पण केला होता. इतकेच नव्हे तर दोन-तीन वेळा आपल्या सरदारांवर दक्षिणेतील कामगिरी सोपवून तो उत्तरेकडे निघाला होता. शिवाजी महाराजांनी जी विजापूरकर आणि गोवळकोंडेकर यांच्याशी युती केली होती त्याचे बंध संभाजी राजांनी दृढ केले आणि स्वतः जीवनमरणाचा लढा चालवीत असतानाही त्यांना मदत देण्यास ते कचरले नाहीत. महाराजांनी दक्षिणियांचा पक्ष उभा करून समान शत्रूविरुद्ध एक गट निर्माण केला होता. त्याच धोरणाची अंमलबजावणी करून दक्षिणेतील शाह्यांना औरंगजेबाविरुद्ध त्यांनी टिकवून धरले आणि काही काळ तरी मुघल त्या लढायात गुंतून पडले.

या सर्व आघाड्यांवर मराठे तोंड देत असताना कधी गोवा तर कधी हबसाण, कधी कर्नाटक, तर कधी राजापूर, सिंहगड, तर कधी चवताळलेल्या शूर सिंहासारखा गर्जत गंगातीरावर तुटून पडणाऱ्या संभाजीला मदिरा आणि मदिराक्षींच्या नादात गुंतून पडावयास वेळ मिळणे शक्य दिसत नाही. तारुण्याच्या भरात क्वचित् एखादी चूक त्याने केली असेल किंवा नसेल असे विरुद्ध बाजूचा निर्णायक पुरावा मिळत नाही म्हणून मानले तरी, संभाजी राजांच्या हातून असे आत्मघातकी व बेजबाबदार कृत्य घडले असेल असा संभव वाटत नाही. त्यांच्या नऊ वर्षांच्या झंझावाती कारकीर्दीत तसा वाव होता असेही दिसत नाही. अकबराच्या आगमनाचा फायदा घेऊन संभाजीने उत्तरेत जावयास हवे होते असे काही इतिहासकारांचे मत असले तरी मुघलांचे एवढे संकट ओढवलेले असताना संभाजीराजांनी तसे धोरण स्वीकारणे धाष्ट्याचे आणि आत्मघातकीपणाचेच झाले असते.

पोर्तुगेज आणि शिवाजी महाराजांचे संबंधही त्यांच्या कारकीर्दीच्या शेवटी ताणले गेले होते. संभाजी राजांनी प्रथम त्यांच्याशी सामोपचाराचे धोरण अंगीकारले. औरंगजेबाने पोर्तुगेजांना दिलेल्या चिथावणीमुळे ते धोरण त्यांना बदलावे लागले. त्यांनी मुघलांशी हातमिळवणी करू नये म्हणून राजांनी प्रयत्न केले. त्याचा उपयोग होत नाही असे दिसताच त्यांनी आक्रमक धोरण स्वीकारून दोघांचा कोकण जिंकावयाचा हेतू धुळीस मिळविला. मराठ्यांचे सैन्य पळपुटे आहे असे पोर्तुगेज समजत. त्यांना संभाजीने जो जबरदस्त तडाखा दिला तो त्यांच्या पूर्वेकडील वास्तव्यात त्यांना कोणीही दिला नव्हता, असे स्वतः पोर्तुगेजांनीच कबूल केलेले आहे. शहा आलमचे मोठे सैन्य स्वराज्यावर चालून येत आहे असे कळताच संभाजी राजे तेथून चपळाईने माघारे फिरले.

सर्व शक्ती पणाला लावीत औरंगजेब यापूर्वी स्वराज्यावर चाल करून आला नव्हता. या प्रचंड शत्रूच्या सामर्थ्याला मराठ्यांना एकाकीपणे तोंड द्यावे लागले. हा इतिहास वाचताना असेही मनात येते की संभाजी राजांच्या काळात ओढवलेले हे प्रचंड संकट जर शिवाजी महाराजांच्या कारकीर्दीत कोसळले असते तर? त्यांचीही संभाजीसारखीच तारांबळ उडाल्यावाचून राहिली नसती. महाराजांनी नेहमीप्रमाणे काही युक्ती केली असती आणि हे संकट निवारण करण्याचा प्रयत्न केला असता असे साहजिकच मनात येते. संभाजीने धैर्याने आणि धडाडीने शत्रूला तोंड दिले. स्वराज्याला शत्रूचा वेढा पडला तरी तो डगमगला नाही. आपल्या पित्याचे अनुकरण करून त्याने काही युक्त्या-प्रयुक्त्या केल्या किंवा नाही ते कळत नाही. परंतु औरंगजेब स्वतः दक्षिणेत उपस्थित असताना तसे युक्तिप्रयुक्तीचे राजकारण जमून हे प्राणसंकट निभावले असते असे वाटत नाही. संभाजीच्या हयातीत मराठे शत्रूला चांगल्या प्रकारे तोंड देत होते. परंतु

मराठ्यांचा राजाच शत्रूच्या हाती पडल्यावर आणि राजाराम कर्नाटकात पळाल्यानंतर मराठ्यांची फारच हलाखी झाली. विजापूर आणि गोवळकोंड्याची राज्ये नष्ट झालेली असल्याने त्या काळात राज्याचे आधारस्तंभ आणि 'राज्याचे सार ते दुर्ग' मुघलांच्या ताब्यात जाण्यास सुरुवात झाली.

सन १६७८ मध्ये रागावून आणि गृहकलहाला विटून स्वतःच्या कर्तृत्वावर राज्य मिळविण्याच्या ईर्षेने संभाजी दिलेरखानाला जाऊन मिळाला. ऐतिहासिक दृष्टीने पाहिले तर स्वतः शिवाजी महाराजांनीही विजापूरकरांचे जहागिरदार म्हणूनच आपल्या कर्तृत्वाला प्रारंभ केला होता. शहाजी राजांनी आपले कर्तृत्व आणि पराक्रम कधी विजापूर, तर कधी निजामशाहीत तर कधी मुघलांसाठी खर्च केला होता. तेही परकीय सत्तेचेच जहागिरदार होते. त्या दृष्टीने संभाजी केवळ मुघलांना मिळाला म्हणूनच त्याला दोष देता येत नाही. परंतु संभाजी एका स्वतंत्र राज्याचा युवराज होता. त्या भूमिकेतून युवराजाने शत्रूला मिळणे हे निःसंशय चूक वाटते. हे गैरकृत्य त्याने केल्याने छत्रपती शिवाजी महाराजांना व मंत्र्यांना त्याच्या हातात राज्य द्यावे की न द्यावे असा संभ्रम उत्पन्न झाला असणे साहजिक आहे. सोयराबाईचा हट्ट आणि स्वार्थ आणि संभाजीचे दुर्वर्तन या गोष्टी अशा अनिश्चित परिस्थितीला कारणीभूत आहेत. परंतु दिलेरखानाने हिंदूंवर केलेले अत्याचार, अन्याय आणि गैरवर्तणूक सहन न होताच संभाजी त्याच्या हातावर तुरी देऊन पळून आला हेही ध्यानात घेतले पाहिजे.

अकबराला आश्रय देताना संभाजीराजांनी कविकलशाचा सल्ला ऐकला हे खरे असले तरी ते कोठल्याही प्रकारे कलशाच्या आहारी गेलेले होते असे दिसत नाही. इतर मंत्र्यांपेक्षा संभाजीराजांचा कविकलशावर विशेष विश्वास होता असेही वाटत नाही. कवि कलशाची सर्व उपलब्ध पत्रे पाहिली म्हणजे तो आपले काम चोखपणे करतो, इतर मंत्र्यांच्या कारभारात लुडबूड करीत नाही, आणि कोणत्याही प्रकारे त्याचे राजांशी विशेष सख्य असलेच तर त्याचा तो गैरफायदा घेत नाही असेच आढळते. तो मुघलांना फितूर होता किंवा त्याने राजांना पकडून दिले अशीही उपलब्ध पत्रव्यवहारावरून शंका येत नाही. अखेरपर्यंत तो मराठी राज्याशी, मराठ्यांच्या राजाशी सचोटीने आणि एकनिष्ठपणे राहून राजांच्या बरोबरच देहदण्डही सोसतो.

संभाजी राजांच्या राज्यकारभाराची सविस्तर माहिती यापूर्वीच दिलेली आहे. मराठ्यांचा राजा म्हणून संभाजीने आपला राजधर्म पाळून राज्याचे रक्षण, न्यायदान, प्रजारक्षण आणि प्रजापालनाची कर्तव्ये कशी पार पाडली याची माहिती राज्यकारभारविषयक प्रकरणात, उपलब्ध कागदपत्रांचे उतारे देऊन ( थोडासा क्लिष्टतेचा दोष पत्करूनही ) दिलेली आहे. संभाजी राजांनी आपल्या कारकीर्दीत राज्यकारभाराकडे दुर्लक्ष केल्याने सर्वत्र बजबजपुरी माजून, विस्कळीतपणा आलेला

होता अशी समजूत रूढ आहे. परंतु उपलब्ध कागदपत्रांचा अभ्यास आणि संकलन केल्यावर त्या रूढ समजुतीला काही आधार राहात नाही. शिवाजी महाराजांनी निर्माण केलेली अष्टप्रधान मंडळाची पद्धत जशीच्या तशीच संभाजी राजांच्या कारकीर्दीत चालू आहे असे दिसते. पेशवा, मुजुमदार किंवा अमात्य, सचीव, सुमंत, पंडितराव किंवा दानाध्यक्ष, वाकेनिवीस, मुख्य न्यायाधीश आणि सरसेनापती ही पदे अबाधित होती. ती कोणाकडे होती, ती कां व केव्हा बदलली याची पुनरुक्ती येथे करण्याचे कारण नाही. संभाजीराजांनी कविकलशाला 'छंदोगामात्य' हे पद देऊन ते त्याच्यासाठी नव्याने निर्माण केले असा सर्वत्र समज आहे. परंतु शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाच्या वेळी "उत्तरेस छंदोगामात्य प्रधान रघुनाथ पंडितराव सुवर्ण कलश मधुपर्ण घेऊन उभे राहिले" असा उल्लेख सापडत असल्याने त्या रूढ समजुतीलाही काही आधार राहात नाही.

संभाजी राजांच्या कारकीर्दीत शेती, सुपारी, भात, नारळ यावरील कर, जकात आणि चौथाई हीच उत्पन्नाची साधने होती. शत्रूच्या प्रदेशात लूट करण्यामागेही उत्पन्न मिळविण्याचाच हेतू असे. संभाजी राजांनी शिवाजी महाराजांप्रमाणेच शत्रूच्या प्रदेशातील व्यापारी पेठा लुटल्या. त्यांनी औरंगाबाद आणि बऱ्हाणपूर येथे केलेली लूट शिवाजी महाराजांच्या सुप्रसिद्ध सुरतेच्या लुटीची आठवण करून देते. या लुटी इतक्या परिपूर्ण होत्या की त्यामुळे तेथील मुसलमानांना 'शुक्रवारचा नमाज पढण्यास जागा उरली नव्हती. बऱ्हाणपूर शहर हे विश्वरूपी सुंदरीच्या गालावरील तीळ समजला जात असे. मराठ्यांनी ते शहर लुटले तेव्हा ते पाऱ्यासारखे अस्थिर झाले होते' असे खुद्द अकबराने औरंगजेबाला खिजवून लिहिलेले आहे.

शेतीचे उत्पन्न वाढावे, पडीक जमिनी पुन्हा लागवडीखाली याव्या; दुष्काळ, अवर्षणाच्या काळात शेतकऱ्यांना अगदी आधुनिक काळात शोभेल अशा पद्धतीने फाळ, बैल, पेरणीसाठी धान्य, करात सवलती आणि सूट या गोष्टी संकट काळी व्यवस्थित आणि कळकळीने दिलेल्या दिसतात.

दुष्काळ, अवर्षण, शत्रूचे हल्ले व त्याने केलेली नासधूस या कारणांनी धान्याची टंचाई उत्पन्न होऊन महागाई होत होती. तेव्हा सुरत आणि अहमदाबादकडून धान्याची सोय करण्यात येत असे. १६८४–८५ मध्ये सुरत, अहमदाबाद व इतर बंदरांतून अन्नधान्य, रसद, शिसे, दारू (स्फोटक) यांचा पुरवठा करण्यात आलेला आहे.

१६८६ सालानंतर संभाजी राजे काय करीत होते असा इतिहासकारांना प्रश्न पडतो. त्यांनी शेवटपर्यंत जरी लढाया केल्या असल्या तरी १६८२ पासून शत्रूच्या आक्रमणामुळे स्वराज्यातील मुलखाची नासाडी होण्यास सुरुवात झाली होती. १६८५-८६ पासून जवळ जवळ सर्व प्रदेशात अवर्षण आणि दुष्काळ या आपत्तींमुळे

मराठी राज्यावर आलेल्या संकटात भरच पडली. मराठ्यांच्याच काय पण औरंगजेबाच्याही हालचाली मंदावल्या होत्या. तोही प्लेग, दुष्काळ आणि मराठ्यांच्या युद्धतंत्रामुळे ग्रासला आणि त्रासला होता. १६८६ नंतर संभाजी विलासात अधिक दंग होत होते आणि त्यामुळे मराठ्यांच्या हालचाली मंदावल्या असा समज आहे. तसे काही झालेले नव्हते. सतत चाललेले युद्ध, अवर्षण आणि दुष्काळ यामुळे आर्थिक परिस्थितीवर आणि मराठ्यांच्या सैन्यशक्तीवर फार ताण पडलेला होता असे दिसते.

शत्रूच्या हल्ल्यांनी भयभीत होऊन परागंदा झालेल्यांना पुनर्वसनासाठी योग्य ते उत्तेजन, साहाय्य देऊन इतर प्रकारांचीही काळजी घेण्यात येई.

प्रजेवर अधिकाऱ्याने किंवा इतर कोणी अन्याय केला तर त्याचे काळजीपूर्वक निराकरण करण्यात येत असे. चोरीचे प्रकरण निवाड्यासाठी आले तर चोरी कोणी केली, काय काय चोरण्यात आले, ते मूळ मालकाने कोठून घेतले होते, त्याची किंमत किती वगैरे तपशीलवार चौकशी करून निर्णय देण्यात येत असे.

न्यायदानाचे कामही राजा, न्यायाधीश, हुजूर हाजीर मजलिस किंवा धर्मसभा करीत असे. संभाजीच्या काळात "न्यायाची रीत राहिली नव्हती, विचार न करता शिरच्छेद करावा, कोणी लाचलुचपतीची चुगली केली तर विना चौकशी आणावा, मारावा, नागवावा, क्वचित शिरच्छेद करावा," असे आरोप बखरकार करतात. परंतु राजांच्या कारकीर्दीत केंद्र सत्तेपासून सुभे, तर्फपर्यंत न्यायदानाची पूर्ववत पद्धतच चालू होती असे स्पष्ट दिसते. शिवाजी महाराजांच्या कारकीर्दीतील प्रल्हाद निराजीच १६८० ते १६८८ पर्यंत मुख्य न्यायाधीश होते. मोरेश्वर पंडितराव हाच पंडितराव होता, आणि हाजीर मजलिस मार्फतच न्यायनिवाडा होत असे. सर्व प्रकारच्या तंट्याबखेड्यांचे निर्णय पद्धतशीरपणे करण्यात येत असत.

वतनांची चालू आणि रूढ परंपरा शिवाजी महाराजांनी मोडण्याचा प्रयत्न केला. वतनवृत्तीचे वाद पिढ्यान् पिढ्या चालू असत. एकाची वृत्ती दुसऱ्याला न देण्याचे शिवाजी महाराजांचे धोरणच संभाजी राजांच्या काळात चालू होते. या विषयातील काही बोलकी उदाहरणे पूर्वी दिलेलीच आहेत. अशी चोख व्यवस्था असली तरी याच वतनांच्या लोभातून शिर्के आणि इतर वतनदारांनी स्वार्थापोटी फितुरी केली. काही वतनदार शत्रूला मिळाले. शिवाजी जेधे आणि त्याचा भाऊ सर्जाराव जेधे मुघलांना मिळाले होते. सर्जारावाला परत स्वराज्यात यावयाचे होते. त्याने विचित्रगडाच्या किल्लेदाराशी परस्पर पत्रव्यवहार केला, हे संभाजी राजांना आवडले नाही. ते त्याला लिहितात, "स्वामीच्या पायासी दुर्बुद्धि धरून दोन दिवसांचे मोगल त्यांकडे जाऊनु राहिलेस...याउपरि गनिमा-

कडे राहाणेच असेली तरी सुखेच राहाणे. तुमचा हिसाब तो काय ? ए क्षणी स्वामी आज्ञा करितात तरी गनिमा देखील तुम्हास कापून काढवीतच आहेत... तुम्ही परभारे मुदे सांगोन गडकिलियाकडे राबिते काय म्हणून करिता ?...जो राबिता करणे स्वामींकडेच करून हुजूर वर्तमान लेहून पाठवावे. " असे जरब दाखविणारे पत्र राजांनी लिहिले तरी स्वामीशी एकनिष्ठता दाखवीत असल्यास त्याला अभयपत्र देण्याचे आश्वासनही दिले. गंगास्नानाच्या निमित्ताने एक जहागिरदार शत्रूला फितूर होत आहे असे कळताच संभाजी राजांनी त्याला देहांताची शिक्षा फर्मावली.

शिवाजी महाराजांप्रमाणे प्रारंभी संभाजी राजे वतने देण्याच्या विरुद्ध असले तरी त्यांना शेवटी शेवटी सैन्यशक्ती कमी पडू लागल्यावर वतने आणि जहागिऱ्या द्याव्या लागल्या.

संभाजी महाराजांना दूरदृष्टी नव्हती, त्यांच्या राजकीय धोरणात काही सुसूत्रता नव्हती, राजा म्हणून त्यांची कारकीर्द अयशस्वी झाली, असे त्यांच्यावर आरोप करण्यात येतात. कोणत्याही राजप्रमुखाचे धोरण आणि त्याची सुसूत्रता त्यावेळच्या परिस्थितीवर अवलंबून असते. त्यामुळे या संबंधात मत व्यक्त करताना राजांना कोणत्या परिस्थितीला तोंड द्यावे लागले याचा विचार करावा लागतो.

पूर्वी सांगितल्याप्रमाणे शिवाजी महाराजांना एकवटलेल्या मुघल सामर्थ्याला कधीच तोंड द्यावे लागले नाही. त्यांनी संधि-विग्रह करून एकाच वेळी दोन किंवा तीन आघाड्यांवर शत्रूशी सामना करण्याचे टाळले. शत्रू प्रबळ आहे हे ध्यानात येताच ते तह करीत. त्यांनी आपल्या भूमीवर कधीही युद्ध होऊ दिले नाही. प्रत्येक पाऊल अत्यंत दूरदर्शीपणाने उचलले. परंतु संभाजी राजे सत्तारूढ झाले त्यावेळी राजकीय परिस्थिती पार बदलून गेली होती. खुद्द रायगडावर त्यांच्या विरुद्ध कट झाल्यामुळे वातावरण संशयग्रस्त होते. त्यांना अंतर्गत प्रश्नाकडे लक्ष पुरवावे लागल्याने राज्याभिषेकही १६८१ च्या जानेवारीपर्यंत पुढे ढकलावा लागला. थोडी स्थिरस्थावर होते न होते तोच अकबर त्यांच्या आश्रयास आला. या अगांतुक पाहुण्याच्या पाठोपाठ औरंगजेब सैन्यासह येऊन थडकला. तरीही राजांनी शिवाजी महाराजांच्या धोरणाप्रमाणेच सिद्दीविरुद्ध हालचाली सुरू केल्या. १६८० ते १६८५ पर्यंत त्यांनी उंदेरी आणि दंडाराजपुरी येथे त्याच्याशी उत्तम-प्रकारे लढा दिला. मुघल सैन्यसंभार स्वराज्यावर चालून येण्यापूर्वीच इंग्रजांवर दबाव आणून सिद्दीला काबूत ठेवण्याचा प्रयत्न केला. शिवाजी महाराजांच्या काळातच सिद्दीशी जे शत्रुत्व आणि युद्ध चालू झाले ते संभाजी राजांच्या कार-कीर्दीतच नव्हे तरी मराठी साम्राज्याचा अस्त होईपर्यंत चालू राहिले आणि कोणीही त्याला आवरू शकले नाही.

इंग्रजांवर दबाव आणताना सिद्दीला काबूत ठेवणे कसे जरूर आहे हेही राजे त्यांना सांगत होते. इंग्रजांनी सिद्दीला मुंबईत थारा देऊ नये म्हणून मराठ्यांनी मुंबईवर प्रत्यक्ष स्वारी केली नाही तरी मराठे केव्हाही मुंबईवर आक्रमण करतील अशी भीती उत्पन्न करून ठेवली. अखेर इंग्रजांनी मराठ्यांशी तह केला आणि संभाजीच्या शस्त्रास्त्र-पुरवठ्याच्या मागण्याही मान्य केल्या. मुघलांच्या भीतीने मराठ्यांना साहाय्य देण्यास कचरणारे इंग्रज लंडनहून दि.२८-१०-१६८५ ला लिहितात, " You should enter into a close confederacy and friendship with Sambhajee Rajah and maintain always a strict friendship with him and then you need not fear the anger of the Mogol or the Portuguese having Sambhajee's country and his armies always to friend." याच आशयाचा पुनरुच्चार करीत इंग्रज पुन्हा लंडनहून दि. ३१ मार्च १६८६ रोजी सुरत आणि फोर्ट सेंट जॉर्जच्या वखारवाल्यांना लिहितात, " ... Sambhajee Rajah who is a **warlike prince**... to Sweaten him.... you may among other things agree to furnish him constantly with so much powder, great guns and shotts and arms, on reasonable terms as he shall desire annually, for which purpose we have now sent you a double proportion...." मराठी राज्यातील आर्थिक हलाखीमुळे राजांना याचा लाभ घेता आलेला मात्र दिसत नाही. परंतु इंग्रजांना खाडीचे रक्षण करावयास लावून संभाजी राजांनी सिद्दीचे प्रकरण किती त्रासदायक आहे याचा त्यांना प्रत्यय आणून दिला.

बखरी आणि तत्कालीन फार्सी लेखक संभाजीराजांना दूषणे देत असले तरी त्याच वेळी संभाजीराजांच्या व्यक्तिमत्त्वाबद्दल, शौर्याबद्दल, युद्धकौशल्याबद्दल "पित्याचे शौर्य आणि स्थान यांचा वारसा संभाजीकडे आला" आणि "...तो तरुण राजपुत्र धैर्यवान आणि आपल्या पित्याच्या कीर्तीला शोभेल असाच आहे. ...त्याचे सैनिक त्याला जणू शिवाजी समजूनच मान देतात. त्यांना संभाजीच्या हाताखाली लढावयास आवडते. आणि शूर कृत्याचा सन्मान करण्यात त्याला आनंद वाटतो." हे इंग्रजांचे आणि प्रवाशांचे उद्‌गार मागे दिलेलेच आहेत.

औरंगजेब दक्षिणेत प्रत्यक्ष ठाण मांडून बसलेला असताना संभाजी राजांनी न डगमगता वऱ्हाड, खानदेश, औरंगाबाद, सोलापूर, परिंडा, बऱ्हाणपूर आणि अहमदनगर येथे मुघल प्रदेशात आक्रमक हल्ले केले; लूटमार केली. त्यामुळे औरंगजेबाचे आक्रमण काही काळ मंदावले. या आक्रमक आणि संरक्षक हालचालींचा सविस्तर वृत्तांत अखबारांवरून पूर्वी दिलेला आहे. पराभव झाला की औरंगजेब आपल्या अधिकाऱ्यांना बडतर्फ करीत असे. त्यामुळे मुघल अधिकारी शक्य

तितके आपले पराभव व फजिती दडवून हे वृत्तांत पाठवीत. त्यांत मराठ्यांची हानी आणि सैन्याचे आकडे फुगविलेले असतील असे गृहीत धरूनच त्यांचा विचार केला पाहिजे. तरीही त्यातून जी माहिती मिळते ती मराठ्यांच्या आणि संभाजीच्या धडाडी, शौर्य, आक्रमण आणि संरक्षण या धोरणांच्या बाबतीत चांगलीच बोलकी आहे.

संभाजी महाराजांनी मरण पत्करतानाही जो बाणेदारपणा आणि जे शौर्य दाखविले ते अद्वितीय आहे. संभाजी राजे यांचा युद्धात पराभव करणे जवळजवळ अशक्य आहे असे लक्षात आल्यावरच औरंगजेबाने त्यांना पकडण्याचा डाव टाकावयास प्रारंभ केला. संभाजीला पकडण्याचा पोर्तुगेज विजरईचाही प्रयत्न फसला होता. संभाजी राजांनी औरंगजेबाला पकडता येईल असे राजा रामसिंगाला लिहिले होते. प्रत्यक्ष तसा प्रयत्न त्यांनी केला होता किंवा नाही याचा कोठेही संदर्भ लागत नाही. परंतु दैवाचे फासे उलटे पडले आणि राजेच औरंगजेबाच्या हातात सापडले. औरंगजेबाने संभाजी राजांसारख्या मातबर आणि जशास तसे या बाण्याने वागणाऱ्या शत्रूला जीवदान दिले असते असे वाटत नाही. संभाजीराजां-सारखा शूर राजा नाहीसा केला म्हणजे मराठी राज्य चटकन् गिळंकृत करता येईल ही बादशहाची कल्पना मात्र फोल ठरली. जिवावर बेतले म्हणजे माणसे कशी स्वाभिमानशून्य होतात याची उदाहरणे इतिहासात कमी नाहीत. संभाजीराजांनी असा काळीमा लावून घेतला नाही. ते शत्रूला शरण तर गेलेच नाहीत; पण त्यांनी शत्रूपुढे मानही वाकविली नाही. त्यांचा देह औरंगजेबाच्या पाशवी वृत्तीला बळी पडला. पण त्याच बलिदानातून आणि हौतात्म्यामुळे मराठी राज्य बचावले हे भारतीयांना केव्हाही विसरता येणार नाही. हे अचाट कृत्य केवळ शिवाजीराजां-सारख्या सिंहाला शोभेल असेच त्यांच्या छाव्याने करून दाखविले.

ते शेवटी संगमेश्वरजवळील नावडी नावाच्या खेड्यात पकडले गेले ते परिस्थितीमुळे, औरंगजेबाच्या डोळस बातमीदारांमुळे आणि शिर्के वगैरे मराठी फितुरांमुळे ! त्यांनी तेथेही पराक्रम केला. लढाई दिली. पण त्यांच्या सर्वच दुर्दैवी जीवनाची अखेर करणारा सर्वात दुर्दैवी प्रसंग काही चुकला नाही ! ते शेवटच्या दिवसापर्यंत कार्यमग्न होते याचाही येथे आवर्जून उल्लेख केला पाहिजे. राजे मुघलांच्या हातात सापडले त्याच दिवशी गिरजोजी यादव संभाजीराजांना आपल्या वतन प्रकरणाच्या निकालासाठी भेटला. राजांनी त्याचा निर्णय केल्यावर सही-शिक्क्यासाठी कागदपत्रेही रवाना केली होती.

संभाजी महाराज पकडले गेले त्याच दिवशी त्यांनी आपल्या नश्वर देहावर उदक सोडले. याच औरंगजेबाच्या हातावर तुरी देऊन शिवाजी महाराज आणि स्वतः बालसंभाजी आग्र्याहून निसटले होते. याच मुक्कामात बाल संभाजीने औरंगजेबाला दरबारात मल्लयुद्ध करण्यास नकार देऊन आपला बाणेदारपणा

दाखविलाच होता. युवराज संभाजीला पकडावयाचा घाट ते दिलेरखानाकडे गेलेले असताना आलमगीराने घातला होता. पण तेव्हाही संभाजीराजे जागरूक होऊन मुघलांकडून पळाले होते. हा या शूर आणि कर्तृत्ववान राजाचा इतिहास औरंगजेब विसरणे शक्यच नव्हते. बादशहाने सावज हातात पडताच त्याचे डोळे काढले ते हाच इतिहास आठवून ! पुन्हा संभाजी निसटला तर ? या भीतीने आणि सूडबुद्धीने औरंगजेबाने राजांना आंधळे केले. डोळे गेले तरी संभाजी राजे बिचकले नाहीत तशीच बादशहाची सूडबुद्धीही थंडावली नाही. प्रत्यक्ष मृत्यू येईपर्यंत राजांचे हाल चालूच राहिले. परंतु या दृढनिश्चयी राजाला त्याची कुठे पर्वा होती ! त्यांनी कर्तव्य करताना, राजद्रोह्यांना शिक्षा देताना अशीच कर्तव्यकठोर बुद्धी दाखविली होती. जन्मभर चारी बाजूंनी वेढलेल्या शत्रूशी लढा दिला होता. आपल्या प्रजेला दिलासा देणारा, मार्दव आणि कळकळ दाखविणारा राजा तितकाच कठोर आणि निश्चयीही होता. शिवरायास आठवावे । जीवित तृणासमान मानावे । इहलोकीं परलोकीं तरावे । कीर्तिरूपी ।। हा रामदास स्वामींचा उपदेश आठवून देशासाठी राजांनी देह कःपदार्थ मानला ! त्यांच्या देहाचे हाल हाल पाशवी वृत्तीचा शत्रू करीत होता तेव्हा

नैनं छिन्दन्ति शस्त्राणि नैनं दहति पावकः ।<br>
न चैनं क्लेदयन्त्यापो न शोषयति मारुतः ।।

हे गीतेतील तत्त्वज्ञान राजांच्या मनात, येणे साहजिकच होते. माणसाने कर्तव्य करीत असताना फळाची आशा धरू नये; देह नाश पावतो, परंतु माणसाचा आत्मा अमरच राहतो. शत्रू देह नष्ट करील पण हा अमर आत्मा शत्रूच्या हातात कोठे पडणार आहे ? अर्थात् ज्या तत्त्वज्ञानामुळे संभाजी राजांना धैर्य आले असेल ते गीतेतील महान् तत्त्वज्ञान बिचाऱ्या औरंगजेबाला कसे माहीत असणार ?

या भारताच्या महान सुपुत्राला मानवंदना देताना मान खाली झुकते आणि लेखणी हातातून गळून पडते......

* * *

# १५. साधन-चिकित्सा

संभाजीराजांच्या कारकीर्दीसंबंधी संस्कृत, मराठी, फारसी, डिंगल, इंग्रजी, पोर्तुगेज, डच आणि फ्रेंच भाषेतील अनेक साधने उपलब्ध आहेत. त्यांचे अप्रकाशित आणि प्रकाशित असे दोन भाग पडतात.

**अप्रकाशित साधने :** बिकानेरच्या दप्तरखान्यात फारसी साधने विपुल आहेत. त्यात 'अखबारात-इ-दरबार-इ-मुअल्ला' या बातमीपत्रांचा संग्रह आहे. औरंगजेबाच्या काळापासून ते पेशवाईच्या अखेरपर्यंतची वार्तापत्रे यात आहेत. संभाजीच्या काळातील बातमीपत्रांत औरंगजेबाच्या मुलांनी आणि सरदारांनी लिहिलेल्या दैनंदिन हकीकती आहेत. या अखबारात मुख्यतः औरंगजेबाच्या कारकीर्दीत झालेल्या लढायांचा तपशील मिळतो. या बातमीपत्रांच्या छायाचित्रित प्रती सीतामाऊ येथील इतिहाससंशोधक डॉ. रघुवीर सिंह यांच्या संग्रहात आहेत. त्यांचे साधन संग्रहालय मध्ययुगीन इतिहासाच्या दृष्टीने महत्त्वाचे आणि उपयुक्त आहे. डॉ. रघुवीर सिंह यांनी दोन तज्ञ मुनशींकडून मला फारसी अखबारांच्या हिंदी नकला पाठविल्या.

यात अनेक आघाड्यांवर लढत असलेल्या मराठी सैनिकांची नावे, सैन्याचे आकडे, त्यांच्या युद्धपद्धती, लढायांच्या तारखा, सैन्याच्या हालचाली यांची माहिती मिळते. परंतु या तपशिलावर संपूर्णपणे विश्वास टाकता येत नाही. ही माहिती शत्रुपक्षाकडील सरदारांनी औरंगजेबाला कळविलेली आहे. मराठ्यांविरुद्ध लढताना अपयश आले तर बादशहा आपल्या अधिकाऱ्यांना बडतर्फ किंवा पदावनत करीत असे. त्यामुळे हे सरदार आपल्या पराभवाची नोंद टाळून जय फुगवून सांगत असत. सर्व वार्तापत्रांच्या शेवटी 'मराठे भाग निकले, बादशाही फते हुई' असे आपल्याला लिहिलेले सापडले तरी प्रत्येक लढाईत मराठ्यांचा पराभवच झालेला नसे. १६८६ मध्ये हंबीररावाने रुहुल्लाखान व रणमस्तखान यांना कोल्हापूर-पासून बेळगावपर्यंत हटविले होते आणि त्यांना बेळगावचा किल्ला घेऊ दिला नव्हता. अखबारात मुघलांच्या या पराभवाची हकीकत आढळत नाही. अखबारा-तून उपलब्ध होणाऱ्या लढायांसंबंधी पूरक मराठी कागदपत्रे मात्र सापडलेली नाहीत. या फारसी साधनांमुळे संभाजीकालीन लढायांचा अगदी नवीन व विपुल

तपशील मिळालेला आहे. अखबारात संभाजीच्या मद्यसेवनाचा किंवा व्यभिचाराचा उल्लेख कोठेही आलेला नाही.

**इंग्रजी साधने** : इंग्रजांच्या 'ईस्ट इंडिया कंपनी 'च्या कारभाराचे व पत्रव्यवहाराचे दप्तर 'फॅक्टरी रेकॉर्ड' म्हणून ओळखण्यात येते. सुरत, मुंबई, राजापूर, कारवार, मद्रास, फोर्ट सेंट जॉर्ज, कुडालोर आणि धरणगाव येथील वखारीतून एकमेकांचा पत्रव्यवहार होत असे. सर्व वखारींच्या प्रमुखांना लंडनला माहिती कळवावी लागे. व्यापाराच्या निमित्ताने आलेल्या इंग्रजांचा हिंदुस्थानातील सत्ताधीशांशी संबंध आला. दक्षिणेतील वखारींची संख्या जास्त असल्यामुळे इंग्रजांचा शिवाजी, संभाजी, राजाराम, विजापूर आणि गोवळकोंड्याचे सुलतान आणि दक्षिणेतील पाळेगारांशी संबंध आला. सर्व वखारीतील अहवाल आणि दैनंदिन कामांची नोंद करण्यात येत असे. हा सर्व पत्रव्यवहार लंडनच्या मुख्य कार्यालयाकडे पाठविण्यात येत असे. इंग्रज वकील वखारी काढण्याची परवानगी मागण्यासाठी, व्यापारी सवलती मिळविण्यासाठी आणि तहाच्या वाटाघाटींसाठी शिवाजीमहाराज, संभाजीराजे यांना भेटण्यासाठी येई. शिवाजीकालीन इंग्रजी पत्रव्यवहार, "English Records on Shivaji" या पुस्तकात छापलेला आहे. या पत्रांचा मराठी अनुवाद 'शिवाजीकालीन पत्रसार संग्रह' या नावाने प्रसिद्ध झालेला आहे.

संभाजी राजांच्या काळातील इंग्रजी पत्रव्यवहाराच्या नकला श्री. वा. सी. बेंद्रे यांनी लंडनहून टंकलिखित करून आणल्या. त्यांनी या नकलांचा उपयोग करण्यास मला परवानगी दिली. संभाजी राजांच्या कारकीर्दीच्या प्रत्येक वर्षाचा एकेक खंड होईल इतकी पत्रे त्यात आहेत. हा पत्रव्यवहार अद्याप छापलेला नाही. डॉ. रॉबर्ट ऑर्मला हा मूळ पत्रव्यवहार पाहावयास मिळालेला असल्याने त्याच्या "Historical Fragments" या पुस्तकातील आणि इंग्रजी पत्रव्यवहारातील माहिती सारखीच आहे.

अर्थात इंग्रजांनी लिहिलेली सर्वच माहिती ग्राह्य धरता येत नाही. प्रस्तुत पुस्तकात इंग्रजांच्या पत्रातील मजकूर काही ठिकाणी कसा चुकलेला आहे याची वेळोवेळी नोंद केलेली आहे. अनेक वेळा ऐकीव माहितीचीही ते आपल्या पत्रात नोंद करतात.

भारत इतिहास संशोधक मंडळाच्या संग्रहालयातील चिंचवड देवस्थानच्या दप्तरातील, संभाजी राजांचे १६८६ सालचे एक अप्रकाशित पत्र श्री. गं. ना. मुजुमदार यांनी मला मिळवून दिले.

याशिवाय मंडळाच्या कै. शं. ना. जोशी यांच्या दप्तरातील संभाजी आणि कविकलश यांच्या विषयीचे टिपण मला श्री. य. न. केळकर यांनी उपलब्ध करून दिले.

या दोन्ही अप्रकाशित साधनांचा मी या पुस्तकात उपयोग केलेला आहे.

**प्रकाशित मराठी साधने :**

मुघल किंवा पाश्चात्यांप्रमाणे दैनंदिन हकीकती लिहून ठेवण्याची प्रथा मराठी माणसात तितकीशी प्रचलित नव्हती आणि नाही. मराठी साधनात शकावल्या, तत्कालीन कागदपत्रे, करीने, निवाडापत्रे आणि बखरी ही मुख्य होत.

ऐतिहासिक दृष्टीने शकावल्यातील उल्लेख अस्सल आणि पहिल्या दर्जाचे साधन समजतात. शहाजीकालीन शकावली, राज्याभिषेक शकावली, होनप–देशपांडे शकावली, शिवापूरकर वहीतील शकावली ( शिवनिधन शकावली ), दासपंचायत शकावली, जेधे शकावली, संपूर्ण शिवकालीन शकावली इत्यादी शहाजी, शिवाजी, संभाजी आणि राजाराम यांच्या काळातील माहिती पुरविणाऱ्या शकावल्या होत. शकावल्यातील शेवटच्या नोंदीवरून त्यांचा रचनाकाल निश्चित करता येतो. त्या रचणारी माणसे साधारणपणे आपल्या कारकीर्दीतील गोष्टी नमूद करीत असत. शिवशाहीतील उल्लेख साधारणपणे समकालीन कागदपत्रांच्या आधाराने केलेले असल्याने शकावल्या विश्वसनीय मानतात. जेधे, शिवापूरकर-वही आणि होनप–देशपांडे या तीन शकावल्यांत शिवाजी, संभाजी आणि राजाराम यांच्या काळची विश्वसनीय माहिती आढळते.

भोर संस्थानातील मौजे कारी येथील श्री. दयाजीराव सर्जेराव ऊर्फ दाजीसाहेब जेधे देशमुख यांच्याकडील ‘ जेधे शकावली ’ १९१५ साली लोकमान्य टिळकांना मिळाली. ही वही उभ्या व अरुंद पोर्तुगेज कागदांवर लिहिलेली असून तीत शके १५४० ते १६१९ म्हणजे सन १६१८ ते १६९७ पर्यंतची वर्षवार हकीकत, कमीअधिक तपशिलासह लिहिलेली आहे. या शकावलीत महत्त्वाच्या घटनांचे उल्लेख असले तरी संभाजीकालीन अनेक महत्त्वाच्या हालचालींची त्यात नोंद सापडत नाही.

शिवापूरकर देशपांडे यांच्या संग्रहात एक लहान यादी आणि दुसरी वहीत असलेली अशा दोन शकावल्या आहेत. यालाच शिवनिधन शकावलीही म्हणतात. शकावली लिहिण्याचा स्वतंत्र असा हा दुसरा प्रयत्न जेधे शकावलीहून अगदी निराळ्या प्रकारचा आहे. या शकावलीत कोठेही वार दिलेला नाही. तरीही “ कल्याणगड पहावयास गेले, प्रतापगडावर देवावर वीज पडली, संभाजीराजे यांस कारभार सांगितला, संभाजीराजे यांची मुंज झाली, ” इत्यादी बारीकसारीक घटनांची नोंद आहे. या तपशिलावरून ही शकावली लिहिणाऱ्यासमोर अस्सल शिवकालीन दाखले असावे असे वाटते.

संभाजीकालीन महत्त्वाचा पत्रव्यवहार भा. इ. सं. मंडळाचे त्रैमासिक व पेशवे दप्तरातील खंडात, राजवाडे यांच्या ‘ मराठ्यांच्या इतिहासाची साधने ’ या

ग्रंथात, रामदासी सांप्रदायाच्या कागदपत्रात आणि इतर पत्रव्यवहारात आढळतो. या सर्व पत्रांच्या संकलनावरून संभाजीराजांच्या राज्यकारभारविषयक, धार्मिक धोरणाबद्दल आणि इतर अनेक मुद्यांबद्दल माहिती मिळते.

**बखरी** : खालील बखरी संभाजीराजांच्याविषयी माहिती पुरवितात.

( अ ) **सभासद बखर** : या बखरीचा लेखक कृष्णाजी अनंत सभासद शिवाजी, संभाजी आणि राजाराम यांचा समकालीन होता. तो दरबारचा सभासद होता. कृष्णाजी अनंत सभासदाने राजाराम महाराजांच्या आज्ञेवरून जिंजी येथे शके १६१६ म्हणजे सन १६९४ मध्ये ही बखर लिहावयास प्रारंभ करून ती तीन वर्षांनी शके १६१९ म्हणजे सन १६९७ मध्ये लिहून पूर्ण केली. सभासदाला शिवाजी महाराजांच्या राजकारणाची प्रत्यक्ष माहिती असल्यामुळे ही बखर मोठ्या प्रमाणात विश्वसनीय मानण्यात येते. संभाजी महाराज राज्यावर आल्यावर म्हणजे १६८० ते १६८९ या नऊ वर्षातील माहिती सभासदाने दिलेली नाही. त्याने शेवटी शिवाजी महाराजांच्या तोंडून संभाजीविषयी भविष्य वर्तविलेले आहे. संभाजीकालीन पत्रव्यवहाराचा अभ्यास केल्यावर ते भविष्य बरोबर आहे असे वाटत नाही. राजाराम, सोयराबाई आणि संभाजी असे त्याकाळी दोन पक्ष झाल्यामुळे सभासदाने संभाजीराजांबद्दल काहीच न लिहिता शिवाजी महाराजांच्या तोंडून भविष्य वर्तविण्याची युक्ती योजलेली असावी असे वाटते.

( ब ) **एक्याण्णव कलमी बखर** किंवा **तारीख ए शिवाजी**—ही बखर अण्णाजी रंगनाथ मालकरे यांचा मुलगा खंडो अण्णाजी याने १७८० साली लिहिली. ती प्रभात मासिकात आणि ‘ भारतवर्षात ’ छापण्यात आली आहे. या बखरीत संभाजीच्या बालपणाची माहिती दिलेली आहे.

( क ) **चिटणीस बखर** : मल्हार रामराव चिटणीस यांनी शिवाजी, संभाजी आणि राजाराम यांचे शिवछत्रपतीचे सप्तप्रकरणात्मक चरित्र, श्रीमंत छत्रपती संभाजी महाराज, आणि राजाराम महाराजांचे चरित्र अशा तीन बखरी लिहिलेल्या आहेत. शाहू छत्रपती यांनी राज्याभिषेक शक १३७ प्रमोदीनाम संवत्सरे, ज्येष्ठ बहुल षष्ठी भृगुवासरे हे चरित्र तयार करण्याची आज्ञा केली असे त्याने बखरीच्या सुरुवातीला लिहिले आहे. परंतु दुसरे शाहू छत्रपती दि. ४–५–१८०८ रोजी मरण पावले आणि दि. ८–६–१८१० रोजी त्यांनी हे चरित्र लिहिण्याची आज्ञा केली ही विधाने विसंगत आहेत. चिटणीसाने हे चरित्र केव्हा पूर्ण केले याचीही बखरीत नोंद केलेली नाही. मल्हार रामरावांनी लिहिलेली ही बखर ग्रँट डफ याने पाहिली होती.

मल्हार रामराव चिटणीसांच्या वंशातील बाळाजी आवजी चिटणीसाला राजांविरुद्धच्या कटात हात असल्याच्या संशयावरून संभाजी राजांनी देहान्ताची शिक्षा दिलेली होती. चिटणीस घराण्याचा या गोष्टीमुळे संभाजी राजांवर राग

असावा असे वाटते. या बखरीत कवि कलश, खुद्द संभाजीराजे यांच्याविषयी अतिशयोक्तिपर आणि विपर्यस्त माहिती वाचावयास मिळते. चिटणिसाची विधाने कशी चुकलेली आहेत हे अस्सल कागदपत्रांच्या आधाराने प्रस्तुत चरित्रात ठिकठिकाणी दाखविलेले आहे. याच बखरीमुळे संभाजी राजांविषयी बरेच गैरसमज पसरलेले असावे असे वाटते.

( ड ) **मराठी साम्राज्याची छोटी बखर** : ही बखर १८१७ सालच्या सुमारास लिहिली गेली. श्री. बाळाजी जनार्दन मोडक यांनी तिचे संपादन करून १८८९ साली ती 'काव्येतिहास संग्रहात' छापली, या बखरीत घटनांची बरीच विसंगती आढळत असली तरी काही महत्त्वाच्या गोष्टीही त्यात मिळतात.

( इ ) **शिवदिग्विजय** किंवा **शिवाजी महाराजांची बखर** : ही बखरही १८१८ साली लिहिण्यात आली. बडोदे येथील चिटणीस घराण्यातील कोणी तरी ही लिहिलेली असावी. श्री. पां. रा. नंदुरबारकर आणि श्री. ल. का. दांडेकर यांनी संपादन करून ती १८९५ साली छापली. या बखरीची भाषा मल्हार रामराव चिटणीसांच्या बखरीतील भाषेपेक्षा वेगळी असली तरी या बखरीतील मजकूर एखाद्या जुन्या बखरीतून घेतलेला असावा असे वाटते. संभाजी राजे गादीवर बसल्यानंतरची हकीकत यात नाही. राजारामाला गादी मिळावी म्हणून सोयराबाईने काय काय केले याचा सविस्तर वृत्तांत यात दिलेला आहे.

( ई ) **पंत प्रतिनिधींची बखर** : ही बखर रावसाहेब कै. गोविंदराव सरखेल यांना तंजावर येथे सापडली. ती १८४४ सालच्या सुमारास लिहिलेली असावी. श्री. द. ब. पारसनीस आणि श्री. हरी नारायण आपटे यांनी ती 'भारत वर्षात' छापली. या बखरीत बरीच विसंगत विधाने आढळतात. अण्णाजी दत्तोच्या पक्षपाती लोकांनी सुलतान अकबराच्या सहकार्याने आणि राजारामाच्या बाजूने केलेल्या मसलतीचा उल्लेख या बखरीत सापडतो. या बखरीत विशाळगडाच्या पंतप्रतिनिधींची पुष्कळ हकीकत लिहिलेली असल्याने या बखरीला 'पंत प्रतिनिधींची बखर' असे म्हणतात.

**तंजावर येथील शिलालेख** : हा बृहदीश्वराच्या मंदिरात असून तो सरफोजीच्या कारकीर्दीत त्याच्या चिटणीसाने दि. १३-१२-१८०३ रोजी खोदून पूर्ण केला. त्यात भोसले घराण्याचा इतिहास आहे. त्यातली भाषा शुद्ध नसून तो बखरीसारखाच वाटतो. मजकुरात संभाजीच्या आग्रा भेटीची आणि शेवटच्या प्रसंगाची गल्लत केलेली आहे. संभाजीविषयी या शिलालेखात फारशी माहिती नाही. तो एकोणिसाव्या शतकात आणि संभाजीराजांच्या मृत्यूनंतर बराच उशीरा लिहिलेला असल्याने सर्वस्वी ग्राह्य धरता येत नाही. यातील संभाजी महाराजांच्या बहिणीसंबंधात लिहिलेली माहिती बरोबर आहे.

सभासद बखर सोडली तर सर्व बखरी पेशवाईच्या उत्तरार्धात लिहिलेल्या आहेत. त्या ऐतिहासिक शास्त्रदृष्ट्या गुणवान नाहीत. या बखरीत कालविपर्यास, प्रसंगलोप, नायकाच्या महत्त्वाचे अज्ञान, संगतवार आणि तपशीलवार गोष्टींचा अभाव इत्यादी दोष; आणि असंबद्ध, परस्परविरोधी, संदिग्ध किंवा अविश्वसनीय वाटणारी विधाने आढळतात.

**डाग रजिस्टर** : इंग्रजांप्रमाणे वेंगुर्ले, कॅनरा, पोर्टो नोव्हो, कारवार इत्यादी ठिकाणी डच लोकांच्या व्यापारी वखारी होत्या. त्यांच्या पत्रव्यवहाराचे ३० खंड छापलेले असून ते औंधच्या संग्रहात आहेत. संभाजीच्या व इतर काळातील पत्रव्यवहार दिल्लीच्या राष्ट्रीय संग्रहालयात आहे. डच भाषा फारशी ज्ञात नसल्याने त्यांचा कोणी फारसा उपयोग केलेला नाही. व्यापारी सवलती मिळविण्यासाठी डच वकील संभाजीराजांना भेटण्यासाठी पन्हाळयाला गेला होता. इंग्रजांप्रमाणे डचांनीही त्यांच्या पत्रव्यवहारात त्यावेळच्या राजकीय घडामोडींची नोंद केलेली आहे. या पत्रव्यवहारातील २८,२९ आणि ३० या तीन खंडांतील काही पत्रांचे इंग्रजी भाषांतर माझे वर्गमित्र श्री. ना. ह. कुलकर्णी यांनी मला करवून दिले.

**फ्रेंच साधने** : डॉ. व. गो. हताळकर यांनी Archives Nationales, Archives de Versailles, इत्यादी ग्रंथालयातील अप्रकाशित साधने, Memoires de Franscis Martin इंग्रजी, डच वगैरे अनेक प्रकाशित आणि अप्रकाशित साधनांवरून मराठे आणि फ्रेंच यांच्या संबंधावर पुस्तक प्रसिद्ध केले आहे. या चरित्रग्रंथात फ्रेंच संबंधाच्या माहितीसाठी याच पुस्तकाचा उपयोग केलेला आहे. त्याचप्रमाणे १९२३ साली सर जदुनाथ सरकार यांनी M. Boureau Deslandes' Diary, चा भा. इ. सं. मंडळाच्या त्रैमासिकात प्रसिद्ध केलेला अनुवाद Paul kaeppelin याचे La Campaigne de Indes Orientales et Francois Martin Paris 1908, इत्यादींचा उपयोग केलेला आहे.

**फारसी साधने** : उत्तरेतील मुघल बादशहा आणि दक्षिणेतील सुलतान राजकीय व इतर महत्त्वाच्या घटनांची नोंद ठेवीत असत. औरंगजेबकालीन दैनंदिन बातमीपत्रासंबंधी पूर्वी माहिती दिलेली आहे. याशिवाय शिवाजी, संभाजी, राजाराम, ताराबाई यांच्याविषयी माहिती देणारी पुढील साधने आहेत :

(१) '**मासिरे आलमगिरी** "– साकी मुस्तैदखान या औरंगजेबाच्या अधिकाऱ्याने मासिरे आलमगिरी नावाने बादशहाचे फारशी भाषेत चरित्र लिहिलेले आहे. हे चरित्र त्याने औरंगजेबाच्या मृत्यूनंतर दोन वर्षात लिहिले. रॉयल एशिअटिक सोसायटी ऑफ बेंगॉल या संस्थेने हा ग्रंथ छापून बिब्लिओथेका इंडिका नावाच्या मालेत इ. स. १८७१ मध्ये प्रसिद्ध केला. या पुस्तकाचे औरंगजेबनामा या नावाचे हिंदी भाषांतर आहे. मूळ ग्रंथाचा उर्दू अनुवाद हैद्राबाद सरकारच्या

भाषांतर खात्याने इ. स. १९३२ मध्ये छापला. १९४७ साली सर जदुनाथ सरकार यांनी मासिरे आलमगिरीचा इंग्रजी अनुवाद केला. तो रॉयल एशिअेटिक सोसायटी ऑफ बेंगॉल या संस्थेने आपल्या बिब्लीओथेका इंडिका या मालेत प्रसिद्ध केला. हा अनुवाद उत्कृष्ट असला तरी त्यात अनेक चुका आढळतात. श्री. सेतुमाधवराव पगडींनी त्या निदर्शनास आणलेल्या आहेत. मासिरे आलमगिरीचे शिवाजी महाराजांच्या मृत्यूपर्यंतचे, मराठ्यांच्या संबंधीच्या मजकुराचे मराठी भाषांतर श्री. ग. ह. खरे यांनी केले आहे ( शिवचरित्र वृत्त, तिसरा खंड, फारसी विभाग, पृष्ठ ९१ ते १०० ). १६८० ते १७०७ या काळातील मजकुराचा अनुवाद श्री. सेतुमाधवरावांनी आपल्या 'मराठे आणि औरंगजेब' या पुस्तकात दिलेला आहे ( १९६३ ). साकी मुस्तैदखानाच्या तारखात चुका क्वचितच आढळतात. 'अखबार–इ–दरबार–इ–मुअल्ला'त यापेक्षा लढायांचा तपशील अधिक सापडतो. या उपलब्ध साधनात सर जदुनाथ सरकार आणि श्री. सेतुमाधवराव पगडी यांनी केलेल्या अनुवादात कोथळा ऐवजी कोंडाणा असा अर्थ लावल्यामुळे मुघलांनी कोंडाणागड दि. १४–१२–१६८४ रोजी घेतला असा त्यांचा समज झाला. श्री. पगडी यांनी पुढे तो दुरुस्त केला. या पुस्तकात मराठा–मुघल संघर्षाची तारीखवार माहिती थोडक्यात मिळते. हा साधन ग्रंथ महत्त्वाचा आहे.

### ( २ ) खाफीखान लिखित 'मुन्तखबुल लुबबाए महंमदशाही' :

सन १७३४ मध्ये महंमद हाशिम खाफीखान याने मुघल साम्राज्याचा इतिहास लिहून त्या पुस्तकाला वरील नाव दिले; याला 'तारीखे खाफीखान' असेही म्हणतात. हा फारसी ग्रंथ सन १८७४ मध्ये 'एशिॲटिक सोसायटी ऑफ बेंगॉल' यांनी दोन खंडांत प्रसिद्ध केला. दुसऱ्या खंडात औरंगजेबाची तपशीलवार माहिती दिलेली असून त्यात त्याच्या कारभाराची आणि बहादूरशहापासून महंमदशहापर्यंतच्या मुघल बादशहांची हकीकत आहे. दुसऱ्या खंडाच्या जवळजवळ अर्ध्या भागाचा इंग्रजी अनुवाद डाऊसन यांनी केलेला असून तो 'इलियट ॲन्ड डाऊसन' या मालेच्या सातव्या खंडात समाविष्ट आहे. खाफीखानाच्या या पुस्तकाचा संपूर्ण अनुवाद कोणीही प्रसिद्ध केलेला नाही. इंडिया ऑफिसमधील 'मॅकेन्झी संग्रहात' या पुस्तकाचा कोणीतरी केलेला अनुवाद असून या अप्रकाशित अनुवादाचा उपयोग श्री. वा. सी. बेंद्रे यांनी त्यांच्या 'छ. संभाजी महाराज' या चरित्रात केलेला आहे.

या ग्रंथातील शिवाजी महाराजांसंबंधीचा भाग श्री. ग. ह. खरे यांनी १९३९ साली भा. इ. सं. मंडळाच्या, शिवचरित्र वृत्त संग्रहाच्या तिसऱ्या खंडात छापला आहे. १९६२ साली श्री. पगडी यांनी १६८० ते १७०७ या काल-

खंडाचा म्हणजे मराठ्यांच्या स्वातंत्र्य-युद्धाचा अनुवाद केलेला आहे. रामसेजच्या वेढ्यात खाफीखान हजर होता. १६८९ मध्ये मुघलांनी रायगड जिंकला तेव्हा तो अब्दुर्रजाक या फौजदाराचा मदतनीस म्हणून रायगडावर होता. मराठे आणि मुघल यांच्या सर्वच लढायांचा तपशील त्याने दिलेला नाही. काही घटनांची तो माहिती देतो. मराठ्यांना तो काफर, नर्कवासी, नालायक, पीडा देणारे, फुटक्या नशिबाचे, अशी दूषणे चिकटवितो. संभाजीराजे विलासात गुंग असताना पकडले गेले असे खाफीखानाने लिहिलेले आहे. परंतु तत्कालीन कागदपत्रांत या विधानाला आधार सापडत नाही. त्याने आडपडदा न ठेवता मुघलांच्या दुर्दशेचे, मराठ्यांच्या युद्धकौशल्याचेही तपशिलाने वर्णन केले आहे. त्याच्याजवळ स्वतःची टिपणे आणि कागदपत्रे असली तरी त्याने काही ऐकीव बातम्यांवरून मजकूर लिहिलेला आहे. खाफीखानाने संभाजीच्या व्यभिचाराचा उल्लेख केलेला असला तरी मासिरी आलमगिरीत आणि दैनंदिन वार्तापत्रात या गोष्टीचा उल्लेख आढळत नाही.

( ३ ) **मातबरखानाची अप्रकाशित पत्रे** : मराठा-मुघल संघर्ष चालू असताना औरंगजेबाचा मातबरखान नावाचा एक अधिकारी १६८७–८८ सालच्या सुमारास नाशिक येथे फौजदार होता. त्याने एक-दोन वर्षांत बागलाणातील किल्ले घेतले. जेठमल नावाचा एक हिंदू त्याचा चिटणीस ( मुन्शी, लेखक ) म्हणून काम करीत असे. तो फारसी भाषेतील मोठा कवी आणि पंडित होता. मातबरखानाने पाठविलेली ( आणि स्वतः चांगल्या भाषेने सजविलेली ) पत्रे एकत्रित करून त्यात मातबरखानाच्या संक्षिप्त हकीकतींची जोड देऊन ‘ कारनामा ’ ( कर्तबगारीची हकीकत ) या नावाचा एक ग्रंथ जेठमलने तयार केला. १७०५ सालानंतर जेठमल कोठे गेला हे कळत नाही. यात शंभर पत्रे असून त्यांचा लेखन काळ १६८८ ते १७०५ आहे. या काळात मातबरखानाने मराठ्यांचे अनेक किल्ले घेऊन जागजागी मुघल ठाणी बसविली. संभाजीच्या कारकीर्दीच्या शेवटच्या वर्षात म्हणजे १६८८–८९ सालात मातबरखानाने त्रिंबकगड, पट्टागड, कवनी, हरीशगड इत्यादी बागलाणातील किल्ले फितुरीने कसे घेतले याची सविस्तर माहिती मिळते. ती फार महत्त्वाची आहे. ही पत्रे औरंगजेबाच्या अधिकाऱ्यांच्या वार्तापत्रांप्रमाणेच आहेत. त्यातून ‘ अखबारांना ’ पूरक माहिती मिळते. या फारसी पत्रांचा श्री. सेतुमाधवराव पगडी यांनी अनुवाद करताना जेठमलची अलंकारिक भाषा टाळून मुख्य मजकुरावर भर दिलेला आहे. हा अनुवाद ‘ नवभारत ’ मासिकाच्या १९७० सप्टेंबर ते डिसेंबरच्या चार अंकांत प्रसिद्ध झाला. या अनुवादाने पुष्कळ नवीन माहितीची भर पडलेली आहे.

( ४ ) **फुतहाते आलमगिरी** : ईश्वरदास नागरने ‘ फुतहाते आलमगिरी ’ म्हणजे ‘ आलमगीर विजय ’ नावाचा बखरवजा ग्रंथ लिहिला. औरंगजेबाचा मुख्य न्यायाधीश शेखुल हस्लाम याचा ईश्वरदास नागर कारकून होता. तो

बादशाही छावणीबरोबर असे. त्यामुळे १६८२ साली औरंगजेबाबरोबरच तो दक्षिणेत आला; त्याच्या मृत्यूनंतर ईश्वरदासने हा ग्रंथ लिहावयास सुरुवात केली. १७०० सालापर्यंतची हकीकत त्यात आलेली असून १७१० ते १७२० च्या दरम्यान त्याने हे लिखाण पूर्ण केले असावे. ईश्वरदासचा नातू लाला खुशहाल याच्या अवलोकनासाठी या ग्रंथाची एक प्रत १७४९ च्या सुमारास तयार करण्यात आली. या प्रतीवरून शहाजानाबाद, दिल्ली येथे राहणारा कहानासिंग याने १८३१ साली सातारा येथे एक प्रत तयार केली असा उल्लेख आहे. हीच प्रत ब्रिटिश वस्तुसंग्रहालयात आहे. ३३९ पृष्ठांचा हा ग्रंथ अद्यापही अप्रकाशित आहे. औरंगजेबाच्या मराठ्यांशी आलेल्या संबंधाचा 'मोगल–मराठा संघर्ष' नावाचा ग्रंथ श्री. पगडी यांनी प्रसिद्ध केला असून त्यात या पुस्तकाचा मराठी अनुवाद आहे. त्यातील माहिती शिवाजी महाराजांसंबंधी ऐकीव आणि अतिशयोक्तीने भरलेली असून त्यात हास्यास्पद चुका व बऱ्याच गप्पाही आहेत. ईश्वरदास १६८९ मध्ये दक्षिणेत होता; नंतर १६९६ साली तो ब्रह्मपुरीच्या छावणीत होता. सुल्तान अकबराची त्याने बरीच माहिती दिलेली आहे. संभाजी राजांची कैद, त्यांचा वध या संबंधात ईश्वरदासने माहिती लिहिलेली असून कविकलशाचा फितुरीत हात होता असे त्याचे मत आहे. ईश्वरदासने कोणत्याही घटनेचा दिवस दिलेला नाही; घटनांचा क्रमही व्यवस्थित वाटत नाही. गोवळकोंड्याच्या विजयाची हकीकत त्याने विजापूरच्या विजयाच्या माहितीपूर्वी दिलेली आहे. रायगड मुघलांनी जिंकला त्याची हकीकत दिल्यानंतर त्याने संभाजीच्या वधाची माहिती लिहिलेली आहे.

'मोगल–मराठा संघर्ष' या पुस्तकात श्री. सेतुमाधवराव यांनी 'खुतूते शिवाजी' म्हणजे शिवाजीच्या पत्रांचा मराठी अनुवाद दिला आहे. या हस्तलिखिताची एक प्रत कलकत्त्याच्या एशिॲटिक लायब्ररीत आहे. त्यात एकूण ३१ पत्रे असून, त्यात सुरुवातीचे एक आणि शेवटचे एक, अशी दोनच शिवाजी महाराजांची आहेत. जयसिंग, दिलेरखान, प्रतापराव गुजर यांची त्यात पत्रे आहेत. औरंगजेबाने अकबराला लिहिलेले पत्र आणि त्याचे उत्तर यात आहे. तसेच अकबराने संभाजीराजे आणि कविकलश यांना लिहिलेल्या १० पत्रांचा त्यात अनुवाद आहे. या पत्रांचा अनुवाद सर जदुनाथ सरकार यांनी 'मॉडर्न रिव्ह्यू' या मासिकात आणि त्यांच्या 'House of Shivajy' या पुस्तकात छापलेला आहे.

(५) "**तारीखे दिल्कुशा**" : म्हणजे मनोरम इतिहास. हे भीमसेन सक्सेना याचे फारसी भाषेतील आत्मचरित्र आहे. भीमसेनचा बाप रघुनंदन सक्सेना हा बऱ्हाणपूर येथे एका लहान हुद्यावर होता. भीमसेन १० वर्षांचा असताना बापाबरोबर नाशिक, त्रिंबकेश्वर, प्रवरा–संगम या स्थळांची यात्रा करून

आला. या पुस्तकात त्याने अनेक आठवणीं दिलेल्या आहेत. शिवाजी महाराज, संभाजी व राजाराम आणि औरंगजेब यांच्या कारकीर्दीतील अनेक घटना त्याने सविस्तरपणे दिल्या आहेत. हे आत्मचरित्र त्याने १७०९ सालाच्या सुमारास लिहिले. १७८१–८२ च्या सुमारास इंग्रज सेनाधिकारी कर्नल पॉपहॅम आणि त्याचा फारसी दुभाष्या कॅप्टन जोनॅथन स्कॉट वगैरे ग्वॉल्हेरच्या भागात फिरत असताना दतिया संस्थानच्या राजाने 'तारीखे दिल्कुशा'ची एक प्रत त्यांना दिली. १७९४ साली जोनॅथन स्कॉट याने आपल्या इतिहास ग्रंथात भीमसेन सक्सेना आणि इतर भारतीय इतिहासकारांच्या ग्रंथांचा इंग्रजी अनुवाद दिलेला आहे. स्कॉटच्या अनुवादावरून श्री. पांडुरंग नरसिंह पटवर्धन यांनी 'बुंदेल्याची बखर' या नावाने १९२० साली मराठी अनुवाद प्रसिद्ध केला. परंतु स्कॉटने दिलेली संभाजीच्या कैदेची व मृत्यूची हकीकत श्री. पटवर्धन यांनी वगळलेली आहे.

'तारीखे दिल्कुशा'ची प्रत ब्रिटिश वस्तु-संग्रहालय, लंडनच्या इंडिया ऑफिस लायब्ररीत असली तरी त्यात १६८७ सालपर्यंतचीच हकीकत आहे. पॅरीस येथील बिब्लियोथके न्याशनल या ग्रंथालयात त्याची संपूर्ण प्रत आहे. इंडिया ऑफिस व ब्रिटिश म्युझियम मधील प्रतीवरून सर जदुनाथ सरकार यांनी आपली छायाचित्रित प्रत तयार करून घेतली. या प्रतीवरूनच श्री. पगडी यांनी भीमसेन सक्सेना यांच्या ग्रंथातील पुष्कळशा भागाचा अनुवाद 'मोगल आणि मराठे' या पुस्तकात केला आहे (१९६३). भीमसेन सक्सेना आपल्या आठवणी नमूद करीत असल्यामुळे त्याचे आत्मचरित्र हा इतिहास ग्रंथ आहे असे म्हणता येत नाही. तरीही त्यातून महत्त्वाच्या ऐतिहासिक घटनांची माहिती मिळते. भीमसेन याने पुष्कळ ठिकाणी तारखा दिलेल्या नाहीत. हे आत्मवृत्त लिहिताना त्याने स्वतःच्या स्मृतीवर भर दिलेला असल्यामुळे ज्या त्या वर्षातच घटनांची नोंद झालेली नाही.

**रुकात–इ–आलमगिरी** : हा पत्रसंग्रह 'कलिमत–इ पैइबात् (?)' म्हणूनही ओळखला जातो. १६८२ ते १७०७ सालातील औरंगजेबाची व त्याच्या सरदारांची पत्रे या संग्रहात आहेत. नकलाकारांच्या चुका यात असल्या तरी या पत्रातील मजकूर महत्त्वाचा आणि ऐतिहासिक आहे.

**बुसातिन–उस्–सलातीन** (बसातीनुस्सलातीन) : या ग्रंथाचा कर्ता मुहम्मद इब्राहीम अझ्झुबैरी असून त्याने ग्रंथरचनेचे साल कोठेही दिलेले नाही. १८२४ सालच्या सुमारास तो लिहिण्यात आलेला असावा. विजापूरच्या आदिलशाही घराण्यात जे आठ राज्यकर्ते झाले त्यांची हकीकत यात आहे. सुरुवातीपासून इब्राहीम आदिलशहाच्या निम्या कारकीर्दीपर्यंतचा भाग मुख्यतः फिरिश्ता व शिराझी यांच्या ग्रंथावरून सजविलेला आहे. मुहम्मद आदिलशहाची कारकीर्द बव्हंशी मुहम्मदनामाच्या आधाराने रंगविलेली आहे. अली आदिलशहाच्या

राजवटीची 'तारीख-इ-अली' आणि 'अलीनामा' वरून माहिती दिलेली दिसते. त्याच्या पुढील हकीकत सामान्यतः खाफीखानाच्या 'मुन्तखबुल-लुबाब' इब्राहीम असदखान आणि शेख अब्दुल हसन या ग्रंथांच्या साहाय्याने लिहिलेली असावी.

या ग्रंथाचा मूळ पाठ दक्षिण हैदराबाद येथे छापण्यात आला. याच ग्रंथाचा नागरी लिपीतील उर्दू अनुवाद बडोद्याच्या पूर्ण चंद्रोदय छापखान्यातून १८९५ साली प्रसिद्ध झाला. मराठी अनुवाद कै. बाळाजी कृष्ण मोडक व दिनकर गोविंद वझे यांनी 'विजापूरच्या आदिलशाही घराण्याचा इतिहास' या नावाने कोल्हापूर येथे छापला. फारसी, हैदराबादी प्रतीतील शिवचरित्राला उपयुक्त असलेल्या मजकुराचा मराठी अनुवाद श्री. ग. ह. खरे यांनी शिवचरित्रवृत्त संग्रहाच्या तिसऱ्या खंडात छापलेला आहे. मूळ ग्रंथ उत्तर कालातील असला तरी ग्रंथकाराने बरीच माहिती समकालीन ग्रंथाच्या आधाराने लिहिलेली असल्यामुळे त्याला ऐतिहासिक महत्त्व आहे. तरीही बखरीत आढळणारे दोष याही ग्रंथात आहेत.

या ग्रंथाच्या मराठी (मोडी लिपीतले) भाषांतराचे काम सर बार्टल फ्रियर यांनी नरसिंगराव विठ्ठल पारसनीस यांच्याकडे सोपविले होते. ते सातारकर छत्रपतींचे पारसनीस होते. त्यांनी हे भाषांतर ५-११-१८५० रोजी पूर्ण केले. त्यानंतर एकाच वर्षाने पारसनीस यांनी श्रीमंत छत्रपती स्वामी, करवीर संस्थान यांच्यासाठी एक प्रत तयार केली. ती दि. २५-१०-१८५१ ला पूर्ण झाली. ही प्रत देवनागरी लिपीत 'विजापूरची आदिलशाही' या नावाने श्री. वा. सी. बेंद्रे यांनी १९६८ साली संपादिली आहे.

**पोर्तुगेज साधने** : गोवे येथील दप्तरात मराठ्यांच्या संबंधी पोर्तुगेज, मराठी, कानडी व फारसी कागदपत्रे आहेत. डॉ. पांडुरंग स. पिसुर्लेकर यांनी पोर्तुगेज भाषेत लिहिलेली Portuguese E Marathas, Antigualhas, Assentos या पुस्तकांचा प्रस्तुत चरित्रात उपयोग केलेला आहे. याशिवाय त्यांनी लिहिलेल्या Historical commission Proceedings, १० खंड, आणि १९३५ सालच्या भारतीय इतिहास परिषदेत यातील इंग्रजी निबंधाचा उपयोग करण्यात आलेला आहे. यात अकबर, पोर्तुगेज आणि मराठे यांच्यात झालेल्या तहाची विस्तृत माहिती दिलेली आहे. Portuguese E Marathas, Antigualhas, Assentos या पुस्तकात संभाजी राजे, त्यांचे अधिकारी व पोर्तुगेज विजरई, त्यांचे अधिकारी यांच्यातील पत्रव्यवहार, त्याच्यातील लढायांचा तपशील मिळतो. या लढायांच्या इतकी विस्तृत माहिती इतर कोणत्याही साधनात मिळत नाही. ही माहिती शत्रू पक्षाने लिहिलेली असली तरी लढायांचा आणि इतर तपशील डॉ. पिसुर्लेकर यांनी पोर्तुगेज, इंग्रजी आणि मराठी भाषेत उपलब्ध करून दिलेला असल्याने संभाजीराजांच्या कारकीर्दीवर बराच प्रकाश पडू शकतो.

या साधनांव्यतिरिक्त सोळाव्या आणि सतराव्या शतकात भारतात आलेल्या पाश्चात्त्य प्रवाशांची प्रवासवर्णने ऐतिहासिक दृष्टींनी उपयुक्त आहेत. काही लेखकांनी त्या काळातील राजकीय घडामोडींची नोंद केलेली आढळते. प्रत्यक्ष पाहिलेल्या आणि ऐकलेल्या घटनांच्या माहितीवर त्यांनी आपली प्रवासवर्णने लिहिलेली आहेत. या प्रवाशांत जॉन फ्रायर, फादर पिएर द ऑर्लीन्स, जे ओव्हिंग्टन, थेव्हेनो, निकोलाय मानुत्ची, आबे करे यांनी लिहिलेली प्रवासवर्णने शिवाजी, संभाजीच्या काळाच्या दृष्टीने महत्त्वाची आहेत. राजकीय घडामोडींवाचून त्यांनी लोकांच्या चालीरीती, सामाजिक नि धार्मिक रूढी यांचीही माहिती लिहून ठेवलेली आहे.

**जॉन फ्रायर** : डॉ. जॉन फ्रायर ईस्ट इंडिया कंपनीतर्फे १६७२ ते १६८१ पर्यंत हिंदुस्थानात सर्जन होता. दि. ९–१२–१६७२ ला तो इंग्लंडहून निघाला आणि जून १६७३ मध्ये कोरोमँडलच्या किनाऱ्यावर व पुढे तेथून डिसेंबर १६७३ मध्ये तो मुंबईस गेला. सुरत, मुंबई, रायगड, जुन्नर, कारवार, गोवा, वेंगुर्ले, गोकर्ण असा प्रवास करीत फ्रायर १६७७ मध्ये सुरतमार्गे परत गेला. दि. ६–१–१६७९ रोजी इराणातून तो भारतात परत आला आणि १६८१ च्या जानेवारी महिन्यात इंग्लंडला परत गेला. सुरत आणि कारवारच्या वखारीतील इंग्रजांकडून त्याला शिवाजी, संभाजी यांची माहिती मिळाली. तो शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाच्या वेळी उपस्थित होता. कारवारच्या भागात फिरत असताना त्याने संभाजी राजांच्या हैदराबादवरील स्वारीचा वृत्तांत दिलेला आहे.

**फादर पिअेर द ऑर्लीन्स** : हा १६८५ सालापर्यंत गोव्यात होता. तेथे त्याने गोळा केलेली माहिती १६८८ साली पॅरिस येथे छापलेल्या आपल्या 'Histoire De Sevaji, Et De son successeur, Nouveaux Conquerans Dansl' Inde and Histoire des deux conquerans Turtares Qui out Subjbgue La chine पुस्तकात सापडते, ही माहिती पुष्कळशी अपुरी असली तरी ती इतर साधनात मिळणाऱ्या हकीकतींशी जुळणारी आहे. अकबर आणि संभाजी राजांच्या गोव्यावरील स्वारीविषयी त्याने दिलेली माहिती पोर्तुगेज कागदपत्रांशी तंतोतंत जुळते. संभाजीराजांविषयी काहीही विपर्यस्त माहिती त्याने दिलेली नाही.

**निकोलाय् मानुत्ची** : हा इटालियन प्रवासी वयाच्या चवदाव्या वर्षी म्हणजे १६५३ साली प्रवासाला निघाला आणि योगायोगाने १६५६ च्या प्रारंभी सुरतेला पोचला. त्याचे पुढील सारे आयुष्य हिंदुस्थानात गेले व तो १७१७ मध्ये भारतातच मेला. शहाजहान, औरंगजेब, दारा शुखो, शहाआलम, अकबर यांच्याशिवाय शिवाजी, संभाजी, जयसिंग, पोर्तुगेज विजरई इत्यादि बड्या व्यक्तींशी त्याचा संबंध आला होता. मानुत्चीने भारतात आलेल्या अनुभवांची

माहिती लिहिलेल्या पुस्तकाच्या दोन प्रती आणि चित्रांचा संग्रह मॉ बोरो देसलँड याच्या बरोबर १७०१ साली परदेशात पाठविला. १७०५ साली पेर कॅट्रोने ( Pere Catrou ) त्यावरून " Histoire Ge'ne'rale de L' Empire du Mogol depuis sur foundation sur les Memoires de M. Manouchi Venetian या नावाचे पुस्तक छापले. मानुत्चीला या पुस्तकाची प्रत मिळाली. आपल्या मेहनतीवर दुसऱ्याने पुस्तक छापल्यामुळे त्याला राग आला आणि त्याने आपल्या हस्तलिखिताच्या चार भागांच्या प्रती यूरोपला पाठविण्याचे ठरविले. हे लिखाण त्याने १७०१ साली सुरू केले. १९०७ साली विल्यम आयर्विन याने " Storia do Mogor " नावाने मानुत्चीच्या हस्तलिखिताच्या इंग्रजी भाषांतराचे चार भाग छापले. या मोठ्या चार खंडांची संक्षिप्त आवृत्ती आयर्विनच्या मुलीने १९१३ साली छापली. मानुत्ची अशिक्षित होता. त्याने वैद्यकीचे पूर्ण ( ? ) ज्ञान नसताना अनमानधपक्याने, चलाखीने चांगला वैद्य म्हणून कीर्ती मिळविली. तो अनेक हकीकतीत थापा मारतो. बऱ्याच ऐकीव गोष्टींवर आधारलेला मजकूर त्याने लिहिलेला असून त्याच्या लिखाणात अतिशयोक्ती आढळते.

**आबे करे** : हा फ्रेंच प्रवासी १६६८ आणि १६७२ मध्ये भारतात आला. सुरतेला प्रथम उतरून तो दमण, चेऊल, राजापूर, सॅन थोमा येथे फिरला. शिवाजीच्या अधिकाऱ्यांकडून परवाना घेऊन तो १६७३ च्या सुमारास विजापूरच्या बाजूला गेला. ज्या घडामोडी पाहिल्या व ज्या गोष्टी ऐकल्या त्यांची माहिती त्याने दोन पुस्तकांत लिहिलेली आहे. शिवाजी आणि संभाजीबद्दल त्याला आदर होता असे दिसते. शिवाजीच्या एका अधिकाऱ्याने सांगितलेल्या माहितीवरून त्याने संभाजीच्या विषयी लिहिलेले आहे.

**रॉबर्ट ऑर्म** : हा शिवाजी आणि संभाजी यांचा समकालीन नव्हता. त्याने आपले Historical Fragments नावाचे पुस्तक संभाजीच्या मरणानंतर जवळ जवळ ९४ वर्षांनी म्हणजे १७८३ सालाच्या सुमाराला लिहिले. १७६० सालापूर्वी त्याने इंडिया ऑफिसमधील कागदपत्रे पाहिली होती. त्या व भारतात गोळा केलेल्या माहितीवरून त्याने वरील पुस्तक लिहिले. त्यामुळे त्याच्या पुस्तकात आणि इंग्रज वखारवाल्यांच्या पत्रातील मजकुरात साम्य आढळते. संभाजीच्या आयुष्यातील शेवटच्या प्रसंगाचे त्याने केलेले वर्णन १७४० साली कानडी भाषेत लिहिलेल्या ' केवदि तृपविजयम् ' मजकुराशी जुळते, त्यामुळे हा भाग ऑर्मने कानडी मजकुरावरून लिहिलेला असावा असे वाटते.

**संस्कृत साधने** : संभाजीचे दानपत्र, ' समयनय ' ही पोथी, ' बुधभूषण ' व अनुपुराण या संस्कृत साधनांची चर्चा ठिकठिकाणी केलेलीच आहे.

* * *

## परिशिष्ट

### संभाजीराजांच्या कारकीर्दीतील निरनिराळ्या अधिकाऱ्यांची उपलब्ध नावे व ठिकाणे

(१) **अजिरेतर्फ**–सुभेदार महालानिहाय–नारो राम (१६८२)
(२) **अहिवंतगड**–दप्तरदार–शामजी केशव (१६८५)
(३) **अंजनवेल**–बहिरो त्रिंबक, विठ्ठल गोपाळ, गंगाधर दादाजी, रुद्राजी अनंत–अंमलदार (१६८० ते १६८८)
(४) **इंदापूर परगणा**–मुख्य देशाधिकारी–नागोजी बल्लाळ
(५) **उन्नोली**–देशमुख–खंडोजी खोपडे
(६) **कटोरगड**–हवालदार–देवाजी श्रीखंडे
(७) **कऱ्हाड**–मुख्य देशाधिकारी–वेंकाजी रुद्र (१६८४), रंगो विश्वनाथ (१६८५); कोनेर रंगनाथ (१६८५); देशाधिकारी–भानजी गोपाळ (१६८०), बायाजी भास्कर (१६८२),
(८) **कऱ्हेपठार**–हवालदार–जिवाजी नारायण
(९) **कल्याण प्रांत**–सुभेदार व कारकून–शंकराजी मुरार
(१०) **कुडाळ**–देशाधिकारी–गणोराम (१६८०);
सुभेदार व कारकून–भानजी गोपाळ (१६८४)
चिटणीस–जिवाजीराम (१६८४)
देशाधिकारी व देशलेखक–नीळकंठ नारायण (१६८६)
(हुमगाव); देशमुख–बाबाजी सूर्याजी नाइक शिंदे
(११) **कोपळ**–सुभेदार महालानिहाय–रखमाजी बाबाजी
(१२) **कोल्हापूर**–सुभेदार व मुजुमदार– विठ्ठल त्रिंबक महाडकर
(१३) **खेळणा**–हवालदार–कृष्णाजी कोंडा
(१४) **खंदेरी, कुलाबा व सागरगड**–हवालदार–जागोजी फर्जन्द व नागोजी वाघमारे (१६८५–१६८६); मुजुमदार–अंताजी भास्कर
(१५) **गदक**–सुभेदार व कारकून–गोविंद रघुनाथ (१६८५)
(१६) **गुंजणमावळ** : सरनाईक– मालोजी इतबारराव

(१७) **चेउल :** सुभेदार–तिमाजी व्यंकटेश (१६८१); राघो विश्वनाथ (१६८२); हरि शिवदेव (१६८४–८५); रंगाजी सबनीस (१६८५)
देशाधिकारी व देशलेखक–येसाजी अनंत (१६८६)
सुभेदार व हवालदार–रायाजी सदक प्रभु (१६८५–८७)
देसाई व देशकुलकर्णी–बाबाजी (दादाजी) महादेऊ देसाई (१६८५–१६८६)
मुजुमदार–सूर्याजी विसाजी प्रभू–(१६८५–८६)
सुभेदार–येसवंतराव अनंत (१६८५–८६);
तुळसोजी; नरसो सुरो.
हवालदार–रामाजी महादेव व येसाजी फर्जन्द (१६८४)
**हाजिर मजालिसींतील अधिकारी—**
**राजमंडळ**–अंताजी सिवराव कवस (१६८५–८६)
सुभेदार–येसाजीराव दरेकर
सुभेदार हशम पावलोक–बहिरजी पवार, त्रिंबक श्रीपत, कृष्णाजी चव्हाण
मुजुमदार–गनोराम; अदकारी–बाबाजी विठोजी.
देसाई, देशकुलकर्णी व अदकारी–दामाजी आपाजी देसाई (तपे अष्टागर, तपे शिराड)

(१८) **जगदेवगड**–दुर्गाधिकारी–बाळाजी कृष्ण

(१९) **जाऊली**–देशाधिकारी व देशलेखक–काशी रंगनाथ (१६८० ते ८२); कोनेर रंगनाथ (१६८२); विठ्ठल शंकर (१६८४)
सुभेदार व कारकून–गोविंद पुरुषोत्तम.

(२०) **डिचोली**–सुभेदार–मोरो दादाजी (१६८०); विनायक उमाजी × जिवाजी विनायक (१६८१); मोरो दादाजी (१६८२).

(२१) **त्रिंबकगड**–अधिकारी–तेलंगराव, शामराज.

(२२) **दाभोळ**–सुभेदार–वेंकाजी निमदेव, रुद्राजी अनंत, विठ्ठल गोपाळ (१६९४ पर्यंत); सरसुभेदार–गंगाजी दादाजी (१६८७)

(२३) **पन्हाळा**–किल्लेदार–विठ्ठल त्रिंबक महाडकर

(२४) **परळी**–देशमुख–अर्जोजी जरब, नरसो + भास्कर, परताप गुजर.

(२५) **पुणे**–सरसुभेदार–दामाजी रघुनाथ (१६८२)
सुभेदार–बाबाजी तानदेऊ (१६८४)

---

× संभाजी राजांचा शिक्षक उमाजीचा मुलगा ?

+ राघो बल्लाळ अत्रे यांचा मुलगा. राघो बल्लाळ शिवाजीराजांच्या काळात जुन्नरचा सुभेदार होता.

सुभेदार व कारकून–विनायेक उमाजी ( १६८०–८३ )
हवालदार–श्रीयाजी सिव प्रभू ( १६८८ )
( २६ ) **पुरंदर**–सर हवालदार–कोंडाजी भोसले ( १६८६ )
हवालदार, मुद्राधारी व कारकून–बाजी घोलप ( १६८३–८८ )
हवालदार–नेतोजी पालकर
सबनीस–कोंडाजी दामोदर
अजहत सबनीस व चिटणीस–पंताजीपंत बोंकील.
( २७ ) **पोर्टी नोव्हो व फोर्टसेंट डेव्हिड**–हवालदार–गोपाळ पंडित
( २८ ) **प्रचंडगड**–मुद्राधारी–रघोजी अहरराऊ ( १६८१ )
हवालदार–रायाजी तोडकरी; मुतालिक, सबनीस–विसाजी माणकेश्वर
( २९ ) **फलटण**–देशमुख–महादजी नाईक निंबाळकर
( ३० ) **फोंडा**–मुख्य देशाधिकारी–धर्माजी नागनाथ ( १६७७–८८ )
( ३१ ) **बहादुरबंडा**–सबनीस–गणेश रघुनाथ व कासी त्रिमळ
( ३२ ) **भुजबळगड**–सुभेदार–चांदो नारायण
( ३३ ) **भीमगड**–हवालदार–नागोजी इंगले
( ३४ ) **मलकापूर**–देशाधिकारी–जगन्नाथ वैजाजी ( १६८० ); बापूजी त्रिंबक ( १६८२ )
( ३५ ) **मावळप्रांत**–देशाधिकारी–गोपाळ रायाजी; सुभेदार–कासी रंगनाथ
( ३६ ) **माहुलीगड**–किल्लेदार–द्वारकोजी
मेढे–देशमुख–पदाजी नाईक, खेलोजी नाईक भणगे
( ३७ ) **राजकोट जंजिरे**–मुजुमदार–तान्हाजी राम
अधिकारी–आपाजी महादाजी
( ३८ ) **राजापूर प्रांत**–सुभेदार व मुजुमदार–देवाजी विठ्ठल
सुभेदार व कारकून–गंगाजी दादाजी
( ३९ ) **रायगड**–दप्तरदाज–राघो स्वानंद, बापोजी दिवाकर चिमणगावकर, महादाजी कृष्ण उपनाम चिरमुले; हवालदार–कान्होजी भांडवलकर
किल्लेदार–येसाजी कंक, चांगोजी काटकर
रत्न शाळेचा अधिकारी सेवक, **राजमंडळ**–बहिरजी नाईक घाटगे.
सर्व राजगृहीची कामे–रघुनाथ पंडितराव; इमारतीची डागडुजी आणि व्यवस्था पाहणारा अधिकारी व सुभेदार–हिरोजी इंदूलकर ×
तर्फ बिरवाडी–देशमुख–संभाजी नरसोजी गायकवाड

× याला १६८७ मध्ये संशयावरून कैद करण्यात येऊन त्याच्या कागदपत्रांची झडती घेण्यात आली.

( ४० ) **रोहिडा**–हवालदार–शिदोजी जाधव ( १६८५–८८, ८९ )
( ४१ ) **रोहिडखोरे**–सबनीस–कृष्णाजी दादाजी नरसप्रभू
देशमुख–बाजी सर्जाराव जेधे
( ४२ ) **लांबगाऊ**–देशाधिकारी व देशलेखक–बालाजी भास्कर
( ४३ ) **तपे वनखळ**–अधिकारी–प्रयागजी दिनकरराऊ
( ४४ ) **वंदन**–देशमुख–बाळाजी अनंत अंगापूरकर
( ४५ ) **वाईप्रांत**–देशाधिकारी व देशलेखक–येसाजी मल्हार ( १६८०–८२; १६८७–८८ ); देशाधिकारी–अंताजी सबदेव ( १६८५ )
देशमुख–दत्ताजी केशवजी नाईक पिसाळ
( ४६ ) **विचित्रगड**–हवालदार–संताजी निंबाळकर ( १६८५ )
( ४७ ) **विशाळगड**–पोतदार–मल्हार रंगनाथ
( ४८ ) **विंझर**–मुजुमदार–गदाजी प्रभू; हवालदार–केशोराम
( ४९ ) **शिरवळ**–देशमुख–मल्हारजी, अप्पाजी यशवंतराव निगडे.
( ५० ) **शिराळे**–कृष्णाजी भास्कर
( ५१ ) **सज्जनगड**–मुद्राधिकारी–ज़िजोजी काटकर
अधिकारी–वासुदेव बाळकृष्ण, कृष्णाजी भास्कर
( ५२ ) **सातारा**–तर्फ सुभा महालानिहाय प्रांत :
सरसुभेदार–अंबाजी मोरदेऊ ( १६८५ ) देशाधिकारी–कोनेर रंगनाथ
( ५३ ) **सासवड**–हवालदार व कारकून–आंताजी गोविंद
सबनीस व चिटणीस–कृष्णाजी गोविंद ( १६८३ )
( ५४ ) **साल्हेर**–किल्लेदार–असोजी
( ५५ ) **सिंहगड**–कारखानीस–मोरो भास्कर
( ५६ ) **सुधागड**–तर्फ सुभाकिलेहाय–सुभेदार–जिवाजी हरी
( ५७ ) **सुपे**–परगणा–मुख्य देशाधिकारी–नागोजी बल्लाळ ( १६८०–८१ )
( ५८ ) **सुवर्णदुर्ग जंजिरे**–सुभेदार–बहिरो त्रिंबक, विठ्ठल गोपाळ, गंगाधर दादाजी, माहादाजी बल्लाळ, रुद्राजी अनंत.
( ५९ ) **सोनस सोलसे**–हवालदार व कारकून–मुकुंद शंकर ( १६७९ )
( ६० ) **हिरडस मावळ**–देशमुख–शंकराजी नाईक बांदल.

* * *

# संदर्भ साहित्य आणि संक्षिप्त सूची


श्री शिवछत्रपति–संकल्प, शिवचरित्राची प्रस्तावना, आराखडा व साधने, लेखक–त्र्यं. शं. शेजवलकर, मराठा मंदिर प्रकाशन, मुंबई — शिछ–शे

अखबारात-इ-दरबार-इ-मुअल्ला (जयपूर), औरंगजेबका जुलूसी सन २५ ते ३२. — अख

अर्वाचीन महाराष्ट्रेतिहास कालातील राज्यकारभाराचा अभ्यास भाग १ ला, इ. स. १६००–१६८०, पुणे विद्यापीठ प्रकाशन, पुष्प ३ रे, शं. ना. जोशी. — अमराअ–जो

आठल्ये घराण्याचा इतिहास–प्रथम व द्वितीय खंड, लेखक–वि. रा. आठल्ये, भा. इ. सं. मंडळ पुरस्कृत ग्रंथमाला, क्र. ३६. — आघइ–आ

आज्ञापत्र–अमात्यकृत मराठे शाहीतील राजनीती, संपादक–डॉ. प्र. न. जोशी, व्हीनस प्रकाशन, पुणे १९६०. — आप–जो

इतिहास आणि ऐतिहासिक (मराठी), मासिक, संपादक–द. ब. पारसनीस, भाग ५ वा, खंड २ रा; सातारा, भाग ६ वा, खंड ३ रा. — इऐमा–पा

इतिहास संग्रह (मराठी) मासिक, संपादक–द. ब. पारसनीस पुस्तक १ ले, अंक १२, जुलै, ऑक्टोबर १९०९, पुस्तक २ रे, अंक ३ रा, १९१०, पुस्तक ३ रे, अंक ७, ८ व ९ फेब्रुवारी ते एप्रिल १९११, सातारा. — इतिसं–पा

उग्रप्रकृति संभाजी, लेखक–गो. स. सरदेसाई — उसं–स

ऐतिहासिक संकीर्ण साहित्य, खंड १ ला, ५ वा व ८ वा (मराठी), भा. इ. सं. मंडळ स्वीय ग्रंथमाला, क्र. ३५, ६१ व ८५, पुणे. — ऐसंसा

ऐतिहासिक साधने ( १५८८ ते १८२१ ), संपादक– शां. वि. आवळसकर, महाराष्ट्र शासन, ऐतिहासिक कागदपत्र व पुरातन स्मारक सल्लागार मंडळ, १९६३ — ऐसा–आजो

ऐतिहासिक पोवाडे अथवा मराठ्यांचा काव्यमय इतिहास, संपादक व संशोधक–य. न. केळकर, महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृति मंडळ पुरस्कृत; टिळक महाराष्ट्र विद्यापीठ प्रकाशन, सुवर्णमहोत्सव ग्रंथ, ३, १९६९. — ऐपो–के

औरंगजेबनामा–अर्थात् मुघल सम्राट महिउद्दीन मोहम्मद औरंगजेब अलमगीर बादशाह का सचित्र इतिहास, मासिर-इ-आलमगिरी का भाषांतर, अनुवादक– मुन्शी देवी प्रसादजी, वेंकटेश प्रेस, मुंबई. — औना–मुदेप्र

काव्येतिहास संग्रह, क्र. ३१, ऐतिहासिक पत्रे, यादी, वगैरे ( मराठी ), संपादक–का. ना. साने १८८८. — काव्येसं–सा

गोवळकोंड्याची कुत्बशाही ( मराठी–इंग्रजी ), लेखक– वा. सी. बेंद्रे, भा. इ. सं. मंडळ स्वीय ग्रंथमाला, क्र. ३९, १९३४ पुणे. — गोकुत्ब–बें

चिटणीस घराण्याची संक्षिप्त माहिती व सनदापत्रे ( मराठी ), संपादक–बा. स. कुलकर्णी, पुस्तक १ ले, दादर, मुंबई. — चिघमा–कु

छत्रपति शिवाजीमहाराज, लेखक–दि. वि. काळे, पुणे विद्यापीठ प्रकाशन १९६१. — छशिम–का

मराठ्यांची बखर–ग्रँट डफ — ग्रँट डफ

मल्हार रामराव चिटणीस विरचित, शिवछत्रपति महाराज यांचे सप्तप्रकरणात्मक चरित्र ( मराठी ), संपादक–का. ना. साने, काव्येतिहास संग्रह, १८८९ पुणे. — सशिचिब

मल्हार रामराव चिटणीस विरचित, श्रीमंत छत्रपति संभाजी महाराज यांचे चरित्र ( मराठी ), संपादक– का. ना. साने, आवृत्ति ३ री, १९१५ पुणे. — मराचिब

केशवपंडितकृतम् धर्मकल्पलतान्तर्गतनीतिमंजर्याम् दण्ड- नीतिप्रकरणम् ( संस्कृत, इंग्लिश ) संपादक–वा. — दंनीति

सी. बेंद्रे, भा. इ. सं. मंडळ स्वीय ग्रंथमाला, क्र. ५९, १९४३ पुणे.

ताराबाईकालीन कागदपत्रे खंड १ ला, संपादक– आप्पासाहेब पवार, शिवाजी विद्यापीठ ऐतिहासिक ग्रंथमाला, पुष्प १ ले, कोल्हापूर. — ताकाका–प

दक्षिणेतील सरदारांच्या कैफियती, यादी वगैरे, संपादक–श्री. ग. चिं. वाड, पु. वि. मावजी आणि द. ब. पारसनीस १९०८.

पेशवे दप्तर-संग्रह किंवा पुणे एलिनेशन ऑफिस (मराठी), (अधिक संक्षिप्ते : पुणे जमाव पुज, शाहूदप्तर–शाद, शाहू रोजकीर्द–शारो; रुमाल–रु.) — पेद

पेशवे दप्तर–ग्रंथमाला, क्र. ३९, १९३४ पुणे — पेदग्रं

पेशवे दप्तरातील सनदापत्रातील माहिती, (मराठी) संपादक–द. ब. पारसनीस, १९१७, मुंबई. — पेदसं

पोर्तुगेज मराठे संबंध अर्थात् पोर्तुगेजांच्या दप्तरातील मराठ्यांचा इतिहास, लेखक–डॉ. पां. स. पिसुर्लेकर, पुणे विद्यापीठ प्रकाशन, १९६७, पुणे. — पोमसं–पि

श्रीमंत पंत अमात्य संस्थान बावडा यांचे वंशवृत्त, लेखक– रामचंद्र महादेव बरवे, कोल्हापूर, १९१५ — पंअसंबा–ब

भोंसल वंश चरित्र तंजापुरी श्री बृहदीश्वरालक्ष्य शिलालिखित भोंसलवंशचरित्र. Tanjor Saraswati Mahal Series No. 46 — भोवंच

श्री मच्छंभुनृपविरचितम् बुधभूषणम् (संस्कृत-इंग्लिश) Edited by H. D. Velankar and published by Bhandarkar Oriental Research Institute's Government oriental series, class 3, No.2, 1926, Poona — बुधभू–वे

भारतवर्ष मासिक–(मराठी), १–प्रतिनिधीची बखर, संपादक–वि. का. राजवाडे, पुणे. — पंप्रब–भाव

मराठ्यांच्या इतिहासाची साधने (मराठी), खंड२, १९००, खंड८, १९०३, खंड१०, १९०९, खंड१५, १९१२, खंड१६, १९१२, खंड१७, १९१३, खंड १८, १९१४, खंड२०, १९१५, खंड२१, १९१८. संपादक–वि. का. राजवाडे, पुणे. — मइसा

महाराष्ट्र इतिहास मंजिरी ( मराठी ), पूर्वार्ध, संपादक–द. वि. आपटे, १९२३, पुणे — मंजिरी
मराठे व औरंगजेब, लेखक-सेतुमाधवराव पगडी, ज्ञानराज प्रकाशन, १९६३ पुणे. — मवऔ–प
मराठी दप्तर, रुमाल १ ला श्रीमंत महाराज भोसले यांची बखर – शेडगांवकरांकडील ( मराठी ), संपादक–वि. ल. भावे, ठाणे. — मदरु
हिंदुस्थानचा अर्वाचीन इतिहास–भाग २ रा, मराठी रिसायत; श्री. गो. स. सरदेसाई, बडोदे १९१५
मराठेकालीन समाजदर्शन, संपादक–शं. ना. जोशी, सत्कार समिती, १९६०. — मकास–जो
मराठी साम्राज्याची छोटी बखर ( मराठी ),संपादक–ज. बा. मोडक, काव्येतिहाससंग्रह क्र. २९,१८८९ पुणे. — मसाछोब
मराठ्यांचे स्वातंत्र्ययुद्ध, लेखक – सेतुमाधवराव पगडी, जोशी, लोखंडे प्रकाशन, १९६२, पुणे. — मस्वायु–प
महाराष्ट्राची राजकीय पंढरी रायगड, लेखक–प. रा. दाते, १९६२ — मरापंरा–दा
मावळंकर सरदेसाई घराण्याचा इतिहास, पूर्वार्ध व उत्तरार्ध, संपादक–गो. स. सरदेसाई, १९३०, कोल्हापूर. — मासघ–स
मोगल मराठा संघर्ष, लेखक–सेतुमाधवराव पगडी, चित्रशाळा प्रेस प्रकाशन, १९६४, पुणे. — मोमसं–प
रामदास आणि रामदासी, ग्रंथावली ( मराठी ), भाग ३ रा, जेधे देशमुख, भाग ९ वा, सर १ला, आणि ९ वा, संपादक–शं. श्री. देव, धुळे. — राम–ग्रं
वार्षिक इतिवृत्त-भा-इ-सं. मंडळ अहवाल, स्वीय ग्रंथमाला क्र. १ शके १८३२, क्र. ७, शके१८३५, क्र. ९, शके १८३६, क्र. ११, शके १८३७, क्र. १७, शके १८३८, ( मराठी ), पुणे. — वाइवृ
विजापूरच्या आदिलशाहीचा इतिहास ( मराठी ), लेखक–बा. प्र. मोडक आणि दि. गो. वझे १८८६ कोल्हापूर. — विआइ

| | |
|---|---|
| विजापूरची आदिलशाही; 'बुसातिन–उस–सलातीन' या फारसी ग्रंथाचे न. वि. पारसनीस कृत मराठी भाषांतर, संपादक–वा. सी. बेंद्रे | विआ–पा (बु–स.) |
| शिवचरित्रप्रदीप (मराठी), संपादक–द. वि. आपटे व स. म. दिवेकर, भा. इ. सं. मंडळ पुरस्कृत, ग्रंथमाला, क्र. ४, १९२५ पुणे. | शिचप्र |
| शिवचरित्र साहित्य (मराठी), खंड १ ते १३, भा. इ. सं. मंडळ ग्रंथमाला, पुरस्कृत, पुणे. | शिचसा |
| शिव–चरित्र–वृत्तसंग्रह, खंड १, २, ३. | शिचवृ |
| शिवकालीन पत्रसारसंग्रह, त्रिशत सांवत्सरिक शिवस्मारक ग्रंथावली, शके १८५१, होळकर सरकार पुस्तकमाला, पुस्तक १४ वे. | शिपसासं |
| शिवाजीची राजनीती, लेखक. भा. वा. भट | शिरा–भ |
| कवीन्द्र परमानन्दकृत 'श्री शिवभारत' (संस्कृत) संपादक–द. वि. आपटे व स. म. दिवेकर, भा. इ. सं. मंडळ पुरस्कृत, क्र. ३, १९२७, पुणे. | शिवभा |
| सनदापत्रातील माहिती (मराठी), संपादक–पु. वि. मावजी व द. ब. पारसनीस, १९१३, पुणे. | समपा–पा |
| सरस्वति मंदिर (मराठी) संपादक–वि. का. राजवाडे. | समंमा |
| समयनय : गागाभट्टकृत : Manuscript in the Limaye collection, Bhandarkar Oriental Research Institute, Poona | समय |
| शिवछत्रपति यांची बखर (मराठी), लेखक–कृ. अ. सभासद, संपादक–का. ना. साने, ४ थी आवृत्ती, १९२७, पुणे | सभाब |
| संभाजीकालीन पत्रसारसंग्रह (मराठी), भा. इ. सं. मंडळ स्वीय ग्रंथमाला, क्र. ७५, १९४९, पुणे. | संकापसं |
| संमेलन वृत्त :–भा. इ. सं. मंडळाचे (मराठी), द्वितीय, शके १८३६ चे, तृतीय, शके १८३७ चे, स्वीय ग्रंथमाला, क्र. ८ व १२, पुणे. | संमेवृ |
| सावंतवाडी संस्थानचा इतिहास (मराठी), लेखक–गो. का. चांदोरकर. | सासंइ–चां |
| हिंदवी स्वराज्य आणि मोंगल, लेखक–सेतुमाधवराव पगडी, १९६६, पुणे. | हिंस्वमो–प |

| | |
|---|---|
| मंत्री दत्ताजी त्रिमल वाकेनिविस विरचित श्री शिवछत्रपतींची ९१ कलमी बखर आणि भोसले घराण्याची चरितावली. संपादक–स. वि. प्रभू, व्हीनस प्रकाशन, पुणे १९६२. | एकब |
| श्रीसमर्थ सांप्रदायाची कागदपत्रे, रामदास आणि रामदासी ग्रंथमालेचे भाग. | श्रीसांका |
| श्रीसमर्थ चरित्र, लेखक–सदाशिव खंडो आळतेकर, शके १८५५ सन १९३३ | श्रीसच–आ |
| दानपत्र–संभाजी, म. म. द. वा. पोतदार संग्रह | दानपत्र |
| शिवदिग्विजय (श्री शिवाजी महाराजांची बखर) संपादक : पांडुरंग रामचंद्र नंदुरबारकर आणि लक्ष्मण काशिनाथ दांडेकर, शके १८१७, बडोदे | शिदिब |
| मोगल आणि मराठे (तारीखे दिल्कुशा) संपादक–श्री सेतुमाधवराव पगडी. | मोआम–प |
| प्रभु रत्नमाला–श्री मुजुमदार स. ब. | प्रर–मु |
| नवभारत मासिक जून, १९६१ सप्टेंबर, ऑक्टोबर, नोव्हेंबर, डिसेंबर १९६९, प्राज्ञपाठशाळा, वाई | |
| भारत इतिहास संशोधन मंडळ त्रैमासिक, आश्विन, पौष शके १८४४ व चैत्र १८४५ वर्ष ३ अंक २–३–४. | भाइसंमं–त्रै |
| आंगरेकालीन अष्टागर (अधिकारी शकावली) कोकणच्या इतिहासाची साधने द. वि. आपटे स्मारक मंडळाने पारितोषिक दिलेला निबंध–शांताराम विष्णु आवळसकर शके १८६९, इ. स. १९४७. | आंकाअ–आ |
| चेऊल बखर | |

| | |
|---|---|
| Annals of the Bhandarkar Oriental Research Institute, Poona, XVI, Parts III and IV | ABORI |
| Surendra Nath Sen, Administrative System of the Marathas : Publishers: University of Calcutta : 1923. | ASM–SNS |
| Pandurang S. Pissurlenkar : Assentos: Do Conselho Do Estado, Vol. IV, 1659 to 1695: Published: 1956. | ASNT–PP |
| Jadunath Sarkar, Dr. Bhandarkar Commemoration Volume, pp. 296 to 307. A chapter from the life of Shivaji ( 1665–1666 ), Bhandarkar Oriental Research Institute; Poona, 1917. | BCV |
| Journal de Boureau Deslandes, Archieves Nationale, Paris : B. I. S. M. Quarterly Vol. III, 1923, Published : Poona. | BISM–QP |
| Cambridge History of India: Published: | CHI |
| Dutch Records, Dagh Register: | DR–DR |
| English Records on Shivaji ( 1659 to 1682 ) Shivaji Tercentenary Memorial Series, Vol VI, Shiv Charitra Karyalya, Poona, 1931. | ERS |
| Father Pierre Joseph D' Orleans ( Translation ); History of Shivaji and his Successor–Recent Conquerors in India, Published in English Records on Shivaji. | ERS–ORN |
| Relations between the French and the Marathas ( 1668–1815 ) Dr. V. G. Hatalkar, Bombay, 1958. | FMR–H |
| Surendra Nath Sen: Foreign Biographies of Shivaji, Vol. II, Book Company Ltd., Calcutta, 1931. | FBS–SNS |
| Dr. John Fryer and Thomas Roe Travels in India in the Seventeenth Century; | FY–TI |

Trubner & Co., London : 1853.

Factory Records, East India Company's Records, India Office, London ( Manuscript: Unpublished. ) V. S. Bendrey's collections: Abrevations further used:

O. C. – Original Correspondence.

Orme MSS – Orme's Notes and Selections.

HM–Home Miscellaneous.

B. Sec. –Bombay Old Secretariat Records.

Con. – Consultation.

Ltrs – Letters.

Bom. – Bombay Factory.

Cho. – Chopda Factory ( Agency )

Coni. – Conimer Factory.

Conj. – Conjeevaram.

Cuda. – Cudalore Factory.

Des. – Despatches.

Dorn. – Dharangaon Factory ( Agency )

Ft. St. G. – Fort St. George or Madras Factory.

Car or Kar. – Carwar Factory; Capt. Keigwin–Keig.

Lon. – London Head Office, East India Company: Mahim to Bom.

Mech.–Mechalipatan Factory. (Masulipattam. )

PN. – Porto Novo Factory.

Raja. – Rajapur Factory.

Sur. – Surat Factory.

( Some serial number of Volumes, repeat every year. ) FR

| | |
|---|---|
| Jadunath Sarkar, History of Aurangzib based on original sources, Indian Educational Service ( Bihar ), Volume IV, Southern India, 1645-1689, M. C. Sarkar & Sons, Calcutta, 1919. | HAZ |
| Prof. V. D. Varma ( Translation. ): Hadiqat -ul-Alam or The History of the Qutb-shahi Rulers of Golkonda. | HA |
| Robert Orme; Historical Fragments of the Mogul Empire, of the Marathas and the English Concerns. - In Indosthan from the Year M. DC. LIX. | HF-RO |
| Satyanath Aiyer : History of the Nayaks of Madura: Madras University Series II, Oxford University Press, Madras, 1924. | HNM-A |
| Sir Jadunath Sarkar, House of Shivaji, Studies and documents on Maratha History ( Royal Period ): 3rd Edition: M. C. Sarkar & Sons Ltd., Bankim Chatterjee Street, Calcutta, 1955. | HOS-JS |
| Historical Records Commission. Proceedings of Meetings, Vol. X, Tenth meeting held at Rangoon; Calcutta, Government of India, Central Publication Branch, 1928 ( Prince Akbar ) | HRCPM |
| Surendra Nath Sen, Editor : Indian Travels of Thevenot and Careri : Indian Records Series, Published by the National Archieves of India, New Delhi, 1919. | ITTC |
| The Judicial System of the Marathas by Vithal Trimbak Gune - Deccan College. Dissertation series - 12, 1953, Poona. | JSM-G |
| Elliot and Dawsonn ( Translation ): Muntakhabullubbab-Muhammad Hashim, | KK-ED |

The History of India by her own Historians, Vol. VII, London.

Sir Jadunath Sarkar, Maasir-i-Alamgiri by Saqa Mustad Khan, Bibliothic India's Work, No. 279, Issue No. 1558, Royal Asiatic Society of Bengal, 1947 : Calcutta. — MA-JS

Modern Review, Calcutta, Volumes XV, XVI and XVII, Calcutta. — MR

G. S. Sardesai, " New History of the Marathas " ( New Edition ) : — NHM-GSS

K. D. Swaminathan, The Nayaks of Ikkeri, Office of the Government Epigraphist for India, Ootacamund, P. Varadaraj & Co.; 8, Linghi Chetty Street, Madras-19. — NI-KS

Oxford Historical and Literary Studies, Volume 6, Keigwin's Rebellion ( 1683 to 1684 )-An Episode in the History of Bombay, by Ray and Olive Stratcher, Clarendon Press, Oxford, 1916. — OHLS

Proceedings of the Indian History Congress: — PIHC
Allahabad, 2nd Session ...... 1938
Calcutta, 3rd ,, ...... 1939
Delhi, 11th ,, ...... 1945
Poona Jubilee Session of 1935
Published in 1938. B. I. S. M. - PJS

G. S. Sardesai, Editor: Paramanandakavya of Kavindra Paramanand; Published by Oriental Institute, Baroda, Gaekwad's Oriental Series, No. CXX — PK-GSS ( पका-स )

Pandurang Pissurlenkar: Portuguese E Marathas II, Sambhaji, Nova-Goa, 1928. — PM-PP

Ruka' at I Alamgiri : — RA

Raghubir Sinh and Jadunath Sarkar (Translation ), Rajasthani Records, Shivaji's — RRSA-RSS

visit to Aurangazib at Agra (A collection of contemporary Rajasthani letters from the Jaipur State Archieve), Indian History Congress Researcb Series No. 1, 1963, Calcutta.

Rise of the Maratha Power–M. G. Ranade; Classics of Indian History and Economics, 1961. — RMP-R

Nicholas Manucci, Storia Da Mogor (Indian Texts Series), Volume II and III, Translated with Introduction and Notes by William Irvine, London, 1907. — SM–NM

Sir John Woodroffe: Introduction to Tantra S' Astra, Ganesh & Co. Madras Private Ltd. 1963 (4th Edition): — TNS-W

The Muslim Rule in India–V. D. Mahajan, 1962. — MRI–M

Dr. B. Muddachari, Mysore Maratha Relations in the 17th century, Prasaranga University of Mysore, 1969. — MMR–BM

Lt. col Mark Wilks: Historical Sketches of the South of India in an attempt to trace the History of Mysore, 1810; Mysore 1932 — HSHM–W

Epigraphia Carnatica. — EC

* * *

# काही अपरिचित शब्दांचे अर्थ

अनाडी–अज्ञानी
अमदक्ती (आमदरफ्ती)–दळणवळण, वहिवाट. वाहतुकीवरील जकात.
अमानत–सरकारजमा; जप्त.
अवल-सुरुवात, प्रारंभ, प्राथमिक अवस्था.
आकणी ( सोप्याची )–खण, वाटणीचे खण.
आकस कोसीस–आकस, द्वेष, वैर
आद्यंती–संपूर्ण, समग्र, प्रारंभापासून शेवटपर्यंत
आबादानी–लावणी, संचणी
आवर ( आवरणी )–पुन्हा लावणी; आटण्याची क्रिया; लाकडाची रास
इजाफत–देणगी वाढवून देणे
इतबारपण–मानपान
इनामती–पाटलाचे ( वंशपरंपरेचे ) हक्क
इनामती खंडणी–इनामावरील कर
इसापती ( इजाफती )–इनामावाचून मिळकतीच्या इतर गोष्टी
उगवणी–पिकांचे, गावकऱ्यांचे रक्षण
उचापती–उसनी रक्कम, कर्ज
उर्जित–उत्कर्ष करून घेणे
उजूर–उपसर्ग
उपराती–तक्रार, हरकत, आक्षेप
उपार्जना करणे–द्रव्य खंडणी किंव खर्चास देणे
उबार–विश्वास, अब्रू; प्रतिष्ठा
अंगभाडे–नावेवरील कर
कटकीचे शिपाई–सैन्यातील शिपाई
कदीम–कदम, पाय, जुने
कदीम घालणे–प्रवेश करणे
कबिला–बायका माणसे
करीना–हकीकत
कीर्दी–लावणी; रोजनिशी
कीर्दी मामुरी–नापीक जमीन पिकाऊ करणे
कुडकियाचे मोती–पुरुषांच्या कानातील चार किंवा एकाच मोत्याचा दागिना
कुसूर कथला–भांडण, वाद, तंटा
कोचकी–पागोटे
कोटवाडा–सरकारी कचेरीचा वाडा
कोविद ( Covid )–पूर्वी भारतात वापरण्यात येणारे माप; ठिकठिकाणी आणि निरनिराळ्या काळी ३६ ते १४ इंचांपर्यंत याची लांबी असे.
क्रयपत्र–खरेदी पत्र, विक्रीपत्र
खरब–कठीण, कोरडी
खराबे ( खराबा )– अष्टागर – गावठाणात बागायतीच्या जागेत

राहण्यापुरती जागा बांधल्यावर त्याच्या खालच्या जागेला खरावे असे म्हणतात. सन १९२८ पर्यंत ही जमीन—महसुलातून वगळलेली होती

खाजगत—खासगी

खिस्ती ( किस्ती )—हप्ते

खूमवाणी बकाल—जाती, वाणी, दुकानदार

गैर माकुल—अयोग्य, गैरकायदा, मूर्खपणाने

गडाचा घेरीया—किल्ल्याचा परिसर

चापे—चाफ्याची झाडे

चावराणा ( चकबंदी )—बिघे म्हणजे चावर ( चाहूर ) ठरविल्यावर त्याच्या सीमा ठरविणे

जिकीर—त्रास

जुमले—एकूण जमा; समुदाय, पायदळ पलटण.

झाप—नारळाच्या झाडाची फांदी, माडाची चटईसारखी विणलेली झापडी

टकबंदी ( जमाबंदी )—जमिनीचे मोजमाप करून सारा आकारणे

टका—जमीन मोजणीचे एक परिमाण

टकाबंदी—दर टका जमिनीवरील महसूल

डबाले—डबोले

तश्रीफा—सन्मान करणे, मानसन्मान

तकरीर—खोटा आरोप

तकसीम—मर्यादा, हद्द

तमकरे—लुच्चेगिरीने दुसऱ्याचे धन हरण करणे

तमासा पहाणे—मौज पहाणे

तर—नाव

तलवटी—तळाची, पायाखालची, पायाजवळची जमीन

तशरीफ—धारा ठरल्यानंतर गावकामगाराला दिलेले इनाम

तसरीफ—मानधन

तसवीस—त्रास

तसैराचा—तहाचा

तहरह—तह, करार

तक्षीमा—वाटणी

तुरीचे कुटाची—भरडलेली डाळ

दरकदार—श्रेष्ठ हुद्दा धारण करणारा, सरदारी

दस्त-ऐवज—करारनामे, हाताने लिहिलेले कागद

दस्त माफीक—यथायोग्य कर, सारा

दाईज—वारस, नातेवाईक किंवा वारसा हक्क असणारा नातेवाईक

दिवाणात—सरकारात

दिव्य करणे-वादातील खऱ्या-खोट्याचा निर्णय करण्याचा जुना व सर्वमान्य उपाय : तुलादिव्य, अग्निदिव्य, जलदिव्य, विषदिव्य, तंडुल दिव्य

दुम—शेवट, शेपूट, मध्यम

दुमदुमाला—पाठलाग करणे, इनाम स्वाधीन करणे

दुमाला—तोफेच्या पाठीमागील भाग

दुमाले—पाठलाग करणे; ध्यास; इनामाचा एक प्रकार

देशगत वतन—देसाईपणाच्या अधिकाराबद्दल दिलेली इनाम जमीन

धर्मसभा—न्यायसभा, धार्मिक बाबीसंबंधी पंडितांची सभा, पंडित-

पंचांची सभा
धारेबंदी—पिकाचा $\frac{1}{6}$ राजभाग
नग-नगोटी—दागिने
नतीजा—शासन, परिणाम, फळ
नवसेरी—दुरुस्त, माप
नामोश्याचा—नावाजलेला, नामांकित
निघावान—मुजुमदाराच्या खालचा कारकून
निवाडपत्र—सनद, निकालपत्र
पटबारी—गावचे हिशेब ठेवणारा अधिकारी
पटेलगीस झोंबणे—पाटीलकी करता भांडणे, तंटा करणे
परिया—ओढा
पाटस्थळ—बागाईती प्रकार
पारखे—रागावणे, दुसरीकडे जाणे
पेशक—घुसलेला
पोटफोडी—जमिनीचा प्रकार
पोता घेतले—सरकारी खजिन्यात जमा करणे
प्रजाभाग—उत्पन्नापैकी शेतकऱ्याचा हिस्सा
फूट-अंमल—अनेक अधिकाऱ्यांचा अंमल
बखेर—बातमी, हकीकत, इतिहास, वर्णन, तपशील
बदराह—दडपण नसलेले, गैरचाल
बदरी—बंदरी
बाजे सिवार—बाजूचे आवार; इतर; अवांतर
बाजे हरजिनसी कूट—अवांतर हरजिन्नस
बारदार—फळाला आलेली झाडे, बहर येणे
बिलाकुसूर—हयगय न करता
बेमुलाहिजा—दयामाया न करिता
बोले—सांगण्यावरून
भाडे—तोफा
भोगवटा—अनुभव
मजलीस—न्यायसभा
मनसुफी न्याय—न्यायनिवाडा
मनसुबी—न्यायनिवाडा,न्याय,कारस्थान
मनारोखा—मनाई पत्र
मऱ्हमत ( मऱ्हामत )—कृपादान, दान
मसाला रोखा-सरकारातून जाणाऱ्या शिपायाचा प्रवास व जेवण खर्च
महतकदम—पुरातन, पूर्वी
महालच्या सडी—महालच्या लेखी साक्षी, सडीसाक्ष-साक्ष
मालिस्त—धुऊन नेणे, सर्व घेऊन जाणे
मिरासदार—मिराशीचा उपभोग घेणारा
मिरासपट्टी—मिरास जमिनीवरील कर
मिरासी—वतनदार; थळकरी; सरकारसारा नियमितपणे भरून आपले स्वामित्व ठेवणारा
मुकरार—मुक्रर; निश्चित
मुजाका—अडचण, हरकत, प्रतिष्ठा
मुशाहरा—मासिक पगार
मोईन—नेमणूक, तैनात, पगार
मोकदमी—प्रसंग
मोख्तसर—प्रमुख असामी
मोटस्थळ—बागाईती प्रकार
मोबारी—तोंडी
रख्तखाना—कचेरी
राउतात—पागेत
राजपत्र—( १ ) राज्याभिषेक, ( २ ) छत्रपती पदान्वित शिवराजनाम ( संभाजीनाम ) आणि ( ३ )

प्रधानमुद्रा असलेले पत्र
राजभाग—वसुलातील सरकारी हिस्सा
राजमंडळ—राजाचे व मंत्र्यांचे मंडळ
राबिता—सार्वजनिक काम न केल्यास द्यावा लागणारा दंड
राबित्या—खेड्यात गावकार्य करणारा महार
राहाटी—वर्तणूक
राळे—कडधान्य
रुख—वृक्ष
रोखा—रोखापत्र किंवा तगाद्याचे हुकूमवजा पत्र
लारी—सुमारे तीन आणे किंमतीचे नाणे
लावणी-संचणी—नापीक जमीन पिकाऊ करणे
लिगाड—कटकट, लचांड
वज़ाई—खालच्या दर्जावर आणणे; खजिना; कचेरी; कराची मागणी
वरकसी जमीन—हलकी धान्ये पिकविण्याची जमीन
वराता—हुंडी, चेक
वस्तभाव—चीजवस्त; दागदागिने; अलंकार
वणीसोड—चरणावळ; सरकारी माळरानावरील चराऊ कर
वरातदार—स्वार किंवा वसुलीकरिता येणारा शिपाई
वहिताला आणणे—लागवडीस आणणे
वाडवल—जात
वाहाती कास—लागोपाठ पिकविलेली
विळे मामला—मामला विल्हे—मामल्याची तरतूद करून देणे
विल्हेस लावणे—निकाल लावणे
सदरेचा—दरबारात; कचेरीत
सनदेवाईक—अधिकार पत्र किंवा राजपत्र असलेला
समजाविसी कागद—तडजोडीचा अधिकृत कागद
सरफराजी—सन्मान
साल मजकुरी—त्या साली
साक्ष मोझे ( मोच्या )—साक्षी पुरावा
सोळुले—१६ पायल्या
संचणी—जमवाजमव
शिरपाव—मानाची वस्त्रे
शेरणी ( सेरणी )—न्याय मिळाल्यावर सरकारला द्यावयाची रक्कम
हक लाजिमा ( लवाजिम )—ठरलेले मान, हक्क
हरकरा—जासूद
हरकसा—कसाही, कोठूनतरी
हरकी—वाद जिंकल्याबद्दल सरकारात द्यावयाची रक्कम
हरदू खोरियाची—परस्परांची; उभयपक्षी; उभयतांची
हरदोजणांचा—दोघांचा
हलखुद—जागच्या जागी ठेवणे
हातरोखा—आज्ञापत्र; चिठ्ठी; दस्तक
हालखुद—यथास्थित; ठाकठीक
हुकूमबार—शिपाई, हुजूर
हुजूर—स्वतः
हुडकर ( हुंडेकर )—ठराविक दरात माल वाहून नेणारा इसम
हुडे—खंड

* * *

# नामसूची

* * *

## ' स्थल–सूची '

* * *